आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), छत्रपती संभाजीनगर

# शिक्षण मंथन

## शाळा यशोगाथा

## 2024-25




## School Leadership Academy (SLA-MIEPA) Maharashtra

आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।



डॉ.वैशाली जामदार,
**संचालक**,
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), छत्रपती संभाजीनगर

## संपादकीय

शाळा ही विकासाचा पाया भक्कम करणारे एक माध्यम आहे जिथे मुलांना नवे काहीतरी शिकण्याची तसेच स्वतः ला सिद्ध करण्याची संधी मिळते आणि बहुआयामी व्यक्तित्व घडण्याची संधी मिळते. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा आणि व्यक्तिमत्वाचा पाया शाळेतच रचला जातो. शाळेत मिळालेल्या शिक्षणाच्या, संस्कार मूल्यांच्या आधारावर पुढील शिक्षणातील यश अनेकदा पहायला मिळते. शाळेत मिळणाऱ्या शिक्षणावरच देशाचे भवितव्य अवलंबून असल्याने शालेय शिक्षणाचे महत्व अनन्य साधारण आहे. शिक्षण ही व्यक्तीच्या जीवनाची शिदोरी आहे. व्यक्ती, समाज आणि राष्ट्र यांच्या विकासात शिक्षण महत्वाचे आहे असे भारतीय राज्यघटनेत नमूद केलेले आहे.

एकविसाव्या शतकातील जागतिकीकरण, आधुनिकीकरण, आणि सर्जनशीलतेच्या जोरावर प्रत्येक क्षेत्राच्या कक्षा विस्तारत आहेत. अंतराळापर्यंत जाऊन अनेक दिवस तिथेच राहण्याचे विश्वविक्रम आपण पहात आहोत.शिक्षण क्षेत्रात असे बदल दिसत आहेत ज्यात शाळा, मुख्याध्यापक, शिक्षक यांच्या बरोबरच गावकरी, पालक मनापासून सहभागी होऊन ज्ञान मंदिरांना अधिकाधिक सक्षम करत आहेत. यातूनच बालकांना विविध अनुभव देणाऱ्या शाळा समृद्ध होत आहेत हे विशेष.

**“गुरुविना न मिळे ज्ञान,**

**ज्ञानाविना न मिळे सन्मान,**

**जीवन भवसागर तराया,**

**चला वंदू गुरुराया”**

महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा) छत्रपती संभाजीनगर मार्फत महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील उत्तम व वेगळा मार्ग स्वीकारून सकारात्मक बदल घडवून

आणलेल्या शाळांची माहिती मागविण्यात आली होती त्यानुसार एकूण प्राप्त 108 शाळांची माहिती प्राप्त झाली, त्यापैकी 78 शाळांची निवड करून त्यांचे Case Study Documentation करण्यात आले.

भारतीय नीतिमत्तेत रुजलेली शिक्षण प्रणाली जी सर्वाना दर्जेदार शिक्षण देऊन भारताला समतापूर्ण आणि चैतन्यशील समाजात रुपांतरीत करण्यासाठी योगदान देत आहे.शिक्षणातून साक्षरता आणि संख्याज्ञान ही मुलभूत कौशल्ये मुलांनी हस्तगत करायची आहेतच त्यासोबतच सांस्कृतिक जागरूकता, सहानुभूती, चिकाटी, नेतृत्व, संवाद यातून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व फुलत आहे. यातूनच अध्यापन शास्त्रीय आणि मूल्यमापन पद्धतींमध्ये सुधारणा, शिक्षक प्रशिक्षणातून सबलीकरण यावर विशेष लक्ष दिले जात आहे. उर्जावान पाठ्यपुस्तके, क्षमता वृद्धीसाठी ई-सामग्री, कार्यक्षम प्रशासनासाठी विविधांगी उपक्रम, कार्यक्रम यातूनच शाळा विकासकेंद्रे होत आहेत.

**“अज्ञानावरती मात करूया,**

**पेटविण्या ज्ञानज्योती,**

**अभिमान आहे आम्हास,**

**घडतात इथे माणिकमोती”**

अनेक परिवर्तनाची मालिका घेऊन नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आले आहे.प्रत्येक बालकाचा विकास अग्रस्थानी ठेऊन या ध्येयसिद्धीसाठी अनेक कालसुसंगत बदल होत आहेत. शैक्षणिक संशोधने आणि विविध प्रयोगातून नवे विचार, नव्या पद्धती, आधुनिक तंत्राचा वापर शालेय शिक्षणात होत आहे. अशा बदलांची बीजे रुजविण्यासाठी उत्तम शाळांमधील नेतृत्वक्षम मुख्याध्यापक आणि त्यांचे सहकारी शिक्षक अथक प्रयत्न करत आहेत. अशाच सकारात्मक काम करणाऱ्या मुख्याध्यापक आणि शिक्षकांच्या प्रयत्नातून शाळारूपी ज्ञान दालने विकसित होत आहेत. त्यांच्या यशोगाथा निश्चितच आपल्यासमोर मांडताना आनंद होत आहे.

**या उत्साही, ध्येयवेड्या, ध्यासवेड्या मुख्याध्यापक व शिक्षक यांचे मन:पूर्वक अभिनंदन !!!**

आपण वाचकांचे प्रेरक आहात,आणखी प्रेरणादायी विचारातुन महाराष्ट्रातल्या शाळांमधून राष्ट्रीय आव्हाने पेलणाऱ्या समाजाच्या निर्मितीचे स्वप्न निश्चितच साकार होईल.

---

आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।



श्री प्रकाश मुकुंद,
**उपसंचालक,**
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था
(मिपा),छत्रपती संभाजीनगर

## संपादकीय

महाराष्ट्रामध्ये वैविध्यपूर्ण भौगोलिक, सामाजिक व आर्थिक परिस्थिती जिल्हानिहाय बदललेली दिसून येते. या विविधतेमुळे महाराष्ट्र सांस्कृतिक दृष्ट्या समृद्ध आहे, सुजलाम सुफलाम आहे. तेवढाच या विविधतेचा परिणाम म्हणजे अनेक ठिकाणी काही विपरीत परिस्थिती सुद्धा निर्माण झालेली दिसून येते. या विपरीत परीस्थितीतही आपले जीवन यशस्वी व्हावे, विपरीत परिस्थितीला तोंड देत सुजाण नागरिक, सर्वांगीण सुदृढ समाज निर्माण करण्याचा प्रयत्न काही समाज घटकांकडून निरंतर सुरु असतो. या सुधारणावादी घटकांमध्ये महत्वाचा घटक आहे शाळा मुख्याध्यापक.

बालकांचा मोफत शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार प्रत्येक ६ ते १४ वयोगटातील मुलाला मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार प्राप्त झाला आहे आणि मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी शासनाने उचललेली आहे. मुलांना शिक्षण देण्यासाठी गाव, वस्ती, तांडे, वाड्या अश्या प्रत्येक ठिकाणी व्यवस्था केलेली आहे. या वाड्या, वस्त्या, तांडे व गाव यामध्ये वेगवेगळ्या समस्यांना तोंड देत मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण कसे देता येईल यासाठी राज्यातील अनेक मुख्याध्यापक, शिक्षक आपल्या कार्यातून समाजासमोर आदर्श निर्माण करीत आहेत.

**“आव्हाने असो कितीही,**

**सामर्थ्य आमच्या मनात्त आहे,**

**साधावयाचा केवळ बालकांचा विकास आहे.”**

शालेय शिक्षणात काम करतांना, परिस्थिती कितीही विपरीत व प्रतिकूल असली तरी, त्यावर उत्तम काम करण्याचे सामर्थ्य सक्षम शालेय नेतृत्वाजवळ दिसून येते. विद्यार्थ्यांना

शाळेत टिकवून, शिकण्याची गोडी लावण्यासाठी, असा शालेय नेता स्वतःचे शालेय नेतृत्व दृष्टीकोन विकसित तर करतोच, त्यात स्वयंविकास, संघबांधणी, भागीदारी, शालेय प्रशासन या भूमिका व जबाबदाऱ्या यशस्वीरीत्या पेलून अध्ययन अध्यापन प्रक्रियेतून अपेक्षित यश साधण्यासाठी सहकाऱ्यांना प्रोत्साहन देत, सक्षम शालेय नेतृत्वाचा आदर्श निर्माण करतो.

**"ज्ञानाचा सागर म्हणजे शाळा,**

**संस्काराचा गोड झरा म्हणजे शाळा**

**व्यक्तिमत्व विकासाचे वेगळे वळण म्हणजे शाळा**

**मौज मस्तीचा वेगळाच थाट म्हणजे शाळा"**

अशाच मुलांच्या विकास साधणाऱ्या उत्तम शाळांच्या यशोगाथा संकलित करून आपणासमोर ठेवतांना आनंद होत आहे. या यशोगाथा वाचत असतांना आपणास लक्षात येईल की, मुख्याध्यापक आणि शिक्षक केवळ पुस्तकी अभ्यासक्रम पूर्ण करत नाहीत तर विद्यार्थ्यांना जीवन शिक्षण मिळावे यासाठी धडपडत आहेत, या यशोगाथांमध्ये बाल वैज्ञानिक घडण्यासाठी अथक प्रयत्न करणारे मुख्याध्यापक आणि शिक्षक भेटतील. क्रीडा क्षेत्रात विद्यार्थी यशस्वी होण्यासाठी धडपडणारे, आदिवासी दुर्गम भागात मुलांना शिक्षण विषयक सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी प्रयत्न करणारे, दिव्यांगता आव्हान नसून संधी आहे असे मानून शिकणे सोपे करणारे शिक्षक आणि मुख्याध्यापक या यशोगाथांमध्ये वाचायला मिळतील तसेच राष्ट्रीय छात्र सेनेत विशेष अविष्कार दर्शविणाऱ्या, मूल्य शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या नागरिकत्वाच्या विकासाचे प्रयत्न करणाऱ्या शाळा दिसतील, पडीक जमिनीचा परसबागेत कायापालट करणाऱ्या शाळा, निसर्गरम्य बेटावर वसलेल्या कृतीप्रवण शाळा सुद्धा येथे पाहायला मिळतील. गुणवंत विद्यार्थी घडविण्याचा ध्यास बाळगून उज्वल यशाचा प्रेरणादायी प्रवास दर्शविणाऱ्या शाळा येथे पाहायला मिळतील.

**शिक्षणाविषयी असलेली तळमळ शालेय शिक्षणातील प्रत्येक घटकाच्या कार्यातून व्यक्त व्हावी आणि विद्यार्थी हा सुजाण नागरिक व्हावा यासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या या मुख्याध्यापक आणि शिक्षक यांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि शुभेच्छा !!**

---

# जिल्हा अंतर्गत शाळानिहाय यशोगाथा

## अनुक्रमणिका


| अ.क्र | जिल्हा | शाळेचे नाव | क्षेत्र | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|
| 1 | पालघर | जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळा, कोटबी बुजडपाडा, केंद्र,आशागड ता.डहाणू जि.पालघर | आदिवासी, दुर्गम भागातील बहुविध सोयीयुक्त शाळा | 1-58 |
| 2 | पालघर | जिल्हा परिषद शाळा, अर्नाळा किल्ला, केंद्र.बाजार.ता.वसई, जि.पालघर | निसर्गरम्य बेटावर वसलेली कृतीप्रवण शाळा | 59-78 |
| 3 | पालघर | जि.प.शाळा, तणाशी, केंद्र.चिंचणी, ता.डहाणू जि.पालघर | शालेय परिवर्तनात शाळा व्यवस्थापन समितीचा सहभाग | 79-89 |
| 4 | पालघर | जिल्हा परिषद शाळा, कवाडा, लिलकपाडा, पालघर | आदिवासी दुर्गम डोंगराळ भागातील कातकरी व वारली आदिवासी जमातीच्या पाड्यावरील शाळा | 90-104 |
| 5 | ठाणे | ठाणे महानगरपालिका शाळा क्र.५५, आझादनगर, ठाणे | नेचर क्लब | 105-116 |
| 6 | ठाणे | जिल्हा परिषद शाळा,शेलवली बांगर,केंद्र.अल्याणी ता.शहापूर,जि.ठाणे | शिक्षण महोत्सव - आनंदोत्सव | 117-123 |
| 7 | पुणे | जि.प.शाळा जगतापवस्ती (आंबळे),केंद्र.राजेवाडी ता.पुरंदर, जि.पुणे | स्थानिक गरजेनुसार उपक्रम घेणारी शाळा | 124-136 |
| 8 | पुणे | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पिंपळगाव तर्फे महाळुंगे, ता.आंबेगाव,जि.पुणे | ग्रामीण भागातील शिक्षण क्रांतीचा अग्रदूत" स्पर्धा परीक्षा तंत्रज्ञान विकास | 137-158 |
| 9 | पुणे | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाबळेवाडी,मु. वाबळेवाडी पो. शिक्रापूर, ता.शिरूर, जि.पुणे | गुणवंत विद्यार्थी घडविण्याचा ध्यास, त्यातून उज्वल यशाचा प्रेरणादायी प्रवास | 159-174 |
| 10 | पुणे | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, धानोरे, ता.खेड, जि.पुणे. | मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा टप्पा २ - राज्यस्तरावरील प्रथम क्रमांकाची जिल्हा परिषदेची मोठ्या पट संख्येची शाळा | 175-178 |
| 11 | कोल्हापूर | उषाराजे हायस्कूल, राजारामपुरी पहिली गल्ली, कोल्हापूर | राष्ट्रीय छात्र सेना - शाळेचा विशेष अविष्कार | 179-192 |
| 12 | कोल्हापूर | कन्या विद्या मंदिर, कळे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर | विषय निहाय - वाचन कोपरे आणि प्रयोगशाळा | 193-196 |
| 13 | कोल्हापूर | कुमार विद्या मंदिर, गांधीनगर नंबर 3.,गांधीनगर, ता.करवीर, जि.कोल्हापूर | बहुभाषिक विद्यार्थी विकासात शाळेचे योगदान | 197-202 |
| 14 | कोल्हापूर | ताराबाई आण्णासाहेब नरदे हायस्कूल, नांदणी, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर | भौतिक विकासा बरोबरच कृतीयुक्त उपक्रमातून विद्यार्थी विकास | 203-211 |
| 15 | कोल्हापूर | श्री. छत्रपती शिवाजी हायस्कूल, टाकळी, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर | लोकसहभागातून भौतिक सुविधांची उपलब्धता | 212-219 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 16 | यवतमाळ | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, विडुळ, नवी आबादी, पं.स.उमरखेड, जि.यवतमाळ | बदल दी चेंज आबादीचा' एक महत्वाकांक्षी प्रकल्प | 220-242 |
| 17 | यवतमाळ | जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळा, राणी अमरावती, पं.स.बाभुळगाव, जि.यतवमाळ | मेहनत रंग लाई....महादीप स्पर्धेतील यश | 243-246 |
| 18 | यवतमाळ | जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, ब्राह्मणवाडा पश्चिम, प.सं.नेर, जि.यवतमाळ. | वृक्षवल्लीने सजलेली सर्वांग सुंदर शाळा..... | 247-252 |
| 19 | सिंधुदुर्ग | श्रीराम मोरेश्वर गोगटे माध्यमिक व उच्च माध्यमिक (व्यवसाय) विद्यामंदिर, जामसंडे,ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग. | भौतिक सुविधांच्या उपलब्धीतून शाळा विकास | 253-264 |
| 20 | सिंधुदुर्ग | शिवाजी विद्यालय, हिर्लोक, ता.कुडाळ जि.सिंधुदुर्ग | वस्ती शाळेचा प्रगती प्रवास | 265-273 |
| 21 | नागपूर | न्यू इंग्लिश हायस्कुल व कनिष्ठ महाविद्यालय, हम्पयार्ड रोड , काँग्रेसनगर, जि.नागपूर | कनिष्ठ महाविद्यालयाची सातत्यपूर्ण मूल्यमापनात्मक यशस्वी प्रक्रिया | 274-280 |
| 22 | नागपूर | जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा,गोंडखैरी (जुन),पं.स.कळमेश्वर, जि.नागपूर | भाषा विकासात नाविन्यपूर्ण उपक्रमांची साथ | 281-287 |
| 23 | नागपूर | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, गुमगाव क्रं. 2,ता.हिंगणा, जि.नागपूर | क्षेत्रीय उपक्रमातून अध्ययन प्रक्रियेचा विकास | 288-295 |
| 24 | नागपूर | जि.प.प्राथमिक शाळा, कान्होली (गुमगाव), पं.स.हिंगणा, जिल्हा नागपूर | शालेय व्यवस्थापन समितीच्या सक्रीय सहभागातून शारीरिक शिक्षण वस्तू संग्रहालयाची उभारणी | 296-306 |
| 25 | नागपूर | जि. प. उच्च प्राथमिक शाळा मटकाझरी ता. उमरेड ,जि.नागपूर | विविध उपक्रमातून विद्यार्थी व शाळा विकास | 307-313 |
| 26 | नागपूर | मानकर आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, वरोडा, ता.कळमेश्वर जि. नागपूर | सहकार्य तत्त्वातून शाळा विकास | 314-331 |
| 27 | नागपूर | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कळमना, (वेला), केंद्र.बेला,ता.उमरेड, जि.नागपूर | कृतीयुक्त आनंददायी शिक्षणाची कास | 332-336 |
| 28 | नागपूर | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सावंगी (देवळी), केंद्र.देवळी (आमगाव), पंचायत समिती, हिंगणा,जिल्हा परिषद, नागपूर | नाविन्यपूर्ण उपक्रमातून गुणवत्तावाढीसाठी प्रयत्न | 337-344 |
| 29 | मुंबई | मीरा भाईंदर महानगरपालिका घोडबंदर शाळा क्रमांक 9, मुंबई | परिश्रमातून विद्यार्थी विकासाचा ध्यास | 345-355 |
| 30 | जालना | जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा,दुधा,केंद्र किर्ला,ता.मंठा,जि.जालना | लोकसहभागातून विद्यार्थी प्रगती | 356-363 |
| 31 | जालना | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मासेगाव, ता.घनसावंगी, जि.जालना | माझी शाळा, माझे योगदान - ग्रामस्थांची शाळा | 364-369 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 32 | जालना | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, देवपिंपळगाव, केंद्र.काजळा, ता.बदनापुर, जि.जालना | यशोगाथा एका ज्ञानमंदिराची | 370-375 |
| 33 | जळगाव | सौ.कमलाबाई सुंदरलाल अगरवाल गर्ल्स हायस्कूल, रावेर, ता.रावेर, जि.जळगाव | क्रीडा क्षेत्रातील उन्नती | 376-382 |
| 34 | गोंदिया | जि.प.वरिष्ठ आदर्श शाळा, सावली, पो.सावली,केंद्र.डोंगरगाव, प.स. देवरी, जि.गोंदिया | नक्षलग्रस्त क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या यशस्वीतेसाठी शालेय नेतृत्वाची कामगिरी | 383-392 |
| 35 | हिंगोली | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, इडोळी, ता.जि हिंगोली. | विद्यार्थी नेतृत्व विकासातून शोधल्या गुणवत्ता विकासाच्या पाऊलवाटा | 393-400 |
| 36 | हिंगोली | जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, कोंढुर,ता.कळमनुरी, जि.हिंगोली | चला बाल वैज्ञानिक घडवूया | 401-406 |
| 37 | गडचिरोली | जिल्हा परिषद उच्च प्राथमिक कन्या शाळा कुनघाडा रै. केंद्र कुनघाडा रै, पंचायत समिती, चामोर्शी, जिल्हा.गडचिरोली | गाथा स्पर्धा परीक्षेतील उत्तुंग भरारीची | 407-411 |
| 38 | नांदेड | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, आरळी, ता.बिलोली, जि.नांदेड | काढून थोडी सवड, निर्माण करू मराठी भाषेची आवड | 412-417 |
| 39 | नांदेड | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पार्डी (म), ताः अर्धापूर जि.नांदेड | शाळा आणि गाव – अभिमानाचे नाव | 418-423 |
| 40 | नाशिक | शासकीय माध्यमिक कन्या विद्यालय नाशिक, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर,मेहेर सिग्नल, सीबीएस,नाशिक | क्रीडा क्षेत्रातील भरारी | 424-429 |
| 41 | नाशिक | जिल्हा परिषद शाळा भोयेगाव ते पी.एम.श्री भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय शाळा, भोयेगाव, पो.जोपूळ, ता.चांदवड, जि.नाशिक | ई-लर्निंग द्वारे विकासाची भरारी | 430-433 |
| 42 | धाराशिव | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मुर्टा, तुळजापूर, जिल्हा धाराशिव | लिंग समावेशकतेमध्ये शालेय नेतृत्वाची कामगिरी | 434-438 |
| 43 | धाराशिव | जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा केसरजवळगा ता. उमरगा जि. धाराशिव | मूल्य शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांच्या नागरिकत्वाच्या विकासाचे प्रयत्न | 439-442 |
| 44 | धाराशिव | जिल्हा परिषद कन्या प्रशाला, मुरूम,ता.उमरगा,जि.धाराशिव | परसबागेची यशोगाथा | 443-445 |
| 45 | रायगड | रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,पालीकातकरवाडी, मु.पाली तर्फे कोथल, खलाटी, पो.गौळवाडी,ता.कर्जत,जि.रायगड. | अतिपर्जन्य क्षेत्रातील शाळेचा प्रेरणादायी प्रवास | 446-458 |
| 46 | रायगड | रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा,वडगाव, ता.खालापूर, जि.रायगड | शाळेची वाटचाल - तिमिरातून तेजाकडे | 459-464 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 47 | छत्रपती संभाजीनगर | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बनवाडी केंद्र.ओहर ता.जि.छत्रपती संभाजीनगर | आव्हान नव्हे.....संधी | 465-471 |
| 48 | सांगली | जिल्हा परिषद शाळा, शिरगाव कवठे,ता.तासगाव जि.सांगली | Online व Offline ची धरुनी कास, विद्यार्थ्याचा करू विकास | 472-477 |
| 49 | सांगली | जिल्हा परिषद शाळा, माळीवस्ती हरोली, ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली | लोकसहभागातून शाळेचा कायापालट | 478-483 |
| 50 | धुळे | जिल्हा परिषद शाळा वारगांव,केंद्र बेटावद. तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे | यशोगाथा-स्थलांतरित बालकांच्या शिक्षणाची | 484-487 |
| 51 | धुळे | जिल्हा परिषद शाळा,काळखेडे,केंद्र-फागणे, ता.धुळे, जि.धुळे | माध्यान्ह भोजन योजनेतील यशस्विता | 488-496 |
| 52 | धुळे | जिल्हा परिषद शाळा, गोताणे, ता.जि.धुळे | आनंददायी शिक्षणाची यशोगाथा | 497-505 |
| 53 | चंद्रपूर | जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा सिदूर, पं.स.चंद्रपूर, जि.चंद्रपूर | प्रबोधन पालकांचे - ध्येय विद्यार्थी विकासाचे | 506-517 |
| 54 | चंद्रपूर | जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, बोर्डा, केंद्र.बोर्डा, बीट.चिचपल्ली, पंचायत समिती, चंद्रपूर, जि.चंद्रपूर. | सुंदर शाळेने लावला मुलांना लळा | 518-521 |
| 55 | बुलढाणा | जि.प.मराठी उच्च प्राथमिक शाळा वरुड ता. जि. बुलढाणा | माझी आनंददायी, स्वच्छ सुंदर शाळा | 522-536 |
| 56 | भंडारा | नवजीवन विद्यालय अँड जुनिअर सायन्स कॉलेज, जमनापूर, साकोली, वैनगंगा शैक्षणिक परिसर नागझिरा रोड जमनापूर ता. साकोली, जि.भंडारा | शालेय विषयाच्या नाविन्यपूर्ण उपक्रमातून विद्यार्थ्यांचा कृतीप्रवण आविष्कार | 537-546 |
| 57 | भंडारा | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, झाडगाव, केंद्र.सानगडी, ता.साकोली, जि.भंडारा | सामाजिक उपक्रमातून विद्यार्थी विकास | 547-556 |
| 58 | अमरावती | जिल्हा परिषद माध्यमिक कन्या शाळा, कॅम्प, अमरावती | स्थापनेचा सुवर्ण महोत्सव साजरा करणारी शाळा | 557-565 |
| 59 | अमरावती | राष्ट्रीय शेतकी विद्यालय, खोलापूर, ता.भातकुली, जि.अमरावती | भौतिक सुविधांद्वारे कायापालट दर्शविणारी शाळा | 566-576 |
| 60 | अमरावती | चंद्रभानजी विद्यालय, कुंड सर्जापूर, ता.जि.अमरावती | ग्रामिण भागात रुजविली क्रीडा संस्कृती- घडवले हजारो खेळाडू क्रीडा सहभागातील राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त शाळा | 577-581 |
| 61 | अमरावती | शासकीय माध्यमिक आश्रम शाळा, माणिकपूर, ता.वरुड, जि.अमरावती | माणिकपूर आश्रम शाळेची यशोगाथा,तिमिरातूनी तेजाकडे | 582-591 |
| 62 | अकोला | म.न.पा.उच्च प्राथमिक शाळा क्र.२२, कृषिनगर, अकोला | बहुविध उपक्रमातून विद्यार्थी जाणीवा विकसित करण्याचे प्रयत्न | 592-597 |
| 63 | अकोला | महात्मा फुले शिक्षण संस्था,हिवरखेड जि.अकोला व्दारा संचालित सहदेवराव भोपळे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, हिवरखेड,ता तेल्हारा, जि.अकोला | शालेय नेतृत्वाची क्रीडा क्षेत्रातील यशोगाथा | 598-605 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 64 | अहिल्यानगर | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,खोसपुरी, ता.अहिल्यानगर, जि.अहिल्यानगर | लोकसहभागातून विद्यार्थी विकास | 606-612 |
| 65 | अहिल्यानगर | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,भाळवणी, ता.पारनेर, जि.अहिल्यानगर. | पी.एल.सी स्वच्छता मॉनिटर प्रकल्पातील सर्वोत्तम शाळा | 613-640 |
| 66 | बीड | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, देवळा, केंद्र.धानोरा (बु.),ता.अंबाजोगाई, जि.बीड | वाचन उपक्रमातून स्व-अभिव्यक्ती विकास | 641-649 |
| 67 | बीड | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,कारेगव्हाण, केंद्र विठ्ठलपेठ नेकनूर, ता.जि.बीड | लोकसहभागातून भौतिक विकास साधणारी शाळा | 650-660 |
| 68 | बीड | श्री.योगेश्वरी नूतन विद्यालय, परळी रोड, अंबेजोगाई, जि.बीड | मार्गदर्शन शालेय नेतृत्वाचे, सहकारातून यश क्रीडा क्षेत्रातले | 661-665 |
| 69 | सोलापूर | रामभाऊ जोशी हायस्कूल,करकंब,ता.पंढरपूर जि.सोलापूर | क्रीडा क्षेत्रातील यश | 666-672 |
| 70 | सोलापूर | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लोकरेवस्ती, करकंब,ता.पंढरपूर जि.सोलापूर | वस्ती शाळेचा आनंददायी प्रवास | 673-681 |
| 71 | सोलापूर | श्री नवलबाई फुलचंद शहा कोठारी हायस्कूल, शिवगंगानगर भाग 5, कुमठानाका, सोलापूर | विविध उपक्रमातून पटसंख्या वाढीचे यश | 682-690 |
| 72 | सोलापूर | श्री सिद्धेश्वर प्राथमिक शाळा, सिद्धेश्वर पेठ, सोलापूर | जीवन कौशल्यातून विद्यार्थी विकास | 691-701 |
| 73 | सोलापूर | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वैदवस्ती, केंद्र.देवळाली, ता.करमाळा,जि.सोलापूर | वैज्ञानिक दृष्टीकोनाच्या विकासासाठी शाळेचे प्रयत्न | 702-714 |
| 74 | नंदुरबार | नेताजी सुभाषचंद्र बोस आवासीय विद्यालय, तोरणमाळ, ता.धडगाव, जि.नंदुरबार | बालविवाह.....एक समस्या | 715-722 |
| 75 | नंदुरबार | जिल्हा परिषद केंद्रशाळा पाचोराबारी ता. जि. नंदुरबार | आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या विकासात शाळेची भूमिका | 723-741 |
| 76 | नंदुरबार | पीएमश्री जि.प.उर्दु केंद्र शाळा क्र.2 अक्कलकुवा, ता.अक्कलकुवा, जि.नंदुरबार | सहकार तत्त्वातून आदिवासी विद्यार्थ्यांचा विकास | 742-755 |
| 77 | वर्धा | जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा, येळाकेळी, केंद्र.जामणी, पं.स.सेलू, जि.वर्धा | आनंददायी शिक्षण, आनंददायी शनिवार | 756-767 |
| 78 | वर्धा | सरस्वती विद्यालय,धोंडगाव ता.समुद्रपूर जि.वर्धा | व्यावसायिक शिक्षणातून विद्यार्थी व शाळा विकास | 768-773 |

# "आदिवासी, दुर्गम भागातील बहुविध सोयीयुक्त शाळा"

**शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळा, कोटबी बुजडपाडा, केंद्र.आशागड, ता.डहाणू, जि.पालघर.**

**शाळेचा ईमेल आयडी** - sunildeshmukhhm@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.सुनिल अशोकराव देशमुख
**मोबाईल क्रमांक** - 9096718080/7972376725
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - sunildeshmukhhm@gmail.com




**शाळेची स्थापना व विस्तार** -

डहाणू पासून साधारण ११ कि.मी.डोंगराच्या पायथ्याशी वसलेले आदिवासी कोटबी गाव आणि गावात असलेली जिल्हा परिषदची प्राथमिक शाळा कोटबी बुजडपाडा. जि.प.प्राथमिक शाळा कोटबी बुजडपाडा या शाळेची स्थापना दिनांक 4 मार्च 1957 रोजी झाली. आजूबाजूस जवळ एकही माध्यमिक शाळा नसल्याकारणाने विद्यार्थ्यांच्या इयत्ता चौथीच्या पुढे शैक्षणिक नुकसान होऊ लागले आणि हे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी शाळेत सन 2010-11 पासून पाचवीचा वर्ग सुरू करण्यात आला पुढे १ ते ७ वी पर्यंत झाली व विद्येने बहरत गेली. सन 2015 मध्ये इयत्ता आठवीच्या वर्ग सुरू करून प्राथमिक शाळा उच्च प्राथमिक शाळा झाली. शाळेचा पट वाढू लागला. कोटबी गावातील प्राथमिक शाळेचे सर्व विद्यार्थी या शाळेत प्रवेश घेऊ लागले आणि शाळेची उत्तरोत्तर तर प्रगती होऊ गेली. शाळेच्या 7 ते 8 किमी च्या आवारात माध्यमिक शाळा नसल्यामुळे 8 वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणात अडचण निर्माण होत होती त्यामुळे बरेच विद्यार्थी शाळा बाह्य होत होते यावर उपाय म्हणून 9 वी व 10 वी वर्ग सुरु करण्यासाठी सतत प्रयत्न करण्यात आले.अखेर 09/10/2024 पासून शाळेमध्ये 9 वी चा वर्ग सुरु करण्यात आला व शाळेस माध्यमिक स्तर प्राप्त झाला.

**शिक्षकांच्या जबाबदाऱ्याचा नियोजनपूर्वक वापर -**

- श्री सुनील देशमुख सर (मुख्याध्यापक) - शालेय व्यवस्थापन, शालेय शिस्त,शासनाच्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी, शासकीय अनुदान CSR निधी योग्य नियोजन.
- सौ.सुनिता अजय बुजड – शालेय परिसर स्वच्छता करून घेणे,शालेय शालेय व्यावस्थापनात मदत,दाखले व बोनाफाइड लिहिणे,अध्ययन अध्यापन व गुणवत्ता वाढ.
- श्रीम.शिल्पा युवराज बांदल – विविध समित्याच्या सभांच्या आयोजन व अहवाल लेखन, शाळेच्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमाची तयारी व आयोजन,स्पर्धा परीक्षा,चित्रकला स्पर्धाची तयारी.
- श्रीम.अश्विनी मांडे – सांस्कृतिक कार्यक्रमाची तयारी व प्रभावी अंमलबजावणी,स्पर्धा परीक्षा ,क्रीडा स्पर्धेची तयारी,गुणवत्ता वाढ,आनंदी शनिवार अहवाल लेखन.
- श्रीम.अश्विनी माने – शा.पो.आहार रजिस्टर नोंद,सखी सावित्री इ.समित्यांचा अहवाल लेखन , गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न.
- श्रीम.श्वेता वरठा (सहशिक्षिका) - सांस्कृतिक कार्यक्रम नियोजन, शालेय पोषण आहार देखभाल व रजिस्टर, विद्यार्थी गुणवत्तावाढ.
- श्री.तुषार रमेश मलावकर – शाळेचे ओनलाईन कामे,,शालेय व्यावस्थापनात सहकार्य, विद्यार्थी गुणवत्तावाढ.
- श्रीम. नैना धोडी – वर्गाध्यापन, गुणवत्ता वाढ,क्रीडा स्पर्धेची तयारी. विद्यार्थी गुणवत्तावाढ.

**शाळेची वैशिष्ट्ये -**

1. जिल्ह्यातील पहिली ISO शाळा
2. स्वच्छ विद्यालय पुरस्कार 2022-23
3. उत्कर्ष अवार्ड
4. स्त्रीरंग पुरस्कार – अन्नपूर्णा सत्कार 2023
5. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा-1 (जिल्ह्यात द्वितीय क्रमांक)
6. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा-2 (मुंबई विभाग प्रथम क्रमांक)
7. CCTV यंत्रणा
8. किशोरवयीन मुलींसाठी पिंक रूम
9. Rain Water Harvesting
10. वाय- फाय सुविधा
11. संपूर्ण शाळेत साउंड सिस्टीम कनेक्शन
12. गुणवत्तापूर्ण शिक्षण
13. फ्युचरीस्टीक क्लासरूम
14. आकर्षक व सर्व सोई-सुविधायुक्त वर्ग खोल्या
15. सुंदर बगीचा व परसबाग
16. पाकशास्त्रात निपूण असणाऱ्या अन्नपूर्णा
17. डिजिटल वर्ग

18. प्रोजेक्टर द्वारे शिक्षण
19. प्रत्येक वर्गासाठी संगणक तासिका
20. तंबाखू मुक्त शाळा
21. VIRTUAL CLASSROOM
22. सौर उर्जेचा वापर
23. तालुका आदर्श शाळा पुरस्कार
24. विज्ञान प्रयोगशाळा
25. सुसज्ज शौचालय
26. जल शुद्धीकरण युक्त पेयजल सुविधा
27. संगणक कक्ष

**शाळेतील सुविधा -**

1. मोफत गणवेश
2. डिजिटल शाळा
3. सर्व सोयींनीयुक्त शौचालय
4. जल शुद्धीकरण यंत्र क्षमता 1000 ली.
5. सर्व वर्गात प्रोजेक्टर सुविधा
6. ग्रंथालय
7. अद्ययावत संगणक कक्ष
8. वैशिष्ट्यपूर्ण विज्ञान कक्ष
9. सर्व विद्यार्थ्यांसाठी लॉकर सुविधा
10. 10.मुबलक क्रीडा साहित्य
11. प्रशस्त क्रीडांगण
12. सुंदर परसबाग
13. सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती योजना .
14. सुसज्ज स्वयंपाक गृह
15. मुबलक धान्य कोठ्या
16. माध्यान्न भोजन व पूरक आहार
17. सुसज्ज ग्रंथालय
18. मोफत पाठ्य पुस्तके सुविधा
19. WHITE BOARD (dustless classroom)
20. मोफत बूट व मोजे

**विद्यार्थी लाभार्थी योजना -**

**मोफत मध्यान्ह भोजन योजना-पूरक आहार**

1. मोफत गणवेश वाटप योजना
2. मोफत शालेय पाठ्यपुस्तक वाटप योजना
3. सुवर्ण महोत्सवी आदिवासी शिष्यवृत्ती योजना
4. उपस्थिती भत्ता योजना
5. विशेष गरजा असणाऱ्या मुलांसाठी विशेष शिक्षक
6. वर्षातून एक वेळा पूर्ण मुलांसाठी फ्री चेकअप व औषध उपचार
7. किशोरवयीन मुलीचे वर्षातून एकदा चेकअप, मार्गदर्शन, उपचार, जीवन शिक्षण
8. वर्षातून एकदा जंत गोळी वाटप
9. महिन्यातून दर आठवड्याला एक रक्त वाढीची गोळी वाटप
10. महाराष्ट्र राज्य पूर्व प्राथमिक परीक्षा परिषद पुणे शिष्यवृत्ती योजना
11. विशेष गरजा असणाऱ्या मुलींसाठी प्रोत्साहनपर उपस्थिती भत्ता
12. अपंग समावेशित शिक्षण अंतर्गत प्रवास भत्ता , मदतनीस भत्ता
13. संयुक्त शाळा अनुदान योजना
14. 4% सादिल योजना
15. शालेय मदतनीस भत्ता योजना
16. मानव विकास अंतगर्त सायकल वाटप

**विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठी घेतलेले उपक्रम -**

1. अभ्यास मित्र.
2. अतिरिक्त पूरक मार्गदर्शन वर्ग.
3. स्पर्धा परीक्षा वर्ग.
4. गट अध्ययन अध्यापन.
5. वाचनलेखन उपक्रम.
6. संख्याज्ञान व गणितीक्रिया उपक्रम.
7. सामान्यज्ञान वाढ उपक्रम.
8. वाचन कोपरा.
9. अध्ययन कोपरा.
10. Futuristic classroom.
11. I.T LAB .
12. सुलेखन वर्ग .
13. तारखेचा पाढा उपक्रम .
14. गणिती खेळ व कोडी उपक्रम .

15. निबंध,चित्रकला,गीतगायन ,हस्ताक्षर,वक्तृत्व ,वादविवाद स्पर्धा .
16. अभ्यासपूरक चित्रे ,लेख,गाणी ,गोष्टी,कोडी यांची कात्रणे गोळा करून संग्रह करणे.
17. विविध सांस्कृतिक कार्यक्रम .
18. बालसभा .
19. शिवणकाम , भरतकाम, कार्यानुभव वर्ग.
20. विज्ञान प्रयोगशाळेत सोपे प्रयोग करून दाखवणे .

**प्रशासकीय सभा -**

शालेय कामकाज सुरळीत व नियोजनबद्ध रितीने चालू रहाण्यासाठी शाळेत शिक्षक व मदतनीस यांची संयुक्त सभा लावली जाते. यामध्ये सर्व विषयांवर चर्चा होते व नियोजन करून अंमलबजावणी केली जाते.




**पालकांचा सहभाग -**

शाळेची प्रगती फक्त शिक्षक व विद्यार्थी यांच्या प्रयत्नांचे फलित नसून संपूर्ण गावातील ग्रामस्थ व पालकांचा सहभाग महत्त्वाचा आहे. जो या बुजडपाडा शाळेला सतत लाभत राहिला आहे व लाभत राहील.यासाठी वारंवार ग्रामसभा व पालक सभेचे आयोजन केले जाते ,शिक्षकांच्या अडचणी व पालकांच्या त्यावरील उपाययोजना यांची सांगड घालून शाळा सुधारण्यासाठी प्रयत्न केला जातो.



**स्वच्छता/मदतनीसांचा गौरव -**

**स्वच्छ शाळा सुंदर शाळा**

आमच्या मदतनीस शाळेला स्वच्छ व सुंदर बनविण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात.नियोजनानुसार आपली कामे चोखपणे पार पाडतात. शाळेचा परिसर,वर्गखोल्या,स्वच्छतागृहे ,धान्य वारंवार स्वच्छ करतात.

**सोमवार,मंगळवार, बुधवार - 1) श्रीम.मती चीपात, 2) श्रीम.सकु फेसरडा**

**गुरुवार, शुक्रवार शनिवार - 1) श्रीम.वेणी पागी, 2) सौ.स्वाती शिंगाडा**

**उल्लेखनीय कामगिरी -**

सन 2020 मध्ये कोरोना प्रादुर्भाव असल्यामुळे सर्वत्र लॉकडाऊन घोषित केले गेले अशाकाळात आमच्या या, मदतनीस यांनी झाडे लावा झाडे, जगवा हा उपक्रम यशस्वीपणे राबवून सुंदर स्वच्छ शालेय भागाची विशेष काळजी घेतली. त्यानिमित्त शाळेतर्फे त्यांना साडी व श्रीफळ देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

**विशेष बाब -** पोषण आहार सप्ताहामध्ये तसेच 8 मार्च आंतरराष्ट्रीय महिला दिन निमित्ताने होतकरू कार्यशील महिला म्हणून त्यांचा सत्कार करण्यात येतो.

**पोषण पंधरवडा –** पोषण पंधरवडा अंतर्गत तृणधान्य पाककृती स्पर्धेत आमच्या मदतनीसानी भाग घेतला व त्यात प्रथम क्रमांकाने विजयी झाल्या.त्यांना 5000 चे बक्षीस मिळाले.

**सत्कार सोहळा –** 4 मार्च 2024 शाळेच्या वर्धापन दिनी मदतनीसांना साडी व श्रीफळ देवून त्यांच्या कार्याबद्दल गौरविण्यात आले.

**सत्कार सोहळा –** माननीय B.D.O. श्री.गरीबे साहेबांच्या हस्ते दि.3/09/2024 रोजी मदतनीसांना साडी देऊन सन्मान करण्यात आले. शाळेत विविध कार्यक्रमात मदतनीस नेहमीच सहकार्य करतात.






**शाळेला प्राप्त पुरस्कार -**

**मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा – 2 - सन 2024 – 25**

सन 2023 -24 प्रमाणे या वर्षी सन 2024-25 मध्येही शाळेनी या अभियानात सहभाग घेतला हे अभियान 5 ऑगस्ट ते १० सप्टेंबर या कालावधीत होते.इतक्या कमी कालावधीत देखील शासनामार्फत निर्देशित सर्व निकषांची पूर्तता करून शाळेने विजयाची परंपरा ठेवली.केंद्रस्तर,तालुकास्तर,जिल्हास्तर व विभागस्तर पर्यंतच्या पारदर्शक व काटेकोर मुल्यांकनानंतर मुंबई विभागातून प्रथम येण्याचा मान पटकावला.

मा.मुख्यमंत्री श्री.एकनाथ शिंदे साहेब ,शिक्षण मंत्री श्री.दीपक केसरकर साहेब,उपमुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस साहेब शिक्षक आमदार श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे व अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत मुंबई येथे आयोजित बक्षीस वितरण सोहळ्यात शाळा सहभागी झाली व शाळेला 21 लाख रु.चा धनादेश व आकर्षक सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.










## मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा – 1

सन 2023-24 मध्ये शाळेने या उल्लेखनीय अभियानात सहभाग घेतला होता.या मध्ये निश्चित केलेले सर्व निकष शाळेने पूर्ण केले व केंद्रस्तर, तालुकास्तर, व जिल्हास्तर मूल्यांकनात पालघर जिल्ह्यात 2nd (द्वितीय क्रमांकाने) शाळा विजयी झाली.शाळेला 5 लाखाचे बक्षीस व सन्मान चिन्हाने गौरविण्यात आले.




महाराष्ट्र शासनाच्या "मुख्यमंत्री माझी शाळा, सुदंर शाळा" अभियानात
मा . रविंद्र चव्हाण साहेब,सार्वजनिक बाधकाम मंत्री (महा . राज्य), मा . प्रकाश निकम साहेब जि . प . अध्यक्ष पालघर,
मा . डॉ . हेमंत सौरा साहेब खासदार पालघर, मा . आमदार श्री . विनोद निकोले साहेब,मा . आमदार श्री . श्रीनिवास वनगा साहेब,
मा . आमदार श्री . सुनिल भुसारा साहेब,मा . श्री . पंकज कोरे साहेब, जि . प . उपाध्यक्ष पालघर, मा . जिल्हा अधिकारी गोविंद बोडके साहेब,
मा . मुख्य कार्य . अधिकारी भानुदास पालवे साहेब, मा . शिक्षणधिकारी सौ . संगिता भागवत मॅडम यांच्या हस्ते पुरस्कार स्विकारताना





मा.रविन्द्रजी चव्हाण ,विनोद निकोले,श्रीनिवास वनगा, शिक्षणाधिकारी संगीता भागवत यांच्या कडून धनादेश व सन्मानचिन्ह स्वीकारताना जि.प.शाळा कोटबी बुजडपाडा टीम.

**तालुकास्तर गौरव –**

आमची शाळा जिल्हास्तरावर द्वितीय आल्यामुळे तालुकास्तरावर ही शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकांना गौरवचिन्ह देवून सन्मानित करण्यात आले.




**विद्यालय पुरस्कार 2022-23**

केंद्रशासना मार्फत आयोजित जिल्हास्तरीय स्वच्छ विद्यालय पुरस्कार, या स्पर्धेमध्ये सन 2022-23 ला आमच्या शाळेने सहभाग घेतला होता त्या मध्ये जिल्ह्यातील सर्वात स्वच्छ शाळा असल्याचा मान आमच्या शाळेला मिळाला व शाळा जिल्ह्यात पहिल्या क्रमांकाने विजयी झाली.


Swachh Vidyalaya Puraskar

SWACHH VIDYALAYA PURASKAR 2021-22

District Level Award

This is to certify that Z.P. SCHOOL KOTABI BUJADPADA ..... School

With UDISE+Code 27960301003 ..... has received the District Level Award

in Swachh Vidyalaya Puraskar 2021-22 and has achieved an overall score of 95 %

with a overall rating of .....

District Collector

Sub Category Wise Self-evaluation Scores

Rating Norms

लोकमत

कोटबी बुजडपाडा शाळा ठरली जिल्ह्यात स्वच्छ

सर्व मंत्रीमुख्यिांनी घूलून, पेतली दखल

Hello Vasai
Page No. 3 Mar 13, 2024
Powered by: erelego.com

लोकमत

न्यूज Inbox

केंद्र शासनाच्या अभिनव योजनेत प्रथम

पालघर जिल्हा परिषदेच्या यातेने डहाणू तालुक्यातील जि.प.च्या कोटबी बुजडपाडा शाळेला सोमवारी सन्मानित करण्यात आले.

Hello Vasai
Page No. 3 Mar 13, 2024
Powered by: erelego.com

**उत्कर्ष अवार्ड -**

उत्कर्ष संस्थे मार्फत सन 2022-23 साली आयोजित पारितोषिक शाळेला प्राप्त झाले.









**स्त्रीरंग पुरस्कार -**

प्रकल्प कार्यालय डहाणू मार्फत दर वर्षी डहाणू फेस्टिवल कार्यक्रमाचे आयोजन मोठ्या उत्साहात पार पाडले जाते. त्यामध्ये होतकरू महिलांचा सन्मान करण्यात आला.त्या मध्ये आमच्या शाळेच्या चार मदतनीस यांना उत्तम अन्नपूर्णा म्हणून गौरविण्यात आले, त्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले.







**तंबाखूमुक्त शाळा सन २०२१ -**

व्यसनमुक्तीचे धडे शाळेतूनच मिळाले पाहिजेत  आणि म्हणूनच शाळा तंबाखूमुक्त व्हावी यासाठी प्रयत्न करण्यात आले.दिलेले सर्व निकष पूर्ण करत बुजडपाडा शाळा डहाणू तालुक्यातील दुसरी तंबाखूमुक्त शाळा ठरली.








डिजिटल शैक्षणिक दैनिक

# रयतेचा वाली

चळवळ माणुसकीची

संपादक :- श्री. शाहू संभाजी भारती ( ९९७५७३८३२१ ) वर्ष दुसरे - अंक १५२ गुरुवार दिनांक १८/०२/२०२१ पान ०१

## कोटबी बुजडपाडा शाळा ठरली डहाणू तालुक्यातील दुसरी तर कोटबी पाटीलपाडा तिसरी तंबाखुमुक्त शाळा





डहाणू / पालघर : दि. १७ ( रयतेचा वाली, ऑनलाइन वृत्तसेवा ) जिल्ह्यातील डहाणू पंचायत समिती अंतर्गत जिल्हा परिषद उच्च प्राथ.शाळा कोटबी बुजडपाडा तसेच कोटबी पाटीलपाडा केंद्र आशागड या शाळांनी तंबाखुमुक्त अभियानाचे सर्व ९ निकष पूर्ण केले आहेत. म्हणूनच सलाम मुंबई फाउंडेशन व नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य चे पालघर जिल्हा संघटक श्री मिलिंद रूपचंद पाटील यांनी डहाणू तालुक्यातील दुसरी व तिसरी तंबाखुमुक्त शाळा म्हणुन जिल्हा परिषद शाळा कोटबी बुजडपाडा व कोटबी पाटीलपाडा या शाळांना घोषित केले आहे.

जिल्हा परिषद शिक्षण विभाग पालघर, तंबाखू नियंत्रण उपक्रम कार्यक्रम, सलाम मुंबई फाउंडेशन व नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद शाळा, खाजगी शाळा, महाविद्यालयात तंबाखुमुक्त अभियान राबविण्यात आले आहे, यासाठी पालघर जिल्ह्यातील सर्व मुख्याध्यापकांची एक दिवसीय ऑनलाईन मार्गदर्शक कार्यशाळा घेण्यात आली होती. यावेळी जिल्हा परिषद शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी ( प्राथमिक ) मा. सौ. लता सानप मॅडम आणि डहाणू तालुक्यातील पंचायत समिती चे गटविकास अधिकारी मा. श्री.बी.एच. भरडे साहेब, शिक्षण विभागाचे गट शिक्षणाधिकारी मा. श्री. राठोड साहेब,विस्तार अधिकारी मा. श्री. विष्णू रावते साहेब, श्री. संजय वाघ साहेब यांच्याकडून लवकरात लवकर तंबाखुमुक्त कराव्या असे आवाहन करण्यात आले होते.

सलाम मुंबई फाउंडेशन चे जिल्हा समन्वयक श्री उदेश माळी, सलाम मुंबई फाउंडेशन चे प्रतिनिधी नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य चे पालघर जिल्हा संघटक श्री मिलिंद रूपचंद पाटील , आशागड केंद्रप्रमुख श्री. सोनूसिंग पाटील सर, कोटबी बुजडपाडा शाळेचे व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री. प्रकाश शिंगाडा , मुख्याध्यापक श्री. सुनिल देसमुख, सहशिक्षिका सौ सामिता पाटील, सि. शालिनी डिसोजा, श्री शिवदर्शनचाले, सौ. रंजना जाधव, श्री. दादाराव हारुले व श्रीम. हेमा ढोपे तसेच जि.प. शाळा कोटबी पाटीलपाडा शाळेचे मुख्याध्यापक श्री. प्रदिप जाधव सर व व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री. बन्सू मासमार, सहशिक्षिका श्रीम. रोहिणी शिंदे यांच्या मार्गदर्शनाने पुढील निकषांची पूर्तता केली. सर्व पालक आणि विद्यार्थ्यांना तंबाखुमुक्त ची शपथ दिली. तंबाखू नियंत्रणावर आधारित उपक्रम राबविले. शाळेच्या १०० मी. यार्ड परिसरात तंबाखू विक्री व सेवन करणाऱ्या व्यक्तीला दंड आकारण्यात येईल. शाळेच्या १०० यार्ड पर्यंत परिसर दिसेल असा पिवळ्या रंगाने रेखांकित करून तेथे " तंबाखुमुक्त क्षेत्र " असे नाव लिहून तंबाखुमुक्त क्षेत्र जाहीर केले व आपली शाळा तंबाखुमुक्त केली. असे जिल्हा परिषद उच्च प्राथ.शाळा कोटबी बुजडपाडा शाळेचे मुख्याध्यापक श्री. सुनिल देसमुख व कोटबी पाटीलपाडा केंद्रे मुख्याध्यापक श्री.जाधव सर यांनी सांगितले.

या उपक्रमात ग.शि.अ. श्री. राठोड साहेब, विस्तार अधिकारी रावते साहेब,चरी कोटबी ग्रामपंचायतीचे सरपंच श्री. गणेश हाडळ, आशागड केंद्रप्रमुख श्री सोनुसिंग पाटील सर तसेच सर फाउंडेशनचे समन्वयक श्री.विजय वाघमारे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.


**नम्र खुलासा :- याद्वारे नम्रपणे जाहीर करण्यात येते, की डिजिटल शैक्षणिक दैनिक रयतेचा वाली हे वृत्तपत्र केवळ 'प्रेरणा देणे आणि प्रेरणा घेणे' एवढ्याच हेतूने जाहिरातमुक्त आणि निशुल्कपणे चालविले जाते. यातून कुणाच्याही भावना दुखविण्याचा, कुणाचा भ्रष्टाचार उघड करण्याचा अथवा कुणाची बदनामी करण्याचा अजिबात हेतु नसतो...**

**आपला नम्र-विश्वासू, रयतेचा वाली परिवार महाराष्ट्र**

**ISO मानांकन :26 ऑक्टोबर 2018 -**

अतिशय दुर्गम ,डोंगराळ भागात असून देखील ISO होण्यासाठी आवश्यक सर्व निकषांची पूर्तता करत.शाळा 26 ऑक्टोबर 2018 ला पालघर जिल्यातील पहिली ISO शाळा ठरली.

"चाह है तो राह है" कष्टाला फळ मिळतेच या युक्ती प्रमाणे शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला.



Certificate

ISPL Cert

This is to certify that the
QUALITY MANAGEMENT SYSTEM
of

ZILHA PARISHAD PRIMARY SCHOOL, KOTBI BUJADPADA

At: Bujadpada, Post: Ashagad, Tal: Dahanu,
Dist: Palghar, Maharashtra, India

has been assessed and found to be in conformance to the requirements of

ISO 9001:2015

This certificate is valid for the following activity:

Providing Primary Education in Accordance with the General Curriculum Framework as Prescribed by the Maharashtra State Education Board

Certificate No. : DI-18102601

| | |
|---|---|
| Date of initial registration | 26-10-2018 |
| Date of this certificate | 26-10-2018 |
| 1st Surv. Due Before | 15-10-2019* |
| 2nd Surv. Due Before | 15-10-2020 |
| Recertification Due | 25-10-2021 |

Auth Sign

*Registration is subject to the system being continually maintained to the above standard under regular surveillance. If surveillance not take place when required, registration shall be removed.

INDRAPRASTHA SYSTEMCERT PVT. LTD.

Accredited by DAC, A Member of International Accreditation Forum

For updated information of Certification, visit- www.ispicert.com,
or E-Mail : info@ispicert.com, ispicert@gmail.com

201, Jaina Tower-3, A-1, Janak Puri, New Delhi-110058, India.
Ph +91 9999 477 631

DAC

IAF

CB-022-MS

**आमदार ,जि.प .अध्यक्ष ,सभापती यांच्या हस्ते गौरव**




**ISO TEAM व गट शिक्षण अधिकारी ह्यांचा हस्ते सम्मान.**










**मा. शिक्षण अधिकारी व विस्तार अधिकारी ह्यांची ISO शाळेस भेट**

**आदर्श शाळा पुरस्कार 2010-11**

प्रगतीला मान मिळाला की ती उंचावते सन 2010-11 मध्ये जि. प. शाळा कोटबी बुजडपाडा शाळेला आदर्श शाळा पुरस्कार लाभला.



जिल्हा परिषद ठाणे

सर्व शिक्षा अभियान

प्राथमिक स्तरावरील मुलींच्या शिक्षणाचा राष्ट्रीय कार्यक्रम

(NPEGEL)

आदर्श शाळा पुरस्कार २०१०-२०११

प्रमाणपत्र

आम्हाला आपल्यातील गुणांचा आणि नैपुण्याचा गौरव करताना अत्यंत आनंद होत आहे.

जि.प.शाळा कोटबी बुजडपाडा केंद्र खाशागड ता. डहाणू जि.ठाणे

महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्रिया, दलित, शोषित व कष्टकरी समाजात शिक्षणाचे बीज पेरले. त्यांच्यात पावलावर पाऊल ठेवत, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देत, धैर्य, चिकाटी, मेहनत व जिद्द या गुणांच्या जोरावर मुलींच्या शिक्षणाचे उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल हार्दिक अभिनंदन !

उत्तरोत्तर असेच कार्य आपले हातून घडत राहो हिच सदिच्छा !

सर्व शिक्षा अभियान

सारे शिकूया, पुढे जाऊया

डॉ. स. चि. म्हस्के
शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद ठाणे

श्री. हो. कि. जावळे
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद ठाणे

Press release –



लोकमत

अनिरुध्द पाटील

## आयएसओ प्राप्त पहिली जि.प. शाळा

पालघर जिल्ह्यात आयएसओ दर्जाप्राप्त असणारी पहिली जि.प. शाळा डहाणू तालुक्यातील उच्च प्राथमिक शाळा आशागड केंद्रातील कोटबी बुजडपाडा ठरली आहे. दरम्यान, या शाळेला भारत सरकार तर्फे प्रमाणित करण्यात आले असून एकूण ३०० पैकी २३० गुण प्राप्त झाले आहे. त्यामुळे पंचायत समितीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला. शिवाय या द्वारे खाजगी माध्यमांच्या शाळांचे व्यवस्थापन तंत्र आणि भौतिक सुविधेला आवाहन उभे ठाकले आहे. त्यामुळे शाळांचा दर्जाही उंचावणार आहे. शाळेने भौतिक सुविधेकरिता सीएसआरच्या माध्यमातून गेल्या तीन वर्षात वीसलाखांपर्यंतचा फंड गोळा केला.

Hello Vasai
Page No. 1 Oct 30, 2018
Powered by: erelego.com

पुढारी

■ जिल्ह्यातील पहिली उच्च प्राथमिक शाळा; पंचायत समितीच्या शिरपेचात मानाचा तुरा

# डहाणूतील कोटबी जिल्हा परिषद शाळेला आयएसओ मानांकन



(छाया : चंद्रकांत खुताडे)




डहाणू ग्रामीण : वार्ताहर

डहाणूतील कोटबी, बुजडपाडा येथील जिल्हा परिषद शाळेला आयएसओ ९००१:२०१५ मानांकन प्राप्त झाले असून हा सन्मान मिळवणारी पालघर जिल्ह्यातील ती पहिली उच्च प्राथमिक शाळा ठरली आहे. या शाळेने वांगतिक दर्जाचे मानांकन संपादन केले. यासाठी शाळेला एकूण ३०० गुणांकनापैकी २३० गुण प्राप्त झाले. या शाळेच्या कामाबद्दल तसेच गुणवत्तेबद्दल डहाणू पंचायत समितीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक सुनील देशमुख, सहकारी शिक्षक व ग्रामस्थ यांनी शाळेसाठी सर्व भौतिक सुविधा सीएसआरच्या माध्यमातून पुरवल्या आहेत. गेल्या तीन वर्षांत जवळजवळ वीस लाखांपर्यंतचा निधी मिळवून आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी, शैक्षणिक प्रगतीसाठी अधिकाधिक प्रयत्न झाल्याचे दिसून येते. शाळेचे माजी मुख्याध्यापक शशी हाडळ, सहशिक्षक, सरपंच नरेश काटेला, उपसरपंच गणेश हडळ तसेच ग्रामस्थांचेही याकामी सहकार्य लाभले आहे. यासाठी केंद्रप्रमुख जयश्री राऊत, बिट विस्तार अधिकारी महादेव पवार, गटशिक्षण अधिकारी विष्णू रावते तसेच पालघर जिल्हा प्रशासनाचे मार्गदर्शन लाभले आहे.

Virar-Dahanu Shuttle Edition
28 Oct, 2018 Page No. 1

सकाळ

# डहाणूच्या शाळेला 'आयएसओ'

बोर्डी (बातमीदार) : पालघर जिल्हा परिषदेच्या डहाणू तालुक्यातील कोटबी बुजडपाडा शाळेला आयएसओ ९००१:२०१५ मानांकन मिळाले आहे. असा मान मिळवणारी ही जिल्हा परिषदेची पहिली शाळा ठरली आहे. यासाठी प्रभारी मुख्याध्यापक सुनील देशमुख, शिक्षक व ग्रामस्थांनी प्रयत्न करून उद्योगांच्या 'सीएसआर' निधीतून तीन वर्षांत सुमारे २० लाखांचे अर्थसाह्य मिळवले.




माजी मुख्याध्यापक शशी हाडळ व शिक्षकांनी परिश्रम घेतले. सरपंच नरेश काटेला, उपसरपंच गणेश हाडळ, केंद्रप्रमुख जयश्री राऊत, विस्तार अधिकारी महादेव पवार, गटशिक्षणाधिकारी विष्णू रावते व जिल्हा प्रशासनाने सहकार्य केले.

Mumbai, Palghar-Today
30/10/2018 Page No. 1



जि.प.शाळा कोटबी बुजडपाडा येथे आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण, मार्गदर्शन शिबिर अदानी डहाणू औष्णिक विद्युत निर्मिती केंद्र डहाणू यांच्या वतीने घेण्यात आले. यावेळी काही प्रात्यक्षिके सादर करुन दाखवली गेली.

# आग लागली, भूकंप झाला तर काय कराल?

## कोटबी बुजडपाड्यात आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

लोकमत न्यूज नेटवर्क

**बोर्डी :** डहाणू तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कोटबी बुजडपाडा येथे आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व मार्गदर्शन शिबिर अदानी डहाणू औष्णिक विद्युत निर्मिती केंद्र डहाणू यांच्या विद्यमाने घेण्यात आले. या कार्यक्रमास अदानी थर्मल पॉवरचे सीएसआर हेड अविनाश फाटक, तसेच अग्निशामक तंत्रज्ञांनी मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांना रस्ता अपघात, [illegible] आपत्तींपासून स्वतः चे व परिवाराचे संरक्षण कसे करावे, [illegible] मार्गदर्शन करण्यात आले.

### प्रात्यक्षिके केली सादर

आपत्तीचे प्रकार आणि बचाव याबद्दल सूचना देण्यात आल्या. काही प्रात्यक्षिके दाखवून विद्यार्थी व शिक्षकांकडून करुन घेतली. शाळेतील पोषण आहार शिजवणाऱ्या महिलांना एलपीजी गॅसला आग लागल्यास करावयाच्या उपाययोजना दाखविण्यात आल्या. यावेळी पालक उपस्थित होते.

शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष स्वाती शिंगाडा, शिक्षिका अश्विनी [illegible] कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिल्पा बांदल आणि आभार मुख्याध्यापक सुनील देशमुख यांनी मानले.

Copy text from image
Set

लोकमत

# बुजडपाडा शाळेला दोन नव्या वर्गखोल्या

## समग्र शिक्षाअंतर्गत केले बांधकाम : विद्यार्थ्यांची होणार सोय

लोकमत न्यूज नेटवर्क

**बोर्डी** : डहाणू तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या कोटबी बुजडपाडा या शाळेच्या समग्र शिक्षाअंतर्गत बांधण्यात आलेल्या दोन वर्गखोल्यांचे उद्घाटन सोमवार, ५ फेब्रुवारी रोजी डहाणू पंचायत समितीचे सभापती प्रवीण गवळी यांच्या हस्ते करण्यात आले.

यामुळे आता शाळेतील विद्यार्थ्यांना नवीन वर्गखोल्यांत शिक्षण घेता येणार आहे.



यावेळी उपसभापती पिंटू गहला, उपसरपंच अमित भोनर, गटशिक्षणाधिकारी माधवी तांडेल, विस्तार अधिकारी कृष्णा गुरोडे, केंद्रप्रमुख सोतुसिंग पाटील, विलास सपाटे, दिनेश वळवी, रामचंद्र पिंपळकर, चंद्रकांत गडकर, प्रदीप जाधव, चंद्रकांत भुयाळ, अनिल जाधव, शिल्पा बांदल, सुनीता बुजड उपस्थित होते.

Hello Vasai
Page No. 3 Feb 07, 2024
Powered by: erelego.com

लोकमत

# पहिल्या आयएसओ शाळेचे जि. प. अध्यक्षांनी केले कौतुक

लोकमत न्यूज नेटवर्क

**बोर्डी** : पालघर जिल्ह्यातील पहिल्या आयएसओ शाळेला आणि १४० पर्यंत पाढे तोंडपाठ म्हणणाऱ्या लखम्या पालकर या विद्यार्थ्याची पालघर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम, उपाध्यक्ष पंकज कोरे आणि जिल्हा परिषद सदस्य काशीनाथ चौधरी यांनी भेट घेतली. यावेळी डहाणू पंचायत समितीचे सभापती प्रवीण गवळी, गटविकास अधिकारी पल्लवी सस्ते आणि विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी शाळेतील भौतिक सुविधा आणि उपक्रमांची दखल मान्यवरांनी घेतली.

जिल्हा परिषदेच्या उच्च प्राथमिक कोटबी बुजडपाडा ही जिल्ह्यातील पहिली आयएसओ शाळा असून, येथील परिसर, स्वच्छता याबद्दल मान्यवरांनी शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. मातृ-पितृ दिनाची सुरुवात करून तो या शाळेपासून साजरा करण्यात यावा, तसेच ९ वी व १० वी इयत्तांची मान्यता मिळवून देत, पुढील वर्षी इ. ९ वीचा वर्ग सुरू करण्याची ग्वाही अध्यक्षांनी दिली. या शाळेला थिंक शार्प फाउंडेशनने इंटररिॲक्टिव्ह बोर्ड दिला असून, या सुविधेचा अभ्यासासाठी वापर करण्याचा सल्ला दिला.




पालघर जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम यांचा शाळेतील पदाधिकाऱ्यांनी सन्मान केला.

### १४० पर्यंत पाढे म्हणणाऱ्या 'लाडक्या'चे कौतुक

१४० पर्यंतचे पाढे पाठांतर करून बुद्धिमत्तेची चुणूक दाखविणाऱ्या लाडक्या पालकर या विद्यार्थ्याच्या खिंडपाडा या शाळेत जाऊन मान्यवरांनी त्याची भेट घेतली. प्रकाश निकम यांनी लाडक्याच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली.

Hello Vasai
Page No. 3 Feb 19, 2023
Powered by: erelego.com

लोकमत



जि.प. बुजडपाडा शाळेतील विद्यार्थ्यांना दप्तर व स्टेशनरीचे वाटप केले. तसेच शैक्षणिक कामासाठी दहा लॅपटॉप देण्यात आले.

# जि.प. बुजडपाडा शाळेचे विद्यार्थी होणार तंत्रस्नेही

## दहा लॅपटॉप देत शाळांना संस्थांची मदत

लोकमत न्यूज नेटवर्क

**बोर्डी** : आय.डी.एफ. प्रोजेक्ट आशाएअंतर्गत जि. प. उच्च प्राथमिक कोटबी बुजडपाडा या आशागड केंद्रातील शाळेत विद्यार्थ्यांना दहा लॅपटॉप, दप्तर व स्टेशनरीचे वाटप केले. तर जि. प. शाळा खिंडपाडा शाळेसाठी शौचालय मंजूर करून मुले व मुली यांच्यासाठी प्रत्येकी दोन युनिटचे भूमिपूजन केले.

डहाणूतील ११ हजार विद्यार्थ्यांना गेल्यावर्षी शैक्षणिक साहित्याचे आशाएतर्फे वाटप केल्याचे कोटबी बुजडपाड्याचे मुख्याध्यापक सुनील देशमुख यांनी सांगितले. या उपक्रमात महत्त्वपूर्ण भूमिका निभावल्याने लता व्यंकट, शशांक शेट्टी, अनीस, शशी अक्का आदींचा शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला. यंदा २५ हजार विद्यार्थ्यांना आयडीएफ दप्तर व स्टेशनरी वाटणार असल्याचे अनीस यांनी सांगितले. विद्यार्थी व शिक्षकांनी लॅपटॉपचा शैक्षणिक उपक्रमात वापर करून तंत्रस्नेही शिक्षणावर भर द्यावा, असे केंद्रप्रमुख सोनुसिंग पाटील म्हणाले. ग्रामीण शिक्षणात संस्थांनी बांधिलकी जपल्यास शासकीय शाळांचा दर्जा उंचावण्यास मदत होणार असल्याने उपक्रमाचे गटशिक्षणाधिकारी माधवी तांडेल यांनी स्वागत केले. या गावात उपक्रम राबविल्याने सरपंच वसुंधरा कलांगडा यांनी आभार मानले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिल्पा बांदल आणि आभार अश्विनी मांडे यांनी मानले. आयडीएफ व आशाएचे सदस्य, सरपंच वसुंधरा कलांगडा, उपसरपंच अमित भोनर, शिल्पा बांदल, अश्विनी मांडे उपस्थित होते.

Hello Vasai
Page No. 3 Jul 03, 2023
Powered by: erelego.com

लोकमत




जिल्हा परिषदेच्या कोटबी बुजडपाडा शाळेत 'आझादी का अमृत महोत्सव' उपक्रमाच्या सांगता समारंभात उपस्थित मान्यवर.

# डहाणूत 'वसुधा वंदन' कार्यक्रमात देशी वृक्षारोपण

## कोटबी बुजडपाडा शाळेत उपक्रमाची सांगता

लोकमत न्यूज नेटवर्क

**बोर्डी** : 'आझादी का अमृत महोत्सव' कार्यक्रमांतर्गत डहाणू तालुक्यात विविध उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमाची सांगता जिल्हा परिषदेच्या कोटबी बुजडपाडा शाळेत १७ ऑगस्ट रोजी झाली. यावेळी सभापती प्रवीण गवळी यांच्या व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत वसुधा वंदन कार्यक्रमांतर्गत २५ देशी वृक्षरोपांची लागवड करून अमृत वाटिका करण्यात आली.

वृक्षदिंडीत गावकऱ्यांनी सहभागी होत पारंपरिक तारपा नृत्य सादर केले, तर शिक्षक व विद्यार्थ्यांनी वृक्षारोपणाबाबत जनजागृती केली. त्यानंतर उपसभापती पिंटू गहला, गटविकास अधिकारी पल्लवी सस्ते, गटशिक्षणाधिकारी माधवी तांडेल, सरपंच वसुंधरा कलांगडा, उपसरपंच अमित भोनर, कृषी अधिकारी प्रशांत जाधव व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ७५ देशी रोपे लावण्यात आली. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रकाश शिंगाडा यांच्या कार्याचा गौरव सन्मानचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. 'मेरी माटी, मेरा देश' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी विविध राज्यांच्या वेशभूषा व सादरीकरणातून विविधतेत एकता दाखवली.

### विविध स्पर्धा रंगल्या

- यावेळी चित्रकला, वक्तृत्व व रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या. शाळेच्या आवारातील झाडांच्या संगोपनाची सामूहिक जबाबदारी अंगीकारण्याचे आवाहन मान्यवरांनी केले.
- या अभियान समारोपात जिल्ह्यातील पहिल्या आयएसओ या शाळेच्या निवडीबद्दल विद्यार्थी-शिक्षक आनंदी झाल्याची भावना मुख्याध्यापक सुनील देशमुख यांनी व्यक्त केली. सूत्रसंचालन शिल्पा बांदल यांनी केले. आभार सोनूसिंग पाटील यांनी मानले.

Hello Vasai
Page No. 3 Aug 23, 2023
Powered by: erelego.com

लोकमत



शाळेतील रानभाज्या महोत्सवाचे उद्घाटन चरी कोटबी ग्रामपंचायतीच्या सरपंच वसुंधरा कलांगडा यांच्या हस्ते झाले.

# कोटबी बुजडपाडा शाळेत रानभाज्या महोत्सव

लोकमत न्यूज नेटवर्क

**बोर्डी** : पोषण पंधरवड्यानिमित्त जिल्हा परिषदेच्या उच्च प्राथमिक कोटबी बुजडपाडा शाळेतील रानभाज्या महोत्सवाचे उद्घाटन चरी कोटबीच्या सरपंच वसुंधरा कलांगडा यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमास केंद्रप्रमुख सोनुसिंग पाटील, विनोद कलांगडा, ग्रामस्थ, विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते.

महोत्सवात कोहरेल, शिराड, खारा आंबा, टेट्टू, अंबाडी, शेवग्याचा पाला आदी रानभाज्या विद्यार्थ्यांनी परिसरातून जमविल्या. भेळ, सॅन्डवीच, सरबत आदी पदार्थ आणि रानभाज्यांचे स्टॉल लावले होते. पोषण पंधरवडा उपक्रमातून रानभाज्यांची प्रचलित नावे, ती ओळखण्याची पद्धती, आहारातील फायदे, पाककृती, आदी माहितीचे आदानप्रदान करण्यात आले. कार्यक्रमास ग्रामस्थांचा प्रतिसाद मिळाल्याचे मुख्याध्यापक सुनील देशमुख यांनी सांगितले.

Hello Vasai
Page No. 3 Sep 11, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

न्यूज Inbox

# आदिवासी पाड्यांतील शाळांचे सर्वत्र कौतुक




'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' अभियानांतर्गत डहाणू तालुक्यातील जि.प. कोटबी, बुजडपाडा शाळेने द्वितीय क्रमांक पटकावला आहे.

# डहाणूची कोटबी, बुजडपाडा शाळा जिल्ह्यात द्वितीय

लोकमत न्यूज नेटवर्क

**बोर्डी** : 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' अभियानांतर्गत पालघर जिल्ह्यात डहाणू तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक कोटबी, बुजडपाडा शाळेने द्वितीय क्रमांक पटकावला आहे, तर लगतच्या तलासरीतील जिल्हा परिषदेच्या कोचाई केंद्रातील अणवीर दाभलीपाडा अव्वल ठरली. सीमा भागातील आदिवासी पाड्यांवरील या शाळांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' अभियानांतर्गत पालघर तालुक्यातील जिल्हा परिषद नवघर ही शाळा विभागीयस्तरावर पालघर जिल्ह्याचे नेतृत्व करणार आहे. डहाणूतील आशागड केंद्राअंतर्गत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक कोटबी, बुजडपाडा ही शाळा जिल्ह्यातील पहिली आयएसओ शाळा आहे.

## मुलांना आनंददायी शिक्षणाची अनुभूती

शाळेत ८ वी पर्यंतच्या वर्गात ३१० विद्यार्थी असून ६ शिक्षक आहेत. दीड कोटी रुपयांपेक्षा अधिक निधी सीएसआरच्या माध्यमातून उभा केला आहे. शाळेकडून परिसराची स्वच्छता मोहीम यशस्वीरीत्या राबवली जाते. बोलक्या भिंती उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना प्रसन्न वाटण्यासह आनंददायी शिक्षणाची अनुभूती मिळते. शाळेतील उरलेल्या अन्नपदार्थांपासून गांडूळ खत उपक्रम राबविला जात असून परसबागेत त्याचा वापर करून पोषणमूल्य युक्त भाजीपाला विद्यार्थ्यांना पोषण आहारातून दिला जातो. किशोवयीन मुलींसाठी मार्गदर्शन, प्लास्टिक, तंबाखूमुक्त अभियान राबविण्यात येत असल्याची माहिती मुख्याध्यापक सुनील देशमुख यांनी दिली.

Hello Vasai
Page No. 3 Mar 05, 2024
Powered by: erelego.com

लोकमत

न्यूज Inbox

## कलागुणांना वाव देण्याचा प्रयत्न




डहाणूतील विद्यार्थी गुणदर्शन स्पर्धेत मान्यवरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

# आशागड केंद्रावर रंगली विद्यार्थी गुणदर्शन स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

**बोर्डी :** डहाणू तालुकास्तरीय विविध गुणदर्शन स्पर्धा आशागड केंद्रातील जिल्हा परिषदेच्या उच्च प्राथमिक शाळा कोटबी बुजडपाडा येथे झाली. हे कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषद सदस्य ज्योती पाटील यांनी केले. निकोप वातावरणात स्पर्धा करण्याबाबतचे मार्गदर्शन गटशिक्षणाधिकारी माधवी तांडेल यांनी करून शुभेच्छा दिल्या.

यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी कृष्णा गुरोडा, केंद्र प्रमुख तुळशीराम पाटील, नंदकुमार लिलका, बच्चू वाडू, प्रकाश शिंगाडे, यशवंत गावित, दस्तगीर घुनकी, अमोल भानारकर, संतोष गुंजाळ, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष स्वाती शिंगाडा, विलास सपाटे शिक्षक, परीक्षक व ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते. केंद्र प्रमुख सोनूसिंग पाटील यांनी प्रास्ताविक केले. अन्नदान प्रोजेक्ट ऑफ सोवो फाउंडेशनने स्पर्धक विद्यार्थ्यांसाठी भोजन व्यवस्था केली. जयप्रकाश प्रजापती यांनी विजेत्यांसाठी ट्रॉफी दिल्या. भावेश शेठ यांच्याकडून प्रत्येक स्पर्धेच्या विजेत्या संघांना ५०० रुपये बक्षीस उपलब्ध करून दिले. सूत्रसंचालन रूपाली पाटील यांनी केले.

Hello Vasai
Page No. 4 Jan 08, 2024
Powered by: erelego.com

लोकमत

न्यूज Inbox

# केंद्र शासनाच्या अभिनव योजनेत प्रथम



पालघर जिल्हा परिषदेच्या वतीने डहाणू तालुक्यातील जि.प.च्या कोटबी बुजडपाडा शाळेला सोमवारी सन्मानित करण्यात आले.

Hello Vasai
Page No. 3 Mar 13, 2024
Powered by: erelego.com

लोकमत

तालुकास्तरीय प्राथमिक, माध्यमिक गटात प्रत्येकी तीन पुरस्कार

# डहाणूतील सुंदर शाळांचा पारितोषिकाने सन्मान

लोकमत न्यूज नेटवर्क

**बोर्डी :** 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' या उपक्रमांतर्गत सुंदर ठरलेल्या तालुका स्तरावरील पहिल्या टप्प्यातील शाळांना पुरस्कारांचे धनादेश नुकतेच देण्यात आले. प्राथमिक आणि माध्यमिक विभागात प्रथम येणाऱ्या पहिल्या तीन शाळांना पुरस्कार दिला गेला.

'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' या उपक्रमात सहभागी होणाऱ्या शाळांनी विविध निकषांची पूर्तता केल्याने, दोन्ही विभागांत अव्वल येणाऱ्या तीन शाळांची निवड करण्यात आली. जिल्हास्तरावर प्राथमिक गटात डहाणू तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या कोटबी बुजडपाडा शाळेने द्वितीय पारितोषिक पटकावले आहे, तर तालुकास्तरावर प्राथमिक गटात घोलवड केंद्राच्या अस्वाली ग्रामपंचायती अंतर्गत जिल्हा परिषदेच्या शंकरपाडा शाळेने प्रथम पुरस्कारावर नाव कोरले. त्यांना ३ लाखांचा धनादेश देऊन गौरविले. द्वितीय पारितोषिक जिल्हा परिषदेच्या तणाशी शाळेला, तर सावटे केंद्रातील आगवण नवासाखरा शाळेला तृतीय क्रमांकाचा १ लाख रुपयांचा दिला गेला.

हे पुरस्काराचे उपक्रमाचे प्रमुख शिक्षिका शिल्पा वनमाळी, तसेच शिक्षक नागनाथ भोसले, अंसू सिंह, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष वनशी तल्हा, केंद्र प्रमुख ममता पटेल यांनी स्वीकारला.




'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' या उपक्रमांतर्गत पहिल्या टप्प्यातील तालुकास्तरीय पुरस्काराचा धनादेश स्वीकारताना बोर्डीतील एसपीएच हायस्कूलचे शिक्षक.

## माध्यमिक गटात भिसे शाळा प्रथम

माध्यमिक गटात पहिला क्रमांक आचार्य भिसे कासा हायस्कूल (तीन लाख रुपये), द्वितीय क्रमांक पारनाका येथील के. एल. पोंदा हायस्कूल (२लाख) तर तृतीय क्रमांक बोर्डीतील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या सु.पे.ह. हायस्कूलला १ लाख रुपयांचा धनादेश देऊन गौरविले. प्राचार्या बिनिता शाह व शाळेतील ज्येष्ठ शिक्षक व विद्यार्थी प्रतिनिधी यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

Hello Vasai
Page No. 1 Sep 22, 2024
Powered by: erelego.com

लोकमत

# कोटबी बुजडपाडा शाळा ठरली जिल्ह्यात स्वच्छ

लोकमत न्यूज नेटवर्क

**बोर्डी :** केंद्र सरकारतर्फे दिला जाणारा जिल्हास्तरावरील स्वच्छ विद्यालय पुरस्कार पालघर जिल्हा परिषदेच्यावतीने डहाणू तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या कोटबी बुजडपाडा शाळेला सोमवारी ११ मार्चला देऊन सन्मानित करण्यात आले. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम, उपाध्यक्ष पंकज कोरे, शिक्षणाधिकारी संगीता भागवत यांच्या उपस्थितीत शाळेचे मुख्याध्यापक सुनील देशमुख यांनी पुरस्कार स्वीकारला.

भारत सरकारने २०२३ मध्ये स्वच्छ विद्यालय स्पर्धा आयोजित केली होती. त्या अंतर्गत जिल्ह्यात विविध अटींची पूर्तता कोटबी बुजडपाडा शाळेने पूर्ण केली. त्यामध्ये शाळेकडून पाण्याची सुविधा, हँडवॉश स्टेशन, कोविड काळात खबरदारीच्या उपाययोजना अंमलात आणण्याच्या कॅटेगरीत पैकीच्या पैकी गुण मिळविले, तर शाळेच्या देखभालीसाठी १५ टक्के गुण, सुसज्ज इमारतीसाठी १० टक्के गुण मिळाल्याने कोटबी बुजडपाडा जिल्ह्यातील सर्वोत्तम शाळा ठरली.

## सर्व सोयीसुविधांनी युक्त, घेतली दखल

या शाळेची स्थापना ४ मार्च १९५७ रोजी झाली. शाळेला २६ ऑक्टोबर २०१८ रोजी जिल्ह्यातील पहिली आयएसओ शाळा म्हणून बहुमान मिळाला. शाळेतील शिक्षकांनी सीएसआरच्या माध्यमातून दीड कोटी रुपयांच्या वास्तू, तसेच वस्तू स्वरुपात भौतिक सुविधा मिळवून देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका निभावली. त्यामध्ये सुसज्ज शौचालय, इंटर रिॲक्टीव्ह बोर्ड, व्हच्यूअल क्लासरुम, सर्व सोयींनीयुक्त वर्गखोल्या व सभागृह, अद्ययावत किचन, आदींचा समावेश आहे.

**■ या यशामध्ये पंचायत समितीचा शिक्षण विभाग, तसेच गटशिक्षणाधिकारी माधवी तांडेल चरी कोटबी ग्रामपंचायत, शाळा व्यवस्थापन समिती, सुधार समिती, ग्रामस्थ, पालक, केंद्रप्रमुख, शिक्षक व विद्यार्थी यांची मेहनत असल्याचे मुख्याध्यापक देशमुख यांनी सांगितले.**

Hello Vasai
Page No. 3 Mar 13, 2024
Powered by: erelego.com

लोकमत




जि.प.च्या कोटबी बुजडपाडा शाळेत सोयी-सुविधांनी युक्त तीन वर्गखोल्या, रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रोजेक्ट मान्यवरांच्या उपस्थितीत उपलब्ध करण्यात आले.

# कोटबी बुजडपाडा शाळेला नव्या तीन वर्गखोल्या

## विविध सोयी-सुविधाही केल्या उपलब्ध

लोकमत न्यूज नेटवर्क

**बोर्डी :** डहाणू तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या उच्च प्राथमिक कोटबी बुजडपाडा शाळेत राउंड टेबल इंडिया २०० या संस्थेमार्फत सुसज्ज, तसेच विविध सोयी-सुविधांनी युक्त तीन वर्गखोल्या, रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रोजेक्ट उपलब्ध केले. याबाबत शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अध्यक्ष स्वाती शिंगाडा यांनी आभार मानले.

डहाणूच्या गटशिक्षणाधिकारी माधवी तांडेल, गटसमन्वयक सोनुसिंग पाटील, राउंड टेबल इंडियाचे सुमित बरेडिया, हर्ष मेहता, अमित बरेदिया, विनय मेहता, सायल लुणिया, केविन जेकब, वेदांत अग्रवाल, अभिषेक बियाणी, सुमित गर्ग, राहुल सोनवट, निखार सोनवट, रवी सवना आदींच्या उपस्थितीत हा उद्घाटन सोहळा पार पडला.

राउंड टेबलचे हर्ष मेहता यांनी शाळेची गरज ओळखून क्लास रूम व रेन वॉटर हार्वेस्टिंग उपलब्ध केले. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीला मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली, तर वर्षभर विविध उपक्रमासाठी भरीव योगदानाचे आश्वासन दिल्याचे शाळेचे मुख्याध्यापक सुनील देशमुख यांनी सांगितले. सूत्रसंचालन शिल्पा बांदल यांनी केले, तर आभार प्रदर्शन शंकर आमटे यांनी केले.

Hello Vasai
Page No. 2 Jul 02, 2024
Powered by: erelego.com

लोकमत

# शिक्षक दिन विशेष-२०२४

## पालघर जिल्ह्यातील पहिली आयएसओ उच्च प्राथमिक शाळा कोटबी बुजडपाडा







डहाणू तालुक्यातील चरी कोटबी ग्रामपंचायती अंतर्गत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कोटबी बुजडपाडा या शाळेची स्थापना ४ मार्च १९५७ रोजी झाली श्री. राऊत गुरुजी यांनी झाडाखाली सुरु केलेली शाळा आज तेरा भव्य वर्ग खोल्या व एक सुसज्ज सभागृह असा शाळेचा वटवृक्ष कसा तयार झालेला आहे याचा प्रवास आहे.

शाळा सुरु झाली, मात्र त्याकाळी शाळेसाठी आवश्यक लागणारी कुठलीही संसाधने नव्हती. ग्रामस्थांच्या सहकार्याने मिळाल्याने इयत्ता १ ते ४ थी पर्यंतचे वर्ग भरले जात. आशागड पासून ४ किमी अंतरावर अतिशय दुर्गम आदिवासी बहुल भागामध्ये शाळा सुरु करणे हे मोठे दिव्य होते, ते राऊत गुरुजींनी लिलया पार पाडले.

२०१० पर्यंत शाळा इयत्ता पाचवी पर्यंत होती, २०११ साली शाळेचे उच्चीकरण होऊन शाळा सहावी सातवी पर्यंत झाली. २०१४ - १५ पासून शाळेचे पुन्हा एकदा उच्चीकरण होऊन शाळा आठवी पर्यंत वर्ग सुरु झाले. येथून विविध सामाजिक संस्था, एनजीओ, दानशूर व्यक्ती यांच्या माध्यमातून दहा वर्षांत सुमारे दोन कोटी रुपयांपेक्षा अधिक वास्तु आणि वस्तु, शैक्षणिक साहित्य भेट मिळाल्याने शाळेचा भौतीक विकास सुरु झाला. स्मार्ट टीव्ही, इंटर रिॲक्टीव बोर्ड, प्रोजेक्टर हे इ लर्निंग साहित्य विद्यार्थ्यांची गुणवत्ता व शाळेच्या लौकिकात महत्वपूर्ण ठरल्या.

आज शाळेमध्ये दोन प्रोजेक्टर, दोन इंटरॅक्टिव्ह बोर्ड, दोन स्मार्ट टीव्ही, एक वर्चुअल क्लासरुम तसेच ११ संगणक, दहा लॅपटॉप उपलब्ध आहेत. पाच सुसज्ज सर्व सोयींनी युक्त अशा वर्गखोल्या व एक प्रशस्त सभागृह विविध सामाजिक संस्थेमार्फत मिळवलेले आहे. विद्यार्थ्यांसाठी शौचालय एनजीओ तर्फे बांधण्यात आलेले आहे. अशा अद्ययावत सुविधांनी युक्त पालघर जिल्ह्यातील अत्याधुनिक शाळांपैकी ओळखली जाते. शाळेचे आजीमाजी विद्यार्थी व शिक्षक, ग्रामस्थांना अभिमान आहे .

२०२३ -२४ साली शाळेतील पंधरा विद्यार्थी एलिमेंटरी परीक्षेला बसलेले, ते सर्व चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले. यावर्षी सुध्दा ३० विद्यार्थी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली तयारी करीत आहेत. क्रीडा स्पर्धेत शाळेतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवलेले असून लंगडी, खो-खो, कबड्डी, लांब उडी, धावणे, संगीत खुर्ची या विविध खेळ प्रकारात नैपुण्य मिळवलेले आहे. यावर्षी जिल्हास्तरावर आटयापाटया खेळात विद्यार्थी खेळणार आहेत. स्काऊट गाईड कब बुलबुल यामध्ये विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादत केलेले आहे. दळणवळणाच्या मर्यादित सुविधा असताना शाळेने मिळवलेले हे घवघवीत यश कौतुकास्पद आहे.

### पुरस्कार मिळवत शाळेचे धवल यश:

शासनाच्या विविध स्पर्धांमध्ये शाळेने यश मिळवलेले आहे, त्यामध्ये तालुका आदर्श पुरस्कार शाळेला मिळालेला आहे . २०१८ साली पालघर जिल्ह्यातील पहिली आयएसओ शाळा होण्याचा बहुमान या शाळेने पटकावला आहे. २०२१-२२ साली केंद्र शासनाच्या स्वच्छ विद्यालय पुरस्कार स्पर्धेत, पालघर जिल्ह्यातील सर्व शाळांमधून पहिली शाळा येण्याचा बहुमान शाळेने पटकावलेला आहे. कोकण विभाग स्तरावर शाळेने प्रतिनिधित्व केलेले आहे. २०२३ साली 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' या राज्य शासनाच्या अभिनव उपक्रमामध्ये या शाळेने सहभाग नोंदवून डहाणू तालुक्यात प्रथम आली. जिल्हास्तरापर्यंत शाळा पोहोचली आणि या पालघर जिल्ह्यातील सुमारे ४ हजार शाळांमध्ये शाळेने द्वितीय क्रमांक पटकावलेला आहे. वक्षीस म्हणून शाळेला पाच लाख रुपये रोख रक्कम व सन्मानचिन्ह देण्यात आले. पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम, जिल्हा परिषद उपाध्यक्ष पंकज कोरे, पालघरचे खासदार डॉ. हेमंत सवरा, डहाणूचे आमदार विनोद निकोले, विधान परिषदेचे आमदार निरंजन डावखरे, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी यांच्या हस्ते शाळेला सन्मान व धनादेश देण्यात आला. ही बाब आमच्या ग्रामीण भागातील शाळेसाठी मैलाचा दगड ठरलेली आहे . या यशात शाळेतील सर्व विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ, ... ग्रामपंचायत यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांचयरोबर प्रशासकीय यंत्रणेमधील सर्व अधिकारी पदाधिकारी यांचे देखील अनमोल मार्गदर्शन मिळाले.









म्हणूनच 'माझी शाळा, माझा अभिमान' हे ब्रीद वाक्य शाळेसाठी आणि विद्यार्थी व शिक्षकांसाठी अभिमानाची गोष्ट आहे.

शाळेमध्ये वैशिष्टयपूर्ण विज्ञान प्रयोगशाळा, शौचालय, अद्यावत स्वयंपाक गृह साऊंड सिस्टिम ची सुविधा इंटरनेट सुविधा उपलब्ध आहेत. तसेच सोलार सिस्टिम रेन वॉटर हार्वेस्टिंग घनकचरा व्यवस्थापन, शिल्लक अनावर प्रक्रिया इ. अभिनव उपक्रम शाळेमध्ये राबवलेले आहेत. शहरी भागातील खाजगी शाळेच्या तोडीस सर्व सोयी सुविधा या शाळेत उपलब्ध करुन घेतलेल्या आहेत.

दरम्यान व्यावसायिक शिक्षण देखील शाळेमध्ये आयडीएफ या सामाजिक संस्थेमार्फत चालवले जाते. त्यामध्ये विनामूल्य शिवणकामाचा कोर्स शिकवला जातो. या कोर्समध्ये गावातील गरजू महिलांना देखील इथे रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. शाळेमध्ये एकूण चार शिलाई मशीन देण्यात आलेल्या आहेत.

लेखन व संकलन:
**सुनिल अशोकराव देशमुख**
(प्र. मुख्याध्यापक, कोटबी बुजडपाडा)

ADVERTORIAL

Hello Vasai
Page No. 3 Sep 05, 2024
Powered by: erelego.com

## सहशालेय उपक्रम

1. ईको क्लब मार्फत वृक्षारोपण
2. शालेय वर्धापन दिन साजरा करणे
3. महावाचन उपक्रमाची अंमलबजावणी
4. स्वच्छता MONITOR टप्पा-1 व टप्पा-2 मध्ये उल्लेखनीय कामगिरी
5. कब-बुलबुल व स्काउट –गाईड ची स्थापना व मार्गदर्शन
6. सर्व नेते व समाजसुधारकांची जयंती व पुण्यतिथी साजरी करणे
7. व्यावसायिक शिक्षणास प्रोत्साहन
   शिलाई (शिवणकाम वर्ग)
   भरतकाम वर्ग
   कार्यानुभव –कला कौशल्यावर आधारीत उपक्रम

कमवा व शिका ,रानभाज्या उपक्रम

8. शिक्षण सप्ताह ची प्रभावी अंमलबजावणी
9. नवभारत साक्षरता अभियानाची अंमलबजावणी
10. विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे नियोजन
    निबंध स्पर्धा
    वाद विवाद स्पर्धा
    समुहगीत गायन
    नाटक भाषण स्पर्धा
    मूर्ती निर्मिती स्पर्धा
11. किशोरवयीन मुलींना मार्गदर्शन व जाणिव जागृती
12. सण व उत्सव – जागतिक आदिवासी दिन ,दिवाळी,रक्षा बंधन,होळी,रंगपंचमी,मकर संक्रांत, इ.साजरे करतात.
13. वनभोजन व शैक्षणिक सहलीचे आयोजन

**रानभाज्या महोत्सव -**



**जागतिक आदिवासी दिन -**




**व्यावसायिक शिक्षण -**



**सांस्कृतिक कार्यक्रम -**




**नवभारत साक्षरता कार्यक्रम -**



**इको क्लब -**








**वाचन उपक्र -**








**ऐतिहासिक सहल -**



**वेशभूषा उपक्रम -**



**नवभारत साक्षरता उपक्रम -**




**वृक्षारोपण उपक्रम -**



**मेरी माटी मेरा देश -**




**कराटे प्रशिक्षण -**



**Scout Guide Trainning -**



**दहीहंडी उत्सव -**



## रक्षाबंधन कार्यक्रम -




## नवभारत साक्षरता कार्यक्रम -



## शाळापूर्व कार्यक्रम -




## अमृतकलश कार्यक्रम -






## शाळेतील उल्लेखनीय बाबी


**पिंक रूम -**

किशोर वयीन मुलींना मासिक पाळी दरम्यान होणाऱ्या त्रासामुळे मुली शाळेत अनुपस्थितीत राहतात त्यावर उपाय म्हणून शाळेत मुलींसाठी रेस्ट रूम (पिंक रूम) तयार करण्यात आली आहे.मुली गरजेनुसार तेथे आराम करू शकतात आवश्यक साहित्य तेथे उपलब्ध आहे.



**सी.सी.टिव्ही (C.C.TV) -**

सर्व विद्यार्थ्यांच्या विशेष करून मुलींच्या सुरक्षिततेचा विचार करून शाळेच्या परिसरात CCTV कॅमेरे बसविण्यात आले आहेत. CCTV मुळे शाळेत शिस्त व सुरक्षितता वाढीस लागली आहे.शाळा व शाळेच्या परिसरात होणाऱ्या गोष्टीवर लक्ष ठेवणे शक्य झाले आहे.





**वाय-फाय (WI-FI) -**

शाळा अतिशय दुर्गम व डोंगराळ भागात असल्यामुळे इंटरनेटच्या सुविधेची पूर्तता करण्यासाठी WI-FI बसविण्यात आले आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांसाठी इंटरनेटचा वापर तसेच शाळेच्या व प्रशासनाच्या कामाला गती आली आहे.



**ध्वनी प्रणाली (SOUND SYSTEM CONNECTION) -**

शाळेचे प्रशासन व व्यावस्थापन सुरळीत चालण्याच्या दृष्टीने सर्व वर्ग ध्वनी प्रणालीने जोडण्यात आलेले आहेत.विद्यार्थी व शिक्षकांना सूचना तसेच माहिती एकाच वेळी मुख्याध्यापकाच्या कार्यालयातून सर्व वर्गांत पोहोचवता येते.



**RAIN WATER HARRVESTING -**

पाणी अडवा पाणी जिरवा मोहीम उत्तम रित्या शाळेत कार्यान्वित आहे 3.5 हजार Sq.Ft वरचे पावसाचे पाणी बोरवेल मध्ये सोडले जाते त्यामुळे उन्हाळ्यात पाण्याची कमतरता भासत नाही.ही योजना राउंड टेबल इंडिया या संस्थेमार्फत देण्यात आली .



**विज्ञान प्रयोगशाळा -**

माध्यमिक शाळा म्हणले कि विद्यार्थ्यांसाठी प्रयोगशाळा हवीच. शाळेला सुसज्ज अशी विज्ञान प्रयोग शाळा लाभली.या प्रयोगशाळेत जवळजवळ 550 प्रयोगाच्या वस्तू आहेत आणि त्यांची मांडणी ही इतक्या सुबकरितीने केली आहे एका वर्गखोलीत स्थिरावलेली ही विज्ञान प्रयोगशाळा म्हणजे शाळेच्या यशात आणखी एक भर होय





**भाषा,गणित इंग्रजी प्रयोगशाळा -**

ज्ञानाचे दृढीकरण पक्के होण्यासाठी विविध अध्ययन अनुभव घ्यावे लागतात प्रत्यक्ष शैक्षणिक साहित्य हाताळून मुले विविध शंका व संकल्पना स्पष्ट करू शकतात.त्यासाठीच विविध विषयांचे शैक्षणिक साहित्य एकत्रित जमा करून ठेवले आहेत.यामध्ये भाषा,गणित व इंग्रजी विषयांचे परिपूर्ण शैक्षणिक साहित्य एकत्रित रित्या ठेवले आहे,ज्याचा वापर शिक्षक व विद्यार्थी आपल्या गरजेनुसार करतात.



**डिजीटल क्लास रूम -**

आमची शाळा माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त उपयोग करून उद्दिष्ट प्राप्त करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.शाळेने संपूर्णपणे डिजीटलाइझेशनचा अवलंब केला आहे. प्रत्येक वर्गांत स्मार्ट TV, प्रोजेक्टर, इंटराक्टीव बोर्ड बसविण्यात आले आहेत.त्यामुळे वर्गाध्यापन सुरळीत व आनंददायी वातावरणात होत आहे.







**संगणक कक्ष -**

जिल्हा परिषद पालघर तर्फे बुजडपाडा शाळेला संगणक वितरित झाले आणि शाळेत संगणक कक्ष उभारले गेले. डिजिटल शाळेची जणु वाटचाल सुरू झाली. प्रत्येक इयत्तेतील विद्यार्थ्यान संगणकाचे ज्ञान घेता येते . शाळेत एकूण 11 संगणक व 1 प्रिंटर आहे.





**सोलर उर्जेचा वापर -**

शाळा प्रगतीचे एक एक पाउल पुढे टाकत आहे शाळेत सोलर बसविण्यात आले आहे त्यावर पाण्याची मोटार चालते.सोलर उर्जेचा वापर केल्यामुळे विद्युत उर्जा नसल्यावरही आम्हाला पाण्याची अडचण निर्माण होत नाही.






**शाळेचा वर्धापन दिवस -**

दरवर्षी 4 मार्च रोजी शाळेचा वाढदिवस साजरा केला जातो. या दिवशी केक सेरिमनी करण्यात येतो. याचे औचित्य साधून आज पर्यंत शाळेला लाभलेले मुख्याध्यापक, सामाजिक संस्थांचे देणगीदार यांना आमंत्रित केले जाते. या दिवशी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.या दिवशी मातृ पितृ दिवस साजरा केला जातो व गावातील लोकांसाठी व विद्यार्थ्यांसाठी भोजनाची व्यवस्था केली जाते.






ल

दप्तराविना शाळा ही उक्ती राबवणे जि. प. शाळा कोटबी बुजडपाडा शाळेला सहज शक्य झाले ते जिल्हा परिषद पालघर मुळे. सन २०१८ मध्ये शाळेला लॉकर्स उपलब्ध करून दिले आणि विद्यार्थ्यांचे दप्तरांचे ओझे कमी झाले. त्या बरोबरच वस्तू कशा सांभाळून ठेवाव्यात याचे ज्ञान ही मिळाले.



**परसबाग -**

आजूबाजूला हिरवा परिसर त्यात शाळेची इमारत आणि शाळेला शोभेल अशी शाळेची परसबाग. शाळेच्या परसबागेत निरनिराळ्या प्रकारच्या भाज्यांची रोपे लावण्यात आली आहेत.परसबागेतील भाज्यांचा वापर मध्यान्ह भोजनात केला जातो.शाळेत फुलांची झाडे लावण्यात आली आहेत. शाळेतील परसबागांचे वैशिष्ट्य म्हणजे केळीची बाग, शाळेतील मदतनीस व विद्यार्थी परसबागेची योग्य ती काळजी घेतात म्हणूनच शाळा व परसबाग फुलत आहे.






**परसबाग व मिनी गार्डन**

**शाळेची रंगरंगोटी -**

शाळेच्या प्रगतीच्या उत्तुंग भरारीत आणखी एक भर पडली, अन्नदानम व IDF फाऊंडेशन या संस्थेने शाळेच्या रंगरंगोटीचा भार उचलण्याचा निर्णय घेतला. शाळेच्या कंपाऊंडच्या भिंतीवर छान छान चित्र रेखाटत घोषणावाक्ये लिहिण्यात आली, शाळा सजु लागली पण फक्त बाहेरून नव्हे तर अध्यापनाचे वातावरण आनंददायी करण्यासाठी प्रत्येक वर्गात पाठ्यपुस्तकातील आवश्यक गोष्टी भिंतीवर उतरविल्या आहेत.निसर्गाचे महत्व,स्त्री-पुरुष समानता,लहान कुटुंबाचे महत्व,शिक्षणाचे महत्व पटवून देणारे चित्र व घोषवाक्य परिसरात रेखाटण्यात आले आहेत.





**शाळेचे क्रीडांगण -**

सुदृढ शरीरातच सुदृढ मन वास करते यामुळे मुलांची शारीरिक सुदृढता टिकवून ठेवण्यासाठी अभ्यासाबरोबर खेळालाही तितकेच महत्व देत शाळेचे क्रीडांगण पसरले आहे.इथली मुले खेळाच्या तासिकेनुसार व आवडीनुसार खेळ खेळतात.शाळेत मोठ्या प्रमाणात खेळाचे साहित्य उपलब्ध आहे. या क्रीडांगणावर विद्यार्थी कबड्डी, खो- खो, लंगडी तसेच इतर खेळांचा सराव करतात.



**जलशुद्धीकरण केंद्र -**

श्री.स्वामी समर्थ अन्नछत्र मठ ठाणे या संस्थेमार्फत शाळेला 1000 लीटर क्षमतेचे जलशुद्धीकरण लाभले आहे. यामुळे मुलांच्या पिण्यासाठी शुद्ध पाणी उपलब्ध झाले त्यामुळे मुलांचे आरोग्य चांगले राहण्यास मदत होते.



**अदययावत किचन शेड -**

हृदयाचा रस्ता पोटातून जातो या उक्ती प्रमाणे शाळेचे किचन आहे. शाळेचे स्वयंपाकघर नीटनिटकेपणा पाहून कोणीही हरखून जाईल. धान्य ठेवण्यासाठी क्षमतेप्रमाणे कोठ्या त्यात व्यवस्थित निवडून ठेवलेले धान्य, त्यांची काळजी मदतनीसांकडून घेतली जाते. चुलीवरच्या धुराला आणि सरपण मिळवण्याच्या धडपडीला आता विराम मिळाला आहे शाळेत आता गॅसची सोय आहे सुसज्ज अशा दोन मोठ्मोठ्या या गॅसचा शेगड्या उपलब्ध आहेत.





**परिपूर्ण शौचालय -**

शाळेची आणखी एक गरज विद्यार्थ्यांसाठी शौचालय ही गरज पूर्ण केली रोटरी क्लब ऑफ मुंबई माहिम यांनी थायसिन ग्रुप यांच्या संयुक्त योगदांनातून सन 2016 मध्ये तेरा लक्ष पन्नास हजार रुपये खर्च करून सोई सुविधा उपलब्ध करण्यात आल्या. विद्यार्थी व विद्यार्थिनी साठी वेगवेगळे शौचालय उभारण्यास आले. शाळेचे हे शौचालय म्हणजे शाळेची जमाबाजुच आहे. अतिशय सुंदर बांधलेले हे शौचालय शिक्षक विद्यार्थी व मदतनिसांच्या मदतीने अजूनही सुसज्ज व स्वच्छ स्थितीतच आढळते.





**क्रीडा महोत्सव -**

क्रीडास्पर्धा शालेय केंद्र, बीट स्तर, तालुकास्तर याप्रमाणे राबविण्यात येतात यात लंगडी मुले-मुली, खो-खो, मुले-मुली कबड्डी मुले-मुली, संगीतखुर्ची, रिले स्पर्धा तीन पायांची शर्यत, लांब उडी,100 मीटर धावणे 200 मीटर धावणे या स्पर्धा घेतल्या जातात यात आमच्या शालेय विद्यार्थ्यांचे यश...



**वेगवेगळ्या स्वयंसेवी संस्थांकडून मदत**

**थायसील इंडस्ट्रियल ग्रुप व रोटरी क्लब ऑफ मुंबई (माहीम) -**

शाळेची गरज लक्षात घेऊन शाळेसाठी सर्वात आवश्यक बाब शौचालय याची पूर्तता थायसील इंडस्ट्रियल ग्रुप व रोटरी क्लब ऑफ मुंबई यांनी शाळेला सुसज्ज शौचालय बांधून दिले त्यामध्ये 12 शौचालय व पाच युरीन पॅन, चार हँडवॉश बेसिन आहेत. त्यांचे बांधकाम आरसीसी केलेले आहे सर्व बाथरूम मध्ये पाण्याची जोडणी करण्यात आलेली आहे.



**अदानी फाउंडेशन डहाणू -**

सन 2021 22 साली अदानी फाउंडेशन डहाणू यांनी शाळेला सुसज्ज दोन वर्ग खोल्या व एक मोठा हॉल बांधून दिला. वर्गात व हॉलमध्ये परिपूर्ण प्रकाश व्यवस्था आहे त्यामध्ये पंखे व लाईट जोडणी केली आहे. दोन्ही वर्ग खोल्यांमध्ये रंगरंगोटी करून देण्यात आली आहे.




**आयडीएफ फाउंडेशन -**

शालेय दप्तर व स्टेशनरी आयडीएफ फाउंडेशन यांच्याकडून सन 2021-22 पासून सर्व विद्यार्थ्यांना शालेय दप्तर देण्यात आले. आयडिया फाउंडेशन यांनी आमच्या शाळेबरोबरच अनेक शाळा दत्तक घेतल्या आहेत. ते दरवर्षी सर्व विद्यार्थ्यांना पुरेल एवढे शालेय शैक्षणिक साहित्य देतात.




**थिंक शार्प फाउंडेशन -**

सन 2022 23 साली थिंक शार्प फाउंडेशन यांनी अध्ययन व अध्यापन आनंददायी व सोपे करण्याच्या हेतूने एक इंटररीऍक्टिव्ह बोर्ड दिला आहे आणि  कसा वापरायचा याचे प्रशिक्षण दिले आहे.




**आयडीएफ फाउंडेशन -**

यांनी काळाची गरज लक्षात घेऊन 1 जुलै 2023 रोजी शाळेला 10 लॅपटॉप भेट दिले. आमच्या शाळेतील व आशागड केंद्रातील सर्व विद्यार्थ्यांना शालेय दप्तर वर्षभर पुरेल एवढे शैक्षणिक साहित्य वाटप केले.






**रोटरी क्लब ऑफ डहाणू –**

त्यांनी 21 ऑक्टोबर 2023 रोजी किशोरवयीन मुलींसाठी Reusable पॅडचे दोन किट वाटले, मासिक पाळी दरम्यान घ्यावयाची काळजी त्यासंबंधीचे गैरसमज दूर करण्यासाठी योग्य मार्गदर्शन केले.

**भारत विकास परिषद -**

यांनी 26 डिसेंबर 2023 रोजी शाळेत येणाऱ्या 30 विद्यार्थ्यांसाठी सायकल वाटप केले. त्यामुळे मुलांची पायपीट वाचली व मुले आनंदाने शाळेत येऊ लागली.




**अन्नदान व SOVO संस्था -**

यांनी 5 जानेवारी 2024 रोजी आमच्या शाळेत आयोजित तालुकास्तरीय विविध गुण स्पर्धेत सहभागी 600 पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना भोजनाची सोय केली होती.



**आयडीएफ व SOVO फाउंडेशन -**

सन 2024 मध्ये शाळेच्या सौंदर्यात वाढ झाली ती इथे बांधलेल्या संरक्षण भिंतीवरील रंगरंगोटीमुळे. आयडीएफ व SOVO यांनी संपूर्ण संरक्षण भिंत व तीन वर्ग खोल्यांची रंगरंगोटी करून दिली यासाठी साधारण 150000 रुपये खर्च केले.

**राऊंड टेबल इंडिया 200 मुंबई -**

सन 2024-25 ला शाळेच्या आवारात एक भव्य दिव्य इमारत उभी राहिली.






**ग्रामपंचायत कार्यालय चरी कोटबी -**

शाळेला यांनी 5000 क्षमतेचे सोलर कीट बसवून दिले आहे.त्यामुळे शाळेत 24 तास विजेची सुविधा झाली आहे.पाण्याची मोटार देखील सोलार उर्जेवर चालते.

**आयडीफ फाऊनडेशन -**

शैक्षणिक वर्ष 2024-25 साली आयडीफ फाउंडेशनने आमच्या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना दि.29.06.24 शालेय दप्तर व स्टेशनरी वाटप केले .




**आनंदा केअर -**

यांनी शाळेला शिक्षकांची कमी असल्यामुळे एक शिक्षक आनंद केअर मार्फत नियुक्त केला आहे ज्यामुळे अध्यापनाचे काम सोपे झाले आहे.

**ज्ञानश्री -**

ज्ञानश्री संस्था ही आपल्या नावाप्रमाणेच काम करते त्यांनी मुलांच्या गुणवत्तेला केंद्र मानून शैक्षणिक वर्ष 2024-25 मध्ये आपले काम आमच्या शाळेत सुरु केले आहे.सर्वप्रथम त्यांनी अध्यापनात मदत व्हावी या हेतूने शिक्षकांना इयत्तेनुसार एक एक सेट स्वाध्याय पुस्तिका भेट दिल्या त्यानंतर मुलांची गुणवत्ता तपासण्यासाठी शिष्यवृत्तीचे आयोजन केले व या परीक्षेत चांगल्या गुणांनी पास विद्यार्थ्यांना प्रोत्साहन म्हणून प्रतीमाह 400 रु. शिष्यवृत्ती देत आहेत.

**आयडीफ फाऊनडेशन -**

यांनी किशोरवयीन मुलींच्या अडचणी लक्षात घेऊन 02/02/2024 रोजी किशोरवयीन मुलींसाठी वर्ष भर पुरेल एवढे sanitary napkins वाटप केले व योग्य समुपदेशन केले.

**सुसज्ज सभागृह व मुख्याध्यापक कार्यालय -**

सन 2021-22 ला शाळेला अदाणी FOUNDATION यांच्या कडून मोठे सभागृह बांधून देण्यात आले.या सभागृहात विविध सांस्कृतिक कार्यक्रम,प्रशिक्षणे व सभा आयोजित केल्या जातात.तसेच शाळेचा रोजचा परिपाठ याच सभागृहात घेतला जातो. शाळेत मुख्याधापक कार्यालय अतिशय प्रशस्त व सर्व सोयी सुविधांनी युक्त आहे.या मध्ये प्रशासकीय व शाळेची संपूर्ण माहिती दर्शविण्यात आली आहे.






----------**----------

# "निसर्गरम्य बेटावर वसलेली कृतीप्रवण शाळा"

**शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद शाळा, अर्नाळा किल्ला, केंद्र.बाजार.ता.वसई, जि.पालघर.**


**शाळेचा ईमेल आयडी** - arnalakillazpschool@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.संजेश डॉमनीक रुमाव
**मोबाईल क्रमांक** - 8793832673/9689782505
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - sanjesh.rumao@gmail.com


अर्नाळा किल्ला हे चारही बाजूने पाण्याने वेढलेल्या निसर्गरम्य बेटावर वसलेले गाव आहे. गावाला ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. सुमारे 4000 लोकसंख्या असलेल्या गावातील सर्व लोक गरीब असून कोळी (मांगेला विशेष मागास प्रवर्गातील) समाजातील आहेत. बहुतांश ग्रामस्थांचा मासेमारीचा व त्यावर आधारित इतर जोडव्यवसाय आहेत. हया गावातील ग्रामस्थ अतिशय प्रतिकूल परिस्थितीत जीवन जगत असून रोजच्या जगण्यासाठी त्यांना अतिशय खडतर परिस्थितीला तोंड द्यावे लागत असून जगण्यासाठी खूपच संघर्ष करावा लागतो. रोजगारासाठी तसेच मासेमारी व्यवसायासाठी बहुसंख्य पुरुषांना खोल समुद्रात जावे लागते. वादळ वारे, ऊनपाऊस व समुद्राच्या लाटांचा सामना करत जीवाची पर्वा न करता मासेमारी हा आपला पारंपारिक वंशपरंपरेने चालत आलेला व्यवसाय करतात. महिला वर्ग अर्नाळा, विरारपासून पालघर व ठाणे जिल्हयातील अनेक शहरात व गावात मासेविक्रीचा व्यवसाय करतात. मासळी सुकविणे, मुंबईहून मासळी विकत आणून आसपासच्या गावात विक्री करणे हा त्यांचा जोडव्यवसाय आहे. नोकरी रोजगारासाठी व शिक्षणासाठी शहरात जाण्यासाठी समुद्र पार करून जावे लागते .हा दररोजचा प्रवास जीवघेणा व संघर्षाचा असून भरती ओहोटीनुसार रोज वेगळ्या परिस्थितीला तोंड द्यावे लागते. तरीही प्राप्त परिस्थितीत आनंदी व सुखी जीवन कसे जगायचे हेच अर्नाळा किल्ला ग्रामस्थाकडूनच शिकावयास मिळते.



अर्नाळा किल्ल्याचा दर्शनी भाग असून किल्ल्याला बाहेरून तटबंदी आहे. हा किल्ला प्राचीन असून ऐतिहासिक वास्तू म्हणून प्रसिद्ध आहे . किल्ला दर्शन करण्यासाठी व गावात प्रवेश करण्यासाठी समुद्र पार करून यावे लागते. त्यासाठी फेरीबोटीचा वापर करावा लागतो

सुमारे 4000 लोकसंख्या असलेल्या गावात जिल्हा परिषद शाळा अर्नाळा किल्ला ही एकमेव शासकीय शाळा आहे. 29 मार्च 1929 रोजी हया शाळेची स्थापना झालेली आहे. शाळा शतक महोत्सवाच्या उंबरठ्यावर आहे .सदर शाळा इयत्ता पहिली ते सातवीपर्यंत असून सद्यस्थितीत एकुण 183 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत . शाळेत सध्या 7 वर्गखोल्या व कार्यालय अशा 8 खोल्या आहेत. इयत्ता आठवी पासून पुढील उच्च शिक्षणासाठी समुद्र पार करण्याचा खडतर व जीवघेणा प्रवास येथील विद्यार्थ्यांना करावा लागतो .दुर्दम्य इच्छाशक्ती व खडतर परिश्रम घेऊन येथील विद्यार्थी शिकत आहेत.






**शाळा व्यवस्थापन समित्ती -**

गावात नवीन शाळा व्यवस्थापन समिती आकारास आली.शाळेची इमारत जीर्ण व नादुरुस्त झालेली असल्याने जिल्हा परिषद पालघरकडे शाळा दुरुस्ती प्रस्ताव पाठविण्यात यावा असा ठराव सभेत मंजूर करण्यात आला. हयासाठी जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्य यांची भेट घेण्यात आली. सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. हया कामी जिल्हा परिषद सदस्य सन्मा.आशाताई चव्हाण,सर्व ग्रामपंचायत सदस्य हयांचे बहुमोल सहकार्य लाभले .त्यामुळेच शाळा दुरुस्ती व नूतनीकरणाचा प्रस्ताव जिल्हा परिषद सभेत बांधकाम समितीकडून मंजूर करून घेण्यात आला . जिल्हा परिषदेकडून निविदा काढून शाळा दुरुस्तीसाठी वज्रेश्वरी मकासस कंपनीला रू. 9,99,994 निविदा मंजूर करण्यात आली.

शाळेच्या मुख्य इमारतीस कौलाची असलेले नादुरुस्त छत कडून पत्र्याची शेड तयार करणे व लादीकाम हया कामाचा समावेश निविदेत असला तरी रंगकाम, संगणक प्रयोग शाळा, लाईट फिटींग, सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी शोषखडडा तयार करणे, शाळेची रंगरंगोटी करणे हया पायाभुत सुविधांसाठी शाळा दुरुस्ती निविदेत तरतूद उपलब्ध नव्हती. हया सुविधा तातडीच्या व अत्यावश्यक असल्याने प्राधान्य क्रमाने उपलब्ध करण्याचे नियोजन व आराखडा तयार करण्यात आला .विविध स्वयंसेवी संस्था व NGO हयांच्या भेटीगाठी घेणे, पत्रव्यवहार करणे हयाबाबत नियोजन करण्यात आले. "गाव करील ते राव काय करील" या म्हणीनुसार सर्वजण झपाटून कामाला लागले. शाळा व्यवस्थापन समिती सदस्य ,ग्रामस्थ, ग्रामपंचायत सदस्य, शिक्षणप्रेमी नागरिक, शिक्षकवृंद हयांच्या संयुक्त विद्यमाने कृतीआराखडा व योजना तयार करण्यात आली. संयुक्त सभेत ठरल्यानुसार THINKSHARP FOUNDATION पुणे ,ROTARY CLUB ARNALA, विजय फाऊंडेशन वसई, महिंद्रा सेरम फाऊंडेशन मुंबई, विजय फाऊंडेशन, लायन्स क्लब, आगाशी, सोशल वेलफेअर ग्रुप अर्नाळा हया व इतर विविध स्वयंसेवी संस्था व NGO हयांच्याशी संपर्क साधण्यात आला. शाळेच्या लेटरपॅडवर आवश्यक मागणी अथवा मदतीबाबत विनंती अर्ज तयार करून मागणी करण्यात आली. कृतीआराखडयानुसार प्रत्यक्ष अमंलबजावणीला सुरुवात झाली.शाळेच्या भौतिक सुविधांसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याची भुमिका सर्वांनी घेतली .काही पालकांनी श्रमदान करून तसेच विविध स्वयंसेवी संस्थामार्फत मदत मिळवण्यासाठी लगबग सुरु केली.शाळेची आकर्षक रंगरंगोटी करण्यासाठी ग्रामस्थांनी पुढाकार घेवून स्वतःच रंगरंगोटी केली.श्री.अमोल वैती हयांनी दर्शनी भिंतीवर चित्रे व माहिती फलक तयार करून दिले.शाळेचे बाहयरंग व चेहरामोहरा बदलण्यास त्यांची खूपच मदत लाभली.

**शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थ संयुक्त शाळा नुतनीकरण सभा -**



शाळेच्या इमारतीत आमूलाग्र बदल झाला.कौलारू इमारतीची बरीचशी कौले फुटलेली होती.वासे कुजलेले होते. दरवर्षी पावसाळयापूर्वी कौले चाळावी लागत होती.फुटलेली कौले बदलावी लागत होती . छत गळत असल्याने विद्यार्थ्यांच्या अध्ययन व अध्यापनावर विपरीत परिणाम होत होता.ही समस्या दूर होण्यास मदत झाली . कौलारू इमारतीचे रुपांतर पत्राच्या छत इमारतीत झाले.



**नुतणीकरणापूर्वीची शाळा**



**नुतणीकरणा नंतरची शाळा**

**विद्यार्थ्यांच्या शाळेतील उपस्थितीचे प्रमाण -**

विद्यार्थ्यांची उपस्थिती 95 टक्के होती. गैरहजर विद्यार्थ्यांना दररोज शाळेत हजर राहण्यासाठी विशेष अभियान राबविण्याचे नियोजन करण्यात आले. पालकसभा, गृहभेटीच्या प्रयत्नाने 100 टक्के उपस्थिती असणाऱ्या विद्यार्थ्यांचा पुष्प देऊन परिपाठाच्या वेळी गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांची उपस्थिती 98 टक्के पर्यंत वाढविण्यात यश आले.




**शालेय मंत्रीमंडळ -**

शाळेत विद्यार्थी मंत्री मंडळ स्थापन करण्यात आले आहे. हया मध्ये मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शिक्षणमंत्री,आरोग्यमंत्री,क्रीडामंत्री तसेच स्वच्छता मंत्री व विविध मंत्री निवडणुकीतून नेमले आहेत. विविध खाते वाटप केले असून हयाबाबत विद्यार्थ्यांना त्यांच्या कामाची माहिती दिली आहे. शाळेची दैनंदिन कामे सरळीत पार पडण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येतो. दैनिक साफसफाई, पाणी भरणे ,शालेय बागेतील फुलझाडे व फळझाडे सिंचन करणे ही कामे शालेय मंत्रिमंडळाकडून केली जातात. शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक मंत्री मंडळाच्या दैनिक कामकाजाचे निरीक्षण व मार्गदर्शन करतात.

**डिजीटल शाळा -**



**शैक्षणिक उठाव -**

भौतिक सुविधा तसेच अध्यापन व अध्ययनाशी संबंधित आधुनिक साधनांची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी कॉर्पोरेट कंपन्या, स्वयंसेवी संस्था, दानशूर व्यक्ती इत्यादी घटकांकडून वस्तू व सेवा यांच्या स्वरुपात अधिकाधिक देणगी गोळा करण्यासाठीचे प्रयत्न करण्यात आले.

शैक्षणिक उठावातंर्गत जवळपास 12 लक्ष रुपयांची मदत वस्तुरुपात व भौतिक सुविधा रुपात मिळवण्यात शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, ग्रामस्थ, ग्रामपंचायत सदस्य, शिक्षणप्रेमी नागरिक, शिक्षकवृंद यशस्वी झाला. लाईट फिटिंग व आतून रंगाकामासाठी विजय फाऊंडेशन कडून दीड लाख रुपयांची मदत लाईट फिटिंग सामान व रंगकाम मटेरियल व मजुरीच्या रुपात मिळाली. ग्रामपंचायत कडून स्मार्ट डीजीटल टी.व्ही प्राप्त झाला. महिंद्रा सेलम फाऊंडेशन कडून फुलझाडे व औषधी वनस्पतीच्या 100 कुंड्या विनामुल्य प्राप्त झाल्या.

पारंपारिक शिक्षणाला आधुनिकतेची जोड देण्यासाठी भौतिक सुविधा तसेच अध्ययन व अध्यापनाशी निगडीत आधुनिक साधनांची उपलब्धता सुनिश्चीतता करण्यासाठी शाळा डीजीटल असली पाहिजे हया भूमिकेतून शिक्षकवृंदाने आपआपल्या परीने योगदान देत दात्यांचा शोध घेतला. THINKSHARP फाऊंडेशन पुणे व रोटरी क्लब अर्नाळा ह्यांच्याकडून जवळपास 6 लक्ष रुपये किंमतीचे स्मार्ट टी.व्ही प्राप्त झाले. इयत्ता 1 ली ते 7 वी संपूर्ण अभ्यासक्रम असलेल्या डीजीटल स्मार्ट टी.व्ही. चा वापर दैनंदिन अध्यापनात सर्व शिक्षकवृंद यशस्वी रित्या करत आहे. लायन्स क्लब व रोटरी क्लब व इतर NGO संस्थाची मदत घेतली. रोटरी क्लब कडून 5 संगणक संच प्राप्त केले असून शाळेत स्वनिर्मित संगणक प्रयोगशाळा तयार केली आहे. संगणक शिक्षण दिले जाते. जि .प.पालघर कडून जवळपास 5 लक्ष रुपये किंमतीचे दोन स्मार्ट टी .व्ही .प्राप्त झाले. अशा प्रकारे संपूर्ण शाळा डिजीटल करण्यात आली.



वसईच्या अर्नाळा किल्ल्यातील विद्यार्थ्यांना पाच संगणक भेट


अर्नाळा किल्ला येथील जिल्हा परिषद शाळेतील मुलांना रोटरी क्लब ऑफ विरार व मी बंदर पाठेकर सामाजिक संस्थेच्या माध्यमातून पाच संगणकांची भेट देण्यात आली.

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : चोहोबाजूने समुद्र अन् साडेचार-पाच हजार लोकवस्तीचे अर्नाळा किल्ला गाव. या गावातील नागरिकांना स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही अनेक सोयी-सुविधांपासून आजही वंचित राहावे लागत आहे. येथील जिल्हा परिषद शाळेतील मुलांना रोटरी क्लब ऑफ विरार व मी असते. अगदी एखादी अडलेली बाई जरी असली तरी तिला लाटांवर स्वार होऊनच पलीकडील गावचा दवाखाना गाठावा लागतो. येथील लोकांना दळणवळणासाठी पार करावे लागणारे दिवा मोठे आहे. मी जागृत बंदर पाठेकर सामाजिक संस्था आणि रोटरी क्लब ऑफ विरार यांनी केला स्वच्छता व सामाजिक उपक्रम







**शिष्यवृत्ती परीक्षा २०२३-२४ -**

सन 2023-24 मध्ये इयत्ता 5 वीतील सर्व 100 % विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेला प्रविष्ठ करण्यात आले. परीक्षा केंद्र आगाशी येथे असल्याने समुद्र पार करून विद्यार्थ्यांना सुरक्षित नेणे आणणे जोखमीचे व

जबाबदारीचे काम होते तरीही 18 फेब्रुवारी 2024 ला सर्व विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेला हजर राहिले तसेच कुमारी आराध्या देविकांत निजाई ही विद्यार्थीनी शिष्यवृत्ती परीक्षेत सुयश मिळवून पात्र ठरली.



| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | TUSCANO | | | |
| 59 | 221 | M5161101124 | 161101 | 27361700105 | MALE | | VEDANT SUNIL HOLSAMUDRE | ENGLISH | 51.0204 | |
| 60 | 222 | M5161104101 | 161104 | 27361704104 | FEMALE | | MYRA DANNY FERNANDES | ENGLISH | 51.0204 | |
| 61 | 223 | M5161101086 | 161101 | 27361700105 | FEMALE | | GAURI UDAY PATIL | ENGLISH | 51.0204 | |
| 62 | 225 | M5161104092 | 161104 | 27361704403 | FEMALE | | JADE JIPSON RODRIGUES | ENGLISH | 51.0204 | |
| 63 | 226 | M5161104085 | 161104 | 27361703503 | MALE | | DURVANK SUBHASH PARAB | ENGLISH | 51.0204 | |
| 64 | 228 | M5161102133 | 161102 | 27361700601 | FEMALE | | RUTVI MANOJ PATIL | ENGLISH | 51.0204 | |
| 65 | 230 | M5161102109 | 161102 | 27361700601 | MALE | | KYLE CEASOR GONSALVES | ENGLISH | 51.0204 | |
| 66 | 231 | M5161101121 | 161101 | 27361700105 | MALE | | VARAD SAINATH SALKAR | ENGLISH | 51.0204 | |
| 67 | 241 | M5161104088 | 161104 | 27361704104 | FEMALE | | GLYNIS AGNELLO DMONTE | ENGLISH | 50.3401 | |
| 68 | 245 | M5161104080 | 161104 | 27361704104 | FEMALE | | CASSIE JULIUS DABRE | ENGLISH | 50.3401 | |
| 69 | 246 | M1161105083 | 161105 | 27361705702 | FEMALE | | UNNATI RAMESH PATIL | MARATHI + ENGLISH | 50.3401 | |
| 70 | 248 | M5161101129 | 161101 | 27361700105 | MALE | | YASH GAURANGKUMAR KAPURIYA | ENGLISH | 50.3401 | |
| 71 | 267 | M1161101009 | 161101 | 27361700301 | FEMALE | | ARADHYA DEVIKANT NIJAI | MARATHI | 49.6644 | |
| 72 | 272 | M5161108153 | 161108 | 27361710412 | FEMALE | | FATIMA WASEEM KHAN | ENGLISH | 49.6599 | |
| 73 | 275 | M1161105075 | 161105 | 27361705702 | MALE | | RUTVIJ KETAN GHARAT | MARATHI + ENGLISH | 49.6599 | |

**शिष्यवृत्ती धारक विद्यार्थिनी कुमारी आराध्या देविकांत निजाई**

**वक्तृत्व कौशल्य विकास -**

शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना सभाधीटपणा व वक्तृत्व निपुण होण्यासाठी प्रयत्न केले जातात . वक्तृत्व स्पर्धा शाळा स्तरावर आयोजित केल्या जातात तसेच अशा जाहीर स्पर्धामध्ये सहभागी होण्यासाठी नेहमीच प्रोत्साहन दिले जाते.



**उत्सव सणसमारंभ -**

अर्नाळा किल्ल्यातील ग्रामस्थ उत्सवप्रिय आहेत.त्या अनुषंगाने सर्व सणसमारंभ पारंपारिक पद्धतीने उत्साहाने साजरा केले जातात.सर्व विद्यार्थ्याचे सांस्कृतिक कार्यक्रम दरवर्षी 26 जानेवारीला आयोजित केले जातात. विद्यार्थी आनंदाने व उत्साहाने त्यात सहभागी होतात.



**क्रीडा व कवायत -**

शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना कला व क्रीडा क्षेत्रात विशेष रुची असून तसा पारंपारिक वारसा लाभलेला आहे. गेल्या अनेक वर्षात शाळेने कला व क्रीडा क्षेत्रात विद्यार्थी गुणगौरव स्पर्धेत केंद्र व तालुकास्तरावर अनेक पारितोषिके मिळवलेली आहेत. सन 2023 -24 मध्ये जिल्हा स्तरावर मुलांच्या खो-

खो संघाने प्रथम क्रमांक प्राप्त केला. केंद्र व तालुका स्तरावर खेळात खो-खो व कबड्डी , लांब उडी, गोळाफेक हया प्रकारात व कला क्षेत्रात समूहगायन, वक्तृत्व, फॅन्सी ड्रेस प्रकारात अनेक बक्षिसे मिळवलेली आहेत. लायन्स क्लब व अर्नाळा सोशल वेलफेअर आयोजित कलाक्रीडा स्पर्धामध्ये सहभाग घेऊन लक्षणीय व घवघवीत यश नेहमीच शाळा मिळवत असते.





**शाळेतील दोन विद्यार्थिनींचा उत्कृष्ट कार्याबद्दल पालघर जिल्हा परिषदेकडून गुणगौरव करण्यात आला त्याची काही क्षण चित्रे**




शाळेतील सर्व शिक्षकाना दररोज संघर्षमय व जीवघेणा प्रवास करावा लागतो .पावसाळ्यात समुद्र खवळलेला असताना जीव मुठीत घेऊन वादळ वारे व लाटांचा सामना करत प्रवास करून शाळेत वेळेत पोहचून विद्यादानाचे कार्य शिक्षक प्रामणिकपणे व इमाने  इतबारे पार पाडतात.



**शालेय गणवेश -**

शाळेतील सर्व विद्यार्थी व शिक्षक यांना  इंग्रजी माध्यम शाळेतील विद्यार्थ्यांप्रमाणे पी .टी गणवेष तयार केले असून खेळ व कवायत तास त्याच प्रमाणे प्रजासत्ताक दिन व इतर शालेय क्रीडा स्पर्धासाठी गणवेष वापर केला जातो.सदर गणवेष 2019 -20 साली डॉ .अमित सामंत ह्यांच्या सौजन्याने प्राप्त झाला होता.



**महिला मेळावा -**

शाळेतील पालक वर्गासाठी महिलांसाठी हळदीकुंकू कार्यक्रम व महिला मेळावा दरवर्षी साजरा केला जातो मोठ्या प्रमाणात महिलांचा सहभाग त्यात असतो. शाळेत विविध शासकीय योजनेबाबत कार्यशाळा आयोजित करून विविध शासकीय योजनेबाबत माहिती देऊन मार्गदर्शन, करून पालकांची जनजागृती करण्यात आली.




शाळेत विद्यार्थीनीना आत्मनिर्भरतेचे धडे, कराटे प्रशिक्षण दिले जाते .कराटे प्रशिक्षणाचा स्वसंरक्षणासाठी निश्चितच उपयोग होणार आहे.



**मिशन आधार पूर्तता -**

सन 2020-21 मध्ये 233 विद्यार्थ्यापैकी 91 विद्यार्थ्याचे आधार कार्ड काढलेले नव्हते .पावसाळा असल्यामुळे सर्व विद्यार्थ्याना व पालकांना आधार कार्ड काढण्यासाठी विरार अथवा वसईला जाऊन आधार कार्ड काढणे जोखमीचे व खर्चिक होते .त्यासाठी आधार केंद्र संचालकांना संपर्क करून शाळेत आधार कार्ड

बायोमेट्रिक मशीन घेऊन पाचारण करण्यात आले .21 ते 23 नोव्हेंबर 2021 या कालावधीत शाळेत कँप लावून 91 विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढण्यात आले .100% आधार पूर्तता करण्यात शाळा यशस्वी झाली.



**मिशन ब्लडग्रुप तपासणी पूर्तता -**

सन 2023-24 मध्ये युडायस स्टूडंड पोर्टल साठी 183 विद्यार्थ्यांचे ब्लड ग्रुप ऑनलाईन नोंदवणे गरजेचे होते. पावसाळा असल्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना व पालकांना ब्लड ग्रुप काढण्यासाठी विरार अथवा वसईला जाऊन ब्लड ग्रुप काढणे जोखमीचे व खर्चिक होते .त्यासाठी प्राथमीक आरोग्य केंद्राशी संपर्क करून शाळेत ब्लड ग्रुप कीट घेऊन पाचारण करण्यात आले. शाळेत कँप लावून 183 विद्यार्थ्यांचे ब्लड ग्रुप काढण्यात आले. 100% ब्लड ग्रुप गोळा करण्यात शाळा यशस्वी झाली . सिस्टर गोन्हेकर व त्यांच्या टीमच्या सहकार्याने विनामुल्य सर्व विद्यार्थ्यांचे ब्लड ग्रुप काढता आले.



**स्वच्छ भारत मिशन -**

स्वच्छ भारत मिशन व संपूर्ण स्वच्छता कार्यक्रमात शाळेने सहभाग घेवून संपूर्ण स्वच्छता पंधरवडा कार्यक्रम साजरे केले आहेत. कार्यक्रमात शाळा परिसर सफाई व ग्राम स्वच्छता व समुद्रकिनारा स्वच्छ केला आहे. सहभागाबद्दल शाळेला प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.











पेयजल एवं स्वच्छता विभाग
जल शक्ति मंत्रालय
DEPARTMENT OF DRINKING WATER AND SANITATION
MINISTRY OF JAL SHAKTI

आज़ादी का अमृत महोत्सव

स्वच्छ भारत

mygov मेरी सरकार

# स्वच्छ भारत मिशन ग्रामीण
# शपथ-पत्र

प्रमाणित किया जाता है कि

Z P SCHOOL ARNALA KILLA

ने अपने आसपास को सम्पूर्ण स्वच्छ बनाने की
दिशा में कार्य करने का संकल्प लिया है

5565275963

September, 17 2024



Swachhata Hi Seva

## Certificate of Appreciation

This is to certify that

**Z P ARNALA KILLA**

Has contributed in
Shramdaan for Swachh Bharat
On
1st October, 2023, at 10 AM

**A Swachh Bharat Mission Initiative**

**साक्षरता साप्ताह सहभाग -**

NILP कार्यक्रमा अंतर्गत सन 2023-24 मध्ये 5 निरक्षरांची नोंदणी ULLAS ऍप वर करून साक्षर करण्यात आले . सन 2024 -25 मध्ये 10 निरक्षरांची नोंदणी करून साक्षरता वर्ग सुरु आहेत . साक्षरता सप्ताह साजरा करून प्रभात फेरी व विविध उपक्रम शाळेत राबविले जातात .



**निपुण माता गट कार्य -**

निपुण माता गटांची स्थापना केली असून वीडीओ पाठवले जातात . निपुण माता गटांचे प्रभावी कार्य सुरु असून 15 ऑगस्टला निपुण माता लीडरचा सत्कार करण्यात आला . 15 ऑगस्टला निपुण माता लीडरना प्रमाणपत्र व गुलाब पुष्प देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला .



**महावाचन सहभाग -**

महावाचन उपक्रमात सन 2023-24 व सन 2024-25 मध्ये सहभाग घेऊन वाचन चळवळ व संस्कृती रुजवण्यासाठी निरंतर प्रयत्न केले आहेत . सन 2024-25 मध्ये इयत्ता 3 री ते 7 वी मधील एकूण पटावरील 145 विद्यार्थांनी सहभाग घेऊन ऑनलाईन 100 %नोंदणी केली आहे.



'महाराष्ट्र शासन'
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
'महावाचन उत्सव २०२४'

महावाचन उत्सव

प्रशस्तीपत्र

***CHIRAG MHATRE***

Z.P. SCHOOL ARNALA KILLA, PALGHAR, इयत्ता ७ वी, **महावाचन उत्सव २०२४** या उपक्रमात इयत्ता **६ वी ते ८ वी** या गटातून सहभाग घेतल्याबद्दल आपणास हे प्रशस्तीपत्र प्रदान केले जात आहे. आपल्या वाचनाच्या आवडीने आणि सक्रिय सहभागामुळे हा उपक्रम यशस्वी झाला आहे. वाचनाचा प्रवास आपल्याला नव्या उंचीवर नेऊन ठेवेल यात शंका नाही. महावाचन उत्सवात सहभागासाठी आपले अभिनंदन!

**आपल्याला पुढील वाचन प्रवासासाठी हार्दिक शुभेच्छा!**

दीपक केसरकर
मंत्री, शालेय शिक्षण,

एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री,

**वृक्षारोपण** - शालेय परिसरात व किल्ल्यात प्रतिवर्षी वृक्षारोपण केले जाते . वृक्षसंवर्धन केले जाते .शालेय इमारती समोर वृक्ष लावून गविले आहेत.



**मुख्यमंत्री स्वच्छ शाळा सुंदर शाळा सहभाग -**

मुख्यमंत्री स्वच्छ शाळा सुंदर शाळा अभियानात सहभाग घेऊन सन 2023-24 मध्ये तालुका स्तरावर द्वितीय क्रमांक व 2024-25 मध्ये जिल्हा स्तरावर तृतीय क्रमांक शाळेने प्राप्त केला आहे.

## जि.प.शाळा अर्नाळा किल्ला वेगवेगळ्या युट्यूब, फोटो .गुगल ड्राईव्ह लिंक्स

https://youtu.be/rBe5XLkBSg4

(जि प शाळा अर्नाळा किल्ला तालुका वसई येथील सातवीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभाचा व्हिडिओ मार्च 2023)

https://youtu.be/9gPoIeDQM_I?si=p1EzhiaGQXM1abXb

(निरोप समारंभ इयत्ता सातवी 2024 जिल्हा परिषद शाळा अर्नाळा किल्ला तालुका वसई जिल्हा पालघर

https://youtu.be/BMjRg-CHASc?si=1q8EMyUPBFaZBWcn

(शाळापुर्व तयारी मेळावा )

https://youtu.be/RQtyWgoDY9w?si=6IaLHm7ZJnwXwkBA

( विस्तार अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी पालघर यांचे जिल्हा परिषद शाळा अर्नाळा किल्ला शाळेविषयी चे विचार दिनांक 26 जानेवारी 2023 जिल्हा परिषद शाळा अर्नाळा किल्ला विद्यार्थी स्नेहसंमेलन )

https://youtu.be/T8yNHoxyKok?si=asnp8ayB20uhZunT

(प्रत्यक्ष प्रात्यक्षिकतून अभ्यास जिल्हा परिषद शाळा अर्नाळा किल्ला )

https://youtube.com/shorts/4sjw1i2dnWI?si=UqdL_6Y_bfAKrvBG

(बालसभा जिल्हा परिषद शाळा अर्नाळा किल्ला )

https://youtu.be/w1EpSw7-5F0?si=MjM5UrZtYP3VIqXZ

(राष्ट्रीय शिक्षण दिन 11 नोव्हेंबर 2022 जि. प. शाळा अर्नाळा किल्ला )

https://youtu.be/PNJbYmbjdZU?si=UsqWpKHl4v-pg6My

(राज्यगीत ओळख व माहिती जिल्हा परिषद शाळा अर्नाळा किल्ला )

https://youtu.be/6JZSR4wNc9E?si=67B7I3zS0s7HJ1pr

(मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा क्रमांक 2 जिल्हास्तरीय परीक्षण शाळा अर्नाळा किल्ला सन 2024)

https://youtu.be/YQ2FQ1lpAKM?si=YSPM6C9jpKO4C4qh

(जिल्हा परिषद शाळा उन्हाळा किल्ला येथील 15 ऑगस्ट 2023 विद्यार्थी भाषणे )

https://youtu.be/G4XVsksrPsA?si=lY8bbCB2uUjTX7Hb

(जि. प. शाळा अर्नाळा किल्ला येथील विद्यार्थिनी दिव्या भरत वैती हिचे महावाचन चळवळ सन 2024 पुस्तक परीक्षण)

https://youtu.be/c1tni6HiLy0?si=XVygWr32VdsApZFF

(जि. प.शाळा अर्नाळा किल्ला ता.वसई ,जिल्हा पालघर जागतिक महिला दिन 8 मार्च 2022 )

https://youtu.be/g3xGwo-Buk8?si=e7OWzmfOyZTcWDaH

(जि.प.शाळा अर्नाळा किल्ला, केंद्र.बोळींज, तालुका.वसई,जिल्हा पालघर जागतिक हात धुवा दिन प्रशिक्षण)

https://drive.google.com/file/d/1MMWqOOMxIk3mAP6WyuQpNyyfUKiDPKIp/view?usp=drivesdk

( विद्यार्थी उपक्रम सहभाग )

https://drive.google.com/file/d/1LkDhJlonOwM6079NPMtrvqCXtZNulD4J/view?usp=drivesdk

( विद्यार्थी उपक्रम सहभाग )

https://drive.google.com/file/d/1MDg6364f2LO_7DhEOcLcj76Yz0Ps__s6/view?usp=drivesdk

( गोपालकाला दिवस साजरा )

https://drive.google.com/file/d/1LhCJAV5kVPAF9N1hFOBp9JrjdZu4Rl0d/view?usp=drivesdk

( समुहगीत स्पर्धा )

https://photos.app.goo.gl/qaPA4AWYbaUB2YX27

( जि.प.शाळा अर्नाळा किल्ला फोटो सन २३-२४)

https://photos.app.goo.gl/iHYRNsKG3n2yNK6e9

( जि.प.शाळा अर्नाळा किल्ला फोटो सन २४ )

https://drive.google.com/drive/folders/1PbiUgSThfPNwUy6bynyXcaVjDrGBHihq

(महावाचन विद्यार्थी पप्रमाणपत्र 2024)

https://drive.google.com/drive/folders/1Q2rikX_AUn2jrp0BhvwXlF8EbUbld-T1

(नवभारत साक्षरता परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे )

https://photos.app.goo.gl/xKbn5uNQ9nEUchMq6

( जि.प.शाळा अर्नाळा किल्ला फोटो )

----------**----------

## “शालेय परिवर्तनात शाळा व्यवस्थापन समितीचा सहभाग”

**शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद शाळा, तणाशी, केंद्र.चिंचणी, ता.डहाणू, जि.पालघर**

**शाळेचा ईमेल आयडी** - z.p.school.tanashi@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.संदीप भालचंद्र म्हात्रे
**मोबाईल क्रमांक** - ९२७३९९४२००
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - z.p.school.tanashi@gmail.com




शाळेला मागील सहा वर्षापासून जे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष लाभले तसेच सदस्य यांनी शाळेच्या विकासात महत्त्वाची भूमिका करून शाळेचा आराखडा निर्माण करून आकर्षक शाळा करण्यासाठी घेतलेल्या मेहनतीचे फळ आज शाळेत सुंदर इमारत आहेच तसेच एक आदर्श शाळा आहे. वाचनालय, विज्ञान प्रयोगशाळा, साऊंड सिस्टिम, संगणक, प्रिंटर तसेच ऑक्सिजन युक्त गार्डन, बोरवेल उपलब्ध आहे.

### पूर्वीची शाळा







प्रयत्न ही यशाची पहिली पायरी आहे या उक्तीप्रमाणे जिल्हा परिषद तणाशी, केंद्र चिंचणी, तालुका डहाणू, जिल्हा पालघर या शाळेच्या भौतिक आणि गुणात्मक विकासाचा संकल्प शिक्षक वृंद ग्रामस्थ मंडळी स्वयंसेवी संस्था, CSR विभाग यांनी केल्यानंतरच लगेचच प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरुवात झाली आणि बघता बघता शाळेचा कायापालट झाला.

**शालेय स्तरावर विविध योजनांचा लाभ विद्यार्थ्यांना दिला जातो.**



**शिक्षण परिषदेत विद्यार्थ्यांना शिक्षकांना उचित मार्गदर्शन केले जाते विविध अंगाने त्यांचा विकास केला जातो.**



**शाळा प्रवेशासाठी पालकांची भेट व विद्यार्थ्यांचे स्वागत आनंददायी वातावरणात केले जाते.**






- सातत्यपूर्ण मार्गदर्शन व सराव चाचणी शाळेमध्ये असलेल्या संगणक व प्रिंटरचा वापर करून सराव चाचणी विद्यार्थ्यांसाठी घेऊन त्यानुसार विद्यार्थ्यांच्या अध्ययन स्तरासाठी मदत घेतली जाते.
- शासकीय चित्रकलेच्या इंटरमिजिएट अँड एलिमेंट्री परीक्षा नवोदय एन. एम. एम. एस. शिष्यवृत्ती पाचवी आणि आठवी याची सर्व तयारी व मार्गदर्शन शाळेत घेतले जाते तसेच वर्गात्मक परीक्षा मध्ये विद्यार्थ्यांना बसण्यासाठी उत्तेजन दिले जाते.






- शाळेमध्ये प्रत्येक विविध उपक्रम तसेच बौद्धिक, भावनिक, सामाजिक विकासाच्या अंतर्गत अनेक उपक्रम घेऊन विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव दिला जातो व सर्वांगीण विकास केला जातो.
- डिजिटल क्लासरूम ही संकल्पना शाळेत राबविली जात असून कार्यानुभव च्या तासाला डिजिटल क्लासमध्ये विद्यार्थ्यांना डिजिटल साधनांद्वारे अध्यापन घेतले जाते तसेच डिजिटल साधने हाताळण्याची संधी दिली जाते.






**पाठ्यपुस्तक मोफत वाटप योजना उत्कृष्टपणे राबवताना तणाशी शाळा**







शाळा व्यवस्थापन समिती व पालक हा शाळेचा कणा असतो. शाळेचे भौतिक विकासासाठी सहकार्य करण्याची भूमिका शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांनी घेतल्यानंतर सर्व शिक्षकांच्या कामाचा व्याप वाढला ज्याला जसे जमेल त्याने योगदान देऊन एक चांगली इमारत पालक वर्गणी आणि शिक्षक वर्ग यांच्या उत्क्रांतीतून झाली.








- योगप्रशिक्षण प्रात्यक्षिक देताना सर्व शिक्षक वर्ग व विद्यार्थी यांच्यामार्फत प्रात्यक्षिक करून घेताना.
- रेन वॉटर हार्वेस्टिंग इत्यादी सोयी निर्माण करण्यासाठी उचित नियोजन CSR
- CSR शैक्षणिक साहित्याचे वाटप कार्यक्रमाचे छायाचित्र
- शैक्षणिक साहित्याचे वाटप कार्यक्रमाचे छायाचित्र
- डिजिटल क्लासरूम ही संकल्पना शाळेत राबविली जात असून कार्यानुभवच्या तासाला डिजिटल क्लासमध्ये विद्यार्थ्यांना डिजिटल साधनांद्वारे अध्यापन घेतले जाते तसेच डिजिटल साधने हाताळण्याची संधी दिली जाते.
- वृक्षारोपण द्वारे शाळेमध्ये संपूर्ण वृक्षांचे लागवड केलेली असून त्यामध्ये फुल व फळझाडे आहेत. शाळेत सुंदर परसबाग तयार केली आहे
- शाळेतील शिक्षक लेझीमचे प्रात्यक्षिक दाखवताना नेहमी लेझीम प्रकार व नृत्य शाळेत शिकवले जाते.
- अनेक स्पर्धात्मक उपक्रम घेऊन विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव दिला जातो व सर्वांगीण विकास केला जातो.
- शासकीय चित्रकलेच्या इंटरमिजिएट आणि एलिमेंट्री परीक्षा पात्र विद्यार्थी



हर घर तिरंगा उपक्रम तसेच राष्ट्रीय सण उत्सव साजरे करताना तणाशी शाळा शिक्षक, ग्रामस्थ व विद्यार्थी.














- सांस्कृतिक कार्यक्रमात कला कौशल्यांचा विकास तणाशी शाळेत होतो यामध्ये मुलींनाही मोठ्या प्रमाणात सहभागी करून कला कौशल्य शिकवले जाते.
- एन. एम. एम. एस. परीक्षेत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले जाते. कुमार मानव दाभाडे हा विद्यार्थी मेरिटमध्ये सन २०२२-२०२३ ला आला असून त्याला आता प्रत्येक वर्षाला रुपये 12000 म्हणजे सतत चार वर्षे रुपये 48 हजार शिष्यवृत्ती मिळणार आहे.
- शैक्षणिक उठावात ग्रामस्थ व शिक्षक यांनी मिळून सुमारे पाच लाख पेक्षा जास्त रकमेचा शैक्षणिक उठाव करून ग्रामीण भागात शाळेला शहरी शाळेचा साज चढविला आहे.





- विज्ञान प्रदर्शन यामध्ये शाळा राज्यस्तरावर गेली असून विद्यार्थ्यांचा प्रकल्प राज्यस्तरावर कौतुकास पात्र होता,अशाप्रकारे गुणवत्तापूर्ण उपक्रमावर भर देणारी ज्ञानरचनावादी शिक्षण देणारी जिल्हा परिषद शाळा तणाशी होय.
- विद्यार्थ्यांसाठी संस्कार पुस्तिकेद्वारे विविध देशभक्तीपर गीत, प्रार्थना, श्लोक, विविध संस्कार तसेच बौद्धिक उपक्रम या द्वारे विद्यार्थ्यांचा विकास केला जातो.














आमची बचत बँक अंतर्गत प्रत्येक वर्गाची बचत बँक, वर्ग प्रतिनिधी मॉनिटर हा सांभाळतो. त्याचा व्यवहार विद्यार्थीच बघतात व बालसभा तसेच तक्रार निवारण व्यवस्था असून विद्यार्थ्यांना व शिक्षकांना विविध मार्गदर्शनासाठी सदर बाबींचा उपयोग होतो. शाळेमध्ये मंत्रिमंडळामार्फत वाचनालय चालवले जाते तसेच

विद्यार्थ्यांना मोबाईल टॅब तसेच साऊंड सिस्टिम याद्वारे परिपाठात चांगला उपयोग शाळेत केला जातो. डिजिटल शाळा ग्रामपंचायत व शाळा व्यवस्थापन समिती यांच्या सहकार्याने सामाजिक बांधिलकी उपक्रम यातून शाळा पूर्ण डिजिटल केली असून आम्ही स्वखर्चाने वायफाय बसवला आहे तसेच शाळेचा झेडपी स्कूल तणाशी नावाने YouTube चैनल आहे.




जागतिक
आदिवासी
दिन
९ ऑगस्ट

चला आपल्या पाल्याचा प्रवेश निश्चित करुया

जिल्हा परिषद शाळा तणाशी, केंद्र- चिंचणी

## शैक्षणिक गुणवत्ता कार्यक्रमात उल्लेखनीय सुयश प्राप्त करणारी शाळा

## मोफत प्रवेश इयत्ता पहिली ते आठवी २०२४ - २०२५

### शाळेची वैशिष्ट्ये

1.दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण
2.प्रशस्त इमारत व सर्व भौतिक सुविधा
3.विविध स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन
4.इंटरमिजिएट व एलिमेंटरी ग्रेड परीक्षा मार्गदर्शन
5. विविधांगी सर्जनशील उपक्रम
6.संगणक शिक्षण ,नववी व दहावी वर्ग प्रस्तावित
7. सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन
8. शिक्षण महोत्सव , शै.सहलीचे आयोजन
9.लेझीम पथक ,क्रीडा प्रकार स्पर्धा
10.निसर्गरम्य वातावरण ,सुसज्ज स्वच्छतागृहे
11.प्रशिक्षित व तज्ज्ञ अध्यापक वर्ग
12.वंचित व गरजू मुलांना मोफत स्कूल किट
13. स्वतंत्र ग्रंथालय , पिण्याचे शुद्ध पाणी
14. मुलींसाठी विशेष आरोग्य सुविधा



### विविध योजना

1.मोफत पाठ्यपुस्तके
2.सर्व मुलामुलींना मोफत गणवेश
3.शालेय पोषण आहार व मध्यान्ह भोजन
4.सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना
5.सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती योजना
6.इ. १ली ते इ. ५ वी मुलींसाठी उपस्थिती भत्ता
7.SPORTS DRESS सुविधा

सौजन्य- शाळा व्यवस्थापन समिती, तणाशी

दैनिक भास्कर • मीरा-भायंदर • वसई-विरार • पालघर • भिवंडी महामुंबई • कल्याण • डोंबिवली • उल्हासनगर • बदलापुर
मुंबई | सोमवार, 9 सितंबर 2024
bhaskarhindi.com
3

मंडे पॉजिटिव

# बारिश की बूंद-बूंद सहेज रहे सरकारी स्कूल के विद्यार्थी

योगेंद्र सिंह ठाकुर | बोईसर

जल प्रकृति की अनमोल धरोहर है। इसके बिना जीवन संभव नहीं है। इसके महत्व को ध्यान में रखकर पालघर जिले के तनाशी स्थिति जिला परिषद के स्कूल में पढ़ने वाले विद्यार्थी बारिश की बूंद-बूंद को सहेजकर पानी की बर्बादी रोक रहे हैं। ये बच्चे बारिश के पानी से जमीन को सींच कर भूजल स्तर बढ़ाने का भी प्रयास कर रहे हैं। इसके तहत बारिश के दौरान बहने वाले पानी को पाइप के माध्यम से जमीन के अंदर पहुंचाया जा रहा है। वहीं वर्षा जल संचय प्रणाली से तनाशी गांव के सरकारी स्कूल में पेयजल, भोजन बनाने, कपड़े धोने और बागवानी के लिए पर्याप्त पानी मिल रहा है। स्कूल को पानी के मामले में आत्मनिर्भर बनाने का श्रेय स्कूल के प्रिंसिपल संदीप म्हात्रे और स्कूल के शिक्षकों को जाता है, जिन्होंने अपने स्कूल में बारिश के पानी का संचय कर उसे पीने योग्य बनाने की योजना साकार की है।

### जल संरक्षण से रोक रहे पानी की बर्बादी



### भूजल के स्रोत हुए रिचार्ज

- बारिश का पानी धरती छोड़ने से भूजल के स्रोत रिचार्ज हुए हैं।
- आस-पास के लोगों को भी पानी की आपूर्ति की जा रही है।
- इससे लोगों को जल संरक्षण की प्रेरणा मिल रही है।
- स्कूल में भरपूर पानी होने से वृक्षारोपण भी किया जा रहा है। स्कूल में फल-फूल के पौधे -भी लगाए गए हैं।
- स्कूल का किचन गार्डन हरा-भरा रहता है।
- स्कूल के किचन गार्डन में बच्चे सब्जियां उगाते हैं और उन्हीं सब्जियों को बच्चों को भोजन में परोसा जाता है।



### विद्यार्थियों को संचय प्रणाली मिली सीखने को

स्कूल में वर्षा जल संचय प्रणाली स्थापित करने की पूरी परियोजना विद्यार्थियों के लिए भी सीखने की प्रक्रिया रही है। सातवीं की एक छात्रा ने बताया कि प्लांट और वर्षा जल संचय के बारे में हमने सिर्फ किताबों में पढ़ा था, लेकिन यहां हम इसे प्रत्यक्ष बनाकर इसके कई लाभ देख रहे हैं।



**जमीन में बढ़ा जल स्तर, दूर हुई पानी की किल्लत:** इस पहल के बारे में स्कूल के प्रिंसिपल म्हात्रे ने कहा कि बारिश का पानी जमीन के नीचे पहुंचाने से स्कूल में पानी की किल्लत दूर हो गई। स्कूल में पहले जनवरी-फरवरी में ही पीने के लिए पानी की किल्लत शुरू हो जाती थी, लेकिन अब पूरे साल भरपूर पानी उपलब्ध रहता है। उन्होंने कहा कि पीने के लिए पानी को फिल्टर किया जाता है। म्हात्रे ने बताया कि सामाजिक कार्यकर्ता जैनब दड़ी और आशुध्यमन संस्था के सहयोग से स्कूल में वर्षा जल संचय प्रणाली लगाई गई। स्कूल की छत पर फिल्टर लगाया है। इसकी देखरेख और धरती को पानी से सींचने की प्रक्रिया को स्कूल के बच्चे देखते हैं।

दैनिक भास्कर Mon, 09 September 2024
https://epaper.bhaskarhindi.com/c/75814106

----------**----------

# “आदिवासी दुर्गम डोंगराळ भागातील कातकरी व वारली आदिवासी जमातीच्या पाड्यावरील शाळा”

**शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद शाळा, कवाडा, लिलकपाडा, पालघर**

**शाळेचा ईमेल आयडी** - dnyaneshwarsarak2588@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.ज्ञानेश्वर दिगंबर सरक
**मोबाईल क्रमांक** - ९०४९५०६०३१
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - dnyaneshwarsarak2588@gmail.com

पालघर जिल्ह्यातील तलासरी तालुक्यातील आदिवासी दुर्गम डोंगराळ भागातील , आपला देश अमृत महोत्सव साजरा करत असताना सुद्धा जिथल्या अनेक झोपड्यांमध्ये ज्ञानाचा अजून दिवाच पेटला नव्हता अशा कातकरी व वारली या आदिवासी जमातीच्या पाड्यावरील एक दुर्लक्षित शाळा म्हणजे जिल्हा परिषद शाळा कवाडा लिलकपाडा ही शाळा होय. दुर्लक्षित म्हणण्याचे कारण म्हणजे सदर शाळेकडे फारसे कोणाचे लक्ष नव्हते. सन २०२३ मध्ये जिल्हाअंतर्गत बदली प्रक्रिया सुरू झाली . या बदली प्रक्रियेमध्ये विनंती बदली या टप्प्यामध्ये कोणीही शिक्षक ही शाळा घ्यायला तयार नव्हते . कारण सदर शाळा ही एक शिक्षकी शाळा होती , त्यामुळे एकट्यालाच पुढे अनेक वर्षे शाळा सांभाळावी लागेल, एकट्याला शाळेत फार कंटाळा येईल या आणि अशा अनेक कारणांमुळे तसेच या शाळेत इतर अनेक समस्या होत्या आणि तलासरी तालुक्यातील सर्व शिक्षकांना त्या ज्ञात होत्या, त्यामुळे पहिल्या ३० पसंतीक्रमातही कोणी या शाळेचे नाव घेत नव्हते.

या शाळेच्या महत्त्वाच्या समस्या म्हणजे पटसंख्येचा अभाव, भौतिक सुविधांची कमतरता, एक शिक्षकी शाळा, शालेय रेकॉर्डचा अभाव, शाळेची इमारत नादुरुस्त त्याचबरोबर वॉल कंपाऊंड तुटलेले, शाळेच्या समोर मोठमोठे खड्डे असलेले असपाट मैदान तसेच नादुरुस्त असलेले गळके असलेले, स्वयंपाकाचे पुरेसे साहित्य नसलेले आणि उंदरांचे साम्राज्य असलेले किचन शेड कारण ज्यावेळेस मी हे शेड उघडले त्यावेळेस मला तिथं मोठ्या प्रमाणावर उंदरांची पिल दिसली म्हणजे किचन शेडला उंदरांनी आपले घरच बनविले होते तसेच विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तेचा आणि शिस्तीचा प्रचंड अभाव, अशा प्रकारच्या अनेक समस्या असलेली ही शाळा तालुक्यातील कोणताही शिक्षक स्वत:हून घेण्यास तयार नव्हता . अशा या दुर्लक्षित आणि अनेक समस्या असलेल्या शाळेची मला पूर्वकल्पना असताना आणि माझे मित्र सुध्दा ही शाळा घेऊ नको तिथे तुझे खूप हाल होतील, काहीच रेकॉर्ड व्यवस्थित नाही, पटसंख्या कमी आहे, तुला एकट्यालाच शाळा सांभाळावी लागेल असे सांगत असताना सुद्धा मी प्रशासकीय बदलीत एक आव्हान म्हणून ही शाळा घेतली आणि दिनांक १८ मे २०२४ रोजी शाळेत हजर झालो.

ज्यावेळेस शाळेमध्ये हजर झालो त्यावेळेस पटसंख्या होती फक्त सतरा या शाळेतील सर्वात मोठे आव्हान म्हणजे शाळेची पटसंख्या वाढवणे हे होते. ज्यावेळेस मी पाड्यातील सर्वे केला तेंव्हा असे कळाले की पाड्यात जवळ जवळ १७० कुटुंब आहेत तसेच अंगणवाडीताई यांच्याशी चर्चा केली असता असे समजले की , पाड्यातून दर वर्षी जवळ जवळ १८ ते २० विद्यार्थी दाखलपात्र असतात , परंतू कोणी पालक आपली मुले या शाळेत पाठवत नाहीत तर, ही सर्व मुले दीड किलोमीटर अंतरावर असलेल्या आश्रमशाळेत शिक्षणासाठी जातात आणि हे खरे होते कारण, शाळेच्या गेटला लागून असलेल्या तसेच शाळेच्या भोवतालच्या घरातील मुले सुद्धा म्हणजेच अगदी शून्य किलोमीटर अंतर असलेली मुले ही घराजवळची शाळा

सोडून दीड किलोमीटर अंतर असलेल्या आश्रमशाळेत जातात तर काही पालकांची मुले ही तालुक्याला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकायला जातात असे समजले. या बाबत पालकांशी चर्चा केली असता बऱ्याच पालकांच्या तोंडी एकच वाक्य त्यांच्या वारली भाषेत ऐकायला मिळायचे ते म्हणजे, "या शालेचा काय ठिकाणा नाय , अथ शिक्षान काय बेस नाय." त्यामुळे इथल्या पालकांचा विश्वास जिंकणे शाळेची पटसंख्या वाढवणे हे माझ्यासमोर मोठ्या आव्हान होते.

शाळेला वर्ग खोल्या दोन आणि ज्यावेळेस दोन्ही वर्ग खोल्या उघडल्या त्यावेळेस वर्ग खोल्यांची अवस्था खूपच वाईट होती भिंती खचलेल्या होत्या, दरवाजे तुटलेले होते खिडक्या तुटलेल्या होत्या, काही खिडक्यांना तर दरवाजेच नव्हते , कपाट गंजलेले होते आणि कपाटातील कागदपत्रांना अक्षरशा वाळवी लागली होती म्हणजेच वाळवीने कपाटातील बऱ्याच साहित्यावर आपला ताबा मिळवला होता अशा अवस्थेमध्ये ही शाळा होती, या शाळेमध्ये परिवर्तन घडवणे हे माझ्यासाठी खूपच मोठे आव्हान होते.

मी पहिले मिशन हाती घेतले ते म्हणजे पटसंख्या वाढविणे. त्यासाठी मी अंगणवाडी ताई कडून दाखल पात्र विद्यार्थ्यांची यादी घेतली आणि प्रत्येक विद्यार्थ्याच्या घरापर्यंत पोहोचलो आणि पालकांना विनंती करू लागलो की, तुमची मुलं ही आपल्या पाड्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेमध्येच पाठवा परंतु एकही पालक आपला मुलगा शाळेमध्ये पाठवायला सहजासहजी तयार होत नव्हता. अनेक पालकांनी तर आपल्या मुलांचा प्रवेश हा जवळच्या आश्रमशाळेमध्ये निश्चित सुद्धा केला होता तरीही मी जिद्द सोडली नाही आणि रोज पालकांच्या घरी जायचो त्यांना विनंती करायचो त्याचबरोबर माझ्या पूर्वीच्या म्हणजे आवारपाडा शाळेतील विद्यार्थ्यांचे पाढे पाठांतर, इंग्रजी वाचन विविध स्पर्धांमधील सहभाग यासारखे व्हिडिओ दाखवून त्यांच्यामध्ये विश्वास निर्माण करायचो की तुमची मुलं ही माझ्याकडे द्या मी त्यांच्यामध्ये नक्कीच बदल घडवेल, पण कोणीही पालक सहजासहजी तयार होत नव्हते. कातकरी पाड्यात तर रोजच जायचो पाड्यांमध्ये फिरून स्वतःच माईक घेऊन दवंडी द्यायचो की, पालकांनो तुम्हाला विनंती करतो आपली मुलं ही आपल्या जिल्हा परिषद शाळेमध्ये पाठवा मी त्यांना चांगल्या प्रकारे घडविन , चांगले शिकवीन अशा प्रकारे मोठमोठ्याने माईकवर ओरडायचो, पालकांना वाटायचं हा मास्तर काय वेडा आहे का काय? हा काय रोज येऊन इथे मोठमोठ्याने ओरडतो. असाच एक प्रसंग एका पालक मातेच्या घरी गेलो आणि तिला विनंती करू लागलो की ,तुमची मुलगी जिल्हा परिषद शाळेत पाठवा तर ती म्हणाली , " नाय ,नाय मास्तर माझी पायरी ही आश्रम शालेतच जाणार ,तथ पोरांना जास्त पैस मिलतात , रोज खाऊ मिलतो , एकदा आश्रम शालेत पोयरा टाकला की मग बारावी पर्यंत काय टेन्शन नाय ," अस काही काही बोलून गेली . अस बऱ्याच पालकांकडून ऐकायला मिळायचे.

पण मी माझी जिद्द सोडली नाही. रोजच पालक भेटी घेऊन, विनंती करून त्यांच्यामध्ये विश्वास निर्माण करून बघता बघता पहिलीच्या नऊ पालकांना आपल्या विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश घेण्यास भाग पाडले. काही पालकांनी तर आपल्या मुलांचा प्रवेश आश्रम शाळेत निश्चित केला होता, त्यांनाही तिथून दाखल केलेली कागदपत्रे परत आणायला लावली, सुजल नावाचा मुलगा आपल्या मोठ्या भावंडांसोबत आश्रम शाळेत जायला सुद्धा लागला होता, त्याला त्याच्या वर्गातून जाऊन आणले. अनेक विद्यार्थ्यांची दाखल केलेली कागदपत्रे पालकांना स्वतः गाडीवर घेऊन जाऊन आश्रम शाळेतून आणली. तरीही काही पालकांनी आपली मुले आश्रम शाळेतच ठेवली आणि अशा प्रकारे इयत्ता पहिलीचा पट शून्य वरून नऊवर नेला. कातकरी पाड्यात फिरताना माझ्या असेही लक्षात आले की काही मुलं हे फक्त नावाला शाळेत आहेत ती शाळेत न

जाता पाड्यावर फिरतात अशा पालकांना सुद्धा विनंती करून त्यांच्या मुलांचे इतर शाळांमधील दाखले काढायला लावून जिल्हा परिषद शाळेमध्ये त्यांना दाखल करण्यासाठी प्रयत्न केले आणि त्यातूनच शाळेचा पट हा ३१ वर नेला . पटसंख्येअभावी शाळेला एकच मदतनीस ताई होती , परंतु पटसंख्या वाढल्यामुळे शाळेला आणखी एक मदतनीस ताई मिळाली. एका गरजू भगिनीला रोजगाराची संधी मिळाली आणि पहिले मिशन यशस्वी झाले.

शाळेतील दुसरी समस्या होती गैरहजर मुलांची. आपला देश स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना बऱ्याच कातकरी समाजातील घरांमध्ये ज्ञानाचा दिवाच लागला नव्हता. अनेक पालक अशिक्षित होते .आपला मुलगा शाळेत गेला काय नाय गेला काय त्यांना काहीच फरक पडत नव्हता. त्यामुळे गैरहजेरीचे प्रमाण खूप होते. त्यामधे २ विद्यार्थी तर असे होते की , नावाला तिसरीला पण पहिली दुसरीत त्यांनी एकही दिवस शाळा केली नाही असे इतर मुलांनी मला सागितले. ती मुले म्हणजे पूर्वेश कडाळी आणि जिवेश भडांगे ही पाड्यावरील जय - विरू ची जोडी. यांना शाळा सोडून इतर कामात फार आवड . पत्ते खेळणे हा यांचा आवडता छंद. आता तुम्ही म्हणाल सर काही खोटं बोलत आहे ,पण हे सत्य आहे. यातील पूर्वेश हा तर आपल्या बापाचा फार लाडका. या मुलांना गोड बोलून , तुम्हाला रोज दहा रुपये खायला देतो असे सांगून या मुलांना रोज शाळेत आणायला लागलो. पूर्वेशचे केस फार वाढलेले होते तलासरीला दुकानात घेऊन गेलो, त्याचे केस कापले आम्ही दोघांनी मस्त वडापाव खाल्ला. त्याच्या आवडीचा थंडा पिला. पण काही दिवसांनी परत त्याने आपले गैरहजेरीचे सत्र सुरू केले . एक दिवस पूर्वेश बाजारात फिरताना दिसला त्याला बाजारातून घेऊन आलो . दुसऱ्या दिवशी परत गायब झाला. परत पाड्यात गेलो तर मोठ्या भावासोबत घरात पत्ते खेळताना दिसला. जवळच चूल पेटलेली होती, त्यात सर्व पत्ते टाकून जाळून द्यायला लावले आणि शाळेत आणले. परत दुसऱ्या दिवशी पुर्वेश गायब, पुन्हा त्याच्या घरी त्याला आणायला गेलो, तर पूर्वेश रडायला लागला , त्याचा बाप रागारागाने माझ्या अंगावर आला आणि म्हणाला, " मास्तर, माझं पोरग शाळेत नाय येणार, त्याला काय करायचे ते करू दे , तू पुन्हा घरी येऊ नको. " त्यावेळी खूप वाईट वाटले नंतर आठ दिवस मी तिकडे फिरकलो नाही. एके दिवशी योगायोगाने मा. गटविकास अधिकारी आणि ग्रामसेवक साहेब कातकरी पाड्यात आले आणि मी ही आधार कॅम्प बाबत माहिती देण्यासाठी पाड्यात गेलो होतो . साहेब पाड्यातील लोकांना सोईसुविधा ,आधार कॅम्प आणि मुलांच्या शिक्षणाबाबत विचारत होते .मी दुरून ऐकत होतो. नंतर साहेबांना भेटलो आणि पूर्वेशच्या बापाचे वर्तन कथन केले. साहेबांनी त्याला योग्य मार्गदर्शन केले .काही खडे बोल सुनावले आणि मग पूर्वेश पुन्हा माझ्याबरोबर गाडीवर बसून शाळेत आला. नंतर त्याला शिक्षणाची हळू हळू गोडी लागली अ ब क ड ही न येणारा पूर्वेश आता बऱ्या पैकी मराठी बरोबर इंग्रजी शब्द ही वाचत आहे.

पूर्वेश प्रमाणे अनेक मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले आणि गैरहजेरीचे प्रमाण फारच कमी झाले. सध्या विद्यार्थी आजारी असेल तरच गैरहजर राहतो नाहीतर १००% हजेरी असते. शाळेतील सर्वात मोठे आव्हान होते विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविणे. कारण शाळेतील इयत्ता तिसरी ते पाचवीच्या विद्यार्थ्यांची पायाभूत चाचणी घेतली गेली त्यावेळेस माझ्या असं लक्षात आलं की इथल्या मुलांमध्ये गुणवत्तेचा खूपच अभाव आहे. पाचवीच्या मुलांना स्वतःचं नाव सुद्धा अचूक लिहिता येत नव्हतं त्याचबरोबर वाचन सुद्धा येत नव्हतं आणि बेरीज वजाबाकी या साध्या साध्या क्रिया सुद्धा मुलं चुकत होते. इंग्रजीच्या बाबतीत तर २ - ४ विद्यार्थी सोडले तर बाकीच्या मुलांना A B C D ची सुध्दा ओळख नव्हती. Bat ,Cat, Mat असे शब्द वाचन तर दूरच हे पायाभूत चाचणी परीक्षेवरून लक्षात आले.

इयत्ता पहिली ते पाचवी सर्व विद्यार्थी म्हणजे ' सब घोडे बारा टक्के ' अशी अवस्था होती. सर्व मुलांना मी एकाच अध्ययन पातळीचे समजून अध्यापनाला सुरुवात केली पहिली ते पाचवी चे सर्व विद्यार्थी आणि एकच शिक्षक त्यामुळे सर्वच मुलांना समान शिक्षण द्यायचं असं ठरवलं आणि मुळाक्षरांपासून सुरुवात केली. मराठी मुळाक्षरे , Alphabets , संख्या वाचन यांचे काड्र्स लॅमिनेशन करून बनविले . सर्व विद्यार्थ्यांना वाटप केले. इंग्रजी अल्फाबेटचा आवाज यातूनच मुलांना एकत्रित मराठी आणि इंग्रजी या विषयाचे धडे देण्यास सुरुवात केली . दररोज सराव घेतला . पंधरा दिवसात मुलांना अक्षर ओळख झाली , इंग्रजी अक्षरांचे आवाज पाठ झाले नंतर मराठी व इंग्रजी शब्द वाचन सराव एकदाच सुरू केला .मराठी बरोबरच मुलांना इंग्रजी वाचन पण येऊ लागले आणि बघता बघता विद्यार्थ्यांचे वाचन - लेखन चांगले सुधारले , संख्याविषयक गुणवत्ता चांगली वाढली.

आपल्या मुलांची प्रगती पालकांना कळावी , तसेच शाळेतील उपक्रम पालकांपर्यंत पोहचविण्यासाठी पालकांचा एक "आपली शाळा लिलकपाडा शाळा " या नावाने व्हॉट्स ॲप ग्रुप सुरू केला. या ग्रुप वर शाळेतील मुलांचे मराठी - इंग्रजी वाचन , पाढे पाठांतर, शाळेतील दररोजचे विविध उपक्रम , रोजचा मेनू यांचे व्हिडिओ / फोटो पाठवायला सुरुवात केली. बघता बघता मुलांच्या गुणवत्तेत वाढ व्हायला लागली आपल्या मुलांची प्रगती पाहून पालकांनी आनंद व समाधान व्यक्त केले.

काही पालक हे आपले कुटुंब सोडून इतर राज्यात मासेमारीसाठी बोटीत ८ - ८ महिने कामाला जातात. WhatsApp ग्रुपमुळे आपल्या मुलांची प्रगती पालकांपर्यंत पोहचू लागली. आपली मुलं छान शिकत आहेत हे पाहून कधी कधी फोन करून , " मास्तर तू बेस आहेस , आमच्या पोरांना बेस शिकवत आहेस ." अशी प्रतिक्रिया व्यक्त करतात. गुणवत्ता वाढीमुळे पालकांचा शिक्षकांबद्दल विश्वास खूप वाढला.

शाळेचे किचनशेड फार खराब होते. पत्रे गळत होते. खाली कोबा किंवा फरशी असे काही नव्हते त्यामुळे उंदरांनी आपले संसार किचन शेडमध्ये थाटले होते, कुबट वास येत होता. याबाबत मा. गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, ग्रामपंचायत कवाडा यांना विनंती अर्ज केले. सदर अर्जाची दखल मा. गटविकास अधिकारी यांनी ताबडतोब घेतली व ग्रामसेवक यांना आदेश देऊन दुरुस्त करून दिले. अशा प्रकारे अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला किचन शेड दुरुस्तीचा प्रश्न मार्गी लावला.

मुलांना आश्रम शाळेबद्दल खूप आकर्षण होत , कारण आश्रमशाळेतील मुलांना पापड ,चिक्की , अंडी , फळे खायला मिळायची . मुलं म्हणायची सर आश्रम शाळेत पका खायला मिल. मग मी ही एक उपक्रम सुरू केला दर शनिवारी वेगळा पदार्थ बनविणे . मुलांना विचारले काय खायचे , मुले म्हणाली , ". पापड ". मुलासाठी मी पहिल्यांदा स्वतः पापड तळले. मुलांना खूप आवडले. त्यानंतर आम्ही शाळेत भेळ पार्टी , चिक्की पार्टी, चिकन भात पार्टी , असे मुले जे म्हणतील ते पदार्थ तयार केले , एक दिवस पुर्वेश म्हणाला सर मॅगी बनवायची , पूर्वेश च्या आग्रहाखातर शाळेत मॅगी पण बनवली. शाळेत गाजर हलवा सुद्धा बनविला .मुलांना खूप आवडला, एक दिवस ऊबाडिया बनविला. असे वेगवेगळे पदार्थ मी आणि विद्यार्थी मिळून बनवायचो, त्यामुळे मुलांना वेगळाच आनंद मिळायचा असे आमचे उपक्रम सुरू असताना एक दिवस शहापूर येथून 'विंग्ज फॉर ड्रीम ' फाउंडेशनचे प्रमुख श्री.धिरज डोंगरे सर यांचा फोन आला. त्यांनी माझी फोनवर मुलाखत घेतली आणि आमच्या शाळेत संस्थेमार्फत नाष्टा प्रोजेक्ट सुरू केला. यामुळे मुलांना शाळेत रोज सकाळी दहा वाजता गरमा गरम नाष्टा त्यामधे शिरा, पोहे, उपमा याची सोय झाली. सुरुवातीला माझी पत्नी स्वाती सरक हिने आचारी म्हणून या नाष्टा प्रोजेक्टचा श्रीगणेशा केला. आमच्या मदतनीस ताई यांना चविष्ट व पौष्टिक

नाष्टा कसा बनवायचा याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. नंतर आमच्या मदतनीस ताईंनी प्रोजेक्टची धुरा सांभाळली . त्याही खूप छान नाष्टा बनवू लागल्या. रोज मुलांना पौष्टिक नाष्टा मिळू लागला . या उपक्रमाचा उद्देश अनेक मुले सकाळी जेवण करून येत नव्हती त्यांना नाष्टा मिळू लागला. काही मुले कुपोषित होती त्यांना सकस आहार देणे हा उद्देश होता. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शाळा खूपच आवडू लागली.

शाळेची इमारत फारच खचलेली होती भिंती फार खराब झालेल्या होत्या आणि रोजच भिंतीची माती खाली पडायची आणि त्यामुळे वर्गखोली घाण व्हायची त्यासाठी मी ऋषभ फाउंडेशन या संस्थेचे प्रमुख श्री वाणीगोटा सर यांच्याशी संपर्क साधला आणि त्यांना विनंती केली की सर आपण एकदा आमच्या शाळेत या आणि आमच्या शाळेतील भिंतींची दुरुस्ती करून द्या आणि सरांनी माझी विनंती मान्य केली आणि आमच्या शाळेत जवळजवळ २० हजार रुपये खर्चून शाळेची एका वर्गाच्या भिंती दुरुस्त करून दिल्या तसेच शाळेला रंगकाम सुद्धा करून दिले त्यामुळे शाळेतील वातावरण बदलले आणि वर्गखोली सुंदर दिसायला लागली. तसेच शाळेमध्ये काही जुने संगणक , प्रोजेक्टर होते , पण त्याच्यावर धुळीचे थर चढले होते . सर्व धूळ खात पडलेले होते. दुरुस्त करायला नेले पण दुरुस्त झाले नाहीत. माझ्याकडे श्रिया शेवाळे मॅडम यांचा नंबर होता, त्यांना कॉल केला आणि शाळेसाठी एक संगणक मिळावा अशी विनंती केली. त्यांनी खुशिया फाऊंडेशन या संस्थेमार्फत शाळेला एक संगणक मिळवून दिला. यामुळे मुले संगणक साक्षर होण्यास मदत झाली.

शाळेमधील शिक्षण मनोरंजक आनंददायी व्हावे म्हणून पुन्हा एकदा ऋषभ फाऊंडेशन चे दार ठोठावले. श्री वाणीगोटा यांनी आपल्या फाउंडेशनच्या माध्यमातून शाळेला एक नवीन ४५ इंची स्मार्ट टीव्ही मिळवून दिला. स्मार्ट टीव्ही पाहून मुलांचा आनंद द्विगुणित झाला.शाळेमध्ये खेळाच्या साहित्याचा अभाव होता. एकही खेळाचे साहित्य नव्हते. मुंबई येथील पगारिया वेलफेअर फाऊंडेशन यांचेशी पत्रव्यवहार , विनंती करून शाळेला Toys Library मिळवली त्यामुळे मुलांना खेळासाठी व बौद्धिक विकासासाठी भरपूर साहित्य मिळाले. तसेच या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी रोशनी फाऊंडेशन यांचेकडून शालेय साहित्य मिळविले. शाळेचे सोलर बंद होते त्यामुळे पाण्याचा प्रश्न निर्माण झाला पुन्हा रोशनी फाऊंडेशन यांना विनंती करून सोलर दुरुस्ती करून घेतले. याच संस्थेने या वर्षी मंथन या स्पर्धा परीक्षेसाठी १० विद्यार्थ्यांचे ५२५० रुपये परीक्षा शुल्क भरले आहे .त्यामुळे पहिल्यांदाच या चिमुकल्यांना स्पर्धा परीक्षेचा अनुभव घेता येणार आहे.

मुलांना शाळेबद्दल आकर्षक वाटावे म्हणून शाळेमध्ये विविध सण उत्सव मोठ्या आनंदात साजरे करण्याचे ठरवले. त्यामध्ये शाळेमध्ये पहिल्यांदाच दहीहंडी हा उत्सव मोठ्या उत्साहात आनंदात साजरा करण्यात आला, त्याचबरोबर जागतिक आदिवासी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला त्यामुळे पालकांना शाळेबद्दल आणि शिक्षकांबद्दल आपुलकी आणि प्रेम वाटू लागले आणि पालकही स्वतःहून शालेय उपक्रमांमध्ये आपला सहभाग नोंदवू लागले शाळेमध्ये नाही तर तलासरी तालुक्यात पहिल्यांदाच बैलपोळा हा उत्सव सुद्धा आमच्या शाळेत मोठ्या उत्साहात आनंदात साजरा करण्यात आला, चक्क शाळेमध्ये एक बैल आणून पालकांच्या सहकार्याने त्या बैलाची पूजा केली. त्याची मिरवणूक काढली आणि पालकांना व विद्यार्थ्यांना बैलाचे महत्त्व पटवून देण्यात आले. पालकांनी एकत्र येत शाळेत गणेशोत्सवही सुरू केला. होळी या सणाला शाळेत पुरणपोळी हा बेत केला याला आर्थिक सहकार्य विंग्ज फॉर ड्रीम फाऊंडेशनचे मिळाले . तर आचारी म्हणून माझी पत्नी स्वाती सरक हिने पूर्ण स्वयंपाक केला . मदतनीस ताई यांनी सुद्धा मदत केली.हा उपक्रमही पालकांना खूपच आवडला असे अनेक उपक्रम शाळेमध्ये वर्षभर घेण्यात आले.

यापूर्वी ही शाळा कोणत्याही स्पर्धेत सहभाग नोंदवत नव्हती असे पालकांनी मला लक्षात आणून दिले मग शाळेतील विद्यार्थ्यांना क्रीडा स्पर्धा असतील किंवा विविध स्पर्धा असतील यामध्ये सहभाग वाढवायचा असे ठरवले आणि त्यातूनच या शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रथमच विविध गुणदर्शन स्पर्धेतील गायन स्पर्धा वक्तृत्व स्पर्धा तसेच नाट्य स्पर्धेमध्ये सुद्धा भाग घेतला आणि विशेष बाब म्हणजे नाट्य स्पर्धेत आमच्या शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी केंद्र स्तरावर द्वितीय क्रमांक पटकावला आणि आमच्या विद्यार्थ्यांना सन्माननीय केंद्रप्रमुख श्री.संजय प्रधान सर यांनी ५०० रुपये बक्षीस सुद्धा दिले आणि इतर उपस्थित शिक्षक बंधू यांनी एक शिक्षकी शाळा असून सुध्दा खूप छान सहभाग नोंदवला याबद्दल कौतुकाची थाप दिली. विद्यार्थांचा आनंद द्विगुणित झाला.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढ यावर विशेष भर देण्यात आला विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी अनेक उपक्रम घेण्यात आले यामध्ये पाढे पाठांतर स्पर्धा, इंग्रजी वाचन, शुद्धलेखन, Student of the week तसेच स्पर्धा परीक्षा यांच्या जादा तासिका सुद्धा घेण्यात आल्या त्यामुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढण्यास खूपच मदत झाली याचा फायदा असा झाला की आमच्या शाळेतील एक मुलगा नवोदय स्पर्धा परीक्षेमध्ये यशस्वी झाला आणि त्याला जवाहर नवोदय विद्यालय पालघर येथे प्रवेश सुद्धा मिळाला याचा शिक्षक म्हणून मला आणि पालकांना सुद्धा याचा खूपच आनंद झाला.

विद्यार्थ्यांचे इंग्रजी वाचन सुधारावे यासाठी मी " एक तास इंग्रजी खास " हा विशेष नवोपक्रम शाळेत राबविला आणि या उपक्रमामुळे विद्यार्थी चांगल्या प्रकारे इंग्रजी वाचू लागले. आमचा शाळा सोडून इतर उद्योग करणारा पूर्वेश ही इंग्रजी आवडीने वाचू लागला. हा उपक्रम नॅशनल एज्युकेशन इनोवेशन या राष्ट्रीय स्तरावर शैक्षणिक कार्य करणाऱ्या संस्थेला सादर केला . या नवोपक्रमाला नॅशनल एज्युकेशन इनोव्हेशन अवॉर्ड २०२४ मिळाला. तसेच पंचायत समिती तलासरी तर्फे तालुका आदर्श शिक्षक पुरस्कार ही मिळाला. या सर्व बाबींचा पुढील वर्षीची पटसंख्या वाढीसाठी सकारात्मक फायदा झाला.

मी नुकताच वाबळेवाडी आणि जालिंदर नगर या वारे गुरुजींच्या शाळांची वारी करून आलो होतो. वारे गुरुजींची ही भेट घेऊन आलो होतो. त्यामुळे वारे गुरुजींचे वारे माझ्या डोक्यात घुमत होते. २६ जानेवारीला शाळेमध्ये एक छानसा कार्यक्रम घेण्यात त्यामध्ये मुलांची भाषणे , नाटके , डान्स , चारोळ्या यांचा समावेश घेण्यात आला. कार्यक्रम झाल्यानंतर पालकांना वाबळेवाडी आणि जालिंदर नगर या शाळा पालक सहकार्यातून कशा विकसित झाल्या याचे उदाहरण दिले. त्यावेळी पालकांनी स्वतःहून प्रतिक्रिया व्यक्त केल्या की सर यापूर्वी असा उपक्रम किंवा असे कार्यक्रम शाळेमध्ये कधी झाले नाहीत . तुम्ही शाळेसाठी खूप मेहनत घेत आहात आणि तुम्ही सांगा की आम्ही आता तुम्हाला काय मदत करू आणि पालकांनीच सुचवले की सर, आम्ही आमच्या परीने फुल ना फुलाची पाकळी शाळेसाठी मदत करू. पुढे पालकांनी तसे करूनही दाखवले आणि जवळजवळ दहा हजार रुपये शाळा विकास निधी म्हणून शाळेसाठी जमा केला . त्यातून शाळेच्या भिंती बोलक्या केल्या त्याचबरोबर शाळेला नावालाच मैदान होते पण त्या मैदानावर खूप मोठे खड्डे होते आणि हे खड्डे जवळजवळ तीन तीन फुटाचे खड्डे होते. मैदान असपाट होते. शाळेतील एक पालक संजू गांगोडा यांनी गावातीलच प्रतिष्ठित व्यक्ती संतोष वरठा यांच्या मदतीने जवळजवळ 15 ट्रॅक्टर एवढा मुरूम आणून शाळेचे मैदान सपाट करून दिले त्यासाठी रोड रोलर सुद्धा त्यांनीच मागवला आणि अशा प्रकारे शाळेच्या स्थापनेपासून म्हणजेच १९९२ पासून मैदान सपाटीकरणाचा प्रश्न पालकांनीच मार्गी लावला . आता मैदान

प्रशस्त झाले आहे. काही पालकांनी स्वतः कलम केलेली रोपे आणून शाळेत लावली. पालकांनी शाळेत परसबाग तयार करून दिली आहे.

शाळेतील विद्यार्थ्यांना पर्यावरणाची आवड निर्माण व्हावी म्हणून सीडबॉल निर्मिती हा उपक्रम सुद्धा यशस्वीपणे घेण्यात आला आणि या उपक्रमाच्या माध्यमातून आमच्या ३० विद्यार्थ्यांनी जवळजवळ दहा हजार सीडबॉलची निर्मिती केली आणि शालेय परिसरात तसेच गावातील डोंगरावर सीडबॉल टाकण्यात आले आहेत. त्यातूनच हजारो रोपांची निर्मिती सुद्धा झाली आणि याची दखल अनेक वर्तमानपत्रांनी घेऊन शाळेच्या कार्याचा गौरव सुद्धा केला.

सदर शाळेमध्ये झालेला बदल, वाढती पटसंख्या विद्यार्थ्यांची वाढलेली गुणवत्ता पाहून गावकऱ्यांनी तर समाधान व्यक्त केलेच आणि गावच्या सरपंच मॅडम दर्शना बोदले यांनी सुद्धा शाळेमध्ये झालेल्या परिवर्तनाचे खूपच कौतुक केले आणि ग्रामस्थांसमोर मा. आमदार श्रीनिवास वनगा यांचे हस्ते माझा सत्कार सुद्धा करण्यात आला.

पुढील वर्षी शाळेची पटसंख्या वाढावी म्हणून डिसेंबर २०२३ पासूनच इयत्ता पहिलीचे वर्ग सुरू केले. याचा फायदा असा झाली की पाड्यातील सर्व दाखलपात्र विद्यार्थी आमच्या शाळेत दाखल झाले. तसेच गेल्या वर्षी विनंती करूनही ज्या पालकांनी आपली मुले इतर शाळांमध्ये दाखल केली होती त्यांनीही आपली मुले आमच्या जिल्हा परिषद शाळेत दाखल केली. शाळेच्या गेट जवळची मुलं जवळची शाळा सोडून दीड किलो मीटर चालत जात होती त्या पालकांनीही आपली मुलं आमच्या शाळेत पाठवली . इतर शाळांमधून जवळ जवळ आठ मुलांनी आमच्या शाळेत प्रवेश घेतला. इंग्रजी माध्यमाची मुलं सुद्धा आमच्या शाळेत आली. एका शिक्षकाने आपला मुलगा तालुक्यातील प्रसिद्ध इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून काढून आमच्या शाळेत इयत्ता तिसरीला दाखल केला.

पटसंख्या अभावी ही शाळा भविष्यात बंद होईल अशी प्रतिक्रिया या शाळेबद्दल एक वर्षापूर्वी ऐकायला मिळायची. अशा एके काळी दुर्लक्षित शाळेची पटसंख्या शिक्षकाची मेहनत, वाढती गुणवत्ता, पालकांचे सहकार्य, विविध संस्थांचे सहकार्य यामुळे वाढली. त्यामुळे शाळेला आणखी एक शिक्षक मिळाला आणि एक शिक्षकी शाळेचे रूपांतर अखेर द्विशिक्षकी शाळेत झाले. शाळेचा अल्पावधीत खूप कायापालट झाला आणि भविष्यातही होईल, अशी प्रतिक्रिया ग्रामस्थ , पालक , अधिकारी , सरपंच यांनी व्यक्त केला.



## शाळेतील सण - उत्सव व विविध उपक्रम









## शाळेतील परसबाग






शाळेची वाढलेली पटसंख्या – २०२३ /२४




**एक पाऊल गुणवत्तेकडे - ध्यास परिवर्तनाचा**

Marathi Newspaer

अशी शाळा, असे प्रयोग



# इंग्रजी लागले आवडायला



**ज्ञानेश्वर सरक**
प्राथमिक शिक्षक, जिल्हा परिषद शाळा कवाडा लिलकपाडा

मराठी व इंग्रजी या विषयांचे वाचन सुधारण्यासाठी एकाच वेळी दोन्ही विषयांचे अध्यापन फोनिक पद्धतीने सुरू केले. यामुळे विद्यार्थ्यांचे मराठी वाचन सुधारले व मुले इंग्रजी शब्दही छान वाचू लागली. त्यांची इंग्रजीची भीतीही गेली...

तलासरी तालुक्यातील कातकरी आणि वारली आदिवासी लोकवस्ती असलेल्या पाड्यातील जिल्हा परिषद शाळा कवाडा लिलकपाडा अनोख्या व प्रेरणादायी उपक्रमांमुळे प्रयोगशील शाळा म्हणून ओळखली जाते. या पाड्यातील अनेक विद्यार्थ्यांना आणि बहुतांश पालकांनाही शिक्षणाचा ना छंद ना गंध. मात्र, हेच सर्व आज पाढे पाठांतर, आनंददायी शिक्षण, गोष्टीचा शनिवार, नाश्ता प्रोजेक्ट, स्पर्धा परीक्षा जादा तासिका आणि विशेष करून 'एक तास इंग्रजी खास' या उपक्रमांत उत्साहाने सहभागी होऊन सर्वांगीण विकास साधत आहेत. यातूनच आधी इंग्रजी शब्द उच्चारण्यासही कचरणारी मुले आता इंग्रजीतून बोलत असून, नावडता विषय त्यांच्या आवडीचा झाला आहे.

शाळेत पहिली ते पाचवीचे विद्यार्थी शैक्षणिक धडे गिरवतात. ही शाळा एकशिक्षकी असल्याने या शाळेवर यायलाच अनेक शिक्षक नकार देतात. त्यातच शाळेची पटसंख्या वाढविणे आणि पालकांचे मतपरिवर्तन करणे, विश्वास जिंकणे मोठे आव्हान होते. हे ओळखून मे महिन्याच्या सुट्टीमध्ये पालकभेटी देऊन पालकांना त्यांच्या मुलांना शाळेत पाठविण्याची गळ घातली. त्यातून मुले शाळेत येऊ लागली. सुरुवातीला मुलांच्या वाचन-लेखनावर भर दिला. सर्व मुलांना एकत्रित बसवून वाचन-लेखनाचे धडे दिले. त्यासाठी मराठी मुळाक्षरे, इंग्रजी मुळाक्षरे, संख्यावाचन कार्ड, मराठी इंग्रजी शब्द वाचन कार्ड यांचे लॅमिनेशन केलेले चार्ट बनविले. सुरुवातीला मुलांचा भरपूर सराव घेतला. विद्यार्थ्यांचा प्रतिसाद वाढू लागल्याने मराठी व इंग्रजी वाचन सुधारण्यासाठी एकाच वेळी दोन्ही विषयांचे अध्यापन फोनिक पद्धतीने सुरू केले. यामुळे विद्यार्थ्यांचे मराठी वाचन, तर सुधारलेच आणि मुले इंग्रजी शब्दही छान वाचू लागली. 'एक तास इंग्रजी खास' उपक्रमावर विशेष भर दिला. नियमित सराव सुरू केल्यामुळे इयत्ता पहिली ते पाचवीची मुले इंग्रजी वाचू लागली असून, त्यांची इंग्रजीची भीतीही दूर झाली आहे.

मुलांची प्रगती पालकांपर्यंत पोहोचावी, यासाठी त्यांचे वाचनाचे व्हिडीओ बनवून पालकांचा व्हॉट्सॲप ग्रुप बनविण्यात आला आहे. त्यावर नियमित हे व्हिडीओ पाठविले जातात. आपल्या मुलांची प्रगती पाहून पालकही खूश आहेत. शाळेतील विविध उपक्रमांचे कौतुक करत कवाडा गावच्या सरपंच दर्शना बोदले, ग्रामपंचायत सदस्य शैलेश जाधव, ग्रामपंचायत सदस्या पिंकी वरठा, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष निलेश जाधव, पालक वसंत जाधव, सुरेश राबड यांनी समाधान व्यक्त केले आहे.

**दैनिक लोकमत वृत्तपत्राने शाळेतील उपक्रमांची दखल घेतली .**





शाळेतील सर्वात मोठे आव्हान - आव्हानपूर्ती — स्वप्नपूर्ती - पटसंख्येत झालेली वाढ




पटसंख्या वाढीसाठी इयत्ता पहिलीचा वर्ग डिसेंबर — २०२३ मध्येच सुरु केला.




किचनशेड ची पूर्वीची अवस्था




दुरुस्त केलेले किचन शेड

वर्गखोली दुरुस्ती



दुरुस्त केलेल्या भिंती





शाळाबाह्य विद्यार्थी - पूर्वेश ला शाळेत आणण्यासाठी खटाटोप




**पालकांचा वाढता सहभाग**




**शाळा विकासासाठी पालक सभा**







**गैरहजेरीचे प्रमाण कमी करणारा उपक्रम – Student of week**

**अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न — मैदान सपाटीकरण**

**पालकांच्या सहकार्याने मार्गी लागला.**









पटसंख्या वाढीसाठी उपक्रम – मुलांच्या आवडीचे जेवण

गाजर हलवा बनवताना शिक्षक – श्री. ज्ञानेश्वर सरक







**विद्यार्थ्यांसोबत जेवण - मुलांसोबत जेवणाचा आनंद**

**शाळेतील शैक्षणिक व्हिडिओ YouTube लिंक -**

https://youtu.be/jv2p0UpoIPg?si=ZBZZJs2rybEzRf2M

https://youtu.be/feLWQPr8nhA?si=Ey2_jJg6C4Du1QYk

https://youtu.be/DWHdVzwgyVI?si=UrwGj-8GqeKNH1X6

https://youtube.com/shorts/QQ0knwioraA?si=4q6pJ_JMjj1Aj7q0

----------**----------

# "नेचर क्लब"

**शाळेचे नाव व पत्ता - ठाणे महानगरपालिका शाळा क्र.५५, आझादनगर, ठाणे.**

**शाळेचा ईमेल आयडी** - schooltmc55@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - सौ. नुतन गजानन बांदेकर
**मोबाईल क्रमांक** - ९७७३४४५८०८
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - nutanbandekar45@gmail.com

**प्रास्ताविक -**

पृथ्वीवरील जीवसृष्टी ज्या विशिष्ट अधिवासात व नैसर्गिक परिस्थितीत जगते त्या सर्व पार्श्वभूमीला आपण पर्यावरण म्हणतो.या पर्यावरणातील एक घटक म्हणजे माणूस. या माणसाच्या बुद्धिमत्तेमुळे आज पृथ्वीवर त्याचे अधिपत्य आहे. त्यामुळे उन्मत्त होऊन पर्यावरणाची पर्वा न करता त्याने विकास साध्य करण्याचे ठरवले तर तो विकास साबणाच्या फुग्याप्रमाणे आकर्षक दिसेल पण क्षणभंगुर ठरेल.

या विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे, म्हणून प्रदूषणाचे प्रमाण कमी करून पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी व त्यातून चिरंतन विकास साध्य करण्यासाठी म्हणून आम्ही शाळेमध्ये नेचर क्लब स्थापन केला जेणेकरून विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाची जाणिव होईल आणि ते भविष्यात पर्यावरणाच्या संरक्षणात खारीचा वाटा उचलतील. त्यासाठी विद्यार्थ्यामधून पर्यावरण दूतांची निवड करण्यात आली.


**पर्यावरण दूत**

| अ. क्र | नाव | वय | कामाचे स्वरूप |
|---|---|---|---|
| 1 | निकिता पवार | 14 | बागकाम करणे |
| 2 | प्रशांत पाईकवार | 14 | पर्यावरण विषयक निबंध व वक्तृत्व स्पर्धेत सहभाग |
| 3 | प्रतिज्ञा राठोड | 13 | स्वच्छतेविषयी जनजागृती करणे |
| 4 | गीता पवार | 12 | झाडे लावणे व संगोपन करणे |
| 5 | सलोनी जाधव | 13 | टाकाऊ प्लॅस्टिक पासून कुंड्या बनवणे |
| 6 | अंकिता कांबळे | 14 | ओल्या कचऱ्यापासून खतनिर्मिती |
| 7 | दिव्या जाधव | 13 | प्लॅस्टिक पिशव्यापासून शोभिवंत वस्तू बनवणे |
| 8 | समीक्षा घोळेहर | 10 | टेरेस गार्डन झाडे लावणे व देखरेख करणे |
| 9 | शिवम कांबळे | 14 | पर्यावरण विषयक जनजागृती करणे |
| 10 | भाविका इंगळे | 14 | शाळेमध्ये स्वच्छता ठेवणे |


ठाणे महानगरपालिका शिक्षण विभाग
शाळा क्र.५५,आझादनगर, ठाणे.
धूम्रपान निषिद्ध क्षेत्र


ठाणे महानगरपालिका शिक्षण विभाग
शाळा क्र.५५,आझादनगर, ठाणे (प.)
आपला परिसर स्वच्छ ठेवा.
SAY NO!
TO PLASTICS
SAVE WATER

**खतनिर्मिती -**




सद्यस्थितीत कचऱ्याचे व्यवस्थापन ही एक अत्यंत कठीण बाब बनत चालली आहे, यावर उपाय म्हणून ठाणे महानगरपालिका शाळा क्रमांक 55 आझादनगर येथे ओल्या कचऱ्यापासून कंपोस्ट खत निर्मिती केली जात आहे.शाळेतील शिक्षक व विद्यार्थी आपल्या घरच्या किचनमधील टाकाऊ ओला कचरा, जसे,पालेभाज्यांचे देठ, फळभाज्यांचा टाकाऊ भाग, फळांची साले, कांदे, बटाटे ,लसूण यांची साले आणि शाळेच्या आसपासच्या परिसरातील मंदिरांतील निर्माल्य शाळेत घेऊन येतात. त्यानंतर त्यापासून खत निर्मिती केली जाते.

जमा झालेला सर्व ओला कचरा एका मोठ्या पिंपात एकत्र केला जातो. त्यावर पाणी मारून गोमूत्र टाकले जाते.दर दोन दिवसांनी पिंपातील सगळा ओला कचरा ढवळून काढला जातो व पुन्हा पिंप बंद करून ठेवले जाते. खत तयार होण्यासाठी साधारणतः तीन महिने लागतात.


ओल्या कचऱ्यापासून खत निर्मितीचे कार्य मागील तीन वर्षांपासून आजतागायत अव्याहतपणे चालू आहे. या उपक्रमाचा दुहेरी फायदा होत आहे तो असा की, ओल्या कचऱ्याचे योग्य प्रकारे व्यवस्थापन होत आहे. त्याचबरोबर शाळेच्या वरील टेरेस गार्डन मधील रोपट्यांसाठी याच खता चा वापर केला जात आहे.

स्वयंपाक घरातील ओल्या
कचऱ्यापासून खतनिर्मिती (भाजीपाला, फळे यांचा टाकाऊ भाग)





**मातीविरहित बाग**



ठाणे महानगरपालिकेच्या शाळा क्रमांक 55,आझाद नगर,ठाणे या शाळेने शालेय इमारतीच्या गच्चीवर माती विरहित बाग हा वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम सुरू केला आहे.विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संरक्षण आणि पर्यावरण संवर्धनाची मुल्ये रुजवण्यासाठी या उपक्रमाची मदत होत आहे.

शाळेच्या उपक्रमशील शिक्षिका-मुख्याध्यापक सौ. नूतन बांदेकर यांनी ठाणे शहरातील एक स्वयंसेवी संस्था 'हिरवे स्वप्न' च्या प्रभा अविनाश मॅडम व श्री. किरण महाजन सर यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेच्या गच्चीवर बागेचे काम सुरू केले आणि बघता बघता सर्वांच्या योगदान, सहभागातून मातीविरहित बाग तयार झाली.

शाळेतील इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांच्या मदतीने हा उपक्रम राबविण्यात आला. शिक्षक विद्यार्थी आणि हिरवे स्वप्नचे सदस्य यांनी सुकलेला पालापाचोळा आणून मातीच्या कुंड्या प्लास्टिकचे डबे यांत अतिशय कमी प्रमाणात मातीचा वापर करून त्यात रोपांची लागवड केली. त्यावर कोकोपीटचा थर देण्यात आला आणि विविध भाजीपाल्यांचे बियाणे पेरण्यात आले.

**उदा.** भाज्या- मेथी, मुळा, पालक, मायाळू, राई, मटार, टोमॅटो, वांगे, कारले,अळू, कांदा, बटाटा इत्यादी.

औषधी वनस्पती- हळद, कढीपत्ता, आले, वेखंड, लाजाळू, शतावरी, शंखपुष्पी, गुळवेल, नागवेल इत्यादी.

फुलझाडे- मोगरा, गुलाब,जास्वंद, अबोली, हळदीकुंकू, रातराणी, तगर ,घंटी पुष्प, ऑफिस टाइम्स इत्यादी.

तसेच विविध बॉटल्स मध्ये मनीप्लांट, नेचे तर छोट्या छोट्या भांड्यांमध्ये, कुंड्यांमध्ये शोभेची रोपे लावण्यात आली. सगळ्या मिळून साधारणतः 300 हून अधिक कुंड्या या बागेत समाविष्ट झाल्या.

त्यानंतर गच्चीच्या दुसऱ्या भागातील भिंतीच्या सुशोभीकरणांतर्गत इयत्ता सहावी ते आठवीतील विद्यार्थ्यांच्या मदतीने भिंतीवर वारली चित्रे काढण्यात आली. अशाप्रकारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून हिरवे स्वप्न संस्थेच्या मदतीने गच्चीवर माती विरहित बाग तयार झाली .

शहरी भागात मोकळी जागा आणि चांगली माती सध्या अभावाने दिसत आहे. त्यासाठी शाळेने योजलेला हा एक नवीन पर्याय आहे.

**प्लॅस्टिकचा पुनर्वापर**



प्लास्टिक ही अत्यंत लोकप्रिय आणि अत्यंत अष्टपैलू सामग्री आहे आणि त्याचा आपण भरपूर प्रमाणात वापर करतो . शक्य तितक्या वेळी वस्तूंचा पुनर्वापर केल्याने नवीन प्लास्टिक तयार करण्याची गरज कमी होऊ शकते.

सर्व मुलांनी व शिक्षकांनी दुधाच्या पिशव्या व टाकाऊ कॅरीबॅग शाळेत जमा करून त्यापासून विविध उपयोगी तसेच शोभिवंत वस्तू बनविल्या. आमच्या शाळेमध्ये प्लॅस्टिक वापरावर बंदी घालण्यात आली आहे. RRR (Reduce, Reuse, Recycle) यासाठी जनजागृती व प्रत्यक्ष उपक्रम घेण्यात येतात.

सर्व विद्यार्थी व शिक्षकांनी प्लॅस्टिकमुक्त शाळेची शपथ घेतली. प्लॅस्टिकच्या पिशवीऐवजी कपड्याच्या पिशव्या वापरण्यात याव्यात यासाठी शाळेने पालकांच्या मदतीने कपड्याच्या १०० पिशव्या शिवण्यात आल्या.सर्व पालकांना व शाळेत येणाऱ्या पाहुण्यांना कापडी पिशवी देऊन पर्यावरणाचा संदेश दिला जातो.

शाळेतील शिक्षकांनी व मुलांनी आपल्या घरचे टाकाऊ ऑडिओ सिडीज शाळेत आणल्या आणि त्यापासून सुंदर अशी भलीमोठी माशाची प्रतिकृती तयार करण्यात आली. थंड पेयाच्या प्लॅस्टिक बॉटल्स जमा करून त्या रंगवून टेरेस गार्डन सजवले आहे. अशा प्रकारे आमच्या शाळेत प्लॅस्टिकचा पुनर्वापर केला जातो.






**कचरा व्यवस्थापन -**

विविध ठिकाणी निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य रीतीने विल्हेवाट कशी लावता येईल, हा आजघडीला संपूर्ण मानवजातीला भेडसावणारा ज्वलंत असा प्रश्न झाला आहे, त्यावर रामबाण उपाय व एक आदर्श म्हणून पाहता येईल असा एक उपक्रम ठाणे महानगरपालिका शाळा क्रमांक 55 आझादनगर या शाळेत राबवला जात आहे.

या उपक्रमांतर्गत शाळेत तीन डबे वापरण्यात आले आहेत. हे डबे अनुक्रमे ओला कचरा, सुका कचरा, E- Waste अशी नावे टाकून शाळेच्या दर्शनी भागात ही तीन डबे ठेवण्यात आले आहेत.शाळेतील

विद्यार्थी व शिक्षक आपल्या घराच्या किचन मधील ओला कचरा शाळेत आणून संबंधित डब्यात टाकतात तसेच शाळेत निर्माण होणारा सुका कचरा संबंधित डब्यात एकत्रित केला जातो.तसेच सध्या सर्वात मोठी समस्या आपल्यासमोर उभी आहे ती म्हणजे E-Waste, तर यासाठीही शाळेत एक डबा ठेवण्यात आला आहे. ज्यात शिक्षक आणि विद्यार्थी आपल्या घरातील E-Waste जमा करतात. शाळेत जमा झालेल्या ओल्या कचऱ्यापासून शाळेतच खत निर्मिती केली जाते त्याचा वापर शाळेच्या गच्चीवरील टेरेस गार्डन मधील रोपांसाठी केला जातो.

अशा प्रकारे शाळेत कचऱ्याची योग्य प्रकारे विभागणी करून विल्हेवाट लावली जाते.



**लागवड वृक्षांची -**


आमची शाळा पहायला गेली तर भरवस्तीत आहे.त्यात काँक्रीटीकरण झालेले असल्याने वृक्षारोपण करणे अवघड होते, त्यावर उपाय म्हणून विद्यार्थी , शिक्षक व पालक यांनी एकत्र येऊन हिरवे स्वप्न या स्वयंसेवी संस्थेची मदत घेऊन शाळेच्या टेरेसवर मातीविरहीत बाग तयार करून त्यात वृक्षांची लागवड केली आहे.



विद्यार्थ्यांना रोपांची लागवड कशी करावी, भाजीपाला, फुलझाडे, औषधी वनस्पती, शोभिवंत झाडे कशी लावावीत याची शिकवण देण्यात आली.त्यासाठी ओल्या कचऱ्यापासून खतनिर्मिती करणे , कांद्याच्या सालापासून कीटकनाशक बनविणे इ. पर्यावरण पूरक गोष्टी प्रत्यक्षात शिकवल्या गेल्या.

सर्वांनी फळझाडांच्या बिया गोळा केल्या. तसेच नारळाची रोपे आणली.आंबा , सीताफळ, बदाम, चिकू, जांभुळ, पपई,चिंच इ. बिया दुधाच्या टाकाऊ पिशव्यांमध्ये मातीत बिया रुजायला घातल्या. महिन्याभरात रोपे तयार झाली. नंतर ती रोपे मोठमोठ्या कुंड्यांमध्ये लावण्यात आली.मुले या सर्व रोपांची उत्तम देखभाल करतात. यामुळे पर्यावरणाचा समतोल राखण्याची जबाबदारी आपली सर्वांचीच आहे , याची जाणीव होते.मुले आपसुकच निसर्गाचा आदर करू लागतात.



**पाणी वाचवा, भविष्य जपा -**




ठाणे महानगरपालिका शाळा क्रमांक ५५, आझादनगर या आमच्या शाळेत जलसंवर्धन जनजागृतीसाठी विविध उपक्रम घेतले जातात. शालेय इमारतीच्या बाहेरील भिंतीवर, पाणी जपून वापरा ;पाणी वाचवूया, भविष्य जपूया असे संदेश देणारी चित्र रंगविली आहेत.त्याद्वारे परिसरातील लोकांमध्ये जनजागृती होते.

घरोघरी माझी वसुंधरा उपक्रमांतर्गत पाण्याचे महत्त्व पटवून देऊन सर्व पालक व विद्यार्थी तसेच शाळा व्यवस्थापन समिती सदस्य यांच्यासाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले.त्यांना पाण्याचे महत्त्व पटवून देण्यात आले.


विद्यार्थ्यांना पाणी वापरताना घ्यावयाची काळजी, प्रत्यक्षात कृती करून प्रात्यक्षिक घेण्यात आले.हात धुण्याची योग्य पद्धत सांगताना नळ बंद करून हाताना साबण लावून हात स्वच्छ कसे धुवावेत याच्या सात पायऱ्या प्रत्यक्ष करून घेण्यात आल्या. नैसर्गिक जलसाठ्यांबद्दल माहिती देऊन विहीर , बोअरवेल तसेच तुर्फापाडा तलाव परिसर स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. अशाप्रकारे विद्यार्थी, शिक्षक व पालक यांच्यामध्ये जाणीव जागृती करण्यात आली व सातत्याने केली जाते.



**पर्यावरण सेवा कार्यक्रम -**

विद्यार्थ्यांना पर्यावरण विषयक धडे देण्यासाठी शाळेमार्फत खालील प्रमाणे विविध उपक्रम राबवले जातात.

- तलाव भेट व तलाव परिसर स्वच्छता करणे.
- विद्यार्थी व शालेय परिसरातील लोकांना स्वच्छतेचे महत्त्व विशद करणे.
- धूम्रपानाचे दुष्परिणाम समजावणे व जनजागृती करणे.
- केळीच्या सालापासून खत निर्मिती करणे.
- कोकोपीट तयार करणे.
- शाळेत प्लास्टिक मुक्त ठाणे अभियान राबवले गेले.



## अशी झाली प्रसार माध्यमांद्वारे जनजागृती -

ठाणे वैभव

# विद्यार्थ्यांनी तयार केली गच्चीवरील मातीविरहित बाग

### ठाणे महानगरपालिकेच्या शाळा क्र. ५५ चा स्तुत्य उपक्रम



**ठाणे** : ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागाच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ठाणे महानगरपालिकेच्या शाळा क्र. ५५, आझादनगर, ठाणे या शाळेने यावर्षी शालेय इमारतीच्या गच्चीवर 'मातीविरहित बाग' हा वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम सुरु केला आहे. शाळेतीलविद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण आणि निसर्ग याविषयी जागरुकता यावी, प्रेम निर्माण व्हावे आणि श्रमांचे महत्व कळावे यासाठी हा उपक्रम अतिशय महत्त्वाचा आहे.विद्यार्थ्यांमध्ये वैतन्य निर्माण व्हावे यासाठी शाळेतील शिक्षक व मुख्याध्यापक यांनी काही नवोपक्रम हाती घेण्याचे ठरविले.

शाळेच्या आवारात मोकळी जागा नसल्याने शाळेच्या गच्चीचा उपयोग टेरेस गार्डनसाठी गेल्या चार वर्षांपासून केला जात होता, परंतु गच्चीचा बाकीचा भाग टाकाऊ वस्तू ठेवण्यासाठी केला जात होता. याच टाकाऊ वस्तू म्हणजे तुटलेले बेंचेस, टेबल्स, प्लॅस्टिक बॉटल्स, थर्माकोलचे बॉक्सेस, फर्निचरचे ड्रॉवर्स, यांची मांडणी करुन विविध रोपे लावण्याचे ठरले. त्याचवेळी गार्डनिंगच्या विषयातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन व मदत घेऊन एक चांगली मातीविरहित बाग बनविण्याचे निश्चित करण्यात आले. शाळेतील उपक्रमशील शिक्षिका नूतन बांदेकर यांनी ठाणे शहरातील एक स्वयंसेवी संस्था 'हिरवे स्वप्न' च्या प्रभा अविनाश आणि किरण महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेच्या गच्चीवर मातीविरहित बागेचे काम सुरु केले. प्रथम इ. 6 वी ते 8 वी च्या विद्यार्थ्यांमधील काही निवडक विद्यार्थ्यांना एकत्र करुन संपूर्ण उपक्रम समजावून सांगण्यात आला. गच्चीचा डावीकडील मोठा भाग टेरेस गार्डनसाठी नक्की करुन नियोजन केले गेले.

शिक्षक, विद्यार्थी आणि हिरवे स्वप्नचे सदस्य यांनी सुकलेला पालापाचोळा आणून मातीच्या कुंड्या, प्लॅस्टिकचे डब्बे यात अत्यल्प मातीचा वापर करुन त्यात रोपांची लागवड केली. अनेकप्रकारच्यावनस्पतींचीयांचीलागवडकर ण्यातआली.विविधबॉटल्समध्येम नीप्लान्ट,नेचे तर छोट्या मोठ्या भांड्यांमध्ये, कुंड्यांमध्ये शोभेची रोपे लावण्यात आली. सगळ्या मिळून साधारणतः तीनशेहून अधिक कुंड्या या बागेत समाविष्ट झाल्या.

आता गच्चीचा दुसरा भाग, जो मुलांना खेळण्यासाठी, परिपाठ, इतर उपक्रम, कवायत यांकरिता वापरण्यासाठी मोकळा ठेवला होता, त्याचे सुशोभीकरण करण्याचे ठरले. इयत्ता 6 वी ते 8 वी तील ज्या विद्यार्थ्यांना वारली पेंटींगची कला अवगत होती, अशा मुलांची भिंत रंगविण्याची स्पर्धा घेण्यात आली आणि दोन दिवसात संपूर्ण भिंती वारली पेंटींगने सजल्या. एकंदरीतच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन हिरवे स्वप्नच्या मदतीने गच्चीवर मातीविरहित सुंदर अशी बाग तयार झाली. शाळेतील विद्यार्थी, शिक्षक आणि हिरवे स्वप्नचे सदस्य यांचे नियोजन, मेहनत आणि उत्साह यामुळे पर्यावरणपूरक तसेच सांघिक्यपूर्ण उपक्रम ठरलेली ही शाळेच्या गच्चीवरील मातीविरहित बाग तयार झाली आहे. या वैशिष्ट्यपूर्ण बागेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

Times of India

# Thane civic school pupils use waste to cultivate garden



Secondary students of Azad Nagar municipal school-55 in their garden

**Thane:** A group of municipal school students from Thane has created a unique terrace garden on their school premises using compost generated from household kitchen biowastes and green garden leaves instead of the conventional mud and soil (in pots).

The secondary section students of Azad Nagar municipal school-55 located along Ghodbunder road, encouraged by their principal Nutan Bandekar, latched on to this concept after scouring internet and speaking to experts from NGO Hirwe Swapna in 2022 as an experiment.

The team members said they collect and turn fruit, vegetable peels, coconut husk and dry leaves among others into compost naturally which is used in the plant containers instead of mud soil.

Elaborating on the process, students Bhavika Ingale and Prashant Palkrao said they first collect raw material and put it in one of four designated drums in their terrace garden. The waste is sandwiched between dry leaves and cow urine added and left to disintegrate naturally. The contents are churned once every week and, once ready, the residual powder is scooped out and filled in the plant containers. The compost is absorbed fast by the plants and needs to be refilled periodically, said class VII student, Divya Jakhar.

The team has also attempted to create natural pest repellent using onion peels which, they claimed, is giving good result.

The group of around 25 students periodically maintain the garden and their efforts have yielded results as the otherwise monotonous terrace now reflects a cheerful green look with a 300 plus variants of healthy plants bearing chemical-free flowers, fruit, vegetables, including some with medicinal properties.

A staff member said they recently harvested a good yield of ginger and colocasia leaves which was distributed among teachers and students.

"The entire process is odourless and pest-free and can easily be adopted in households," says Bandekar who has also initiated the concept in her own house.

The students say their attempt is a small step to optimise natural resources and conserve soil that is already becoming scarce in metros like Mumbai, Thane that has become concrete jungles.

Presently, the school says it is sprinkling the available raw material but it often falls short as these students, who are from low-income families, cannot source adequate fruits, vegetables.

"We often bring waste from our own homes while few students request neighbourhood vendors to share leftovers," said Bandekar.

The initiative has garnered good response among the Azad Nagar locality where a few families have adopted this process, said Bandekar who presented this initiative at a recent online global event drawing applause and queries.



महाराष्ट्र टाईम्स

# फुलली मातीविरहित बाग

### विद्यार्थ्यांच्या मदतीने शाळेत कल्पक उपक्रम

म. टा. वृत्तसेवा

**ठाणे :** क्रमिक अभ्यासक्रमाबरोबरच विद्यार्थ्यांना कृतिशील प्रशिक्षण देऊन त्यांच्यावर पर्यावरणस्नेही संस्कार करण्याच्या हेतूने ठाणे महापालिकेच्या आझादनगर येथील शाळा क्रमांक ५५ मध्ये गच्चीवर मातीविरहीत बाग तयार करण्यात आली आहे. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली शाळेचे विद्यार्थी या बागेची निगा राखतात.

शाळेतील उपक्रमशील शिक्षिका नूतन बांदेकर यांनी 'हिरवे स्वप्न' या स्वयंसेवी संस्थेच्या प्रभा अविनाश आणि किरण महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेच्या गच्चीवर मातीविरहित बाग तयार केली आहे. शाळेतील इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांच्या मदतीने हा उपक्रम राबविण्यात आला. गच्चीवरील बागेसाठी सुकलेला पालापाचोळा आणि अत्यल्प माती कुंड्यांमध्ये भरण्यात आली. त्यात रोपांची लागवड करून त्यावर कोकोपिट्च थर देण्यात आला. त्याचप्रमाणे मेथी, मुळा, पालक, मायाळू, राई, मटार, टोमॅटो, वांगी, करले, अळू, कांदा, चटाटा आदींची भाज्यांची लागवड करण्यात आली. त्याचप्रमाणे हळद, कडीपत्ता, आले,

### कंपोस्ट खताही शाळेतच

बागेला लागणारे कंपोस्ट खत तयार करण्याची व्यवस्था तिथेच करण्यात आली. एका मोठ्या प्लॅस्टिकच्या पिंपामध्ये सुका पालापाचोळा आणि त्यावर दररोज निर्माण झालेले ओला कचरा टाकत जाऊ लागला. विद्यार्थी, शिक्षक आणि 'हिरवे स्वप्न'चे सदस्य आपापल्या घरून भाज्या, फळे यांचे देठ, साले, टरफले असा ओला कचरा शाळेत आणू कंपोस्टच्या पिंपात टाकू लागले. आठवडाभरातून एकदा हे थर हलवले जाऊ लागले. साधारणपणे एक दीड महिन्यात खत तयार झाले. ते खत सर्व झाडांना घालून नियमितपणे पाणी घालण्याचे काम मुलांनी आळीपाळीने केले.



वेखंड, लाजाळू, शतावरी, शंखपुष्पी, गुळवेल, नागवेल आदी औषधी वनस्पतीही लावण्यात आल्या. मोगरा, गुलाब, जास्वंद, अबोली, हळदीकुंकू, गारगोटी, तगर, घंटेपुष्प, ऑफिस टाइम्स अशी फुलझाडे मिळून ३०० हून अधिक प्रकारची झाडे या टेरेस बागेत आहेत.

गच्चीच्या दुसऱ्या भागातील पिंगीवर मुलांनी वारली चित्रे काढली. त्यासंबंधी माहितीचे स्वतंत्र फलकही लावण्यात आले. इयत्ता ६ वी ते ८ वी चे विद्यार्थी आ बागकाम करू लागले. येथेच ते करून त्यांच्यापुरते खत तयार करू लागले. झाडांची काळजी लागले. शाळेतील विद्यार्थी, पि आणि हिरवे स्वप्न'च्या सद नियोजन, मेहनत आणि उत्साह पर्यावरणपूरक तसेच सांघिक्यपूर्ण उ उरलेली ही शाळेच्या गच्चीव मातीविरहित बाग तयार झाली आ वैशिष्ट्यपूर्ण बागेचे सर्वत्र कौतुक आहे.

ठाणे वैभव

# ग्लोबल प्रोजेक्टमध्ये ठाणे मनपा शाळा क्र. ५५ च्या विद्यार्थ्यांचा सहभाग




**ठाणे :** मनपा शाळेच्या विद्यार्थ्यांनी Climate Action प्रोजेक्ट 2023 या गणेशा पॉटर्सवॉटर सहभागी होऊन ठाणे महापालिका शाळेचे नाव आंतरिक पातळीवर नेले. शालेय अभ्यासाबरोबरच शाळेचा रोजचे जागरुक पर्यावरणपूरक विविध उपक्रम हे या शाळेचे वैशिष्ट्य आता जागतिक पातळीवरील एका महत्त्वाच्या उपक्रमात पोहचले आहे.

या उपक्रमासाठी ठाणे महापालिकेचे उपायुक्त (शिक्षण) उमाकांत गायकवाड, शिक्षणाधिकारी वाकानांडेकर तसेच, प्रशिक्षणाधिकारी संदीप शाणे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच आवारात मोकळी जागा नसल्याने शालेतील उपक्रमशील शिक्षिका नूतन बांदेकर यांनी त्यावर तोडगा म्हणून शालेच्या टेरेसचे रूपांतर सुंदर अशा बागेत करण्याची संकल्पना मांडली. त्यानुसार त्यांनी 'हिरवे स्वप्न' या स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने विद्यार्थ्यांना बागकामाचे धडे देण्यास सुरुवात केली. आधी 30 ते 40 कुंड्यांपासे असलेली बाग मागील वर्षी 330 कुंड्यांपर्यंत पोहोचली. या उपक्रमातून बागकामाबरोबरच घातलेल्या ओला कचरा सुका कचरा व्यवस्थापन, ओल्या कचऱ्यापासून कंपोस्ट खत निर्मिती, शाळकाच्या शैक्षियाहून कोको पीट निर्मिती, फ्लाटिक्याचा पुनर्वापर असे पर्यावरण शिक्षण मुलांना देता आहेत. सुका पालापाचोळा आणि कॉपोस्ट खत याचा वापरलेली ही बाग म्हणजे एक वैशिष्ट्यपूर्ण प्रयोग आहे. संपूर्ण टेरेसच्या भिंती, जमीन यावर पर्यावरणपूरक संदेश देणारी तसेच वारली चित्रशैलीतील चित्रे रेखाटून विद्यार्थ्यांनी टेरेसचे एका सुंदर बागेत रूपांतर केले आहे.

काही मोठ्या लाकडी बॉक्सेसमध्ये मेथी, पालक, मोहरी, घेवडा, कारले, वांगी, मिरची, मटार, गाजर, बीट, काटे, बटाटे, शिंदू, टोमॅटो, अळू, आले, तसूप, इक्कर अशा भाज्यांची लागवड केली. तर काही कुंड्यांमध्ये औषधी वनस्पतींची लागवड केली. त्यामध्ये शतावरी, शंखपुष्पी, ओवोगंस, लाजाळू, वेखंड, ब्राह्मी, पुदिना, तगी, अडुळसा इत्यादी वनस्पतींची लागवड केली. काही कुंड्या फुलझाडांनी सजल्या. त्यात गुलाब, जास्वंद, अबोली, हळदीकुंकू, सोनटक्का, शतावणी, मोगरा, पिवळी बेलफुलांसर्स, सदाफुली अशी अनेक प्रकारची फुलझाडे लावली गेली. तर सुरु महिन्यात मुलांनी ओवा, सीताफळ, पपई, जांभूळ, बदाम यांच्या बिया जमवून त्यांची रोपे तयार केली, ही फळझाडा ठिकाणात आहेत.

अनेक कुंड्यांमध्ये सी व्यापरत्न, मनी प्लांट, कॅक्टस, नेचे, रंगीत शोभेचे अन्नु असे अनेक प्रकारची कॉमिंवेड झाडे लावली गेली. प्लॅस्टिक बॉटल्स रंगवून त्यात मनीप्लांटस लावण्यात आले. या बॉटल्स लोंबती सांबोभोवती बांधण्यात आल्या. या सगळ्या कुंड्या विविध प्रकारे नियोजन करून ठेवल्या गेल्या. या गार्डनमध्ये भाजीपाला, औषधी वनस्पती, फुलझाडे, फळझाडे, शोभेची झाडे अशी विविध प्रकारचा आहेत आहेत.

जागतिक पातळीवर दरवर्षी होणाऱ्या Climate Action Project मध्ये यावर्षी या शाळेने आपला सहभाग नोंदवून आपला पर्यावरण विषयक उपक्रम जगातील 153 देशांपर्यंत पोहोचवला आहे. त्या प्रोजेक्टचा एक भाग म्हणून ऑक्टोबर महिन्यात इतर देशातील विद्यार्थी व निसर्गप्रेमी संवाद साधण्याची संधी या मुलांना मिळाली. या डिस्टर्नेलन कॉन्फ्रेंसदरम्या साधण्यात या विद्यार्थ्यांनी सर्बिया, पोर्तुगाल, युक्रेन, स्पेन, नायजेरिया, साउथ ब्रुनाइटेड अरब अमिरती, बोलिव, पाकिस्तान, सायप्रस यासह विविध देशातील शालेयमधील विद्यार्थी व निसर्गप्रेमी संवाद साधला. आपल्या परिने वातावरण बदलाच्या परिणामांवर मात करण्यासाठी काही सोप्यातल्या सादरीकरण केले.

सर्वांत महत्वाचे म्हणजे त्या सर्व शाळांना आपल्या देशातील, आपल्या शहरातील यातायत बदलाची कारणे आणि त्याचे होत असलेले परिणाम याविषयी माहिती दोन्ही देशातील विद्यार्थी एकमेकांना देत असतात त्यामुळे माहितीची देवाणघेवाण होते. ज्ञानात भर पडते आणि विद्यार्थी सगळ होतात, असे शालेच्या शिक्षकांनी सांगितले. या ऑनलाइन सिटिंगसाठी टुमकोलेसाठी श्रीलता चेला यांनी आणि टेक्नाल साह्य नंदेवी तिवारी आणि शास्त्रिक शेख शिक्षक ठाणे मनपा यांचे सहाय्य लाभले. यामुळे शालेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांनी सहकार्य केले.

**समारोप -**

ठाणे महानगर पालिका शाळा क्रमांक 55,आझाद नगर ठाणे या शाळेत सद्यस्थितीत समाजात भेडसावणाऱ्या अनेक समस्यांवर आदर्श उपाययोजना अंमलात आणताना दिसून येतात जसे की, शहरामध्ये झाडे लावण्यासाठी मोकळी जागा उपलब्ध होत नाही त्यासाठी शाळेने गच्चीवरच टेरेस गार्डन फुलवले व त्या बागेसाठी ओल्या कचऱ्यापासून खतही बनवले जात आहे.

प्लास्टिकचा पुनर्वापर करून शाळा समाजासमोर एक आदर्श उभा करताना दिसून येत आहे. तसेच या टेरेस गार्डनचे वैशिष्ट्य म्हणजे ही बाग माती विरहित आहे. जलसंवर्धन या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना पाण्याचे महत्व पटवून देण्यात येते.

पर्यावरण सेवा कार्यक्रमामध्ये शालेय परिसर, शालेय इमारत स्वच्छ करण्यात येऊन विविध ठिकाणी क्षेत्रभेटी देण्यात येतात. तसेच प्रसारमाध्यमंद्वारे जनजागृती कार्यक्रमाच्या माध्यमातून शाळेचे स्तुत्य उपक्रम समाजासमोर आणले गेले जेणेकरून समाजही या उपक्रमाचे अनुकरण करेल व ही साखळी पुढे वाढत राहील.

अशा प्रकारे निसर्गाशी नाळ असणारी भावी पिढी घडवण्यासाठी शाळेचे संबंधित उपक्रम अत्यंत मोलाचे कार्य करत आहेत.





----------**----------

# "शिक्षण महोत्सव - आनंदोत्सव"

**शाळेचे नाव - जिल्हा परिषद शाळा,शेलवली बांगर,केंद्र.अल्याणी ता.शहापूर,जि.ठाणे**

**शाळेचा ईमेल आयडी** - rekha15575@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री बाळू कान्हू धानके
**मोबाईल क्रमांक** - 9209311096
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - rekha15575@gmail.com

**प्रास्ताविक -**

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे शिक्षण प्रक्रियेचे उद्दिष्ट आहे. 'विद्यार्थी मातीचा गोळा असून कुंभार देईल तसा आकार त्याला प्राप्त होत असते' हे गृहीतक आता कालबाह्य झाले आहे. त्याऐवजी 'विद्यार्थी हे बागेतील फुले असून ते स्वतःच्या क्षमतेने फुलत असतात. शिक्षक फक्त माळी बनून त्यांना फुलण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करत असतो' हे विधान आता सर्वमान्य होऊ लागले आहे.नागरी भागात पालक सजग असतात. ते विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व विकासाच्या वेगवेगळ्या संधी किंवा सुविधा उपलब्ध करून देत असतात. हार्मोनियम, ढोलकी, बासरी किंवा अन्य वाद्य वाजविणे, बुद्धिबळ, कॅरम यांसारखे खेळ, कथ्थक, भरतनाट्यम यांसारखे नृत्य प्रकार, हॉलिबाल, क्रिकेट, फुटबॉल यांसारखे मैदानी खेळ, शास्त्रीय गायन, वक्तृत्व- नेतृत्व विकास इ. सुविधेतून विद्यार्थी स्वतःची क्षमता सिद्ध करत असतात. ग्रामीण भागात मात्र या सुविधा उपलब्ध नाहीत, परिणामी शाळा हेच विद्यार्थी विकासाचे माध्यम असते. जिल्हा परिषद शाळा शेलवली बांगर ही आमची ग्रामीण आदिवासी भागातील शाळा असून तालुका मुख्यालयापासून 25 किलोमीटर अंतरावर आहे. गाव आणि आदिवासी वाडी मिळून साधारणपणे 1200 लोकवस्तीचे गाव असून गावातील बहुतेक लोक मोलमजुरी करत असतात.

शिक्षक आणि पालक यांच्या मधुर समन्वयातून आधी गुणवत्ता विकासाचा निर्धार करण्यात आला. मंथन प्रज्ञाशोध परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा, एन एम एम एस शिष्यवृत्ती परीक्षा, नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा यांसारख्या शालेय स्पर्धा परीक्षेत आमच्या शेलवली बांगर शाळेने घवघवीत यश संपादन केले. शाळेचे सर्वत्र कौतुक होऊ लागले. पण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एवढेच पुरेसे नाही या भावनेतून शाळेत दोन दिवसीय शिक्षण महोत्सव सुरु करण्याची कल्पना पुढे आली. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मा. श्री भरत बांगर आणि काही सन्माननीय सदस्य यांच्या चर्चेतून कार्यक्रमाची रूपरेषा ठरवण्यात आली. विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून देण्यासाठी जेजे करणे शक्य असेल ते अत्यंत प्रभावीपणे करण्याचा मनोदय पालकांनी व्यक्त केला आणि संपूर्ण राज्याला हेवा वाटावा असा दोन दिवसीय शिक्षण महोत्सव शाळेत साजरा करण्यास सुरुवात झाली.

**नियोजन -**

31 डिसेंबर आणि 1 जानेवारी हे दोन्ही दिवस अलीकडच्या काळात बीभत्स पध्दतीने साजरे होताना दिसतात. आपल्या संस्कृतीचे विद्रुपीकरण करण्याचा हा निंदनीय प्रकार बंद व्हायला हवा ही सर्वांची प्रामाणिक इच्छा असली तरी सुरुवात कोणी आणि कशी करावी हा प्रश्न असतो. हेच दोन दिवस शेलवलीकरांनी हेरले. सरत्या वर्षाला निरोप आणि नव्या वर्षाचे स्वागत शाळेतच धुमधडाक्यात करण्याचे निश्चित झाले. शिक्षण महोत्सवात काय काय असावे यावर जाणकारांशी चर्चा करण्यात आली. त्यानुसार विद्यार्थ्यांना आणि युवकांना वाचन प्रेरणा देण्यासाठी ग्रंथ दिंडीने शिक्षण महोत्सवाचा शुभारंभ करावा हे सर्वमान्य झाले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत बाल आनंद मेळावा, वर्षभर विविध परीक्षा आणि स्पर्धेत देदीप्यमान यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा, विद्यार्थ्यांच्या खाऊचे स्टॉल, मनोरंजक खेळ, विज्ञान जत्रा इ कार्यक्रम सकाळच्या सत्रात तर गावातील तमाम महिला भगिनींसाठी होम मिनिस्टरचा खेळ दुपार सत्रात घेण्याचे निश्चित करण्यात आली. दुसऱ्या दिवशी सकाळी 'करा योग राहा निरोग', महिलांसाठी रांगोळी स्पर्धा, विद्यार्थ्यांच्या चित्रकला, निबंध, हस्ताक्षर स्पर्धा घेण्याचे ठरले. दुपारी पुन्हा महिलांसाठी पाककला स्पर्धा, तारे शहापुरचे अंतर्गत आपल्या क्षेत्रात यशस्वी ठरलेल्या व्यक्तींची मुलाखत शाळेतील विद्यार्थी घेणार असल्याचे ठरले. सायंकाळी गीत संध्या, रात्रीचे सर्व गावाचे प्रीतीभोजन आणि रात्रीचे सांस्कृतिक कार्यक्रम अशा भरगच्च कार्यक्रमांची रूपरेषा ठरवण्यात आली. त्यासाठी लागणाऱ्या साहित्याची, मान्यवर पाहुण्यांची, बक्षिसे, पैठणी,बॅनर्स, पत्रिका, फोटो शूटिंग, भोजनाची, मंडप व्यवस्था, डेकोरेशन, साउंड सिस्टीम व कार्यक्रमांची जबाबदारी निश्चित करण्यात आली.

**अंमलबजावणी -**

'नियोजनात यशाची बीजे रोवली गेलेली असतात' या उक्तीप्रमाणे सर्व उपक्रमांचे अत्यंत सूक्ष्म नियोजन केल्याने 'शिक्षण महोत्सव' हा आमचा अनोखा उपक्रम प्रचंड यशस्वी होऊ शकला.

**पालकसभा -**

जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून पालकवर्गाने सकारात्मक प्रतिसाद दिला. दोन दिवसांचे कार्यक्रम ठरले. प्रत्येकाची वर्गणी ठरली. एकाही पालकाच्या दरवाज्यापर्यंत वर्गणी मागण्यासाठी जाण्याची आवश्यकता भासली नाही. दिडलाख रुपये लोकवर्गणी दोन दिवसात जमा झाली. शिवाय वस्तू रूपानेही खूप सारी मदत जमा झाली.

**मंडप व्यवस्था व सजावट -**

गावातीलच एका पालकाने दोन दिवसासाठी स्वतःचे मंडप डेकोरेशन मोफत उपलब्ध करून दिल्याने खूप मोठा आर्थिक भार कमी झाला. गावातील युवावर्गाने फ्लेक्स बॅनर्स ठिकठिकाणी लावून वातावरण निर्मिती करून बहुमोल योगदान दिले.

**ग्रंथदिंडी -**

ठरल्याप्रमाणे ग्रंथदिंडीने शिक्षण महोत्सवाचा शुभारंभ करण्यात आला. छानपैकी पालखी सजवली गेली. त्यात डॉ एपीजे अब्दुल कलाम यांची प्रतिमा ठेवून वाचनीय पुस्तके पालखीत ठेवली गेली. गावातील सरपंच उपसरपंच, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य यांनी पालखी खांद्यावर घेऊन दिंडीची सुरुवात झाली. विद्यार्थ्यांनी लेझीम नृत्यावर ताल धरला तर मुली आणि महिलांनी कळस घेतले. दारोदारी रांगोळ्या सडासंमार्जन करून अत्यंत मंगलमय वातावरणात ग्रंथ दिंडी सोहळा संपन्न झाला. महोत्सव उद्घाटन सोहळात्या नंतर तालुक्याचे आमदार, माजी आमदार, गटशिक्षणाधिकारी आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या शुभहस्ते महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. गतवर्षातील NMMS शिष्यवृत्ती, 5 व 8वी शिष्यवृत्ती परीक्षेतील आणि नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेतील यशवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला. यशस्वी विद्यार्थ्यांना REAL ACADEMY शहापूर यांनी देणगी स्वरूपात बक्षिसे उपलब्ध करून दिली. पाहुण्यांनी देखील भरघोस स्वरूपात बक्षिसे प्रदान केली. बाल आनंद मेळावा: विद्यार्थ्यांनी स्वतःच्या आवडीचे स्टॉल्स मांडले होते. पाणी पुरी, भेळ, चना चटपटी, वडा पाव, डोसा, इडली, मेंदूवडा इ. खाद्यपदार्थ तर विविध खेळांच्या स्टॉल्सवर बालगोपालांनी मनसोक्त आनंद लुटला.

**होममिनिस्टर -**

दुपारी गावातील महिला भगिनी यांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग झाल्याने होममिनिस्टर कार्यक्रम जबरदस्त यशस्वी होऊ शकला. महिलांनी मनोरंजक खेळात सहभागी होऊन मनमुराद आनंद लुटला. यशस्वी महिलांना 50 पारितोषिके आणि पैठण्यांचे वाटप करण्यात आले. संपूर्ण सूत्रसंचालन सौ शर्मिला पाटोळे आणि श्री प्रमोद पाटोळे या जोडीने करून धम्माल उडवून दिली.

**करा योग -**

दुसऱ्या दिवसाचा प्रारंभ योगाच्या कार्यक्रमाने झाला. अब्दुल शेख आणि सलमा शेख यांनी अत्यंत शैलीदारपणे योग प्रकार करून घेतले.

**रांगोळी स्पर्धा -**

गावातील महिलांनी आपापल्या दाराशी नियोजित विषयांवर मनमोहक रांगोळ्या काढून परीक्षकांची मने जिंकली. 10 विजेत्या महिलांना बक्षिसे प्रदान करण्यात आली.

**तारे शहापुरचे -**

या उपक्रमांतर्गत गावातीलच राष्ट्रपती पदक विजेते सेवानिवृत्त पोलीस जमादार श्री तुकाराम बांगर आणि कवी रमेश तारमळे यांची मुलाखत शाळेतील विद्यार्थ्यांनी घेऊन उपस्थित रसिकांची दाद मिळवली. अत्यंत प्रेरणादायी असा हा मुलाखत सोहळा आनंददायी वातावरणात संपन्न झाला.

**पाककला स्पर्धा -**

यानंतर महिलांसाठी पाककला स्पर्धा संपन्न झाली. त्यातही रुचकर आणि स्वादिष्ट, पूरक आणि पोषक पदार्थ बनवून महिलांनी धम्माल उडवून दिली. कधीही न पाहिलेल्या रेसिपी यावेळी अनुभवता आल्या.

**गीतसंध्या -**

यानंतर विद्यार्थ्यांच्या चमूने व्यासपीठाचा ताबा घेतला. स्वतः गायन वादन करून विद्यार्थ्यांनी दर्जेदार गाणी सादर केली. काही विद्यार्थी- पालकांनी कराओके या म्युझिक ऍपवर गाणी सादर केली.

**प्रीतीभोजन -**

या नंतर गावातील सर्व लहानथोर मंडळींचे शाळेच्या आवारात प्रीतीभोजन संपन्न झाले,याचे सर्व व्यवस्थापन ग्रामस्थ बांधवांनी पाहिले.

**पारितोषिक वितरण -**

दोन दिवसांत जेवढया स्पर्धा झाल्या त्या सर्व स्पर्धांचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

**सांस्कृतिक कार्यक्रम -**

रात्री एक वाजेपर्यंत विद्यार्थ्यांनी लोकनृत्य, चित्रपट गीते आणि धम्माल कॉमेडी सादर करून कार्यक्रम प्रचंड यशस्वी केला.अशा रीतीने दोन दिवसीय शिक्षण महोत्सव कार्यक्रमाची यशस्वी सांगता झाली.

**फलनिष्पत्ती -**

**लोकसहभाग -**

शाळेच्या भौतिक आणि गुणात्मक विकासात लोकसहभाग मोठ्या प्रमाणात वाढला. दरवर्षी किमान दीड लाख रुपये निधी जमवू शकलो. परिणामी शाळेच्या अनेक भौतिक गरजा पूर्ण करता आल्या. गावातील युवक त्यांची कला विद्यार्थ्यांना शिकवू लागले. त्यातून चित्रकला, नृत्यकला, गायन ,वादन अशा कला विकसित होऊ शकल्या. शिवाय दर रविवारी शिष्यवृत्ती सराव परीक्षा आयोजित केली जाते त्यासाठी गावातून मोफत पर्यवेक्षक उपलब्ध होऊ लागले.

**पटसंख्या वाढ -**

एका बाजूला जिल्हा परिषद शाळांचा पट कमी होत असताना आमच्या पटात लक्षणीय वाढ झाली. शाळेचा पट 120 वरून 180 पर्यंत पोहोचला. आजूबाजूच्या 10 किलोमीटरच्या परिघातून विद्यार्थी आमच्या शाळेत दाखल झाले. काही विद्यार्थी इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून आमच्याकडे दाखल झाले.

**शाळेला मिळाली नवी इमारत -**

शाळेचा लौकिक ऐकून अनेक सेवाभावी संस्था शाळेत येऊ लागल्या. हवी ती मदत करू लागल्या. सत्यसाई सेवा संस्था तळवाडे ठाणे ही संस्था देखील शाळेला भेट देण्यासाठी आली. संस्थेने येथील उपक्रमांचे कौतुक केले. शाळेच्या विनंती वरून शाळेला सुसज्ज अशी नवी इमारत बांधून दिली. तीन वर्गखोल्यांची सखोल दुरुस्ती देखील करून दिली. ही आमच्या सर्वांसाठी मोठी उपलब्धी होती. या शिवाय सर्व विद्यार्थ्यांना अत्यंत उत्कृष्ट दर्जाचे बेंचेस देखील संस्थेने उपलब्ध करून दिले आहेत.

**अन्य भौतिक सुविधा -**

शौचालय, वॉटर प्युरीफायर, बोअरवेल, नेट मिटरिंग, मोफत वायफाय, विद्यार्थ्यांना मोबाईल टॅब, स्मार्ट बोर्ड, प्रोजेक्टर, स्मार्ट tv, रंगमंच, सायन्स लॅब, वाचनालय इ. अनेक महत्वपूर्ण सुविधा शाळेला उपलब्ध झाल्याने शाळेचा संपूर्ण कायापालट होऊ शकला.

**समारोप -**

शाळा हे बालकाच्या सर्वांगीण विकासाचे केंद्र आहे. केवळ पुस्तकी शिक्षण पुरेसे नसून बालकाला विकासाच्या अनेक प्रकारच्या विकासाच्या संधी उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. शाळेचा दोन दिवसीय शिक्षण महोत्सव आयोजित करून अनेक प्रकारच्या संधी विद्यार्थ्यांना देता आल्या. त्यातूनच गावातच नव्हे तर संपूर्ण ठाणे जिल्ह्यात शाळेसाठी सकारात्मक वातावरण निर्माण झाले. ठाणे जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा.रोहन घुगे साहेब यांनी प्रत्यक्ष शाळेला भेट देऊन शाळेच्या उपक्रमांचे कौतुक केले.

**युट्युब लिंक्स -**

https://youtu.be/jCCK9hFkre0?si=HSzuiS2mI5QKORhg
https://youtu.be/lQRzEKbscbM?si=EPiLJXHYuPTrpD4W
https://youtu.be/IATNWGqpDc0?si=KyWhAM0v5InTq5jx
https://youtu.be/tuQtUwf5cXM?si=DVGCkZSQAIS5ueUs
https://youtu.be/PawbD4Fa0Wo?si=6reexxIH801jEpx8
https://youtu.be/t8efxIjIwKE?feature
https://youtu.be/GwE0s3WcYvc?feature




शाळेची जीर्ण झालेली इमारत




देणगीतून मिळालेला रंगमंच




शाळेचे बदललेले नवे रूप




शिक्षण महोत्सवातील एक क्षण



ग्रंथ दिंडी

----------**----------

# "स्थानिक गरजेनुसार उपक्रम घेणारी शाळा"

**शाळेचे नाव व पत्ता - जि.प.शाळा जगतापवस्ती (आंबळे),केंद्र.राजेवाडी ता.पुरंदर ,जि.पुणे**

**शाळेचा ईमेल आयडी** - chhayajagdale1982@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - सौ.वैजंयता अनिल कुंजीर
**मोबाईल क्रमांक** - 9767200605
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - chhayajagdale1982@gmail.com

**प्रस्तावना -**

शिक्षण क्षेत्र असो की अन्य क्षेत्र असो प्रत्येक क्षेत्रात यशस्वी झालेल्या व्यक्तींच्या संघर्षाचे व यशाची नेमके सूत्र काय होते...? यशाचे कारण काय होते ....? जसे की लता मंगेशकर सचिन तेंडुलकर यांनी मिळवलेले यश मागील खरे कारण काय होते...? काय सूत्र होते ...? यावर चिंतन केल्यास उत्तर मिळाले..... विशिष्ट लक्ष्य प्राप्तीसाठी एकाग्रतेने व समर्पक भावनेने निरंतर केलेले प्रयत्न. यात एकाग्रता, त्याग, दृढ निश्चय, चिकाटी व प्रयत्नांची पराकाष्ठा यांच्या उच्चतम पातळीचा समुच्चय असतो. पाल्य कर्तव्याप्रति प्रेम व निष्ठा असेल तरच हे शक्य आहे, ध्यासपूर्तीच्या प्रयत्नातून झालेली फलश्रुती एक उत्तम आदर्श उदाहरण बनत असते, या प्रयत्नांना सर्वांची साथ मिळाली तर अशक्य गोष्टही शक्य होते. काळ बदलत आहे समस्या बदलत आहे विद्यार्थ्यांच्या गरजाही बदलत आहेत. याचे अवलंबन करून आपण काळानुसार स्वतःच्या अध्यापन पद्धती अपडेट करणे गरजेचे आहे.तसेच अध्यापन अपडेट झाले तर अध्ययन देखील अपडेट होईल व विद्यार्थी देखील काळानुरूप अपडेट राहतील यासाठी अजून एक पद्धतीचा वैविध्यपूर्ण पद्धतींचा विचार आणि वापर, प्रेरणा आणि आनंद देणारे शिक्षणासाठी विविध उपक्रम राबवणे गरजेचे आहे. एक दिशा परिवर्तनाची गाथा ही अनोख्या उपक्रमांची ज्या अध्यापन पद्धतीतून विद्यार्थ्यांना शिकण्यास आनंद वाटेल प्रेरणा मिळेल अशाच पद्धती खऱ्या अर्थाने शिक्षणासाठी आदर्श अध्यापन पद्धती ठरतात. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास करणारे, विचार क्षमता विकसित करणारे, आनंद देणारे शिक्षण कसे देता येईल तसेच मुलांच्या आवडी निवडी क्षमता गरजा आणि समस्या तेथे स्थानिक परिस्थितीनुसार प्राधान्य देऊन विविध उपक्रम कसे राबवता येईल याचा विचार करून त्या परिस्थितीनुसार विद्यार्थ्यांना सक्षम बनवणारे शिक्षण देणे महत्त्वाचे वाटले व त्याच्यानुसार विविध उपक्रमांचे शाळेमध्ये आयोजन केले गेले.

शाळेची पटनोंदणी आणि विद्यार्थ्यांची नियमित उपस्थिती ही शैक्षणिक शाळेच्या यशस्वीतेचे दोन महत्त्वपूर्ण पैलू आहेत. पट नोंदीमध्ये विद्यार्थ्यांची मूलभूत माहिती, प्रवेश, वर्ग, विभाग इत्यादींचा समावेश होतो. तर उपस्थिती ही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा एक महत्त्वपूर्ण निर्देशक आहे.

**मुख्याध्यापक आणि शिक्षक यांना विषयासंदर्भात आलेल्या अडचणी -**

- विद्यार्थी संख्या कमी - शैक्षणिक वर्ष 2019 च्या सुरुवातीला शाळेची विद्यार्थी संख्या कमी होती.
- उपस्थितीचे सातत्य नव्हते.
- समाजातील इतर लोकांचा शाळेकडे पाहण्याचा नकारात्मक दृष्टिकोन शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये वंचित गटातील फासेपारधी समाजातील विद्यार्थी असल्यामुळे इतर पालक आपल्या पाल्याला शाळेत पाठवण्यास तयार होत नव्हते.
- भौतिक सुविधांचा अभाव शाळेमध्ये एक वर्गखोली सोडून इतर कुठल्याही प्रकारची भौतिक सुविधा नव्हती.
- पालकांची शाळेबद्दलची अनास्था व मानसिकता शाळा ही ठराविक वस्तीवर असल्यामुळे व विशिष्ट गटातील मुलांसाठी असल्याची मानसिकता पालकांची होती त्यामुळे आपल्या पाल्यांना या शाळेत चांगल्या प्रकारचे शिक्षण मिळणार नाही त्यांचा सामाजिक बौद्धिक विकास या शाळेत होऊच शकत नाही अशी भावना पालकांमध्ये असल्यामुळे अशा शाळेत मुलांना पाठविण्यास पालक धजवत नव्हते.
- सहा पैकी फक्त तीनच विद्यार्थी हजर असत तसेच शंभर टक्के विद्यार्थी हे कधी शाळेत उपस्थित नसत काही विद्यार्थीही दुपारपर्यंत शाळेत येऊन दुपारनंतर परस्परही शाळेतून घरी राहत होते.
- इंग्रजी माध्यमाचे आकर्षण शालेय परिसरातील सर्व मुले ही इंग्रजी माध्यमात जाणारे विद्यार्थी होते.
- पालकांची मानसिकता बदलण्याचे आव्हान इंग्रजी माध्यमातून इतर खाजगी शाळेत विद्यार्थी दाखल असल्यामुळे त्या शाळेतून काढून अशा प्रकारच्या शाळेमध्ये घालण्यास पालकांना प्रवृत्त करणे हे अवघड होते.
- शिक्षकांचा अभाव - पटाअभावी शाळेमध्ये नियमानुसार एकच शिक्षक कार्यरत होता.
- पालकांची शाळेबद्दलची उदासीनता, सहभागाचा अभाव जे विद्यार्थी शाळेमध्ये येत होते ते फासेपारधी समाजातील असल्यामुळे त्यांचा परंपरागत कामधंदा ते व त्यांचे पालक करत त्यामुळे पालक कधी शाळेत येत नव्हते.

**या अडचणींवर मात करण्यासाठी मुख्याध्यापक शिक्षक यांनी केलेल्या उपाययोजना किंवा मुख्याध्यापक शिक्षक यांनी प्रभावी कामासाठी केलेली अंमलबजावणी -**

- पालक भेटी गृहभेटी विद्यार्थ्यांना शाळेमध्ये दाखल करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन गृहभेटी व पालक भेटी देण्यात आल्या.
- शाळाबाह्य विद्यार्थी शोध शाळेच्या परिसरात तसेच पोल्ट्री व्यवसाय ऊसतोड या ठिकाणी जाऊन शाळाबाह्य विद्यार्थ्यांचा शोध घेण्यात आला.
- शाळा सर्वेक्षणातील विद्यार्थी शोध व दाखल शाळेच्या सर्वेक्षणात येणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करून ते विद्यार्थी इतर ठिकाणी गेलेले असल्यास त्यांचा शोध घेऊन त्यांना शाळेमध्ये दाखल करून घेण्यात आले.
- समाज संपर्क - समाजातील व्यक्तींशी संपर्क साधून शाळेविषयीची ध्येयधोरणे व समाजविकासात शाळेचा महत्त्वाचा वाटा याचे महत्त्व पटवून देऊन मुलांना शाळेत पाठवणे विषयी आव्हान करण्यात आले.
- सहयोग पटनोंदणीसाठी इतर शाळांशी सहयोग घेण्यात आला इतर शाळांशी संपर्क करून वस्तीवरून दुसऱ्या शाळेमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांना पुन्हा शाळेमध्ये पाठवण्याची विनंती करण्यात आली.
- पायाभूत सुविधांची सुधारणा, शौचालय दुरुस्ती, पिण्याचे पाण्याची सोय ,विजेची उपलब्धता, क्रिडांगण उपलब्धता, इमारत दुरुस्ती, नवीन बांधकाम इत्यादी उपलब्ध करण्यात आले
- शैक्षणिक गुणवत्तेवर भर विद्यार्थी शाळेत येण्यासाठी सेमी इंग्रजी सुरू करण्यात आले. विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. नवीन अध्यापन पद्धतींचा वापर करण्यात आला
- लोकसहभाग शाळेच्या विकासात लोकसभा घेण्यात आला. लोकसहभागातून अनेक आवश्यक गोष्टी शाळेला उपलब्ध करून घेण्यात आल्या. इतर कॉर्पोरेट कंपन्यांचा शाळेच्या विकासासाठी उपयोग करून घेण्यात आला.
- अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर- दहा वर्षांमध्ये शाळेत विज नसल्यामुळे कुठल्याही प्रकारचे तंत्रज्ञान उपलब्ध नव्हते परंतु लोकसहभागामुळे शाळेमध्ये टीव्ही संच, टॅबलेट, संगणक, साऊंड सिस्टम इत्यादी गोष्टी उपलब्ध करून अध्यापन त्याचा वापर करून शासनाच्या विविध स्पर्धेत भागही

घेण्यात आला आणि त्याच्यामध्ये विद्यार्थ्यांना चांगले असे यश संपादन करण्यास त्याचा उपयोग झाला.

- विविध स्पर्धा परीक्षा- राज्यस्तरीय अभिरूप परीक्षा, मंथन परीक्षा आणि शासनाच्या विविध स्पर्धा प्रज्ञाशोध यासारख्या स्पर्धा परीक्षांमध्ये सहभाग घेण्यात आला आणि त्याप्रमाणे विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन ही करण्यात आले.
- शाळेतील विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढवण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या शाळा अधिक आकर्षक बनवली ,भौतिक सुविधा वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात आले .
- विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन, ज्यात विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक गरजा लक्षात घेऊन त्याप्रमाणे त्यांना मार्गदर्शन करून तसेच विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळे स्वाध्याय कार्ड तयार करून ते घरी अभ्यासाचे देऊन पालकांना त्यांना मदत करण्यास सांगितले याचाच परिणाम म्हणून 2023-24 मध्ये शाळेला 100% प्रगत शाळा म्हणून शाळेचा गौरव करण्यात आला.
- पालकांच्या बैठका घेऊन त्यांना शाळेच्या कामाबद्दल माहिती दिली तसेच पालकांशी संवाद साधून त्यांच्यामधील शाळा आणि पालक यांच्यातील समन्वय घडवून आणला. शाळेत होणाऱ्या विविध शैक्षणिक प्रगती बद्दल वेळोवेळी पालकांना माहिती दिली आणि शाळेच्या ध्येय धोरणांमध्ये शाळेच्या विकासामध्ये पालकांना सहभाग करून घेतले.
- शालेय वातावरण सुधारले, शाळेचा परिसर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यात आला. शाळेच्या इमारतीची दुरुस्ती करून त्या त्यांना रंगरंगोटी करून आकर्षक तर त्यांचा वापर करून वाचन समृद्ध वातावरण वर्गामध्ये आणि वर्गाच्या बाहेरही तयार करण्यात आले. शाळेमध्ये विविध प्रकारच्या खेळणी आणि खेळाच्या मैदानांची व्यवस्था केली. विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी अनुकूल वातावरण शाळेमध्येच उपलब्ध करण्यात आले.
- स्थानिक परिस्थितीनुसार विविध उपक्रमांचे आयोजन-स्थानिक परिस्थितीचा विचार करून आणि उपक्रमांची शाळेमध्ये आयोजन करून पालकांचा शाळेमध्ये सहभाग वाढविण्यात आला तसेच विद्यार्थ्यांनाही शाळेबद्दल आवड आणि गोडी निर्माण करण्यासाठी उपक्रम राबविण्यात आले. त्यातून त्यांचा सामाजिक विकासाबरोबरच बौद्धिक विकासही घडून आला. उपक्रम - नाव होतं माता पालकांचा सन्मान, मातृदिनानिमित्त शाळेमध्ये सर्वच माता पालकांना बोलून आपल्या पाल्यांकडून माता पालकांचे पूजन करून त्यांच्या प्रति आदर व्यक्त करून त्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच त्यांच्यासाठी विविध प्रेरणादायी व्याख्याने ठेवण्यात आले तसेच त्यांना घरगुती

व्यवसायाबद्दल माहिती देण्यासंदर्भात व्याख्यान आयोजित करून त्या संदर्भात संपूर्ण माहिती देण्याची व्यवस्था केली त्यामुळे माता पालकांचा शाळेबद्दलचा ओढा अधिकच वाढला. माता पालक गट स्थापन करण्यात आले त्यामध्ये लीडर मातांनी इतर विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी पुढाकार घेतला.

- फिरते वाचनालय शाळेमध्ये विद्यार्थ्यांना वाचनाबद्दल आवड निर्माण व्हावी यासाठी वाचन समृद्ध वातावरण निर्माण करण्यात आले. तसेच यासाठी विद्यार्थ्यांना वाचनाबद्दल आवड निर्माण व्हावी यासाठी फिरत्या वाचनालयाचा उपयोग झाला. विद्यार्थ्यांना दुपारच्या सुट्टीमध्ये फिरते वाचनालय हे शाळेच्या मैदानात ठेवून विद्यार्थी दररोज वर्तमानपत्रे गोष्टींची पुस्तके मासिके स्वतः हाताने घेऊन या पुस्तकांचे झाडाखाली बसून वाचन करतात.

विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन अंतर्गत विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक गरजा लक्षात घेऊन त्याप्रमाणे त्यांना मार्गदर्शन करण्यात आले त्यासाठी विद्यार्थ्यांना त्याप्रमाणे स्वाध्याय सोडवण्यास देण्यात आले.

पालकांचे समुपदेशन ज्यात आपल्या पाल्याला शाळेत पाठवण्याबाबत पालकांचे समुपदेशन करण्यात आले, इंग्रजी माध्यमांच्या शाळा व मराठी माध्यमांच्या जिल्हा परिषदेच्या शाळेतील फरक व महत्त्व सांगण्यात आले.

आठ मार्च रोजी जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने यशस्वी मातांचा शाळेत सन्मान केला गेला त्यांच्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करून सर्व महिलांचा सहभाग घेतला गेला त्यामुळे महिलांचा शाळेमध्ये सहभाग वाढवून त्यांनाही शाळेबद्दल आपुलकी निर्माण झाली.

बालक पालक सहल आयोजनात शाळेतील सर्व विद्यार्थी व माता पालक यांची जिल्ह्यातील आदर्श शाळा पाहण्यासाठीच्या सहलीचे आयोजन केले गेले जेणेकरून अशा शाळा पाहून त्यांच्यामध्ये आपल्या शाळेबाबतची जबाबदारी स्वीकारण्याची समज वाढली.

निपुण भारत अंतर्गत माता गटांची स्थापना अंमलबजावणीनुसार शाळेमध्ये माता पालक गटांची स्थापना करून त्यांच्या मिटिंग घेण्यात आल्या तसेच त्यांचा व्हाट्सअप ग्रुप तयार करून त्यांना माता पालकांच्या व्हिडिओज आणि त्या ग्रुप वर पाठवण्यात आले त्या व्हिडिओ प्रमाणे जे विद्यार्थी मागे आहेत त्यांना घरचा अभ्यास करून घेण्यासाठी उपयोग करून घेण्यात आला त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययन पातळीत सुधारणा झाली.

इंग्रजी माध्यमांमध्ये विविध उपक्रम घेतले जातात त्यामुळे पालक या आकर्षणाला भूलून आपले विद्यार्थी या शाळेमध्ये घालतात, परंतु या ठिकाणी कुठेतरी पालकांना जागृत करण्यासाठी इंग्रजी माध्यमाच्या

शाळेत घेतले जाणारे उपक्रम आमच्या शाळेत घेतले. त्यामध्ये विद्यार्थी राज्य स्तरामध्ये खेळाडू प्रथम क्रमांक मिळून यशस्वी झाले हा उपक्रम घेऊन खाजगी स्पर्धांमध्ये विद्यार्थी सहभागी होतात याचे पालकांना कौतुक वाटते आणि त्यामुळे शाळेचा पट वाढण्यास मदत झाली.

**मुख्याध्यापक शिक्षक यांनी निवडलेल्या विषयासंदर्भातील अडचणी दूर केल्यानंतर किंवा मुख्याध्यापक शिक्षक यांनी प्रभावी कामासाठी केलेल्या अंमलबजावणीनंतर दृश्य परिणाम फलनिष्पत्ती -यशोगाथा -**

- विद्यार्थी संख्या वाढली सन 2019 मध्ये असलेली सहा ही विद्यार्थी संख्या 2024 मध्ये सहा वरून तीस वर आहे.
- पालकांचा विश्वास वाढला अध्ययन अध्यापन प्रक्रिया प्रभावी व पारदर्शक शैक्षणिक कार्य यामुळे पालकांचा शिक्षक व शाळेविषयीचा विश्वास वाढला.
- प्रत्येक विद्यार्थ्याला वैयक्तिक मार्गदर्शन, प्रशिक्षित शिक्षक अध्यापनात आधुनिक पद्धतींचा वापर इत्यादीमुळे शैक्षणिक गुणवत्ता सुधारली.
- शाळेचे रूप बदलले, पूर्वी भौतिक सुविधा नसलेली शाळा आता सर्व सुविधा युक्त बनली. लोकसहभागातून सर्व भौतिक सुविधा उपलब्ध झाल्यामुळे शाळेचे रूप पूर्णपणे बदलले.
- राज्यस्तरावरील विविध स्पर्धा अभिरूप मंथन प्रज्ञाशोध यांसारख्या परीक्षांमध्ये विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले. शाळेचा निकाल शंभर टक्के दिसून आला.
- माता पालकांचा शाळेतील कामात सक्रिय सहभाग घेण्यात येतो ज्यात निपुण भारत अंतर्गत माता पालकांचे गट असून शाळेतील प्रत्येक उपक्रमात कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेऊन चित्रकला, रांगोळी, गायन विणकाम इत्यादी शाळेत येऊन शिकवले जाते.
- सर्वांच्या सहकार्यातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासोबत सांस्कृतिक कला, क्रीडा विषयी विकास करण्यास चालना मिळाली.
- शासनाकडून घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धेत विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय यश मिळाले.
- शाळेमध्ये दोन अगदी लांब अंतर असलेल्या वर्गखोल्या शाळेसाठी वापरल्या जात होत्या परंतु ग्रामस्थांच्या मागणीने शाळेला नवीन वर्ग मान्य झाला तसेच बहुतेक सुविधांमध्ये प्रत्यक्ष पाणीपुरवठ्याची सोय शाळेमध्ये होऊन विद्यार्थ्यांना अगदी हात धुण्यापासून ते पिण्याच्या पाण्याची

व्यवस्था केली गेली. शाळेला कुठल्याही प्रकारचे मैदान नसताना लोकसहभागातून ग्रामस्थांच्या मदतीने शाळेसमोरील जागेस मुरूम टाकून ती जागा सपाट करून करण्यात आली. मुलांसाठी शौचालयाची सुविधा नव्हती हे शौचालय ग्रामपंचायत कडून बांधून मिळाले. त्यामुळे मुला मुलींना स्वतंत्र शौचालयाची सोय झाली. नवीन वर्गखोली, शौचालय संरक्षक भिंत इत्यादीचे काम शाळेमध्ये करण्यात आले आहे.

- अंगणवाडीचे वर्ग हे वस्ती पासून दोन किलोमीटर अंतरावर गावामध्ये भरत होते, वस्तीवर कुठल्याही प्रकारच्या अंगणवाडीसाठी वर्ग उपलब्ध नसताना लहान मुले त्या ठिकाणी इतक्या लांब चालत जात, कधी कंटाळा करत होते. शाळेच्या आवारामध्येच अंगणवाडी जागा उपलब्ध करून दिल्यामुळे अंगणवाडीची वर्गखोली शाळेच्या जागेत झाल्यामुळे विद्यार्थी संख्येमध्ये अजून वाढ जाण्यास मदत झाली हेच विद्यार्थी प्राथमिक शाळेमध्ये सहजपणे येऊ लागली.
- शासनाकडून निर्देशित विविध उपक्रम घेण्याबाबत शाळेमध्ये प्रभावीपणे अंमलबजावणी केली जाते. जिल्हा परिषदेकडून आलेला परकीय भाषा उपक्रम, तालुक्यातील प्रथम आमच्या शाळेमध्ये राबवल्या गेला त्यामुळे संपूर्ण तालुक्याला प्रशिक्षण देण्याचे काम हे आमच्या शाळेला मिळाले त्यामध्ये जर्मन भाषा हा उपक्रम आमच्या शाळेने राबवला, शाळेतील सर्व विद्यार्थी चांगल्या प्रकारे जर्मन भाषा बोलू लागले व त्याचाही परिणाम इतर ठिकाणचे पालक शाळेकडे ओढ घेऊ लागले.
- सध्याचे युग पाहता शाळेमध्ये सर्वच विद्यार्थ्यांना सुरक्षित वातावरण दिले जाते त्यासाठी शाळांमध्ये सखी सावित्री, विद्यार्थी सुरक्षा समिती स्थापन केली असून ते जबाबदारीने आपले काम करत असतात, विद्यार्थ्यांच्या आरोग्याविषयी काळजी घेतली जाते ,पालकांना बोलावून लगेच सांगितले जाते त्यामुळे पालक आपल्या विद्यार्थ्यांच्या आरोग्या बाबत येणाऱ्या समस्येविषयी जागरूक होतात विद्यार्थ्यांच्या शाळेमध्ये वेगवेगळी आरोग्य तपासण्या केल्या जातात.
- शाळेमध्येच राबवले जाणारे विविध उपक्रम ,कार्यक्रम त्यामध्ये पालकांचा सहभाग सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग ,पालकांमधील संबंध या सर्व गोष्टींमुळे विद्यार्थ्यांनाही शाळेबद्दलची गोडी निर्माण झाली आहे आणि पालकांनाही शाळेबद्दलच्या सर्व गोष्टींचा अभिमान वाटतो.
- शाळेची वाटचाल पाहता येणाऱ्या प्रत्येक अधिकारी प्रत्येक पालक व प्रत्येक विद्यार्थ्याला अभिमान वाटावा असा शाळेमध्ये बदल झालेला दिसून येतो. अगदी माळरानावर ओसाड असलेली शाळा कमी कालावधीत मुलांनी भरून गेली. झाडाझुडपांनी फुलझाडांनी हिरवाईने भरून गेली. कमी कालावधीत गुणवत्तेच्या बाबतीत विद्यार्थ्यांनी गौरव संपादन केला, सर्वच कामात भाग घेणारा

शिक्षक वर्ग, आणि राबवले गेलेले नाविन्यपूर्ण उपक्रम, यातून शाळेचा गौरव राज्यापर्यंत पोहोचला या सर्व गोष्टी पाहता ग्रामस्थ पालक या सर्वांना शाळेचा अभिमान वाटतो.


- वर्षानुवर्ष शाळा ही एक शिक्षकीच होती त्यामुळे सर्व कामेही एका शिक्षकाला करावी लागत होती त्यामुळे गुणवत्तेत अडचण निर्माण झाली होती परंतु शाळेचा पट वाढला , शाळेला एक शिक्षक मिळाला व शाळा ही द्वी शिक्षकी झाली. उत्तम काम करणाऱ्या शिक्षकांमुळे शाळा कमी कालावधीतच उंची गाठू शकली.

**समारोप -**

बंद पडण्याच्या मार्गावर असलेल्या शाळेचा कायापालट होताना विद्यार्थी पट वाढ झाली. शंभर टक्के उपस्थिती, लोकसहभाग, अध्ययन अध्यापनात आधुनिकतेचा वापर, शाळेमध्ये अध्यापन सेमी इंग्रजी तसेच इंग्रजी माध्यमांप्रमाणे वेगवेगळे उपक्रम शाळेमध्ये राबवले गेले या सर्वांमुळेच शाळेमध्ये बदल होत गेला. शाळेचे रूप पूर्णपणे बदलत गेले.

**उपक्रमा संदर्भातील काही निवडक फोटो व व्हिडीओ लिंक -**

https://drive.google.com/file/d/1PqEyyinZPtaScKSnPjjYVSZAHIA1GrDg/view?usp=drivesdk






शालेय स्थिती
सुरुवातीचा शालेय पररसर
सध्याचा शालेय पररसर

# पटसंख्येत झालेली वाढ

| सुरुवातीचा पट | सध्याचा पट |
| --- | --- |
|  |  |

# उपस्थिती

| सुरुवातीची उपस्थिती | सध्याची उपस्थिती |
| --- | --- |
|  |  |

# शालेय स्थिती

२०१९



२०२४



# अध्यापनातील बदल

पूर्वी



सध्याची



## पट संख्येत वाढ होण्यासाठी केलेले प्रयत्न

**गृह भेट**



**पालकांचे समुपदेशन**



## शाळा बाह्य सर्वेक्षण

**पूर्वी**



**सध्याची**



## शाळे साठी वाढलेली मदत

| २०१९ स्लीपिंग कीटवाटप | सध्याची वाढलेली मदत |
| --- | --- |
|  |  |

----------**----------

## “ग्रामीण भागातील शिक्षण क्रांतीचा अग्रदूत" स्पर्धा परीक्षा तंत्रज्ञान विकास

**शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पिंपळगाव तर्फे महाळुंगे, ता.आंबेगाव,जि.पुणे**

**शाळेचा ईमेल आयडी** - zpschoolpimpalgaonmaha@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - सौ.अश्विनी सुर्यकांत मेंगडे
**मोबाईल क्रमांक** - 9766625580
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - smrunal88@gmail.com

**प्रास्ताविक** -


पुण्यापासून ७० किलोमीटर अंतरावरील पिंपळगाव तर्फे महाळुंगे या छोट्याशा गावातील जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा ही केवळ एक शाळा नाही, तर एक आदर्श मॉडेल आहे. 1914 पासून चालू असलेली ही शाळा आज 600 विद्यार्थ्यांना इयत्ता १ ली ते ५ वी पर्यंत शिक्षण देत असून, त्याचे उत्कृष्ट कामगिरीचे अनेक दाखले आहेत. ६०० विद्यार्थ्यांना शिक्षणाचे अमृत पाजणारी ही शाळा, ग्रामीण भागातील शिक्षणाचे एक उज्ज्वल उदाहरण आहे.






**शाळेची स्थापना आणि इतिहास -**

पुणे जिल्ह्याच्या हिरव्यागार डोंगराळ भागात वसलेला आंबेगाव तालुका, आपल्या नैसर्गिक सौंदर्याबरोबरच शैक्षणिक समृद्धीसाठीही प्रसिद्ध आहे. याच तालुक्यातील मंचर शहरापासून पूर्वेला, घोडनदीच्या काठावर वसलेले महाळुंगे गावातील जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा, पिंपळगाव तर्फे महाळुंगे हा शैक्षणिक विश्वाचा एक उज्ज्वल दिपक आहे.एक छोटेसे खेडेगाव असूनही, या शाळेने केवळ ६०० विद्यार्थ्यांपासून प्रारंभ करून आज हजारो विद्यार्थ्यांच्या भवितव्य घडावे यासाठी ही जबाबदारी स्वीकारली आहे. शंभर वर्षांच्या दीर्घ काळात या शाळेने अनेक उंची गाठल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवून, कला, क्रीडा आणि ज्ञानाच्या क्षेत्रात विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचे काम या शाळेने केले आहे.या शाळेची खासियत म्हणजे विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांचे अतूट बंधन. या तिघांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे शाळेची ओळख दूरवर पसरली आहे. शहरातील विद्यार्थीही ग्रामीण भागातील या शाळेत शिकण्यासाठी उत्सुक असतात. शिक्षकांच्या कर्तृत्वपूर्ण कामगिरीमुळे शाळेला जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर अनेक पुरस्कार मिळाले आहेत. पालकांचा विश्वास या शाळेवर अतूट असून, ते आपल्या मुलांचे भवितव्य या शाळेच्या हाती सुपूर्द करतात.




**आलेल्या अडचणीवर शिक्षक व मुख्याध्यापक यांनी अधिक प्रभावी केलेले काम -**

सदर शाळेला काही वर्षांपूर्वी गावकरी यांनी मिळून टाळे लावले होते. कारण शाळेची गुणवत्ता ढासळली होती. शैक्षणिक दर्जा खालावला होता. इंग्रजी माध्यमाकडे पालकांचा कल वाढल्यामुळे जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रवेश कमी होण्याचे प्रमाण वाढले होते.

1. सामाजिक प्रतिष्ठा: इंग्रजी माध्यमाच्या शाळांना सामाजिकदृष्ट्या अधिक प्रतिष्ठा प्राप्त आहे. अनेक पालक मानत होते की इंग्रजी माध्यमात शिक्षण घेतल्याने त्यांच्या मुलांचे भविष्य उज्ज्वल होईल.

2. रोजगारांच्या संधी: इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे आजच्या काळात अनेक क्षेत्रांमध्ये आवश्यक मानले जाते. पालक मानत होते की इंग्रजी माध्यमात शिक्षण घेतल्याने त्यांच्या मुलांना चांगल्या नोकऱ्या मिळण्याची शक्यता अधिक असते.

3. खासगी शाळांची सुविधा: खासगी इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये आधुनिक सुविधा, चांगले शिक्षक आणि वैविध्यपूर्ण शैक्षणिक कार्यक्रम असतात. असा पालक वर्गाचा समज होता.

4. पुरेशा शिक्षकांचा अभाव, अपुऱ्या सुविधा आणि गुणवत्तेचे प्रश्न.

**या परिस्थितीचे परिणाम -**

1. जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थी संख्या कमी झाली होती. यामुळे शाळांना चालवणे कठीण होते आणि शैक्षणिक दर्जाही प्रभावित झाला होता.

2. शिक्षण विषमता: इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये प्रवेश घेण्याची क्षमता असलेल्या मुलांना चांगले शिक्षण मिळते, तर जिल्हा परिषद शाळांमधील मुलांना गुणवत्तेचे शिक्षण मिळणे कठीण होते.असा एक गैरसमज पालकांमध्ये होता.

**या समस्यावर उपाय -**

1. गुणवत्ता सुधारणे: प्रथम गावकरी आणि शिक्षक मिळून प्रशासनास विनंती करून शिक्षक संख्या शाळेची वाढवली गेली. शाळांमध्ये आधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्या गेल्या आणि शैक्षणिक पद्धतींमध्ये सुधारणा केली.

2. इंग्रजी भाषेवर भर देणे: जिल्हा परिषद शाळा पिंपळगाव तर्फे महाळुंगे मध्ये सेमी इंग्रजी शिक्षण सुरु केले.

3. पालकांना जागरूक केले : जिल्हा परिषद शाळांमध्ये झालेल्या सुधारणांबद्दल पालकांना जागरूक केले लोकसहभाग वाढवला. शाळेसाठी तब्बल 30 ते 40 लाख असा भरीव निधी गावकरी यांमार्फत जमा केला गेला.

4. शिक्षणासाठी समान संधी: सर्व मुलांना गुणवत्तेचे शिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न केले.

**या अडचणींवर मात करण्यासाठी उपाययोजना प्रभावी कामासाठी केलेली अंमलबजावणी -**

जिल्हा परिषद शाळा पिंपळगाव तर्फे महाळुंगे शिष्यवृत्ती परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची तयारी करण्यासाठी विविध उपक्रम राबवतात. या उपक्रमांचा उद्देश विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी आवश्यक ज्ञान आणि कौशल्य देणे हा असतो.

**विविध उपक्रम -**

1. विषयनिहाय अभ्यास वर्ग: प्रत्येक विषयासाठी विशेष अभ्यास वर्ग आयोजित केले जातात. या वर्गात अनुभवी शिक्षक विद्यार्थ्यांना विषयाचे सखोल ज्ञान देतात.
2. प्रश्नोत्तरे सत्र: नियमित प्रश्नोत्तरे सत्रांचे आयोजन करून विद्यार्थ्यांची परीक्षेची तयारी चांगली होते.
3. मॉडेल पेपर्स: विद्यार्थ्यांना मॉडेल पेपर्स सोडवण्याची संधी दिली जाते, ज्यामुळे त्यांना परीक्षेचे स्वरूप समजून येते.

4. समूह चर्चा: विद्यार्थ्यांना समूह चर्चा करण्याची संधी दिली जाते, ज्यामुळे त्यांच्यात विचार करण्याची क्षमता वाढते.
5. व्यक्तिगत मार्गदर्शन: मंदगतीने शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना व्यक्तिगत मार्गदर्शन दिले जाते.
6. अभ्यास सामग्री: विद्यार्थ्यांना आवश्यक असलेली सर्व अभ्यास सामग्री, जसे की पुस्तके, नोट्स, मॉडेल पेपर्स इ. उपलब्ध करून दिली जातात.
7. अभिभावक बैठका: अभिभावकांना शाळेत बोलावून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबद्दल चर्चा केली जाते.
8. मोबाईल ॲप्स आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्म: शाळा विद्यार्थ्यांना ऑनलाइन अभ्यासासाठी मोबाईल ॲप्स आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देतात.
9. प्रेरणादायी व्याख्याने : विद्यार्थ्यांना प्रेरित करण्यासाठी प्रेरणादायी व्याख्याने आयोजित केले जातात.

**उपक्रमांचे फायदे** -

1. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो.
2. त्यांना परीक्षेची भीती कमी होते.
3. त्यांना विषयाचे सखोल ज्ञान होते.
4. त्यांची समस्या निवारण क्षमता वाढते.
5. ते परीक्षेसाठी चांगले तयार होतात.

**शिक्षकांची भूमिका** –

शिक्षक या उपक्रमांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात, त्यांच्या शंकांचे निवारण करतात आणि त्यांना प्रोत्साहित करतात.

**हे उपक्रम राबवण्यासाठी शाळेला खालील गोष्टींची आवश्यकता असते** -

1. अनुभवी शिक्षक
2. पुरेसे अभ्यास साहित्य
3. योग्य वातावरण

**पिंपळगाव तर्फे महाळुंगे गावातील गावकरी, पालक यांनी स्वतः प्रयत्नातून शाळा एक उत्तम मॉडेल म्हणून उभी केली आहे. ज्या शाळेला काही वर्षांपूर्वी स्वतः गावकरी यांनी टाळे लावले होते त्या शाळेला गावानेच उभे केले. आज शाळेत शहरातून विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी येत आहेत. हे एक उत्तम उदाहरण आहे लोकसहभाग , संघटन , जागरूकता आणि विश्वासाचे**.

**शाळेचे ध्येय आणि उद्देश** -


1. शाळा विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिकदृष्ट्याच तयार करत नाही, तर त्यांना एक सक्षम स्वयंपूर्ण आणि आनंदी नागरिक बनवण्याचा प्रयत्न करते.
2. ग्रामीण भागातील शिक्षणाचा प्रसार: ही शाळा ग्रामीण भागातील मुलांना चांगले शिक्षण देण्याचे काम करते.
3. सामाजिक चेतना वाढ: शिक्षणाच्या माध्यमातून या गावातील लोकांची सामाजिक चेतना वाढली आहे.

4. विकासाचा पाया: शिक्षित समाज हाच देशाच्या विकासाचा पाया असतो.
5. बेकारी कमी करणे: शिक्षणामुळे या गावातील बेकारी कमी होईल आणि रोजगार वाढेल.

**सुविधा** -

1. आधुनिक सुविधा: स्मार्ट टीव्ही, संगणक प्रयोगशाळा, विज्ञान प्रयोगशाळा, क्रीडा साहित्य अशा सर्व आधुनिक सुविधा शाळेत उपलब्ध आहेत.
2. स्वच्छता आणि आरोग्य: स्वच्छतागृहे, शुद्ध पेयजल योजना अशा सुविधांमुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य चांगले राखले जाते.
3. विद्यार्थी विकास: सर्वतोमुखी विकास कवायत, योग, कला, वक्तृत्व अशा विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो.
4. प्रोत्साहन: गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन त्यांना प्रोत्साहित केले जाते.
5. सहकार्य: समाजसहकार्य, शाळा व्यवस्थापन समिती, माता-पिता, ग्रामपंचायत अशा सर्व घटकांचे सहकार्य शाळेच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे आहे.

**भौतिक सुविधा तसेच अध्यापन व अध्ययनाशी संबंधित आधुनिक साधनांची उपलब्धता यासाठी शाळा व्यवस्थापन समिती , ग्रामपंचायत , गावकरी , पालक , दानशूर व्यक्ती , कंपन्या यांकडून आर्थिक आणि वस्तुरूप मदत**


लोकसहभाग

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळगाव तर्फे महाळुंगे तालुका-आंबेगाव, जिल्हा- पुणे


| अनु. | प्रत्यक्ष लोकसहभाग | अंदाजे रक्कम | | प्रत्यक्ष उपयोग |
|---|---|---|---|---|
| १ | शाळा परिसरसुधार बांधकाम | ३ लाख | रुपये | शाळेच्या सुशोभीकरणात भर |
| २ | शालेय रंगीबेरंगी बांधकाम | ५ लाख | रुपये | उत्तम आरोग्य |
| ३ | मुलांसाठी बेंच | ८५००० | रुपये | आकर्षक बैठक व्यवस्था |
| ४ | बोलका खडांडा | ७०००० | रुपये | मुलांचा चांगला विकास |
| ५ | शालेय बाग | ६५००० | रुपये | गावातल योगासने सासाठी उपयुक्त |
| ६ | मुलांसाठी खेळांची मैदाने | ५५००० | रुपये | मुलांचा शारीरिक विकास |
| ७ | शुद्ध पेय जलसाठी RO फिल्टर | ३५००० | रुपये | उत्तम आरोग्य |
| ८ | इ लर्निंग संच | ३०००० | रुपये | शिक्षणात माहिती तंत्रज्ञाचा उपयोग |
| ९ | क्रीडा साहित्य व पुस्तके | २५००० | रुपये | शारीरिक व मैतुपिक विकासासाठी उपयुक्त |
| १० | कार्यालय नुतनीकरण | २५००० | रुपये | सुंदर कार्यालय |
| ११ | लेझीम व वाद्यसंच | २५००० | रुपये | क्रीडा शिक्षण |
| १२ | संगणक | १२५००० | रुपये | संगणक शिक्षण |
| १३ | सर्व मुलांसाठी शालेय साहित्य | २०००० | रुपये | गळती कमी करण्यासाठी उपयुक्त |
| १४ | शिवसृष्टी सभागृह निर्मिती | ५ लाख | रुपये | शालेय इतिहास विषय समजासाठी उपयोगी |
| १५ | गरीब मुलांसाठी शालेय साहित्य | १८००० | रुपये | गळती कमी करण्यासाठी उपयुक्त |
| १६ | इन्व्हर्टर सोलर साहित्य | १५००० | रुपये | मुलांचा सर्वांगीण विकास |
| १७ | सराव सिरिटम | २५००० | रुपये | परीपाठासाठी अतिशय उपयुक्त |
| १८ | प्रिंटर | १००००० | रुपये | वैज्ञानिक साहित्य निर्मिती |
| १९ | कपाटे १२ | ५५००० | रुपये | वैज्ञानिक साहित्य निर्मिती |
| २० | शालेय टेबल १२ नग | २४००० | रुपये | भौतिक सुविधा |






**आपण काय करू शकतो?**

1. **शाळेच्या विकासात सहभाग:** आपण या शाळेच्या विकासात सहभागी होऊ शकतो.
2. **विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्या:** आपल्या गावातील मुलांना शिकण्यासाठी प्रोत्साहित करा.
3. **शिक्षकांचे सहकार्य:** शिक्षकांना सहकार्य करा.
4. **समाजात जागरूकता निर्माण करा:** शिक्षणाचे महत्त्व समाजात पसरवा.




❑ जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा पिंपळगाव

तालुका – आंबेगाव

जिल्हा – पुणे


❑ गावाचे नाव – पिंपळगाव तर्फे महाळुंगे

❑ लोकसंख्या – ४९२४

❑ पटसंख्या – ५८२

❑ ग्रामीण भाग

तालुक्यातील गुणवत्तेच्या बाबतीत अग्रेसर असलेली शाळा गावची लोकसंख्या ४९२४ आहे. शाळा १ लि ते ५ वी पर्यंत असून पटसंख्या ५८१ आहे .शेजारील गावांतून विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी येतात . गावामार्फात ४ शालेय बस आहेत. त्यामार्फत वाहतूक व्यवस्था चालते .




**शाळेची विविध उपक्रम राबविल्यामुळे असलेली फलनिष्पत्ती -**

**शैक्षणिक उत्कृष्टता -**

सर्वांगीण शैक्षणिक गुणवत्ता शाळेने सतत A+ दर्जा राखला असून, शिष्यवृत्ती परीक्षेत 213 विद्यार्थी राज्य आणि जिल्हा पातळीवर यशस्वी झाले आहेत.तर नवोदय विद्यालयात 33 विद्यार्थी प्रवेश पात्र झालेले आहेत. सातारा सैनिकी विद्यालयात २ विद्यार्थी प्रवेश पात्र झालेले आहेत.शिष्यवृत्ती परीक्षेत आज तागायत 550 विद्यार्थी पात्र ठरलेले आहेत.

**विविध स्पर्धांमध्ये यश -**

लेझीम, विज्ञान प्रदर्शन, वक्तृत्व स्पर्धा,राष्ट्रीय स्तरावरील ICT मेला स्पर्धेत विद्यार्थ्यांचे प्रथम क्रमांकाने निवड झालेली आहे. अशा अनेक स्पर्धांमध्ये शाळेने उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

## राष्ट्रीय स्तरावरील CIET NCERT आयोजित ICT मेला स्पर्धेत इयत्ता २ री मधील विद्यार्थिनीस विशेष प्राविण्य गायन स्पर्धा



## शालेय क्रीडांगण लेझीम स्पर्धा प्राविण्य



**अतिरिक्त क्रियाकलाप: शिष्यवृत्ती परीक्षा व स्पर्धा परीक्षा उपक्रम -**

शैक्षणिक वर्ष 2006 पासून शाळेतील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी परंपरा सुरू झाली. सन 2006 पासून राज्य व जिल्हा गुणवत्ता यादीत आलेले विद्यार्थी 213 आहेत. त्याचप्रमाणे केंद्र शासनाच्या वतीने चालवले जाणारे केंद्रीय नवोदय विद्यालय, पिंपळे जगताप, ता.शिरूर या ठिकाणी 35 विद्यार्थी आजपर्यंत प्रवेशपात्र ठरलेले आहेत. तसेच केंद्रीय सैनिकी स्कूल, सातारा, पुणे व अहमदनगर या ठिकाणी विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे. या उपक्रमाची यशस्विता खालील बाबींवर असल्याचे दिसून येते.

**उपक्रम पद्धती :**

- महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने घेण्यात येणारी इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये 100% विद्यार्थ्यांना संधी दिली जाते.
- प्रत्येक विद्यार्थ्याला वैयक्तिक मार्गदर्शन व गट पद्धतीमध्ये मार्गदर्शन केले जाते.
- सुट्टीच्या दिवशीही जादा तास व अभ्यासिकेचे आयोजन केले जाते.
- विविध प्रकारच्या प्रश्न संचांचा मुबलक वापर केला जातो. दरवर्षी जवळपास 100 पेक्षा अधिक प्रश्नसंचांचा सराव विद्यार्थ्यांकडून करून घेतला जातो.
- या कामी पालकांचे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन व शिक्षकांना संपूर्ण सहकार्य केले जाते.
- वर्षभरात वेळोवेळी मुख्याध्यापकांचे व इतर शिक्षकांचे सदर वर्गाला मार्गदर्शन मिळते.
- या स्पर्धा परीक्षेसाठी सर्वच विद्यार्थ्यांना बसवून त्यांचा अध्ययन स्तर उंचावण्याचा प्रयत्न केला जातो.
- जीवनात स्पर्धा परीक्षेला सामोरे जाण्यासाठी पायाभूत तयारी या उपक्रमात होते.

**प्रोत्साहनपर बक्षिसे -**

- शासनाच्या वतीने दिली जाणारी सलग 3 वर्षे प्रत्येकी पाच हजार रुपये शिष्यवृत्ती प्रत्येक शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्याला मिळते.
- पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने प्रत्येक शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्याला सायकल भेट व राज्य यादीत आलेल्या विद्यार्थ्यांना किल्ल्याच्या ठिकाणी सहल घडवली जाते.
- शाळेच्या पालक व ग्रामस्थांच्या वतीने अनेक शिष्यवृत्ती मार्गदर्शक शिक्षकांना मोटारसायकल व लॅपटॉप अशी बक्षिसे मिळालेली आहेत.
- त्याचप्रमाणे शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना दरवर्षी शाळा व्यवस्थापन समिती,पालक व ग्रामस्थ यांचेकडून मनगटी घड्याळ, स्कूलबॅग, डायरी, कंपासपेटी यांसारख्या शैक्षणिक वस्तू बक्षिसे मिळतात.
- प्रत्येक वर्षी सर्व शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांची गावातून सवाद्य मिरवणूक ट्रॅक्टरमधून काढली जाते.
- अशा प्रकारे शाळेत सुरू केलेला स्पर्धा परीक्षा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरलेला आहे.

## गावामार्फात शिष्यवृत्ती मार्गदर्शक शिक्षकांना मोटारसायकल , laptop भेट






## गावामार्फात शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी शिक्षक यांचा सन्मान









**आजतागायत इयत्ता ५ वी चे 254 विद्यार्थी महाराष्ट्र शासन शिष्यवृत्ती पात्र आहेत . नवोदय विद्यालयात 26 विद्यार्थी प्रवेश पात्र आहेत, सातारा सैनिकी विद्यालय साठी 2 विद्यार्थ्यांची निवड झाली आहे .**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिपळगाव तर्फे महाळुंगे, तालुका - आंबेगाव, जिल्हा - पुणे.

५ वी शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी राज्य आणि जिल्हा यादी

| अ.क्र. | सन | शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी संख्या | परीक्षेस बसलेले | अनुपस्थित | पात्र | अपात्र | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2016-17 | 30 | 66 | 0 | 55 | 10 | 83.33% |
| 2 | 2017-18 | 40 | 111 | 0 | 88 | 23 | 79.27% |
| 3 | 2018-19 | 17 | 66 | 0 | 55 | 10 | 83.33% |
| 4 | 2019-20 | 27 | 83 | 0 | 70 | 13 | 84.34% |
| 5 | 2020-21 | 15 | 87 | 9 | 35 | 43 | 44.87% |
| 6 | 2021-22 | 24 | 88 | 2 | 62 | 24 | 72.09% |
| 7 | 2022-23 | 33 | 104 | 0 | 96 | 8 | 92.31% |
| एकूण | | 186 | 605 | 11 | 461 | 131 | 76.19% |

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिपळगाव तर्फे महाळुंगे, तालुका - आंबेगाव, जिल्हा - पुणे.

५ वी नवोदय पात्र विद्यार्थी संख्या

| अ.क्र. | सन | नवोदय पात्र विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| 1 | 2016-17 | 5 |
| 2 | 2017-18 | 4 |
| 3 | 2018-19 | 3 |
| 4 | 2019-20 | 7 |
| 5 | 2020-21 | 3 |
| 6 | 2021-22 | 0 |
| 7 | 2022-23 | 4 |
| एकूण | | 26 |






लोकमत

आत्तापर्यंत ११५ विद्यार्थी गुणवत्ता यादीत

आदर्श प्राथमिक शाळेचे २७ विद्यार्थी गुणवत्ता यादीत

## शाळेतील नाविन्यपूर्ण उपक्रम

आजच्या युगात शिक्षण हे केवळ पुस्तकांमध्ये मर्यादित राहिलेले नाही. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण प्रणालीत नवनवीन बदल होत आहेत. माझी शाळाही या बदलांच्या प्रवाहात सहभागी होऊन विद्यार्थ्यांना आधुनिक काळाच्या गरजेनुसार तयार करण्यासाठी प्रयत्नशील आहे.

## खालील नाविन्यपूर्ण उपक्रमांमध्ये माझी शाळा सक्रिय आहे:

1. **गेमिफिकेशन इन एज्युकेशन** - शिक्षणात गेमिफिकेशनचा वापर करून शिकणे हे अधिक मनोरंजक आणि प्रभावी बनवले आहे. खेळाच्या माध्यमातून विद्यार्थी विविध संकल्पना सहज समजून घेतात.
2. **प्रोजेक्ट बेस्ड लर्निंग** - विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे संशोधन करण्याची आणि प्रकल्प तयार करण्याची संधी देऊन त्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन दिले जाते. यामुळे त्यांच्यात समस्या सोडवण्याची क्षमता वाढते.
3. **लेट द गार्डन ऑफ लँग्वेजेस ब्लूम** - विद्यार्थ्यांमध्ये भाषा शिकण्याची आवड निर्माण करण्यासाठी विविध भाषांचे उद्यान तयार केले आहे. यामुळे विद्यार्थी नैसर्गिक पद्धतीने भाषा शिकू शकतात.
4. **माय FLIP क्लासरूम** - या पद्धतीत विद्यार्थी घरच्या वातावरणात नवीन विषयवस्तु शिकतात आणि शाळेत त्यावर आधारित चर्चा आणि प्रश्नोत्तरे करतात. यामुळे शाळेत अधिक वेळ शंका निरसन आणि व्यावहारिक अनुभव घेण्यासाठी मिळतो.
5. **क्लायमेट ॲक्शन प्रोजेक्ट** - जागतिक तापमान वाढ आणि पर्यावरणाच्या समस्यांबद्दल विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध पर्यावरणीय प्रकल्प राबवले जातात.
6. **ग्रीन प्लॅनेट** - शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करून आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाची जागरूकता निर्माण केली जाते.




7. **नो मोर हंगर** - भूकबळीमुक्त समाज निर्माण करण्याच्या उद्देशाने विद्यार्थ्यांना भोजन वाटप, अन्नदान इत्यादी कार्यक्रमांमध्ये सहभागी केले जाते.
8. **प्लास्टिक ब्रिज प्रोजेक्ट**-प्लास्टिक प्रदूषणाच्या समस्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी प्लास्टिक कचऱ्यापासून पुलाचे मॉडेल तयार करण्याचा प्रकल्प राबवला जातो.
9. **गो ग्रीन**-शाळेच्या परिसराला हिरवेगार करण्यासाठी विद्यार्थ्यांना स्वतःच्या हाताने रोपे लावण्यास प्रोत्साहित केले जाते.




10. **वेलकम टू द स्कूल**-शाळेच्या वातावरणात सकारात्मकता आणण्यासाठी विद्यार्थ्यांना शाळेत येण्यासाठी प्रोत्साहित करण्याचे विविध उपक्रम राबवले जातात.
11. **लर्निंग विथ लॉकडाउन**- कोरोना महामारीच्या काळात ऑनलाइन शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान भरून काढण्याचा प्रयत्न केला गेला.
12. **डान्स विथ मी** - विद्यार्थ्यांच्या शारीरिक आणि मानसिक विकासासाठी नृत्य आणि खेळांना प्रोत्साहन दिले जाते.

13. **स्कायप इन द क्लासरूम** - अंतराष्ट्रीय स्तरावरील शाळांशी संपर्क साधून विद्यार्थ्यांमध्ये वैश्विक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी स्कायपचा वापर केला जातो.

**Cultural Exchange Programme**




14. **वुमेन्स डे** - महिला दिनाच्या निमित्ताने महिलांच्या योगदानाचे महत्व समजावून सांगण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित केले जातात.

**याशिवाय, शाळेत विविध कला, संगीत, क्रीडा आणि सामाजिक कार्यक्रम आयोजित करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले जातात.अशा प्रकारे माझी शाळा विद्यार्थ्यांना एक चांगला नागरिक बनवण्यासाठी प्रयत्नशील आहे. हे सर्व उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानार्जन, कौशल्य विकास आणि मूल्यवान गुणांची जोपासना करण्यास मदत करतात.**

**STEM education Students Project**



**शिक्षकांची भूमिका :**

या शाळेतील शिक्षक केवळ ज्ञान देणारे नव्हे तर विद्यार्थ्यांचे सुलभक आहेत. ते विद्यार्थ्यांना शिकण्याची उत्सुकता निर्माण करतात आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील असतात. शिक्षक

विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, चरित्र निर्माण करण्यास मदत करतात आणि त्यांना एक चांगला नागरिक बनण्यासाठी प्रेरित करतात.

**पालकांचे सहकार्य :**

पालक या शाळेच्या यशात महत्त्वाची भूमिका बजावतात. ते शाळेच्या कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतात आणि आपल्या मुलांच्या शिक्षणात खूप रस घेतात. पालक आणि शिक्षक यांच्यातील समन्वय या शाळेच्या यशासाठी एक महत्त्वाचा घटक आहे.

**"पिंपळगाव तर्फे महाळुंगेची जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा: लोकसहभागाचा अद्भुत नमुना"**

1. शाळेसाठी गावकरी मोठ्या प्रमाणात सहभाग देतात शाळेसाठी भरीव प्रकारे आर्थिक , वस्तुरूप मदत केली जाते. पिंपळगाव तर्फे महाळुंगे गावात मंचर सारख्या मोठ्या शहरातून ५ शाळा बस भरून मुले शिक्षणासाठी येतात.त्याचप्रमाणे अवसरी , चांडोली , घोडेगाव , खडकी या शेजारील गावातून मुले शिक्षणासाठी ये जा करतात. गावकरी , पालक , ग्रामपंचायत , शाळा व्यवस्थापन समिती यांमार्फत शाळेसाठी संगणक कक्ष , तृष्णाई water प्लांट , शालेय परिपाठ सभागृह , शालेय स्पर्धा परीक्षा सभागृह , वर्गखोल्या , शालेय बाग , शालेय कर्मचारी (संगणक शिक्षक , मदतनीस , शिक्षक ) सोलर प्लांट , किरकोळ बांधकाम , शालेय आवार , शाळा प्रवेशद्वार , बेंच , TV , झेरोक्स मशीन , 30 संगणक , २ प्रोजेक्टर , आर्थिक स्वरूपातील विद्यार्थी बक्षीस योजना , शिष्यवृत्ती सायकल योजना या प्रकारच्या असंख्य सोई सुविधा लोकसहभाग आणि लोक उठवतून केवळ आणि केवळ ग्रामस्थांच्या आणि पालकांच्या सहकार्याने उभ्या राहिल्या आहेत.
2. शाळेची भौतिक सुविधा: शालेय आवारात १७ वर्गखोल्या असून दुमजली रंगरंगोटी केलेली अशी भव्य इमारत डौलाने उभी आहे.




नवीन पद्धतींचा अवलंब: कोरोना काळात प्रत्यक्ष वर्गात बसून घेतले जाणारे शिक्षण ते ऑनलाइन शिक्षण हा एवढा मोठा बदल सगळ्यांनी अनेक अडचणीसहित स्वीकारला. कोरोना काळात शिक्षणव्यवस्थेची

मोडलेली घडी पुन्हा अद्यावत पध्दतीने बदल करून बसवण्याचा प्रयत्न सर्वांनी केला. कोरोना संकटाला संधी मानून वर्गातले आणि ऑनलाइन अश्या दोन्ही प्रकारच्या शिक्षणाचा समन्वय साधून सर्वांनी संमिश्र शिक्षण पद्धती अवलंबली. कदाचित हे लवकर झाल नसतं पण कोरोना मुळे हे घडून येत आहे. हे किती सकारात्मक आहे. कोरोना काळात जे ऑनलाइन शिक्षण दिलं त्यासाठी मागील अनेक वर्षे आपण वेगवेगळ्या स्तरावर काम करत आहोत, नाविन्यपूर्ण प्रयोग करत आहोत. तेच प्रयोग ,काही ऑनलाइन पद्धती आपण उस्फुर्तपणे कोरोना काळात राबविल्या.




आता मात्र आपल्याला मुलांना पालकांना या आभासी काळातून बाहेर काढून २१ व्या शतकातील शिक्षण हे सर्जनशीलता चिकित्सक विचार सहयोग सहकाऱ्यांनी संप्रेषण संवाद यावर भर देणारे आहे. माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्रचंड प्रगती झाल्यामुळे घरबसल्या विद्यार्थ्यांना खूप माहिती सहजगत्या उपलब्ध होते विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास होण्यासाठी परिणामकारक अध्ययन करण्याची गरज आहे आणि यासाठी अनेक कार्यनिती शिक्षकांनी वापरल्या पाहिजेत एकदा एखादा विशिष्ट किंवा क्लिष्ट अवघड विषय विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी शिक्षकाला विविध तंत्रे व कौशल्ये यांचे ज्ञान असावे २१ व्या शतकातील कौशल्येही माहितीची देवाण-घेवाण करण्यासाठी आणि योग्य मार्गाने वापरण्यावर अधिक भर देतात शिक्षकाला सुविधा दाता आणि अध्ययनासाठी प्रेरणा देणारा म्हणून विद्यार्थ्यांना कार्यतत्पर व सक्षम करावे बदलत्या काळानुरूप शिक्षकाने आपली भूमिकाही बदलावी त्यासाठी या वर्षीची आपण शाळापूर्व तयारी कशी करू शकतो याचा काही याच्या संदर्भात आपण काय तयारी करू शकतो.

**नवीन प्रवेश-**

- सध्या एप्रिल मध्ये सुट्टीच्या कालावधी आम्ही आमच्या गावातील दाखलपात्र मुलांची यादी तयार करून अंगणवाडी सेविका मदतनीस आणि पालकांसोबत संपर्क साधला. बाहेरून येणाऱ्या मुलांची यादी नोंदवून त्यांचा WhatsApp गट तयार करून गुगल Forms चा वापर करून लिंक पाठवून सर्व माहिती गोळा केली. माहिती गोळा करते वेळी पालकांना सूचना या काळजीपूर्वक दिल्या आणि खूपच सुटसुटीतपणे Excel sheet द्वारे १ ली चे प्रवेश फॉम तयार केले. आता जून मध्ये पालकांना

वेळापत्रकाप्रमाणे बोलावून कागदपत्रांची सत्यता तपासून विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित होतील. त्यासोबतच त्यांना इतर माहिती म्हणजे विद्यार्थ्यांचे आधार कार्ड,फोटो यासंदर्भातील सूचना सुद्धा देण्यात येतील ही तयारी झाली नवीन प्रवेशाची शाळा ही १ ली ते ५ वी असल्यामुळे इतर इयत्तांचे देखील प्रवेश होतात त्यानुसार त्यांची सुद्धा प्रक्रिया पूर्ण केली. आता इतर वर्गातील विद्यार्थ्यांचे नियोजन आपण कसे कराल.

- पाठ्यक्रम – जुन्या पुस्तकांचे व्यवस्थित वर्गीकरण व ती पुस्तके शाळा सुरू झाल्यावर विद्यार्थ्यांना नवीन पुस्तके मिळेपर्यंत उपलब्ध करून देणे, त्याचप्रमाणे वेळापत्रकाचे नियोजन करणे,पालकांशी संपर्क साधून विद्यार्थ्यांच्या येण्याजाण्याच्या सुरक्षिततेबाबत व आरोग्यविषयक चौकशी करणे या संदर्भातील नियमावली तयार केली विद्यार्थ्यांपर्यंत व्हाट्सअप द्वारे माहिती पोहोचविली. कोविड नंतर चे या वर्षाचे हे शैक्षणिक वर्ष आता नव्याने सुरू होत आहे व पूर्वीसारखे सुरू होत आहे पण या दोन वर्षाच्या आभासी online काळामुळे विद्यार्थ्यांमध्ये भरपूर प्रमाणात बदल झालेले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सामाजिक भावनिक शिक्षणावर भर देणे गरजेचे आहे. त्यानुसार वेगवेगळे मनोरंजक खेळांचे नियोजन पाठ्यक्रमाशी संबंधित असलेले वेगवेगळे खेळ याची पूर्वतयारी अगोदरच करून घेणे गरजेचे आहे.
- वर्षभरातील उपक्रम - आपण आपल्या इयत्तेनुसार वर्षभरात कोणकोणते नवीन उपक्रम राबवू या याची यादी तयार करणे. जसं की या वर्षात आम्ही वृक्षारोपण ,झाडे लावा झाडे जगवा, निसर्ग आपला मित्र, चित्रकला, गाणे म्हणू या, खेळ खेळूया, आपल्या परसबागेत असे वेगवेगळे उपक्रम मी माझ्या वर्गाचे घेणार आहे त्यानुसार प्रत्येक महिन्यात वाईज स्वतःचे असे वेळापत्रक तयार करावे.
- सोशल इमोशनल लर्निंग (SEL) - सोशल इमोशनल लर्निंग (SEL) ही एक पद्धत आहे जी सर्व वयोगटातील विद्यार्थ्यांना त्यांच्या भावना चांगल्या प्रकारे समजून घेण्यास, त्या भावना पूर्णपणे अनुभवण्यास आणि इतरांबद्दल सहानुभूती प्रदर्शित करण्यास मदत करते.

## v) हात स्वच्छ धुवण्याचे योग्य पद्धतीचे प्रात्यक्षिक व त्यासाठीची सुविधा







ii) स्वयंरोजगार व्यवसाय, व्यापार, उद्योग अशा क्षेत्रात भविष्यात करीअर घडविण्यासाठी विशिष्ट कौशल्यावर आधारित व्यवसाय शिक्षणाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यासाठी तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन पर व्याख्यान- यात अशा अभ्यासक्रमांची ओळख, शिक्षण देणाऱ्या संबंधित संस्था, प्रवेश प्रक्रिया, भविष्यातील संधी इत्यादीबाबतची माहिती असावी



i) तंबाखू मुक्त शाळा :- शाळेपासून किमान २०० मीटर अंतरावर तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीस बंदी







## पालक SMC सभा ठराव








- Art activities...
- Practical tasks....
- Mindfulness activities....
- Goal-setting activities....
- Reading books....
- Icebreaker activities...
- watching Educational Movies, singing, painting, crocheting, learning about arts and craft, traveling and sightseeing, and bird watching.
- पालक संवाद - विद्यार्थ्यांच्या इयत्तेला अनुसरून पालक संवाद शिक्षण प्रक्रियेमध्ये पालक हा खूप महत्त्वाचा घटक आहे सध्याच्या कोविडच्या काळामध्ये आरोग्यविषयक सर्व ज्या काही समस्या सर्वांना भेडसावत आहे त्यानुसार विद्यार्थ्यांची चौकशी करणे गरजेचे असते त्यामुळे सुट्टीच्या काळात देखील पालक संवाद साधणे खूप गरजेचे आहे जेणेकरून विद्यार्थी व पालक आणि शिक्षक यांचा समतोल राहून शिक्षण पद्धती ही व्यवस्थित पणे सुधारते जे विद्यार्थी वारंवार गैरहजर असतात त्या पालकांना आपण संवाद साधून शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे काम करू शकतो जे विद्यार्थी अभ्यासात मागे आहेत किंवा ज्यांनी ऑनलाईन अभ्यास पूर्ण केला नाही व नंतरच्या काळात शाळेत आले असे विद्यार्थी देखील शिक्षण प्रवाहापासून मागे आहेत त्यांना वेगवेगळे उपक्रम देऊन पालकांच्या मदतीने त्यांना मुलभूत कौशल्य कसे प्राप्त होतील याबाबतीत मार्गदर्शन करता येईल

**संदर्भ साहित्य -**

पुढील वर्षभरात आपण कोण कोणते संदर्भसाहित्य वापरणार आहोत किंवा आपण कोण कोणते वेगवेगळ्या प्रकारचे वाचन साहित्य विद्यार्थ्यांसाठी वापरणार आहोत याची तयारी आपण आत्ता सुट्टी च्या काळामध्ये म्हणजेच शाळा पूर्वतयारीमध्ये करू शकतो उदाहरणार्थ वेगवेगळी गोष्टीची पुस्तके, मासिके विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार आपण साहित्याची जमवाजमव करू शकतो. सध्या आपण ऑनलाइन च्या मदतीने सुद्धा वेगवेगळ्या प्रकारे स्मार्ट टीव्ही वरून विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण करू शकतो त्यासाठी

आपल्याकडे ते संदर्भसाहित्य असणे गरजेचे आहे तर आपण यांची जमवाजमव ऑनलाइनच्या माध्यमातून नक्कीच करू शकतो.

- वर्षभरातील कामाचे वेळापत्रक - पुढील शैक्षणिक वर्षात आपण जर वेळापत्रकानुसार गेलो होतो तर आपले सर्व उपक्रम, सर्व परीक्षा आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होईल या दृष्टिकोनातून केलेले सर्व प्रयत्न यासाठी आपण एक वेळापत्रक आखणे गरजेचे आहे म्हणजेच आपला पाठ्यक्रम ,उपक्रम परीक्षा आणि इतर कार्यक्रम हे वेगवेगळ्या प्रकारे आपण दिलेल्या वेळेत पूर्ण करू शकतो.
- **शिक्षकांना पुरस्कार:** राष्ट्रीय ICT पुरस्कार २०१९ , राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२३ , जिल्हास्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार, जिल्हास्तरीय शिष्यवृत्ती मार्गदर्शक पुरस्कार, तालुकास्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार असे अनेक पुरस्कार शाळेतील शिक्षकांना मिळाले आहेत.
- सरकारी मान्यता: 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' या स्पर्धेत जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांक, जिल्हा परिषद अध्यक्ष चषक, साने गुरुजी स्वच्छ व सुंदर शाळा पुरस्कार असे अनेक पुरस्कार शाळेला मिळाले आहेत.आयएसओ मानांकन प्राप्त A+ शाळा आहे.




**शालेय पुरस्कार -**

1. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत साने गुरुजी- स्वच्छ व सुंदर शाळा स्पर्धेत प्रथम क्रमांक व 50000/- रू. बक्षीस.(2010)

2. जिल्हा परिषद अध्यक्ष चषक पुरस्कार (2015)

3. आयएसओ मानांकन प्राप्त शाळा (2015)

4. यशवंतराव चव्हाण कला क्रीडा महोत्सव अंतर्गत मुले (लहान गट)लेझीम स्पर्धा-जिल्हा पातळीवरील द्वितीय क्रमांक (2018)

5. मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा स्पर्धेअंतर्गत जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांक.750000/- रू.बक्षीस.(2023)

6. यशवंतराव चव्हाण कला- क्रीडा महोत्सव अंतर्गत सातत्याने विविध प्रकारात केंद्र, बीट,तालुका स्तरावर क्रमांक.

**शालेय शिक्षक पुरस्कार -**

1.मृणाल नंदकिशोर गांजाळे - राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार 2023

-राष्ट्रीय ICT पुरस्कार 2019

-राष्ट्रीय आयसीटी मेला NCERT ciet winner 2022

-राष्ट्रीय आयसीटी मेला NCERT ciet winner 2023

-सावित्रीमाई फुले राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार 2021-22

-शरद पवार इन्स्पायर फेलोशिप 2022

-जानेवारी 2022 मायक्रोसॉफ्टचे सीईओ सत्या नाडेला तर्फे दिल्लीत सन्मान

-जिल्हा स्तर शिष्यवृत्ती तज्ञ मार्गदर्शक पुरस्कार 2019

-मायक्रोसॉफ्ट एज्युकेशन एक्सचेंज सिडनी ऑस्ट्रेलिया 2020 परिषद निवड.

2. मच्छिंद्र श्रीरंग चासकर - जिल्हा गुणवंत शिक्षक पुरस्कार 2023

3. आरती ज्ञानेश्वर निमोणकर - जिल्हा गुणवंत शिक्षक पुरस्कार 2022, जिल्हा शिष्यवृत्ती पुरस्कार 2023

4. सचिन तुकाराम पालेकर - तालुका गुणवंत शिक्षक पुरस्कार 2024, जिल्हा शिष्यवृत्ती पुरस्कार 2019, 2024

5. शशिकांत दत्तात्रय थोरात - तालुका गुणवंत शिक्षक पुरस्कार 2011, जिल्हा शिष्यवृत्ती पुरस्कार 2012, 2020

6. सुधीर सिताराम चिखले - जिल्हा शिष्यवृत्ती पुरस्कार 2018, 2023

7. सुनील सोपान वाघ - जिल्हा शिष्यवृत्ती पुरस्कार 2021

8. माणिक सोपान बाजारे - जिल्हा शिष्यवृत्ती पुरस्कार 2024

9. मोनिका शशिकांत थोरात - जिल्हा शिष्यवृत्ती पुरस्कार 2022

10. अनिता संतोष पोखरकर - जिल्हा शिष्यवृत्ती पुरस्कार 2022

11. रोहिणी पांडुरंग लोंढे - जिल्हा शिष्यवृत्ती पुरस्कार 2022

12. वैशाली रोहिदास इंदोरे - जिल्हा शिष्यवृत्ती पुरस्कार 2023

अशा रीतीने शालेय सर्वांगीण विकासामध्ये शाळा व्यवस्थापन समिती,मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांचा वाटा आहे.




**समारोप -**

"Education is not the learning of facts, but the training of the mind to think" 'आकलनासह शिक्षण' हे ब्रीद (विविध) स्पर्धा परीक्षा सारख्या उपक्रमातून जपून त्याच्या सोबतीला विविध सहशालेय उपक्रम राबवून शाळेने यशाचा आलेख उचावत ठेवला आहे. विद्यार्थी, शिक्षक, पालक समाज, विविध संस्था , गाव यांच्या लोकसहभागातून एकेकाळी कुलूप ठोकून बंद करणारी होणारी प्रवेश शाळा ते विदयार्थी प्रतिक्षा यादी असणारी शाळा एव्हढा शाळेचा नावलौकीक झाला आहे. सार्धा परक्षिप्रमाणेच प्रत्येक विद्याथ्यांतील उत्कृष्ठ शोधून त्यास गती देऊन भावी संवेदनशील, विचारशील , उत्सुक , आनंदी जीवन जगणारे नागरिक तयार व्हावेत असा मानस.

- **आकलनासह शिक्षणावर भर:** आपली शाळा केवळ परीक्षेच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना तयार करत नाही, तर त्यांना स्वतंत्रपणे विचार करण्यास आणि समजून घेण्यास प्रोत्साहित करते.
- **विविध सहशालेय उपक्रम:** शाळेतील विविध उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास मदत करतात.
- **लोकसहभाग:** विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि समाजातील इतर सदस्यांचा सक्रिय सहभाग शाळेच्या वाढीला चालना देतो.
- **प्रवेशासाठी प्रतिक्षा यादी:** ही बाब शाळेच्या लोकप्रियतेचे आणि गुणवत्तेचे द्योतक आहे.
- **निष्कर्ष:** पिंपळगाव तर्फे महाळुंगेची जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा ही केवळ एक शाळा नाही, तर एक आदर्श मॉडेल आहे. ही शाळा ग्रामीण भागातील शिक्षणाचे एक उज्ज्वल उदाहरण आहे. या शाळेची यशोगाथा आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. आपल्या सर्वांच्या सहकार्याने आपण या शाळेला अधिक मजबूत बनवू शकतो.

| अ. क्र | शिक्षकाचे नाव | पद | एकूण सेवा | नोकरी सुरुवात शैक्षणिक व्यावसायिक आर्हता | आज असलेली शैक्षणिक व्यावसायिक आर्हता | विशेष प्राविण्य पुरस्कार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सौ. अश्विनी मेंगडे | मुख्याध्यापक | 28 वर्ष | HSC D.ED | MA D.ED | जिल्हा आदर्श शिष्यवृत्ती शिक्षक |
| २ | श्री. मच्छिंद्र चासकर | उपशिक्षक | 27 वर्ष | HSC D.ED | MA EDU. M.ED | जिल्हा आदर्श शिक्षक |
| ३ | श्री. सुधीर चिखले | उपशिक्षक | 27 वर्ष | HSC D.ED | MA D.ED | जिल्हा आदर्श शिष्यवृत्ती शिक्षक |
| ४ | श्री.शशिकांत थोरात | उपशिक्षक | 26 वर्ष | HSC D.ED | MA D.ED | जिल्हा आदर्श शिष्यवृत्ती शिक्षक |
| ५ | श्री.सुनिल वाघ | उपशिक्षक | 23 वर्ष | HSC D.ED | MA D.ED | जिल्हा आदर्श शिष्यवृत्ती शिक्षक |
| ६ | सौ. मोनिका थोरात | उपशिक्षक | 22 वर्ष | B.A. D.ED | MA D.ED | जिल्हा आदर्श शिष्यवृत्ती शिक्षक |
| ७ | श्री. माणिक बाजारे | उपशिक्षक | 20 वर्ष | HSC D.ED | MA D.ED | जिल्हा आदर्श शिष्यवृत्ती शिक्षक |
| ८ | श्री. वैशाली इंदोरे | उपशिक्षक | 20 वर्ष | HSC D.ED | MA D.ED | जिल्हा आदर्श शिष्यवृत्ती शिक्षक |
| ९ | श्री. सचिन पालेकर | उपशिक्षक | 19 वर्ष | HSC D.ED | MA D.ED | जिल्हा आदर्श शिष्यवृत्ती शिक्षक |
| १० | सौ. अनिता पोखरकर | उपशिक्षक | 19 वर्ष | HSC D.ED | MA D.ED | जिल्हा आदर्श शिष्यवृत्ती शिक्षक |
| ११ | सौ.आरती निमोणकर | उपशिक्षक | 19 वर्ष | HSC D.ED | MA D.ED | जिल्हा आदर्श शिक्षक ,जिल्हा आदर्श शिष्यवृत्ती शिक्षक |
| १२ | श्रीमती रोहिणी लोंढे | उपशिक्षक | 17 वर्ष | HSC D.ED | MA D.ED | जिल्हा आदर्श शिष्यवृत्ती शिक्षक |
| १३ | श्रीमती मृणाल गांजाळे | उपशिक्षक | 15 वर्ष | HSC D.ED | MA EDU. D.ED | राष्ट्रीय,राष्ट्रीय ICT ,राज्य ,जिल्हा शिक्षक पुरस्कार |




## शाळेतील सर्व गुरुवर्य



----------**----------

## गुणवंत विद्यार्थी घडविण्याचा ध्यास, त्यातून उज्वल यशाचा प्रेरणादायी प्रवास

**शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाबळेवाडी,मु. वाबळेवाडी पो. शिक्रापूर, ता.शिरूर, जि.पुणे**

**शाळेचा ईमेल आयडी** - zppswablewadi80@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.विजय चंदरराव गोडसे
**मोबाईल क्रमांक** - ९३७०६६०३८३
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - vcgodase72@gmail.com




**फेब्रुवारी २०२४ मध्ये झालेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत (५वी व ८वी) गुणवत्ता यादीत आलेले एकूण ६७ विद्यार्थी...**

**प्रस्तावना व स्वरूप -**

ग्रामीण भागात काम करत असताना बहुतांश वेळा शिक्षणाच्या अभावामुळे गणित, इंग्रजी व बुद्धिमत्ता अशा विषयांच्या तयारीसाठी पालकांचा अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. अशा वेळी मुलांना शिकण्यासाठी आत्मनिर्भर करणे गरजेचे होते.

ग्रामीण भागातील बहुसंख्य विद्यार्थी हे जिल्हा परिषद व अनुदानित शाळांमधून शिक्षण घेतात. त्यांना शिक्षणास प्रोत्साहन मिळावे यासाठी शिष्यवृत्ती परीक्षा, जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा, एन. एम. एम. एस. परीक्षा, अशा विविध शासकीय परीक्षांचे आयोजन केले जाते. या परीक्षांची पूर्वतयारी व्हावी आणि या परीक्षेतील त्यांची संपादणूक वाढावी यासाठी हा उपक्रम घेतला.

शिष्यवृत्ती परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या जीवनातील पहिली स्पर्धा परीक्षा. भावी जीवनातील स्पर्धा परीक्षांचा पाया भक्कम करण्यासाठी, मुलांमध्ये परीक्षेविषयी जागृती निर्माण करण्यासाठी, आर्थिक दृष्ट्या दुर्बल गटातील विद्यार्थ्यांच्या प्रज्ञेचा शोध घेऊन तिचे संवर्धन करण्यासाठी आणि गरजू व हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळवून देण्यासाठी शालेय स्तरावर या स्पर्धा परीक्षांची तयारी होणे अत्यंत गरजेचे असते.

पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी) – या दोन्हीही परीक्षा साधारणपणे फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या रविवारी घेतल्या जातात. पाचवीसाठी इयत्ता १ली ते ५वीचा अभ्यासक्रम व इ. ८वी साठी इयत्ता १ ली ते ८ वीचा अभ्यासक्रम परीक्षा परिषदेने यासाठी निश्चित केला आहे. या अभ्यासक्रमावर आधारित बहुपर्यायी प्रश्न या परीक्षेमध्ये विचारले जातात. दीड तासाचे दोन पेपर असतात.

**पेपर १ - मराठी (५० गुण) व गणित (१०० गुण) एकूण गुण १५०.**

**पेपर २ - इंग्रजी (५० गुण) बुद्धिमत्ता चाचणी (१०० गुण) एकूण गुण १५०**

**NMMS** - ही सरकारी आणि अनुदानित शाळांमध्ये शिकत असलेल्या 8वीच्या आर्थिक दुर्बल विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धात्मक शिष्यवृत्ती परीक्षा आहे. NMMS अभ्यासक्रमात SAT आणि MAT असे दोन विभाग आहेत. NMMS MAT अभ्यासक्रमात तर्क प्रश्न समाविष्ट आहेत. तर NMMS SAT अभ्यासक्रमात सामाजिक विज्ञान, विज्ञान आणि गणिताचा समावेश आहे. पालकांचे वार्षिक साडेतीन लाख रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या आणि अनुदानित शाळेत शिकणाऱ्या आठवीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेअंतर्गत गुणवत्तेच्या आधारे शिष्यवृत्ती दिली जाते. शिष्यवृत्तीप्राप्त विद्यार्थ्यांना चार वर्षात ६०००० रुपये शिष्यवृत्तीची रक्कम दिली जाते. ही परीक्षा साधारणत: डिसेंबर महिन्यामध्ये होते.

**सारथी शिष्यवृत्ती** – NMMS ही परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व केंद्र शासनाची शिष्यवृत्ती अपात्र असलेल्या मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा या लक्षित गटातील अर्ज केलेल्या पात्र विद्यार्थ्यांना छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती पात्र समजण्यात येते. चार वर्षात 38 हजार 400 रुपये शिष्यवृत्ती या विद्यार्थ्यांना मिळते.

**नवोदय प्रवेश परीक्षा** - एकूण 80 वस्तुनिष्ठ प्रश्न असतात आणि त्यात एकूण 100 गुण असतात. मानसिक क्षमता, अंकगणित चाचणी आणि भाषा चाचणी हे तीन विभाग आहेत. ही परीक्षा साधारणत: जानेवारी महिन्यामध्ये होते.

**SOF (Science Olympiad Foundation)** - यांचेद्वारे ऑलिम्पियाड परीक्षा घेतली जात असते. इंटरनॅशनल इंग्लिश ऑलिम्पियाड (IEO), नॅशनल सायन्स ऑलिम्पियाड (NSO) इंटरनॅशनल मॅथेमॅटिक्स ऑलिम्पियाड (IMO) या परीक्षेला १ली ते ८ वीपर्यंतची मुले बसवली जातात. ही परीक्षा डिसेंबर मध्ये घेतली जाते.

**गणित प्राविण्य परीक्षा** - प्रज्ञा पूर्व तयारी म्हणून महाराष्ट्र गणित अध्यापक महामंडळ इ. ५ वी व इ. ८ वी च्या दरवर्षी डिसेंबरच्या पहिल्या रविवारी गणित प्राविण्य परीक्षा घेते. ही परीक्षा १०० गुणांची असून वेळ तीन तास असतो. या परीक्षेत विद्यार्थ्याला सुप्त गुण प्रकट करण्यास भरपूर वाढ असतो. कोणत्याही पद्धतीने (रीतीने) उदाहरणे सोडविता येतात.विचार करण्याचे व तो मांडण्याचे कौशल्य अजमावता येते.

**गणित प्रज्ञा परीक्षा** - गणित प्राविण्य परीक्षेतून प्रज्ञा स्पर्धेसाठी पात्र ठरलेले दोन्ही इयत्तांचे विद्यार्थी या स्पर्धेसाठी पात्र असतात. ही स्पर्धा फेब्रुवारीच्या पहिल्या रविवारी सर्व महाराष्ट्रातील केंद्रांवर एकाच वेळी घेण्यात येते.

विद्यार्थ्यांना शिक्षणात आनंद निर्माण व्हावा, यासाठी विविध प्रकारचे उपक्रम शाळेमध्ये राबवले जातात. त्यामध्ये विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा याकडे प्रामुख्याने लक्ष दिले जाते. आनंददायी शिक्षणासाठी राबवले गेलेले उपक्रम विविध अंगी असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या 6C विकसनासाठी देखील या उपक्रमांचा नक्कीच उपयोग होत आहे.

विद्यार्थ्यांना शिकण्यात आनंद निर्माण व्हावा यासाठी शाळेमध्ये विविध उपक्रम राबवले आहेत. त्यामध्ये आनंददायी शनिवार, विविध सांस्कृतिक स्पर्धा, क्रीडा संबंधित उपक्रम, व्याख्याने, कवी आपल्या भेटीला यासारखे उपक्रम शैक्षणिक वर्ष २०२४- २५ मध्ये राबवले आहेत.

**विषयासंदर्भात आलेल्या अडचणी -**

**I) गुणवत्तेशी संबंधित हा उपक्रम असल्यामुळे नियमित उपस्थिती व तयारी यासंबंधी काही अडचणी आल्या त्या पुढील प्रमाणे**

१. विद्यार्थ्यांच्या विशेष तयारीसाठी निर्धारित शालेय वेळेपेक्षा जास्त वेळ देण्याची गरज.

२. मुलांची शब्द संपत्ती आवश्यकतेपेक्षा कमी असल्याने ती वाढवण्याची गरज

३. अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर सरावासाठी विविध प्रश्नसंच यांची आवश्यकता.

४. स्पर्धा परीक्षांचे सखोल व अतिरिक्त मार्गदर्शन

५. एन. एम. एम. एस. परीक्षेबाबत पालकांमध्ये जागृती

६. ऑलिम्पियाड साठी माध्यमाची समस्या..

७. मुलांची एकाग्रता व सातत्य टिकवून ठेवण्याचे आव्हान

**II) आनंददायी शिक्षणासाठी उपक्रम राबवत असताना काही अडचणींचा सामना करावा लागला त्या पुढील प्रमाणे**

1) विद्यार्थी संख्या
2) वेळेची मर्यादा
3) आवश्यक साधनसामग्री

**समस्या दूर करण्यासाठी शिक्षकांनी केलेल्या उपाययोजना...**

**विद्यार्थ्यांच्या विशेष तयारीसाठी निर्धारित शालेय वेळेपेक्षा जास्त वेळ देण्याची गरज -** वरील परीक्षा डिसेंबर,जानेवारी किंवा फेब्रुवारी या कालावधीत असल्यामुळे वार्षिक नियोजनाप्रमाणे न जाता, अभ्यासक्रम परीक्षेच्या पुरेसा आधी पूर्ण करून सरावाची गरज असते. त्यासाठी मुलांना शालेय वेळेव्यतिरिक्त अध्यापनासाठी जास्त वेळ देणे गरजेचे असते. मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली जादा तासाचे वेळापत्रक तयार करून सर्व शिक्षकांनी ते काटेकोरपणे राबविले. शाळा सुरू होण्याच्या आधी दोन तास व शाळा सुटल्यानंतर एक तास तसेच सुट्टीच्या दिवशी जादा तास घेऊन ही समस्या यशस्वीपणे दूर करण्यात आली. वेळेवर अभ्यासक्रम पूर्ण करून परीक्षेच्या आधी विद्यार्थ्यांचा पुरेसा सराव घेण्यात आला.

**मुलांची शब्द संपत्ती आवश्यकतेपेक्षा कमी असल्याने ती वाढवण्याची गरज** - अवांतर वाचनासाठी पुस्तके उपलब्ध करण्यात आली . दररोज दोन वर्तमानपत्र शाळेत सुरू करण्यात आली. अवांतर वाचनासाठी खास वेळ देण्यात आला.

**अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर सरावासाठी विविध प्रश्नसंच यांची आवश्यकता** - विविध प्रकारच्या प्रश्न प्रकारांचा विद्यार्थ्यांना सराव व्हावा म्हणून अनेक प्रकाशनांचे सराव संच उपलब्ध करण्यासाठी मुख्याध्यापकांच्या पूर्व परवानगीने पालकांच्या मदतीने सराव संच उपलब्ध करण्यात आले. इयत्ता आठवीच्या वर्ग शिक्षिका सौ. जयश्री सुनिल पलांडे यांनी सुमारे १०००० रुपये किमतीचे अचूकवेध प्रकाशनाचे संच आठवीच्या मुलांना उपलब्ध करून दिले.

**स्पर्धा परीक्षांचे सखोल व अतिरिक्त मार्गदर्शन** - शिष्यवृत्ती व एन. एम. एम. एस. परीक्षेच्या मार्गदर्शनासाठी शिष्यवृत्ती क्षेत्रातील तज्ञ मार्गदर्शकांची व्याख्याने आयोजित करण्यात आली त्यात प्रामुख्याने अभ्यासक्रम समितीचे सदस्य श्री. कल्याण कडेकर, राष्ट्रपती पारितोषिक विजेते श्री. अनिल पलांडे शिष्यवृत्ती तज्ञ श्री. संदीप गीते, श्री. उमेश धुमाळ श्री.गोरख काळे यांचे विशेष मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले. यामध्ये तज्ञांनी विद्यार्थ्यांना येणाऱ्या विविध समस्या यासंबंधी चर्चा करून विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले.



**श्री. कल्याण कडेकर सर (शिष्यवृत्ती अभ्यासक्रम समितीचे सदस्य) विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना..**

**एन. एम. एम. एस. परीक्षेबाबत पालकांमध्ये जागृती** - वर्षाच्या सुरुवातीला एन. एम. एम. एस. परीक्षेसंबंधी सखोल माहिती देण्यासाठी आठवीच्या पालकांची बैठक घेण्यात आली. परीक्षेतून होणारी विद्यार्थ्याची बौद्धिक तयारी व गुणवत्ता यादीत आल्यानंतर होणारा आर्थिक लाभही समजावून देण्यात आला. यामधून विद्यार्थ्यांची वर्षभर नियमित उपस्थिती राहण्यास मदत झाली.

**ऑलिम्पियाड साठी माध्यमाची समस्या** - सेमी व मराठी माध्यम असल्यामुळे विद्यार्थ्यांना ऑलिम्पियाड परीक्षेतील प्रश्न सोडवण्यास कठीण वाटत होते. प्रश्नांची भाषा समजण्यास कठीण जात होती. त्यासाठी इंग्रजी शब्द संपत्ती वाढविणे गरजेचे होते म्हणून शाळेत अवांतर वाचनाच्या पुस्तकात इंग्रजी वाचनाची पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली. तसेच पुरेशा प्रश्नपत्रिकेचा सराव घेण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेला न बसवता साधारणत: 50 टक्के मुले परीक्षेला बसवण्यात आली.

**मुलांची एकाग्रता व सातत्य टिकवून ठेवण्याचे आव्हान** - अभ्यासातील मुलांचे सातत्य व एकाग्रता टिकून ठेवण्यासाठी मुलांना प्रेरणा देण्यासाठी काही अधिकाऱ्यांचा मुलांशी संवाद आयोजित करण्यात आला. पाठ्यपुस्तकातील कवींचा मुलांशी संवाद आयोजित करण्यात आला. प्रश्नमंजुषा सारख्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या.

**केंद्रस्तरीय शिष्यवृत्ती सराव आयोजन** - शिष्यवृत्ती व एन.एम.एम.एस परीक्षेची तयारी करत असताना शाळेमध्ये अभ्यासक्रम संपल्यानंतर पेपरचे आयोजन केले जाते. वर्गात दररोज सराव पेपर चालू असतोच पण इतर शाळांच्या विद्यार्थ्यांसोबत परीक्षेचा सराव व्हावा, वातावरण व ठिकाण बदलाचा सराव व्हावा, इतरांच्या तुलनेत आपण कोठे आहोत याची जाणीव व्हावी, या हेतूने दुसऱ्या शाळेत सराव परीक्षेचे आयोजन केले गेले. शेवटचा पाचवा सराव पेपर ज्या शाळेत अंतिम परीक्षा होणार आहे त्याच शाळेत घेतला गेला. या सराव पेपरचे नियोजन अंतिम परीक्षेप्रमाणे A,B,C,D संच तयार करून केले. त्याच ठिकाणी पेपर तपासून निकाल देखील तयार केला. प्रथम आलेले पाच विद्यार्थी व प्रत्येक विषयात प्रथम आलेले विद्यार्थी यांचे विशेष कौतुक केले गेले. याच ठिकाणी शिष्यवृत्तीचे तज्ञ मार्गदर्शक शिक्षक यांना बोलावून मुलांना मार्गदर्शन केले गेले.



वाबळेवाडी शाळेत केंद्रस्तरीय शिष्यवृत्ती सराव परीक्षेचे आयोजन...

**विविध उपक्रम राबवताना आलेल्या अडचणीवर केलेले प्रभावी उपाय -**

**विद्यार्थी संख्या** - राबवत असलेल्या उपक्रमात सर्व विद्यार्थ्यांना एकावेळी सामावून घेणे बऱ्याचदा अडचणीचे ठरत होते. त्यासाठी त्यावर उपाय म्हणून विद्यार्थ्यांचे गट करणे, विद्यार्थ्यांच्या आवडीनिवडीचा विचार करून विद्यार्थ्यांना संबंधित उपक्रमात सहभागी करून घेतले गेले. तसेच विद्यार्थी वयोगट व क्षमता यांचा देखील विचार उपक्रमात विद्यार्थ्यांना सहभागी करून घेताना केला.

**वेळेची मर्यादा** - विद्यार्थ्यांच्या आनंददायी शिक्षणासाठी उपक्रम राबवत असताना बऱ्याचदा वेळेचे नियोजन करणे बाबत अडचणी येत होत्या. त्यासाठी मुख्याध्यापकांनी संबंधित उपक्रमाचे वेळापत्रक करून विद्यार्थ्यांच्या शालेय वेळेमध्ये नवोपक्रम कसे राबवले जातील याचे प्रभावी नियोजन केले. आनंददायी शनिवार या दिवशी अनेक नवोपक्रम राबवले गेले. तसेच एखादा उपक्रम राबवण्यापूर्वी त्यासंबंधीत वेळेची कालमर्यादा तसेच उपक्रमाची यशस्वीता यांचा मेळ घालून उपक्रम राबवले गेले.

**आवश्यक साधनसामग्री** - शाळेत नवोपक्रम राबवत असताना त्यासंबंधीत आवश्यक घटकांची उपलब्धता करून देण्यासाठी बऱ्याचदा अडचणी येत होत्या.

उदा. व्याख्यान आयोजित करण्यासाठी संबंधित व्यक्तीस पाचारण करणे, कला क्रीडा संबंधित उपक्रम राबवताना विद्यार्थ्यांच्या साठी आवश्यक ते साहित्य उपलब्ध करून देणे. यासाठी मुख्याध्यापकांनी उपक्रम राबवत असताना उपक्रमाची जबाबदारी संबंधित शिक्षकावर देऊन त्या क्षेत्राशी संबंधित व्यक्तीस पाचारण करणे आवश्यक साहित्य जुळवाजुळव करणे यासारखी जबाबदारी वाटप केले.

**नवोपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी** - विद्यार्थ्यांच्या आनंददायी शिक्षणासाठी शाळेमध्ये सर्वतोपरी प्रयत्न केले जातात. त्यासाठी शाळेत राबविण्यातआलेल्या उपक्रमांची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी यांचा सहभाग तर होताच, परंतु अनेक शाळाबाह्य घटकांनी देखील या उपक्रमांच्या यशस्वीतेसाठी उल्लेखनीय मदत केली आहे.

**शाळेमध्ये शैक्षणिक वर्ष 2024- 25 मध्ये पुढील प्रमाणे अनेक नवोपक्रम राबविलेले आहेत तसेच अद्याप देखील हे उपक्रम सुरू आहेत.**

**आनंददायी शनिवार** - बऱ्याचदा इतर दिवसांच्या पेक्षा शनिवारी विद्यार्थ्यांची उपस्थिती कमी आढळून यायची त्यासाठी शाळेत आनंददायी शनिवार हा उपक्रम राबविला जातो. त्यामध्ये 'दप्तर विना शनिवार', Saturday is a FUN DAY' या अंतर्गत विविध उपक्रम राबवले गेले.

https://youtu.be/9oSmYTh-6t0?si=1a45nkEJvfYLow_6

**देशी खेळ खेळूया** - यानवोपक्रमांतर्गत विद्यार्थी अनेक प्रकारचे पारंपारिक खेळ खेळत असतात त्यामध्ये आट्यापाट्या, चल्लस आठ, लेझीम, लाठी काठी, कबड्डी, खो-खो, लंगडी यांसारख्या अनेक खेळांची ओळख करून देऊन ते कसे खेळायचे यासंबंधीत मार्गदर्शन शाळेतील शिक्षकांनी केले तसेच अनेक खेळ शिकवण्यासाठी बाहेरून देखील मार्गदर्शक उपलब्ध करून देण्यात आले . त्यामुळे विद्यार्थ्यांना पारंपारिक खेळाची माहिती देखील मिळाली तसेच ज्या विद्यार्थ्यांना या खेळाची आवड आहे ती मुले त्या त्या खेळात सहभागी करून घेण्यात आली.

https://youtube.com/shorts/yaY-DMFstZQ?si=GLIH5iGC4_MRjtHC

**चला कल्पक होऊया** - या उपक्रमा अंतर्गत विद्यार्थ्यांना स्वरचित कविता बनवणे, कार्यानुभवातील अनेक वस्तू बनवणे, विविध विषयांवर चित्र काढणे, विज्ञानातील विविध प्रोजेक्ट बनविणे, विविध भाषिक खेळ बनवणे संदर्भात आव्हाने देण्यात आली. तसेच त्या संदर्भात विद्यार्थ्यांनी बनविलेल्या वस्तूंचे प्रदर्शन देखील शाळेत भरवले गेले. त्यामुळे विद्यार्थी आनंदाने सर्व उपक्रमांमध्ये सहभागी होताना दिसले.

**एरोबिक्स तसेच संगीतमय कवायत** - आनंददायी शनिवार अंतर्गत शाळेमध्ये संगीतमय कवायत तसेच एरोबिक्स घेतले जाते. यामध्ये सर्व विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्यात येते. विद्यार्थी या उपक्रमात आवडीने सहभागी झालेले दिसतात.

**विविध स्पर्धांचे आयोजन** - विद्यार्थ्यांच्या विविध कौशल्यांचा विकास व्हावा यासाठी अनेक स्पर्धांचे आयोजन केले जाते. उदा. वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, क्रीडा स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, कविता लेखन स्पर्धा,

चित्रकला स्पर्धा इ. या स्पर्धांचे आयोजन करताना विद्यार्थ्यांची आवड लक्षात घेऊन विषय ठरवले जातात. स्पर्धा आयोजनासाठी संबंधित शिक्षकावर जबाबदारी दिली जाते. तसेच स्पर्धा पार पाडल्यानंतर त्याचा निकाल जाहीर करून विद्यार्थ्यांचा यथोचित सन्मान देखील केला जातो. त्यामुळे विद्यार्थी या विविध स्पर्धांमध्ये आवडीने सहभागी होत असलेले दिसून येते . तसेच त्यांच्या विविध कलाकौशल्यांचा विकास देखील त्यामुळे झालेला दिसतो.

**व्याख्याने आयोजित करणे** - शाळेमध्ये विविध विषयांवर आधारित व्याख्यानांचे आयोजन केले जाते . त्यामध्ये विविध क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन घेतले जाते. शाळेमध्ये मागील शैक्षणिक वर्षात तसेच चालू शैक्षणिक वर्षात पुढील व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते.

**आर्थिक साक्षरता संदर्भात व्याख्यान** - विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक साक्षरता निर्माण व्हावी तसेच आर्थिक व्यवहार संदर्भात अधिक माहिती मिळावी या दृष्टीने शाळेमध्ये व्याख्यान आयोजित केले गेले होते त्यासाठी बापूसाहेब नरके - स्टेट बँक मॅनेजर यांनी व्याख्यान दिले. त्यांनी विद्यार्थ्यांना डिजिटल बँकिंग, बचत खाते, पैशांची बचत , शेअर मार्केट तसेच अकाउंट हॅकिंग यासंदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी देखील अनेक शंका विचारून अधिक माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला.

**गांडूळ खत निर्मिती संदर्भात व्याख्यान** - विद्यार्थ्यांना आधुनिक शेती करण्यासंदर्भात तसेच गांडूळ खत निर्मिती प्रकल्पासंबंधीत माहिती देण्यासाठी प्रा. संदीप कोकरे यांना शाळेमध्ये बोलवण्यात आले होते. सरांनी गांडूळ खत कसे निर्माण केले जाते त्या संदर्भात विस्तृत माहिती दिली. तसेच गांडूळ खत मार्केटिंग यासंबंधी देखील मार्गदर्शन केले. गांडूळ खताचा पिकांसाठी होणारा उपयोग याची माहिती देखील विद्यार्थ्यांना देण्यात आली. विद्यार्थ्यांनी शाळेत गांडुळ खत निर्मिती केलेली असून या खताचा वापर परसबागेतील पिकांसाठी केला जातो.

**किशोरवयीन मुलींसाठी समुपदेशन पर व्याख्यान** - डॉक्टर सुहास निकम व प्रतिभा निकम यांचे मुलींसाठी समुपदेशन पर व्याख्यान आयोजित केले होते. त्यामध्ये विद्यार्थ्यांना स्वच्छते संदर्भात व मासिक पाळी संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी देखील त्यांना प्रतिसाद देत आपल्याला असणाऱ्या शंकांचे निरसन करून घेतले.

**मुलींसाठी bad touch, good touch संदर्भात व्याख्यान** - शाळेतील सर्व मुलींसाठी मुलींची सुरक्षितता या संदर्भात माहिती देण्यासाठी दामिनी पथकाच्या सदस्या पोलीस हवालदार जयश्री राऊत यांना मार्गदर्शन करण्यासाठी बोलावले गेले. त्यांनी समाजात वावरत असताना घ्यावयाची काळजी तसेच असा प्रसंग निर्माण झाल्यास आपण काय करावे या संदर्भात मार्गदर्शन केले.

**करियर गायडन्स संबंधी व्याख्यान** - इयत्ता सातवी व आठवीच्या विद्यार्थ्यांना करिअर संदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी प्रा. गायकवाड सरांना बोलावण्यात आले होते. सरांनी विद्यार्थ्यांना दहावी नंतर काय? बारावी नंतर काय? या संदर्भात योग्य मार्गदर्शन केले.

**शिवदुर्ग संदर्भात व्याख्यान** - विद्यार्थ्यांना विविध गडकिल्ल्यांची माहिती व्हावी तसेच इतिहास विषयासंदर्भात आवड निर्माण व्हावी यासाठी ऐतिहासिक व्याख्यान देणारे श्री. विजय लोहार सर यांना

आमंत्रित केले होते त्यांनी शिवदुर्ग संदर्भात चित्रफित दाखवून प्रत्येक किल्ल्याची माहिती तसेच शौर्यगाथा विद्यार्थ्यांसमोर उलगडवली.

**आमचा भाजी बाजार** - विद्यार्थ्यांमध्ये व्यवहार ज्ञान विकसित व्हावे यासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या दैनंदिन कामात बदल म्हणून शाळेत भाजी बाजार भरवण्यात आला होता. त्यामध्ये सर्व विद्यार्थी सहभागी झालेले दिसून आले. विद्यार्थ्यांनी स्वतः घरून भाजीपाला घेऊन येऊन ज्याप्रमाणे गावात आठवडी बाजार भरतो तसाच शाळेत भाजी बाजार भरवला होता. विद्यार्थ्यांनी आणलेला भाजीपाला गावातील लोकांनी विकत घेतला. त्यामुळे विद्यार्थ्यांना देखील प्रत्यक्ष अनुभवाद्वारे पैशांसंदर्भात व्यवहार समजण्यास मदत झाल्याचे दिसून आले.

**विविध सण समारंभ साजरे करणे** - साधारणतः विद्यार्थी सण- समारंभात सहभागी होण्यासाठी घरी राहताना दिसतात. विद्यार्थ्यांनी आवडीने शाळेत यावे, तसेच प्रत्येक समारंभात सहभागी व्हावे यासाठी शाळेत आषाढी एकादशी, भोंडला, रक्षाबंधन, होळी ,शिवजयंती यासारखे सण उत्साहात साजरी केले जातात. विद्यार्थी देखील प्रत्येक सणात आवडीने सहभागी होताना दिसतात.

**संगीतबद्ध कविता गायन** - विद्यार्थ्यांना बऱ्याचदा कविता गायन करताना अडचणी येतात. तसेच त्या तालासुरात सादर करताना अडखळतात. या उपक्रमाची निवड त्यांच्या कविता गायनातील अडचणी दूर होण्यासाठी केली गेली. विद्यार्थ्यांना कवितेला चाल कशी लावावी, पेटी व तबला यांच्या ठेक्यावर ती कशी बसवावी या संदर्भात मुख्याध्यापकांनी मार्गदर्शन केले.

या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांकडून स्वतः कवितांना चाली लावून, त्या कविता पेटी व तबला या वाद्यांच्या ठेक्यावर कृतीयुक्त करण्याचा प्रयत्न केला जातो.

**योग शिबीर आयोजन** - सुहासिनी योग ग्रुप यांच्यामार्फत विद्यार्थ्यांसाठी योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये योग आणि प्राणायाम यांची आवड निर्माण व्हावी व त्याचे महत्त्व कळावे यासाठी या उपक्रमाचे आयोजन शाळेत केले होते.

https://youtu.be/ycdxr_sVWcA?si=xcf1LloXLsrBGazl

**फलनिष्पत्ती / यशोगाथा -**


**शिष्यवृत्ती परीक्षा (इ.८ वी)** - महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने घेण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती परीक्षेचा, इयत्ता आठवीचा निकाल हा चिंताजनक असतो. परंतु या वर्गातील विद्यार्थ्यांची या परीक्षेतील संपादन पातळी अतिशय उच्च राहिली. पात्र टक्केवारी मध्ये पुणे जिल्ह्यातील हा प्रथम क्रमांकाचा निकाल होता. परीक्षेला ४१ विद्यार्थी बसले.पैकी ३९ विद्यार्थी पात्र झाले. शेकडा निकाल ९५% लागला. ३५ विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले. त्यातील ५ विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत आले. रुत्विज विशाल सावंत हा या वर्गातील विद्यार्थी 278 गुण मिळवून ग्रामीण विभागातून महाराष्ट्रात तिसरा आला.वर्गातील ८५.३६% विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले. ही या परीक्षेतील अत्युच्च संपादन पातळी दाखविते.

**पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा(इ. ५ वी)** -परीक्षेला बसलेले विद्यार्थी 75, पात्र विद्यार्थी 70, शेकडा निकाल 93% गुणवत्ता यादीत आलेले विद्यार्थी 32, पैकी राज्य गुणवत्ता यादीत 6

**जवाहर नवोदय प्रवेश परीक्षा** - जानेवारी 2024 मध्ये झालेल्या परीक्षेत श्रेया किरण पाटील ही विद्यार्थिनी प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होऊन जवाहर नवोदय विद्यालय पिंपळे ता. शिरूर जि. पुणे या ठिकाणी पुढील शिक्षण घेत आहे.

**एन. एम. एम. एस. परीक्षा** - ४१ विद्यार्थी परीक्षेला बसले. ४० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. शेकडा निकाल ९७.५ टक्के. ३४ विद्यार्थी प्रत्येकी ६०००० रुपये शिष्यवृत्तीचे मानकरी ठरले. तर ४ विद्यार्थी सारथी शिष्यवृत्तीचे (३८०००रुपये ) मानकरी ठरले.

अशा पद्धतीने सर्व विद्यार्थ्यांना मिळून 21 लाख 92 हजार रुपये शिष्यवृत्ती मिळणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची या परीक्षेतील संपादणूक ही उत्कृष्ट राहिलीच, त्याबरोबर वर्गातील 92.68% मुलांना शिष्यवृत्ती मिळाली. महाराष्ट्रातील एक विक्रमी निकाल संपादन करता आला.





लोकमत



वाबळेवाडी (ता. शिरूर) येथील एनएमएमएस परीक्षेतील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक.

# एनएमएमएस परीक्षेत ३४ विद्यार्थ्यांचे यश

लोकमत न्यूज नेटवर्क

**कान्हूर मेसाई** : जिल्हा परिषद शाळा वाबळेवाडीतील ४१ पैकी ३४ विद्यार्थ्यांची एनएमएमएस परीक्षेत शिष्यवृत्तीसाठी निवड झाली आहे. ४ विद्यार्थी सारथी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत. यापूर्वीचा या शाळेचा ४२ पैकी २७ हा स्वतःचाच उच्चांक मोडीत ४१ पैकी ३४ विद्यार्थी गुणवत्ता यादीत आणत जयश्री पलांडे व सुनील पलांडे यांनी नवा विक्रम केल्याची माहिती मुख्याध्यापक विजय गोडसे यांनी दिली.

४१ पैकी ४० म्हणजे शे.९७.५६ विद्यार्थी परीक्षेत पात्र झाले असून शाळेने उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. गुणवत्ता यादीत आलेले विद्यार्थी व त्यांचे गुण कंसात पुढीलप्रमाणे - अपेक्षा जालिंदर वाबळे (१५६), विवेक गणेश कदम (१५५), सिद्धी श्यामकांत माळी (१५३), श्रावणी नवनाथ इंगवले (१५२), पौर्णिमा दत्तात्रय मासळकर (१५२), वेदांत नितीन बोऱ्हाडे (१५१), ईश्वरी संजय मासळकर (१४८), अदिती बापू मोरे (१४८), मधुरा उत्तम काळे (१४८), अश्मिका शीतल पाटील (१४६), आदिती संजय तांबे (१४२), सृष्टी रवींद्र नेमाणे (१४०), वेदांत जीवन तांबे (१३९), गौरी गणेश टेमगिरे (१३८), क्षितिज नीलेश गवारी (१३४ गुण), आदित्य अतुल शिंदे (१३४), दिशांत संदीप काळे (१३३), तनिष्का कैलास शेळके (१३२), मीनल गौतम बर्गे (१३२), साईराज ज्ञानेश्वर मासळकर (१३१), श्रीनिवास अनमोल करंजे (१३१), शर्वरी ज्ञानदेव पाचर्णे (१३१), ओंकार राजू देवकुळे (१३१), तन्मय लक्ष्मण शिवले (१३०), असीम युनुस शेख (१२९), अभिनव सतीश बोंगर (१२८), यज्ञ शरद काळे (१२१), अरमान सलीम मुलाणी (१२०), राधाकृष्ण दत्तात्रय बुरंगे (११८), तनिष्का संजय वाघमारे (११७), श्रीनाथ बाबाजी राऊत (११७), वैष्णवी गणेश रणदिवे (११७), श्रुती प्रदीप सातपुते (११६), विनय संतोष गुप्ता (११५).

सारथी शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थी - भक्ती गणेश वाबळे (१०६), प्रथमेश गिरीधर वाबळे (१०५), अवनी शिवाजी सातारकर (१०४), निखिल मोरे (९८) विद्यार्थ्यांना वर्गशिक्षक जयश्री पलांडे व सुनील पलांडे यांनी मार्गदर्शन केले.

यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचा सन्मान शाळा समितीचे अध्यक्ष संदीप वाबळे, सदस्य प्रकाश वाबळे, केशवराव वाबळे, माजी मुख्याध्यापक विठ्ठल पवार यांच्या हस्ते करण्यात आला. या यशाबद्दल केंद्रप्रमुख शरीफा तांबोळी, केंद्रप्रमुख प्रकाश लंघे, विस्तार अधिकारी वंदना शिंदे, गटशिक्षणाधिकारी अनिल बाबर यांनी अभिनंदन केले.

Hello Pune Gramin
Page No. 4 Apr 18, 2024
Powered by: erelego.com

**गणित प्राविण्य परीक्षा** - या परीक्षेसाठी प्रथमच पुणे जिल्ह्यातून एका जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थी परीक्षेला बसले होते. वर्गातील 24 विद्यार्थी बसले होते. त्यातील प्रज्ञा परीक्षेसाठी 23 विद्यार्थी पात्र झाले. पात्र होण्याचे प्रमाण हे 96 टक्के राहिले.

**गणित प्रज्ञा परीक्षा** - पुणे जिल्ह्यातील सर्वात मोठा निकाल हा एका जिल्हा परिषद शाळेचा लागला. गणित प्रज्ञा परीक्षेत 23 पैकी ९ विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत आले.

**MTS परीक्षा** - मॉडर्न एज्युकेशन सोसायटीच्या वतीने घेतल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्य प्रज्ञाशोध परीक्षेत ८ विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत, ६ विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत यशस्वी झाले. तर १० विद्यार्थ्यांची विशेष पारितोषिक प्राप्त म्हणून निवड झाली.



समर्थ भारत

## वाबळेवाडी जि.प.शाळेचे 16 विद्यार्थी प्रज्ञाशोध शिष्यवृत्ती गुणवत्ता यादीत

समर्थ भारत वृत्तसेवा

तळेगाव ढमढेरे ता. २५ : महाराष्ट्र प्रज्ञाशोध शिष्यवृत्ती परीक्षेत वाबळेवाडी जिप प्राथमिक शाळेचे सोळा विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले असून त्यातील आठ विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत चमकले असून जिल्ह्यात प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकही याच शाळेने पटकावला असल्याची माहिती विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय गोडसे यांनी दिली.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना वर्गशिक्षिका जयश्री पलांडे व सुनिल पलांडे यांनी मार्गदर्शन केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे केंद्रप्रमुख प्रकाश लंघे, विस्तार अधिकारी वंदना शिंदे, गटशिक्षणाधिकारी अनिल बाबर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संदीप वाबळे, उपाध्यक्ष मल्हारी वाबळे, ग्रामपंचायत सदस्य प्रकाश वाबळे, माजी उपसरपंच केशव वाबळे यांनी अभिनंदन केले आहे.

**गुणवत्ता यादीतील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी**

साईराज ज्ञानेश्वर मासळकर (१५८ गुण, राज्यात १३ वा), रूत्विज विशाल सावंत (१५७ गुण, राज्यात १४ वा), अरमान सलीम मुलानी (१५७ गुण, राज्यात १४ वा), वेदांत नितीन बोन्हाडे (१५६ गुण, राज्यात १५ वा), विवेक गणेश कदम (१५६ गुण, राज्यात १५ वा), निखिल प्रवीण मोरे (१५६ गुण, राज्यात १५ वा), सिद्धी शामकांत माळी (१५५ गुण, राज्यात १६ वी), अपेक्षा जालिंदर वाबळे (१५५ गुण, राज्यात १६ वी), आदिती बापू मोरे (१५४ गुण, जिल्ह्यात प्रथम), असीम युनूस शेख (१५४ गुण, जिल्ह्यात प्रथम), आदित्य अतुल शिंदे (१५३ गुण, जिल्ह्यात द्वितीय), पौर्णिमा दत्तात्रय मासळकर (१५३ गुण, जिल्ह्यात द्वितीय), ईश्वरी संजय मासळकर (१५३ गुण, जिल्ह्यात द्वितीय), राधाकृष्ण दत्तात्रय बुरंगे (१५२ गुण, जिल्ह्यात तृतीय), सृष्टी रविंद्र नेमाने (१५० गुण, जिल्ह्यात पाचवी), वेदांत जिवन तांबे (१४९ गुण, जिल्ह्यात सहावा), श्रावणी नवनाथ इंगवले (१४८ गुण, जिल्ह्यात सातवी).

**NATIONAL SCIENCE OLYMPIAD (NSO)**

**Gold medal (सुवर्णपदक ) विजेते विद्यार्थी**

**इयत्ता -चौथी**

1.निषाद अभिजीत जोशी (Qualify for second level)

2. अर्णव सुधीर मुळे

3. पियूष अनिल माळी

**इयत्ता - सहावी**

1. निधी राहुल भालशंकर (Qualify for second level)

2. वेदांत नागनाथ निमकर

3. देवेन अविनाश कदम

**इयत्ता - सातवी**

1. संस्कार विजय गिते (Qualify for second level)

2. शार्दुल प्रशांत गवारी

3. प्रतिक्षा महादेव म्हेत्रे

**सायन्स ऑलिम्पियाड फाउंडेशन** - SOF INTERNATIONAL MATHAMATIC OLYMPIAD (IMO) Gold medal विजेते विद्यार्थी

**इ. दुसरी**

1. सार्थक स्वप्निल बर्वे
2. पुर्वी प्रशांत राणे
3. श्रीराज दादासो ठोंबरे

**इ. तिसरी**

1. स्वरूप प्रविण म्हस्के (Qualify for second level)
2. रुचिता तुषार सिनलकर
3. अगस्त्य शिरीष हार्दे

**इ .चौथी**

1. अर्णव सुधीर मुळे (Qualify for second level)
2. कौस्तुभ सुहास निकम
3. अनुष्का नवनाथ डफळ
4. सायली निलेश रामाणे

**इ.सहावी**

1. देवेन अविनाश कदम (Qualify for second level)
2. श्रावणी उमराव भालेराव
3. अनय अविनाश गुरव
4. अर्णव शांताराम मोकळ
5. निधी राहुल भालशंकर

**इ. सातवी**

1.अनुष्का भाऊसाहेब वाबळे (Qualify for second level)
2. आयुष विश्वास साकोरे (Qualify for second level)
3. प्रतिक्षा महादेव म्हेत्रे
4. संस्कार विजय गिते

**उपक्रमाची यशस्विता -** विद्यार्थ्यांचे शालेय वातावरण आनंदी होण्यासाठी शाळेमध्ये राबवल्या गेलेल्या या विविध अंगी उपक्रमां मुळे शालेय वातावरण आनंदी तर बनले पण विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी देखील याचे सहाय्य मिळाले या उपक्रमाची यशस्विता पुढीलप्रमाणे सांगता येईल.

- आनंददायी शनिवार अंतर्गत राबवलेल्या विविध उपक्रमामुळे विद्यार्थी शनिवारचे देखील मोठ्या प्रमाणात उपस्थित राहू लागले. गैरहजेरीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर कमी झालेले आढळून आले.
- विविध पारंपारिक खेळांची माहिती विद्यार्थ्यांना शाळेत देसी खेळ खेळूया या उपक्रमांतर्गत झाली. विद्यार्थी आवडीने या खेळात सहभागी झाले. तसेच स्वत:हून पारंपारिक खेळाविषयी माहिती मिळवू लागले. विविध क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग घेऊ लागले. यावर्षी झालेल्या यशवंतराव चव्हाण कला क्रीडा महोत्सव अंतर्गत झालेल्या क्रीडा स्पर्धांमध्ये आट्यापाट्या या खेळात शाळेने तालुकास्तरावर प्रथम क्रमांक मिळवलेला आहे.( जिल्हा स्पर्धा अद्याप बाकी आहेत.)
- लेझीम या खेळ प्रकारात अनेक विद्यार्थी सहभागी होतात. शाळेतील पहिली ते आठवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना यात सहभागी करून घेतले जाते. तसेच यशवंतराव चव्हाण कला क्रीडा महोत्सव या अंतर्गत झालेल्या सांस्कृतिक कला क्रीडा स्पर्धांमध्ये लेझीम या खेळ प्रकारात शाळेने तालुकास्तरावर शाळेचे प्रतिनिधित्व केलेले होते. तसेच मागील वर्षी प्रजासत्ताक दिनी सर्व ग्रामस्थांसमोर विद्यार्थ्यांनी लेझीमचे उत्कृष्ट सादरीकरण केले होते.

https://youtu.be/HMLLmU9Zdc4?si=3yeWXzccq9HWQkXx

- लाठीकाठी या उपक्रमामुळे विद्यार्थी शिवकालीन युद्धकलांविषयीची माहिती स्वतः मिळवून त्यातील लाठी काठी खेळाविषयी स्वतः माहिती मिळवू लागले. सर्व विद्यार्थी या क्रीडा प्रकारात सहभागी होतात. स्वातंत्र्यदिनी झालेल्या विविध गुणधर्म कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी लाठीकाठी चे उत्कृष्ट सादरीकरण सर्व ग्रामस्थांसमोर केले होते.

https://youtu.be/VabYvAiHsnM?si=lwiXM4zIFdNZdNpB

- एरोबिक्स व संगीतमय कवायत यामुळे विद्यार्थी व्यायाम देखील आवडीने करू लागले, तसेच शाळेतही नियमितपणे हजर राहू लागलेले दिसून आले.
- शाळेत विविध स्पर्धांच्या आयोजनामुळे विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व, कविता लेखन, निबंध लेखन, हस्ताक्षर,चित्रकला, बुद्धीबळ यामध्ये उल्लेखनीय सुधारणा झालेली दिसून येते.



- विद्यार्थ्यांनी बनवलेल्या कार्यानुभवाच्या विविध वस्तूंचे प्रदर्शन शाळेत भरवले जात असल्यामुळे सर्व विद्यार्थी यात सहभागी झाल्याचे दिसून आले.
- विविध व्याख्यानांच्या आयोजनामुळे विद्यार्थ्यांना विविध क्षेत्राविषयी माहिती मिळाली. तसेच विद्यार्थी स्वतः होऊन देखील अनेक क्षेत्रासंबंधी माहिती संग्रहित करू लागल्याचे दिसून आले.




- कवी आपल्या भेटीला या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना कविता वाचनाविषयी आवड निर्माण झाली. विद्यार्थी नवनवीन कवितांचा स्वतः संग्रह करू लागले तसेच कविता देखील स्वतः तयार करू लागले.

https://youtu.be/hxsswsAQ3s0?si=OD_f9LB91PSKGtHp

- शाळेमध्ये विविध सण समारंभ साजरे केल्यामुळे विद्यार्थी त्या सणाविषयी आधीच अधिक माहिती मिळवू लागले. तसेच त्यासाठी आवश्यक तयारी देखील ते करू लागले. शाळेतील प्रत्येक समारंभात सहभागी होण्याचा विद्यार्थी प्रयत्न करताना दिसत आहेत.
- कवितेचे कृतियुक्त व संगीतबद्ध गायन यामुळे विद्यार्थी प्रत्येक कविता आवडीने गाऊ लागले तसेच स्वतः त्या कवितेची चाल लावून ती कृतीयुक्त गाण्याचा प्रयत्न करताना दिसू लागले. यावर्षी झालेल्या यशवंतराव चव्हाण कला क्रीडा महोत्सवाअंतर्गत होणाऱ्या कविता गायन स्पर्धेमध्ये या शाळेतील इयत्ता सातवीच्या विद्यार्थिनींनी तालुकास्तरावर प्रथम क्रमांक मिळवला आहे.




- योग शिबिराचे आयोजन केल्यामुळे विद्यार्थी अनेकविध योग प्रकार करण्यासाठी इच्छुक असतात. आरोग्यासाठी योगाचे महत्त्व समजले.

## विद्यार्थ्यांना शिक्षकांकडून विशेष प्रोत्साहन पर बक्षीस



समर्थ भारत



वाबळेवाडी जि. प. प्राथ. शाळेतील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना बक्षिसे देताना वर्गशिक्षक.

**विद्यार्थ्यांनी स्वतःचाच पाचवी शिष्यवृत्तीचा विक्रम आठवीत मोडला**

**शिष्यवृत्तीधारकांना वर्गशिक्षिका जयश्री पलांडे यांनी दिले बक्षीसे**

समर्थ भारत वृत्तसेवा

तळेगाव ढमढेरे ता.२६ : वाबळेवाडी जि. प. प्राथ. शाळेतील पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत (इ.८वी ) ४१ विद्यार्थ्यांपैकी ३५ विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले. हेच विद्यार्थी इयत्ता पाचवीत असताना ५० पैकी ४२ विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले होते. पूर्वीचा हाच विक्रम मोडल्यास प्रत्येक विद्यार्थ्याला पाचशे रुपये बक्षीस देण्याचे वर्गशिक्षक सुनिल पलांडे व जयश्री पलांडे यांनी जाहीर केले होते. त्यानुसार वर्गशिक्षकांकडून बक्षीस मिळाल्याने विद्यार्थ्यांचा आनंद गगनात मावेना.

शिक्षकांनी दिलेले आव्हान सर्व मुलांनी स्वीकारून ८४ टक्के विद्यार्थी शिष्यवृत्ती गुणवत्ता यादीत येण्याचा विक्रम यावर्षी ८५ टक्के विद्यार्थी गुणवत्ता यादीत येऊन मोडीत काढला. याशिवाय ५ विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत आले. तसेच एन.एम.एम.एस. परीक्षेत ३४ विद्यार्थी गुणवत्ता यादीत तर ४ विद्यार्थी सारथी शिष्यवृत्ती मिळवण्यात यशस्वी ठरले. त्याबद्दल गुणवत्ता यादीत आलेल्या एकूण ३८ विद्यार्थ्यांना वर्गशिक्षिका जयश्री सुनिल पलांडे यांनी प्रत्येक विद्यार्थ्याला ५५० रुपये किमतीची लाईट वेट स्कूल बॅग बक्षीस म्हणून दिली. तर शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये राज्य गुणवत्ता यादीत आलेल्या पाचवी व आठवीच्या ११ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती तज्ञ शिक्षक प्रतिभा काळे व गोरख काळे यांनी प्रत्येकी १ हजार ५० रुपये किमतीचे स्मार्ट वॉच बक्षीस म्हणून दिले.

इयत्ता पाचवीचे ३२ विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले होते त्या पालकांनी शाळेला सुमारे सव्वा लाख किमतीचा इंटर ॲक्टिव्ह बोर्ड भेट दिला. त्यात वर्गशिक्षक पोपट दरंदले व दीपक खैरे यांनी प्रत्येकी ५ हजाराचे योगदान दिले. शिक्षकांनी वैयक्तिक बक्षीस न घेता स्वतःचे योगदान देऊन मुलांचे कौतुक करणे व शाळेत भेटवस्तू देणे हा निर्णय पथदर्शी असल्याचे मुख्याध्यापक विजय गोडसे यांनी सांगितले. यावेळी व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संदीप वाबळे, उपाध्यक्ष मल्हारी वाबळे, ग्रामपंचायत सदस्य प्रकाश वाबळे यांनी यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

यापूर्वी सन २०२०-२१ मध्ये इयत्ता पाचवी चे ५० पैकी ४२ विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले होते आणि ८४ % विद्यार्थी गुणवत्ता यादीत येण्याचा विक्रम शाळेच्या नावावर होता. हा विक्रम सर तुमच्या बॅचने मोडला तर प्रत्येक विद्यार्थ्याला वर्गशिक्षकांकडून १५ ऑगस्ट २०२४ च्या कार्यक्रमात खास बक्षीस दिले जाईल असे जाहीर करण्यात आले होते.

हे आव्हान विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे स्वीकारले आणि 41 पैकी 35 विद्यार्थी गुणवत्ता यादी तालीम म्हणजेच शेकडा ८५% विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले. गुणवत्ता यादीत आलेल्या सर्व विद्यार्थ्यांना वर्ग शिक्षकांच्या वतीने प्रत्येकी ५५० ₹ ची स्कूल बॅग भेट देण्यात आली.

राज्य गुणवत्ता यावर्षी ८वीचे ५ व ५ वी चे ६ विद्यार्थी आले. सर्व विद्यार्थ्यांना शाळेतील उपशिक्षक श्री. काळे सर यांच्याकडून प्रत्येकी ११०० रुपये किमतीचे स्मार्ट वॉच भेट देण्यात आले.

**समारोप -**

शालेय स्तरावर होणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करता यावे यासाठी शाळेमध्ये अनेक समकक्ष स्पर्धा परीक्षांची तयारी करून घेतली जाते, त्यामुळे विद्यार्थ्यांची अभ्यासाची बैठक वाढलेली दिसून येते. तसेच विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता विकास होतो. स्पर्धा परीक्षांच्या दृष्टीने परिपूर्ण तयारी होते, तसेच पुढील वर्गांतील अभ्यासक्रमाची पूर्वतयारीदेखील होते. त्यामुळे विद्यार्थी शालेय स्तरावर होणाऱ्या इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती तसेच एन एम एम एस परीक्षा यामध्ये लक्षणीय यश संपादन करताना आढळून येतात.

शाळेमध्ये राबवले गेलेल्या विविध उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचे शालेय वातावरण आनंदी तर होतेच शिवाय विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत झालेली दिसून येते. विद्यार्थी गैरहजेरीचे प्रमाण कमी होते. विद्यार्थी

प्रत्येक उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी होताना दिसून येतात. विद्यार्थी आत्मविश्वास वाढून अनेक कलागुणांना वाव मिळाल्याचे आनंददायी शिक्षणासाठी राबवलेल्या या सर्व उपक्रमातून दिसून आले.

कौतुकास्पद • मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत अकरा लाखांचे बक्षीस

# वाबळेवाडीची शाळा जिल्ह्यात अव्वल

शिक्रापूर, (वा.) महाराष्ट्र शासनाने शाळांच्या सर्वांगीण विकासासाठी राबवलेल्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात शासकीय गटात शिरूर तालुक्यातील वाबळेवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने जिल्हा स्तरावर प्रथम क्रमांकाचे अकरा लाखांचे पारितोषिक पटकावले असल्याची माहिती शाळेच्या मुख्याध्यापिका शरीफा तांबोळी यांनी दिली आहे.

शिक्रापूर ता. शिरुर येथील वाबळेवाडीतील आंतरराष्ट्रीय शिक्षण देणारी पहिली जिल्हा परिषद प्राथमिक शाळा असा नावलौकिक मिळवलेल्या वाबळेवाडी जिल्हा परिषद शाळेने गुणवत्ता राखत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत बाजी मारली, भौतिक सुविधांचे निर्माण, शैक्षणिक गुणवत्तेतील वाढ व प्रशासकीय सुधारणा अशी प्रमुख क्षेत्रे सदर योजनेसाठी निश्चित करण्यात आली होती. तसेच शैक्षणिक गुणवत्ता, अध्ययन, अध्यापन, प्रशासन यात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, पर्यावरण संवर्धनाची जाणीव, सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छता, चांगले आरोग्य, राष्ट्रीय एकात्मतेची भावना वृद्धिंगत करण्यासाठीचे प्रयत्न, व्यवसाय शिक्षणाची तोंड ओळख, अंगभूत कला क्रीडा गुणांचा विकास अशा अनेकविध निकषांचा अंतर्भाव करण्यात आला होता. हे सर्व निकष पूर्ण करत शाळेने यश संपादित केले आहे.



## विक्रमी यश मिळवले

शाळेत गुणवत्ता विकास वाढीसाठी सर्वच परीक्षांमध्ये विक्रमी यश संपादन करत राज्यभर आपल्या नावाचा डंका निर्माण केला आहे. शाळेत राज्यातील अनेक शाळा, शिक्षक, पालक, शाळा व्यवस्थापन समित्या, ग्रामस्थ, अधिकारी व पदाधिकाऱ्यांनी अभ्यास भेटी दिल्या आहेत.

## विविध उपक्रमांत गुणवत्ता कायम

शाळेने नुकतेच मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात जिल्हा स्तरावर प्रथम क्रमांकाचे अकरा लाखांचे पारितोषिक पटकावले असताना शाळेची उत्तम गुणवत्ता कायम राखत विविध उपक्रमांतून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकडे यशस्वी प्रवास कायम राखण्याचा निर्धार शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संदीप वाबळे व ग्रामपंचायत सदस्य प्रकाश वाबळे यांनी व्यक्त केला आहे, तर शाळेच्या यशाबद्दल केंद्रप्रमुख प्रकाश लंघे, शिक्षण विस्ताराधिकारी वंदना शिंदे, गटशिक्षणाधिकारी अनिल बाबर यांनी अभिनंदन केले आहे.

**उपक्रम फोटो लिंक -**

https://drive.google.com/drive/folders/1EzjPMw5P1g_rnnFTXZitTEUvsSiiFVD4

----------**----------

## “मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा टप्पा २ - राज्यस्तरावरील प्रथम क्रमांकाची जिल्हा परिषदेची मोठ्या पट संख्येची शाळा”

**शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, धानोरे, ता.खेड, जि.पुणे.**

**शाळेचा ईमेल आयडी** - punezp.dhanore0816301@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.सत्यवान कुशाबा लोखंडे
**मोबाईल क्रमांक** - ९९२३०९२२२२
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - punezp.dhanore0816301@gmail.com

**प्रास्ताविक -**

ही आवडते  मनापासून शाळा लाविते लळा ही जशी माऊली बाळा.. अशी खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांना लळा लावणारी आणि विद्यार्थ्यांना हवीहवीशी वाटणारी अशी स्वच्छ आणि सुंदर शाळा म्हणजे आमचे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धानोरे.. विविध अडचणींवर मात करत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी तत्पर असलेली आमची शाळा. विविध कंपन्या, विविध संस्था यांच्याकडून मदत मिळवून लोक सहभागाचा एक आदर्श घालून देणारी आमची जिल्हा परिषद प्राथमिक धानोरे.

शासनातर्फे घेतल्या जाणाऱ्या स्कॉलरशिप एन एम एम एस नवोदय यांसारख्या स्पर्धा परीक्षेमध्ये वेगळा ठसा उमटवत विद्यार्थ्यांना उद्याच्या जगाच्या स्पर्धेसाठी तयार करणारी शाळा म्हणजे आमचे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धानोरे.

मुख्यमंत्री माझी शाळा ,सुंदर शाळा टप्पा २ अभियानात शाळेने सर्वोच्च शिखर गाठत राज्य स्तरावर प्रथम क्रमांक पटकावून ५१ लक्ष रुपयांचे पारितोषिक मिळवले.

**आलेल्या अडचणी -**

१) शाळेसाठी लागणारी जागा
२) भौतिक सुविधा निर्माण करण्यासाठी आर्थिक मदत
३) विविध शैक्षणिक साहित्याची कमतरता
४) मोठ्या परिसराचे स्वच्छता ठेवण्याचे आव्हान
५) स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी

**उपाययोजना -**

1. ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने तीन एकरचा गायरान असलेल्या परिसर शाळेच्या नावे शासनाकडून करून देण्यात आला आणि खऱ्या अर्थाने शाळेच्या विकासाला सुरुवात झाली.
2. शालेय परिसरात काम करणाऱ्या विविध संस्था आणि विविध कंपन्या यांची भेट घेऊन शाळेच्या असणाऱ्या गरजा त्यांच्यासमोर मांडण्यात आल्या. शाळेचा होत असलेला गुणवत्ता विकास पाहून विविध कंपन्या, विविध संस्था यांनी भरीव मदत करत आज शाळेमध्ये सुस्थितीत अशा 33 वर्ग खोल्या, सुस्थितीतील शौचालय ,अपंगांसाठीची शौचालय ,ग्रंथालय, विविध विषयांच्या प्रयोगशाळा, कंप्यूटर लॅब, कोडींग लॅब,उपलब्ध आहेत... त्याचप्रमाणे सुंदर असे पेविंग ब्लॉक्सचे ग्राउंड देखील उपलब्ध आहे...
3. शाळेचा असलेला एवढा मोठा परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी कोणीही स्वच्छता कर्मचारी वेगळे असे काम करत नाही परंतु प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये शाळेतील स्वच्छते विषयीच्या सवयी आणि प्रत्येक वर्गासाठी नेमून दिलेला स्वच्छतेचा परिसर, या परिसराची सकाळच्या दहा मिनिटांमध्ये विद्यार्थी स्वतः स्वच्छता करतात.
4. स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी मे महिन्यापासूनच शाळेचे वर्ग सुरू होतात ..सुट्टीच्या दिवशी देखील शाळेचे वर्ग सुरू असतात ..केवळ दहा ते पाच हीच वेळ न ठेवता ,स्पर्धा परीक्षेसाठी सकाळच्या वेळेत जादा तास तसेच शनिवार रविवार देखील शाळेचे वर्ग सुरू असतात... व्यवस्थित केलेले अभ्यासक्रमाचे नियोजन आणि घेतलेला सराव याद्वारे विद्यार्थी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये चमकत आहेत...

**परिणाम -**

2012 साली 240 विद्यार्थी संख्या आणि 10 शिक्षक कार्यरत असणारी धानोरे शाळा आज 1000 पेक्षा अधिक (1011) विद्यार्थ्यांना शिक्षण देत आहे. 30 पेक्षा जास्त शिक्षकांना बरोबर घेऊन ज्ञानदानाचे पवित्र काम करत आहे. सरकारी शाळांमध्ये अनेक अडचणी आहेत पण याचा कुठलाही बाऊ न करता अनेक संघर्षांवर मात करत धानोरे येथील सर्व वर्ग खोल्या बांधकाम संरक्षण भिंत क्रीडांगण भौतिक सुविधा या सीएसआर लोकसहभाग या देणगी मधून उभ्या राहिल्या आणि न भूतो न भविष्य असे शाळेचे चालते बोलते नवचैतन्यांनी सळसळते ज्ञानमंदिर तयार झाले.या शाळेला जसे मुख्याध्यापक शिक्षक ग्रामस्थ यांनी घडवण्यासाठी रक्ताचे पाणी केले तसेच विविध सेवाभावी संस्थांची मदत मिळाली.यात रोटरी क्लब ऑफ

पुणे सेंट्रल पुणे. मधुसूदन राठी चॅरिटी ट्रस्ट यांच्याकडून वर्गखोल्या,संरक्षण भिंत,मैदान सपाटीकरण,संगणक लॅब,प्रयोग साहित्य,सीसीटीव्ही कॅमेरे,ई लर्निंग, संच,लॅपटॉप,मुलींसाठी स्वच्छतागृह, शालेय रंगकाम.इनव्हो लूट टेक्नोलॉजी प्रायव्हेट (IGW) लिमिटेड यांस कडून आठ वर्गखोल्या, ग्रामपंचायत धानोरे कडून तीन वर्ग खोल्या, पिण्याचे पाणी, मैदान सपाटीकरण,स्वच्छतागृह. मधुसूदन राठी चारिटी ट्रस्ट कडून तीन वर्ग खोल्या, हॅन्ड वॉश स्टेशन,सॅनिटरी नॅपकिन,आरो पिण्याचे पाणी,वसंत राठी व श्री विजय राठी शाळेसाठी हॉल रंगकाम व सुशोभीकरण, पुष्पक स्टील, इंद्रायणी फेरोकास्ट यांस कडून पाच वर्ग खोल्या, मे .कैलास वाहन उद्योग धानोरे यांस कडून तीन वर्ग खोल्या मिळाल्या आहेत.आशा रिजाईन्स,रिको इंडस्ट्रीज, ग्रावर अँड वाईल इंडिया लि यांजकडून वर्गखोली व 40 कॉम्प्युटर ची भव्य लॅब, किचन ग्रेस- स्लीक इंटरनॅशनल- एशियन पेंट यांजकडून फर्निचर,विद्यार्थ्यांना बसण्याची व्यवस्था कमी होती, वर्गखोल्या अभावी प्रवेश देता येत नव्हता ही अडचण लक्षात घेवून दहा वर्गखोल्या देणारे पूना राऊंड टेबल नंबर पंधरा या सर्वांचा या यशात मोलाचा वाटा आहे. अतिशय सुंदर स्वच्छ नीटनेटका परिसर हे शाळेचे वैशिष्ट्ये तर आहेच.शिवाय अगदी अप्रतिम मुख्याध्यापक कार्यालय,अद्ययावत हॉल,गणित,विज्ञान प्रयोगशाळा, शालेय क्रीडांगण ही शाळेची बलस्थाने आहेत. शाळेत प्रवेश केल्यावर आपल्याला येथील निसर्गरम्य मनाला मोहन टाकणारा शाळेचा परिसर काही काळ शाळेत या रेंगाळायला भाग पाडतो.

केवळ भौतिक सुविधाच नाही तर गुणवत्तेच्या बाबतीतही शाळा आपल्याला आघाडीवर असलेली दिसते. जव्हार नवोदय विद्यालय,पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा, उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती, एन एम एम एस या स्पर्धा परीक्षेमध्ये शाळेचे दोनशे पेक्षा अधिक विद्यार्थी यशस्वी झालेले आहेत.पुणे जिल्हा परिषदेतर्फे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून यशवंतराव कला क्रीडा महोत्सव आयोजित केला जातो.या स्पर्धेतही वक्तृत्व,लेझीम,विज्ञान प्रदर्शन, लोकनृत्य,चित्रकला,भजन ,नाट्य स्पर्धा,प्रश्नमंजुषा या विविध स्पर्धांमध्ये घवघवीत यश मिळवणारी धानोरे शाळा पुणे जिल्हा परिषदेच्या प्रथम क्रमांकाच्या अध्यक्ष चषकाची मानकरी ठरलेली आहे.मुलांमध्ये असणाऱ्या चांगल्या वृत्तीचे योग्य मूल्यमापन होऊन त्यांना प्रेरणा प्राप्त झाली तर त्यांचा त्याबद्दलचा आत्मविश्वास वाढतो व त्यामधील यश संपादन करण्याची त्यांना प्रेरणा निर्माण होते परिणामी मुलांना आत्मविश्वास पूर्ण अभिव्यक्ती प्राप्त होते याचाच एक भाग म्हणून या शाळेमध्ये आगळे वेगळे उपक्रम राबवण्यात येतात.आपण सहजासहजी कुठेही न ऐकलेला,वाचलेला उद्योजकिय मानसिकता विकास हा उपक्रम मुलांच्या उद्योजक वृत्तीला प्रोत्साहन देण्यासाठी एन लर्निंग स्किल डेव्हलपमेंट प्रायव्हेट लिमिटेड मुंबई यांज कडून राबवला जातो. कोटक एज्युकेशन फाउंडेशन मुंबई यांस कडून इंग्रजी आकलन

क्षमता वाढण्यासाठी स्पिकिंग इंग्लिश कोर्स मुलांच्या इंग्रजी आकलन व बुद्धिमत्तेला वाव देतो.त्याच बरोबर पायजम फाउंडेशन यांच्या कोडींग व रोबोटिकच्या शिक्षणातून मुले कोडींग शिकत आहे छोट्या छोट्या कमांड देत आहे,रोबोट वर आधारित प्रोजेक्ट तयार करत आहे.रूम टू रीड संस्था यांनी स्वतंत्र ग्रंथालय शाळेला उपलब्ध करून दिलेले आहे. स्तरनिहाय अनेक पुस्तके या ग्रंथालयात उपलब्ध असून मुलांची वाचनाची गती वाढवण्यास अनुकूल आहेत.आजच्या जगात मुलांवरती अध्यात्माचे संस्कार व्हावे म्हणून ओळख ज्ञानेश्वरीची हा जगा वेगळा, कोणत्याही शाळेत कदाचित नसेल असा उपक्रम दर शनिवारी धानोरे शाळेत राबवला जातो.यामध्ये सहावी ते आठवी पर्यंतच्या मुलांना अध्यात्मिक मार्गदर्शन केले जाते. वर्षाच्या शेवटी ज्ञानेश्वर महाराज संस्थान,ज्ञानेश्वर महाराज चरित्र समिती या मुलांचे मूल्यमापन करते. या उपक्रमातून मुलांच्या स्मरणशक्ती आणि पाठांतरात सुधारणा, अध्यात्माची गोडी, सुविचारांची बैठक हे बदल मुलांमध्ये झाल्याचे दिसून आले आहे.जाते.याशिवाय अनेकही ज्ञात अज्ञात संस्था व व्यक्तीचा या शाळेच्या उन्नतीमध्ये अनमोल हातभार लागला आहे.शाळेत छंद वर्ग,रांगोळी,नाटक,विणकाम, शिवणकाम,हरिपाठ,नृत्य,वादन चित्रकला,ओरिगामी इत्यादी उपक्रमातून मुलांच्या ज्ञानाच्या कक्षा विस्तारत आहेत.

**समारोप -**

गाव शाळेत येते आणि शाळा गावात जाते या समीकरणातून ज्ञानमंदिराची सुंदर अशी कलाकृती धानोरे आदर्श शाळेच्या रूपाने उदयास आली. मुख्यमंत्री माझी शाळा ,सुंदर शाळा टप्पा २ अभियानात शाळेने सर्वोच्च शिखर गाठत राज्य स्तरावर प्रथम क्रमांक पटकावून ५१ लक्ष रुपयांचे पारितोषिक मिळवले. स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासक्रमाच्या सुयोग्य नियोजनाची प्रभावी अंमलबजावणी करून स्पर्धा परीक्षा (शिष्यवृत्ती, NMMS, नवोदय) यांमध्ये शाळेचा आलेख वाढता आहे.

**फोटो व व्हिडिओ लिंक -**

https://drive.google.com/drive/folders/1Yq3LUu3UKCqulR0TI-g60c9_83mfjJgl?usp=sharing

----------**----------

# "राष्ट्रीय छात्र सेना - शाळेचा विशेष अविष्कार"

**शाळेचे नाव व पत्ता - उषाराजे हायस्कूल, राजारामपुरी पहिली गल्ली, कोल्हापूर.**

**शाळेचा ईमेल आयडी** - usharajehs@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - सौ.शोभा दिलीप चौधरी.
**मोबाईल क्रमांक** - 9552514481
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - varshamaske7279@gmail.com

**प्रस्तावना -**

करवीर संस्थापिका महाराणी ताराराणी यांच्या नावाने 1945 मध्ये डॉ. व्ही.टी.पाटील तथा काकाजी यांनी ताराराणी विद्यापीठ ही महिला शिक्षण संस्था स्थापन केली. उषाराजे हायस्कूल ही ताराराणी विदयापीठाची एक शाखा आहे. या शाळेत इयत्ता 5 वी ते 10 वी वर्गाच्या 36 तुकड्या असून त्यामध्ये 1833 विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत. संस्थेच्या प्रांगणात उभारलेल्या भद्रकाली महाराणी ताराराणीच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण फील्ड मार्शल सॅम माणिक शॉ यांच्या हस्ते करण्यात आले होते तसेच संस्थेत असणाऱ्या भाई माधवराव बागल यांच्या आर्ट गॅलरीचे उद्घाटन लेफ्टनंट जनरल करीअप्पा यांच्या हस्ते करण्यात आले होते.

विद्यार्थिनींमधील धैर्य, चिकाटी, साहस, नेतृत्व या गुणांना वाव मिळावा यासाठी 1972 मध्ये राष्ट्रीय छात्र सेना म्हणजेच एनसीसीचे 100 कॅडेट क्षमता असलेले 6 महाराष्ट्र गर्ल्स बटालियनचे युनिट मिळाले. 100 गर्ल्स कॅडेटचे युनिट असणारी महाराष्ट्रातील उषाराजे हायस्कूल ही एकमेव शाळा आहे. 2005 पासून उषाराजे हायस्कूल कोल्हापूर येथे विज्ञान शिक्षिका म्हणून रुजू झालेल्या शाळेच्या सहाय्यक शिक्षिका सौ. वर्षा मस्के या एनसीसी सर्टिफिकेट प्राप्त असल्यामुळे त्यांना एन.सी.सी. बद्दल ज्ञान तसेच एन.सी.सी. साठी आवश्यक असणारी शिस्त आणि नियम याविषयी माहिती होती; त्यामुळे संस्थेने त्यांना NCC विभाग प्रमुख म्हणून नियुक्त केले. 2016 पासून एनसीसी सहयोगी अधिकारी म्हणून उत्तमरित्या जबाबदारी सांभाळत आहेत.

NCC मधील शालेय विद्यार्थिनींना ज्युनिअर विंग म्हणून ओळखले जाते. इयत्ता 8 वी व 9 वी तील विद्यार्थिनींना NCC विषय स्व-इच्छेने घेता येतो. दोन वर्षासाठी असलेल्या अभ्यासक्रमात प्रत्येक वर्षी 40 परेड होणे आवश्यक असते. या कॅडेटची ए सर्टिफिकेट परीक्षा ही द्वितीय वर्षाच्या शेवटी घेण्यात येते. त्यानंतर त्यांना ए सर्टिफिकेट दिले जाते.




दोन वर्षाच्या अभ्यासक्रमामध्ये या कॅडेट्सना द्वितीय वर्षापासून कॅम्प करता येतात. एनसीसी मार्फत विविध प्रकारचे कॅम्पचे आयोजन करण्यात येते. RDC, AITSC, EBSE, NIC, ATC, BLC, treking, स्कुबा डाईव्ह, पॅरासिलिंग यासारखे विविध प्रकारचे कॅम्प NCC कडून घेतले जातात. हे कॅम्प दहा ते बारा दिवसांच्या कालावधीचे असतात. नवी दिल्ली येथे होणारे प्रजासत्ताक दिन संचलन (RD परेड कॅम्प) तसेच राष्ट्रीय स्तरावरील थलसैनिक कॅम्प हे मानाचे कॅम्प म्हणून देशभरात ओळखले जातात. या राष्ट्रीय स्तरावरील कॅम्पमध्ये शाळेच्या विद्यार्थिनी सहभागी होणे प्रतिष्ठेचे मानले जाते.

कॅडेट वेलफेअर सोसायटी CWS छात्र सैनिकांसाठी अर्थ सहाय्य पुरवणारी राष्ट्रीय स्तरावरील संघटना आहे. या संघटनेकडून दरवर्षी हुशार, गरीब, होतकरू कॅडेटना शिष्यवृत्ती बहाल केली जाते. विद्यार्थ्यांना आकर्षित करणारा एनसीसीचा खाकी युनिफॉर्म आणि ड्रिल इतक्या मर्यादित स्वरूपात एनसीसी नसून त्यामध्ये एनसीसी ऑर्गनायझेशन, मॅप रीडिंग, फिल्ड अँड बॅटल क्राफ्ट, टेन्ट पिचिंग, हेल्थ अँड हायजिन, लीडरशिप अँड पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट, डिझास्टर मॅनेजमेंट, रायफल शूटिंग असे विविध विषय शिकवले जातात. एनसीसी कडून विविध प्रकारचे लाभ कॅडेट्सना मिळू शकतात. त्यांचा राष्ट्रीय स्तरावर गौरव होऊ शकतो. इतकेच नव्हे तर एनसीसी प्रमाणपत्र मिळवल्यानंतर विविध प्रकारच्या प्रशासकीय सेवेचाही लाभ घेता येतो. ही सर्व माहिती कॅडेट पर्यंत किंबहुना त्यांच्या पालकांपर्यंत पोहोचवणे आवश्यक होते. उषाराजे हायस्कूल मधील NCC कॅडेटना या सर्व संधी मिळाव्यात या हेतूने हा प्रवास सुरु झाला.

**मुख्याध्यापक /शिक्षक यांना विषयासंदर्भात आलेल्या अडचणी -**

1. विद्यार्थिनी आणि पालक यांना NCC उपक्रमाविषयी परिपूर्ण माहिती नव्हती.
2. NCC मध्ये सहभागी झाल्यावर कराव्या लागणाऱ्या कॅम्प संबधी कल्पना नव्हती.
3. CWS कडून मिळणाऱ्या स्कॉलरशिप विषयी अज्ञान होते.
4. राष्ट्रीय कॅम्प मध्ये कॅडेट्स चा विशेष सहभाग नव्हता.


5. शाळेला स्वतःचे NCC ऑफिस व आवश्यक साहित्याची कमतरता होती.

**अडचणीवर मात करण्यासाठी मुख्याध्यापक/शिक्षक यांनी केलेल्या उपाययोजना -**

**NCC मधील संधी विषयी कॅडेट्स आणि पालकांसाठी तज्ञांचे मार्गदर्शन -**

एनसीसी मध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थिनींना एनसीसीच्या इतिहासा सोबत, एनसीसी मध्ये घेतल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या उपक्रमांविषयी तसेच एनसीसीनंतर मिळणाऱ्या नोकरीच्या संधी यांची सविस्तर आणि इत्यंभूत माहिती मिळावी यासाठी एनसीसी विभाग प्रमुख वर्षा मस्के यांनी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. चौधरी मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली विविध तज्ञांच्या व्याख्यानांचे आयोजन विद्यार्थिनींसाठी केले.

एनसीसी आणि थलसेनेशी निगडित असणारे अधिकारी वर्गाचा यामध्ये समावेश होता. एनसीसी युनिटच्या जीसीआय निशा भोसले मॅडम, ऑनररी मेजर रूपा शहा मॅडम, ६ महाराष्ट्र गर्ल्स बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल जे.पी.साकीया सर, कोल्हापूर ग्रुपचे ग्रुप कमांडर ब्रिगेडियर डोग्रा सर यांच्या महत्त्वपूर्ण अशा व्याख्यानांमुळे विद्यार्थ्यांना एनसीसी मध्ये नव्हे तर एनसीसीमुळे प्राप्त होणाऱ्या संधीं विषयी माहिती मिळाली. त्यांचा आत्मविश्वास वाढला. यामुळे विविध कॅम्प करण्यासाठी त्या उत्सुक झाल्या. 2020 व 2022 मध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त नवी दिल्ली येथे झालेल्या आरडी परेड मध्ये सीएसएम पूर्वा पाटील आणि गोल्डन सार्जंट ईश्वरी नेगांधी या सहभागी झाल्या व प्रधानमंत्री बॅनर मिळवण्यामध्ये त्यांनी मोलाचा वाटा मिळवला.



NCC मधील संधीन विषयी तज्ञांचे मार्गदर्शन

https://youtu.be/sXd-3aO2mRc?si=m_gJjlfHqVEBvEZI

**एनसीसी कॅडेटच्या व्यक्तिमत्व विकासासाठी व्याख्यानांचे आयोजन -**

कॅडेटच्या व्यक्तिमत्वाला उभारी यावी म्हणून विविध माध्यमातील तज्ञांच्या व्याख्यानाचे कॅडेट करिता आयोजन केले. यामध्ये शाहीर विशारद डॉ.आझाद नाईकवडी सर, मानसोपचार तज्ञ डॉ. शाल्मली रानमाळे मॅडम या तज्ञांच्या व्याख्यानांचा कॅडेट्सना लाभ झाला. कॅडेट मधील आत्मविश्वास बाणवण्यासाठी मदत झाली.



व्यक्तिमत्व विकासासाठी तज्ञांचे मार्गदर्शन

https://youtu.be/-2lWmau4_VM?si=lhxZke0wZtcF2rmW

## एनसीसी कॅडेटना स्व-संरक्षणाचे धडे -

गर्ल्स कॅडेटना परिस्थितीनुसार स्व-संरक्षण करता यावे यासाठी स्व-संरक्षणाच्या प्रात्यक्षिकांसोबत प्रशिक्षित करण्यात आले.



कॅडेट ना स्व-संरक्षणाचे धडे

https://youtube.com/shorts/luIdsMgcPRI?si=lp8ZFaSSuFYR_zT7

## एनसीसी कॅडेटना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे -

परिसरात येणाऱ्या विविध आपत्तींना तोंड देता यावे यासाठी कॅडेटना जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्ष यांच्या मार्फत कार्य करणाऱ्या शुभांगी घराळे व त्यांच्या सहकारी कोमल कांबळे यांच्या साहाय्याने आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कोरोना काळामध्ये कॅडेटकडून जनजागृती करणाऱ्या व्हिडिओची निर्मिती करून ते यू ट्यूबच्या माध्यमातून प्रसारित करण्यात आले. स्वतः मास्क शिवून त्याचे समाजातील गरजूंना मोफत वितरण देखील केले.



आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेचे आयोजन

https://youtu.be/w4RMv_3u7WQ?si=HXl2J5EHsMaiyBRW

**शस्त्रास्त्र प्रदर्शनाला भेट व कॅडेटकडून डेमो रायफल भेट -**

सेनेशी संबंधित असणाऱ्या शस्त्रास्त्रांची माहिती मिळवण्यासाठी शस्त्रास्त्र प्रदर्शनाला भेटीचे आयोजन करण्यात आले. रायफल शूटिंगमध्ये शास्त्रोक्त प्रशिक्षण मिळावे यासाठी कॅडेटना डेमो रायफल भेट देण्याचे आवाहन करण्यात आले. कॅडेटनी डेमो रायफल शाळेला भेट दिल्या. डेमो रायफलमुळे कॅडेट्साठी रायफल प्रशिक्षण घेणे सोयीचे झाले. याचा परिणाम राष्ट्रीय स्तरावरील थल सैनिक कॅम्प, नवी दिल्ली येथे 2022 व 2023 या दोन वर्षांमध्ये रायफल शुटिंग प्रकारामध्ये गोल्डन सार्जंट मानसी खोंद्रे आणि गोल्डन सार्जंट ऋजुला चव्हाण या दोन कॅडेटनी गोल्ड मेडल पटकावले.



शस्त्रास्त्र प्रदर्शन भेट रायफल शूटिंग प्रशिक्षण

https://youtu.be/CpxckqSDgzM?si=v4hzd1t2SOvh4-g1

**एनसीसी अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन -**

**सरनोबतवाडी परिसर स्वच्छता मोहीम -**



एनसीसी विद्यार्थ्यांची सरनोबतवाडीत स्वच्छता

सकाळ वृत्तसेवा

टेंबलाईवाडी, ता. २५ : ताराराणी विद्यापीठाच्या उषाराजे हायस्कूल मधील एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी सरनोबतवाडी येथे स्वच्छता मोहीम राबवली. १७ सप्टेंबर ते दोन ऑक्टोबर हा महास्वच्छता पंधरावडा साजरा करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी ही स्वच्छता मोहीम राबवली.

एनसीसीच्या विद्यार्थ्यांना लष्करी शिस्त शिकवत असतानाच सामाजिक बांधिलकीही शिकवण्यात येते. श्रम प्रतिष्ठा, सामाजिक जबाबदारी पेलताना आवश्यक सहभाग याचा विकास करण्यासाठी एनसीसी क्षेत्रांना प्रशिक्षण दिले जाते. यासाठी विविध सामाजिक कामात त्यांना सहभागी करण्यात येते. यावेळी स्वच्छता पंधरावाड्या निमित्त या एनसीसीच्या मुलांनी स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला. सरनोबतवाडी येथील गोरखनाथ मठ व रेणुका मंदिर परिसराची या सर्वांनी स्वच्छता केली. यावेळी स्वच्छता रॅलीचेही आयोजन करण्यात आले होते. प्लास्टिकचा वापर टाळा, स्वच्छ भारत सुंदर भारत, कचरा व्यवस्थापन घरच्याघरी याविषयी नागरिकांमध्ये जागृती करण्यात आली. कॅडेट रमा देशपांडे व एनसीसी अधिकारी वर्षा मस्के यांनी प्लास्टिकमुक्त भारत बनवण्याचे नागरिकांना आवाहन केले.

या कार्यक्रमाचे आयोजन उषाराजे हायस्कूलच्या एनसीसी अधिकारी वर्षा मस्के यांनी केले. यावेळी जीसीआय निशा भोसले, गोरखनाथ मठाचे व्यवस्थापक, ग्रामपंचायत पदाधिकारी उपस्थित होते. या उपक्रमासाठी सहा महाराष्ट्र गर्ल्स बटालियनचे कमांडिंग ऑफिसर मोहन तिवारी, मेजर गुगामालती, ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील, सचिव प्राजक्ता पाटील, मुख्याध्यापिका ए. यू. साठे, एस. डी. चौधरी यांनी मार्गदर्शन केले.

महास्वच्छता अभियान

सरनोबतवाडी : येथे स्वच्छता मोहिमेसाठी आलेले एनसीसीचे विद्यार्थी.

सरनोबतवाडी परिसर स्वच्छता मोहीम

https://youtu.be/vNxmLxb8YuU?si=UtjjbVwiZ4umx1pF

## प्लास्टिक मुक्त भारत अभियानाचे आयोजन -



प्लास्टिक मुक्त भारत अभियान

https://youtu.be/K3NUyu9zKH4?si=AoRSsOobIsPCHrfP

## प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित संचलनामध्ये सहभाग -




https://youtu.be/_Pn3BACC6ec?si=GkYn1LwzF69tHydX

## एनसीसी कॅडेटद्वारे परिसरामध्ये वृक्षारोपण मोहीम -




वृक्षारोपण

https://youtu.be/uxtCn_yug8s?si=grPUiTje1Pvh-imq

## NCC दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन -



लोकमत कोल्हापूर, शनिवार, दि. २ डिसेंबर २०१७

### एनसीसी प्रशिक्षण हा आयुष्याचा ठेवा

**रुपा शहा : शिबिरात यश संपादन केलेल्या छात्रसैनिकांचा सत्कार**

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : गुणवत्तापूर्ण व्यक्तिगत व सामाजिक जीवनासाठी एनसीसी प्रशिक्षण म्हणजे आयुष्यभराचा ठेवा आहे, असे प्रतिपादन 'एनसीसी'च्या ऑनरी मेजर डॉ. रुपा शहा यांनी केले.

राष्ट्रीय छात्रसेना दिनानिमित्त उषाराजे गर्ल्स हायस्कूल येथे आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका एम. व्ही. जाधव होत्या.

शहा म्हणाल्या, सुंदर भविष्याच्या जडणघडणीत बीजे सशक्त करण्याचे काम राष्ट्रीय छात्रसेनेकडून होते. छात्रसैनिकांना दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाबद्दल तपशील सांगून त्यांनी व्यक्तिमत्व विकास कसा घडून येते, हे उदाहरणासह स्पष्ट केले. यावेळी हायस्कूलमधील एनसीसी युनिटमधे नव्याने प्रवेश घेतलेल्या छात्रसैनिक



कोल्हापुरातील उषाराजे गर्ल्स हायस्कूलमध्ये राष्ट्रीय छात्रसेना दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात ऑनरी मेजर डॉ. रुपा शहा यांनी मार्गदर्शन केले. यावेळी वर्षा मस्के, एम. व्ही. जाधव, ए. यू. साठे, एस. डी. चौधरी, व्ही. डी. जमेनीस उपस्थित होत्या.

विद्यार्थिनींचे स्वागत, वार्षिक प्रशिक्षण शिबिरामध्ये यश संपादन केलेल्या छात्रसैनिकांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे संयोजन एनसीसी अधिकारी वर्षा मस्के यांनी केले होते. प्रणोती उलपे हिने आभार मानले. यावेळी उपमुख्याध्यापिका ए. यू. साठे, एस. डी. चौधरी, व्ही. डी. जमेनीस, आदी उपस्थित होत्या. सूत्रसंचालन नेहा पाटील हिने, तर सिद्धी हुंबे, आदिती लाड, संस्कृती रायकर, रजनी यादव यांनी कार्यक्रमासाठी पुढाकार घेतला होता.

एनसीसी दिवस

https://youtu.be/fP50xww7QQA?si=nQCSAH6W_kFL5KK7

## कोरोना काळातील आपत्ती व्यवस्थापन -



कोरोना काळातील आपत्ती व्यवस्थापन

https://youtu.be/kchupuQPn-4?si=6zYmg9OC6U5H7AND

## आजादी का अमृत महोत्सव उपक्रमाचे आयोजन -



आजादी का अमृत महोत्सव

https://youtu.be/sslkKs5WwvY?si=5aGGHw7j1kJLyC85

**राष्ट्रीय कॅम्पमध्ये सहभाग व यश -**

उषाराजे हायस्कूलच्या एनसीसी कॅडेटनी विविध प्रकारच्या राष्ट्रीय स्तरावरील कॅम्पमध्ये सहभाग घेतलाच त्याबरोबर उज्वल यश देखील संपादन केले. प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित केल्या जाणाऱ्या आरडी परेड कॅम्प दिल्ली येथे सीएसएम पूर्वा पाटील (2022) व गोल्डन सार्जट ईश्वरी नेगांधी (2023) यांनी प्रधानमंत्री बॅनर मिळवण्यामध्ये सहभाग नोंदवला. राष्ट्रीय स्तरावरील थल सैनिक कॅम्पमध्ये गोल्डन सार्जंट मानसी खोंद्रे (2022) व ऋजूला चव्हाण (2023) रायफल शूटिंग प्रकारात गोल्ड मेडल पटकावले. माननीय राज्यपालांच्या हस्ते सत्कारही स्वीकारला.




राष्ट्रीय स्तरावरील कॅम्पमध्ये सहभाग आणि यश

https://youtu.be/i4gFE9OthHk?si=BMccOWoq2q12nymr

**एनसीसी ऑफिस उभारणी -**

NCC सहयोगी अधिकारी फर्स्ट ऑफिसर वर्षा मस्के यांचे प्रयत्न आणि कॅडेटना मिळणारे यश लक्षात घेऊन तारांराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष आदरणीय डॉ. क्रांतिकुमार पाटील साहेबांनी आणि शाळेच्या आदरणीय मुख्याध्यापिका सौ. चौधरी मॅडम यांनी शाळेला NCC ऑफिस साठी जागा आणि आवश्यक त्या सुविधा दिल्या.

NCC ऑफिससाठी लागणारे सर्व बॅनर व मूलभूत गरजा NCC अधिकारी वर्षा मस्के यांनी पूर्ण केल्या. गोल्डन सार्जंट मानसी खोंद्रे हिच्या पालकांनी ऑफिससाठी लागणारा मोठ्ठा आरसा भेट दिला.

ऑफिससाठी घड्याळ गोल्डन सार्जंट ईश्वरी नेगांधी हिने भेट दिले. इतकेच नव्हे तर पालकांना केलेल्या आवाहनानुसार एनसीसी कॅडेटच्या पालकांनी ई लर्निंग साठी एलसीडी प्रोजेक्टर शाळेला भेट दिला.



**फलनिष्पत्ती -**

**उषाराजे हायस्कूलच्या NCC कॅडेटना मिळालेल्या विविध स्कॉलरशिप /अवॉर्ड -**



कोल्हापूर : स्कॉलरशिपप्राप्त विद्यार्थिनींबरोबर डॉ. क्रांतिकुमार पाटील आदी.

## उषाराजे हायस्कूलच्या आठ छात्रांना शिष्यवृत्ती

**कोल्हापूर** : राष्ट्रीय छात्र संघटना 'एनसीसी'च्या कॅडेट वेल्फेअर सोसायटी दिल्लीतर्फे गरीब, होतकरू एनसीसी कॅडेटना दरवर्षी प्रत्येकी सहा हजार रुपयेप्रमाणे शिष्यवृत्ती दिली जाते. यावर्षी उषाराजे हायस्कूलच्या आठ विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती मिळाली. सलग पाच वर्षे उषाराजेच्या विद्यार्थिनींना ही शिष्यवृत्ती मिळत असून, यासाठी एनसीसी विभागप्रमुख सेकंड ऑफिसर वर्षा मस्के यांचे मार्गदर्शन ठरले. यावर्षी ४८ हजारांची शिष्यवृत्ती

उषाराजे हायस्कूलच्या शिष्यवृत्तीधारक एनसीसी छात्रांचा सत्कार डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापिका एम. व्ही. जाधव, उपमुख्याध्यापिका ए. यु. साठे, एनसीसी अधिकारी वर्षा मस्के, आदी उपस्थित होते.

## उषाराजे हायस्कूलच्या एनसीसीच्या छात्रांना सलग तीन वर्षे शिष्यवृत्ती

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : राष्ट्रीय छात्र संघटना एनसीसीच्या कॅडेट वेलफेअर सोसायटीतर्फे गरीब व होतकरू कॅडेटना दरवर्षी प्रत्येकी सहा हजार रुपयेप्रमाणे शिष्यवृत्ती दिली जाते. यादी वर्षी उषाराजे हायस्कूलच्या सहा अंकिता फडतारे, संगीता पोवार, रिया पाटील, अपूर्वा माळवेकर, अनुष्का शेटे यांना मिळाली आहे. या धनादेशाचे वितरण ६ महाराष्ट्र गर्ल्स बटालियनचे कमांडिंग ऑफीसर कर्नल जे. पी. साकिया यांच्या हस्ते करण्यात आले. शिष्यवृत्तीधारक विद्यार्थिनींचा सत्कार ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी

कोल्हापूर : प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील व मुख्याध्यापिका एम. व्ही. जाधव यांच्यासमवेत शिष्यवृत्तीधारक विद्यार्थिनी.

## 'उषाराजे'च्या एनसीसी छात्रांना शिष्यवृत्ती

**कोल्हापूर** : राष्ट्रीय छात्र संघटनेच्या 'कॅडेट वेलफेअर सोसायटी'तर्फे गरीब व होतकरू छात्रांना प्रत्येकी सहा हजार शिष्यवृत्ती दिली जाते. यावर्षी उषाराजे हायस्कूलच्या सात विद्यार्थिनींना ही शिष्यवृत्ती मिळाली. यामध्ये वैष्णवी जाधव, प्रतीक्षा नायकवडे, निशा पवार, साक्षी भोसले, श्वेता पाटोळे, नेहा पाटील व पूर्वा थोरे यांचा समावेश आहे. तसेच केंद्र शासनाकडून 'स्टेट गव्हनर्मेंट स्कॉलरशिप' एनसीसी छात्रांना दिली जाते. यावर्षी प्रज्ञा रजपूत व सानिका सोकासने या दोन छात्रांना ही स्कॉलरशिप

कोल्हापूर : उषाराजे हायस्कूलच्या दहावीतील राष्ट्रीय कॅडेट कोर (एन.सी.सी.) विद्यार्थिनींचा शिष्यवृत्ती मिळाल्याबद्दल सत्कार करताना ताराराणी विद्यापीठाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील व इतर.

## उषाराजे हायस्कूलच्या एन.सी.सी.च्या पाच विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती

**कोल्हापूर (प्रतिनिधी)** : उषाराजे हायस्कूलच्या दहावीतील राष्ट्रीय कॅडेट कोर (एन.सी.सी.) विद्यार्थिनींना नवी दिल्ली येथील कॅडेट वेल्फेअर सोसायटीची प्रत्येकी सहा हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळाली आहे. यात सानिया सोकासने, वेदा बडिगेर,

| अनु. क्र. | वर्ष | मिळालेला स्कॉलरशिप /अवॉर्ड | स्कॉलरशिप/अवॉर्ड मिळवणाऱ्या कॅडेट ची संख्या | स्कॉलरशिप रक्कम प्रत्येकी (रुपये) | एकूण स्कॉलरशिप (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 2017 | कॅडेट वेलफेयर सोसायटी (CWS) | 05 | 6000/- | 30000/- |
| 2. | 2018 | कॅडेट वेलफेयर सोसायटी (CWS) | 07 | 6000/- | 42000/- |
| | | स्टेट गव्हर्मेंट स्कॉलरशिप | 02 | 500/- | 1000/- |
| 3. | 2019 | कॅडेट वेलफेयर सोसायटी (CWS) | 06 | 6000/- | 36000/ |
| 4. | 2021 | कॅडेट वेलफेयर सोसायटी (CWS) | 02 | 6000/- | 12000/- |
| 5. | 2022 | कॅडेट वेलफेयर सोसायटी (CWS) | 08 | 6000/- | 48000/- |
| 6. | 2023 | कॅडेट वेलफेयर सोसायटी (CWS) | 01 | 6000/- | 6000/- |
| 7 | 2024 | कॅडेट वेलफेयर सोसायटी (CWS) | 02 | 6000/- | 12000/- |
| | | बेस्ट कॅडेट अवॉर्ड | 01 | 4500/- | 4500/- |
| | | | | **एकूण रक्कम(रुपये)** = 191500/- | |

## NCC कॅडेट चा राष्ट्रीय स्तरावरील कॅम्प मधील सहभाग

| अनु. क्र. | वर्ष | कॅम्पचे नाव | ठिकाण | सहभागी कॅडेट संख्या | उल्लेखनीय |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2017 | NIC (National integration camp) | सातारा | 10 | राष्ट्रीय स्तरावरील कॅम्प सहभाग |
| 2. | 2019 | All India trekking camp | उटी | 02 | राष्ट्रीय स्तरावरील ट्रेकिंग कॅम्प सहभाग |
| 3. | 2020 | RDC (Republic day camp) | नवी दिल्ली | 01 | राष्ट्रीय स्तरावर प्रधानमंत्री बॅनर विजेता संघ |
| 4. | 2022 | AITSC (All india thal sainik camp) | नवी दिल्ली | 01 | रायफल शूटिंग राष्ट्रीय स्तरावर गोल्ड मेडेल राज्यपालाच्या हस्ते सत्कार |
| 5. | 2023 | RDC (Republic Day camp) | नवी दिल्ली | 01 | राष्ट्रीय स्तरावर प्रधानमंत्री बॅनर विजेता संघ |
| 6. | 2023 | AITSC (All India thal sainik camp) | नवी दिल्ली | 01 | रायफल शूटिंग राष्ट्रीय स्तरावर गोल्ड मेडेल. |
| 7. | 2024 | EBSB (Ek bharat sreshth bharat ) | जळगाव | 02 | राष्ट्रीय स्तरावरील कॅम्प सहभाग. |



न्यूज Inbox

## मानसीची थल सैनिक शिबिरासाठी निवड

कोल्हापूर : सहा महाराष्ट्र गर्ल्स बटालियन, कोल्हापूरची छात्रा मानसी अजित खोंद्रे हिची दिल्ली येथे १४ ते २४ सप्टेंबरच्या दरम्यान होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील थल सैनिक शिबिरासाठी निवड झाली. ती उषाराजे हायस्कूलची विद्यार्थिनी असून, तिची फायरिंग प्रकारातून या शिबिरासाठी निवड झाली आहे. मानसीला सहा महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल एस. गणपती, मेजर ए.गुंगामालती, सुभेदार मेजर सचिन पाटील, सुभेदार मेजर वारंग, वर्षा मस्के यांचे मार्गदर्शन लाभले.

## ईश्वरी नेगांधी हिची परेडसाठी निवड

कोल्हापूर : प्रजासत्ताक दिनानिमित्त २६ जानेवारीस नवी दिल्ली येथे होणाऱ्या परेडसाठी येथील उषाराजे हायस्कूल व सहा महाराष्ट्र गर्ल्स बटालियन


## प्रजासत्ताकदिनी संचलनासाठी पूर्वा पाटील हिची निवड

पूर्वा पाटील

कोल्हापूर : प्रजासत्ताकदिनी नवी दिल्ली येथे होणाऱ्या संचलनासाठी उषाराजे हायस्कूलची विद्यार्थिनी पूर्वा एकनाथ पाटीलची निवड झाली आहे. पूर्वा नववीत शिकत आहे. एनसीसीच्या ६ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन कंपनी सार्जंट मेजर आहे. कोल्हापूर विभागातून या संचलनासाठी दहा विद्यार्थ्यांची निवड झाली. माजी विक्रीकर अधिकारी एकनाथ पाटील यांची ती कन्या आहे. तिला कमांडिंग ऑफिसर कर्नल तिवारी, सीनियर जीसीओ निशा भोसले, प्रशासक मेजर गुंगा मालती, उषाराजे हायस्कूलच्या एनसीसी विभागप्रमुख सेकंड ऑफिसर वर्षा मस्के, संगीत शिक्षक शाहीर विशारद आझाद नायकवडी, मुख्याध्यापिका ए. यु. साठे, उपमुख्याध्यापिका एस. डी. चौधरी, व्ही. डी. जमेनिस, एस. के. तारांराणी विद्यापीठाचे कार्यकारी

**विविध स्तरावरील NCC कॅडेटचे सत्कार व ADG NCC यांचे अभिनंदनपर पत्र -**





मेजर जनरल योगेंद्र प्रसाद खंडूड़ी
अपर महानिदेशक
**Maj Gen Y P Khanduri**
Addl Director General

Tel: 22016225 / 22092138
Email: adg.maha@nccindia.nic.in

राष्ट्रीय कैडेट कोर निदेशालय महाराष्ट्र
ए.एफ आय बिल्डिंग, बॉम्बे हास्पिटल लेन,
धोबीतलाव, मुंबई - ४०० ०२०.

NCC Directorate Maharashtra
AFI Building, Bombay Hospital Lane,
Dhobi Talao, Mumbai - 400 020

9030/NCC/Trg/RDC-23

23 Mar 2023

**Mrs Shobha Dilip Choudhary**
**Principal**
Usharaje High School
1215, E Ward,
Rajarampuri Karveer Taluk,
Kolhapur, Maharashtra 416008

Dear Principal,

1. It is a matter of immense pride and honor for all of us that the NCC Directorate Maharashtra has become Champion Dte again for the 19th time and received the Prime Minister's Banner. This was possible due to the unstinted support and cooperation from your esteemed college, under your able stewardship.

2. I am writing this letter to acknowledge and appreciate each and every one in your college who groomed and guided **Cdt Negandhi Ishwari Punit** who was one of the pillars during the journey to Kartavaya Path and achieving glory for the Directorate and the College.

3. I would also like to put on record the exemplary motivation and efforts of **ANO S/O Varsha Suryakant Maske** from your college who supported the contingent and the cadets at all times and inspired them to manage the tough schedule of academics and NCC training.

4. May I request you to felicitate **Cdt Negandhi Ishwari Punit** and **S/O Varsha Suryakant Maske** at an appropriate function in your college.

Warm regards

Yours Sincerely

**ग्रुप स्तरावर बेस्ट कॅडेट स्कॉलरशिप मिळविण्याचा बहुमान**



उषाराजे हायस्कूलची विद्यार्थिनी ऋजुला चव्हाण हिची बेस्ट कॅडेट म्हणून निवड झाली. तिचा ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्या हस्ते सत्कार झाला. यावेळी मुख्याध्यापिका एस. डी. चौधरी, उपमुख्याध्यापिका व्ही. डी. जमेनीस, आदी उपस्थित होते.

## 'उषाराजे'ची ऋजुला चव्हाण ठरली बेस्ट कॅडेट

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : सहा महाराष्ट्र गर्ल्स बटालियनची कॅडेट आणि उषाराजे हायस्कूलची विद्यार्थिनी गोल्डन सार्जंट ऋजुला रणजित चव्हाण हिची कोल्हापूर ग्रुपची बेस्ट कॅडेट म्हणून निवड झाली.

ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्या हस्ते तिचा सत्कार झाला. मुख्याध्यापिका एस. डी. चौधरी, उपमुख्याध्यापिका व्ही. डी. जमेनीस उपस्थित होत्या. या संघटनेच्या माध्यमातून दरवर्षी बेस्ट कॅडेट अवॉर्ड आणि कॅडेट वेल्फेअर सोसायटीतर्फे शिष्यवृत्ती दिली जाते. बेस्ट कॅडेटला अवॉर्ड म्हणून ४५००, कॅडेट वेल्फेअर सोसायटीतर्फे ६ हजार रुपये शिष्यवृत्ती दिली जाते.

नवी दिल्लीच्या कॅडेट वेल्फेअर सोसायटीतर्फे ऋतुजा लोकरे, कॅडेट समीक्षा येसणे यांना प्रत्येकी सहा हजार, अशी एकूण १२ हजारांची शिष्यवृत्ती मिळाली. बेस्ट कॅडेट अवॉर्ड, कॅडेट वेल्फेअर सोसायटी स्कॉलरशिप अवॉर्डचे वितरण सहा महाराष्ट्र गर्ल्स बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल संधान मिश्रा यांच्या हस्ते झाले. कॅडेटना उषाराजे हायस्कूलच्या एनसीसी विभाग प्रमुख फर्स्ट ऑफिसर वर्षा मस्के यांचे मार्गदर्शन, एनसीसी युनिटच्या बाकल यांचे सहकार्य लाभले.

Congratulations Beta

**समारोप -**

यशाची परंपरा असणाऱ्या उषाराजे हायस्कूलच्या मुख्याध्यापिका आदरणीय सौ.चौधरी मॅडम यांच्या मार्गदर्शनामुळे सहयोगी NCC अधिकारी वर्षा मस्के यांना सतत प्रोत्साहन आणि काम करण्याची प्रेरणा मिळाली. 2016 पासून 2023 पर्यंत नवी दिल्ली येथे झालेल्या प्रजासत्ताक दिन संचलन व थल सैनिक कॅम्पमध्ये एकूण चार विद्यार्थिनींनी सहभाग घेतला व उज्वल यश संपादन केले. कॅडेट वेल्फेअर सोसायटी मार्फत 1 लाख 21 हजार रुपयांची भरघोस स्कॉलरशिप कॅडेटना मिळाली. विविध उपक्रम, कार्यशाळा यामधून कॅडेटचा व्यक्तिमत्व विकास होण्यास मदत झाली. याचेच फलित म्हणजे शाळेच्या NCC कॅडेट या कला, क्रीडा, शैक्षणिक आणि सामाजिक अशा विविध क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत आहेत.

----------**----------

## "विषय निहाय - वाचन कोपरे आणि प्रयोगशाळा"

**शाळेचे नाव व पत्ता - कन्या विद्या मंदिर, कळे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर**

**शाळेचा ईमेल आयडी** - kishorichougale@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री दिनकर दादू हंकारे
**मोबाईल क्रमांक** - 9049649911
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - kishorichougale@gmail.com




**प्रस्तावना** -

कन्या विद्या मंदिर कळे शाळेची स्थापना 1983 ला झाली आहे. कळे गावामध्ये इयत्ता पाचवी ते दहावी या वर्गात असणाऱ्या मराठी इंग्रजी माध्यमाच्या आणि खाजगी शाळा आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद शाळेचा कायापालट मोठ्या जबाबदारीचे काम आहे त्यामुळे मुख्याध्यापक श्री हंकारे सर व किशोरी चौगुले यांनी काही बदल सुचवले. दरवर्षी विविध उपक्रम राबवणाऱ्या कन्या विद्या मंदिर कळे शाळेमध्ये विषय निहाय वाचन कोपरे वर्गवार करण्याचे ठरवले. त्याशिवाय विषय वार प्रयोगशाळेची संकल्पना मांडण्यात आली. त्यानंतर सर्व शिक्षकांची मीटिंग घेऊन प्रत्येकाला त्यांच्यावर असणाऱ्या जबाबदारीचे वाटप केले.

इयत्ता पहिली ते सातवी सर्व वर्गामध्ये विविध प्रकारचे वाचन कोपरे साकार करण्यात आले. यामध्ये चित्र वाचन, पुस्तक वाचन त्याचप्रमाणे डिजिटल बोर्ड वाचन इत्यादी विविधता होती.

कन्या विद्यामंदिर कळे ही ग्रामीण भागातील शाळा आहे. या ठिकाणी शाळेतील विद्यार्थ्यांची ग्रामीण बोलीभाषा आहे. जिल्हा परिषद शाळा असल्यामुळे त्यांना सर्व सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात, शिक्षणात होणारे अनेक बदल त्यांच्यापर्यंत अनेक विविध उपक्रमामार्फत पोहोचवण्यासाठी आणि परिसरातील इतर शाळांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना सर्व विषयाशी संबंधित सखोल ज्ञान मिळण्याच्या हेतूने हा प्रवास सुरु झाला. वाचाल तर वाचाल या उक्तीप्रमाणे विद्यार्थ्याच्या समोरच वाचन साहित्य उपलब्ध असेल तर त्याला वाचण्यासाठी मोठ्या सुट्टीमध्ये वेळ मिळेल. शाळेच्या परिसरामध्ये अगदी हसत खेळत त्याला या वाचन कोपऱ्याचा लाभ घेता येईल.

ग्रंथालयात जाऊन पुस्तक घेणे ते नोंदवणे ते दिल्यानंतर परत करणे इत्यादी औपचारिक गोष्टीतून त्याची सुटका होऊन त्याला त्याच्या मर्जीप्रमाणे कोणतेही पुस्तक कधीही वाचता येऊ लागले. शासनाकडून आलेल्या गणित भाषा आणि इंग्रजी पेट्या दिवसेंदिवस तशाच बंद परिस्थितीत होत्या. त्या पेट्यांची कुलपातून सुटका करून भाषा गणित विज्ञान विषयातील संकल्पना समजण्यासाठी विषयावर प्रयोगशाळेचा प्रवास सुरू झाला. या विषयावर प्रयोगशाळेतून विद्यार्थ्यांना विषयानुसार त्या त्या विषयाशी संबंधित विविध मॉडेल्स किंवा प्रतिकृती हाताळता येऊ लागल्या आणि शब्द पट्ट्या अंक पट्ट्या त्याचप्रमाणे अक्षर कार्ड यांचाही वापर अध्यापन अध्ययनामध्ये होऊ लागला.




**मुख्याध्यापक /शिक्षक यांना विषयासंदर्भात आलेल्या अडचणी -**

1. वाचन कोपऱ्यासाठी लागणारी पुस्तके.
2. विविध विषयाच्या प्रयोगशाळासाठी लागणारे साहित्याची मांडणी
3. डिजिटल चार्ट ची उपलब्धता
4. वर्गवार प्रत्येक विषयानुसार वाचन कोपऱ्याने प्रयोग साहित्याची मांडणी

**अडचणीवर मात करण्यासाठी मुख्याध्यापक/शिक्षक यांनी केलेल्या उपाययोजना -**

1. प्रथम विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार वाचनालयातील पुस्तकांची निवड केली
2. साहित्यामध्ये वैविध्यपूर्ण मांडणी करून वाचन कोपरे तयार केले.
3. शिक्षक आणि सोनी मी तयार केलेल्या साहित्याचाही वापर यामध्ये करण्यात आला
4. प्रत्येकी तेथील वयोगटानुसार मूलभूत घटक समजण्यासाठी अध्ययन सराव पुस्तिका तयार करण्यात आली.

5. वाढदिवसाचा एक उपक्रम म्हणून विद्यार्थी वाचन चळवळ उभा केली त्यातही विद्यार्थ्यांनी भेट दिलेल्या पुस्तकांचा समावेश होता.
6. इंग्रजी मधील शंभर पुस्तकांचा इंग्रजी लायब्ररी मध्ये समावेश करून तिचा परिचय विद्यार्थ्यांना देण्यात आला. ती पुस्तके वाचण्याचे वेळापत्रक ठरवून देण्यात आले.
7. प्रत्येक वर्गाच्या तासिकेप्रमाणे शिक्षक भाषा गणित इंग्रजी प्रयोगशाळेचा वापर करू लागले.
8. वर्गवार वाचन मुक्त ठेवण्यात आले.
9. एक दिवस शाळेसाठी या उपक्रमातील पालकांचे वाचन चळवळीचे योगदान घेतले.




**वाचन कोपरे आणि विविध प्रयोगशाळेचा प्रत्यक्ष परिणाम -**

1. विविध विषयातील वयोगटानुसार पुस्तके वापरल्यामुळे मुलांचे अनुभव विश्व समृद्ध झाले.
2. मुक्त वाचनालय या संकल्पनेमुळे मुले दुपारच्या सुट्टीमध्ये व ऑफ तासाला पुस्तकांचे वाचन करू लागली
3. शिक्षक स्वनिर्मित साहित्य वापरल्यामुळे अध्ययन अध्यापनाची प्रक्रिया आनंदही झाली
4. विविध प्रयोगशाळेमध्ये गणित भाषा इंग्रजी पेट्यांचा अध्ययन प्रक्रियेमध्ये दररोज वापर होऊ लागला
5. इंग्रजी शंभर पुस्तकाच्या वाचनालयामुळे इंग्रजी वाचनाची आवड निर्माण झाली
6. शाळेतील साहित्य स्वतः हाताळल्यामुळे मुलांचे कृती अध्ययन चांगले होऊ लागले.






**समारोप -**

अशाप्रकारे कन्या विद्यामंदिर कळे शाळेमध्ये विषय निहाय वाचन कोपरे आणि विषय निहाय प्रयोगशाळा हा उपक्रम मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षक वृंद यांच्या अथक परिश्रमामुळे चांगल्या पद्धतीने सफल झाला.

https://youtube.com/shorts/LyiqCLmykyc?si=_LQ7wsZZ8qu_dRJj

----------**----------

# "बहुभाषिक विद्यार्थी विकासात शाळेचे योगदान"

**शाळेचे नाव व पत्ता - कुमार विद्या मंदिर, गांधीनगर नंबर 3.,गांधीनगर, ता.करवीर, जि.कोल्हापूर.**

**शाळेचा ईमेल आयडी** - kumargandhinagar3@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्रीम.मीना पास्कू रेगे
**मोबाईल क्रमांक** - 9623513383
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - regemeena67@gmail.com

**प्रास्ताविक -**

कुमार विद्या मंदिर गांधीनगर नं. ३ ही एक आव्हानात्मक शाळा.जिथे संपूर्ण भारत सामावला आहे...याशिवाय नेपाळचेही विद्यार्थी इथे आहेत...आपल्या उदरनिर्वाहासाठी इतक्या दूरवर येऊन झोपडपट्टीत राहणारी माणसं...ज्यांना पोटासाठी अविरत कष्टाशिवाय पर्याय नाही...अशा या पालकांच्या पाल्यांचा शोध घेऊन त्यांना शाळेत आणणे व त्यांना योग्य वळण लावून ज्ञानदान करणे ही कसरतही आनंदाने करण्यास याच चिमुकल्यांचे निरागस चेहरे प्रेरित करतात...

आमची शाळा म्हणजे कर्नाटक, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, तेलंगणा आणि महाराष्ट्र अशा विविध प्रांतातील तसेच नेपाळमधील विद्यार्थ्यांची एकत्रितपणे वाहणारी ज्ञानगंगाच आहे.

या शाळेमध्ये बहुभाषिक विद्यार्थ्यांचा समावेश आहे. इथं दाखल होणारं प्रत्येक मूल म्हणजे एक कथा असते. मोलमजुरी करून पोट भरण्यासाठी आलेले पालक आणि त्या पालकांच्या पर्यंत पोहोचून त्यांचे पाल्य शाळेत आणण्यासाठी धडपडणारे शिक्षक यांची खरी कसोटी असते.

आमच्या शाळेमध्ये अशी मुलं टिकवण्याचं काम सर्व शिक्षक करतात.नवीन प्रवेश घेणारं प्रत्येक बालक एका आगळ्यावेगळ्या विश्वातून आलेलं असतं. अशा अनेक मुलांना प्रथम तर मराठी भाषा काही समजत नसते.हिंदी भाषा थोडी थोडी समजते आणि जिथे आपली मातृभाषा नाही अशा ठिकाणी प्राथमिक शिक्षण घेण्यासाठी आलेल्या चिमुकल्यांना पाहून असं वाटतं, यांना यांचा अधिकार मिळाला पाहिजे. यांना हे प्राथमिक शिक्षण 100% मिळालं पाहिजे याच उद्देशाने प्रेरित होऊन आमचा एक- एक शिक्षक या मुलांसाठी कार्यरत असतो आणि मग सुरू होतो आम्हा शिक्षकांचा एक नवा प्रवास...

**समस्या -**

1. पालकांचे अज्ञान व शिक्षणाबद्दल निरुत्साह
2. पालकांची व्यसनाधीनता व घरातील कलुषित वातावरण
3. विविध भाषेमुळे येणाऱ्या अध्ययनातील अडचणी

4. स्वच्छतेबद्दलच्या जाणीव जागृतीचा अभाव
5. बहुभाषिकतेमुळे बालकांमध्ये निर्माण झालेला न्यूनगंड व संकुचित वृत्ती
6. गरिबीमुळे विकासात येणाऱ्या अडचणी
7. आर्थिक अडचणीमुळे राहणीमानातील मागासलेपणा

**समस्यावरील उपाययोजना -**

1. प्रत्येक घरभेट देऊन पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यात येते.
2. घरातील स्त्री शिकली पाहिजे तरच ती आपल्या मुलाबाळांना शिक्षण देऊ शकते म्हणून अशा स्त्रियांना शाळेमध्ये माता पालक सखी मंच अशा वेगवेगळ्या कार्यक्रमाद्वारे मार्गदर्शन करून या महिला भगिनींना शिक्षणाच्या प्रवाहात आणून सोबत त्यांच्या मुलांच्या शिक्षणात ही त्यांची मदत व्हावी यासाठी प्रयत्न केले जातात.
3. विविध संस्था व दानशूर व्यक्तींच्या माध्यमातून शैक्षणिक साहित्य मिळवून ते साहित्य मोफत देऊन पालकांचा आर्थिक भार कमी करण्यासाठी प्रयत्न केला जातो.
4. मुलांच्या शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन जर मुले शिकली तर उद्या आपल्या कुटुंबाचे भविष्य सुरक्षित आहे याची जाणीव वडिलांना करून दिली जाते.
5. मुलांचा घरचा अभ्यास हा शाळेच्या वेळेतच पूर्ण करून घेतला जातो जेणेकरून मुलांचा सराव होण्यास मदत होते.
6. अस्वच्छ वातावरण यामुळे मुलांना होणारे रोग याची माहिती देऊन स्वच्छता व स्वच्छतेचे महत्त्व विविध मान्यवरांच्या मार्गदर्शनातून पटवून देण्यात येते.
7. मुले बहुभाषिक असल्यामुळे सर्वांना देशाची राष्ट्रभाषा म्हणून हिंदी याचा परिचय आहे म्हणून या भाषेचा वापर करून मुलांना शिक्षण दिल्यामुळे ही भाषा सहज सोपी असल्याने सर्वच मुले या भाषेतून शिकण्याविषयी गोडी दाखवतात.

**बालकांचा शोध अन् पालकांना बोध...**

दूरवर पोट भरण्यासाठी आलेले लोक... काहीही काम नसणाऱ्यांनी काम मिळवून कमावलेल्या पैशांमध्ये आपला उदरनिर्वाह करणे. एवढेच काय ते पालकांना ठाऊक...कारण स्वतःही न शिकलेले किंवा कमी शिकलेले.... मग ते मुलांना तरी काय शिकवणार? अशा पालकांचा शोध घेऊन, त्यांच्याशी

संपर्क साधून हिंदी या आपल्या राष्ट्रभाषेच्या माध्यमातून त्यांना शाळेच्या, शिक्षणाच्या महत्त्वाची जाणीव करून देऊन ती मुलं शाळेत आणणं आणि टिकवून ठेवून त्यांना शिकवणं ही खूप मोठी कसोटी असते.





**नवीन जगात नव्याने स्वागत -**

अशा या बहुभाषिक बालकांचे जल्लोषात स्वागत केले जाते.एक नवा उत्साह मनांमनामध्ये निर्माण केला जातो.

**Video link -** https://www.youtube.com/watch?v=sx25kkI3Xzk

**स्मार्ट बॉय स्मार्ट गर्ल उपक्रम**

बहुभाषिक मुलं जिथे राहतात ती झोपडपट्टी, ती वस्ती, तो भाग पाहिला तर अंगावर शहारे येतात. पावसाळ्यात तर या ठिकाणांची अवस्था खूपच दयनीय...



घर कुठले एखादी पत्र्याची खोली अशा ठिकाणी राहणारी ही मुलं, त्यांना कुठले आले ऐश्वर्य किंवा आनंदी जगण्याचं भाग्य! अशी ही झोपडपट्टीतली मुलं जेव्हा आम्ही शाळेत घेऊन येतो तेव्हा बरेचदा त्यांचे केस वाढलेले अंगावरचे कपडे मळलेले अंघोळ कधीतरी करणारी मुलं, मग पहिल्यांदा यांच्यावर शिक्षणापेक्षा यांच्या स्वच्छतेकडे जास्त लक्ष देणं क्रमप्राप्त असते.म्हणूनच स्मार्ट बॉय स्मार्ट गर्ल उपक्रम वर्गवार राबवला जातो.स्वच्छता व टापटीपपणा यांची रुजवणूक केली जाते.



**आम्ही जपतो बालकांचे निरागस हास्य...**

या शाळेत येणारं मूल हे नेहमी हसत शाळेत आलं पाहिजे. खरंतर या ठिकाणी विद्यार्थ्यांची उपस्थिती 100% असणं. हेच फार मोठे दिव्य काम आहे आणि यासाठी या मुलांना शैक्षणिक साहित्य,अंकलीपी, पाटी, पेन्सिल, दप्तर, वही, दिवाळी स्वाध्याय अशा अनेक छोट्या-मोठ्या गोष्टी भेट म्हणून दिल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावरचे जे निरागस्य हास्य असतं ते खूपच समाधानकारक असतं.



**प्रत्येक शनिवारी...छान छान खाऊ...**

शनिवारी मुलांचे उपस्थितीचे प्रमाण खूप कमी होते. त्यामुळे उपस्थिती वाढविण्यासाठी एक नवीन उपक्रम चालू केला. अगदी जूनपासून प्रत्येक शनिवारी मुलांना शिरा, सुजी, केळी,जिलेबी अशा पदार्थांचे वाटप केले जाते.कधी कधी तर वडापाव, मिसळपाव असे पदार्थ प्रत्यक्ष बनवून सर्व मुलांना खायला दिले जातात. प्रत्येक शनिवारी एका शिक्षकाकडून हा खाऊ मुलांना दिला जातो.यामुळे शनिवारची उपस्थिती वाढण्यास खूप मोठी मदत झाली आहे.

**Video link -** https://youtu.be/qcNqdAm4ZwY?feature=shared

**विविधतेत एकता -**

विविध प्रांतातील मुलांना आपापल्या मातृभाषेतून सादरीकरणाची संधी उपलब्ध करून दिली जाते. या उपक्रमात अगदी पहिलीपासून चे सर्व विद्यार्थी आनंदाने सहभागी होतात.काही मुले अगदी उत्साहाने कोणत्याही तयारीशिवाय सहभाग घेतात आणि कार्यक्रम उत्कृष्ट करतात.

**Video link -** https://youtu.be/XC-hw_zG1Ns?si=wUwj3w4q1O3HcAwZ

**विशेषरित्या साजरी जयंती -पुण्यतिथी**



नेत्यांची जयंती व पुण्यतिथी विशेष प्रकारे साजरी केली जाते. यामध्ये सुट्टीच्या दिवशी सर्व मुलांना व पालकांना शाळेत आमंत्रित केले जाते.विद्यार्थ्यांबरोबर पालकांनाही थोर नेत्यांच्या विषयी माहिती समजावी, त्यांचे विचार आचरणात आणावेत या उदात्त हेतूने सर्व पालकांना अशा प्रसंगी आमंत्रित केले जाते आणि आलेल्या पालकांच्या आणि मुलांच्या मध्ये सुसंवाद साधला जातो कधी खेळाच्या माध्यमातून तर कधी स्नेहभोजनाच्या माध्यमातून...विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. या स्पर्धा मधील बक्षिसांचे वितरण ही त्याच दिवशी केले जाते. कधी कधी पालकांचा आणि विद्यार्थ्यांचा एकत्रितपणे स्नेहभोजनाचा कार्यक्रमही ठेवला जातो. तर कधी महिला पालकांसाठी विशेष स्पर्धा आयोजित केल्या जातात. अशा आगळ्यावेगळ्या प्रकारे या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

**माझा वाढदिवस....एकदम खास**



प्रत्येकाच्या आयुष्यातील वाढदिवस हा एक विशेष दिवस असतो आम्ही आमच्या शाळेत मुलाच्या वाढदिवसादिवशी मुलाचा फुलांनी सजलेल्या छान अशा गोल कमानीत सुंदर असा फोटो घेऊन त्याला वाढदिवसाच्या शुभेच्छा देतो. त्याच्या चेहऱ्यावरील हास्य खूप काही सांगून जाते. ही माझी शाळा नुसती शाळा नसून हे माझे घर आहे. ही आपुलकीची, जिव्हाळ्याची भावना वाढीस लागते.

**आम्ही जपतो महाराष्ट्राची परंपरा...**




मुलांना आपल्या महाराष्ट्र राज्यातील सांस्कृतिक व धार्मिक परंपरेची ओळख व्हावी म्हणून विविध सण व उत्सव आम्ही आमच्या शाळेत अगदी एखाद्या सणासारखे साजरे करतो. यामध्ये आषाढी एकादशी, गौरीचे खेळ यांसारखे कार्यक्रम मोठ्या थाटामाटात साजरे केले जातात. या दिवशी मुले नवनवीन कपडे, सलवार कुर्ता, धोतर जॅकेट परिधान करतात. तर मुली नऊवारी साडी, सहावारी साडी, चुडीदार अशा वेगवेगळ्या वेशभूषा करून कार्यक्रमात सहभागी होतात या सणाचं महात्म्यही जाणून घेतात.



**आम्ही शाळेच्या चार भिंतीच्या बाहेरही शिकतो...**

वर्गामध्ये बसून शिकता येते, पण खरे व्यावहारिक ज्ञान हे शाळेची चौकट सोडून बाहेर आपल्या परिसरातच मिळते. मुलांना आपल्या बाजारपेठेमध्ये विविध व्यवसाय उद्योगधंदे करणारे छोटे-मोठे व्यापारी यांचे काम, कामाची पद्धत या सर्व गोष्टी तर माहीत असायलाच हव्यात. त्यासोबत त्या ठिकाणी व्यवहार करत असताना आर्थिक साक्षरता ही खूप महत्त्वाची आहे आणि म्हणून आम्ही आमच्या मुलांना गांधीनगरच्या बाजारपेठेमध्ये छोट्या मोठ्या व्यापाऱ्यांची भेट घेतो, त्यांची मुलाखत घेतो आणि केवळ नोकरी म्हणजेच शिक्षण नव्हे तर या शिक्षणातून आपण स्वतःच्या पायावर उभे राहून असे छोटे मोठे व्यवसाय, जे देशाच्या विकासाच्या जडणघडणीत महत्त्वाचे आहेत. त्याला हातभार लावू शकतो. याची शिकवण मुलांना देता येते. मुलांचा [illegible] झालाच पाहिजे



याशिवाय शारीरिक विकास होणे खूप महत्त्वाचे आहे. म्हणूनच आम्ही आमच्या शाळेत मुलांच्या शारीरिक विकासासाठी योगासने, कवायत, मनोरे, एरोबिक्स यासारखे व्यायाम प्रकार घेतो. हे घेत असताना त्याला जोड म्हणून संगीताची साथ देतो. त्यामुळे मुले अत्यंत आवडीने प्रत्येक क्रीडा प्रकारात भाग येतात. याच्यामुळे मुलांच्या मध्ये लवचिकता, शिस्त, नीटनेटकेपणा, आज्ञापालन यासारख्या गुणांचा विकास होतो.

**आम्ही पहिलीपासून मराठी शिकू लागलो...**

जी भाषा आपली मातृभाषा नाही ती शिकताना येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी प्रत्येक शिक्षक स्वतः आपल्या मुलांसाठी आवश्यक शैक्षणिक साहित्य तयार करून त्याचा वापर करतात. याशिवाय शासनाकडून मिळालेल्या साहित्य पेट्यांचा पुरेपूर वापर करून मुलांच्या बौद्धिक विकास वाढीसाठी इष्ट ते प्रयत्न केल्यामुळे मुले मराठी वाचन, लेखन, देवनागरी अंकलेखन करत आहेत. हे शाळेचे खूप मोठे यश आहे.

**Video link -** https://youtu.be/avBGIXV1e0U?si=9gawqVvEoBT1GCCp

**वास्तव समाधान...**



जी मुलं शाळेत आल्यावर घाबरत होती तीच मुलं स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन यासारख्या कार्यक्रमांमध्ये अगदी सर्व गावकऱ्यांच्या समोर माईक हातात घेऊन आपली मनोगत मांडू लागतात त्यावेळेला त्या मुलांचे शाळेतील पहिले पाऊल आणि मुलांचा आताचा विकास पाहिला तर मुलांचा सर्वांगीण विकास होत असल्याचे पाहून आम्हा सर्व शिक्षक वर्गाला गोरगरीब मुलांसाठी काम केल्याचे समाधान वाटते.

**समारोप -**

आमची शाळा आणि आमचा परिसर पाहिला  तर आमच्या शाळेत पटसंख्या टिकविणे हे खरंच फार मोठे दिव्य असे काम आहे. सधन कुटुंबातील मुले ही खाजगी शाळेत किंवा इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जातात. पण अत्यंत गरीब, झोपडपट्टी आणि कामगार वसाहत अशा ठिकाणची मुले, जी देशाच्या विविध कानाकोपऱ्यातून आलेली आहेत. ती मुले या शाळेत शिकू लागतात. खरंतर या मुलांचा शिक्षणाचा हक्क त्यांना मिळालाच पाहिजे, यासाठी आमचा नेहमी अट्टाहास असतो आणि तो आम्ही आमच्या परीने शंभर टक्के त्यांना देण्याचा पूर्ण प्रयत्न करतो. आमची मुले शाळेत येताना अगदी सुरुवातीला घाबरतात शाळेविषयीची अनामिक भीती मनात असते.  परिसरात थांबण्यास, फिरण्यास त्यांना असुरक्षितता वाटते. पण आमच्या शाळेतील विविध उपक्रमांच्या माध्यमातून मुलांना आमची शाळा ही शाळा नसून एक जिव्हाळ्याचे घर आहे हीच भावना निर्माण होते. मग अशी मुले अगदी अस्वच्छ परिसरात राहत असूनही शाळेला टापटिपपणे यायला लागतात. जी मुलं वर्गात बोलत असताना ही घाबरत होती, तीच मुलं आज माईकवर आत्मविश्वासाने बोलतात.हेच आमच्या शाळेचे यश आहे..आणि यातच प्रत्येक शिक्षकाचं खरं सुख...












----------**----------

# "भौतिक विकासाबरोबरच कृतीयुक्त उपक्रमातून विद्यार्थी विकास"

**शाळेचे नाव व पत्ता - ताराबाई आण्णासाहेब नरदे हायस्कूल, नांदणी, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर.**

**शाळेचा ईमेल आयडी** - tanhighschoolnandani@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - सौ. प्रज्ञा प्रकाश देसाई
**मोबाईल क्रमांक** - 9545170682
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** – desaipradnya01@gmail.com




**प्रस्तावना -**

विद्यार्थ्याच्या सर्वांगीण विकासाचे शिवधनुष्य हाती घेऊन भावी पिढी घडविण्याच्या उद्देशाने शासनाच्या परवानगीने 1990-91 साली नंदादीप शिक्षण प्रसारक मंडळ,नांदणी या संस्थेने "न्यू गर्ल्स हायस्कूल नांदणी" ही मुलींसाठी शाळा सुरू केली. नंतर शाळेचे नंदादीप हायस्कूल व यानंतर आत्ताचे मुला मुलींना एकत्र सहशिक्षण देणारी "ताराबाई आण्णासाहेब नरदे हायस्कूल" असे नामकरण झाले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये डिसेंबर 1990-91 साली नांदणीतील शिक्षणाबद्दल डोळस दृष्टी असलेल्या तरुणांनी शाळा सुरू केली.

सुरुवातीच्या काळामध्ये लोकांचा विश्वास संपादन करून घेण्यात काही वर्षे गेली. कारण पटाचा अभाव, भौतिक सुविधांच्या अभावामुळे गावातील लोकांचा विश्वास मिळविण्यासाठी काही काळ खर्च झाला. सुरुवातीच्या काळामध्ये शिक्षकांनी गाव भाग, वाड्या- वस्त्यावर, शेतामध्ये, माळ भागामधील विद्यार्थ्यांच्या दारी उभे राहून विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित केला. मात्र संस्थेचे अध्यक्ष मा. श्री आदिनाथ नरदे, उपाध्यक्ष मा.श्री.अजित कुरडे, सचिव मा.श्री कुमार हातगिणे, खजिनदार मा.श्री श्रीकांत भगाटे व संस्थेचे संचालक व सदस्य यांनी कितीही अडचणीचा प्रसंग असू देत न डगमगता अतिशय कठोर कर्तव्य भावनेने त्यावर मात करून पुढे कसे जायचे? हे आम्हास शिकविले. त्यावेळीही शाळेच्या व्यतिरिक्त ज्यादा तास, अभ्यासिका, स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन, एमसीसी,साक्षरता प्रसार असे अनेक उपक्रम घेतले जात होते. तसेच संस्थेने शिक्षकांवरील दाखविलेल्या विश्वासामुळे व आशीर्वादामुळे हळूहळू प्रत्येक विभागात प्रगती होत गेली.

**"पाया भरीव ज्याचा, प्रासाद भव्य त्याचा"**

ह्या ओळी इथे खरोखर सार्थ आहेत. कारण सध्या शाळेचे नाव संस्थेने उपलब्ध करून दिलेल्या भौतिक सुविधांमुळे व विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमुळे संपूर्ण परिसरात प्रसिद्ध झाली आहे.

**गुणवत्ता निर्माण करण्यासाठी आलेल्या समस्या -**

- शाळेसाठी अपुरी जागा.
- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी भौतिक सुविधांचा अभाव
- स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून गुणवत्ता निर्माण करणे.
- क्रीडा सुविधांचा अभाव.
- विद्यार्थी पालक व शिक्षक यांच्या तील समन्वयाचा अभाव.
- आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव.
- अप्रगत विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा अभाव.
- महाराष्ट्र छात्र सेना या विभागासाठी पुरेशा साहित्याचा अभाव.
- सांस्कृतिक विभागासाठी पुरेशा साहित्याचा अभाव.

**समस्येच्या पूर्ततेसाठी केलेल्या उपाययोजना -**

- सुरुवातीच्या काळात आमची शाळा एका मोठ्या वाड्यामध्ये भरत होती. यावेळी अपुऱ्या जागेमुळे विद्यार्थ्यांना व शिक्षकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागायचे. कोणतेही कार्यक्रम प्रार्थना स्पर्धेची तयारी करणे यासाठी मोठी अडचण निर्माण होत होती त्यामुळे या सगळ्याचा विचार करून संस्थेने गावाबाहेर एक जागा खरेदी करून तिथे गरजेपुरती प्रथमतः इमारत बांधली व नंतर त्यामध्ये थोडा विस्तार केला गेला.
- काळाच्या प्रवाहाबरोबर जाण्यासाठी व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्थेच्या योगदानातून व समाजातील दानशूर व्यक्तींच्या मदतीमुळे भौतिक सुविधांची पूर्तता करण्यात आली.
- भौतिक सुविधांबरोबर विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत ही वाढ होणे महत्त्वाचे असते. त्यामुळे इयत्ता दहावी, एन एम एम एस व स्कॉलरशिप शिष्यवृत्ती स्पर्धा परीक्षेत यश मिळवण्यासाठी वेगळा पॅटर्न राबविण्यात आला यासाठी शाळेच्या वेळे व्यतिरिक्त ज्यादा तासिकेचे नियोजन केले तसेच तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शनही ठेवण्यात आले. तसेच प्रत्येक वर्गातील अप्रगत विद्यार्थ्यांचे गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत शाळा सुटल्यानंतर त्यांच्या खास तयारीसाठी तासिकांचे नियोजन केले गेले
- ग्रामीण भागातील विद्यार्थी हे शारीरिक दृष्ट्या सक्षम असतात म्हणून अनेक क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यार्थी सहभागी होत होते मात्र अपुऱ्या क्रीडा साहित्यामुळे यश थोडक्यात हुकत होते. त्यामुळे समाजातील दानशूर व्यक्तींच्या योगदानामुळे क्रीडा साहित्य मिळविले व यानंतर काही प्रयत्नानंतर विद्यार्थ्यांना यश मिळविणे सोपे गेले.
- कोणत्याही शाळेच्या प्रगती मध्ये विद्यार्थी व शिक्षक हे मुख्य घटक असतात. मात्र याबरोबर पालक व संस्था चालक यांची भूमिकाही महत्त्वाची असते. यांच्यामध्ये सह समन्वय असणे गरजेचे असते. म्हणून आम्ही यावरील उपाय योजना म्हणून प्रत्येक सत्रात प्रत्येक वर्गाची स्वतंत्र पालक मीटिंग आयोजित करत असतो यामध्ये पारदर्शकता ठेवून विद्यार्थ्यांच्या प्रगती बाबत सकारात्मक चर्चा घडून येते . यामुळे विद्यार्थी- शिक्षक- पालक यांच्यामध्ये सहसंबंध निर्माण होतात.

- अलीकडच्या काळातील पिढी ही खूप हुशार असल्याने त्यांच्या बुद्धीला योग्य प्रकारे खुराक देण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची पूर्तता करण्यात आली यामध्ये प्रत्येक वर्गात प्रोजेक्टर, सुसज्ज संगणक कक्ष, अटल टिंकरिंग लॅब, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी शाळेच्या संपूर्ण परिसरात सीसीटीव्ही ची सुविधा, शुद्ध पेयजल प्रोजेक्ट, सर्व सोयींनी युक्त सायन्स लॅब विद्यार्थ्यांसाठी असे तंत्रज्ञान पुरवण्यात आले.
- जेव्हा विद्यार्थी इयत्ता चौथी मधून पाचवी मध्ये आमच्या शाळेत प्रवेश करतात. त्यावेळी काही विद्यार्थी हे बौद्धिक दृष्ट्या कमकुवत असतात हे आम्हाला दरवर्षी आढळून येत असते त्यांचा पाया कच्चा राहिल्याने वाचन लेखन प्राथमिक गणिती क्रिया सुद्धा काही विद्यार्थ्यांना येत नसतात . अशा विद्यार्थ्यांची प्रगती खुंटू नये यासाठी आम्ही शाळेच्या वेळे व्यतिरिक्त अप्रगत विद्यार्थ्यांसाठी तासिकेचे नियोजन करत असतो.
- महाराष्ट्र छात्र सेना म्हणजेच एमसीसी या विभागांतर्गत आमच्या शाळेने अनेक पारितोषिके मिळविली आहेत. मात्र या विद्यार्थ्यांना छात्रसेनेचा गणवेश व बुटांची कमतरता भासत होती .अशा वेळेला काही श्रीमंत व दानशूर व्यक्तींची भेट घेऊन त्यांना आमचे अडचण सांगितली. अशाप्रकारे त्यांच्याकडून आर्थिक मदत मिळवली व विद्यार्थ्यांना एम सी चा गणवेश व बूट देऊ केले.
- शाळेमध्ये सांस्कृतिक विभाग हा विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडत असतो. अंतर्गत विविध गुणदर्शन, अनेक सांस्कृतिक बाह्य स्पर्धा यासारख्या अनेक स्पर्धांचा सहभाग होत असतो. विविध गुणदर्शनासाठी अनेक गरीब व कलेमध्ये निपुण असणाऱ्या विद्यार्थ्यांना लागणाऱ्या साहित्याची गरज ओळखून त्यांना ती पुरवितो तसेच अनेक स्पर्धांमध्ये विद्यार्थी विभागीय व राज्यस्तरापर्यंत मजल मारतात या विद्यार्थ्यांना येणारा सगळा खर्च उपलब्ध करून देत असतो यामुळे अशा स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग हा वाढत आहे.

**वरील उपाय योजनेमुळे शाळेने प्राप्त केलेली गुणवत्ता व अंमलबजावणी -**

- शाळा ही पूर्णतः सेमी इंग्रजी माध्यमाची असूनही सलग अकरा वर्षे इयत्ता दहावीचा निकाल नंदादीप पॅटर्न मुळे 100% लागला आहे.
- सन 2022- 23 मध्ये आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी असलेल्या एन एम एम एस या शासकीय स्पर्धा परीक्षांमध्ये तब्बल '14' विद्यार्थ्यांनी तसेच सन 2023- 24 मध्ये '9' विद्यार्थ्यांनी सदर शिष्यवृत्ती मिळविली.व ते शिष्यवृत्तीधारक झाले आहेत. यामुळे शिरोळ तालुक्यामध्ये ग्रामीण विभागात आमची शाळा एन एम एम एस या परीक्षेमध्ये अव्वल बनली आहे.




- इयत्ता पाचवी व इयत्ता आठवी या वर्गांसाठी असलेल्या शासकीय स्कॉलरशिप परीक्षेमध्येही एकूण आठ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मिळविली.
- गतवर्षी" मुख्यमंत्री माझी शाळा -सुंदर शाळा" या अभियानामध्ये गटस्तरावर विद्यालयाचा प्रथम क्रमांक व तालुका स्तरावर द्वितीय क्रमांक आला होता. विद्यालयाला यावेळी दोन लाखाचे पारितोषिक प्राप्त झाले. याही वर्षी या अभियानामध्ये गटस्तरावर विद्यालयाचा प्रथम क्रमांक आला आहे.




- सन 2023- 24 मध्ये शासनाने आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय जलजीवन मिशन निबंध स्पर्धेमध्ये कु. विशाखा सुतार हिने प्रथम क्रमांक मिळवून 21 हजाराचे पारितोषिक पटकाविले.
- 2023 -24 मध्ये तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये " ऊस सोलणी यंत्र" या उपकरणाला प्रथम क्रमांक व जिल्हा स्तरावर उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त झाला.
- 2023- 24 मध्ये तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय विज्ञान वक्तृत्व स्पर्धेमध्ये कु. समीक्षा चौगुले हिने प्रथम क्रमांक पटकाविला व विभागीय विज्ञान वक्तृत्व स्पर्धेसाठी निवड झाली.
- 2024- 25 मध्ये तालुकास्तरीय विज्ञान वक्तृत्व स्पर्धेमध्ये चि. नेमिनाथ बाळिगिरे याने प्रथम क्रमांक पटकाविला.




- 2023-24 व 2024- 25 मध्ये विद्यालयातील क्रीडा विभागाने अनेक शासकीय क्रीडा स्पर्धेमध्ये दैदीप्यमान यश मिळविले. यामध्ये बुद्धिबळ, कॅरम, कुस्ती, रिले, थाळीफेक, भालाफेक, गोळाफेक, हर्डल्स, उंच उडी, लांब उडी, जुडो कराटे अशा अनेक स्पर्धा प्रकारांमध्ये विद्यार्थ्यांनी तालुका स्तरावर व जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक मिळवून विभागीय स्पर्धेमध्ये यशस्वी सहभाग नोंदविला.



- राष्ट्रीय छात्रसेना म्हणजेच एमसीसी या विभागाने अनेक  वर्षे परेड स्पर्धेमध्ये गट स्तर व तालुका स्तरा बरोबर जिल्हास्तरावर ही प्रथम येऊन शाळेचा दबदबा कायम राखला.
- तसेच अनेक बौद्धिक स्पर्धा परीक्षा, हिंदी बाह्य परीक्षा, गणित प्राविण्य परीक्षा, याबरोबरच निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा ,हस्ताक्षर स्पर्धा, कथाकथन स्पर्धा, नाट्यछटा स्पर्धा, सांस्कृतिक स्पर्धा अशा अनेक स्पर्धांमध्ये वैविध्यपूर्ण यश मिळविले.
- शासन पुरस्कृत व संस्थेच्या योगदानामुळे निर्माण झालेली अटल लॅब व याद्वारे अनेक विद्यार्थ्यांना विविध उद्योगांची ओळख व विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव दिला.
- विद्यार्थ्यांच्या ज्ञानामध्ये भर पडण्यासाठी शासनाचे अनुदान व संस्थेच्या हिस्स्याने बंदिस्त कंपाउंड तयार केले. या भिंतीचे सुशोभीकरण व बोलक्या भिंती तयार केल्या.



- तसेच प्रत्येक वर्गाचे स्वतंत्रपणे आयोजित केले जाणारे पालक मेळावे.
- खास पालकांसाठी आयोजित केलेली तज्ञ व्यक्तींची व्याख्याने.
- दहावीनंतर पुढे काय? या समस्येच्या निराकरणासाठी तज्ञ व्यक्तींचे आयोजित केलेले करियर मार्गदर्शन.
- भारतीय सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी व विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी सादर केलेले दर्जेदार सांस्कृतिक विविध गुणदर्शन कार्यक्रम.
- शालेय विज्ञान प्रदर्शन, पुस्तक प्रदर्शन, चित्रकला प्रदर्शन.
- महिलांसाठी पाक कलाकृती स्पर्धा.

- महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी दिनानिमित्त सादर केलेले वैविध्यपूर्ण कार्यक्रम.



नांदणी नरदे हायस्कूल येथे हिंदी दिन संपन्न

नांदणी/महान कार्य वृत्तसेवा : ताराबाई अण्णासाहेब नरदे हायस्कूल, नांदणी (ता. शिरोळ) वर्गातील विद्यार्थीनींनी हिंदी कवितेचे गायन केले. ६ वीच्या विद्यार्थीनींनी हिंदी भाषेविषयी

नरदे हायस्कुलमध्ये क्रांती दिन उत्साहात साजरा

नांदणी : प्रतिनिधी –

येथील ताराबाई आण्णासाहेब नरदे हायस्कूलमध्ये क्रांती दिन उत्साहात साजरा करण्यात आला. पोपवाक्य, स्वातंत्र्यवर कविता, थोर समाज सुधारकांची महती विद्यार्थ्यांनी एक आपल्या मनोगतातून व्यक्त केली. याच दिवशी महात्मा गांधींनी भारत छोडो आंदोलनाची सुरुवात केली व जनतेला 'करो या मरो'चे आवाहन केले. एस. बी. जैनापुरे यांनी मनोगत व्यक्त केले.

माजसंनी नंदणिर भालतिकास संहिताच्या भालसभांनी विविध समाज सुधारकांची वेशभूषा परिधान केली होती. गायसभेत जनजागृतिपर प्रभात फेरी काढण्यात आली. याप्रसंगी संस्थेचे चेअरमन आदिनाथ नरदे, मुख्याध्यापिका पी. पी. देसाई, सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पूर्वी गले, आरजू मुजावर तर आभार मिसबाह शेख हिने मानले.



नरदे हायस्कूलमध्ये शैक्षणिक साहित्याचे वाटप

नांदणी : प्रतिनिधी –

येथील ताराबाई आण्णासाहेब नरदे हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. साहित्याचे वाटप संस्थेचे चेअरमन आदिनाथ नरदे यांच्या हस्ते झाले. मुख्याध्यापिका पी.पी.देसाई यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी

नांदणी नरदे हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांना घेतले दत्तक

नांदणी : प्रतिनिधी–

येथील ताराबाई आण्णासाहेब नरदे हायस्कूलमध्ये संस्थेचे सेक्रेटरी कुमार हातगिणे यांनी हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत देऊ केली. या अंतर्गत हातगिणे यांची कन्या सौ.निशिगंधा अभिषेक मगदूम यांनी इ.५ वी मधील चार विद्यार्थ्यांना व कुमार हातगिणे असून शैक्षणिक साहित्याचे वाटप ही त्यांनी केले. तसेच यापुढेही या विद्यार्थ्यांना सर्वतोपरी मदत करण्याचा त्यांचा मानस आहे. यावेळी कुमार हातगिणे यांनी मनोगत व्यक्त केले. सदरच्या कार्यक्रमासाठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर स्टाफ उपस्थित होता. कार्यक्रमाचे संयोजन विभाग

- एन एम एम एस व स्कॉलरशिप इयत्ता पाचवी व आठवी तसेच इयत्ता दहावीसाठी आयोजित केलेली तज्ञ लोकांचे मार्गदर्शन.
- मे च्या उन्हाळी सुट्टीमध्ये शिक्षणाधिकारी मा.श्री एकनाथ आंबोकर साहेबांच्या मार्गदर्शनाखाली "eco clubs for mission life "या आदेशानुसार राबविलेले असंख्य उपक्रम.
- शिक्षण सप्ताह उपक्रम
- आनंददायी शनिवार उपक्रम.




- आरोग्य तपासणी.
- अप्रगत विद्यार्थ्यांसाठी जादा तासिकेचे नियोजन करण्यात आले.
- तसेच दररोज सकाळी 9.30 ते 10.30 पर्यंत व संध्याकाळी 5.15 ते 5.45 पर्यंत इ10वी, एन एम एम एस , ( इ.8वी ) , स्कॉलरशिप ( इ.5 वी इ.8वी ) व अप्रगत विद्यार्थ्यांच्या तासिकांचे नियोजन करण्यात आले.

**गुणवत्ता विकासासाठी संस्थेचे योगदान -**

आमच्या संस्थेने गुणवत्ता विकासासाठी मोठे योगदान दिले आहे. कारण बौद्धिक विकासासाठी भौतिक विकासाची सुद्धा गरज असते हे ओळखून विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून आमच्या संस्थेने स्वखर्चाने अनेक सुविधा निर्माण केल्या आहेत. प्रत्येक वर्गात प्रोजेक्टर बसविले यामुळे दीक्षा ॲप सारख्या ॲपचा वापर करून अध्यापकांना ज्ञानार्जन करता येते.




- शाळेच्या संपूर्ण परिसरामध्ये CCTV ची सुविधा निर्माण केली आहे.
- शासनाच्या व संस्थेच्या माध्यमातून अटल टिंकरिंग लॅब ची निर्मिती केली आहे.
- विद्यार्थ्यांना स्वच्छ व शुद्ध पाणी मिळावे यासाठी संस्थेने एक लाख रुपये खर्च करून शुद्ध पेयजलाची सुविधा निर्माण करून दिली आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे दप्तराचे ओझे सुद्धा कमी झाले आहे.
- प्रत्येक वर्गात ग्लास बोर्ड व बैठक व्यवस्थेसाठी दर्जेदार बेंचेस ची सुविधा दिली आहे.
- पालक मीटिंग व शालेय कार्यक्रम घेण्यासाठी आधुनिक सुविधांनी सुसज्ज अशा हॉलची निर्मिती केली आहे.
- संगणक लॅब व सायन्स लॅब ची सुविधा केली आहे.
- वातानुकूलित व प्रशस्त वर्गखोल्या उपलब्ध करून दिल्या आहेत.
- प्रशस्त ग्रंथालय व विद्यार्थ्यांच्या स्व -अभ्यासिकेची व्यवस्था केली आहे.

- विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी सोयीचे ग्राउंड व अनेक क्रीडा साहित्याची उपलब्धता करून दिली आहे .
- मैदानावरील व कंपाऊंडच्या भिंती बोलक्या करून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात कळत नकळत भर टाकण्याचा प्रयत्न केला गेला आहे.
- शाळेचे कार्यालय व स्टाफ रूम यांचेही अद्यावतीकरण केले आहे.
- संपूर्ण शाळेचा परिसर Wi-Fi द्वारे internet ने connect केले आहे.

**"कोण होतास तू , उन्नत झालास तू"**

असा सकारात्मक बदल झाला आहे.

या संस्थेने निर्माण केलेल्या सर्व सुविधांमुळे अध्यापकांना अध्यापनाचे व विद्यार्थ्यांना घडवण्याचे काम करण्यामध्ये समाधान मिळते. अशा कामाची दाद समाजही घेत असतो. म्हणूनच काही वर्षांपूर्वी विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी आम्हाला घरोघरी फिरावयास लागायचे. तेच आता नेमके उलटे झाले आहे म्हणजे प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची रांग लागत आहे. हा बदल नक्कीच संस्थेच्या व शिक्षकांच्या प्रयत्नाने झाला आहे हे मात्र नक्की.

**गुरुनापि शोभते शिष्य : , शिष्ये नापि गुरुस्तथा ।।**

**उभाभ्याम् शोभते शाला , शालया शोभते पुरम् ।।**

म्हणून असे म्हणावेसे वाटते की, जी माणसे स्वप्न बघतात आणि त्या स्वप्नातील कर्तृत्वावर, सौंदर्यावर, विधायकतेवर ज्यांचा पूर्ण विश्वास आहे .त्यांची दखल आणि जबाबदारी ही भविष्यकाळ नक्कीच घेतो. बदलत्या शैक्षणिक प्रवाहाशी सुसंगत असा चेहरामोहरा घेऊनच आमची शाळा नवी आव्हाने पेलायला सज्ज झाली आहे .या ज्ञान यज्ञात संस्थेचे भगीरथ प्रयत्न , मुख्याध्यापक आणि शिक्षक -शिक्षकेतर वृंदाचा वाटा खूप मोठा आहे. नंदादीप चा हा ज्ञानयज्ञ अखंड प्रज्वलित राहील तसेच आत्ताच्या प्रगत पिढीला आणखीन प्रगत करण्याचे सामर्थ्य आमच्यामध्ये येईल असा विश्वास व्यक्त करून नेहमी यासाठी आम्ही कटिबद्ध राहू.

----------**----------

# "लोकसहभागातून भौतिक सुविधांची उपलब्धता"

**शाळेचे नाव व पत्ता - श्री. छत्रपती शिवाजी हायस्कूल, टाकळी, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर**

**शाळेचा ईमेल आयडी** - cst27340404904@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.विनोद तात्यासाहेब पाटील
**मोबाईल क्रमांक** - 9421100994
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - vtptkl200@gmail.com

**प्रस्तावना -**

"ही आवडते मज मनापासून शाळा लावीते लळा ही जसा माऊली बाळा" कवी श्रेष्ठ प्र. के. अत्रेंच्या ह्या पद्यपंक्ती आजही शालेय विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून आणि निबंधातून चिरतरुण ठेवल्या आहेत.

खरंच विद्यार्थ्यांना मनापासून आवडणारी शाळा ही त्यांची शारीरिक भावनिक आणि बौद्धिक गरज पूर्ण करणारी आणि बदलत्या सामुदायिक गरजा नुसार चालत राहणारी असावी असे श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल टाकळी तालुका शिरोळ मधील मुख्याध्यापक श्री विनोद पाटील, लोकशिक्षण मंडळ टाकळी चे सर्व संस्थाचालक, पंचक्रोशीतील समाजसेवक श्री भवानी सिंह घोरपडे सरकार,शाळेच्या लिपिक पदी नव्याने नियुक्त असलेले श्री वैभव पाटील, सर्व शिक्षक ,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि माजी विद्यार्थी यांनी ठरवले.

टाकळी हे सैनिकी परंपरेचे कोल्हापूर जिल्ह्यातील एक सुपरिचित असे गाव. आजी-माजी सैनिकांना घडवणारी ही शाळा कालचक्राच्या ओघात बदलली पाहिजे सर्वसमावेशक शैक्षणिक अनुभवांच्या करिता विविध पायाभूत सुविधा तिच्यामध्ये असल्या पाहिजेत असे सर्वांनी ठरवले. आणि ठरले तर मग 2021 हा कोरोना महामारीचा काळ ते सन 2023 या केवळ तीन वर्षात शाळा विविध सामाजिक संस्था, दानशूर व्यक्ती, आणि आजी - माझी विद्यार्थ्यांच्या सहकार्याने अंतर्बाह्य बदलली. तब्बल 85 लाख रुपयाचा शैक्षणिक उठाव करून शाळा प्रशासनाने असाध्य ते साध्य करिता सायास हे शब्दशः करून दाखवले.

**उद्देश -**

- समाजातील स्वयंसेवी संस्था दानशूर व्यक्ती कार्पेट कंपनी यांच्याशी संपर्क साधून शाळेच्या भौतिक विकासासाठी सुविधा उपलब्ध करून घेण्यासाठी प्रयत्न करणे.
- विद्यालयामध्ये लोकसहभाग वाढवणे.
- ग्रामीण भागातील मुलांना शहरी भागातील मुलांना मिळणाऱ्या शिक्षणासारखे शिक्षण देण्यासाठी प्रयत्न करणे.
- मुलांना शिक्षण देण्यासाठी त्या अत्याधुनिक शिक्षण देणारी शैक्षणिक साधने मिळवण्यासाठी प्रयत्न करणे.
- विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाविषयी त्यांच्या मनात कुतूहल निर्माण करणे.
- समाजामध्ये डिजिटल शिक्षणाचा प्रचार प्रसार करणे.

**उपक्रमाचे स्वरूप व कार्यवाही -**

शाळेच्या भौतिक सुविधांची सुधारणा करणे व अत्याधुनिक शैक्षणिक साधने मिळवण्यासाठी शाळेच्या वतीने समिती तयार करण्यात आली आहे.समितीमार्फत समाजातील दानशूर व्यक्ती, स्वयंसेवी संस्था, कार्पोरेट कंपन्या यांना संपर्क साधून शाळेच्या मदतीसाठी आवाहन केले जाते.

| अ.क्र | पदाधिकाऱ्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| 1. | श्री.विनोद तात्यासो पाटील | अध्यक्ष |
| 2. | श्री.राजेश आण्णासाहेब पाटील | सचिव |
| 3. | श्री. उदयकुमार शिवाजीराव पाटील | सदस्य |
| 4. | श्री.रामचंद्र महादेव पाटील | सदस्य |
| 5. | श्री.वैभव तुकाराम पाटील | सदस्य |

**शाळेत झालेल्या भौतिक सुविधा -**

1. शाळेच्या वर्ग खोल्या अद्ययावत करून छत काम व सिलिंग व्यवस्था

करण्यात आले असून प्रत्येक वर्ग खोलीमध्ये उत्कृष्ट असे दिवाबत्तीची सोय व फॅन ची सुविधा करण्यात आली. याकरिता सुमारे 15 लक्ष इतका खर्च आला असून सकाळ रिलीफ फंड ,मा.राहुल घाटगे (गुरुदत्त शुगर्स ,टाकळी वाडी,क्रीएटिव्ह चेंज ग्रुप ,पुणे यांचे सहकार्य लाभले.



**अधिक माहितीसाठी येथे क्लिक करा.**

https://m.facebook.com/story.php?story_fbid=pfbid02AfG9FiSndQpWvazxnqDYouhaEAp1wRWa4jT841EiDL37qxjbUhRBx2MtpQLpmHVdl&id=100079095042101&mibextid=Nif5oz

**2.सौरउर्जेवर चालणारा शुद्ध पाणी प्रकल्प -**

आरोग्यम् धनसंपदा. विद्यार्थ्यांच्या आरोग्या करिता शुद्ध निर्धोक पेयजलाची आवश्यकता लक्षात घेऊन Being volunteer संस्थेच्या सेवाभावी मदतीतून स्वच्छ फिल्टर पाण्याची योजना कार्यान्वित करण्यात आली. आणि याकरिता सोलर ऊर्जेचा उपयोग करण्यात आला आहे. याकरिता सुमारे रु.४.०० लक्ष खर्च

करण्यात आला. यानंतर शाळेकरीता कुपनलिकेची  आवश्यकता निर्माण झाली अशावेळी एका हाके वर शाळेच्या माजी विद्यार्थ्यांनी मदतकेली.






**3. ई लर्निंग ची सुविधा -**


इयत्ता पाचवी ते दहावीच्या सर्व वर्ग खोल्यांच्या मध्ये स्मार्ट टीव्ही ची रचना केली गेली आहे. या सर्व स्मार्ट टीव्ही मध्ये इयत्ता पहिली ते बारावीचा अभ्यासक्रम अपलोड केला गेला असून कॉमकिन चे उच्च दर्जाचे सॉफ्टवेअर यामध्ये आहे. प्रगत आणि अप्रगत विद्यार्थ्यांना याचा लाभ होतो. आपल्या इयत्तेच्या अभ्यासक्रमासह मागच्या पुढच्या इयत्तांचा अभ्यासक्रम ही त्यांना संदर्भाकरता उपलब्ध होतो. याकरता अनेक व्यक्तींचे तसेच कंपनीच्या सी.एस. आर.  फंडांचेही सहकार्य लाभले.

(पाच खोल्यांना जेव्हा स्मार्ट टीव्ही बसवण्यात आला तेव्हा एक खोली ही वंचित राहत होती. अशावेळी मुख्याध्यापकानी आपल्या सहकाऱ्यांसह कणेरी मठावरील पंचमहाभूतांचा कार्यक्रम आटपून येताना गोकुळ शिरगाव मधील इंडोकाउंट कंपनीला भेट दिली तिथल्या व्यवस्थापनाशी चर्चेत  ते फक्त सरकारी प्राथमिक शाळा व आश्रम शाळांनाच मदत करतात असे सांगितले पण तुमची तळमळ आणि सैनिकी गाव लक्षात घेऊन आम्ही मदत करू असे आश्वासन दिले व पूर्णही केले. तळमळ असेल तर इच्छापूर्ती होतेच त्याचे हे उदाहरण.)



## 4.इंटर ऍक्टिव्ह बोर्ड -

शाळेतील एक माजी विद्यार्थी श्री सुहास पाटील हे पोलीस दलात काम करणारे. पुण्यामधील एक प्रसिद्ध आणि दातृत्ववान व्यक्तिमत्व श्री पुनीत बालन यांच्या सुरक्षिततेसाठी तैनात असल्याने त्यांच्याशी परिचित होते. त्यांच्या ओळखीतून इंद्रायणी बालन ग्रुप यांच्याकडून सहा इंटरॅक्टिव्ह स्मार्ट बोर्ड मंजूर झाले पैकी तीन आठवी नववी व दहावीच्या वर्गात बसवण्यात आले आहेत बाकी प्रस्तावित आहेत.




**अधिक माहितीसाठी येथे क्लिक करा .**

https://m.facebook.com/story.php?story_fbid=pfbid029EGAKgr54xnQBkuYtBeMraVp9Bk6oaZySuokNMGaG9WSkp1rDL4C52MbQLSNw6xkl&id=100079095042101&mibextid=Nif5oz

## 5. संगणक कक्षाची निर्मिती -

डिजिटल साक्षरता हे आजच्या तंत्रज्ञान चलित जगामध्ये एक अपरिहार्य वास्तव आहे. संगणकाची ओळख इंटरनेटचा वापर मुलांना शालेय वयातच शिकता यावा याकरिता 15 संगणकांची अशी सुसज्ज लॅब रोटरी क्लब ऑफ पुणे विजडेन यांच्यावतीने पूर्णत्वास आली. याकरता सुमारे २.०० लक्ष रुपये इतका खर्च आला. यानंतर दिल्ली स्थित एका सेवाभावी संस्थेकडून मॅजिक बॉक्स मिळवण्यात शाळेला यश आले ज्यामध्ये संगणकाचे सर्व प्रशिक्षण अपलोड केले आहे.



अधिक माहितीसाठी येथे क्लिक करा.

https://m.facebook.com/story.php?story_fbid=pfbid02qUjhigRQ4D41o4NGHmAs1v753Afp8dJpuRGGg1kgrDHVnmk6h4fBHGeUoSjaQHd7l&id=100079095042101&mibextid=Nif5oz

## 6. सुसज्ज ग्रंथालय व वाचनालय -

शालेय व्यवस्थापनाचा एक अविभाज्य घटक म्हणजे ग्रंथालय* होय. शैक्षणिक अभ्यासक्रमाच्या मर्यादा ओलांडून विद्यार्थ्याला समृद्ध करते ते ग्रंथालय. डॉरबीट फाउंडेशन, पुणे यांच्या सहकार्यातून एक अतिशय सुंदर आणि सुसज्ज असे ग्रंथालय शाळेमध्ये उभे करण्यात आले. ग्रंथालयामध्ये बुक सेल्फ टेबल खुर्च्या बॅटिंग असे सर्व व्यवस्था करण्यात आली आहे.




**अधिक माहितीसाठी येथे क्लिक करा.**

https://m.facebook.com/story.php?story_fbid=pfbid02woFFr4x9WCfZHFsps2uU5xv6QBspnxh6ZkFoyv6MwKJ1bP9KF7X16MTsmVfCKKFZl&id=100079095042101&mibextid=Nif5oz

## 7. कला आणि संगीत कक्ष -

विद्यार्थ्यांच्या सर्जनशील व्यक्तिमत्त्वाच्या विकासाकरिता कला आणि संगीताला खूप महत्त्व आहे. शाळेने हे महत्व लक्षात घेऊन रोटरी क्लब ऑफ पुणे विजडम यांच्या सहकार्याने सुमारे 50 हजार ₹ चे संगीत वाद्य उपलब्ध करून दिले. यामध्ये ढोल, झांज, ताशा, ड्रम ,हार्मोनियम, तबला, ट्रिपल ,ड्रम इत्यादीचा समावेश आहे.



## 8. क्रीडा सुविधा -

खेळाडूंच्याकरता ड्रेस चेंजिंग गृह व स्वच्छतागृहाची व्यवस्था.

कोल्हापूर जिल्ह्याच्या क्रीडा विभागाकडून सुमारे सात लाख किमतीचे खेळाडूंच्याकरता ड्रेस चेंजिंग व स्वच्छतागृह उभारले आहे. तसेच माजी विद्यार्थ्यांच्याकडून सुमारे 50 हजार रुपये किमतीचे क्रीडा साहित्य उपलब्ध करून दिले आहे.



## 9. सी.सी.टी.व्ही. कॅमेरे -

बदलापूर घटनेनंतर शासनाने त्वरित जीआर काढून सर्व शाळांना सीसीटीव्ही लावण्याचे आदेशित केले. पण शाळेने अगोदरच सुमारे एक वर्षापूर्वी विद्यार्थी सुरक्षिततेचे महत्व लक्षात घेऊन सर्व वर्ग खोल्या व शालेय परिसर यांच्यामध्ये तब्बल 17 सीसीटीव्ही कॅमेरे बसून संपूर्ण परिसर सी.सी.टी.व्ही. नियंत्रणाखाली ठेवला आहे. याकरता शाळेचे सहाय्यक शिक्षक श्री एस. व्ही. पाटील यांनी 50 हजार रुपयांचे योगदान दिले आहे.




## 10. सुसज्ज प्रशासकीय कार्यालय -

शाळा प्रशासन आणि समुपदेशन कर्मचाऱ्यांच्या करिता तसेच शिक्षक पालक बैठकी करता शाळेमध्ये सुसज्ज प्रशासकीय कार्यालय आहे.



11. **वॉल कंपाऊंड ची व्यवस्था -**

शाळेच्या संपूर्ण परिसराला वॉल कंपाऊंडने सुरक्षित बनवण्यात आले आहे याकरिता मा.खासदार राजू शेट्टी यांच्या खासदार  निधीचा वापर करण्यात आला आहे.




12. **वाचमन/पहारेकरी  कक्षाची उभारणी -**

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठीचे आणखीन एक पाऊल म्हणजे सेक्युरिटी केबिनकक्षाची उभारणी.यशश्री पॉलीमर्स जयसिंगपूर यांच्या सहकार्यातून पहारेकरी  कक्ष उभारले आहे. शाळेमध्ये प्रत्येक विद्यार्थ्याला त्यांच्या मनाला प्रशिक्षित करण्यास, त्यांच्या ज्ञानाची क्षितिजे विस्तृत करण्यास आणि त्यांची कौशल्ये सुधारण्यास अनुमती देणारी प्रत्येक सुविधा असावी. याकरताचे ध्येय मनात ठेवून एका ध्येयवेड्या  संस्थेने आणि मुख्याध्यापकांनी आपली वाटचाल सुरू ठेवली आहे.



**समारोप** -

शाळेचे मुख्याध्यापक ,संस्थेचे पदाधिकारी ,शिक्षक ,कर्मचारी व आजी –माजी विद्यार्थी याच्या सकारात्मक दृष्टीकोनातून व अथक प्रयत्नातून शाळेचा कायापालट झाला व खालील गोष्टींचा फायदा झाला.

- लोकसहभागातून शाळेच्या झालेल्या भौतिक विकासामुळे समाजात शाळेकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला.
- अत्याधुनिक शैक्षणिक साधनाचा अध्यापनात वापर झाल्याने विद्यार्थ्यांना अमूर्त बाबी चांगल्या प्रकारे समजू लागल्या.
- विद्यार्थ्याच्या विविध शासकीय स्पर्धा परीक्षेत सहभाग वाढून शैक्षणिक प्रगतीत व खेळातील कौशल्यात भर पडण्यास मदत झाली .
- शाळेच्या विद्यार्थी पट संख्येत वाढ झाली.
- इतर शाळांना असा उपक्रम राबवण्यास प्रेरणा मिळाली.

----------**----------

# “बदल दी चेंज आबादीचा' एक महत्वाकांक्षी प्रकल्प”

**शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, विडुळ, नवी आबादी, पं.स.उमरखेड, जि.यवतमाळ**

**शाळेचा ईमेल आयडी** - nageshpmirashe@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.कोंडबा एम. झाटे
**मोबाईल क्रमांक** - 8605657080
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - nageshpmirashe@gmail.com



**प्रास्ताविक -**

वेगाने घसरत चाललेली पटसंख्या व वर्षागणिक शेकडो बंद पडत चाललेल्या जिल्हा परिषदेच्या शाळा म्हणजे गोरगरीब,उपेक्षित व वंचितांच्या शिक्षणाला लागलेली अखेरची घरघर म्हणावी का?असाच प्रश्न निर्माण होतोय.

अशाच नकारात्मकतेच्या चक्रव्यूहात अडकलेली शाळा म्हणजे यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड तालुक्यातील विडूळ नवी आबादी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा.नवी आबादी म्हणजे झोपडपट्टी .ही सामाजिक,आर्थिक व शैक्षणिक मागासलेली वस्ती.वडार,नाईकडा आदिवासी,मुस्लिम व कोळी समाज बहूल झोपडपट्टी.बांधकाम मजूर, विटभट्टी कामगार,ऊसतोड कामगार व शेतमजूराचे हे हबच.तिथे अज्ञान,अंधश्रद्धा व व्यसनाधीनता प्रत्येकाच्या जणु पाचवीलाच पुजलेली.दारु व जुगाराने अनेक घर उद्धस्त झालेले.शिक्षणाशी दुरान्वयानेही संबंध न ठेवणारी ही अठरा विश्व दारिद्र्य नांदवणारी वस्ती.

वस्तीत पाचवीपर्यंत शाळा आहे. काळवंडलेली इमारत, कोंदटलेल्या दोन तीनच वर्गखोल्या,गळके छप्पर, तुटके दरवाजे खिडक्या,मैदान नाही,शौचालयाची दुरावस्था, पिण्याच्या पाण्याची गैरसोय,ई.लर्निंग व डिजिटल साधनांचा दुरान्वयानेही संबंध नाही, याशिवाय अनेक समस्यांचा शाळेत जणु डोंगरच.परीणामी

शाळेकडे पालकांची व विद्यार्थ्यांनी पाठ फिरवल्याचे चित्र होते.रोज रात्री व सुट्टीत होणाऱ्या चुकीच्या कामासाठीही शाळा चर्चेचा विषय होती.

मुलांना शाळेची ओढच नाही अन् शाळेत पाहिजे असा आनंदही नाही.त्यामुळे शाळेत येण्यासाठी मुलांची प्रचंड अनास्था होती.निम्मेशिम्मे मुलंच शाळेत यायची.पण शाळेत एकंदरीत निरस व बेशिस्त वातावरण असल्याने मुलांचे मन शाळेत अजिबात रमायला तयार नसायचे.परीणामी गुणवत्तेचा स्तरही घसरलेला.एकंदरीत काय तर हेरंब कुलकर्णी यांच्या भाषेत 'शाळा आहे पण शिक्षण नाही' अशीच अवस्था.

ह्या शाळेला पुनर्जिवीत करुन तिथे आनंदमय शिक्षणाच वातावरण उभं करणं काळाची गरज होती. मुलांना 'गुंगवून व गुंतवुन ठेवणारी शाळा' निर्मितीचा ध्यास घेण आवश्यक आहे.त्यासाठी शिक्षकांनी पुढे येत समाजाची मोट बांधत काही नवोपक्रम हाती घेतले पाहिजेत असा विचार जुन २०२३ ला बदलीने आलेल्या सहायक शिक्षक नागेश मिराशे ह्यांनी आपल्या सहकाऱ्यापुढे मांडला.सर्वंकष आराखडा तयार करीत 'बदल दी चेंज आबादीचा' हा आनंददायी शिक्षणासाठीचा नवोपक्रम हाती घेतला गेला. आठ महिने रात्रीचा दिवस एक केला.अन अवघ्या आठ महिन्यांत ह्या मोडकळीस आलेल्या शाळेच्या सर्वच बाबतीत एक क्रांतिकारी बदल घडवुन एक आदर्श शाळेकडे झंझावात वाटचाल सुरू झाली.झालेली वाटचाल पुढीलप्रमाणे.....

**विषया संदर्भात मुख्याध्यापक व शिक्षकास आलेल्या अडचणी.....**

शाळेत अनेक उणिवा अडचणी होत्याच.पण साधारणपणे ....

- कोरोना काळानंतर मुलं शाळेकडे फिरकायलाच तयार नव्हती.ही मुख्य अडचण होती.त्यामुळे सतत गैरहजरीचे प्रमाण मोठे होते.
- पालकांची शिक्षणाबद्दलची कमालीची अनास्था एक अवघड समस्या होती.पालक स्थलांतर ही समस्या गुंतागुंतीची होती.
- शाळेत रात्रीला व सुट्टीत मटण चिकन,दारु पार्टी व जुगार हे नित्याचेच होते.शाळेत पुड्या बिड्यासह बाटल्यांचा सडा पडलेला असायचा.पान खर्रा खाऊन सगळ्या भिंती व व्हरांडे कायम रंगलेले असायचे.सर्वत्र त्याचाच दर्प असायचा.





- शालेय परीसर ओसाड,उजाड व जुनाट दुरुस्तीला आलेला होता.कुठल्याही वर्गात साधी रंगवलेली भिंतही नव्हती.
- मुलं मुलींना शौचालय व मुत्रीघराची स्वतंत्र व सुरक्षित व्यवस्था नव्हती.तिथे वापरास पाणी अजिबात नव्हते.शाळेत मुलांना पिण्याच्या पाण्याची सोय नव्हती.
- शाळेला तुटपुंजे मैदान होते.तेही पावसाळ्यात पाण्याने डबडबले असायचे.मुलं त्यातुन मार्ग काढत वर्गात यायचे.एरव्ही ते मैदान सतत उकरलेले असायचे.त्यामुळे मुलं कायम धुळीने माखलेले दिसत.
- शाळेच्या किचनशेडची अवस्था अतिशय दयनीय होती.अख्खा पावसाळाभर ते पाणी थेट आत शिरायचे.
- शाळेत पाच वर्ग,चार शिक्षक व इनमिन तीन खोल्या.त्या सगळ्याच खोल्यात अर्धेअधिक वायफळ पसाराच पडुन असल्याने नुसती अडगळ होती.त्यामुळे मुलांना वर्गात बसायला पुरेशी जागा पण नव्हती.
- अर्धानिर्धा रॅम्प,पडके व्हरांडे,तुटक्या दरवाजे खिडक्या, फुटक्या फरशा,अपुरे फर्निचर, तांत्रिक साधनांचा अभाव, इलेक्ट्रिक सुविधांचा अभाव अशा अनेक अडचणी शाळेसमोर होत्या.
- शाळेत नाही म्हणायला काही झाडेझुडपे होती पण शालेय परसबाग असा काही प्रकार अस्तित्वात नव्हता.त्यामुळे शाळेला आकर्षकता नव्हती.
- मुलांना शालेय परीपाठ,सभाधिटपणा, पाठांतर आदि अभिव्यक्तीच्या संधी वा सवयी अजिबात नव्हत्या.त्यामुळे पाचवीतला मुलगाही पुढे येण्यास घाबरायचा.
- शाळेत मोजके महापुरुषांच्या सोडल्या तर इतर कोणत्याही महापुरुषांच्या प्रतिमा वा फोटो उपलब्ध नव्हते.जयंत्या पूण्यतिथी अभावानेच व्हायच्या.

- मुलं झोपडपट्टी परीसरातील गरीब घरची असल्याने आवश्यक ते शालेय साहित्य त्यांना मिळत नव्हते त्यामुळे अध्ययन अध्यापनात अडचणी यायच्या परीणामी गुणवत्तेचा स्तर खालावलेलाच असायचा.
- मुलांना पाढे पाठांतर नव्हती,वाचन लेखनाचा स्तर पार खालचा.घरी गृहपाठाची व्यवस्थाच नसल्याने गृहपाठ करणे हा प्रकारच नव्हता.
- वडार व आदिवासी समाजातील मुलांची भाषेची समस्या ही एक अवघड समस्या होती.त्यामुळे गुणवत्ता सुधारण्यासाठी त्याचा व्यत्यय यायचाच.
- शिकवलेला अभ्यास फार लवकर व वेगाने ही मुलं विसरायची.त्यामुळे अध्यापनात काय बदल करावा हे सुचणे शिकवणाऱ्या शिक्षकापुढे आव्हानच होते.
- मिसरुड फुटायच्या वयात परीसरात वाममार्गाला लागायची लत लागायची .हे एक भयानक वास्तव होते.त्यामुळे शिक्षण प्रवाहातून बाहेर पडु इच्छिणारी मुलं खूप जास्त प्रमाणात होती.
- मुलांमध्ये शालेय शिस्त,मॅनर्स हा प्रकारच नव्हता.विद्यार्थ्यांमधील सततची भांडणं व पालकांच्या येणाऱ्या तक्रारीं ही एक मोठी समस्या शाळेसमोर होती.
- घरात व परीसरात सतत वाद व्हायचे परीणामी मुलांच्या तोंडी शिव्यांची लाखोलीच होती.मुल त्या शिव्या सहजपणे शाळेत बोलत.
- शिक्षकांबद्दल पालकांमध्ये काही गैरसमज असल्याने मुलं इतर शाळेत घालण्यासाठी टि.सी.काढण्याचे प्रमाण वाढते होते.
- एकंदरीत काय तर ओसाड शालेय परीसर, सोयीसुविधांचा अभाव, अशिक्षित पालकवर्ग व शाळेतील निरस वातावरण ह्या समस्यांमुळे शैक्षणिक गुणवत्ता संवर्धनासाठी प्रबळ इच्छाशक्ती व मोठ्या नियोजनबद्ध पद्धतीच्या प्रयत्नांची गरज होती.

**अडचणींवर प्रभावी अंमलबजावणी -**

**'बदल दी चेंज आबादीचा' एक महत्वकांक्षी प्रोजेक्ट**

सर्वप्रथम सर्व शिक्षकांच्या मदतीने नागेश मिराशे या शिक्षकाने 'बदल दी चेंज आबादीचा' या उपक्रमाचा आराखडा तयार केला.सुरक्षितता, स्वच्छता व सौंदर्यीकरणासोबत विद्यार्थ्यांना शालेय प्रवाहात आणण्यासाठी काय करता येईल. व त्या अडचणींवर प्रभावी अंमलबजावणी कशी करावी यावर सांगोपांग चर्चा केली.शासनाच्या खात्यात केवळ ५३ रुपये आहेत त्यामुळे मुख्याध्यापकांनी आर्थिक सहकार्यास असमर्थता दर्शवली.बदलासाठी लागणारा निधी वा मदत कशी उभी करणे हे मोठे आव्हान उभे राहले.ते उभारणीस अंदाज बांधले गेले. त्यासाठी कोणकोणत्या संस्था, व्यक्ती वा समुह मदत करू शकतील याची यादी करण्यात आली.नंतर सगळेजण त्या दिशेने कामाला लागले.

**महिला पालक मेळावे -**



सर्वप्रथम महिला पालकांचे मेळावे व समुपदेशन करण्यात आले.शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगत त्यांच्या समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न केला गेला.शाळेच्या दयनीय अवस्था बदलासाठी त्यांची साथ मिळवली गेली.शैक्षणिक शिस्त व गुणवत्ता वाढीसाठी विश्वास दिल्यामुळे शाळेतून जाणाऱ्या टि.सी.चा ओघ थांबला.वेळोवेळी मातापालकांना डोळ्यासमोर ठेवून विविध अंगी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

**शाळेचे दर्शनी नाव -**

शाळेचे कित्येक वर्षांपासून दर्शनी नावच दिसत नव्हते.त्यामुळे ही शाळा आहे अशी ओळखच दिसत नव्हती.गावातील निलेश जैन या व्यापाऱ्याच्या मदतीने शाळेला ठसठशीत नाव पेंटिंग झाले.अन शाळेला नाव मिळाले.

**मोफत दर्जेदार शैक्षणिक साहित्य वाटप -**



मुलांच्या आर्थिक परिस्थितीची आपबिती शिवप्रभा चॅरिटेबल ट्रस्ट पुणे व ग्रॅन्ड मराठा फाउंडेशन मुंबई यांचे कडून शैक्षणिक साहित्य पुरविण्याची विनंती करण्यात आली.त्यांनीही शाळेतील सर्वच मुलांना दर्जेदार बॅग, वर्षभर पुरतील एवढ्या वह्या,रंगपेट्या,कंपास पेट्या व इतर साहित्य अगदी मोफत पुरवले.परीणामी मुलं अगदी आनंदुन जात शाळेत यायला लागली.

**साउंड सिस्टीम -**





मुलांना स्टेज डेअरिंग यावी,मुलं बोलती व्हावीत त्यांच्या अभिव्यक्तीला चालना मिळावी ह्यासाठी परीसरातील ढाणकी या गावच्या आर्य वैश्य महिला महासभेच्या महिलांना साद घालण्यात आली.त्यांनी

दर्जेदार साउंड सिस्टीम भेट देत प्रेरणा दिली.परीणामी एरव्ही बुजरी भासणारी मुलं कविता,पाढे व परीपाठातून बोलायला लागली.

**उपक्रम फोटोंचा जागर विचारांचा -**



तरुण भारत

Yavatmal-Wardha | 2023-11-08 | Page- 1

epaper.tarunbharat.net

'उपक्रम फोटोंचा-जागर विचारांचा' अनोखा शैक्षणिक उपक्रम

नवी आबादी शाळेत ३० महापुरुषांचे फोटो प्रदान

शाळेत महापुरुषांचे मोजकेच फोटो होते.त्यामुळे मुलांना महापुरुषांची नावे देखील सांगता येत नसतं.त्यांच्या जयंती पुण्यतिथी वा दिनविशेष साजरे करण्यासाठी फोटोंची गरज भासु लागली.त्यावर मित्र मंडळींना आवाहन करण्यात आले.अन विडूळ गावातील १९९६ ला दहावीत असणाऱ्या एकाच बॅचने तब्बल तीस दर्जेदार फोटो पुरवले अन शाळेत दिनविशेष साजरे होण्यास आपसुकच चालना मिळाली.

**स्वित्झर्लंडमधुन नवोदय दत्तक योजना -**



लोकमत

स्वित्झर्लंडच्या शास्त्रज्ञांनी विडूळच्या मुलांना सांगितला यशाचा फॉर्म्युला

नवोदयच्या तयारीसाठी १० गरीब विद्यार्थी घेतले दत्तक

नवोदयमध्ये शिकून स्वत: झाले संशोधक

Helo Yavatmal

Page No. 6 Dec 19, 2023

Powered by: enewspo.com

स्वित्झर्लंडमधील शास्त्रज्ञ श्री.श्रीकांत हरणे यांनी दहा मुलं शैक्षणिक दत्तक घेतली.त्यांनी वर्ग पाचवीच्या नवोदय विद्यालय प्रवेश पुर्व परीक्षेचा दहा मुलांचा संपूर्ण खर्च उचलला अन मुलं स्पर्धा परीक्षेच्या रिंगणात उतरली.

**थेट लंडनची मदत -**



शाळेच्या बदलाचा प्रोजेक्ट अनेक संस्थाकडे मांडण्याचा आटोकाट प्रयत्न शिक्षकाच्या वतीने करण्यात आला.त्यात लंडन स्थित श्री.रोहीतजी शेलटकर व सौ.माधवी शेलटकर हे धावुन आले.त्यांच्या ग्रॅण्ड मराठा फाउंडेशन मुंबईच्या माध्यमातून त्यांनी शाळेस जवळपास पाच लाख रुपयांची मदत केली.त्यामध्ये संपूर्ण शाळा दुरुस्ती,परीसरात गट्टु बसविणे,शालेय रंगरंगोटी व बोलक्या भिंती, शौचालय दुरुस्ती व संगणक संच आदि कामे पुर्णत्वास गेल्या अन शाळेचे संपूर्ण रुप पालटले.

**विद्यार्थ्यांना विदेशी शिष्यवृत्त्या तर पालकांना रोजगार निर्मिती -**





अनाथ विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या वाटचालीतील व्यथा नागेश मिराशे ह्या शिक्षकाने शिवप्रभा या संवेदनशील संस्थेमार्फत मांडल्या.त्यात युरोपमधील एका अज्ञात महिलेने मनोज वास्टर ह्या विद्यार्थ्यांला संपूर्ण शिक्षणासाठी शिष्यवृत्तीच्या माध्यमातून कायमस्वरूपी दत्तक घेतले. शाळेच्या प्रवेशद्वारावर मुलींच्या शिक्षणाला प्रेरक ठरणारे सुंदर चित्र व ओळी लिहिल्या आहेत.

**“प्रत्येक माय माझी वाघीण झाली पाहिजे,**

**इथे तिथे राहण्यापेक्षा शाळेत आली पाहिजे.”**

विधवा महिलांना मुलींच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन म्हणून विविध संस्थाकडुन रोजगारासाठी शिलाई मशीन मिळवून देण्यात आल्या.पाच विधवा महिलांना महाराष्ट्र शासनाच्या बालसंगोपन योजना मिळवून देण्यात आली. परीणामी आज मुली शाळेत नियमित येतायत.




**दिल्लीच्या मदतीने टॅब प्रोजेक्ट -**

दिल्लीच्या कल्याणी खेर व विक्रम खेर ह्यांनी टॅब प्रोजेक्ट साठी तब्बल साठ हजार रुपयांची दर्जेदार टॅब पाठवुन देत ई लर्निगला चालना दिली.



**AI PROJECT बेंगलोर -**

बेंगलोर च्या AI BUDDIES ह्या खाजगी कंपनीने शाळेस विशेष भेट देत झालेले बदल तपशीलवार जाणुन घेतले.शाळेच्या कायापालटाने समाधान व्यक्त करीत थेट मा.जिल्हाधिकारी यवतमाळ यांचेकडे शाळेस **AI PROJECT** च्या माध्यमातून डिजिटलायेझशनसाठी दत्तक घेण्यासाठी विचारणा केली आहे.

**देशाविदेशातील अनेक संस्थाची व व्यक्तींची मिळवली मदत -**




ग्रॅन्ड मराठा फाउंडेशन मुंबई,दि बेटर इंडिया बेंगलोर, शिवप्रसाद ट्रस्ट पुणे,पार्वती गृप उमरखेड,अगस्तेय फाउंडेशन बेंगलोर, आर्य वैश्य महिला महासभा,एआय बड्डीस बेंगलोर, हरणे परीवार अमेरिका व युरोप आदि संस्था व व्यक्ती शाळेच्या उत्कर्षासाठी मदती साठी धावल्या. अन् शाळेच्या अनेक समस्यांचा निपटारा करता आला.

**कृतियुक्त शिक्षण व आनंददायी खेळावर भर -**






मुलं आनंदाने व स्वकृतीतून शिकले पाहिजेत ह्यासाठी विषय पेट्यांचा सुरेख वापर सुरू केला.विविध आनंदनिर्मिती करणारे खेळ घेत मुलांना शाळेची पर्यायाने शिक्षणाची ओढ लावली.

https://youtu.be/E4iALJ6AItQ?si=IJ-fzB5Y5NsjvbU3

**सांस्कृतिक कार्यक्रम व इतर उपक्रम -**





'जल्लोष आबादीचा..!' ह्या सांस्कृतिक कार्यक्रमाने शाळा घराघरात पोहोचली.कलागुणांना वाव मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेशी लळा निर्माण झाला.परीणामी १०० टक्के उपस्थितीचे उदिष्ट सफल झाले.

**शालेय परसबाग व पाणी व्यवस्था -**

शाळेचे अंतर्बाह्य रुप पालटले.लोकांचा विश्वास बसला.या सगळ्या कामांत सुधाकर मुलंगे या जेष्ठ नागरिकाने मार्गदर्शन व प्रत्यक्ष मोलाची मदत केली.शाळेत स्थानिकांच्या मदतीने सुंदर परसबाग तयार करण्यात आली.शाळेत चोवीस तास पाणी व्यवस्था उभी राहिली. रखरख दिसणारी परसबाग गोजिरवाण्या फुलांनी टवटवली व शाळा हिरवाईने नटली.आपुसकुच मुलं व फुलं फुलली.








**देशविदेशातील अनेकांची मिळवली मदत -**

शाळेचे बदलते आकर्षक रुप अनेकांना भुरळ घालुन गेले.अमेरिका,युरोप, इंग्लंड सह अनेक देशांतील व भारतातील मंडळींनी शाळेच्या गुणवत्ता वाढीसाठी लागणाऱ्या विविध वस्तूंची मदत केली.अन शाळेचा अवघ्या आठ महिन्यांत कायापालट झाला.

**अनोख्या उपक्रमाची रेलचेल -**

शाळेमध्ये विद्यार्थी बहुश्रुत व्हावेत म्हणून विविध क्षेत्रातील कर्तुत्ववानाच्या भेटी,जयंत्या पुण्यतिथी, दिनविशेष, वाढदिवस,पाढे पाठांतर स्पर्धा,सुंदर हस्ताक्षर कार्यशाळा, चित्रकला तथा रंग भरणं स्पर्धा,मार्गदर्शन शिबिर, शाळा पुर्वतयारी मेळावे,प्रवेशोत्सव आदिंनी मुलं शिक्षण प्रवाहात वेगाने आली रमली अन् आता गुणवत्तेत पण टिकतायत.












लोकमत

विडूळ येथे सुंदर हस्ताक्षरासाठी कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

विडूळ : हस्ताक्षर हा व्यक्तिमत्त्वाचा आरसा असतो, म्हणून विद्यार्थ्यांना शालेय जीवनातच हस्ताक्षरांना वळण देणे गरजेचे असते. त्यानुषंगाने विद्यार्थ्यांनी सुंदर हस्ताक्षर कसे काढावे, याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी कार्यशाळा नुकतीच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विडूळ नवी आवादी येथे पार पडली.

शाळेच्या प्रांगणात पार पडलेल्या 'सुलेखन' या कार्यशाळेत अवळगाव शेभरावर विद्यार्थी सहभागी झाले होते. सुंदर हस्ताक्षरासाठी महागड्या साहित्यापेक्षा अक्षरांचा नियमित सेवनयुक्त सराव करा, असे आवाहन सुलेखनकार हस्ताक्षरतज्ज्ञ सचिन शिरसाट यांनी केले. यावेळी सुंदर हस्ताक्षराचे शिक्षणातील व जीवनातील महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

सोबतच विद्यार्थ्यांना देवनागरी व इंग्रजी भाषेतील लिपी चिन्हं, अक्षरांचे वळण व विविध आकार समूह यांचा प्रत्यक्ष सराव करून घेतला. सरावादरम्यान कोणती पथ्ये पाळावीत, मायावात तपशीलवार मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांची अक्षर लेखन सुधारले या हेतूने शाळेच्या सतीने मोफत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यशाळेसाठी मुख्याध्यापक कोडवा झाले, सहायक शिक्षक नागेश गिरसे, सुवर्णा वाघडे, वर्षाराणी हिंगणे आदींनी पुढाकार घेतला. विद्यार्थ्यांनी घेतलेला उत्सूर्त सहभाग बघून पालकांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

Hello Yavatmal
Page No. 6 Oct 05, 2024
Powered by: erelego.com



लोकमत

जीवनात मोठे व्हायचे असेल तर अभ्यास करा

प्रणिता काळे : विडूळ येथे विद्यार्थ्यांशी संवाद

लोकमत न्यूज नेटवर्क

विडूळ : जीवनात खूप मोठे व्हायचे असेल तर खूप अभ्यास करा, असे आवाहन नुकत्याच डीवायएसपी झालेल्या प्रणिता काळे यांनी विद्यार्थ्यांना केले.

विडूळ येथील (नवी आवादी) जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत भेट दिली असता त्यांनी मुलांशी संवाद साधला. प्रणिता काळे सामान्य शेतकऱ्याची मुलगी असून त्या सध्या नांदेड जिल्हा परिषदेच्या उपशिक्षणाधिकारी आहेत. नुकत्याच लागलेल्या निकालात त्यांची डीवायएसपी म्हणून निवड झाली. हीच संधी साधून शाळेतील विद्यार्थ्यांना व शाळांना त्या प्रत्यक्ष भेट देऊन मार्गदर्शन करत आहेत. मराठा फाउंडेशन मुंबईच्या सौजन्याने नवी आवादी शाळेच्या नूतनीकरणाचे काम चालू असल्याने त्या शाळा भेटीवर आल्या होत्या. शाळेतर्फे प्रणिता काळे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते सुधाकर मुलगे होते. प्रमुख अतिथी सुरुवात शाळेच्या मुख्याध्यापिका शाहू केंद्रे उपस्थित होत्या. सूत्रसंचालन सुरुवात बाकडे तर आभार नागेश गिरसे यांनी मानले. कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक भास्कर गुंडे, सहायक शिक्षक कोडवा झाले यांच्यासह विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

Hello Yavatmal
Page No. 6 Mar 31, 2024
Powered by: erelego.com

**शासनाने नेमुन दिलेल्या निर्देशानुसार प्रभावी अंमलबजावणी -**

शासनाने नेमुन दिलेल्या प्रत्येक निर्देश,पत्रक व उपक्रमाची तंतोतंत व प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विविध कौशल्यपूर्ण योजना आखली जाते व ते प्रभावीपणे राबविण्याचा प्रयत्न केला जातो.उदा.बदलापूर घटनेच्या पार्श्वभूमीवर सखी सावित्री सुरक्षा समिती स्थापन करण्यात आली.पण तसा प्रकार आपल्या परीसरात घडुच नये ह्यासाठी विद्यार्थी व त्यांच्या माता भगिनींसाठी मार्गदर्शन शिबिराचे शानदार आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमासाठी प्रसिद्ध ॲड.अस्मिता टाकणखारे व डॉ.प्रिती जयस्वाल यांना आमंत्रित करण्यात आले होते.तसेच चक्रधर स्वामी यांच्या जयंती निमित्त महानुभव पंथाचे अभ्यासक महंत श्री.कृष्णमुर्ती यांना निमंत्रित करण्यात आले होते.






पुढारी

www.pudhari.com

## मुलींना आयुष्यात माणसं ओळखायला शिकवा

'माझी लेकबाळ व सुरक्षितता' कार्यक्रमात स्त्री रोगतज्ञ डॉ. प्रीती जयस्वाल यांचे आवाहन

My Nanded Edition Edition
Aug 31, 2024 Page No. 02
Powered by: erelego.com

**सांज दिवाळी - दिपोत्सव आबादीचा -**

एक दिवा ज्ञानासाठी!,एक दिवा शहीदांसाठी!,एक दिवा किसानांसाठी!,एक दिवा जवानांसाठी!,एक दिवा कष्टकऱ्यांसाठी ह्या संकल्पनेला रूजवत ऐन दिवाळीच्या सुट्टीतही दिवाळी पाडव्या निमित्ताने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विडुळ नवी आबादी येथे 'सांज दिवाळी-दिपोत्सव आबादीचा!' थाटात साजरा झाला. रांगोळी, आकाशदिवे,सजावट,आरास,दीपमाळी,फटाके,संगित नृत्य व गोडधोड अशी रेलचेल होतीआपल्या आनंदामागे असणाऱ्या तमाम सानथोरांच्या कृतज्ञता व्यक्त करत ज्ञानदिवाळी साजरी केली गेली.यामाध्यमातून येणाऱ्या मतदानादिवशी मतदान आवश्य करा असे आवाहन करीत मतदार जनजागृती करण्यात आली.परीणामी सगळी झोपडपट्टी शाळेबद्दल सकारात्मक विचार करु लागली.

https://youtu.be/DuVHdV6d7rA?si=fFMcnqlykMp-qbNJ

**फलनिष्पत्ती -**



## कॉन्व्हेंट संस्कृतीच्या काळात जिल्हा परिषद शाळेची भरारी



लोकमत

## जिल्हा परिषदेची ही शाळा खासगी शाळेवर भारी!

मेहनत फळली, पटसंख्याही वाढली : विडुळमध्ये उपक्रमांची चंगळ



पुढारी

## गुणवत्तेत विडूळची जि.प.शाळा ठरली अव्वल

अनेक संस्थांच्या सहकार्यातून आठ महिन्यांत शाळेचा कायापालट

My Nanded Edition Edition
Jul 06, 2024 Page No. 02
Powered by: erelego.com

शाळेच्या खात्यात केवळ ५३ रुपये असतांना शाळेच्या 'बदल दी चेंज आबादीचा' या उपक्रमाने शाळेत देशाविदेशातील दानशूर व्यक्ती व संस्थांच्या मदतीने शाळेचे संपूर्ण रुप पालटले. केलेल्या प्रयत्नांची फलनिष्पत्ती पुढीलप्रमाणे...

**मुलांची उपस्थिती १००% -**

मुलांचा व पालकांचा शाळेबद्दलची आपुलकी व विश्वास निर्माण करण्यात यशस्वी झालो.१००% मुलं नियमित शाळेत येऊ लागली.




**पटसंख्येत विक्रमी वाढ** झाली.आजुबाजुच्या इंग्रजी व आश्रम शाळेला जाणारा संपूर्ण ओघ थांबला.नव्हे तिकडची मुलं शाळेत परत आलीत.शाळाबाह्य एकही मुल राहील नाही.

**मिशन दृष्टी -**

शाळेत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले.त्याचबरोबर मिशन दृष्टी ह्या पार्वती चॅरिटेबल ट्रस्ट ह्या संस्थेच्या मदतीने सर्व मुलांची नेत्र तपासणी केली.US च्या Spring Vision या संस्थेकडुन मोफत चष्मे वाटप हा यशस्वी उपक्रम राबविण्यात आला.



**शाळेचे आकर्षक व बोलके रुप -**

शालेय परीसर सुंदर, स्वच्छ व सुरक्षित झाला.त्यामुळे शाळेत कुणीही घाण करायची नाही. असा पालकांनी निर्णय घेतला.आजमितीला ही बोलकी शाळा बघायला दोनशे पेक्षा जास्त मंडळी येऊन गेली.




पालकांमध्ये सकारात्मकता वाढली अन शाळेत पुर्वापार चालत आलेलीच इतर सर्व चुकीची कामं आपोआप थांबली. परीणामी शाळा सुरक्षित व स्वच्छ ठेवण्यासाठी आता पालकच पुढाकार घेतायत.

मुलांना संपूर्ण साहित्य शाळेतच मोफत मिळु लागल्याने पालक सुखावले.मुलही झपाट्याने अभ्यासाला लागली.







शालेय शिस्त,शालेय परसबाग,शालेय परीपाठ,गितमंच,इको क्लब,सुरक्षा क्लब, खेळ व क्रियेसाठी बाजुच्या शेतात क्रिंडांगणे केली,या निर्मितीमुळे मुलांमध्ये नेतृत्वगुण विकसित होत चैतन्य पेरल्या गेले.




अभ्यासासोबतच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळाला.परीणामी गुणवत्तेचा स्तर सुधारायला चालना मिळाली.

संगणक व टॅब ह्या डिजिटल साधनांचा वापर मुलं करु लागली.परीणामी डिजिटल स्मार्ट शिक्षणाला शाळेत सुरूवात झाली.



आमच्या झोपडपट्टीतल्या झालेल्या बदलांनी प्रेरीत होऊन विद्यार्थ्यांसाठी AI तंत्रज्ञानासाठी बेंगलोर संस्थेने शाळा डिजिटल करण्यासाठी दत्तक प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यवतमाळ यांचेकडे नुकताच सादर केला आहे.तो पुर्णत्वास गेल्यास ह्या उच्च तंत्रज्ञानाद्वारे अध्ययन अध्यापन करणारी महाराष्ट्रातील ही कदाचित पहिलीच शाळा ठरेल.


ज्ञान तेथे मान
Action Words
म्हणी बनवा




हिंदुराष्ट्र






**शिक्षणाबद्दल गाव झाले जागरूक** -

लोकांना शाळेत झालेला आमुलाग्र बदल खूप भावला.त्यांना शाळेविषयी कोण अभिमान निर्माण झाला.त्याचा परीणाम म्हणजे एका गणपती मंडळाने शाळेविषयी अभिमान व्यक्त करणारे भव्य पोस्टर रुपी देखावा थेट हायवेवर लावला.



**सुट्टीतही चालु राहणारी शाळा -**






सुट्टी मग ती उन्हाळी असो की दिवाळी,रवीवार असो की सण.एवढच काय अगदी रात्रीही उशीरापर्यंत ही शाळा चालु राहते.उपक्रमाचे मुख्य प्रवर्तक मिराशे सर हे सदर गावातच राहतात.त्यामुळे ते पुर्णवेळ शाळा व विद्यार्थ्यांशी संपर्कात असतात.सर शाळेत आले की हा हा म्हणता सर्व मुलं शाळेत जमा होतात.कुणी अभ्यास करत,तर कुणी स्वच्छता तर कुणी परसबागेत काम करतं.रात्री दहापर्यंतही मुलं शाळेत रेंगाळतात.एरव्ही शाळेकडे न फिरकणारी ही मुलं आज शाळेतून घरी जायला तयारच होत नाहीत.ह्यातच सदर उपक्रमाचे सर्व फलीत एकवटलेले दिसते.

**सारांश** -

एकंदरीत काय तर मोडकळीस आलेली शाळा देशाविदेशातील दानशूर व्यक्ती व संस्थांच्या मदतीने अवघ्या आठ महिन्यांत पालटली.शाळेत आजमितीला आवश्यक त्या सर्व समस्यांवर शिक्षकांनीच दीर्घकालीन उपाययोजना केल्या.विक्रमी वाढलेली पटसंख्या, नियमित राहणारी उपस्थिती व वाढीस लागलेली गुणवत्ता हे त्याचेच फळ आहे. स्लम समजल्या जाणाऱ्या परीसरात शाळेत चालणाऱ्या विविध अंगी उपक्रमाने

मोठी वैचारिक व शैक्षणिक क्रांती घडवून आणली.पालक शिक्षणाबाबत कमालीचे जागरूक झाले.अभ्यासातील सातत्यामुळे मुलांची वेगवेगळ्या परीक्षेत ठसा उमटायला सुरूवात झाली.शाळा परीसरासाठीच नव्हे तर शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी आदर्श व अभिमानाची ठरली. **बदल दी चेंज आबादीचा** ह्या उपक्रमाने केवळ शाळेच्या भौतिकतेत व गुणवत्ता संवर्धनाच्या दृष्टीनेच बदल केला नाही तर समाजाचा जिल्हा परिषदेच्या शाळांकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलुन गेला. एखाद्या शिक्षकाने मनावर घेतलं अन् टिमने साथ दिली तर शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी काय चमत्कार घडु शकतो ह्याच उदाहरण म्हणजे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विडुळ नवी आबादी.

ह्या कामी खऱ्या अर्थाने मुख्याध्यापक श्री.कोंडबा झाटे,श्री.नागेश मिराशे,कु.सुवर्णा बाकडे व कु.वर्षाताई हिंगणे ह्यांनी अतोनात मेहनत घेतली. 'ज्ञानासाठी आत या, सेवेसाठी बाहेर पडा' हे ब्रिद वाक्य दर्शनीभागावर ठसठशीतपणे लिहिलेली ही शाळा परीसरातील लोकांसाठीच नव्हे तर विविध प्रकारची मिडिया व संपूर्ण जिल्ह्यासाठी कौतुकाचा,औत्सुक्याचा विषय ठरली आहे.

**व्हिडिओ लिंक व बदल झालेले फोटो** -

- https://youtu.be/DuVHdV6d7rA?si=3Um-ZpRmzeoU42WF
- https://youtu.be/E4iALJ6AItQ?si=IJ-fzB5Y5NsjvbU3
- https://youtu.be/fPmzHitCcNQ?si=FXIinssZmdHaMWiM
- https://youtu.be/6NxgH8bdrQY?si=ptBwGwhMY1NH9uSw
- https://youtube.com/shorts/MEI1GAEzPXM?si=uqWKL9CGXmIKOKuE
- https://www.facebook.com/share/v/12ATQJYMHni/
- https://www.facebook.com/share/v/188FUxbvjG/
- https://www.facebook.com/share/v/175KAav7am/
- https://www.facebook.com/share/v/18GHMbtzVb/
- https://www.facebook.com/share/v/12ATQJYMHni/
- https://www.facebook.com/share/v/1Aw6PhgHt8/
- https://www.facebook.com/share/v/181koaeP1M/
- https://youtu.be/tiPjgqbtKF8?si=L7KNbA4lqDioFwnh

----------**----------

# "मेहनत रंग लाई....महादीप स्पर्धेतील यश"

**शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळा, राणी अमरावती, पं.स.बाभुळगाव, जि.यतवमाळ**

**शाळेचा ईमेल आयडी** - cumratkar@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.चंद्रशेखर उमरतकर
**मोबाईल क्रमांक** - 7083058203
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - namratakhadse79gmail.com

**प्रास्ताविक** -

**''कुछ किए बिना ही जय जयकार नहीं होती,**

**कोशिश करनेवालोकी कभी हार नहीं होती''**

निश्चितच या काव्यपंक्तींना खरा अर्थ देण्याचा प्रयत्न माझ्या विद्यार्थ्यांनी महादीप या स्पर्धा परीक्षेतील यशाने सिद्ध करून दाखविला. प्रयत्नाच्या जोरावर आपण यश खेचून आणू शकतो हे न सांगता, प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याचा प्रयोग माझ्या शाळेच्या विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे केला. यशोगाथा आहे, बाभुळगाव तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या टुमदार आणि प्रशस्त अश्या राणी अमरावतीच्या शाळेची. या शाळेत इयत्ता आठवीपर्यंत एकूण 232 विद्यार्थी अत्यंत आनंदी व स्वयंशिस्तीने शिकतात. यातल्याच काही निवडक मुलांची ही यशोगाथा.

निमित्त होतं 'महादीप' या स्पर्धा परीक्षेच. आजचा काळ हा प्रचंड स्पर्धेचा आहे. प्रत्येक क्षेत्रात जीवघेणी स्पर्धा बघावयास मिळते. त्यात शिक्षण क्षेत्र कसे बरे सुटणार. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचा अनुभव यावा व त्यातून त्यांचा आत्मविश्वास वाढून त्यांना स्वयंअध्ययनास प्रेरित करण्यासाठी स्पर्धा परीक्षेचा मा. सूर्यवंशी साहेब(माजी प्राथमिक शिक्षणाधिकारी) यांच्या कल्पनेतून 'महादीप' या महत्वाकांक्षी उपक्रमाचा श्रीगणेशा 2020 यावर्षी करण्यात आला. ग्रामीण भागातील विद्यार्थाना स्वतःच्या क्षमता सिध्द करण्यास उपयुक्त असा हा उपक्रम! आकाशात उत्तुंग भरारी घेण्यास समर्थ ठरणारा हा उपक्रम! स्वतःची बलस्थाने शोधत प्रसिध्दी देणारा हा उपक्रम! आणि या स्पर्धा परीक्षेचे निराळेपण म्हणजे यात विजयी होणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस म्हणून विमानवारीचे आयोजन केले जात होते. या विमानवारीची सर्व जि. प. च्या मुलांना भुरळ पडली. त्याला माझ्या शाळेची मुलं सुध्दा अपवाद नव्हती. विमानात बसण्याचे एकमेव स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्याच्या उमेदीने 'महादीप' या परीक्षेत उतरले आणि इथूनच त्यांचा स्वप्नांचा प्रवास सुरु झाला...

डॉ. ए. पी.जे. अब्दुल कलाम यांचे एक खुप सुंदर वाक्य मला आठवतं की,

**''स्वप्न तीच बघा, जी तुम्हाला झोपू देणार नाहीत,**

**जी तुम्हाला झोपेतून खडबडून जागे करतील''**

हीच ओळ मुलांना आम्ही वारंवार सांगायचो. कारण महादीप या स्पर्धा परीक्षेचा आवाका फार मोठा होता. स्पर्धा ही केवळ शाळेपुरती मर्यादीत नसून संपूर्ण जिल्हयातून स्पर्धक त्यांत उतरणार होते. त्यांत या परीक्षेची काठिण्यपातळी म्हणजे यात कुठल्याही प्रश्नांना उत्तरांचे पर्याय दिलेले नव्हते. तर प्रत्येक प्रश्नांचे उत्तर हे आठवून लिहायचे होते. म्हणजेच संपूर्ण स्मरणावर आधारीत ही परीक्षा होती. त्यात यांच्या जिल्हयातून

निवड होण्याकरिता सात फेऱ्या पार कराव्या लागणार होत्या. यातून जे विद्यार्थी सर्वाधिक गुण प्राप्त करतील अशा पहिल्या केवळ पाच विद्यार्थ्यांनाच विमानवारीत जाण्याची संधी दिली जाणार होती. तसेच स्पर्धा परीक्षेचा अभ्यासक्रम म्हणजे भाषा, गणित, बुध्दिमत्ता, सामान्य ज्ञान, सा. विज्ञान, सा. शास्त्र, चालु घडामोडी इ. समावेश यात केला जाणार होता. परीक्षेसाठी चार पुस्तके अभ्यासाला होती. परीक्षेचे हे स्वरुप बघून मुले थोडी गोंधळात पडली कि, अभ्यास नेमका करायचा कसा आणि कुठून? त्यातल्या त्यात काही विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास कमी झाला. कारण 2020 पासून जेव्हा हि परीक्षा घेण्यात आली तेव्हापासून माझ्या शाळेचे विद्यार्थी जिल्ह्यावरून थोड्या कमी प्रयत्नांमुळे परत यायचे. आम्ही मात्र 2023-24 यावर्षी जोमाने सुरुवात केली. मागील वर्षीचा अनुभव पाठीशी होताच. त्यात ही परीक्षा इयत्ता 5 ते 8 वी करिताच असते.

**"Well begin is half done"** या उक्तीप्रमाणे आम्ही या स्पर्धा परीक्षेतील मुलांची निवड करण्यासाठी त्यांची शाळास्तरावर छोटीशी चाचणी घेतली. यात 5 ते 8 च्या 22 मुला-मुलींनी चांगला प्रतिसाद दिला. हीच आमच्या विजयाची सुरुवात होती. असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. या स्पर्धा परीक्षेचा सराव करून घेणं हे केवळ विद्यार्थ्यांसाठीच नव्हे तर आमच्यासाठी सुद्धा एक आव्हान होते. त्यासाठी आम्ही पूर्णपणे तयार होतो. सर्वप्रथम मुलांची गटात विभागणी केली आणि गटानुसार अभ्यास देणे सुरु केला. त्यात अडचण अशी आली की आमच्याकडे पुस्तके फार कमी होती. तेव्हा त्यांना पुस्तकाच्या झेरॉक्स पुरविल्या. शाळेतील तासीका व सुट्टीचा वेळ कसा कामी लावता येईल याचे सुक्ष्म नियोजन केले. मुले अभ्यास करित असताना जो भाग त्यांना अवघड जात आहे त्यांच्या त्या संपूर्ण विषयांच्या तासिका घेतल्या. नोट्स काढून त्यांना पुरविल्या. सतत अभ्यासाचे वातावरण तयार करून गटचर्चा, सराव चाचण्या, तोंडीपाठ, स्वयंअध्ययन, ध्यान इ. विविध क्लुप्त्या वापरुन दिवसागणिक प्रयत्न वाढवत नेले आणि काय कमाल, मुले परीक्षेची वाट बघायला लागले. विचारायला लागले की, परीक्षा कधी आहे? म्हणून. केंद्रस्तरावर प्रथम येऊन आठवी च्या सानिया श्रीकृष्ण परोपटे, तर सातवीच्या संकेत दिनेश मेंढे यांनी आपण स्पर्धेत कोणत्या स्थानावर आहोत हे दाखवून दिले.

त्यानंतरच्या तालुकाफेरीत सुध्दा 9 विद्यार्थी पात्र ठरले आणि एकप्रकारे यशाचा आत्मविश्वास मुलांमध्ये पेरून गेला. मात्र खरा कस लागणार होता तो तालुक्याच्या अंतीम फेरीत. यासाठी आम्हाला आमचे प्रेरणास्थान श्री. मेघने साहेब गटशिक्षणाधिकारी, बाभुळगाव यांनी खूप मोलाचे मार्गदर्शन केले. मुलांशी भेटून त्यांच्या मनातील परीक्षेचे दडपण दूर करण्याचा प्रयत्न केला. आता मात्र नव्या उमेदीने मुलांचा पुन्हा सराव घेण्यासाठी तयार झाले. त्याकरिता शनिवार, रविवार आणि शाळा सुटण्यापूर्वीचा अर्धातास दररोज 10.30 पूर्वी येऊन एक तास सराव घेणे सुरु केले. यात आणखी एक अडचण आम्हाला जाणवली, ती म्हणजे विज्ञान विषयाची उत्तरे मराठीतून लिहायची होती. मात्र शाळेत सेमी इंग्रजी असल्यामुळे विज्ञान हा विषय इंग्रजीतून शिकविला जात होता. त्यासाठी संपूर्ण विज्ञान विषय मराठीतून विविध प्रकारच्या क्लुप्त्या वापरुन शिकविला. यात पालकांना सुध्दा सहभागी करुन घेतले. फोनव्दारे, मॅसेजव्दारे त्यांच्याशी संपर्कात राहून मुलांच्या अभ्यासाकडे लक्ष द्यायला सांगितले.

**"असफलता एक चुनौती है, इसे स्विकार करो**

**क्या कमी रह गई, देखो और सुधार करो !"**

याप्रमाणे मागील वर्षीच्या चुकांना टाळून दिवसागणिक प्रयत्न वाढवित नेत 9 विद्यार्थी उत्तम गुणांनी जिल्हास्तरावर पोहचले. याठिकाणी स्पर्धा शिगेला पोहचली होती आणि आता 'इस पार या उस पार' असा

निकाल लागणार होता. मुलांनी छान पेपर सोडविले. जिल्हास्तरीय परिक्षेनंतर प्रत्येकांनी आपला गुणांचा अंदाज बाहेर येऊन मला सांगितला. त्यानंतर आम्ही अंतिम निकालाची वाट बघू लागलो.

आणि शेवटी तो दिवस आला. ज्या दिवसाची आम्ही सर्वजण वाट बघत होतो. माझ्या शाळेची इयत्ता आठवीची कु. सानिया श्रीकृष्ण परोपटे ही महादीप या स्पर्धा परीक्षेत जिल्ह्यातून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली. 50 पैकी 46 गुण घेऊन तिने यशाचे शिखर गाठले. सोबतच तिची मैत्रीण कु. अनुष्का प्रमोद ऊईके (वर्ग 8वा) ही सुध्दा पाचवा क्रमांक घेवून उत्तीर्ण झाली आणि दोघीही विमानवारीसाठी पात्र ठरल्या, त्यांच्या यशामुळे हे सिध्द झाले की.

**'गुणवत्ता ही अपघाताने प्राप्त होणारी बाब नसून..**

**सातत्य चिकाटी आणि कठोर मेहनत याचे ते फलित आहे''**

**समारोप** -

एखादं स्वप्न बघावं आणि संपुर्ण जिद्दीने ते पुर्ण करण्यासाठी प्रयत्न करावे व त्याला यश मिळावे यापेक्षा दुसरा अतुलनीय आनंद नक्कीच नाही. हा आनंद माझ्या विद्यार्थीनींनी या यशाने मिळविला. विद्यार्थ्यांमध्ये अफाट शक्ती असते. केवळ गरज असते ती ज्ञानलालसा जागृत करण्याची. त्यासाठी शिक्षक म्हणून आम्ही केवळ त्यांना दिशा दाखवित होतो तर मुख्याध्यापक प्रत्येक ठिकाणी मार्गदर्शक, सहकारी आणि कुशल नेता म्हणून सोबत होते. यशाच्या दिपस्तंभापर्यंत पोहचण्याकरिता आणि निश्चितच या सर्वात शाळेचे मुख्याध्यापक व सर्व सहकारी शिक्षकांनी एकमेकांना साथ दिली. आमचे केंद्रप्रमुख श्री. गुल्हाने सर, विस्तार अधिकारी श्री. देशपांडे सर व श्री. मस्के साहेब तसेच तालुका समन्वयक श्री. कोंबे सर, संपूर्ण शाळा व्यवस्थापन समिती, पालकवर्ग यांची भक्कम साथ आम्हाला होती. या यशाने विद्यार्थ्यांमध्ये आमुलाग्र बदल झाला आहे. त्यांच्यात आत्मविश्वासाचं बळ मजबुत झाल आहे. मेहनतीने कुठलीही गोष्ट आपण मिळवू शकतो हा दृढविश्वास त्यांच्यात बघायला मिळतो. शेवटी एवढच..

**'मेहनत रंग लाई' !**

# राणीअमरावती जि. प. शाळेने मारली बाजी

## जिल्हास्तरीय महादीप परीक्षा

◆ **यवतमाळ, २१ मार्च**

जिल्हास्तरीय महादीप परीक्षेत बाभूळगाव तालुक्यातील राणीअमरावती येथील जिल्हा परिषद शाळेने बाजी मारली. दोन विद्यार्थिनींची विमानवारीसाठी निवड झाली आहे.

जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या वतीने ९ मार्चला पार पडलेल्या परीक्षेला जिल्ह्यातील ६१४ विद्यार्थी बसले होते. यामध्ये ४१ विद्यार्थी गुणवत्ता सिद्ध करून विमानवारी व विविध बक्षिसांसाठी पात्र ठरले. यामध्ये बाभूळगाव पंचायत समितीअंतर्गत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा राणीअमरावती शाळेने यश संपादन करून महादीप परीक्षेत जिल्ह्यातून अव्वलस्थान प्राप्त केले. शाळेतील ८ व्या वर्गातील सानिया श्रीकृष्ण परोपटे व अनुष्का प्रमोद उईके या विद्यार्थिनींचा यात समावेश आहे.



यशस्वी विद्यार्थिनींच्या रॅलीप्रसंगी उपस्थित मान्यवर

जिल्हास्तरीय महादीप परिक्षेत अव्वल स्थान प्राप्त केल्यामुळे या विद्यार्थिनींच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन १६ मार्चला जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा राणीअमरावती येथे केले होते. अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किशोर मेंढे होते. प्रमुख अतिथी म्हणून सरपंच सतीश मेंढे, उपसरपंच ईमरान यांच्यासह ग्रामस्थांची उपस्थिती होती. ग्रामस्थांनी गुणवत्ता प्राप्त सानिया परोपटे व अनुष्का उईके यांचा सत्कार केला व शाळांतर्फे बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी ग्रामस्थांनी दुचाकीवर रॅली काढली.

विद्यार्थिनींचे मार्गदर्शक शिक्षक नम्रता खडसे यांनासुद्धा ग्रामस्थांनी सन्मानित केले. यशाबद्दल बाभूळगाव पं. स.चे गटशिक्षणाधिकारी मैघने, विस्तार अधिकारी तथा केंद्रप्रमुख राजहंस मेंढे यांनी अभिनंदन केले. संचालन प्रवीण दरेकर यांनी तर मुख्याध्यापक चंद्रशेखर उम्रतकर यांनी आभार मानले. सोहळ्यासाठी उम्रतकर, प्रवीण दरेकर, खोडे, भोकरे, भस्मे आदींनी सहकार्य केले. *(तभा वृत्तसेवा)*

----------**----------

## "वृक्षवल्लीने सजलेली सर्वांग सुंदर शाळा"

**शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, ब्राम्हणवाडा पश्चिम, पंचायत समिती, नेर, जि.प. यवतमाळ**

**शाळेचा ईमेल आयडी** - shitaldudhe6@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्रीमती शितल प्रल्हादराव दुचे
**मोबाईल क्रमांक** - 8805731480
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - shitaldudhe6@gmail.com







**ओसाड रानी, फुलला मळा**
**सजीव शाळा, लावी लळा.....**

बालकांना लळा लावणारी आमची जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा ब्रह्मणवाडा पश्चिम पंचायत समिती नेर... मी 2023 मध्ये विनंती बदलीने ब्राह्मणवाडा पश्चिम या शाळेवर पदवीधर शिक्षिका म्हणून रुजू झाले संपूर्णतः उजाड असलेल्या रानामध्ये जसे पाखरांना करमणार नाही अगदी त्याचाप्रमाणे शाळेत मन लागत नव्हते. दिवसातील जास्तीत जास्त वेळ जिथे घालवायचा तिथे अगदीच उजाडपणा असताना, कुठलीही सुविधा नीट नसताना काय करावे विचाराने मन उदास झाले होते.

विस्तीर्ण मैदान आहे परंतु सगळीकडे कचरा, वाढलेले गवत्, साचलेले डबके, मैदानाचा चढ-उतार, पिण्याच्या पाण्याची सुविधा नाही, अत्यंत जुन्या माठात साठवलेले पाणी विद्यार्थी पितात, फिल्टर धूळ खात पडलेले, वर्गात पंखे आहेत परंतु बंद अवस्थेत, शाळेत टीव्ही प्रोजेक्टर आहे ते पण बंदमध्यान्ह भोजनाची धड़ व्यवस्था नाही खोली अगदीच विस्कटलेली, विद्यार्थी म्हणाल तर अगदीच अबोल शिस्तीचा अभाव शिक्षणाचा धड पायाही पक्का नव्हता.... अशी विदारक अवस्था बघून मन उदास झाले होते.

अशातच आमचे केंद्रप्रमुख श्री विजय धुस्ट सर यांची शाळेला भेट झाली... सरांना माहिती होती की मॅडम स्वस्थ बसणार नाहीत, त्यांनी मला तुम्ही चार्ज घ्या व कार्य करायला सुरुवात करा अशी प्रेरणा दिली. सरांनी मांडलेल्या प्रस्तावावर मन विचार करू लागले नग दुसऱ्याच दिवशी आमचे गटशिक्षणाधिकारी श्री मंगेश देशपांडे साहेबांशी संवाद साधला. सर म्हणाले, मॅडम तुम्हाला मिळालेली ही एक संथी आहे. मोझरला असताना विद्यार्थी गुणवत्तेचा कळस तुम्ही गाठलात, आता ब्राह्मणवाडा पश्चिम ला भौतिक शैक्षणिक असा सर्वांगीण गुणवत्तेचा कळस गाठण्याची ही संधी आहे. त्यांचे शब्द अत्यंत प्रेरणादायी ठरले. म्हणतात ना, दृढनिर्धार कष्ट करण्याची तयारी असली सर्व काही शक्य होतं... मग मनाशी अगदी पक्की खूणगाठ बांधत विडा उचलला शाळा विकासाचा आणि तो प्रत्यक्षात उतरवत आहे. या निर्धाराने तयार झाली आमची सर्वांग सुंदर शाळा.....

**पूर्वीचे स्वरूप, आलेल्या अडचणी व संवाद सत्र -**

आमच्या शाळेत प्रवेश करतच विशाल काय वड सर्वप्रथम सर्वांचे स्वागत करतो. त्याच्या सोबतीला डौलदार कडुलिंब उभा आहे. विस्तीर्ण मैदान स्वरूप छान वाटत असतानाच आत कटाक्ष टाकला की लक्षात आल शाळेच उजाड रूप. वाढलेले गवत पाण्याचे साठलेले डबके, त्यावर घोंगावणारे कीटक सगळीकडे अस्वच्छता पिण्याच्या पाण्याचा जुना झालेला माउ, मुली मध्यान्ह भोजनासाठी बसतात ती पडक्या अवस्थेतील काळी झालेली जागा, विस्कळीत असलेली किचन शेड, बंद असलेल्या टीव्ही शौचालय स्वच्छतागृहाची धड व्यवस्था नाही.... असे स्वरूप पालटायचे तर सर्वांची साथ महत्त्वाची...

प्रथम मुलांशी संवाद साधला. मैदानात साठलेले डबके बुजवायचे यासाठी फार सोपी ट्रिक अमलात आणली. मुझे व आम्ही कामास लागलो आणि सर्वप्रथम सभोवतालची उच सखल मैदान सपाट केल व डबक्यांमध्ये माती भरली, मातीही खडकाळ होतीच त्यामुळे सहज डबक्यात पाणी साचणे बंद झाले अन कीटक व मच्छरांचे साम्राज्य देखील. छोट्या छोट्या कृती करायच्या आहेत त्याही नाविन्यतेने व कल्पकतेने हे सहज लक्षात आले.

व्यवस्थापन समितीची सभा आयोजित केली. अध्यक्षांशिवाय कोणीच आले नाही... एवढी नकारात्मकता का? हाच प्रश्न पोषण आहार शिकवणाऱ्या ताईंना विचारला तर त्यांचे उत्तर, येथे असेच असते... लोक येत नाहीत. अशातच गृहस्थ भेटले त्यांनी तर शाळेचा तेथील शिक्षकांचा संपूर्ण इतिहासच माझेसमोर मांडला. मग त्या नकारात्मकता मागचे कारण समजले. मग पुन्हा एकदा सभा आयोजित केली सर्वांशी फोनवर देखील संवाद साधला, मग कुठे अध्यक्ष व तीन सदस्य आले. सुरुवात झाली संवाद सत्राची.. त्यांच्याशी शाळा सुधारणा बाबत संवाद साधला. माझझे नियोजन त्यांचे समक्ष ठेवले. शाळेतील इतर दोन शिक्षकांना सुद्धा बोलावने, त्यांना शाळेचे स्वरूप पालटताना भौतिक व शैक्षणिक बदल कशाप्रकारे करता येईल हे पटवून दिली त्यांचे मत घेऊन आम्ही कार्याला सुरुवात केली. समाज सहभाग मिळवायचा ठरविला. पालक सभा सुद्धा आयोजित केली.

**आलेल्या अडचणी -**

हे सर्व करताना लोकांची शाळेप्रती प्रचंड नकारात्मकता आहे. हे अनुभवास येत होते. आधी आलेल्या त्यांच्या अनुभवांची ही शिदोरी असावी त्यांचे मन पालटण्याचा भरपूर प्रयत्न करावा लागला. आर्थिक अडचण भरपूर होती, मग स्वतः जाऊनच खर्च करून करण्याची ठरविले, सर्वप्रथम पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली, टाकी बसवून त्यावर कठडे बसविले, पिण्याच्या पाण्याकरिता फिल्टर सुद्धा सुरू केले. फिल्टर दुरुस्ती करिता, एका सभ्य गृहस्थाने विनामूल्य शाळेला मदत केली हॅन्ड वॉश स्टेशन सुरू केल, स्वच्छतागृहे व शौचालय स्वच्छ करून घेतली, या पायाभूत सुविधा निर्माण करताना लोकांची मानसिकता बदलत आहे हे अनुभवास मिळाले... आणि इथूनच सुरुवात झाली उत्क्रांतीला.

**वृक्षवल्लींचा साज -**

शाळेच्या भव्य मैदानामध्ये मधल्या पेवर ब्लॉकच्या बाजूला व आजूबाजूच्या परिसरामध्ये सुद्धा सुंदर रोपे लावली. यांवर त्यांच्या मराठी व इंग्रजी नावाच्या पाट्या लावल्या अतिशय सुंदर परिसर दिसायला लागला आणि आमची शाळा वृक्षवल्लीनी पाहून आनंदीत होतो.

या सुंदर परिसरामध्ये आलेला प्रत्येक व्यक्ती थोडा वेळ वृक्षवल्लीना पाहून आनंदीत होतो.

**सुंदर शालेय परसबाग -**

किचन शेडच्या समोर असलेल्या खुल्या जागेमध्ये सुंदर अशी आकर्षक परसबाग निर्मिती करण्यात आली. यातही विद्यार्थी, शिक्षक शाळा व्यवस्थापन समिती, तसेच पालकांचा उत्स्फूर्त सहभाग होता. परस बागेमध्ये दैनंदिन आहारामध्ये उपयोगात येणाऱ्या सर्व भाजीपाला लावण्यात आला. मेथी, पालक, सांभार, चवळी टोमॅटो, दुधी भोपळा, काकडी दोडके... अनेक भाजीपाल्यांचा उपयोग पोषण आहारात केला जातो. आता विद्यार्थ्यांना सकस व चवदार आहार मिळतो आहे. पालकांना सुद्धा याचा आनंद होतो.

**वर्गखोल्यांनी टाकली कात -**

सर्व वर्ग खोल्यांना रंगरंगोटी करण्यात आली साहित्यांनी सजलेल्या विषय कोपऱ्यांनी नटलेल्या वर्ग खोल्या उदयास आल्या. मध्यान्ह भोजनाचा व्हरांडा व किचन शेड अतिशय विस्कळीत व काळा झालेला परिसर तसेच किचन रूमच्या बाजूची वर्गखोली अतिशय भंगार अवस्थेत होती. या सर्व खोल्यांना आज नवीन रूप प्राप्त झाले आहे. विद्यार्थी स्वच्छ सुंदर जागेवर जेवतात आनंद त्यांच्या चेहऱ्यावर व्यक्त होतो.

**आकर्षक वाचन कट्टा व सेल्फी पॉइंट -**

मुलांना वाचनाची आवड निर्माण व्हावी याकरिता बाल वाचनालय तर सुरू केले सोबतच सुंदर वाचन कट्टा उभारला घात तीन सिमेंट बेंचा समाज सहभागातून मिळवले व त्याचा वरील ढाचा स्वखर्चाने उभारला. सुंदर आकर्षक अशा वाचन कट्ट्याचा आनंद वाचनाचा एक तास या उपक्रमामध्ये मन मुराद घेतला जातो. मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण झाली. शाळेत राबविलेल्या विविध उपक्रमाच्या फोटोद्वारे सेल्फी पॉइंट उभारला व वाढदिवस सेल्फी पॉइंट सुद्धा उभारला. त्याद्वारे वैविध्यता आकारास येऊन आकर्षकता निर्माण झाली.

**गुणवत्ता विकासासाठी संगणक कक्ष व विविध उपक्रमांची अंमलबजावणी -**

शाळेमध्ये रुजू झाले तेव्हा विद्यार्थी खूपच अबोल, आत्मविश्वासाचा अभाव, शिस्तीचा अभाव असे तसेच विषयांचे पायाभूत ज्ञान सुद्धा कमी.... अशावेळी विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक अनुभव देणे अत्यंत गरजेचे होते. याकरता शाळेतील सहकान्यांसह विविध उपक्रमाबाबत चर्चा केली वर्गानुसार तसेच शाळेचे

सामूहिक उपक्रमांची यादी बनवून उपक्रम राबविले पात ग्राहक भांडार, बचत बैंक, विज्ञान प्रदर्शन, किल्ले बनवणे, क्राफ्ट उपक्रम, दप्तर मुक्त शनिवार, दिनांक तो पाढा, दिनांक ची स्टोरी, मजेदार कोडी, माझे सामान्य ज्ञान माझा शब्दसंग्रह, वर्डगार्डन, माय बर्ड कॉर्नर, असे विविध उपक्रम राबवत आहोत. अशा विविध उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास वाढीस लागला, विद्यार्थी बोलके बनले, ज्या विद्यार्थ्यांना साथी साधी इंग्रजी शब्द माहिती नव्हते आज मुझे वाक्य सांगतात इंग्रजी मधून भाषण देतात प्रेडीटेशन करू शकतात.

संगणकाच्या युगामध्ये संगणकाचे ज्ञान विद्याध्यर्थ्यांना मिळावे याकरिता संगणकाचा एक संच विकत घेऊन विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण दिले जाते. अशा प्रकारे विविध उपक्रमाच्या मदतीने गुणवत्ता विकासाकडे वाटचाल सुरू आहे.

**समारोप -**


जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा ब्राह्मणवाडा पश्चिम येथे झालेला विकासात्मक बदल हा सर्वांच्या सहकायचि फलित आहे. आदरणीय गावकरी मंडळी व्यवस्थापन समिती शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सर्वांची सोबत, तसेच अधिकाऱ्यांची प्रेरणा व मार्गदर्शन या सर्व बाबींमुळे हा अमुलाग्र बदल घडून आणण्यास आम्ही सक्षम ठरलो... आणि त्याचीच परिणीती म्हणजे, आमच्या शाळेने' मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या राज्यस्तरीय अभिनव उपक्रमामध्ये तालुक्यातुन प्रथम क्रमांक पटकाविला... सर्वांचे मनस्वी धन्यवाद.....

यापुढेही विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्याचे व शाळेच्या विकासाचे कार्य असेच घडत राहू दे हेच निसर्गाकडे मागणे.....


**सुक्ष्माकडून भव्यतेकडे जाण्याचा मार्ग गवसला....**
**सर्वांग सुंदर शाळेचा इंद्रधनु नभी उमटला.....**












बालकांची
बचत बँक
वि.प.उच्च प्राथ. शाळा


READ

# आमची सुंदर परसबाग











----------**----------

## "भौतिक सुविधांच्या उपलब्धीतून शाळा विकास"

**शाळेचे नाव व पत्ता - श्रीराम मोरेश्वर गोगटे माध्यमिक व उच्च माध्यमिक (व्यवसाय) विद्यामंदिर, जामसंडे,ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग.**

**शाळेचा ईमेल आयडी** - sanjaygogate66@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री. संजय मोहन गोगटे
**मोबाईल क्रमांक** - 9421264112
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - sanjaygogate66@gmail.com

**प्रास्ताविक** -

जामसंडे आणि आजूबाजूच्या परिसरातील मुलांची माध्यमिक शिक्षणाची सोय व्हावी या उद्देशाने येथील कै.श्री.जनार्दन मोरेश्वर तथा आप्पासाहेब गोगटे (माजी आमदार) व त्यांचे बंधू आणि ग्रामस्थ मित्रमंडळी यांनी विद्या विकास मंडळ, जामसंडे या संस्थेची सन 1975 मध्ये स्थापना केली आणि अनेक दानशूर व्यक्ती देणगीदार यांच्या साहाय्याने प्रशालेसाठी स्वतःची आरसीसी बांधकाम असलेली स्लॅबची इमारत बांधून जून 1981 मध्ये श्रीराम मोरेश्वर गोगटे माध्यमिक विद्यामंदिर जामसंडे या नावाने माध्यमिक शाळा सुरू केली आणि इयत्ता पाचवी व आठवी चा वर्ग शाळेच्या स्वतःच्या इमारतीत सुरू केला व पुढे 10 वी पर्यंतचे वर्ग टप्प्या टप्प्याने सुरु झाले. सन 1993-94 मध्ये अकरावी बारावीचे व्यवसाय अभ्यासक्रमाचे वर्ग सुरु केले. आज मितीला इयत्ता पाचवी ते बारावी पर्यंतचे वर्ग सुरू आहेत. सुरुवातीच्या काळात जवळपास आठ वर्षे शाळेला अनुदान नव्हते. खडतर वाटचालीतून प्रशालेची प्रगती साधण्याचा प्रयत्न केला. आता संस्थेचे विद्यमान अध्यक्ष श्री.अजितराव पांडुरंग गोगटे, कार्यवाह श्री. प्रवीण वासुदेव जोग, शाळा समिती अध्यक्ष श्री. प्रसाद गोपाळ मोंडकर व पदाधिकारी यांचे मार्गदर्शन प्रशालेला लाभते आहे.

प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. संजय मोहन गोगटे यांच्या नेतृत्वात प्रशालेने अनेक विषय क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करीत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षकांच्या सहाय्याने अनेक उपक्रम हाती घेतले आहेत व ते राबविण्यात येत आहेत.

विद्यार्थी अभ्यासाबरोबरच कला, क्रीडा सांस्कृतिक इत्यादी क्षेत्रात उत्तम यश प्राप्त करीत आहेत आणि स्वच्छ व सुंदर शाळेचा उपक्रमही यशस्वी करीत आहेत. प्रशालेची प्रगती अनेक उपक्रमांच्या माध्यमातून होत आहे. शिक्षणाच्या विविध क्षेत्रांमधील उपक्रम प्रशालेने राबविले असून येथे मात्र सन 2024-25 मध्ये प्रशालेने अनेक उपक्रमांबरोबरच स्वच्छ व सुंदर शाळा हा उपक्रम हाती घेऊन तो यशस्वी केला आहे. महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा हे स्पर्धात्मक अभियान सुरू केले आणि यामध्ये आमच्या प्रशालेने जानेवारी/फेब्रुवारी 2024 मध्ये जिल्हास्तरावर तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. याच अभियानाच्या टप्पा दोन मध्ये ऑगस्ट/सप्टेंबर 2024 मध्ये जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे.

**मुख्याध्यापक शिक्षक यांना विषयासंदर्भात आलेल्या अडचणी किंवा मुख्याध्यापक शिक्षक यांनी विषयासंदर्भात अधिक प्रभावी केलेले काम** -

मुख्याध्यापक श्री. संजय मोहन गोगटे व शिक्षक, कर्मचारी यांनी प्रशालेत शिक्षण क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती साधण्यासाठी काही सकारात्मक बदल घडवून आणले पाहिजे यासाठी विचार विनिमय केला. प्रशालेत अनेक वर्षे सहशालेय उपक्रम घेतले जात आहेत. विद्यार्थी प्रगतीसाठी गुणवत्तेला प्राधान्य देऊन अध्ययन अध्यापन प्रक्रिया आधुनिकीकरण करणे. क्रीडा साहित्य उपलब्ध करणे, विविध खेळांची मैदाने तयार करणे, विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणे, गुणवत्तेसाठी पालक सभा घेणे, कलाक्षेत्रातील शिक्षण

देणे, आपत्ती व्यवस्थापनाची ओळख करून देणे, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ची ओळख करून देणे, त्यासाठी चर्चा घडवून आणणे, योगासने, प्राणायाम शिकविणे, किशोरवयीन मुलींच्या आरोग्याविषयी समुपदेशन करणे. विद्यार्थ्यांचा विविधांगी विकास साधणे, आनंददायी शिक्षण प्रक्रिया राबविणे याविषयी विचार विनिमय झाला. तसेच महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा हे अभियान राबविले. शालेय प्रगती साधण्यासाठी हे अभियान उपयुक्त ठरले.

**मुख्याध्यापक व शिक्षक यांनी केलेले प्रभावी कार्य -**

मुख्याध्यापक यांच्या नेतृत्वाखाली शिक्षक व कर्मचारी यांनी स्वच्छ सुंदर शाळेसाठी प्रभावीपणे कार्य केले. त्यासाठी पुढील अनेक मुद्द्यांवर/ घटकांवर काम करण्याचे निश्चित करुन त्याची अंमलबजावणी केली.

1. वर्गाची रंगरंगोटी व सजावट करणे.
2. शालेय इमारतीची रंगरंगोटी करणे याविषयी चर्चा केली व रंगकाम करण्याचे निश्चित करण्यात आले.
3. शालेय परिसरात पर्यावरण पूरक झाडांची लागवड करणे. त्यासाठी चिरेबंदी पेठा बांधणे माती घालून जागा तयार करणे.
4. शालेय परिसरात पालेभाज्या फळभाज्यांची लागवड करणे व पोषण आहारात त्याचा वापर करणे.
5. संरक्षक भिंतीची रंगरंगोटी करणे व त्यावर प्रबोधनात्मक विचार लिहिणे.
6. बोलक्या भिंतींची निर्मिती करणे.
7. शाळा परिसरात खो-खो कबड्डीचे मैदान तयार करणे.
8. स्टाफ रूमची रंगरंगोटी करणे.
9. क्रीडा साहित्य रूम अद्ययावत करणे.
10. विज्ञान प्रयोगशाळा अद्ययावत करणे.
11. समाजशास्त्र, भाषा, गणित प्रयोगशाळा निर्माण करणे.
12. ग्रंथालय अद्ययावत ठेवणे.
13. डिजिटल शिक्षणाची सुविधा अधिकाधिक उपलब्ध करणे
14. ध्वज स्तंभाला स्टीलचे रेलिंग (रिंगण)
15. स्वच्छतागृहे अद्ययावत राखणे.

**या आणि अशा स्वच्छ सुंदर शाळेसाठी आवश्यक असणाऱ्या अनेक घटकांवर चर्चा करून त्याची अंमलबजावणी करण्याचे ठरविण्यात आले.**

**मुख्याध्यापक व शिक्षक यांनी प्रभावी कामासाठी केलेली अंमलबजावणी -**

स्वच्छ सुंदर शाळेसाठी कार्याची अंमलबजावणी करताना मुख्याध्यापकांनी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक वर्ग यांचे सहाय्य घेण्याचे ठरविले आणि अंमलबजावणी केली.

**वर्गाची रंगरंगोटी व सजावट -**

सुरुवातीला काही वर्गाची रंगरंगोटी विद्यार्थ्यांनी दिलेल्या देणगीतून व संस्थेने केलेल्या आर्थिक योगदानातून करण्यात आली. तसेच प्रशालेत वर्गशिक्षक असलेल्या शिक्षकांनी स्वखर्चाने आपल्या वर्गाला रंग काढला. विद्यार्थ्यांची मदत घेतली. चांगल्या प्रकारचा ऑइल बॉण्ड कलर काढून वर्गाची रंगरंगोटी केली आणि वर्ग सजावट करण्यासाठी विविध विषय शिक्षकांकडून व विद्यार्थ्यांकडून माहितीचे तक्ते तयार करून ते वर्गात लावले तसेच प्रबोधनात्मक सुविचार, नकाशे, व्याकरण विषयक तक्ते, चित्रे यांनी वर्गाच्या भिंती

बोलक्या केल्या. प्रत्येक वर्गात रंगकाम आणि तक्ते माहिती,, वर्ग सजावट यासाठी सुमारे एका वर्गासाठी दहा ते बारा हजार रुपये याप्रमाणे सर्व वर्गांना रंगरंगोटी व सजावट करण्यात आली. या कामी संस्था व शिक्षक यांनी आर्थिक योगदान दिले वर्गाच्या रंगरंगोटीमुळे वर्ग सुंदर व स्वच्छ दिसू लागले. बोलक्या भिंतींची निर्मिती झाली. वर्गातील वातावरण अध्ययन अध्यापनासाठी अधिक पूरक व प्रसन्न झाले. विद्यार्थी उत्साही वातावरणात रमू लागले.

**पूर्वीचा वर्ग**



**बदलानंतरचा वर्ग**




**शालेय इमारतीच्या बाह्य भागाची रंगरंगोटी -**

शालेय इमारतीच्या बाह्यभागाचे रंगकाम पुन्हा नव्याने करावयास झालेले होते. हे रंगकाम कमी कालावधीमध्ये करण्यासाठी नियोजन करण्यात आले. काही रंगारी आणि माजी विद्यार्थी तसेच विद्यार्थी यांचे मदतीने प्रशालेच्या इमारतीला बाहेरून रंग देण्यात आला. विद्या विकास मंडळ जामसंडे या संस्थेने या कामी मोलाचे आर्थिक योगदान दिले. साहजिकच आधीच मुख्य रस्त्यालगत असलेली शाळा दिमाखदार दिसू लागली. परिसराचे वातावरण स्वच्छ व प्रसन्न झाले.

https://go.screenpal.com/watch/cZ6UiyncYnP

**पूर्वीची इमारत**



**बदलानंतरची इमारत**



**शालेय परिसरात पर्यावरण पूरक झाडांची लागवड करणे -**

प्रशालेची इमारत ज्या जमिनीवर उभी आहे तो सर्व भाग दगडी, कातळी आहे. इथे अन्य ठिकाणाहून माती आणून झाडे लावण्यासाठी जागा तयार करावी लागते त्यासाठी संस्थेच्या मदतीने वृक्ष लागवडीसाठी जागा तयार करण्यासाठीचे नियोजन आणि अंमलबजावणी करण्यात आली. प्रशालेच्या परिसराला असलेल्या संरक्षक भिंतीच्या आतल्या बाजूने सुमारे दोन मीटर अंतर रुंदीच्या जागी संरक्षक भिंतीला लागून झाडे लावण्यासाठी येथे उपलब्ध होणाऱ्या जांभ्या दगडाच्या चिऱ्यांच्या पेठा (भिंत) बांधण्यात आली. सुमारे 250 फूट लांब आणि 7 फूट रुंद अशा आकाराच्या चिरेबंदी पेठा बांधून त्यात वृक्ष लावण्यायोग्य अशी सुमारे 20 डंपर माती (सुमारे ८०००० /- रु.) विकत घेऊन घालण्यात आली आणि त्यात विविध पर्यावरण पूरक झाडांची लागवड करण्यात आली या कामी विद्यार्थ्यांनी शिक्षकांनी संस्थाचालकांनी पालकांनी सहभाग घेऊन विविध प्रकारची वृक्ष लागवड केली यात औदुंबर, अशोक, साग, कडूनिंब, रक्तचंदन, आवळा, कवट, बेल, पेरू तसेच आंबा, नारळ, सुपारीची रोपे लावण्यात आली.

सदर रोपांची जोपासना प्रशालेतील शिक्षक कर्मचारी विद्यार्थी यांचेकडे देण्यात आली असून झाडांना नियमित पाणी घालणे त्याचे मशागत करणे झाडांची निगराणी करणे ही कामे विद्यार्थी शिक्षक कर्मचारी आवडीने करीत आहेत तसेच सदर झाडे विद्यार्थ्यांना दत्तक देण्यात आली आहेत व त्याद्वारे झाडांची रोपांची जोपासना करण्यात येत आहे.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार या उपक्रमाद्वारे विद्यार्थी अभ्यासाबरोबरच अभ्यासपूरक अशा वृक्ष संवर्धनाचे प्रात्यक्षिक धडे घेत आहेत आणि हा अनुभव विद्यार्थ्यांना समृद्ध करणारा आहे.

**ओसाड जागा**



**पर्यावरणपूरक झाडांची लागवड**





**शालेय परिसरात परसबागेची निर्मिती -**

प्रशालेचे एकूण क्षेत्र 101 गुंठे आहे. यामध्ये प्रशालेची इमारत, सभागृह, पोषण आहार स्वयंपाक गृह, स्वच्छतागृह अशा इमारती आहेत. तसेच परिसरात वृक्ष लागवडी बरोबरच प्रशालेच्या मागील बाजूस परसबागेची निर्मिती करण्याकरिता चिरेबंदी पेठा बांधून माती घालून परसबागेसाठी जागा तयार करण्यात आली. प्रशालेतील शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी पालेभाज्यांचे बी रुजवणे, जोपासना करणे, फळभाज्यांची लागवड करणे, निगराणी करणे, ही कामे आवडीने केली. कार्यानुभवाच्या तासिकांना तसेच शाळा सुटल्यानंतरही काम करून विद्यार्थ्यांनी प्रशाला परिसरात परसबाग फुलविली. यात लालमाठ पालेभाजी, मुळा भाजी, वांगी, टोमॅटो, मिरची, अशा प्रकारच्या भाज्यांचे उत्पादन घेतले आणि शालेय पोषण आहारात समावेश करून विद्यार्थ्यांना त्याचा लाभ देण्यात आला. पोषण आहारात वापरून शिल्लक राहिलेल्या अतिरिक्त पालेभाजी फळभाजी यांची विक्री करण्यात आली. आणि ती रक्कम पुन्हा भाजीपाला लागवडीसाठी वापरण्यात येते. श्रमाबरोबरच विक्री व्यवसाय व्यवस्थाही विद्यार्थ्यांना अभ्यासता येत आहे.

**ऑगस्ट 2024 मध्ये पोषण शक्ती आहार योजनेअंतर्गत झालेल्या परसबाग स्पर्धेत प्रशालेला देवगड तालुक्यात तृतीय क्रमांक प्राप्त झाला आहे.**



**परसबाग निर्मिती**

**संरक्षक भिंतीची रंगरंगोटी -**

प्रशालेला चारही बाजूंनी चिरेबंदी संरक्षक भिंत आहे. या भिंतीला रंगरंगोटी करून ती सुशोभित करणे आणि त्यावर प्रबोधनात्मक लेखन करून भिंत बोलकी करणे यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मदतीने संरक्षक भिंत रंगविली. त्यासाठी विविध रंगछटांचा उपयोग करून भिंत आकर्षक केली. यामुळे परिसराच्या व प्रशालेच्या सुशोभीकरणात वाढ झाली आणि प्रबोधनात्मक लेखनामुळे जाणीव जागृती विद्यार्थी आणि नागरिकांमध्ये निर्माण होण्यास मदत होत आहे.





**बोलक्या भिंती -**

प्रशालेत विद्यार्थी रमला पाहिजे आणि परिसरात त्याला प्रसन्न वातावरण उपलब्ध होऊन इथे त्याने ज्ञानकण वेचावे यासाठी प्रशालेच्या भिंती बोलल्या पाहिजेत. शिक्षक विद्यार्थी यांच्या मदतीने प्रशालेच्या भिंतींवर प्रबोधनातून विचार माहिती अभ्यासक्रम लेखन अनुसार विषयानुसार लेखन करण्याचे नियोजन झाले.

प्रशालेची इमारत रंगारंगोटीने स्वच्छ सुंदर आकर्षक झालीच, त्यावर आता प्रबोधनात्मक सुविचार चित्रे नकाशे थोर व्यक्तींचे फोटो विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या कल्पकतेने लावले आणि आता प्रशालेच्या भिंती बोलक्या केल्या आहेत विद्यार्थी वर्गात व वर व्हरांड्यातून फिरताना हे ज्ञानगण वेचत असतो आणि सुवचन, दिनविशेष, पंचांग लेखन, दैनंदिन घडामोडी, (बातम्या), विज्ञान वार्ता, ही सदरे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालतात.






**अध्यापक कक्षाची रंगरंगोटी -**

जसा वर्ग सुंदर स्वच्छ सुशोभित तसा मुख्याध्यापक कक्ष लिपिक कार्यालय अध्यापक कक्ष या भागात सुद्धा रंगरंगोटी करण्यात आली.

**विज्ञान प्रयोगशाळा -**

प्रशालेतील विज्ञान प्रयोग शाळेची पूर्वीची जागा बदलून ती अधिक प्रशस्त जागेत मांडण्याचे नियोजन करण्यात आले. विज्ञान शिक्षक, प्रयोगशाळा सहाय्यक, चतुर्थ श्रेणी कर्मचारी, यांच्या साह्याने पूर्वीपेक्षा मोठ्या जागेत प्रयोगशाळा करण्यात आली आहे. तसेच स्टेम लर्निंग कंपनीद्वारे विद्यार्थ्यांना विज्ञानाचे प्रयोग करून पाहता येतील अशी अभ्यासक्रमाला पूरक विज्ञानाची 80 मॉडेल्स प्रशालेत प्राप्त झाली असून विद्यार्थी आवडीने प्रयोगशाळेत रमत आहेत.






**अद्ययावत क्रीडा साहित्य खोली -**

प्रशालेत विविध खेळांचे साहित्य उपलब्ध आहे. तसेच शासकीय अनुदानातून सुमारे एक लाख चाळीस हजार किमतीचे क्रीडा साहित्य प्रशालेला प्राप्त झाले आहे. त्याचबरोबर प्रशालेचे माजी विद्यार्थी आणि शिक्षणप्रेमी यांनी सुमारे 75 हजार रुपयांचे क्रीडा साहित्य, लेझीम आणि ढोल ताशे प्रशालेला देणगी रूपात दिले आहेत. कॅरम बोर्ड, आर्चरी, लगोरी सेट, हॉलीबॉल, बुद्धिबळ, खो-खो चे पोल, गोळा फेक साठी गोळे, दोरी उड्या, असे विविध साहित्य प्रशालेत उपलब्ध आहे.

सदर क्रीडा साहित्यासाठी स्वतंत्र खोलीची व्यवस्था करण्यात आली असून क्रीडा साहित्य ठेवण्यासाठी तेथे लोखंडी रॅक (स्टॅन्ड) बनवण्यात आले आहेत. त्याच ठिकाणी खेळाच्या साहित्याचे रजिस्टर ठेवण्यात आले असून विद्यार्थी व शिक्षक खेळाचे साहित्य घेतल्याची व जमा केल्याची नोंद त्या ठिकाणी करतात. यामुळे साहित्य व्यवस्थित रित्या हाताळले जाते व गहाळ होत नाही. तेथे ते नेटकेपणाने ठेवण्यात येते. शिस्तीचा हा मूल्य संस्कार, विद्यार्थ्यांवर घडतो आणि घेतलेली वस्तू जागच्या जागी आणि वेळच्यावेळी ठेवली पाहिजे याची जाणीव विद्यार्थ्यांना होते.




**शालेय परिसरात खो-खो कबड्डीचे मैदान उपलब्ध करणे -**

शाळेला सुमारे चार एकरचे क्रीडांगण उपलब्ध आहे. तसेच प्रशाला परिसरात समोरील भागात कातळी, दगडी भागावर सुमारे 50 हजार किमतीची दहा डंपर माती टाकून एक खो खो व कबड्डी खेळण्यासाठी मैदान तयार करण्यात आले आहे. तसेच या परिसरात बास्केटबॉलचे मैदानही प्रस्तावित आहे. त्यासाठी

श्री निरंजन दीक्षित यांनी चार लाख रुपये देणगी दिली आहे. प्रशाला परिसरात या होत असलेल्या सकारात्मक बदलांमुळे प्रशालेचा परिसर सुशोभित होण्यास मदत झाली आहे.

**समाजशास्त्र व भाषा, गणित विषयांच्या प्रयोगशाळा -**


प्रशालेत विज्ञान विषयाची प्रयोगशाळा आहे. त्याचबरोबर गणित, समाजशास्त्र, भाषा या विषयांच्या प्रयोगशाळा सुद्धा स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात आले आहेत. विज्ञान, गणित शिक्षक, भाषा, समाजशास्त्र विषयाचे शिक्षक यांची बैठक घेऊन या संदर्भात नेमके काय करता येईल याचे नियोजन करण्यात आले. तशा प्रकारची व्यवस्था स्वतंत्र वर्गामध्ये करण्यात आली. शासनाकडून प्राप्त झालेल्या गणित भाषा विज्ञान विषयाच्या जादुई पेटाऱ्यांचा उपयोग विद्यार्थ्यांच्या आनंददायी शिक्षणासाठी होत आहे. तसेच विद्यार्थी शिक्षकांनी तयार केलेले अध्यापन साहित्य विद्यार्थ्यांची उत्सुकता वाढवणारे आहे. अशा प्रयोगशाळांमधून विद्यार्थी त्यांना उपलब्ध झालेल्या वेळेत तसेच मोकळ्या वेळेत या प्रयोगशाळांमधून गणिती क्रियांचे ज्ञान, भाषाविषयक ज्ञान, साहित्यिक, साहित्यप्रकार, नकाशांची ओळख, भौगोलिक स्थाने यांचे ज्ञान मिळऊ शकतो. यामध्ये संगणक व इंटरनेटची सुविधाही उपलब्ध आहे.



**डिजिटल शिक्षणाची सुविधा -**

प्रशालेत नेहमीच्या अध्ययन अध्यापन प्रक्रियेत विद्यार्थ्यांना ज्ञानप्राप्तीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यासाठी संगणक प्रोजेक्टर, इंटरॲक्टिव्ह बोर्ड, स्मार्ट टीव्ही इत्यादीचा उपयोग करण्यात येत आहे. आमदार श्री. नितेश राणे यांचे निधीतून प्रशालेला आठ संगणक, एक झेरॉक्स मशीन, एक प्रिंटर उपलब्ध झाला आहे. तसेच शिक्षक आमदार श्री ज्ञानेश्वर म्हात्रे यांचे कडून एक प्रोजेक्टर, व पाचवी ते दहावीचा अभ्यासक्रम पेन ड्राईव्ह प्राप्त झाला आहे. तसेच श्री निरंजन डावखरे यांचे कडून प्रशालेला प्रोजेक्टर प्राप्त झाला आहे. भगीरथ ग्रामविकास प्रतिष्ठान झाराप यांनी स्मार्ट टीव्ही उपलब्ध करून दिला आहे. आणि प्रशालेच्या संस्थेने 40% लोकवर्गणी भरून आणि भगीरथ ग्रामविकास प्रतिष्ठान झाराप यांनी 60% रक्कम भरून प्रशालेला एक इंटर ऍक्टिव्ह डिजिटल बोर्ड १०/१०/२०२४ रोजी उपलब्ध करून दिला आहे. विद्यार्थ्यांच्या अध्यापनात याचा उपयोग प्रकर्षाने होत आहे. आणि शालेय सुशोभीकरणात या गोष्टी भर घालणाऱ्या ठरत आहेत. आणि विद्यार्थ्यांच्या अध्ययन प्रक्रियेत आवड निर्माण करीत आहेत.




**ध्वजस्तंभ सुशोभन -**

प्रशालेच्या इमारती समोर असलेल्या ध्वज स्तंभाच्या बांधकामाला प्रशालेतील शिक्षक श्री. विनायक पांडुरंग ठाकूर यांनी आपल्या आई-वडिलांच्या स्मरणार्थ स्टीलचा ध्वजस्तंभ व त्याला स्टीलचे नक्षीदार रिंगण सुमारे 70 हजार रुपये किमतीचे देणगी रूपाने करून दिले आहे. यामुळे प्रशाला व परिसराच्या सुशोभीकरणात अधिकच वाढ झाली आहे.





**वर्ग स्वच्छता व परिसर स्वच्छता -**

प्रशालेत दरवर्षी वर्ग प्रतिनिधींची निवडणूक होऊन वर्ग प्रतिनिधी निवडले जातात. यामध्ये प्रत्येक वर्गात एक स्वच्छता मंत्री असतो वर्गशिक्षक स्वच्छता मंत्री यांच्या मदतीने आपला वर्ग नेहमी स्वच्छ व सुंदर राहील याकडे लक्ष पुरविण्यात येते . प्रत्येक वर्गात डस्टबिन झाडू व कचरा भरण्यासाठी सुपली उपलब्ध करण्यात आली आहे. तसेच व्हरांड्यात दोन्ही बाजूला एकूण सहा मोठे डस्टबिन माजी विद्यार्थ्यांनी देणगी म्हणून दिले आहेत. ( सुमारे 35 हजार रुपये किमतीचे) याशिवाय शाळेच्या परिसरात दोन मोठ्या कचराकुंड्या आहेत. विद्यार्थी आपल्या वर्गासमोरील व्हरांडा आणि संपूर्ण शाळेचा परिसर स्वच्छ ठेवतात. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये आणि एकूणच प्रशालेत वावरणाऱ्या सर्व घटकांमध्ये स्वच्छतेचे मूल्य रुजवण्यास मदत होत आहे. याशिवाय प्रशालेतील विद्यार्थी स्वच्छता मॉनिटर म्हणून काम करतात. शासनाच्या पोर्टलवर तशी नोंद करून विद्यार्थ्यांनी केलेले उपक्रम तेथे नोंदविले आहेत. तसेच वैयक्तिक स्वच्छतेकडे लक्ष पूरविण्यात येते केवळ शाळा आणि परिसर एवढीच स्वच्छतेची मर्यादा नसून आपल्या आजूबाजूचा विद्यार्थी राहतो त्या ठिकाणचा परिसर सुद्धा स्वच्छ कसा राहील यासाठी विद्यार्थी काम करीत आहेत स्वच्छतेचा हा मूल्यसंस्कार विद्यार्थ्यांच्या अंगी यशस्वीपणे बाणताना दिसत आहे.

https://youtu.be/_sbGTIZK1PA



**सुसज्ज ग्रंथालय -**

प्रशालेच्या ग्रंथालयात सुमारे 4000 पेक्षा अधिक पुस्तके असून विविध मासिके, शैक्षणिक पाक्षिके, वृत्तपत्रे असे वाचनीय साहित्य उपलब्ध असते. प्रत्येक वर्गात वर्ग प्रतिनिधींमधून एक वाचनालय मंत्री असतो. त्यामार्फत प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्याला वाचनालयातून पुस्तके वाचायला मिळतात. तसेच प्रशालेत वाचन कट्ट्याची निर्मिती करण्यात आली आहे. महावाचन चळवळ, विद्यार्थ्यांसाठी वाचन प्रेरणा उपक्रम याद्वारे विद्यार्थ्यांना वाचनाची सवय निर्माण करण्याचा प्रयत्न सातत्याने होत आहे.

**गांडूळ खत प्रकल्प -**

पोषण आहारातील टाकाऊ पदार्थ आणि टाकाऊ पालापाचोळा यातून गांडूळ खत प्रकल्प प्रशालेत कार्यान्वित करण्यात आला आहे यात निर्माण झालेले खत परिसरातील झाडांना फुलझाडांना फळभाज्यांना घालण्यात येते.

**अद्ययावत स्वच्छतागृहे -**

प्रशालेत विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे उपलब्ध असून दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आणि महिला व पुरुष शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र स्वच्छतागृह आहेत. तेथे फिनेल, पाणी, याची उत्तम व्यवस्था आहे आणि नेहमीच स्वच्छता राखली जाते.

**मुख्याध्यापक/शिक्षक यांनी प्रभावी कामासाठी केलेल्या अंमलबजावणीनंतर दृश्य परिणाम/ फलनिष्पत्ती/यशोगाथा -**

स्वच्छ व सुंदर शाळेसाठी मुख्याध्यापक यांनी शिक्षक व शिक्षकेतर यांचे सहाय्याने प्रशालेत विविध उपक्रम राबविले. यात मुख्याधापकांच्या नेतृत्वाने शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, पालक, विद्यार्थी, यांचे साह्याने जे उपक्रम राबवले त्याचे सकारात्मक बदल शालेय वातावरण आणि कामकाज यावर झालेले दिसून आले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये असे बदल होणे अपेक्षित आहेत.

स्वच्छ व सुंदर शाळा उपक्रम हाती घेतल्यावर मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या राबविलेल्या स्पर्धात्मक अभियानात जानेवारी फेब्रुवारी 2024 मध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यात प्रशालेने तृतीय क्रमांक प्राप्त केला व रोख रुपये तीन लाखाचे पारितोषिक प्राप्त झाले. तर ऑगस्ट 2024 मध्ये याच सुंदर शाळेच्या टप्पा दोन अभियानात सिंधुदुर्ग जिल्ह्यात प्रशालेने द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे.त्यासाठी रुपये पाच लाखाचे बक्षिस जाहीर झाले आहे. स्वच्छ व सुंदर वातावरण मनाची प्रसन्नता वाढवते. प्रशालेचे स्वच्छ व सुंदर वातावरण विद्यार्थ्यांना अधिक सुखद अनुभव देणारे ठरत आहे. अंमलबजावणी नंतरचे दृश्य परिणाम सांगायचे म्हणजे विद्यार्थ्यांना आपली शाळा, परिसर, वर्ग स्वच्छ ठेवण्याचे शिक्षण मिळाले कचरा हा अन्यत्र न टाकता तो कचराकुंडीत टाकला जातो. प्रशालेचे वर्ग व व्हरांडे स्वच्छ झाडून ठेवण्याची सवय विद्यार्थ्यांना लागली.

वर्गाची रंगरंगोटी व सजावट केल्यामुळे बोलक्या भिंतींची निर्मिती झाली मोकळ्या वेळेत विद्यार्थी भिंतीवरील लेखन वाचू लागले. संरक्षक भिंत सुद्धा बोलकी झाली, आकर्षक झाली. विद्यार्थ्यांना शाळेच्या परिसरात फिरताना त्यांच्या नजरेसमोर सुविचार, प्रबोधनात्मक लेखन राहू लागले आणि विद्यार्थी परिसरात रमू लागले आहेत.

प्रशालेच्या परिसरात पर्यावरण पूरक झाडांची लागवड केल्यामुळे विद्यार्थ्यांना वृक्षांची ओळख झाली. शिवाय विद्यार्थी किंवा विद्यार्थ्यांच्या गटाला झाडे निगराणीसाठी नेमून दिल्यामुळे त्यांची जोपासना कशी करावी, पाणी कधी द्यावे, किती द्यावे, खताची मात्रा किती द्यावी, याचे शिक्षण शिक्षकांमार्फत त्यांना मिळाले आणि या उपक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये वृक्ष प्रेम निर्माण होण्यास मदत झाली आहे. तसेच शाळेचा परिसरही सुशोभित झाला आहे.

शाळेच्या परिसरातील परसबागेच्या निर्मितीमुळे विद्यार्थ्यांना पालेभाज्या फळभाज्यांची ओळख झाली. उत्पादन कसे घ्यावे याचे शिक्षण मिळालं. विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या पोषण शक्ती आहारात सदर पालेभाज्यांचा, फळभाज्यांचा, समावेश करताना त्याचा विद्यार्थ्यांना लाभ झाला आणि अधिकचा शिल्लक भाजीपाल्याची विक्री करण्यात येत असल्याने बाजार व्यवस्थापनाचे शिक्षणही मिळाले. विद्यार्थ्यांनी ऑगस्ट महिन्यामध्ये रानभाज्यांचे प्रदर्शन व विक्री राबविला. ग्रंथालयाचा सुयोग्य वापर, वाचन प्रेरणा उपक्रम, महावाचन उत्सव, वाचन कोपरे, या उपक्रमातून विद्यार्थ्यांना **वाचाल तर वाचाल** हा संदेश मिळाला आणि वाचनाची आवड निर्माण होण्यास हे उपक्रम उपयुक्त ठरत आहेत.विज्ञान प्रयोग शाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे कुतूहल, जिज्ञासा, जागृत होण्यास मदत झाली आहे. मिळालेल्या मोकळ्या वेळेत सुद्धा विद्यार्थी प्रयोगशाळेत रमत आहेत. प्रशालेत आता उपलब्ध केलेल्या क्रीडा साहित्याचा लाभ विद्यार्थी घेत आहेत. त्यांना शारीरिक शिक्षण शिकविणाऱ्या शिक्षकांकरवी चांगले शिक्षण मिळते आहे. विद्यार्थी शाळा सुटल्यानंतर आणि सुट्टीच्या दिवशीही खेळाच्या सरावासाठी मैदानावर आवडीने हजर राहतात आणि याचाच परिणाम म्हणून शासनाच्या पावसाळी क्रीडा स्पर्धांमध्ये प्रशालेतल्या विद्यार्थ्यांनी कबड्डी, खो-खो, कॅरम, बुद्धिबळ,

मैदानी स्पर्धा अशा स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवून तालुकास्तर, जिल्हास्तर, विभाग स्तर, राज्यस्तरापर्यंत यश प्राप्त करीत आहेत.

भाषा, समाजशास्त्र, गणित या प्रयोगशाळांमुळे विद्यार्थ्यांना ज्ञानाची अधिक दालने उपलब्ध झाली आहेत. पुस्तकी ज्ञानाबरोबरच प्रात्यक्षिकाचे धडे विद्यार्थी आवडीने घेताना दिसतात. हा सकारात्मक बदल दिसून येतो आहे. गांडूळ खत प्रकल्पाच्या निर्मितीतून टाकाऊतून टिकाऊची संकल्पना विद्यार्थ्यांमध्ये रुजत आहे. ध्वज स्तंभ बांधणीला स्टीलचे रेलिंग, खो-खो कबड्डीचे मैदान, विद्यार्थी वावर असलेल्या शाळेचा नेहमी स्वच्छ परिसर, स्वच्छ वर्ग, वृक्ष लागवड केलेल्या झाडांची जोपासना या सर्व गोष्टी स्वच्छ आणि सुंदर शाळेच्या सौंदर्यात अधिकच भर घालणाऱ्या आहेत.

स्वच्छ सुंदर शाळेची कल्पना ही केवळ शाळेचे रंगरंगोटी आणि परिसराची स्वच्छता एवढ्या पुरतीच मर्यादित नसून विद्यार्थ्यांचा गुणात्मक विकास, भावनात्मक विकास, सांस्कृतिक विकास, यातीलही प्रगती हे प्रशालेचे सौंदर्य आहे. ऑगस्ट 2024 मध्ये विद्यार्थी गुणवत्ता विकास यासाठी माननीय शिक्षण संचालक पुणे यांनी शाळा तपासणीसाठी शाळेला भेट दिली होती. यावेळी विद्यार्थ्यांची गुणवत्ता 91 टक्के दिसून आली खऱ्या अर्थाने अंतर्बाह्य स्वच्छता सुंदरता गुणात्मकता या गोष्टी प्रशालेला स्वच्छ व सुंदर शाळा म्हणून नावारूपाला आणत आहेत. आनंददायी शिक्षणाची संकल्पना साकार होताना दिसत आहे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विषयी** (2020) -

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे 21व्या शतकातील पहिले शैक्षणिक धोरण आहे. आणि या धोरणाचे ध्येय आपल्या देशातील वाढत्या विकासात्मक आवश्यकतांवर उपाययोजना करणे हे आहे. प्राचीन आणि सनातन भारतीय ज्ञान आणि विचारांची समृद्ध परंपरा लक्षात घेऊन हे धोरण तयार करण्यात आले आहे. प्रशालेत झालेला हा सकारात्मक बदल राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये नमूद केल्यानुसार प्रत्येक विद्यार्थ्याच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यास आणि अभ्यासेतर दोन्ही क्षेत्रांमध्ये चालना देणारा आहे.

**समारोप** -

प्रशालेत 2024-25 मध्ये मुख्याध्यापकांच्या नेतृत्वाखाली शिक्षकांच्या सहाय्याने जे सकारात्मक बदल घडून आले त्याचे दृश्य परिणाम, फलनिष्पत्ती वरील नमूद मुद्द्यांवरून दिसून येईल. केंद्र शासनाच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार या धोरणामध्ये अपेक्षित असलेल्या मूल्यांवर आधारित हे सकारात्मक बदल प्रशालेत दिसून येतात. अभ्यासाबरोबर अभ्यासेतर क्षेत्रांमधील ज्ञान, आनंददायी शिक्षण, स्वच्छता, कल्पकता, तार्किक विचार, भारताची समृद्ध वैविध्यपूर्ण प्राचीन आणि आधुनिक संस्कृती, ज्ञानव्यवस्था, परंपरेचा अभिमान, भारतीय असल्याचा सखोल अभिमान, केवळ विचारात नव्हे तर व्यवहारात आणि बुद्धीमध्ये रुजवणे, स्वच्छतेचे महत्व जाणणे ही या धोरणाची दूरदृष्टी जोपासण्यास प्रशालेत घडून आलेले सकारात्मक बदल निश्चितच उपयुक्त आहेत.

प्रशालेत घडून येत असलेल्या या सकारात्मक बदलातून स्वच्छ सुंदर शाळेची कल्पना आकाराला आली आहे. येत आहे. आता इथे येत असलेल्या, रमत असलेल्या विद्यार्थ्यांची भावना प्रशालेविषयी जणू लळा लावणारीच ठरत आहे.

**ही आवडते मज मनापासूनि शाळा ।**
**लाविते लळा ही जसा माऊली बाळा ।।**
**धन्यवाद!**

----------**----------

# "वस्ती शाळेचा प्रगती प्रवास"

**शाळेचे नाव व पत्ता - शिवाजी विद्यालय, हिर्लोक, ता.कुडाळ जि.सिंधुदुर्ग.**

**शाळेचा ईमेल आयडी** - dineshmhadgut1713@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.दिनेश जयचंद म्हद्गुज
**मोबाईल क्रमांक** - 9404344460
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - dineshmhadgut1713@gmail.com

आमची शाळा - महाराष्ट्र राज्याच्या, सह्याद्री पट्ट्यात कोल्हापूर व सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या सिमावर्ती भागात असलेल्या व छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या, रांगणागडाच्या पायथ्याशी असलेल्या, हिर्लोक,गावात 14 जनू 1976 रोजी, लोकसहभागातून शिवाजी विद्यालय हिर्लोक, हायस्कुलची स्थापना झाली.

'हिर्लोक पंचक्रोशीतील ८ गावामधील शेतकरी, आदिवासी, भटक्या विमुक्त समाजातील मुले व मुली इयला 5 वी ते10 वी पर्यंत शिक्षण सेमी इंग्रजी व मराठी माध्यमातून या विद्यालयात घेत आहेत. NEP 2020 अतंर्गत शिक्षणात होणारे आमुलाग्र बदल लक्षात घेत, शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून विद्यालयात बहुविध कौशल्य (NSQF) अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होण्याच्या उद्देशाने, शाळेतील शिक्षक अध्यापनाबरोबर अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम शाळेत राबवितात. BaLA अंतर्गत बोलक्या भिंती, कला-क्रिडा क्षेत्रात नैपुण्य, आपत्ती व्यवस्थापन, उत्कर्षा उपक्रम, स्वच्छ व सुंदर शाळा, ई-लर्निंग, बायोगॅस निर्मितीतून धुर मुक्त शाळा, गांडूळ खत निर्मिती ,पर्यावरणपूरक वनऔषधी वनस्पतींची लागवड, स्वच्छता मॉनिटर, नवभारत साक्षरता अभियान, मुबलक हँडवॉश स्टेशन, मुला-मुलींसाठी तसेच दिव्यांग विद्यार्थ्यासाठी स्वतंत्र स्वच्छतागह, विज्ञान प्रयोगशाळा, संगणक व भाषा प्रयोगशाळा, सी.सी.टी.व्ही कॅमेरे, वाचनालय, बायोमेट्रिक मशीन, गप्पी मासे पैदास केंद्र, सांस्कृतिक भवन व रंगमच, संरक्षक भिंत, शुद्ध पाणी पिण्याची व्यवस्था, परसबाग निर्मिती, स्काऊट गाईड,मातकाम,बचत बँक, वारली पेंटिग, एम.सी.सी.,शिक्षण सप्ताह व आनदंदायी शनिवार या विविध उपक्रमांच्या माध्यमातून परिपूर्ण विद्यार्थी घडविण्याचे कार्य विद्यालयात केले जाते.

सन 2023- 2024 मध्ये महाराष्ट्र शासनाने राबवलेल्या मुख्यमंत्री माझी शाळा-सुंदर शाळा, या उपक्रमात, वरील सर्व उपक्रमांच्या माध्यमातून व प्रशालेत उपलब्ध असणाऱ्या भौतिक सुविधांच्या उपलब्धतेमुळे माध्यमिक गटात सिंधुदुर्ग जिल्हयामधून द्वितीय क्रमांक व सन 2024- 2025 या शैक्षणिक वर्षात माध्यमिक गटात प्रथम क्रमांक पटकावून शाळेने यश संपादन केले.

**प्रशालेत राबविलेले उपक्रम -**

**1.NSQF -**

प्रशालेत राबविण्यात आलेल्या बहुविध कौशल्य विकास अभ्यासक्रमात इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांचा समावेश असून ,या अभ्यासक्रमात शेती, तंत्रज्ञान व बागकाम, अभियांत्रिकी आणि कार्यशाळा, ऊर्जा आणि पर्यावरण, अन्नप्रक्रिया तंत्रज्ञान हे चार अभ्यासक्रम शिकविले जातात.

**2.आपत्ती व्यवस्थापन -**

पावसाळ्यात पडणाऱ्या विजांपासून विद्यार्थ्यांचे सरंक्षण होण्यासाठी तडीतवाहक, अग्निशामक यंत्रणा, आपत्ती व्यवस्थापन कौशल्य प्रशालेत कार्यान्वित करण्यात आली आहेत.

**3. बायोगॅस प्रकल्प -**

शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या पोषण आहाराच्या स्वयंपाकासाठी प्रशालेत गोबर गॅसची निर्मिती केली आहे. त्यामुळे प्रशाला जिल्ह्यातील पहिली धुरमुक्त शाळा म्हणनू नावारूपास आली आहे. स्वयंपाकातील शिल्लक राहिलेले उष्टे-खरकटे गोबर गॅस मध्ये टाकून गॅसची निर्मिती विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार शिजवून दिला जातो.

**4. स्काऊट गाईड -**

प्रशालेमध्ये शिक्षक व शिक्षिका यांच्या माध्यमातून स्काऊट व गाईडचे प्रात्यक्षिकासहित अध्यापन केले जाते. विविध उपक्रमांमधून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम,सहकार्य,स्वयंशिस्त, स्वावलबंन तसेच अनुशासन इत्यादी गुणांची रुजवणूक केली जाते.

**5. ई-लर्निंग -**

भगीरथ ग्रामविकास प्रतिष्ठान झाराप व टेसा टेक या स्वयंसेवी संस्थाकडून दिल्या गेलेल्या 60 इंच डिजिटल बोर्ड द्वारे विद्यार्थ्यांना आधुनिक पद्धतीने प्रशिक्षित शिक्षकांद्वारे अध्यापन केले जाते तसेच विद्यार्थी स्वतः अध्ययनासाठी डिजिटल बोर्डचा वापर करतात.

**6. विज्ञान, भाषा व संगणक प्रयोगशाळा -**

ग्लोबल फाउंडेशन पिंगुळी या सामाजिक संस्थेकडून प्राप्त झालेल्या मिनी सायन्स लॅबमधनू विद्यार्थ्यांना विविध प्रयोग दाखविले जातात विद्यार्थ्यांनी स्वतः प्रयोग केल्यामुळे त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टीकोन वाढीस लागतो सुसज्ज संगणक व भाषा प्रयोगशाळेमुळे विद्यार्थी आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात जागतिक स्तरावर स्वतःला सिद्ध करण्यासाठी तत्पर झाला आहे.

**7. वाचनालय -**

विविध भाषेतील दैनिके, मासिके, कथा, कविता, नाट्य, वैज्ञानिक व ऐतिहासिक पुस्तके इत्यादींचे वाचन, विद्यार्थी आपल्या मोकळ्या वेळात करतात. त्यामुळेच महावाचन उत्सव यासारख्या उपक्रमांमध्ये विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

**8. सौर पॅनल -**

शिक्षक आमदार श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या माध्यमातून प्रशालेला सौर पॅनल उपलब्ध झाले आहे. याचा वापर विज गेल्यावर शाळेत विविध शैक्षणिक कामकाजासाठी केला जातो.

**9. सांस्कृतिक कार्यक्रम -**

विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा, यासाठी आमच्या शाळेत विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. यामध्ये पारंपारिक, ऐतिहासिक व आधुनिक पद्धतींच्या कलागुणांचे सादरीकरण केले जाते.

**10. क्रीडा -**

विद्यार्थ्यांमध्ये खेळाच्या माध्यमातून विविध गुण रुजविण्यासाठी आमच्या प्रशालेमध्ये बांबूउडी, लांब उडी, धावणे,थाळीफेक, भालाफेक, हॉलीबॉल, कबड्डी, लंगडी , आट्यापाट्या, विटी-दांडू, लगोरी इत्यादी मैदानी व पारंपारिक खेळ खेळले जातात. त्याचबरोबर लेझीम व ढोल पथकाच्या माध्यमातून उत्कृष्ट असे सादरीकरण केले जाते.

**11. परसबाग व झाडांची निगा -**

शाळेच्या परिसरात विविध प्रकारचे फळझाडे, फुलझाडे, वनऔषधी वनस्पती,फळभाज्या व पालेभाज्यांची लागवड केली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना वनस्पतींची माहिती मिळते. तसेच परस बागेतून मिळणाऱ्या फळभाज्या व पालेभाज्यांचा वापर शालेय पोषण आहारात केला जातो.

**12. उत्कर्षा कार्यक्रम-**

उत्कर्षा कार्यक्रमाच्या माध्यमातून किशोरवयीन मुलींच्या समस्या सोडविण्याच्या हेतूने मुलींसाठी प्रशालेत त्यांच्या माता भगिनी सहित मार्गदर्शन वर्ग आयोजित केले जातात.

**13.शालेय प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना -**

शालेय पोषण आहाराच्या माध्यमातून प्रशालेत इयत्ता पाचवी ते आठवीच्या सर्व विद्यार्थ्यांना सकस आहार दिला जातो.

**14. BaLA -**

बोलक्या शाळेच्या निर्मितीसाठी शाळेच्या भिंतीवर वेगवेगळ्या प्रकारची शैक्षणिक चित्र विद्यार्थ्यांच्या माध्यमातून रेखाटली आहेत.त्यामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी वातावरण तयार झाले आहे.

**15. आनदंदायी शनिवार -**

महाराष्ट्र शासनाने काढलेल्या परिपत्रकानुसार , आमच्या प्रशालेमध्ये आनदंदायी शनिवार राबविला जातो. त्यामध्ये विविध उपक्रम घेतले जातात. त्यामध्ये कलम बांधणी, मातकाम, बागकाम, नारळाच्या

झावळ्यापासून झाडू बनवणे, टाकाऊ पदार्थापासून टिकाऊ वस्तू बनवणे, पुष्पगुच्छ निर्मिती , पारंपारिक खेळ, योगा, ऐतिहासिक वस्तूंचे संवर्धन व जतन करणे. इत्यादी उपक्रम घेतले जातात. त्यामधून विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक अभिरुची वाढवण्यासाठी मदत होते.

वरील सर्व उपक्रमांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना परिपूर्ण व दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी संस्था कार्यकारी मंडळ , विविध सामाजिक व स्वयंसेवी संस्था, पालक- शिक्षक संघ , शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी , शिक्षणप्रेमी तसेच अधिकारी वर्ग यांच्या सहकार्यातून प्रशालेचा शैक्षणिक आलेख उंचावत आहे.

**व्हिडिओ लिंक** -
https://drive.google.com/file/d/1JduG26wXRQ4eC9FHSsPwc40K3eORfq91/view?usp=drivesdk

**फोटो –**





परसबाग निर्मिती




विद्यार्थ्यांना सायकल वाटप




प्रजासत्ताक दिनानिमित्त नाटिका सादरीकरण करताना विद्यार्थी



अभ्यासवर्ग



सांस्कृतिक कार्यक्रम




स्वच्छता मॉनिटर सहभाग



भगीरथ ग्रामविकास प्रतिष्ठान आयोजित गोमय गणेश निर्मिती प्रशिक्षण.



बहुविध कौशल्य अभ्यासक्रम




**अमली पदार्थ विरोधी जनजागृती**

----------**----------

# "कनिष्ठ महाविद्यालयाची सातत्यपूर्ण मूल्यमापनात्मक यशस्वी प्रक्रिया"

**शाळेचे नाव व पत्ता - न्यू इंग्लिश हायस्कुल व कनिष्ठ महाविद्यालय, हम्पयार्ड रोड , काँग्रेसनगर, जि.नागपूर**

**शाळेचा ईमेल आयडी** - nehscnngp@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - सौ.सुनीता विजय बोरघाटे
**मोबाईल क्रमांक** - ९४२३६८३०२९
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - nehscnngp@gmail.com

**असाध्य ते साध्य करिता सायास, कारण अभ्यास तुका म्हणे ।**

**प्रास्ताविक -**

शाळेची पटसंख्या वाढती असणे हे शाळेच्या उपक्रमशीलतेचे लक्षण आहे. शैक्षणिक आणि सहशैक्षणिक उपक्रमांचे आयोजन आणि नियोजन सुयोग्य पद्धतीने असले तर शाळेच्या निकालाचा आलेख उंचावत जातो. कोविडनंतर विद्यार्थ्यांच्या एकूणच अध्ययन क्षमतेत झालेली घट , लेखनक्षमतेचा अभाव आणि मोबाइलचे वेड ही आव्हाने सतत डोळ्यापुढे होती आणि सद्यपरिस्थितीतही ती आहेत.

खरी कसोटी होती ती उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवण्याची. या सगळ्या अडचणींना तोंड देण्यासाठी आमच्या शाळेच्या कनिष्ठ महाविद्यालयाची संपूर्ण टीम जोमाने तयारीला लागली होती. त्या टीमचे नेतृत्व शाळेचे अनुभवी शिक्षक श्री अमेय प्रकाश एदलाबादकर यांच्याकडे होते. या संपूर्ण चमूने अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने कामाचे नियोजन आणि आखणी करून प्रचंड यश शाळांत परीक्षेत विद्यार्थ्यांना मिळवून दिले, त्याची ही यशोगाथा !

या संपूर्ण उपक्रमात शालांत परीक्षेचा निकाल उत्कृष्ट कसा लागेल यासाठी एक वेळापत्रक तयार केले. साधारणतः जून महिन्याच्या १० तारखेपासून त्याची अंमलबजावणी सुरु झाली. अधिकाधिक विद्यार्थी शाळेत उपस्थित असावेत यासाठी प्रयत्न करण्यात आले.

रोज शिकवला जाणारा घटक हा विद्यार्थ्यांना किती समजला हे तपासून बघणे गरजेचे होते त्यासाठी शैक्षणिक साहित्यनिर्मितीवर भर दिला गेला. परीक्षेत येणारे विविध प्रश्नप्रकार अभ्यासून त्याप्रमाणे निरनिराळे प्रश्नसंच शिक्षकांनी तयार केले.

विज्ञान आणि वाणिज्य अशा दोन्ही विभागाच्या सर्व शिक्षकांनी हे आव्हान समर्थपणे पेलले आणि यातूनच खरी कामाची सुरुवात झाली. प्रश्नसंच हा प्रश्न जरी सुटला असला तरी त्याचे टंकलेखन आणि इतर बाबी अडचणीच्या ठरत होत्या. शाळा व्यवस्थापनाकडून मदत आणि शिक्षकांचा हातभार यातून हा प्रश्न ताबडतोब सुटला. प्रश्नसंचाचे वाटप विद्यार्थ्यांना करण्यात आले. रोज शिकवलेला घटक शाळेतच अतिरिक्त तासिका घेऊन प्रश्नसंच सोडवून घेऊन तपासल्या जाऊ लागला.

ऑगस्ट महिन्याच्या मध्यापर्यंत या उपक्रमाने चांगलाच जोर धरला. आणि त्यानंतर शाळेत वर्गातील उपस्थिती वाढली. विद्यार्थी नियमित शाळेत येत होतेच पण आता त्यांना ओढ लागली होती नित्य सरावाची आणि अभ्यास करण्याची नुसतेच प्रश्नसंच सोडवून घेऊन काम भागणार नव्हते. त्यातून

अध्ययन निष्पत्ती किती झाली हे बघणे अतिशय गरजेचे होते. यासाठी परीक्षेचे स्वरूप आणि वारंवारीता बदलली  पाहिजे असे सर्व शिक्षकांचे मत पडले. प्रत्येक महिन्यात शेवटच्या आठवड्यात परीक्षा घेतली पाहिजे यावर सार्वमत झाले आणि त्यातून पुढचा प्रवास सुरु झाला.

परीक्षेला उपस्थिती अगदी १०० टक्के जरी नसली तरी ती ९५ टक्क्यांच्या खाली कधीच नव्हती. पण खरी अडचण पुढे होती. या सगळ्या प्रयत्नातून अनपेक्षित निकाल पदरात पडला आणि तोही अगदी पहिल्याच परीक्षेत. त्याचे कारण शाळेतून घरी गेल्यावर अभ्यास करण्याचे नगण्य प्रमाण आणि मोबाइल हे होते.

यासाठी काहीतरी ठोस उपाय करणे गरजेचे होते. शेवटी असे ठरले की एक शून्य तासिका वाढवावी आणि त्यातच विद्यार्थ्यांना लिखाणासाठी प्रवृत्त करावे. शाळेत आल्यावर रोज त्यांचा मोबाइल वर्गशिक्षकांनी आपल्याकडे ठेवून घ्यावा आणि शाळा  सुटेपर्यंत तो देऊ नये. याला प्रतिसाद मिळायला वेळ लागला . परंतु अगदी आठवड्याभरातच फक्त दुरून येणारे विद्यार्थी मोबाईल घेऊन यायचे आणि बाकी विद्यार्थ्यांनी मात्र तो आणणे बंद केले . हे आमचे सगळ्यात मोठे यश होते.




GPS Map Camera
Nagpur, Maharashtra, India
Congress Nagar, Kagaz Nagar, Dhantoli, Nagpur, Maharashtra 440012, India
Lat 21.130623°
Long 79.081921°
28/01/24 12:18 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Nagpur, Maharashtra, India
Congress Nagar, Kagaz Nagar, Dhantoli, Nagpur, Maharashtra 440012, India
Lat 21.130498°
Long 79.081993°
26/01/24 12:53 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Nagpur, Maharashtra, India
Congress Nagar, Kagaz Nagar, Dhantoli, Nagpur, Maharashtra 440012, India
Lat 21.130623°
Long 79.081921°
28/01/24 12:18 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Nagpur, Maharashtra, India
Congress Nagar, Kagaz Nagar, Dhantoli, Nagpur, Maharashtra 440012, India
Lat 21.130479°
Long 79.081912°
03/02/24 04:37 PM GMT +05:30
Google




विद्यार्थ्यांना शाळेतच चहा आणि नाश्ता उपलब्ध करून देण्याची सोय तत्कालीन मुख्याध्यापक, उपक्रम प्रमुख एदलाबादकर सर आणि इतर शिक्षकांनी केली. यामुळे सरळ कामावरून येणारे आणि दुरून येणारे विद्यार्थी निश्चिन्त झाले.

या सर्व गोष्टींचा परिणाम असा दिसला की उच्च गुणवत्ता नसून सुद्धा विद्यार्थी मेहनतीच्या जोरावर चांगले गुण मिळवू लागले. सप्टेंबर महिन्यापर्यंत वाणिज्य (इंग्रजी माध्यम) विभागातील १० विद्यार्थी , विज्ञान विभागातील १० विद्यार्थी आणि वाणिज्य (मराठी माध्यम ) विभागातील ५ विद्यार्थी उत्तम गुण घेऊ लागले. आमच्या आशा पल्लवित झाल्या आणि पुढे लवकरात लवकर अभ्यासक्रम पूर्ण करण्याकडे लक्ष देण्याचे ठरले. यासाठी सुटीच्या दिवसाची आणि रविवारची निवड करण्यात आली. याची जबाबदारी पूर्णपणे श्री.एदलाबादकर सरांनी घेतली. नियमितपणे अतिरिक्त वर्ग झाले आणि सप्टेंबर महिन्यात जवळपास ९० ते ९५ टक्के अभ्यासक्रम पूर्ण झाला. निवडक विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे वेळापत्रक देण्यात आले. त्यांच्या सर्व परीक्षा आधी सुरु झाल्या. विद्यार्थी रोज सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत एकाच विषयाचे २ सेट सोडवू लागले. त्यांच्या अडचणी सर्व विषयशिक्षक सोडवत होते. पेपर तपासण्याचे काम वाढले असले तरी त्याचा आनंद काही वेगळाच होता. उत्तरलेखन हे अतिशय व्यवस्थित व्हावे आणि सराव वाढावा यासाठी अभ्यासक्रमाचे वेगवेगळे घटक तयार करून पुन्हा पेपर्स घेतले गेले. हा उपक्रम नोव्हेंबर महिन्यापर्यंत चालला. त्यानंतर पुन्हा संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित पेपर घेणे सुरु केले. विद्यार्थी अधिकाधिक प्रमाणात गुण घेऊ लागले. त्यांचे उत्तरलेखन दिवसेंदिवस उत्तम दर्जाचे होत गेले. यातून चांगला निकाल मिळणार याची आम्हाला खात्री वाटू लागली.

या संपूर्ण कालावधीत विद्यार्थ्यांचे मानसिक आणि शारीरिक आरोग्य जपणे आवश्यक होते. प्रार्थनेत बळ असते आणि सकारात्मकता वाढण्यास ती कारणीभूत ठरते. म्हणूनच '**इतनी शक्ती हमें देना दाता ।**' या प्रार्थनेची निवड केली गेली आणि रोज आल्यावर आणि जाताना ती विद्यार्थी आणि शिक्षक म्हणतात .




एक गोष्ट इथे आवर्जून नमूद करावीशी वाटते की यातील एकही विद्यार्थी कुठल्याही शिकवणी वर्गाला जात नव्हता. पैशाची चणचण हे जरी कारण असले तरी शाळेत रोज होणारे उपक्रम हा त्याचा आधार होता. याचे समाधान आम्हालासुद्धा होते.

या सर्व उपक्रमाचा परिपाक असा झाला की वर्ग १२ च्या बोर्ड परीक्षेत विद्यार्थ्यांना घवघवीत यश प्राप्त झाले आणि वाणिज्य शाळेचा विद्यार्थी नागपूर बोर्डात मुलांमध्ये द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला. त्याची टक्केवारी होती ९६.१७ इतकी !



HSC - Commerce Second Topper

**Did preparations for 12th board exams without tuitions, says Ujjwal**

■ Staff Reporter

UJWAL Pillare, a student of New English High School and Junior College, is the city second topper in Maharashtra State Board Class XII Examination in Commerce stream with a score of 96.17 per cent.

He scored 93 marks in English language, 91 in Hindi language, 99 in Book Keeping and Accountancy, 99 in Economics, 98 in Secretarial Practice, and 97 in Organisation of Commerce and Management. He said he did his preparation for the board examination entirely at his college. He did not attend any coaching classes, and said he achieved this score due to the guidance provided by his teachers.

Ujwal added that he spent maximum time at his college for studying, practised many sample papers and also attended college's practice sessions during weekends. Ujwal further aspires to become a Chartered Accountant (CA).

His strategy of preparation was to break chapters into small parts to learn information effectively. He also stated that he did not experience much stress because he was confident of his preparation done at college and clarity of concepts.

He extends his heartfelt gratitude to his mother Indira Pillare and college faculty members for their constant support.

शेवटी इतकेच की सामूहिक प्रयत्नाने असाध्य गोष्ट साध्य करता येते. शाळेच्या व्यवस्थापन मंडळाने या सर्व विद्यार्थ्यांशी साधलेला संवाद, शिक्षकांनी घेतलेली मेहनत, पालकांचा शाळेवर असलेला विश्वास अशा सर्व बाबींचा सकारात्मक परिणाम आमच्या शाळेच्या निकालावर आणि पर्यायाने पुढील सत्राच्या प्रवेशावर अतिशय उत्तम झाला. नागपुरातील १४० वर्ष जुनी नामांकित संस्था आणि शाळा पुन्हा एकदा दिमाखात उभी राहिली. शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा वाढला. हा उपक्रम सध्या शाळेची ओळख आहे. रोज उपस्थित असणारे विद्यार्थी वाढले आणि यातूनच कामाला आणि आमच्या आयुष्याला दिशा देणारा आणि कलाटणी देणारा हा कार्यक्रम अल्पावधीतच प्रसिद्ध झाला आहे, विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा विश्वास हे त्यामागचे कारण आहेच, पण सगळ्या शिक्षकांची प्रचंड मेहनत आणि झोकून देण्याची वृत्ती या यशाचे खरे कारण आहे.

----------**----------

# "भाषा विकासात नाविन्यपूर्ण उपक्रमांची साथ"

**शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा,गोंडखैरी (जुन),पं.स.कळमेश्वर, जि.नागपूर.**

**शाळेचा ईमेल आयडी** - zpgondkhairiold@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - सौ.मोहिनी प्रकाश वैरागडे
**मोबाईल क्रमांक** - 9763343586
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - rauturmila95@gmail.com

शिक्षक म्हणून कार्य करताना आपले पंख विद्यार्थ्यांना लावून उडायला शिकवायचे नाही तर त्यांच्या पंखात उडण्याचे बळ निर्माण करायचे आहे. भविष्यातील आव्हाने त्याला पेलता यायला हवी. विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी जास्तीत जास्त चांगले वातावरण उपलब्ध करून देता येईल जिथे विद्यार्थी आनंदाने उत्साहाने व जोमाने शिकते होतील. त्यांच्यात शिकण्याची उर्मी निर्माण करता आली पाहिजे.

**सोडून कास अज्ञानाची,सवय लावू वाचनाची,उघडू दारे प्रगतीची//**

योग्य शैक्षणिक वातावरणात आनंददायी व गुणवत्तापूर्ण शिक्षण मुलांना मिळावे. देशाचे सुजाण नागरिक येथे तयार व्हावे. शैक्षणिक गुणवत्ता वाढावी यासाठी शाळा व वर्ग डिजिटल झाले तरीही शंभर टक्के विद्यार्थी मूलभूत क्रिया साधू शकत नाही.

प्रत्येक भाषेची चार महत्त्वाचे क्षेत्र आहेत श्रवण, भाषण, वाचन ,लेखन या क्रमानुसार आपण भाषा शिकलो नाही तर भाषा आपण बोलू शकत नाही. श्रवण भाषण ही संप्रेक्षणाची क्षेत्र असून उरलेली दोन त्यांना मदत करतात त्यापैकी वाचन तिसरी पायरी. वाचनाला ग्रहणात्मक साधन म्हटलं जाते. अर्थपूर्ण उच्चारण म्हणजे वाचन. प्रामुख्याने वाचनाचे दोन प्रकार पडतात १) प्रकटवाचन म्हणजे मोठ्याने वाचन २) मूक वाचन म्हणजे मनात वाचन.

वाचनामध्ये एकट वाचन हे महत्त्वपूर्ण आहे यात सर्वांचा मेळ साधला म्हणजे वाचणारा, ऐकणारा यांना आनंद मिळतो म्हणून प्रकट वाचन क्षमतेचा विकास होणे महत्त्वाचे आहे. प्रकटवाचन करताना वर्णांचा शुद्ध स्पष्ट उच्चार करणे, संयुक्त स्वर व्यंजने जोडाक्षरांचा अचूक उच्चार, वाचताना विरामचिन्ह लक्षात घेणे, अर्थग्रहण करून वाचन करणे या क्षमतांचा विकास होण्यापेक्षा अपेक्षित आहे.

प्रकट वाचन म्हणजे मोठ्याने वाचन किंवा अक्षररूप अशा ध्वनींचा स्पष्ट व मोठ्या आवाजात उच्चार करून भावना व विचारांचे प्रकटीकरण साधने म्हणजे प्रकटवाचन. वाचाल तर वाचाल हा सुविचार आपण लहानपणापासून ऐकला आहे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेला सुविचार आपल्याला वाचनाचे महत्त्व पटवून देताना जीवनात वाचन खूप महत्त्व पूर्ण आहे, नियमित येणारे वर्तमानपत्र गोष्टींची पुस्तके कादंबऱ्या ग्रंथ साप्ताहिके अशा अनेक गोष्टींचे वाचन आपण करू शकतो.

**वाचनाने समृद्ध होते मती,मिळते विकासाला गती//**

भाषा विषयाचे अध्ययन अध्यापन प्रक्रियेत काही विद्यार्थ्यांना अभिरुची नसल्याचे आढळले, वाचन करायला लावले असताना वाचत नाहीत, त्यामुळे इतर विषयाशी सांगड घालताना सुद्धा अडचणी निर्माण होतात. वाचन येत नसल्याने कोणत्याही विषयाचे ज्ञान समजून घेण्यात अडचण येताना दिसली. इतर शिक्षकांशी मुख्याध्यापकांशी चर्चा केल्यानंतरही तीच अडचण समोर आली. मुलांना प्रकट वाचन येत नाही, त्याचा सराव होत नाही यासाठी आपल्याला काही उपाययोजना कराव्या लागतील हे लक्षात घेऊन उपक्रम घेण्याचे ठरविले.

***न वाचणाऱ्यांना वाचतं करू.***
***समाजात लेखन वाचनाची***
***उत्तम  परंपरा निर्माण करू...***
***आणि समाजाला योग्य दिशा देऊ ***

आपण जे बोलतो वाचतो ते इतरांना समजले पाहिजे तसेच इतरांचे विचार आपल्याला समजले पाहिजे. त्यामुळे आपली राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत व्हायला मदत होते. म्हणूनच भाषा वाचन कौशल्य विद्यार्थ्यांचे विकसित करणे महत्त्वाचे असते. त्यामुळेच आपली वाचन संस्कृती सुद्धा जपण्यासाठी मोठा हातभार लागेल. वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम जरी एकच असला तरी प्रत्येकाला मिळणारे गुण मात्र वेगवेगळे असतात याचे कारण वाचन कौशल्य विकसित न झाल्यामुळे त्यांना वाचलेले समजत नाही अनुभव उत्तराची योग्य पद्धतीने मांडणी करू शकत नाही.

**वाचनात रस असला की,ज्ञानाचे भांडार आपोआप भरते.**

वर्षभरातून कार्यक्रमाची काही उद्दिष्टे ठरवून घेतली.यात भाषा वाचताना येणाऱ्या अडचणींचा शोध घेऊन विद्यार्थ्यांचे वाचन कौशल्य विकसित करणे. विद्यार्थ्यांच्या वाचनाबाबत आत्मविश्वास वाढीस लावणे, वाचनाची आवड निर्माण करणे, चित्र वर्णन प्रसंगवर्णन करता येणे, आकलन, सहवाचन करून कथेचा सार सांगता येणे, उत्तम प्रकट वाचन करणे व त्यात गती येणे, स्वतःचे विचार स्वतःच्या शब्दात मांडता येणे.

विशिष्ट परिस्थितीत येणाऱ्या अडचणी म्हणजे समस्या. या समस्या दूर करण्यासाठी संशोधन, उपक्रम घेतले जातात. त्यासाठी ठरविलेल्या उद्दिष्टांच्या दृष्टीने वाटचाल कशी करणार हे ठरविणे म्हणजेच कार्यपद्धती होय. या उपक्रमासाठी प्रायोगिक पद्धतीचा अवलंब व त्यासाठी गट निवड चाचणी निर्मिती पूर्वतयारी या घटकांचा विचार केला.गुणवत्तेचे मोजमाप करण्यासाठी निरीक्षण तंत्र, प्रश्नावली, मुलाखत याद्वारे माहिती घेण्यात आली.

**पडताळा सूची -**

| अ.क्र | निरीक्षण घटक |
|---|---|
| 1 | न घाबरता वाचन करतो |
| 2 | वाचताना सरलता आहे |
| 3 | न अडखळता वाचतो |
| 4 | योग्य गतीने वाचतो |
| 5 | अक्षर शुद्ध वाचतो |

वरील कोष्टकावरून विद्यार्थ्यांच्या वाचन विषयक सवयीबाबत माहिती मिळाली आणि त्यावरून विद्यार्थ्यांच्या कोणत्या घटकात बदल होण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे हे लक्षात आले.

**वाचनाने मिळते ज्ञान,उंचावते जीवनमान//**

कार्यक्रमात सर्वांचा सहभाग राहावा,विश्वास पूर्ण वातावरण राहावे, पारदर्शकता राहावी यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली.

**नियोजन व उपक्रम-** प्रस्तुत नियोजन करताना विद्यार्थ्यांचा वयोगट लक्षात घेऊन त्यांची माहिती असलेल्या शब्दांची यादी करून त्यावर आधारित पूर्व चाचणी घेण्यात आली.
व काही उपक्रम घेण्यात आले. यामध्ये

**1.चित्रवाचन उपक्रम-**

चित्र विद्यार्थ्यांना आवडतात त्यामुळे त्यांना निसर्गचित्र, प्रसंगचित्र,वस्तूंचे चित्र, गोष्टींचे चित्र दाखवून चित्राचे नाव व चित्राचे वर्णन करायला सांगितले.संकेत यामुळे विद्यार्थ्यांच्या शब्दसंग्रहात वाढ झाली. व उच्चार स्पष्टता शुद्धा आली.

**2.शब्द पट्ट्यांचे वाचन-**

विद्यार्थ्यांना वाचनात रस निर्माण झाल्यानंतर शब्द पट्ट्या बनवून त्यात कठीण शब्द लिहिल्या गेले. एक एक पट्टी दाखवून त्या शब्दांचे वाचन करायला सांगितल्याने शब्द ओळखून त्यांचे शब्द संपत्ती वाढली.

**3.वाचनाच्या ध्वनिफीत ऐकविले-**

विद्यार्थ्यांचा वाचनाकडे ओढा वाढविण्यासाठी , भाषेमधील बारकावे समजावे,वाचन कसे करावे, हे समजण्यासाठी उत्तम वाचन असलेल्या ध्वनिफिती मुलांना ऐकवल्या. त्यातून त्यांना वाचन कसे करावे मार्गदर्शन झाले.

**4.वाचन स्पर्धा –**

विद्यार्थ्यांसाठी वाचन स्पर्धा घेऊन जो विद्यार्थी उत्कृष्ट वाचन करेल त्यास बक्षीस दिले. त्यामुळे विद्यार्थी वाचन सराव करू लागले व सुधारणा दिसून आली. याबरोबरच वाचन संस्कृती जपूया, प्रकट वाचन करणे, गती वाचन करणे, दहा वस्तूंची नावे, पाठ्यपुस्तकातील उतारावाचन, कथा वाचन काव्य वाचन, शब्द कोडे, विरुद्धार्थी शब्द माइंड मॅप, प्रश्नमंजुषा तंत्रज्ञानाचा उपयोग करताना बोलूया ,दीक्षा ॲप वापरणे.इत्यादी उपक्रमांची जोड देण्यात आली.

**शिक्षण म्हणजे,**
**नाही केवळ ज्ञानसंचय,**
**संस्कारासह विद्यार्थ्यांचा,**
**सर्वांगीण विकास संचय //**

सुमारे 75 ते 80 टक्के ज्ञान आपल्याला वाचनातून मिळते. परंतु काही विद्यार्थ्यांना वाचन करता येत नाही ही बाब विद्यार्थ्यांच्या दृष्टीने चिंतनीय आहे म्हणून विद्यार्थ्यांच्या प्रकट वाचन विषयक समस्या जाणून घेण्यासाठी याची निवड करण्यात आली. 'वाचाल तर वाचाल' म्हणून वाचन क्षमता विकसित करणे आवश्यक आहे. यासाठी संपूर्ण आढावा घेतल्यानंतर फलनिष्पत्ती प्राप्त झाली. शिक्षकांनी केलेल्या प्रयत्नांचा सकारात्मक परिणाम झाला. विद्यार्थी मोठ्या आवाजात वाचन करू लागले. विद्यार्थी स्पष्ट व शुद्ध उच्चारण करू लागले. विद्यार्थी योग्य ठिकाणी विरामचिन्हांचा उपयोग करू लागले. वाचनात आत्मविश्वास वाढला. विद्यार्थ्यांच्या गुणसंपादनामध्ये चांगला परिणाम झाला आणि विद्यार्थ्यांची संपादणूक पातळी उंचावली. या उपक्रमाचा फायदा विद्यार्थ्यांना इंग्रजी हिंदी व इतर भाषा विकासासाठी सुद्धा फलदायी ठरला, गणित विज्ञान व सामाजिक शास्त्र इत्यादी विषयासाठीही उपयुक्त ठरला. त्याचप्रमाणे दैनंदिन व्यवहारात स्वतःचे जीवन सुकर करण्यासाठी सुद्धा उपयोगी ठरला. यामुळे विद्यार्थी उपस्थिती व संपादणुकीसाठी उपयुक्त असा हा उपक्रम झाला. यातून लोकसहभाग व सहकार्यासाठी सुद्धा उपयुक्त असा हा उपक्रम झाला.

सर्वात मोठे यश म्हणजे इयत्ता तिसरीची विद्यार्थिनी जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत पहिल्या क्रमांकावर आली. 80 टक्के विद्यार्थी अभिव्यक्त होऊ लागले.

***हेच धोरण आणि हेच तोरण***
**शब्द शब्द वेचूया,**
**मोठ्याने वाचूया//**




वाचनात रस निर्माण झाल्यानंतर गोष्टीची पुस्तके वाचताना.



स्वतःचा शब्दसंग्रह तयार केला.



जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत सृष्टी गुरूनुले हिचा प्रथम क्रमांक आल्याबद्दल शाळेचे व्यवस्थापन समिती व शिक्षक वृंदांकडून अभिनंदन !!



निबंध वाचन करताना इयत्ता तिसरीचा विद्यार्थी

ज्ञानज्योतीने इथे पेटवू,
दिव्या दिव्यांच्या अक्षरधारा,
चला चला हो प्रगत करूया,
महाराष्ट्र सारा //

**माझा शब्द संग्रह -**

https://www.facebook.com/share/v/ris3jsh1V2e8UWr5/?mibextid=xfxF2i

**जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक -**

https://www.facebook.com/share/p/sBv3HxZQB3HbQWp4/?mibextid=xfxF2i

----------**----------

# "क्षेत्रीय उपक्रमातून अध्ययन प्रक्रियेचा विकास"

**शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, गुमगाव क्रं. 2,ता.हिंगणा, जि.नागपूर**

**शाळेचा ईमेल आयडी** - anilturare123@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री अनिल पांडूरंग तुरारे
**मोबाईल क्रमांक** - 9326943768
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - anilturare123@gmail.com




**प्रास्ताविक -**

नागपूर जिल्ह्यातील हिंगणा तालुक्यात ऐतिहासिक व स्वातंत्र्याचा वारसा लाभलेले गुमगाव हे वेणा नदीच्या तीरावर वसलेले गाव आहे. हिंगणा तालुक्यापासून 8 किमी अंतरावर आहे. गाव मोठे असून दोन जिल्हा परिषद व दोन Convent च्या शाळा असतांना सुध्दा दरवर्षी इयत्ता 1 ली मध्ये 45 ते 50 विद्यार्थी दाखल होतात. तसेच आजुबाजूच्या गावात शाळा असतांना सुध्दा तेथील विद्यार्थी आमच्या शाळेत प्रवेश घेतात.या शाळेमध्ये अनेक नवनवीन उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना आकर्षित केले जाते. 2020-21 मध्ये शाळेची पटसंख्या 164 असून 2024-25 मध्ये 206 पर्यंत पोहचलेली आहे या शाळेला महाराष्ट्राचे शिक्षण सचिव, शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी यांनी भेट देवून विद्यार्थ्यांना व शिक्षकांना कौतुकाची थाप दिली. अशाप्रकारे या शाळेची प्रगती उत्तरोत्तर होत आहे.






कम्प्यूटर (संगणक) वर कार्य करतांना विद्यार्थी

**शाळेची विविध क्षेत्रातील प्रगती -**

मागील दोन वर्षापासून आमची शाळा कला व क्रिडा स्पर्धेत तालुका व विभागस्तरावर बक्षिस प्राप्त करीत आहे. मागील दोन सत्रापासून पटनोंदणीत वाढ होत आहे. गळतीचे प्रमाण नाही बरोबरीचेच आहे. शैक्षणिक साहित्य निर्माण करुन तसेच उपलब्ध असलेल्या साहित्याचा वापर करुन अध्ययन - अध्यापन प्रक्रिया राबविली जाते. आनंददायी शिक्षणासाठी प्रत्येक शिक्षक आपले कौशल्य वापरुन नवोपक्रम तयार करतात व त्याचा उपयोग अध्यापनात करतात. त्याची फलनिष्पत्ती वर्गस्तरावर व शाळास्तरावर दिसून येत आहे.

शाळेमधील आपत्ती व्यवस्थापनाकरिता अग्निशामक यंत्र आहे तसेच दैनिक परिपाठातून विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनासंबंधी मार्गदर्शन केले जाते. Cyber Safety याविषयी सुध्दा मार्गदर्शन केले जाते. विद्यार्थी सुरक्षेच्या संदर्भाने परिवहन समिती स्थापन केली आहे व विद्यार्थ्यांच्या काही तक्रारी असल्यास तक्रार पेटीची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. सामाजिक व भावनिक विकासाच्या दृष्टिने शाळेत अनेक उपक्रम राबविले जातात. उदा.पथनाट्य सादरीकरण, चित्रफीती दाखविणे, दरवर्षी स्नेहसम्मेलन व सहलीचे आयोजन करणे. मूल्यमापनाच्या नविन तंत्राकरिता संगणकिय प्रणालीचा वापर केला जातो.

पायाभूत साक्षरता व अंकगणितीय क्षमता वर्गानुरुप अध्यापनाद्वारे विकसित केल्या जातात. पायाभूत चाचणीद्वारे मूल्यमापन केले जाते. मागे असणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता अनेक उपाययोजना राबविल्या जातात. कला – कार्यानुभव अंतर्गत विविध वस्तूंचे व्यावसायिक मार्गदर्शनाद्वारे विद्यार्थी वस्तूंची निर्मिती करतात. उदा. राखी बनविणे, मातीच्या वस्तू, ग्रिटींग कार्ड, आकाश कंदील बनविणे.

स्थलांतरित बालकांना वयानुरुप प्रवेश दिल्या जातो व वर्गानुरुप अध्ययन क्षमता प्राप्त करण्यासाठी सर्व शिक्षक प्रयत्न करतात. शाळा स्वच्छ व सुंदर ठेवण्याकरिता विद्यार्थी तसेच शिक्षक प्रयत्नशील असतात. आमची शाळा स्वच्छ व सुंदर आहे. गावातून नेहमीच लोकसहभाग मिळत असतो. त्याचा उपयोग विद्यार्थी विकासासाठी होतो.

मागील सत्रात ICT स्पर्धेमध्ये शाळेतील तीन शिक्षकांनी बक्षिस प्राप्त केले व शाळेला Computer Lab चे ज्ञान मिळविण्यास व Scratch सारखे Project तयार करण्याकरिता मदत होते. त्याच आधारावर विद्यार्थ्यांनी Hackathon स्पर्धेमध्ये भाग घेऊन जिल्हा स्तरावर द्वितीय व राज्यस्तरावर आठवा क्रमांक प्राप्त करुन शाळेचे नाव उंचावले आहे. सर्व प्रकारची जीवनकौशल्ये आत्मसात करण्याकरिता विविध उपक्रमाचे आयोजन केल्या जाते. विद्यार्थी विकासाकरिता शालेय व्यवस्थापन समितीचा पुरेपूर सहभाग असतो. बहुभाषिक विकासाकरिता मोबाईल व संगणकाचा उपयोग शिक्षक करतात. मुल्याधिष्ठित शिक्षण देऊन

विद्यार्थी विकास साधल्या जातो. दरवर्षी शाळासिध्दी स्वयंमूल्यमापन करुन मागे असणाऱ्या मुद्द्यावर भर देऊन गुणवत्ता विकास साधला जातो. स्थानिक/भौगोलिक व सामाजिक परिस्थितीनुसार अनेक उपक्रम घेतले जातात.



"हॅके थॉन स्पर्धा" जिल्हास्तरीय द्वितीय क्रमांक




"हॅके थॉन स्पर्धा" राज्यस्तरीय द्वितीय क्रमांक

इंग्रजी भाषेची भिती घालवून विद्यार्थ्यांना इंग्रजीत बोलते करण्याकरिता तसेच सर्व विषयात प्रविण करण्याकरिता नवनवीन उपक्रम आयोजित करतात. मध्यान्ह भोजन योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना सकस व पोषक आहार दिला जातो. त्यामुळे त्यांच्या शारीरिक व सामाजिक विकासास मदत होते. सर्व वर्गात विषय कोपरे तयार करुन साहित्याची मांडणी केली आहे. जलसाक्षरता व पर्यावरणपोषक उपक्रमात चित्रकला व घोषवाक्य स्पर्धा घेऊन जनजागृती करिता प्रभातफेरी काढली जाते. आनंददायी शिक्षणात विद्यार्थी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतात. संगणक प्रोजेक्टर व LCD या साधनांचा वापर करुन अध्यापन केले जाते. लिंग भेदभाव न करता मुले व मुली यांना समान संधी देऊन अनेक शालेय उपक्रमात सहभागी केले जाते. CWSN विद्यार्थी यांना शाळेत प्रवेश दिला जातो व त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्यांच्या क्षमतेनुसार शालेय नेतृत्वाची जबाबदारी देण्यात येते.




"हँके थॉन स्पर्धा" राज्यस्तरीय द्वितीय क्रमांक



तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा




राज्य शालेय शिक्षण सचिव श्री. रणजित देओल यांची भेट घेतांना



सांस्कृतिक स्पर्धा व क्रिडा स्पर्धा सहभाग




शिक्षणाधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांची भेट




आरोग्य जनजागृती कार्यक्रम




**तंबाखू मुक्ती जनजागृती व गाव स्वच्छता अभियान**

या सर्व उपक्रमामुळे विद्यार्थी स्वत: उत्स्फूर्तपणे शालेय उपक्रमात आवडीने सहभागी होतात. स्वत: शाळेची स्वच्छता करतात. परिपाठाची पूर्वतयारी करुन सादरीकरण करतात. तंत्रज्ञानाचा वापर करुन Scratch सारखे Project तयार करतात. यामुळे गावकऱ्यांचा जिल्हा परिषद शाळेकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक झालेला आहे. अशाप्रकारे सकारात्मक बदल घडवून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याकरिता सर्व शिक्षक व मुख्याध्यापक सतत प्रयत्नशील असतात.

----------**----------

# “शालेय व्यवस्थापन समितीच्या सक्रीय सहभागातून शारीरिक शिक्षण वस्तू संग्रहालयाची उभारणी”

**शाळेचे नाव व पत्ता - जि.प.प्राथमिक शाळा, कान्होली (गुमगाव), पं.स.हिंगणा, जिल्हा नागपूर.**


**शाळेचा ईमेल आयडी** - vrp15051969@gmail.com

**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री वसंत रामचंद्र पिसे

**मोबाईल क्रमांक** - 9881514050 / 8788289085

**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - vrp15051969@gmail.com







**प्रास्ताविक -**

**"शाळेला गावाचा आधार असावा**
**गावाला शाळेचा अभिमान असावा"**

आदिवासी बहुल लोकसंख्या असलेले हिंगणा तालुक्यापासून 15 किलोमीटर अंतरावर असलेले एक छोटेसे गाव म्हणजे कान्होली (गुमगाव) होय. हे गाव हायवेवरून 2 किलोमीटर अंतरावर आहे. परंतु गावातील प्रत्येक गरज भागविण्यासाठी गावातील प्रत्येक व्यक्तीला 02 किलोमीटर अंतर पायी किंवा स्वत: च्या वाहनानेच जावे लागते. ती गरज मग कोणतीही असो जसे दैनंदिन जीवनातील वस्तू, उच्च शिक्षण, आरोग्य सेवा इ. प्रत्येक गरजेसाठी ही पायपीट करावीच लागते.

या गावाच्या सुरूवातीलाच जिल्हा परिषदेची पहिली ते पाचवी वर्ग असलेली प्राथमिक शाळा आहे. या गावातील लोकसंख्या ही आदिवासी बहुल असल्यामुळे जास्तीत जास्त लोक निसर्गाशी जुळलेले आहेत आणि तीच क्षमता या विदयार्थ्यांमध्येही जोपासलेली आहे. शाळेतील विद्यार्थ्यांना निसर्ग, खेळ, परिसर याविषयी विशेष आवड आहे. त्यांची आवड ही उत्तरोत्तर वाढत जावी यासाठी शाळेने लोक सहभागातुन **'शारीरीक शिक्षण वस्तू संग्रहालय'** तयार केलेले आहे.

या वस्तू संग्रहालयामुळे शाळेतील सर्व विद्यार्थी विशेष प्राविण्य प्राप्त असलेल्या भारतीय खेळाडूंना ओळखतात. जे खेळाडू आपल्या भारत देशाचे ऑलीम्पिक खेळात प्रतिनिधित्व करतात त्यांची माहिती विदयार्थ्यांना झालेली आहे. तसेच चित्र पाहून त्या खेळाडूंचीच नाही तर काही विद्यार्थी चक्क ह्या खेळाडूंनी प्राप्त केलेल्या प्राविण्याचीही माहिती सांगतात. ही सर्व बाब प्रत्यक्षात साध्य झाली ती गावाच्या, गावातील लोकांच्या सहभागामुळेच आणि या सर्व कार्यातूनच शाळेला शैक्षणिक सत्र - 2024 -25 मध्ये **'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा क्र. 2'** अंतर्गत तालुक्यातून **द्वितीय क्रमांक** प्राप्त झालेला आहे.

**पूर्वीची वर्गखोली**




या भारतात बंधूभाव नित्य वास दे , दे वरचि असा दे।


शारीरिक शिक्षण वस्तू संग्रहालय
जि.प.प्राथमिक शाळा, कान्होली गुमगाव,प.स.हिंगणा,जि.नागपूर


MIRABAI CHANU (WEIGHTLIFTER)
SAKSHI MALIK (WRESTLING)
किलबिल
हस्तपुस्तिका
प्रकाशन सोहळा

**अडचणी -**

शारीरिक शिक्षण वस्तू संग्रहालय उभारतांना शाळा पातळीवर शिक्षक/ मुख्याध्यापक यांना अनेक अडचणी आल्या. त्यातील सर्वात प्रथम व मोठी अडचण म्हणजे आर्थिक पाठबळ होय. कारण हे संग्रहालय उभारण्यासाठी जवळपास 25 ते 30 हजार रूपये इतका खर्च येणार होता तेव्हा ही रक्कम कशी निर्माण करावी ही आमच्या समोरील मोठी समस्या होती. तसेच हे संग्रहालय निर्माण करण्यासाठी आवश्यक असलेले साहित्य कोठून व कशाप्रकारे मिळवावे ही सुध्दा एक समस्या आमच्या समोर होती. परंतु या सर्व समस्यावर आम्ही, गाव, शाळा, पालक या सर्वांनी मिळून सुंदर असे उपाय योजिले आहे ते उपाय पुढीलप्रमाणे आहे.

**अंमलबजावणी -**

शारीरीक शिक्षण वस्तू संग्रहालय उभारतांना आलेली प्रथम समस्या म्हणजे आर्थिक पाठबळ होय. ही समस्या सोडविण्यासाठी सर्वप्रथम शाळा व्यवस्थापन समितीची सभा घेण्यात आली. या सभेत मुख्याध्यापक व केंद्रप्रमुखांनी या संग्रहालयाची आवश्यकता महत्त्व सर्वांना पटवून सांगितले व सर्वांनी संग्रहालय निर्मितीसाठी सर्वांनी स्वक्षमतेने मदत करावी असे आवाहन केले तर या उपक्रमासाठी सर्व सदस्यांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला व सहमती दर्शवली. तसेच अधिक आर्थिक पाठबळ आवश्यक असल्याने गावाचे सरपंच, उपसरपंच, पालकवर्ग, नागरिक यांची सुध्दा सभा घेऊन संग्रहालय निर्मितीस आवश्यक असलेले आर्थिक पाठबळ उभारण्यासाठी सर्वांना आवाहन करण्यात आले. गावातील सर्वच उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक करून उत्तम प्रतिसाद दिला व मदत करण्याचे आश्वासन दिले यामुळे आमची एक समस्या सोडविण्यात आम्हाला यश आले.

नंतर संग्रहालय निर्मितीसाठी आवश्यक असलेले साहित्य, चित्रे, माहिती उपलब्ध करण्यासाठी तंत्रज्ञानाची मदत घेतल्या गेली तसेच उपलब्ध माहितीचे योग्य प्रकारे वर्गीकरण करून त्यांची मुद्देसूद मांडणी करण्यात आली. विशेष मदत म्हणून या उपक्रमासाठी लागणारे साहित्य जमविण्यास मदत व मार्गदर्शन करण्याचे कार्य आमचे केंद्रप्रमुख श्री चव्हाण सर यांनी केले व यामुळेच हे संग्रहालय इतके सुंदर व प्रभावी बनलेले आहे.

गावातील प्रत्येक व्यक्तीने आपल्या क्षमतेप्रमाणे शाळेला रोख स्वरूपात मदत केली आहे. प्राप्त सर्व रकमांचे संकलन करून तंत्रज्ञानाच्या साहाय्याने व तंत्रज्ञान केंद्राच्या मदतीने ऑलम्पिक सामन्यात विशेष प्राविण्य प्राप्त खेळाडूंचे बोलके असे बॅनर बनविण्यात


शारीरिक शिक्षण वस्तू संग्रहालय
सुस्वागतम
जि.प.प्रा.शा.कान्होली
ग्रा.पं. थानोली
केंद्र - गुरुगांव,पं.स. - हिंगणा
WELCOME
INDIAN


INDIAN CRICKET TEAM


MIRABAI CHANU (WEIGHTLIFTER)
SAKSHI MALIK (WRESTLING)
BIGGEST ACHIEVEMENTS OF SANIA MIRZA
NITU GHANGHAS (BOXER)
P V SINDHU (BADMINTON)


INDIAN KHO-KHO TEAM


NEERAJ CHOPRA (BHALA WEIGHT)
ABHINAV BINDRA (SPORTS SHOOTER)

आले. गावातील कान्होली मित्र परिवार तसेच इतर नागरिक यांच्या मदतीने हे सर्व बॅनर वर्गखोलीत म्हणजे सभा हॉलमध्ये लावण्यात आले. विदयार्थ्यांना विविध खेळाडूंची ते खेळत असलेल्या खेळांची, त्यांच्या प्राविण्याची माहिती सांगण्यात आली. अशाप्रकारे आमच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कान्होली (गुमगाव) येथे **'शारीरिक शिक्षण वस्तू संग्रहालय'** उभारण्यात आले. या संग्रहालयाचे उद्घाटन हिंगणा निर्वाचन क्षेत्राचे आमदार **मा. श्री समीरजी मेघे** यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी शाळेचे असे संग्रहालय निर्माण केल्याबद्दल कौतुक केले तसेच गावानी दिलेल्या प्रतिसादाबद्दल अभिनंदनही केले.



**फलनिष्पती :-**

'शारीरिक शिक्षण वस्तू संग्रहालय' निर्मितीमुळे गावातील सर्व नागरिकांना शाळेविषयी आधिक आपुलकी वाटू लागली आहे. गावातील लोकांची मदत घेतल्यामुळे आता शाळेच्या प्रत्येक छोट्या-मोठ्या कार्यक्रमात सर्वच व्यक्ती सक्रिय व आनंदाने सहभागी होतात.

**'शारीरिक शिक्षण वस्तू संग्रहालय'** यामुळे विद्यार्थ्यांमध्ये खेळाविषयी विशेष आवड निर्माण झाली आहे. तसेच ते स्वयंप्रेरणेने विविध खेळ खेळतात तसेच विविध खेळाडूंची, ते खेळत असलेल्या खेळांची त्यांनी मिळविलेल्या प्राविण्याची विद्यार्थ्यांना माहिती होऊ लागली. त्यामुळेच विद्यार्थ्यांमध्ये त्या खेळाडूंप्रमाणे यश संपादित करून आपल्या शाळेचे, गावाचे नाव मोठे करावे अशी स्फूर्ती, प्रेरणा त्यांच्यात निर्माण झाली आहे.

तसेच गावातील वरीष्ठ गटातील विद्यार्थीही या खेळाडूंची ते खेळत असलेल्या खेळाची माहिती मिळवितात व त्यांच्या प्रमाणे यश संपादन करण्यास शाळेचे, गावाचे नाव मोठे करण्यासाठी प्रेरित झालेले आहे.

या संग्रहालय निर्मितीची नोंद जिल्हा परिषदेने सुध्दा घेतली व जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी (प्राथमिक) मा. रोहीणी कुंभार मॅडम यांनी आमच्या शाळेत येऊन आमच्या शाळेला व वस्तूसंग्रहालयाला भेट दिली. शिक्षणाधिकारी मॅडम यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला, खेळाडूंची माहिती विचारली विद्यार्थ्यांनी त्यांचे स्वागतापासून ते त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देणे, मुलाखत घेणे ही सर्व कामे स्वत:च केली. यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षणाधिकारी मॅडम यांनी कौतूक केले व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. शाळेला भेट देवून संग्रहालय पाहून शिक्षणाधिकारी मॅडमनीही शाळेचे कौतूक करीत आनंद व समाधान व्यक्त केले.








तसेच कुही तालुक्यातील केंद्रप्रमुख श्री पारसे सर, मुख्याध्यापक, शिक्षक आणि हिंगणा केंद्रातील शिक्षक, मुख्याध्यापक यांनीही आमच्या संग्रहालयाला भेट दिली. त्यांचेही विद्यार्थ्यांनी स्वागत केले, खेळाडूंची माहिती सांगितली व मुलाखत घेतली. त्यांनीही सर्व विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले व अशी प्रयोगशाळा निर्माण केल्याबद्दल आमच्या शाळेचे अभिनंदनही केले तसेच याप्रमाणे कार्य करण्यासाठी आम्ही प्रयत्न करू असे म्हणू लागले.

एकंदरीत या सर्वामुळे विद्यार्थ्यांत आत्मविश्वास, धीटपणा, बोलकेपण इ. गुण विकसित झाले तसेच नविन माहिती आत्मसात करण्याची वृत्ती निर्माण झाली.


SAKSHI MALIK (WRESTLING)


MIRABAI CHANU (WEIGHTLIFTER)
SAKSHI MALIK (WRESTLING)


शिक्षणाचा अधिकार
जि.प.प्राथमिक शाळा, कान्होली.
आई सारखे दैवत साऱ्या जगतामध्ये नाही


NEERAJ CHOPRA (BHALA WEIGHT)


SAKSHI MALIK (WRESTLING)

**समारोप:-**

**"गाव आपले आपण गावाचे**

**शाळा आपली आपण शाळेचे "**

या उक्तीप्रमाणेच गावातील प्रत्येक व्यक्तिने शाळेला स्वक्षमतेने मदत करून शाळेचा विकास साधला आहे. शाळेला हे वस्तू संग्रहालय निर्माण करण्यासाठी प्रेरणा देण्याचे कार्य आमच्या केंद्राचे केंद्रप्रमुख मा. श्री चव्हाण सर यांनी केले आहे. त्यांचे खूप मोठे योगदान आहे. तसेच गावाचे सरपंच, उपसरपंच, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सदस्य, पालक वर्ग, गावातील नागरिक यांच्या सक्रिय सहभागानेच हे वस्तू संग्रहालय उभारण्यात यश मिळाले आहे व या सर्व कृतीतून विद्यार्थ्यांचाही विकास साधला गेला व परिणामी शाळेचाही विकास साधला गेला आहे.

- https://youtu.be/8Q0DHAcwqhk?si=sT-VhT863bCanpHC
- https://youtu.be/-2Q4m-t_Dd0?si=R7DQVCSaWhinneay
- https://youtu.be/W-2rSQ7vIdw?si=IKOVfsv7bg7qEIQ4
- https://youtu.be/iy40PUuO-mY?si=qpDGgGoAeBdRuJdc
- https://youtu.be/fBpDKxX-eRg?si=m2zqunjnEolCNez6
- https://youtu.be/V8v4BJkz3pM?si=xJ0JPT21c5vMdVjb
- https://youtube.com/watch?v=Y55OCGQwsP8&feature=shared

----------**----------

# "विविध उपक्रमातून विद्यार्थी व शाळा विकास"

**शाळेचे नाव - जि. प. उच्च प्राथमिक शाळा मटकाझरी ता. उमरेड ,जि.नागपूर महाराष्ट्र**

**शाळेचा ईमेल आयडी** - kailashdaf121@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.कैलाश डफ
**मोबाईल क्रमांक** - 9764327981
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - kailashdaf121@gmail.com

1.**कला क्रीडा क्षेत्र यश-**

कला आणि क्रीडा क्षेत्रातील यश हा समाजाच्या विकासाचा महत्त्वपूर्ण भाग आहे. कलाक्षेत्रात चित्रकला, नृत्य, संगीत, अभिनय या माध्यमातून कलाकार आपली प्रतिभा व्यक्त करतात आणि संस्कृतीचा प्रचार व प्रसार करतात. त्याचप्रमाणे, क्रीडा क्षेत्रातील यश खेळाडूंच्या मेहनती, शिस्तबद्ध सराव, आणि जिद्दीमुळे मिळते. हे यश देशासाठी अभिमानाचा विषय असतो, कारण ते आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचं प्रतिनिधित्व करतं. या क्षेत्रातील यशस्वी व्यक्ती समाजाला प्रेरणा देतात आणि युवा पिढीला त्यांच्या स्वप्नांच्या दिशेने मार्गदर्शन करतात.

**कौशल्य विकास व करिअर संधी -**

- कला आणि क्रीडा क्षेत्रात यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध करिअर संधी उपलब्ध होतात.
- स्पर्धात्मक कला व क्रीडा कार्यक्रमांमधून विद्यार्थ्यांचे कौशल्य वृद्धींगत होते, ज्यामुळे त्यांना भविष्यात यशस्वी होण्यास मदत होते.
- 2023 -2024 च्या क्रीडा महोत्सव स्पर्धेमध्ये इयत्ता आठवीचा विद्यार्थी शिवम शामजी दुर्वे यांनी लांब उडी व उंच उडी मध्ये जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळवला आणि जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मटकाझरी केंद्र पाचगाव तालुका उमरेड चा मानाचा तुरा खोवला.

**Video link -**

https://youtu.be/BACdMZziboo?si=2RPIWdAYZPUi0tjp

**फोटो -**





सारांश: कला आणि क्रीडा क्षेत्रातील यश विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक आहे. जिल्हा परिषद शाळांमध्ये या क्षेत्राला दिला जाणारा महत्त्वामुळे विद्यार्थ्यांना जीवनातील विविध कौशल्ये विकसित करण्याची संधी मिळते.

## 2.गळती आणि पटनोंदणी -

जिल्हा परिषद शाळांमध्ये गळती म्हणजेच विद्यार्थ्यांचे शाळा सोडणे ही मोठी समस्या आहे. आर्थिक अडचणी, पालकांचा शिक्षणाकडे असलेला कमी कल, तसेच शैक्षणिक सुविधांचा अभाव यामुळे अनेक विद्यार्थी शाळा सोडतात. दुसरीकडे, पटनोंदणी वाढवणे हे देखील महत्त्वाचे आहे. सरकारच्या विविध योजनांमुळे विनामूल्य शिक्षण, पोषण आहार आणि शालेय साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. शिक्षकांनी जनजागृती आणि पालकांशी संवाद साधून विद्यार्थ्यांची पटनोंदणी वाढविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. गळती कमी करणे आणि पटनोंदणी वाढवणे हे शैक्षणिक विकासासाठी अत्यावश्यक आहे.

### गळती (Dropout)

- कारणे: आर्थिक संकट, कुटुंबीयांचा शिक्षणाबद्दल कमी रस, वाईट शैक्षणिक वातावरण, आणि दीर्घ शाळा कार्यकाळामुळे विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण वाढते.
- परिणाम विद्यार्थ्यांची गळती शिक्षणाच्या गुणवत्तेवर नकारात्मक परिणाम करते, ज्यामुळे शाळेतील उपस्थिती कमी होते आणि शाळा कार्यक्षमता कमी होते.
- भावनिक परिणाम: गळतीमुळे विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्यावर प्रतिकूल प्रभाव पडतो, ज्यामुळे त्यांचे भविष्य धोक्यात येते.
- समाजातील असमानता: गळतीमुळे समाजात शिक्षणाच्या समानतेवर परिणाम होतो, विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गातील विद्यार्थ्यांना.

**पटनोंदणी (Enrolment)**

- महत्त्व: शाळेत विद्यार्थ्यांची पटनोंदणी वाढवणे आवश्यक आहे, ज्यामुळे शाळेच्या कार्यक्षमतेत सुधारणा होते.
- उपाययोजना: शालेय उपक्रम, क्रीडा आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांचा समावेश केला जात आहे ज्यामुळे विद्यार्थी आकर्षित होतात.
- पालकांचा सहभाग: पालकांनी शिक्षणाच्या महत्त्वाबद्दल जागरूकता वाढवून शाळेत विद्यार्थ्यांची पटनोंदणी वाढवणे आवश्यक आहे याचे महत्व पटवून देण्यात येत आहे .
- जनजागृती: माध्यमातून जनजागृती करून विद्यार्थ्यांना शाळेत दाखल होण्यासाठी प्रोत्साहित केली जात आहे.

**सारांश:** गळती आणि पटनोंदणी हे दोन्ही मुद्दे जिल्हा परिषद शाळांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. यावर लक्ष देऊन, शाळा आपल्या शैक्षणिक दर्जात सुधारणा करू शकतात आणि विद्यार्थ्यांच्या भविष्यात सकारात्मक बदल घडवू शकतात. 2023 च्या बॅचचे इयत्ता आठवीचे विद्यार्थी शिक्षक नसल्या कारणाने इयत्ता सातवीतून आठवीत जाण्याकरिता इतर शाळेमध्ये जाण्याची सोय करत होते. अशातच शिक्षकांनी पालकांचे व विद्यार्थ्यांचे संपन्न करून इयत्ता आठवीचा वर्ग वाचविला . यासाठी केलेले प्रयत्न म्हणजे ऑनलाइन बदलांमध्ये मिळालेल्या तीन शिक्षकांचा फोन नंबर व पत्ता शोधण्यात आला. त्यांना रीतसर आमंत्रण देऊन शाळा बंद होण्याच्या आधीच एक छोटेखानी कार्यक्रम घेण्यात आला आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांना तसेच पालकांना शाळा न सोडण्याचे आवाहन केले आणि ते आव्हान आणि विद्यार्थ्यांनी दिलेली संधी यशस्वी झाली आणि इयत्ता आठवीचा वर्ग टीकला.

https://youtu.be/Dc9BPrnPz_w?si=U2ibb0vExllkOHqR

**3.आनंददायी शिक्षणासाठी नवोपक्रम**

जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांना आनंददायी शिक्षण देण्यासाठी विविध नवोपक्रम (Innovations) राबवले जात आहेत. या उपक्रमांचा उद्देश शिक्षणाला रुचकर आणि सुलभ बनवणे हा आहे. काही महत्त्वाचे नवोपक्रम असे आहेत:

1. खेळाद्वारे शिक्षण: शिक्षणात खेळांचा वापर करून मुलांचा सहभाग आणि उत्साह वाढवला जातो, ज्यामुळे ते शिकण्यात अधिक आनंद घेतात.
2. संगणक साक्षरता: डिजिटल शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना संगणक व तंत्रज्ञानाचे प्राथमिक ज्ञान दिले जाते, ज्यामुळे शिक्षण अधिक सोपे बनते.
3. कार्यशाळा आणि प्रकल्पाधारित शिक्षण: विद्यार्थ्यांना वेगवेगळे प्रकल्प आणि कार्यशाळांमध्ये सहभागी करून घेऊन त्यांची कौशल्ये आणि ज्ञान सुधारले जाते.
4. श्रवण, दृश्य माध्यमांचा वापर:शैक्षणिक विषय शिकवताना ऑडिओ-व्हिज्युअल साधनांचा वापर केला जातो, ज्यामुळे मुलांचा अभ्यासात रस वाढतो.

हे नवोपक्रम विद्यार्थ्यांना शिकण्याची प्रक्रिया आनंददायी व सर्जनशील बनवण्यासाठी महत्त्वाचे ठरत आहेत. शाळेतील नवोपक्रमाचे फलित म्हणून विद्यार्थ्यांना शाळेमध्ये मनोरंजक पद्धतीने शिकवले जाते. यासाठी" कचऱ्यातून ज्ञान निचरा", "माय गॉड लिसनिंग" क्रियांचा राजा भागाकार माझा ",अशा प्रकारचे

नवीन उपक्रम  चालू असतात आणि याचे राज्यावर सादरीकरण सुद्धा करण्यात येते यासाठी 2022- 23 ला जिल्ह्यामध्ये "कचऱ्यातून ज्ञान निचरा" या नवोपक्रमाचा  पाचवा क्रमांक आला.

2023 -24 ला माय गुड लिसनिंग या नवोपक्रमाला  चौथा क्रमांक मिळाला आणि २०२४-२५ चा उपक्रम म्हणून आता राज्यावर "क्रियांचा राजा भागाकार माझा" हा सादर करीत आहे.  अशा पद्धतीने जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मटकाझरी  येथे अनेक प्रकारचे उपक्रम चालू असतात आणि विद्यार्थी याचा पुरेपूर आनंद घेतात आणि या मनोरंजनातून शिक्षणाकडे वळतात.

https://youtube.com/@pralhadpralhad?si=aKyzS__rbwcKz8Un

सर्व उपक्रम यावर आहेत.


महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वर्धा

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र

जिल्हास्तरीय नवोपक्रम स्पर्धा

प्रमाणपत्र

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत आयोजित
राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा सन 2021-22 साठी

श्री/श्रीमती/डॉ. प्रणाली रामचंद्र कोल्हे

यांनी जिल्हास्तरावर सादर केलेल्या कोड्यांदारे फुलवू ज्ञानपिसारा या नवोपक्रमास

प्राथमिक या गटातून जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त केल्याबद्दल त्यांना
हे प्रमाणपत्र सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येत आहे.

हार्दिक अभिनंदन!

श्रीमती मधुमती सा...
जिल्हा नोडल अधिकारी
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था

डॉ. मंगेश घोगरे
प्राचार्य
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वर्धा

**4.विद्यार्थी विकासात पालक सहभाग -**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात पालकांचा सहभाग खूप महत्त्वाचा आहे.  पालकांचा सहभाग वाढवण्यासाठी शाळेत नेहमी  विविध उपक्रम राबवले जातात. पालकांनी शाळेच्या उपक्रमांमध्ये सहभाग घेतल्याने  मुलांच्या शैक्षणिक आणि नैतिक विकासात मोठा फरक पडत आहे .

1. पालक-शिक्षक सभा (PTA): या सभांद्वारे पालक आणि शिक्षक यांच्यात संवाद होतो, ज्यामुळे पालकांना मुलांच्या शैक्षणिक प्रगतीची माहिती मिळते आणि शाळेच्या उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग वाढतो आहे .
2. गृह अभ्यासाचे निरीक्षण: पालकांनी मुलांच्या गृह अभ्यासावर लक्ष ठेवणे आवश्यक आहे, जेणेकरून मुलांना योग्य मार्गदर्शन मिळेल यासाठी आम्ही प्रयत्नशील असतो .

3. शालेय उपक्रमांमध्ये सहभाग: शाळेतील विविध सांस्कृतिक, क्रीडा आणि शैक्षणिक उपक्रमांमध्ये पालकांचा सहभाग विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासात आणि त्यांच्या विकासात हातभार लागताना दिसत आहे.

पालकांचा सक्रिय सहभाग विद्यार्थी विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो आणि शाळा व कुटुंब यांच्यातील दुवा मजबूत करत आहे.

**5.शालेय स्तरावरील विविध स्पर्धा परीक्षेतील यश -**

शालेय स्तरावर विविध स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण असतात. या परीक्षांमध्ये सहभाग घेणारे विद्यार्थी त्यांच्या ज्ञानाची चाचणी घेतात आणि विविध कौशल्ये विकसित करतात. शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये यश मिळवणारे विद्यार्थी भविष्याच्या शैक्षणिक संधींसाठी तयार असतात. स्पर्धात्मक परीक्षा विद्यार्थ्यांना आत्मविश्वास वाढवण्यास मदत करतात, ज्यामुळे ते विविध क्षेत्रांमध्ये उत्कृष्टता साधू शकतात म्हणूनच शाळेत विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षा देण्यासाठी उद्युक्त केले जाते ज्यामुळे

1. ज्ञानाची चाचणी: विद्यार्थ्यांचे ज्ञान व समजण्याची पातळी तपासली जाते.
2. आत्मविश्वास वाढवतो: स्पर्धेत यश मिळवणे विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासात वाढ करते.
3. उच्च शिक्षणाच्या संधी: यशस्वी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या आणि उच्च शिक्षणाच्या संधी मिळतात.
4. एक्सपोजर व नेटवर्किंग: स्पर्धांमधून विद्यार्थ्यांना विविध व्यक्तींशी संपर्क साधण्याची संधी मिळते.

**6.मध्यान्ह भोजन योजना सकारात्मक परिणाम -**

मध्यान्ह भोजन योजना विद्यार्थ्यांना पौष्टिक आहार प्रदान करते, ज्यामुळे त्यांच्या शारीरिक आणि मानसिक विकासात सुधारणा होते. विशेषतः आर्थिक दृष्ट्या मागास वर्गातील विद्यार्थ्यांसाठी ही योजना महत्त्वाची आहे, कारण यामुळे शाळेतील उपस्थिती वाढत आहे आणि शिक्षणाच्या दर्जात सुधारणा होत आहे. पोषणयुक्त आहारामुळे विद्यार्थ्यांची शारीरिक शक्ती वाढून त्यांचे लक्ष व एकाग्रता सुधारत आहे , ज्यामुळे शैक्षणिक कामगिरीत सकारात्मक परिणाम दिसून येत आहे .

1. उपस्थितीत वाढ: या योजनेमुळे शाळेतील विद्यार्थ्यांची उपस्थिती सुधारते.
2. शारीरिक स्वास्थ्य: पौष्टिक आहारामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य सुधारते आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढते.
3. एकाग्रता व लक्ष: चांगल्या आहारामुळे विद्यार्थ्यांचे लक्ष आणि एकाग्रता वाढते.
4. समाजातील समावेश: योजनेमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना समान शैक्षणिक संधी मिळतात.

**7.आनंददायी शिक्षण -**

आनंददायी शिक्षण पद्धती विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रक्रियेत सहभागी करण्यावर केंद्रित आहे. या पद्धतीमध्ये खेळ, प्रकल्प आणि सहलींचा समावेश केला जातो, ज्यामुळे विद्यार्थ्यांना शिकणे मजेदार वाटते. शिक्षक विविध शैक्षणिक साधने वापरून शिक्षणातील रुची वाढवतात, ज्यामुळे विद्यार्थ्यांचे मनोबल आणि आत्मविश्वास वाढत आहे . आनंददायी शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचे एकाग्रता आणि सृजनशीलता सुधारत आहे.

1. शिक्षणात रुचि: खेळ आणि सर्जनशील उपक्रमांद्वारे शिक्षण मजेदार बनवले जाते.
2. सकारात्मक वातावरण: आनंददायी शिक्षणामुळे शाळेतील वातावरण अधिक सकारात्मक बनते.

3. सृजनशीलता व कल्पकता: विविध उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता वाढवतात.
4. सामाजिक कौशल्ये: सहकार्याने काम केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या संवाद कौशल्यांचा विकास होतो.



रयतेचा कैवारी

संपादक ~ शाहू संभाजी भारती ( डिजिटल शैक्षणिक दैनिक रयतेचा कैवारी – वर्ष चौथे, अंक ०२३, एकूण अंक ९९७ ) बुधवार दिनांक १२-१०-२०२२ पान ०७

## 'कचऱ्यातून ज्ञाननिचरा' उपक्रमाला उत्तम प्रतिसाद

उमरेड / नागपूर : दि.११ ( रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा ) उपक्रमाची जोड अध्ययनाला मिळाली की अध्ययन मजेदार होते. उपक्रमातून निरनिराळे घटक अध्ययन अनुभवाची जोड म्हणून कार्य करतात. आणि अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यात मदत मिळते. असाच एक नवोपक्रम जि.प.उ.प्रा.शा.मटकाझरी येथे शाळेचे मुख्याध्यापक नंदकिशोर अकर्ते यांच्या सहकार्यातून स.शि.प्रणाली कोल्हे यांनी सुरु केला.

उपक्रमाचे स्वरुप -

१. दैनंदिन जीवनात वर्तमानपत्रात अथवा इतर ठिकाणाच्या वाचनातून मिळाणाऱ्या ,न माहिती असणाऱ्या , नविन वाटणाऱ्या शब्दाला कापणे.
२. कात्रणवहित चिकटविणे
३. शब्दाची माहिती मोठ्यांना विचारणे
४. माहितीचा मोठा स्त्रोत असलेल्या गुगल इंजिनचा वापर करुन शोधणे.
५.मिळालेली माहिती त्या शब्दाखाली लिहिणे.
६. शब्दाची माहिती इतर माहितीसाठी उपयोगात आणणे

उपक्रमाची उद्दीष्टे : १.शब्दांचा शोध घेऊन माहिती शोधण्यास स्त्रोत शोधणे.
२. तंत्रज्ञानाचा वापर करता येणे.
३. स्वयंअध्ययनास प्रेरीत करणे.
४.स्पर्धा परीक्षेचे स्वरुप कळणे.



कार्यवाही : विद्यार्थी नवनविन मिळाले शब्द जमा करुन चिटकवितात. मिळालेले शब्दांची माहिती गुगलवरुन घेऊन त्याचे वाचन करुन लिहिले जाते.सर्व विद्यार्थ्यांनी मिळवलेली माहिती जमा करुन त्याची पुस्तिका तयार केली जाते.या पुस्तिकेवरुन गुगल फॉर्मद्वारे विद्यार्थी आपल्याला आकलन झालेले प्रश्नांची उत्तरे सोडवतात.

ही चाचणी शाळेपुरती मर्यादीत न राहता तंत्रज्ञानाच्या मार्फत केंद्र, तालूका जिल्हा व इतर जिल्ह्यातही जात असल्याने या चाचणीचा व मिळाणाऱ्या ज्ञानाचा लाभ इतरही विद्यार्थी , शिक्षक , पालक घेत असल्याचे दिसत आहे.उत्तम गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक नंदकिशोर अकर्ते व स.शि सोनकुसरे यांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात येते. यामुळे मुले पुढील चाचणी आणखी उत्साहाने सोडवतात.अश्याप्रकारे शाळेत उपक्रमाला उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

**8.सहशालेय उपक्रमातून विद्यार्थी गुणवत्ता -**

सहशालेय उपक्रम, जसे की क्रीडा, कला, संगीत, आणि निबंध स्पर्धा, विद्यार्थ्यांच्या एकात्मिक विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. या उपक्रमांमध्ये सहभागी झाल्याने विद्यार्थ्यांचे नेतृत्वगुण, संघभावना आणि सामाजिक कौशल्ये विकसित होत आहेत . सहशालेय उपक्रम विद्यार्थ्यांना एकत्र येण्याची, संवाद साधण्याची, आणि त्यांच्या सृजनशीलतेला वाव देण्याची संधी प्रदान करतात, ज्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्वात उजळणी होत आहे .

1. एकात्मिक विकास: सहशालेय उपक्रम विविध कौशल्यांच्या विकासावर लक्ष केंद्रित करतात.
2. नेतृत्व गुण विकसित करणे: विविध स्पर्धांमध्ये भाग घेणाऱ्यांना नेतृत्व गुण विकसित करतात.
3. संघभावना: विद्यार्थ्यांमध्ये संघभावना व एकजुटीची भावना निर्माण करतात.
4. सामाजिक जबाबदारी: सहशालेय उपक्रम विद्यार्थ्यांना समाजाशी जोडतात व जबाबदारी शिकवतात.

**9.विविध अध्यापन शास्त्रीय कौशल्यांचा यशस्वी वापर**

https://youtu.be/p5rHYLOhy98?si=qGssR6c-rjK2qmAo

https://youtu.be/iWADGDuKjEo?si=63HMMnzB6PSkq8j0

शिक्षणाच्या प्रक्रियेत विविध शास्त्रीय कौशल्यांचा यशस्वी वापर केल्याने विद्यार्थ्यांची समज वाढवता येते. शिक्षकांनी श्रवण, दृश्य, आणि प्रयोगाधारित शिक्षण पद्धतींचा समावेश करतात विद्यार्थ्यांना शिकणे

अधिक प्रभावी होत आहे . या पद्धतींमुळे विद्यार्थ्यांना ज्ञानाची अचूक समज प्राप्त होत आहे आणि ते जास्त सक्रियपणे शिक्षणात भाग घेत आहेत , ज्यामुळे त्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावत आहे .

1. अधिक प्रभावी शिक्षण: विविध अध्यापन पद्धतींमुळे विद्यार्थ्यांचा समज वाढतो.

2. सक्रिय सहभाग: श्रवण, दृश्य, आणि प्रयोगाधारित शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग वाढतो.
3. आधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश: तंत्रज्ञानाचा वापर शिक्षण अधिक सोपे बनवतो.
4. व्यावसायिक अनुभव: विविध पद्धती विद्यार्थ्यांना व्यावसायिक जगात यशस्वी होण्यासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करतात.

https://youtu.be/_aot3R2cJMg?si=GIRYh0AAjjKdDAMs

https://youtu.be/-yzQNxUo04c?si=qfs29g0lw3JpJWjG

**विडियो लिंक -**

https://youtu.be/BjWqaTLx60A?si=7vsfbXfpMv0xjpkq

https://drive.google.com/file/d/14nHH-svnjiC-PgVyvhXrgMHViyugKJcN/view?usp=drivesdk

**फोटो -**

https://tickli.in/uSDFPUjlKWVN6bkhleXdSVkhDTExsUT09

स्वकमाईचा आनंद हा वेगळाच असतो. या स्व कमाईतून विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कमाईचे पैसे हे स्वतःच्या बँक खात्यात टाकले. आणि स्वतःच पावती भरून त्यांनी हा पोस्टाचा व्यवहार केला.

https://youtu.be/_TDd5md6wcc?si=WBsdh5IRYQWmuJ_1

----------**----------

# "सहकार्य तत्त्वातून शाळा विकास"

**शाळेचे नाव व पत्ता - मानकर आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, वरोडा, ता.कळमेश्वर जि. नागपूर**

**शाळेचा ईमेल आयडी** - mavwaroda@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - सौ.जया राजेंद्र मानकर
**मोबाईल क्रमांक** - 9921258429
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - jayamankar.jm@gmail.com

**शाळेची इमारत**

**जुनी इमारत**



**नवीन इमारत**



**प्रस्तावना -**

१९८९ मध्ये वरोडा येथे मानकर आदर्श विद्यालयाची गांधी शिक्षण संस्थे अंतर्गत स्थापना करण्यात आली. तत्कालीन संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रमेशजी मानकर (माजी जि. प. अध्यक्ष) यांनी गोर-गरीब विद्यार्थ्यांना गाव पातळीवरच शिक्षण मिळावे या उद्देशाने त्यांनी मानकर आदर्श विद्यालयाची स्थापना केली. मनात सेवाभावी वृत्ती व शिक्षण प्रेमी या त्यांच्या ध्यासाने त्यांनी वरोडा या गावातील सावनेर बायपास निसर्ग रम्य वातावरणात शाळेसाठी जागा उपलब्ध करून दिली व संस्थेची बेताचीच असलेली आर्थिक परिस्थितीतून इमारतही उभी करून दिली साधारणतः १९८९ -१९९२ मध्ये तीन खोल्या उभ्या केल्या व नंतर २०१०-११ मध्ये शाळेची इमारत उपलब्ध करून दिली.

ज्या वेळी शाळेची स्थापना झाली त्या वेळी वर्ग ५ वी ते १० वी पर्यंतच वर्ग भरायचे. परंतु पालकांच्या मागणी नुसार व तालुक्या शिवाय कनिष्ठ महाविद्यालय कुठेच उपलब्ध नव्हते. त्यामुळे बरेच विद्यार्थी प्रामुख्याने मुलींना पालक तालुक्यांच्या ठिकाणी शिक्षण घेण्याकरिता पाठवीत नसत व त्यामुळे संस्थेच्या अध्यक्षांनी वर्ग ११ वी व १२ वी आर्ट्स व कॉमर्स च्या ज्युनिअर कॉलेजच्या शाखा सुरु केल्या त्यास उत्तम असा प्रतिसाद मिळाला.

**शाळेचा विकास** –

मी २ नोव्हेंबर, २०१५ ला मुख्याध्यापिका झाले. त्यावेळी शाळेमध्ये वर्ग ५ वी ते १२ वी पर्यंतचे वर्ग सुरू होते. वरोडा हे गाव तालुक्यालगत म्हणजे चार किलोमीटर अंतर, सर्वत्र शहरीकरण सुरू झालेले आहे. पालक आपल्या मुलांच्या प्रवेशासाठी कॉन्वेट संस्कृती कडे वळायला लागलेली होती. आज प्रत्येक श्रीमंत, गरीब, व मजुरी करणाऱ्या पालकांनाही वाटते कि माझा मुलगा हा कॉन्वेंट मध्ये जायला पाहिजे. इंग्रजी बोलायला पाहिजे, त्यांनी टाय, बेल्ट, बूट घालायला पाहिजे. माझा मुलगा चकमकीत असलेल्या शाळेमध्ये गेला पाहिजे आणि ते सर्वात मोठे आव्हान आमच्यासमोर होते.

मी मुख्याध्यापिका होण्याअगोदर पर्यवेक्षिका होते आणि शाळा व्यवस्थापक मंडळामध्येही होते. त्यामुळे तत्कालीन अध्यक्षांनी उभे केलेले शाळेचे वैभव पुढे न्यायचे आहे हा ध्यास होता. त्या करिता मराठी शाळेमधील पहिली,दुसरी वर्गातील विद्यार्थी संख्या कमी होत होती जर या वर्गात विद्यार्थी राहिले नाही तर माझ्या शाळेत ५ व्या वर्गात कोणते विद्यार्थी येतील प्रश्न भेडसावत होता.



या करिता शाळा, मॅनेजमेंट ,सचिवांच्या सहकार्यातून बालाजी कोन्वेंट ची सुरुवात केली ज्यात आज नर्सरी ते ४ थी पर्यंत १४० विद्यार्थी आहेत .

संस्थेने २००५ मध्ये ११ वी आर्ट्स कॉमर्स शाखा ज्युनिअर कॉलेज साठी सुरु केली करिता. कालांतराने मुलांचा ओढा विज्ञानशाखेकडे वाढायला लागला. तालुक्यामध्ये नगर परिषद शाळे शिंवाय विज्ञान शाखा उपलब्ध नव्हती. त्यामुळे तिथे टक्केवारी नुसार म्हणजे मेरीट नुसार प्रवेश होत असल्यामुळे वरोडा गाव व त्याच्या आजूबाजूच्या परिसरात असलेल्या गावातील मुलांना विज्ञान शाखेमध्ये प्रवेश मिळत नव्हता. त्यामुळे ज्या मुलांचे इंजिनीअरिंग , बी फार्म, नर्सिंग, मेडिकल, ॲग्रीकल्चर या विभागाकडे जायचे स्वप्न असायचे ते अपूर्ण रहायचे. त्याकरिता २०१५ मध्ये संस्थेच्या तत्कालीन सचिव प्रिया मॅडम यांच्या सहकार्याने विज्ञान शाखा सुरु केली व अश्याप्रकारे गाव पातळीवरील विद्यार्थ्यांना विज्ञानशाखेमध्ये प्रवेश घेणे सोयीचे झाले. शाळेमध्ये वर्ग ५ ते १२ मध्ये जवळपास ८ ते १० गावामधून विद्यार्थी येतात.

**माझी शाळा सुन्दर शाळा व स्वच्छ शाळा** - शाळा विकास नियोजन करीत असताना शिक्षणाबरोबरच शाळा सुंदर व स्वच्छ असणे व दिसणे महत्त्वाचे आहे त्याशिवाय विद्यार्थी शाळेत रमणार नाही.












शाळा सुंदर दिसण्याकरिता भौतिक घटकांचे महत्त्व आहे. यामध्ये शाळा इमारत , शाळेची रंगरंगोटी , चित्रदर्शक भिंती, या सर्व बाबी असणे गरजेचे असते . परंतु १९९०-९२ मध्ये बांधण्यात आलेली जुनी इमारत जीर्ण व्हायला आलेली होती, कौलारू असल्यामुळे उन्हाळ्यामध्ये माकड कौल फोडून ठेवायचे त्यामुळे विद्यार्थ्यांना वर्ग खोलीमध्ये बसवणे कठीण झाले होते . त्यावेळी CSR अंतर्गत मिळणाऱ्या सुविधा कुठे मिळते या शोधात आम्ही होतो . JSW FOUNDATION ही संस्था आमच्या मदतीला धावून आली . २०२०-२१ मध्ये JSW FOUNDATION CSR अंतर्गत रूफ टू dream या प्रकल्पामध्ये आमच्या शाळेचा अंतर्भाव करून शाळेची जुनी जी तीन रूमची इमारत होती त्याची नूतनीकरण करून दिले ,वर्गातील रंगकाम करून दिले, वरांडातील रंगकामाबरोबर सुंदर अशा चित्रांनी सुद्धा भिंती रंगवून दिल्या, वर्गखोलींना खिडक्या काचेची तावदान असलेल्या खिडक्या बसवून दिल्या, नवीन दारे लावून दिली, त्यावर रंगकाम करून दिले , उदबोधनपर असे चित्र व वारली प्रिंटने सुशोभिकरण करण्यात आले. रुफ टू ड्रीम या प्रकल्प अंतर्गत आमची जुनी जीर्ण झालेल्या तीन खोल्यांना जीवनदान मिळाले त्याकरिता JSW FOUNDATION ला धन्यवाद . विद्यार्थी या वर्गखोल्यांमध्ये रमायला लागले.

नवीन इमारत जी होती तिचे रंग काम आवश्यक होते त्याकरिता आर्थिक सहाय्य असणे गरजेचे होते, त्यामध्ये आमच्या शाळेच्या संचालिका सौ. अरुणाताई यांनी मोलाची मदत दिली व इमारतीचे व्हाईट वॉश करून दिले त्यामुळे आमच्या दोन्ही इमारती चांगल्या दिसायला लागल्या पण त्या सुंदर दिसणे आवश्यक होते त्याकरिता भिंत चित्रीकरण कामकाज याकरिता शाळेतील ड्रॉइंग टीचर श्री वाघमारे सर यांनी मोलाची मदत केली विद्यार्थ्यांना सोबत घेऊन त्यांनी भिंतीवर चित्रे काढली . प्रत्येक वर्गातील अभ्यास विषयक भिंती, रंगवून त्यातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शक होऊ लागल्या , व्हरांड्यात वॉल

पेंटिंग काढून शाळेचे सुशोभीकरण झाले व शाळा सुंदर दिसायला लागली. शाळा सुंदर दिसण्याबरोबरच स्वच्छ पण असणे गरजेचे आहे.










**शाळेचे सौंदर्यीकरण** –

पर्यावरण विषयक उपक्रम, वृक्षारोपण हा उपक्रम शाळांमध्ये दरवर्षीचे होत असतो . शाळेमध्ये शोभेचे झाड लावणे आवश्यक होते ,त्याशिवाय शाळेची सुंदरता वाढणार नाही याकरिता " **एक वर्ग- एक कुंडी - एक झाड** " हा उपक्रम सुरू केला. यामध्ये वर्ग शिक्षकांनी मोलाचे सहकार्य केले . यातून शाळेमध्ये आज ५० ,६० शोभेची झाडे असणाऱ्या कुंड्या उपलब्ध आहेत व त्यांचे विद्यार्थ्यांद्वारे वृक्षारोपण करणे ,वृक्षदिंडी काढणे, सीड बॉल तयार करणे त्यांचे रस्त्यालगत बिजारोपण तयार करणे , शाळेत रोपवाटिका तयार करणे , असे अनेक उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण विषयक जागृती करिता राबविले जातात. शाळेत ECO CLUB ची स्थापना करण्यात आली, त्यांचे त्यामध्ये विद्याजंली पोर्टल वरती नोंदणी करण्यात आली आहे, तसेच JSW FOUNDATION अंतर्गत ESS पर्यावरण सेवा योजना सुरू केलेली असून. शाळेमध्ये पर्यावरण विषयक उपक्रम राबविले जातात.

ओला कचरा, सुका कचरा, याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जाणीव जागृती देऊन शोष खड्ड्यामध्ये ओला कचरा डम्प केल्या जातो व प्लास्टिक मुक्त परिसर या उपक्रमातून इको ब्रिक्स तयार करण्याबाबत उपक्रम घेतले जातात.








वृक्षारोपण


PLASTIC FREE SCHOOL
SAVE WATER
ECO CLUB
मराठे

या झाडांचे, कुंड्यांचे संरक्षण करणे, जतन करणे, झाडांना पाणी टाकणे , याकरिता शाळेमध्ये विद्यार्थी मंत्रिमंडळ तयार केले जाते त्यानंतर पर्यावरण मंत्र्याकडे ही जबाबदारी सोपविली जाते व विद्यार्थी या बाबींची काळजी घेतात.

तसेच शालेय परिसर स्वच्छ असणे गरजेचे आहे , त्याकरिता तसेच विद्यार्थी परिसर स्वच्छतेचे महत्त्व याकरिता आठवड्यातून एक दिवस एका वर्गाचा अशा प्रकारे नियोजन करून परिसर स्वच्छता राखल्या जाते.

**विद्यार्थी सुरक्षा** –

आज अतिशय संवेदनशील प्रश्न म्हणजे विद्यार्थी सुरक्षा , विद्यार्थी सुरक्षितते करिता शाळेमध्ये अनेक सुविधा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे , यामध्ये शाळेला संरक्षण भिंत असणे गरजेचे आहे, परंतु आर्थिक समस्येमुळे ती पूर्ण करणे शक्य नसल्यामुळे एका भागाने तार कुंपण कठडा आहे , परंतु एक भाग मोकळा होता , तो बंद करणे महत्त्वाचे होते याकरिता आम्ही वेस्ट मटेरियलचा उपयोग केला , जुन्या बिल्डिंगच्या व्हरांडातून निघालेल्या टीन व लोखंडी तारांचे कुंपण करून शाळेची कंपाऊंड वाल तयार केली. सौंदर्यीकरण करण्याकरिता कला शिक्षक व विद्यार्थ्यांचा उपयोग करून त्यावर वारली प्रिंट काढली त्यामुळे दोन्ही गोष्टी साध्य झाल्या .

विद्यार्थ्यांकरिता तक्रारपेटी लावण्यात आली व शाळा व्यवस्थापन कमिटीद्वारे तक्रारपेटीची तपासणी केली जाते. शाळेमध्ये, सखी सावित्री मंचची स्थापना करून त्याद्वारे विद्यार्थ्याकरिता विद्यार्थी सुरक्षा बाबत विविध उपक्रम राबविले जातात . मुलींकरिता GOOD TOUCH , BAD TOUCH या सारखे समुपदेशनाचे कार्यकम राबविले जातात . यामध्ये सौ. गीता दळवी - समुपदेशिका कळमेश्वर पोलीस स्टेशन या विद्यार्थी संरक्षणाबाबत सतत सहकार्य करतात .

विद्यार्थी सुरक्षेकरिता परिसरामध्ये सी सी टी व्ही कॅमेरा लावण्यात आलेले आहेत आणि शाळेमध्ये दामिनी पथकाचेही सतत सहकार्य लाभते व विद्यार्थ्यांना सायबर सिक्युरिटी , मोबाईलचा वापर किती व कसा करावा याबाबत विद्यार्थ्यांना जाणीव जागृती केली जाते.












**अध्ययन अध्यापन विषयक नियोजन** –

विद्यार्थी अध्ययन अध्यापन योजनांमध्ये जे लहान वर्ग असतात त्यांचे वाचन आणि लेखन यावर सुरुवातीच्या काळात लक्ष केंद्रित केल्या जातात व अध्ययन निष्पत्ती नुसार वर्ग पाचवी ,सहावी स्तर निहाय गटाने कार्य केले जाते व त्यानुसार वर्गशिक्षकांकडे जबाबदारी देऊन सुधारणेसाठी प्रयत्न केला जातो त्याकरिता शाळेच्या परिपाठापूर्वी पहिले १/२ तासाचे विद्यार्थ्यांचे वर्ग घेतल्या जातात.

संच मान्यतेनुसार शिक्षक निर्धारण असते. माझ्या शाळेमध्ये २०२०, २०२२, २०२४ या तीन वर्षामध्ये विज्ञान व गणित शिक्षक सेवानिवृत्त झाले . त्यामुळे विज्ञान व गणित शिक्षकाचे वर्कलोड काढणे विज्ञान - १ शिकवायला शिक्षक नाही अशा परिस्थितीत इतर शिक्षकांच्या सहकार्यातून दोन कंत्राटी एम. एस .सी .शिक्षिका नियुक्त करण्यात आल्या व विद्यार्थ्यांना अध्यापन करणे सोपे झाले . विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन तयार व्हावा म्हणून विद्यार्थ्यांना विज्ञान हे प्रयोगशाळेत शिकावे हा आग्रह त्यामुळे विज्ञान १ , विज्ञान २ या विषयाचे अध्यापन हे प्रयोगशाळेत होते किंवा प्रोजेक्टवरून विद्यार्थ्यांना संकल्पना शिकविली जाते . विद्यार्थ्यांनी प्रत्येक वेळी ई लर्निंग चा लाभ मिळण्याकरिता वर्गातही स्मार्ट

टीव्ही लावण्यात आलेले आहे विद्यार्थी त्याचा लाभ घेतात . आनंददायी शनिवार यातून विविध उपक्रम विद्यार्थ्यांचे घेतले जातात. उदाहरणार्थ योगासने ,ध्यान , प्राणायाम , आनंददायी उपक्रमातून आनंददायी गणित शिकवण्याचा प्रयत्न केला जातो. विद्यार्थ्यांना संगणकाची ओळख व्हायलाच पाहिजे. त्याकरिता विद्यार्थ्यांना आयसीटी लॅब द्वारे पुरेपूर सहभाग घेतला जातो , त्याबाबत तासिकेमध्ये नियोजन दिले आहे . तसेच विद्यार्थ्यांना खाली तासिकेमध्ये ही संगणकावर बसायची मुभा दिली जाते. त्याचप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना ।T या अतिरिक्त विषयाची सुरुवात करण्यात आलेली आहे.













**स्पर्धात्मक परीक्षा -**

स्पर्धात्मक परीक्षेचे यश ही शाळेसाठी खूप मोठी उपलब्ध असते. पण यामध्ये आम्हाला पालक सहकार्य लाभत नाही त्याचे प्रमुख कारणही तसेच असते ते सकाळी कामाला जातात तर ते सायंकाळी घरी येतात आणि त्यांच्यासाठी पोटाची भूक महत्त्वाची असते . म्हणून आम्ही शाळेतच त्यांना अभ्यासाची नियोजन करतोय यामुळे तीन वर्षापासून यश मिळाले , शाळेतच दीड तास NMMS परीक्षेचा दुपारचा जेवणाच्या सुट्टीनंतर नियोजन केले जाते व शिक्षक ते पाळतात. तसेच यामध्ये सेवानिवृत्त शिक्षक श्री वासनकर सर यांचेही मोलाचे सहकार्य लाभले . NMMS परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांच्या सेवानिवृत्त शिक्षक यांचा दीड तास वर्ग घेतात त्यामध्ये बुद्धिमत्ता चाचणी हा महत्त्वाचा विषयाचे पेपर पॅटर्न नुसार तयार करून घेतात आणि विद्यार्थी त्याला उत्तम प्रतिसाद देतात .

विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची आवड निर्माण व्हावी त्याकरिता करिअर गायडन्स बरोबर स्पर्धा परीक्षेचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले जाते, वर्गात रोज फळ्यावर जनरल नॉलेज बाबत पाच प्रश्न लिहिले जातात , त्यामुळे विद्यार्थ्यांचे सामान्य ज्ञान वाढत आहे .










प्रत्येक वर्गामध्ये स्टडी कॉर्नर तयार केलेला आहे, त्याचबरोबर विद्यार्थ्यांना घरीही विद्यार्थ्यांना स्टडी कॉर्नर करण्याकरता प्रोत्साहीत केले जाते.

विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजावी याकरिता ग्रंथालयामध्ये विविध उपक्रम राबविले जातात, विद्यार्थ्यांनी वाचनाकरिता जास्तीत जास्त पुस्तके न्यावी हा आमचा आग्रह असतो . पुस्तकाचे वाचन झाल्यानंतर ग्रंथपाल मॅडम यांनी विद्यार्थ्यांकडून अभिप्राय लिहून घ्यावा हा आमचा आग्रह असतो.

वाचन प्रेरणा दिन, वाचन चळवळ , हा उपक्रम प्रभावीपणे राबविला जातो ." शिवचरित्राचे वाचन, वेदप्रतिष्ठान, अंतर्गत" हा उपक्रम राबविला गेलेला होता . शाळेतील 80 टक्के विद्यार्थ्यांना वेध प्रतिष्ठानचे 100 प्रश्न पाठ होते .

**रोटरी क्लब डाऊन टाऊन यांचे योगदान -**

विद्यार्थ्यांचा अध्ययन अध्यापन अनुभवातून रोटरी क्लब डाऊन टाऊन नागपूर यांनी मोलाची मदत केली . त्यांचा CSR फंड अंतर्गत विद्यार्थ्यांचा इ लर्निंग करिता प्रोजेक्टर अभ्यासक्रमासह शाळेला भेट दिली. त्याचप्रमाणे प्रयोग शाळेकरिता वर्ग ५ वी ते १० वी च्या अभ्यासक्रमानुसार मानवी इंद्रिय मॉडेल भेट दिले . यातून विद्यार्थ्यांना प्रभावी अध्ययन अनुभव मिळतात. माझ्या शाळेमध्ये रोटरी क्लब ने इंटरॅक्टीव क्लब ची स्थापना केली . ज्यावर आजपर्यंत कोणत्याही ग्रामीण शाळेमध्ये त्यांनी प्राधान्य दिले नाही . परंतु आमच्या शाळेला त्यांनी यामध्ये सहभागी केले , त्यातून रोटरी क्लब द्वारे विद्यार्थ्यांचे

व्यक्तीमत्व घडविणारे विविध उपक्रम घेतले जातात . त्याच प्रमाणे नेत्र तपासणी सारखे उपक्रम ही शाळेमध्ये राबविले जाते.



पुण्य नगरी

City Pulse

## रोटरी डाउनटाउनच्या इंटरॅक्ट क्लबची वरोड्यातील आदर्श विद्यालयात स्थापना

**नागपूर :** रोटरी क्लब ऑफ नागपूर डाउनटाउन, नागपूर प्रायोजित इंटरॅक्ट क्लबची वरोडा येथील मानकर आदर्श विद्यालयात स्थापना करण्यात आली. या क्लबमध्ये विद्यार्थ्यांमधूनच अध्यक्ष, सचिव व कोषाध्यक्ष यांची निवड करण्यात आली. इतर काही विद्यार्थ्यांना संचालकपदाची जबाबदारी देण्यात आली तसेच क्लब नियंत्रक व मार्गदर्शक म्हणून प्रभा ठाकरे यांना जबाबदारी सोपविण्यात आली. कोवळ्या वयातच नेतृत्वगुण, समाजाप्रती सेवाभाव व देशप्रेम या सर्वांचा विकास करणे हे इंटरॅक्ट क्लबचे प्रमुख उद्दिष्ट आहे. याप्रसंगी रोटरी क्लब ऑफ डाउनटाउन नागपूरच्या अध्यक्षा डॉ. प्रतीक्षा मायी या प्रामुख्याने उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना इंटरॅक्ट क्लबबाबत माहिती देऊन पदाधिकाऱ्यांना जबाबदारी सोपविली. याप्रसंगी रोटरी डाउनटाउनच्या सचिव मृदुला सुदामे यांनी शाळेच्या ग्रंथालयाला पुस्तके भेट दिली. रोटरी क्लबचे संकेत धाराशिवकर, विक्रांत दारवेकर आदी या कार्यक्रमाला उपस्थित होते. आभार मृदुला सुदामे यांनी मानले.

Nagpur Edition

**सामाजिक उपक्रम** –

यामध्ये मतदार जागृती अभियान प्रभावीपणे शाळांमध्ये सायकल रॅली, पायदळ रॅली, रांगोळी स्पर्धा, पोस्टर मेकिंग स्पर्धा, घोषवाक्य पेंटिंग कॉम्पिटिशन, उपक्रम घेतल्या जातात. मतदार नोंदणी शिबिर राबविला जाते .मतदार नोंदणी कार्यशाळेमध्ये कार्यक्रमाची संबंधित व्यक्तीला बोलून मार्गदर्शन केले जाते.



SVEEP
गांधी शिक्षण संस्था संचालित
मानकर आदर्श माध्यमिक व
उच्च माध्यमिक विद्यालय, वरोडा
तालुका कळमेश्वर, जिल्हा नागपूर
मतदानाचे पहिलेपासि शिक्षा आणि निवडणूक साक्षरता (SVEEP) उपक्रम
बुढे हो या जवान
चलो करे मतदान
मतदानाचा हक्क मला..... मी मागे राहणार नाही !


गांधी शिक्षण संस्था, धापेवाडा द्वारा संचालित
मानकर आदर्श माध्यमिक व
उच्च माध्यमिक विद्यालय, वरोडा
ता. कळमेश्वर, जि. नागपूर
- मतदार जागृती अभियान -
१००% मतदान करा....!
- मतदारांसाठी प्रतिज्ञा -
आम्ही, भारताचे नागरीक, लोकशाहीवर निष्ठा ठेऊन,
याव्दारे, प्रतिज्ञा करतो की,
आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे
जतन करू आणि, नि:पक्षपाती व शांततापूर्ण
वातावरणातील निवडणूकांचे पावित्र्य राखू व
प्रत्येक निवडणूकीत निर्भयपणे नसेच
धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या
विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा
कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता
१००% मतदान करू...!
तुझं भविष्य तूझ्या हातात !
एवढी ताकत आहे तूझ्या मतात !


SVEEP




SVEEP






मानकर आदर्श माध्यमिक
व उच्च माध्यमिक विद्यालय,
वरोडा

शाळेमध्ये "मतदान जनजागृती क्लब " चालविला जातो . त्या अंतर्गत नोडल अधिकारी म्हणून नियुक्त केलेल्या शिक्षकांकडून कार्यवाही केली जाते .

**NILP अभियान -** असाक्षर विद्यार्थ्यांचे वर्ग चालवून त्याबाबत योग्य ती कार्यवाही वेळेच्या वेळी पूर्ण केल्या जाते. त्यामध्ये IT टीचर वैष्णवी मॅडम यांचे तांत्रिक बाबी पूर्ण करण्यामध्ये मोलाचे सहकार्य लाभले.







**विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणांना वाव** –

यामध्ये विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणांकरिता विविध सांस्कृतिक स्पर्धा घेतल्या जातात , भाषण स्पर्धा, वाद विवाद स्पर्धा ,चित्रकला स्पर्धा ,अशा अनेक स्पर्धा घेतल्या जातात . तसेच शासकीय चित्रकला परीक्षेमध्ये एलिमेंट्रीच्या तसेच वैज्ञानिक दृष्टीकोन वृद्धिंगत व्हावा याकरिता शाळेच्या स्तरावर विज्ञान

प्रदर्शनाचे आयोजन केले जाते. विविध परीक्षेला विद्यार्थ्यांना बसविले जाते . विविधांगी व्यक्तिमत्व घडविण्याचे यातून प्रयत्न केले जातात.

विद्यार्थी विकासामध्ये विद्यार्थ्यांना सर्वांगीण विकास हा महत्त्वाचा घटक असतो, त्यामध्ये व्यक्तिमत्व विकासाला बरोबरच शारीरिक विकासही तेवढाच महत्त्वाचा असतो, त्याकरिता क्रीडा स्पर्धा घेतल्या जातात तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी केल्या जाते . त्याप्रमाणे शाळेला शारीरिक शिक्षक नाही आहे परंतु JSW FOUNDATION अंतर्गत विद्यार्थ्यांना त्याही सुविधा दिल्या आहे .















शहरातील पालक आपल्या पाल्याला एखाद्या खेळामध्ये पारंगत करण्याकरिता क्लब लावून देतात परंतु आमच्या पालकाकडे पैसेही नसतात व मुलांकरिता वेळही नसतो व त्याचे त्यांना महत्त्वही नसते परंतु शाळा स्तरावर JSW FOUNDATION ने CSR अंतर्गत फुटबॉल कोच, मलखांब कोच , या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत व विद्यार्थी त्यांचा लाभ घेतात भविष्यात चांगले खेळाडू तयार होतील असे वाटते.

आरोग्य सुविधा करिता विद्यार्थ्यांना आरोग्य तपासणीचा लाभ दिला जातो, आरोग्य शिबिराबरोबरच मुलींची हिमोग्लोबिन तपासणी केली जाते. किशोरवयीन मुलींकरिता मार्गदर्शन शिबिराचे आयोजन केले जातात. " मासिक पाळी संबंधित आजार यावर यावर मार्गदर्शन डॉक्टर राजश्री राऊत या आरोग्य अधिकाऱ्याकडून नेहमी केले जाते .

**समारोप** –

एकंदरीत मानकर आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वरोडा या शाळेची वाटचाल प्रगतीच्या दिशेने असून २०२३ - २४ मध्ये शाळेला मा.शिक्षणाधिकारी ( माध्यमिक ) जिल्हा परिषद नागपूर यांच्याकडून तालुक्यातून " प्रगतिशील शाळा " म्हणून २६ जानेवारी २०२४ ला पुरस्कार मिळाला . तसेच " **मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा**" **(पहिला टप्पा)** यामध्ये तालुक्यातून दुसरा क्रमांक प्राप्त करून दोन लाखांचे बक्षीस जिंकले . तर "**मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा**" **(टप्पा दुसरा)** यामध्ये तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविला.






या सर्व यशामागे शाळेचे शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे टीम वर्क आहे . यामध्ये मला शिक्षक, पालक माझ्या केंद्रातील केंद्रप्रमुख **डॉ. कीर्ती पालटकर मॅडम** (ब्राह्मणी केंद्र) यांचे सतत मार्गदर्शन लाभत असते व त्यांच्या मार्गदर्शनातून नवीन काही करण्याची प्रेरणा मिळत असते. शाळेचे नियोजन करण्यासंबंधी व निर्णय क्षमतेसंबधी **मिपा** प्रशिक्षणाचा तसेच सीपीडी प्रशिक्षणाचा खूप फायदा होत आहे.

----------**----------

# “कृतीयुक्त आनंददायी शिक्षणाची कास”

**शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कळमना, (वेला), केंद्र.बेला,ता.उमरेड, जि.नागपूर**

**शाळेचा ईमेल आयडी** - meeranagargoje79@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्रीम.मिरा ज्ञानोबा मुसळे (नागरगोजे)
**मोबाईल क्रमांक** - 8806826767
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - meeranagargoje79@gmail.com




**प्रास्ताविक** -

**शाळेचे ब्रिदवाक्य – “एकच ध्यास विदयार्थ्यांचा सर्वांगिण विकास”**

निसर्गाच्या वनराईत नट्लेली नदीकाठच्या सौंदर्यावर वसलेली शाळा जि. प. प्राथमिक शाळा कळमना (वेला) केंद्र - बेला ता.उमरेड जि. नागपूर.

आपल्या दैनंदिन मुलभूत गरजांपैकी शिक्षण ही एक मुलभूत गरज आहे २१ व्या शतकात शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही ,नविन शैक्षणिक सत्राची सुरुवात आनंददायी शिक्षणानी करायचे ठरवले.मुले शाळेत १००% आली पाहिजेत, शाळेत टिकली पाहीजेत आणि ती शिकली पाहीजेत.आनंददायी शिक्षणासोबतच आदर्श, स्वच्छ सुंदर शाळा करण्याचे आव्हान होते. यासाठी काय करावे? कोणाची मदत घ्यावी? असे अनेक प्रश्न मनात येत होते. अनेक प्रश्नांचा गुंता होता. या सर्व प्रतिकूल परिस्थितीत मनात भावनांचा कल्लोळ दाटला होता. यामधूनच आमच्यातील शक्तिस्थाने शोधणे सुरु झाले.

जि. प. प्राथ. शाळा कलमना येथील विद्यार्थी, पालक, शाळा व्यवस्थापन समिती, सरपंच, उपसरपंच ग्रामपंचायतचे सदस्य व ग्रामस्थ यांच्याशी संवाद साधला. संभाषणाद्वारे पालकांच्या मनातील शाळेविषयीची, शिक्षणाविषयीची तळमळ जाणवत होती. शाळा दुर्गम भागात असल्यामूळे मुले शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर नये. ही भीती त्यांच्या मनात सलत होती.

या सर्व गोष्टीचा सारासार विचार करून मुख्याध्यापक, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत, शिक्षक पालक गट, माता पालक गट तसेच पालकांना विश्वासात घेऊन आनंददायी शिक्षण व **माझी शाळा सुंदर शाळा** करायचे ठरविले व आमचे मार्गक्रमण सुरु झाले.

**उद्दिष्टे -**

१) मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा बनवणे

२) १००% मुलीपर्यंत आनंददायी शिक्षण पोहचवणे व त्यांना शैक्षणिक प्रवाहात टिकवून ठेवणे.

3) पालक विद्यार्थी व शिक्षक यांच्या माध्यमातून शिक्षणाची गति वाढविणे.

4) आनंददायी वातावरणात विद्यार्थ्यांना अध्ययनाची सवय लावणे

5) विद्यार्थ्यांना अभिव्यक्त होण्याची संधी उपलब्ध करून देणे.

6) मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या स्पर्धेत पहिला नंबर मिळवणे.

अशी उद्दिष्टे समोर ठेवून प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली.

**अंमलबजावणी -**

एखादी व्यक्ती समाजातील इतर घटकांशी आंतरक्रिया किती यशस्वी रित्या साधू शकते हे ओळखून प्रथम नियोजन व पूर्व तयारी आवश्यक आहे हे ठरवले . यासाठी शाळेतील शिक्षिका सौ. रुपाली शेंडे, शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत यांना विश्वासात घेऊन आनंददायी शिक्षण व माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमाची सुरवात करण्यात आली. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. दिनकर राऊत, उपाध्यक्ष श्री किशोर शहाणे, उपसरपंच श्री.सचिन भाकरे, मुख्याध्यापिका मिरा मुसळे (नागरगोजे) व पालकांसोबत चर्चा करून उपक्रमाची सुरवात करण्यात आली. त्यात सरपंच व उपसरपंच यांचा खंबीर पाठींबा मिळाला. ग्रामपंचायतने शाळेची पूर्ण डिजीटल रंगरंगोटी करून दिली. यामुळे शालेय वातावरण अगदी प्रसन्न झाले. विद्यार्थ्यामध्ये सकारात्मक परिणाम जाणवू लागले. जे विद्यार्थी शाळेत येत नव्हते ते दररोज शाळेत येऊ लागले व आनंदाने धडे गिरवू लागले. शैक्षणिक साहित्याचा वापर विविध खेळ संवाद, अभिनय, गायन विविध कलांचे सादरीकरण यामूळे विद्यार्थी आनंददायी शिक्षण अनुभवू लागले. सर्व कृतीतून विदयार्थी बोलते झाले. लहान लहान संभाषण विद्यार्थी विद्यार्थी करू लागले. संवादामुळे घरातील व्यक्तीसोबत सुद्धा संवाद साधू लागले. सरावाने त्यात सहजता येत गेली. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला. भाषेची समज वाढली. वाक्यांचा अर्थबोध होऊ लागला. ज्या ठिकाणी विद्यार्थ्यांना अडचणी येत होत्या त्या ठिकाणी वारंवार सराव घेण्यात आला.

प्रत्येक विद्यार्थी या उपक्रमात सहभागी कसे होतील यासाठी आम्ही सगळे प्रयत्न करत होतो.शाळेचे डिजीटल पेंटीग झाल्यानंतर विद्यार्थ्यांचे भावविश्व भिंतीवर रेखाटले गेले. जिवंत व बोलके वातावरण शाळेमध्ये निर्माण झाले व विद्यार्थी म्हणू लागले

मॅडम... या भिंती आमच्याशी बोलू लागल्या आहेत. खरच स्वप्नाहूनही सुंदर शाळा सजली. विद्यार्थी सुध्दा शाळेत रममाण झाले आणि आमचे स्वप्न माझी शाळा सुंदर शाळा "उमरेड तालुक्यातून आम्हाला प्रथम क्रमांकाचे बक्षिस सुध्दा मिळाले.

वाढदिवस विदयार्थाच्या आयुष्यातील महत्वाचा दिवस, म्हणून शाळेने विद्यार्थ्यांचे वाढदिवस आई वडिलांसह शाळेत केक कापून साजरे करण्यास सुरुवात केली. ज्या विद्यार्थ्यांचा वाढदिवस असेल त्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी पुस्तक किंवा वस्तू स्वरुपात भौतिक सुविधा म्हणून शाळेला भेट दिल्या, शाळेप्रती सामाजीक बांधीलकी जपली. या उपकर्‌मामुळे शाळेला गावक-याकडून खूप मदत झाली. स्पर्धेच्या युगात विद्यार्थी टिकून राहावेत म्हणून सामान्य ज्ञानावर आधारित आठवड्याला ५ प्रश्न विद्यार्थ्यांकडून पाठ करून घेण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सामान्य ज्ञानात भर पडली. विद्यार्थ्यांना इंग्रजी वाचता, लिहिता व बोलता यावे म्हणून शाळेतील मिरा मुसळे मॅडमनी स्पोकन इंग्लिश प्रोग्राम सुरु केला. अथक परिश्रमानंतर विदयार्थी अस्खलितपणे इंग्रजी वाचू लिहू व थोडक्यात बोलू लागले. मुलांपर्यंत आनंददायी शिक्षण पोहचले. शाळा आदर्श तयार झाली. विद्यार्थांची शिकण्याची गती वाढली.खेळ व आनंददायी शिक्षणाने विद्यार्थी सक्षम होऊ लागले. मुलांना स्वयं अध्ययनाची सवय लागली. विद्यार्थ्यामध्ये आत्मविश्वास निर्माण झाला.

**फलनिष्पत्ती -**

आनंददायी शिक्षणात मुलांची आवड व क्षमतानुसार काही शैक्षणिक खेळाच्या मदतीने मुले अभ्यास करु लागली. शाळेत डिजीटल पेंटींग झाली भिंती बोलक्या झाल्या. सोबतीला काही स्वनिर्मित शैक्षणिक साहित्याचे झेरॉक्स, flash कार्ड, इयत्तावार अभ्यासाचे झेरॉक्स तसेच स्वनिर्मित व्हिडीओच्या माध्यमातून शाळा साहित्यांने पूर्ण करण्यास मदत झाली. तसेच गोष्टीचा शनिवार, किशोर मासिक पत्रक, दिक्षा ॲपचा वापर, विनोवा ॲपचा वापर अशा अनेक साहित्याची सोबत मिळाली. शैक्षणिक उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांचा जास्तीत जास्त सहभाग वाढला. विदयार्थी स्वयंप्रेरणेने अभ्यास करू लागले.

**समारोप -**

आनंददायी शिक्षण व उपकर्‌माद्वारे विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकाद्वारे शिक्षण घेता आले. आनंददायी शिक्षणामुळे अभ्यासाविषयी आवड निर्माण झाली. विद्यार्थ्यांना प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी मदत झाली. वेळोवेळी विद्यार्थ्यांना बक्षीसरूपी साथही दिली. त्यामुळे आनंददायी शिक्षणाचे ध्येय साध्य होत आहे. शाळेविषयीचे आमचे स्वप्न पूर्ण झाले. पालक विद्यार्थी व शिक्षक यांच्यात सुसूत्रता असेल तर प्रत्येक अडचणीवर मात करता येते.

आनंददायी शिक्षणामूळे **मुले शिकली व शाळा हसली** शाळेच्या या सर्व अविस्मरणीय प्रवासामध्ये श्री. सिद्धेश्वर कालोसे साहेब प्रा. शिक्षणाधिकारी नागपूर मा. श्री. छत्रपाल पटले साहेब, गटशिक्षणाधिकारी प. स. उमरेड मा. श्री. माने साहेब, विकास अधिकारी उमरेड , मा. श्री. सुधाकरजी मते साहेब, शि. विस्तार अधिकारी पं. स. उमरेड, मा. श्री. मनोज पाटील साहेब, पं. स. उमरेड मा. श्री. मधुकर पजई साहेब ,केंद्र प्रमुख केंद्र बेला साहेब तसेच शाळेतील शिक्षकवृंद शाळा व्यवस्थापन समिती व पालक ग्रामपंचायत सर्व पदाधिकारी तसेच कर्मचारी यांचे उत्तम सहकार्य व मार्गदर्शन मिळाले.

**संदर्भ साहित्य – फोटो व व्हिडीओ**





https://youtu.be/W7BJQ_wpENs

https://youtu.be/Qsb6MughCNs

https://youtu.be/ef3j-2yGCI8

https://youtu.be/sNVewMEZI2A

https://youtu.be/KuwHFwa0ATk

https://youtu.be/caU0vUHvlQM




A B C D E F G H I J K L M N O P Q R S T U V
Class-4th
DIVISION-I
FRACTION
FILL
TIMES TABLES
HALF
QUARTER


जि.प.प्राथमिक शाळा कन्हाळगाव
• पं.स.उमरेड जि.प.नागपूर •

----------**----------

# "नाविन्यपूर्ण उपक्रमातून गुणवत्तावाढीसाठी प्रयत्न"

**शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सावंगी (देवळी), केंद्र.देवळी (आमगाव), पंचायत समिती, हिंगणा,जिल्हा परिषद नागपूर**

**शाळेचा ईमेल आयडी** - pachareusha@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - सौ.उषा राजकुमार पचारे
**मोबाईल क्रमांक** - 9021769271
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** – pachareusha@gmail.com




**प्रास्ताविक -**

यशोगाथा लेखन करतांना अत्यंत आनंद होत आहे की,नागपूर जिल्ह्यातील हिंगणा तालुक्यात वर्ग पहिली ते पाचवीपर्यंत 127 पटसंख्या असलेली जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सावंगी शाळेने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या स्पर्धेत तालुका स्तरावर प्रथम क्रमांक पटकावून एक ऐतिहासिक कामगिरी करून दाखविली आहे.

शाळेच्या यशस्वी प्रवासात गावातील सर्व पदाधिकारी, ग्रामपंचायत, शाळा व्यवस्थापन समिती, पालक वर्ग, अधिकारी वर्ग या सर्वांचा सिंहाचा वाटा आहे. शाळेने अपार कष्ट,संघर्ष आणि दूरदृष्टी ठेवून हा मानाचा तुरा शिरपेचात रोवला आहे. सावंगी या गावाने स्वच्छता तसेच इतर स्पर्धेत अनेक पुरस्कार मिळवले आहे हा या यशाच्या मागील मुख्य प्रेरणास्त्रोत आहे.

**आलेल्या अडचणी -**

शाळेची गुणवत्ता चांगली असल्यामुळे एक ते पाच वर्गात शाळेची पटसंख्या दरवर्षी 125 च्या वर असते. दोन वर्ग खोल्या सुस्थितीत होत्या पण इतर वर्ग खोल्या असलेली इमारत मोडकळीस आली होती. ही इमारत कौलारुची असल्यामुळे माकड व इतर कारणाने कवेलू फुटल्या जायचे. त्यामुळे पावसाळ्यात पाणी गळण्याचा त्रास व्हायचा. इमारत खूप जुनी असल्यामुळे मोडकळीस आली होती. विद्यार्थ्यांना बसायला खूप मोठी अडचण होती. ही अडचण लक्षात घेता गावातील पदाधिकारी, ग्रामपंचायत, अधिकारी वर्ग व मुख्याध्यापिका यांनी आपल्या प्रयत्नांनी ब्रिज द गॅप फाउंडेशन व नागपूर लेडीज सर्कल कडून भव्य दिव्य इमारत मिळवण्यासाठी पाठपुरावा करण्यात आला. आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पूर्तता व त्यांच्या अटी मान्य करून इमारत बांधकाम भूमीपूजन सोहळा घेण्यात आला. यातही बऱ्याच अडचणी आल्या पण एकजुटीने सर्व समस्या सोडविण्यात आल्या.

इमारतीचे निर्लेखन केल्यामुळे शाळाच उपलब्ध नसल्यामुळे तात्पुरती सोय करण्याची समस्या उद्भवली. ग्रामपंचायतीने समाज मंदिरात तात्पुरती सोय करून दिली.वर्षभर अनेक अडचणींना शाळेला सामोरे जावे लागले. पाण्याची समस्या रंगरंगोटी इत्यादी अडचणी होत्याच. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवण्यासाठी स्पर्धेतील सर्व निकष पूर्ण करणे आवश्यक होते. यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न व नियोजनबद्ध कार्य करून यश मिळविले आहे.

**उपाययोजनासह अंमलबजावणी -**

ब्रिज द गॅप फाउंडेशन व नागपूर लेडीज सर्कल 50 कडून तीन वर्ग खोल्या, स्वयंपाक गृह व स्वच्छतागृहासह आधुनिक सोयीसुविधेयुक्त सुंदर अशा इमारतीचे बांधकाम करण्यात आले. इमारतीचे बांधकाम इको फ्रेंडली तत्त्वावर करण्यात आले आहे.

संस्थेकडून विद्यार्थ्यांना बसण्यासाठी दर्जेदार असे डेस्क बेंच मिळून घेण्यात आले.10 संगणक व दोन प्रोजेक्टर स्मार्ट टीव्ही मिळवून शाळेत ई लर्निंग सुरू करण्यात आले आहे. सहा संगणकाची आयसीटी लॅब सुरू करण्यात आली असून प्रत्येक वर्गात एक-एक संगणक उपलब्ध करून विद्यार्थ्यांना त्याद्वारे अध्ययन केले जाते. विद्यार्थ्यांना संगणक सुरू करणे, बंद करणे, संगणक व इतर साहित्याची ओळख करून देणे,संगणकावर चित्र काढणे, टायपिंग करणे, गुगल सर्च करून माहिती मिळविणे याविषयी मार्गदर्शन केले जाते. शाळेत अनेक उपक्रम राबवून शाळेची गुणवत्ता वाढवली जाते.

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या स्पर्धेतील खालील मुद्द्यांच्या आधारे अंमलबजावणी करण्यात आली.

1. सुंदर, सुसज्ज व शैक्षणिक साहित्यासह पाच वर्ग खोल्या उपलब्ध आहेत.
2. 'ग्रंथ हेच गुरु' यानुसार शाळेत ग्रंथालय, बाल वाचनालय, वाचन कोपरे व पुस्तक पेढी सुरू करण्यात आली आहे. विद्यार्थी दररोज किमान एक तास वाचनालयातील पुस्तकांचे वाचन करतात.
3. वैज्ञानिक दृष्टिकोन वृद्धिंगत होण्यासाठी शाळेत प्रयोगशाळा उपलब्ध करून दिली आहे.भाषा व गणित साहित्याची मांडणी करून भाषा प्रयोगशाळा व गणित प्रयोगशाळा तयार करण्यात आली असून याद्वारे विद्यार्थी स्वयंअध्ययन करतात.
4. स्वतंत्र मुख्याध्यापक कक्ष असून ग्रामपंचायतीकडून फोमच्या खुर्च्या मिळवून घेतल्या आहेत. कार्यालयात शाळेची माहिती, समित्यांचे फलक उपलब्ध आहेत. शालेय रेकॉर्ड अद्यावत असून व्यवस्थित मांडणी केली आहे.
5. दरवर्षी शाळेत नियमित आरोग्य तपासणी करण्यात येते. तसेच रक्तदान शिबिर किंवा आरोग्य शिबिरे आयोजित केली जातात.

6. स्वच्छतेकडे विशेष लक्ष दिले जात असून शाळेत एकूण सहा हॅन्डवॉश स्टेशन उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांना हात धुण्याची प्रात्यक्षिके करून दाखवली असून विद्यार्थी त्याप्रमाणे हात धुतात. हात धुण्यासाठी लिक्विड, साबण ठेवली जातात. विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक स्वच्छतेकडे विशेष लक्ष दिले जाते. दररोज स्वच्छ विद्यार्थी/विद्यार्थिनी निवडल्या जाते.
7. शाळेत दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र शौचालय व रॅम्प आहे. त्यांना लागू असलेल्या योजना व सोयी सुविधा मिळवून दिल्या जातात.
8. विद्यार्थी सुरक्षितता अंतर्गत माननीय धनंजय भक्त अग्निशमन अधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत अग्निशमन प्रात्यक्षिक कार्यशाळा घेऊन प्रत्यक्ष आग विझवण्याची प्रात्यक्षिके शिक्षक व विद्यार्थ्यांनी करून दाखविले. शाळेत अनुचित प्रकार घडू नये व विद्यार्थी सुरक्षा लक्षात घेऊन शाळेत एकूण आठ सीसीटीव्ही कॅमेरे लावले आहेत. शाळेचे सुरक्षा ऑडिट दरवर्षी केली जाते.
9. 'वृक्ष माझा मित्र' या उपक्रमांतर्गत प्रत्येक विद्यार्थी व शिक्षकांनी एक एक झाड लावले असून त्या झाडांची वृक्ष संवर्धन करून जोपासना केली जाते. इतर संस्थेच्या वृक्षारोपण कार्यात शाळेचा सक्रिय सहभाग असतो.
10. शाळेत विद्यार्थी शिक्षक व गावातील तरुणांचा इको क्लब तयार करण्यात आला आहे. पर्यावरणास पूरक असे उपक्रम घेतले जातात.
11. ओला कचरा, सुका कचरा वेगवेगळा गोळा केला जातो. गोळा केलेला कचरा गावातील कंपोस्ट खत प्रकल्पाला दिला जातो. कागदापासून वेगवेगळ्या वस्तू तयार केल्या जातात. प्लास्टिक निर्मूलन करिता इको ब्रिक्स उपक्रम राबवला जात असून पाण्याच्या रिकाम्या बॉटलमध्ये प्लास्टिकचा कचरा जमा केला जातो. सांडपाण्याचा वापर परसबागेकरीता केला जातो.
12. शाळेत सौर उर्जेवर आधारित विद्युत व्यवस्था असून त्याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनही केले जाते.
13. शाळेत खेळाचे मैदान उपलब्ध असून कबड्डी, खो-खो,लंगडी व वैयक्तिक स्पर्धेचा नियमित सराव घेतला जातो.
14. BaLA उपक्रमांतर्गत शाळेच्या, वर्गाच्या व संरक्षण भिंतीच्या रंगरंगोटी करून विद्यार्थ्यांना स्वयम्अध्ययन पद्धतीने ज्ञानार्जन होण्यासाठी भिंती बोलक्या केल्या आहेत.
15. वर्गात अध्ययन निष्पत्तीचे तक्ते दर्शनी भागात लावले असून त्यानुसार वेगवेगळे उपक्रम घेऊन अध्ययन अध्यापन केले जाते.
16. विद्यार्थी व शिक्षक मिळून वर्गाची व शाळेची सजावट नियमित करतात.
17. शाळेत उपलब्ध जागेवर शिक्षक व विद्यार्थ्यांनी मिळून परसबाग तयार केली आहे; त्यातील भाजीपाल्यांचा शालेय पोषण आहारात वापर केला जातो. परसबागेची देखरेख विद्यार्थी करतात.
18. विद्यार्थी लाभांच्या योजनांबाबत जनजागृती केली जाते व शाळेच्या दर्शनी भागात फ्लेक्स व माहिती पुस्तिका लावल्या आहेत. पालक सभा व इतर सभेत माहिती दिली जाते.
19. सरल प्रणाली, यु-डायस पोर्टल व इतर ऑनलाइन कामे निर्धारित वेळेत पूर्ण केली जाते व माहिती अद्ययावत आहे.
20. प्रत्येक विद्यार्थ्यांला ओळखपत्र तयार करून दिले आहे. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनाही ओळखपत्र दिले असून त्यांचे छायाचित्र दर्शनी भागावर प्रदर्शित केले आहे.
21. 'महावाचन चळवळ'या उपक्रमात मागील व यावर्षीही सक्रिय सहभाग आहे. विद्यार्थी नियमित पुस्तकांचे वाचन करतात.
22. सर्व शासकीय कार्यक्रमात शाळेचा शंभर टक्के सहभाग असतो. शासन निर्णयानुसार कार्यवाही केली जाते.
23. शाळेने तंबाखू मुक्तीचे सर्व निकष पूर्ण करून शाळा तंबाखू मुक्त शाळा म्हणून घोषित केली आहे. व्यसनमुक्तीसाठी प्रभात फेरी पथनाट्य सांस्कृतिक कार्यक्रमात प्रबोधन केले जाते.
24. कब बुलबुल रजिस्ट्रेशन करण्यात आले असून विविध खेळ व उपक्रम नियमित घेतली जातात.

25. शासनाच्या सूचनेनुसार शाळेत सर्वच प्रकारच्या समित्या स्थापन करण्यात आल्या असून वेळोवेळी सभा घेतल्या जातात पालक सभेत पालकांची उपस्थिती 50% च्या वर असते. विविध सोयी सुविधा व योजनेची माहिती व विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर चर्चा केली जाते.
26. तक्रार निवारण होण्यासाठी शाळेत तक्रारपेटी दर्शनी भागात ठेवली असून शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा सदस्यांच्या समक्ष तक्रारपेटी उघडली जाते. विद्यार्थ्यांना पोलीस ताई कडून गुड टच बॅड टच याविषयी मार्गदर्शन करण्यात आले आहे.
27. विद्यांजली पोर्टलवर नोंदणी व मागणी केलेली आहे.
28. समग्र प्रगती पुस्तक HPC ची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली आहे.
29. व्यवसाय कौशल्यावर आधारित राख्या तयार करणे, आकाश कंदील तयार करणे, विविध वस्तू तयार करणे यांसारखी उपक्रम राबवली जाते व प्रदर्शनी भरवली जाते.
30. शाळेची अभिलेखे सुस्थितीत, नीटनेटकी व अद्ययावत आहेत.
31. स्वच्छता मॉनिटर लेट्स चेंज अंतर्गत नोंदणी केली असून स्वच्छते प्रती जागरूकता करणे हा उपक्रम विद्यार्थी व शिक्षकांकडून राबविला जातो. अस्वच्छता पसरवणाऱ्यांना वेळीच रोखले जाते. त्यांना सन्मानपूर्वक विनंती केली जाते. विद्यार्थी आपले अनुभव परिपाठात कथन करतात. विद्यार्थ्यांचे अनुभव फेसबुक वर अपलोड केले जातात .

**गुणवत्ता वाढीसाठी नाविन्यपूर्ण उपक्रम -**

१) आदर्श इंग्रजी परीपाठ २)जो दिनांक तो पाढा ३)माझी आवड(कला,कार्यानुभव) ४)वृक्ष माझा मित्र ५)सांस्कृतिक कार्यक्रम ६)गीतगायन स्पर्धा ७)भाषण स्पर्धा ८)क्रीडा स्पर्धा ९)वाढदिवस साजरे करणे १०)भित्तिपत्रक तयार करणे ११)निसर्गसहल १२)स्वच्छता सप्ताह साजरा करणे १३)विद्यार्थी दत्तक घेणे १४)विविध जयंत्या व पुण्यतिथी १५ शिवबा बाल बचत बँक १६)माझे सुंदर हस्ताक्षर १७)हजेरी घेताना इंग्रजी शब्द १८)वाचन कट्टा १९) शाळेतील बाजार २०)माझी परसबाग २१)विजयी उपस्थिती वर्ग २२)इंग्रजी संभाषण २३)शब्द बँक २४)स्वच्छ मुलगा-मुलगी २५)दत्तक कुंडी प्रकल्प २६)तंबाखू मुक्त शाळा २७)फिरता बगीचा २८)वर्तमानपत्र वाचन २९)विविध क्रीडा स्पर्धा ३०)चित्रकला स्पर्धा ३१)निबंध लेखन ३२)वक्तृत्व स्पर्धा आयोजन ३३)नवरत्न स्पर्धा ३४)दप्तराविना शाळा(शनिवार) ३५)झुलती बाग ३६)सांगा तुम्ही लिहितो आम्ही ३७)करू या आम्ही संचालने ३८)प्रश्न आमचे ,उत्तर आमचे ३९) ईकोब्रिक्स(प्लॅस्टिक संकलन) ४०)शिक्षकाचे व विद्यार्थ्यांचे सत्कार ४१)कला, कार्यानुभव प्रदर्शन ४२)बाल आनंद मेळावे ४३)विविध विषयावर तज्ञांचे मार्गदर्शन ४४)प्रवेशोत्सव ४५)100% पटनोंदणी ४६)लघु उद्योगाला भेटी ४७)हरित शाळा ४८)पक्ष्यांना खाऊ ४९)ज्ञानरचनावादी साहित्य ५०)डिजीटल शाळा ५१)स्वच्छता ही सेवा ५२)इंग्रजीचा सोमवार ५३)वजाबाकीचा मंगळवार ५४) बेरजेचा बुधवार ५५) गुणाकाराचा गुरुवार ५६) भागाकाराचा शुक्रवार अशाप्रकारे अनेक उपक्रम राबवून गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न केले जातात.

**फलनिष्पत्ती -**

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत तालुकास्तरावर प्रथम क्रमांक मिळवला असून शाळा खरोखरच स्वच्छ सुंदर व गुणवत्ता पूर्ण शाळा म्हणून उदयास आली आहे. शालेय वातावरण आनंददायी व शैक्षणिक दर्जा वाढीसाठी अनुकूल आहे. त्यामुळे शाळेच्या पटसंख्येत वाढ होत आहे. एक आदर्श शाळा म्हणून आमच्या शाळेची ओळख झाली आहे.

**समारोप -**

आमची शाळा स्वच्छ सुंदर व गुणवत्तापूर्ण शाळा करण्यात ब्रिज द गॅप फाउंडेशन नागपूर लेडीज सर्कल व इतर संस्थेने आंतरराष्ट्रीय दर्जाची शाळा तयार करून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके कमीच आहे.

तसेच गावातील सन्माननीय पदाधिकारी वर्ग, ग्रामपंचायत, शाळा व्यवस्थापन समिती, पालक वर्ग व सन्माननीय गटविकास अधिकारी गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख व केंद्रातील सर्व शिक्षक यांच्या प्रेरणेने व सहकार्यानेच हे शक्य झाले आहे, त्याकरिता सर्वांचेच मनःपूर्वक आभार. यशोगाथा आपणा समोर सादर करण्यात अत्यंत आनंद होत आहे.

**शाळा पाहण्यासाठी लिंक** https://youtu.be/dRIb820mKZU?si=fkV4mHWz-xD4j4oW

**काही क्षणचित्रे**




# सहशालेय उपक्रम

वृक्षारोपण, विविध स्पर्धा, स्काऊट गाईड, मेरी माटी मेरा देश, आर्थिक साक्षरता, शालेय परिसरातील घटकांची माहिती देणे.
शालेय निवडणूक, महावाचन उत्सव , सामूहिक वाचन, नवसाक्षरता अभियान प्रचार व प्रसार, अग्निशमन प्रात्यक्षिक, इको ब्रिक्स उपक्रम, इंग्रजीत भाषणे,
संगणक शिक्षण ,आनंददायी शनिवार (दप्तरमुक्त शाळा), अध्ययन साहित्य निर्मिती, चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, मा.मुख्यमंत्री यांचे संदेश पत्र वाचन व सेल्फी,
लेझीम पथक, तंबाखू मुक्त शाळा, सांस्कृतिक कार्यक्रम, शैक्षणिक सहल,शालेय पोषण आहार ,पूरक आहार व स्नेहभोजन, इंग्रजी परिपाठ...



# शाळेला ग्रेट भेट...



मा. सौ.उज्वलाताई बोढारे
(माजी सभापती महिला व बालकल्याण तथा सदस्या जि. प.नागपुर) यांची भेट



मा. सौ.अनुसयाताई सोनवाने सदस्या, पंचायत समिती हिंगणा यांची शाळेला भेट



मा.श्री संदीपजी गोडशेलवार गटविकास अधिकारी पं.स.हिंगणा,
मा.सौ.जोत्सना हरडे गटशिक्षणाधिकारी
मा. श्री राजकुमार पचारे शिक्षण विस्तार अधिकारी यांची शाळेला भेट



मा. श्री बोडे साहेब विस्तार अधिकारी
आरोग्य विभाग हिंगणा यांची भेट



मा. सरपंच, माजी उपसरपंच, सदस्या ग्रामपंचायत सावंगी,
अध्यक्षा शाळा व्यवस्थापन समिती यांची शाळेला भेट



मा.हर्षलता बोराडे प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था नागपुर , मा. मोडक मॅडम
मा. जोत्सना हरडे गटशिक्षणाधिकारी हिंगणा, यांची भेट





मा. श्रद्धा मॅडम व
मा. शिवराज सर व्यवस्थापक यांची भेट



मा. विजय धनालकोटवाल विस्तार अधिकारी तथा
केंद्रप्रमुख यांची भेट



नागपूर लेडीज सर्कल संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची भेट



माननीय श्री धनंजय भक्त अग्निशमन अधिकारी यांची भेट



मा. श्रद्धा मॅडम व मा. मेघा मॅडम यांची भेट

# ब्रिज द गॅप फाउंडेशन, नागपूर लेडीज सर्कल व विविध संस्थेकडून शाळेला मिळालेली मदत...




UDISE - 27091001501

## Z.P. PRIMARY SEMI ENGLISH SCHOOL

SAWANGI (DEOLI)

CLUSTER - DEOLI (AMGAON)

P.S. HINGNA , Z.P. NAGPUR

SAMAGRA SHIKSHA SCHEME

SAMAGRA SHIKSHA ABHIYAN

QUALITY EDUCATION FOR ALL

----------**----------

# "परिश्रमातून विद्यार्थी विकासाचा ध्यास"

**शाळेचे नाव व पत्ता - मीरा भाईंदर महानगरपालिका घोडबंदर शाळा क्रमांक 9, मुंबई.**

**शाळेचा ईमेल आयडी** - bolaikarsmita@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्रीमती स्मिता राजाराम बोलाईकर
**मोबाईल क्रमांक** - 8850697499
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - bolaikarsmita@gmail.com

मी स्मिता राजाराम बोलाईकर मीरा भाईंदर महानगरपालिका घोडबंदर शाळा क्रमांक 9 येथे प्रमुख शिक्षिका या पदावर कार्यरत आहे.

कोविड -१९ सारख्या भयंकर विषाणूच्या काळात सर्व जग थांबले होते पण शिक्षक मात्र सदैव हसतमुखाने एखाद्या योद्ध्याप्रमाणे ऑनलाइन ऑफलाइन कार्यरत होते. करोनावर विजय मिळवून जून 2022 मध्ये शाळा सुरू झाल्या खूप स्थित्यंतर झाले होते. सर्वजण एकमेकांच्या साथीने पुढील भविष्यातील पिढी घडवण्यासाठी ज्ञानदान करत होते अनेक समस्या भेडसावत होत्या पण कोणत्याही समस्येचा बाऊ न करता शिक्षक मात्र कायमच कार्यरत होते.

सर्व काही ठीक चाललेले आहे असे वाटत असतानाच ऑगस्ट 2022 मध्ये अनपेक्षित पणे आमची बदली मीरा भाईंदर महानगरपालिका क्रमांक चार मधून मीरा भाईंदर महानगरपालिका घोडबंदर क्रमांक नऊ येथे झाली. आम्ही सर्वजणी नाराज होतो. कारणरस्त्यावरची शाळा मोठा ग्रुप मोठी शाळा सोडून जाताना मनाला असंख्य वेदना होत होत्या. तरीही शासकीय आदेशानुसार आम्ही सर्वजणी आपापल्या शालेय कामी हजर झालो.

शाळेची वास्तु स्वच्छ सुंदर, निसर्ग सौंदर्याने नटलेला परिसर, मुले ही सदगुणी आणि हुशार, शिक्षक व शिक्षकेतर स्टाफ अतिशय हुशार, समंजस, कष्टाळू, प्रामाणिक असल्यामुळे थोड्याच कालावधीत शाळेने आम्हाला व आम्ही शाळेला आपलेसे केले सर्व जण जीव तोडून काम करू लागले.संक्रमण परिवर्तन व प्रोवर्तन

या त्रीसूत्रीचा ध्यास घेऊन ज्ञान यज्ञ अखंड धगधगता ठेवला होता. त्यावेळी सौ पारले मॅडम प्रमुख शिक्षिका पदावर कार्यरत होत्या त्यांच्या मार्गदर्शनानुसार आम्ही शाळेचे रंगरंगोटी करून घेतले आणि शाळेचे रुपडेच पालटले. हेमा फाउंडेशन स्वच्छ सुंदर अभियानांतर्गत आमच्या शाळेला तृतीय पारितोषिक प्राप्त झाले.

अशाप्रकारे विजयाची घोडदौड चालू असताना मैदानी स्पर्धेमध्ये तब्बल 15 ट्रॉफी मिळवल्या. विविध स्पर्धा उपक्रम चालूच होते. समारंभ साजरे होत होते. विद्यार्थी उत्साहाने शाळेत येऊ लागले शाळेची उपस्थिती वाढली. पटसंख्या वाढली. विविध स्पर्धा परीक्षांना विद्यार्थी बसू लागले बीटीएस मध्ये तर मुलांनी अनेक बक्षीसे पटकावले. इयत्ता पहिलीची विद्यार्थिनी राज्यस्तरावर सातवी आली. अनेक विद्यार्थ्यांनी स्कॉलरशिप परीक्षेमध्ये सहभाग नोंदवला. एन एम एम एस परीक्षेमध्ये एका विद्यार्थी पास झाला. विद्यार्थी शाळेचे सुशोभनकरू लागले. स्वतःची परसबाग तयार केली. ओला कचरा झाडांना घालून सेंद्रिय खत तयार केले. गेल्या आठवड्यामध्ये शाळेचा एक विद्यार्थी नायब तहसीलदार झाला.

स्नेहसंमेलनात नटून थटून आलेल्या मुलांना पाहून वास्तू सुद्धा कृत कृत्य झाली. विद्यार्थ्यांना इतिहासाची ओळख व्हावी. छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यवस्थापनाची कल्पना यावी म्हणून ऐतिहासिक सहलींचे नियोजन

करण्यात आले. रायगड किल्ला पाहताना विद्यार्थ्यांच्या मनात विचारांची खळबळ चालू होती पण दमदार आवाजाचा गाईड मिळाल्यामुळे त्याने सर्वांच्या शंकांचे निरसन केले. इयत्ता पहिली ते पाचवीच्या मुलांची सहल घोडबंदर किल्ल्यावर नेऊन त्यांनाही किल्ल्याची संपूर्ण माहिती देण्यात आली. त्यामुळे मुलांच्या मनात इतिहासाविषयी आदर निर्माण झाला त्यांना महाराजांच्या कार्याची प्रत्यक्ष ओळख झाली तेथील तेथील भौगोलिक परिस्थिती पाहून भूगोलाची ही ओळख झाली.विद्यार्थी शिवाजी महाराजांबद्दल भरभरून बोलू लागले तसेच निबंध लिहू लागले.

शाळेत सुरुवातीला एकच प्रोजेक्टर होता पण आत्ता प्रत्येक वर्गामध्ये एक स्मार्ट टीव्ही आहे. त्या टीव्हीच्या मदतीने सर्व शिक्षक टेक्नो सेव्ही झालेले आहेत. सोप्याकडून कठीणा कडे, अज्ञातांकडून ज्ञाताकडे अशा पद्धतींचा वापर करून शिक्षक प्रत्येक घटक सोपा करून शिकवत आहेत. सुरुवातीला शाळा पहिली ते आठवीपर्यंत भरत होती. नंतर नववी व दहावी सुरू करण्यात आली. त्यामुळे लोकांचा शाळेकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला. गावकरी सुद्धा शालेय उपक्रमांमध्ये सहभागी होऊ लागले. शाळेचे माजी विद्यार्थी सुद्धा शाळेत मदतीसाठी येऊ लागले.

सर्वांचा ध्यास शालेय विकास हे सर्वांचे ब्रीदवाक्य झाले. इयत्ता सातवी किंवा आठवीतून मुले मुली शाळा सोडत होते. मुली लग्न होऊन सासरी जात होत्या तर मुले मोलमजुरी करायला त्यांच्या आई-बाबांसोबत जात होती. गावात शाळा झाल्यामुळे सर्व मुले आता शाळेत शिकू लागली. शाळेत इयत्ता दहावीचा वर्ग उघडणे हे आम्हा सर्व शिक्षकांचे ड्रीम प्रोजेक्ट होते त्यासाठी आम्ही अहोरात्र मेहनत करून दहावीच्या वर्गासाठी परमिशन मिळवली 29 /11 ला आम्ही एसएससी बोर्डासाठी 37 मुलांचे फॉर्म भरले. विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त अभ्यास करता यावा म्हणून शाळेत अभ्यासिका चालू केली तसेच त्यांना ज्या काही समस्या अडचणी येत होत्या त्या सर्व शिक्षक मिळून सोडवत होते गावातील दोन महिला त्यांना ध्यान धरणा शिकवायला व योग शिकवायला येत असतात. अंतरंग संस्थेतून करियर गायडन्स करायला एनजीओ येतात तसेच केशव सृष्टी मधून विज्ञान प्रयोगाचे मार्गदर्शन करायला शिक्षक येतात. मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त मॅडम तसेच अनेक मान्यवर मंडळी यांच्या प्रयत्नाने सहकार्याने मार्गदर्शनाने घोडबंदर शाळेच्या प्रगतीचा वारू घोडदौड करीत आहे.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी अनेक समित्यांची स्थापना केलेली आहे. त्यातही लोकसहभाग घेण्यात आला आहे विद्यार्थिनींना स्वतःच्या संरक्षणासाठी कराटेचे प्रशिक्षण दिले जाते. सर्व विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण दिले जाते. वेळोवेळी आरोग्य तपासणी केली जाते व त्यांच्या काही समस्या असतील तर शिक्षक जातीने लक्ष देतात. गुड टच बॅड टच बद्दल देखील विद्यार्थ्यांना सतत सतर्क केली जाते. शिस्तीबद्दल पोलीस अॅकॅडमीचे देखील शाळेला बक्षीस मिळाले आहे व 15 ऑगस्ट 2024 ला शाळेचा सत्कार करण्यात आला. 2024 मध्ये हेमा फाउंडेशनचे स्वच्छ सुंदर मिरा भाईंदर स्पर्धेत सलग दुसऱ्या वर्षी तृतीय पारितोषिक प्राप्त झाले आहे. स्टार रँकिंग अवॉर्ड मध्ये ही शाळेला तिसऱ्या क्रमांकाचे बक्षीस प्राप्त झाले आहे. इन्स्पायर अवॉर्ड मध्येही विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला आहे.

अशाप्रकारे माझी शाळा मीरा-भाईंदर महानगरपालिका घोडबंदर क्रमांक नऊ ची दोन वर्षातील यशोगाथा सादर केलेली आहे.

विद्यार्थ्यांच्या शिक्षकांच्या पालकांच्या अडचणी सोडवत समस्यांचे निराकरण करत शाळेच्या विजयाची पताका फडकत आहे. कोणाची कोणाबद्दल काही तक्रार असेल तरीसुद्धा त्याला निर्भयपणे ते नोंदवता यावी म्हणून एक तक्रार पेटी सुद्धा ठेवलेली आहे. त्यामुळे विद्यार्थी पालक आपल्या तक्रारी निर्भयपणे आमच्यासमोर मांडत आहेत. अशाप्रकारे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शाळेच्या वास्तू बरोबरच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व मीरा-भाईंदर महानगरपालिकेचे अधिकारी झटत आहेत.

# मिरा भाईंदर घोडबंदर शाळा क्रं 09










## शालेय स्वच्छता






मिरा भाईंदर घोडबंदर शाळा 09
आपला
घोडबंदर गाव
प्रभातफेरी स्वच्छता जनजागृती




मिरा-भाईंदर महानगरपालिका
शाळा क्र.०१ घोडबंदर, जि.ठाणे
विद्यार्थ्यांमध्ये निकडपूरक साक्षरता
वाढविणे
उपक्रम अहवाल
इं मुख्याध्यापक
मिरा भाईंदर म.न.पा. शिक्षण मंडळ
उच्च प्राथ. शाळा क्र. १, घोडबंदर
पो. मिरे ता. जि. ठाणे








ज्ञानसंग्रह करण्याचे प्रबळ साधन म्हणजे वाचन होय.
राष्ट्रगीत






नकारात्मक उर्जा
सकारात्मक उर्जा








**शालेय नेतृत्वाच्या यशोगाथा.....शिक्षक म्हणून मला आलेला अनुभव**

शिक्षक म्हणून मला आमच्या मीरा भाईंदर महानगरपालिका घोडबंदर शाळा क्रमांक 09 येथे आयोजित केलेल्या रायगड शैक्षणिक सहलीबाबत आलेला अनुभव आपल्या समोर मांडण्याचा हा प्रयत्न.

दिवाळीच्या सुट्टीनंतर सहल कुठे न्यायची याबाबत चर्चा करताना आमच्या शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका प्रियंका मॅडम यांनी मोठ्या मुलांसाठी रायगड हे ठिकाण सुचवले. रायगड किल्ला चढून जाणे तसे कठीणच प्रवासही लांबचा होता.आरोग्याच्या कुरबुरी ,वाढतं वय, सेवापुर्तीकडे चाललेली पावले हे सगळेच अडथळे शिक्षकांच्या समोर होते.परंतु सर्वांचच एकमत झालं की रायगडला गेल्यावर मुलांना काही चांगले अनुभव आपल्याला देता येतील.सर्वांनीच आपलं बळ एकवटून रायगड सहलीच्या तयारीला सुरुवात केली.

सहलीसाठी ठाणे बस डेपो कडे चौकशी सुरू केली. बस डेपोतील मुख्य व्यवस्थापक यांनी रायगड सहलीसाठी बस देण्याची तयारी दर्शवली. रायगड सहल एका दिवसात करणे तसे कठीणच होते. सर्व शिक्षकांनी

ठरवले की विद्यार्थ्यांना रोप वे ने रायगड किल्ल्यावर घेऊन जाऊ. प्रवास खर्च, रोपवेची तिकीट, इत्यादी गोष्टींचा विचार करून रायगड सहलीसाठी एक हजार रुपये सहलीची फी निश्चित करण्यात आली. महानगरपालिकेतील विद्यार्थ्यांची गरीब परिस्थिती पाहता ही फी थोडी जास्तच होती.

विद्यार्थ्यांना सहलीचे ठिकाण सांगण्यात आलं. सहलीची फी सांगण्यात आली. पंधरा दिवस होऊनही विद्यार्थ्यांकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. आम्ही हळूहळू विद्यार्थ्यांसोबत चर्चा करायला सुरुवात केली. सहलीला न येण्याचं कारण जाणून घेण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थ्यांनी आपलं मत आमच्यासमोर मन मोकळेपणाने मांडायला सुरुवात केली. त्यांच्या मते रायगडच्या सहलीसाठी आपण जे पैसे घेणार आहोत त्याच पैशात आपण एखाद्या रिसॉर्टला सहज सहल काढू शकतो. आजच्या या प्रॅक्टिकल पिढीचे हे विचार त्यांच्या दृष्टीने योग्यच होते. रिसॉर्टला भरपूर खाण आणि भरपूर मौज मस्ती त्यांना करायला मिळणार होती. घोडबंदर ची मुलं तर रोजच घोडबंदर किल्ला बघतात. त्यांना रायगड किल्ला पाहण्यात स्वारस्य नव्हते.

आमच्या समोर आव्हान उभे राहिले.रिसॉर्ट ते रायगड हे अंतर कसं पार करायचं.? स्वच्छंदी जीवनशैली ते शिव विचार मुलांना कसं वळवायचं?त्यानंतर आम्ही मुलांना रायगड किल्ल्याची माहिती गोळा करायला सांगितली. रायगड किल्ल्याचा इतिहास शोधायला सांगितला.रायगड किल्ला बांधताना वापरले गेलेले शास्त्रीय तंत्र याबाबत माहिती शोधण्यास सांगितले. मुलांसमोर एक एक आव्हान उभ करण्यात आले. रायगडाशी संबंधित गोष्टी मुलांना शिक्षकांनी सांगायला सुरुवात केली.

पाहता पाहता मुलांची मानसिकता बदलत गेली. जे विद्यार्थी पैशाच्या अडचणीमुळे सहलीस येत नव्हते त्यांच्या पालकांशी चर्चा करायला सुरुवात केली. विद्यार्थ्यांच्या पैशांची अडचण सोडवण्यासाठी शिक्षकांनी वैयक्तिक पातळीवर प्रयत्न केले.पुढील पंधरा दिवसात एवढे विद्यार्थी सहलीला तयार झाले की आम्हाला सहलीसाठी दोन बस आरक्षित कराव्या लागल्या.

शुक्रवार 2 फेब्रुवारी 2024 सहलीची तारीख ठरली. प्रवास लांबचा असल्याने सहलीच्या दिवशी सकाळी साडेपाच वाजता सर्व शिक्षक व विद्यार्थी शाळेच्या प्रांगणात उपस्थित झाले. ठाणा डेपोतून बस येण्यास सहा वाजले. बस सव्वा सहाला घोडबंदर वरून रायगडला जाण्यासाठी निघाल्या. रायगडला पोचताना रायगड पासून 15 किलोमीटर अंतरावर आमची एक बस पंक्चर झाली. आजूबाजूला कुठेही लोकवस्ती नव्हती. आमच्या समोर रायगड दिसत असताना तिथे पोहोचायचं कसं हा प्रश्न निर्माण झाला. बस ड्रायव्हर ने फोन करून जवळच्याच बस डेपोतून गाडीचा टायर बदलण्यासाठी मेकॅनिक बोलावला. वेळ निघून चालला होता. उन्हाचे चटके जाणवू लागले होते. शेवटी सर्व विद्यार्थ्यांना एकाच बसमध्ये चढवून पुढे जाण्याचा निर्णय घेतला. पंक्चर झालेली बस दुरुस्त होऊन मागावून रायगडला पोचणार होती.

रायगडला पोहोचेपर्यंत आम्हाला दुपारचे एक वाजले होते. मुलांचे थकलेले चेहरे पाहून मनात धस्स झाल. लगेचच रोप-वे ने आम्ही मुलांना रायगडाच्या माथ्याशी आणले. जेवण करून लगेचच रायगडाची माहिती घेण्यास सुरुवात केली. पुढील धुरा तेथील गाईडच्या हाती दिली. आम्हाला लाभलेल्या गाईडने मुलांच्या समोर त्याच्या बुलंद आवाजात रायगडाचे वैभवशाली चित्र उभे केले. रायगडाचा इतिहास, रायगड बांधताना वापरण्यात आलेली शास्त्रीय पद्धत, पाण्याची योजना, सात मजली बुरुजावर बांधण्यात आलेली पाण्याची टाकी आणि निर्माण केलेले कारंजे, गंगासागर तलाव, खलबतखाना, किल्ल्यावरील राणी कक्ष, महाराजांचा कक्ष, रायगडावरील टाकसाळ, अष्टप्रधान मंडळांतील अधिकाऱ्यांसाठी बांधलेल्या वाडे, रायगडावरील बाजारपेठ, टकमक टोक, जगदीश्वराचे मंदिर, हिरकणी

बुरुज, राज्याभिषेक सोहळ्यासाठी बांधलेले सभागृह जिथून शिवरायांनी सहा हजार लोकांना संबोधित केले. तिथे वापरण्यात आलेली इको साउंड सिस्टीम, हे सारं ऐकून मुलं अचंबित होत होती.

रायगडावर महाराजांनी अवाढव्य हत्ती कसे नेले असतील हा प्रश्न सर्वांनाच विचारात टाकणारा होता. महाराजांनी हत्तीची दोन पिल्लं पालखीतून रायगडावर नेऊन त्यांचं पालन पोषण करून वाढवली होती. त्यांची दूरदृष्टी मुलांना आश्चर्यचकित करून गेली. मॅनेजमेंट गुरु म्हणून साऱ्या विश्वाने ज्या शिवरायांचे विचार अभ्यासायला सुरुवात केली; त्यांचे विचार आमच्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यात काही अंशी यशस्वी झालो होतो. शेवटी शिवरायांच्या समाधीवर सर्वांनी माथा टेकऊन रायगडाचा निरोप घेतला. परतीच्या प्रवासात एक समाधान मात्र आम्हा शिक्षकांच्या पदरी पडलं होत की आज आम्ही मुलांना अविस्मरणीय क्षण देऊ शकलो.

----------**----------

# "लोकसहभागातून विद्यार्थी प्रगती"

**शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा,दुधा,केंद्र किर्ला,ता.मंठा,जि.जालना**

**शाळेचा ईमेल आयडी** - kanganev@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.विजय बाबाराव कांगणे
**मोबाईल क्रमांक** - 7798069698
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - kanganev@gmail.com

**प्रास्ताविक** -

शाळेच्या ज्ञान मंदिरात विद्येचा सुगंध लोकसहभागातून व पालक सहभागातून, विद्यार्थी विकास घडवून आणण्यात तसेच नियमित उपस्थिती व पटनोंदणी तसेच आनंददायी शिक्षणामुळे खरोखर शाळेचे रूपच बदलून गेले. गावातून या अगोदर बरीच मुले तळणी येथे इंग्रजी शाळेत जात होती. परंतु, ती आता शून्य झाली आहे. त्याचे कारण म्हणजे शाळा स्वच्छ व सुंदर झाली. परंतु, गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे, पालकांचा सहभाग, गावातील लोकांचा सहभाग वाढला व 2018 मध्ये केवळ 26 पटसंख्या असलेली शाळा ही आज रोजी 77 पटापर्यंत गेली आहे. यामध्ये इतर खेड्यांची मुले आमच्या शाळेत दाखल होत आहे. यामुळे दिवसेंदिवस आमच्या गावातील पहिलीला प्रवेश पात्र संख्या कमी असूनही विद्यार्थी पटसंख्येचा आलेख चढत्या क्रमाने वाढत आहे. याचे गमक म्हणजे विद्यार्थी विकासात पालकांचा असलेला मोठा सहभाग.






**अडचणी-**

कोणतेही कार्य पार पाडत असताना प्रथम वेळी त्या कार्याला अनेक प्रकारच्या अडचणीत सतत येत असतात. याप्रमाणे मी 2018 साली वझर सरकटे येथून ऑनलाइन बदली ने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, दुधा येथे प्रथम वेळी हजर झालो. त्यावेळी फक्त एक सहकारी कार्यरत होता व मी पदवीधर असल्यामुळे माझ्याकडे मुख्याध्यापक पदाचा कार्यभार आला. यावेळी मी माझ्यातील शिक्षकी पेशा जिवंत ठेवून मोठ्या उत्साहाने मुख्याध्यापक पदाची जबाबदारी स्वीकारून खरोखर शाळेमध्ये सर्वच बाबतीत शिस्त, चिकाटी, धैर्य, गुणवत्ता, आनंदी शिक्षण इत्यादी अनेक गुणांचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला व तो यशस्वी झाला.

पटसंख्या व उपस्थिती साठी मी ज्यावेळी 2018 साली योगायोगाने ऑनलाइन सहावी ते आठवी मध्ये तीन मुले असल्यामुळे, मला या शाळेवर यायला संधी मिळाली परंतु यावेळी 6 वी ते 8 वी या वर्गात एकही विद्यार्थी पटावर नव्हता. अशा वेळी मला विद्यार्थी पट नोंदणी व उपस्थिती टिकवण्यासाठी पालकांची जागृती करणे आवश्यक होते. त्यामुळे त्यांना आश्वासन देण्यासाठी मी बरीच कसरत केली यावेळी वर्ग एक ते आठ मध्ये केवळ पटावर 26 मुले दाखल होती. बरीच आश्वासने दिल्यानंतर पालकांनी विश्वास दाखवला. त्यामुळे 2018 साठी सहावी वर्गात चार विद्यार्थ्यांची पट नोंदणी केली व वरच्या वर्गांना नव संजीवनी देण्याचे काम केले. परंतु, विद्यार्थी पटसंख्या कमी असल्यामुळे वर्ग एक ते आठ संख्येला फक्त आम्ही केवळ दोघे शिक्षक होतो. त्यामुळे आम्हाला जास्तीचे काम करावे लागणार होते. याचा चंगच आम्ही बांधला. पालकांना विद्यार्थी गुणवत्ता सुधारण्यासाठी, विद्यार्थ्यांना नियमित उपस्थित राहण्यासाठी मदत करावी. त्यांच्यातील असलेल्या उणिवा दूर करण्यासाठी पालकांना विश्वासात घेऊन जागृती केली. यानंतर विद्यार्थी उपस्थिती टिकवण्यासाठी विद्यार्थ्यांना आनंददायी शिक्षण देणे गरजेचे होते. कारण, विद्यार्थ्यांना शाळेविषयी आपुलकी, शिक्षकाविषयी जिव्हाळा व शिक्षणाची गोडी लावणे गरजेचे होते. त्यामुळे आनंददायी शिक्षण महत्वाचे होते. यात प्रथम बऱ्याच अडचणी आल्या, परंतु विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या साहित्याची मांडणी करून, त्यांना साहित्याद्वारे प्रत्यक्ष शिक्षण देण्यासाठी साहित्य मांडणी, रूमची निर्मिती करावी लागली. शाळेसाठी भौतिक सुविधा मिळवण्यासाठी, तसेच शाळेतील आवश्यक साहित्य मिळवण्यासाठी लोक आर्थिक सहभाग द्यायला

तयार नव्हते, कारण लोकांची शाळेविषयी आस्था राहिली नव्हती. त्यामुळे अनेक अडचणी आल्या. परंतु, येणाऱ्या संकटांना सामोरे जात त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला. यातूनच शाळेत पुढे निसर्गरम्य वातावरणासाठी रोपवाटिका उपक्रमाद्वारे, रोपे लागवड ते निगा यासाठी अनेक वेळा शालेय वेळेव्यतिरिक्त जास्त वेळ थांबून पालक व लोकांच्या मदतीने शालेय भौतिक वातावरण सुधारण्याचे काम करण्यात आले.



**आलेल्या अडचणीवर मात-**



कोणतीही गोष्ट मनावर घेतल्यानंतर ती पूर्ण करण्यासाठी वेगळी ऊर्जा माणसाकडे येत असते. अशाच प्रमाणे मी व माझा सहकारी आम्ही प्रथम जून महिन्यामध्ये शाळेला सुरुवात झाल्यानंतर, मुख्याध्यापक या नात्याने प्रत्यक्ष घरी जाऊन शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांच्या भेटी घेतल्या. त्यावेळी त्यांनी सांगितलेले अनुभव व त्यांची शाळेविषयी असणारे अनास्था ही मनामध्ये कुठेतरी सतत बोचत होती. यामुळे पालकांना विश्वासात घेण्यासाठी त्यांना पटवून सांगण्यात आले की, एका महिन्यानंतर आपल्या मुलांमध्ये जर बदल झाला नाही तर, अवांतर शाळेविषयीचा निर्णय तुमचा असेल. असे ठोसपणे आश्वासन दिले व खरोखर एका महिन्यानंतर विद्यार्थी बोलके झाले, त्यांचे राहणीमान, टापटीप इत्यादी अशा अनेक गोष्टींमध्ये बदल झालेला पालकांच्याही लक्षात आला. यामुळे पालकांचा विश्वास आमच्यावर बसला व विद्यार्थी उपस्थिती शाळेत वाढली यासाठी आनंददायी शिक्षण देण्याचा प्रयत्न करण्यात आला. यामुळे विद्यार्थी नियमित उपस्थिती टिकवण्यात मदत झाली व आजही आमच्याकडे हंगामी स्थलांतर होणारे विद्यार्थी शून्य आहेत. एखाद्याकडे पर्यायी व्यवस्था म्हणून विद्यार्थ्यांना त्यांच्या आजी-आजोबा कडे सांभाळायला ठेवतात. विद्यार्थी गुणवत्तेसाठी व शाळेतील उपस्थितीसाठी आजही आमच्या शाळेत निसर्ग वाचन, गटकार्य, परसबाग, क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक स्पर्धा इत्यादी उपक्रम राबवले जातात. यामुळे विद्यार्थी शाळेत रममाण होऊन, स्वयं अध्ययन करतात. त्यामुळे हळूहळू गुणवत्ता विकासाकडे जाताना पाचवी स्कॉलरशिप परीक्षेत दोन विद्यार्थ्यांना पहिल्याच वर्षी यश संपादन झाले व ते शिष्यवृत्ती धारक झाले. आजही ही यशाची परंपरा दरवर्षी कायम टिकून आहे. यामुळे पालकांचा आम्ही विश्वास संपादन केला. त्यामुळे लगेच पुढील वर्षी आमची विद्यार्थी संख्या जवळपास 26 पासून 57 पर्यंत पोहोचली व पहिली ते पाचवीसाठी शिक्षकांचे अतिरिक्त एक पद निर्माण झाले. यानंतर आमच्या शाळेसाठी लोकसहभाग वाढला. शाळेविषयी लोकांना आस्था वाटू लागली. दरवर्षी राष्ट्रीय उत्सवातील कार्यक्रमात विद्यार्थ्यांना बक्षिसे मिळू लागली. लोक सहभागातून आजपर्यंत दोन एलईडी टीव्ही, सोलर पॅनल, सोलर इन्वर्टर, सोलर बॅटरी इत्यादी वस्तू मिळाले आहे. तसेच बहुतेक सुविधेसाठी बरेच पालक सहकार्य करतात यामध्ये वृक्ष लागवड, शाळेची देखरेख, विद्यार्थी गुणवत्ता, वेगवेगळ्या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग इत्यादी साठी पालकांनी मोलाचे सहकार्य करून विद्यार्थ्यांना स्पर्धेत टिकवण्यासाठी त्यांचा अभ्यास घेवून स्पर्धेत यश संपादन करेपर्यंत सहकार्य केले. तसेच यामुळे पालक शिक्षक संपर्क वाढवून गुणवत्ता पूर्ण शिक्षण मिळाले. यानंतर कोरोना सारखी महामारी आल्यानंतर शाळा शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील समन्वय पाठ्यपुस्तकातील अभ्यासक्रम ऑनलाइन तासिका घेऊन शिकवण्यात आला. यामुळे गावातील अनेक पालकांच्या लक्षात आले , आमची तळमळ त्यांना कळाली त्यामुळे जवळपास आमची संख्या 57 पासून त्र्याहत्तर पर्यंत व नंतर सत्याहत्तर पर्यंत गेली. वर्ग एक ते आठ व विद्यार्थी संख्या 77 व दोन शिक्षक कार्यरत, अशी परिस्थिती असतानाही, आमची शाळा तालुकास्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेत लहान गटात तालुक्यातून प्रथम आली. तसेच इस्रो सहलीसाठी इन कॅमेरा घेण्यात आलेल्या परीक्षेत मंठा तालुक्यातून तीन विद्यार्थी निवडीमध्ये, आमच्या शाळेतील एका विद्यार्थ्याची निवड झाली होती. गुणवत्तेकडे लक्ष देताना विस्तृत शालेय परिसर यांची स्वच्छता नियमित असते. परिसरामध्ये मी व माझे सहकारी आणि विद्यार्थी यांच्या मदतीने रोपवाटिका उपक्रम राबवून, त्या वृक्षाचे वाटप गावातील व्यक्तींना व इतर गावातील शाळांना करतो. यामुळे वृक्ष संवर्धनास वाव मिळतो. आमचा शालेय परिसर घनदाट वनराईने नटलेला असून, शाळेत ऑक्सिजन पार्क, गुलाब पार्क,हिरवळीचे खत प्रकल्प, गांडूळ खत प्रकल्प इत्यादी

प्रकल्पाद्वारे विद्यार्थ्यांना यांचे महत्व व फायदे माहित आहेत. विद्यार्थी वेगवेगळ्या खताचा वापर परसबागेत जैविक भाजीपाला काढण्यासाठी वापरतात. यामुळे विद्यार्थ्यांना स्वयं प्रेरणेचे धडे भेटून भविष्यासाठी ते उपयोगी ठरेल. शाळेत राबवलेल्या वेगवेगळ्या उपक्रमामुळे आमची शाळा प्लॅस्टिक मुक्त शाळा, तंबाखूमुक्त शाळा, म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. या उपक्रमाचा फायदा आम्हाला मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभियानात झाला असून 2023- 24 मध्ये आमची शाळा तालुक्यातून तृतीय व 2024- 25 मध्ये म्हणजे यावर्षी तालुक्यातून प्रथम येण्याचा  बक्षीस रुपी मान मिळाला आहे. या सर्व यशाचे गमक म्हणजे कोणतीही गोष्ट मनावर घेतली असता, ती पूर्ण करण्यासाठी कोणत्याही कारणाची गरज नसते. जेणेकरून आजकाल भरपूर वर्ग आहे, भरपूर विद्यार्थी संख्या आहे, शासनाची बरीच कामे आहे. मी एकटा कसे करू अशी कारणे सांगायची गरजच पडत नाही किंवा ती गौण ठरतात.




**समारोप-**

कोणत्याही शाळेला यश मिळवण्यासाठी शिक्षक, विद्यार्थी, पालक व लोक सहभाग यांची आवश्यकता असते. या सर्वांचा सहभाग असेल तर, विद्यार्थी प्रगतीकडे कमी वेळात जाऊ शकतो. यासाठी मुख्याध्यापक, शिक्षक यांची मेहनत, नियोजन व समाज संपर्क महत्त्वाचा असतो. त्याच प्रमाणात शासकीय कार्यालय, अधिकारी इत्यादींचे सहकार्य घेऊन कोणतेही काम मुख्याध्यापक सहज व यथाशक्तीने करू शकतात. हे आमच्या शाळेच्या यशोगाथेवरून खरोखर अनुभवास मिळाले.






Activity Board
Number वचन
Degree Formation
Singular एकवचन
Noun
Positive Degree
comparative Degree
Superlative Degree
Good
better
best
tall
taller
tallest


COMPUTER LAB



पुण्य नगरी

दिनेश जोशी

# In Short

## कल्याणी कांबळे हिची स्कॉलरशिपसाठी निवड

**मंठा/प्रतिनिधी**



मंठा तालुक्यातील दुधा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची विद्यार्थीनी कल्याणी विष्णू कांबळे या विद्यार्थिनीची एनएमएमस वार्षिक १२०० रुपये शिष्यवृत्तीसाठी निवड झाली आहे. तिला ही शिष्यवृत्ती पाच वर्षांपर्यंत देण्यात येणार आहे. मंठा तालुक्यात निवड झालेली ती एकमेव विद्यार्थिनी ठरली आहे. शाळेने विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या विविध स्पर्धा परीक्षा असो या करीता विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व त्यांच्या गुणांना वाव देण्यासाठी ही शाळा तालुक्यात अव्वल स्थानावर आहे. कल्याणी हिच्या यशाचे कौतुक होत आहे.

----------**----------

## “माझी शाळा, माझे योगदान - ग्रामस्थांची शाळा”

**शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मासेगाव, ता.घनसावंगी, जि.जालना**

**शाळेचा ईमेल आयडी** - zppsmasegaon@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.श्यामराव पवार
**मोबाईल क्रमांक** - 8208300659
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - rahuldombale1989@gmail.com



**प्रास्ताविक -**

जि.प.प्रा.शाळा मासेगाव केंद्र साकळगाव ता.घनसावंगी जि.जालना UDISE-27180412401 पटसख्या २१३ माध्यम मराठी स्थापना वर्ष - १९५६ प्रा.शाळा मासेगाव ही शाळा हे गाव पर्जन्यछायेच्या प्रदेश (परिसर) डोंगराळ, कातळ दगड व सर्वात कमी भूजल पातळीचा भाग आहे. शेतातील अत्यल्प उत्पन्न पावसाच्या पाण्यावर अवलंबुन असलेली शेती आहे. पण गावातील तरुणांनी / शेतकऱ्यांनी या ठिकाणी सुदधा निश्चय करुन फळभागा, पाण्याचा योग्य वापर (जलव्यवस्थापन) करुन गावाचा आर्थिक उंचावण्याचा प्रयत्न करत आहेत. मासेगाव येथील जन्मलेल्या पावन भुमीत वाढलेल्या सकारात्मकतेची वेगळीच अदभूत दैवीशक्ती मारोतीराया (तळयातील) मिळालेली आहे असे अनेक गावकरी म्हणतात. संघर्ष याठिकाणी ठायी ठायी वसला आहे हा झाला गावाचा इतिहास.

प्रा.शाळा मासेगाव शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रत्येक क्षेत्रात आपला यशाचा ध्वज उंचावलेला आहे जिल्हास्तरीय खो-खो (दोन्ही संघ) जिंकण्याचा मान मिळवलेला आहे. तसेच कलाक्षेत्रामध्ये नाट्यान्कूर स्पर्धेत प्राविण्य (१२ बक्षिसे) मिळवलेली आहेत. ज्ञानरचनावादाच्या अंमलबजावणीसाठी केलेली नाटिका यातून महाराष्ट्रभर लोकप्रियता मिळवलेली आहे. NMMS आणि खाजगी संस्थेमार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धेत अनेक विद्यार्थ्यांनी यश मिळवलेले आहे.

यावर्षी २०२३ - २४ मध्ये गावातील महिलांनी आपल्या पाल्यांना व शाळेला कायमस्वरुपी ग्रंथालय (७६०००) निर्मीती करुन दिले यामुळे २०२३ - २४ मधील जि.प.प्रा.शाळा मासेगाव येथे तालुकास्तरीय ग्रंथोत्सव घेण्याचा मान मिळाला. या संदर्भात मार्गदर्शन श्री रवी जोशी साहेब (BEO घनसावंगी) तसेच विस्तार अधिकारी सोळंके साहेब शै.वर्ष २०२३ - २४ वर्ष मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा -२ यामध्ये जिल्ह्यातून द्वितीय क्रमांक येण्याचा मान मिळवलेला आहे. सदरील पाच लक्ष रु.चे बक्षीस जाहीर झाले आहे.

**माझी शाळा माझे योगदान -**

या उपक्रम अंतर्गत गावातील अनेक तरुण किंवा प्रौढ किंवा विद्यार्थी पुर्वी वाढदिवस साजरा करताना विद्यार्थ्यांना चॉकलेट किंवा केक इतर अनावश्यक खर्च वाढत होता त्यामूळे काही निष्पन्न होत नव्हते.

माझी शाळा माझे योगदान यामार्फत तरुण किंवा प्रौढ परिपाठाच्यावेळी कमी वेळामध्ये शाळेमध्ये केक न कापता,चॉकलेट न वाटता आपला वाढदिवस शाळेत साजरा करतात (पुष्पगुच्छ विद्यार्थी देतात) तरुण स्वत: शाळेसाठी 100 रु पासुन ते 500 रु पर्यंत वर्गणी जमा करतात व शाळेच्या भौतिक सुविधेत भर घालतात.

या उपक्रमामुळे गावातील सर्व तरुण आणि प्रौढांना शाळेविषयी असलेली आवड वाढलेली आहे.शाळेतील अडचणी किंवा चांगल्या बाबी गावातील पालक किंवा तरुणांच्या लक्षात येत आहे. आज गावातील प्रत्येकाला आपल्या शाळेविषयी अभिमान वाटत आहे. शाळा हा गावासाठी आदर्शवत करण्यासाठी प्रत्येकाचा सहभाग महत्वाचा आहे.






**ग्रंथालय -**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या वाक्यानुसार वाचाल तर वाचाल याप्रमाणे सध्याची पिढी मोबाईल आणि सोशल मिडीयामुळे वाचनापासुन दुरावत चालली आहे,त्यामुळे अनोखी अशी संकल्पना गावातील महिला वर्गांनी त्यांच्या बचतीमधील 100 रु पासुन 500 रु. पर्यंत वर्गणी जमा करून 36000 रु.चे फर्निचर व 40,000 रु.चे ग्रंथ उपलब्ध करुन दिले आहेत. वेळापत्रकानुसार वर्गाचे नियोजन करण्यात आले आहे.यासाठी गावातील महिलांनी आपल्या बचतीचा हिस्सा ग्रंथालयासाठी जमा केलेला आहे.यामुळे विद्यार्थ्यांना याचा भविष्यासाठी लाभ होणार आहे. ग्रंथालयात अग्निपंख, मारुती चित्तमपली तसेच ऐतिहासीक व विद्यार्थ्यांच्या वयानुसार, मनोरंजनात्मक व अभ्यासपूर्ण पुस्तकांचा संच आहे. प्रत्येक वर्गासाठी नियोजन केल्यामुळे प्रत्येक वर्गाला याचा लाभ मिळत आहे चौथी पासून विद्यार्थ्यांच्या हातात चांगल्या संस्काराचे ग्रंथ हाती पडत आहेत. भविष्यात या ग्रंथालयाचे रुपांतर विद्यार्थ्यांना ( गावातील) अभ्यासीकेमध्ये करण्याचा मानस आहे,





**माझा वाढदिवस माझा नवीन संकल्प -**

या उपक्रमातंर्गत शाळेतील विद्यार्थ्यांचा वाढदिवस असताना त्या विद्यार्थ्यांना अप्रत्यक्षरित्या ज्यांचा वाढदिवस असेल ते एखादा ग्रंथ/पुस्तक त्यांच्या परिस्थीतीनुसार भेट दिली जाते. विद्यार्थी अतिशय आनंदाने या उपक्रमात सहभागी होत आहेत. ज्या विद्यार्थ्यांचा सुटीच्या दिवशी वाढदिवस येतो ते विद्यार्थी स्वत:हुन शाळेच्या कार्यदिनी आपली वर्गणी किंवा पुस्तक उपलब्ध करुन देतात. या सर्व वाढदिवसाचे नियोजन शाळेतील मंत्रिमंडळापैकी सांस्कृतिक मंत्री हे काम पाहतात.या उपक्रमामुळे ग्रंथालयातील ग्रंथाची संख्या वाढत आहे.भविष्यात महाराष्ट्रातील आदर्श ग्रंथालय उभे राहील.







**माझी शाळा माझे श्रमदान -**

या उपक्रमाअंतर्गत शाळेसाठी आठवडयातुन एक दिवस किंवा किमान एक तास प्रत्येक पालक श्रमदान करत असतो. या उपक्रमाच्या माध्यमातुन शाळेला विनामुल्य श्रमदान करतात.पुढील पिढीला चांगली परंपरा गावकऱ्यांनी निर्माण केली आहे. मासेगाव या गावातील ग्रामस्थांनी सर्व प्रकारची मदत करून शाळेची प्रगती करण्यासाठी सिंहाचा वाटा उचलला आहे.






**माझा परिपाठ सुंदर परिपाठ -**

परिपाठ हा शालेय वेळापत्रकात महत्वाचा घटक आहे.सकाळी शाळा प्रवेश घेतल्यावर शाळेतुन बाहेर पडेपर्यंत चांगले संस्कार व्हावेत यासाठी परिपाठातून वेगवेगळया कृतींच्या माध्यमातुन बोधकथा कृतीयुक्त पध्दतीने सादर केल्या जातात. प्रत्येक दिवशी वेगवेगळया प्रार्थना घेतल्या जातात व परिपाठात विविध जयंती पुण्यातिथी निमित्त मार्गदर्शन केले जाते. प्रत्येक दिवशी परिपाठ घेणाऱ्या वर्गाला गुणदान केले जाते, आठवडयातुन शेवटी ज्या वर्गाला सर्वात जास्त गुण मिळतात त्या वर्गातील सहभागींचा विशेष (संगित

व राळयासह ) सन्मान केला जातो यामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा लागते व आपला प्रथम क्रमांक यावा म्हणुन वर्गातील प्रत्येक विद्यार्थी प्रयत्न करत असतो.





**खरी कमाई -**

स्काऊट गाईड या उपक्रमाअंतर्गत खरी कमाई यानुसार प्रत्येक वर्गाला एक आठवडयाचा कालावधी दिला जातो त्यानुसार त्या वर्गातील गटानुसार वेगवेगळया पदार्थांचे शाळेच्या मध्यंतरमध्ये विद्यार्थी स्टॉल मांडतात, त्याचा खर्च किती, नफा किती आठवडयानुसार हिशेब ठेवला जातो,ज्या वर्गातील गटाचे भांडवल कमी उत्पन्न व नफा जास्त असेल त्यांना बक्षीस दिले जाते .

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आर्थिक सवयी व बचतीची सवय लागते व्यावसायिक जीवनाची सवय लागते तसेच विद्यार्थांना भविष्यात स्वत:च्या कामाच्या सवयी लागते.




**समारोप -**

शाळेत झालेले भौतीक बदल आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमध्ये झालेले बदल यामध्ये शाळा व्यवस्थापन समिती, गावातील सर्व ग्रामपंचायत पदाधिकारी शिक्षक,पालकवर्ग यांच्या योगदानामुळे दिसून येत आहेत . भविष्यात यापेक्षा मोठे यश नक्कीच मिळेल अशी खात्री वाटते.



----------**----------

# "यशोगाथा एका ज्ञानमंदिराची"

**शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, देवपिंपळगाव, केंद्र.काजळा, ता.बदनापुर, जि.जालना**

**शाळेचा ईमेल आयडी** - zppsdeopimpalgaon1@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.पांडुरंग रामभाऊ तळेकर
**मोबाईल क्रमांक** - ८२०८०९०६४०
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - prtalekar1968@gmail.com











आपला देश धार्मिक दृष्टीने समृद्ध आणि संपन्न दिसतो जिथे देविकांच्या मंदिरांना स्मारकांना धार्मिक विधींना सढळ हाताने कोट्यावधी रुपये आपण खर्च होताना पाहतो परंतु ज्या ठिकाणी या देशाचं भविष्य घडत आहे त्या ज्ञानमंदिरांची म्हणजेच शाळांची परिस्थिती मात्र उदासीन दिसून येते. विशेषतः ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्था व इतर शासकीय शाळांची परिस्थिती पाहता आजच्या 21 व्या शतकातील फारशी सुधारलेली नाही अशीच दिसून येते, पण या परिस्थितीला आव्हान देत उत्कृष्टरित्या परिवर्तन घडवून आणला आहे एका

ग्रामीण भागातील शाळेनेच. ही जिल्हा परिषद शाळा जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यात आहे. देवपिंपळगाव गाव हे तसं लोकसंख्येच्या दृष्टीने मोठे, गावात एकूण चार अंगणवाड्या व एक जि.प.शाळा या शाळेत जवळपास 325 विद्यार्थी शिक्षण घेतात. पहिली ते आठवीपर्यंतचे वर्ग आहेत. शाळेचा परिसर तसा बऱ्यापैकी मोठा परंतु इमारत जुनी व परिसर उदासीन होता.






**शाळेची पूर्वीची स्थिती -**

शाळेची भौतिक वातावरण विद्यार्थ्यांसाठी चैतन्यमय असावे अशी शिक्षकांना नेहमी वाटायचे परंतु भौतिक सुविधा निर्माण करण्यासाठी खूप मोठ्या पैशांची गरज भासणार होती त्यामुळे हे काम पूर्ण होऊ शकत नव्हते परंतु निमित्त ठरले मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या स्पर्धेचे आणि मग झाली परिवर्तनाला सुरुवात.....

शाळेतील शिक्षक वृंद धडपड करणारी गावातील तरुण मंडळी ग्रामपंचायत आणि विशेष करून शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सर्व सदस्य यांच्या विचारणे शाळेची सुधारणा आणि बदल करण्याचे ठरलं आणि म्हणतात ना तुम्ही जेव्हा एखादा चांगलं काम करायला पुढे येता तेव्हा नशीबही तुमचंच असतं शाळेच्या कामाला सुरुवात झाली आणि हळूहळू गावकऱ्यांचा प्रचंड सहभाग वाढला कुठलेही काम करायचं म्हटलं तर प्रश्न उभा राहतो तो पैशांचा आणि हे तर शाळेचा कायापालट करण्याचं काम होतं मग सुरुवात झाली लोक वर्गणीची आणि

कमाल म्हणजे जसा देवाच्या मंदिराला पैसा उपलब्ध व्हावा तसा अवघ्या आठ-दहा दिवसांच्या कालावधीत जवळपास तीन लाख रुपये पर्यंत निधी शाळेत प्राप्त झाला.




गावातील प्रतिष्ठित मंडळींनी निधी दिला परंतु रोजंदारी करणाऱ्या गावकऱ्यांनी पालकांनी सुद्धा त्यांच्या वतीने खारीचा वाटा उचलला. गाव करील ते राव काय करील ही म्हण आमच्या देवपिंपळगावने सार्थ ठरवली. गावची एवढे सहकार्य पाहून शिक्षकांचा उत्साह द्विगुणीत झाला. मग काय आपल्या वर्गापासून शाळेच्या गेट पर्यंत प्रत्येक कानाकोपऱ्यात काय नवीन करता येईल या पद्धतीने विचार व काम सुरू झाले वर्ग खोल्यांची आतून बाहेरून रंगरंगोटी शाळेचा बाह्य परिसर रंगोटीने आकर्षक करणे, वर्ग खोल्यांमध्ये शैक्षणिक साहित्य निर्मिती करणे शाळेचे आकर्षक कमान तयार करणे, मैदानाची रचना करणे, मैदानाची आखणी करणे, वर्गांच्या समोर गट्टू बसवणे फुलबाग व परसबाग तयार करणे अशी बरीच कामे शिक्षक विद्यार्थी व गावकऱ्यांनी मिळून पूर्ण केली. ही कामे करत असताना शाळेचे जे विशेष उपक्रम आहे जशी की युको क्लब अंतर्गत मेडिसिन पार्क सायन्स क्लब अंतर्गत ऑक्सिजन पार्क हे देखील उत्तम प्रकारे तयार करण्यात आले.





शाळेचा कायापालट होण्याअगोदरच या शाळेत अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम सुरू होते जसे की डीटीएच देवपिंपळगाव टॅलेंट हंट यामध्ये स्पर्धा परीक्षेची तयारी करून घेत प्रत्येक आठवड्याला चाचणी देखील घेण्यात येत होती. एपीजे अब्दुल कलाम सायन्स क्लबची स्थापना विज्ञान प्रयोगशाळेत करण्यात आलेली आहे. रोबोटिक्स लॅबमध्ये रोबो क्लब तयार आहे, स्काऊट गाईड क्लब ची स्थापना करण्यात आली आहे त्या माध्यमातून अनेक पर्यावरण पूरक उपक्रम राबवले जातात. पर्यावरण पूरक उपक्रम गांडूळ खत कंपोस्ट खत यांची निर्मिती सुद्धा केली

जाते. शालेय परिसरामध्ये दोन जागेत वेगवेगळी परसबाग देखील फुलवण्यात आलेली आहे. या मुख्य उपक्रमा व्यतिरिक्त  अनेक शैक्षणिक उपक्रम शाळेमध्ये राबवले जातात. शाळेचा कायापालट झाला तो उपलब्ध झालेला निधी व इतर शैक्षणिक सुविधामुळे जशी शाळेला पाच किलो वॅट व तीन किलो वॅट क्षमतेचे दोन सोलार पॅनल उपलब्ध आहे. त्यामुळे शाळेचा विजेचा पूर्ण प्रश्न सुटलेला आहे, शाळेला 24 तास वीज उपलब्ध आहे.





प्रत्येक वर्गामध्ये असलेले स्मार्ट टीव्ही, प्रयोगशाळा, स्मार्ट क्लास पॅनल, बालभारतीचा व्हर्च्युअल सेटअप आणि प्रत्येक वर्गातील स्मार्ट टीव्ही फॅन्स या सर्व गोष्टी पूर्ण वेळ वीज उपलब्ध असल्यामुळे चालू शकत आहेत. विजेसोबतच दुसरा महत्त्वाचा प्रश्न येतो तो पाण्याचा. शाळेसाठी ग्रामपंचायत मार्फत पाणी उपलब्ध करून देण्यात आलेले आहे, तसेच पिण्याची पाण्याची सोय उपलब्ध व्हावी म्हणून शाळेत वाटर फिल्टर आणि वॉटर कुलरची देखील सेवा उपलब्ध झालेली आहे. त्यासाठी सोलर पॅनल ची देखील व्यवस्था आहे, बहुतेक सुविधांनी परिपूर्ण अशा शालेय इमारत परिसरात शैक्षणिक सुविधांनी सुद्धा संपूर्ण झाली आहे. शाळेमध्ये पहिली ते आठवीसाठी जे वर्ग एक विज्ञान प्रयोगशाळा, एक संगणक कक्ष, मुख्याध्यापक कक्ष किचन शेड इत्यादी उपलब्ध आहेत. प्रत्येक वर्गात स्मार्ट टीव्ही संच उपलब्ध आहेत, एक स्मार्ट क्लास आहे एक बालभारती पॅनल उपलब्ध आहे, संगणक कक्षामध्ये 12 कम्प्युटर आणि एक प्रोजेक्ट उपलब्ध आहे अशी भौतिक व शैक्षणिक सुविधांनी परिपूर्ण झालेली शाळा.




शाळेने यंदाच्या 2024 मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या स्पर्धेत केंद्र, तालुका, जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक पटकावला तसेच जालना जिल्हा विभाग स्तरावर नेतृत्व करण्याची संधी प्राप्त करून दिली आणि युवक स्तरावर देखील शाळेने तृतीय क्रमांक मिळवत जालना जिल्ह्याचे नाव राज्य पातळीवर नेले. मुंबई येथे आयोजित भव्य कार्यक्रमांमध्ये मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य मा. शिक्षण मंत्री महाराष्ट्र राज्य मा. आयुक्त शिक्षण महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते जि. प. प्राथमीक शाळा देव पिंपळगाव शाळेला सन्मानपत्र आणि ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. शिक्षकांना जर गावाने समाजाने पाठिंबा दिला सहकार्य केलं तर काय परिवर्तन घडवून येते याचे उत्तम उदाहरण म्हणजे देवपिंपळगावची ही शासकीय शाळा उद्या भविष्यात या शाळेतून उत्तम विद्यार्थी घडून बाहेर पडतील हे तर नक्कीच!


ECO CLUB
इको क्लब
Medicine Park
GO GREEN
Come here
Breath i
Live healthy
Live Long



----------**----------

# "क्रीडा क्षेत्रातील उन्नती"

**शाळेचे नाव व पत्ता - सौ.कमलाबाई सुंदरलाल अगरवाल गर्ल्स हायस्कूल, रावेर, ता.रावेर, जि.जळगाव**

**शाळेचा ईमेल आयडी** - ksagirlsraver@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्रीमती नीलम पुरुषोत्तम पुराणिक
**मोबाईल क्रमांक** - ८४२१८१०९७५
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - ksagirlsraver@gmail.com

सौ.के.एस.ए गर्ल्स हायस्कूल ही शताब्दी कडे वाटचाल करणारी संस्कृतीला जपणारी व विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारी विविध सण उत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. पाणी पर्यावरण या विषयांवर रांगोळी स्पर्धा, देशभक्तीपर गीत, पोवाडा नृत्य, नाटिका, एकांकिका, भित्तीपत्रिका, आनंद मेळावा, गरबा, लेझीम,पथनाट्य, अशा कार्यक्रमातून वर्षभरातील सण उत्सव भारतीय संस्कृती विद्यार्थिनींमध्ये रुजवली जाते तसेच शाळेत 'शारदा उत्सव' मोठ्या आनंदात साजरा केला जातो

**स्वच्छ व सुंदर शाळा -**

सौ. के एस ए गर्ल्स हायस्कूल रावेर येथे शासकीय उपक्रमानुसार 'माझी स्वच्छ शाळा सुंदर शाळा' हा कार्यक्रम संपूर्ण महाराष्ट्रात राबविला जात असून आमच्या शाळेत देखील हा उपक्रम राबविला जात आहे. त्यानुसार शाळेच्या मुख्याध्यापिका एन. पी. पुराणिक यांनी शाळेतील विद्यार्थिनींना उपक्रमाच्या नियोजनानुसार वर्गातील व्हरांडा मैदान शाळेतील आजूबाजूचा परिसर स्वच्छ करण्याचे आव्हान केले. त्यानुसार सर्व विद्यार्थिनी व सर्व शिक्षक बंधू- भगिनी यांनी शाळेत वृक्षारोपण केले. विद्यार्थीनिनी वर्ग सजावट केली.

सर्व विद्यार्थीनिमार्फत शपथ विधी घेण्यात आला की , वर्गात शालेय आवारात व आपल्या परिसरात कचरा फेकणार नाही. अशी शपथ घेतली ह्या उपक्रमाचा फायदा असा झाला कि, शाळे बरोबरच आपल्या घराच्या आजू बाजूचा परिसर स्वच्छता करायला लागल्या आहेत. ह्या उपक्रमासाठी शाळेचे संचालक मंडळाचे अनमोल मार्गदर्शन मिळाले तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे अनमोल सहकार्य लाभले.

**किशोरवयीन मुलींचे आरोग्य -**

सौ. के एस ए गर्ल्स हायस्कूल येथे किशोरवयीन मुलींच्या आरोग्यासाठी शाळेत आरोग्य कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत डॉ. प्राची सुनील कुलकर्णी बी. एच. एम. एस. यांनी आरोग्य आहार व स्वच्छतेबाबत विशेष दक्षता कशी घ्यावी या बद्दल सखोल मार्गदर्शन करताना काही ठळक मुद्दे विद्यार्थिनींना आवर्जून करण्यास सांगितले ते पुढीलप्रमाणे.

1. किशोर वयीन मुलींच्या आहारासंदर्भात माहिती दिली.
2. आरोग्याविषयी समस्या व त्यावर उपाय
3. किशोरावस्था म्हणजे काय? त्या संदर्भातील माहिती दिली.
4. पालकांना देखील आव्हान केले कि विद्यार्थिनींचे आहार व आरोग्य चांगले असेल तर मानसिक आरोग्य हि चांगले ठेवावे ह्या वर योग्य ते उपाययोजना करण्यास सांगितले.
5. प्रौढत्वाचा प्रवास कसा होतो व त्यानुसार शरीरात होणारे बदल व त्यानुसार लागणारा आहार त्याची सखोल माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती एन. पी पुराणिक. पर्यवेक्षिका सौ. पी. जे. कुलकर्णी यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर बंधू भगिनी यांचे अनमोल सहकार्य लाभले.

**शालेय स्तरावरील विविध स्पर्धा परीक्षांतील यश -**

सौ.के.एस. ए.गर्ल्स हायस्कूल येथे संपूर्ण रावेर मध्ये प्रसिद्ध असलेली शाळा सर्व गुण संपन्न अशा विद्यार्थिनी घडविण्याचे काम केले जात आहे. त्यानुसार आपल्या शाळेत विविध स्पर्धा परीक्षांचे आयोजन करून अधिकच्या तासिका घेऊन अनमोल असे मार्गदर्शन केले जात असते. स्पर्धा परीक्षा पुढीलप्रमाणे.

१. विज्ञान मंच मेळावा - रावेर येथे ही स्पर्धा घेण्यात आली. कु. प्रणिती योगेश बनकर हि विद्यार्थिनी तालुक्यात प्रथम येऊन जिल्ह्यात तिची निवड आली. यात सर्व विज्ञान शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.
२. विज्ञान प्रदर्शन यात भार्गवी लक्ष्मीकांत शिंदे या विद्यार्थिनीची जिल्हास्तरावर निवड झाली.
३. एन एम एम एस – राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकांमध्ये मोडत असलेल्या विद्यार्थिनींसाठी हि परीक्षा घेतली जाते. यात कु. भूमिका यशवंत दलाल व कु. देवश्री पंकज सपकाळे या विद्यार्थिनी प्रथम आल्या.
४. एकलव्य ज्ञान वर्धिनी परीक्षा नागपूर – ही स्पर्धा सामान्य ज्ञानासाठी घेतली जाते. यात कु. उन्नती राजेश पाटील व देवश्री संजय महाजन या प्रथम आल्या.
५. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ – ही परीक्षा शाळाबाह्य प्रचार परीक्षा (पुणे) यांचे कडून इंग्रजी विषयासाठी घेतली जाते. यात जास्तीत जास्त विद्यार्थिनी सहभागी होतात.
६. हिंदी राष्ट्रभाषा परीक्षा
७. स्कॉलरशिप परीक्षा
८. भूगोल प्रज्ञाशोध परीक्षा- यात कु. जयिश्ना विनोद पाटील हिला १०० पैकी १०० गुण सुवर्णपदक मिळाले.
९. इन्स्पायर अवार्ड – यात तेजस्विनी सुनील महाजन हिचा सहभाग होता.

**विविध क्रीडा प्रकारांचा अवलंब करून अनेक विद्यार्थीनीना संधी दिली जाते त्यासाठी विशेष लक्ष देऊन सराव करून घेतला जातो ज्यामुळे मुलींची क्रीडा प्रकारातील कामगिरी उत्तम होत आहे ,त्यात खालील मुलींचा सहभाग व प्राविण्य खालीलप्रमाणे**

**शालेय वेट लिफ्टिंग स्पर्धा – तालुका स्तर, जिल्ह्य स्तर, विभाग स्तर, राज्य स्तर , सहभाग व प्राविण्य**

१. अश्विनी शांताराम चौधरी ( तालुका, जिल्हा, विभाग, प्रथम )
२. अक्षरा राकेश भावसार (तालुका व जिल्हा प्रथम )
३. प्रियांका जितेंद्र बारी (तालुका, जिल्हा प्रथम )
४. रोशनी रामचंद्र चौधरी (तालुका, जिल्हा, विभाग प्रथम)
५. मोनिका आमोद महाजन (राज्यस्तरीय प्रथम )
६. धन्वी मनसुखलाल लोहार (तालुका,जिल्हा प्रथम)
७. जागृती जितेंद्र लोणारी (तालुका, जिल्हा प्रथम )
८. .वैष्णवी जीवन चौधरी (तालुका जिल्हा प्रथम)
९. प्राची राजेश तायडे (तालुका, जिल्हा प्रथम )
१०. मनस्वी यशवंत महाजन (तालुका, जिल्हा प्रथम )

**BADMINTON स्पर्धा – (१४ वर्ष आतील)**

खालील सर्व विद्यार्थिनी तालुका स्तरीय स्पर्धेत प्रथम आल्या व जिल्हा स्तरीय स्पर्धेत सहभागी झाल्या.

१. प्रणिती योगेश बनकर
२. तपस्या मोरेश्वर सुरवाडे
३. जान्हवी चंद्रकांत चौधरी
४. अनुष्का संदीप पाटील
५. सावी स्वप्नील वाणी
६. केतकी जयवंत पाटील

**तालुका स्तरीय मैदानी स्पर्धा (१४ वर्ष आतील)**

१. योगिनी विनोद महाजन – तालुका स्तरीय लांब उडी स्पर्धेत प्रथम जिल्हा स्तरीय लांब उडी स्पर्धेत प्रथम विभाग स्तरीय लांब उडी स्पर्धेत तृतीय
२. लक्ष्मी राजेंद्र गोसावी- ६०० मीटर धावणे प्रकारात तालुका स्तर जिल्हा स्तर प्रथम आणि विभाग स्तरीय स्पर्धेत सहभाग
३. भूमेश्वरी किशोर महाजन – १०० मी, २०० मी, तालुका स्तरीय जिल्हा स्तरीय प्रथम आणि विभाग स्तर सहभाग
४. कोमल अशोक महाजन – २०० मी. तालुका स्तरीय द्वितीय क्रमांक.

**रिले स्पर्धा ४ * १००-**

खालील विद्यार्थिनी तालुका स्तर, जिल्हा स्तर, प्रथम आल्या तसेच नाशिक येथे विभागीय स्पर्धेत सहभागी होत्या.

१. योगिनी महाजन
२. लक्ष्मी गोसावी
३. भूमेश्वरी महाजन
४. कोमल महाजन

**शालेय कबड्डी स्पर्धा (१७ वर्षा आतील) – तालुका स्तर, जिल्हा स्तर , विभाग स्तर,** प्राविण्य खालील विद्यार्थिनी तालुका स्तर तसेच जिल्हा स्तरावर प्रथम आल्या व नाशिक येतील स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवून यशस्वी झाल्या.

१. श्रद्धा संदीप महाजन
२. संजना मिलिंद महाजन
३. काजल प्रमोद महाजन
४. महिमा मोहन महाजन
५. पूनम रमेश झोपेकर
६. परिमिता अनिल घेटे
७. पल्लवी शांताराम महाजन
८. अफसाना इलायखा तडवी

**शालेय खो खो स्पर्धा ( १७ वर्ष आतील)**

खालील विद्यार्थीनी तालुका स्तरीय स्पर्धेत प्रथम आल्या तसेच जिल्हा स्तरीय स्पर्धेत सहभागी होत्या .

१.कीर्ती समाधान पाटील
२. नेहा संदीप सावळे.
३. हर्षली उमाकांत पाटील
४. प्राची उमाकांत पाटील
५. वेदिका विनोद कोष्टी
६. देवयानी सुनील जुमळे
७. गुंजन शिंदे
८. सानिका लवंगे.

**जिल्हा स्तरीय स्केटिंग स्पर्धा (१७ वर्षा आतील )**

१. चंचल सुनील पाटील – तालुका स्तरीय प्रथम क्रमांक तसेच जिल्हा स्तरीय प्रथम क्रमांक

**मैदानी क्रीडा स्पर्धा (१७ वर्षा आतील)**

१. सृष्टीता वासुदेव पाटील – १०० मीटर. २०० मीटर धावणे तालुका,जिल्हा,तसेच विभाग स्तरावर प्रथम क्रमांक.

२.दिव्या प्रल्हाद भिलाला – गोळा फेक स्पर्धेत प्रथम क्रमांक लांब उडी स्पर्धेत द्वितीय क्रमांक व जिल्हा स्तरीय स्पर्धेत सहभाग

२९ ऑगस्ट मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस क्रीडा सप्ताह म्हणून साजरा करण्यात आला. दि. २२ ते २९ ऑगस्ट या कालावधीत क्रीडा सप्ताह साजरा करण्यात आला. या क्रीडा सप्ताहामध्ये विविध क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या.

१. पारंपारिक खेळ – लगोरी, दोरीवरच्या उड्या, चौपट बित्तू बित्तू
२. मैदानी स्पर्धा- २०० मी. ४०० मी. १०० मी.८०० मी
३. BADMINTON स्पर्धा
४. कबड्डी स्पर्धा
५. स्केटिंग स्पर्धा
६. खो खो स्पर्धा
७. लाठी काठी प्रशिक्षण

**यापद्धतीने क्रीडा सप्ताह विविध स्पर्धांचे आयोजन करून साजरा करण्यात आला.**



















----------**----------

# "नक्षलग्रस्त क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या यशस्वीतेसाठी शालेय नेतृत्वाची कामगिरी"

**शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद वरिष्ठ आदर्श शाळा, सावली, पो.सावली, केंद्र.डोंगरगाव, प.स. देवरी, जि.गोंदिया**

**शाळेचा ईमेल आयडी** - sandiptidke2014@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.संदीप ईश्वरदास तिडके
**मोबाईल क्रमांक** - ७७२१९६९०७१
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - sandiptidke2014@gmail.com

**प्रस्तावना -**

**हस-या फुलांची, बाग जशी आनंदी;**
**तशीच ही शाळा, मुले इथे स्वच्छंदी.'**

वरील ओळीची व खरीखुरी व जिवंत प्रचीती म्हणजे जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक आदर्श शाळा सावली.आनंददायी शिक्षणातून विद्यार्थांच्या चेह-यावर आनंद फुलवणारे ,नित्तीमत्तेला जास्त महत्व देऊन चारीत्र्यवान, चांगली व्यक्ती घडवण्यासाठी विविध सहशालेय उपक्रमातून, विविध स्पर्धा,खेळ,आदर्श परिपाठ,हिरव्याकंच फुललेल्या रम्य परीसरातून ,सुसज्ज परिपूर्ण भौतिक सुविधा पुरवून तसेच डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी विद्यार्थी हेच माझे दैवत समजून आपल्या दैवतासाठी झिजणारे मेहनती शिक्षक कु.वर्षा वालदे पदवीधर शिक्षिका ,श्री.जे. झेड.मलगाम,श्री.व्हि.एच..नाईक,कु .शितल खाडे,कु .वैशाली बडे तसेच ध्येयवेडे व तन -मन -धनाने झटणारे सक्षम नेतृत्व मा.श्री.संदीप तिडके मुख्याध्यापक सावली यांच्या अचूक मार्गदर्शनात सावलीचे नंदनवन फुलले नसते तरच नवल .....

हळूहळू उमलणा-या फुलांप्रमाणे उमलत गेलेली सावली शाळा आज दिमाखात उभी आहे.नव्याने २०१६ ला रुजू झाल्यास प्रथम दर्शनी ज्या कार्यालयाचे दर्शन घडले ते म्हणजे खूप गच्च सामानाची गर्दी असलेली एक जुनाट खोली होती. वाटल कार्यालय असे असेल तर वर्गखोली कशी असेल? महत्वाची कार्यवाही आटपून सर्वात अगोदर वर्गखोल्या पाहायला गेले तर त्याही साधारण वर्गखोल्या, जुनाट फरशी, थोडेफार वर्गखोल्या रंगवलेल्या स्थितीत वर्ग होते. मैदान प्रशस्त होते परंतु बाह्यभिंत कुठल्याही चित्राविना उदास वाटत होती.फक्त एकच गोष्ट नेहमीप्रमाणे समान होती ती म्हणजे विद्यार्थ्यांच्या हस-या चेह-यावरचा आनंद हळूहळू शाळेचा एक घटक म्हणून मिसळले.ह्या शाळेला नेतृत्व म्हणून सौ .पुष्पलता बागडे मुख्याध्यापीका होत्या. पण सहा महिन्यात त्यांची इतरत्र बदली होऊन श्री.संदीप तिडके ह्यांनी नेतृत्वाचा पदभार ग्रहण केला. शाळेत होणारा दैनंदिन परिपाठ, विविध स्पर्धा, स्नेहसंम्मेलन, क्रीडा टूर्नामेंट, थोर पुरुषांच्या जयंत्या- पुण्यतीथ्या इ.सारख्या उपक्रमातून व अध्ययन अध्यापनातून विद्यार्थी घडत असताना थोडा बदल करायचे ठरविले. नाविन्यपूर्ण सर्जनशील उपक्रम हेच रामबाण औषध असू शकते.सुसंस्कृत व हरहुन्नरी विद्यार्थी घडवण्याचे व शाळेला राज्यस्तरावर प्रसिद्धीच्या झोतात आणण्याचा संकल्पच आखण्यात आला. विविध सुंदर कल्पक व सृजनशील उपक्रमांची यादी करून वार्षिक नियोजनाप्रमाणे त्या-त्या वेळी येणारे जयंत्या,पुण्यातीथ्या,दिनविशेष,विविध स्पर्धा घेऊ लागलो शाळा सुद्धा दिवसेंदिवस आकार घेऊ लागली.

**आमच्या शाळेत आज घडीला विविध सहशालेय उपक्रमातून गुणवत्ताविकास साधला जातो ते खालील प्रमाणे**

1. वक्तृत्व स्पर्धा
2. समयस्फूर्त भाषण स्पर्धा
3. कथाकथन
4. काव्यगायन
5. प्रश्नमंजुषा स्पर्धा
6. पाढे पाठांतर स्पर्धा

7. तीन शब्दावरून कथा लेखन
8. पाच मिनिट वाचन ,श्रुतलेखन ,अनुवाचन स्पर्धा
9. पाच मिनिट गणिती क्रिया स्पर्धा
10. दहा मिनिटे शाळेसाठी
11. जयंती पुण्यतिथी साजरी करणे
12. बालसभा
13. भरारी पथक
14. एक धागा समतेचा
15. विद्यार्थ्यांच्या भावनिक ,सामाजिक विकासाला,कलागुणांना नेतृत्वाविकासाला प्राधान्य देणारा स्नेहमेळावा एक आगळीवेगळी अनुभूती देऊन जातो.कचऱ्याची होळी व रंगपंचमीचा आनंद विद्यार्थी घेतात. वर्ग सजावट स्पर्धा, दिवाळीला दिवे,आकाशकंदील ,ग्रीटिंग ,मातीच्या वस्तू तयार करणे,विविध शैक्षणिक साहित्य तयार करणे इ.स्पर्धा घेतल्या जातात.
16. विज्ञान प्रदर्शनीमध्ये २०२१-२२ ते २०२३ -२०२४ ह्या सलग तीन वर्षात तालुक्यात प्रथम येण्याचा मान सावली शाळेने पटकावला आहे.
17. खान अकादमीतून विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. दैनंदिन आदर्श परिपाठ घेतला जातो व उत्कृष्ट सादरीकरणाला शाळेद्वारे छापलेले प्रमाणपत्र दिले जातात. विविध स्पर्धातून प्रथम,द्वितीय, तृतीय विद्यार्थ्याना वस्तू, प्रमाणपत्र इ देऊन गौरविले जाते. अशा स्पर्धातून विद्यार्थ्यांच्या शारीरिक,मानसीक,सामाजिक व भावनिक कलागुणांना भरारी दिली जाते.शाळेने शिक्षक व गावकरी यांच्या माध्यमातून अनेक उपक्रम शाळेत राबवून मागील काही अनेक पुरस्कार मिळवणारी जिल्ह्यातील अग्रमानांकित शाळा म्हणून सावली शाळेकडे बघितले जाते.

**मुख्याध्यापक/शिक्षक यांना विषयानुसार आलेल्या अडचणी तसेच केलेले प्रभावी काम -**

सावली शाळा २०१२ मध्ये डोंगरगाव केंद्रात भौतिक व गुणवत्तेसंदर्भात सर्वात मागे असणारी शाळा म्हणून ओळखली जात होती. शाळेकडे पालकांचा बघण्याचा दृष्टीकोन निरुत्साही प्रकारचा होता.कॉन्वेंट मध्ये गावातील जवळपास ३० टक्के विद्यार्थी शिकत होते,पडकी व मोडकी इमारतीत शिक्षण देणे कठीण काम होते. विद्यार्थी गैरहजरीचे प्रमाण जास्त असल्याने गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे कठीण काम होते.शाळेला सुरक्षा भिंतच नसल्याने जनावरांचा हैदोस खूप मोठ्या प्रमाणात होता अशा परिस्थितीत श्री संदीप तिडके सर १ ऑगस्ट २०१२ ला शाळेत रुजू झाले त्यांनी बारकाईने शालेय परिस्थीतीचा अभ्यास केला.सर्व शिक्षक वर्ग व गावकरी यांना सोबत घेऊन शाळेचा कायापालट करण्याचे खालीलप्रमाणे नियोजन केले.

- पालकमेळावे आयोजित करून पालकांत शिक्षणजागृती करणे.
- चावडी वाचन सारखे उपक्रम नियमित आयोजित करणे.
- गावची शाळा आमची शाळा ही भावना मनात तयार करणे.
- शैक्षणिक सहल व नामांकित शाळांना भेट देण्यासंदर्भात अभ्यास दौरा आयोजित करणे .
- तीन दिवशीय सावली महोत्सवाचे आयोजन करून सांस्कृतिक मनोरंजनासोबातच शैक्षणिक जागृती पालकांत तयार करणे.
- शिक्षण दिंडी व शाळा प्रवेश उत्सव सारखे कार्यक्रम प्रभावीपणे आयोजित करणे.
- ज्ञानरचनावाद व आधुनिक (संगणकीय व डिजिटल अध्यापन तंत्र) शिक्षण पद्धतीचा अध्ययन —अध्यापन अनुभूती मध्ये प्रभावी वापर करणे.
- भरारी पथक, गैरहजर विद्यार्थ्याना पत्र पाठवणे, नियमितपणे पालक भेट घेऊन विद्यार्थी अनुपस्थितीचे प्रमाण शून्य पर्यंत आणणे.
- ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने स्वाध्याय विद्यार्थ्यांना देऊन अध्ययन पद्धती प्रभावी करणे.

- १ दिवस शाळेसाठी हा उपक्रम पालकांकरिता आयोजित करून शालेय स्वच्छता, ग्रामसफाई सारखे उपक्रम लोकसहभागातून यशस्वी करून सामाजिक बांधीलकी जोपासणे.
- १० मिनिटे शाळेसाठी हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी आयोजित करून श्रमप्रतिष्ठा हे मुल्ये विद्यार्थ्यात जोपासणे.

**मुख्याध्यापक व शिक्षक यांनी प्रभावी कामासाठी केलेल्या अंमलबजावणीनंतर शाळेत झालेला सकारात्मक बदल व शाळेची यशोगाथा**

**जसा बदलत गेला फळा**
**तशी बदलत गेली शाळा**

वरील ऊक्तीप्रमाणे जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा सावली शाळेने बदल घडवीत विविध क्षेत्रात स्वतःचा नवीन ठसा उमटविलेलाआहे.त्यात प्रामुख्याने खालील उल्लेखनीय बाबींचा समावेश करता येईल.

**सुसज्ज वर्गखोल्या व आकर्षक रंगरंगोटी** - मागील दहा वर्षात विविध शासकीय योजना व लोकसहभागातून शाळेत अध्ययन पूरक वातावरण निर्मिती साठी वर्गनिहाय नाविन्यपूर्ण आकर्षक रंगरंगोटीसह वर्गखोल्या तयार करण्यात आलेल्या आहेत त्याचा परिणाम विद्यार्थी बालमनावर होत आहे.

**स्वतंत्र मुख्याध्यापक कक्ष व भोजनसाठा कक्ष निर्मिती** - आधुनिक तत्वावर आधारित शाळेत सर्व सोयी सुविधायुक्त मुख्याध्यापक कक्ष तयार करण्यात आले असून स्वतंत्रपणे भोजन व्यवस्थापन खोली निर्माण करण्यात आली आहे याचा परिणाम शाळा व्यवस्थापन प्रक्रियेत सकारात्मक बदल होत आहे.

**स्वतंत्र भोजन शेड** - विध्यार्थ्यांना मोकळ्या वातावरणात जेवण करता यावे तसेच उन, वारा, थंडी, पाऊस यापासून विद्यार्थ्यांचा बचाव व्हावा यासाठी स्वतंत्र व प्रशस्त भोजनशेड लोकसहभागातून निर्माण करण्यात आले आहे एकाचवेळी २५० पेक्षा जास्त विद्यार्थी जेवण करू शकतात.

**आकर्षक परसबाग निर्मिती** - शालेय पोषण आहार योजने अंतर्गत विद्यार्थ्यांना दर्जेदार व पोषक आहार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शाळेत कायमस्वरूपी गट्टूसह परसबाग तयार करण्यात आलेली आहे.या माध्यमातून विद्यार्थ्यांना सकस आहार उपलब्ध करून देण्यास मदत होत आहे.

**कायमस्वरूपी सौरउर्जा** - ICICI बँके तर्फे शाळेत सौरउर्जा संयत्र बसविण्यात आलेला असून पूर्ण वेळ विद्युत या माध्यमातून शाळेला प्राप्त होत आहे यामुळे विद्युत बिल शून्य येत असून दृक्श्राव्य साधने अडथळ्याविना क्रियान्वित आहेत

**डिजीटल संसाधने व पुरेसा साउंड सेटअप** - शाळेत वर्गनिहाय पुरेसे डिजीटल संसाधने उपलब्ध असून अध्ययन प्रक्रियेत यांचा मोठ्या प्रमाणात वापर होत आहे शाळे १५ व्या वित्त आयोगातून ग्राम पंचायत तर्फे प्रोजेक्टर व पुरेसा साउंड सेटअप उपलब्ध झालेला आहे तसेच लोकसहभागातून व शालेय खर्चातून ४ एलईडी शाळेला प्राप्त झाले आहेत.

**नाविन्यपूर्ण वाचन कुटी** - विद्यार्थ्यांना मोकळ्या वातावरणात शिकता यावे तसेच स्वनिर्मितीचा आनंद त्याला अनुभवता यावा यासाठी शाळेत नाविन्यपूर्ण वाचन कुटी तयार करण्यात आली आहे विद्यार्थी नियमितपणे या वाचन कुटीचा वापर अध्ययन प्रक्रिया विकसित करण्यासाठी करतात.

**क्रीडा साहित्य व ग्रीन जिमची व्यवस्था** - विद्यार्थ्यांचा शारीरिक विकास व्हावा त्याला खेळाप्रती आवड निर्माण व्हावी यासाठी क्रीडा विभागाला शाळेतर्फे पत्रव्यवहार करून विविध क्रीडा साहित्य शाळेला प्राप्त झाले असून आकर्षक ग्रीन जिमची व्यवस्था सुद्धा विद्यार्थ्यासाठी तयार करण्यात आली आहे.

**आकर्षक प्रवेशद्वार व संपूर्ण सुरक्षाभिंत** - शाळा सुंदर दिसावी तसेच विद्यार्थ्यांना शाळेप्रती आकर्षण वाटावे यासाठी सोबतच शाळेतील सर्व भौतिक साहित्य सुरक्षित राहण्यासाठी सम्पूर्ण सुरक्षा भिंत निर्माण करण्यात आली आहे.

**विविध पुरस्कार प्राप्त शिक्षक व शाळा** - शाळेतील शिक्षक व गावकरी यांच्या सहकार्याने खालील प्रकारचे पुरस्कार प्राप्त केले आहेत त्यात प्रामुख्याने,

1) गावाची शाळा आमची शाळा उपक्रमात २०१२ ते २०१५ दरम्यान तालुका व जिल्हा स्तरावर चार पुरस्कार प्राप्त
2) २०१५ ला विज्ञान प्रदर्शनीत प्रथम पुरस्कार
3) २०१६ शिष्यवृत्ती परीक्षेत वर्ग आठवीचा विद्यार्थी तालुक्यात प्रथम
4) २०१९ ला आमची शाळा आदर्श उपक्रमात जिल्ह्यात तिसरा क्रमांक १ लक्ष 35 हजार रोख रक्कम प्राप्त
5) २०२१ ते २०२४ दरम्यान सातत्याने तीन वर्ष विज्ञान प्रदर्शनीत शाळा तालुक्यात प्रथम क्रमांकाने सन्मानित
6) २०२३ला जिल्हा आदर्श पुरस्कारात शाळेतील सहायक शिक्षक श्री. वसंत नाईक सन्मानित
7) २०२३ -२४ मध्ये मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमात सावली शाळा नागपूर विभागात द्वितीय १५ लक्ष रुपये माननीय मुख्यमंत्री यांचे हस्ते प्राप्त
8) २०२४ ला स्वातंत्र दिनानिमित माननीय पालक मंत्री यांचे हस्ते शाळेने केलेल्या गुणात्मक कामगिरीच्या आधारावर राष्ट्रीय सन्मानाने शाळा सन्मानित
9) शाळेचे मुख्याध्यापक संदीप तिडके यांना यावर्षीचा राज्यस्तरीय क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार मिळाला
10) २०२४-२५ मध्ये मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमात सावली शाळेचा गोंदिया जिल्ह्यात दुसरा क्रमांक.

**कॉन्वेंटची व्यवस्था सोबत स्वतःची school van** - पटसंख्या टिकून राहावी सोबतच विद्यार्थ्यांना अल्प दरात गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी कॉन्वेंट शाळा सुरु करण्यात आली सोबतच विद्यार्थ्यांना ने -आण करण्यासाठी लोकसहभागातून स्वतःची school van खरेदी करण्यात आलेली आहे.

**आधुनिक तत्वावर आधारित handwash स्टेशन निर्मिती तसेच ५०० लिटर जलशुद्धीकरण यंत्राची उपलबद्धता** - शाळेत १६८ विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात आधुनिक तत्वावर आधारित handwash स्टेशन निर्मिती करण्यात आली आहे तसेच ५०० लिटर जलशुद्धीकरण यंत्राची उपलबद्धता विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आलेली आहे.

**सुसज्ज वाचनालय** - वाचनाची सवय लागावी यासाठी विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात स्वतंत्र वाचनालय तयार करण्यात आले आहे सोबतच वाचनालयात पुस्तकांचा साठा वाढावा यासाठी विद्यार्थ्यांचा वाढदिवस "माझा वाढदिवस पुस्तकासंगे" या उपक्रमांतर्गत साजरा केला जातो सोबतच एक घर एक पुस्तक हा उपक्रम शाळा राबवीत असून यामाध्यमातून ५०० पुस्तके गावातून प्राप्त झाले आहेत

**जिल्हा क्रीडासत्राच्या आयोजनाची संधी** - २०१९ मध्ये शाळेतील शिक्षक व गावकरी यांच्या नेतृत्वात भव्यदिव्य जिल्हा क्रीडासत्र सावली शाळेत संपन्न झाला .या जिल्हा क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून लोकसहभागातून जवळपास १२ लक्ष रुपयाची वर्गणी गोळा करण्यात आली .तसेच श्रमदानातून ३ एकर झुडपी जंगल साफ करून विद्यार्थांसाठी प्रशस्त स्वतंत्रपणे खेळाचे मैदान तयार करण्यात आले.न भूतो न भविष्यती अशा स्वरूपाचा जिल्हा क्रीडा व

सांस्कृतिक महोत्सव घेण्यात आला. उरलेल्या पैशातून शाळेतील कॉन्वेंट विद्यार्थ्यांसाठी गाडी घेण्यात आली ,सोबतच भव्य भोजनशेड सुद्धा तयार करण्यात आला.

**SCHOOL IN GARDEN संकल्पना** - शालेय परिसरात जवळपास ३०० पेक्षा जास्त गार्डनिंगचे झाडे लावले असून यामुळे शाळा आकर्षक व सुंदर दिसत आहे. मोठ्या प्रमाणात झाडे परिसरात लावली असल्याने शाळेत बगीचा दिसत नसून बागेत शाळा दिसत आहे.


**पटसंख्येत लक्षणीय वाढ** - सावली शाळेने राबविलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमाच्या भरवश्यावर शाळेची पट ११३ वरून मागील सहा वर्षात १६८ पर्यंत पोचली आहे

**बाला अंतर्गत सुसज्ज खोली** - शाळेत बाला उपक्रमांतर्गत सुसज्ज वर्गखोली तयार करण्यात आली असून मुले परिसरातून व तयार केलेल्या वर्गखोलीच्या माध्यमातून अध्ययन करतात.

**समारोप** -


विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा उत्तम केंद्रबिंदू असून जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा सावली आदिवासी बहुर व नक्षलग्रस्त क्षेत्रात असून सुद्धा शिक्षक व गावकरी यांच्या सहकार्याने शाळेने विविध क्षेत्रात यश संपादन केले आहे. शाळेतर्फे गावातील चार सुशिक्षित बेरोजगार यांना रोजगार देण्याचे काम केले असून शाळेचा कायापालट लोकसहभागातून होत आहे.विविध पुरस्काराने सन्मानित ही सावली शाळा दिवसेंदिवस अशीच फुलत राहो हिच सदिच्छा..ध्येयाने झपाटलेला शिक्षकवर्ग व सक्षम ध्येयवेडे नेतृत्व जोपर्यंत या शाळेला लाभतील ही शाळा अशीच खुलत राहील, बहरत राहील...




विकासासाठी संदेश, बाबासाहेब पाच वर्षांची असताना,
आई भरण पावली,मीरा बाईनी (आत्या) सांभाळ केलं.
वाचन,चिंतन,मनन सदा गर्क, पुर्ण करार, चवदार तळ्याचे
सत्याग्रह १८ तास अभ्यास,प्राचीन भारतातील व्यापार
प्रबध लेखन २००० ग्रंथ होते. १९९७ मध्ये भारतात
परत आले, पत्रकार व संपादक आबेडकर राजकारणी व
अर्थशास्त्रज्ञ शिक्षणतज्ञ हरिजनांच्या उध्दारासाठी व
अस्पृश्य समुह उच्चाटन, भारतरत्न, किताबाने सन्मानित,
मसुदा समितीचे अध्यक्ष, बुध्दीमान, झुझार व्यक्तिमत्व.
भौमितीय आकृत्या
बिंदू
रेषाखंड
किरण
रेषा
कांहीकोन
लघुकोन
विशालकोन
त्रिकोण
आयत
नाव : कु.रेणुका यशवंत पाळनाडे
Quadrilaterals
विस्तार सूत्रे


३.पत्नीच्या मदतीने पुण्यात मुलीच्या तीन
शाळा काढल्या
४.शेतकऱ्याचा असूड
५:गुलामगिरी
६.ब्राम्हणाचे कसब
७.अस्प्रश्याना मानवतेची वागणूक दिली.
८.जनतेचे'महात्मा' हा किताब बहाल केला.
मौलिक अधिकार
प्राणी पेशी व वनस्पती पेशी
EARTH
परिसंस्था ECOSYSTEM


परिचय
छत्रपती शिवाजी महाराज
जन्म :-१९ फेब्रुवारी १६३० (शिवनेरी)
मृत्यु :-२ एप्रिल १६८० (रायगड)
१.मराठी साम्राज्याचे संस्थापक
२.एक सामर्थ्यशाली, प्रागतिक राज्य
३.मुघल व आदिलशाही फौजाचा सामना केला
४.महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकिय इतिहासामध्ये मोठा प्रभाव
५.धर्मनिरपेक्ष व सहिष्णु वृत्तीने राज्यकारभार
वाचन कोपरा




PLASTO


वाचन
कुटी




पिण्याचे पाणी
जल ही जीवन है।
WASH YOUR HANDS
हँड वाश स्टेशन
वाचनालय


Class:KG-1
दिशा उपदिशा


जि.प.वरिष्ठ प्राथ.आदर्श शाळा सावली
महाराष्ट्राचे मानबिंदु



----------**----------

# "विद्यार्थी नेतृत्व विकासातून शोधल्या गुणवत्ता विकासाच्या पाऊलवाटा"

**शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, इडोळी ता.जि हिंगोली.**

**शाळेचा ईमेल आयडी** - - aj9764513946@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.आत्माराम अर्जुनराव जाधव
**मोबाईल क्रमांक** - 9764513946
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - aj9764513946@gmail.com

**प्रास्ताविक** -

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा इडोळी शाळेने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान (टप्पा एक) मध्ये हिंगोली तालुक्यातून प्रथम क्रमांक मिळविला. टप्पा क्रमांक दोन मध्ये या शाळेने जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक पटकावला. हे सर्व करत असताना विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांमध्ये नोंदविलेला सहभाग व उपक्रमांचे आत्मविश्वासपूर्वक केलेले सादरीकरण ही शाळेसाठी सर्वात जास्त जमेची बाजू ठरली. अनेक विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांचे नेतृत्व केले. इतर विद्यार्थ्यांना सोबत घेऊन काम केले. यातून शाश्वत अध्ययन व आनंददायी अनुभवाकडे जाण्याचा मार्ग त्यांना मिळाला. नेतृत्व करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मदतीने गुणवत्ता विकासाचा प्रवास सुरू झाला.

**मुख्याध्यापक, शिक्षक यांना आलेल्या अडचणी** -

शाळेत काम करत असताना शिक्षक व मुख्याध्यापक यांना वारंवार विद्यार्थ्यांच्या शिस्तीचा प्रश्न उद्भवत असे. दिलेल्या सूचनांचे पालन करणे, अध्यापन किंवा इतर बाबी एकाग्रतेने ऐकणे, ठरवलेले नियम पाळणे, एकमेकांसोबत शांततापूर्वक काम करणे, स्वयंशिस्तीचे पालन करणे. इत्यादी बाबी विद्यार्थ्यांमध्ये अभावानेच दिसत असत. गटामध्ये किंवा जोडीने काम करताना विद्यार्थ्यांना अडचणी येत असत. विद्यार्थ्यांच्या एकमेकांच्या बाबतीत सतत तक्रारी येत असत. कधी कधी यामध्ये पालकांचा देखील हस्तक्षेप होत असे. परिणामी विद्यार्थ्यांच्या अंतरक्रिया प्रभावी होत नसत. विद्यार्थ्यांची एकमेकांकडून शिकण्याची प्रक्रिया मंदावली होती.

**अडचणींवर मात करण्यासाठी मुख्याध्यापक, शिक्षक यांनी केलेल्या प्रभावी उपाययोजना/अंमलबजावणी** -

यासाठी विद्यार्थ्यांना एकमेकांसोबत काम करण्याच्या विविध संधी देण्याचे ठरले. सर्वप्रथम शालेय मंत्रिमंडळ स्थापना करण्यात आले. त्याचबरोबर प्रत्येक वर्गामध्ये वर्ग मंत्रिमंडळ देखील स्थापन करण्यात आले. यामध्ये विविध विद्यार्थ्यांना नेतृत्व करण्याची संधी मिळाली. आपल्याला काहीतरी पद मिळाले आहे ही भावना विद्यार्थ्यांना प्रेरित करणारी ठरली. विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणाऱ्या या भावनेचा सकारात्मक उपयोग करून घेण्यासाठी पुढे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना नेतृत्वाची संधी देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले.

**बाल बचत बँक** -

विद्यार्थ्यांना विविध उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची व नेतृत्व करण्याची आवड निर्माण झाली. 2023 -24 या शैक्षणिक वर्षात 'स्वर्गीय काशीरामजी महाराज इडोळीकर बाल बचत बँक' सुरू करण्यात आली. यासाठी विद्यार्थ्यांमधून

एक बँक मॅनेजर - व एक असिस्टंट मॅनेजर म्हणून नेमणूक करण्यात आली. 2024 - 25 या शैक्षणिक वर्षात प्रत्येक वर्गासाठी स्वतंत्र बँक मॅनेजर नेमण्यात आले. त्याचप्रमाणे प्रत्येक वर्गासाठी स्वतंत्र विद्यार्थी ग्रंथपाल नेमण्यात आले. या उपक्रमातून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना पुढाकार घेण्याच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी उपयोग झाला. या उपक्रमात शाळेतील शंभर टक्के विद्यार्थी सहभागी झाले.

**वाचन कुटी -**

महावाचन चळवळीमध्ये शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. आमच्या शाळेतील प्रत्येक विद्यार्थी आवडीने पुस्तक वाचतात. प्रत्येक विद्यार्थ्याला पुस्तकाशी मैत्री झालेली आहे. पुस्तकाची गोडी वाढविण्यासाठी 'वाचन कुटी' हा एक पथदर्शक उपक्रम राबविण्यात आला. गावकऱ्यांनी आम्हाला श्रमदानातून वाचन कुटी तयार करून दिली. या वाचन कुटीमध्ये नेतृत्व करणारे विद्यार्थी पुस्तके ठेवतात आणि ते इतर विद्यार्थ्यांना वाचनासाठी उपलब्ध करून देतात. या वाचनकुटीचे भाव विश्व इतके बहरले आहे की, संत गाडगे महाराज यांची 'किती आनंदी आनंद, या झोपडीत माझ्या' ही कविता विद्यार्थ्यांना आपल्या भावविश्वाशी एकरूप करते. या सर्व उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचे भावविश्व श्रीमंत होत आहे. म्हणूनच विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी चालविलेले हे उपक्रम यशस्वी झाले.



**स्वच्छता मॉनिटर -**

प्रत्येक वर्गामध्ये स्वच्छता मॉनिटर नियुक्त करण्यात आले. त्यांनी शाळेत, गावात स्वच्छता मॉनिटर म्हणून काम केले. त्या संदर्भात 50 पेक्षा जास्त व्हिडिओ शाळेतील तसेच शिक्षकांच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वर अपलोड केलेले आहेत. परसबाग मित्र, वृक्षमित्र, वर्ग सजावट, शाळा सजावट इत्यादी उपक्रमांमध्ये देखील शाळेतील सर्वच विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला. या सर्व उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना हळूहळू एकमेकांसोबत काम करण्याची सवय निर्माण झाली. एकमेकांना सहकार्य करण्याची सवय निर्माण झाली. यातूनच पुढे गटात अध्ययन करण्याचे नियोजन करण्यात आले.

**विद्यार्थी अभ्यासाचे गल्लीगट -**

शालेय वेळेव्यतिरिक्त विद्यार्थ्यांनी स्वयं अध्ययन करावे व एकमेकांसोबत शिकून प्रगती करावी या हेतूने विद्यार्थ्यांचे अभ्यासाचे गल्लीगट तयार झाले. यासाठी पालकांनी देखील पुढाकार घेतला. आपल्या गल्लीतील विद्यार्थ्यांना निवडक पालक अभ्यासासाठी एकत्र बोलावतात. त्यांना वेळापत्रक तयार करून देण्यात आले आहे. बसण्यासाठी व्यवस्था तयार करून देण्यात आली आहे. तेथे विद्यार्थ्यांची नावे व त्यांच्या गटप्रमुखाची नावे यांची तक्ते लावण्यात आले आहेत. विद्यार्थी नियमितपणे गल्लीगटाचा लाभ घेतात व पालक त्यांचे फोटो वर्गांच्या व्हाट्सअप ग्रुप वर पाठवितात. पालक सभांमध्ये पालक अभ्यासाच्या गल्लीगटांविषयी अनुभव व्यक्त करतात. गल्लीगट उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये एकत्रितपणे काम करण्याची सवय अधिक खोलवर रुजत आहे. येथे विद्यार्थी एकमेकांना मदत करतात. एकमेकांसोबत शिकतात. आवश्यकता पडल्यास पालक मदतीला असतात. अशाप्रकारे गल्लीगट हा उपक्रम संपूर्ण गावामध्ये राबविला जातो. सकाळी व सायंकाळी दोन वेळा विद्यार्थी अभ्यासाला बसतात. काही ठिकाणी विद्यार्थ्यांच्या अभ्यासाच्या रूम शैक्षणिक साहित्याने सजविण्यात आल्या आहेत. हा उपक्रम येत्या काळात अधिक व्यापकपणे व 100% विद्यार्थ्यांना लाभ होईल या दृष्टीने राबविण्याचे नियोजन आहे.

**किड्स ॲज चेंज मेकर्स -**

ज्याच्यामध्ये बदल घडवून आणण्याची क्षमता आहे त्या कोणत्याही व्यक्तीला आपण चेंज मेकर असे म्हणू शकतो. लहान मुले चेंज मेकर असू शकतात यावर आमचा विश्वास आहे. खरे तर मुलेच जग बदलू शकतात या संकल्पनेवर दृढ विश्वास आहे. फिरकी ॲप वरील किड्स चेंज मेकर्स हा ट्रेनिंग प्रोग्राम केल्यानंतर ही संकल्पना आम्हाला सुचली. मुलांनी केलेल्या छोट्या छोट्या गोष्टींना प्रोत्साहन देणे, त्यांच्यातील अंगभूत नेतृत्व क्षमता व जीवन कौशल्य ओळखून त्यांना पुढील कार्यासाठी संधी उपलब्ध करून देणे हे काम या उपक्रमांतर्गत केले जाते. मुलांनी केलेली छोटी कृती ही त्यांच्या जीवनातील मोठ्या कृतीची सुरुवात असते. उदाहरणार्थ: वेदिका पांडुरंग टेकाळे इयत्ता सहावी ह्या विद्यार्थिनीने Read Along, Bhashini या ॲपचा वापर शिकल्यानंतर इतर विद्यार्थ्यांना देखील या ॲप विषयी माहिती दिली. त्या क्षेत्रातील ती चेंज मेकर झाली. तिच्या पुढाकारामुळे अनेक विद्यार्थ्यांना देखील लाभ झाला. आता जास्तीत जास्त बदल घडवून आणण्यासाठी अशा चेंज मेकर विद्यार्थ्यांचा फायदा होत आहे.

याच प्रकारे वेगवेगळ्या उपक्रमामध्ये वेगवेगळे विद्यार्थी चेंज मेकर म्हणून काम करतात. स्वच्छता मॉनिटर (प्रत्येक वर्गात दोन), परसबाग मित्र (5), पुस्तक मित्र (16), अभ्यास मित्र (20), कचरा पुनर्वापर निरीक्षक (5), क्रीडा साहित्य मित्र (5), वृक्षमित्र (50), वाचन कुटी मित्र (4), बचत बँक मॅनेजर (8), शालेय वस्तू भांडार (4), स्पोकन इंग्लिश क्लब (15) इत्यादी उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी नेतृत्व करून त्या त्या क्षेत्रामध्ये बदल घडवून आणला आहे. या प्रकारे मुले चेंज मेकर म्हणून काम करतात.

**महावाचन चळवळ -**

यावर्षी शालेय परिसरात लोकसहभागातून वाचन कुटी तयार करण्यात आली आहे. 'पूज्य साने गुरुजी वाचन कुटी' असे नामकरण करून, काम करण्यासाठी सुरुवातीला चार विद्यार्थ्यांना वाचन कुटी मित्र म्हणून संधी देण्यात आली आहे. हे विद्यार्थी आपले काम अत्यंत चोख व प्रामाणिकपणे पार पाडतात. कुटीमध्ये पुस्तके लावणे, काढून ठेवणे, विद्यार्थ्यांना पुस्तके पुरविणे, इतर विद्यार्थ्यांना यामध्ये उत्साहाने सहभागी करून घेणे इत्यादी जबाबदारी ते पार पाडतात.

विद्यार्थी जेवणाच्या सुट्टीत व इतर मिळालेल्या वेळेमध्ये वाचन कुटीचा लाभ घेतात. आजूबाजूला शिक्षक उपस्थित नसताना देखील विद्यार्थी शिस्तीने रांगेत उभे राहून वाचन कुटीतील पुस्तके घेतात आणि परत करतात. शाळेतील वाचनालय हे विद्यार्थी समृद्धीचे केंद्र बनले आहे. या वाचन कुटीसाठी गावातील 'गौतमी स्वयंसहायता महिला बचत गटाने' 5000 रुपये किमतीची पुस्तके शाळेला मदत म्हणून दिली आहेत. यामध्ये प्रथम प्रकाशन, तुलिका प्रकाशन इत्यादी प्रकाशनांची मराठी, इंग्रजी व द्विभाषिक पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली आहेत. वाचन चळवळीमध्ये विद्यार्थी आता उत्स्फूर्तपणे सक्रिय झालेले आहेत.

**स्पोकन इंग्लिश फ्रेंड्स -**

स्पोकन इंग्लिश फ्रेंड्स या उपक्रमांतर्गत काही विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला आहे. हे विद्यार्थी शालेय वेळे व्यतिरिक्त नियमितपणे दोन वाक्यरचना शिकतात. त्यातून स्वतःची पन्नास वाक्य बनवितात आणि ही बनवलेली वाक्य इतर विद्यार्थ्यांना गटामध्ये ऐकवतात. प्रत्येक विद्यार्थी 10 पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना या उपक्रमात सहभागी करून घेतो. अशाप्रकारे विद्यार्थी शिकतात व इतरांना शिकवतात. विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेल्या पुढाकाराच्या व सहयोगाच्या वृत्तीमुळे उपक्रम व कृती सहजतेने यशस्वी होत आहेत. आता विद्यार्थ्यांना गटात काम करण्याची आवड निर्माण झाली आहे. शिकण्याची आणि शिकविण्याची गोडी निर्माण झाली आहे. त्यामुळे विद्यार्थी गुणवत्ता विकासाचा वेग वाढला आहे.

**माझी जागा माझा फळा -**

BaLA उपक्रमांतर्गत शालेय परिसरामध्ये विविध ठिकाणी व्हाईट बोर्ड व ग्रीन बोर्ड विद्यार्थ्यांना लिहिता येतील अशा उंचीवर लावण्यात आले आहेत. या विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या जागा शालेय परिसरात ठिकठिकाणी आहेत. याचा वापर करण्याचे स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना देण्यात आले आहे. विद्यार्थी गट अध्ययन करण्यासाठी या जागांचा प्रभावी वापर करत आहेत. शाळा भरण्यापूर्वी किंवा शाळा सुटल्यानंतर देखील येथे विद्यार्थी गटाने अभ्यास करताना दिसतात. वाचलेल्या पुस्तकातून मिळालेली माहिती लिहिण्यासाठी त्या माहितीवर आधारित प्रश्न तयार करण्यासाठी विद्यार्थी या जागेचा वापर करताना आढळून आले आहेत.




**शालेय परिसराचा विद्यार्थी क्षमता विकासाकरिता प्रभावी वापर -**

शालेय परिसराच्या प्रत्येक कानाकोपऱ्याचा विद्यार्थ्यांच्या क्षमता विकासाकरिता उपयोग करून घेतला जात आहे. मुलांना खेळण्यासाठी विविध जागा तयार करण्यात आल्या आहेत. क्रीडांगण व व्हारांड्यामध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबवण्यासाठी जागा तयार करण्यात आल्या आहेत. महावाचन चळवळ उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी वाचन कुटी व्यतिरिक्त वाचन कट्टा नावाची एक जागा तयार करण्यात आली आहे. येथेही विद्यार्थी वाचन करतात. तसेच परिसरात वाचन करत बसण्यासाठी टायर सीट उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. शालेय आवारात विद्यार्थी गरजेनुसार मूर्ती काम, रंगकाम, खेळ, कागदकाम इत्यादी कामे करतात. गरजेनुसार विद्यार्थ्यांना गट पद्धतीने शिकविण्यासाठी शालेय आवाराचा वापर केला जातो. शालेय आवार वाचन समृद्ध असल्यामुळे प्रत्येक कानाकोपऱ्यात विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी विविध गोष्टी व चित्रे दिसून येतात. 'माझी शाळा माझे झाड' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना एक झाड संवर्धनासाठी वाटून देण्यात आलेले आहे. या झाडांवर विद्यार्थ्यांच्या नावाच्या पाट्या दाखवण्यात आल्या आहेत. एकमेकांची नावे वाचत असताना नव्यानेच वाचन शिकणाऱ्या मुलांना हे एक शिकण्याचे साधन म्हणून देखील वापरल्या जाते. प्रत्येक सोयी सुविधेच्या ठिकाणी लेबलिंग केलेली असल्यामुळे तेथे देखील नव्याने वाचन शिकणाऱ्या मुलांसाठी प्रिंट रीच वातावरण मिळते. विविध खेळाची क्रीडांगणे विद्यार्थी स्वतः आखतात. रेन वॉटर हार्वेस्टिंग , कचरा पुनर्वापर, परसबाग, हँडवॉश स्टेशन मॅनेजमेंट इत्यादी कामांसाठी विद्यार्थ्यांना जबाबदाऱ्या सोपविण्यात आलेल्या आहेत. अशाप्रकारे परिसराचा अत्यंत सुंदर वापर अध्ययन अध्यापनामध्ये करून घेतल्या जातो. त्यातून विद्यार्थ्यांच्या क्षमतांचा विकास होतो.

**पालक सभा व माता पालक कार्यशाळा -**

विद्यार्थ्यांमध्ये घडत असलेले सकारात्मक बदल पाहून पालक सभांना पालकांचा उत्स्फूर्त सहभाग मिळत आहे. पालक सभांच्या माध्यमातून जागरूक पालकत्व निर्माण करण्यासाठी शाळेद्वारे काम केले जात आहे. निपुण भारत अभियान अंतर्गत माता पालकांच्या कार्यशाळांना देखील चांगला प्रतिसाद मिळत आहे. छत्रपती संभाजी नगर विभागाचे विभागीय निपुण

समन्वयक यांनी माता पालक कार्यशाळेला भेट दिली व समाधान व्यक्त केले. माता पालकांची देखील गुणवत्ता विकासासाठी भरीव मदत मिळत आहे. शाळेसाठी त्यांचा उपयोग आम्ही करून घेत आहोत.

माता पालक देखील आता लोकसहभागामध्ये मागे नाहीत. निपुण भारत अभियानांतर्गत लीडर माता सक्रियपणे काम करत आहेत. याचा शालेय गुणवत्तेवर सकारात्मक परिणाम दिसून येत आहे. भविष्यात शिक्षण व जागरूक पालकत्व या विषयावरील कार्यशाळा राज्यस्तरीय तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली शालेय परिसरातच नियोजित करण्यात आल्या आहे.

**फलनिष्पत्ती / यशोगाथा -**

विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेल्या सकारात्मक बदलांमुळे लोकसहभाग उत्स्फूर्तपणे वाढला आहे. शाळेतील सर्व उपक्रमाचे यश म्हणजे 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात' (टप्पा एक) शाळेने तालुक्यातून पहिला क्रमांक मिळवत तीन लाखाचे बक्षीस मिळविले. दुसऱ्या टप्प्यामध्ये लोकसहभाग जास्त वाढला. दिवस रात्र शाळेसाठी झटणारे ग्रामस्थ तयार झाले, शाळेशी जोडल्या गेले. त्यांनी शाळेसाठी आवश्यक सर्व कामे कमी कालावधीत करून दिली. लोकसहभागाच्या बळावर व शाळेतील राबवलेल्या विविध उपक्रमाच्या यशामुळे 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानाच्या' दुसऱ्या टप्प्यामध्ये अधिक परिणामकारक कामगिरी करत शाळेने जिल्ह्यातून पहिला येण्याचा मान मिळविला व अकरा लाखाचे बक्षीस पटकावले. एकूण 14 लाखांचे बक्षीस मिळविण्यासाठी शाळा यशस्वी झाली. या बक्षिसातून शालेय गुणवत्ता वाढीचे नियोजन करण्यात येत आहे. प्रामुख्याने आधुनिक संगणक, पुस्तके, कृतीयुक्त अध्ययन अध्यापनासाठी शैक्षणिक साहित्य व फर्निचर, क्रीडा साहित्य, डिजिटल स्मार्ट बोर्ड, विविध विषयाचे शिकणे सुलभ होण्यासाठी आवश्यक शैक्षणिक साहित्य खरेदी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यातून गुणवत्ता वृद्धिंगत होण्यास मदत होणार आहे. शालेय विद्यार्थी व शिक्षकांनी केलेल्या प्रयत्नांना प्रतिसाद म्हणून शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थ अधिक सक्रियपणे शालेय प्रगतीसाठी प्रयत्न करत आहेत. शाळेसाठी मदतीचा ओघ दिवसेंदिवस वाढत आहे. शिकण्या शिकविण्याची प्रक्रिया गतिमान झाली आहे आणि हीच आमची यशोगाथा आहे.




मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान टप्पा 2 विभागस्तरीय मुल्यांकन समिती




मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान टप्पा 2 जिल्हास्तरीय मुल्यांकन समिती

**समारोप -**

शाळेचे नियोजन, सर्वांचे टीम वर्क, विद्यार्थ्यांचा कृतीयुक्त सहभाग आणि ग्रामस्थांचे योगदान या बळावर आमच्या शाळेने गुणवत्ता विकासाच्या अनेक पाऊलवाटा शोधून काढल्या आहेत. स्थळ, काळ व वेळ सापेक्ष उपक्रमांमध्ये कल्पकता वापरण्यात आली आहे. छोट्या छोट्या पाऊलवाटांनी सुरू झालेला हा प्रवास आता विस्तार करू पाहत आहे. भविष्यात मुलांच्या कल्पकतेला अजूनही धुमारे फुटत जातील व मोकळ्या आकाशात ते यशस्वी विहार करताना दिसतील.

**फोटो व्हिडिओ लिंक -**

https://drive.google.com/drive/folders/17h-OsFsKHz0-CSxtMAAkBkEWryIxBX-v

----------**----------

# "चला बाल वैज्ञानिक घडवूया'

## शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा कोंढुर ता.कळमनुरी जि.हिंगोली

**शाळेचा ईमेल आयडी** - kondhur123@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.जगन्नाथ परसराम बेद्रे
**मोबाईल क्रमांक** - 9923196109
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - kondhur123@gmail.com

**प्रास्ताविक** -

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा कोंढूर ही ग्रामीण भागातील शाळा असून त्या गावची लोकसंख्या 4500 च्या जवळपास आहे. ही शाळा हिंगोली जिल्ह्यातील कयाधू नदीच्या काठावरती वसलेली आहे. अतिगंभीर पूरस्थिती निर्माण झाल्यास शाळेच्या काही वर्गात पाणी येत असते. या शाळेतील विद्यार्थ्यांना शिकवत असताना त्यांच्या चंचलपणामुळे त्यांना काय शिकवावे, कसे शिकवावे, असा प्रश्न नेहमीच पडायचा. कितीही रंजकतेने खडू आणि फळ्यांच्या मदतीने शिकवण्याचा प्रयत्न केला तरी ती निरसपणे अध्ययन करत असल्याचे जाणवत होते. अशा मुलांना अध्यापनात खिळवून ठेवण्यासाठी काहीतरी वेगळे करायला हवे असल्याचे आमच्या लक्षात आले. आता पारंपारिक शिक्षण पद्धती बदलुन ऑनलाईन शिक्षणाच्या माध्यमातून पुढील वाटचाल करावी असे ठरवले. सोबतच 21 व्या शतकातील कौशल्ये मुलांमध्ये रुजवणे गरजेचे असल्याचे लक्षात आले. त्यासाठी सर्वप्रथम शाळेतील 100% शिक्षक तंत्रस्नेही होतील यासाठी प्रयत्न केले. त्याचा परिणाम म्हणून शाळेतील काही शिक्षकांना राज्यस्तरावर तंत्रस्नेही शिक्षक म्हणून काम करण्याची संधी मिळाली. सर्व शिक्षकांच्या ज्ञानाचा उपयोग मुलांना शिकते करण्यासाठी कसा उपयोग होईल याचा विचार करू लागलो. आजच्या काळात विज्ञान विषय इतका विस्तृत आणि रंजक आहे की ज्यातून विद्यार्थी विकास चांगल्या प्रकारे साधता येऊ शकतो. विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेला चालना मिळू शकते. प्रत्येक विद्यार्थ्यात वैज्ञानिक सृजनशीलता असते. विद्यार्थ्यांना योग्य वातावरण, व्यासपीठ मिळाले तर त्यांचे विज्ञान विषयातील सर्व संकल्पना स्पष्ट करता येऊ शकतात आणि सोबतच विज्ञान विषयात विशेष रुची वाढवण्यास मदत होते. आपल्या देशातील, राज्यातील काहीं शाळेमध्ये विज्ञान विषयावर जे नाविन्यपूर्ण प्रयोग केले जातात तसे प्रयोग आपल्या शाळेत राबवले जावेत असे आम्हाला वाटले. पुस्तकात दिलेले प्रयोग प्रत्यक्षात मुलांनी करून पहावेत, त्यासोबतच पुस्तकाबाहेरील प्रयोग करण्यास मुलांना प्रेरणा मिळणे गरजेचे आहे हे जाणवले. अंतराळ अभ्यास हा विषय पण विद्यार्थ्यांना माहित व्हावा, त्याबाबत सर्व संकल्पना स्पष्ट व्हाव्यात जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन तयार होईल. असे आम्हा सर्वांना वाटत होते. 21 व्या शतकातील कौशल्य अंतर्गत एअरक्राफ्ट विज्ञान, विमानाचे प्रकार, रोबोटचे प्रकार, उपग्रह प्रक्षेपण केंद्र हे शिकवणे गरजेचे आहे हे देखील जाणवले.

आम्हाला वाटलेल्या वरील सर्व गोष्टी मुलांमध्ये पाहायला मिळाव्यात म्हणून आम्ही विद्यार्थ्यांसाठी 'चला बनूया बाल वैज्ञानिक' हा उपक्रम शाळेत राबविण्याचे निश्चित केले. याची सुरुवात मुलांना शास्त्रज्ञांच्या जीवनचरित्राचा थोडक्यात परिचय करून देण्यापासून झाली. पुढे या उपक्रमाअंतर्गत शाळेत आकाशदर्शनाच्या कार्यशाळा घेऊन त्या सोशल मिडीयावरती प्रकाशित केल्याने अन्य शाळांनी यातून बोध घेऊन अशाच स्वरूपाच्या कार्यशाळा घेण्यासाठी उद्युक्त झाल्या. जिल्ह्यातील तसेच महाराष्ट्रातील हजारो विद्यार्थ्यांना चंद्र, शुक्र, गुरु, बुध असे ग्रह प्रत्यक्षात पाहण्याची संधी मिळाली. सर्व विद्यार्थ्यांचा उत्साह, गावातील नागरिकांचा भक्कम पाठींबा यामुळे पुढे इसरोच्या आजादी सॅट 1&2 सॅटलाईट निर्मितीत

शाळेतील दहा मुलींचा सहभाग घेता आला. या मुलींना सर्वांकडून 'युवा बाल वैज्ञानिक' म्हटले जाऊ लागले. यावरून आमच्या उपक्रमाचे "चला बालवैज्ञानिक घडवूया" हे नाव सार्थ ठरले असे आम्हाला वाटते.

**मुख्याध्यापक / शिक्षक यांना विषयासंदर्भात आलेल्या अडचणी –**

- उपक्रम राबवत असताना काही प्रयोगाच्या प्रक्रियेच्या अनुषंगाने समस्या आणि अडचणी आल्या.
- प्रयोग करत असताना त्यासाठी लागणारी रसायने ग्रामीण भागात उपलब्ध नव्हती.
- प्रयोगादरम्यान रसायने वापराच्या अनुषंगाने काही समस्या जाणवत होत्या.
- उपक्रम राबवत असताना कोणकोणत्या संकल्पनाचा समावेश नियोजनात करावा हा खूप महत्त्वाचा प्रश्न आमच्यासमोर होता.
- विद्यार्थ्यांना आकाशदर्शनाचा लाभ घेता यावा यासाठी शाळेमध्ये टेलिस्कोप नव्हता.
- उपक्रमासाठी लागणारी आवश्यक साधन सामुग्री जसे कि संगणक, प्रोजेक्टर, कॉलर माईक इत्यादी सुविधा कशा मिळवाव्या ही एक अडचण होती.
- शाळेतील विद्यार्थ्यांना इसरो या ठिकाणी घेऊन जाण्यासाठी पालकांची परवानगी आवश्यक होती.
- इसरो या ठिकाणी जाण्यासाठी जास्त खर्च येणार होता त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करणे हे एक आव्हान होते.

**अडचणीवर मात करण्यासाठी मुख्याध्यापक शिक्षक यांनी केलेल्या उपाय योजना तथा मुख्याध्यापक किंवा शिक्षक यांनी प्रभावी कामासाठी केलेले नियोजन व त्याची अंमबजावणी -**

**उपक्रमाचे नियोजन -**

उपक्रम राबवण्याअगोदर मुलांच्या विज्ञान विषयांच्या अनुषंगाने निरीक्षण केले असता विज्ञान विषयात आवड तर भरपूर आहे पण त्यांना संधी मिळाली नव्हती किंवा प्रत्यक्ष अनुभव देता आला नव्हता असे आढळून आले. एक दिवस पाठ्यपुस्तकाबाहेरील प्रयोग करण्यासाठी मुलांना साहित्य घरून आणण्यास उद्युक्त केले. विद्यार्थांनी आवडीने साहित्य आणून प्रयोग पूर्ण केला. त्यांच्या ह्याच जिज्ञासेला पुढे घेऊन जाताना अवकाश, अंतराळ, खगोलशास्त्र यावर माहिती विचारली असता मुलांना यातील बऱ्याच गोष्टी माहिती नसल्याचे जाणवले. यासाठी शाळेत उपलब्ध असलेल्या अस्ट्रोनॉमी क्लबअंतर्गत खरेदी केलेला टेलिस्कोप कार्यन्वित करायचे ठरवले.

या उपक्रमाचे नियोजन माहे - जुलै - 2022 ते एप्रिल - 2023 पर्यंत करण्यात आले होते. यामध्ये सर्वप्रथम इयत्ता सहावी, सातवीच्या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

उपक्रमासाठी आवश्यक बाबींचा व साधनांचा पूर्वविचार करून त्याची यादी तयार करण्यात आली. उपक्रम सुरू होण्यापूर्वी त्याची उपलब्धता करण्यात आली. लोक सहभागातून 26000 रुपयांचा टेलीस्कोप खरेदी केली होता. शाळेला लोकसहभागातून खरेदी केलेले प्रोजेक्टर, इंटरॲक्टिव्ह बोर्ड, स्मार्ट टीव्ही आणि संगणक संच इत्यादी अवश्यक सामुग्रीची खरेदी करण्यात आली. विज्ञान थीम अभ्यासक्रम अंतर्गत प्रत्येक महिन्यात राबवायच्या थीमसाठीचे व्हिडियो डाऊनलोड करण्यात आले. उघड्या डोळ्यांनी आकाश निरीक्षण करता यावे यासाठी एक लेझर खरेदी करण्यात आला. काही उपयुक्त ॲप, ऑनलाईन चाचणी, रेकॉर्डिंग साधने, उपक्रम पूर्व चाचणी, उत्तर चाचणी (प्रश्नावली) आदींची निर्मिती करण्यात आली. प्रत्येक महिन्यात कोणते प्रयोग करायचे त्यांची यादी करण्यात आली. त्यासाठी कोणते साहित्य लागेल याचाही संग्रह करण्यात आला. प्रत्येक महिन्यात कोणकोणत्या शास्त्रज्ञांची जयंती,पुण्यतिथी आहे याची यादी तयार करण्यात आली.

शास्त्रज्ञांच्या माहितींवर आधारित  भाषणे तयार करण्यात आली. नाविन्यपूर्ण विज्ञान केंद्रातील ५२० प्रयोग वापरण्याचे नियोजन करण्यात  आले.  इसरो, स्पेस किड्स इंडियाने पाठवलेले पेलोड किट वापरण्याचे नियोजन करण्यात आले.

**कार्यवाहीचा कृती कार्यक्रम**

**कृती क्र.1 प्रयोग सादरीकरण -**

या उपक्रमासाठी आठवड्यातून किमान दोन प्रयोग करायचे  नियोजन करून दर शनिवारी ते घेण्यात आले. आपणास कोणता प्रयोग या आठवड्यात घ्यायचा आहे हे ठरवून त्यासाठी  आवश्यक असणारे साहित्य कोणते लागेल ? याचा सूक्ष्म अभ्यास करून विद्यार्थ्यांना त्यांच्या घरी असणाऱ्या निरुपयोगी वस्तू आणण्यास उद्युत केले गेले. त्यामुळे विद्यार्थी अतिशय उत्साहाने "मी आणू का ? मी आणू का ?" असे विचारू लागले अशा पद्धतीने निरुपयोगी साहित्य उपयोगात आणले गेले. मुलांच्या मदतीने सर्व वर्गातील मुलांच्या समोर त्या प्रयोगाचे सादरीकरण केले गेले. त्यामुळे सर्वांना समजण्यास मदत झाली. पुस्तकातील सर्व प्रयोगांचे  सादरीकरण तर झालेच त्यासोबतच अन्य 40-50 प्रयोगांचे ही सादरीकरण मुलांनी केले यावर आधारित एका पुस्तकाचेही लेखन आम्ही शिक्षकांनी केले.







**कृती क्र.2 नाविन्यपूर्ण विज्ञान केंद्रातील प्रयोग -**

आमच्या शाळेत नाविन्यपूर्ण विज्ञान केंद्र  आहे. या विज्ञान केंद्रातील 520 प्रयोगापैकी 343 प्रयोगाचे आतापर्यंत मुलांसोबत सादरीकरण करण्यात आले आहे. त्यासाठी दररोज सकाळी परिपाठ, प्रसंगी शिक्षकाकडून सादरीकरण करण्याचे नियोजन करण्यात आले. त्यानंतर आता शाळेतील प्रत्येक विद्यार्थी तोच प्रयोग आपल्या अन्य मित्रासमोर सादरीकरण करू लागला. या नाविन्यपूर्ण विज्ञान केंद्रातील प्रत्येक प्रयोगाची कृती आणि सविस्तर विश्लेषण क्यु आर कोड  स्वरूपात बंदिस्त असून विद्यार्थी अगोदरच्या दिवशी तो क्यूआर कोड स्कॅन करून त्याबद्दल माहिती घेऊनच सादरीकरण करू लागले.

**कृती क्र.3 थीमयुक्त विज्ञान अभ्यासक्रम -**

या उपक्रमासाठी प्रत्येक महिन्यात मुलांना विज्ञानातील नाविन्यपूर्ण गोष्ट शिकता यावी यासाठी प्रत्येक विषयावर / घटकावर आधारित अभ्यासक्रम ठरविण्यात आला.त्यासाठी वेगवेगळ्या थीम निर्माण करून प्रत्येक महिन्यात कोणती थीम घ्यायची ? त्या थीम अंतर्गत कोणकोणते घटक घ्यायचे ? याचे नियोजन करण्यात आले . त्या थीमच्या संदर्भात श्री सुरज कदम सर व सुशांत पाईकराव या विज्ञान तज्ञांनी तयार केलेला अभ्यासक्रम आमच्या शाळेत राबवायचे ठरवले. श्री सुरज कदम सर हे 14 वर्षे अमेरिकेत शिक्षण क्षेत्रावर काम करण्यासाठी गेले होते तेथील विज्ञान विषयावर जे काही प्रयोग केले जातात याबाबतची सविस्तर माहिती त्यांच्याकडे होते. प्रत्येक थीम तयार करताना सरांचे मार्गदर्शन खूप मोलाचे ठरले. यात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला होता. शास्त्रज्ञ तयार होण्यासाठी जसे वातावरण सभोवताली असावे लागते तसे नियोजन तयार करून प्रत्येक महिन्यात त्या थीममधील घटक घेऊन त्यांचा सराव घेतला गेला. त्यासाठी शाळेतील प्रोजेक्टर तथा इतर साधने खूप कामी आले.

**कृती क्र.4 जयंती पुण्यतिथी साजरी करणे -**

या उपक्रमासाठी आम्ही प्रत्येक महिन्यात कोणकोणत्या शास्त्रज्ञांच्या जयंती पुण्यतिथी आहे यांचा एक चार्ट तयार केला.त्या साजऱ्या करत असताना भाषण स्वरूपात त्यांच्याविषयी, त्यांच्या शोधाविषयी माहिती सांगण्यात आली. याअनुषंगाने उपलब्ध असेलेले चित्रपट दाखवण्यात आले.

**कृती क्र.5 आकाश निरीक्षण -**

या उपक्रमाअंतर्गत शाळेत विज्ञान विषयाच्या जागृतीच्या अनुषंगाने कृती राबवण्यात येऊ लागल्या. त्यामध्ये आकाशदर्शन ही कृती राबविण्यासाठी शाळेत टेलिस्कोप असणे गरजेचे होते. म्हणून पालकांच्या सहकार्यातून लोकसहभागातून 26000 रुपयांचा टेलीस्कोप खरेदी करण्यात आला. सदर टेलिस्कोपच्या सहायाने शाळेतील विद्यार्थी, गावकरी यांना प्रथमच कधीही न पाहिलेले चंद्र, शुक्र, गुरु ,शनी असे ग्रह व त्यांचे उपग्रह पाहण्याची संधी उपलब्ध करून दिली गेली. त्यासाठी 21 ऑक्टोबर २०२२ रोजी आयुका आणि लायगोचे दोन शास्त्रज्ञ यांच्या मदतीने तीन टेलिस्कोपच्या मदतीने शाळा व्यवस्थापन समितीच्या पुढाकाराने शुक्र,शनी, गुरु ग्रह पाहण्याची संधी एकाच ठिकाणी करण्यात आली. गावातील वडीलधारी,ज्येष्ठ व्यक्ती,ज्यांनी फक्त पोथी पुराणात ग्रहांची नावे ऐकली होती ते ग्रह प्रत्यक्ष पाहण्यास मिळाल्याने त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला. त्यानंतर प्रत्येक महिन्यात या विषयाच्या अनुषंगाने एक किंवा दोन कार्यशाळा आयोजित करण्यात येऊ लागल्या. त्यांचे फोटो सोशल मीडियावर share केल्याने अन्य शाळानी ते फोटो पाहून त्यांच्या शाळेतील मुलांना आकाशदर्शन करता यावे असे त्यांना वाटत होते. त्यामुळे आमच्या शाळेतील टेलीस्कोपच्या मदतीने अन्य शाळातील विद्यार्थ्यांना ग्रह पाहता येतील अशा कार्यशाळा घेतल्या. गणेशवाडी, मेथा, बेलथर ,बाभळी, असोलवाडी, कनका,बासंबा अशा जवळपास 57 ठिकाणी कार्यशाळा आयोजित केल्या. यातून हजारो विद्यार्थी आकाश दर्शनाचे लाभार्थी ठरले.

**कृती क्र.6 सॅटेलाईट निर्मिती व इसरो सफर -**

संयुक्त राष्ट्रसंघाचे 'प्रत्येक महिला उपग्रहात गेली पाहिजे', तसेच मा.पंतप्रधान साहेबांचे 'बेटी पढाओ बेटी बचाओ' ही उद्दिष्ट साध्य करण्यासाठी भारत सरकारच्या नीती आयोगाने व स्पेस किड्स इंडियाने इसरोच्या मदतीने आजादी सॅट 1 सॅटलाईट बनवण्याचे काम हाती घेतले. त्यात संपूर्ण देशभरातून 75 शाळा सहभागी झाल्या होत्या. त्यात आमच्याही शाळेचा सहभाग होता. आजादी सॅटेलाईट स्पेस किडस इंडियाच्या युवा शास्त्रज्ञानी तयार केले ते जगातील पहिले मुलींनी बनवलेले कमी वजनाचे सॅटलाईट ठरले. सदर सॅटेलाईट निर्मितीसाठी आमच्या शाळेतील मुलींना सहभागी होता आले. त्याचे प्रक्षेपण 8 ऑगस्टला श्रीहरीकोटा येथून होणार असल्याने आम्ही त्या उपक्रमात सहभागी दहा मुलींना विमानाने इसरो येथे घेऊन गेलो. आमच्या शाळेतील मुलींनी तेथील वैज्ञानिक स्पेस किड्स इंडियाच्या श्रीमती केसन मॅडम, इस्त्रोचे अध्यक्ष श्री सोमनाथ

यांच्याशी वार्तालाप करून बऱ्याचशा गोष्टी समजून घेतल्या. सकाळी 9:18 ला प्रक्षेपण झाल्यावर तेथील तारांगण, 3 डी चित्रपट, अर्थ स्पेअर हे सगळे मुलींनी प्रत्यक्ष अनुभवले. हैदराबाद येथे आल्यावर मेट्रोचा प्रवास पहिल्यांदाच अनुभवला. ग्रामीण भागातील मुलींना जिल्ह्याच्या बाहेर जाणे हीच मोठी गोष्ट होती. पण या इसरो सफरच्या माध्यमातून मुलींनी दुसऱ्या राज्यात प्रवेश केला होता.संपूर्ण महाराष्ट्र राज्यात या गोष्टीची चर्चा झाली. दुर्गम भागातील, ग्रामीण भागातील आमच्या शाळेतील मुलींच्या सॅटेलाईट निर्मितीच्या सहभागामुळे तत्कालीन विभागीय आयुक्त मा. श्री सुनिल केंद्रेकर साहेब यांनी प्रत्येक जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना इसरो विज्ञान सहल कशी घडवून आणता येईल यावर विचार व्हावा असे सर्व जिल्ह्यांना `आदेशित केले. ही आमच्या शाळेसाठी खूप मोठी उपलब्धी म्हणावी लागेल.




**उपक्रमाची यशस्वीता/फलनिष्पती –**

"चला बाल वैज्ञानिक घडवूया" या उपक्रमामुळे केवळ आमचीच शाळा नव्हे तर अन्य शाळेतील विद्यार्थी जे की आमच्या संपर्कात होते अशा सर्वच विद्यार्थ्यांना खूप मोठा फायदा झाला.

- विद्यार्थ्यांना ऍस्ट्रॉनॉमिक क्लब विषयी संपूर्ण माहिती झाली.
- ऍस्ट्रॉनॉमिक क्लब स्थापन होऊन वैज्ञानिक दृष्टिकोनाचे दृढीकरण झाले.
- आपल्या सभोवताली असणाऱ्या गोष्टींचा उपयोग प्रयोग करण्यासाठी करण्यात येऊ लागल्याने 7 आर आर हे पर्यावरण स्नेही उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मदत झाली.
- शालेय विद्यार्थ्यांना अंतराळविषयी संपूर्ण माहिती झाली. त्यातील मानवीक्रिया कशा होतात हेही माहिती होण्यास मदत झाली.
- विद्यार्थ्यांना उपग्रह प्रक्षेपण केंद्र कसे असते ? त्या ठिकाणावरून कोणकोणते उपग्रह सोडले जातात? त्यासाठी कोणत्या प्रकारची प्रक्रिया करावी लागते ? त्या उपग्रह प्रक्षेपणाचा काय फायदा होतो ? याविषयी संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना झाली.
- एकविसाव्या शतकातील कौशल्य वृद्धिगत होण्यासाठी विद्यार्थ्यांना रोबोटिक्सचा परिचय होऊन वेगवेगळ्या प्रकारचे रोबोट कसे तयार केले जातात ? याबद्दल माहिती मिळाली. आपल्या शाळेत प्राप्त रोबोटिक्सकिटच्या मदतीने मुलांनी वेगवेगळ्या स्वरूपाचे काही रोबोटचे मॉडेल तयार केले.
- आय एस एस ही एक खूप मोठी संस्था असून त्या संस्थेच्या संदर्भात विद्यार्थ्यांना संपूर्ण माहिती होण्यास मदत झाली.
- रॉकेट कसे उडवले जाते ? रॉकेट उडवण्यामागे कोणते विज्ञान असते ? याबद्दल माहिती झाली. रॉकेट्रीचा संपूर्ण परिचय विद्यार्थ्यांना माहिती होऊन विद्यार्थी बाल वैज्ञानिक होण्यास मदत झाली.
- कोणताही प्रयोग करताना त्यासाठी कोणकोणत्या पायऱ्या पूर्ण कराव्या लागतात ? म्हणजे निरीक्षण, परीक्षण, प्रयोग, निष्कर्ष या टप्प्यातून प्रत्यक्ष अनुभव घेण्यास विद्यार्थ्यांना शिकविल्याने विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन दृढ होण्यास मदत झाली.

- विज्ञान व तंत्रज्ञानाचा दैनंदिन जीवनातील अतिरेकी वापर यातून निर्माण होणाऱ्या समस्या, त्यासाठी आवश्यक जागरूकता याबाबतची जागृती होण्यास मदत झाली.




**समारोप -**

या उपक्रमामुळे गुणवत्ता वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणात मदत झाली आहे. हा उपक्रम म्हणजे मुलांच्या संपूर्ण पायाभूत व्यक्तिमत्व विकासासाठी आवश्यक प्रयत्नाचा, विज्ञान विषयासाठी केलेल्या प्रयत्नांचा सुंदर मिलाप होता. केवळ आमच्याच शाळेतील विद्यार्थी नव्हे तर महाराष्ट्र राज्यातील जवळपास 57 ठिकाणी आकाशदर्शनाच्या विविध कार्यशाळा घेऊन चंद्र, शुक्र,शनी, गुरु असे ग्रह तारे प्रत्यक्ष पाहण्याची संधी हजारो शिक्षक, विदयार्थी, पालकांनाही मिळाली.

उपग्रह प्रक्षेपण केंद्र काय असते ? हे आमच्या शाळेतील किंवा जिल्ह्यातील कोणालाही माहीत नव्हते पण आजादी सॅट 1 & 2 नावाच्या सॅटलाईट निर्मितीत आमच्या शाळेतील दहा मुलींना सहभागी होता आले. ही आमच्यासाठी खूप मोठी अभिमानाची घटना वाटली. यामुळे हिंगोली जिल्ह्यातील सर्व विद्यार्थ्यांना श्रीहरीकोटा माहिती झाले. अतिशय ग्रामीण,मागास भागातील विद्यार्थी व पालक याना इसरो या ठिकाणी उपग्रह प्रक्षेपणास बोलावल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात ही बातमी सोशल मीडिया वरती वाऱ्यासारखी पसरली. असा पराक्रम करणारी **आमची हिंगोली जिल्ह्यातील महाराष्ट्र राज्यातील पहिलीच जिल्हा परिषदेची शाळा ठरली.** त्या ठिकाणी जाऊन विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या स्वरूपाची उपग्रह प्रक्षेपण मॉडेल्स पाहिले. ही त्यांच्यासाठी एक वेगळीच अनुभूती ठरली. त्या ठिकाणी स्पेस किड्स इंडिया ही नव बाल वैज्ञानिक तयार करणारी संस्था आहे. त्या संस्थेने ही आम्हाला विशेष असे मार्गदर्शन केल्यामुळे वेगवेगळ्या शास्त्रज्ञांची माहिती होण्यासही विद्यार्थ्यांना मदत झाली.

**फोटो लिंक -**

https://drive.google.com/drive/folders/1_QgaT_bkaXvi_vUY8dgVSo6ZtBToGIri?usp=sharing

**व्हिडियो लिंक -**

- प्रयोग- https://youtube.com/playlist?list=PLdvcXtpLVNEk_7N-dTcWy6XJe7xD-X5PC&si=fMVnoqFrEO0QmRzI
- Azaadi sat - https://youtu.be/n2VhauMPen0?si=Q_9KV-_aTSaHSFp-

----------**----------

# "गाथा स्पर्धा परीक्षेतील उत्तुंग भरारीची"

**शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद उच्च प्राथमिक कन्या शाळा कुनघाडा रै. केंद्र कुनघाडा रै, पंचायत समिती, चामोर्शी, जिल्हा.गडचिरोली**

**शाळेचा ईमेल आयडी** - zpupgirlsschoolkunghada@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्रीमती.वर्षा सुधाकर गौरकार
**मोबाईल क्रमांक** - 9011547793
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - varsham3094@gmail.com

**प्रस्तावना** -

आजचे युग हे स्पर्धा परीक्षेचे युग आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार आपल्याला भविष्यवेधी शिक्षणातून भविष्यातील आव्हाने पेलण्यासाठी सक्षम असणारी पिढी घडवायची आहे. यासाठी PISA level चे विद्यार्थी प्रत्येक शाळेतून घडणे आवश्यक आहे. आणि याचीच पायाभरणी होत आहे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक कन्या शाळा कुनघाडा रै या शाळेतुन....

2017-18 या शैक्षणिक सत्रामध्ये नवोदय शिष्यवृत्ती या दोन्ही स्पर्धा परीक्षेत शाळेला पाहिजे तसे यश मिळाले नाही आणि 18-19 या सत्रामध्ये प्रयत्न करूनही पाहिजे तें यश पदरात पडले नाही. म्हणूनच यावर मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षक यांनी विचार मंथन करून स्पर्धा परीक्षा संदर्भात एक भविष्यवेधी कार्य योजना आखली आणि त्याचाच परिणाम म्हणजे त्याच्या लगतच्या वर्षातच आम्हाला त्या योजनेचा परिणाम दिसून आला आणि आमच्या शाळेतील एक विद्यार्थिनी नवोदय परीक्षेसाठी पात्र ठरली. हे पहिले यशच आम्हाला पुढील कार्य जोमाने करण्यासाठी प्रेरक ठरले. वर्षभर काम करताना जाणवलेल्या विविध त्रुटीची पूर्तता करून पुढील सत्रात प्रयत्न करण्यात आले आणि याचेच फलित म्हणजे सन 2020-21 मध्ये नवोदय स्पर्धा परीक्षा आमच्या शाळेतील चार विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचीं मोहर उमटवली आणि ही यशाची घोडदौड अविरतपणे सुरू आहे...

**कार्ययोजना** -

**विद्यार्थी आणि पालकांमध्ये स्पर्धा परीक्षा संदर्भात आशावाद निर्माण करणे** -

2019 मध्ये शाळेला पाहिजे ते यश मिळाले नाही याचा मागोवा घेतला असता असे लक्षात आले की पालकांचीं विद्यार्थ्यांच्या शिक्षणाविषयी अनास्था आणि शिक्षक पालक यामधील समन्वयाचा अभाव. या अडचणींवर मात करण्यासाठी सर्व प्रथम शिक्षक पालक विद्यार्थी समन्वय आवश्यक होते. यासाठी दरमहा एक मासिक पालक सभा आयोजित करण्यात आले. यामध्ये माता पालकांचा सहभाग घेण्यात आला आणि याचाच

परिणाम असा झाला की पालकांची शिक्षणाविषयीची अनास्था दुर होऊन शिक्षक पालक संबंध दृढ झाले आणि पालकांचा शिक्षकांवरील विश्वास वाढला. शिक्षकांनी सुद्धा पालकांचा हा विश्वास सार्थ ठरवला.

**इयत्ता चौथी पासून स्पर्धा परीक्षेची तयारी -**

इयत्ता पाचवी मध्ये होणाऱ्या नवोदय आणि शिष्यवृत्ती या परीक्षेची तयारी कन्या शाळेमध्ये इयत्ता चौथ्या वर्गापासून सुरू करण्यात येते. एप्रिल महिन्यातील द्वितीय सत्र परीक्षेनंतर नवोदयचे सराव वर्ग सुरू करण्यात येतात.

**365 दिवस चालणारे सराव वर्ग -**

कन्या शाळा ही 365 दिवस चालणारी शाळा म्हणून प्रसिद्ध आहें. दिवाळीचे मुख्य सणाचे केवळ तिन दिवस सोडल्यास वर्षभर शिष्यवृत्ती,नवोदय वर्ग चालू असतात.

**सकाळचे ज्यादा वर्ग -**

वर्षभर सकाळी आठ ते 10:30 पर्यंत नवोदय आणि शिष्यवृत्तीचे ज्यादा वर्ग शाळेत घेण्यात येतात त्यामुळे स्वतःच्या सुरुवातीपासूनच स्पर्धा परीक्षेची तयारी सुकर होण्यास मदत होते.

**रात्रीच्या गृह भेटी -**

विद्यार्थी दिलेला गृहपाठ घरी व्यवस्थित सोडवतात की नाही यावर देखरेख ठेवण्यासाठी आणि त्यांना अभ्यासात येणाऱ्या अडचणी शंका दूर करण्यासाठी शिक्षकांद्वारे विद्यार्थ्यांच्या घरी रात्री आकस्मिक गृहभेटी देण्यात येतात.

**मासिक पालक उद्बोधन वर्ग -**

नवोदय परीक्षेसाठी बसलेल्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावा आणि त्यांच्या परिवारावर येणारा ताण कमी व्हावा यासाठी पालकांची भूमिका व जबाबदाऱ्या समजावून सांगिण्यासाठी प्रत्येक महिन्याला पालक सभेचे आयोजन करण्यात येते.

**रात्र कालीन सराव वर्ग -**

परीक्षेच्या तारखा जाहीर झाल्यानंतर परीक्षेच्या एक महिना आधीपासून विद्यार्थ्यांचे रात्र कालीन वर्ग शाळेमध्ये आयोजन करण्यात येतात. झालेल्या घटकांची उजळणी आणि राहिलेल्या घटकांचा सराव यासाठी हे रात्र कालीन वर्ग अतिशय लाभदायक ठरले आहेत.

**स्वतः काढलेल्या प्रश्नपत्रिका -**

प्रत्येक घटकावर आधारित शिक्षक स्वतः प्रश्नपत्रिका तयार करतात आणि त्यांचा सराव विद्यार्थ्यांना देण्यात येतो. तसेच मागील वर्षातील काढलेल्या प्रश्नपत्रिका ही विद्यार्थ्यांकडून सोडवून घेण्यात येतात.

**सराव -**

स्पर्धा परीक्षेचे गुपीत म्हणजेच सराव शाळेमध्ये इयत्ता चौथ्या वर्गाला उन्हाळ्यातील सुट्टी पासूनच पाचव्या वर्गातील अभ्यासक्रमाला सुरुवात करण्यात येते. त्यामुळे विद्यार्थ्यांना स्पर्धे परीक्षेसाठी पुरेसा सराव होऊन यश मिळवणे सोपे झाले आहे.

**प्रत्येक घटकावर चाचणी -**

विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेच्या सराव व्हावा यासाठी दर आठवड्याला झालेल्या घटकावर चाचणी घेण्यात येते. शिकवण्यात आलेला भाग विद्यार्थ्यांना कितपत समजला यासाठी ही चाचणी उपयुक्त ठरलेली आहे.

**परीक्षेची मानसिक तयारी -**

वर्षभर नवोदय आणि शिष्यवृत्ती चा पुरेसा सराव झाल्यानंतर नेमका पेपरच्या दिवशी पेपर कसा सोडवायचा, मनस्थिती शांत ठेवून परीक्षेला धीराने कसे सामोरे जायचे याविषयी शाळेतर्फे विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन सत्र आयोजन करण्यात येते. तसेच या काळामध्ये पालकांनी काय काळजी घ्यावी,सकस आहार आणि घरातील वातावरण आनंदी कसे ठेवावे याविषयी मातांना मार्गदर्शन करण्यात येते.

**फलनिष्पत्ती**

**लेखन साहित्य भेट -**

मागील चार वर्षापासून नवोदय आणि शिष्यवृत्ती चा चढता आलेख बघता समाजातील दानशूर व्यक्ती शाळेला मदत करायला नेहमी तयार असतात. नवोदय आणि शिष्यवृत्तीच्या सरावा दरम्यान विद्यार्थ्यांना खूप रजिस्टरची आवश्यकता असते या रजिस्टर खरेदीचा खर्च पालकांवर येऊन त्यांना आर्थिक ताण पडतो यासाठी समाजातील दानशूर व्यक्ती आणि प्रतिष्ठित नागरिक स्वतःहून विद्यार्थ्यांना लेखन साहित्य उपलब्ध करून देतात.

**शिक्षण प्रेमी कडून सहकार्य -**

नवोदय परीक्षेसाठी बसलेल्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावा त्यांच्या परिवारावर येणारा आर्थिक ताण कमी व्हावा यासाठी गावातील प्रतिष्ठित नागरिक आणि शिक्षक प्रेमी यांच्यातर्फे विद्यार्थ्यांना नवोदय पुस्तके

आणि गाईड दरवर्षी भेट देण्यात येत आहेत त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये एक प्रकारचा सकारात्मक आत्मविश्वास वाढल्याचे दिसून येत आहे.

**पालकांचे सहकार्य -**

नवोदय चे पेपर काढणे, पेपर छपाई करणे, विद्यार्थ्यांच्या घरी गृहभेटी देणे, विद्यार्थी आणि पालकांना मानसिक दृष्ट्या सक्षम करणे इत्यादीसाठी पालकांचे सकारात्मक सहकार्य लाभतें.

**नवोदय व शिष्यवृत्ती परीक्षेतील प्रगतीचा आलेख पुढील प्रमाणे आहे.**

| अनु क्र. | सत्र | नवोदय पात्र विद्यार्थी | शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थी |
|---|---|---|---|
| 1 | 2018-19 | 0 | 1 |
| 2 | 2019-20 | 1 | 1 |
| 3 | 2020-21 | 4 | 7 |
| 4 | 2021-22 | 4 | 6 |
| 5 | 2022-23 | 4 | 5 |
| 6 | 2023-24 | 5 | 6 |

**सदर उपक्रमाच्या अंमलबजावणीची लिंक -**

https://docs.google.com/presentation/d/1m_RFBbgxnUTvKoYS_9nKbr8fYqEw-IgI/edit?usp=drivesdk&ouid=104680395334705918299&rtpof=true&sd=true

**स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार बाबत व्हिडिओ लिंक -**

https://youtu.be/3k-i1E7sQzU?si=zmENr2TWOm_bix66

**विविध वर्तमानपत्रांनी शाळेत घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा पूरक उपक्रमांची घेतलेली दखल -**

https://drive.google.com/drive/folders/1mEc4thdc2pL8tjxG2dBtX9T_AejJYdqO

**शाळेत राबवण्यात येत असलेल्या स्पर्धापूरक विविध उपक्रमांची माहिती लिंक -**

https://docs.google.com/presentation/d/1lviTL1Knf9_wR5G7-AS86nv0uHh_sQB0/edit?usp=drivesdk&ouid=104680395334705918299&rtpof=true&sd=true

**समारोप -**

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक कन्या शाळा येथील शिक्षकांना मागील काही वर्षांचा पाठपुरावा केल्यानंतर असे लक्षात आले की, स्पर्धा परीक्षांची तयारी करून घेण्यासाठी काहीतरी विशेष कार्य योजना

आखण्याची आपल्याला आवश्यकता आहे.., शाळेतील मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षकांच्या टीमने त्या अनुषंगाने शिष्यवृत्ती आणि नवोदय परीक्षेची पूर्वतयारी करून घेतली त्यासाठी पालकांचा सहभाग, समाजाचा सहभाग अशा अनेक उपक्रमांची भर घातली. आणि 2019 पासून सुरू झालेली ही यशस्वी वाटचाल आजतागायत सुरु आहे.

अशी ही जिल्हा परिषद उच्च प्राथमिक कन्या शाळा कुनघाडा रै येथील स्पर्धा परीक्षांच्या यशाची उत्तुंग भरारी...




----------**----------

# “काढून थोडी सवड निर्माण करू मराठी भाषेची आवड”

शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, आरळी, ता.बिलोली, जि.नांदेड

**शाळेचा ईमेल आयडी** — shindemaddy86@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** — श्री.माधव रावसाहेब शिंदे.
**मोबाईल क्रमांक** — ९४०४४६७२६४
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - shindemaddy86@gmail.com

**प्रस्तावना -**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आरळी येथे मराठी माध्यमाची इयत्ता 1 ली ते 4 थी पर्यंत जिल्हा परिषदेची मराठी माध्यमाची शाळा आहे. गावात मुस्लिम धर्माचे लोक आहेत त्यांची बोली भाषा हिंदी आहे त्यामुळे ते घरी मातृभाषेत उर्दू किंवा हिंदीमध्ये बोलतात, शाळेच्या सहशिक्षक श्रीमती शिवकन्या पटवे यांनी मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शना अंतर्गत विद्यार्थ्यांना मराठी भाषेची आवड निर्माण व्हावी व त्यातून शिक्षण प्रक्रिया सुलभ व्हावी यासाठी विशेष प्रयत्न केले. त्यांचे प्रयत्न या यशोगाथेत नमूद केले आहेत.

भाषा विकासाची पहिली पायरी श्रवण या पासून माझे विद्यार्थी वंचित आहेत याची मला जाणीव झाली आणि तेंव्हा कळलं की विद्यार्थी मराठी विषय शिकवताना भावना नसल्यासारखे नुसते तोंडाकडे का पाहतात व लक्षपूर्वक श्रवण केल्यासारखं फक्त भासवतात. याच कारण त्यांना मराठी भाषा समजतच नव्हती त्यातील शब्दांचे आकलनच होत नव्हते. तेंव्हा या समस्येचे निराकरण करायचे असेल तर मला मराठीकडे एक विषय म्हणून न पाहता एक भाषा म्हणून पाहावं लागेल व त्यासाठी नाविन्यपूर्ण पद्धती वापरून त्यांना या भाषेविषयी आवड निर्माण करावी लागेल तेंव्हाच माझ्या डोक्यात कल्पना आली की मराठी विषयासाठी मी हा माझा उपक्रम राबवावा आणि माझं नियोजन सुरू झालं.

माझा इयत्ता दुसरीचा वर्ग आणि मुख्याध्यापक यांचा इयत्ता तिसरीच्या वर्गातही मी मराठी विषय विद्यार्थ्यांना शिकवायचे इयत्ता दुसरी व तिसरीच्या विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम घ्यावा असं मी ठरवलं आणि शाळेच्या वेळेत दुपार सत्रामध्ये तीन ते चार या वेळेमध्ये विद्यार्थी अध्ययन अध्यापन करण्यास कंटाळलेले असतात तेव्हा थोड्या वेगळ्या रंजक पद्धतीने यांना हा वेळ सत्कारणी लागावा म्हणून मी या उपक्रमाचे नियोजन माझ्या पद्धतीने सुरु केले.

**उपक्रमाची गरज -**

मुस्लिम विद्यार्थी मराठी माध्यमाच्या शाळेत शिकतात तेव्हा जेव्हा ते नवीन शाळेत येतात तेव्हा त्यांना मराठी विषय शिकताना शब्दसंग्रह त्यांच्याकडे नसल्यामुळे त्यांना मराठी विषय नीट समजत नाही अशा वेळेला

आपल्याला त्या विद्यार्थ्यांना मराठी भाषेचे आकलन होण्यासाठी उपयोजन कसे करायचे यामध्ये खूप अडचणी येत होत्या ,तेव्हा लहानपणापासूनच विद्यार्थ्यांना जर मराठीची गोडी लागली तर या समस्या येणार नाहीत यासाठी मला हा उपक्रम राबवावासा वाटला पालकांनाही उर्दू शिक्षणाची ओढ जास्त असल्याने मुलांना मराठी नाही आली तरी ते लक्ष देत नाहीत पण मुलांना मराठी आलीच पाहिजे कारण ते मराठी माध्यमाच्या शाळेत शिकतात आणि सर्व विषय हे मराठी भाषेला जोडलेले सहसंबंध आहेत.

मुस्लिम पालक इयत्ता पहिली ते चौथी मराठी माध्यमात शिकवतात आणि नंतर उर्दू शिकवण्यासाठी मुलींना पाठवतात या समस्येवर उपाय म्हणून आपण जर त्यांना चांगली मराठी शिकवली तर ते उर्दू शिक्षणाकडे जाणार नाही आणि आपल्या शाळेतील चौथीनंतरची मुलींची गळती थांबेल यासाठी मला हा उपक्रम राबवावा वाटला.

**उपक्रमाची कार्यवाही -**

हा उपक्रम राबवताना मी मुलांच्या मानसिकतेचा विचार करून माझ्या उपक्रमाची सुरुवात विनोदी मराठी गीतांनी केली

1.**मराठी विनोदी गीते**

मराठी भाषेत असे अनेक गीत आहेत जे लहान मुलांना खूप भावतात आणि कृती करून घेतली की सहज तोंडपाठ होतात व मराठीचा गोडवा विद्यार्थी अनुभवतात हे आपल्याला त्यांच्या आनंदी चेहऱ्यावरून दिसते.

**उदा -**

- आत्याची आली मला तार, आत्या मला सून करणार, आत्याचा मुलगा गोरा, गणिताचा पेपर कोरा (याप्रमाणे 5 कडवे आहेत)
- दिल मला कोकणात, माझं माहेर कोकणात, सासू बाईंनी सांगितलं, सडा टाकायला, बाई बाई पडले मी शेणात (असे 10 कडवे आहेत)
- एवढी मोठी आजी, एवढी मोठी आजी, आजीने कापली, भेंडी ग बाई भेंडी, मामाला आमच्या शेंडी, ग बाई शेंडी
- चुरमुरा चुरमुरा चुरमुरा, चुरमुरा चुरमुरा चुरमुरा

अशी अनेक गाणी मी मुलांकडून गाऊन घेते ज्यातून मुलांना अनेक मराठी शब्द, वाक्य सहज समजतात व बोलण्यात एक लयबद्धता येते.

**यु-ट्यूब वरती माझी कृती युक्त गाणी आहेत त्यांची लिंक -**

https://youtu.be/202UqapJ8HU

**भाषिक खेळ -**

मुलांना खेळ म्हटलं की ते काहीही करायला तयार होतात आणि महत्वाचं म्हणजे ते ह्या गोष्टी आनंदाने करतात. म्हणून मला वाटलं की या गोष्टीचा उपयोग आपण मराठी शब्दसंग्रह वाढवण्यासाठी करावा म्हणून मी त्यांच्या साठी असे भाषिक खेळ शोधून काढले व ते वर्गात राबवले ते खेळ खालील प्रमाणे आहेत.



1. **फळ,फुल,भाजी** - या खेळात मुलांना गोल करून थांबवायचं, एकाने मध्ये थांबायचं व एका एका मुलासमोर येऊन फळ, फुल, भाजी अस म्हणत पुढे पुढे जायचं, ज्याच्या जवळ तो थांबेल तिथे जो शब्द बोलला तो अगदी 5 सेकंदाच्या आत सांगायचं पुढच्या मुलाने उदा. भाजी तर भाजीच नाव सांगायचं, नाही सांगितलं तर आउट.

2.**शब्द फुले वाचूया वाक्य हार बनवूया** - एक टोपली घ्यायची त्यात शब्द लिहून चिठ्या ठेवायच्या त्या नंतर मुलांना त्या चिठ्या जुळवून वाक्य बनवायला लावायचे, ज्या गटाची जास्त वाक्य होतील तो गट विजयी

3.**चैन ड्रिल ऍक्टिव्हिटी** - यात प्रत्येक मुलाने चैन च्या माध्यमातून आपला परिचय किंवा जो विषय दिला असेल त्या विषयी माहिती सांगायची एकही मुलगा सुटणार नाही प्रत्येक जण यातून बोलणारच

**उदा.** नमस्कार कैफ माझं नाव, आदिल तुझं नाव काय आहे ?अशी साखळी शेवटच्या विद्यार्थ्या पर्यंत चालूच राहील.

**4.शब्द भेंड्या** - गावाच्या, मुलांच्या,फुलांच्या,पदार्थांच्या प्राण्यांच्या नावाच्या भेंड्या खेळणे असे विविध भाषिक खेळ मी घेतले.

**4.नाटिका सादरीकरण** - नाटिका मुलांना आवडतात लहान लहान प्रसंग देऊन नाटिका सादर करायला लावल्याने मुलांना मराठी वाक्य पाठ होऊ लागली व आपोआपच मराठी भाषा तोंडवळणी पडण्यास मदत झाली. पाठयपुस्तकातील बंडूची इजार ,अति तिथं माती अशी नाटकं तर मुले स्वत:हुन करायला तयार होतायत म्हणजे प्रमाण भाषा सुद्धा ते आता आत्मसात करू लागली आहेत.

**5. ई-लर्निंगच्या माध्यमातून मुलांना रोज मराठी गोष्ट ऐकवणे** - Tv च्या मदतीने यु ट्यूब चा वापर करून मुलांना रोज एक गोष्ट ऐकवली जाते ज्यातून त्यांना मराठी शब्द, वाक्य,काळ, क्रियापद या सारख्या बारिक सारीक गोष्टी समजून सांगायच्या व मनोरंजनातून आपला भाषा विकास साधून घ्यायचा माझा प्रयत्न असतो.



**6. गोष्टीची पुस्तके वाचणे** - मराठी भाषेतील अनेक गोष्टींची पुस्तके वाचनालयात आहेत ती मुलांना वाचायला दिल्याने त्यांचा मराठी भाषेचा शब्दसंग्रह वाढला व मराठी भाषेची गोडी निर्माण होण्यास मदत झाली



**7.माईंड मॅप** - माईंड मॅपच्या साह्याने मुलांना एक शब्द द्यायचा व त्याच्याशी संबंधित शब्द मुलांना लिहायला सांगायचे व नंतर त्याच शब्दांपासून वाक्य बनवायचे म्हणजे त्यांच्या डोक्यात एक विशिष्ट गोष्ट विचार करण्यास प्रवृत्त करते व त्या संबंधीचे शब्द ते आठवतात व वाक्य रचना करून वाक्य बनवतात यामुळे त्यांचा मराठी भाषा विकास होण्यास मदत होते

**8.आठवण देई धप्पा** - वर्गात नियम बनवला की मराठी बोलायचं, हिंदी बोललं की बाजूच्यानी त्याला धप्पा द्यायचा व आठवण करून द्यायची

**9.मराठी पेटीतील साहित्याचा प्रभावी वापर** - मराठी पेटित भरपूर छान साहित्य आहे त्याचा वापर करून मी मुलाना मराठी भाषा शिकवली. चित्रकार्ड, वाक्य चित्र कार्ड,शब्द,क्रम लावणे,समानार्थी विरुद्धार्थी शब्द,कोण कुठे राहतो, अश्या अनेक साहित्य आहे त्याचा वापर करून मुलांचा शब्दसंग्रह खूप वाढला



**10.लग्नपत्रिका व पेपर मधील कात्रणाचे गटात वाचन व चर्चा** - वर्गात मुलांचे गट पाडून त्यांना लग्न पत्रिका व पेपर मधील जाहिराती यांचे वाचन व चर्चा मी करायला लावते यातून त्यांना गावांची नावे, तालुके, जिल्हे, विविध भाषा, वाक्यरचना, भाषेचा रसास्वाद अश्या छोट्या गोष्टींचे नकळत हसत खेळत ज्ञान होते व त्यांचा मराठी भाषा विकास होण्यास मदत झाली.

**माझा फळा माझी लेखणी** -

यात विद्यार्थ्यांना मी 15 दिवस रोज एक विषय द्यायची व त्यांनी त्या विषयाला अनुसरून शब्द फळ्यावर लिहायचे व तोंडी त्याची वाक्य सांगायची व सर्व वाक्य सांगून झाली की मी सर्व वाक्य मिळून त्या विषयावर पुन्हा बोलायचे, अश्या तऱ्हेने मुलाना शब्दाकडून निबंधकडे नेण्याचा प्रयत्न चांगला काम करू लागला

एखादा उपक्रम आपण जेव्हा विशिष्ट ध्येय ठेऊन करतो व त्याच नियोजन केले तर यश हे मिळतेच याची प्रचिती मला आली, सुरुवातीला मी निराश झाले या मुलांना कस शिकवावं हेच मला कळत नव्हतं पण

आज माझे विद्यार्थी मराठी छान समजून घेऊ लागले,मराठीत बोलण्याचा ते आवडीने प्रयत्न करतात माझ्या सर्व उपक्रमात सर्व विद्यार्थी सहभागी होतात.

विद्यार्थ्यांचे पालक सांगतात की मुले घरी मराठी बोलत आहेत त्यामुळे आम्हाला पण मराठी येऊ लागली आहे .खऱ्या शिक्षणाचा अर्थ हाच आहे शिकलेल्या ज्ञानाचा उपयोग आपल्या जीवनात करणे ते त्यांच्या पालकांना पण मराठी भाषा शिकवत आहेत याहून आनंदाची ती गोष्ट काय.

आज वर्गात शिकवताना मुलाच्या चेहऱ्यावर भाव अनुभवते म्हणजेच त्यांना मराठी भाषा चांगली




समजू लागली आहे त्यामुळे ते आपले मत व्यक्त करतात ,चर्चा करतात आनंदाने हसत खेळत मराठी विषय शिकतात आता मराठी हा विषय त्यांना आवडीचा वाटतो याचा खूप आनंद वाटतो.

----------**----------

## "शाळा आणि गाव - अभिमानाचे नाव"

**शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पार्डी (म), ता.अर्धापूर जि.नांदेड**

**शाळेचा ईमेल आयडी** - zppardi2018@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.राजेश उत्तमराव देशमुख
**मोबाईल क्रमांक** - 9922922892
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - rudeshmukh1868@gmail.com

**प्रास्ताविक -**

अर्धापूर शहरापासून ५ कि.मी. अंतरावर राज्य महामार्गावर असलेली जि. प. प्रा. शाळा पार्डी (म) ता. अर्धापूर जि.नांदेड शाळा नेहमीच नावीन्यपूर्ण उपक्रमाची खाण म्हणुन ओळख आहे. शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी 'विद्यार्थी विकासात पालक सहभाग' उपक्रमाची गरज आहे.

मुलभूत गरजांपैकी शिक्षण एक मुलभूत गरज आहे. २१ व्या शतकातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी व निपुण भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी पालक सहभागातून विद्यार्थी विकास उपक्रम करण्याचे ठरले. मुले १००% शाळेत आली पाहिजेत, मुले शाळेत टिकली पाहिजे आणि शिकली पाहिजेत. ही आव्हाने मनाला स्वस्थ बसू देत नव्हती. पालकाची मदत घेणे हा पर्याय होता. यासाठी काय करावे ? कोणाची मदत घ्यावी? असे अनेक प्रश्न मनात येत होते. या प्रतिकूल परिस्थितीत उत्तरे शोधण्यासाठी मनात भावनांचा कल्लोळ दाटला होता. यामधूनच आमच्यातील शक्तीस्थान शोधणे सुरु झाले.

जि.प.प्रा.शाळा पार्डी (म) शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, पालक यांच्याशी संवाद साधला. संभाषणाद्वारे पालकांच्या मनात शिक्षणाविषयी तळमळ जाणवत होती. प्रत्येक बालक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सक्षम झाले पाहिजे असा मनोदय चर्चेतून समोर आला. या सर्व गोष्टीचा विचार करून शाळेत 'विद्यार्थी विकासात पालक सहभाग' हा उपक्रम सुरू करण्याचे ठरविले व त्याप्रमाणे मार्गक्रमण सुरू झाले.

**उद्दिष्टे -**

१. नियमित उपस्थिती १००%ठेवणे.
२. स्पर्धा परीक्षेसाठी तयार करणे.
३. आनंददायी वातावरणात स्वयंअध्ययनाची सवय लावणे.
४. लोकसहभाग वाढवणे.
५. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे.

उपरोक्त उद्दिष्टे ठरवून प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली.

**अंमलबजावणी -**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा, पालक व प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने कार्य करणे गरजेचे आहे. ही गरज लक्षात घेऊन मी पालक सहभागातून विद्यार्थी विकासाचा पाया रचला प्रथमतः

पालकांचा अल्प प्रतीसाद होता पण दर आठवड्याला गृहभेटी घेऊन समुपदेशन केले सहकारी शिक्षक यांच्या मदतीने पालक सहभाग वाढवला. शाळेतील जास्तीत जास्त माता-पालकाचा सहभाग घेण्यात आला. दर आठवड्याला मातापालक गटाची मिटींग घेण्यात आली व प्रत्येक मुलाच्या आईला कृतीकार्यक्रम तयार करून देण्यात आला. मातांनी नियमित रात्री एक तास आपल्या पाल्यासोबत संवाद साधत अभ्यास व इतर उपक्रमाची चर्चा करत असत. मुलांची शिकण्याची गती दिवसेंदिवस वाढू लागली. माता-पालक नियमित आढावा घेत असल्यामुळे आपोआप दैनंदिन उपस्थिती १००% राहू लागली. आठ दिवसाच्या बैठकीत माता-पालक आपल्या पाल्यांच्या शैक्षणिक अडचणीबाबत व आगामी आठवड्यात करायच्या अभ्यासाबाबत चर्चा होऊ लागली. पालकांचा प्रतिसाद दिवसेंदिवस वाढू लागला. आपल्या मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी स्पर्धा परीक्षेसाठी परीक्षा देण्यासाठी आग्रह घरला तब्बल ५० विद्यार्थी भारत टॅलेंट सर्च परीक्षा २०२५ साठी सहभागी झाले. मुले नियमित शाळेत या परीक्षेची तयारी करत असून घरी पालकांच्या मदतीने अभ्यास करत आहेत. पालकांचा सहभाग घेतल्यामुळे शाळा, विद्यार्थी, पालक, शिक्षक नियमित एकमेकांच्या संपर्कात आहेत.

मुले शाळेत शिकल्यानंतर घरी जाऊन स्वयंअध्ययन करत आहेत. अभ्यासात मित्रांची मदत घेऊन समस्यांची उकल करत आहेत एकंदरीत आनंददायी वातावरण निर्माण झाले असुन तणावमुक्त वातावरणात मुले शिक्षण घेत आहेत.

निपुण भारताचे उद्दिष्टे पूर्ण होताना दिसत आहे. वर्ग तिसरीतील मुले समजपूर्वक वाचन करत असून पाच अंकी संख्येचा भागाकार, गुणाकार किया अचूक करत आहेत. आठ अंकी संख्यावाचन करतात. पालकांपालंकामध्ये चुरस निर्माण झाली असून प्रत्येक पालक अपेक्षित उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

माता - पालक सहभागामुळे शाळेला अत्यावश्यक गरजांची चर्चा करण्यात आली. यामध्ये शाळेला प्रोजेक्टर व साऊंड सिस्टीम भेट मीळाली. यामुळे मुले तंत्रज्ञानाच्या मदतीने शिक्षण घेत आहेत. वेगवेगळ्या राज्यातील शाळेशी व्हर्चुअलच्या माध्यमातून जोडले जात आहेत. शाळेच्या रंगरंगोटीचे काम लोकसहभागातून करण्यात आले. शाळेच्या सर्व भिंतीवर अभ्यासक्रम लिहिला आहे त्यामुळे मुले हसतखेळत अभ्यास करत आहेत. पालक सहभागा- मुळे शाळेचा चेहरा बदलण्यासाठी मदत झाली. पालक आज प्रत्येक आव्हान स्विकारत आहेत व शाळेच्या प्रत्येक कार्यात सक्रीय सहभाग घेत आहेत.

माता-पालकांचा विद्यार्थी विकासात वाटा असून त्याचे सकारात्मक परीणाम पार्डी शाळेत दिसून येत आहेत. शाळेतील प्रत्येक मुल शारीरिक, मानसीक, बौद्धिक, भावनीक विकासावर वळण घेत आहे. मुळे नियमित शाळेत सकाळी योगासने करतात व्यामुळे मुलांचे अवधान टिकून राहण्यास मदत झाली. पालकांना सकस आहाराचे महत्व समजावून सांगीतले आहे त्यामुळे पालक मुलांसह कुंद्धबात सकस आहाराचा समावेश करत आहेत. शाळेत आरोग्यदायी सवयीचे पालन सहज होऊ लागले त्याचबरोबर पालक घरीपण आरोग्यदायी सवयीचे पालन करू मागले.

पालक सहभागामुळे मुलांच्या अडचणी, त्यांच्या अंगी असलेल्या अध्ययनातील सुप्त क्षमता, सर्जनशीलता यावर सविस्तर मार्गदर्शन व सहकार्य होत असल्यामुळे विद्यार्थी विकासाचा आलेख उंचावताना दिसून येतो. शाळेत वेगवेगळ्या गुणवत्तापूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी करणे सहज सोपे झाले. जी मुले दर आठवड्याला होणाऱ्या परीक्षेत गुणानुक्रमे प्रथम येतील अशा प्रत्येक वर्गातील विद्यार्थी व पालकांचा सन्मान

करण्यात येऊ लागला त्यामुळे मुलांना व पालकांना प्रेरणा मिळाली. जो विद्यार्थी जास्तीत जास्त वेळा गुणानुक्रमे प्रथम येईल त्याचा व पालकाचा सन्मानपत्र व शैक्षणिक साहित्य भेट देऊन सन्मान केला जातो त्यामुळे मुलांचा आपोआपच गुणवत्ता विकास होतो.

पालकांच्या मदतीने शाळेत स्काऊट - गाईड उपक्रम सुरू करण्यात आला. या उपक्रमामुळे मुलांमध्ये स्वयंशिस्त, स्वावलंबन, राष्ट्रभक्ती,राष्ट्रप्रेम, सेवासमुदाय या गुणांची जोपासना करण्यास मदत झाली. शाळेतील मुले व मुली वेगवेगळ्या उपक्रमात सहभाग घेत असून जिल्हा मेळाव्यामध्ये निवासी सहभाग घेत आहेत. पालकांनी संमती कृतीयुक्त विकासास सहभाग घेतल्यामुळे मुलांच्या सर्वांगीण विकसास वाव मिळत आहे.यावर्षी शाळेतील स्काऊट गाईड राज्यपुरस्कारासाठी १४ मुली, १९ मुलांची निवड झालेली असून परीक्षा जानेवारी २०२५ मध्ये होणार आहे. ज्यावेळस मुलांच्या सर्वांगीण विकासाचा परिपोष करायचा असतो तेव्हा नक्कीच पालक सहभाग महत्वाचा आहे हे अधोरेखीत होते.

विद्यार्थी शाळेत आत्मविश्वासाने बोलत असून वेगवेगळी आव्हाने पेलण्यासाठी सक्षम झाली आहेत. पालक, विद्यार्थी व शिक्षक यांच्या माध्यमातून शिक्षणाची गती वाढली. विद्यार्थ्यांना अभिव्यक्त होव्याची संधी उपलब्ध करून दिल्यामुळे मुलांमध्ये आनंदाचे व आत्मविश्वासाचे वातावरण निर्माण झाले. या सर्वांसाठी विद्यार्थी विकासात पालक सहभाग उपक्रम जीवनदायी ठरला.

**फलनिष्पती -**

विद्यार्थी विकासात पालक या उपक्रमामुळे शाळेतील नियमित उपस्थिती वाढण्यास मदत झाली. मुलांना स्पर्धा परीक्षेसाठी तयार करण्यास पोषक वातावरण मिळाले. उत्साहवर्धक व आनंददायी वातावरणात मुलांना स्वयंअध्ययन करण्याची सवय लागली. शाळेच्या विकासासाठी लोकसहभाग मीळवण्यास मदत झाली. शाळेच्या परीसरात नावीन्यपूर्ण बदल घडवण्यासाठी मदत झाली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास वाव मिळाला. मुलांच्या अभिव्यक्तीस व विचारांना चालना मिळाली. मुले प्रत्येक उपक्रमात आनंदाने सहभागी होऊ लागली.

**समारोप -**

विद्यार्थी विकासात पालक सहभाग या उपक्रमामुळे मुलांना आनंददायी शिक्षण देता आले. शिक्षणातील उत्साह टिकून ठेवून वेळोवेळी पालक व विद्यार्थ्यांना बक्षीसाची थापही दिली.पालकांनी केलेल्या वेळोवेळी सहकार्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासास वाव मिळाला. याचबरोबर सहशालेय उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करणे सहजशक्य झाले. आज गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे ध्येय साध्य होत आहे. हे सर्व पाहून मनस्वी आनंद होत आहे. ठरलेले ध्येय साध्य झाले. पालक विद्यार्थी, शिक्षक यांच्यात / सुसंवाद व सुसूत्रता असेल तर प्रत्येक अडचणीवर आपण मात करू शकतो.' विद्यार्थी विकासात पालक सहभाग या उपक्रमाच्या अविस्मरणीय प्रवासामध्ये डॉ सविता बिरगे मैडम शिक्षणाधिकारी प्राथमिक नांदेड, श्री सुदर्शन चिटकुलवार साहेब प्राचार्य जि.शि.व प्र-संस्था नांदेड, श्री लोकदोजी गोडबोले गटशिक्षणाधिकारी अर्धापूर, श्री विकास चव्हाण केंद्रप्रमुख, श्री राजेश देशमुख मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद, शालेय व्यवस्थापन समिती व पालक यांचे उत्तम मार्गदर्शन व सहकार्य मिळाले.

**संदर्भसाहित्य - फोटो व व्हिडीओ.**



**माता पालक समुह बैठक**




**सहशालेय उपक्रमात मातांचा सहभाग**



**मुलांसोबत कृती समजून घेतांना मातापालक**

लोकमत

# दप्तराविना शाळा उपक्रमात पार्डीच्या शाळेत घेतला वनभोजनाचा आस्वाद

## दर शनिवारी आनंददायी शिक्षण । विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव, सर्वांगीण विकासाची अपेक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पार्डी :** मुलांच्या पाठीवरचे दप्तराचे ओझे एक दिवस तरी दूर व्हावे, विद्यार्थ्यांना आठवड्यातील एक दिवस दप्तराविना आनंददायी शिक्षण मिळावे यासाठी दर शनिवारी 'मुलांनो शाळेत या दप्तराविना' ही संकल्पना जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पार्डी (म.) येथे राबविण्यात येत आहे. यामुळे शाळेतील चिमुकले मात्र चांगलेच खूश झाले असल्याचे चित्र दिसत आहे.

दर शनिवारी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. अर्धापूर तालुक्यातील पार्डी (म) केंद्राचे केंद्रप्रमुख विनोद देशमुख हे दर शनिवारी केंद्रातील शाळेत दप्तराविना शाळा हा अनोखा उपक्रम राबवित आहेत.विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून कला, कार्यानुभव, शालेय शिक्षण, शालेय सहल या विषयांवर आधारित मुलांच्या उपजत कलागुणांना संधी देण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

### विद्यार्थ्यांचे दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी



> अशा उपक्रमामुळे मुलांच्या कलाकौशल्य गुणांना चालना मिळेल. ग्रामीण भागातील मुलांना शिक्षणाची आवड निर्माण होईल व सर्वांगीण गुणवत्ता विकास होईल -**कांता गांजुरे**, मुख्याध्यापिका, जि.प.शाळा पार्डी.

> लहान वयात मुलांना दप्तराचे ओझे जास्त होते. ते कमी करण्यासाठी दप्तराविना शाळा हा उपक्रम चांगला असून या संकल्पनेचे स्वागत केले पाहिजे -**बाबूराव भांगे**, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष.

शनिवारी शेतशिवार व वनभोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यामध्ये प्रामुख्याने शेतीविषयी माहिती देण्य आली. यामध्ये निरनिराळ्या झाडांची, पक्ष्यां प्राण्यांची तसेच रबी हंगामातील पिकांची माहि करून दिली.

यावेळी शाळेच्या मुलांनी अंगी असले कला सादर केली. यामध्ये गाणी, विविध पक्ष्य आवाज, कथा, उखाणे घेण्यात आले. या विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी निर्माण झा आहे.

शिक्षणाची गोडी लागावी यासाठी ने विविध उपक्रम राबविले जात आहेत. याम सर्व विद्यार्थी व शिक्षक उपस्थित राहत आहे यावेळी शोभा देशमुख, मंगला सलाने, उ नळगिरे, नामदेव भोसले, रमेश पाव योगाची कल्याणकर व विद्यार्थी उपस्थि होते.

लोकमत



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पार्डी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून मान्यवरांच्या हस्ते स्पर्धेमध्ये यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात आले.

लोकमत



विद्यार्थ्यांचा सत्कार : जिल्हास्तरीय स्काऊट गाईड मेळाव्यात सहभागी पार्डी ता. अर्धापूर येथील जि.प.प्रा.शाळेच्या विद्यार्थ्यांच्या सत्कारप्रसंगी सदाशिवराव देशमुख, कानबा पवार, शंकर बंडाळे, नागनाथ कापसे, बालाजी पाटोळे, शिवाजी कांबळे, मुख्याध्यापिका कांता गांजुरे, शोभा देशमुख, मंगला सलामे आदी.

https://youtu.be/KlECoDKP2Ko?si=1C8PaLkBLUg7QBv9

https://youtube.com/shorts/9a-JYlkhmTY?si=vH4V79s7SPUnMaUi

----------**----------

# “क्रीडा क्षेत्रातील भरारी”

**शाळेचे नाव - शासकीय माध्यमिक कन्या विद्यालय नाशिक, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, मेहेर सिग्नल, सीबीएस,नाशिक**

**शाळेचा ईमेल आयडी** - gghsnashik@gmail.com

**मुख्याध्यापकाचे नाव** - डॉ.मिता अ. चौधरी

**मोबाईल क्रमांक** - 8010856117

**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - dipali.ahire271@gmail.com

**प्रास्ताविक -**

क्रीडा क्षेत्रात खो खो हा एक पारंपारिक आणि लोकप्रिय खेळ आहे, जो खेळाडूंना शारीरिक तंदुरुस्ती, टीमवर्क आणि रणनीतीचा उत्कृष्ट अनुभव देतो. भारतात खो खो खेळाचा इतिहास आणि संस्कृती आहे, ज्यामुळे याला एक विशेष स्थान प्राप्त झाले आहे. हे खेळ न केवळ मनोरंजनासाठी, तर खेळाडूंना शारीरिक आणि मानसिक शक्ती वाढवण्यासाठीही महत्त्वाचे आहे.

विभागीय आणि राज्य स्तरावर खो खो खेळण्याच्या स्पर्धांमध्ये भाग घेतल्याने खेळाडूंना विविध अनुभव मिळतात. यामध्ये त्यांना त्यांच्या कौशल्यांचा अभ्यास करणे, प्रतिस्पर्ध्यांची रणनीती समजून घेणे आणि चांगले प्रदर्शन देण्याची संधी मिळते. यामुळे खेळाडूंचा आत्मविश्वास वाढतो आणि त्यांना त्यांचे ध्येय साध्य करण्यात मदत होते.

राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये निवड होणे ही एक महत्त्वाची कामगिरी आहे, जी एक खेळाडूच्या मेहनतीचे आणि समर्पणाचे प्रतीक आहे. या स्पर्धांमध्ये भाग घेण्याने खेळाडूंच्या क्षमता आणि कौशल्यांचा अभ्यास होतो, आणि त्यांना उच्च स्तरावर स्पर्धा करण्याची संधी मिळते. तसेच या स्पर्धांमुळे खो खो खेळाच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या संसाधनांची उपलब्धता आणि प्रोत्साहन मिळते.

यामुळे खो खो खेळाचे महत्व केवळ एक खेळ म्हणूनच नाही, तर व्यक्तिमत्व विकास, शारीरिक तंदुरुस्ती, आणि राष्ट्रीय एकतेच्या दृष्टीने देखील आहे. यशस्वी खेळाडू त्यांच्या कर्तृत्वाच्या माध्यमातून युवा पिढीसाठी प्रेरणा बनतात. खो खो खेळाच्या या सर्व पैलूंवर अधिक माहिती देणारे हे प्रास्ताविक आहे.

**शिक्षकांना या विषयासंदर्भात आलेल्या अडचणी -**

क्रीडा क्षेत्रातील खो खो खेळामध्ये विभागीय, राज्य स्तरावरील यश आणि राष्ट्रीय स्पर्धेत निवड करण्यासंबंधी शिक्षकांना काही महत्त्वाच्या अडचणींचा सामना करावा लागतो.

1. संसाधनांची कमतरता: योग्य प्रशिक्षणासाठी आणि साधनांसाठी आवश्यक असलेल्या संसाधनांची कमी, जसे की प्रशिक्षक, खेळण्याचे सामान, आणि सुविधा.
2. अवसरांची कमी: विभागीय आणि राज्य स्तरावरील स्पर्धा आयोजित करण्यासाठी आवश्यक असलेल्या व्यवस्थापनात अडचणी. स्पर्धांचे आयोजन वेळेवर करणे आणि त्यासाठी योग्य जागा उपलब्ध करणे हे आव्हानात्मक ठरते.

3. विद्यार्थ्यांचा सहभाग: विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक वातावरणात सहभागी होण्याची प्रोत्साहन कमी असू शकते. काही वेळा, अभ्यासाच्या ताणामुळे किंवा इतर कारणांमुळे खेळात भाग घेण्याची इच्छाही कमी होते.
4. प्रशिक्षणाची कमी: प्रशिक्षकांना खो खो खेळाच्या तांत्रिक ज्ञानाची कमी असू शकते, ज्यामुळे प्रशिक्षित आणि सक्षम खेळाडू तयार करण्यात अडचणी येतात.
5. सकारात्मक वातावरणाचा अभाव: क्रीडा क्षेत्रात एक सकारात्मक वातावरण निर्माण करण्याची गरज आहे. काही वेळा, शिक्षणातील प्राथमिकता आणि क्रीडाप्रेम कमी असते , ज्यामुळे विद्यार्थ्यांचे मनोबल कमी होते.
6. फंडिंगची समस्या: स्पर्धांसाठी आवश्यक असलेल्या आर्थिक साधनांचा अभाव, ज्यामुळे खेळाडूंना आवश्यक साधने, प्रशिक्षण, आणि स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी लागणारे खर्च पूर्ण करणे कठीण होते.
7. विकासाची पद्धती: खेळाच्या विकासासाठी योग्य प्रशिक्षण आणि खेळाची जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे. या प्रक्रियेत अडचणी येऊ शकतात.
8. राष्ट्रीय स्तरावर स्पर्धेच्या तयारीचा ताण : राष्ट्रीय स्पर्धेत प्रवेश मिळविण्यासाठी योग्य तयारी करणे आणि तीव्र स्पर्धेत सामील होण्यासाठी लागणाऱ्या मनोबलाची कमी.

या अडचणींवर मात करण्यासाठी शिक्षकांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे, तसेच खेळाच्या प्रचारासाठी स्थानिक संस्थांचे, सरकारचे आणि क्रीडा संघटनांचा सहयोग देखील महत्त्वाचा आहे.

**या अडचणींवर मात करण्यासाठी शिक्षकांनी केलेली उपाययोजना / अंमलबजावणी -**

खो-खो हा एक लोकप्रिय पारंपारिक भारतीय खेळ आहे, जो संघ खेळाच्या स्वरूपात खेळला जातो. या खेळात विभागीय आणि राज्य स्तरावर यश मिळवण्याचे अनेक महत्वाचे घटक आहेत, परंतु शिक्षकांना या प्रक्रियेत काही अडचणींचा सामना करावा लागतो.

**विभागीय आणि राज्य स्तरावरील यश -**

1. तयारी : योग्य तयारी आवश्यक आहे, ज्यात नियमित सराव, योग्य तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण, आणि संघातील खेळाडूंची मानसिकता विकसित करणे यांचा समावेश आहे.
2. प्रशिक्षण: प्रशिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि खेळाडूंची शारीरिक क्षमता विकसित करणे महत्त्वाचे आहे.
3. स्पर्धा: स्पर्धात्मक वातावरण तयार करणे, ज्यामुळे खेळाडूंची कामगिरी सुधारते.

**राष्ट्रीय स्पर्धेत निवड -**

1. अभ्यासक्रम: खो-खोचे तांत्रिक व मानसिक कौशल्ये विकसित करणे आवश्यक आहे.
2. दृढता: खेळाडूंच्या मनाची दृढता आणि आत्मविश्वास वाढवणे महत्त्वाचे आहे.
3. संघभावना: संघातील एकता आणि सहकार्य महत्त्वाचे आहे.

**शिक्षकांना आलेल्या अडचणी -**

1. संसाधनांचा अभाव: प्रशिक्षकांना योग्य साधने आणि सुविधांचा अभाव होता .
2. वेळेची कमी: शालेय कार्ये आणि खेळ यामध्ये संतुलन साधणे कठीण होते.
3. संवेदनशीलता: विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा विचार न करता त्यांच्यावर जास्त दबाव .
4. आर्थिक मदतीचा अभाव: राष्ट्रीय स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी , विविध स्तरावर जाणे येणेसाठी आवश्यक असलेल्या आर्थिक मदतीचा अभाव.

**अडचणींवर मात करण्याचे उपाय -**

1. संपर्क साधणे: अधिकृत संस्थांशी संवाद साधून संसाधने मिळवण्यात आली .
2. प्रशिक्षण कार्यशाळा: शिक्षक व खेळाडू यांच्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या .
3. समाजातील सहकार्य: स्थानिक समुदाय, शाळा आणि क्रीडा मंडळांशी सहयोग साधला गेला .
4. संवेदनशीलतेवर काम करून विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर लक्ष दिले आणि त्यांना योग्य मार्गदर्शन करण्यात आले.

**शिक्षक यांनी निवडलेल्या विषयासंदर्भातील अडचणी दूर केल्यानंतर झालेली फलनिष्पत्ती -**

खो-खो खेळाच्या क्षेत्रात शिक्षकांनी अडचणींवर मात करून मिळवलेल्या फलनिष्पत्ती

**यशाचे महत्त्वाचे घटक -**

1. संघाच्या तयारीतील सुधारणा: शिक्षकांनी प्रशिक्षण पद्धतीत सुधारणा केली, ज्यामुळे खेळाडूंच्या कौशल्यामध्ये वाढ झाली.
2. मानसिक तयारी: खेळाडूंची मानसिकता मजबूत करण्यावर लक्ष केंद्रित करून त्यांना अधिक आत्मविश्वास मिळवण्यात मदत झाली.
3. संवादाचे महत्त्व: शिक्षकांनी खेळाडूंमध्ये संवाद साधला, ज्यामुळे संघभावना वाढली.

**फलनिष्पत्ती -**

1. विभागीय आणि राज्य स्तरावरील यश: सुधारित प्रशिक्षण पद्धतीमुळे संघाने विभागीय आणि राज्य स्तरावर स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली.
2. राष्ट्रीय स्पर्धेत निवड : अनेक खेळाडू राष्ट्रीय स्तरावर खेळण्यासाठी निवडले गेले, जे एक महत्त्वाचे यश आहे.
3. सामाजिक ओळख: यशामुळे स्थानिक स्तरावर संघाची मान्यता वाढली, ज्यामुळे अधिक खेळाडूंना या खेळात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन मिळाले.

**अडचणींवर मात करण्याचे परिणाम -**

1. संसाधनांचा अधिक उपयोग: आवश्यक साधनांची उपलब्धता वाढली, ज्यामुळे प्रशिक्षणाच्या दर्जात सुधारणा झाली.
2. सकारात्मक वातावरण : शालेय व्यवस्थापन आणि समुदायाचा पाठिंबा मिळाल्याने सकारात्मक वातावरण तयार झाले.

3. आर्थिक सहाय्य : खेळाडूंच्या प्रवास आणि प्रशिक्षणासाठी आर्थिक सहाय्य मिळाल्याने त्यांना स्पर्धांमध्ये भाग घेणे सुलभ झाले.

या सर्व बाबींचा विचार करता, खो-खो खेळातील शिक्षकांनी अडचणींवर मात केल्यानंतर मिळालेली फलनिष्पत्ती सकारात्मक व प्रेरणादायी ठरली आहे. यामुळे खेळाची प्रतिष्ठा वाढली असून, अधिक युवा खेळाडूंना या खेळात करिअर घडवण्यासाठी प्रोत्साहन मिळाले आहे.

**समारोप -**

खो-खो हा खेळ केवळ शारिरीक  क्षमताच नव्हे तर मानसिक दृढता आणि संघभावना यांचा संगम आहे. विभागीय आणि राज्य स्तरावर मिळवलेले यश हे कठोर परिश्रम, नियोजित प्रशिक्षण आणि खेळाडूंच्या एकतेचे फळ आहे.  शिक्षकांच्या मार्गदर्शनाने आणि योग्य प्रशिक्षणामुळे संघाने आपल्या कार्यक्षमतेत लक्षणीय सुधारणा केली आहे. हे यश खेळाडूंच्या मेहनतीचे आणि त्यांच्या आत्मविश्वासाचे प्रतीक आहे. राष्ट्रीय स्तरावर खेळण्यासाठी निवड होणे म्हणजे खेळाडूंच्या कलेची मान्यता यामुळे त्यांच्या करिअरच्या नवीन शक्यता निर्माण झाल्या आहेत. खेळाडूंमध्ये असलेल्या संघभावनेने त्यांना एकमेकांच्या क्षमतांचा आदर करण्यास शिकवले आहे. संवाद कौशल्ये सुधारल्याने खेळाडू अधिक सक्षम बनले आहेत.

**भविष्याचा मार्ग -**

खो-खो खेळाचे भविष्य उज्ज्वल आहे, जेव्हा संघ, शिक्षक आणि क्रीडा समुदाय एकत्र येऊन काम करतील. संसाधने, आर्थिक सहाय्य आणि समुदायाचा पाठिंबा मिळाल्यास, हे खेळाडू पुढील पिढीला प्रेरणा देऊ शकतात. यामुळे, खो-खो खेळात विभागीय आणि राज्य स्तरावर मिळालेल्या यशाबरोबरच राष्ट्रीय स्पर्धेत निवडीचा प्रवास एक महत्त्वाचा टप्पा आहे, जो खेळाच्या विकासात योगदान देत आहे.



शासकीय माध्यमिक कन्या विद्यालय, नाशिक
14 वर्षाखालील खो-खो संघ



शासकीय कन्या विद्यालय, नाशिक
17 वर्षाखालील खो-खो संघ

# राज्याच्या दोन संघांचा खो-खो स्पर्धेत विजय

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

अस्मिता खो-खो लीग स्पर्धेत १४ आणि १८ वर्षांआतील मुलींच्या महाराष्ट्राच्या दोन्ही संघांनी विजय मिळवला. यात नाशिकच्या सुषमा, सरिता, नीलम या सुवर्णपदकाच्या मानकरी ठरल्या. वडोदरा (गुजरात) येथे २८ ते ३० सप्टेंबरदरम्यान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

भारतीय क्रीडा प्राधिकरण आणि भारतीय खो खो महासंघाच्या वतीने या पश्चिम विभागीय खो-खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत महाराष्ट्राच्या दोन्ही संघांनी विजेतेपदाला गवसणी घातली.

१४ वर्षांआतील राज्याच्या संघात नीलम मोहाडकर हिची निवड झाली होती. गत वर्षी रांची येथे झालेल्या १४ वर्षांआतील शालेय राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेतील विजेत्या महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधीत्व करताना तिने सुवर्णपदक प्राप्त केले होते. वडोदरा येथील स्पर्धेतही अंतिम फेरीत यजमान गुजरात संघाचा पराभव करून महाराष्ट्र संघाने विजेतेपद कायम राखले. नीलम ही जिल्हा परिषदेच्या शासकीय कन्या शाळेची विद्यार्थिनी आहे. तर १८ वर्षांआतील पश्चिम विभागीय खो-खो स्पर्धेसाठी सुषमा चौधरी आणि सरीता दिवा यांची राज्याच्या संघात निवड झाली होती. सुषमा चौधरी वाय. डी. बिटको कनिष्ठ महाविद्यालयाची विद्यार्थिनी असून, गतवर्षी १७ वर्षांआतील शालेय राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेतील विजेत्या महाराष्ट्र संघाची कर्णधार होती. तसेच त्याच स्पर्धेतील सर्वोत्तम अष्टपैलू खेळाडू म्हणून तिची निवड झाली होती, तर सरीता दिवा एसएमआरके महाविद्यालयाची विद्यार्थिनी असून, ती यापूर्वी भुवनेश्वर येथे झालेल्या १८ वर्षांआतील राष्ट्रीय विजेत्या महाराष्ट्र संघाची खेळाडू होती. वडोदरा येथे झालेल्या स्पर्धेत अंतिम फेरीत महाराष्ट्राने यजमान गुजरात संघाचा डावाच्या फरकाने पराभव करून विजेतेपद कायम राखले.



**नाशिकच्या सुषमा, सरीता, नीलम यांना सुवर्ण**

राज्याच्या किशोरी संघात सरीता दिवा, सुषमा चौधरी आणि नीलम मोहाडकर या स्व. सौ. सुरेखाताई भोसले निवासी खो-खो प्रबोधिनीच्या संस्कृती, नाशिकच्या खेळाडू असून, गीतांजली सावळे आणि उमेश आटवणे यांच्या मार्गदर्शनाखाली नियमीत श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल नाशिक येथे सराव करतात. नाशिक जिल्हा खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. प्रदीप पवार, आजीव अध्यक्ष रमेश भोसले, संस्कृती नाशिकचे अध्यक्ष शाहू खैरे, कार्याध्यक्ष आनंद गारमपल्ली, खजिनदार सुनील गायकवाड आणि अन्य पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.





# शासकीय कन्या शाळेचे जळगावात दुहेरी यश

**विभागीय खो-खो स्पर्धेत चमक**

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

जळगाव जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने जळगाव येथे आयोजित १४ आणि १७ वर्षाआतील मुलींच्या विभागीय खो-खो स्पर्धेत नाशिकच्या शासकीय कन्या शाळेतील खेळाडूंनी विजेतेपद पटकावले.

स्पर्धेत नाशिक विभागातील मुलींचे सात तर मुलांचे आठ असे एकूण १५ संघ सहभागी झाले. मुलींच्या गटात गतवर्षीचा राज्य उपविजेता शासकीय कन्या शाळेचा संघ हा नाशिक महानगराचे प्रतिनिधित्व करीत होता. या संघाला उप उपांत्य फेरीत पुढे चाल मिळाल्यानंतर उपांत्य फेरीत धुळे ग्रामीण संघाचा तर अंतिम फेरीत नाशिक संघाचा डावाच्या फरकाने एकतर्फी पराभव करून सलग पाचव्या वर्षी नाशिक विभागाच्या विजेतेपदाला गवसणी घातली. हा संघ लातूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शालेय स्पर्धेत नाशिक विभागाचे प्रतिनिधीत्व करणार आहे. नाशिक महानगर ते नाशिक विभागीय स्पर्धा या सर्व ठिकाणी शासकीय कन्या शाळेने आपले सर्व सामने हे डावाच्या फरकाने जिंकून आपले वर्चस्व प्रस्थापित केले.

विजेत्या खेळाडू या नाशिक जिल्हा

**स्थानिक क्रीडावृत्त**

खो-खो असोसिएशन संचलित सुरेखा भोसले निवासी खो-खो प्रबोधिनीच्या खेळाडू आहेत. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व नाशिक जिल्हा खो-खो असोसिएशन संचलित छत्रपतीशिवाजी महाराज क्रीडा संकुल येथे सकाळ आणि सायंकाळ अशा दोन सत्रात गीतांजली सावळे आणि उमेश आटवणे यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित सराव करीत असतात.



**...यांची कामगिरी मोलाची**

विजेत्या संघात रोहिणी भवर, शीतल गांगुर्डे, प्राजक्ता बोरसे या तीन राष्ट्रीय सुवर्ण पदक विजेत्या खेळाडूंना कर्णधार जागृती जाधव, कौसल्या काहांडोळे, कविता माळघरे, पल्लवी सहारे, ज्योती तलवारे, प्रियांका गावंडे, मीनाक्षी खडके, रसिका भोये, चैताली बागूल, निशा गुंबाडे, जान्हवी वड यांनी आपल्या संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. १४ वर्ष आणि १७ वर्ष या दोन्ही गटात शासकीय कन्या शाळेचा संघ राज्य स्पर्धेत नाशिक विभागाचे प्रतिनिधीत्व करणार आहे.

दिव्य मराठी **नाशिक 23-10-2024**

# खो-खो : शासकीय कन्या शाळा अजिंक्य

प्रतिनिधी | पंचवटी



शासकीय कन्या शाळेचा विजयी संघ

जळगाव जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या वतीने झालेल्या १४ वर्षाआतील किशोर आणि किशोरी गटाच्या विभागीय खो-खो स्पर्धेत नाशिक कन्या शाळा संघाने विजेतेपद मिळवले. त्यात १६ संघ सहभागी होते. कन्या शाळेने अंतिम सामन्यात नाशिक ग्रामीण संघाचा १९ विरुद्ध ४ अशा १५ गुणांनी पराभव करून सलग सहाव्या वर्षी विजेतेपद पटकाविले.

हा संघ दिनांक ५ ते ७ नोव्हेंबर दरम्यान डेरवन (ता.चिपळूण, जिल्हा रत्नागिरी) येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शालेय खो खो स्पर्धेत नाशिक विभागाचे प्रतिनिधीत्व करेल. विजेत्या संघाकडून गायत्री पेंढार, कर्णधार भूमिका खोटरे, राष्ट्रीय खेळाडू नीलम मोहांडकर, मोनिका तलवारे, सुलोचना तलवारे यांनी मोलाचा वाटा उचलला.त्यांना गायत्री जाखेरे, हर्षाली हडस, मंगला गांगुर्डे, साक्षी जाधव, जयश्री बागूल,राधिका काकडे, लावण्या पवार यांनी चांगली साथ दिली. गीतांजली सावळे, उमेश आटवणे यांच्या मार्गदर्शनाखाली हा संघ सराव करतो.

प, गाळा क्रमांक ४१९, चौथा मजला, श्रीहरी कुटे मार्ग, चांडक सर्कलजवळ, नाशिक (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
AR /२०१९/४१९९७, फोन: ०२७३-२३१८१९, Email- divyamarathi.nasik@dbcorp.in

दिव्य मराठी **नाशिक 04-10-2024**

**सिटी स्पोर्ट्स**

# वडोदरातील पश्चिम विभागीय खो-खो स्पर्धेत सुषमा, सरिता व नीलम यांना सुवर्ण

प्रतिनिधी | पंचवटी



पश्चिम विभागीय अस्मिता खो-खो लीग स्पर्धेत नाशिकच्या सुषमा चौधरी, सरीता दिवा आणि नीलम मोहांडकर यांनी सुवर्णपदक मिळवले. वडोदरा (गुजरात) येथे १४ आणि १८ वर्षाआतील या स्पर्धेचे आयोजन राष्ट्रीय क्रीडा प्राधिकरण आणि भारतीय खो-खो महासंघाच्या वतीने करण्यात आले होते. त्यात महाराष्ट्राच्या दोन्हीही संघांनी विजेतेपद मिळवले.१४ वर्षा आतील राज्याच्या संघात नीलम मोहांडकर हिची निवड झाली होती.गत वर्षी रांची येथे झालेल्याशालेय राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेतील विजेत्या महाराष्ट्र संघाची कर्णधार होती. सरीता दिवा एसएमआरके महाविद्यालयाची विद्यार्थिनी असून यापूर्वी भुवनेश्वर येथे राष्ट्रीय विजेता ठरलेल्या महाराष्ट्र संघाची खेळाडू राखले. नीलम ही जिल्हा परिषदेच्या शासकीय कन्या शाळेची विद्यार्थीनी आहे. १८ वर्षा आतील गटात सुषमा चौधरी आणि सरिता दिवा यांची राज्याच्या संघात निवड झाली होती.सुषमा चौधरी वाय.डी.बिटको कनिष्ट महाविद्यालयाची विद्यार्थिनी असून गतवर्षी १७ वर्षा आतील शालेय राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेतील विजेत्या महाराष्ट्र संघाची कर्णधार होती. सरीता दिवा एसएमआरके महाविद्यालयाची विद्यार्थिनी असून यापूर्वी भुवनेश्वर येथे राष्ट्रीय विजेता ठरलेल्या महाराष्ट्र संघाची खेळाडू होती.



----------**----------

# "ई-लर्निंग द्वारे विकासाची भरारी"

**शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद शाळा भोयेगाव ते पी.एम.श्री भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय शाळा, भोयेगाव, पो.जोपूळ, ता.चांदवड, जि.नाशिक**

**शाळेचा ईमेल आयडी** - modelschoolbhoyegaon@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.बाळासाहेब एकनाथ धाकराव
**मोबाईल क्रमांक** - ८६६८७८१३५५
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - balasahebdhakrao@gmail.com

**शाळेची ठळक वैशिष्ट्ये -**

**ISO मानांकन प्राप्त. सन २०१५**
**जिल्हा परिषद नाशिक व इम्पथी फाउंडेशन मुंबई यांच्या सयुंक्त विद्यमाने सुसज्ज इमारत बांधकाम पूर्ण सन २०१५-१६**
**महाराष्ट्र शासनाच्या महत्वकांक्षी उपक्रमातून राज्यातील १०० शाळा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या करणे अंतर्गत समावेश सन २०१७-१८**
**शाळेस भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय जि.प.शाळा भोयेगाव असे नामकरण सन २०१८-१९**
**राज्याच्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत आदर्श शाळा म्हणून निवड सन २०२०-२१**
**नाशिक जिल्ह्याच्या मिशन मॉडेल स्कूल या उपक्रमांतर्गत मॉडेल शाळा घोषित. सन २०२२-२३**
**PM श्री या केंद्र शासनाच्या योजनेतील दुसऱ्या टप्प्यात गुणात्मक निकषावर निवड. सन २०२३-२४**

**प्रास्ताविक -**

२१ व्या शतकाला सामोरे जाताना शाळेतील प्रत्येक विद्यार्थी हा सर्जनशील विचार करणारा, स्वयंपूर्ण व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सर्व कौशल्ये प्राप्त करण्यासाठी प्रयत्नशील बनावा यासाठी विविध अध्ययन अनुभूती आमच्या शाळेत दिल्या जातात. विद्यार्थ्यांना अध्ययनात आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख व वापर करता यावा यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक आहेत म्हणून आमच्या शाळेने या समस्येवर मार्ग काढण्यासाठी सकारात्मक पावले उचलून त्यासाठी योग्य उपाययोजना केल्या व विद्यार्थ्यांना दररोजच्या अध्ययन अध्यापनासाठी तंत्रज्ञान सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या .

**मुख्याध्यापक / शिक्षक यांनी केलेले प्रभावी कामकाज**

आमच्या शाळेत शिकणारी बहुतांश विद्यार्थी गरीब, कष्टकरी, सामान्य कुटुंबातील व काही विद्यार्थी मध्यम, नोकरदार अशा परिवारातील असून आजूबाजूच्या १४ खेड्यातून शिक्षण घेण्यासाठी मुले शाळेत प्रवेशित झाली आहेत. शाळेच्या आजवरच्या एकंदरीत प्रवासाचे वर्णन हे जिल्हा परिषदेपासून ते पी.एम.श्री. शाळा असा चढता आलेख आहे. शाळेत विविध प्रकारचे अध्ययन अनुभव दिले जातात. त्यात दैनदिन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर हा भाग खूपच महत्वाचा आहे. आमच्या शाळेत सुरुवातीस या सुविधेचा अभाव होता , याची

गरज व महत्व लक्षात घेऊन आम्ही सर्व शिक्षक व शाळा व्यवस्थापन समिती यांच्या सहकार्याने या विषयावर काम करण्याचे निश्चित केले. त्यासाठी वर्गवार पालक मेळावे आयोजित करून पालकांना तंत्रज्ञानाचे महत्व समजावून सांगितले. काय-काय आपल्या शाळेसाठी आवश्यक आहे याची यादी या मेळाव्यात सांगण्यात आली. शिक्षक वर्गात विद्यार्थ्यांना हे तंत्रज्ञान नेमके कशा पद्धतीने व काय अध्ययन अनुभव देवून शिकवणार आहेत हेही पालकांना समजावून सांगितले. परंतु काळानुसार शिकण्याच्या व शिकवण्याच्या पद्धती या बदलत असतात त्याप्रमाणे आमच्या शाळेतही बऱ्याच बाबी बदलाव्या लागतील यासाठी विचार विनिमय सुरु झाले, त्यानुसार अत्याधुनिक संसाधने आपल्याकडे असावीत व त्याचा आपल्या दैनदिन अध्यापनात वापर करता यावा म्हणून आम्ही सर्वांनी पुन्हा प्रयत्न सुरु केले.

**या अडचणींवर मात करण्यासाठी केलेली उपाययोजना**

पालकांनी आपल्या पाल्याच्या उज्ज्वल भवितव्यासाठी प्रत्येक वर्गासाठी लोकसहभाग जमा करून प्रोजेक्टर वर्गात बसवून दिले, व इतर होतकरू पालकांनी शाळेस कॉम्प्यूटर भेट दिले. शिक्षकांनी आपल्या पाठ्यपुस्तकातील घटक विद्यार्थ्यांना दररोज प्रोजेक्टरच्या साहाय्याने समजावून सांगण्यासाठी सुरुवात केली. विद्यार्थी आनंदाने दररोज नवनवीन संकल्पना व पाठ्यांश वर्गात शिकण्यासाठी प्रेरित होऊ लागले व स्मार्ट TV, Interactive स्मार्ट बोर्ड, Tab, Laptop व internet या सुविधा मिळवण्यासाठी प्रशासन, खाजगी स्वयंसेवी संस्था यांच्या सहकार्याने आमच्या शाळेत या सुविधा उपलब्ध करून दिल्या .शाळेत सध्या ६- प्रोजेक्टर , ५- स्मार्ट TV, ३- interactive स्मार्ट बोर्ड, ५० – tablet, १४- laptop, WIFI, इंटरनेट सुविधा उपलब्ध आहेत.

**फलनिष्पत्ती / दृश्य परिणाम / यशोगाथा**

शाळेतील शिक्षकांनी स्वतः तंत्रस्नेही बनण्यासाठी सुरुवात केली , शाळेतील इतर तंत्रस्नेही शिक्षकांच्या मदतीने उपलब्ध साधनाचा प्रभावी वापर कशाप्रकारे करावा यासाठी चर्चा करून साधने व वापर कर्त्याच्या पद्धती निश्चित करून घेतल्या व त्याप्रमाणे प्रत्यक्ष कार्यवाही करण्यासाठी सुरुवात झाली. त्यात प्रामुख्याने डिजिटल pdf , वेगवेगळी android apps , तयार असलेले शैक्षणिक घटकांवर आधारीत व्हिडीओ, interactive ppt निर्मिती, app निर्मिती इत्यादी बाबी शिक्षक विद्यार्थ्यांना अध्ययन अनुभव देण्यासाठी उपयोगात आणायला सुरुवात केली.

शाळेतील शिक्षक श्री.जयेश सुर्यवंशी यांनी स्वतः ज्ञानज्योती या नावाचे android app तयार केले असून ते पूर्णतः offline कामकाज करते व त्याचा पालक,शिक्षक व विद्यार्थी यांना अध्ययन अध्यापनात भरपूर प्रमाणात चांगला फायदा होताना दिसून आला आहे, तसेच त्यांनी Interactive पद्धतीच्या ppt निर्मिती करून विद्यार्थ्यांना tablet व प्रोजेक्टर व स्मार्ट बोर्डच्या मदतीने या ppt चा सराव केला जातो तसेच घरी विद्यार्थी पालकांच्या मोबाईल वर अनावश्यक गेम खेळत असतात त्यावर उपाय म्हणून या ppt चा वापर करण्यास प्रेरित केले आहे.अशा जवळजवळ १४०० च्या वर Interactive ppt ची त्यांनी स्वतः निर्मिती केली असून महाराष्ट्रातील बहुतांश शिक्षक,पालक व विद्यार्थ्यांना या ppt चे मोफत वाटप केले आहे व त्यांचा वापर सुलभतेने करण्यात येतो. शाळेत विविध स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केले जाते त्यासाठी विविध पद्धतीचा अवलंब करण्यात येतो , त्यात प्लीकर्स या डिजिटल माध्यमाचा वापर शाळेतील श्री.केशव वाकचौरे सर यांच्या माध्यमातून केला जातो. घटकानुसार प्रश्नावल्या बनवून त्याचे स्क्रीन वर सादरीकरण करून योग्य पर्याय विद्यार्थ्याने

दाखवण्यासाठी PVC कार्ड बनवले आहेत. शाळेतील इतरही शिक्षक ppt , Worksheet, व्हिडीओ निर्मिती अशा माध्यमातून तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करतात.

**समारोप**

शाळेतील विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानासोबतच बदलत्या शैक्षणिक प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी शाळेत नाविन्यपूर्ण पद्धतीने अध्यापन करण्यात येते. २१ व्या शतकातील कौशल्ये प्राप्त करण्यासाठी वेगवेगळ्या मार्गाने अध्ययन अनुभव देण्याचे कार्य नियमित केले जाते. विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण मिळावे या हेतूने भविष्यवेधी शिक्षण विचार या पद्धतीचा अवलंब करून त्यातील सहा पायऱ्यानुसार गट पद्धतीने अध्ययन अनुभव देण्यात येतात.

**संदर्भासाठी -**

1.Techno Jayesh YouTube channel -

https://youtube.com/@technojayesh1736?si=c-gZkwbIrQFKQitb

2.ज्ञानज्योती Android App -

https://drive.google.com/file/d/1yQZzqK1b3ZN2OGxCdtrrDxoCFr_CUqQE/view?usp=drivesdk

**अगोदरची शाळा**



**सध्याची शाळा**



----------**----------

# "लिंग समावेशकतेमध्ये शालेय नेतृत्वाची कामगिरी"

**शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मुर्टा, तुळजापूर, जिल्हा धाराशिव.**

**शाळेचा ईमेल आयडी** - swamia711@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री. श्रद्धानंद स्वामी
**मोबाईल क्रमांक** - 9623980162
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - mahanurbabita@gmail.com

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुर्टा तालुका तुळजापूर जिल्हा धाराशिव येथे लिंग समावेशकता याविषयावर झालेले कार्य आणि त्यात झालेले सकारात्मक बदल म्हणजे यशोगाथा. सदर लेखात मी बबिता खंडेराव महानूर प्राथमिक पदवीधर शिक्षिका आणि सर्व स्टाफ यांनी केलेले विविध प्रयत्न आणि आलेले यश मांडले आहे. हे उपक्रम शाळेतील सर्व शिक्षक आणि मुख्याध्यापक श्री.स्वामी श्रध्दानंद आणण्या यांच्या कुशल मार्गदर्शनात आणि देखरेखीत राबवले आहेत. लेखनही मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनातच पूर्ण केले आहे. प्राचीन भारतीय संस्कृती ही पुरुष प्रधान संस्कृती असल्यामुळे तिचाच वावर आपल्या सर्व समाजजीवनात दिसून येतो.

पुरुषप्रधान संस्कृतीचा पगडा सर्वत्र दिसतोच. त्याचा परिणाम मुलांच्या वर्तनात दिसून येतो , त्याची झळ मुलांच्या रोजच्या जगण्यास लागते. शाळेत दिसत असलेल्या अनेक बाबीमध्ये मुलं नेहमी मुलीपेक्षा वरचढ असल्याची भावना ठेऊन जगतात मुलींचे वर्तन नेहमी दुय्यम पद्धतीचे होते अस वाटत होते. मुली नेहमी दबलेल्या जाणवत होत्या. कुठल्याही अवघड कामात मुलं पुढे येत पण मुली नेहमी मागे राहायच्या नको नको ती कारणे देणे आणि जबाबदारी टाळणे हे तर सर्व मुलींच्या स्वभावात कायम रुजलेले होते. स्त्री आणि पुरुष समान मानून त्यापध्दतीने प्रत्येक मुलगा किंवा मुलगी वाढवलेली आपणास दिसत नाही. आजच्या घडीला ही मुलगा आणि मुलगी यांच्या वर्तनात खूप भेद दिसून येतात. खूप मोठा फरक त्यांच्या पालन पोषण आणि शिक्षणात केला जातो. अनेक कारणांमुळे ग्रामीण भागात तर मुली शाळा बुडवतात. लहानभावंडांचा सांभाळ करणे, पाहुणे आले की घरातल्यांच्या मदतीला हातभार लावणे,सणवार आले की मदत म्हणून मुलींचा वापर, मुलींचा बालविवाह अशा अनेक समस्यात मुलींचे जगणे आजही कोंडलेले आहे.

शाळेत पण हे परिणाम दिसून येत होते. मूल जन्मते तेही या विषमतेच्या विचित्र वातावरणात! मुलगा झाला सगळे आनंदी, मुलगी झाली सगळ्यांची तोंडे पडलेली असतात. वाकडे झालेले सर्वांचे तोंड घेऊन मुलींचे आगमन होते. पहिली मुलगी असेल तर जिलेबी हौसेने वाटली जाते. पण दुसऱ्यांदा मुलगी झाली की स्वतःहून सांगितले ही जात नाही. हे सगळे असे का घडते? तर प्रत्येक भारतीय माणसाच्या मनावर बिंबलेला पुरुषी पगडा! मग जडणघडण होताना, खेळणी खाऊ कपडे या सगळ्यात भेदभाव!

हे सगळे बघत बघत मुले मुली मोठ्या होतात. शाळेत येतात. शिकतात जातात नि आपणही तोच किस्सा गिरवायला सज्ज होतात. या सगळ्या भेदभाव प्रकरणात स्त्रिया अग्रेसर असलेल्या अनेकदा दिसून येतात या सगळ्याला जबाबदार त्यांनी भोगलेल्या अनेक चटक्यात दिसून येते. मुलगी म्हणून जन्माला येणे आणि ते सारे व्यवस्थित निभावणे, सहन करणे, समजून घेणे या सर्व चक्रातून ती स्वतः गेलेली असते. मग आपल्या पोटाला येणाऱ्या बाळाच्या नशिबी ती सुख चिंतत असते.

सुख म्हणजे पुरुष हे समीकरण जणू तिच्या विचारात घट्ट बसलेले असते आणि म्हणून तिला स्वतःला फक्त आणि फक्त मुलगा हवा असतो आणि त्यात अनेक जबाबदाऱ्या सांभाळून तीच मेटाकुटीला आलेली असल्यामुळे विचाराच्या कक्षा तिथेच स्वतःच्या विश्र वाभोवती गुरफटून जातात. सुखाच्या कल्पना अगदी दूर दूर निघून गेलेल्या असतात. अशा बिकट अवस्थेत तिला मुलगी होणे हे दुःखाचे कारण वाटू लागते. मुलगी असणे हे दुःखाचे कारण कधीच होऊ शकत नाही. पण सतत शारीरिक कष्टात अडकलेल्या स्त्रीला ज्ञानाचे डोस कोण पाजणार?

ती जे शिकते ती कुटुंब,समाज आणि तिला आलेले बरेवाईट अनुभव यातून ! म्हणूनच **बरेचदा** तिला तिच्या पोटी स्त्रीचा जन्म व्हावा असे वाटत नाही. पण कधी कधी मुली आणि फक्त मुलीच जन्म घेऊ लागतात आणि ती स्त्री वैतागते तिला मुलगा हवाच असतो. मग ती कचरत नाही स्त्री भ्रूण हत्या करायला!

अर्थात तिच्या सोबत्याच्या, सासूच्या सर्वांच्या मदतीने ! परंतु दोन मुली झाल्या आता आपण थांबवू या हा साधा विचार कोणाच्या डोक्यात येत नाही. कारण वंश बुडेल ही भीती! हे काही त्यांच्या कोणाच्या डोक्यात येणे शक्य नाही . आपल्या वंशाला दिवा हवा आहे बास ! असे अनेकदा दिसून येते, पेपर, टीव्ही च्या माध्यमातून अशा अनेक घटना पाहायला,वाचायला आणि ऐकायला मिळतात.

घर, समाज, शाळा या सर्व ठिकाणी स्त्री पुरुष हा भेद बघत मुले आणि मुली मोठ्या होतात. सर्वत्र विभागणी कामाची आणि वागण्याचीही.आता शारीरिक रचनेत फरक असतो ती नैसर्गिक गोष्ट आहे. परंतु प्राबल्य फक्त पुरुषांकडे देणे हा आपल्या इथल्या सामाजिक चालीरीतीने आपल्या मनावर बिंबवलेला एक चुकीचा संस्कार आहे. मग अशा विषम वातावरणातून मुले शाळेत दाखल होतात.

त्यांच्या घरात असलेल्या वातावरणाचा पगडा मुलावर असतो. आई वडील ,आजी आजोबा , बहिणभावंडे या सर्व नात्यात मुलाला मिळत असलेले श्रेष्ठत्व घेऊन ते मूल शाळेत येते आणि शाळेत सुरू होतो "मुलगा मुलगी समानतेचा नारा" वर्तन काही वेगळे आणि नारा वेगळा या दोन्हींचा अर्थ बऱ्याचदा न समजणारे ते वय.

गोंधळलेली मनस्थिती यात अनेक बाबीतून समानता शिकवण्याचे चालू होते. वास्तविक प्रत्यक्ष ती शाळेतही कुठं सापडत नाही बऱ्याचदा! परंतु शाळा पातळीवर हे मुल्य, ही समानता रुजविण्याचे कौशल्य शिक्षकात असणे गरजेचे असते.

शिक्षकाच्या अनेक कृतीतून विद्यार्थ्यांना कळले पाहिजे की मुलगा आणि मुलगी हे समान आहेत. त्या समानतेच्या वाटेवरून शिक्षकाला आपल्या सर्व विद्यार्थ्याला घेऊन जाता यायला हवे .हे नेतृत्व शिक्षकांच्या ठायी तर हवेच परंतु ते आपल्या विद्यार्थ्यांच्या ठायी सुद्धा रुजवता येणे गरजेचे आहे.

**"समानता पे स्थित ही समाज हमे चाहिए!**
**जितना पुरुष मुक्त है उतनी ही स्त्री भी चाहिए!"**

या वरील ओळीप्रमाणे मुलगा आणि मुलगी किंवा स्त्री आणि पुरुष हे दोन्ही अतिशय महत्वपूर्ण घटक असून त्यांचा विकास सोबत झाला पाहिजे यासाठी शाळेत नेतृत्व विकसन झाले पाहिजे. हा विचार पूर्वीपासून डोक्यात घट्ट बसलेला असल्यामुळे ज्या ज्या शाळांत काम करण्याची संधी मिळाली तिथे तिथे मुलामध्ये हा विचार रुजविण्यात यश आले आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुर्टा या शाळेत पण हे नेतृत्व विकसित करण्यात उत्तम यश आले .त्याचाच लेखाजोखा या लेखात मी मांडत आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुर्टा येथे जेव्हा पाच वर्षापूर्वी मी शाळेत रुजू झाले होते तेव्हा इयत्ता 5 वी ते 7 वी च्या विद्यार्थी विद्यार्थिनी मध्ये अनेक समस्या होत्या. उदाहरणार्थ मुले मुली एकमेकांना बोलायच्या नाहीत. मुलींनी सगळे समजून घ्यायचे. गट तट करणे, चहाड्या लावणे, झाडू मारणे फक्त मुलींच करणार मुले हात लावणार नाहीत. कुठले गार्डनचे वगैरे काम फक्त मुले करणार, मुलांच्या तोंडी आई ,बहिण या नात्याबाबत घाणेरड्या शिव्या मग त्यावरून भांडणे क्वचित मारामाऱ्या ही! घरी पण मुलांच्या हातात आयता पाण्याचा ग्लास द्यावा लागत असे!

जेवणाचे ताट पण व्यवस्थित वाढून मुलांना द्यावा लागत असे ! मुली मात्र स्वतः वाढून घेऊन जितके खायचे तितके खायचे नाहीतर नाही खायचे. इतकेच काय तर मुले इंग्लिश माध्यमाच्या शाळेत नि मुली मराठी माध्यमात गावातल्या शाळेत शिकायच्या आणि घरी अडचण असेल तर मुलींची शाळेला बुट्टी! आई आजारी असली की ज्याला बहिण नाही अशी मुले काहीच काम करत नसत! शेजारच्या काकू सगळे काम करायच्या, शाळेत ही प्रचंड असमानता दिसून येत होती. मुलगा मुलगी एकसमान चे नारे देत आम्ही गावात जायचो. नि मुलगा होत नाही म्हणून चार पाच मुली होऊ देऊन मग मुलगा झालेला अशी अनेक कुटुंबं पहात होतो!

मुलगा होत नाही तोपर्यंत कितीही मुली झाल्या तरी हरकत नाही पण मुलगा हवाच हा हट्ट असलेली जोडपी पाहण्यात येत होती! काही ठिकाणी मुलगा होत नाही म्हणून सुनेला जाच करणाऱ्या सासवा ही बघण्यात येत होत्या. एकुलता एक मुलगा झालाच की तो अतिशय लाडाकोडातला ,सर्वांच्या कौतुकाचा विषय झालेला असायचा!

घरी आधीच असलेल्या मुली मात्र अशाच जन्म दिलाय तर आता तिचे नीट करणे आपले कर्तव्य या भावनेतून नाईलाजाने जगवत असलेल्या! मुलींचे आणि तिच्या लग्नाचे मोठे कोडे घेऊन जगणारे आईबाप अजुनही ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागात आढळतात.

आई वडील का मुलींशी जाणून बुजून वाईट वागत न्हवते परंतु पुरुषप्रधान संस्कृतीमुळे नकळत मुलगा घरात महत्वपूर्ण ठरत असे नि मग चालू असायचे मुलींच्या हेळसांडीचे चक्र अगदी नकळतपणे! मुली शाळेत ही दबून असायच्या! विचित्र परिस्थिती होती! अभ्यास पण अगदीच कच्चा! मुलांचा थोडा ठीक पण मुली घरातली सगळी कामे करून, छोट्या भावंडांचा सांभाळ करून, थकून भागून शाळेत यायच्या ! त्यात लेकरे अधिक नि आई वडील, आजी आत्या इत्यादींचे भांडण झालेले असेल तर मुलींची अवस्था बघवत न्हवती!

एक मुलगी तर म्हणायची "मॅडम सगळे म्हणतात माझ्या नशिबात कधीच सुख नाही!" ही किती मोठी नकारात्मकता त्या लेकरामध्ये इयत्ता सातवीच्या वयात भिनलेली होती ! आश्चर्य वाटत राहायचे ! प्रत्येक मुलाची नि मुलीची कहाणी वेगळीच! ग्रामीण भाग ,कसल्या सुविधा नाहीत आणि अंतर्गत समस्या अनेक होत्या!"

मी जेव्हा जिल्हापरिषद प्राथमिक शाळा मुर्टा येथे कामावर इयत्ता 6वी आणि 7वी वर्गासाठी रुजू झाले तेव्हाची ही अशी विचित्र परिस्थिती मुलांमध्ये दिसून येत होती. अनेक शाळांचा, वर्गाचा ,प्रशिक्षणाचा अनुभव गाठीशी असल्यामुळे मुलांत मूल होता येत होते. या परिस्थितीत सुधारणा करून शिकणे आनंददायी करण्याचे ध्येय मी मनोमन ठरवले होते. हळू हळू मुले मुली यांचे मैदानावर खेळ घेणे सुरू केले. विद्यार्थ्यांशी अनौपचारिक गप्पा मारण्यामुळे ग्रामीण भागातील अनेक घरगुती समस्यांचा उलगडा होत होता. त्या समस्याच मुलांच्या जगण्यातील अडथळे ठरत होत्या . मुलींच्या समस्या तर अजुनच वेगवेगळ्या! अशात शाळेत मीनाराजू मंच स्थापन केला. अध्यक्ष मुलगी नि उपाध्यक्ष मुलगा केला. शाळेतली सर्व छोटी मोठी कामे सर्वांना समान वाटून दिली. मुलींची कामे, मुलांची कामे हा भेद दूर केला .मैत्री आणि आकर्षण यातला फरक समजून सांगितला .मुलींची म्हणून शिक्का बसलेली सर्व कामे घरी जाऊन मुलांनी करावी आणि ती सर्वांसमोर सांगावी असा उपक्रम घेतला.

आज सर्व मुले आईला कामात मदत करतात .मुली तर न सांगताच सारे काही करतात ( जन्मतःच मुली समजदार असतात असा आपला समज आणि तो अक्षरशः खरा करून दाखवतात या मुली!) शाळेत चपाती करून आणायचा असाच एक उपक्रम मी राबवला होता. मुलांनी आणि मुलींनी चपात्या करून आणल्या. कोण आनंद झाला होता त्यांना अबब! थोड्या कच्च्या मच्च्या झाल्या होत्या ती गोष्ट वेगळी! पण प्रयत्न उत्तम केला होता मुलांनी! मुलींची भूमिका मुले जगत होती ! एक प्रकारची समानुभुती आणि आईच्या ,आजीच्या बहिणीच्या कष्टाची जाणीव मुलांना होत होती .आई आजारी पडली की बहिण नसलेल्या मुलांची समस्या या निमित्ताने दूर होत होती. कारण मुलांनी घरातील सर्व गोष्टी शिकण्याचा ठाम निर्णय घेतला होता.

मीना राजू मंच च्या वतीने शिवीबंद अभियान शाळेत राबवले. ग्रामीण मुलांच्या आणि मुलींच्याही तोंडातून सहज शिव्या रुळलेल्या होत्या. त्या शिव्या आई आणि बहिणी वरून होत्या! शाळेतच नाही तर गल्लीत आणि घरात सुद्धा मुलांनी शिव्या देऊ नये याची काळजी घ्यावी म्हणून पालकांचा सहभाग ही घेण्यात आला. पालक भेटीच्या माध्यमांतून दोन मुले मग त्या मुली असल्या तरी कुटुंब नियोजन करण्याविषयी पालकांना बोलण्यात आले. पालकांना मुलगा हवाच असतो ती गोष्ट वेगळीच! पण शाळेतील मुले तर जागरूक नागरिक घडतील, समानतेवर आधारित समाज निर्मितीत पुढे सहभाग घेतील या अनुषंगाने लिंगभेद समभाव शाळेत रुजविण्यासाठी प्रयत्न करण्यात आला. अनेक उपक्रमामुळे मुलामुलींमध्ये एक वेगळाच आत्मविश्वास निर्माण झाल्याचे दिसून येऊ लागले. कुठलाही कार्यक्रम मुले स्वतःहून पडेल ती कामे करून यशस्वी करू लागली .श्रमप्रतिष्ठा हे मूल्य प्रात्यक्षिकातून, मुलांच्या जगण्यात रुजताना दिसले.

**संबंधित फोटो -**







----------**----------

# "मूल्य शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांच्या नागरिकत्वाच्या विकासाचे प्रयत्न"

**शाळेचे नाव :- जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा केसरजवळगा ता. उमरगा जि. धाराशिव**

**शाळेचा ईमेल आयडी** - zpcpskj1885@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री शेख नबिलाल गुलाबसाब
**मोबाईल क्रमांक** - 9689891355
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - shaikhnabilal1355@gmail.com

**प्रास्ताविक** -

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा ही निजामकालिन शाळा आहे, शाळेची स्थापना 5 जून 1885 असून ही शाळा जिल्ह्यातील जुन्या शाळापैकी एक आहे. मूल्याधारित शिक्षणाचे महत्व अनन्यसाधारण आहे त्यामुळे दैनंदिन शालेय कामकाजातून मूल्य रुजवली जावीत यासाठी प्रयत्न करावेत असे सर्व शिक्षक आणि मुख्याध्यापक यांनी ठरवले.

**समस्या** -

शाळेमध्ये पोषण आहार वाटप झाल्यानंतर मुले उरलेले अन्न इकडे तिकडे फेकत असल्याने शालेय परिसर अस्वच्छ होत होता. वर्गावर्गातून होणारा कचरा कोठेही पडायचा , मुले निटनेटकी शालेय गणवेशात उपस्थित राहत नव्हती. तसेच शाळेत वेळेवर येणे व वेळेत घरी जात नसल्याने अनेक पालकांच्या तक्रारी वाढत होत्या.

**उपाय** -

वरील सर्व समस्या भेडसावत होत्या. त्यासाठी सर्वप्रथम वेगवेगळ्या कचराकुंड्या आणून वर्गात होणारा कचरा गोळा करण्यासाठी त्याचा वापर केला गेल्याने कचरा पूर्णपणे बंद होण्यास मदत झाली.मुले पूर्ण गणवेशात यावी यासाठी जो विद्यार्थी पूर्ण गणवेशात आला आहे त्याचा सत्कार करण्यात आल्याने इतर मुलेही गणवेशात येण्यास मदत झाली.त्याचबरोबर शाळेत खालील मूल्यावर आधारित उपक्रम घेतल्याने मुलांच्या वर्तनात बदल झालेले दिसून आले .

**शालेय परसबाग** -

मुलांना श्रमाचे महत्त्व कळावे यासाठी शाळेमध्ये उत्तम परसबाग निर्मिती केली. मुलांचा सहभाग घेऊन विविध प्रकारच्या फळभाज्या यामध्ये पालक, भोपळा, कोथिंबीर, दोडका आणि शेवग्याच्या वीस झाडाची लागवड करण्यात आली.सर्व काम मुलेच पाहत असल्याने श्रम प्रतिष्ठा हे मूल्य रुजविण्याचा प्रयत्न करता आला .

**बचत बँक** -

मुलांना बचतीची सवय लावावी, यासाठी बचत बँक निर्मिती केली. मुले बचतीतून बँकेत जमा करतात व आपणाला लागणारे शैक्षणिक साहित्य घेतात. या उपक्रमामुळे स्वावलंबन ,श्रम प्रतिष्ठा, यांचे संस्कार विद्यार्थ्यांवर करता आले.

**संवेदनशीलता -**

खेळत असताना किंवा इतर वेळी मुलांना झालेल्या जखमा इतर विद्यार्थी शाळेमध्ये असलेल्या प्रथमोपचार पेटीचा वापर करून मुलांना मलम लावणे, पट्टी बांधणे अशा कृती करण्यासाठी पेटीचा वापर करण्यात येतो .

**सहकार्य -**

एकमेकांना सापडलेल्या वस्तू परत गुरुजींकडे जमा करून स्वतः चीच वस्तू घ्यायची ,इतरांच्या वस्तूला हात लावायचा नाही अशी सवय मुलांना लागली .

**एक वर्ग एक खेळ -**


शाळेमध्ये विविध प्रकारचे खेळ घेतले जातात. यामध्ये कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, थाळी फेक, गोळा फेक, लांब उडी, उंच उडी अशा विविध खेळांमध्ये एक वर्ग एक खेळ याप्रमाणे उपक्रम राबवला जातो. कला,क्रीडा गायन नृत्य असे विविध उपक्रम शाळेत राबवले जातात.

परिपाठात मुले एकमेकांच्चे गणवेश,शरीर स्वच्छता याकडे लक्ष देतात ,त्यामुळे नकळत मुले टापटीप रहाण्यासाठी प्रयत्न करू लागले.

वरील सर्व उपक्रमांमुळे मुलांना मूल्याधारित शिक्षणातून व्यक्तिमत्व उन्नत करण्यासाठी शाळा प्रयत्न करत आहे. मुले ही देशाचे भावी नागरिक असल्याने शालेय जिवनापासूनच हे संस्कार व्हावेत यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.





स्पर्धा आयोजन




एक वर्ग एक खेळ



परसबाग




परिपाठ




परसबाग

----------**----------

## "परसबागेची यशोगाथा"

**शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद कन्या प्रशाला, मुरूम,ता.उमरगा,जि.धाराशिव**

**शाळेचा ईमेल आयडी** - mbkamble@99gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्रीमती. मंकावती बळीराम कांबळे
**मोबाईल क्रमांक** - 9923445943
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - mbkamble@99gmail.com

**"शाळा एक अविस्मरणीय**
**अशी आठवण**
**ज्याची प्रत्येकानेच आपल्या आयुष्यात**
**करून ठेवलीय साठवण"**

उपरोक्त काव्यपंक्ती शाळेची महती सांगून जातात.'शाळा' हे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचे संस्कार केंद्र होय. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण तसेच आरोग्यदायी विकास व्हावा यासाठी केंद्र शासनाने प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेअंतर्गत सर्व शाळांमध्ये परसबाग निर्माण करून सदर परसबागांमधून उत्पादित भाजीपाला व इतर पदार्थांचा समावेश शालेय पोषण आहारामध्ये करण्याचे निर्देश दिनांक 15 ऑक्टोबर 2019 रोजी च्या मार्गदर्शक सूचनानुसार दिले आहेत . या सूचनानुसार जिल्हा परिषद कन्या प्रशाला,मुरूम, तालुका-उमरगा, जिल्हा-धाराशिव या शाळेची इमारत खूपच भव्य- दिव्य व सुंदर शाळा अगदीच मोक्याच्या स्थानी स्टॅन्ड समोरच उभी.

**कुंपणाविषयी चंद्रशेखर गोखले म्हणतात**
**"घराभोवती कुंपण हवं**
**म्हणजे आपलं जग ठरवता येतं**
**बाहेर बरबटलेलं असलं तरी....**
**आपल्यापुरतं सावरता येतं.**

या शाळेला मैदानही खूप मोठे आहे ;पण खंत एकाच गोष्टीची ती म्हणजे या शाळेला नसलेल्या कुंपणाची. कुंपण नसल्याकारणाने शाळेमध्ये झाडांची संख्या खूपच कमी अगदी हातावर मोजणे इतकीच. मी या शाळेत येऊन एक वर्ष होऊन गेले.या शाळेमध्ये आल्यापासूनची इच्छा, ती म्हणजे झाडे लावण्याची. या शाळेमध्ये इमारतीच्या आतील बाजूने फरशी न घातलेला जमिनीचा पाच ते सहा मीटर लांब व तीन ते चार मीटर रुंद तुकडा पडीक होता .

ज्याचा उपयोग लहान वर्गातील म्हणजेच एक ते चार या गटातील मुले लघवीला जाण्यासाठी करत होती. या जागेचा उपयोग मी स्वतः घरात तयार केलेल्या रोपाने सजवण्याचे ठरवले .अरेका पाम, सायप्रस, नारळ,जास्वंद, कण्हेरी स्वस्तिक (लहान-मोठी )अशी बरीचशी झाडं आम्ही मुलांच्या सहाय्याने या जागेतील गवत काढून, साफसफाई करून लावली.

या जागेमध्ये बांधकाम केलेले व उपयोगी नसलेले भरपूर साहित्य पडलेले होते. विटांचे तुकडे, फरशा, दगड धोंडे, इतर घाण, गवत या सर्वांची साफसफाई करून वृक्षारोपण करण्यात आले. आमच्या

मुख्याध्यापिका श्रीमती. कांबळे मॅडम यांनी सुचवले की आपण यात परसबाग देखील करूयात. परसबाग ज्यामध्ये आठ ते दहा दिवसात उगवलेल्या मायक्रो ग्रीन्स म्हणजे अंकुर फुटून दोन किंवा त्यापेक्षा जास्त आलेली पाने किंवा भाजीपाला.

**संत सावता माळी म्हणतात...**
**कांदा, मुळा, भाजी ।अवघी विठाई माझी।।**
**लसूण, मिरची, कोथिंबीर । अवघा झाला हरी।।**

शाळेमध्ये तयार करण्यात करण्यात येणाऱ्या पोषण आहारात खिचडीमध्ये, वरणामध्ये हा सेंद्रिय भाजीपाला वापरून मुलांना सकस आणि सेंद्रिय खत घातलेला पोषण युक्त आहार पोहोचवा .

स्वतः पिकवून तयार केलेल्या. भाजीपाल्याची त्या कष्टाच्या आनंदाची जाण मुलांना व्हावी आणि झालीच पाहिजे. मग काय आमच्या जाधव मॅडम यांनी मुलांकडून सऱ्या करून घेतल्या. या सरीमध्ये प्रथम आम्ही मेथी, पालक ,कोथिंबीर भोपळा, दोडका, कारले ,मिरच्या,कढीपत्ता, टोमॅटो इत्यादींची बियाणे टाकण्यात आली . मुलांना देखील तुमच्याकडे घरी असणारे रोपे आणावयास सांगितले .मुलांनी देखील कांदा, भेंडी,मिरची अशी बरीचशी रोपे आणून लावली. मुलांना देखील या परस बागेत विविध रोपे लावण्याची गोडी वाढू लागली.बी- बियाणे टाकल्यानंतर दहा ते बारा दिवसातच अंकुर फुटून रोप जमिनीच्या बाहेर येऊ लागले. तसतशी सर्वांचीच उत्सुकता वाढू लागली .अतिशय घाणेरड्या असलेल्या जागेत आता टुमदार अशी छोटी छोटी रोपे उगवून आलेली सर्वांचेच लक्ष वेधू लागली .

आज परिपाठाला त्या जागेच्या बाजूला उभारले असता प्रसन्न वाटू लागले.भेंडीच्या रोपाला लांब सडक आणि करकरीत भेंडी लागली. वांग्याच्या रोपातून लागलेले हिरवेगार वांगे ...रोपातून हळूच वाकून पाहणार वांग, मला बघा, मला बघा असं म्हणू लागलं की काय वाटू लागलं. भोपळ्याचे वेल मला वर चढवा नाही तर मी सगळ्या झाडावर चढेण असं म्हणत की काय भासू लागलं.

**पालक मला खोडून घ्याचं गाणं गाऊ लागली.**
**तर कोथिंबीर म्हणू लागली,**
**“आहे मी कवळी कवळी**
**खाऊन घ्या नाहीतर**
**होईल पिवळी पिवळी”.**

आता खिचडी बनवताना सर्वच भाज्यांचा उपयोग होऊ लागला. आता पाऊस संपला .आता आली खुरपणाची वेळ. शाळेमध्ये असलेले किंवा घरामधून आणलेले खुरप,विळा जे काही असेल त्यांनी मिरच्यांच्या सरी ,वेलींच्या तळाची जागा ,मोठ्या झाडांची अळी सर्वांची माती भुसभुशीत करून घेण्याचं काम लागलं. गायकवाड सर तसेच जाधव मॅडम यांनी वेली कशा कुठे चढवायच्या यासाठी तार बांधून घेणे सर्वच कामे करू लागले. शेके सर यांनी लांबूनच परसबाग खूप सुंदर झाली असा शेरा दिला. या परसबागेत खत घालणे, कीटकनाशक फवारणी या सर्वांचाच उपयोग केला ,परंतु तो सेंद्रिय खत वापरण्यात आला. म्हशीचे शेण गांडूळ खत, गाईचे गोमूत्र इत्यादीचा वापर या परसबागेत सेंद्रिय खत आणि कीटकनाशके म्हणून मुलांच्या साह्याने करण्यात आला अशा रीतीने जिल्हा परिषद कन्या प्रशाला मुरूम येथे सर्व शिक्षकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या मदतीने परस बागेची निर्मिती झाली आणि ती राहील. रामदास स्वामींनी म्हणलेलेच आहे.केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहिजे.



सुरवातीस असलेली पडीक जमीन.




सकारात्मक बदल झालेली परसबाग.

----------**----------

# “अतिपर्जन्य क्षेत्रातील शाळेचा प्रेरणादायी प्रवास”

**शाळेचे नाव व पत्ता - रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,पालीकातकरवाडी, मु.पाली तर्फे कोथल, खलाटी,पो.गौळवाडी,ता.कर्जत,जि.रायगड.**

**शाळेचा ईमेल आयडी** - archanadeshmukh198@gmail.com
**मुख्याध्यापकाचे पूर्ण नाव** - सौ. अर्चना संतोष देशमुख
**मोबाईल नंबर** - 7745872989
**ईमेल आय.डी** - archanadeshmukh198@gmail.com

**प्रस्तावना** -

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पालीकातकरवाडी या शाळेची स्थापना 21 डिसेंबर 2004 रोजी “वस्तीशाळा” स्वरूपात झाली असून शाळेची इमारत बांधकाम शासनामार्फत सर्व शिक्षा अभियान अंतर्गत सन 2010 मध्ये करण्यात आले होते.परंतु अतिपर्जन्यक्षेत्रात शाळा येत असल्याने 2018 पासून छतगळतीची मोठी समस्या निर्माण झाली.त्याचबरोबर 2019 साली आलेल्या “तुकते” चक्रीवादळामुळे स्वयंपाकगृहावरील पत्रे नादुरूस्त झाले.त्यामुळे अध्ययन अध्यापनासोबतच मध्यान्ह भोजन योजना अंमलबजावणीत अडचणी येऊ लागल्या. या सर्व समस्यांवर मात करून सन 2023 -24 मध्ये “मान मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा” तालुकास्तर व्दितीय क्रमांक व प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत रायगड जिल्ह्यामध्ये “उत्कृष्ट परसबाग” स्पर्धेत उत्तेजनार्थ क्रमांक मिळविण्यापर्यंत शाळा विकास कसा झाला याची यशोगाथा यामध्ये दिलेली आहे.

**<u>विषयासंदर्भात आलेल्या अडचणी</u>** -

**छतगळतीमुळे विद्यार्थी व शिक्षक यांची बैठक व्यवस्था** -

इमारतीची छतगळती होत असल्याने एक वर्ग पूर्णपणे पाण्याने भरत असे.त्यामुळे सर्व विद्यार्थी व दोन्ही शिक्षक बैठक व्यवस्था एकाच वर्गात करावी लागत होती.

**अध्ययन अध्यापन करताना येणा-या अडचणी** -

सर्व विद्यार्थी व दोन्ही शिक्षक बैठक व्यवस्था एकाच वर्गात असल्यामुळे विद्यार्थ्यांना अध्ययन अध्यापन करणे अडचणीचे होते.विद्यार्थ्यांचे लक्ष केंद्रित करणे अवघड होत असे.

**विद्यार्थी व शिक्षक आरोग्य विषयक समस्या** -

इमारत गळतीमुळे शाळेतील वातावरण ओलसर व दमट असल्याने सतत आरोग्याच्या समस्या मोठ्या प्रमाणात उद्भवत होत्या.

**भितीदायक वातावरण -**

इमारतीची छतगळती होत असल्याने छत केंव्हाही कोसळू शकते याची भिती शिक्षक व विद्यार्थी यांच्या मनात होती. तसेच पोषण आहार देखील याच वर्गात शिजवला जात असल्याने विद्यार्थी सुरक्षेची भिती निर्माण झाली होती.

**मध्यान्ह भोजन शिजवणे व वाटप करण्यासंदर्भात समस्या -**

वादळामुळे किचनशेडचे पत्रे उडून गेल्यामुळे शालेय इमारतीच्या एकाच वर्ग खोलीमध्ये अध्ययन अध्यापन करणे, पोषण आहार शिजवणे, पोषण आहार वाटप करणे ही सर्व कामे करावी लागत होती.

**विजेचा खांब यामुळे आलेली समस्या -**

मुलींच्या स्वच्छतागृहाजवळील विजेचा खांब खालून गंजला असल्यामुळे तो कधीही पडेल अशी भिती निर्माण झाली होती.

**पिण्याच्या पाण्यासाठी साठवण टाकीची समस्या -**

वादळात किचनशेडचे पत्रे उडून साठवण टाकीवर पडल्यामुळे टाकी फुटून वापरण्यायोग्य राहिली नाही.

**विद्यार्थी उपस्थिती व विद्यार्थी गुणवत्ता संदर्भात आलेल्या अडचणी -**

वरील सर्व समस्यांमुळे विद्यार्थी उपस्थिती कमी होऊन शालेय गुणवत्ता कमी व्हायला सुरूवात झाली होती.

**मोकाट गुरे व भटक्या जनावरांमुळे शालेय परिसराची होणारी हानी -**

शालेय इमारतीला कुंपण नसल्यामुळे दरवर्षी केलेले वृक्षांचे संवर्धन होत नव्हते.शालेय परसबाग निर्माण करण्यात अडचणी येत होत्या.

**<u>अडचणींवर मात करण्यासाठी केलेल्या उपाययोजना</u> -**

**स्वच्छ व सुंदर शालेय इमारत -**

वरील बहुतेक अडचणी ह्या इमारत संदर्भात असल्याने प्रथम इमारत दुरूस्ती केल्याने ब-याचशा अडचणी दूर होतील अश्या विचाराने इमारत दुरूस्तीसाठी आवश्यक निधी मिळविण्यासाठी पालकांना संपर्क केला. परंतु पालक मोलमजुरी करणारे आदिवासी वर्गातील असल्याने मदत मिळणे शक्य झाले नाही. म्हणून आजुबाजूच्या गावातील, समाजातील, दानशुर व्यक्ती, संस्था यांच्या भेटी घेतल्या. त्यातून पाली गावातील श्री.अनंत मांजरेकर यांच्या माध्यमातून 'परवीन इंडस्ट्रीज लिमिटेड कंपनी मुंबई' ह्या कंपनीने मदत करण्याची तयारी दाखविली. सदर इमारत दुरूस्ती व शाळा रंगरंगोटी,विद्युतीकरण, इमारतीसाठी प्लिंथ प्रोटेक्शन यासाठी होणा-या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. शालेय इमारत ही शासनाच्या मालकीची असल्याने इमारत दुरूस्तीसाठी आवश्यक असलेल्या परवानग्या ग्रामपंचायत पाली तर्फे कोथल खलाटी, पंचायत समिती कर्जत यांजकडून घेवून काम पूर्ण करण्यात आले.

**आनंददायी शालेय अंतरंग -**

पावसाळ्यात व हिवाळ्यात मुलांना जमीनीवर बसून आरोग्यविषयक समस्या निर्माण होत असल्याने रोटरी क्लब ऑफ देवनार यांच्यामार्फत मुलांना बसण्यासाठी बेंचची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.

परवीन इंडस्ट्रीज लिमिटेड कंपनी मुंबई यांच्याकडून डिजिटल वर्ग संकल्पनेतून 2 संगणक, 1 प्रिंटर, 1 युपीसी, 4 साऊंड देण्यात आला.तसेच ग्रुप ग्रामपंचायत पाली तर्फे कोथल खलाटी यांच्यामार्फत डिजिटल अभ्यासक्रमासह टी.व्ही देण्यात आला.

शालेय वर्गखोल्यांना आतून डिजिटल फ्लेक्स ऍस्ट्रिड फाऊंडेशन व बाहेरून श्री.सुदामदादा पवाळी यांच्याकडून बसविण्यात आले.

**स्वच्छ व सुंदर पाणी साठवण टाकी -**

वादळामुळे नादुरूस्त झालेल्या पाण्याच्या टाकीचा चौथरा बांधणे गरजेचे होते.त्यासाठी पालक, माजी विद्यार्थी संघ यांच्या श्रमदानातून सिमेंट क्रॉंकिटचे बांधकाम करून चौथरा तयार केला. रोटरी क्लब ऑफ देवनार यांच्यामार्फत 1000 लि.क्षमता असलेली पाण्याची साठवण टाकी बसविण्यात आली.निर्धोक पिण्याचे पाणी मुलांना मिळण्यासाठी रोटरी क्लब देवनार यांच्याकडून ऍक्वागार्ड वॉटर प्युरीफायर बसवून घेतला.त्यामुळे पाण्याची साठवण करणे व शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय झाली.

**स्वच्छ व सुंदर शौचालय -**

स्वच्छ व सुंदर शौचालय अंतर्गत शौचालय रंगरंगोटी, विद्युतीकरण, प्लंबिंग तसेच हॅन्ड वॉश स्टेशनची निर्मिती करण्यात आली.

**स्वच्छ व सुंदर स्वयंपाकगृह -**

स्वयंपाकगृहावर नवीन पत्रे बसविण्यात आले. तसेच स्वयंपाकगृहासमोर पत्र्याचे नवीन शेड तयार करण्यात आले. स्वयंपाकगृहामध्ये विद्युतीकरण करून रंगरंगोटी करण्यात आली.

**निर्धोक शालेय परिसर -**

शालेय शौचालयाच्या बाजूचा व्दियुत खांब गंजला असल्याने तो व्दियुत कर्मचारी व ग्रामस्थ यांच्या सहकार्याने काढून नवीन बसविण्यात आला. परवीन इंडस्ट्रीज लिमिटेड कंपनी मुंबई यांच्यामार्फत शालेय परिसराला तारेचे कंपाऊंड व लोखंडी गेट बसविण्यात आले.

**स्वच्छ व सुंदर शालेय परिसर -**

तसेच शालेय परिसरात फुलझाडे, फळझाडे, औषधी वनस्पती, सुशोभिकरणाची झाडे व इतर 30 अशा झाडांची लागवड करण्यात आली आहे. कर्जत पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी मा. संतोष दौंड साहेब यांच्या संकल्पनेतून शालेय परिसरात वड व पिंपळ वृक्षांची लागवड करण्यात आली आहे.

**स्वच्छ व सुंदर परसबाग -**

शालेय इमारतीला गेटसह तारेचे कंपाऊंड परवीन इंडस्ट्रीज लिमिटेड कंपनी मुंबई यांच्या मार्फत तयार करून मिळाल्यामुळे परिसरात मोकाट जनावरे येणे बंद झाले.तसेच पाण्याच्या टाकीचेही काम रोटरी क्लब ऑफ देवनार यांच्यामार्फत झाल्यामुळे परसबाग तयार करणे व त्याची जोपासना करणे सोपे झाले. सुरूवातीला भेंडी,कोबी,वांगी,टोमॅटो,चवळी,मिरची,दुधी भोपळा अशा वेगवेगळ्या भाज्यांच्या बिया खरेदी केल्या. पाण्याच्या टाकाऊ प्लॅस्टिकच्या ग्लासमध्ये बिया लावून रोपवाटिका तयार केली. शेणखत व लेंडीखत टाकून रोपे लावण्यासाठी जमीनीवर वाफे तयार केले.त्यावर रोपांची लागवड करून दररोज त्यांची जोपासना केली.

**विद्यार्थी उपस्थिती वाढविण्यासाठी केलेले प्रयत्न -**

1. गृह / पालक भेटी
2. पालक सभा
3. 100 टक्के विद्यार्थी उपस्थित विद्यार्थी गुणगौरव

**गुणवत्तापूर्ण विद्यार्थी घडविण्यासाठी केलेले प्रयत्न -**

**संगीतमय परिपाठ -**

https://drive.google.com/file/d/1S5WQ0mqYHrhVnALk6BPzRy6NF_i7ENdj/view?usp=drivesdk

**संगीतमय पाढे -**

https://drive.google.com/file/d/1S0pyclsmwPQ7JahRkOPUssDF8cZZKXAI/view?usp=ड्राइव्हसडक

**वाचनपूर्व तयारी - बालमित्र**

https://drive.google.com/file/d/1RrK0FMdkk68lGiz3NmQbgwogElqDqpcR/view?usp=ड्राइव्हसडक

**वाचनपाठ -**

https://drive.google.com/file/d/1Ruo8VDvFtkKpRFlry4V63cmPBmrkD6FM/view?usp=ड्राइव्हसडक

**इंग्रजी विषय शब्दडोंगर उपक्रम -**

https://drive.google.com/file/d/1Rmsg8dhyHh5Rpy0vxy8RJQOIKnK0OoVM/view?usp=ड्राइव्हसडक

**डिजिटल अभ्यासक्रमाचा वापर -**

https://drive.google.com/file/d/1S9HxZ-K7uXCk4Kjj9sgCof-yOdkXhGAJ/view?usp=drivesdk

**इंग्रजी वाचन पुस्तिका उपक्रम -**

https://drive.google.com/file/d/1SFaFBaPukRxj1rFg1tFfIu6SAw8TAAJk/view?usp=drivesdk

## लोकसहभागातून शाळेसाठी मिळालेले योगदान

| अ.क्र. | मदत करणा-याचे नाव | मदत तपशिल / स्वरूप | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | रोटरी क्लब ऑफ देवनार | किचनशेड वर पत्रा<br>ऍक्वागार्ड मशिन टाकीसह<br>शालेय रंगरंगोटी<br>बेंच – 20 नग<br>संगणक व प्रिंटर | 20,000/-<br>25,000/-<br>15,000/-<br>15,000/-<br>35,000/- |
| 2 | प्रगती फाऊंडेशन<br>ऍस्ट्रिट फाऊंडेशन<br><br>ग्रमापंचायत पोटल | विद्यार्थी किट<br>विद्यार्थी शैक्षणिक साहित्य,व्हाईट बोर्ड- 2, फॅन – 3, फ्लेक्स चार्ट<br>स्मार्ट टी.व्ही ,डिजिटल अभ्यासक्रम सह | 25,000/-<br>40,000/-<br><br>45,000/- |
| 3 | परवीन इंडस्ट्रीज लिमिटेड<br><br>रत्न निधी चॅरिटेबल ट्रस्ट | संगणक नग – 3, युपीएस -3, स्पिकर जोडी – 3, प्रिंटर – 2<br>ग्रंथालय कपाट, पुस्तके | 1,34,247/-<br><br>25,000/- |
| 4 | श्री.सुदामदादा पवाळी ग्रामपंचायत पाली तर्फे कोथल खलाटी | व्हरांडा साठी फ्लेस्क, साऊंड<br>लोखंडी कपाट, व्हरांडा ग्रील | 15,000/-<br>22,000/- |
| 5 | **परवीन इंडस्ट्रीज लिमिटेड** | 1) लोखंडी गेट,शाळेला रंगकाम,विद्युतीकरण<br>2) शालेय इमारतीवर नवीन पत्रे बसविणे,लोखंडी पाईपसह करणे, प्लिंथ प्रोटेक्शन, शाळा प्रवेशद्वाराजवळ कॉंक्रिटिकरण, तारेचे कंपाऊंड, प्लंबिंगचे काम | 1,46,955/-<br><br>5.57.157/- |
| **एकूण लोकसहभाग निधी -** | | | 11,20,339 /- |

**फलनिष्पत्ती -**

- शालेय इमारत छतगळती थांबल्यामुळे दोन्ही वर्ग अध्ययन अध्यापनासाठी वापरात येऊ लागले.
- अध्ययन अध्यापनासाठी प्रत्येक शिक्षकाला स्वतंत्र वर्गखोली मिळाली.
- विद्यार्थी केंद्रित अध्ययन अध्यापन पद्धत राबविणे शक्य झाले.
- विद्यार्थ्यांना बसण्यासाठी बेंचची सुविधा उपलब्ध झाली.
- स्वतंत्र स्वयंपाकगृह कार्यरत झाले.
- निर्धोक पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध झाली.
- शौचालय,वॉश बेसिन, परसबाग यासर्वांसाठी साठवण टाकी उपलब्ध झाली.
- शालेय इमारत परिसरात मोकाट जनावरांचा वावर बंद झाला.
- शाळेत आनंददायी वातावरण तयार झाले.
- शालेय परिसरात वृक्ष लागवड व संवर्धन करणे शक्य झाले.

- सुंदर परसबाग तयार करता आली.
- विद्यार्थी उपस्थिती वाढण्यास मदत झाली.

**समारोप -**

स्वच्छ व सुंदर शाळा तयार करताना येणा-या अडचणींवर मात करण्यासाठी विविध उपाययोजनांचा अवलंब केला. यासाठी विविध सामाजिक संस्था व दानशुर व्यक्ती यांची मदत मिळाली.याचे फलित म्हणून 2023 -2024 या शैक्षणिक वर्षामध्ये "मान. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा" तालुकास्तर व्दितीय क्रमांक व प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत रायगड जिल्ह्यामध्ये "उत्कृष्ट परसबाग" स्पर्धेत उत्तेजनार्थ क्रमांक मिळाला.



**सन 2004 ची सुरूवातीची शालेय इमारत**

# सन 2022 ची शालेय इमारत






सन 2023-2024 ची शालेय इमारत




नादुरूस्त किचनशेड




सध्याचे किचनशेड







पाण्याची साठवण टाकी

रोपवाटिका तयार करताना



रोपवाटिका






**मा.केंद्रप्रमुख यांची परसबाग भेट**









अध्ययन अध्यापनात शैक्षणिक साहित्याचा वापर





मा.मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा तालुकास्तर व्दितीय क्रमांक



**मा.मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा तालुकास्तर व्दितीय क्रमांक मिळाल्याबद्दल अभिनंदन करताना मा.गटविकास अधिकारी साबळे साहेब, मा.गटशिक्षण अधिकारी दौंड साहेब व मा.केंद्रप्रमुख सोनवणे साहेब**



**शाळेचे बाह्यांग -**



रायगड जिल्हा परिषद अलिबाग
प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना

ई- मेल : mdmraigad@gmail.com दूरध्वनी क्रमांक :- ०२१४१- २२२३६९

जा.क्र.राजिप/शिक्षण/पीएमपोषण/लेखा-७/ /२०२४ दिनांक :-१७/०१/२०२४

प्रति,

**मा.शिक्षण संचालक (प्राथमिक),**
**प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना, (स्वतंत्र कक्ष),**
**प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे - ४११ ००१.**

**विषय: प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत ' उत्कृष्ट परसबाग ' स्पर्धा अहवाल कळविणेबाबत.**

संदर्भ : मा.शिक्षण संचालक (प्राथ.), शिक्षण संचालनालय, पुणे या कार्यालयाकडील पत्र क्र.जा.क्र.प्राशिसं/पीएमपोषण/परसबाग/२०२३-२४/०६३८४, दि.०८/०९/२०२३.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत रायगड जिल्हयामध्ये जिल्हास्तरावर ' उत्कृष्ट परसबाग ' स्पर्धा घेण्यात आल्या आहेत. सदर स्पर्धेमध्ये जिल्हास्तरावर गुणाक्रमे पहिले तीन आलेल्या व प्रोत्साहनपर शाळांची माहिती खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे. कृपया माहिती स्विकृतीस नम्र विनंती आहे.

| अ. क्र | जिल्हयाचे नाव | तालुक्याचे नाव | शाळेचे नाव | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | रायगड | खालापूर | राजिप शाळा निंबारवाडी | प्रथम क्रमांक |
| २. | | म्हसळा | राजिप शाळा गायरोणे | द्वितीय क्रमांक |
| ३. | | मुरुड | राजिप शाळा ताडवाडी | तृतीय क्रमांक |
| ४. | | पेण | राजिप शाळा बोरगांव | प्रोत्साहनपर |
| ५. | | माणगांव | राजिप शाळा पाणोसे | प्रोत्साहनपर |
| ६. | | कर्जत | राजिप शाळा पालिकातकरवाडी | प्रोत्साहनपर |

(पुनिता गुरव)
शिक्षणाधिकारी(प्राथ.)
रायगड जिल्हा परिषद अलिबाग

**प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना अंतर्गत उत्कृष्ट परसबाग स्पर्धा अंतर्गत रायगड जिल्ह्यात प्रोत्साहनपर क्रमांक**

----------**----------

## “शाळेची वाटचाल - तिमिरातून तेजाकडे”

**शाळेचे नाव व पत्ता - रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा,वडगाव, ता.खालापूर, जि.रायगड**

**शाळेचा ईमेल आयडी -** zpschoolwadgon@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव -** श्री.सुभाष रामचंद्र राठोड
**मोबाईल क्रमांक -** ९०११८५८४८५
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी -** mycar8394@gmail.com




**शाळेच्या पटसंख्येचा वाढता आलेख -**

रायगड जिल्हा परिषदेची वडगाव शाळा सन २०२३-२४ साली ३२ पट असलेली शाळा,एकेकाळी या शाळेत 200 हुन अधिक विद्यार्थी शिक्षण घ्यायचे. २०२३ साली या शाळेत फक्त ३२ मुले राहिली होती.नुकतेच बदली होऊन आलेले श्री.सुभाष राठोड,श्रीम.सरस्वती कवाद विषय शिक्षिका, श्री.वैजनाथ जाधव हे तीन शिक्षक.त्यातले सुभाष राठोड हे यापूर्वी वडगाव शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत होते.त्यांनी ग्रामस्थांच्या व माजी लोकप्रतिनिधी यांच्या भेटी घेणे व चर्चा करणे सुरू केले,हळूहळू पट संख्या ४२ नंतर ४९ झाली.परंतु राठोड सरांना चैन पडत नव्हते,सतत ते विचार करायचे त्यातून त्यांना काही उपक्रम सुचले त्यात भात लावणी जो जिल्हाभर गाजला,शाळा गैरहजर विद्यार्थ्यांच्या दारी ज्यामुळे उपस्थिती वाढली टाईम्स ऑफ इंडिया सह सर्व वृत्तपत्रे व न्यूज चॅनेल यांनी दखल घेतली होती.



# Wadgaon village school goes to student's house when he plays truant

Aditya.Waikul@timesgroup.com

**Pune:** A smart student from a zilla parishad school in Wadgaon village in Khalapur, some 100km from Pune, who began to skip classes for and a perfect match in his principal.

Last Tuesday, the Std IV student played truant yet again giving in to his love for the screen — he was enamoured by cellphone games that he played for hours on the new smartphone.

The child had skipped school sporadically since mid-September. Sometimes, he would come to school, set his bag on his seat and disappear for the day.

Repeated warnings and messages to his parents did not make him mend his ways and he skipped school for four consecutive days in the second week of October. On October 17, there was no sign of the boy for the fifth day.

School principal Subhash Rathod realised he needed to do something especially since the festival season would increase absenteeism.

The three teachers in the school had an intense discussion on how to deal with it. As is were word reached some students playing on the ground.

One of them ran up to the teachers and said that the truant child was at home and on the cellphone. Another said, "He went for a swim in the river yesterday but bunked school." A third student let the cat out of the bag. "Today, he hid behind his uncle's house when I went to call him to school," he said.

Rathod and the other two teachers hit upon an idea. "We will go to his house and bring him to school today. If he doesn't come, we will conduct classes in front of his house." The kids cheered and bringing back their fellow student became a mission.

The principal said the truant boy was a smart child and good at studies but the cellphone had caught his fancy. "It was a spontaneous decision to march to his house, a 'school morcha', to bring him back," Rathod added.

Aditya Waikul



Some students and teachers sat outside the student's house in Wadgaon, in Khalapur, while others went to look for him

Thirty-five students and three teachers took the small walk to the boy's house in the village. They even carried extra notebooks and pens in case he gave the excuse of not having any.

"It was a 10- to 15-minute walk through the village. Everyone was taken aback when they saw us trooping to the boy's house. Some thought we were on a field trip," Rathod said.

Looking at his fellow students and teachers outside his house, and boy ran away to his uncle's house. But the search party knew his hideout and began calling out to him.

"We found him hiding behind his uncle's shop. He was about to cry when we brought him, but the principal and the two teachers spoke to him kindly and convinced him to come to school with us," a Std VII student, said.

Realising that he could not slip out of the situation, the boy got into his uniform, picked up his satchel, joined his fellow students and walked back to school.

Teachers, students, and bystanders cheered and celebrated his return. After all, he was one of their own and once he heeded them, they were all on the same side.

His mother said, "He is our only child and serious about studies but he got hooked on to the new smartphone. He has started going to school regularly after all the children and teachers came to our house. We are relieved."

After this episode, a few other irregular students have begun attending school daily, worried that the school morcha may come to their doorstep someday. Rathod is pleased that the initiative has the full support of the parents and the villagers.

He said, "In a situation where there is poor enrolment in ZP schools, it is vital to maintain 100% attendance. If a student skips school without a valid reason, then our school will go to his house to bring him back."

शालेय रंगरंगोटी,आकर्षक खेळ,धबधब्यावर सहल,नदीवर फेरफटका,गावातून सतत रॅली,सांजगृह भेटी, संगणक शिक्षण,डिजिटल,फनिवार शनिवार,सहल,चित्रकला स्पर्धा रोख बक्षिसे,वृक्षारोपण व दत्तक योजना,सर्व मुलांचे शाळेत वाढदिवस साजरे करणे,प्रत्येक सण शाळेत साजरा करून त्यापद्धतीने शालेय सजावट हे एक मुख्य आकर्षणाचे कारण आहे,पोषण आहारात बदल,पूरक आहारात केळी, अंडी,बिस्किटे मा.सरपंच यांचेकडून क्रीडा गणवेश ,अल्कले कंपनीकडून संगणक लॅब,स्वच्छ स्वच्छता गृहे,परसबाग,आकर्षक शालेय परिसर,फुलांच्या बागा,वृक्षारोपण व वृक्ष दत्तक उपक्रम ज्यामुळे आझादी का अमृतमहोत्सव या उपक्रमातून ७५झाडे लावली व सर्व ७५ झाडे जगवली.

**मी स्वत: भेट देऊन शाळेची पाहणी केली शिक्षकांचे उपक्रमशील अध्यापन,डिजिटल शिक्षण स्वच्छ व शुद्ध फिल्ट्राईज केलेले पिण्याचे पाणी,ABL, ज्ञानरचनावाद,स्वयं अध्ययन,अध्ययन स्तरनिहाय व अध्ययन निष्पत्ती नुसार अध्ययन अनुभवाचे नियोजन इत्यादी उपक्रमामुळे रायगड जिल्हा परिषद शाळा वडगाव च्या पटसंख्येत लक्षणीय वाढ झालेली आहे.इतर शिक्षक व शाळांनी वडगाव च्या उपक्रमाचे अनुकरण करावे. - मा.पुनीता गुरव,शिक्षणाधिकारी रायगड जिल्हा परिषद**


लोकमत

असी शाळा, असे प्रयोग

मुलांना लावली शाळेची गोडी

सुभाष राऊळ
जुन्यामध्यापक, रायगड जिल्हा परिषद शाळा, वडगाव

विद्यार्थ्यांना शाळेपर्यंत आणण्यासाठी रायगड जिल्हा परिषद शाळेने प्रयोग शोधून पटसंख्येत झपाट्याने वाढ केली. चक्क कार्टूनगाडीचे नवीन मुलांच्या स्वागताला आणून त्यांना शाळेची गोडी लावली.

Hello Mumbai
Page No. 2 Jul 15, 2024
Powered by: erelego.com


लोकमत

जिल्हा परिषदेची ही शाळा खासगी शाळेवर भारी !

'पीएम श्री' या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना मिळाल्या चांगल्या सुविधा

शाळेतील या उपक्रमांचे कौतुक

शाळेचे वेगळेपण काय?

शाळेचा चढता आलेख

Hello Raigad
Page No. 2 Jul 03, 2024
Powered by: erelego.com

शाळा अनेक नवोपक्रम व उपक्रम राबवत असून,शाळेच्या सामाजिक सहभाग व शैक्षणिक चढता आलेख आनंददायी आहे.मुख्याध्यापक जनसंपर्क चांगला ठेवत असून त्यांच्या उपक्रमशीलतेचा शाळेला फायदा होत आहे.- श्री.कैलास चोरामले, गटशिक्षणाधिकारी खालापूर

**असा घडला बदल -**







ग्रुप ग्रामपंचायत वडगाव डिजिटल क्लास रूम एक ,पाणी पुरवठा,स्वच्छता,परसबाग विकसन,कंपोस्ट प्लॅन्टर

मा.महादेव गडगे उपसरपंच शालेय क्रीडा गणवेश,प्रत्येक सणाला खाऊ व भेटवस्तू

प्रत्येक विद्यार्थ्याचा वाढदिवस मुख्याध्यापक सुभाष राठोड यांच्याकडून केक व खाऊ

बिर्ला कार्बन इंडिया लि.शालेय रंगरंगोटी,अल्कले अमाईन्स संगणक लॅब,केळकर कंपनी कडून TV,मर्क लाईफ सायन्स कडून TECHMINT INTRACTIVE BOARD

नोव्होझाईम्स कंपनी कडून ११० झाडे

पोलीस पाटील मा.मनमोहन गडगे ४० रोपे विविध फुलांची,मानसी गडगे १० रोपे माजी विद्यार्थिनी

माजी विद्यार्थ्यांच्या सहभागातून अनेक शैक्षणिक उपक्रम,पालकांचा सक्रिय सहभाग

मा.संतोष ठोंबरे माजी ग्रामपंचायत सदस्य यांचे कडून एक वर्गखोली रंगकाम

प्रत्येक वर्गखोल्यांची लॅन द्वारे इंटरनेट जोडणी, सर्व वर्गात दोन प्रकारचे स्पीकर व माईक. कराओके माईक व स्पीकर, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव.मुस्कान किताब घर वाटेल तेंव्हा वाचन मनाप्रमाणे अभ्यास

या सर्व उपक्रमाचा पटसंख्या वाढण्यासाठी फायदा झाला,आज शाळेत १०३ हुन अधिक विद्यार्थी असून अजून पटसंख्येत वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.दरवर्षी २५ हुन अधिक विद्यार्थी दाखलपात्र असतात त्यातले मोजके ६ ते ७ मुले या मराठी शाळेत दाखल व्हायची,पण यंदा राठोड सरांच्या,शाळा व्यवस्थापन समितीच्या,सर्व शिक्षकांच्या प्रयत्नाने पालकांच्या मनात विश्वास निर्माण झाल्यामुळे इयत्ता पहिलीच्या दाखलपात्र २४ मुलांपैकी २१ मुलांनी रायगड जिल्हा परिषदेची वडगाव शाळा निवडली उर्वरित दोन मुलांनी पालकांच्या नोकरीमुळे बाहेर गावी दाखल झाली.वडगाव शाळेच्या उपक्रमशीलतेला रायगड जिल्हा परिषद ने रायगड जिल्हा परिषद ग्रामीण उत्कृष्ट शाळेचे अनुदान देऊन त्यांच्या उडत्या पंखात बळ भरण्याचे काम केले आहे.तसेच शाळेने २०२३-२४ साली झालेल्या मुख्यमंत्री माझी शाळा,सुंदर शाळा या उपक्रमात तृतीय क्रमांकाचे बक्षीस पटकावले आहे.तर चालू २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा -२ मध्ये शाळा मुंबई विभागातून द्वितीय क्रमांकाच्या पारितोषिकाची मानकरी ठरली आहे.

पालकांच्या मनात विश्वास निर्माण करायला आम्हाला एक वर्ष लागले,यासाठी मा.पुनीता गुरव शिक्षणाधिकारी प्राथमिक,जिप रायगड यांची प्रेरणा,गटशिक्षणाधिकारी मा. कैलास चोरामले साहेब यांचे मार्गदर्शन,ग्रुप ग्रामपंचायत वडगाव च्या मा.सरपंच गौरीताई गडगे,मा.महादेव कमलाकर गडगे,सर्व अधिकारी यांचे व त्यांच्या माध्यमातून CSR मधून मदत करणाऱ्या कंपन्यांचे खुप मोलाचे सहकार्य आहे.माझे शिक्षक,स्वयं सेविका निकिता व साक्षि,माजी विद्यार्थी,ग्रामस्थ,पालक व शाळा व्यवस्थापन यांचे हात नेहमीच माझ्या पाठीशी असल्यामुळे पट संख्येत वाढ होऊ शकली.-**श्री.सुभाष राठोड,मुख्याध्यापक शाळा वडगाव**

राठोड सरांचे आणि सर्व शिक्षकवृंद यांचे शैक्षणिक व शाळेच्या विकासातील काम अभिनंदनीय आहे,आज शाळा नावलौकिक प्राप्त करत आहे त्याचे श्रेय शाळेशी जोडले गेलेले सर्व सदस्य यांना आहे.

**व्हिडीओ लिंक -**

https://youtu.be/YRCOygn8VAY?si=av2nPmGAObyjRNTp

https://youtu.be/ybXXKa1WbME?si=H23cVy5k0_HC5pDn



शब्दांना सत्याची धार

प्रहार

## एक हजार दिवाळी शुभेच्छा कार्ड वाटप करून मतदान करण्याचे आवाहन



### राजिप शाळेचा स्तुत्य उपक्रम

◆ खोपोली (वार्ताहर) :

रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, वडगाव नेहमीच वेगवेगळे उपक्रम राबवत असल्यामुळे यावर्षी दिवाळीच्या सणाच्या उत्सवात विधानसभेच्या निवडणुकीचे पडघम वाजत आहे. शासनाने मतदानाच्या दिवशी सार्वत्रिक सुट्टी जाहीर केली जाते तरी काही नागरिक मतदान करीत नाही. लोकशाहीत मतदानाला खूप महत्व असून हे पटवून देण्यासाठी एक कंदील,एक दिवा,मतदान कर रे भावा,तसेच स्विप कार्यक्रमांतर्गत अभिनव मतदान जनजागृती करण्यासाठी रायगड जिल्हा परिषद वडगाव यांनी एक हजार शुभेच्छा कार्ड देवून यामध्ये मतदान करण्याविषयी आवाहन करण्यात आले.

यावेळी विद्यार्थी गावामध्ये जावून शुभेच्छा कार्डसमवेत लोकशाहीचा व जागर,मतदानाचा हा कार्यक्रम हाती घेण्यात आला. तसेच चला करू मतदान,या गीतावर नृत्य,पथनाट्य,तसेच जनजागृतीचा संदेश देणारे आकाश कंदील,रांगोळ्या व मतदान करा असा संदेश देणारे गावामध्ये प्रत्येकास भेटकार्ड देण्यात आली. गटशिक्षणाधिकारी कैलास चोरमले यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मुख्याध्यापक सुभाष राठोड यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वी झाला. यावेळी पनवेल तालुक्यातील ज्योती भोपी, म्हात्रे, मनोज म्हात्रे व योगिनी वैदू यांनी या आई या भाऊजी या मतदान करा ही लावणी गात मतदारांना साद घातली.

> मुलांनी दिवाळी मतदान जनजागृतीसाठी हे उद्देश ठेऊन केलेले उपक्रम खरोखर स्तुत्य आहे.
> - महादेव गडगे : मा.सरपंच (ग्रामस्थ) वडगाव

वडगाव शाळा व शाळेचे सुभाष राठोड व सर्व शिक्षक नेहमीच वेगवेगळे यशस्वी उपक्रम राबवत असतात.१००० शुभेच्छा कार्डाच्या माध्यमातून मतदान जनजागृती ही अभिनव संकल्पना सुंदर व कौतुकास्पद आहे.
- कैलास चोरमले,

गटशिक्षणाधिकारी खालापूरमला नाविन्याची व नाविन्यतापूर्ण उपक्रम राबविण्याची आवड आहे,तसेच या कामासाठी विद्यार्थी,शिक्षक पालकांचा पूर्ण सहभाग व पाठींबा असतो.
- सुभाष राठोड, मुख्याध्यापक शाळा वडगाव

## स्विपअंतर्गत वडगाव शाळेत मतदान जनजागृती



**खोपोली : पुढारी वृत्तसेवा**

रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा नेहमीच वेगवेगळे उपक्रम राबवत असते. यावर्षी स्विप कार्यक्रमांतर्गत दिवाळी सणानिमित्त शाळेत आयोजित सण दिवाळीचा, उत्सव लोकशाहीचा व जागर मतदानाचा हा कार्यक्रम आयोजित करून गावात मतदान जनजागृती करण्यात आली आहे.

मुख्याध्यापक सुभाष राठोड यांनी स्विप पथक प्रमुख कैलास चोरामले, गटशिक्षणाधिकारी खालापूर यांच्या मार्गदर्शनाखाली चला करू मतदान मतदान या गीतावर नृत्य, नाट्य, पथनाट्य सादर करत गावातील घरोघरी संदेश दिला.

या कार्यक्रमाचे खास आकर्षण म्हणजे मुलांनी तयार केले मतदान जनजागृती चा संदेश देणारे आकाशकंदील, रांगोळ्या व मतदान करा असा संदेश देणारे आकर्षक स्वतः बनविलेले दिवाळी भेटकार्ड प्रत्येक मतदाराला देऊन जनजागृती केली.

ही विद्यार्थ्यांची कृती खूपच प्रशंसनीय असून कौतुक पात्र आहे,

> मला नाविन्याची व नावीन्यतापूर्ण उपक्रम राबविण्याची आवड आहे. मुले व शिक्षक व पालकांचा पूर्ण सहभाग व पाठींबा असतो.
> - सुभाष राठोड,
> मुख्याध्यापक, शाळा वडगाव

असे उद्गार ग्रामस्थांनी काढले. या उपक्रमासाठी पनवेल तालुक्यातील ज्योती भोपी, मनोज म्हात्रे व योगिनी वैदू यांनी या आईजी, या भाऊजी मतदान करा जी... ही लावणी गात वडगावच्या मतदारांना साद घातली. मुलांनी दिवाळी मतदान जनजागृतीसाठी हे उद्देश ठेऊन केलेले उपक्रम खरोखर स्तुत्य आहे, असे ग्रामस्थ महादेव गडगे यांनी सांगितले.

वडगाव शाळा व शाळेचे सुभाष राठोड व सर्व शिक्षक नेहमीच वेगवेगळे यशस्वी उपक्रम राबवत असतात.१००० शुभेच्छा कार्डाच्या माध्यमातून मतदान जनजागृती ही अभिनव संकल्पना सुंदर व कौतुकास्पद आहे.

लोकमत

# वडगाव शाळा ठरली सरस

मोहोपाडा : जिल्हा परिषदेच्या वडगाव येथील उच्च प्राथमिक शाळेने 'मुख्यमंत्री माझी शाळा - सुंदर शाळा' या उपक्रमात जिल्ह्यात प्रथम व मुंबई विभागात द्वितीय क्रमांक प्राप्त करून १५ लाख रुपये पारितोषिक मिळविल्याबद्दल नुकतेच शाळेचे कौतुक करण्यात आले. खालापूर तालुक्याचे गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी शाळेला भेट देऊन शाळेच्या कामाची माहिती घेतली. यावेळी विस्तार अधिकारी शैलेंद्र तांडेल उपस्थित होते. याप्रसंगी मुख्याध्यापक सुभाष राठोड यांचे त्यांनी कौतुक केले.

Hello Raigad
Page No. 3 Oct 24, 2024
Powered by: erelego.com

महाराष्ट्रामध्ये प्रत्येक ठिकाणी प्रतिनिधी नियुक्त करणे आहे अधिक माहितीसाठी 8983242343

निर्भीड निष्पक्ष मराठी वृत्तपत्र

रायगड स्वाभिमान

RNI NO. MAHMUL/2023/86828

मुख्य संपादक : रघुनाथ गणपत कडू संपादक : दिनेश धांगू मोरे आयुत्ती संपादक : किरण लक्ष्मण मोरे

बुधवार दिनांक २३ ऑक्टोबर २०२४ | उपसंपादक : रोहन रघुनाथ कडू | संपर्क : ८९८३२४२३४३

# रायगड जिल्हा परिषद शाळा वडगाव येथे नेचर फ्रेंड सोसायटी कडून वन्यजीव प्राण्यांविषयी जनजागृती





पनवेल प्रमोद पाटील

रायगड जिल्हा परिषद शाळा वडगाव येथे नेचर फ्रेंड सोसायटी पनवेल व वन विभाग महाराष्ट्र शासन यांच्या वतीने शाळेतील विद्यार्थ्यांना वन्यजीव बद्दल माहिती व मार्गदर्शन करून सापांविषयी माहिती सांगण्यात आले,विविध प्रकारच्या सापांच्या जाती व त्यांची वैशिष्ट्ये श्री.आर्यन उदरे यांनी pptx च्या माध्यमातून माहिती दिली.तर श्री.संतोष उदरे यांनी सापांच्या बाबतीत असलेले गैरसमज व साप व मानव जीवनातली संघर्ष या विषयी माहिती दिली.यावेळी इयत्ता पाचवी ते 8 वी च्या 43 विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शनाचा लाभ घेतला.याप्रसंगी मुख्याध्यापक श्री.सुभाष राठोड यांनी सर्वांचे स्वागत केले तर वैजनाथ जाधव सरांनी सूत्रसंचालन व आभार मानले.या मार्गदर्शन शिबिरास सुभाष राठोड ( मुख्याध्यापक शाळा वडगाव) संतोष उदरे ( अध्यक्ष नेचर फ्रेंड सोसायटी ) व संस्थेचे सदस्य प्रतीक शेंदरे,अक्षदा बैलमारे,संचया म्हसकर,शिवांगी रासकर,अमीर जाधव,ऋषिकेश जाधव तर शाळेचे वैजनाथ जाधव सर,सरस्वती कवाद व स्वयं सेविका उपस्थित होत्या.

वन्यजीव व सापांविषयीची मुलांची भीती दूर व्हावी व भूतदया मूल्य रुजावे.वन्यजीवाविषयी साक्षरता रुजविण्यासाठी या शिबिराचे आयोजन महत्त्वाचे वाटते

# खालापूर पं.स. गटविकास अधिकाऱ्यांची वडगाव शाळेला भेट

चौक : प्रतिनिधी

राजिप उच्च प्राथमिक शाळा वडगावला मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या उपक्रमात तालुक्यात प्रथम व जिल्ह्यात प्रथम व मुंबई विभागात द्वितीय क्रमांक प्राप्त करून १५ लाख रुपये पारितोषिक मिळविल्याबद्दल खालापूर तालुक्याचे गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी शाळेला भेट दिली. या वेळी विस्तार अधिकारी शैलेंद्र तांडेल उपस्थित होते.



विद्यादान व प्रसारण करणारे शिक्षक आणि विद्या आत्मसात करणारे विद्यार्थी हे एकत्र आल्यावर शिक्षणाचा पाया मजबूत होतो. शिक्षणाचा स्तर अधिक उंच होतो, असे गौरवोद्गार गटविकास अधिकारी संदिप कराड यांनी काढले. शाळेच्या विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे व शाळा व्यवस्थापन समितीचे अभिनंदन करून मुख्याध्यापक सुभाष राठोड यांचे कौतुक केले.

वडगाव शाळा ही मॉडेल स्कूल म्हणून नावलौकिक मिळवत आहे. या शाळेच्या विकासात अजून काही योगदान देता येत असेल तर नक्की द्यावे. राठोड गुरुजी व सर्व शिक्षक चांगले काम करीत आहेत, असे गटविकास अधिकारी संदिप कराड म्हणाले.

शाळेने राबविलेल्या स्विप कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृतीसाठी घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेचे गटविकास अधिकारी कराड यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

स्थापना १९३९

# पुढारी

www.pudhari.com

## वडगावच्या विद्यार्थ्यांची आनंददायी कोजागिरी

**महावाचन स्पर्धेत ४६ विद्यार्थ्यांचा सहभाग**



**खोपोली : पुढारी वृत्तसेवा**

महावाचन महोत्सव २०२४ या शालेय शिक्षण विभागाच्या राबविलेल्या उपक्रमात रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, वडगाव च्या ३ री ते ८ वी च्या ४६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यातील हर्ष एकनाथ गडगे इयत्ता ५ वी या विद्यार्थ्याने ३ री ते ५ गटात तालुक्यात द्वितीय तर ६ वी ते ८ वी गटात कृतिका गोपीनाथ गडगे इयत्ता ८ वी प्रथम क्रमांक पटकावून या महावाचन व लेखन उत्सवात बाजी मारली. त्यांना दि.१५ ऑक्टोबर,२०२४ रोजी वाचन प्रेरणा दिनानिमित्त प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

यावेळी जल्लोष कोजागिरी कार्यक्रम घेऊन शाळेत विविध गुणदर्शन कार्यक्रम साजरा करण्यात आला. यात नवभारत साक्षरता अभियान व मतदान जनजागृती (डतएएइ) बाबत जनजागृती करण्यात आली.

यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा. करुणा रविंद्र ठोंबरे, उपाध्यक्ष. राजश्री नरेश जांभुळकर, महादेव कमलाकर गडगे, धीरज गडगे यांच्यासह, निरीक्षर प्रौढ व्यक्ती, विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी माता पालक यांनी उत्तम सहकार्य केले.मिसळ पाव, केशर दुधाचा मुलांनी मनसोक्त आस्वाद घेतला. याप्रसंगी मुख्याध्यापक सुभाष राठोड यांनी सर्वांचे स्वागत केले.

वैजनाथ जाधव सर यांनी संचलन तर सरस्वती कवाद व मयुरी धायगुडे यांनी प्रमाणपत्र वितरण केले. मोहन दहिफळे सर,रवींद्र घोगरे सर यांनी नवभारत साक्षरता अभियानासाठी सहकार्य केले. स्वयं सेविका निकिता गडगे, साक्षी जांभुळकर, वेदिका गडगे, आकांक्षा जाधव, भाग्यश्री तांबोळी यांनी कार्यक्रमासाठी सहकार्य केले.

Raigad Edition
Oct 18, 2024 Page No. 05
Powered by: erelego.com

लोकमत

## वडगावची सुंदर शाळा जिल्ह्यात प्रथम

लोकमत न्यूज नेटवर्क

**मोहोपाडा :** मुख्यमंत्री माझी शाळा अभियानात खालापूर तालुक्यातील रसायनी पाताळगंगा परिसरातील रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वडगाव शाळेने रायगड जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

तर ही शाळा मुंबई विभागातही दुसरी आली आहे. मुख्याध्यापक सुभाष राठोड आणि शिक्षक यांचे अभिनंदन होत आहे.

या अभियानात वडगाव शाळेने विविध उपक्रम राबविले. यात प्रत्येक मुल आनंददायी, पिण्याचे स्वच्छ पाणी, सर्व वर्गांत विद्युत पुरवठा, पंखे, डिजिटल रूम, पटसंख्या वाढविणे, इंग्रजी माध्यमात शिकणारी मुले पुन्हा वडगाव शाळेत, गैरहजर त्याच्या दारी शाळा, सर्व शाळा रंगीत, ओला व सुका कचरा वर्गवारी आणि कंपोस्ट, गांडूळ खताची निर्मिती, पाणी अडवा, पाणी जिरवा, वृक्षलागवड आणि संगोपन असे अनेक उपक्रम राबविण्यात आले.

मुख्याध्यापक सुभाष राठोड, सर्व शिक्षक, शाळा समिती, ग्रामस्थ, विविध माध्यमे, जिल्हा शिक्षण अधिकारी, गटविकास अधिकारी संदीप कराड, गटशिक्षण अधिकारी चोरमोळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

> माझे स्वप्न शाळा आंतरराष्ट्रीय करणे व सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण सहज व सुलभ उपलब्ध होईल असे आहे. हे काम सर्वांच्या सहकार्याने करायचे आहे.
>
> -सुभाष राठोड, मुख्याध्यापक

मंत्रालयात झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शिक्षण मंत्री दीपक केसरकर, शिक्षण सचिव कुंदन मॅडम, शिक्षण आयुक्त सूरज मांढरे व मान्यवरांच्या उपस्थित सन्मानचिन्ह, प्रशस्तिपत्र व धनादेश देऊन गौरविण्यात आले. यावेळी शिक्षणाधिकारी पुनीता गुरव, शिक्षणाधिकारी तुपे, गटशिक्षण अधिकारी कैलास चोरमले, शिक्षण विस्तार अधिकारी शिल्पा दास, सरपंच गौरी गडगे, महादेव गडगे, शिक्षण समिती अध्यक्ष करुणा ठोंबरे यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी कार्यक्रमास मुंबई येथे उपस्थित होते.

महाराष्ट्राचे लोकप्रिय दैनिक

# पुण्य नगरी

गुरुवार, १७ ऑक्टोबर २०२४

## डमध्ये अव्वल

**जिल्हा परिषद शाळा प्रथम**

**तेसरी**

**खासगीमध्ये श्रमजीवी प्रथम**

## वडगाव शाळेचाही 'सुंदरतेत' डंका

दै.कृषीवल : काशिनाथ जाधव

## राजिप शाळा वडगाव रायगड जिल्ह्यात प्रथम



**■ मुंबई विभागात द्वितीय क्रमांक**

। पाताळगंगा । वार्ताहर ।

रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वडगाव जिल्ह्यात प्रथम, तर मुंबई विभागात द्वितीय क्रमांकावर यशस्वी पणे उतुंग झेप घेतली. विविध उपक्रम राबवून या शाळेमध्ये अमुलाग्र बदल घडविला त्याच बरोबर विद्यार्थ्यांची पट संख्येचा अलेख वाढत चालला असून, शाळेमध्ये डिजिटल स्वरुपात, शिक्षण, मतदान गुढी, कंपोस्ट खत या सर्व तत्वाचा आभ्यास करुन महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग, मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या निष्कर्षावर या शाळेला शिक्षक, शालेय कमिटी यांना शालेय शिक्षण मंत्री दिपक केसरकर यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र व धनादेश देवून गौरविण्यात आले.

हा पुरस्कार सोहळा मुंबई येथे संपन्न झाला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शिक्षण सचिव कुंदन, शिक्षण आयुक्त सुरज म ांढरे शिक्षणाधिकारी पुनीता गुरव यांच्यासह अन्य उपस्थित होते.

----------**----------

# “आव्हान नव्हे.....संधी”

**शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बनवाडी केंद्र.ओहर, ता.जि.छत्रपती संभाजीनगर**

**शाळेचा ईमेल आयडी** - hmbanwaditanda2015@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.आहेवाड गणेश मन्साराम
**मोबाईल क्रमांक** - ७९७२४२२०३३
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - ganeshahewad@gmail.com

**शाळेची पार्श्वभूमी** -

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बनवाडी, तांडा.केंद्र ओहर,ता.जि.छत्रपती संभाजीनगर मध्ये असलेली शाळा शैक्षणिक वर्ष 2019-20 मध्ये या शाळेचा पट 21 होता. जून 2019 मध्ये या शाळेमध्ये बदली होऊन आल्यानंतर शाळेमध्ये अनेक प्रकारच्या समस्या होत्या. शाळेचा अस्वच्छ परिसर, शाळेच्या अवतीभोवती वाढलेले गवत,शाळेच्या आवारात सुरू असलेला पत्त्यांचा डाव,शाळेच्या भिंतीवरती पिचकाऱ्यांचा सडा, षटकोनी खोलीत पावसाचे वाहत जाणारे पाणी,शाळेच्या अवतीभोवती सकाळी केलेली घाण,दिवसभर शाळेमध्ये घुमणारा दुर्गंध,मुलांना भाषा समजण्यासाठी येणारी अडचण, बंजारा बोलीभाषा, दिवाळीनंतर ऊसतोडी साठी निघून जाणारे विद्यार्थी अशा अनंत अडचणीमध्ये मिळालेली ही शाळा.

अनेक समस्यांमधून शाळा उभी करण्यासाठी मागील तीन शाळेत काम केल्याचा फार छान अनुभव पाठीशी होता. "आव्हाने स्वीकारण्यासाठीच असतात"हे वाचलेले वाक्य शाळेला नवीन पद्धतीने निर्माण करण्यासाठी प्रेरणादायी ठरले. सुरुवातीला शाळेचा परिसर शालेय व्यवस्थापन समिती, सरपंच,उपसरपंच,ग्रामपंचायत सदस्य,ग्रामस्थांच्या सहकार्याने शाळेला आकर्षक रंगरंगोटी केल्याने गावकऱ्यांचा, विद्यार्थ्यांचा शाळेविषयी दृष्टिकोन बदलला.

विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठी अनेक उपक्रम राबविण्यात आले.दिवाळी सुट्टी अभ्यासाची धमाल,मी होणार विजेता,चला बोलू काही,एक संख्या अनेक प्रकारे वाचन,दिनांक उपक्रम, जुन ते जानेवारी या कालावधीत उत्कृष्ट अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रोख पारितोषिक अशा उपक्रमातून शाळेची पटसंख्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये ३५ झाली आहे.

या सर्व विविध उपक्रमांमध्ये मोलाचे सहकार्य करणाऱ्या सहकारी सहशिक्षिका श्रीमती पालवे स्वाती दिनकरराव या आपल्या (हर्ष महेंद्र ताठे) मुलासंबंधीच्या काही अडचणींचा सामना करत होत्या.

**हर्षची पार्श्वभूमी -**

हर्ष महेंद्र ताठे जन्मदिनांक 06 ऑक्टोबर 2015.अडीच महिन्याचा असताना विनातापेचे काही झटके आलेला (अर्थात epilepsy).हर्षला 2018 ला घराजवळील शाळेत टाकण्यात आले.परंतु हर्षचे वर्तन इतर विद्यार्थ्यांना त्रासदायक असल्याने शाळेने शाळा बदलण्यास सांगितले. 2019 मध्ये कोरोना काळातील लॉकडाऊन त्या काळात हर्ष शिक्षणाच्या प्रारंभिक टप्प्यात शाळेत गेलाच नाही. हर्षची समस्या पालकांना विशेष लक्षात आली नाही. 2021 ला घराजवळील इंग्रजी शाळेत हर्षने पहिली मध्ये प्रवेश घेतला.हर्ष शाळेच्या आत वडील, आजी,आजोबा,बहीण,आई यापैकी कोणीतरी नेहमी शाळेच्या बाहेर ते हर्षसाठी कारण हर्ष भाऊ वर्गातील वेगवेगळ्या कारणांसाठी प्रसिद्ध हर्ष वर्गात विद्यार्थ्यांना इजा करू लागला.वर्गातील त्याची आक्रमकता दिवसेंदिवस वाढतच होती.हर्षला शाळेत पाठवू नका.दुसरी मुले हर्ष मुळे घाबरतात हर्ष इतरांना इजा करतो.कुणाच्याही दप्तरात पाणी टाकून देतो.डबा खाताना व्यवस्थित जेवत नाही तेव्हा शाळेतील शिक्षकांनी हतबलतेने हर्षला दुसऱ्या विशेष मुलांच्या शाळेत टाका किंवा थेरपी चालू करा असा सल्ला हर्षच्या पालकांना दिला. हर्षच्या शाळेतून अचानक येणाऱ्या फोनमुळे शाळेत असणाऱ्या मॅडम पूर्णपणे डिस्टर्ब होऊ लागल्या. हर्षला रोज बनवाडीच्या शाळेत गाडीवर घेऊन येऊ लागल्या. गाडीवर व्यवस्थित न बसणारा हर्ष पडेल या भीतीने त्याला कमरेला बांधून आणावे लागत.

**हर्षचे प्राथमिक निरीक्षण -**

हर्ष आई बरोबर शाळेत आल्यानंतर हर्षचे निरीक्षण करण्यास सुरुवात केली. हर्ष आईच्या वर्गातून माझ्या वर्गात काही केल्या येत नव्हता. वर्गात आणण्याचा प्रयत्न केलाच तर दरवाजावर मोठमोठ्याने लाथा मारून शाळेचा परिसर दणाणून सोडत.जोरजोरात स्वतःचा हात चावणे,आईचा हात चावणे,शाळेच्या परिसरात खोल गडडे करण्यास सुरुवात करणे, अचानक वर्गातून कुठेतरी पळून जाणे, कधी कधी अति आक्रमक होणे,वर्गात कमी व बाहेर जास्त अशी हर्ष ची प्राथमिक अवस्था मी दररोज पाहत होतो.

**हर्षची समस्या दूर करणे -**

हर्षला काहीतरी समस्या आहे, ही समस्या कळण्यास मला वेळ लागला नाही.सर्वप्रथम मॅडमला हर्ष पासून तुम्ही पालकांनी दूर होणे आवश्यक आहे हे मी पटवून दिले.हर्षला लाडीगोडीने आपण एवढे वर्ष शाळेत बसवून पाहू तो बसलाच तर पुढील वर्षी त्याचे नाव घेऊ असा सल्ला मी पालक व सहकारी म्हणून त्याच्या आईला दिला.

शालेय व्यवस्थापन समिती, गावातील विद्यार्थी, ग्रामस्थ यांना सर्वांना हर्षच्या समस्येबद्दल जाणीव करून दिली. रोज नवीन नवीन प्रलोभन दाखवून हर्षला माझ्या वर्गात बसविण्यासाठी प्रयत्न सुरू केले. कधी

खिशात चॉकलेट, कधी रंगपेटी,कधी समोसा हर्षला आवडणाऱ्या या गोष्टी त्याला त्याच्या आवडीप्रमाणे उपलब्ध करून देऊ लागलो.हर्षचे लाडके नाव राजवीर."विद्यार्थी कसा असावा राजवीर सारखा हुशार असावा" परिपाठात दररोज हर्षचा जयजयकार सुरू केला. एक गोष्ट निरीक्षणात येत होती. हर्षला सांगितलेले, हर्षने ऐकलेले त्याला अगदी लक्षात राहत होते.हर्षची बुद्धिमत्ता चांगली असल्याचे लक्षात आले. परिपाठात घेतली जाणारी प्रार्थना,पाढे,संविधान,प्रतिज्ञा हर्ष जवळ बसलेला असताना गुणगुणताना त्याला मी ऐकले. हर्षला परिपाठात समोर संधी द्यायची हा विचार करून हर्षला दररोज प्रतिज्ञा,संविधान,पाढे म्हणण्यासाठी परिपाठ लीडर केले. वर्गातील हर्ष पासून दूर जाणारी मुले हर्ष जवळ कशी येतील त्या अनुषंगाने जो विद्यार्थी हर्षला अभ्यासात मदत करेल त्याला बक्षीस जाहीर केले. विद्यार्थ्यांमध्ये हर्ष जवळ जाण्याची एक प्रकारे स्पर्धा निर्माण झाली.प्रत्येक विद्यार्थी हर्षच्या मनाप्रमाणे वागू लागला. मध्यंतराच्या सुट्टीमध्ये हर्ष गड्डे करत असेल तर त्याचा वर्गमित्र त्याला मदत करू लागला. गड्डे करण्याची सवय ही कोरोना काळात त्याच्या अंगी रुजली हे मला मॅडमच्या बोलण्यातून समजले होते.गड्डे करण्यासाठी त्याला हवी असलेली वस्तू त्याचा मित्र घेऊन उभा राहू लागला. हर्षची शाळेच्या मुलांबरोबर जवळीक वाढली. माझ्या वर्गात पाचही मिनिटं न बसणारा हर्ष मध्यंतरापर्यंत माझ्या वर्गात बसू लागला.

**हर्षचा प्रवेश बनवाडी तांडा येथे निश्चित -**

शैक्षणिक वर्ष 2023-24 हर्षची शाळेत बसण्याची समस्या काही अंशी दूर करण्यात आली होती. हर्ष शाळेत बसू शकतो,शिकू शकतो हा आत्मविश्वास बनवाडी तांडा येथील दोन्ही शिक्षकांमध्ये, अंगणवाडी ताई यांच्या मध्ये आला होता. हर्ष मध्ये होणारा बदल पाहून त्याच्या पालकांनी शैक्षणिक वर्ष 2024-25 मध्ये हर्ष चा जि.प. प्रा.शा.बनवाडी तांडा केंद्र ओहर ता.जि छत्रपती संभाजीनगर या शाळेत प्रवेश घेण्याचे निश्चित केले.

**प्रत्येक मुल शिकू शकते हा आत्मविश्वास देणारा हर्ष -**

हर्षला दिलेले आव्हान हर्ष पूर्ण करतो का?याचे निरीक्षण करण्यास सुरुवात केली. सर्वप्रथम फलकावर लेखनाचा सराव सुरू केला.डाव्या हाताने लिहिणारा हर्ष काही वेळातच फलक लेखन करू लागला. फलक लेखनानंतर वहीमध्ये खिचडी करून,एका पानापासून लेखनास झालेली सुरुवात आज दिवसभरात ३६ पाने लेखनापर्यंत झाली आहे. परिपाठात सतत दिलेल्या संधीमुळे, मिळालेल्या आत्मविश्वासामुळे परिपाठातील प्रतिज्ञा,संविधान, प्रार्थना,श्लोक,पाढे दररोज हर्ष टीम लीडर म्हणून घेतो. हर्षचे पंधरा पर्यंत पाढे मुखोद्गत झाले आहेत. इंग्रजी राइम्स म्हणण्याची संधी आवर्जून हर्ष स्वीकारतो. इंग्रजी उच्चार,काही निवडक इंग्रजी शब्द वाचन करू लागला आहे. शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनात दोन गीतात हर्षला संधी देण्यात आली. कधीही कुणी आल्यानंतर घाबरून पळून जाणारा हर्ष आज शिक्षण विस्तार अधिकारी साहेब केंद्रप्रमुख साहेब यांच्यासमोर सादरीकरण करण्याचे धाडस करू लागला आहे. शाळेच्या अवतीभवती चे गड्डे कमी झाले आहेत.हर्ष चे हात चावणे आता पूर्ण थांबले आहे. जेवण्यात व्यवस्थितपणा निश्चित आला आहे.हर्ष आता खरोखर हुशार झाला आहे. खरोखर हर्ष महेंद्र ताठे (CWSN)आता शाळेत बसू,शिकू लागला आहे. पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी

अग्रेसर होऊ लागला आहे. प्रत्येक मुल शिकू शकते हा आत्मविश्वास आम्हा सर्व शिक्षकांमध्ये निर्माण करू लागला आहे. "प्रयत्नांती परमेश्वर" हे हर्षकडे (अर्थात राजवीरकडे) पाहून निश्चितच सार्थकी वाटते.

**विश्वास -**

आज इंग्रजी माध्यमाच्या झपाटलेल्या दुनियेत हर्षच्या आई, वडिलांनी, कुटुंबीयांनी,नातेवाईकांनी टाकलेला विश्वास जिल्हा परिषदेच्या शाळेच्या उज्वल भविष्यासाठी निश्चितच प्रेरणादायी आहे

**हर्ष सारखे विद्यार्थी खरंतर आव्हान नाही संधी म्हणल्यास वावगे ठरणार नाही.**






मी होणार विजेता
उपक्रमांतर्गत हर्ष महेंद्र ताठे
यास बक्षीस





आनंददायी पद्धतीने
शाळेबाहेर
शिक्षण घेताना हर्ष महेंद्र ताठे



परिपाठात आनंददायी
पद्धतीने नेतृत्व करणारा हर्ष
महेंद्र ताठे




आदरणीय शि.वि.अ.
श्री.भोसले साहेब साहेब,
केंद्रप्रमुख श्री.काकडे साहेब
यांच्या समोर न घाबरता
सादरीकरण करणारा जि.
प.प्रा.
शा बनवाडी तांडा शाळेचा
विद्यार्थी हर्ष महेंद्र ताठे


वर्गात वेगवेगळी आव्हाने,
दररोजची निरीक्षणे,
प्रोत्साहन
मित्रांच्या सहकार्याने शिक्षण घेताना
प्रा.शा बनवाडी तांडा
शाळेचा विद्यार्थी हर्ष महेंद्र
ताठे


जि.प.प्रा.शा बनवाडी तांडा
शाळेचा विद्यार्थी हर्ष महेंद्र
ताठे यास शाळा प्रवेशानंतर
वर्गाबाहेर मनाप्रमाणे
मोकळीक
विविध शैक्षणिक
उपक्रमांमध्ये शाळेचीभीती
दूर होण्यासाठी
विद्यार्थ्यांबरोबर संधी


हर्ष महेंद्र ताठे
प्रारंभीचे लेखन व सध्याचे लेखन


जि.प.प्रा.शा बनवाडी तांडा केंद्र ओहर ता.जि. छत्रपती संभाजीनगर शाळेचा विद्यार्थी हर्ष महेंद्र ताठे(CWSN) आम्हा सर्व शिक्षकांना खात्री व आत्मविश्वास देतो की प्रत्येक मूल शिकू शकत
3
Kakade Prabhakar
15 MB
मित्रांनो हाच तो हर्ष ताठे जो कोणी म्हणेल का हा CWSN विद्यार्थी आहे हे यश आहे याला शिकविणाऱ्या सरांचे
22:23
जि.प.प्रा.शा बनवाडी तांडा केंद्र ओहर ता.जि.छत्रपती संभाजीनगर
वर्ग तिसरा
हर्ष महेंद्र ताठे
06/01/2028
Authority Sign
हर्ष महेंद्र ताठे यास पुढील दैदीप्यमान शैक्षणिक वाटचालीसाठी सर्व शिक्षण क्षेत्राच्या वतीने हार्दिक शुभेच्छा

----------**----------

# "Online व Offline ची धरुनी कास विद्यार्थ्यांचा करू विकास"

**शाळेचे नाव - जिल्हा परिषद शाळा, शिरगाव कवठे, ता.तासगाव, जि.सांगली**

**शाळेचा ईमेल आयडी** - vasantikodande@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.नेताजी आनंदा कांबळे
**मोबाईल क्रमांक** - 8830244817
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - vasantikodande@gmail.com

**प्रास्ताविक** -

**" विविधतेच्या नाविन्यतेचा ध्यास,**

**करी विद्यार्थी सर्वांगीण विकास**

**विविध उपक्रमांची अनुभूती देऊन,**

**ज्ञानात करु सप्तरंगी उधळण"**

शाळा हे ज्ञानाचे भांडार आहे. येथे ज्ञानाची देवाण-घेवाण केली जाते. या ज्ञानरुपी भांडारात ज्ञानाचा सर्वेसर्वा हा शिक्षक असतो.शिक्षणाच्या माध्यमातून अनेक विद्यार्थी घडवित असतो.आपला विद्यार्थी अभ्यास, कला,क्रीडा, सामाजिक या क्षेत्रात अव्वल घडावा यासाठी प्रयत्नशील असतो , आपला विद्यार्थी सर्वगुणसंपन्न घडावा यासाठी प्रयत्नशील असतो, विद्यार्थ्यांचा शारीरिक, सामाजिक, बौद्धिक विकास व्हावा यासाठी तो विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतो. अभ्यासाबरोबरच त्याच्यातील इतरही कलागुणांचा विकास व्हावा यासाठी विविध ऑनलाईन व ऑफलाईन उपक्रम राबवले असून आमच्या शाळेमध्ये अतिशय प्रभावीपणे अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. यासाठी यूट्यूब चैनल, ब्लॉग, ऑनलाईन टेस्ट, स्मार्ट pdf, व्हाट्सअप ग्रुप, स्मार्ट टीव्ही प्रोजेक्टर, कम्प्यूटर लॅब अशा तंत्रज्ञानाच्या विविध साधनांचा वापर अध्ययन अध्यापनात केला जात आहे त्यामुळे मुलांचे शिकणे आणि शिक्षकांचे शिकवणे अतिशय सुलभ होत आहे.

**शिरगाव कवठे येथील आजी माजी -विद्यार्थ्यांनी गिरवले स्वच्छतेचे धडे** -

शिरगाव कवठे येथील जिल्हा परिषद शाळेत महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली.दोन नेत्यांच्या कार्याची ओळख व्हावी व त्यांच्या कार्याला आदरांजली वाहण्याच्या योगाने शाळेतील शालेय परिसर स्वच्छ करण्याचा संकल्प केला. शाळेच्या माजी विद्यार्थ्यांनी शाळेचे उतराई होण्याचा व शाळेप्रती असलेला आदर या माध्यमातून दाखवला . या दिवशी शाळेची स्वच्छता करून शाळेतील विद्यार्थ्यांना एक चांगला आदर्श घालून दिला.

चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा व ऑनलाइन चाचणीचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांनी दोन्ही नेत्यांच्या जीवन चरित्रावर आधारित खूप चांगले अनुभव वक्तृत्व स्पर्धेच्या माध्यमातून सादर केले, त्याच पद्धतीने चित्रकला स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी खूप सुंदर अशी स्वच्छ भारत सुंदर भारत अभियान, एक पाऊल स्वच्छतेकडे, क्लीन इंडिया ग्रीन इंडिया असे मेसेज देत सुंदर चित्रे रंगवली होती. या स्पर्धेच्या उपक्रमाचे विद्यार्थी व पालकांनी खूप कौतुक केले. महात्मा गांधी लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनावर आधारित

ऑनलाइन चाचणीचे विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळाले. स्पर्धेचे मुख्याध्यापक नेताजी कांबळे यांच्या सहीचे ऑनलाइन प्रमाणपत्र देण्यात आले, जिल्ह्यातील जवळजवळ 500 जणांनी भाग घेतला व प्रमाणपत्र मिळवले.

**कृतीयुक्त उपक्रम -**

या माध्यमातून विद्यार्थ्याकडून प्रात्यक्षिक व कृतीयुक्त उपक्रम करून घेतले विविध पानांचा संग्रह, भेंडीचे ठसे, डाळीपासून सुंदर कलाकृती, टाकाऊपासून-टिकाऊ वस्तू बनविणे , मातीचा गणपती प्रतिकृती, योगासने प्राणायाम, नक्षीकाम, वृक्षारोपण , राखी तयार करणे, पुस्तकाला कव्हर घालणे असे विविध कृतीयुक्त उपक्रम करून घेतल्याने विद्यार्थ्याच्या स्वनिर्मितीला वाव मिळाला व हा सर्वगुणसंपन्नतेचा विकास झाला.

**Guest Interview (speaking skill) -**

विद्यार्थ्यांचे इंग्लिश स्पिकिंग स्किल विकसित व्हावे यासाठी गेस्ट इंटरव्यू म्हणजे इंग्रजी मुलाखत हा उपक्रम राबवला. या उपक्रमास खूप चांगल्या पद्धतीने प्रत्येकाने प्रतिसाद दिला. या मुलाखतीमध्ये इंग्रजीमध्ये मुलाखत घेतली जाते त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी बोलण्याचे धाडस वाढलेले आहे. त्यामुळे पालक व अधिकाऱ्यांमध्ये सुद्धा या उपक्रमाविषयी खूप चांगली चर्चा आहे.विद्यार्थी इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये जशे शिकतात याचा पालकांना अभिमान वाटला.परिणामी शाळेचा पट वाढला.इंग्रजी शाळेतील मुले आमच्या शाळेत प्रवेशित झाली.

**योग दिनानिमित्त ऑनलाईन योग मार्गदर्शन, झुम्बा व आरोग्यविषयक मुलाखत -**

असेही एक रक्षाबंधन....एक नातं निसर्ग संवर्धनाचे...एक नातं रक्षणाचे..पर्यावरण दिनानिमित्त एक झाड लावू-पर्यावरण वाचवू - Save the tree.. एक सामाजिक बांधिलकी व पर्यावरण जपण्याचा एक आमचा छोटा प्रयत्न

**कोरोनाला पत्र:लॉकडाउन काळातही तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांनी साधला पत्राद्वारे संवाद -**

कोरोनाविषयी विद्यार्थ्यांच्या भावना जागृत केल्या यासाठी विद्यार्थ्यांनी कोणाला पत्र लिहिले, हा कोरोना आपल्यासाठी किती घातक आहे आणि या द्वारे आपण काय केले पाहिजे हे सर्वांनी या कोरोनाला पत्र याद्वारे सांगितले .त्याच पद्धतीने कोरोना फायटर म्हणून डॉक्टर, पोलिस, नर्स यांनी विशेष काम केले या विशेष कामगिरीबद्दल त्यांचे आभार मानावे यासाठी विद्यार्थ्यांनी आभार पत्र त्यांना पाठवले.

अशा प्रकारे विविधांगी शैक्षणिक उपक्रमांनी विद्यार्थी शैक्षणिक प्रवाहात टिकून आहेत याचा सार्थ अभिमान आहे. online शिक्षण हे सध्याचे शिक्षणाचे प्रभावी माध्यम आहे; पण याबरोबरच या उपक्रमामुळे विदयार्थ्यांचा सर्वांगीण विकास होणार आहे. त्यामुळे विदयार्थ्यांना अभ्यास हा कंटाळवाणे न वाटता आनंददायी वाटेल. यासाठी या उपक्रमाची गरज वाटली. विद्यार्थी उपस्थिती व गुणवत्ता वाढीसाठी याचा खूप उपयोग झाला. यामुळे मुलांच्यात विविध सामाजिक व भावनात्मक मूल्ये, निसर्ग पर्यावरण विषयक जागरूकता, सहकारी वृत्ती,समाज बांधिलकी या मूल्यांची वाढ झाली.यामुळे आपण या ज्ञानदानाच्या पवित्र क्षेत्रांशी जोडले गेलो याचा सार्थ अभिमान वाटतो.

**माहिती तंत्रज्ञानाचा अध्यापनात वापर -**

- अध्यापनात ई टेक्नॉलॉजी
- कोरोना काळात ऑनलाइन शिक्षण
- सर्वगुणसंपन्नतेसाठी ऑनलाईन विविध स्पर्धा
- विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक व्हिडीओ निर्मिती
- चॅनेल नाव - vasanti kodande educational channel

https://youtube.com/channel/UC97CrHv4opH9e9cDjsgtAkA

- लॅपटॉप व वर्गातील एलसीडी च्या साह्याने अध्यापन
- फ्लीप बुक निर्मिती
- ऑनलाइन टेस्ट व प्रमाणपत्र
- वर्ल्ड वॉल गेम ,विविध शैक्षणिक अँपच्या साह्याने अध्यापन

**इयत्ता पहिलीसाठी स्वतःचे ॲप -**

दरवर्षी विद्यार्थ्यांची सहल काढली जाते या सहलीच्या ठिकाणी विद्यार्थ्यांना भौगोलिक ठिकाणाची ओळख करून दिली जाते. क्षेत्रभेट घेतले पण सध्या कोरोनामुळे आपण बाहेर पडू शकत नाही यासाठी आम्ही ऑनलाईन ट्रिप लंडन येथे काढली , खूप चांगला प्रतिसाद दिसून आला .संपूर्ण जिल्ह्यातील विद्यार्थी जॉईन होते व या ट्रिपसाठी आम्हाला शुभम क्षीरसागर यांनी मदत केली.

**प्राणी विद्यार्थी भेटीला व सूर्यमाला माझ्या हातात -**

हा तंत्रज्ञानाचा उपक्रम, स्वतःची शाळेची वेबसाईट

आमच्या शाळेचा ज्ञानामृत नावाचा स्वतःचा ब्लॉग आहे.

https://zpschoolshirgaon.blogspot.com/

**स्वतःचे यूट्यूब चैनल -**

या चैनल वर शैक्षणिक व्हिडिओ त्याच पद्धतीने शालेय व सहशालेय उपक्रम यांचे व्हिडिओ अपडेट केले जातात.

https://youtube.com/channel/UC97CrHv4opH9e9cDjsgtAkA

**लोकसहभागातून शाळेचा कायापलट -**

**शाळेची रंगरंगोटी** - त्याच पद्धतीने शाळेमध्ये आम्ही स्वतः रंगरंगोटी केलेली आहे ही आमच्यासाठी खूप महत्त्वाची व अभिमानास्पद गोष्ट आहे.

- प्रत्येक वर्गाला फॅन व स्मार्ट टीव्ही
- शाळेमध्ये पेविंग ब्लॉक रंगरंगोटी व क्रीडांगण
- बोलक्या भिंती

- काळा प्रिंटर व लॅमिनेशन मशीन
- प्रत्येक वर्गाला एलइडी स्मार्ट टीव्ही
- शालेय ध्वज व कट्टा दुरुस्ती
- प्रत्येक वर्ग डिजिटल वर्ग
- माजी विद्यार्थी यांच्याकडून वायरलेस माइक सिस्टम
- मुलींच्यासाठी सॅनिटरी नॅपकिनडिसपोजल मशीन व स्वतंत्र रुम
- टेबल - खुर्ची
- सेतुअभ्यास पुस्तिका सरपंच व डेप्युटी सरपंच यांच्याकडून भेट
- शाळेचा माजी विद्यार्थी यांच्याकडून विद्यार्थ्यांना स्पोर्टस किट

**आलेल्या अडचणी -**

इयत्ता पहिली ते चौथी पर्यंत वर्ग असणाऱ्या आमच्या शाळेत सध्या 104 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. online education ची पार्श्वभूमी असल्यामुळे विद्यार्थ्यांना व पालकांना तंत्रज्ञानाच्या विविध साधनांची ओळख आहे. WhatsApp ग्रुपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दैनंदिन अभ्यास दिला जातो. काही मुलांकडे मोबाइलची समस्या आहे, तर काही मुलांचे पालक अशिक्षित असल्यामुळे मुलांना तंत्रज्ञानाची साधने वापरताना अडचणी येतात. पण सध्या शाळा चालू आहेत त्यामुळे या ऑनलाइन शिक्षणात शिक्षण हे आम्ही आमच्या शाळेतील टीव्हीवरच देतो . तरीही पालकांचे मत असते की विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेचा फक्त अभ्यास करावा पालकांच्या मानसिकतेत बदल करणे हे खूप मोठे संकट होते

**केलेल्या उपाययोजना -**

या अडचणींवर मात करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षकांनी विचार विनिमय करून ज्या मुलांकडे मोबाइल नाही किंवा जे पालक अशिक्षित आहेत अशांसाठी शाळेत स्मार्ट TV च्या माध्यमातून अध्ययन-अध्यापन करण्याचे ठरवले. त्यासाठी गावातील शाळेचा विद्यार्थी बसवराज पाटील याच्या सहकार्याने प्रत्येक वर्गासाठी एक याप्रमाणे सात स्मार्ट टीव्ही लोकसहभागातून घेत आणि दररोज एक तास TV च्या माध्यमातून अध्ययन-अध्यापन करण्यात येऊ लागले. माझी स्वतःचे यूट्यूब चैनल आहे. व्हिडिओ निर्मितीदेखील स्वतः करते. तसेच शैक्षणिक ब्लॉगच्या माध्यमातून शैक्षणिक माहितीची देवाणघेवाण केली जाते. ई लर्निंगसाठी वापरण्यात येणारी तंत्रज्ञानावर आधारित विविध शैक्षणिक साहित्य स्वतः तयार केले आहे. यामध्ये व्हिडिओज, स्मार्ट पीडीएफ, quiz,गेम यांचा समावेश आहे.

**परिणाम -**

अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे खालील सकारात्मक बदल दिसून आले आहेत.

1. विद्यार्थ्यांचे अध्ययन सुलभ सोपे होण्यास मदत झाली.अध्ययन - अध्यापन आनंददायी व मनोरंजनात्मक झाले.
2. विद्यार्थ्यांची शिकण्याची गोडी वाढली.शिक्षणामध्ये तंत्रज्ञान समाविष्ट झाले.
3. विद्यार्थी तंत्रज्ञानाची वेगवेगळी साधनं सहजपणे हाताळू लागले.विद्यार्थी व शिक्षकांच्या मध्ये तंत्रज्ञानाची आवड व कौशल्य निर्माण झाले.
4. व्हिडिओ निर्मिती स्वतः शिक्षकांनी केल्यामुळे दर्जेदार ई-साहित्य तयार होण्यास मदत झाली.

5. व्हाट्सअप ग्रुपच्या माध्यमातून पालक-शिक्षक- विद्यार्थी एकमेकांशी जोडले गेले. त्यामुळे चांगल्या गोष्टींचे आदान-प्रदान होण्यास मदत झाली.

**समारोप -**

अशा प्रकारे विविधांगी शैक्षणिक उपक्रमांनी माझे विद्यार्थी शैक्षणिक प्रवाहात टिकून आहेत याचा मला सार्थ अभिमान आहे. online शिक्षण हे सध्याचे शिक्षणाचे प्रभावी माध्यम आहे; पण याबरोबरच माझ्या या उपक्रमामुळे विदयार्थ्यांचा सर्वांगीण विकास होणार आहे. त्यामुळे विदयार्थ्यांना अभ्यास हा कंटाळवाणे न वाटता आनंददायी वाटेल . यासाठी मला या उपक्रमाची गरज वाटली. विद्यार्थी उपस्थिती व गुणवत्ता वाढीसाठी याचा खूप उपयोग झाला.यामुळे मुलांच्यात विविध सामाजिक व भावनात्मक मूल्ये ,निसर्ग पर्यावरण विषयक जागरूकता ,सहकारी वृत्ती,समाज बांधिलकी या मूल्यांची वाढ झाली.यामुळे आपण या ज्ञानदानाच्या पवित्र क्षेत्रांशी जोडले गेलो याचा सार्थ अभिमान वाटतो. अध्ययन अध्यापनातील प्रभावी वापरामुळे आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासामध्ये खूपच सकारात्मक बदल झाला आहे. त्यांची शिकण्याची आणि शिक्षकांची शिकवण्याची प्रक्रिया एकंदरीत खूपच सुलभ होण्यास मदत झाली आहे.




HAPPY DIWALI
दिवाळी ग्रिटींग
दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा


आकाशकंदील बनविणे




तिरंगा बॅच
जिल्हा परिषद प्राथ.शाळा




गणपती बाप्पा मोरया

----------**----------

# “लोकसहभागातून शाळेचा कायापालट”

**शाळेचे नाव - जिल्हा परिषद शाळा, माळीवस्ती हरोली, ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली.**

**शाळेचा ईमेल आयडी** - gajanandeshing@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.गजानन बाळासो पाटील
**मोबाईल क्रमांक** - 9960724588
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - gajanandeshing@gmail.com

**प्रास्ताविक** -

कवठेमहांकाळ तालुक्याच्या पश्चिमेस असणारे हरोली गाव दोन हजार लोकसंख्या असणाऱ्या हारोली गावामध्ये दोन जिल्हा परिषदेच्या शाळा आहेत. एक गावामध्ये आणि एक वस्ती भागामध्ये. आज अशा एका शाळेची आपण यशोगाथा पाहणार आहोत जी शून्य पटाअभावी बंद पडलेली होती. आमच्या जिल्हा परिषद शाळा माळीवस्तीची यशोगाथा पाहूया, या शाळेची स्थापना 1963 साली झाली. ही शाळा हरोली गावापासून दोन किलोमीटर पश्चिमेस आहे. या शाळेच्या सभोवताली साखरे वस्ती, पाटील वस्ती, कोळी वस्ती , जाधव शेंडे वस्ती अशा थोड्या अंतरावर असणाऱ्या वस्तीच्या मध्यभागी ही शाळा मुलांच्या सोयीसाठी स्थापन झाली. प्रारंभी या शाळेमध्ये इयत्ता पहिली ते सातवी असे शिक्षणाचे धडे दिले जायचे. सात वर्ग व मोठी शाळा या शाळेचा नावलौकिक होता. शाळेजवळच असणारी 1972 च्या दुष्काळामध्ये खूप मोठे तळ्याचे काम झाले आणि तेव्हापासून येथील शेतकरी सुजलाम सुफलाम झाला. ऊस, द्राक्ष बाग ,गुलाब शेती, पशुपालन असे नवनवीन प्रयोग येथील शेतकरी आपल्या शेतात करतात. शाळेविषयी अतिशय जिव्हाळा प्रेम असणारे येथील लोक आहेत. एक नाव असलेली आणि मोठी शाळा, इसवी सन 2000 पासून या शाळेला घरघर सुरू झाली. या शाळेचा पट कमी होऊ लागला. वस्तीवरील मुले इंग्रजी माध्यमांच्या शाळेकडे गाडीतून जाऊ लागली हळूहळू पट कमी कमी होत सन 2010 साली पट 0 होऊन ही शाळा बंद पडली. या शाळेतील दोन शिक्षकांचे समायोजन इतर शाळेमध्ये करण्यात आले. अशा प्रकारे सुजलाम सुफलाम असणाऱ्या परिसरातील शाळा बंद पडणे हे फार मोठे दुर्दैव म्हणावे लागेल येथील मुले शिरढोण , कवठेमहांकाळ व अन्य परगावी शिकण्यासाठी जावू लागली. परंतु जे गरीब पालक होते त्यांची मुले मात्र कोठे शिक्षणाला न घातल्याने घरीच राहू लागली. त्यांचे शिक्षणाचे दरवाजे कायमचे बंद झाले. फार बिकट अवस्था येथे झाली. अशातच सन 2013 साली तालुका अंतर्गत बदल्या चालू होत्या. यावेळी तत्कालीन गटशिक्षण अधिकारी आदरणीय बाळासाहेब शेटे साहेब यांनी सुरुवातीला सांगितले की 2010 पासून तीन वर्षे बंद असलेल्या शाळा कोणी घेणेस इच्छुक आहे का? येथील मुले परगावी शिक्षणासाठी जातात पालकांची फार मोठी गैरसोय झालेली आहे. येथील काही मुले घरी असतात. शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर झालेली आहे आणि ही बंद पडलेली शाळा पुन्हा एकदा बदल्यांसाठी ओपन करण्यात आलेली आहे आणि तिचे पुनरुज्जीवन करावयाचे आहे असे आपल्या प्रास्ताविकामध्ये सांगितले आणि यावेळी याच परिसरातील असणारे शिक्षक

श्री अजित वांडरे सर व श्री दीपक माळी सर यांनी या शाळेमध्ये बदली करून घेण्याचे ठरवले.शाळा पुनर्जीवित करायचे ठरवले.

**आलेल्या अडचणी -**

ही शाळा सुरू केल्यानंतर 15 जून 2013 पासून पुन्हा या शाळेमध्ये मुलांचा किलबिलाट सुरू झाला. सर्वप्रथम या परिसरात असणाऱ्या सर्व वस्तीवरील पालकांच्या गृहभेटी घेण्यात आल्या. पालकांना उत्तम शिक्षण देण्याची हमी देण्यात आली. त्याच बरोबर इमारत खूप जुनी आणि मोडकळीस आलेली होती. तिची रंगरंगोटी करण्यात आली. परिसर गवत व झुडपांनी भरलेला होता. मजूर सांगून तो स्वच्छ करण्यात आला. शाळेची कौले फुटलेली होती ती बसवून घेण्यात आली. दोन वर्ग खोल्या होत्या. त्यातील एक खोली अतिशय धोकादायक होती. एक वर्ग खोली चांगली होती. त्यामध्ये दोन वर्ग बसवण्याचे नियोजन केले व उरलेले दोन वर्ग व्हरांड्यात बसवण्याचे नियोजन केले आणि अशा प्रकारे तीन वर्षे बंद पडलेले असलेल्या शाळेने पुन्हा एकदा श्वास घेतला. पहिल्या वर्षी 11 पट झाला, काही वर्गाचा पट शून्य होता. शाळेच्या सभोवताली फक्त दोन झाडे होती. शाळा माळावरती होती शाळेचा परिसर मुलांना आकर्षक होईल असा नव्हता. एक वर्ग व्हरांड्यात भरला जायचा. पावसाळ्यामध्ये या वर्गाचे खूप हाल व्हायचे, व्हरांड्यात पाणी यायचे. त्यामुळे चारी वर्गातील मुलांना एकत्रित एका वर्गात बसवली जायची. सुरुवातीला तीन बाबींवरती काम करायचे नियोजन करण्यात आले. पहिली गोष्ट **मुलांचा पट वाढवणे**. अजूनही बरीच मुले परगावी शिक्षणासाठी जात होती त्यामुळे मुलांना आपल्या शाळेत आणि दुसरी बाब **शाळेची इमारत दुरुस्ती करणे** अथवा नवीन इमारतीस प्रस्ताव देणे शाळेच्या परिसरात **वृक्षारोपण करून परिसर आकर्षक बनवणे** या बाबींवरती सुरुवातीला लक्ष देण्यात आले. परिसरातील दानशूर व्यक्तींनी- विश्वास साखरे यांनी झाडे लावण्यासाठी ठिबक सिंचन दिले. शाळेच्या चारही बाजूंनी जेसीबी सहाय्याने खड्डे काढून 600 झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या पाईप लाईन मधून एक पाण्याचे कनेक्शन शाळेसाठी घेण्यात आले. अशा प्रकारे शाळेच्या सभोवताही वृक्षारोपण करण्यात आले. मुलांना दर्जेदार शिक्षण देऊन पहिल्याच वर्षी घेण्यात आलेल्या कवठेमहांकाळ तालुकास्तरीय केटीएस परीक्षेत शाळेतील दोन विद्यार्थी तालुका गुणवत्ता यादीत आले. पहिल्याच वर्षी घेण्यात आलेल्या स्नेहसंमेलन कार्यक्रमात पालकांनी शाळेला भरभरून बक्षीसे दिली. अशा प्रकारे परिसरातील पालकांमध्ये शाळेविषयी पुन्हा पुन्हा आत्मीयता निर्माण झाली. या शाळेमध्ये आपल्या मुलांना शिक्षणासाठी पाठवावे असे त्यांना वाटू लागले. वृक्षारोपणामुळे शाळेच्या परिसराला आकर्षकपणा येऊ लागला. याच वेळी मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जाणाऱ्या मुलांनी आपल्या शाळेमध्ये प्रवेश घ्यावा म्हणून **सेमी इंग्रजीतून शाळा सुरू करण्याचा निर्णय सर्व पालकांच्या संमतीने घेण्यात आला.** आजच्या काळानुसार मुलांना इंग्रजीचे महत्त्व लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला व देशिंग केंद्रातील पहिली सेमी इंग्रजी शाळा सुरू झाली.आता परगावी जाणारी मुले या शाळेमध्ये शिक्षणासाठी प्रवेश घेऊ लागली आणि शाळेचा पट हळूहळू वाढू लागला. सेमी इंग्रजी मुळे पालकांना एक चांगला पर्याय उपलब्ध झाला. शिक्षकांचे प्रयत्न आणि शाळेचे बदलणारे रूप यामुळे पुन्हा एकदा या शाळेला प्रगतीचे दार उघडले 2017 साली या शाळेला जिल्हा परिषदेच्या माध्यमातून एका वर्ग खोलीचे बांधकाम करून देण्यात आले. त्यानंतर 2019 साली पुन्हा एका खोलीचे

बांधकाम करण्यात आले अशा प्रकारे शाळेला दोन वर्ग खोल्या आर.सी.सी उपलब्ध झाल्या. व्हरांड्यात बसणारी मुले आता नवीन चांगल्या इमारतीमध्ये शिक्षण घेवू लागली. नवीन वर्ग खोल्या बांधल्यानंतर अनेक कामे करावयाची होती . पुन्हा नव्याने सुरुवात करायची होती.

**लोक सहभागातून शाळेचा कायापालट -**

**नवीन वर्ग खोल्या बांधून झाल्यानंतर या इमारतीची रंगरंगोटी करणे, बाला पेंटिंग करणे, स्वतंत्र ऑफिस बांधणे यासारखी कामे करावयाची होती व शाळा मॉडेल स्कूल प्रमाणे तयार करावयाची होती.** यासाठी पालकांना प्रत्यक्ष भेटून शाळा व्यवस्थापन समिती व शिक्षक श्री गजानन पाटील सर व श्री दीपक माळी सर यांनी वस्तीवरील पालक भेटी घेतल्या .पालकांनी सढळ हाताने मदत केली. कोणी आर्थिक मदत केली. तर कोणी वस्तुरूपाने मदत केली. अशा प्रकारे दोन लाख रुपये जमा झाले. त्यातून **शाळेची रंग रंगोटी करण्यात आली. बाला पेंटिंग केले, ऑफिस बांधकाम करण्यात आले. ऑफिसमधील फर्निचर व पीओपी करण्यात आले. दोन्ही खोल्यांमध्ये लाईट फिटिंग करण्यात आले.** राहिलेल्या पैशातून वाचन साहित्य खरेदी करण्यात आले याचवेळी **ग्रामपंचायतच्या माध्यमातून मुलांचे शौचालय उत्तम प्रकारे बांधण्यात आले व त्याला रनिंग वॉटर सिस्टीम करण्यात आली परसबागेसाठी माती देण्यात आली. शाळेतील एका वर्गासाठी एलईडी टीव्ही देण्यात आला.** राहिलेल्या दुसऱ्या वर्गात लोकसहभागातून एलईडी अँड्रॉइड टीव्ही घेण्यात आला अशाप्रकारे शाळेचा कायापालट झाला. वस्तीवरील एक दानशूर पालक श्री दत्तात्रय साखरे यांनी शाळेसाठी स्वागत कमानीचे बांधकाम करून दिले. त्यामुळे शाळेच्या सौदर्यात भर पडली. त्याच बरोबर पुणे येथील प्रसिद्ध आयटी कंपनी परसीस्टंट इंडिया लिमिटेड या कंपनीने शाळेसाठी चार संगणक संच दिले. यामुळे शाळेतील मुलांना संगणक शिक्षणाचे धडे मिळू लागले. पाच संगणकांची लॅब तयार करण्यात आली. आज सर्व मुले संगणकाचे धडे घेत आहेत. परिसरातील पालक श्री नंदूकाका साखरे यांनी सर्व मुलांना स्पोर्ट किटचे वाटप नुकतेच केलेले आहे. शून्य पट असणारी शाळा जिचा प्रवास 35 पटापर्यंत वाढला .पालकांचा विश्वास आणि विद्यार्थी प्रगती हे दोन घटकासाठी अहोरात्र कष्ट करण्याची तयारी या शाळेतील शिक्षक श्री गजानन पाटील सर व सौ पूनम संदीप माने मॅडम या करत आहेत. गेल्यावर्षी जिल्हा परिषदेने घेतलेल्या गुणवत्ता शोध परीक्षांमध्ये दोन विद्यार्थी गुणवत्ता यादीत आलेले आहेत. क्रीडा स्पर्धेमध्ये शाळेने जिल्हा स्तरापर्यंत मजल मारलेली आहे. लहान शाळा असून धावणे , कबड्डी, खो-खो यासारख्या स्पर्धेत केंद्रामध्ये नेत्रदीपक यश प्राप्त केलेले आहे. शाळेची विद्यार्थिनी स्नेहा शेंडे हिने धावणे व लांब उडीत जिल्हा स्तरापर्यंत सहभाग घेतलेला आहे. आज शाळेच्या परिसरामध्ये 1000 पेक्षा अधिक वृक्ष आहेत. शाळेचा परिसर अतिशय स्वच्छ व सुंदर आहे. लोकसहभागातून पाच लाख रुपये पर्यंतची कामे या छोट्याशा वस्तीतून झालेली आहेत. परिसर निसर्गरम्य वनराईने नटलेला आहे . वडांची अनेक झाडे, पिंपळ, फणस, आंबा, केळी, नारळ, जांभूळ, चिंच, लिंबू, गुलमोहर रेंन ट्री, सायकस, मोरपंखी अशी अनेक झाडे परिसरात पाहायला मिळतात. शाळेची सुंदर परसबाग पाहायला मिळते. बंद पडलेली शाळा सुरू होऊन आता एक दशक संपलेले आहे. पण दहा वर्षात या शाळेने खूप प्रगती केलेली आहे. दोन झाडे असणारी शाळा आता हजारो झाडांनी फुलली आहे. शाळेची इमारत शाळेत बगीचा , सेमी इंग्रजी माध्यम, लोक सहभाग, बाला पेंटिंग , स्वागत कमान

व शाळेचा वाढलेला पट पालकांची शाळेविषयी असणारी आत्मीयता असा बदल या परिसराने पाहिलेला आहे. अजूनही अनेक कामे करण्यासाठी पालक स्वतःहून पुढे येत आहेत . शाळेच्या परिसरात असणाऱ्या वस्तूंची , झाडांची काळजी येथील पालक घरच्यांसारखी घेतात. शाळेच्या प्रगतीसाठी हातभार लावणारी येथील पालक शाळा व्यवस्थापन समिती माजी अध्यक्ष सर्व सदस्य दानशूर व्यक्ती सर्वांचे मनस्वी आभार. **आमची शाळा आणि येथील परिसर हे आता वेगळे घटक नसून एक कुटुंब झालेले आहे.**

**शाळेसंबंधी संपूर्ण माहिती पाहण्यासाठी शाळेच्या फेसबुक अकाउंटला भेट द्या –**

https://www.facebook.com/zpschoolmalivastiharoli.kavathemahankal?mibextid=







# शिक्षकामुळे हरोली येथील माळीवस्ती शाळेचे रूपडे पालटले

**जनप्रवास । प्रतिनिधी**

**कवठेमहांकाळ :** शिक्षकावर शिक्षणाचा दर्जा अवलंबून असतो. व शिक्षकावर शाळेचे आस्तीत्व अवलंबून असतो. जिल्हा परिषदेच्या शिक्षकावर समाज टिका करत असतो. परंतु बंद पडण्याच्या मार्गावर असलेल्या कवठेमहांकाळ तालुक्यातील हरोली येथील माळीवस्ती शाळेचे तेथील कार्यरत शिक्षकांनी रूपडे पालटले आहे. इमारत,भौतिक सुविधासह दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून माळी व पाटील या दोन कर्तबगार व समाजनिष्ठ शिक्षकांनी माळी वस्तीवरील जिल्हा परिषदेची शाळा गुणवत्ता विकासाचे केंद्र निर्माण केले आहे.

सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा माळी वस्ती, हरोली या शाळेतील शिक्षकांनी मिळून बंद पडण्याच्या मार्गावर असलेली शाळा काही महिन्यातच नावारूपाला आणली आहे.

जिल्हा परिषदेचे शिक्षक दिपक माळी व गजानन पाटील या दोघांनी समाज व पालकांचे सहकार्य घेतले. शाळा उठाव मोहिम राबविण्यात आली. समाजाचा शिक्षकावरील विस्वास वाढला. त्यामुळे




कवठेमहांकाळ तालुक्यातील हरोली येथील माळीवस्ती परिसरातील जिल्हा परिषदेची आदर्श शाळा आकर्षक दिसत आहे.

शिक्षकांनीही समाजाने टकालेल्या विस्वासास पात्र राहून शाळेची इमारतीची रंगरंगोटी केली. आकर्षक इमारत, भौतिक सुविधा, दर्जेदार शिक्षण व पालकांचे सहकार्य मिळाले. त्यामुळे शाळेतील विध्यार्थी संख्या वाढली. गुणवत्ता पूर्ण शिक्षणाची खात्री झाल्याने विद्यार्थी शाळेकडे आकर्षित होवू लागले.

बंद पडण्याच्या मार्गावर असलेल्या शाळेचे स्वरूप शिक्षक बदलू शकता हे सिध्द करून दाखवले आहे. आवारातील झाडे, शाळेतील स्वच्छतागृह शाळेतील रंगरंगोटी काम, स्वच्छता, मुलांची बैठक व्यवस्था, शाळेच्या आवारात झाडी वेली अशा विविध प्रकाराने शाळा सजवण्यात आलेली आहे. माळी वस्ती शाळेचे मुख्याध्यापक दीपक माळी व सहाय्यक शिक्षक गजानन पाटील तसेच शाळाप्रिय पालक विश्वास साखरे व सरपंच व ग्रामस्था यांच्या प्रयत्नातून शाळेच्या गरजाची पूर्ती करण्यात या दोन शिक्षकांना यश मिळाले. व आकर्षक अशी आदर्श सेमी इंग्रजी माध्यमाची शाळा निर्माण केली.

पंचायत समितीचे गट शिक्षणाधिकारी प्रमोद गोफणे, शिक्षण विस्तार अधिकारी अनसर शेख, विस्वास साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याध्यापक माळी व शिक्षक पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत. विद्यार्थी प्रिय व व्यवसाय निष्ठा अशा शिक्षकांनी हरोली येथील माळीवस्ती शाळेचे स्वरूपच पालटले आहे. त्यामुळे माळी व पाटील या दोन शिक्षकांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



----------**----------

# “यशोगाथा-स्थलांतरित बालकांच्या शिक्षणाची”

**शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद शाळा वारगांव,केंद्र बेटावद. तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे.**

**शाळेचा ईमेल आयडी -** sammarathe79@gmail.com

**मुख्याध्यापकाचे नाव -** श्री पंढरीनाथ रतन पवार

**मोबाईल क्रमांक** - ९५२७३६८४०४

**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी -** sammarathe79@gmail.com

**प्रास्ताविक -**

आमची आदिवासी वस्तीवरील मोलमजुरी करणाऱ्या गरीब पालकांच्या बालकांची शाळा, जिल्हा परिषद शाळा वारगाव. तालुका शिंदखेडा,जिल्हा धुळे. गेल्या दोन वर्षापासून माझ्या शाळेतील विद्यार्थ्यांचे पालक उदरनिर्वाहाच्या सोयीसाठी आपल्या मुलांसह ऊस तोडीसाठी स्थलांतरित होत असतात व साधारण सहा ते सात महिने ते विद्यार्थी शाळा व शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर जातात. त्यामुळे त्यांच्या गुणवत्तेवर खूप मोठा परिणाम होऊन अधोगती होते व ज्यावेळी ते विद्यार्थी ऊस तोडीवरून परत येतात तेव्हा त्यांची गुणवत्ता, अध्ययन क्षमता या कमी झालेल्या असतात व एकंदरीत त्यांचे त्या वर्षातील अध्ययन संपादणूक पातळी कमी झालेली असते व एकंदरीत त्यांचे त्या वर्षातील शैक्षणिक प्रगती खालावली जाते. ही उणीव व कमतरता भरून काढण्यासाठी या समस्याचे निराकरण करण्यासाठी आम्ही या कार्यपुस्तीकेची निर्मिती केलेली आहे. ही पुस्तिका पहिली ते चौथीच्या ऊसतोडी ला जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मराठी, गणित, व इंग्रजी विषयाच्या सरावाच्या दृष्टीने तयार केलेली आहे.

**या विषया संदर्भात आलेल्या अडचणी -**

- आमच्या शाळेतील विद्यार्थी ऊस तोडीला जातात त्यामुळे ते स्थलांतरित होतात.
- विद्यार्थ्यांचे स्थलांतर झाल्यामुळे ते शिक्षणाच्या व शाळेच्या प्रवाहातून काही महिन्यांसाठी लांब जातात.
- त्यामुळे विद्यार्थ्यांना अवगत असलेल्या अध्ययनक्षमता ह्या कमी होत जातात.
- त्यांच्या शिक्षणात- शिकण्यात खंड पडू लागतो.
- अध्ययनाची गती मंदावते.
- अध्ययनातील गोडी कमी होते.
- त्यांच्यातील शाळा, अध्ययन, शैक्षणिक वातावरण यामधील सातत्य कमी होते.
- शाळा विद्यार्थी शिक्षक व शिक्षण यात मानसिक दुरावा तयार होण्याची शक्यता असते.
- विद्यार्थ्यांमध्ये शिकण्यातील मानसिक नैराश्य निर्माण होते.
- विद्यार्थी उत्साही न राहता आळशी होतात.

**या विषयासंदर्भात अधिक प्रभावी केलेले काम:-**

- सर्वात आधी स्थलांतरित होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे समुपदेशन केले व त्यांना विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानाविषयी समजावून सांगितले.
- स्थलांतरित होणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी केली.
- या विद्यार्थ्यांची स्थलांतरित होण्याआधी अध्ययनक्षमता तपासणी , अध्ययन स्तर निश्चिती करून घेतली.
- या अध्ययन निष्पत्ती व स्तर निश्चितीसाठी लेखी व तोंडी स्वरूपात पूर्व चाचणी घेतली.
- त्या चाचणीनुसार त्यांची अध्ययनक्षमता ओळखून ते विद्यार्थी स्थलांतरित झाल्यावर त्यांना सहज अध्ययनाचा सराव व्हावा व अवगत असलेल्या क्षमतेच्या आधारे त्यांचे शिकणे नियमित सुरू राहावे यासाठी विद्यार्थ्यांना सरावात्मक अध्ययनासाठी कार्यपुस्तिका तयार करण्यात आली.
- ज्या पुस्तिकेतून त्या विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन, मित्र-मैत्रिणींसोबत जोडीत,गटात अध्ययन करता यावे यासाठी मराठी गणित इंग्रजी विषय एकत्रित तिथेच लिहीता,वाचता, सोडवता येईल अशा प्रकारच्या कार्यपुस्तिका तयार करण्यात आल्या.
- या प्रकारच्या अध्ययनासाठी स्थलांतरित विद्यार्थ्यांचे वर्गमित्र, जोडी मित्र व गट तयार करण्यात आले व self learning, peer learning, pair learning, group learning याप्रमाणे अध्ययनासाठी विद्यार्थ्यांचे नियोजन करून दिले.
- अधून मधून फोन द्वारे विद्यार्थी व पालकांशी संपर्क करून त्यांच्या सरावाचा मागोवा घेण्यात आला.
- विद्यार्थी ऊस तोडी वरून शाळेत परत आल्यानंतर त्यांची उत्तर चाचणी घेण्यात आली. उत्तर चाचणीतून त्यांची अध्ययन क्षमता, अध्ययन स्तर तपासण्यात आला.
- या सद्यस्थितीतील विद्यार्थ्यांच्या उत्तर चाचणीतून मिळालेल्या अध्ययनक्षमता अध्ययन स्तरानुसार पुढे नियमित अध्यापन करण्यास सुरुवात केली.

**फलनिष्पत्ती -**

- या उपक्रमामुळे विद्यार्थी ऊस तोडीसाठी स्थलांतरित झाले तरी शैक्षणिक व शालेय प्रवाहातून पूर्णतः वंचित झाले नाही.
- शिक्षणात व शिकण्यात खंड पडला नाही.
- स्वयम् प्रेरणेने, मित्रांच्या मदतीने, ग्रुपमध्ये, पालकांसोबत अध्ययनाचा सराव होत राहिला.
- अध्ययनात सातत्य टिकून राहिले ,अवगत असलेल्या क्षमता कृतिपुस्तिकाच्या सरावामुळे टिकून राहिल्या व वाढत गेल्या
- स्वयंअध्ययनास चालना मिळाली.
- शाळा शैक्षणिक वातावरण यांच्या पलीकडेही मूल शिकू शकते याची प्रचिती मिळाली.
- कृतिपुस्तिका तपासल्यानंतर त्याद्वारे विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करणे सहज शक्य झाले.

**समारोप -**

माझ्या शाळेतील विद्यार्थी व त्यांचे पालक दरवर्षी त्यांच्या परिस्थितीमुळे उदरनिर्वाहासाठी सहा ते सात महीने ऊसतोडीला स्थलांतरित होत असतात. त्या विद्यार्थ्यांच्या अध्ययनात, शैक्षणिक गुणवत्ता विकास, अध्ययनक्षमता, अध्ययन स्तर व अध्ययन सातत्य टिकून राहावे त्यात खंड पडू नये यासाठी उपाययोजना म्हणून त्या विद्यार्थ्यांच्या क्षमता व अध्ययन स्तर व त्यांचा वर्ग व अभ्यासक्रम लक्षात घेऊन त्यांच्या अध्ययनाच्या सरावासाठी आम्ही कार्यपुस्तिका तयार करून घेतली व त्या विद्यार्थ्यांना ऊस तोडीला जाताना त्यांच्या पालकांसमोर देण्यात आल्या व त्या पुस्तिकेविषयी त्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले व विद्यार्थ्यांना त्या कशा सोडवायच्या त्यांचे ग्रुप त्यांचे मित्र जोडी कोण आहेत या पुस्तिकेमधून तुम्हाला कसा अभ्यास करता येईल कुणाच्या मदतीने हे सर्व सविस्तर समजावून सांगितले या नावीन्यपूर्ण उपक्रमाचा गेल्या दोन वर्षापासून विद्यार्थ्यांना व आम्हा शिक्षकांनाही खूप सकारात्मक फायदा झाला. त्यामुळे स्थलांतरित बालकांचे शिक्षण सतत सुरूच राहिले..






**ऊस तोडीला जाण्याआधी विद्यार्थ्यांची पूर्व चाचणी घेण्यात आली.**



पालक मेळावा घेऊन पालकांचे समुपदेशन करण्यात आले



विद्यार्थ्यांना कार्य पुस्तिकेचे वाटप कार्यपुस्तिकेचे निरीक्षण करताना विद्यार्थी



----------**----------

# “माध्यान्ह भोजन योजनेतील यशस्विता”

**शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद शाळा,काळखेडे,केंद्र- फागणे, ता.धुळे, जि.धुळे**

**शाळेचा ईमेल आयडी** - zpschoolkalkhede@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.विलास केदार पवार
**मोबाईल क्रमांक** - ८३९०९५२४६६
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - pawarvilas288@gmail.com

**आमचे गाव,आमची ओळख** -

धुळे - सुरत - नागपूर हायवे पासून ४ कि.मी. च्या अंतरावर, उत्तरेला निसर्गाच्या सानिध्यात असलेले, डोंगर दरीच्या कुशीत वसलेले, काळखेडे एक छोटीशे टुमदार गाव. उत्तरेला धरणाच्या बाजूला जूने पुरातन प्रसिद्ध गायमुख महादेव मंदिर. निसर्गरम्य असे आई भोलाई मातेच्या मंदिराने गावाची असलेली सर्वश्रुत ओळख लोकसंख्या सुमारे ३५०० ते ४००० च्या जवळपास आहे. मुख्य व्यवसाय शेती व पशुपालन आहे.

काळखेडे गाव जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणापासून जवळच आहे. गावातील लोक प्रगतशील शेतकरी आहेत. बरेचसे पालक सुशिक्षित असल्या कारणाने त्यांना विविध सरकारी योजनांविषयी परिपूर्ण अशी माहिती आहे. शाळेमध्ये विद्यार्थी लाभाच्या विविध शासकीय योजना व त्यातल्या त्यात विद्यार्थ्यांसाठी राबवली जाणारी मध्यान्ह भोजन योजना यात सहभाग नोंदवितात, मध्यान्ह भोजन योजनेत गावातील पालकांचा शाळा व्यवस्थापन समितीचा तसेच विशेष करून माता- पालकांचा सहभाग मोठ्या प्रमाणात नोंदविण्यात येतो.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 (NEP)ने विद्यार्थ्यांच्या समग्र विकासाकडे लक्ष केंद्रित केले आहे. समग्र विकासामध्ये विद्यार्थ्यांचा शारीरिक विकास देखील महत्त्वाचा आहे. अर्थात विद्यार्थी शारीरिक, मानसिक व भावनिक दृष्ट्या सुदृढ असणे हे अत्यंत महत्वाचे आहे. याकरिता शासनाने तळागाळातील प्रत्येक विद्यार्थी शिकला पाहिजे, टिकला पाहिजे व पुढे गेला पाहिजे यासाठी विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाबरोबरच शारीरिक विकासही महत्त्वाचा आहे. हा विचार करून मध्यान्ह भोजन योजना अंमलात आणली. ही योजना विद्यार्थी प्रिय होण्यासाठी वेळोवेळी त्यात विविध प्रकारचे बदल शासनामार्फत करण्यात येतात. शासनाच्या या योजनेत प्रभावीपणे सहभागी होऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण व सर्वकष विकासासाठी ह्या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी, आमच्या जिल्हा परिषद शाळा काळखेडे येथे केली जाते. त्यासाठी नाविन्यपूर्ण उपक्रमांचा समावेश मध्यान्ह भोजन योजनेत केला जातो.

**सुदृढ बालक घडवूया**

**देश बलवान बनवूया**

**अशी होते आमच्या शालेय पोषण आहाराची सुरुवात**

https://youtu.be/pjoXFlc3TtE?si=d0DGjClrRNzlKUce



**मध्यान्ह भोजन योजना पार्श्वभूमी -**

भारतात सन १९९५ पासून मध्यान्ह भोजन योजनेस (MDM)राष्ट्रीय स्तरावर सुरु करण्यात आली. याचा उद्देश देशभरातील शाळकरी मुलांना पौष्टिक आहार देणे आहे. या योजनेची प्राथमिक उद्दिष्टे शाळांमध्ये नावनोंदणी आणि उपस्थिती वाढवणे, मुलांची पोषण स्थिती सुधारणे आणि शिक्षणामध्ये सामाजिक आणि लैंगिक समानतेला प्रोत्साहन देणे आहेत.

सुरुवातीला या योजनेअंतर्गत प्राथमिक इयत्ताना १ ली ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना ठराविक प्रमाणात धान्य व दाळी दिल्या जात असत. मात्र सन- २००२ मध्ये सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार अन्नपदार्थांच्या ऐवजी शिजवलेले अन्न विद्यार्थ्यांना देणे सक्तीचे करण्यात आले. मुलांना किती अन्न मिळाले पाहिजे ? याचे निकष पुनरावलोकन करून वारंवार बदलले जात असतात. सन 2004 साली 300 कॅलरीज दिल्या जात होत्या, हे प्रमाण आता इयत्ता १ ली ते ५ वी च्या विद्यार्थ्यांना 450 कॅलरी व १२ ग्राम प्रोटीन दिले जाते व ६ वी ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्याना ७०० कॅलरी व २० ग्राम प्रोटीन असलेले शिजवलेले अन्न देणे, व ते वर्षातील किमान २०० दिवस देणे बंधनकारक आहे. ही केंद्रपुरस्कृत योजना असून, योजनेच्या अंमलबजावणीसाठी लागणारा खर्च केंद्र व

संबंधित राज्य सरकारांनी वाटून घेतला आहे. 'मध्यान्ह भोजन योजना' हा एक चांगला हेतू असलेला कार्यक्रम आहे. वंचित व दुर्बल घटकातील मुलांना दररोज किमान एक वेळ पौष्टिक आहार प्रदान करण्याचे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

उन्हाळ्याच्या सुट्टीत दुष्काळग्रस्त भागातील प्राथमिक शाळेतील मुलांनाही या योजनेअंतर्गत आहार दिला जातो. सरकारने देशातील बालपोषणावर लक्ष केंद्रित केल्याने मध्यान्ह भोजन योजनेचे नाव प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजना असे केले आहे. या योजने अंतर्गत आमच्या जिल्हा परिषद शाळा काळखेडे येथे विविध उपक्रम राबविण्यात आले. त्याचा फायदा आमच्या विद्यार्थी उपस्थितीवर, त्यांच्या शारीरिक विकासावर व गुणवत्तेवर झाला. त्याची ही यशोगाथा आहे.

**मुख्याध्यापक, शिक्षकांना मध्यान्ह भोजन योजनेसंदर्भात आलेल्या अडचणी / समस्या -**

1) पटनोंदणीमध्ये गावातील अनुसूचित जाती जमाती, भटक्या जमाती वंचित घटकातील मुला-मुलींचे प्रमाण फारच कमी होते.

2) पालक, ग्रामस्थ आणि मुख्याध्यापक, शिक्षक यांच्यात संवाद नसल्याने समन्वयाचा अभाव होता.

3) विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार खाण्यात रुची नव्हती.

4) शालेय पोषण आहाराचा दर्जा फारसा समाधान कारक नव्हता

5) शालेय पोषण आहाराच्या चवीत तोच तो पणा.

6) शालेय पोषण आहार वाटप व देखरेख यात पालकांचा अत्यल्प सहभाग.

**मुख्याध्यापक / शिक्षकांनी मध्यान्ह भोजन योजनेअंतर्गत केलेली प्रभावी अंमलबजावणी -**


**आरोग्य जागरुकता प्रज्वलित करा, एक चांगले भविष्य घडवा!**

1. आमच्या जिल्हा परिषद शाळा काळखेडे येथे मध्यान्ह भोजन योजना प्रभावीपणे काम करण्यासाठी माता-पालक यांची वेळोवेळी सभा आयोजित करण्यात आली. मध्यान्ह भोजन योजनेत राबविण्यात येणारे उपक्रम याविषयी सभेत चर्चा करण्यात आली जसे- रानभाजी महोत्सव, कडधान्याची ओळख, परिसर भेट, आनंद मेळावा.

2. मध्यान्ह भोजन योजनेसाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सदस्य यांच्या बैठकीचे आयोजन केले. सदर बैठकीत योजनेवर आधारित विषयावर चर्चा करण्यात आली. बैठकीत राबविण्यात येणारे उपक्रम निवडण्यात आले. SMC सदस्यांनी, माता, पालकांनी अन्नांची चव घेणे व ती चव रजिस्टरवर नोंदविणे हे बैठकीत ठरविण्यात आले.

3.दररोज प्रत्येक वर्गातील किमान दोन माता पालकांनी पोषण आहार वाटपाच्या ठिकाणी देखरेख करणे गरजेचे आहे. असे सर्वानुमते ठरविले.





## शालेय पोषण आहार योजना

### शिजवून अन्न देण्याबाबत शाळास्तरावर ठेवण्याची चव नोंदवही

महिना डिसेंबर २०२४

| दिनांक | चव घेतल्याची वेळ | विद्यार्थ्यांना आहार वाटप वेळ | आजचा मेनू | चव घेणाऱ्याचे नाव | चवीबद्दल अभिप्राय | चव घेणाऱ्याची सही |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ रविवार | | | | | | |
| २ सो | १०:३० | ११:४५ | मध्ये पुलाव, वटाणा स्नाइस्ड, खीर | सौ. जानिता सुनिल पाटील, उपाध्यक्ष शा.व्य.स. | रुचकर | |
| ३ मं | १०:३५ | ११:४५ | मसूरी पुलाव, मुगडाळ स्नाइस्ड, खीर | श्रीमती फरजाना बाबुलाल मांडोळे | चवदार | |
| ४ बु | १०:३५ | ११:४५ | अंडा पुलाव, वटाणा स्नाइस्ड, खीर | सौ. ज्योती अनिल मराठे, सदस्या, माता-पालक संघ | चांगली | ज्योती प्रविण मराठे |
| ५ गु | १०:३० | ११:४५ | मटर पुलाव, वटाणा स्नाइस्ड, खीर | सौ. जया श्री दोलदास पवील, सदस्या शा.व्य.स. | रुचकर | J. D. Patil |
| ६ शु | १०:३५ | ११:४५ | मुगडाळ खिचडी, मुगडाळ स्नाइस्ड, खीर | श्री. प्रविण उत्तमराव वोरोडे | स्वादिष्ट | P. Mane |
| ७ श | १०:३० | ११:१५ | चवळी खिचडी, चवळी स्नाइस्ड, नाचणी लस्सी | सौ. उषरती सागर कोमी, सदस्या, माता-पालक संघ | रुचकर | A. S. Koli |
| ८ रविवार | | | | | | |
| ९ सो | १०:३५ | ११:४५ | मुगडेगण नरगमात, मुगडाळ स्नाइस्ड, खीर | सौ. सोमा मानबा कोमी, सदस्या, शा.व्य.स. | स्वादिष्ट | |
| १० मं | १०:३० | ११:४५ | मडवी उसळ मात, मडवी स्नाइस्ड, खीर | श्री. प्रविश नरेंद्र सामुके | चविष्ट | |
| ११ बु | | | | | | |
| १२ गु | | | | | | |
| १३ शु | | | | | | |

**चव रजिस्टर नोंदी -**

सर्वप्रथम मुख्याध्यापक शिक्षक यांनी एकत्र येऊन उपक्रमाविषयीचा आराखडा तयार केला.

जसे- 1)माता पालक सभेचे आयोजन 2) रानभाज्या महोत्सव व्यवस्थापन 3) परिसर भेट नियोजन 4) माता पालक पौष्टिक पाककला यांच्या स्पर्धा .

सतत गैरहजर असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन त्यांच्या पालकांना शासनामार्फत दिल्या जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या लाभाच्या योजना याबद्दल माहिती सांगितली तसेच विद्यार्थ्यांना दररोज दिले जाणारे प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना अंतर्गत पौष्टिक आहार याबाबत त्यांना मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर शिक्षणावर होणारा त्याचा परिणाम समजावून सांगण्यात आला. यामुळे ज्या मुलांच्या घरी दोन वेळच्या जेवणाचा प्रश्न होता अशी मुले नियमित शाळेत येऊ लागली.

**सदर उपक्रमाची अंमलबजावणी खालील प्रमाणे करण्यात आली-**

**विविध पाककलेचे आयोजन -**



**रानभाज्या महोत्सव व माता पालक पाककृती स्पर्धा**

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच त्यांचा शारीरिक विकास देखील महत्त्वाचा आहे. त्यासाठीच शाळेत पोषण आहारही दिला जातो. आता तर प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेंने यातच भर घातली आहे. राज्यामध्ये आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. याच अनुषंगाने शालेय पोषण आहाराची गोडी वाढण्यासाठी शाळांमध्ये पाककृती स्पर्धेचे आयोजन केले. त्यातील उत्कृष्ट पाककृतींना शाळे कडून बक्षिसेही दिले.

आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांना तृणधान्ययुक्त आहाराची सवय लागावी आणि त्यांच्या आईने देखील दैनंदिन आहारात असे पदार्थ करावेत, या हेतूने आम्ही ही पाककला स्पर्धा घेतली. तृणधान्यापासून निर्मित विविध पाककृतींचा समावेश दैनंदिन आहारामध्ये केल्यास मुलांना वेगळेपणा मिळेल व आहार विद्यार्थी आवडीने खाऊ शकतील. यातून मुलांचे आवश्यक शारिरिक पोषण होईल, याच हेतूने ही पाककृती स्पर्धा आयोजित केली. स्पर्धेत गावातील माता पालकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. प्रत्येक मातेने विद्यार्थ्यांना स्वयंनिर्मित पदार्थातून पौष्टिक आहार मिळेल याची काळजी घेतली.

खरे तर आमचे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना रानभाज्या परिचयाची असतात. परंतु आता रानभाज्या तशा लुप्त होत चाललेल्या आहेत. माता पालकांना तसेच त्यांच्या घरात असलेल्या आजी आजोबांना रानभाज्या माहिती आहेत आणि त्या काही काही ऋतूंमध्ये विशिष्ट रानभाज्या मिळतात. याच रानभाज्यांमधल्या पौष्टिक गुणतत्त्वांची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी याकरिता आम्ही शाळेमध्ये रानभाजी महोत्सव आयोजन ठरवले. सदर उपक्रमामध्ये गावातील मान्यवर तसेच विद्यार्थी, माता पालक, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, सदस्य, शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षक यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

**सदर पाककृती स्पर्धेची व्हिडिओ लिंक सोबत दिलेली आहे-**

https://youtu.be/Lfw4vmJ7du4?feature=shared

**क्षेत्रभेट -**

आमच्या शाळेतील विद्यार्थी व शेती यांचे एक वेगळेच नाते आहे. काही विद्यार्थ्यांच्या घरी शेती आहे, तर काही विद्यार्थ्यांचे पालक हे इतरांच्या शेतीत मजुरी करतात. शेतीमध्ये होणाऱ्या बऱ्याच घडामोडी ते निरीक्षणाद्वारे करीत असतात. त्याला शास्त्रोक्त पद्धतीची जोड देण्यासाठी आम्ही क्षेत्रभेटीचा आधार घेतला. विद्यार्थ्यांना विविध पालेभाज्या व फळ भाज्या यांची ओळख व्हावी त्यातील पौष्टिक घटकांची माहिती मिळवी तसेच दैनंदिन आहारात त्याचा समावेश कसा महत्त्वाचा आहे याविषयीची जागृती होण्याच्या दृष्टीने गावातील जवळच्या परिसरात क्षेत्रभेटीच्या माध्यमातून शेतात भेट दिली. शेतातील पालेभाज्या जसे मेथी, पालक,कोथिंबीर व फळभाज्या टोमॅटो,गिलके, काकडी यांची प्रत्यक्ष ओळख करून दिली. पालेभाज्यांमध्ये खनिजांचा समृद्ध स्रोत असतो. तर काकडी टोमॅटो यासारख्या फळभाज्यांमध्ये पाणी हे जास्त प्रमाणात असते याचे महत्त्व विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कोशिंबीर तयार करून समजाविले.

**सदर क्षेत्रभेटीची लिंक पुढे दिलेली आहे.**

https://youtu.be/je66LdwvQc4?si=ooRgEi2vkQ_74qbV



परिसर भेट विद्यार्थी व शिक्षक



परिसरातील रानमेवा गोळा करतांना विद्यार्थी व शिक्षक

**विद्यार्थ्यांना कडधान्यांची व फळांची ओळख -**

गाव तसे छोटेसे पण मुख्य रस्त्यापासून जवळचे त्यामुळे गावातल्या लोकांचे शहरात नेहमी जाणे येणंजाणे असायचे. त्यामुळे विद्यार्थ्यांना हॉटेलमधील तळलेले पदार्थ जसे की समोसा कचोरी याची विशेष आवड. आम्हा शिक्षकांना जाता येता नेहमी प्रश्न पडायचा. हे जंक फूड तसेच पदार्थ तळलेल्या तेलाची गुणवत्ता आणि आमची ही मुलं गावच्या बाजारात याच पदार्थांचा हट्ट करायची. यामुळेच आम्ही शिक्षकांनी ठरवले की गावातील पालकांना आणि विद्यार्थ्यांना संतुलित आहाराचे महत्व समजावून सांगणे गरजेचे आहे.

आजच्या काळात लोक संतुलित आहाराचे महत्व विसरत आहेत आणि निरोगी अन्नापासून दूर जातायेत, ज्यामुळे मुलांमधे मधुमेह आणि लठ्ठपणाचा धोका वाढते आहे: आपण जंकफूडकडे आकर्षित होत आहोत. अन्नाच्या दर्जाकडे लक्ष देत नाही. जंक फूड स्वादिष्ट असेल पण पौष्टिक अजिबात नसून ते आपल्या आरोग्यासाठी हानिकारक आहे. हे पालकांना प्रत्यक्ष समजावून दिले.

विद्यार्थ्यांना दैनंदिन आहारात कडधान्याचे तसेच फळांचे महत्त्व व त्यापासून शरीराच्या भरण पोषणासाठी मिळणारे घटक यांची माहिती प्रत्यक्ष स्मार्ट टीव्हीवर दाखविली. विद्यार्थ्यांना विविध कडधान्य नमुने गोळा करून चार्टवर चिटकवून त्याविषयीची माहिती लेखन करण्यास सांगीतले.

**शालेय पोषण आहारातील पालक सहभाग -**

अशा प्रकारे आमच्या शाळेतील विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थी व पालकांमध्ये शालेय पोषण आहाराविषयी मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात आली. पालकांमध्ये देखील पोषण आहारा विषयी मोठ्या प्रमाणात उत्सुकता निर्माण झाली. शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकांनी प्रत्येक वर्गातील माता पालकांचा सदर योजनेत शालेय पोषण आहार वाटप व चव देखरेख यात वर्गनिहाय पालकांचा समावेश केला. दररोज प्रत्येक वर्गातील दोन ते तीन माता पालकांनी सहभागी होऊन विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शालेय पोषण आहार वाटप करण्यापूर्वी अन्नपदार्थाची चव घेणे व प्रत्यक्ष वाटप करतांना देखरेख करणे या कामी मोठ्या हिरीरीने सहभाग नोंदवला. त्याचा दृश्य परिणाम म्हणजेच पोषण आहाराचा दर्जा सुधारला. तसेच आपला मुलगा किंवा मुलगी देखील पोषण आहार किती आवडीने खातात आहे याकडे प्रत्येक पालकांचे लक्ष केंद्रित झाले.

यात अधिक भर पडावी याच उद्देशाने दर महिन्याला गावातील आशा वर्कर तसेच डॉक्टर यांचे देखील वेळोवेळी संतुलित आहाराविषयी विविध चर्चासत्रांचे आयोजन केले. मुलांना संतुलित आहार, पौष्टिक आहार याविषयीची माहिती दिली. शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ कसे राहील याविषयी जागरूकता निर्माण केली.



**आशावर्कर व डॉक्टर विद्यार्थ्यांना संतुलित आहार,आरोग्य याविषयी मार्गदर्शन करतांना**





**जि.प.शाळा काळखेडे येथे मातापालक सभा तसेच पालकसभेचे आयोजन, व्यवस्थापन समिती अध्यक्ष, सदस्य तसेच ग्रामपंचायत सदस्य, गावातील पालक ,माता पालक प्रधानमंत्री पोषण शक्ती योजना अंतर्गत दिला जाणारा पोषण आहार वाटप करतांना तसेच स्वतः आस्वाद घेताना पालक व शिक्षक.**

**फलनिष्पत्ती -**

1) **रानभाज्या महोत्सव** - विद्यार्थ्यांना रानभाज्या महोत्सवातून विविध रानभाज्यांची ओळख निर्माण झाली. तसेच रानभाज्यातील पोषक तत्त्वांची माहिती त्यांना या उपक्रमातून मिळाली.

2) **माता पालक पाककृती स्पर्धा**- या स्पर्धेतून घरातील स्वयंनिर्मित पदार्थातून पौष्टिक आहार कसा मिळतो यांचे महत्त्व कळाले.

3) **परिसरातील क्षेत्रभेट**- या क्षेत्रभेटीच्या माध्यमातून शेतात उगवणाऱ्या विविध पालभाज्या व फळभाज्या यांची ओळख व महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले.

4) **कडधान्यांची ओळख** - जंक फूड स्वादिष्ट असले तरी ते आपल्या आरोग्यासाठी हानिकारक असते हे समजावून सांगितले. कडधान्यांचे महत्त्व प्रत्यक्ष स्मार्ट टीव्हीवर विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले. **प्रथिने, जीवनसत्वे क्षार, यांचे आहारात महत्त्व फार**

5) **शालेय पोषण आहारात माता पालक सहभाग**- शालेय पोषण आहारात माता पालकांचा सहभाग यामुळे पोषण आहाराचा दर्जा सुधारला. आपला पाल्य किती आवडीने पोषण आहार ग्रहण करतो याकडे पालकांचे लक्ष केंद्रित झाले.

6) वरील विविध उपक्रम राबविल्यानंतर त्याचे सकारात्मक परिणाम हळू-हळू जाणवू लागले. विद्यार्थ्यांची दैनंदिन उपस्थिती मोठ्या प्रमाणात वाढली.

7) विद्यार्थी नियमितपणे शाळेत हजर राहू लागले. तसेच त्यांच्या विचारात सकारात्मकता जाणवू लागली. विद्यार्थ्यांच्या वजन उंचीच्या मासिक नोंदी ठेवलेल्या असता त्यातही बदल जाणवू लागला.

8) पालकांचा शाळेत अधिकाधिक सहभाग वाढला. विद्यार्थी सर्वच भाज्या आवडीने खाऊ लागले.शेती व बाग कामाविषयी विद्यार्थ्यांच्या मनात आवड निर्माण झाली. एकंदरीत विद्यार्थ्यांच्या शारिरीक, मानसिक व बौद्धिक विकासाच्या जडणघडणीत शालेय पोषण आहाराचा मोठा वाट आहे हे सिद्ध झाले.

**समारोप** -

अशाप्रकारे शासनाच्या प्रत्येक उपक्रमात शाळेचा १०० टक्के सहभाग असतो. आमच्या मध्यान्ह भोजन योजना MDM उपक्रमांमध्ये आम्ही अशा प्रकारे सृजनशील विचार आणि सर्जनशीलता आणली. या सर्व उपक्रम, नियोजन व कृती सर्व कार्यक्रमात शाळेतील माता पालक, ग्रामस्थ, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, सदस्य मुख्याध्यापक व सर्व शिक्षक मिळून सदर उपक्रम यशस्वीतेसाठी सहभाग नोंदविला. यामुळे विद्यार्थ्यांच्या शारीरिक, बौद्धिक व भावनिक विकास झाला. सदर उपक्रम अशाच प्रकारे आमच्या जिल्हा परिषद शाळा काळखेडे येथे निरंतर सुरू राहील यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

----------**----------

# "आनंददायी शिक्षणाची यशोगाथा"

## शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद शाळा, गोताणे, ता.जि.धुळे

**शाळेचा ईमेल आयडी** - sadhanakhairnar19@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.झुलाल सजन पाटील
**मोबाईल नंबर** - 7620633523
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - sadhanakhairnar19@gmail.com

**प्रास्ताविक -**

जिल्ह्याच्या ठिकाणापासून अवघ्या १८ किमी अंतरावर आमचे गोताणे गाव चहुबाजूंनी हिरवळीने नटलेले. नैऋत्य दिशेच्या डोंगरावर गोताणी मातेचे मंदिर असून त्यावरून गावास गोताणे हे नाव पडले. येथे मकरसंक्रातीच्या दुसऱ्या दिवशी मोठी यात्रा भरते. गावाच्या नैऋत्य ते उत्तरेला नदी वाहते. अक्कलपाडा धरणाचा मोठा कॅनल, मध्यावर विठ्ठल मंदिर, पूर्वेला हायस्कूल व पुरातन भवानी मातेचे मंदिर आहे. आजूबाजूला पाडळदे,आनंदखेडे, चौगाव यासारखी गावे आहेत. गोताणे गाव जिल्ह्यात दुधासाठी प्रसिध्द आहे. कारण आमच्या गावात गाईम्हशींचे प्रमाण जास्त आहे. उत्तरेला आमची जिल्हा परिषद शाळा गोताणे, महादेवाचे व क्षेत्रवीर भातिजीचे मंदिर आणि बगीचा आहे. असे आनंददायी वातावरण लाभलेली माझी शाळा यावर्षी भौतिक सुविधा आम्हाला भरपूर मिळाल्या. दररोज मुले आनंदाने शाळेत हजर असतात. मी आणि माझ्या सोबत सौ.साधना गिरधर खैरनार मॅडम गोताणे शाळेत रूजू झालो .

आमच्या शाळेत आम्ही दररोज नवीन ज्ञानाचा वापर करून नवनवीन उपक्रम राबवित असतो. सुरवातीला आमच्या शाळेची पटसंख्या 240 होती, तर आता 270 असून, 1 मुख्याध्यापक व 8 उपशिक्षक शाळेला लाभलेले आहेत. शासनाने राबविलेल्या विद्याप्रवेश-शाळेचे पहिले पाऊल या उपक्रमामुळे इ. 1 ली च्या मुलांशी छान जवळीक साधता आली. त्यानंतर मुले वर्गात आली. मग आनंददायी शिक्षणाचा प्रवास सुरु करायचे ठरविले.

**जिल्हा परिषद शाळा, गोताणे, ता.जि.धुळे येथील मुख्याध्यापक व शिक्षक / शिक्षिका.**



जिल्हा परिषद शाळा,गोताणे येथे सतत आनंददायी उपक्रम घेण्यात येतात. विद्यार्थी हे शैक्षणिक वातावरणातून वास्तविक जगात वावरतांना शाळेत शिकलेली मुल्ये त्यांना अंगिकारता यावीत यासाठी शाळेने काही उपक्रम राबविले ते पुढीलप्रमाणे-

**उपक्रम क्र.१ :- 3 दिवसात मुळाक्षरे**

**वर्ग – इ.१ ली**

'एक एक अक्षर शिकू या,
ज्ञानाचा डोंगर चढू या'

आमची शाळा भाग्यवान, यावर्षी इयत्ता १ लीत तब्बल 53 विद्यार्थी पटावर होते. या मुलांना शाळापूर्व तयारीद्वारे थोडेफार गाणी व गोष्टी येत होती. या गाणी गोष्टीसमवेत भाषा शिक्षणाचा प्रवास आम्हाला सुरू करावयाचा होता. म्हणून आम्ही ३ दिवसात मुळाक्षरे हा आनंददायी उपक्रम सुरू केला. या उपक्रमाचे उद्दिष्ट मुलांना मुळाक्षरांची ओळख व्हावी, ज्ञान मिळावे हा होता. या उपक्रमात पाठ्यपुस्तकातील मुळाक्षरांच्या क्रमानुसार चित्र तसेच प्रत्यक्ष वस्तू दाखवून त्या मुळाक्षरांचा सराव विद्यार्थ्यांकडून करून घेतला.

उदाहरणार्थ, 'क कमळाच्या ऐवजी 'क हे मुळाक्षर शिकवताना प्रत्यक्ष व चित्ररूपात कप दाखवून मुलांकडून प्रत्यक्ष वाचन व लेखनाचा सराव करून घेतला. याप्रमाणेच 'च दूध पिण्याचा चमचा, 'घ साठी प्रत्यक्ष घर व चित्र दाखवून विद्यार्थ्यांचा सराव करून घेतल्यामुळे विद्यार्थ्यांची संकल्पना दृढ होऊन त्यांना मुळाक्षरे वाचन- लेखन येऊ लागले.





**उपक्रम : 3 दिवसात मुळाक्षरे**

**उपक्रम क्र.२ : रंगांची ओळख**

**वर्ग :- इ. १ ली व २ री**

विद्यार्थ्यांना सर्व रंगांची अचूक ओळख करून देणे हे या उपक्रमाचे उद्दिष्ट होते. एखादा रंग शिकवताना विद्यार्थ्यांना पूर्व दिवशी त्या रंगाचा (उदा.पिवळा रंग ) फुगा फुगवून दाखवणे, त्या रंगाचा खाऊ, त्याच रंगाचे पोषाख परिधान करावयास सांगितले जात असे. तसेच मुलांना विविध रंगाची फुले, कपडे, ठोकळे, कार्डशिट घरून आणायला सांगितले. यानंतर एखाद्या दिवशी विद्यार्थ्यांना विविध रंगाचे पोषाख परिधान करून येण्यास सांगितले असता, ते एकमेकांच्या पोषाखाचे रंग चांगल्या प्रकारे ओळखू लागले. तसेच विद्यार्थ्यांना शालेय परिसरातून, घरातून विविध रंगाची फुले, कपडे, ठोकळे, वस्तूंचा संग्रह करून मुलांना गटात बसवून त्यांच्यासमोर ठेवले. प्रत्येकाला एक एक वस्तू उचलायला सांगून व दिलेल्या वस्तूचा रंग ओळखणे बाबत मार्गदर्शन केले. अशा प्रकारे रंगांची ओळख करून दिल्यामुळे प्रत्येक रंग विद्यार्थ्यांच्या चांगल्या प्रकारे स्मरणात राहिला व रंग ओळख झाली. या पद्धतीने आम्ही विद्यार्थ्यांना रंगांची ओळख दृढ करून दिली.

**उपक्रम :- रंगांची ओळख**




**उपक्रम क्र.३ :- जादुई पिटारा**

**वर्ग :- इ.१ ली व २ री**

या उपक्रमाचे उद्दिष्ट मुलांच्या भाव-विश्वातील विविध विषयांवर त्यांनी स्वत:चे विचार व्यक्त करावे हे होते. या उपक्रमासाठी इयत्ता पहिली व इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. इयत्ता पहिलीची मुले खूप लाजरीबुजरी असतात. कारण ते पहिल्यांदाच घर सोडून शाळेत आलेले असतात. त्यामुळे ती व्यक्त होत नाहीत. अशा वेळेस त्यांच्या भाव- विश्वातल्या विषयांना आम्ही जादुई पिटाऱ्यात टाकले. उदाहरणार्थ, जादुई पिटाऱ्यात विविध विषयांच्या, शब्दांच्या चिठ्ठ्या टाकण्यात आल्या.जसे, माझी आई, माझे बाबा, माझी गाय, माझे घर, माझे दुकान, माझी आजी इत्यादी. नंतर विद्यार्थ्यांच्या डोळ्यावर पट्टी बांधून त्यांच्याकडून एक एक चिट्ठी जादुई पिटाऱ्यातून काढण्यात आल्यात. चिठ्ठीत लिहिलेल्या

विषयावर त्यांना बोलायला सांगितले. यात विद्यार्थी आलेल्या चिठ्ठीतील विषयावर मुक्तपणे व्यक्त होऊ लागले व त्यांना आनंद वाटू लागला. अशाप्रकारे मुलांना बोलते केले व सराव करून घेतला असता मुले मुक्तपणे व्यक्त होऊ लागली.




**उपक्रम क्र.४ : खिचडी उपक्रम**

**वर्ग :- इ.1 ली ते ४ थी**

या उपक्रमाचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना मराठी व इंग्रजी शब्द व मजकूर वाचन करता येणे. तसेच मराठीत लिहिलेल्या इंग्रजी शब्दाचे वाचन करता येणे.

या उपक्रमात कचरा तसेच टाकाऊ वस्तूंचा वापर करण्यात आला. यात विद्यार्थ्यांना रॅपर, टूथपेस्टचे खोके, साबणाचा बॉक्स, खोबरेल तेलाची बॉटल यासारख्या वस्तूवरील मजकूर वाचन याचा सराव करून घेण्यात आला. त्यावरील वजन, निर्मितीची तारीख, एक्सपायरी तारीख याविषयी माहिती समजावून त्या वाचनाचा सराव करून घेतला. त्यामुळे आपल्या घर, परिसरातील परिचयाच्या उपलब्ध विविध वस्तूंच्या आवरणावरील वाचन योग्य मजकूर, संदेश, उत्पादन, तारीख, कालबाह्य तारीख, मूल्य, वजन, ग्रॅम, लिटर, मीटर इत्यादीमध्ये समजपूर्वक वाचन येऊ लागली.



**उपक्रम क्र.५ : आम्ही माईकवर बोलतो**

**वर्ग - इ. १ ली ते ४ थी**

या उपक्रमाचे उद्दिष्ट सर्व विद्यार्थ्यांना बोलते करणे, व्यासपीठावर बोलण्याची संधी देणे होय. यासाठी काही खेळ घेण्यात आले. यात बाऊल मध्ये विविध चिठ्ठ्या टाकल्या. मुलांकडे जी चिठ्ठी येईल त्यावर दोन-तीन वाक्य तोडके-मोडके का असेना ते बोलण्यास सांगितले. प्रत्येकाने मांडलेले विचार स्वीकारून त्यांचे कौतुक केले. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊन ते बोलके झाले. विद्यार्थ्यांना परिपाठाच्या वेळी स्वतःचे मत मांडण्याची संधी देण्यात आली. लाजऱ्या-बुजऱ्या मुलांनाही बोलण्याची संधी दिली. माइकवर परिपाठ घेण्याची सवय लागली.






**उपक्रम क्र.६ : झिरो बजेट व शोधातून बोध**

**वर्ग - इ. १ ली ते ४ थी**

या उपक्रमाची उद्दिष्ट विद्यार्थ्यांची इंग्रजी विषयाची भिती घालवणे, गोडी लावणे व आत्मविश्वास वाढविणे होय. विद्यार्थ्यांना घरातील, परिसरातील, दुकानाजवळील, शाळेतील, दैनंदिन उपयोगातील अथवा

टाकाऊ वस्तू गोळा करून त्यावरील मजकूर वाचन करायला सांगण्यात आले. सराव करून घेण्यात आला. यात विद्यार्थ्यांना घरातील, परिसरातील वस्तूंचा शोध घेऊन याविषयीची माहिती तयार करणे. तसेच विद्यार्थ्यांना गोलात /गटात बसून त्यांच्यासमोर साहित्य टाकण्यात आले व प्रत्येकाने एक वस्तू उचलून वस्तूची माहिती तयार करण्यास सांगण्यात आली.




**उपक्रम क्र.७ - आम्ही रानभाज्या खातो**

**वर्ग - इ. १ ली ते ४ थी**

**उद्दिष्ट** - मुलांना रानभाज्याचे महत्व समजणे तसेच विद्यार्थ्यांना पालेभाज्या खाण्याची आवड निर्माण होऊन त्या खाण्याची सवय लागणे. आजच्या आधुनिक युगामध्ये विद्यार्थी जीवनसत्वयुक्त खाद्य खाण्यास विसरलेले आहे. ते जास्तीत जास्त बाहेरील जंक/फास्ट फूड खाऊन आपली भूक भागवतात. आम्ही मुलांना आपल्या परिसरातील भाजी शोधून आणायला सांगायचो. आणि ते शोधून आणायचे. जसे, फांगचा पाला, तांदूळका, चिलची भाजी, अळुची पाने, हादग्याची भाजी, बोकडची भाजी, शेवग्याच्या पानाची व फुलाची भाजी, कच्च्या केळीची व पपईची भाजी, शिंगरीची भाजी, कटुरल्याची भाजी, घोळची भाजी, आघाड्याची भाजी, पिंपळाच्या कोवळ्या पानांची भाजी, कोवळी बांबुची भाजी, शिरीची भाजी, कोवळी वंजारी साबरची भाजी, हरभऱ्याची भाजी, माठल्याची भाजी, किडुची भाजी इ. दररोज मुलांना कोणती रानभाजी खाल्ली? त्यातून कोणते जीवनसत्व मिळाले? याचा सराव करून घेतला. या उपक्रमामुळे मुलांना स्थानिक रानभाज्यांचे महत्व समजले व त्यातून कोणती जीवनसत्व मिळतात? त्याचा आपल्या शरीराला काय फायदा होतो ? याविषयीची माहिती नाटिकेद्वारे देण्यात आली. त्यातून मुलांमध्ये रानभाज्या खाण्याची सवय लागते.यासाठी रानभाज्या महोत्सव, आनंद मेळावे भरवून विविध भाज्यांची ओळख करून देण्यात आली.



**उपक्रम क्र.८ : सुंदर हस्ताक्षर स्पर्धा**

**वर्ग :- इ. १ ली ते ४ थी**

एक एक अक्षर शिकू या.

ज्ञानाचा डोंगर चढू या.

या उपक्रमाचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना अक्षर लेखनाची सवय लावणे. सुरुवातीला दररोज दहा ओळी शुद्धलेखनाची सवय मुलांना लावली. ठराविक कालावधीनंतर त्यावर आधारित स्पर्धा घेण्यात आल्या. प्रथम तीन क्रमांकांना बक्षीस देऊन मुलांचा आत्मविश्वास वाढविला. हा उपक्रम आम्ही अजूनही सुरूच ठेवला आहे. ज्या मुलांची अक्षर खराब होती. त्या मुलांना अक्षरपाटी देऊन दररोज अक्षर गिरवण्याचा सराव करून घेतला. त्यामुळे मुलांची हस्ताक्षरे सुंदर येऊ लागली. मुले उत्साहाने त्यात सहभाग नोंदवत असत व विद्यार्थ्यांमध्ये प्रथम येण्याची चुरस वाढत गेली.



**उपक्रम क्र.९ : सांगा सांगा वाजले किती ?**

**वर्ग - पहिली ते चौथी**

**उद्दिष्ट- विद्यार्थ्यांना घड्याळावर आधारित प्रश्नांची उत्तरे देता येणे व वेळ अचूक सांगता येणे.**

परिपाठाच्या वेळी मुलं उशिरा आल्यास घड्याळ दाखवून वेळ विचारणे. यात मुलांना त्यांची दिनचर्या सुधारण्यासाठी रोज किती वाजता उठतात?, किती वाजता झोपतात?, जेवणाची, अभ्यासाची, खेळण्याची, झोपण्याची वेळ याविषयी चर्चा करून विद्यार्थ्यांना घड्याळ पाहण्याची व वेळ सांगण्याची सवय लागली.



**फलनिष्पत्ती -**

1. **३ दिवसात मुळाक्षरे** - चित्र व प्रत्यक्ष कृतीद्वारे विद्यार्थ्यांना मुळाक्षरांचे ओळख झाली व ते स्वरचिन्हयुक्त शब्दांचे वाचन व लेखन करण्यास शिकले.
2. **रंगांची ओळख** - विविध खेळातून विद्यार्थ्यांना रंगांची ओळख झाली. विद्यार्थी घरातील, शाळेतील, बाजारातील विविध वस्तूंचे, कपड्यांचे, फुलांचे, फळांचे, रंग अचूक ओळखू लागले.
3. **जादुई पिटारा** - अचानकपणे विषय घेतल्यामुळे विद्यार्थ्यांच्या बुद्धीला चालना मिळाली. अनेकदा अबोल असणारी मुलेही बोलू लागली. इतरांचे विचार ऐकण्याची सवय व आपले विचार मुक्तपणे व्यक्त करण्याची संधी मिळाली.
4. **खिचडी उपक्रम** - मुलांना मुक्तपणे बोलण्याची सवय लागली. मराठी/ इंग्रजी मजकूर, संदेश, उत्पादन तारीख, कारवाई तारीख, मूल्य, वजन याचे ते बारकाईने व अभ्यासपूर्वक वाचन करू लागले. मुलांची इंग्रजी विषयाची भीती नाहीसी झाली.
5. **आम्ही माईकवर बोलतो** - विद्यार्थ्यांची भीती कमी झाली व ते माइकवर मुक्तपणे व अभ्यासपूर्ण बोलू लागले.

6. **झिरो बजेट व शोधातून बोध** - हसत-खेळत शिक्षणातून विद्यार्थ्यांची इंग्रजी वाचनाची रुची वाढली.
7. **आम्ही रानभाज्या खातो** - विद्यार्थ्यांना परिसरातील रानभाज्यांची ओळख झाली. भाज्यांचे महत्व त्यांना समजले. रोजच्या आहारात ते सर्व भाज्यांचा समावेश करू लागले. त्यामुळे पालकांनाही आनंद वाटला.
8. **सुंदर हस्ताक्षर स्पर्धा** - स्पर्धेविषयी चुरस निर्माण झाली,बक्षीस वितरणामुळे प्रेरणा मिळाली, विद्यार्थी सुंदर हस्ताक्षरात लिहू लागली.
9. **सांगा सांगा वाजले किती?** - विद्यार्थ्यांना घडाळ्यातील आकडेमोड कळाली. विद्यार्थ्यांमध्ये सर्व बाबीत वक्तशीरपणा निर्माण झाला. विद्यार्थी झोपण्याची, उठण्याची, खाण्याची, खेळण्याची, अभ्यासाची यासारख्या विविध वेळा निश्चित करून सांगू लागले.

**समारोप** -

आमच्या शाळेने 'आनंददायी शिक्षणासाठी' या उपक्रमासाठी विविध नाटीका व कार्यक्रम आयोजित करून विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पाल्यांच्या गरजा, आवडीनिवडी बाबत माहिती पोहचवून विद्यार्थ्यांसाठी शिक्षण आनंददायी करण्याचा प्रयत्न करत आहोत .

----------**----------

# "प्रबोधन पालकांचे - ध्येय विद्यार्थी विकासाचे"

**शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, सिदूर, पं.स.चंद्रपूर, जि.चंद्रपूर**

**शाळेचा ईमेल आयडी** - zpupschoolsidur@gmail.com

**मुख्याध्यापकाचे नाव** - श्रीम.सुलोचना शिवराम माहूरकर

**मोबाईल क्रमांक** - 9284571467

**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - ssmahurkar345@gmail.com

**प्रास्ताविक -**

पालकांचा आनंद ज्यात असतो त्यात पाल्यांचा आनंद असेलच असे नाही.मुलांचे आयुष्य आणखी काही वेगळे असते. त्यांना वेगवेगळ्या आनंदाच्या वाटा हव्या असतात,कोणाला गायचे असते, कोणाला वाद्य वाजवायचे असते,कोणाला कवी व्हायचे असते कोणाला लेखक व्हायचे असते,कोणाला क्रीडा क्षेत्रात जायचे असते.खरतर प्रत्येक आवडीच्या क्षेत्रात विद्यार्थ्यांना यश मिळविता येते.पैसा हा त्याच्या आयुष्याला हवा तितका मिळविता येणे महत्वाचे नाही तर त्यापलीकडेही आनंद मिळणे महत्वाचे असते. पैसा कितीही मिळविला तरी आनंद मात्र कितीही पैसा ओतला तरी मिळविता येत नाही. त्यामुळे जीवनाचे यश पैशात न मोजता आनंदात,शिक्षणात मोजायला शिकल्याशिवाय आपण आपल्या पाल्यांना आनंददायी शैक्षणिक प्रगतीकडे नेऊ शकत नाही.

काळ्या सोन्यासाठी प्रसिद्ध जिल्हा म्हटल कि चंद्रपूर हे नाव समोर येत आणि या चंद्रपूर शहराच्या अगदी 8 किलोमिटर वर सिदूर हे छोटस खेड गाव.गावातील जवळपास लोकांचा व्यवसाय म्हणजे शेती आणि सोबतच जवळच कारखाने जास्त प्रमाणात असल्यामुळे कामगारांची संख्या पण जास्त गावात शाळा परंतु चंद्रपूर शहर जवळ असल्यामुळे शाळेत विद्यार्थ्यांची संख्या कमीच आणि शाळेमध्ये पालकांचा सहभाग फार कमी.

मी बऱ्याच आदर्श शिक्षकांचे अनुभव ऐकले होते की,जिथपर्यंत पालकांना शाळेविषयी ओढ, आपुलकी निर्माण होत नाही तिथपर्यंत शाळेमध्ये पाहिजे त्या प्रमाणात बदल घडवून आणू शकणार नाही. शाळेच्या संरक्षण भिंतीला लागून उकिरडा होता.शाळेविषयी गावातील लोकांना असलेली अनास्था, विद्यार्थ्यांची कमी गुणवत्ता बघून होत होते. मुख्य उद्देश शाळा गुणवत्ता पूर्ण बनविणे,त्यासाठी गावकऱ्यांचा सहभाग,सहकार्य आवश्यक होते,हळूहळू कामाला सुरुवात केली. शाळा ही गावाचा आरसा आहे. हे वाक्य लोकांना वेगवेगळ्या माध्यमातून लोकांना वारंवार पटवून देण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी पालक सभा लावली परंतु पालक सभेला अत्यल्प प्रतिसाद मिळायचा पण खचून न जाता शाळेतील सर्वच म्हणजे तिन्ही शिक्षकांनी ध्येय गाठायचे म्हणजे गाठायचेच हा चंग बांधला होता.प्रथम मी स्वतः नकलेच्या, पथ नाट्याच्या माध्यमातून प्रबोधन केले. वर्ग एक ते आठ चे विद्यार्थी बोलकी अभ्यासू आणि स्वयंअध्ययन करून आपली स्तर निश्चिती करण्यापर्यंतची मजल गाठलेली आहेत उपक्रमशील शिक्षकांमुळे शाळा विकास चांगल्या पद्धतीने घडून आला आहे. अशी प्रतिक्रिया गावातून अधिकारी यांचे भेटीदरम्यान प्रतिक्रियेतून ऐकायला मिळते.

**मुख्याध्यापक शिक्षक यांनी विषयासंदर्भात अधिक प्रभावी केलेले काम -**

आमची खंत अशी होती की, गावातील, शाळेतील विद्यार्थ्यांचे एक दोन पालक वगळता शाळेत येऊन मुलाच्या अभ्यासाविषयी, शाळेविषयी आत्मीयतेने कोणीही विचारट नव्हते, विद्यार्थ्यांची गुणवत्ता पाहिजे त्या प्रमाणात नव्हती. शाळेचा विकास, विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी जे उपक्रम राबवायचे आहे ते उपक्रम यशस्वी करण्यासाठी पालकांच्या मनात शाळेविषयी ओढ निर्माण करणे गरजेचे होते. बहुतांश पालक हे मजूर, शेतकरी असल्यामुळे आपल्या पाल्यांना वेळ देऊ शकत नव्हते.त्यामुळे पालक आपल्या पाल्यांना पुरेसा वेळ देतांना दिसत नव्हते.शिवाय शाळा हा गावाचा आरसा आहे हे पालकांच्या समोर पटवून देणे गरजेचे होते.प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या काही अध्ययन समस्या आणि उणीवा दिसून आल्या त्यावर प्रभावी उपाययोजना करून विद्यार्थी प्रभुत्व संपादन करण्यास विशेष प्रयत्न करणे गरजेचे होते, याशिवाय विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण याच प्राथमिक स्तरावर करणे आवश्यक वाटत होते. सोबतच शाळेतील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्याकरिता पोषक वातावरण निर्माण करणे ही गरजेचे होते.

प्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांच्या अध्ययनाबरोबर नवविचार करण्याची प्रवृत्ती, आत्मविश्वास, स्वावलंबन, सुसंस्कार रुजणे महत्वाचे असते. या सर्व गोष्टी त्यांना सांगितल्याने फक्त समजत नाही तर रोजच्या कृतीतून ते घडणे महत्वाचे असते.सोबतच विद्यार्थ्यामध्ये असणारे सुप्त गुण शोधण्यासाठी नाविन्य पूर्ण खेळ, उपक्रम राबविणे गरजेचे होते.त्यातून विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून देणे प्रथम पालकांचे प्रबोधन करून शाळेविषयी आत्मीयता, शिक्षणाचे महत्व पटवून देणे गरजेचे होते. आपल्या पाल्यासाठी आपल्याला काय काय करता येईल आणि हे केल्यानंतर त्याचा फायदा कशाप्रकारे होईल हे पटवून देण्यासाठी पालकांचे प्रबोधन करणे महत्वाचे होते त्यासाठी हा उपक्रम हाती घेतला.


**उपक्रमाचे वेगळेपण -**

विविध उपक्रमाची सांगड घालून अध्यापन केले त्यामुळे आनंददायी व प्रत्यक्ष कृतीतून अध्ययन विद्यार्थ्यांना करायला मिळाले.हा उपक्रम फक्त विशिष्ट विषयापुरता मर्यादित न ठेवता सर्व विषय व क्षेत्रासाठी लाभदायक ठरणारा नवोपक्रम आहे.थेट पालकांशी संपर्क साधून विद्यार्थ्यांच्या प्रगतीच्या आलेखाचे निरीक्षण करून वेळेवरच उणीवा दूर करणे हे या उपक्रमाचे वेगळे पण होते.म्हणजेच हा उपक्रम फक्त विद्यार्थी-शिक्षका पुरता मर्यादित न राहता विद्यार्थी -शिक्षक-पालक-समाज या मध्ये सुलभ आंतरक्रिया होऊन समन्वय साधणारा उपक्रम आहे.

**मुख्याध्यापक/शिक्षक यांनी प्रभावी कामासाठी केलेली अमलबजावणी -**

**नक्कल,पथनाट्य ,प्रवचन या सारख्या कार्यक्रमाचे आयोजन -**

शाळेतील विद्यार्थ्यांचे काही पालक हे व्यसनाधीन झालेले होते त्यांचे जोपर्यंत प्रबोधन होत नाही तोपर्यंत विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढणार नाही. हे लक्षात घेऊन पालकांना एकत्र करून प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला.यामुळे पालकांमध्ये जनजागृती झाली आणि गुणवत्ता विकासाचे ध्येय पूर्ण झाले.




**दरमहा पालक सभेचे आयोजन करून शिक्षक-पालक-विद्यार्थी आंतरक्रिया अधिक मजबूत केली -**

दरमहा पालकांची सभा आयोजित करून शाळेविषयीचे प्रेम,आपुलकी कशी निर्माण होईल या दृष्टीने प्रयत्न केले.विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा आलेख पालकांपुढे ठेवून त्यावर प्रगतीच्या बाबतीत चर्चा घडवून आणली हळूहळू या माध्यमातून शाळा सुधार फंड 6 लाख गोळा करून शाळेच्या भौतिक सुविधा पूर्ण केल्या.




**Student self attendance and changeable calendar -**

इयत्ता १ ली ते ३ री पर्यंत विद्यार्थी स्वतः आपली हजेरी मनोरंजक पद्धतीने कार्ड शिटवर दररोज भरतात जो विद्यार्थी गैरहजर आहे त्या विद्यार्थ्यांची हजेरी वर्गनायक भरत असतो.सोबतच changeable calendar बनविले आहे. दररोज विद्यार्थी उपस्थित असणारा वार, दिनांक, महिना, ऋतू यांची नोंद करण्यात येते .या उपक्रमामुळे इयत्ता १ ली २ री च्या विद्यार्थ्यांना इंग्रजी महिन्यांचे स्पेलिंग पाठांतर झाले आणि तारखेच्या संख्यामुळे विद्यार्थ्यांना दश कोटी पर्यंतच्या संख्यांचे ज्ञान प्राप्त झाले आहे.







**समान हेअर कट -**

आमच्या शाळेमध्ये सर्व मुलांची समान हेअर कट करण्यात येते आणि मुलीं विशिष्ट हेअर स्टाइल करतात. मुलांची समान हेअर कट करण्याचा ठराव पालक सभेमध्ये घेण्यात आला.त्यामागचा उद्देश पालकांना समजावून सांगण्यात आला.शालेय गणवेशात समान हेअर कटमुळे सर्व विद्यार्थी आकर्षक दिसतात पण त्यांच्यामध्ये एक शिस्त निर्माण झाली.भारतीय सैनिका प्रमाणे त्यांनी स्वतः ला शिस्त लावून घेतलेली आहे. परिसरात कुठेही साधा कागदाचा तुकडा मिळणार नाही.याचा परिणाम गुणवत्तेवर झाला त्यांच्यामध्ये एकाग्रता निर्माण झाली.


लोकमत

आय विटनेस स्टाइल नाही ही तर शिस्त...


विद्यार्थ्यांमध्ये शिस्त महत्त्वाची असते. या शिस्तीतूनच विद्यार्थी घडतात. शिस्त नसेल तर भरकटण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळेच शाळांमध्ये शिस्तीला अधिक महत्त्व दिले जाते. चंद्रपूर येथून जवळच असलेल्या जिल्हा परिषद शाळा, सिंदूर येथील शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये शिस्त यावी, यासाठी त्यांची हेअर स्टाइल एकसमान करुन दिली. याला पालकांनीही सहमती दिली.


Hello Chandrapur
Page No. 3 Feb 27, 2024
Powered by: erelego.com



**विज्ञान कोडे –**

विज्ञान कोडे हा उपक्रम नेहमी सारखाच आहे परंतु आकर्षक आणि मनोरंजक पद्धतीने तो घेतला जातो.दररोज परीपाठामध्ये एक विज्ञान कोडे विचारले जाते जो या विज्ञान कोड्याचे उत्तर देईल त्याला एका शास्त्रज्ञाचे नाव दिले जाते आणि दिवसभर त्याला त्याचे नाव न घेता त्या शास्त्रज्ञाच्या नावाने आवाज दिला जातो.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यामध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण झाला आहे.इयत्ता दुसरी चे विद्यार्थी सुद्धा किमान दहा वीस शास्त्रज्ञांची नावे सांगून त्यांचे शोध सांगतात.







**आमचे दुकान -**

आमच्या शाळेत विद्यार्थ्यांना लागणारे शालेय साहित्य शाळेमध्ये एका कपाटामध्ये आणून ठेवून ज्या विद्यार्थ्यांना जी वस्तू (उदा.वही,पेन,पेन्शील,खोडरबर )लागेल ती वस्तू त्या दुकानातून विकत घेतात. त्याचा सर्व व्यवहार विद्यार्थीच बघतात,साहित्य संपल्यानंतर पुन्हा विकत आणले जाते.

**अध्ययन निष्पत्ती –**


मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग व्यवहारामध्ये करतात.




**सुंदर माझे हस्ताक्षर -**

शाळेतील विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर सुवाच्च आणि वळणदार व्हावे यासाठी 45 दिवस चालणारा सुलेखन अभ्यास वर्ग घेण्यात आला.यासाठी आमच्या शाळेतील अक्षरमित्र श्री.संभाशिव गावंडे सरांनी हा उपक्रम घेतला .या उपक्रमामध्ये अक्षराच्या आकारानुसार विशिष्ट गट बनवून त्या गटातील अक्षराचा समावेश असणारे शब्दगट,उतारे तयार करून विद्यार्थ्यांकडून स्मार्ट सुलेखन वही मध्ये लिहण्याचा सराव घेण्यात आला.यामुळे आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांचे अक्षरामध्ये सुधार घडून आला.

**अध्ययन निष्पत्ती - चिन्हाकित लेखनाच्या पुढे जाऊन विद्यार्थी स्वतःच्या पद्धतीने लेखन करतात.**


घास घर वानर गुलाब कुसंग घसघस
घार छगन छप्पन छोकरा मेघना
वशी बगळा पेरू शर्थी घिरकी कलाकार
किरकिर किलबिल छोकरा छमछम छान
छाप छापा छनछन थमक उपा उपकार
राखी मेघना वाघ बिघारी मालक धारण
बिमारी धोकला चिकामा माघारी मरमर
काळ सकाळ वाळाराम पाकळी सापळा
घेरा केरा पुरक पासून नीळ रीघ कीस
रेघ केळघर सळसळ माळकरी वीळ
पानमळा पालघर पितळ कीस रुमाल
घर धन धबधबा धरा धाव धावाधाव
यमुना यम यश यमक फुले फुलसिंग
फुलवणे रोव शेण



अ आ इ ई उ ऊ ए ऐ ओ औ
मा मा मा मा मा मा मा मा मा मा
मि मि मि मि मि मि मि मि मि मि
मी मी मी मी मी मी मी मी मी मी
मु मु मु मु मु मु मु मु मु मु
मू मू मू मू मू मू मू मू मू मू
मे मे मे मे मे मे मे मे मे मे
मै मै मै मै मै मै मै मै मै मै
मो मो मो मो मो मो मो मो मो मो
मौ मौ मौ मौ मौ मौ मौ मौ मौ मौ
मं मं मं मं मं मं मं मं मं मं
मॅ मॉ मॅ मॉ मॅ मॉ मॅ मॉ मॅ मॉ
गृ गृ गृ गृ ७
मृ मृ मृ मृ मृ मृ मृ मृ मृ मृ
म्म म्म म्म म्म म्म म्म म्म म्म म्म
र्म र्म र्म र्म र्म म्म म्म र्म र्म


आल्फ्रेड नोबेल

आल्फ्रेड नोबेल यांचा जन्म २१ ऑक्टोबर 1833 रोजी स्वीडनमधील स्टॉकहोम येथे झाला ते रसायनशास्त्रज्ञ, इंजिनिअर आणि उत्पादक होते. त्यांची आई कॅरोलिना आणि वडिल इमॅन्युएल हे देखील संशोधक आणि अभियंता होते. वेगवेगळ्या देशात त्यांच्या नावाने सुमारे 355 पेटंटस् आहेत. नोबेल पुरस्काराचे जनक म्हणून ओळखले जाणारे आल्फ्रेड नोबेल. लहानपणी आल्फ्रेड खलल आजारी पडत असल्याने त्यांचे आल्फ्रेडवर अतिशय प्रेम होते. लहानपणापासूनच अतिशय हुशार, चिकित्सक वृत्ती. त्यांचा मृत्यू 10 डिसेंबर 1896 रोजी सॅनरेमो येथे त्यांना हृदयाविकारामुळे त्यांचा मृत्यू झाला.

**ज्ञानपुष्प -**

दररोज परिपाठामध्ये पाच सामान्य ज्ञानावर प्रश्न विचारले जातात आणि हे पाच प्रश्न इयत्ता दुसरी पासून आपल्या स्वतंत्र वहीमध्ये लिहून घेतात आणि डिसेंबर महिन्यामध्ये यावर आधारित परीक्षा आयोजित करून गुणानुक्रमे आलेल्या पाच विद्यार्थ्यांना सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात येतो आणि सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरीत करण्यात येते.याचा फायदा विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षामध्ये होत आहे.




**गव्हांकुर -**

आमच्या शाळेतील काही विद्यार्थ्यांना पोट दुखण्याची समस्या होती.यावर उपाय म्हणून आर्युवेदिक वैद्याच्या सल्ल्याने गव्हांकुर हा उपक्रम सुरु केला.ज्या पद्धतीने गौरी लावली जाते त्या पद्धतीने वेगवेगळ्या टोकरीमध्ये शाळेमध्ये तयार केलेले गांडूळ खत,माती यावर गहू टाकून ते आठ ते दहा दिवसांनी रोप तयार झाल्यानंतर प्रत्येक शनिवारी मिक्सर मध्ये त्या गव्हाच्या रोपाचा अर्धा कप रस आजारी विद्यार्थ्यांना दिला गेला .यामुळे विद्यार्थ्यांचे आजारपण कमी झाल्याचे दिसून आले.



**गांडूळ खत निर्मिती -**

शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणावर वाढला असून तो कर्जबाजारी होत आहे. वर्षानुवर्षे एकाच जमिनीत एकाच पिकाची लागवड केली जाते.दिवसेंदिवस शेतजमिनीचे प्रमाण कमी होत आहे परंतु अन्नधान्याची गरज मात्र मोठ्या प्रमाणात वाढतच आहे.ही गरज भागविण्यासाठी जमिनीचा अधिकाधिक वापर करावा लागणार आहे. त्यासाठी जमीन दीर्घकाळ जिवंत, सुपीक ठेवणे ही आपली नैतिक जिम्मेदारी आहे. हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवून गांडूळ खत प्रकल्प हाती घेतला. आमच्या विद्यार्थ्यांच्या पालकांना हा प्रकल्प दाखवून त्याचे महत्व पटवून देण्यात आले आणि तयार झालेले गांडूळ खत शाळेतील परसबाग, झाडे यांना होऊ लागला.





**आम्ही होणार तंत्रस्नेही -**

आमच्या शाळेमध्ये आम्ही पालकांच्या मदतीने सोबतच पालकांसोबत विविध व्यावसायिक, समाजसेवक यांना भेटी देऊन त्यांच्याकडून शाळेसाठी एक स्वतंत्र संगणक कक्ष तयार करण्यात आला. या संगणक कक्षात wi-fi ची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. शिष्यवृत्ती फार्म online स्वतः विद्यार्थी भरतात. घटकातील एखादा घटक विस्तृतपणे समजून घेण्यासाठी या संगणक कक्षाचा वापर विद्यार्थी करतात.




**फलनिष्पत्ती -**

या उपक्रमाच्या सुरुवातीला घेतलेली चाचणी आणि शेवटी घेतलेल्या चाचणीवरुन लक्षात येइल की, उपक्रम किती प्रमाणात यशस्वी झालेला आहे. पालकांना असलेल्या व्यसनापासून दूर जाऊन आपल्या पाल्यांची, शाळेची गुणवत्ता कशी वाढेल याकडे पालक प्रामुख्याने लक्ष देऊ लागले. शाळेचे पहिले रूप, शाळेच्या भौतिक सुविधा, यामध्ये सुधारणा झाली.जिल्ह्यातील सहाशेच्या वर शिक्षकांनी भेटी दिल्या. भेट झाल्यानंतरच्या प्रतिक्रियेतून आपल्या लक्षात येईल की उपक्रमाची यशस्विता किती आहे,विद्यार्थ्यांची उपस्थिती १०० % झाली.

पालकांचा शाळेविषयी ओढा अधिक तीव्र झाला. त्यामुळे शाळा-पालक-शिक्षक-विद्यार्थी यांच्यात योग्य आंतरक्रिया होण्यास सुरुवात होऊन शाळेच्या भौतिक सुविधेसोबत विद्यार्थ्यांचा गुणात्मक विकास झाला.गुगल लेन्स चा वापर करून पुस्तकातील इंग्रजी विषयाचा उतारा मराठी मध्ये भाषाबदल करू लागले.पालकांप्रती विद्यार्थ्यांची जी भीती होती ती भीती दूर झाली त्यामुळे मुले घरी सुद्धा घरकामात मदत करू लागली.स्पर्धा परीक्षेची आवड विद्यार्थ्यात निर्माण झाली. मुलांचे मराठी, इंग्रजी वाचन योग्य गती, आरोह-अवरोह चा वापर करून आत्मविश्वासाने वाचन करू लागली.

आमची शाळा विविध वर्तमानपत्र ,you tube वर झळकू लागली.

**समारोप -**

माझ्या शाळेची सुरुवातीची परिस्थिती बघून काहीतरी नाविन्यपूर्ण उपक्रम केल्याशिवाय आपली शाळा आकर्षक,गुणवत्ता पूर्ण शाळा होणार नाही ही भावना मनात आली होती.त्यात यश आले हे बघून अत्यंत आनंद होत आहे. विद्यार्थ्यामध्ये धीटपणा निर्माण व्हावा एखादी शैक्षणिक समस्या निर्माण झाल्यावर विद्यार्थ्यांनीच ती सोडवावी यासाठी विद्यार्थी तयार झाले याचा आनंद होत आहे.जवळपास सर्वच पालकांना शाळेविषयी आवड निर्माण झाली आहे.शाळेतील विद्यार्थ्यांना नियमितपणे अभ्यास करण्याची सवय लागलेली आहे.शाळेतील विद्यार्थ्यांचे मिळणारे यश यामुळे परिसरात नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यात शाळेचे नाव झालेलं आहे.

**Video link** -

https://youtu.be/4BwJK-0M4ac?si=X0dPmaOj4MGjrgyB

https://youtu.be/zy2b5fOjXgI?si=Zd229uhBjRpr_NFo

https://youtu.be/vujeaXkyCaA?si=66UXf6iWNOhdL0iU

https://youtu.be/dqzx4TpRNI8?si=hwx7KDAUk4mUBYQT

https://youtu.be/eI8nqFJBvSk?feature=shared

https://youtu.be/dO76c0hZsUE?si=VZzz40uvzxvyE4VL

https://youtu.be/s_X2_I8ogo8?si=n4v-0IYnms3wLj9w

https://youtu.be/PH_eQ5f_Rjk?si=OerpGrbrfeZXFciS

https://youtu.be/9OBjuQYg6Xk?si=ZzBDpMT9IYHWw9vh-

लोकमत

आय विटनेस

## मी इंग्रजी शिकणार, मी मराठी वाचणार



जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा सिदूर येथील शिक्षक अविनाश जुमडे यांनी विद्यार्थ्यांना पाटी, पेन्सिल, नोट पॅड, 'मी इंग्रजी शिकणारच', 'मी मराठी वाचणारच' पुस्तके भेट दिली. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुनील माशिरकर, ग्रामपंचायत सदस्य नमिता उलमाले, शाळा समिती सदस्य रामदास कांबळे, मुख्याध्यापक सुलोचना माहूरकर, राजानंद दुधे, अविनाश जुमडे, कांचन जुमडे, स्पंदन जुमडे, अर्चिष्मती जुमडे, प्रीती मोडक आदी उपस्थित होते. पुस्तक मिळाल्याने मी इंग्रजी शिकणारच, मी मराठीही वाचणार म्हणून विद्यार्थ्यांनी एकच जल्लोष केला.

Hello Chandrapur
Page No. 4 Aug 30, 2023
Powered by: erelego.com







लोकमत

# सिदूर शाळेने केले दोनशे वृक्षांचे रोपण

लोकमत न्यूज नेटवर्क

चंद्रपूर : येथून जवळच असलेल्या सिदूर येथील जिल्हा परिषद शाळेने पर्यावरण संवर्धनासाठी शाळेच्या परिसरात तब्बल दोनशे वृक्षांचे रोपण केले. शिक्षक सहकार संघटनेचे जिल्हाध्यक्ष अविनाश जुमडे यांच्या संकल्पनेतून आयोजित या वृक्षारोपण कार्यक्रमाला सुलोचना माहूरकर, राजानंद दुधे, अविनाश जुमडे, शाळा व्यवस्थापन समिती व गावकऱ्यांच्या सहकार्याने तब्बल दोनशे निलगिरी झाडांचे वृक्षारोपण केले. शाळेच्या बाजूला असलेल्या मैदानाच्या सभोवताल निलगिरी झाडांचे चार फूट अंतरावर वृक्षारोपण करण्यात आले.



वृक्षारोपण करताना विद्यार्थी तथा ग्रामस्थ.

Hello Chandrapur
Page No. 4 Sep 15, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

आय विटनेस

## चिमूकल्यांनी तयार केले आकाशकंदील



विद्यार्थ्यांच्या अंगी विविध कलागुण असतात. त्या गुणांना आकार देण्याचे काम शिक्षकांकडून केले जाते. जसा आकार शिक्षक देतील, तसे विद्यार्थी घडतात. असाच प्रयत्न चंद्रपूर पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या जिल्हा परिषद शाळा सिदूर येथील शिक्षकांनी केला. दिवाळीनिमीत्त विद्यार्थ्यांकडून आकाश कंदील करुन विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या गुणांना वाव देण्यात आला.

Hello Chandrapur
Page No. 4 Nov 09, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

पॉलि-क्लिनिक

## 'एकच लक्ष, मताचा हक्क'



'मतदार राजा जागा हो, विकासाचा धागा हो', 'लोकशाही बळकटीकरणासाठी सर्वांचा सहभाग', 'एकच लक्ष, मताचा हक्क' अशा घोषणा देत बुधवारी सिदूर येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापिका सुलोचना माहूरकर, शिक्षक अविनाश जुमडे, राजानंद दुधे, संभाशिव गावंडे यांच्या मार्गदर्शनात गावातून मतदार जनजागृती फेरी काढली.

Hello Chandrapur
Page No. 3 Apr 04, 2024
Powered by: erelego.com

लोकमत

# विज्ञान प्रदर्शनीमध्ये सिदूर जि.प. शाळा प्रथम



गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानित करताना मान्यवर.

लोकमत न्यूज नेटवर्क

चंद्रपूर : येथील रफी अहमद किडवाई हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज चंद्रपूर येथे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या विज्ञान प्रदर्शनीमध्ये इयत्ता सहावी ते आठवी या गटात तालुक्यातील सर्वच माध्यमाच्या जिल्हा परिषद व खासगी शाळांनी सहभाग नोंदवला होता. यामध्ये मारडा मोठा केंद्रातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा सिदूर या शाळेतील कृतुजा कांबळे या विद्यार्थिनीच्या प्रतिकृतीस प्रथम क्रमांक मिळाला.

या विद्यार्थिनीला विषय शिक्षक राजानंद दुधे यांचे मार्गदर्शन लाभले. सोबतच मुख्याध्यापक उमेश कुकुटकर, अविनाश जुमडे, लीना आवळे, सुधांशू बंडीवार यांचे तिला सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

काही दिवसापूर्वी इन्स्पायर अवॉर्डसमध्ये या शाळेच्या प्रतिकृतीची निवड राज्य स्तरावर झाली. त्यानंतर आता पुन्हा विज्ञान प्रदर्शनामध्ये शाळेने तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे.

या यशासाठी मार्गदर्शक शिक्षक, मुख्याध्यापक व पालक, गटशिक्षणाधिकारी निवास कांबळे, विस्तार अधिकारी धनराज आवारी, केंद्रप्रमुख मारोतराव रायपुरे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सर्व सदस्य आणि गावकऱ्यांनी कौतुक केले आहे.

# City Pulse

## सिदूर शाळेत विविध उपक्रम राबवून राष्ट्रीय गणित दिवस उत्साहात



चंद्रपूर: श्रीनिवास रामानुजन यांचा २२ डिसेंबर हा जन्मदिवस राष्ट्रीय गणित दिवस म्हणून साजरा केला जातो. विद्यार्थ्यांमध्ये गणितीय दृष्टिकोन निर्माण व्हावा, विद्यार्थ्यांच्या सर्जनशिलतेला वाव मिळावा, विद्यार्थ्यांमध्ये गणिताविषयी गोडी निर्माण व्हावी, यासाठी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, सिदूर येथे रांगोळी स्पर्धा, गणितातील विविध क्रियांच्या प्रात्यक्षिकांचे सादरीकरण करण्यात आले. रांगोळी स्पर्धेमध्ये इयत्ता दुसरी ते इयत्ता आठवीपर्यंत विद्यार्थी सहभागी झाले होते. माध्यमिक गटाच्या रांगोळीचे निरीक्षण मुख्याध्यापक उमेश कुकुटकर, विषय शिक्षिका लीना आवळे यांनी केले. तर प्राथमिक गटाचे निरीक्षण विषय शिक्षक राजानंद दुधे, सहाय्यक शिक्षक अविनाश जुमडे, सुधांशू बंडीवार यांनी केले. प्राथमिक गटातून प्रथम क्रमांक वैष्णवी शेलवटे, द्वितीय क्रमांक रोहित देवतळे, माध्यमिक गटात समृद्धी मत्ते, द्वितीय क्रमांक वृतुजा कांबळे यांनी पटकावला. सोबतच इयत्ता तिसरी, चौथीच्या विद्यार्थ्यांनी गणितातील विविध क्रियांचे प्रात्यक्षिकांचे शैक्षणिक साहित्याचे सादरीकरण केले. या सर्व उपक्रमांमध्ये शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

# एनएमएमएस परीक्षेत पाच विद्यार्थ्यांचे सुयश



चंद्रपूर, ब्युरो. विद्यार्थ्यांचे उच्च माध्यमिक स्तरापर्यंतचे शिक्षण घेण्यास मदत व्हावी, आर्थिक दुर्बलतेमुळे प्रज्ञावान विद्यार्थ्यांची उच्च माध्यमिक स्तरापर्यंत होणारी गळती रोखावी, हे एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षा या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. या परीक्षेत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा सिदूर येथील इयत्ता आठवीतील चार विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले आहे.

यात श्रुती पाटील, खुशबू देवतळे, सोनिया नगराळे, रिदिमा अल्लीवार हे चार विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यातही दोन विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले. त्यापैकी श्रुती पाटील हिने 103 गुण मिळवत खुल्या प्रवर्गातून जिल्ह्यातून 49 वा क्रमांक मिळवला तर खुशबू देवतळे हिने 98 गुण घेत जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळवला. या दोन विद्यार्थिनींना बाराव्या वर्गापर्यंत शिष्यवृत्ती मिळणार आहे. या विद्यार्थ्यांच्या यशामध्ये वर्गशिक्षक राजानंद दुधे, मुख्याध्यापक सुलोचना माहुरकर, अविनाश जुमडे, संभाशिव गावंडे यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल विस्तार अधिकारी गीता चौधरी, केंद्रप्रमुख अतुल पोहाणे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य, गावकऱ्यांनी कौतुक केले.

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

लोकमत

आय विटनेस

## तोच देश होईल महान, ज्या देशात १०० टक्के मतदान




विधानसभा निवडणूक २० नोव्हेंबरला आहे, अधिकाधिक मतदान व्हावे यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहे. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, सिदूर येथील शिक्षक अविनाश जुमडे तसेच विद्यार्थ्यांनी जनजागृती केली. ज्या देशात १०० टक्के मतदान, तो देश महान, असे फलक विद्यार्थ्यांनी हातात घेत जनजागृती केली.

Hello Chandrapur
Page No. 3 Nov 17, 2024
Powered by: erelego.com



## जिल्हा परिषद शाळा, सिदूर

**चंद्रपूर :** येथून जवळच असलेल्या जिल्हा परिषद शाळा सिदूर येथे संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी गावातून मिरवणूक काढली. दरम्यान, संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. यावेळी शिक्षक अविनाश जुमडे यांच्यासह शाळेतील अन्य शिक्षक तसेच ग्रामस्थांची उपस्थिती होती.

लोकमत

# वृद्धाश्रमात भेटीदरम्यान विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत आले अश्रू

### सिदूर जिल्हा परिषद शाळेचा उपक्रम : जाणून घेतली वृद्धाश्रमातील माहिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**चंद्रपूर :** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा सिदूर येथील स्काऊट गाईड व कब बुलबूल युनिटच्या विद्यार्थ्यांनी डेबू सावली वृद्धाश्रम देवाळा येथे भेट दिली. यावेळी येथील आजी-आजोबांसोबत हितगूज करून माहिती जाणून घेतली. वृद्धाश्रमातील आजी-आजोबांनी सांगितलेल्या जीवनातील काही गोष्टीनंतर उपस्थित काही विद्यार्थ्यांची डोळ्यांत अश्रू आले.



वृद्धाश्रमातील आजी-आजोबांसह सिदूर शाळेतील विद्याथ

वृद्धाश्रमातील एक आजीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. घरातील आई-वडील, आजी-आजोबा यांची तुम्ही सेवा करा, त्यांचा आदर करा. तुम्हीच आमचे नातवंडे, तुम्हीच आमचा परिवार, अशा भावना येथील आजी-आजोबांनी व्यक्त केल्या. वृद्धाश्रमाचे अध्यक्ष सुभाष शिंदे यांचे स्काऊट गाईड सॅल्यूट देऊन अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी या परिसरात वृक्षारोपण केले.

वृद्धाश्रमात विद्यार्थ्यांकडून विचारले गेलेले प्रश्न नक्कीच विचार करायला लावणारे होते. वृद्धाश्रमातील चर्चा अनुभव हे ऐकत असताना काही विद्यार्थ्यांना अश्रू अनावर झाले. याप्रसंगी स्काऊट गाईड लीडर अविनाश जुमडे, मुख्याध्यापक सुलोचना माहूरकर, राजानंद दुधे, संभाशिव गावंडे व विद्यार्थी उपस्थित होते.

लोकमत

पॉलि-क्लिक

## स्काऊट, गाइडची मतदानासाठी रॅली...



विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. यासाठी राजकीय पक्षांनी, तसेच प्रशासनाने तयारी सुरु केली आहे. दरम्यान, मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी जनजागृती केली जात आहे. या अंतर्गत जिल्हा परिषद शाळा सिदूर येथील स्काऊट आणि गाइडच्या विद्यार्थ्यांनी गावात गावातून रॅली काढली. दरम्यान, मतदारांची स्वाक्षरी अभियानही राबविले. यावेळी शिक्षक अविनाश जुमडे, राजानंद दुधे यांची उपस्थिती होती.

----------**----------

# "सुंदर शाळेने लावला मुलांना लळा"

**शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, बोर्डा, केंद्र.बोर्डा, बीट.चिचपल्ली, पंचायत समिती, चंद्रपूर, जि.चंद्रपूर.**

**शाळेचा ईमेल आयडी -** zpschoolborda1949@gmail.com

**मुख्याध्यापकाचे नाव -** श्री.प्रशांत शांताराम काटकर.

**मोबाईल क्रमांक -** 7768828268

**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी -** zpschoolborda1949@gmail.com

**प्रास्ताविक -**

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, बोर्डाची स्थापना सन 1949 मध्ये झाली. शाळेला या वर्षी 75 वर्षे पूर्ण झाले. शाळेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात शाळेत उल्लेखनीय कामगिरी करावी या ध्येयाने शाळेचे मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी निश्चय केला. मागील वर्षी मुख्यमंत्री, माझी शाळा, सुंदर शाळा ही राज्यस्तरीय स्पर्धा सुरू झाली. या स्पर्धेत चांगली कामगिरी करता आली नाही. मागील पाच वर्षापासून शाळेनी शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली होती. सन 2022-23 मध्ये NMMS परीक्षेचा 100% निकाल लागला होता.सन 2023-24 मध्ये ही 6 विद्यार्थी NMMS परीक्षेत उत्तीर्ण झाले.शिष्यवृत्ती परीक्षेतही विद्यार्थी उत्तीर्ण होऊन शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले. यामागे शिक्षकांची मेहनत, उन्हाळ्याच्या सुट्ट्या न घेता सुट्ट्यांमध्येही शिक्षक वर्ग घेत होते.

2024-25 मध्ये शाळेच्या अमृतमहोत्सवी वर्षात शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक, मुख्याध्यापक यांनी शाळा सुंदर व स्वच्छ करण्याचा निर्णय घेतला. त्यामध्ये आमचे विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, गटशिक्षणाधिकारी यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. त्यामुळे आम्हाला त्यांच्याकडून प्रेरणा मिळाली. शाळा व्यवस्थापन समिती भरीव सहकार्य, त्याचप्रमाणे शाळेला सुंदर बनवण्यासाठी आम्ही सर्व मंडळी कामाला लागलो. शाळेचे सौंदर्यीकरण करण्याची सुरुवात 2018 पासून सुरू झाली. शाळेचा परिसर नीटनेटका आणि आकर्षक होताच त्यामुळे रंगरंगोटी, बोलक्या भिंती व गुणवत्तापूर्ण शिक्षण या बाबीवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक होते . या सर्व बाबीसाठी शिक्षक वृंदांना मा.शिक्षण विस्तार अधिकारी, मा. केंद्रप्रमुख यांनी मार्गदर्शन करायला सुरुवात केली. त्यामुळे सन 2024 -2025 मध्ये मुख्यमंत्री, माझी शाळा, सुंदर शाळा या स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक, विभागात तिसरा क्रमांक प्राप्त करुन शाळेनी यश संपादन केले.

**शाळा स्वच्छ आणि सुंदर करताना मुख्याध्यापक/ शिक्षक यांना आलेल्या अडचणी -**

शाळेचे सौंदर्यीकरण करताना सुरूवातीला सहज करू अस वाटलं होतं. पण प्रत्यक्षात जेव्हा कामाला सुरुवात केली. तेव्हा अनेक अडचणी आ वासून समोर उभ्या राहिल्या.

1. सौंदर्यीकरणासाठी पैसा आवश्यक होता.
2.काम करण्यासाठी श्रम करणाऱ्या माणसांची गरज होती.

3.पावसामुळे शालेय प्रांगणात पाणी साचायचे, त्याचे नियोजन करणे.

4. परिसरात बराच कचरा वाढला होता. त्याची विल्हेवाट लावणे.

5.शालेच्या निर्लेखनासाठी आलेल्या इमारती बाबतीत विचार करणे.

6 शाळेत अडगळीत पडलेले निष्कामय साहित्याची विल्हेवाट लावणे.

7. अभ्यासात मागे असलेल्या विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणणे अशा अनेक समस्या समोर होत्या. या सर्व समस्या कशा सोडवायच्या यासाठी शिक्षकवृंद आणि शाळा व्यवस्थापन समिती यांच्या वारंवार बैठका घेऊन तोडगा काढत गेलो. त्यामुळे सर्वांच्या विचारविनिमयातून एक- एक समस्या सुटत गेल्या.

**मुख्याध्यापक व शिक्षक यांनी विषयासंदर्भात अधिक प्रभावी केलेले काम -**

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, बोर्डा येथे 1 ते 8 वर्ग आहेत. 8 वर्गखोल्या आणि प्रशस्त शालेय प्रांगण असल्यामुळे शालेय रंगरंगोटी व परिसर आकर्षक करण्याकरिता निधीची आवश्यकता होती. बोर्डा हे गाव आदिवासीबहुल खेडेगाव आहे. येथील नागरिक शेतकरी, मजूर वर्गातले होते. तसेच शाळेच्या आजूबाजूला कोणतेही कंपन्या किंवा औद्योगिक क्षेत्र नाही अशा वेळेस लोक लोकवर्गणी गोळा करणे अत्यंत कठीण काम होते. सन 2018 -19 मध्ये आर्थिक निधी मिळवण्यासाठी या शाळेतून शिकून गेलेली आणि विविध क्षेत्रात काम करत असलेले माजी विद्यार्थ्यांचा सत्कार व स्नेहसंमेलन आयोजित केले. या कार्यक्रमाकरिता माजी विद्यार्थ्यांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. माजी विद्यार्थ्याकडून 75 हजार रुपये लोकवर्गणी गोळा झाली. या लोकवर्गणीमधून आकर्षक शालेय बाग तयार करण्यात आली.शाळेच्या वर्गखोल्या व शालेय परिसर आकर्षक करण्यासाठी किमान दोन लक्ष रुपयाची आवश्यकता होती. यासाठी आम्ही आमच्या सर्व शिक्षकांची बैठक घेतली. शाळेच्या शिक्षकांनी स्वतःपासून लोकवर्गणी काढण्याचा निर्णय घेतला. त्यामध्ये प्रत्येक शिक्षकांनी दहा हजार रुपये देण्याची तयारी दाखवली. त्यानंतर ही बाब आम्ही शाळा व्यवस्थापन समितीच्या सभेमध्ये निदर्शनात आणली. शाळा व्यवस्थापन समितीने सुद्धा मदत करायचे ठरवले. शाळा व्यवस्थापन समितीच्या मदतीने गावातून लोकवर्गणी गोळा केली. यामध्ये खूप कमी प्रतिसाद मिळाला. त्यानंतर आम्ही चंद्रपूर शहरातील काही दानशूर व्यक्तींना भेटायचं निर्णय घेतला. यामध्ये काही प्रमाणात सहकार्य मिळाले. साधारण एक लक्ष पन्नास हजार रुपयांची निधी गोळा करण्यात यश प्राप्त झाले.

**मुख्याध्यापक व शिक्षक यांनी प्रभावी कामासाठी केलेली अंमलबजावणी -**

शाळा स्वच्छ आणि सुंदर आकर्षक करण्यासाठी नियोजन करण्यात आले. शाळा ही गावाच्या मध्यभागी रोडवर आहे. शाळेला पक्के संरक्षण भिंत आहे. रंगरंगोटीची सुरुवात प्रथम आम्ही संरक्षण भिंतीपासून सुरू केली. भिंतीवर आकर्षक चित्रे काढण्यात आली. गावातील येणारे जाणाऱ्यांना हा बदल दिसू लागला.शाळेत नवीन बदल होत असल्याचे गावातील सामान्य नागरिकांच्या लक्षात येऊ लागले. शाळेला लागूनच असलेल्या माजी विद्यार्थी जे पोलीस विभागात आहेत,त्यांनी शाळेला नवीन लोखंडी प्रवेशद्वार सप्रेम भेट दिले. शाळेचे प्रवेशद्वार अधिकच आकर्षक दिसू लागले. त्यानंतर शाळेतील प्रांगणात असलेल्या वृक्षांवर आकर्षक प्राणी, पक्षी यांची चित्रे काढण्यात आली. शाळेच्या वर्गखोलीच्या बाहेरील

भागास आकर्षक पेंटिंग करण्यात आली.मा.गट विकास अधिकारी, मा.गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख यांनी भेट देऊन परिसर आकर्षक करता येईल याबद्दल मार्गदर्शन केले. शाळेच्या परिसरात नव्याने फुलझाडे लावण्यात आली. शाळेत परसबाग तयार करण्यात आली. त्यामध्ये माध्यान्ह भोजनासाठी लागणारे वांगी, टमाटर, मिरची, पालक, मेथी सारख्या पालेभाज्यांची लागवड करण्यात आली. शाळेची परसबाग तयार करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे खूप मोलाचे सहकार्य लाभले. श्री जगन्नाथ पोटे शिक्षक यांनी शाळेला रोपे भेट दिली. नवीन फुलझाडांनी शाळेचा परिसर अधिकच आकर्षक दिसू लागला. यानंतर महत्त्वाचे काम होते ते वर्गाची रंगरंगोटी करून वर्गखोल्या आकर्षक करणे. त्यासाठी शिक्षकांची सभा घेऊन नियोजन करण्यात आले. शाळेत जमा झालेली लोकवर्गणी संपलेली होती. त्यामुळे पुन्हा शिक्षकांना आपले स्वतःचे वर्ग स्वतः रंगरंगोटी व आकर्षक करण्यासाठी सर्व शिक्षकांनी तयारी दर्शवली. सगळे शिक्षक कामाला लागले. सर्वप्रथम निरंजना पोटे, शिक्षिका यांनी इयत्ता पहिल्या वर्गात शैक्षणिक साहित्याच्या मदतीने वर्गखोली आकर्षक केली. त्यांच्या वर्गाला अधिकाऱ्यांनी भेट देऊन खूपच कौतुक केले. त्यामुळे प्रत्येक शिक्षकांनाही आप-आपल्या वर्गात शैक्षणिक साहित्याचे व्यवस्थापन योग्य रीतीने करून वर्ग आकर्षक केले. त्याचबरोबर वर्गाच्या गुणवत्ता वाढीकडे अधिक लक्ष दिले.

**मुख्याध्यापक व शिक्षक यांनी प्रभावी कामासाठी केलेल्या अंमलबजावणीचे फलनिष्पत्ती -**

शाळा शिक्षक व शाळा व्यवस्थापन समिती यांच्या मदतीने शाळेची इमारत सुंदर स्वच्छ आकर्षक दिसू लागली. गावातील जे लोक शिक्षकांवर टीका करत होते त्या लोकांनी शाळेचे बदललेले सर्व रूप बघून लोकवर्गणी देऊ लागले. हा सर्वात मोठा झालेला सकारात्मक बदल होता. सन 2024 -25 मध्ये मुख्यमंत्री, माझी शाळा, सुंदर शाळा या स्पर्धेमध्ये शाळेनी सक्रिय सहभाग घ्यायचा ठरविले. त्यासाठी प्रत्येक शिक्षकांकडे निकषानुसार नियोजन देण्यात आले. प्रत्येक शिक्षकाने आपली जबाबदारी अतिशय काटेकोरपणे पार पाडली. केंद्रस्तरीय मूल्यमापन पार पडले.आमच्या शाळेने केंद्रातून प्रथम क्रमांक प्राप्त केला. त्यामुळे आमचा थोडा आत्मविश्वास वाढला. तालुक्यातून प्रथम येण्यासाठी पुन्हा शाळा व्यवस्थापन समितीने कंबर कसली. आणखी शाळा आकर्षक व सुंदर होण्यासाठी श्रमदान करू लागले. यासाठी शाळेतून सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांनीही मदतीचा हात दिला. केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी यांनी शाळेला भेट देऊन मार्गदर्शन केले. शाळा तालुका स्तरीय मूल्यमापनासाठी तयार झाली. शाळेतील आकर्षक परिसर व गुणवत्तापूर्ण शिक्षण यामुळे आमची शाळा तालुक्यातून प्रथम क्रमांकावर आली. तालुका प्रथम स्थानावर शाळा आल्यामुळे पुन्हा आमच्या अपेक्षा वाढल्या. श्री.निवास कांबळे,गटशिक्षणाधिकारी यांनी शाळेला भेट देऊन जिल्ह्यात प्रथम क्रमांक प्राप्त करण्यासाठी मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनानुसार काही रंगरंगोटी, नवीन फुलझाडे, वर्गखोल्यात शैक्षणिक साहित्य व रचना बदल करण्यात आली. जिल्हास्तरीय मूल्यमापनासाठी जिल्ह्याच्या टीम मध्ये मा.अश्विनी सोनवणे शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांनी भेट दिली. शाळेतील आकर्षक परिसर व विद्यार्थ्यांची गुणवत्ता बघून आमच्या शिक्षकांचे कौतुक केले. काही दिवसातच शाळा जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त झाल्याबद्दल निरोप आला. विद्यार्थी, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती, गावकरी यांनी गावातून ढोल-ताशावर मिरवणूक काढली. खूप जल्लोष करण्यात आला. शाळा जिल्ह्यात प्रथम आल्यामुळे आमची खूप मोठी जबाबदारी वाढली. मान.शिक्षणाधिकारी

अश्विनी सोनवणे यांनी आमची शाळा विभाग स्तरावर प्रथम येऊ शकते त्यासाठी सर्व शिक्षक, मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समितीने कसे प्रयत्न करायचे याबाबत मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनानुसार पुन्हा जोमाने आम्ही कामाला लागलो. आमच्या प्रयत्नाला यश आले. मुख्यमंत्री, माझी शाळा, सुंदर शाळा या स्पर्धेत शाळेला विभाग स्तरावर तृतीय क्रमांक मिळाला. माननीय मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत मुंबई येथे सत्कार सोहळ्याला उपस्थित राहण्यासाठी निमंत्रण मिळाले आणि आम्ही बक्षीस घेण्यासाठी मुंबईत दाखल झालो.मुख्यमंत्री महोदय, मा.शिक्षण मंत्री यांच्या हस्ते बक्षीस प्राप्त करण्याचे स्वप्न पूर्ण झाले.

**समारोप -**

जि. प. उच्च प्राथमिक शाळा, बोर्डा आज शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती, अधिकारी, गावकरी या सर्वांच्या सहकार्याने,मार्गदर्शनाने संपूर्ण जिल्ह्यात आकर्षणाचे केंद्र बनले आहे. जिल्ह्यातील विविध केंद्रातील शिक्षकांच्या शाळेला भेटी होत आहेत. आता शाळेची सौंदर्यता टिकवणे तेवढेच जिकिरीचे काम असणार आहे. एकंदर सहकार्यातून अशक्य गोष्ट शक्य करता येऊ शकते. याचं मुर्तीमंत उदाहरण म्हणजे आमची जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, बोर्डा. केंद्र- बोर्डा, बीट- चिचपल्ली, पं. स. चंद्रपूर, जिल्हा- चंद्रपूर.

**PHOTO LINK -**

https://docs.google.com/document/d/1KkP3TbCyqnuEZo7NsS5I_juWcS5ccwmC/edit?usp=sharing&ouid=110293833348900477188&rtpof=true&sd=true

**VIDEO LINK -**

https://drive.google.com/file/d/1jBecjhP-GPg60N91HN1CFeQgbu7TnRzW/view?usp=sharing

----------**----------

# "माझी आनंददायी, स्वच्छ सुंदर शाळा"

**शाळेचे नाव व पत्ता - जि.प.मराठी उच्च प्राथमिक शाळा वरुड ता. जि. बुलढाणा**

**शाळेचा ईमेल आयडी** - shrirambhute@gmail.com

**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.श्रीराम सांडू भुते

**मोबाईल क्रमांक** - 9850648432

**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - shrirambhute@gmail.com

**शाळेची प्रारंभिक माहिती -**

जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा वरुड अजिंठा डोंगर रांगांमध्ये अतिशय दुर्गम भागामध्ये वसलेली एक शाळा आहे. सन 2018 मध्ये मुख्याध्यापक श्री.श्रीराम भुते व सर्व शिक्षक नव्यानेच या शाळेवर रुजू झाले. त्यावेळी शाळेची परिस्थिती अतिशय दयनीय होती. शाळेच्या मैदानाच्या मधूनच एक छोटासा पाण्याचा नाला वाहत जात होता. परिसर मोठा होता परंतु शालेय मैदानामध्ये खड्डे असल्यामुळे मैदान खेळण्यास योग्य नव्हते. गावातील लोकांसाठी शाळा एक गावअड्डा होता. शाळा इमारत भकास वाटत होती. शालेय गुणवत्तेचा स्तर आवश्यक तसा नव्हता. तेव्हा मुख्याध्यापक व शिक्षक यांनी गुणवत्तेचा ध्यास घेऊन शाळेचा कायापालट करण्याचा संकल्प केला.




**प्रत्यक्ष कार्यवाही -**

सन 2019 मध्ये मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांनी भौतिक विकासाच्या अगोदर गुणवत्ता विकासावर अधिक भर देऊन पहिल्या एका वर्षामध्ये आनंददायी शिक्षण पद्धतीने विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमध्ये आमुलाग्र बदल घडवून आणत पालकांचा विश्वास संपादित केला. ऑगस्ट 2020 मध्ये संपूर्ण शिक्षकांनी एकत्र येऊन शाळेचा भौतिक विकास कसा करता येईल यावर विचार विनिमय केला. सर्वप्रथम शाळेला ISO मानांकन कसे मिळवता येईल यावर चर्चा करण्यात आली. ISO मानांकनासाठी आवश्यक त्या भौतिक व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करण्यासाठी आठ ते दहा लाख रुपये एवढा निधी आवश्यक होता. कोरोना काळ असल्यामुळे शाळेला सुट्या होत्या. या काळाचा सर्व शिक्षकांनी पुरेपूर उपयोग करून घेत दररोज गावामध्ये तीन ते चार तास फिरून लोक

वर्गणी जमा केली. गावानेही शाळेसाठी लोक सहभागाने आठ ते दहा लाख रुपये एवढा निधी दिला. या निधीमधून शाळेसाठी भौतिक व शैक्षणिक सुविधा निर्माण करण्यात आल्या व शाळेला ISO मानांकन मिळवून देण्यात आले. या सर्व प्रक्रियेमधून एक आनंददायी शाळापरिसर तसेच खेळाचे मैदान याची निर्मिती झाली.



पुण्य नगरी SMART वऱ्हाड अकोला / बुलडाणा / वाशीम

## वरुडच्या शाळेला शासनाचा आयएसओ दर्जा

### शिक्षकांची मेहनत आली फळास



**मासरूळ**, दि. ६ (प्रतिनिधी)

वरुड येथील मराठी उच्च प्राथमिक शाळेला शासनाचा आयएसओ दर्जा प्राप्त झाला आहे. शिक्षक आणि ग्रामस्थांच्या मेहनतीचे हे फळ आहे.

अजिंठा डोंगर रांगेतील दुर्गम भागामध्ये वसलेले वरुड हे छोटसे गाव. काही वर्षांपूर्वी येथे येण्याजाण्यासाठी पुरेशी व्यवस्थ नव्हती. या गावात पहिली ते आठवीपर्यंतचे वर्ग असलेली जिल्हा परिषदेची मराठी शाळा आहे. मागील दोन वर्षांपासून या शाळेवर रुजू झालेले मुख्याध्यापक तसेच सर्व शिक्षक वृंदांनी शाळेचा कायापालट करण्याचा निर्धार केला. तसा मानस गावकऱ्यांसमोर व्यक्त केला. ग्रामस्थांनीही सर्वोतोपरी सहकार्य केले. त्याचेच फलित म्हणून आज शाळेला शासनाचे आयएसओ मानांकन प्राप्त झाले आहे.

सर्व वर्गखोल्यांमध्ये डिजिटल शिक्षण देण्यासाठी सुसज्ज एलईडी व प्रोजेक्ट व्यवस्था उभारण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी प्रशस्त क्रीडांगण आहे. पाणी शुद्धीकरणासाठी आरओ, विद्युत निर्मितीसाठी सोलर प्लांट, मिनी ब्लास्ट लाइट व्यवस्था, गांडूळ खत निर्मिती प्रकल्प, अग्निशमन यंत्रणा, शाळा भिंती व वर्गभिंतीवर केलेली सुसज्ज पेंटिंग व बोलक्या भिंती, सर्व सुविधांनी युक्त शाळा, बाल नर्सरी, घंटा मुक्त शाळा, शैक्षणिक साहित्याचा जास्तीत जास्त उपयोग करून कृतीयुक्त शिक्षण अशी आधुनिक शाळा सध्या निर्माण करण्यात आली आहे.

Smart Bhandara-Gondiya
Page No.1 September 07, 2021

## वरुड रंगाप्पा येथील मराठी उच्च प्राथमिक शाळेला महाराष्ट्र शासनाचा आय.एस.ओ दर्जा प्राप्त



बुलडाणा, ५ सप्टेंबर (गुड इव्हनिंग सिटी) : तालुक्यामध्ये अजिंठा डोंगर रांगांमध्ये दुर्गम भागामध्ये वसलेले वरुड हे छोटस गाव.काही वर्षापूर्वी या गावामध्ये ये ण्या जाण्यासाठी पुरेशी व्यवस्था सुद्धा नव्हती.या गावामध्ये वर्ग १ ते ८ पर्यंतचे वर्ग असलेली एक जिल्हा परिषदेची छोटीसी मराठी शाळा. मागील दोन वर्षापासून या शाळेवर रुजू. झालेले मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंद यांनी शाळेचा कायापालट करून शाळेला आय एस ओ मानांकन दर्जा मिळवून देण्याचा संकल्प केला.तसा प्रयत्न मानस गावकऱ्यांसमोर व्यक्त केला.गावकऱ्यांनी सुद्धा या संकल्पाला पूर्ण शक्तीनिशी सर्व प्रकारे सहकार्य केले. त्याचेच फलित आज या शाळेला महाराष्ट्र शासनाचे आय एस ओ मानांकन प्राप्त झाले आहे.आज रोजी शाळेमध्ये वर्ग १ ते ८ पर्यंतच्या सर्व वर्ग खोल्यामध्ये डिजिटल माध्यमातून शिक्षण देता यावे यासाठी सुसज्ज अशी एलईडी व प्रोजेक्ट व्यवस्था आहे.या व्यवस्थेच्या माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष व डिजिटल पद्धतीने अध्ययन-अध्यापन केले जाते.विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी प्रशस्त असे क्रीडांगण असून त्यावरती सर्व प्रकारच्या खेळांची मैदाने या ठिकाणी विकसित होत आहेत.त्याचप्रमाणे पाणी शुद्धीकरणासाठी आर.ओ.व्यवस्था ,विद्युत निर्मिती साठी सोलर प्लांट,मिनी ब्लास्ट लाईट व्यवस्था,गांडूळ खत निर्मिती प्रकल्प,अग्निशमन यंत्रणा, शाळा भिंती व वर्गभिंतीवर केलेली सुसज्ज पेंटिंग व बोलक्या भिंती,सर्व सुविधांनी युक्त असे शाळा कार्यालय, मुला-मुलींसाठी सर्व सुविधायुक्त असे स्वतंत्र स्वच्छतागृह,फुलझाडांनी व फळ झाडांनी सुसज्ज अशी बाग,बाल नर्सरी,घंटा मुक्त शाळा,शैक्षणिक साहित्याचा जास्तीत जास्त उपयोग करून कृतीयुक्त शिक्षण या व अशा प्रकारच्या अनेक सुविधा उपलब्ध असून आजच्या स्पर्धेच्या काळात इंग्रजी व इतर खाजगी शाळांच्या तुलनेत त्याहीपेक्षा सुंदर पद्धतीने विद्यार्थ्यांना याठिकाणी शिक्षणाचे धडे दिल्या जातात.शाळा विकासासाठी शाळा व्यवस्थापन समिती,सर्व गावकरी यांनी मनापासून सहकार्य करून हातभार लावला, हे महत्वाचे.



सायंदैनिक गुड इव्हनिंग City

**WANTED**

सायंदैनिक गुड इव्हनींग सिटीला खालील पदे त्वरीत भरायाची आहेत. इच्छुकांनी गुरुवार, दि.०९/०९/२०२१ रोजी सकाळी ११ वाजता प्रत्यक्ष मुलाखतीसाठी हजर रहावे.

| अ.क्र | पदे | संख्या | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| १ | अॅडव्हर्टाईज मार्केटींग ऑफिसर | ३ | पदवीधर तसेच संभाषण कौशल्य अवगत असावे |
| २ | ऑपरेटर | २ | कॉम्प्यूटर वर मराठी टायपींग आवश्यक |
| ३ | वेब मॅनेजर | १ | वेबसाईट तथा सोशल मिडीया अकाऊंट हाताळता यावे. |

पत्ता- सायं.गुड इव्हनिंग सिटी, शॉप नं. २, पत्रकार भवन सैनिक मंगल कार्यालय शेजारी, बस स्टँड समोर,बुलडाणा
मो.नं.९८५०३७७३४४, ९७६३४६९१८४

https://youtu.be/z7VcK_Y_Zio?feature=shared&t=9

**शाळा इमारत व परिसर सुशोभीकरण -**

शाळेच्या संपूर्ण इमारतीला रंगरंगोटी करण्यात आली. BaLA उपक्रमांतर्गत सर्व वर्ग खोल्या, व्हरांडा व कुंपण भिंती रंगवण्यात आल्या. शाळेच्या मैदानामध्ये असलेल्या नाल्यांमध्ये 300 ते 400 ट्रॉली मुरूम टाकून तो नाला बुजवण्यात आला व विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी प्रशस्त असे मैदान तयार करण्यात आले. यामध्ये खो-खो, कबड्डी व हॉलीबॉलचे प्रत्येकी दोन असे मोठे मैदान बनवण्यात आले . त्यांचा विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी, आनंद मिळवण्यासाठी तसेच शारीरिक व क्रीडा विकासासाठी उपयोग होऊ लागला.


जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा, वकड
S O T S
A B C


अ आ इ ई उ ऊ ए ऐ ॲ ओ ऑ अं अः
आपला बुलडाणा जिल्हा
PARTS OF BODY
Grand mother
Grand father
दक्षिण
VEGETABLES
Onion
Garlic
Chilli
Brinjal
Ginger
Tomato
Potato
Carrot
Radish
Cucumber
Lemon
Cabbage
Cauliflower
Ladies-finger
Opposite words
Black X White
Dark X light
Day X Night
Sad X happy
Laugh X Cry
In X Out
Up X Down
Here x There
Start x Stop
Hot X Cold
Poor x Rich
Similar words
Large – Big
Exit – Leave
Last – Final
Easy – Simple
Trip – Journy
Sad – Unhappy
Fast – Quick
Glad – Happy
Rude – Low
Safe – Secure
Angry – Hurtful
Brother
Sister
Mother
दया हा मानवाचा धर्म
A B C







**वृक्षारोपण व बाग निर्मिती -**

शाळेला भव्य दिव्य असा दोन एकराचा शाळा परिसर असून त्यामध्ये विविध प्रकारच्या वृक्ष, औषधी वनस्पती व फुल झाडांची लागवड करण्यात आली.यामधून सुंदर अशा बागेची व परसबागेची निर्मिती झाली, या बागेमध्ये विविध खेळ साहित्य मांडून विद्यार्थ्यांना त्याचा खेळण्यासाठी उपयोग होऊ लागला. शालेय

परसबागेमधील फळे व भाजीपाला आपल्यालाच खायला मिळतो म्हणून विद्यार्थी आनंदाने बागकाम करू लागली व यातून मिळणाऱ्या आनंदामुळे त्यांचा उत्साह व शारीरिक क्षमतेमध्ये वाढ झाली.

https://youtube.com/shorts/uNKhihMInTA?feature=shared



**आनंददायी शिक्षण पद्धती -**

शिक्षणामधील निरसता नाहीशी होऊन विद्यार्थ्यांना शाळेचा लळा लागावा यासाठी सर्व शिक्षक वर्गामध्ये आनंददायी शिक्षण पद्धतीचा उपयोग करू लागले. शब्द डोंगर, शब्द भांडार, कृतीयुक्त गाणी, पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान यावर आधारित उपक्रम घेतले. यामधून विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीस लागून गळती शंभर टक्के रोखण्यास मदत झाली तसेच पटनोंदणी वाढवण्यास सुद्धा मदत झाली.

https://youtu.be/Se-067vkC2c?feature=shared



**स्नेहसंमेलन -**

दरवर्षी जानेवारी महिन्यामध्ये वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करून त्यामध्ये विविध देशभक्तीपर गीत गायन, वादन,नृत्य, इ. स्पर्धा घेण्यात येतात. यामध्ये विविध लोककला, आदिवासी लोकनृत्य, वेशभूषा यामुळे विद्यार्थ्यांचा उत्साह वाढून त्यांचा आनंद द्विगुणीत होतो. आनंददायी पद्धतीने कला व सांस्कृतिक शिक्षण मिळण्यास मदत होते.

https://youtu.be/0JTEpQ8ZIvg?feature=shared





**लेझीम कवायत -**

राष्ट्रीय सणांच्या दिवशी लेझीम व डंबेल्स कवायत संचलन बसवून शाळेमध्ये व प्रभात फेरीमध्ये कवायत संचालन घेण्यात येते. यामधून विद्यार्थ्यांना आनंद मिळतो व त्यांचा उत्साह व कलागुण वाढण्यास मदत होते.

https://youtu.be/KaGIhN1IXbk?feature=shared




**बाल आनंद मेळावा व शाळापूर्व तयारी -**

बाल आनंद मेळाव्यामध्ये दरवर्षी विविध प्रकारच्या पाककृती स्पर्धा आयोजित केल्या जातात. यामध्ये विद्यार्थी वेगवेगळ्या प्रकारचे स्वादिष्ट व्यंजन व मेनू बनवून आणतात. खऱ्या कमाईच्या रूपाने विद्यार्थ्यांना या पदार्थांची विक्री करतात. यामधून विद्यार्थ्यांना पाककलेचे शिक्षण मिळते व विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित होतो. इ १ ली मध्ये जास्तीत जास्त विद्यार्थी प्रवेशित व्हावे म्हणून शालेय सत्राच्या शेवटी व सुरुवातीला आनंददायी पद्धतीने शाळापूर्व तयारी मेळावा आयोजित केला जातो.

https://youtu.be/9hr98UYfZ6M?feature=shared

















**दहीहंडी व होळी उत्सव -**

दरवर्षी शाळेमध्ये कृष्ण जन्माष्टमीच्या दिवशी दहीहंडी उत्सवाचे आयोजन केले जाते.यामध्ये विविध प्रकारची कृष्ण गीते, गीत गायन, नृत्य, गोपाळकाला व दहीहंडी इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. त्याचप्रमाणे दरवर्षी होळी उत्सव साजरा करून यामध्ये दुर्गुणांची होळी केल्या जाते. यामधून विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या संस्कृती, कला गुण व वेशभूषा इत्यादी गोष्टीचे ज्ञान मिळते व आनंद मिळतो.

https://youtu.be/YnDWWerjG44?feature=shared

https://youtu.be/5il0RamzRyU?feature=shared



**दप्तर मुक्त शाळा -**

आठवड्यातून एक दिवस दर शनिवारला दफ्तरमुक्त शाळा असते. या दिवशी विविध आनंददायी खेळ, कृती, गाणी,बालसभा, वक्तृत्व स्पर्धा व गायन स्पर्धा यासारख्या विविध स्पर्धांमधून कलागुणांना प्रोत्साहन मिळते.यामधून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते. शाळेची गळती रोखण्यास मदत होते व विद्यार्थ्यांना शाळेबद्दलची आवड निर्माण होते.

https://youtu.be/M6Ur3jopLdA?feature=shared

**चित्रकला, रांगोळी स्पर्धा, मतदान जनजागृती व वस्तू प्रदर्शनी -**

शाळेमध्ये चित्रकला, रांगोळी स्पर्धा यासारख्या विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. कागदकाम व मातकाम अशा कृती शिबिरात आयोजित केल्या जातात. बागेतील वनस्पतीच्या पानापासून राख्या बनविणे ,रंगीत कागदापासून विविध मुखवटे बनविणे , दिवाळी ग्रीटिंग तयार करणे व आकाश कंदील बनविणे इत्यादी कृती व कलांचे आनंददायी पद्धतीने शिक्षण दिल्या जाते. सामाजिक कर्तव्य म्हणून मतदार जनजागृतीसाठी विविध कार्यक्रम आयोजित केल्या जातात.

https://youtu.be/s5w_qwa-c_g?feature=shared






**आनंददायी पद्धतीने डिजिटल शिक्षण व विज्ञान प्रयोगशाळा -**

शाळेमध्ये संगणक प्रयोगशाळा असून प्रत्येक वर्गामध्ये डिजिटल बोर्ड आहे. वर्गामध्ये डिजिटल बोर्डाच्या माध्यमातून हसत खेळत आनंददायी पद्धतीने शिक्षणाचे धडे दिल्या जातात.शाळेमध्ये A.P.J. अब्दुल कलाम विज्ञान प्रयोगशाळा असून विद्यार्थ्यांना प्रयोगशाळेतील साहित्याची प्रत्यक्ष हाताळणी करता येते. यामधून त्यांना कृतियुक्त शिक्षण मिळते. स्वतः विविध शैक्षणिक प्रकल्प विद्यार्थी पूर्ण करतात.

https://youtu.be/NxZbjlKGmq4?feature=shared&t=4



**बालोद्यान व परसबाग -**

शाळेच्या भव्य मैदानामध्ये बालोद्यान व परसबाग विकसित केलेली आहे.यामध्ये विद्यार्थी स्वतः बागकाम करतात. यातून त्यांच्यामध्ये श्रम प्रतिष्ठेचे मूल्य विकसित होत व त्यांच्या सर्वांगीण विकासास चालना मिळते. यामुळे शालेय वातावरण आनंददायी व निसर्गरम्य बनले आहे.







**स्वच्छ शाळा सुंदर शाळा, आनंददायी शाळा -**

शाळेची भव्यदिव्य अशी इमारत असून वर्गाच्या प्रत्येक भिंतीवर रंगरंगोटी केलेली आहे. निसर्गरम्य अशा मैदानाच्या बाजूंना प्रत्येक ठिकाणी वृक्षांची व फूल फळझाडांची लागवड केलेली आहे.यामुळे निसर्गरम्य अशा आनंदी वातावरणाची निर्मिती झालेली आहे. या वातावरणात मुले दिवसभर रमतात व शाळा सुटल्यानंतर सुद्धा मुले शाळा परिसरातच रेंगाळतात.

https://youtu.be/SS62GPweqXo?feature=shared






**क्षेत्रभेट व सहल -**

वर्षातून दोन वेळेस शाळेची क्षेत्रभेट सहल निघते. यामध्ये निसर्ग, डोंगरदऱ्या यांच्या सानिध्यामुळे विद्यार्थ्यांना निसर्गाचे ज्ञान मिळते व विद्यार्थी सहलीचा आनंद उपभोगतात.

https://youtu.be/zkynDTHmy7Q?feature=shared

https://youtu.be/0du5NyPmOrI?feature=shared







**शाळेला प्राप्त पुरस्कार**

- ISO (9001: 2015) मानांकन पुरस्कार सन 2020
- जिल्हास्तरीय स्वच्छ विद्यालय पुरस्कार सन 2022
- तालुकास्तर मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा गौरव पुरस्कार सन 2023/24
- जिल्हास्तरीय शाळा गुणगौरव पुरस्कार सन 2023



AQcert

Certificate of Registration

This is to Certify that the Quality Management System of

ZILHA PARISHAD MARATHI UPPER PRIMARY SCHOOL, WARUD

at

AT. POST. – WARUD, TAL. – BULDANA, DISTRICT – BULDANA - 443106, MAHARASHTRA, INDIA

Has been independently assessed by AQcert and is compliant with the requirements of the standard

ISO 9001:2015

For the following scope:

PROVIDING PRIMARY EDUCATION IN ACCORDANCE WITH GENERAL CURRICULUM FRAMEWORK AS PRESCRIBED BY THE MAHARASHTRA STATE EDUCATION BOARD

Certificate Number: AQC2103321

Validity of this certificate can be verified at www.aqcert.in

| | | |
|---|---|---|
| Date of Certification | : | 18-02-2021 |
| First Surveillance Audit Due | : | 17-02-2022 |
| Second Surveillance Audit Due | : | 17-02-2023 |
| Certificate Expiry (subject to the company maintaining its system to the required standard) | : | 17-02-2024 |

Authorized Signatory

UAAFS

ISO 9001

This certificate is the property of Asure Quality Certification and shall be returned immediately on request.
28 Old Gloucester Street, London, United Kingdom, WC1N 3AX
Corporate office : U-98, 3rd Floor, Shakarpur, Laxmi Nagar, Delhi – 110092, India
Website – www.aqcert.in

दिव्य मराठी **बुलडाणा** 17-09-2022

**दिव्य मराठी विशेष** • सर्वसाधारण श्रेणीमधून झाली आठ, तर उपश्रेणीमधून सहा शाळांची निवड

# वरुडच्या शाळेला 'विद्यालय स्वच्छ' पुरस्कार

प्रतिनिधी | बुलडाणा

भारत सरकार शिक्षण मंत्रालय नवी दिल्ली व राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छ विद्यालय पुरस्कार हा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमात जिल्ह्यात सर्वसाधारण श्रेणीमधून सहा शाळांची राज्यस्तरासाठी तर उप श्रेणीमधून तीस शाळांची जिल्हास्तरीय स्वच्छ विद्यालय पुरस्कारासाठी जिल्हास्तरीय निवड करण्यात आली होती. यामध्ये सहा घटकांचे निकष पुर्ण केल्याबद्दल वरुड तालुका बुलडाणा येथील शाळेला स्वच्छ विद्यालय पुरस्कार देण्यात आला.

स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत दिला जाणारा सन २०२१-२२ चा स्वच्छ विद्यालय पुरस्कार बुलडाणा तालुक्यातील वरुड येथील जिल्हा परिषद शाळेला देण्यात आला आहे. या पुरस्कारासाठी जिल्ह्यातील चौदा शाळांची निवड राज्य स्तरावर करण्यात आली होती. त्यापैकी वरुड येथील शाळा जिल्हा परिषदेची चौ एकमेव शाळा तालुक्यामधून राज्यस्तरावर नामनिर्देशनास पात्र ठरली होती. जिल्हा व राज्यस्तरावरील मूल्यमापन टीम द्वारे ५९ प्रकारचे प्रश्न विचारून स्वच्छतेच्या विविध निकषांची पडताळणी करण्यात आली. त्या संपूर्ण नियम व अटी पूर्ण केल्यामुळे शाळा स्वच्छ विद्यालय पुरस्कारासाठी पात्र ठरली आहे. १४ सप्टेंबर रोजी शिवाजी सभागृह जिल्हा परिषद बुलडाणा येथे शिक्षणाधिकारी किशोर पागोरे, उपशिक्षणाधिकारी उमेश जैन, गटशिक्षणाधिकारी संजय पवार व जिल्हा समन्वयक मंगेश बोरसे यांच्या हस्ते मुख्याध्यापक श्रीराम भुते यांना पुरस्कार प्रमाणपत्र व पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. पुरस्कार मिळवून देण्यासाठी शाळेतील शिक्षण विस्तार अधिकारी वंदना टाकळकर, केंद्रप्रमुख सुनील गवते यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.




पुरस्कार वितरण करताना शिक्षणाधिकारी किशोर पागोरे, उपशिक्षणाधिकारी उमेश जैन, संजय पवार.

**सहा निकष असे :** पाणी, टॉयलेट, साबणाने हात धुणे, प्रक्रिया व देखभाल, वर्तन बदल व क्षमता निर्माण, कोविड १९ हे सहा घटक पुरस्कारासाठी होते.

### सर्वसाधारण व उपश्रेणीतील शाळा

सर्वसाधारण श्रेणीमध्ये जि.प. म.उच्च प्राथमिक शाळा बोराखेडी, जि.प.म. केंद्रीय प्राथमिक शाळा वडशिंगी, जि.प. म.उच्च प्राथमिक शाळा वरुड, एन. व्ही. चिन्मया विद्यालय कनारखेड, सहकार विद्या मंदिर सीबीएसई येळगाव, जि.प. म.उच्च प्राथमिक शाळा सावरगाव, लायन्स ज्ञानपीठ खामगाव, चिखली अर्बन विद्यानिकेतन चिखली यांची अंतिम राज्यस्तरावर निवड करण्यात आली होती. तर उपश्रेणीमध्ये एल. टी. गोविंद सावजी सहकार विद्या मंदिर सिंदखेड राजा, सहकार विद्या मंदिर सीबीएसई येळगाव, सेंट जोसेफ इंग्लिश स्कूल सुंदरखेड बुलडाणा, जि.प. म.केंद्रीय प्राथमिक शाळा आदी.





॥ तमसो मा ज्योतिर्गमय:॥

शिक्षण विभाग, पंचायत समिती, बुलडाणा

व्दारा आयोजित

शाळा गुणगौरव सोहळा २०२३

ISO मानांकन प्राप्त शाळा, आदर्श उपक्रमशील शाळा, शिक्षक व शाळा व्यवस्थापन समिती यांचा भव्य गौरव सोहळा

शिक्षणाचा अधिकार

समग्र शिक्षा अभियान

सारे शिकूया, पुढे जाऊया

प्रमाणपत्र

जिल्हा परिषद मराठी / उर्दू प्राथमिक / उच्च प्राथमिक शाळा वरुड, पं.स. बुलडाणा

शाळा व्यवस्थापन समिती आणि मुख्याध्यापक, शिक्षक यांच्या अथक प्रयत्नाने व लोकसहभागाने आपल्या शाळेला आपण सर्वांनी आदर्श व उपक्रमशील शाळा केल्याबद्दल आपले मनपूर्वक अभिनंदन !

दि. १० मार्च २०२३

बुलडाणा

श्री. ज्ञानेश्वर वायाळ
गट शिक्षणाधिकारी
पंचायत समिती, बुलडाणा

श्रीमती सरिता पवार (वर्ग १)
गट विकास अधिकारी
पंचायत समिती, बुलडाणा

श्रीमती भाग्यश्री विसपुते (IAS)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, बुलडाणा

**समारोप -**

वरुड गावच्या परिसरामध्ये इंग्रजी माध्यमाच्या व खाजगी संस्थेच्या शाळा स्पर्धेत असताना सुद्धा शाळेतील मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांनी खूप कष्ट व मेहनत घेऊन शाळेला भौतिक व शैक्षणिक गुणवत्तेच्या बाबतीत एक नवीन उंची मिळून दिली. सन 2020 मध्ये शाळेला ISO मानांकन प्राप्त झालेले असून मागील दोन-तीन वर्षात शाळेला अनेक प्रकारचे पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. यामध्ये सन 2022 या वर्षी स्वच्छ विद्यालय पुरस्कारासाठी शाळा राज्यस्तरासाठी पात्र झाली होती. मागील वर्षी शाळेने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत तालुकास्तरावर द्वितीय क्रमांक व यावर्षी प्रथम क्रमांक मिळवलेला आहे. शाळेच्या गुणवत्तापूर्ण वाटचालीमध्ये शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक,गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, ग्रामस्थ व शाळा समिती या सर्वांचे मोलाचे योगदान आहे.

----------**----------

# "शालेय विषयाच्या नाविन्यपूर्ण उपक्रमातून विद्यार्थ्यांचा कृतीप्रवण आविष्कार"

**शाळेचे नाव व पत्ता - नवजीवन विद्यालय अँड जुनिअर सायन्स कॉलेज, जमनापूर, साकोली, वैनगंगा शैक्षणिक परिसर नागझिरा रोड जमनापूर ता. साकोली, जि.भंडारा.**

**शाळेचा ईमेल आयडी** - nvj.jamnapur@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - डॉ.लोकानंद शामराव नवखरे
**मोबाईल क्रमांक** - 9834799606
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - nawkhare.lokanand@gmail.com

**प्रास्ताविक -**

संकल्प सिद्धीचे शिल्पकार डॉ. ब्रह्मानंद बाजीरावजी करंजेकर संस्थापक अध्यक्ष, वैनगंगा बहु-उद्देशीय विकास संस्था नागपूर यांच्या प्रयत्नाने निर्माण झालेली भंडारा जिल्ह्यातील साकोली तालुक्यातील मुंबई - कोलकाता या राष्ट्रीय महामार्गावरून उत्तर दिशेला जाणाऱ्या नागझिरा अभयारण्य रोडवर वैनगंगा बहु-उद्देशिय विकास संस्था नागपूर' द्वारा संचालित वैनगंगा शैक्षणिक परिसरात '**नवजीवन विदयालय अँड ज्युनिअर सायन्स कॉलेज जमनापुर- साकोली** ही शाळा आहे. माझ्या शाळेचा इतिहासही मोठा रंजक आहे. शाळेची स्थापना सत्र १९९९-२००० या शैक्षणिक वर्षात जमनापूर सारख्या छोट्याशा खेडेगावात झाली. मात्र आज तीच शाळा वैनगंगा शैक्षणिक परिसरातील बहुमजली सुसज्ज इमारतीमध्ये सर्व भौतिक सुविधासहित सुरु आहे.सत्र १९९९-२००० मध्ये शाळेचा ८ वा वर्ग जेमतेम ३१ विद्यार्थ्यावर सुरू करण्यात आला. सन २००२ ला शाळेची पहिली फळी एस एस सी बोर्ड परीक्षा उत्तीर्ण होऊन निघाली सत्र २००२-०३ पासून या शाळेत इयत्ता पाचवीचा वर्ग सुरू करण्यात आला. सुरुवातीच्या काळात शाळेमधील विद्यार्थी संख्या अतिशय तोकडी होती सत्र २००९-१० मध्ये इयत्ता पाचवी ते दहावीची एकूण पटसंख्या १८८ एवढी होती. याच सत्रात श्री सुनील सुपारे यांनी मुख्याध्यापक म्हणून या शाळेची सूत्रे आपल्या हाती घेतली आणि खऱ्या अर्थाने इथून सुरू झाली शाळेची यशोगाथा. त्यात भर म्हणून सन २०११ मध्ये याच शाळेत कामाई करंजेकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय एकोडी येथून बदली होऊन आलेले सहा. शिक्षक लोकानंद नवखरे यांनी शालेय गुणवत्ता व शाळेमध्ये नवनवीन संकल्पना, योजना, उपक्रम व प्रकल्प राबविण्यास सुरुवात केली आणि पाहता पाहता या शाळेचा चेहरामोहराच बदलला. आतातर या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ही ६०० च्या वर पोहोचली आहे. आजच्या घडीला शाळेत स्वयंअर्थसहाय्यीत इयत्ता अकरावी व बारावीचे विज्ञान शाखेचे वर्ग सुरू करण्यात आले असून त्यात २०३ विद्यार्थी अध्ययन करीत आहेत. शाळेतील पाच वर्गखोल्यांमध्ये डीजीटल स्मार्ट बोर्ड द्वारे अध्ययन-अध्यापन कार्य सुरु आहे आणि बाकी सर्व वर्गखोल्यांमध्ये प्रोजेक्टर आणि डेकस्टाप द्वारे डिजिटल वर्गात रूपांतर करण्यात आले आहे.

**वर्ग खोली ऐवजी विषय खोली -**

विद्यार्थ्यांना आनंददायी अध्ययन अनुभूती देत असतांना जो विषय विद्यार्थ्यांना समजून घ्यायचा आहे त्या विषयाशी निगडीत सर्व साहित्य, उपकरणे त्याच खोलीत उपलब्ध असावी या हेतूने आम्ही आमच्या शाळेत वर्ग खोली ऐवजी विषय खोली तयार केल्या आहेत. शालेय अभ्यासक्रमातील प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र कक्ष उपलब्ध करण्यात आला आहे आणि विद्यार्थ्यांना त्या विषयाच्या शिकवणीसाठी

त्या कक्षामध्ये जावे लागते. आमचा हा दृष्टिकोन विद्यार्थ्यांना त्या विशिष्ट विषयाशी संबंधित वातावरणात शिक्षण घेण्याची संधी देतो, जिथे त्या विषयाशी संबंधित साधने, साहित्य आणि संसाधने असतात. उदाहरणार्थ, विज्ञानाचा तास असेल तर विद्यार्थी विज्ञान खोलीत जातील, जिथे प्रयोग साहित्य आणि साधने उपलब्ध असतील. गणिताचा तास असेल तर गणित खोलीत जाणे होईल, जिथे गणिताशी संबंधित दृश्य साधने आणि तक्ते इत्यादी उपलब्ध असतील. यामुळे विशिष्ट विषयासाठी वातावरण तयार होऊन विद्यार्थी अधिक ध्यानपूर्वक शिकतात. शिक्षकांना त्या विषयाशी संबंधित साधनांचा योग्य वापर करता येतो. विषयाला अनुसरून सजावट, शैक्षणिक साधने अधिक सुलभतेने वापरता येतात.

**स्व-निर्मितीचा आनंद.....**

शासनाने सुरू केलेल्या मध्यान्ह भोजन योजनेत आपण विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या प्रकारच्या भाज्या देत असतो पण बाहेरून खरेदी केलेल्या भाज्या ह्या रासायनिक खत व औषध वापरून पिकवलेल्या असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या भाज्या ह्या शाळेतच पिकवून त्या भाज्यांचा वापर शालेय पोषण आहारासाठी करावा असे ठरवले. त्यासाठी लागणाऱ्या जागेची निवड करून त्याठिकाणी ६०*६० चे ग्रीनशेड उभारण्यात आले यात सहकार्य लाभले ते जैन इरिगेशनचे. या माध्यमातून पेरणीपूर्व शेतीची मशागत कशी केले जाते ह्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली जाते. जमीन व्यवस्थित करून पावसाळा सुरू झाल्यावर शाळेच्या परसबागेत भेंडी, गवार, कारले, वांगे, चवळी शेंगा, असे अनेक पालेभाज्या व फळभाज्यांची लागवड केली जाते. विद्यार्थी निरंतर ह्या परसबागेची काळजी घेत पिकांना लागणारे पाणी देणे, आवश्यक असल्यास शेणखत टाकणे ,जैविक औषधांची फवारणी करणे यामुळे फळभाजी व पालेभाजी वाढ प्रक्रिया त्यांच्या लक्षात आली. कोणत्या वनस्पतीला वाढण्यासाठी किती दिवस लागले ह्याची सुद्धा विद्यार्थी माहिती मिळवू लागले. याबरोबरच नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार विद्यार्थ्यांना कृषिविषयक अनुभव देता येतात आणि स्व-निर्मितीतुन पिकवलेली भाजी खाण्याचा आनंद विद्यार्थ्यांना मिळतो.





**स्मार्ट क्लासचा प्रभावी वापर...**

तंत्रज्ञान म्हणजे 'वैज्ञानिक व इतर सुसंघटीत ज्ञानाचे' प्रत्यक्ष जीवनात आवश्यक प्रात्यक्षिक कृतींना सोपं व सहज करण्यासाठीचे उपयोजन. तंत्रज्ञानाच्या मदतीने मानव वेगवेगळे अवजारे व यंत्रे वापरून ह्या प्रात्यक्षित कृती सोप्या व सहज पद्धतीने करतो. विद्यार्थी शिकत असताना पारंपरिक पद्धतीला तंत्रज्ञानाची जोड दिल्यास जगातील कोणत्याही माहितीचा साठा मिळवून आपल्या ज्ञानात भर घालू शकतो. शाळेतील पाच वर्गखोल्यांमध्ये डीजीटल स्मार्ट बोर्ड द्वारे अध्ययन अध्यापन कार्य सुरु आहे आणि बाकी सर्व वर्गखोल्यांमध्ये प्रोजेक्टर आणि डेस्कटॉप द्वारे डिजिटल वर्गात रूपांतर करून शैक्षणिक सोफ्टवेअर चा उपयोग करून विद्यार्थ्यांच्या ज्ञान वृद्धीचे कार्य निरंतर सुरु आहे.





**विषयानुरूप प्रयोगशाळांची निर्मिती....**

शाळेत सर्व आवश्यक साधन सामुग्री आणि उपकरणे उपलब्ध करून जीवशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, फिशरी या विषयांच्या प्रयोगशाळा तयार करण्यात आल्या आहेत. यासोबतच भविष्यातील विद्यार्थ्यांच्या गरजा शालेय जीवनातच पूर्ण करण्याकरिता शाळेत भाषा प्रयोगशाळा, गणित प्रयोगशाळा, सामाजिक शास्त्र कक्ष ,संगणक कक्ष,कार्यानुभव कक्ष अशा प्रात्यक्षिक अनुभूती आणि शिक्षण देणाऱ्या कक्षाची निर्मिती करून विद्यार्थ्यांना आनंददायी, प्रात्यक्षिक व स्वानुभव पद्धतीने शिक्षण देण्याचे कार्य सुरू आहे.














My
Math's



**संगणक शिक्षण (ICT ROOM) -**

आजचे युग हे संगणकाचे AI चे युग आहे याची दखल शाळा प्रशासनाने फार पूर्वी घेत शाळेत हळूहळू स्वखर्चातून ३० संगणकांची इंटरनेट सुविधा असलेल्या कक्षाची उभारणी केली आहे. अगदी पाचवीतल्या विद्यार्थ्यांना सुद्धा संगणकाचे ज्ञान व्हावे यासाठी रोज सकाळी १०:०० ते १०:४० या वेळेत संगणकाचे अतिरिक्त वर्ग घेण्यात येतात. यामध्ये विद्यार्थ्यांना मूलभूत संगणकीय ज्ञान , संगणक कसे कार्य करतात आणि ते कसे वापरावे याबद्दल माहिती दिली जाते . सोबतच टायपिंग, कीबोर्ड कमांड शिकणे, संगणक चालू आणि बंद करणे, मायक्रोसॉफ्ट ऑफिस, एक्सेल, पॉवर पाईट , इ-मेल तयार करणे अश्याप्रकारचे प्राथमिक ज्ञान विद्यार्थ्यांना दिले जाते.



**ऑनलाइन पद्धतीने शिक्षण -**

कोव्हीड -19 या विषाणूजन्य साथीच्या रोग प्रसारामुळे लागू करण्यात आलेल्या संचारबंदीच्या काळात विद्यार्थ्यांचे खूप शैक्षणिक नुकसान झाले. परंतु या कालावधीत शाळेने सुरुवातीला Learning from Home ही संकल्पना अत्यंत कल्पक पद्धतीने राबविली. गूगल मीट ॲप द्वारे सर्व विद्यार्थ्यांना सर्व विषय ऑनलाइन पद्धतीने तंत्रज्ञानाचा वापर करून शिकविले. दीक्षा ॲप, ई-बालभारती, Talking Banks आदी माध्यमांचा प्रभावी वापर शिक्षकांनी अध्यापनात केला. Google Classroom, Google form, YouTube आदी पर्यायांचा सुद्धा प्रभावी वापर करून अध्ययन-अध्यापन अधिक मनोरंजक करण्यात आले. गैरहजर विद्यार्थ्यांच्या पालकांना फोनद्वारे संपर्क करून शिक्षण प्रवाहात आणण्यात आले.

**पालक व शिक्षक WhatsApp ग्रुप -**

आपल्या पाल्याची शालेय माहिती पालकांना मिळावी याकरिता प्रत्येक वर्गाचे whatsapp ग्रुप तयार करून सदर ग्रुपवर विद्यार्थ्याची प्रगती, विदयार्थ्यांचा घरचा अभ्यास, विद्यार्थ्याच्या गैरहजेरी बाबत माहिती पाठविली जाते. तसेच शाळेतील उपक्रम पालकांपर्यंत वेळोवेळी पोहचवले जातात.

**विद्यार्थी दत्तक योजना -**

शालेय शिक्षण घेत असतांना कधी कधी विद्यार्थ्यांच्या जीवनात आकस्मिक संकट ओढवते आणि अश्या वेळी त्या विद्यार्थाचे शालेय जीवन संपण्याची परिस्थिती निर्माण होते. अश्या आकस्मिक घडणाऱ्या घटना आपणास टाळता येत नसल्या तरी अश्या विद्यार्थ्यांना त्यांचे शालेय शिक्षण पूर्ण करण्याकरिता शाळेने विद्यार्थी दत्तक योजना सुरु केली असून शाळेतील प्रत्येक घटक शाळेतील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या किवा आकस्मिक संकट ओढवलेल्या विद्यार्थ्यांचा संपूर्ण शालेय शिक्षणाचा खर्च उचलून विद्यार्थ्यावर आलेल्या आर्थिक संकटावर मात करत त्याला चांगले शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहित करतात.

**इतर नाविन्यपूर्ण उपक्रम -**

१) प्रवेशोत्सव साजरा करणे.
२) आदर्श परिपाठ
३) थोर नेत्यांच्या जयंती, पुण्यतिथी साजरी करणे.
४) मनोरंजक व नाविण्यपूर्ण खेळ
५) क्रिडासत्रांचे आयोजन
६) स्नेहसंमेलन
७) व्यावसायिकांच्या मुलाखती व क्षेत्रभेट
८) मुलांचा वाढदिवस साजरा करणे
९) खेळाचे साहित्य यांचा पुरेपूर वापर
१०) संगणकाच्या तासिकेचा वेळापत्रकात समावेश
११) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन
१२) वृक्षारोपण
१३) आरोग्य तपासणी
१४) शैक्षणिक सहल

१५) हळदी कुंकू कार्यक्रम
१६) आनंद मेळावा
१४) शालेय विद्यार्थ्यांकरिता अभ्यासिका

असे नाविन्यपूर्ण उपक्रम शाळेत राबविण्याबरोबरच, शाळेतील पालकांचा विश्वास संपादन करण्यात आणि विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून शाळेचे नाव उज्वल करण्यासाठी आमच्या शाळेचे मुख्याध्यापक आणि आम्ही सर्व शिक्षक प्रयत्नशील आहोत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी कोणतीही तडजोड न करता त्याचा शिक्षणाचा हक्क मिळवून देण्यासाठी संस्थेने नेहमीच पुढाकार घेतला आहे. अनेक आव्हाने स्वीकारत जिल्ह्यातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील नामवंत शाळा घडविण्याचा संस्थेचा मानस आहे आणि यामुळेच सन २०२३-२४ मध्ये महाराष्ट्र शासनाकडून राबविण्यात आलेल्या 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' या उपक्रमामध्ये शाळा विभागातून तृतीय आली. तर सन २०२४-२५ मध्ये महाराष्ट्र शासनाकडून राबविण्यात आलेल्या 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा-२' या उपक्रमामध्ये शाळा विभागातून द्वितीय येत आपल्या यशाची परंपरा कायम राखली आहे.

----------**----------

# "सामाजिक उपक्रमातून विद्यार्थी विकास"

शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, झाडगाव, केंद्र.सानगडी,
ता.साकोली, जि.भंडारा

**शाळेचा ईमेल आयडी** - ramchachere@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.रामकृष्ण मदन चाचेरे
**मोबाईल क्रमांक** - ८५५२९८९२९३, ८२७५१४३९७५
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - ramchachere@gmail.com

**प्रस्तावना -**

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर अभियानाअंतर्गत सर्व उपक्रम राबविल्या नंतर शाळेने विविध उपक्रम हाती घेतलेले आहेत. यामुळे विद्यार्थ्यांचा सामाजिक विकास तसेच सामाजिक एकोपा आणि शाळेविषयीचा पालकांचा तसेच समस्त ग्रामवासी यांचा आपलेपणाचा दृष्टीकोन वाढलेला आहे. त्यामुळे माझी शाळा हा भाव वृद्धिंगत होऊन शाळेच्या भौतीक सुविधेचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी संपुर्ण पालक मित्र परिवार हा पुढे आलेला आहे. सदर उपक्रम राबविल्यामुळे विद्यार्थ्यांचा भावनीक, सामाजिक, सांकृतिक, विकास होऊन सर्वांगिण विकासाकडे वाटचाल सुरु झालेली आहे. खालील उपक्रम राबवत असतांना विद्यार्थी अभ्यासाभिमुख होऊन शाळा हे एक कुटुंब आहे हा भाव वाढीस लागत आहे. संपुर्ण उपक्रमांमध्ये विद्यार्थी तसेच पालक हिरीरीने भाग घेत आहेत. आपले आर्थिक, श्रमीक, योगदान देऊन शाळेला येणाऱ्या अडचणी ते स्वत: सोडवत आहेत. सक्रीय अध्ययन अध्यापनाच्या प्रक्रीयेला शाळेचे निर्सग सौर्दयाने नटलेले ठिकाण कारणीभुत करून विद्यार्थी विकासाची मुहुर्तमेढ रोवल्या गेली. त्यातच चिमुकला झाडगाव परिवर्तनाचा केंद्रबिंदु ठरला पाठांतराची पद्धती नाकारून अध्ययन हे कृतीशील बनवले आहे. पालक सहभागाद्वारे विद्यार्थी केंद्रीत अध्ययन अनुभव, नाटीका, प्रकल्प, चर्चा, संवाद, निरिक्षण, भेटी, इत्यादी द्वारे शाळा परिवर्तन करत यशस्वी वाटचाल केली आहे.

**विषया संर्दभात आलेल्या अडचणी आणि केलेले प्रभावी काम -**

लोकसहभागातून विद्यार्थी विकास घडवत असतांना शाळा म्हणजे घर आणि घरात शाळा आणणे हे शाळा प्रशासनाचे प्रथम ध्येय होते. मात्र जेव्हा पालकसभा घेण्यात येत होत्या तेव्हा पालकांची अत्यल्प उपस्थिती दिसत होती. शाळेविषयी पालकांची अनास्था दुर करण्यासाठी शाळेतील शिक्षकांनी काम करणे सुरू केले. यासाठी विविध प्रसंगोपात उपक्रम घेऊन पालकांना शाळेविषयीचे आकर्षण तयार करवुन त्यांना शाळेत येण्यासाठी बाध्य केले गेले. शाळा हा विद्यार्थी विकासाचा केंद्रबिंदु आहे. पालक शिक्षक सहकार्यामुळेच शाळा विकास पर्यायाने विद्यार्थी विकास होऊ शकतो याची प्रचीती संपुर्ण पालकांना आली. विद्यार्थी सहभागाचे विविध प्रात्यक्षिक तसेच अध्ययन अध्यापनातील नाविण्यपुर्ण पद्धतीचा अवलंब यामुळे विद्यार्थी अभ्यासात बोलके होऊ

लागल्यामुळे पालकांनाही शाळेविषयी ओढ तयार झाली आणि शाळेला आवश्यक भौतीक सुविधा देण्यासाठी पालक सरसावले. पालकांचे शाळेला आर्थिक श्रमदानाच्या रूपात योगदान मिळू लागले.

**विषया संदर्भातील अडचणी दुर केल्यानंतर शाळेवर झालेले दृष्य परिणाम -**


लोक सहभाग मिळवण्यासाठी पालकांची अनास्था दुर केल्यानंतर शाळेत केलेल्या छोट्या योगदानामुळे पालक वर्ग समाधानी झालेला दिसला आणि वस्तु रूपात आर्थिक रूपात किंवा श्रमदानाच्या रूपात पालकांचे योगदान वाढू लागले. अनेक कार्यक्रमाच्या निमित्ताने पालक शाळेच्या उपक्रमात सहकार्य करू लागले. पालकांमध्येच शाळेला मदत देण्याची चढाओढ सुरू झाली त्यामुळे शाळेतील अडचणी कमी झाल्या . त्याचा परिणाम मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या राज्यस्तरीय स्पर्धेत शाळा झाडगावचा जिल्ह्यात मागील वर्षी द्वितिय तर वर्ष 2024-25 मध्ये जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळविता आला किंबहुना शाळेचा पट अतिशय




झपाट्याने वाढलेला आहे.

१२. मागील दोन वर्षाच्या तुलनेत चालू शैक्षणिक वर्षात झालेली पटसंख्या वाढ. पटनोंदणी / पूर्वप्राथमिक शिक्षणातील सहभाग.

सन २०२४ – २०२५ ह्या शैक्षणिक वर्षात मागील पाच वर्षाच्या कालावधीत अत्युच्च पटसंख्या आहे. शाळास्तरावर राबलेले उपक्रम आणि त्यामुळे विद्यार्थ्यांत झालेला बदल ह्यामुळे शाळेचा पट वाढलेला आहे. तो खालील ग्राफ मध्ये दाखवलेला आहे. शाळेत पाचे ते सहा गावातील विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे.




पटसंख्या वाढ दर्शविणारा स्तंभालेख

लोक सहभागाची परिणाम कारकता :-

शालेय परिसर फारच स्वच्छ व निटनेटका आहे. पिण्याच्या पाण्यासाठी स्वतंत्र R.O. ची व्यवस्था आहे. एकूणच सर्व मुलांना हात धुण्यासाठी Handwash (हँडवाश ) स्टेशनची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. वेगवेगळे हात धुण्याचे स्पॉट तयार करून मुलांना स्वच्छतेच्या सवयी लावण्यात आल्या. यासाठी शाळा प्रशासन प्रयत्न करीत आहे. तसेच मुलांना व मुलींना स्वतंत्र स्वच्छता गृहाची व्यवस्था आहे. त्यात नळाची व्यवस्था करून देण्यात आली आहे. शाळेत दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह नाही. परंतु दिव्यांगासाठी चेअरची उपलब्धता केल्यामुळे, दिव्यांगसुद्धा सदर स्वच्छतागृहाचा वापर करू शकतात.



लोकसहभागाने अडथळा मुक्त वातावरण, शालेय आनंददायी वातावरण तयार केला.

शालेय परिसर अध्ययनपूरक तयार करण्यात आलेला आहे. BALA अंतर्गत शालेय रंगरंगोटी सुद्धा अध्ययन पूरक वातावरण तयार करण्यात आली. शालेय परिसरात वैविध्यपूर्ण प्रायोगिक चित्र तयार करण्यात आले आहे. शालेय वातावरण अडथळा मुक्त आहे. अगदी गावाबाहेरील शांत, नैसर्गिक वातावरणात विद्यार्थी अध्ययन करतात. शाळेला पक्की संरक्षक भिंत असून अध्ययनपूरक तयार करण्यात आलेली आहे.

शाळेत वर्गनिहाय अध्ययनपूरक साध्य करावयाच्या अध्ययन निष्पत्ती प्रदर्शित केलेल्या आहेत. तसेच वर्गसजावट केलेली आहे. वर्गसजावट विद्यार्थी पालक निर्मित साहित्याने करण्यात आली.



दोन शिक्षकी शाळा असल्यामुळे बहुवर्ग अध्यापनपद्धतीचा अंगीकार करणे क्रमप्राप्त ठरले. कमी पटसंख्या असलेल्या झाडगाव शाळेत आम्हाला प्रत्येक विद्यार्थ्यांकडे व्यक्तीगत लक्ष देणे सोपे झाले. पालकभेटीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना निर्माण झालेल्या अडचणीवर सहज मात करता आली. गुरूदेव रविंद्रनाथ टागोर यांच्या शांतिनिकेतन शिक्षण प्रणालीशी सुसंगत अशी शिक्षण प्रक्रीया प्रारंभ करून वर्गा बाहेरची शाळा आणि शिक्षण सुरू झाले. परिसर भेटीच्या माध्यमातुन शालेय अध्ययन अध्यापन प्रक्रियेची सांगड घालता आली . शिक्षण प्रक्रियेत विविध उपक्रमांमुळे संस्कार व रूजवणुक होऊन शिक्षण सोपे झाले. तंत्रज्ञानाची साथ मिळाली त्यामुळे विद्यार्थी अभ्यासात रमू लागले.

**शाळेने राबविले विविध नाविन्यपुर्ण उपक्रम -**

१) **रात्र शाळा उपक्रम -**

येथे वर्षातुन दोनदा दोन्ही सत्रात प्रत्येकी एक दिवस या प्रमाणे दोन दिवस रात्र शाळा उपक्रम राबविला जातो. यामध्ये सर्व शिक्षकासह सर्व विद्यार्थी आयोजन करणारे पालक शाळेमध्ये रात्र काढतात. सकाळी विद्यार्थी शाळेत आला की तो पुन्हा परत दुसऱ्याच दिवशी घरी जात असतो. विद्यार्थी स्वत: आपले काम करण्यास उत्सुक असतो. विद्यार्थी शाळेत येतांना आवश्यक साहित्य घेऊन

मुक्काम करण्यासाठी येतो. शाळेला सुट्टी झाली की, विद्यार्थी घरी न जाता शाळेतच कामास सुरूवात करत असतात. त्या सायंकाळी विद्यार्थी शिक्षकासोबत विविध खेळात रममाण होऊन जातात. त्यानंतर संध्याकाळी सांजवातीच्या समयी पालकांनी स्वत: आयोजित केलेली भजन संध्याकाळचे आयोजन पार पडते. यात विद्यार्थी सुध्दा भजनाच्या कार्यक्रमांत सक्रिय सहभागी होत असतात. त्या वेळात महिला पालक मंडळी आपल्या पाल्या साठी स्वयंपाक तयार करण्यात मदत करतात. रात्रीला मुले गुरूजी सोबत जेवणास बसतात. रात्रीला विद्यार्थ्यांचे मनोरंजक कार्यक्रम पार पाडले जातात आणि शेवटी विद्यार्थी शाळेतच स्वत:चे अंथरूण घालून झोपी जातात. खरा कार्यक्रम तर सकाळी उठले की सुरू होतो कारण सकाळीच विद्यार्थ्यांना झोपेतुन जागे करून त्यांना व्यायाम, आंघोळ इत्यादी प्रात:विधीचे कार्यक्रम पार पाडणे.

हे काम असते. त्यामुळे वेळेतच सर्व काम पार पडावी यासाठी सर्व यंत्रणा कामात लागते. विद्यार्थी शाळेसाठी शाळेतच तयार होतात. सदर उपक्रम शुक्रवार व शनिवार ह्या दिवसात पार पडतो. उपक्रमाला पालकांकडुन सायंकाळचा नास्ता, रात्रीचे जेवण त्या साठी तांदुळ , कणीक, किराणा, भाजीपाला, सकाळी दुध, नास्ता, अशा अनेक प्रकारचे साहित्य दिल्या जाते. ह्या मुळे शिक्षक जवळीकता साधुन विद्यार्थी आणि पालकांमध्ये शाळेविषयी गोडी निर्माण होते.





परसबाग तयार करून भाजी पाला उत्पादन घेतला.

शालेय आवारात परसबागेची निर्मिती करण्यात आली. त्यासाठी उमेद बचतगटाच्या माध्यमातून महिला मंडळींनी शालेय आवारात परसबाग लावून देण्यास सहकार्य केले. त्याचप्रमाणे सदर परसबागेतील भाजीपाला रोज पोषण आहारात उपयोगात आणला जातो. तसेच भाजीपाला वापर हा आर्थिक दृष्टीकोनातून केल्या जाते. शालेय परसबागेतील शेवग्याच्या शेंगाचा वापर हा विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारात तसेच विक्रीसाठीपण शाळेने आर्थिक कमाई केली आहे. परसबागेत सध्या वांगे, मिरची, भटई, इत्यादी झाडे







२) **पर्यावरण जोपासना आणि संवर्धन कार्यप्रणाली (Seed Ball व्यवस्थापन, वृक्षारोपण, वृक्षरक्षाबंधन, वृक्षभेट योजना, बगीचा व्यवस्थापन) -**

शाळेने मागील वर्षापासुन वृक्षसंवर्धनाबाबत उपक्रम राबविले आहेत. त्यात विद्यार्थी वर्षभर विविध प्रकारच्या बिया गोळा करतात आणि शाळा सहकार्याने बियांपासुन सिड बॉल तयार करून शाळेत जतन करून ठेवल्या जाते. पावसाळ्यात वृक्षारोपण कार्यक्रमासोबत सदर सिड बॉल मोकळ्या रानमाळ परीसरात पसरविल्या जातात. त्या पासुन बिया मातीत रूजुन नविन झाडे तयार होतात. ह्या वर्षी शाळेने जवळपास पाच हजार सिड बॉल तयार केले. मागील लागवड केलेल्या वृक्षांची जपणूक व्हावी, विद्यार्थ्यांना वृक्षाचे महत्व पटावे यासाठी रक्षाबंधन कार्यक्रम प्रसंगी वृक्षरक्षाबंधन सुध्दा शाळेत आयोजित केल्या जाते. सोबतच वृक्षाचा वाढदिवस केक कापुन साजरा करण्याची प्रथा शाळेने सुरू केले आहे. मागील सात वर्षा पासुन सदर उपक्रम शाळेत सुरू आहे. ह्या मुळे विद्यार्थ्यांचा पर्यावरण दृष्टीकोण निर्माण होऊन निर्सगाप्रती विद्यार्थ्यांची भावनीक जाणीव जागृती तयार झालेली दिसत आहे. वाढदिवसा प्रसंगी अनेक पालक शाळेला वृक्ष भेट देत असतात.








३) **प्रदर्शनी उत्सव (विद्यार्थी निर्मित साहित्य, गणित दिन, विज्ञान दिवस, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, शालेय बाजरपेठ आयोजन) -**

शाळेत विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी प्रसंगानुरूप साहित्य निर्मितीस प्रोत्साहन दिल्या जाते. पालक तसेच विद्यार्थी, सहकार्याने निर्मित साहित्य तयार करून प्रदर्शन भरविले जाते. शाळेत आयोजित जयंती, पुण्यतिथी, कार्यक्रम तसेच विशेष दिन निमित्ताने चित्रकला, रांगोळी स्पर्धा त्या संदर्भात प्रदर्शन भरवुन वेगवेगळे साहित्य तयार करण्यास विद्यार्थ्यांना संधी दिली जाते. सहभागी विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन प्रेरीत केल्या जाते.

४) **शालेय बाजारपेठ उपक्रम -**

पालक सहकार्याने शालेय बाजारपेठेचे आयोजन केले जाते. ह्या उपक्रमात विद्यार्थी दुकानदार आणि समस्त पालक तसेच गावकरी खाद्य वस्तु खरेदी करण्यासाठी ग्राहक बनुन येत असतात. विद्यार्थी स्वत: नाणी नोटांची आकडे मोड करतो. ग्रामिण भागातही पालकांच्या भरपुर अशा सहकार्याने सदर उपक्रमांचे कौतुक केल्या जाते. विद्यार्थी सुध्दा धाडसी बनलेले दिसतात. सामाजिक गणितीय दृष्टीकोण निर्माण होत असतो. विद्यार्थ्यांच्या माहितीत भर पडावी यासाठी विज्ञान दिन, गणित दिन, साजरे केले जातात. ह्यात विद्यार्थी नाविन्यपुर्ण, साहित्य तयार करतो. त्यामुळे विद्यार्थ्यांत वैज्ञानिक दृष्टीकोण निर्माण होऊन चिकित्सकवृत्ती निर्माण झालेली दिसत आहे.







५) **शालेय बचत बँक -**

शाळा स्तरावर शाळेने मुलांची थेंबे थेंबे तळे साचे बचत बँक सुरू केलेली आहे. यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांला शाळेतुन पासबुक पुरविल्या गेली. आठवड्यातुन मंगळवार आणि शुक्रवार या दिवसात बँक मध्ये पैसे टाकण्याचा दिवस ठरविला आहे. बँकेचे व्यवस्थापक मंडळ आहे. त्यात विद्यार्थीच कैशिअर, मॅनेजर, लेखनिक, या भुमिका पार पाडत आहेत. दिवसा अखेर जमा झालेली रक्कम मुख्याध्यापक यांच्या कडे सोपवली जाते. विद्यार्थीच पैसे जमा करतात. त्या साठी पैसे काढण्याचा तसेच पैसे टाकण्याचा फॉर्म शाळेने तयार केलेला आहे. सदर जमा झालेली रक्कम वर्षाअखेर निकालाच्या दिवशी सर्व विद्यार्थ्यांना परत केली जाते. सन २०२३-२०२४ मध्ये विद्यार्थ्यांनी दोन लाख बत्तीस हजार रूपये रक्कम जमा केली. त्या मुळे विद्यार्थ्यांमध्ये गणितीय आकडे मोड तसेच बचतिची सवय इत्यादि गुण निर्माण होत आहेत.



बचत के संस्कार के साथ आर्थिक साक्षरता का दे रहे ज्ञान

» झाड़गांव की जिला परिषद शाला का उपक्रम » शिक्षकों के सहयोग से चलाई जा रही बैंक

मेदन तांडो | सागनडी (भंडारा)

बचत के जरिए आवश्यक जरूरतों को पूर्ण किया जा सके इसलिए रोजमर्रा के जीवन में बचत महत्वपूर्ण घटक है। विद्यार्थियों को स्कूल में बचपन से ही बताया जाए तो वह आर्थिक साक्षरता के साथ बचत का महत्व भी आत्मसात कर सकते हैं।। इस प्रकार का विश्वास रखकर साकोली पंचायत समिति अंतर्गत झाड़गांव ग्राम की जिला परिषद शाला के शिक्षकों ने विद्यार्थियों के लिए स्कूल में ही बचत बैंक की शुरुआत की है, जिसमें विद्यार्थियों द्वारा बैंक में जमा की गई राशि पर मिलने वाले ब्याज से संपूर्ण वर्ष विद्यार्थियों को शाला में लगने वाली सामग्री की खरीदी करने में मदद प्राप्त होती है।

उपरोक्त आर्थिक साक्षरता से जिला परिषद शाला के विद्यार्थियों में बचत के संस्कारों को आत्मसात करवाया जा रहा है। ग्रामीण परिसर के अभिभावक अपने पाल्य को खर्च करने के लिए पैसे देते हैं। इन पैसों का विद्यार्थी किसी भी प्रकार का विचार न करते हुए खाद्य पदार्थों पर खर्च कर देते हैं। छोटे बच्चों द्वारा पैसों के गुम होने की शिकायत लेकर अभिभावक भी अनेक बार स्कूल पहुंचते हैं। जिस पर उपाय योजना करते हुए झाड़गांव जिला परिषद शाला के शिक्षक कालिनाथ राऊत व राम चाचेरे द्वारा शाला में ही विद्यार्थियों के लिए बचत बैंक का उपक्रम चलाया गया। उन्होंने शाला प्रबंधन समिति के साथ इस संदर्भ में चर्चा की। इसके बाद शाला स्तर पर बैंक की रचना कर संभव हो सके इस अनुसार पैसों को जमा करने की शुरुआत की। गत चार वर्ष में बचत बैंक उपक्रम झाड़गांव शाला में चलाया गया। जून से मई माह तक शैक्षणिक वर्ष में विद्यार्थियों द्वारा संभव हो सके उतनी राशि जमा की जाती है। आगामी वर्ष के जून माह में विद्यार्थियों द्वारा पिछले वर्ष जमा की राशि को सामने की कक्षा में प्रवेश लेने पर नियमित रखा जाता है। शाला छोड़कर बाहर जा रहे विद्यार्थियों को टी. सी. के साथ ही जमा राशि को वापस लौटा दिया जाता है। वर्ष 2019-20 के शैक्षणिक सत्र में कोविड-19 को देखते हुए लगाए गए लॉकडाउन के दौरान 29 अक्टूबर को बचत बैंक में जमा की राशि विद्यार्थियों में वितरित की गई। झाड़गांव में विद्यार्थियों के अभिभावक मेहनत मजदूरी कर जीवन यापन करते हैं। ऐसी परिस्थिति में जमा की राशि हाथ में आते ही विद्यार्थियों व उनके पालक चेहरों पर मुस्कराहट दिखाई देती है। आठ विद्यार्थियों द्वारा शाला के बैंक में जमा की गई। 22 हजार 649 रूपये राशि का वितरण किया गया।

**पालकों के सहयोग से मिली सफलता**

विद्यार्थियों को भविष्य में दृष्टिकोण स्वावलंबन और व्यावहारिक दृष्टिकोण से सक्षम करने के लिए बचत बैंक के माध्यम से प्रयास किया गया है। शाला में बचत बैंक यह उपक्रम चलाया गया है। जिसमें पालक वर्ग का भी सहयोग प्राप्त होने से सफलता मिली है।

- कालिनाथ राऊत,
मुख्याध्यापक जिला परिषद डिजिटल पब्लिक स्कूल, झाड़गांव

www.readwhere.com

दैनिक भास्कर Mon, 02 November 2020 https://epaper.bhaskarhindi.com/c/56074398

**समारोप -**

शाळेत लोकसहभाग वाढल्यामुळे नाविन्यपुर्ण उपक्रमांचा समावेश झाल्यामुळे विद्यार्थी विकास होऊन शालेय पटसंख्या वाढू लागली. झाडगाव शाळेत प्रवेश मिळावा म्हणून पालकवर्ग आतूर झाला. २० ते २२ पटाची शाळा आता ७७ पटसंख्येची झाली. झाडगाव व्यतिरिक्त आसपासच्या गावातून देखील विद्यार्थ्यांनी शाळेत प्रवेश घेतला. जिल्हा परिषद शाळा झाडगाव नव्यानेच विविध कृतीयुक्त बाबींनी नावारूपात आली. विद्यार्थ्यांच्या पायाभुत विषयक अडचणी संपुष्टात आल्या. १००% विद्यार्थी वाचन करू लागले. इंग्रजी वाचन सहज झाले. लोक सहभाग मिळाल्या मुळे उपक्रम यशस्वी होत बोलण्याचा संवाद साधण्याचा विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला. विद्यार्थ्यांत झालेल्या बदला मुळे पालकवर्ग आनंदीत झाला. शाळेत विविध उपक्रम राबविण्यात आले. त्यामध्ये शाळा प्रवेश उत्सव, माता पिता पूजन सोहळा, स्वातंत्र्यदिन सोहळा, एक दिवस

शाळेचा, एक वार विषयाचा, बचत बँक, शालेय वस्तु भांडार खरी कमाई, व्यावसायिक मार्गदर्शन, परिसर भेट, माझी लाडकी लेक, विद्यार्थी वाढदिवस, माजी विद्यार्थी मेळावा, संस्कार शिबिर, ग्रामोत्सव स्नेहसंमेलन कार्यक्रम, बाल सभा, सामान्य ज्ञान स्पर्धा, राष्ट्रीय सण व जयंत्या, शालेय परसबाग, कचऱ्याची होळी, आरोग्य शिबिर, चावडी वाचन, बँगलेस शनिवार, इत्यादि उपक्रम शाळेने राबविलेले आहेत.

**उपक्रमांच्या युट्युब लिंक्स -**

१. https://www.youtube.com/watch?si=dzZsLGjZC९VTmE५p&v=VvhfRC_gkSI&feature=youtu.be
२. https://youtu.be/HX०EadB७iyc?si=UhNWM७Y१j४sGf५Zc
३. https://youtube.com/shorts/BOP४FmanqMw?si=WmpuFkMwhufWMw५४
४. https://youtube.com/shorts/aZp०g०SRgpc?si=ZrCbGNsShdTz-Nkr
५. https://youtube.com/shorts/cyG०GGAQC२s?si=२DpRdPR०१LplBrTv
६. https://www.facebook.com/share/v/३L२६wWDH४PTQ४S२z/

----------**----------

# “स्थापनेचा सुवर्ण महोत्सव साजरा करणारी शाळा”

**शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद माध्यमिक कन्या शाळा, कॅम्प, अमरावती**

**शाळेचा ईमेल आयडी** - zpgirlshighschool@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** — श्री.धनंजय एन.वानखेडे
**मोबाईल क्रमांक** - 9511650256
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - dnwankhade67@gmail.com




**प्रास्ताविक -**

जिल्हा परिषद (मा.शा.) माध्यमिक कन्या शाळा म्हणजेच Govt. Girl's Highschool ची स्थापना 1912, नुकताच शाळेने सुवर्ण महोत्सव साजरा केला. शाळा तशी इंग्रज कालीन आणि आत्ताच्या आधुनिक युगात इतर शाळेला टक्कर देवून महाराष्ट्र शासनातर्फे मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान यात राज्यस्तरीय तपासणी होऊन शाळेने विभागावर प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त केला. शाळेने यशाची एक एक शिखरे पार करत आज आपले नाव लौकिकपात्र केले आहे. "सुरक्षित वातावरणात सर्वांगीण, शैक्षणिक प्रगती साधून विद्यार्थीनींना सुरक्षित व सुसंस्कृत करणे हे या शाळेचे मुख्य ध्येय आहे. विविध शालेय व सहशालेय

उपक्रमातून विद्यार्थीनीचा गुणवत्ता विकास साधला, तसेच शासनामार्फत येणाऱ्या विविध परिपत्रकानुसार राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये शाळेचा सक्रीय सहभाग असतो.

**समस्या/आव्हाने -**

शाळेची 1912 ची स्थापना आहे. खूप जुनी शाळा असल्याने शाळेचा चेहरा मोहरा बदलणे हे मुख्य आव्हान होते. शालेय परिसर सुरक्षित करणे, सर्व वर्ग डिजीटल करणे, शाळेची रंगरंगोटी BaLA नुसार करणे अशी अनेक आव्हाने होती.

**नियोजन व अंमलबजावणी -**

1) **विभागस्तरीय माझी शाळा सुंदर शाळा पुरस्कार विजेती शाळा -**

मागील वर्षी मुख्यमंत्री 'माझी शाळा सुंदर शाळा अभियान टप्पा क्र १ मध्ये शाळेने जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त केला असून टप्पा क्र. २ मध्ये शाळेची राज्यस्तरीय तपासणी होवून शाळेने विभाग स्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त करून राज्याच्या मा.मुख्यमंत्री मा.शिक्षणमंत्री यांच्या उपस्थितीत मुंबई येथे 21 लक्ष रुपयाचे पुरस्कार देवून सत्कार करण्यात आला.





महासागर

**जि. प. गर्ल्स हायस्कूल विभागातून प्रथम**

**'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' अभियान**

महासागर प्रतिनिधी

अमरावती,( दि.15 ) – नुकतेच मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान टप्पा क्र. 2 चे शासनामार्फत निकाल घोषित करण्यात आले. येथील कॅम्प स्थित जिल्हा परिषद गर्ल्स हायस्कूल ला अमरावती विभागातील पाच जिल्ह्यामधून शासकीय गटातून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. शाळेचे मुख्याध्यापक तथा वर्ग 2 पदावर कार्यरत असणारे गटशिक्षणाधिकारी धनंजय वानखडे यांचे नेतृत्व, सखोल मार्गदर्शन आणि अपार मेहनतीने शाळेच्या सर्व प्रशिक्षित चमुच्या साहाय्याने शाळेने ही मजल मारली आहे.

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान टप्पा क्र. 2 मध्ये पायाभूत सुविधा, शासन ध्येय धोरण अंमलबजावणी आणि शैक्षणिक संपादणूक अशा विविध पैलूचे एकूण 150 गुणांचे मुल्यांकन विविध केंद्रस्तर,तालुकास्तर, जिल्हा स्तर, विभागस्तर आणि राज्यस्तरीय समिती कडून मुल्यांकन करण्यात आले. एकूण 21 लक्ष रुपयांचे बक्षिस शाळेने प्राप्त झाले आहे. नुकतेच दि.15 ऑक्टोंबर रोजी शाळेला शासनामार्फत आयोजित जमशेद भाभा थिएटर एन.सी.पी.ए., मुंबई येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजितजी पवार, शिक्षणमंत्री दिपक केसरकर, शालेय शिक्षण सचिव आय. ए. कुंदन प्रधान आणि शिक्षण आयुक्त सुरज मांढरे यांच्या हस्ते शाळेच्या सर्व चमुला आमंत्रित करून प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह आणि 21 लक्ष रुपयाचे धनादेश देवून सन्मानित करण्यात आले आहे.

16 Oct 2024 - Page 2 | dainikmahasagar.com
Powered by softisky.com

2) **The Student Mart -**

विद्यार्थीनींना शाळेत आल्यानंतर मुख्य रस्ता ओलांडून बाहेर जाणे फार धोक्याचे होते. त्यासाठी शाळेत चालविले जाणारे NSQF अभ्यासक्रमाच्या माध्यमातून **The Student Mart** उपक्रम राबविण्याचे ठरविले. त्यानुसार हा उपक्रम मुलींना उपयोगी वस्तू, शालेय वस्तू, इतर खाण्याचे पदार्थ यांची दुपारच्या सुट्टीत प्रत्यक्ष मुलीकडून व्यवहार करून त्यांना खरेदी-विक्री, प्रत्यक्ष नफा - तोटा यांचे ज्ञान या Mart च्या माध्यमातून प्राप्त होत आहे.

**व्हिडिओ पाहण्यासाठी खालील लिंक वर क्लिक करावे.**

https://youtu.be/TvsmZyYXHjM?si=EKywq7CNJAPryjZf


### 3) राष्ट्र संरक्षणाचे धडे म्हणजेच NCC, SPC, RSP-CP आणि स्काऊट गाईड -

शाळेमध्ये विद्यार्थीनींनी देशसेवा अणि रक्षणाचे प्रशिक्षण NCC, स्काउट SPC-student police cadet आणि RSP- CD- Road SAFETY PATROL and CIVIL DEFENCE चे नियमित वर्ग घेतले जातात. मुलींची नियमित कवायत घेतल्या जाते तसेच मुलींचे 10-10 दिवसाचे निवासी शिबीर सुद्धा घेण्यात येतात.

### 4) BaLA - Building As a Learning Aids –

शाळा जुनी असल्यामुळे त्यात नाविन्य आणि जिवंतपणा आणण्यासाठी संपूर्ण शाळेला रंगरंगोटी आणि उपलब्ध शालेय परिसर आणि शालेय भिंत व इमारतीचे शैक्षणिक साहित्य म्हणुन वापर करण्याचा पुरेपुर प्रयत्न केलेला आहे.






**फोटो पाहण्यासाठी खालील लिंक वर क्लिक करावे.**

**http://https://drive.google.com/drive/folders/1vWj1mvOCHniXRceBotcK6-8pdaggDQlG**

## 5) व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन वर्ग

NEP 2020 शाळेमध्ये NSQF आणि निर्देशित व्यावसायिक शिक्षणासाठी Retail management and Beauty wellness हे व्यावसायिक अभ्यासक्रम नियमित चालविले जातात आणि त्यासाठी विविध व्यावसायिक क्षेत्र भेटी जसे.

D-Mart, Next Level अशा ठिकाणी भेटी देणे तथा विविध व्यावसायिकांचे मार्गदर्शन व समुपदेशन सत्रांचे नियमित आयोजन करण्यात येते.



विद्यार्थिनींनी शाळेतच थाटले डिपार्टमेन्टल स्टोअर

अमरावतीच्या जिल्हापरिषद शाळेतील अनोखा उपक्रम

एकाच छताखाली खरेदीचा आनंद

छात्राओं ने पढ़ा व्यावसायिकता का पाठ

रघुवीर प्रतिष्ठान का व्यावसायिक मार्गदर्शन कार्यक्रम

प्रतिनिधि, विदर्भ की दहाड

अमरावती, ११ जुलाई- स्थानीय जिला परिषद कन्या विद्यालय में रिटेल मैनेजमेंट की पढ़ाई कर रही १०वीं कक्षा की छात्राओं को बिजनेस की शुरुआत कैसे करें, तथा व्यवसाय में आने वाले विविध समस्याओं का निवारण कैसे किया जाता है, यह बेहतर ढंग से अमरावती शहर के प्रसिद्ध रघुवीर स्वीट के संचालक दिलीप पोपट द्वारा विशेष मार्गदर्शन किया गया।

उन्होंने बताया कि आज की तनावपूर्ण जिंदगी में सिर्फ नौकरी पर निर्भर रहने की बजाय बिजनेस की ओर रुख करना जारी है। उसी के एक भाग के रुप में गर्ल्स हाईस्कूल में कक्षा ९ वी और १० वी के छात्रों को खुदरा प्रबंधन पर व्यावसायिक पाठ्यक्रम पढ़ाया जाता है। जिसमें छात्रों में व्यवसाय करने के लिए आवश्यक कौशल विकसित किए जा रहे हैं। रघुवीर प्रतिष्ठान के संचालक दिलीप पोपट इन्हें मार्गदर्शन हेतु आमंत्रित किया गया। इस दौरान उन्होंने छात्रों से बातचीत की और बिजनेस को शुरु से शिखर तक ले जाने के लिए क्या प्रयास करने चाहिए और बिजनेस में गुणवत्ता कैसे बनाए रखनी चाहिए, इस पर विशेष मार्गदर्शन दिया।

साथ ही इस अवसर पर प्रेरक वक्ता रिया मनोजा ने २०२४-२५ प्रतिबद्धता का वर्ष विषय पर कक्षा १० के छात्रों का मार्गदर्शन किया। जिसमें उन्होंने परीक्षा की योजना कैसे बनाएं और पढ़ाई और परीक्षा को प्राथमिकता कैसे दें, इस पर मार्गदर्शन दिया। इस अवसर पर रघुवीर ने सभी विद्यार्थियों को उपहार स्वरुप रघुवीर रजिस्टर एवं करेंट अफेयर्स की पुस्तक दी। सम्पूर्ण कार्यक्रम का समन्वयन कुमारी सिब्बल शेख और कुमारी अनुष्का मेश्राम ने किया। कार्यक्रम का आयोजन विद्यालय के व्यवसायिक शिक्षक मंगेश मानकर द्वारा किया गया।

इस समय व्यवसाय शिक्षक मंगेश मानकर ने बताया कि छात्राओं को व्यावसायिकता के गुर अधिक गहराई से अध्ययन हो सके इस लिए हर महीने अनुभवी व्यवसायिक हस्तियों को मार्गदर्शन हेतु विद्यालय में आमंत्रित किया जाता है, ताकि छात्राओं में व्यवसाय प्रति आकर्षण बढ़ सके।

http://https://drive.google.com/drive/folders/1upRmYcD_jN7JzqB9Et8Sqrcst8Tpd23b

## 6) Robotic Dr. A.P.J. Kalam तंत्रज्ञान केंद्र -

शाळेमध्ये विद्यार्थीनीचा सर्वांगिण विकास करण्यासाठी, विविध वैज्ञानिक प्रयोग करण्यासाठी, विविध Robotic प्रयोग करण्यासाठी Dr. APJ Abdul Kalam Robotic प्रयोग शाळा विकसित करण्यासाठी शासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा करून उपलब्ध प्रयोगशाळा उपलब्ध करून घेतली आहे.





**फोटो पाहण्यासाठी खालील लिंक वर क्लिक करावे**

http://https://drive.google.com/drive/folders/1sYlAvbTJHKieNla85O7vu_yH4pVXlMrp

## 7) रविवारी परदेशी वारी

शाळेतील विद्यार्थीनींना परदेशातील शिक्षणपद्धती, खेळ, सण उत्सव, परंपरा आणि भौगोलिक स्थितीचा अभ्यासासाठी शाळेतील उपक्रमशील शिक्षक श्री.विरेंद्र ब्राम्हण सर यांच्या Global Guru या महत्वाकांक्षी प्रकल्पातून रविवारी शाळेच्या सुट्टीच्या दिवशी ऑनलाईन ' रविवारी परदेशी वारी' हा उपक्रम राबवून इतर परदेशातील विविध बाबींची माहिती प्राप्त करण्याची संधी उपलब्ध करू देतात.




**व्हिडिओ पाहण्यासाठी खालील लिंक वर क्लिक करावे**

१) http://https://youtu.be/a6P0BohRTIU?si=L6Py0oruDshky0Fq

२) http://https://youtu.be/d54g6hNS1s?si=r1FeNjraUQ-jkNCv

### 8) 100% डिजीटल शाळा -

शाळेतील प्रत्येक वर्गात Android digital TV लोकसहभातून बसविण्यात आलेल्या आहेत आतापर्यंत ११ TV लोकवर्गणीतून प्राप्त झालेला आहेत. तसेच 2 projector आणि 2 digital touch screen panel बसवून शाळा 100% digital करण्यात आलेली आहे .

### 9) शाळेचा तिसरा डोळा - CCTV

मुलींची शाळा असल्यामुळे मुलींच्या सुरक्षितेसाठी शालेय परिसरात आणि वर्गात CCTV कैमेरा आवश्यक होते त्यासाठी विविध लोकसहभागातून सर्व वर्गात आणि शालेय परिसरात CCTV कैमेरे लावण्यात आले आहेत.

### 10) यशस्वी व्यक्ती - मुलाखत सत्र

विद्यार्थीनींना विद्यार्थी वयातच विविध स्पर्धा परिक्षेची माहिती मिळावी म्हणून UPSC, MPSC सारख्या परिक्षेतून पास झालेल्या व यशस्वी व्यक्तींची मुलाखत घेण्याचा उपक्रम शाळेचे मुख्याध्यापक श्री धनंजय वानखडे सर आणि उपक्रमशील शिक्षक श्री. विरेंद्र ब्राम्हण सर यांच्या मार्फत चालविल्या जातो.



**व्हिडिओ पाहण्यासाठी खालील लिंक वर क्लिक करावे.**

**http://https://youtu.be/IGH5ccZ1QcY?si=EfaPrIE-ABL_bKPX**

11) **माझी अदययावत तंत्रज्ञानयुक्त संगणक प्रयोगशाळा**

शाळेमध्ये विद्यार्थीनींच्या तंत्रज्ञानयुक्त शिक्षणासाठी अद्ययावत 50 संगणकयुक्त प्रयोगशाळा उपलब्ध झाली असून त्यामध्ये विद्यार्थीनीना ms-word, ms- Excel, Power point चे प्रशिक्षण वर्ग नियमित घेण्यात येतात.

**फोटो पाहण्यासाठी खालील लिंक वर क्लिक करावे**

**http://https://drive.google.com/drive/folders/1rhSI2TVXZXD2IRL9SsKv2hKsDImw-qKe**

**फलनिष्पत्ती**

1. मागील वर्षी मुख्यमंत्री 'माझी शाळा सुंदर शाळा अभियान टप्पा क्रमांक १ मध्ये शाळेने जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त केला असून टप्पा क्र. २ मध्ये शाळेची राज्यस्तरीय तपासणी होवून शाळेने विभाग स्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त करून राज्याच्या मा. मुख्यमंत्री आणि मा. शिक्षणमंत्री यांनी मुंबई येथे 21 लक्ष रुपयाचे पुरस्कार देवून सत्कार करण्यात आला आहे.
2. शाळेमध्ये NSQF अभ्यासक्रम असून Retail managementt आणि Beauty Wellness अभ्यासक्रम यशस्वीरित्या राबविला जात आहे.
3. शाळेत विद्यार्थी वाचनालय, आनंददायी शनिवार, BaLA नुसार रंगरंगोटी असे उपक्रम राबविले जात आहे.
4. वर्ग 5 वी ते 10 वीच्या विद्यार्थीनीसाठी VR Glasses Virtual Reality यानुसार उपलब्ध असुन सर्व विद्यार्थीनीं यानुसार शिक्षण घेत आहे.
5. शाळेतील विविध बाबीची पुर्तता व्हावी यासाठी आजपर्यंत 8,50,000 पर्यंत लोकसहभागातून निधी जमा केली असून CCTV कैमेरे आणि मुलीसाठी Ro- UV युक्त पाण्याची व्यवस्था केली आहे.
6. शाळेत पर्यावरण पुरक संवर्धनासाठी परसबाग आणि 'हरितसेना' अंतर्गत 'पर्यावरण मंडळ' स्थापन करून परसबाग व परिसरातील इतर झाडांचे नियंत्रण, संवर्धन केल्या जाते.

**शाळेची यशोगाथा पाहण्यासाठी खालील लिंक वर क्लिक करावे.**

**https://youtu.be/wKVRCfPfOI?si=pXzmtgmqPIKuL_9i**

**http://https://www.youtube.com/watch?v=lsNFsInUGTY**

http://https://drive.google.com/drive/folders/1tPQ2bfEkbaAsYcFv3m_7_A669QEOgnVa

http://https://drive.google.com/drive/folders/1vWj1mvOCHniXRceBotcK6-8pdaggDQlG



**समारोप -**

अशाप्रकारे शाळेने 'माझी शाळा ,सुंदर शाळा, शासकीय मुलींची शाळा' म्हणून विविध स्तरावर अव्वल ठरून असून शाळेने आपले वैभव टिकवून ठेवले आहे. यासाठी शाळेचे मुख्याध्यापक तथा सर्व शिक्षक विद्यार्थीनींच्या सर्वांगिण विकासासाठी प्रयत्नशील आहेत.

----------**----------

# "भौतिक सुविधांद्वारे कायापालट दर्शविणारी शाळा"

## शाळेचे नाव व पत्ता - राष्ट्रीय शेतकी विद्यालय, खोलापूर, ता.भातकुली, जि.अमरावती

**शाळेचा ईमेल आयडी** - rsvkf33@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री. गजानन नागोरावजी मानकर
**मोबाईल क्रमांक** - 9860334742
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - gnmankar71@gmail.com

"फळा फुलांचा मळा पाहिजे,आनंदाचा सोहळा पाहिजे,गावात एक आदर्श शाळा पाहिजे." हे स्वप्न किंवा ध्येय शिक्षण क्षेत्रात कार्य करणाऱ्या प्रत्येक मुख्याध्यापक, शिक्षक तथा कर्मचारी यांचे असणे स्वाभाविक आहे. परंतु प्रत्येक ठिकाणी परिस्थिती भिन्न स्वरुपाची असल्याने शाळेच्या विकासामध्ये विविधता दिसून येते. साधारण सहा वर्षापूर्वी शाळेचे मुख्याध्यापक पद स्विकारण्यास ज्येष्ठ शिक्षकांचा नकार आल्याने संस्थेने अचानक कनिष्ठ असणाऱ्या शिक्षकाकडे मुख्याध्यापक पदाची जबाबदारी दिली. त्यानंतर एक आदर्श शाळा निर्मितीचे स्वप्न, एक विकासात्मक ब्ल्यू प्रिंट निर्मितीचे काम शाळेमध्ये अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये सुरु झाले.

या अत्यंत ताणतणावाचे काळात शांतपणे प्रथम शाळेतील समस्यांची यादी तयार करण्यात आली. या समस्या सोडविण्याचे स्रोत, कालावधी याचे अंदाजपत्रक (आराखडा) तयार करण्यात आले. शाळासिद्धीमध्ये प्रशिक्षक ते निर्धारक या भूमिकेवर काम केले असल्याने शाळेची सर्वांग गुणवत्ता वाढीसाठी शाळासिद्धी च्या सुधारणेच्या नियोजना नुसार एक ब्ल्यू प्रिंट तयार करण्यात आली. टापर शिक्षण संस्था खोलापूर द्वारा संचालित एकमेव राष्ट्रीय शेतकी शाळेची स्थापना १९५३ आणि इमारत बांधकाम १९५६ ला झालेले असल्याने,शाळेची काळवंडलेली जुनी नादुरुस्त इमारत, छतावरील काळे गळके टीन, दुरुस्तीच्या पलीकडे तुटलेल्या खिडक्या- दारे, उजाड परिसर, शालेय परिसरात वाढलेले गवत- काटेरी झुडपे, सुरक्षा भिंत- कुंपण अभाव, कमकुवत भौतिक सुविधा, शाळेतील एकूण उदासीनता त्यामुळे विद्यार्थी पटसंख्येमध्ये झालेली झपाट्याने घसरण, पालकांमध्ये शाळेविषयी अनास्था, संस्थेचे दुर्लक्ष इत्यादी समस्येमुळे एक आदर्श शाळा निर्मितीचे हे आव्हान पुन्हा सर्व सहकाऱ्यांना सोबत घेवून पेलण्याचे ठरविले.

**१.शालेय परिसर स्वच्छता -** शाळेचा प्रथम दर्शनी असलेला प्रवेश मार्ग तसेच शालेय परिसर मध्ये मोठ्या प्रमाणात गवत आणि काटेरी झुडपे वाढलेले असल्याने परिसरात मोकाट जनावरांचा प्रचंड त्रास तसेच विद्यार्थ्यांना खेळण्याचे मैदान नसल्यामुळे प्रथम सदर परिसर स्वच्छ करण्याकरिता लोकसहभागातून पालक श्री राम शेटे यांच्या ट्रॅक्टरचे माध्यमातून परिसराची वखरणी करून घेतली. मजुरांकडून काटेरी झुडपे तोडून परिसर स्वच्छ करण्यात आला. दोन गाडी विटांचा चुरा प्रवेश द्वाराजवळ पसरवून प्रवेश अडथळा मुक्त करण्यात आला. स्वच्छ झालेल्या परिसरामध्ये क्रीडा मैदान आखण्यात आले.












**२.शालेय इमारत सुशोभीकरण** - शाळेची इमारत सुंदर दिसावी याकरिता काळवंडलेल्या इमारतीला चुना रंग देण्यात आला. संस्थेकडे इमारत दुरुस्ती आणि छताचे टीन बदलविण्याबाबत निवेदन देण्यात आले , शाळा समिती मध्ये ठराव घेण्यात आला. एकंदरीत शाळेचा विकास बघून संस्थेने पुढाकार घेत नवीन प्लास्टरसह संपूर्ण इमारतीची संपूर्ण दुरुस्ती आणि छतावरील टीन बदलविले. कर्मचारी वृंद यांचे आर्थिक सहकार्यातून रंगरंगोटी करण्यात आली. शाळेचे कलाशिक्षक श्री.ठवरे यांनी भिंतीवर बोलकी चित्रे रेखाटली, प्रेरणादायी सुविचार लिहिले. शाळेची इमारत आकर्षक आणि सुंदर झाली.










**३.सुरक्षा भिंत / कुंपण** - शाळेला कुंपण नसल्याने शाळा संपल्यानंतर गावातील काही व्यसनी आणि कुप्रवृत्तीचे लोक शाळेत वावरत असल्याचे लक्षात आले.शाळेतील काही वस्तू चोरी गेल्याचे आढळून आले तेव्हा पोलीस स्टेशन कडे गेल्यानंतर त्यांनी प्रथम शाळेला आवार बंदोबस्त करण्याचा सल्ला दिला. त्यानंतर शाळेला प्राप्त झालेल्या वेतनेत्तर अनुदान मधून शाळेच्या परिसर तथा वर्ग खोली मध्ये एकूण १५ CCTV कॅमेरे लावण्याचा निर्णय शाळा समितीमध्ये घेण्यात आला. दरम्यान मा.शिक्षणाधिकारी श्रीमती टाके मॅडम यांची शाळेला भेट झाली. त्यांनी शाळेचे कार्य बघून

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालया कडून मिळणारे अनुदान विषयी माहिती दिली आणि शिफारस सुद्धा केली. त्यामुळे शाळेच्या सुरक्षा भिंत व कुंपण करिता मिळालेल्या अनुदानातून सुंदर प्रवेशद्वार, सुरक्षा भिंत आणि परिसराला संपूर्ण दुहेरी कुंपण निर्माण झाले. तसेच व्यायाम शाळा याकरिता मिळालेल्या अनुदानातून दोन खोल्यांचे बांधकाम करण्यात आले. सुरक्षा भिंत आणि CCTV कॅमेरे यामुळे शाळा सुरक्षित झाली.











**४.वृक्षारोपण** - शाळा ही टेकडीवर असल्याने निसर्ग सौंदर्यात भर घालण्या करीता हिरवळ अत्यंत महत्वाची होती त्यामुळे टेकडी व शाळेचा उजाड परिसर वृक्षारोपण करून हिरवा करण्याचे ठरविले. त्यानुसार सामाजिक वनीकरण विभाग यांचे योजनेमधून दरवर्षी २०० वृक्ष याप्रमाणे साधारण तीन - चार वर्षात जवळपास ६०० वृक्षांचे रोपण आणि संवर्धन करण्यात आले. शालेय परिसराचे सहा परिसर (झोन) मध्ये वाटप करून प्रत्येक झोन वर्गाचे नावे करण्यात आला. त्या वर्ग परिसरातील वृक्ष त्याच वर्गातील विद्यार्थ्यांना संवर्धन करण्याकरिता दत्तक देण्यात आले. आज या वृक्षांमुळे शाळा हिरवीगार झाली असून खऱ्या अर्थाने सुंदर झाली आहे.










**५.विद्यार्थी गणवेश -** सध्या पालकांचे आकर्षण शालेय इमारत, विद्यार्थी गणवेष, इंग्रजी माध्यम इत्यादी घटकाकडे अधिक असल्याने शाळेतील विद्यार्थ्यांचा जुना गणवेष जो होता त्यात बदल करण्याचा विचार सुरु झाला, याकरिता सेवानिवृत्त शिक्षक श्री नवले सर यांचेकडे भेटीला गेल्यानंतर विद्यार्थी गणवेश बाबत चर्चा झाली आणि त्यांचे कडून शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना रु.५१,०००/- देणगीमधून नवीन आकर्षक गणवेश (टाय,बेल्ट सह) प्राप्त झाले. त्या नंतर शाळेचे १५ वर्षापूर्वी सेवानिवृत्त झालेले माजी मुख्याध्यापक श्री पांडेसर शाळेत आले आणि त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना सॉक्स आणि शूज करिता रु. ११,०००/- देणगी दिली. शाळेतील विद्यार्थ्यांचा पेहरावात बदल झाला. विद्यार्थ्यांना आणि पालकांना नवीन गणवेश खूप आवडला. शिक्षकांनाही ड्रेस कोड सुरु झाला. हळूहळू शाळेचे अंतरंग आणि बाह्यांग यात लक्षणीय बदल झाला.

**६.शालेय अभिलेखे व्यवस्थापन -** शाळेच्या स्थापनेपासून सर्व दस्तावेज विखुरलेल्या तथा जीर्ण अवस्थेत असल्याने वेळेवर कुठलेच रेकॉर्ड व्यवस्थित दिसत नव्हते. तसेच शाळेतील लिपिक सेवानिवृत्त झाल्याने काम करतांना खूप अडचण होती. योगायोगाने कोविड कालावधीत लॉक डाऊन असल्याने तो वेळ








शाळेतील विविध कामे करण्याकरिता सर्वांना उपयोगी आला. कार्यालयातील खूप जुने अनावश्यक कागदपत्रे तपासून नष्ट करण्यात आले तर आवश्यक दस्तावेज वर्गीकरण करून सुंदर फायलिंग करण्यात आले आणि एक सुंदर शालेय अभिलेखांचे योग्य व्यवस्थापन झाल्यामुळे प्रशासन गतिमान झाले आणि जिल्ह्यातील अनेक शाळांना आमच्या शाळेतील शालेय अभिलेखे व्यवस्थापन मार्गदर्शक ठरले











**७.पेय जल व्यवस्था व HAND WASH स्टेशन-** शाळेतील पिण्याचे पाणी साठवण टाकी बाहेर उघड्यावर तसेच लिकेज मुळे गळकी होती तसेच झाकण तुटके असल्याने त्यामधील पाणी स्वच्छ व शुद्ध असल्याची खात्री नव्हती. याकरिता शाळेचे माजी विद्यार्थी से.नि.इंजीनिअर श्री मोहोड यांनी पाणी साठवण करिता दोन सिंटेक्स टाकी दिल्या. शाळेचे से.नि.,क.लिपिक यांनी सेवानिवृत्ती निमित्त शाळेला पिण्याचे पाणी शुद्धीकरण करिता RO सिस्टीम भेट दिली तसेच माजी विद्यार्थिनी कु. राधिका झंवर हिने शाळेला पाण्याचा कुलर भेट दिला. त्यामुळे विद्यार्थ्यांना सुरक्षित, शुद्ध व स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध झाले. जुन्या पाणी साठवण टाकीवर एक सिंटेक्स टाकी बसवून त्याचे रुपांतर Hand Wash स्टेशन मध्ये करण्यात आले.










**८.डीजीटल वर्गखोली व आय सी टी लॅब** - माजी विद्यार्थी तथा उद्योजक सिद्धार्थ वासनिक यांनी शाळेतील बंद पडलेल्या आय सी टी लॅब करिता पाच CPU (रु.५०,०००/-) भेट दिले, माजी विद्यार्थिनी कु. राधिका झंवर हिने शाळेला दोन मोठे स्मार्ट TV (रु.४६,०००/-) भेट दिले तसेच माजी विद्यार्थी महेंद्र भटकर यांनी शाळेला प्रोजेक्टर रु.४०,०००/- भेट दिला. त्यामुळे विद्यार्थ्यांकरिता डिजिटल अध्यापन कार्य सुरु झाले. शाळेमध्ये लोक सहभागातून समाज शिक्षक उन्हाळी सुटी मध्ये विद्यार्थ्यांकरिता एक महिना संगणक बेसिक कोर्स मोफत चालवितात.

**९.ग्रंथालय** - ग्रंथालयातील पुस्तके अनेक दिवसांपासून वापरात नसल्याने ग्रंथालयातील बहुतांश पुस्तके वाळवी लागून खराब झाले त्यामुळे त्यांना रीतसर नष्ट करण्यात आले. शाळेच्या ग्रंथालय समृद्ध करण्याकरिता शाळेतील शिक्षकांनी घरची अडगळीत पडलेली वाचनीय पुस्तके भेट देण्याबाबत आवाहन केले असता अतिशय सुंदर आणि वाचनीय पुस्तके , संदर्भ पुस्तके गोळा झाली. तसेच शिक्षण प्रेमी श्री श्रीनाथ वानखडे (रु.१०००/-), कु.योगिता मोहोड रु.५००/-

मुख्याध्यापिका इंदिरा कन्या विद्यालय (रु.५००/-) यांचे कडून ग्रंथालयाला पुस्तके प्राप्त झाल्यामुळे शाळेचे ग्रंथालय समृद्ध झाले. शाळेत विद्यार्थ्यांकरिता वाचन कोपरे तयार करण्यात आले आणि ग्रंथालयाचा दैनंदिन वापर वाढला.












**१०.स्वच्छता गृहे** - शाळेतील स्वच्छतागृहे खूप जुनी तथा वापरासाठी पाण्याची व्यवस्था नसल्याने अस्वच्छ होते. याकरिता माजी विद्यार्थिनी कु. निलिमा राजने यांनी शाळेला स्वच्छता गृहाचे अद्ययावतीकरण करिता र.११,०००/- देणगी दिली. तसेच पालक श्री रहिमभाई यांनी त्यांचे दुकानातील टाईल्स अत्यल्प किंमतीमध्ये दिल्या. त्यामुळे सर्व स्वच्छतागृहांना स्वतंत्र पाणी टाकी, टाईल्स व बेसिन सह पाण्याची व्यवस्था झाल्याने सुंदर व स्वच्छ स्वच्छतागृहे तयार झालीत.






**११. वर्गखोली सजावट** - माजी विद्यार्थी श्री निलेश काळे कडून प्राप्त रु.११,०००/- चे ऑईल पेंट द्वारे वर्गातील प्रत्येक फर्निचर ला शिपायांनी पेंट देवून वर्ग सुशोभित केले. शाळेतील प्रत्येक लोखंडी तथा लाकडी फर्निचर रंग दिल्याने नविन झाले. वर्गामध्ये अभ्यासपुरक विविध तक्ते, फ्लेक्स काही क्राफ्ट नमुने लावण्यात आले. माजी विद्यार्थिनी कु.निलिमा राजने कडून भेट मिळालेले ग्रीन बोर्ड वर्गात लावण्यात आले. माजी विद्यार्थी तथा से,नि.पोलीस निरीक्षक श्री सुभाष पोतदार यांचेकडून ६ फॅन तसेच श्री.मनीष मेटकर यांचेकडून ३ पंखे शाळेला भेट मिळाले ते पंखे प्रत्येक वर्गात लावण्यात आले. प्रत्येक वर्गखोलीमध्ये इलेक्ट्रिक फिटिंग करण्यात आली. एक कपाट ठेवण्यात आले. आणि वर्ग सर्वांग सुंदर झाले.






**१२.शाळेच्या प्रथम दर्शनी भागाचे सुशोभीकरण** - शाळेचे माजी विद्यार्थी श्री. उदय शाह यांनी शाळेच्या व्हरांड्याला ७१,०००/- रु देणगीमधून टाईल्स लावून दिल्या. माजी विद्यार्थी श्री सिद्धार्थ वासनिक यांनी पायऱ्यांना टाईल्स व परिसराचे सौंदर्यीकरण (रु. १,००,०००/-) करिता योगदान दिले. शाळेच्या सर्व टीम कडून आता चुना रंग नव्हे तर ऑईल पेंट द्वारे शालेय इमारत रंगविण्यात आली. शाळेचे कला शिक्षक श्री. ठवरेसर आता खऱ्या अर्थाने कलाकार म्हणून पुढे आले आणि आपल्यामधील कल्पक कलाकृतीने शाळेचा चेहरा मोहरा त्यांनी बदलविला. प्रेरणादायी विचार आणि आकर्षक पेंटिंग काढून भिंती बोलक्या केल्या. शाळेचा प्रथम दर्शनी उजाड असलेला भाग त्यांनी सुंदर शिल्प तथा आकर्षक पेंटिंग द्वारे सुशोभित केला आणि शाळेत प्रवेश केल्यानंतर वेलकम पॉइंटची जागा सेल्फी पॉइंटने घेतली. आज शाळेत आलेले प्रत्येक व्हिजीटर तेथे सेल्फी घेण्याचा मोह आवरू शकत नाही.










**१३. परसबाग व फळबाग** - शाळेच्या परिसरामध्ये परस बाग निर्माण करण्यात आली आहे. या परसबागेमधून शालेय पोषण आहार करिता भाजीपाला पिकविला जातो. मागील सत्रात आमच्या परसबागेला तालुक्यातून प्रथम क्रमांक प्राप्त झाला. शाळेमध्ये पाच वर्षापूर्वी लागवड केलेली पेरू आणि सीताफळ बाग आहेत. सध्या सीताफळ बागेत भरपूर फळ आलेले आहेत.






**१४. जलसंधारण** - शाळा टेकडीवर असल्याने पावसाचे पाणी वाहून जातांना पावसाचे पाण्यासोबत माती सुद्धा मोठ्या प्रमाणात वाहून जाते. याकरिता उताराचे भागात दोन मोठे शोष खड्डे तयार करण्यात आले. यामध्ये पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात जमा होवून, "पाणी अडवा, पाणी जिरवा" यानुसार शाळेत जलसंधारणाचे काम केले जाते.





**१५.लोकसहभाग** - शाळेमध्ये विविध उपक्रम सातत्याने राबविणे सुरु असल्याने शाळेतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत सुद्धा वाढ झाल्याचे दिसून येते. NMMS परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा, रेखाकला परीक्षा मध्ये दरवर्षी विद्यार्थी गुणवत्तेत उत्तीर्ण होत आहे. गावामध्ये शाळेविषयी सकारात्मक वातावरण निर्माण झाल्याने विद्यार्थी पटसंख्येत सहा वर्षापासून सातत्याने वाढ सुरु आहे. शाळेच्या स्नेह संमेलनामध्ये सर्व माजी शिक्षक, मुख्याध्यापक तथा माजी विद्यार्थी यांना निमंत्रित करून मेळावा घेण्यात आला. श्री.हातगावकर यांनी शाळेला एक लाख रुपये पारितोषिक प्रयोजनार्थ देणगी दिली.शाळेचे से.नि.शिक्षक श्री कंडाळे सर यांनी त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्त् विद्यार्थ्यांना पारितोषिक प्रयोजनार्थ रु.२१,०००/- देणगी दिली. श्री.तन्मय टापर यांनी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना आकर्षक स्कूल बॅग भेट दिल्या.याशिवाय संपूर्ण परिसरातील फुलांच्या कुंड्या, खेळांचे साहित्यासह सुसज्ज मैदाने, अद्ययावत प्रयोग शाळा, ग्रंथालय, वाचन कोपरे, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, नियमित आरोग्य तपासणी, पौष्टिक पोषण आहार, शुद्ध व स्वच्छ पिण्याचे पाणी, डिजिटल वर्ग खोल्या, स्वच्छ व सुंदर परिसर या सर्व भौतिक सुविधे सोबत शालेय अध्यापन परिणामकारक होण्याचे दृष्टीने गावातील उच्च शिक्षित माजी विद्यार्थी यांचा अध्यापनाकरीता मोलाचा वाटा आहे. सेवानिवृत्तीमुळे निम्म्या रिक्त जागेवर समाज शिक्षक कार्यरत आहेत. "मुख्यमंत्री माझी शाळा,सुंदर शाळा" याकरिता मागील सत्रामध्ये तालुक्यामधून तृतीय तर या सत्रामध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त झाला आहे.

**अपनी दौड ! ना किसीसे ईर्ष्या ना किसी से होड, मेरी अपनी मंजिले, मेरी**



सकाळ

लोकसहभागातून पालटला शाळेचा चेहरामोहरा

शाळासिद्धी : कोरोना काळात केले संधीचे सोने



---**----------

# "ग्रामिण भागात रुजविली क्रीडा संस्कृती- घडवले हजारो खेळाडू
# क्रीडा सहभागातील राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त शाळा"

**शाळेचे नाव व पत्ता - चंद्रभानजी विद्यालय, कुंड सर्जापूर, ता.जि.अमरावती**

**शाळेचा ईमेल आयडी -** chandrabhanjividyalaya@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव -** श्री.एन.टी.चव्हाण
**मोबाईल क्रमांक -** 9860865310/7972401776
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी -** namdeo.chavan321@gmail.com

**प्रस्तावना -**

परिस्थिती हलाखीची, मजुरीच्या भरवशावर कुटुंबाचे पोषण करताना निदान लिहिता वाचता यावं म्हणून मुलांना शाळेत पाठवणाऱ्या ग्रामीण भागातील पालकांची मुलं केवळ लिहायला आणि वाचायलाच शिकली नाही तर विविध खेळाच्या माध्यमातून राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील मैदान गाजवायला लागली आहेत. तसेच खेळाच्या भरवशावर त्यांनी सरकारी नोकरीत देखील जागा पटकाविली आहे. अमरावतीपासून १५ किलोमिटर अंतरावर असलेल्या कुंड सर्जापूर या गावात ही क्रीडा संस्कृती निर्माण झाली आहे.

**शाळा व गावाची ओळख -**

- पेढी नदीच्या काठावर वसलेल्या कुंड सर्जापूर या गावात पुरातन श्रीराम मंदिर आहे. या मंदिराच्या ट्रस्टी व तत्कालीन अध्यक्ष स्व. रावसाहेब उपाख्य भगवंतराव इंगोले यांच्या उदात्त हेतूने जवळपासच्या गावातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय व्हावी या दृष्टीने १९६९ साली चंद्रभानजी विद्यालयाची स्थापना केली.
- काही वर्ष शाळा मंदिरात चालली त्यानंतर मंदिराचे ट्रस्टी श्री श्यामपंत व रमेशदादा बहाळे यांनी दिलेल्या जागेत शाळा बांधण्यात आली. कुंड सर्जापूर गावाच्या लगतच्या कुंड खुर्द, वनारसी, सावरखेड, अळणगाव, सुकळी, हातुर्णा, सातुर्णा, गोपगव्हाण आदी ८ गावातील विद्यार्थ्यांना इयत्ता ५ ते १० वी पर्यंतच्या शिक्षणाची सोय झाली.
- एका सार्वजनिक मंदिराच्या माध्यमातून गरिब विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय झाली ही या लहानशा गावातील अजून एक विशेष बाब.
- शाळा सुरु झाली, या शाळेत इतर शिक्षक होते मात्र क्रीडा शिक्षक नसल्याने शाळेतील विद्यार्थ्यांना खेळाचा गंध नव्हता. २००७ मध्ये या शाळेत क्रीडा शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली व त्यानंतर मात्र या शाळेने क्रीडा क्षेत्रात एक वेगळा ठसा उमटविला. ज्या शाळेत तालुकास्तरावर विद्यार्थी खेळला नव्हता त्या शाळेत आज शासनाच्या शालेय क्रीडा स्पर्धेत ९०० हून अधिक विद्यार्थी राज्यस्तरावर, १०० हून अधिक विद्यार्थी राष्ट्रीय स्तरावर तर २ हजारावरून अधिक खेळाडू विभाग व जिल्हास्तरावर खेळले आहे. तर सॉफबॉल व बेसबॉल क्रीडा संघटनांच्या विविध गटातील स्पर्धेत सुध्दा येथील खेळाडूंनी आपला पताका फडकविला आहे.

**क्रीडा शिक्षकाच्या मेहनतीचे फळ -**

- कुंड सर्जापूर येथील चंद्रभानजी विद्यालयात २००७ मध्ये राष्ट्रीय पातळीवरील जलतरणपटू असणारे, शरद गढीकर हे क्रीडा शिक्षक म्हणून रुजू झाले. इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना खेळाची आवड लावण्यासाठी त्यांनी पहिल्या वर्षीपासूनच प्रयत्न सुरू केले. मुख्याध्यापक व इतर शिक्षकांनी सुध्दा या शिबीराला सहकार्य केले.
- पहिल्याच वर्षी उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये त्यांनी सॉफटबॉल, बेसबॉल, खो-खो , कबड्डी या खेळांचे महिनाभराचे शिबिर शाळेच्या पटांगणात भरवले. या शिबिराला विद्यार्थ्यांनी आनंदाने प्रतिसाद दिला.
- विशेष म्हणजे या उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिरासाठी क्रीडा शिक्षकाने स्वतःच्या खिशातून खर्च करतात. उन्हाळी क्रीडा शिबिराची परंपरा ही आजपर्यंत या शाळेत कायम आहे. वर्षभर खेळासंदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असतानाच क्रीडा शिबिराच्या माध्यमातून गावात उत्कृष्ट खेळाडू निर्माण करण्याचं काम शाळा करत आहेत.

**सॉफ्टबॉल, बेसबॉल ही शाळेची ओळख -**

- या शाळेमध्ये कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, रिंग टेनिस, सॉफबॉल, बेसबॉल अशा खेळांमध्ये विद्यार्थी तयार व्हायला लागलेत. विद्यार्थ्यांचा सॉफटबॉल आणि बेसबॉल या खेळातील अधिक इंटरेस्ट पाहता या खेळावर अधिक भर दिला. यामुळंच विभागीय, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या शालेय क्रीडा स्पर्धेत सोफ्टबॉल आणि बेसबॉल या खेळ प्रकारात बाजी मारणारी शाळा म्हणून कुंड सर्जापूरच्या शाळेची ओळख निर्माण झाली आहे.

**शाळेतील ४० विद्यार्थी शासकीय सेवेत -**

- २००७ पासून आतापर्यंत या शाळेत विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेली खेळाची आवड पाहता ९०० विद्यार्थी हे राज्य पातळीवर आणि ६४ विद्यार्थी हे राष्ट्रीय पातळीवर गेले आहेत. या शाळेत विविध खेळांमध्ये तयार झालेल्या विद्यार्थ्यांनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या सॉफटबॉल आणि बेसबॉल या संघात कर्णधार म्हणून प्रतिनिधित्व केलं आहे.
- अमरावती विद्यापीठाच्या विविध खेळांमध्ये या शाळेत तयार झालेले एकूण २५ विद्यार्थी आंतर विद्यापीठ स्पर्धेत चमकले आहेत.अतिशय गरीब कुटुंबातून येणाऱ्या या विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रात घेतलेल्या उंच भरारीमुळं शासकीय सेवेत देखील सहज जागा मिळाल्या आहेत. या शाळेतील विद्यार्थी पोलीस निरीक्षक, लेखा अधिकारी म्हणून रुजू झाले आहेत. तर 35 विद्यार्थी हे पोलीस दल आणि शासनाच्या विविध विभागात नोकरीत लागले आहेत.
- एक हजाराच्या आसपास लोकसंख्या असणाऱ्या कुंड सर्जापूर गावात सुरुवातीला मुलांना खेळण्यासाठी प्रेरित केले असता त्यांच्या आई-वडिलांचा विशेष असा प्रतिसाद मिळत नव्हता. आज मात्र, शिक्षणासोबतच खेळल्याने परिस्थिती पालटेल असा विश्वास पालकांमध्ये निर्माण झाला. खरंतर अनेकदा विद्यार्थ्यांना प्रेरणा व पाठपुरावा करून खेळामध्ये सहभाग घ्यायला लावायचा.
- प्रसंगी पालकांचा रोष देखील पत्करावा लागायचा, आज मात्र कुंड सर्जापूरसह लगतच्या सर्व आठही गावांमध्ये पालक मुलाला चांगला क्रीडापटू म्हणून तयार करा असे सांगायला लागले आहे. शाळेतील अनेक विद्यार्थ्यांना शासनाच्या क्रीडा शिष्यवृत्तीचा लाभ मिळाला आहे. त्यामुळे पालक व विद्यार्थी क्रीडा क्षेत्राकडे करीअर म्हणून बघत आहे.

**पदाधिकारी व शिक्षकांचा सहभाग -**

- श्रीराम मंदिर ट्रस्टचे व शाळा समितीचे अध्यक्ष दिलीपबाबू इंगोले हे स्वतः व्हॉलीबॉल या खेळाचे नावाजलेले खेळाडू. या खेळातील महाराष्ट्र शासनाचा सर्वोच्च श्री शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार त्यांना प्राप्त झाला आहे. त्यामुळे त्यांची खेळाप्रति विशेष रुची. त्यामुळे जे-जे चांगले करता येईल यासाठी त्यांनी व संस्थेचे पदाधिकारी व इतर शिक्षकांनी सहकार्य व प्रोत्साहन दिले. त्याची फलश्रुती म्हणजे चंद्रभानजी विद्यालय, कुंड सर्जापूर च्या विद्यार्थ्यांचे हे यश होय.

**यावर्षी देखील ५ संघ राज्यस्तरावर -**

- चंद्रभानजी विद्यालयाने आपल्या दैदिप्यमान यशाची परंपरा कायम राखीत यावर्षी सन २०२४-२५ मध्ये सुध्दा सॉफटबॉल, बेसबॉल या खेळात १४ व १७ वर्ष वयोगटातील मुले व मुलींच्या एकूण 5 संघ निवड राज्यस्तरावर झाली आहे. विभागीय स्पर्धेत विभागातील सर्व संघांना धुळ चारीत या संघाने अजिंक्यपद पटकाविले आहे. या माध्यमातून यावर्षी एकूण ८० विद्यार्थी राज्यस्तरावर खेळत आहे. यातूनच राष्ट्रीय स्पर्धेत सुध्दा या विद्यार्थ्यांची निवड होणार आहे.





शिक्षक सराव घेतांना



नजी विद्यालयाचे तिहे

बेसबॉल स्पर्धेत तिन संघ राज्यस्तरावर

रचे क्रीडा प्रशिक्षण शिबीर म्हणजे खेळाडू घडा

ग्रालयात क्रीडा प्रशिक्षण शिबीराचा समारोप मान्यवरांचे प्रतिपादन, क्रीडा प्रात्याक्षिके, विविध

शेतकऱ्यांच्या पाठीव
राज्यस्तरीय राजीव गां

२१ मे २०२२
भव्य पुरस्कार

क्रीडा सहभागातील वृत्तपत्रातील नोंद




**क्रीडा सहभागातील राज्यस्तरीय पुरस्कार स्वीकारताना**

----------**----------

# “माणिकपूर आश्रम शाळेची यशोगाथा,तिमिरातूनी तेजाकडे”

**शाळेचे नाव व पत्ता - शासकीय माध्यमिक आश्रम शाळा, माणिकपूर, ता.वरुड, जि.अमरावती**

**शाळेचा ईमेल आयडी** - asmanikpur@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.जी.बी.तेलमोरे
**मोबाईल क्रमांक** - ९४२१०१७७२०
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - asmanikpur@gmail.com

**आम्ही गुणवत्ता पाहून विद्यार्थ्यांना प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थीमध्ये गुणवत्ता निर्माण करण्यासाठी प्रयत्न करतो !**

**प्रास्ताविक –**

**विद्यार्थी हा शाळेचा नकाशा | शाळेवरून देशाची परीक्षा |**

वरील ओळी जो संदेश देतात तो खरच खुप बहुमोलाचा आहे, कारण विद्यार्थी हा शाळेचा आत्मा आहे आणि आमच्या शाळेचा आत्माच निघुन चालला होता तेव्हा एक चमत्कार झाला. कधी काळी ४०० च्या वर पटसंख्या असणारी आमची आश्रम शाळा ही कोरोना काळानंतर १३० च्या पटसंख्येवर आली होती म्हणजे ज्यामुळे शाळेचे अस्तित्व आहे ते विद्यार्थीच शाळेमधून कमी होत चालले होते. माणूस शरीराने थकलेला असला तर चालेल पण तो मनाने थकता कामा नये. अश्या थकलेल्या प्रशासनात नवसंजीवनी ओतण्याचे काम केले ते श्री.जी.बी.तेलमोरे सर यांनी. मे २०२२ मधे सर शाळेवर रुजू झाले त्यांनी शाळेचा कायापालट करण्याचा विडा उचलला. सर्वप्रथम त्यांनी शाळेची पूर्व तपासणी केली आणि त्यांना पटसंख्येची जी कमतरता दिसून आली त्यानंतर त्यांनी काम करायला सुरुवात केली ती पुढील प्रमाणे...

**पटनोंदणी व नियमित उपस्थिती (शाळेचा पुनर्जन्म) -**

शाळेची अवस्था सुधारण्यासाठी श्री.तेलमोरे सर यांनी सर्व शिक्षक वर्ग आणि इतर कर्मचारी यांची बैठक घेतली. विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्याचे ठरविले. यामध्ये गावभेटी, शिक्षण जागृती रॅली आणि पालक सभा यावर जास्त भर देण्यात आला. यावर्षीचा प्रवेशोत्सव हा आमच्या धारणी प्रकल्पामध्ये सर्वात जास्त उपस्थिती असणारा प्रवेशोत्सव झाला. बुडत्याला काठीचा सहारा या उक्तीप्रमाणे जे जे शक्य ते सर्व प्रयत्न शिक्षकांनी केले आणि आज ती पटसंख्या २२७ पर्यंत पोहचली आहे. पुढल्या वर्षी हा आकडा ३०० पार न्यायचा अट्टाहास आम्हा सर्व शिक्षकवृंदांचा आहे.



**कला क्षेत्रातील यश –**

एक तरी अंगी असावी कला... नाही तर काय फूका जन्मला. प्रत्येक विद्यार्थांच्या अंगी काही तरी कलागुण असतात. त्यांना बाहेर काढण्याचे, उभारी देण्याचे काम ही शाळा करीत असते. वरील उक्ती प्रमाणे आमच्या आदिवासी विद्यार्थ्यांमधील त्यांच्या ज्या परंपरागत आणि सांस्कृतिक कला आहेत त्यांना नवीन जोड देऊन मुलांना प्रोत्साहन दिले जाते. त्यामुळे त्यांना इतर स्पर्धेत उतरण्याची संधी त्यांना आम्ही प्राप्त करुन देतो यामध्ये चित्रकला स्पर्धा, गायन स्पर्धा, विविध नृत्याच्या स्पर्धांचा समावेश आहे.

राष्ट्रीय लोकसंख्या शिक्षण प्रकल्प अन्वये २०२३ मध्ये लोकनृत्य स्पर्धेत शाळेला द्वितीय क्रमांक प्राप्त झाला होता. नृत्याच्या स्पर्धेत तर यावर्षी राष्ट्रीय लोकसंख्या शिक्षण प्रकल्प अन्वये भूमिका अभिनय स्पर्धेत जिल्हा स्तरावर तृतीय आणि लोकनृत्य स्पर्धेत विभाग स्तरावर द्वितीय क्रमांक आला. त्यामुळे



विद्यार्थ्यांमध्ये पुढच्या वर्षासाठी नवीन उमेद तयार झाली आहे की पुढल्यावर्षी राज्यस्तरावर शाळेचे नाव नेऊ.





**आनंददायी शिक्षण -**

मुलांना आनंद मिळण्यासाठी धडपडणारी आमची शाळा. आमच्या शाळेतील शिक्षकवर्ग हा अतिशय उपक्रमशील आहे. आमच्या शाळेत विविध प्रकारचे विद्यार्थ्यांना अनुकूल असे शैक्षणिक उपक्रम राबविले जातात. यामध्ये आनंददायी शनिवार, थोर व्यक्तींच्या जयंती - पुण्यतिथी साजरी करणे, विद्यार्थ्यांना घरची आठवण येऊ नये विविध सण-उत्सव साजरे केले जातात. उदा.पोळा, गणेशोत्सव, कोजागिरी,दहीहंडी, होळी, दसरा, नववर्ष, आणि होळी हे सर्व सण शिक्षक आणि विद्यार्थी मिळून साजरे करतात व त्यांना आपल्या संस्कृतीची ओळख करुन दिल्या जाते. या सर्व उपक्रमांमुळे विद्यार्थी शाळेत टिकून राहतो. शाळा नेहमी उपक्रमशील राहण्यास मदत होते.



**लोकसहभागातून विद्यार्थी विकास -**

या भू-तलावरील प्रत्येक व्यक्ती हा समाजाचे देणे लागतो या उद्देशाने समाजसेवी वृत्तीचे लोक आपल्या समाजात वावरत असतात. असे काही लोक आमच्या शाळेला भेट देऊन विद्यार्थी आणि शालेय उपयोगी वस्तू भेट म्हणून देतात. त्यामुळे विद्यार्थ्यांचा उत्साह वाढतो. यासाठी आमचे शिक्षक आणि इतर कर्मचारी वर्ग खूप मेहनत घेतात. या वर्षी आमच्या मुलांना विविध प्रकारचे खेळाचे साहित्य मिळाले ज्याचा उपयोग आमचे विद्यार्थी करतात. अश्या दानी लोकांची आमची शाळा सदैव ऋणी आहे.

**लोकसहभागाच्या वीडियो आणि फोटो पाहण्यासाठी या लिंक वर क्लिक करा -**
**https://drive.google.com/file/d/163FDFrcTUCwm_90tt7NweGYJgZYucH8K/view?usp=share_link**

**साहित्य वाटपाचा वीडियो आणि फोटो पाहण्यासाठी या लिंक वर क्लिक करा -**
**https://drive.google.com/file/d/160NxjgQCm1IAy_O0LBxkYwmxWFT66o79/view?usp=share_link**

**स्वच्छ व सुंदर शाळा -**

**शुद्ध बीजा पोटी | फळे रसाळ गोमटी ||**

या उक्ती प्रमाणे विद्यार्थी जर निरोगी आणि सुंदर - स्वच्छ ठेवायचं असेल तर शाळा पण तशीच असायला पाहिजे. म्हणून शाळेतील प्रत्येकाला स्वच्छतेचे जाणीव करून देऊन वैयक्तिक तसेच शालेय परिसराची स्वच्छता नियमीतपणे केल्या जाते.



याचे श्रेय आमच्या शाळेचे अधिक्षक आणि अधीक्षिका यांना जाते. आमची शाळा म्हणजे संस्काराचे माहेरघर आहे. कारण आमच्या शाळेतील सकाळच्या योगा, प्राणायाम, प्रार्थना, आणि जेवणापूर्वीचे श्लोक या सर्वांमुळे शाळा जणू एक मंदिरच भासते.



**आदिवासी भागातील विद्यार्थी विकासात शाळेचे योगदान -**

आमची शाळा ही आदिवासी विद्यार्थ्यांची निवासी शाळा आहे. त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांबद्दल जास्तीत जास्त विकासात्मक गोष्टी करण्यावर आमचा भर असतो. आदिवासी समाजातील शैक्षणिक मागासलेपणा दूर करण्यासाठी शाळेत विविध उपक्रम राबविले जातात यामध्ये प्रामुख्याने सांगायचे झाल्यास त्यांच्या मातृभाषेचा उपयोग करुन त्यांचे सोबत जवळीक साधली जाते. आदिवासी समाजातील सर्व सण उत्सव आमच्या शाळेत साजरे होतात. विशेषत: होळी हा सण चांगल्या प्रकारे साजरा आणि परंपरागत पद्धतींने साजरा केला जातो. सुट्यांमध्ये जेव्हा आमचे विद्यार्थी घरी जातात तेव्हा ते त्यांच्या अशिक्षित पालकांना शिकवितात. छोट्या भावांना शिकवितात शाळेतील नव नवीन गोष्टी त्या आपल्या मित्रांना सांगतात त्यामुळे त्यांचे आमच्या शाळेबद्दल विशेष आकर्षण वाढते आणि नकळत आमच्या शाळेची पटसंख्या वाढण्यात हातभार लागतो.



**नेचर क्लब -**

स्वच्छ पाणी सुंदर हवा - आरोग्याचा मंत्र नवा.....या मंत्राचे पठण आमच्या शाळेत नित्य नेमाने केले जाते. कारण आमच्या शाळेत इको क्लब आहे. हा एक असा मंच आहे जो विद्यार्थ्यांना पर्यावरणीय जाणीव वाढविण्यासाठी आणि त्याचे संरक्षण करण्यासाठी प्रोत्साहित करतो. या क्लबद्वारे पर्यावरणाशी संबंधित विविध उपक्रम राबवले जातात, जसे की वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम, वायू आणि जल प्रदूषण नियंत्रण, कचरा व्यवस्थापन, आणि पर्यावरणीय साक्षरता. याचा उद्देश विद्यार्थ्यांना पर्यावरणाच्या संरक्षणाच्या महत्त्वाबद्दल जागरूक करणे आणि त्यांना त्यात सक्रिय सहभाग घेण्यास प्रेरित करणे आहे.



इको क्लबमुळे विद्यार्थी केवळ निसर्गाशी जोडले जात नाहीत, तर त्यांच्या सकारात्मक कृतीमुळे पर्यावरण जपण्यासाठी विद्यार्थ्यांचा हातभार लागतो. आम्ही कोणत्याही कार्यक्रमाची सुरुवात ही वृक्षारोपणाने करतो. याच क्लब च्या माध्यमातून शाळेत एका सुंदर अश्या परसबागेची निर्मिती केलेली आहे. ज्याचा उपयोग विद्यार्थ्यांच्या आहारात होतो.



**अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर -**

आजचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आणि या तंत्रज्ञानाच्या युगात आमच्या आश्रम शाळेतील विद्यार्थी कुठे मागे पडणारनाही यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील असतो. आमच्या शाळेत डिजीटील क्लासरूम सुरु केली आहे ज्यात एक मोठा डिजिटल बोर्ड आहे त्यावर आमच्या शाळेतील शिक्षक हे अध्यापनाचे धडे देतात. तसेच एक छोटी संगणक लॅब आहे. त्यावर आमचे विद्यार्थी हे संगणकाचे धडे घेत असतात. याचेच फळ म्हणून आमच्या शाळेची डिजिटल शाळा म्हणून निवड झाली आहे. त्याच्या माध्यमातून आमच्या शाळेत दोन नवीन डिजिटल रूम आणि एक "टॅब लॅब" आमच्या शाळेत तयार होणार आहे. ज्याचा उपयोग करुन आदिवासी मुलांना आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात टिकून राहण्यास नक्कीच म
दत होईल.

**समारोप -**

**जे-जे आपणाशी ठावे | ते-ते इतरांशी सांगावे ||**
**शहाणे करुनी सोडावे | सकलजन |**

या उक्तीला अनुसरून आमच्या शाळेतील प्रत्येकजण कृतीशील असतो. २०२२ ते २०२४ या काळातील पटसंख्या वाढीचा वाढलेला दर, विविध कौशल्यपूर्ण उपक्रम याचेच फळ म्हणून आमची शाळा ही यावर्षी धारणी प्रकल्पामधुन आदर्श शाळा म्हणून निवडण्यात आली आहे. हे सर्व आम्ही सर्वांनी आणि विद्यार्थ्यांच्या एकत्रित कार्याचे यश आहे. आता येवढ्यावरच थांबून चालणार नाही तर आता हीच शाळा एक आदर्श म्हणून इतर शाळांसमोर कशी उभी राहील याचे प्रयत्न आम्ही करीत आहोत.





**वीडियो आणि फोटो पाहण्यासाठी या लिंक वर क्लिक करा :**
https://drive.google.com/drive/folders/11LmGNygpO9ksPdT32jrLLWl0uf7Q0SDr?usp=share_link



----------**----------

# "बहुविध उपक्रमातून विद्यार्थी जाणीवा विकसित करण्याचे प्रयत्न"

## शाळेचे नाव व पत्ता - म.न.पा.उच्च प्राथमिक शाळा क्र.22,कृषिनगर, अकोला

**शाळेचा मेल आयडी** - arjunhingmire91@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.अर्जुन मनोहर हिंगमिरे
**मोबाईल नंबर** - 9822608694/8007878822
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** – arjunhingmire91@gmail.com

**शाळा आहे चैतन्यमयी ही,तिच्या बोलक्या भिंती,**

**येथे आहे प्रेम जिव्हाळा ,नाहीच कसली भीती ।**

**नाचुनी गाऊनी मुले बागडती,दिव्य घेऊनि शक्ती,**

**सर्वांगीण हा विकास साधे ,उजळती ज्ञानज्योती ।।**

खऱ्या अर्थाने शाळा म्हणजेच विविध शैक्षणिक प्रयोग करण्यासाठी उपलब्ध असलेली एक प्रयोगशाळाच आहे. विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाची गोडी निर्माण करणे ही खरी शिक्षणाची सुरुवात आहे.आमची महानगर पालिका उच्च प्राथमिक मराठी शाळा क्र.22, कृषी नगर अकोला ही शाळा चैतन्यमयी होण्याचे कारण म्हणजे तेथील विविधांगी उपक्रम! या शाळेत इयत्ता 1 ते 8 पर्यंत वर्ग असून यावर्षी आठवा वर्ग सुरू करावयाचा आहे.शाळेच्या अवतीभवती पंधरा खाजगी इंग्लिश कॉन्व्हेंट्स आहेत. शाळेचा पालक वर्ग हा व्यसनाधिनता, गुन्हेगारी, अस्वच्छता, अंधश्रद्धा, शिक्षणाप्रति अनास्था इत्यादींचा पगडा असलेला असा आहे. अशा परिस्थितीत अनेक आव्हानांना तोंड देत सर्व शिक्षकांच्या प्रयत्नांच्या बळावर ही शाळा उत्तरोत्तर नावलौकिक मिळवित आहे.

**शाळेच्या विकासासाठी शाळेने निर्धारित केलेली चतु:सुत्री पुढीलप्रमाणे -**

**1.विद्यार्थीसहभाग 2. पालकसहभाग 3. लोकसहभाग 4. शिक्षकसहभाग**

**1. विद्यार्थी सहभाग -**

प्रत्येक विद्यार्थी शालेय उपक्रमात सहभागी झाला पाहिजे,नवनवीन गोष्टी शिकला पाहिजे,शिकलेल्या गोष्टींचे उपयोजन त्यास करता आले पाहिजे या गोष्टी लक्षात घेऊनच विद्यार्थी उपक्रमांचे नियोजन आणि आयोजन केले आहे.

**विद्यार्थी उपक्रम आणि फलश्रुती पुढीलप्रमाणे सांगता येईल.**

**• पथनाट्यामुळे वाढली उपस्थिती -**

पालकांची शिक्षणाप्रति उदासीनता,व्यसनाधीनता,गरिबी,पोटापाण्याचा रोजचा प्रश्न यामुळे त्यांचे आपल्या पाल्यांकडे दुर्लक्ष झाले होते. परिणामी शाळेत मुलांची अनुपस्थिती दिवसेंदिवस वाढतच होती.वस्तीत जाऊन चौकाचौकात स्वलिखित पथनाट्याद्वारा जाणीवजागृती केली.

https://youtu.be/x6I7Cqkun_M?si=lzcnMoh606jgFxJQ

गैरहजर राहणाऱ्या मुलांसाठी शाळेतील शिक्षिका अपर्णा ढोरे यांनी ' राजू तुझा तुझ्यावर भरवसा नाही काय ? अशी गीते लिहून विद्यार्थ्यांद्वारे सादरीकरण करून गैरहजर विद्यार्थ्यांना शाळेचा लळा लावला. 39 असलेली पटसंख्या आता 91 वर गेली आहे. तसेच KG चे 40 विद्यार्थी आहेत.

https://youtu.be/4vlKfxVlo1k?si=qTAtraHJ6UebFFqC

**• आदर्श परिपाठातून नैतिक मूल्य संवर्धन -**

शाळेत परिपाठाचे सूत्रबद्ध ऑडिओ नियोजन इयत्ता निहाय,वारानुसार केले.ह्यात प्रत्येकास सुत्रसंचालन,सुविचार,बोधकथा इ.ची संधी दिली आहे.थोरपुरुषांच्या जीवनावर आधारित स्वलिखित प्रासंगिक नाटकांच्या सादरीकरणाचेही दिनविशेषानुसार नियोजन केले. परिपाठाचा शेवट संगीतमय पाढ्यांनी केला जातो.परिपाठातील मूल्यवर्धक गोष्टींमुळे मुलांमधील चोरी,खोटेपणा,लबाडी या वाईट सवयी गेल्या आहेत. थोरपुरूषांच्या चरित्रावर आधारित नाटिका विद्यार्थी सादर करतात.

https://youtu.be/X6p8CO2nJmo?si=Ezvf5uwRYSlnHsyc

**• शिवीमुक्त शाळा -**

मुलांच्या शिव्या बंद करण्यासाठी 'ज्याची शिवी त्याला परत' हा उपक्रम सुरू केला. ज्याने शिवी दिली त्या मुलाला कोणत्याच उपक्रमात,खेळांत सहभागी करून घ्यायचे नाही, त्याच्याशी अबोला धरायचा,पालकांनाही ह्यात सहभागी करून घेतले.

**• वाचन कट्टा -**

शाळेत शिक्षकांनी मोठ्या मुलांच्या मदतीने चौदाखडी तोरणासोबतच वर्गनिहाय, विषयनिहाय वाचन कार्डे बनवली.ह्यात प्रत्येक मुलाच्या क्षमतेनुसार विभाग बनवले.साधे शब्द ते जोडाक्षर युक्त शब्द, सोपी वाक्ये ते कठीण वाक्ये,उतारे,शब्दडोंगर,प्रश्नोत्तरे इ.सर्व बाबींचा या वाचन कट्ट्यात समावेश केला आहे.

**• गणिताशी गट्टी -**

या उपक्रमांतर्गत शाळेतील सर्वच विद्यार्थी गणितातील प्रत्येक उदाहरणाशी बोलू लागले. संख्यांशी मैत्री करीत स्वयं अध्ययन कार्डावरील उदाहरणे गोष्ट तयार करून सोडवू लागले. गटामध्ये विद्यार्थी विविध क्रियांची उदाहरणे सोडवतात. अडचण आलीच तर गटप्रमुखाला विचारतात. भिंतीवर लावलेल्या छोट्या संक्षिप्त क्लृप्त्यांचा वापर मुले करतात. उदा.रोमन अंक शिकतांना "आई विमलला एक्स एल सीडी माग!"यामुळे मुलांना 1 ते 1000 पर्यंत रोमन संख्यांची ओळख झाली. रोमन संख्यांच्या ट्रिकचा व्हिडिओ यु ट्यूब वर शिक्षिका अपर्णा ढोरे यांनी तयार केला आहे.

https://youtu.be/NSJ9NZKIhAU?si=0msiflrx6yiSVted , https://youtu.be/zO6jZPk3jYY?si=aHgqbbG1Eg5iR5FX

https://youtu.be/yI45qYzJlQg?si=epp9RNx_sZbvJfhy

**• बँक ऑफ इंग्लिश -**

इंग्रजीतील अक्षरे, शब्द, वाक्यांची लयलूट या बँकेत आहे. यात इयत्ता पहिली ते पाचवीच्या इंग्रजी पाठयपुस्तकांचा उपयोग केला आहे. शाळेतील शिक्षकांनी मिळून हे शब्दभांडार तयार केले आहे.चित्राला अनुसरून शब्द वाक्यवाचन मुले करतात. मुले स्वतः वाक्यनिर्मिती करू लागली. इंग्लिशमध्ये संभाषण करू लागली. जॉली फोनिक्स तंत्रामुळे मुलांना स्पेलिंग तयार करणे सोपे झाले आहे. विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी अभ्यासक्रमावर आधारित पाठ यू ट्यूब वर टाकले आहेत.

https://youtu.be/fobBhkSjsFU?si=w0B8_-vCd0NM20yp

https://youtu.be/_0dNQ7TprN0?si=qZ4DwezjPh-MwrLA

**• नकाशा वाचतो आम्ही -**

तालुका, जिल्हा, राज्य, यांच्या नावावरून गोष्ट तयार केली आहे.त्यामुळे मुलांच्या स्मरणात दिशांची , तालुक्यांची, जिल्ह्यांची, राज्यांची नावे लक्षात राहू लागली. उदा.अकोला जिल्ह्यातील तालुक्याची नावे लक्षात ठेवण्यासाठी "अबा अबा तेपा मूर्ती"हे तंत्र वापरल्या जाते. नकळत मुलांचा सामान्यज्ञानाचा अभ्यास होत आहे.

**• आमची बचत आम्हाला परत -**

मुलांना काटकसरीची सवय लागावी त्यातून जमा होणाऱ्या रकमेतून शालेय साहित्य घेता यावे म्हणून "आमची बचत-आम्हाला परत"हा बचत उपक्रम सुरू केला.घरून खाऊसाठी देण्यात येणारे पैसे मुले बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ न खाता या बचत बँकेत साठवतात. रजिस्टरमध्ये नोंद करायला दोन विद्यार्थ्यांची निवड केली आहे.

**• शाळादूत -**

स्वच्छता, आरोग्य, परिपाठ, सांस्कृतिक कार्यक्रम, वर्गअभ्यास, डिजिटल, क्रीडा, कला, हस्तकला, शांती इ.विभाग मुलेच सांभाळतात.यात शालेय सफाई पासून संध्याकाळी खेळ घेण्यापर्यंत सर्वच कामात मुले नेतृत्व करतात.भांडणे झाली तर मिटवणारे शांतिदुताचे काम मुलेच पाहतात अर्थात शिक्षकांचे मार्गदर्शन आणि सहकार्य असतेच.

**• स्वयंपाकघरातील विज्ञान -**

स्वयंपाक घरातील विज्ञान वापरून हे असे का ते तसे का ह्याचे उत्तर आता विद्यार्थीच शोधू लागले आहेत."आम्ही प्रयोग करतो" या उपक्रमांतर्गत विद्यार्थी छोटेछोटे प्रयोग करू लागले. ह्याची फलश्रुती ही की एका पालकाने" डॉ.अब्दुल कलाम" ह्यांचे छायाचित्र शाळेला भेट दिले.

**• तंत्रज्ञानाचा अध्ययन अध्यापनात वापर -**

शाळा डिजिटल झाल्यामुळे क्लिष्ट कठीण संबोध सुलभ करता आले. मोबाईलमधील तंत्रज्ञानाचा वापर करून'वर्गात अवतरली सूर्यमाला' ही भौगोलिक अनुभूती मुलांना दिली. शिक्षक टेक्नोसेव्ही झाल्यामुळे ईसाहित्यही तयार होऊ लागले आहे. यात शब्द, वाक्ये, उतारे, शब्दडोंगर, इंग्लिश स्टोरीज, गणित उदाहरणे

यांचे व्हिडीओ तयार केलेले आहेत.शाळेतील शिक्षिका अपर्णा ढोरे यांनी शाळेसाठी यू ट्यूब चॅनेल तयार केले आहे ह्यात शाळेचे सर्व उपक्रम आहेत.

https://youtube.com/@aparnadhore2425?si=IJZvOjVTGP0wcl67

तसेच शाळेचे इंस्टाग्राम पेज आहे, त्यावर शाळेतील विद्यार्थ्यांचा सादरीकरण सहभाग आहे.

https://www.instagram.com/reel/C-5heGZoxhi/?igsh=ZnBwNHJ0c3dlZGF1

**• खिचडीची त्रिसूत्री -**

शाळेतील खिचडी चविष्ट,पौष्टिक तर असतेच त्यासोबतच सर्वांना मोहून टाकते ती तिची त्रिसूत्री "जेवढे हवे-तेवढे घ्यावे-तितकेच खावे !" आता पालकांना शाळेत मिळणाऱ्या स्वादिष्ट खिचडी विषयी माहिती झाली आहे.(महानगरपालिकेची ही एकमेव शाळा आहे की जेथे शाळेतच खिचडी शिजवली जाते,एक माता पालकच खिचडी शिजवण्याचे काम करते.)

**• बोलीभाषेतील गीतातून मतदान जागृती -**

लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या वेळी (2019) मतदान जनजागृतीसाठी परिसरात जाऊन, 'आईबाबा तुमी माह्य ऐकता काय मतदान कऱ्याले जायाचं हाय म्हंजे जायाचं हाय'ह्या बोलीभाषेतील साभिनय कृतीगीताने मतदार जनजागृती केली. तसेच 20 नोव्हेंबर 2024 निवडणुकीसाठी विद्यार्थ्यांनी पथनाट्य आणि घोषवाक्य द्वारा मतदान जनजागृती केली.

https://youtu.be/Q0BjJ2Hwcgs?si=oWpcmHHelf6bP4So

https://www.instagram.com/reel/DCbt-yNoOL7/?igsh=MWp5d3NmMmU5ZWdvbQ==

**• शाळाबाह्य मुलांसाठी थीम डान्स -**

परिसरात असणाऱ्या शाळाबाह्य मुलांना शिक्षण प्रवाहात समाविष्ट करण्यासाठी शाळेतील विद्यार्थ्यांचा 'शिक्षा के दीप'हा थीम डान्स बसवून त्याचे परिसरात, प्रमिलाताई ओक सभागृह अकोला ह्याठिकाणी सादरीकरण केले.

**• परिसर स्वच्छता, प्लास्टिक कचरा निर्मूलन अभियान, कागदी पिशव्या निर्मिती -**

वस्तीत होणारे आजार हे अस्वच्छता,तुडुंब भरलेल्या नाल्या,शौचालयाचा अभाव इ मुळे होतात हे पटवून देण्यासाठी मुलांनी चौकाचौकात नाटिका,घोषवाक्य,बाल कीर्तन इ.सादर केले. यासाठी लोकप्रतिनिधी सोबत परिसराची साफ सफाई केली.शाळा प्लास्टिक मुक्त तर झालीच आहे परंतु परिसरातही जागरूकता आली आहे.वर्तमानपत्रापासून कागदी पिशव्या तयार करून त्या परिसरातील दुकानदारांना दिल्या. स्वच्छता मॉनिटर सारख्या उपक्रमांमुळे सुध्दा परिसरात सकारात्मक परिवर्तन दिसून येत आहे.

https://www.instagram.com/reel/DAizWkhyjgc/?igsh=MTV6d2pxZHNlbWVs

2) **पालकसहभाग**

**• एक दिवस आईसाठी -**

जागतिक महिला दिनी माता पालकांना शाळेत आमंत्रित करून त्यांचा गौरव केल्या जातो.मुलांनी तयार केलेल्या कविता,छोट्या गोष्टी चे वाचन होते. चला बोलू या बाबांबद्दल हा उपक्रम सुध्दा शाळा आणि घर यांना जवळ आणणारा ठरला.

https://youtu.be/XbKecz2Fbe0?feature=shared तसेच शाळेचे माता पालकांचे दिशा, ऊर्जा, सृष्टी आणि दृष्टी असे चार गट आहेत. त्यांच्या सहकार्याने निपुणचे सर्व उपक्रम यशस्वी रित्या पार पाडले जातात.

**• पालकांसाठी विविध संघटनांचे (NGO)सहकार्य घेऊन खालील उपक्रमांचे आयोजन केले.**

आरोग्य शिबीर, क्रीडा मेळावा, माता पालक मेळावा, लेक शिकवा अभियान, व्यसनमुक्ती समुपदेशन, तंबाखू विरोधी दिन,सुसंवाद सभा यांमुळे पालक आणि शिक्षक यांच्यात सुसंवाद आणि विश्वासाचे नाते निर्माण झाले.पालकांना भेटण्यासाठी मध्यान्ह भोजनाची वेळ दिली आहे कारण त्यावेळी त्यांनाही शाळेतील खिचडीची चव, शाळेचे अनुशासन पाहता यावे हा त्यामागचा उद्देश ! इयत्तेनुसार विषयनिहाय,विद्यार्थ्यांच्या क्षमतेनुसार स्वयंअध्ययन कार्डे तयार करून प्रत्येकाच्या घरी त्याचा संच दिला आहे.रोज कामावरून आल्यावर आपले मूल अभ्यास करेल ह्याची जबाबदारी पालकांकडे देण्यात आली.यातील अभ्यासकार्डे लॅमीनेशन केलेली असल्यामुळे ही गृह अभ्यास संच फारच उपयोगी सिद्ध झाला आहे.

3) **लोकसहभाग**

शाळेच्या भौतिक सुविधेसाठी लोकसहभागातून सुधारणा करण्यात आल्या. शाळेला वॉटर प्युरीफायर, पाण्याची टाकी,लॅमीनेशन मशीन,व्हाइट बोर्ड,वाचनालयासाठी पुस्तके, विद्यार्थ्यांना लागणारे शैक्षणीक साहित्य,विविध आरोग्य शिबिरे,शाळेचे पुनर्निर्माण, आधुनिक स्वच्छतागृह इ.सुधारणा केल्या. विद्यार्थी अध्ययन कोपरा, शैक्षणिक सहलीचे आयोजन, सांस्कृतिक कार्यक्रम लोकसहभागातून पार पाडले जातात.

• प्रतिष्ठित लोकांचे वाढदिवस मुलांना शैक्षणिक साहित्य देऊन शाळेत साजरे केल्या जातात. शाळेच्या विकास समितीत अशा प्रतिष्ठित लोकांचा समावेश केला आहे.शाळेच्या वतीने त्यांना ऋणनिर्देश पत्र दिल्या जाते.शाळेच्या उपाध्यक्षा नगरसेविका सुनीतातार्ई अग्रवाल ह्या शाळा विकासात आणि शिक्षकांना सहकार्य करण्यास सदैव अग्रेसर असतात.तसेच शाळेचे इतर नगरसेवक आशिषभाऊ पवीत्रकार,सुजातातार्ई अहीर आणि अनिलभाऊ मुरूमकर ह्याचे सहकार्य असते.इनव्हील क्लब,रोटरी क्लब,इतर सामाजिक संस्था ह्यांनी शाळेच्या प्रगतीवर खुश होऊन पुढाकार घेऊन शाळेला भरपूर मदत केली असून ह्यापुढेही करतील हा विश्वास आहे.

https://youtu.be/Zl2ecVy4xLI?si=Few3zAQGL59oXfHf

4) **शिक्षकसहभाग**

मुख्याध्यापकासह शिक्षकांनी स्वतःच्या वाढदिवसाला प्रत्येकी पाचहजार रुपये शाळेला दिले आणि आपल्या कुटुंबातील इतर व्यक्तींच्या, नातेवाईकांच्या, मित्रमंडळींच्या वाढदिवसाला शाळेतच मुलांसाठी शैक्षणिक साहित्य आणले जाते. हा पायंडा दरवर्षी पाडल्या जाणार आहे. शिक्षिका अपर्णा ढोरे यांनी शाळेला प्रिंटर आणि झेरॉक्स मशीन दिली. वाढदिवसाला एक झाड ही संकल्पना कंपाऊंड वॉल पूर्ण झाल्यावर करणार आहोत.तसेच शिक्षकांच्या वाढदिवशी पुस्तकांचा (गोष्टीरुप) संच शाळेला भेट देण्याची परंपराही सुरू केली आहे. जेणेकरून शाळेचे वाचनालय समृद्ध होईल. तसेच मूल्यवर्धन कार्यक्रमातील जिल्हा मेळाव्यात थोर समाजसेवक मा.श्री.शांतीलालजी मुथ्था आणि जिल्हाधिकारी मा.श्री.जितेंद्र पापळकर यांच्या हस्ते उत्कृष्ट प्रेरक म्हणून शाळेतील शिक्षिका अपर्णा ढोरे, ह्यांना गौरविण्यात आले.या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी त्यांच्यात झालेले बदल जिल्हाधिकारी आणि शांतीलालजी मुथ्था यांना सांगितले आणि त्यांची मने जिंकली हे विशेष!

https://youtu.be/5OV0hP-bF5Y?si=EezILekwFDlUzF6X

जॉली फोनिक्स द्वारा इंग्रजी अध्ययन अध्यापन होत असल्यामुळे विद्यार्थी इंग्रजी वाचू लागले. सेरेब्रल पाल्सी ग्रस्त निखिलही याद्वारे इंग्रजी शब्द वाचायला शिकला.

https://youtu.be/-bPjaTn_XH8?si=1p_QWvXBRcoMkZsV

विद्यार्थी पालक,परिसरातील इतरही लोकं शाळेच्या प्रगतीवर समाधानी आहेत.इतरही शाळा आमच्या या उपक्रमांचे अनुसरण करीत आहेत. हा मार्ग नव्हे एकट्याचा यानुसार मुख्याध्यापक, शिक्षक विषय तज्ञ,शाळा व्यवस्थापन समिती,शाळा विकास समिती, मनपा प्रशासन, जिल्हा प्रशिक्षण संस्था ह्यांचे सहकार्य फार मोलाचे ठरत आहे.

----------**----------

# "शालेय नेतृत्वाची क्रीडा क्षेत्रातील यशोगाथा"

**शाळेचे नाव व पत्ता - महात्मा फुले शिक्षण संस्था,हिवरखेड जि.अकोला व्दारा संचालित सहदेवराव भोपळे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय,हिवरखेड ता तेल्हारा जि.अकोला**

**शाळेचा ईमेल आयडी** - bhoplevidyalay.skrauthm@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.संतोषकुमार काशिनाथजी राऊत
**मोबाईल क्रमांक** - 9623125859
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - bhoplevidyalay.skrauthm@gmail.com

**प्रास्ताविक** -

महात्मा फुले शिक्षण संस्था व्दारा संचलित सहदेवराव भोपळे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, हिवरखेड, ता.तेल्हारा जि.अकोला येथे मी संतोषकुमार बेबीताई काशिनाथजी राऊत दि.१ सप्टेंबर २०२३ पासून मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहे. सदर महाविद्यालयाचे संस्था प्रतिनिधी विषय क्रीडा स्पर्धेतील सहभागाच्या संदर्भात शाळेला विशेष मदत व सातत्याने प्रोत्साहन मिळत असते. सदर शाळा ही निमशहरी भागात असल्याने नवनवीन क्रीडा प्रकारातील विद्यार्थ्यांच्या सहभागाच्या संदर्भात तसेच भौतिक सोयी सुविधांच्या संदर्भात क्रीडा साहित्याच्या संदर्भात सातत्याने आव्हानात्मक परिस्थिती असते. अशा परिस्थितीत शालेय व्यवस्थापनाअंतर्गत शालेय क्रीडा विभागाची व्यवस्थापनाची जबाबदारी पार पाडत असताना मुख्याध्यापक म्हणून मी आणि माझे सहकारी अनेक आव्हानात्मक परिस्थितीवर मात करून शाळेतील विद्यार्थ्यांचा तालुका स्तरापासून ते राज्यस्तरापर्यंतचा प्रवास सुखकर होण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असतो. मी स्वतः क्रीडा शिक्षक असल्याने विद्यार्थ्यांमधील गुणवंत खेळाडू शोधून त्यांच्यातील कौशल्यास वाव देण्यासाठी कायमस्वरूपी तत्पर असतो. आमच्या सहदेवराव भोपळे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील एकूण विद्यार्थी संख्या १०३५ असून दरवर्षी सरासरी २०० विद्यार्थी खेळाडूंना स्थानिक पातळीपासून ते राज्य स्तरापर्यंत विद्यार्थ्यांचा शालेय क्रीडा प्रकारात सहभाग वाढावा व त्यातील गुणवंत विद्यार्थ्यांना विभागीय, राज्यस्तरापर्यंत पोहोचवण्यासाठी शाळा परिश्रम घेत आहे. या परिश्रमाला आता यश मिळताना दिसून येत आहे. महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था अंतर्गत झालेल्या प्रशिक्षणातून प्रशासन कार्याला कमालीची गती प्राप्त झालेली आहे. अशा या स्तुत्य अशा उपक्रमाबद्दल मी सदर संस्थेचे सादर आभार व्यक्त करतो. तसेच मुख्याध्यापकाच्या परिश्रमाला व कार्य कर्तुत्वाला प्रोत्साहन देणाऱ्या मुख्याध्यापकाची यशोगाथा या स्तुत्य अशा उपक्रमातून शाळा, मुख्याध्यापक आणि शिक्षकांना संधी मिळते. आमच्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील क्रीडा स्पर्धेतील सहभागी जी संख्या केवळ दहा खेळाडूपासून सुरू झाली ती आज २०२४-२५ मध्ये ही संख्या २७५ पर्यंत पोहोचली आहे. आलेल्या असंख्य अडचणी त्यात निधीची कमतरता, बहुतेक सोयी सुविधांची कमतरता, शालेय साहित्यांची कमतरता, जागेची कमतरता, दर्जेदार क्रीडा प्रशिक्षणाची उणीव, क्रीडा क्षेत्राबद्दल विद्यार्थ्यांमध्ये असलेली उदासीनता, पालकांमध्ये असलेली

उदासीनता, शाळा व्यतिरिक्त इतर कार्यालयीन कामे, वेळेची कमतरता अशा आव्हानावर, अडचणीवर मात करून २०२४-२५ मध्ये तब्बल १६ खेळाडूंना विविध क्रीडा स्पर्धेत विभागीय स्तरापर्यंत आम्ही घेऊन जाऊ शकलो. यात संस्था, शासन, कर्मचारी क्रीडा कर्मचारी याची सातत्याने मदत मिळत गेली हे मांडताना नितांत आनंद होत आहे.

**मुख्याध्यापकाला यशोगाथा क्षेत्रा संदर्भात आलेल्या अडचणी पुढील प्रमाणे आहे....**

- पुरेसा निधी उपलब्ध नसणे.
- भौतिक सोयी सुविधांची कमतरता.
- जागेची कमतरता.
- क्रीडा साहित्याची अनुपलब्धता, कमतरता.
- दर्जेदार क्रीडा प्रशिक्षणाची उणीव.
- क्रीडा क्षेत्राबद्दल पालकांची असलेली उदासीनता.
- क्रीडा क्षेत्रांबद्दल विद्यार्थ्यांमध्ये असलेली जाणीव जागृतीची कमतरता.
- शालेय प्रशासनातील इतर अतिरिक्त कार्यभार.
- पुरेशा वेळेची कमतरता.
- शालेय विद्यार्थी खेळाडूंच्या अभ्यासक्रम पूर्ततेचा प्रश्न.
- नैसर्गिक हवामानातील अनिश्चितता.
- पुरेशा कर्मचाऱ्यांचा अभाव.
- क्रीडा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची क्रीडा क्षेत्राच्या संदर्भात असलेली अज्ञान/ उदासीनता
- महिला क्रीडा शिक्षकांची उणीव.
- महिला खेळाडूंच्या सुरक्षिततेचा प्रश्न.
- खेळाडूंच्या सुरक्षित वाहतुकीची समस्या.
- महिला खेळाडूंच्या पालकांच्या समस्या.
- ग्रामीण भागात गुणवंत खेळाडूंचा दर्जेदार प्रशिक्षणाच्या समस्या व अनुपलब्धता
- विद्यार्थ्यांचा क्रीडा क्षेत्रातील सहभाग वाढवण्यातील समस्या.
- विद्यार्थ्यांचा क्रीडा क्षेत्रात सहभाग सातत्य टिकवण्याची समस्या.
- विद्यार्थी खेळाडूंच्या कौटुंबिक परिस्थितीच्या समस्या.
- सामाजिक सहकार्याची व सहभागाच्या संदर्भात समस्या.
- शालेय प्रशासनातील समन्वयाचा अभाव.
- स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सहकार्याचा अभाव.
- सार्वजनिक खेळाची मैदान, प्रशिक्षणे संस्था याची अनुपलब्धता.
- राजकीय हस्तक्षेप

**वरील अडचणीवर मात करण्यासाठी केलेल्या उपाययोजना -**

**समस्या १) पुरेशा निधीची कमतरता.**

**उपाययोजना** - शालेय क्रीडा क्षेत्रात अनेक समस्यांवर मात करण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देण्याच्या संदर्भात संस्थेची सातत्याने पत्र व्यवहार विविध शासकीय पातळीवर निधीसाठी विनंती वजा पत्र व्यवहार तसेच स्थानिक पातळीवरील सार्वजनिक क्षेत्रातील सधन व्यक्तींना निधी मागणीसाठी विनंती तसेच अनेक वेळा अकस्मात आलेल्या समस्या सोडवण्यासाठी स्व-निधीतून खर्च केला आहे.

**समस्या २) विद्यार्थी खेळाडूंचा सहभाग कमी असणे.**

**उपाययोजना** - ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा खेळातील सहभाग अथवा प्रतिसाद अत्यंत कमी असतो अशा परिस्थितीत मी स्वतः तसेच इतर शालेय शिक्षकांच्या माध्यमातून त्यांचे सर्व व त्यांच्यामध्ये क्रीडा क्षेत्रात संदर्भात जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करून मुलांच्या सहभाग वाढविण्यात यशस्वी झालो आहे.

**समस्या ३) भौतिक सोयी सुविधांची कमतरता.**

**उपाययोजना** - महात्मा फुले शिक्षण संस्था हिवरखेड ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी १९८३ पासून कार्य करीत आहे. शालेय शिक्षणासोबतच विविध क्रीडा प्रकाराची आवश्यकता असलेली अद्ययावत भौतिक सुविधा सोयी सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नव्हती. परंतु सातत्याने संस्थेशी संपर्क करून विविध पत्राद्वारे तसेच स्थानिक पातळीवरील व्यक्तीशी संपर्क करून सातत्याने मागणी करू तसेच वेळोवेळी त्याचा पाठपुरावा करून क्रीडा मैदानी आवश्यक मैदानी क्रीडा साहित्यांची उपलब्धता करून घेतली आहे. तसेच विद्यार्थी खेळाडू त्यांचा लाभ घेऊन विविध खेळात प्राविण्य मिळवत आहे.

**समस्या ४) दर्जेदार क्रीडा प्रशिक्षणाची उणीव.**

**उपाययोजना** - ग्रामीण भागात क्रीडा प्रशिक्षक म्हणून कार्य करण्यास अनेक शिक्षक सहसा तयार होत नाही. तसेच अनेक वर्षापासून शासकीय पातळीपासून क्रीडा शिक्षकांची भरती झालेली नाही. अशा परिस्थितीत संस्थेला वारंवार विनंती करून एका क्रीडा प्रशिक्षकाची मानसेवी तत्वावर नेमणूक आम्ही केलेली आहे. तसेच माझ्या इतर प्रशासकीय कार्यातून वेळ काढून मी सुद्धा जमेल तशी क्रीडा प्रशिक्षकाची भूमिका पार पाडत आहे आणि समुपदेशन व प्रशिक्षण प्रक्रियेतून विद्यार्थ्यांना समुपदेशन करीत आहेत. त्यात बऱ्यापैकी यश मिळत आहे. अजूनही दोन क्रीडा प्रशिक्षकांचे नेमणुकीसाठी संस्थेकडे आग्रह धरला आहे.

**समस्या ५) क्रीडा साहित्याची अनुपलब्धता / कमतरता**

**उपाययोजना** - संस्था सातत्याने सहकार्य असली तरी प्रत्येक वेळी क्रीडा साहित्याची उपलब्धता होतेच अशी नाही. साहित्याच्या वापराने नियतकालीन वेळेनुसार क्रीडा साहित्याची वारंवार गरज पडत असते. अशावेळी संस्थेचे पदाधिकारी शालेय कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने तसेच वेळ पडल्यास मी स्वतः माझ्या एका अपत्याच्या वाढदिवसाचे संपूर्ण खर्च शालेय साहित्याच्या उपलब्धतेसाठी करीत आहे. मागील वर्षी आमच्या वारंवार विनंती आणि मागण्या यांना मान्यता देऊन शासकीय स्तरावरील आमच्या शाळेला तीन लक्ष साहित्यांची उपलब्धता निर्माण करून देण्यात आम्हाला यश आले आहे. तसेच क्रीडा साहित्य ठेवण्यासाठी महाराष्ट्र राज्याच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय विभागाच्या वतीने क्रीडा विकास अनुदान अंतर्गत भांडारगृह मंजूर करून त्याचे बांधकाम पूर्णत्वास गेले. व्यायामशाळेचे बांधकाम सुध्दा या निधी अंतर्गत मंजूर करून पूर्ण झालेले आहे.

**समस्या ६) क्रीडा क्षेत्राबद्दल विद्यार्थी आणि पालकांमध्ये असलेली उदासीनता.**

**उपाययोजना** - ग्रामीण भागातील विद्यार्थी आणि पालकांमध्ये क्रीडा क्षेत्राबद्दल अनेक गैरसमज असलेले दिसून येतात. शिक्षण पूर्ण झाले की नौकरी करायची असे अनेक विद्यार्थी पालकांना वाटते त्यामुळे त्यांची या क्षेत्रासंदर्भात उदासीनता आढळून येते. ती उदासीनता कमी करण्यासाठी संस्थेच्या परवानगीने विद्यार्थी पालक संघाच्या माध्यमातून, घरोघरी क्रीडा जागृतीच्या माध्यमातून विद्यार्थी व पालकांचे समुपदेशन करण्यात आले. लोकसहभागाच्या माध्यमातून विद्यार्थी सहभाग वाढवण्यात आम्ही यशस्वी होत आहोत.

**समस्या ७) शालेय प्रशासनातील कार्यबाहुल्य - अतिरिक्त कार्यभारामुळे वेळेची कमतरता**

**उपाययोजना** - सद्यस्थितीत शालेय कामकाजा व्यतिरिक्त शासकीय प्रणाली मार्फत अनेक कामांची जबाबदारी मुख्याध्यापकांवर सोपवण्यात आलेली आहे. त्यामुळे वेळेची कमतरता भासते परंतु त्यावर मात करण्यासाठी मी शाळेच्या कामकाजाचा वेळेनंतर, सुट्टीमध्ये सुद्धा विद्यार्थ्यांच्या त्यांच्या सार्वजनिक मैदानी भेट देऊन मार्गदर्शन करीत असतो. तसेच फावल्या वेळेस शाळेतील शिक्षकांसह आवश्यक मार्गदर्शन करण्यासाठी प्रयत्न करीत असतो. त्यात सुद्धा आम्ही बऱ्यापैकी यशस्वी झालेलो आहोत.

**समस्या ८) विद्यार्थी खेळाडूंच्या पाठ्यक्रम पूर्ततेचा प्रश्न**

**उपाययोजना** - विद्यार्थी खेळाडूंच्या दैनंदिन सराव, स्पर्धा कालावधीमध्ये त्यांचा शालेय पाठ्यक्रम पूर्ण करून घेण्यात अनेक अडचणी येतात. अशावेळी संस्थेतील सर्व कर्मचारी व शिक्षक यांच्या सहकार्याने अतिरिक्त तासिकेचे नियोजन करून त्याचा पाठ्यक्रम पूर्ण करून घ्यावा लागतो. त्यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान काढण्यासाठी टाळण्यात आम्ही यशस्वी झालो आहोत.

**समस्या ९) महिला क्रीडा प्रशिक्षणाची कमतरता -**

**उपाययोजना** - ग्रामीण भागात मुलांबरोबर मुलींचाही अनेक क्रीडा प्रकारात सहभाग वाढवण्यासाठी आम्ही समुपदेशनाबाबत जागृती कार्यक्रमाचे आयोजन करीत असतो. परंतु दर्जेदार महिला क्रीडा प्रशिक्षकांची उणीव करून काढणे कठीण असते. अशावेळी फक्त उपलब्ध महिला शिक्षकांना तात्पुरत्या स्वरूपात प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. व त्यांच्या मार्फत उणीव भरून काढण्यात आम्ही प्रयत्न करीत आहोत. महिला खेळाडूंच्या समस्यावर मात करण्यासाठी आमच्या शाळेतील सर्व महिला शिक्षिका क्रमाक्रमाने जबाबदाऱ्या पार पाडत आहे. त्यामुळे मुलींचा क्रीडा क्षेत्रातील सहभाग सातत्याने शेवटी यशस्वीतेपर्यंत पोहोचवण्यात बऱ्यापैकी यश मिळालेले आहे.

**समस्या १०) खेळाडूंच्या सुरक्षित वाहतुकीचा प्रश्न -**

**उपाययोजना** - बहुतांश वेळी स्पर्धेच्या निमित्ताने विद्यार्थी खेळाडूंना अनेक ठिकाणी प्रवास करावा लागतो. अशावेळी सुरक्षित वाहन उपलब्धता करावे लागते. ही बाब मुख्याध्यापक म्हणून आव्हानात्मक असते. अशावेळी संस्था, पालक यांच्याशी संपर्क साधून सुरक्षित वाहन खेळाडूंना स्पर्धेत सहभागा होणेसाठी बाहेरगावी जाण्यासाठी उपलब्ध करून देत असतो. यात महीला खेळाडूंची अधिकाधिक सुरक्षितता राहणेसाठी महिला शिक्षक, पालक प्रतिनिधी विद्यार्थिनी खेळाडू सोबत पाठविल्या जातात.

**समस्या ११) दर्जेदार प्रशिक्षण संस्थेचा अभाव -**

**उपाययोजना** - ग्रामीण भागात गुणवंत खेळाडूंसाठी दर्जेदार प्रशिक्षण संस्था उपलब्ध होत नाही. अशावेळी आम्ही स्थानिक प्राधिकरणाच्या सहकार्याने अशा संस्थांना गुणवंत खेळाडूंचे दत्तक पालक देऊन त्यांच्या मार्फत शहरी भागातील उत्तम प्रशिक्षक, माजी गुणवंत खेळाडू यांना पाचारण करून खेळाडूंच्या गुणवत्तेचा वाव देण्याचा प्रयत्न करीत असतो. त्यात अनेक विद्यार्थ्यांनी अशा संस्थांच्या सेवेचा लाभ घेऊन भरघोस यश मिळवलेले आहे.

प्रभावी कामांसाठी केलेल्या अंमलबजावणीनंतर फलनिष्पत्ती - महात्मा फुले शिक्षण संस्था व्दारा संचलित सहदेवराव भोपळे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय,हिवरखेड येथे शैक्षणिक योगदान देण्यासोबतच शाळेचा विविध क्रीडा प्रकारातील सहभाग वाढवण्यासाठी आम्ही सातत्याने आग्रही असतो. त्यासाठी शाळेत विविध क्रीडा प्रकार मुले व मुली यांचा स्वतंत्र संघ निर्माण करून सांघिक क्रीडा प्रकारासह वैयक्तिक क्रीडा प्रकारात प्राविण्य मिळत आहे. खेळाडूंच्या संख्येच्या प्रमाणातील फलनिष्पत्ती, जनजागृती, घरोघरी समुपदेशन, पालक शिक्षक संघाच्या माध्यमातून समुपदेशन करून खेळाडूंच्या संख्येमध्ये लक्षणीय वाढ घडवून आणलेली आहे. ती पुढीलप्रमाणे.....

| अ.क्र. | वर्ष | खेळाडूंची संख्या | शालेय स्तर | तालुका स्तर | जिल्हा स्तर | विभाग स्तर | राज्य स्तर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २०२२-२३ | १२० | १०५ | ७५ | ४५ | १८ | १ |
| २. | २०२३-२४ | २५६ | २४६ | १२० | ७५ | २० | ० |
| ३. | २०२४-२५ | २७५ | २५० | १५० | ९८ | २८ | १ |

नवराष्ट्र

# मुलींचा व्हॉलीबॉल संघ विभागस्तरावर



तेल्हारा, (ता. प्र.). नुकत्याच महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अकोला जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाद्वारे आयोजित जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत 19 वर्षाखालील मुलींचा संघ विजयी झाला. हा संघ अकोला जिल्ह्याचे प्रतिनिधित्व अमरावती विभागस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत करणार आहे.
या यशाबद्दल महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अनिलकुमार भोपळे, कार्यवाह श्यामशील भोपळे, विभागप्रमुख स्नेहल भोपळे, प्राचार्य संतोषकुमार राऊत व पर्यवेक्षक गणेश खानझोडे यांनी खेळाडू व मार्गदर्शक शिक्षक-शिक्षिका, प्रशिक्षकांचे कौतुक केले. खेळाडू आपल्या यशाचे श्रेय क्रीडा विभागप्रमुख तथा प्रशिक्षक अक्षय मोरखडे, प्रा. चेतन चुने, रवी भोयर, महिला पालक प्रतिनिधी वर्षा वानखडे यांना देतात.

Akola Plus Edition
Oct 05, 2024 Page No. 2
Powered by: navbharatlive.com

लोकमत

# भोपळे महाविद्यालयाचा व्हॉलीबॉल संघ विभाग स्तरावर



लोकमत न्यूज नेटवर्क
**हिवरखेड** : महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाव्दारा आयोजित जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत भोपळे महाविद्यालयाचा १९ वर्षाखालील मुलींचा संघ विजयी झाला.
हा संघ अकोला जिल्ह्याचे प्रतिनिधित्व अमरावती विभागस्तरीय स्पर्धेत करणार आहे. यशाबद्दल महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अनिलकुमार भोपळे, कार्यवाह श्यामशील भोपळे, विभागप्रमुख स्नेहल भोपळे, प्राचार्य संतोषकुमार राऊत व पर्यवेक्षक गणेश खानझोडे यांनी खेळाडू व मार्गदर्शक शिक्षक-शिक्षिका, प्रशिक्षकांना गौरविले. यशाचे श्रेय क्रीडा विभाग प्रमुख तथा प्रशिक्षक अक्षय मोरखडे, प्रा. चेतन चुने, रवी भोयर, वर्षा वानखडे यांना देतात.

Hello Akola Gramin
Page No. 2 Sep 30, 2024
Powered by: erelego.com

तरुण भारत
Akola Main | 2024-10-22 | Page- 2
epaper.tarunbharat.net

# सहदेवराव भोपळे विद्यालयाचे १८ खेळाडू विभागस्तरावर

**हिवरखेड, २१ ऑक्टोबर**

जिल्हास्तरीय मैदानी विविध स्पर्धा प्रकारात येथील सहदेवराव भोपळे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी बाजी मारून १८ विद्यार्थी खेळाडूंची विभागस्तरावर निवड झालेली आहे.

यात १९ वर्षाखालील मुली या गटातून ४४०० मीटर रिले प्रथम सहभागी विद्यार्थिनी खेळाडू गौरी बिलोने, सायली बोर्डे, प्रांजली बान्ते, गौरी ढोकणे व प्राची कानतोडे , हॅमर थ्रो प्रथम रेणुका राऊत, १७ वर्षाखालील गटातून ४ १०० मीटर रिले प्रथम सहभागी खेळाडू हेमलता भोपळे, राखी मोहतुरे, श्रावणी वानखडे, सपना पिंपळकर व प्रणिता गावंडे यांनी घवघवीत नेत्रदीपक यश मिळविले आहे.

हॅमर थ्रो द्वितीय क्रमांक नेहा बाजारे व प्रणिता गावंडे हिने १०० मीटर हर्डल्स, १०० मीटर धावणे या प्रकारात दुसरा क्रमांक पटकावून मुलींच्या गटातून ११ खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

तसेच १९ वर्षाखालील गटातून रामेश्वर देवानंद अरबे या विद्यार्थ्यांनी तिहेरी उडी, लांब उडी, २०० मीटर धावणे, रिले ४४०० मध्ये प्रथम क्रमांक पटकावून एकाच विद्यार्थ्याने चार सुवर्णपदक मिळावित नेत्रदीपक कामगिरी केली.

रिले या प्रकारात १७ वर्षाखालील मुले या गटात रामेश्वर अरबे, नितीन गावंडे, प्रेम नागपुरे, ओम राऊत व शंतनू गावंडे यांचा समावेश असून ते जिल्हास्तरावर प्रथम क्रमांकावर आहेत.

या जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत १८ सुवर्ण तर ३ रौप्य पदक मिळवित १८ विद्यार्थी खेळाडू ९ मैदानी क्रीडा प्रकारात विभागस्तरावर अकोला जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

या यशाबद्दल महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अनिलकुमार भोपळे ,कार्यवाह श्यामशील भोपळे, विभाग प्रमुख स्नेहल भोपळे, प्राचार्य संतोषकुमार राऊत, पर्यवेक्षक गणेश खानझोडे यांनी खेळाडूंना गौरविले. विभागस्तरावर निवड झालेल्या या १८ खेळाडूंचे सर्वच स्तरांतून कौतुक करण्यात येत आहे. शासनाने ग्रामीण भागातही चांगल्या दर्जाचे खेळाडू निर्माण करण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन केले आहे.

*(तभा वृत्तसेवा)*



सुरज चौबे 9730215424

यशवंत विद्यार्थ्यांसह शिक्षक व मान्यवर

Powered by iDocuments

देशोन्नती

# सहदेवराव भोपळे विद्यालयाचे १८ खेळाडू विभागीय स्तरावर

देशोन्नती वृत्तसंकलन

**हिवरखेड :** महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक संचालनालय व अकोला जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्यावतीने आयोजित जिल्हास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत विविध स्पर्धा प्रकारात सहदेवराव भोपळे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, हिवरखेड येथील विद्यार्थ्यांनी बाजी मारून १८ विद्यार्थी खेळाडूंची विभागीय स्तरावर निवड झालेलीआहे.

यात १९ वर्षाखालील मुली या गटातून ४ बाय ४०० मीटर रिले प्रथम सहभागी विद्यार्थिनी खेळाडू गौरी बिलोने, सायली बोर्डे, प्रांजली बान्ते, गौरी ढोकणे व प्राची कानतोडे, हॅमर थ्रो प्रथम रेणुका राऊत, १७ वर्षाखालील

## मैदानी क्रीडा स्पर्धेत मारली बाजी



गटातून ४ बाय १०० मीटर रिले प्रथम सहभागी खेळाडू हेमलता भोपळे, राखी मोहतुरे, श्रावणी वानखडे, सपना पिंपळकर व प्रणिता गावंडे, हॅमर थ्रो द्वितीय क्रमांक नेहा बाजारे व प्रणिता गावंडे हिने १०० मीटर हर्डल्स, १०० मीटर धावणे या प्रकारात दुसरा क्रमांक पटकावून मुलींच्या गटातून ११ खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तसेच १९ वर्षाखालील गटातून रामेश्वर देवानंद अरबे या विद्यार्थ्यांनी तिहेरी उडी, लांब उडी, २०० मीटर धावणे, रिले ४ बाय ४०० मध्ये प्रथम क्रमांक पटकावून एकाच विद्यार्थ्याने चार सुवर्ण पदक मिळवित नेत्रदीपक कामगिरी केली. रिले या प्रकारात १७ वर्षाखालील मुले या गटात रामेश्वर अरबे, नितीन गावंडे, प्रेम नागपुरे, ओम राऊत व शंतनू गावंडे यांचा समावेश असून ते जिल्हास्तरावर प्रथम क्रमांकावर आहेत. या जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत १८ सुवर्ण तर ३ रौप्य पदक मिळवीत १८ विद्यार्थी खेळाडू ९ मैदानी क्रीडा प्रकारात विभागस्तरावर अकोला जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. या यशाबद्दल महात्माफुले शिक्षणसंस्थेचे अध्यक्ष अनिलकुमार भोपळे, कार्यवाह श्यामशिल भोपळे, विभाग प्रमुख स्नेहल भोपळे, प्राचार्य संतोषकुमार राऊत, पर्यवेक्षक गणेश खानझोडे यांनी खेळाडूंना गौरविले. खेळाडू आपल्या यशाचे श्रेय आपल्या पालकांसह क्रीडा विभाग प्रमुख तथा प्रशिक्षक अक्षय मोरखडे, प्रतिभा इंगळे, माजी खेळाडू संकेत झगडे यांना देतात.

Akola Edition
Oct 19, 2024 Page No. 3
Powered by: erelego.com

**बातमीच्या व्हिडीओ लिंक**

https://youtu.be/x05qnMvxVAM?si=8Kr1YXCz0xRywn8J

सहदेवराव भोपळे विद्यालयाचे १८ खेळाडू विभागीय स्तरावर...

महाराष्ट्र नंदन न्यूज चैनल करीता तेल्हारा तालुका प्रतिनिधी....नंदकिशोर नागपूरे

https://youtu.be/f9yf41VJyF8?si=Gzu7Idp4Dxq8Y8xq

सहदेवराव भोपळे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय,हिवरखेड मधील क्रीडा स्पर्धेतील यश* 💐🌹🏅🏆

**समारोप -**

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे सहदेवराव भोपळे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे सदर यशोगाथा मध्ये नमूद केलेल्या अनेक अडचणीवर संस्था पदाधिकारी, शिक्षक –शिक्षिका, विद्यार्थी व पालकवर्ग यांच्या सहकार्याने मात करून त्यावर उपाययोजना करून प्रसंगी स्वतःचा वेळ, पैसा, वेळप्रसंगी कौटुंबिक जबाबदाऱ्याचा त्याग करून केवळ विद्यार्थी हितासाठी कार्य करीत आहे. क्रीडा क्षेत्रात शाळा उच्च स्थानी जागतिक पातळीवर पोहचविण्याच्या आमच्या हेतूला आणखी बळ मिळो, हीच अपेक्षा. धन्यवाद.

----------**----------

# "लोकसहभागातून विद्यार्थी विकास"

**शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,खोसपुरी,ता.अहिल्यानगर,जि.अहिल्यानगर**

**शाळेचा ईमेल आयडी** - zpschoolkhospuri01@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.जगताप माणिक लहानु
**मोबाईल क्रमांक** - 9922909827
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - manikjagtap1667@gmail.com

"कोणतीही गोष्ट सुंदर आणि चांगली करायची म्हणलं की प्रयत्न परिश्रम मेहनत घेतल्याशिवाय यश प्राप्ती होत नाही. आपली शाळा आदर्श व स्वच्छ, सुंदर व सर्व भौतिक सुविधायुक्त करण्यासाठी लोकसहभागातून साकारलेल्या खोसपुरी शाळेची यशोगाथा.

अहमदनगर जिल्ह्यातील नगर तालुक्यातील उत्तरेला शेवटचे घाटाखालील गाव डोंगराच्या कुशीत वसलेले हे टुमदार खोसपुरी गाव बहुतांश लोकांचा शेती व पशुपालन, बहुसंख्य मेंढपाळ हा व्यवसाय आहे. गावच्या नजीकच पांढरी पुलावरची भेळ प्रसिद्ध आहे. त्यामुळे पांढरीपूल महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. पांढरी पुलापासून दोन किलोमीटर अंतरावर खोसपुरी गाव आहे. गावात सर्व धर्मीय लोक गुण्यागोविंदाने एकत्र नांदतात.खोसपुरी शाळेला आम्ही जून 2018 मध्ये बदलून बदली होऊन आलो जिल्ह्याच्या मुख्यालयापासून जवळच असलेले गाव परंतु लोकांची शिक्षणाप्रती अनास्था. शाळेची इमारत तशी सुसज्ज होती परंतु भौतिक सुविधा शाळेत कोणत्याही नव्हत्या. शाळेत एक ते सात पर्यंतचे वर्ग आहेत. गावातील सधन पालकांची मुले बाहेरगावी शाळेत जात असायची. शाळेत एक ग्रेड पात्र मुख्याध्यापक व सात शिक्षक, आम्ही शाळा आदर्श करण्यासाठी सर्व भौतिक सुविधा सोई सुविधायुक्त शाळा बनवण्यासाठी कटिबद्ध होतो. विशेष म्हणजे शाळेमध्ये मुख्याध्यापक सोडून सर्व आम्ही शिक्षक हे त्यावर्षी त्या शाळेत बदलून आलेले होतो.प्रत्येकाला कामाचा चांगला दांडगा अनुभव होता. एक चांगली टीम आमची शाळेला हजर झालेली होती. आम्ही जून महिन्यामध्ये ग्रामस्थांची बैठक बोलावली, सर्वांनी आपल्या मनातील शाळेविषयी नाविन्यपूर्ण कल्पना मांडल्या. आदर्श शाळा करण्यासाठी आम्ही ज्या गोष्टी व्यक्त केल्या त्यासाठी ग्रामस्थांनी पुरेपूर सहकार्य करण्याचे ठरवले.

शाळेत सर्व शिक्षक मन लावून आपापले वर्ग अध्यापनाचे कार्य मोठ्या हिरीरीने करत होते त्यामुळे शाळेची शिस्त मुलांची प्रगती गावकऱ्यांना दिसत होती. गावामध्ये शाळेची प्रतिमा उंचावण्यास हातभार लागला. लोकांमध्ये चांगला संदेश गेल्यामुळे लोकांचा शाळेकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक होऊ लागला. एकदा गावाला शाळा आपलीशी वाटायला लागली की शाळेचा विकास हा झाल्याशिवाय राहत नाही. शाळेमध्ये पूर्वी जे मुलं शिकून गेले ते त्रास द्यायचे शाळेचे नुकसान करायचे परंतु आमच्या सर्वांच्या कामामुळे एकीमुळे अशा मुलांचा उपद्रव कमी झाला. जुलै महिन्यात आम्ही शाळेमध्ये सावली देणारे कडुलिंब, करंज यासारख्या वृक्षांची लागवड

केली आणि मुलांना त्याची जबाबदारी दिली प्रत्येक झाड गटामध्ये मुलांना विभागून दिले झाडांची काळजी मुले अतिशय चांगल्या प्रकारे वृक्षांची काळजी घेऊ लागले त्यामुळे वृक्ष चांगले बहरली.

गावात सर्व धर्मीय लोक असल्यामुळे सर्व सण उत्सव मोठ्या आनंदाने साजरे होतात. आम्ही आषाढी एकादशी निमित्त शाळेतील मुलांचे बालकिर्तन आयोजित केले आणि मोठ्या संख्येने बहुसंख्य लोक त्या कीर्तनासाठी आले. या गोष्टी गावच्या इतिहासात पहिल्यांदा घडत होत्या. लोकांना सुद्धा या गोष्टीचे कौतुक वाटत होते कारण प्रत्येकाच्या घरातील मुलगा मुलगी त्या कीर्तनात सहभागी झाले होते. कीर्तनात पूर्ण गाव दंग झाले होते. कीर्तनाचा सुंदर असा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमातून भरघोस अशी लोकवर्गणी जमा झाली आणि आम्हा सर्व शिक्षकांच  आणि मुख्याध्यापक यांच कौतुक झालं. मुलांसाठी शाळेमध्ये हात धुण्यासाठी हॅन्डवॉश स्टेशन नव्हते. आम्ही या लोकवर्गणीचा चांगला उपयोग करून मुलांसाठी सुसज्ज असे हॅन्ड वॉश स्टेशन उभारले. शाळेतील इमारत सोडून बाकी सर्व गोष्टी अपूर्ण होत्या. आम्ही त्यावर लक्ष देऊन एक एक गोष्ट पूर्णत्वास नेण्यासाठी प्रयत्न करत होतो. त्यानंतर ग्रामपंचायत मधून 15 व्या वित्त आयोगातून गावच्या सरपंच साहेबांशी चर्चा केली व ग्रामपंचायत कडून काय मिळेल यासाठी आम्ही प्रयत्न करू लागलो, त्यानुसार गावच्या सरपंचांनी तीन एलईडी टीव्ही देण्याचे कबूल केले आणि ते दिले. यामुळे आता मुले डिजिटल शिक्षण ई लर्निंग शिक्षणाकडे वाटचाल करू लागले. आमचा पाठपुरावा कायम प्रत्येक गोष्टीसाठी चालूच होता. या पाठपुराव्यामुळेच माननीय खासदार साहेबांकडून शाळेला दोन संगणक मिळाले सर्वांना केलेल्या चांगल्या कामाची पावती यातून मिळाली.

शाळेच्या चांगल्या कामाची दखल घेत अधिकाऱ्यांनी जेऊर बीटचा बाल आनंद मेळावा खोसपुरी येथे ठेवला यासाठी खोसपुरी ग्रामस्थांनी फार मोठ्या प्रमाणात सहकार्य केले, मंडप डेकोरेशन अशी सर्व जबाबदारी ग्रामस्थांनी पार पाडली. मेळावा आनंदात पार पडला. "गाव करील तेथे राव काय करील" या म्हणीप्रमाणे सर्व गावाने बाल आनंद मेळाव्यामध्ये खूप मोठ्या प्रमाणात आर्थिक व प्रत्यक्ष उपस्थित राहून सहकार्य केले. शाळेच्या सर्व चांगल्या उपक्रमांची माहिती सर्वांपर्यंत पोहोचली उपक्रमांचे कौतुक झाले.

शाळेला तीन बाजूने संरक्षक भिंत होती परंतु एक बाजू उघडी होती त्याचा शाळेला खूप त्रास होत होता. मोकाट जनावरे वृक्षांची तोड, नासधूस करत,त्यासाठी आमचा पाठपुरावा चालू झाला. यातूनच ग्रामपंचायतमार्फत आम्ही गावातील निधी शाळेकडे वळवून राहिलेली एक बाजूची संरक्षक भिंत ग्रामपंचायत निधीतून बांधून मिळाली. आता भिंत तर एवढी छान तयार झालेली होती त्यावर लोकसहभागातून रंगकाम करण्यात आले. विविध आकर्षक चित्रे, अभ्यास माहिती, मुलांसाठी आनंददायी कार्टून्स असे वॉल कंपाऊंडच्या भिंतीवर रेखाटले गेले, त्यामुळे भिंती बहरल्या. दिवसेंदिवस शाळेची घोडदौड चालूच होती.

विविध स्पर्धा परीक्षांमध्ये मुले पहिल्या क्रमांकावर असायची. जिल्हा परिषद अहमदनगर मार्फत घेण्यात येणाऱ्या इस्रो सहलीच्या स्पर्धेकरता आमच्या शाळेतील विद्यार्थिनी अस्मिता नागरगोजे हिची इस्रो सहली करता निवड झाली आणि शाळेच्या शिरपेचात अजून एक मानाचा तुरा रोवला गेला. जिल्हाभरातून अनेक मुले परीक्षेला बसलेली होती निबंध,परीक्षा व मुलाखत त्यानंतर निवड असे स्वरूप होते. तिच्या निवडीने सर्व स्तरातून तिचे व सर्व् शिक्षकांच्या कामाचे कौतुक झाले. काम करताना कुठेतरी प्रोत्साहन मिळणे गरजेचे आहे. जेऊर केंद्राचे

केंद्रप्रमुख व बीटचे आदर्श विस्तार अधिकारी श्री.कापरे साहेब यांनी अस्मिता व सर्व शिक्षकांचा जाहीर सत्कार केला. साहेबांनी नेहमीच चांगल्या कामात प्रोत्साहन दिल्यामुळे काम करण्यास हुरूप येत होता.

गावातील सुजाण नागरिक श्री.अण्णा पाटील यांनी त्यांच्या अमेरिकेतील मित्राला आमची जिल्हा परिषदेची शाळा दाखवली जे अमेरिकेत डॉक्टर आहेत. त्यांनी शाळेतील मुलांची गुणवत्ता पाहून शाळेसाठी काय मदत करू शकतो असे विचारले. शाळेत मुला- मुलींचे शौचालय नव्हते पूर्ण खराब झालेले होते, त्यांना समस्या सांगितली त्यांनी तात्काळ होकार दिला आणि जवळपास दीड लाख रुपये किमतीचे सुसज्ज असे शौचालय बांधून दिले. गावातील लोकांना शाळेप्रती तळमळ असली तरच अशा गोष्टी घडतात.

कालांतराने अजून काही वर्गामध्ये एलईडी टीव्हीची कमतरता होती. 26 जानेवारीला आम्ही सांस्कृतिक कार्यक्रम ठेवले सर्व ग्रामस्थांना ,पालकांना आमंत्रित केलेले होते. कार्यक्रम खूप बहारदार झाला आणि मोठ्या प्रमाणात लोकवर्गणी जमा झाली यातूनच शाळेला एलईडी टीव्ही खरेदी केले. शाळेसाठी गाव एवढे सहकार्य करत असल्यामुळे आम्ही सर्व सुद्धा आपण शाळेचे काही देणे लागतो या भावनेतून शाळेला साऊंड सिस्टिमची कमतरता होती आम्ही वर्गणी जमा करून अत्याधुनिक साऊंड सिस्टिम खरेदी केली. त्याचबरोबर हार्मोनियम व ढोलकी सुद्धा आणली याचा फायदा आता शाळेचा परिपाठ संगीतमय होऊ लागला. मुले आमच्या मदतीने सर्व कलांमध्ये पारंगत होत होती. प्रत्येक शिक्षक हरहुन्नरी असल्यामुळे सर्व गोष्टी साध्य होत होत्या त्यामुळे शाळेचे सुंदर असे कलापथक तयार झालेले आहे.

शाळेमध्ये विविध स्पर्धा परीक्षा स्कॉलरशिप यामध्ये मुले अव्वल असतात.एकीचं बळ काय असतं हे आम्ही सर्व शिक्षकांनी दाखवले आहे.शाळेमध्ये मुलांना कृषी विषयाची माहिती होण्यासाठी मुलांच्या मदतीने आम्ही सुंदर अशी परसबाग तयार केलेली आहे.शाळेला ज्या गोष्टीची कमी पडते त्या ठिकाणी ग्रामस्थ आमच्या पाठीशी सदैव उभे राहतात. यातूनच शाळेला पेव्हर ब्लॉक बसवण्यात आलेले आहेत. सुसज्ज मुला-मुलींचे शौचालय सर्व गोष्टींना आकर्षक रंगकाम यामुळे खोसपुरीची शाळा एक शैक्षणिक पर्यटन स्थळ बनली आहे.

अभ्यासाबरोबर इतर शैक्षणिक उपक्रम जसे की शैक्षणिक सहल दरवर्षी आयोजित केली जाते आणि मोठ्या उत्साहात पार पडते. सर्वांगीण विकासात शारीरिक विकासाचे महत्त्व लक्षात घेऊन शारीरिक शिक्षण दृष्टीने आम्ही शासनाकडे प्रस्ताव तयार करून पाठपुरावा करून शाळेसाठी जवळपास दोन लाख रुपये किमतीचे क्रीडा साहित्य मिळवले. अतिशय आधुनिक सर्व क्रीडा साहित्यातून मुलांचा चांगला विकास घडत आहे. शाळेसाठी विविध योजना असतात परंतु बरेचदा तिथपर्यंत आपण पोहोचत नाही. अशीच एका योजनेंतर्गत शासनाच्या महाऊर्जा वीज विभागाकडून साहित्य मिळवले. तेथेही चांगला पाठपुरावा केल्यामुळे शाळेला इको फ्रेंडली फॅन एलईडी, सीएफएल लाईट, हायमॅक्स अशी 75 हजार रुपयांचे साहित्य प्राप्त झाले. मुख्याध्यापक यांच्यासह सर्व शिक्षक शाळेत झोकून देऊन काम करतात त्यामुळे मुलांची गुणवत्ता पाहून अधिकारी ग्रामस्थ कौतुक करतात.

कोविड काळातही विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमध्ये आम्ही काही फरक पडू दिला नाही. सर्व शिक्षकांनी ऑनलाइन तास, घरोघरी जाऊन गृहभेटी YouTube, Google meet या उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना

शैक्षणिक प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी सातत्याने सर्वांनी मनापासून प्रयत्न केले त्यामुळे मुलांची गुणवत्ता वाढण्यात मदत झाली.

ग्रामीण भागातील गरिबांची,शेतकऱ्यांची मुले मोठ्या इंग्रजी शाळेत अमाप फी भरून शिक्षण घेण्यापेक्षा आम्ही मुख्याध्यापक व सर्व शिक्षक इंग्रजी शाळेपेक्षा कितीतरी पटीने उत्कृष्ट दर्जाचे शिक्षण आपल्या जिल्हा परिषद शाळेत देण्यासाठी कायम कटिबद्ध आहोत. मुलांचा सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने आम्ही सर्व शिक्षक कृतीयुक्त अध्यापनावर कौशल्यावर भर देत असून पारंपारिक खेळ, कला, संगीत ,पर्यावरण शिक्षण प्रत्यक्ष अनुभव मुलांना देत असून मातृभाषेतून शिक्षण व गुणवत्तेबरोबर विविध कलागुणांना भरपूर वाव दिला जातो. कृतीयुक्त अध्यापन तसेंच ज्ञानरचनावादी अध्यापन पद्धती, विज्ञान प्रदर्शन, क्रीडा स्पर्धा, सामान्य ज्ञान स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, परीक्षा, चित्रकला स्पर्धा, विद्यार्थी गुणवत्ता कौशल्य वाढीसाठी प्रत्येक उपक्रमात सहभागी होऊन आमचे विद्यार्थी प्राविण्य प्राप्त करत आहेत. जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये बक्षीसे मिळवत ग्रामीण भागातील शाळेने मोठे यश मिळवले आहे. शिष्यवृत्तीसाठी आमच्या शाळेतील मुलांचा निकाल हा अव्वल असतो दरवर्षी गुणवत्ता यादीत मुले चमकतात. या सर्व कामगिरीमुळे आमच्या शाळेला अधिकारी, पदाधिकाऱ्यांनी भेटी देऊन नेहमीच कौतुक केलेले आहे.

**आमच्या शाळेत पुढील उपक्रम अभ्यासाबरोबर राबवले जातात.**

1. स्वच्छ शाळा, सुंदर शाळा, सुंदर परिसर शाळा-परिसर स्वच्छतेचे महत्व
2. ज्ञान रचनावादानुसार अध्ययन-अध्यापन
3. Musical दैनिक आदर्श परिपाठ, दिनांक व सुविचार, दिनविशेष वाचन
4. ओझ्याविना अध्ययन, दप्तर विना शाळा.. दप्तरमुक्त शाळा
5. १००% पटनोंदणी, उपस्थिती व गुणवत्तापूर्ण शिक्षण
6. सांस्कृतिक स्पर्धा
7. वृक्षारोपण वृक्षसंवर्धन
8. १ ते १०० पर्यंतच्या संख्यांच्या दृढीकरणासाठी उपक्रम.. (पाढे पाठांतर)
10. शब्दांपासून वाक्ये - ज्ञानरचनावादावर भर
11. प्रत्येकाचा वाढदिवस नावीन्यपूर्ण पद्धतीने साजरा केला जातो.
12. सराव पेपर पालकांच्या मदतीने सोडवुन घेतो.
13. वक्तृत्व कला वृध्दींगत करण्यासाठी तोंडी भाषणाचा सराव
14. वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन
15. क्रीडा स्पर्धा.. क्रीडास्पर्धेत यश
16. पिण्यासाठी शुद्ध पाणी
17. मुला मुलींसाठी स्वतंत्र शौचालय स्वच्छतागृह नियमित वापर
18. जेवणाच्या अगोदर हात धुण्यासाठी 6 पायऱ्यांचा नियमित वापर.

19. मध्यान्ह भोजन शिस्तीने
20. चित्रकला स्पर्धा. रांगोळी स्पर्धा
21 इंग्रजीचे कुठलेही स्पेलिंग तयार करणे व वाचणे मधल्या सुट्टीत स्पेलिंग वाचन
22. गणिती क्रिया करण्यासाठी भरपूर साहित्य आहे. वेगवेगळ्या पद्धतींचा वापर.
23. गटनिहाय अभ्यास, कृतीयुक्त अध्यापनावर भर, चित्रकला स्पर्धा
24. पालक भेट..गैरहजर मुलांना शाळेत आणण्यासाठी पाठपुरावा
25. पालकांना विद्यार्थ्यांच्या प्रगतीची चर्चा पालकभेट घेऊन अथवा फोनवरुन
26. वैयक्तिक अध्यापनावर भर...शिक्षक बनतात सुलभक.
27.पहिलीला दाखल होणारे विद्यार्थी मार्चपासूनच शाळेत येतात व पुर्व तयारी होते
28. तिसरी, चौथी, पाचवी वर्गासाठी शिष्यवृत्तीच्या दृष्टीने जादा तासिकांचे आयोजन.

अशाप्रकारे विविध चांगल्या बाबीमुळे पालकांना शाळा आपली वाटू लागली आहे. लोकसहभाग मोठ्या प्रमाणात जमा होतोय आमच्या गावातील जी मुले दुसरीकडे इंग्रजी माध्यमांच्या शाळेत जात होती ती आमच्या शाळेत प्रवेशित आहेत. गावातील लोक आदराने शाळेविषयी इतरांना माहिती सांगतात त्यामुळे बाहेरगावातील विद्यार्थीही या शाळेत दाखल झालेले आहेत. मुख्याध्यापक,शिक्षक, पालक व विद्यार्थी यांनी मनावर घेतले आणि इच्छाशक्तीच्या जोरावर वाटचाल करण्याचा निर्धार केला तर किती कायापालट होऊ शकतो याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे म्हणजे आमची खोसपुरीची शाळा.शाळेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी खोसपुरी ग्रामस्थ यांच्या मदतीने व परिसरातील दानशूर लोकांच्या योगदानातून खोसपुरी शाळा एक आदर्श शाळा म्हणून नावलौकिक करत आहे.

आम्हाला नेहमीच प्रेरणा देणारे तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी बाबुराव जाधव साहेब आमचे मार्गदर्शक जेऊर बीटचे विस्तार अधिकारी श्री कापरे साहेब तसेच जेऊर केंद्राचे केंद्रप्रमुख श्री पोपट धामणे साहेब यांच्या प्रोत्साहनामुळे सर्व गोष्टी शक्य होत आहेत. आमच्या शाळेचे आधारस्तंभ आमचे आदर्श मुख्याध्यापक श्री माणिक जगताप सर व आम्ही सर्व शिक्षक श्री. बाळासाहेब कदम सर् सौ.सुरेखा मुरकुटे मॅडम, श्रीम. वैशाली खरमाळे मॅडम, राहुल लोंढे सर, श्री मनोज काशीद सर आम्ही सर्वजण सातत्याने खोसपुरी शाळेला यशाच्या उंच शिखरावर नेण्याचा कायम प्रयत्न करत आहोत.शाळेला सदैव सहकार्य करणाऱ्या खोसपुरी ग्रामस्थांचे आभार.

Link-1. https://youtu.be/70yruihKrKQ?si=j39pXn57O2u2n90P
Link2. https://youtu.be/MkRJSJuA2Nc?si=mn_MDce7wgsv1eq7
Link3. https://youtu.be/wqLHkkx4NCE?si=40_-YnzXUtAicedO
Link4. https://youtu.be/wqLHkkx4NCE?si=X6O9NfxBXfZAr6y6




चरित्र ही मनुष्य का श्रेष्ठ गुण है।
पतंग


जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खोसपुरी ता जि अ.नगर


प्राथमिक

----------**----------

# "पी.एल.सी स्वच्छता मॉनिटर प्रकल्पातील सर्वोत्तम शाळा"

**शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भाळवणी, ता.पारनेर, जि.अहिल्यानगर.**

**शाळेचा ईमेल आयडी** - bhalwani@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.श्रीपती दादाभाऊ अबुज
**मोबाईल क्रमांक** - 9423202088
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - shripatiabuj@gmail.com

**प्रस्तावना -**

प्रत्येक बालकामध्ये जिज्ञासूपणा,कल्पकता अशा सवयी विकसित होणे अतिशय गरजेचे आहे. NEP 2020 नुसार पूर्व प्राथमिक ते इ.3 री पर्यंतच्या प्रत्येक विद्यार्थ्यास सन 2020 पर्यंत मूलभूत स्तरावर वाचन लेखन व अंक गणिताच्या क्षमता प्राप्त करण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. यासोबतच प्रत्येक बालकाचा बौद्धिक, भावनिक, सामाजिक विकास होणेही अत्यंत आवश्यक आहे. या दृष्टीने जिल्हा परिषद भाळवणी शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासासाठी विविध सह शालेय उपक्रम आयोजित केले जातात. विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होत आहे.

**शिक्षक व मुख्याध्यापक यांना आलेल्या अडचणी -**

1. विद्यार्थ्यांमध्ये जीवन कौशल्यांचा अभाव.
2. वैज्ञानिक दृष्टिकोन आरोग्यपूर्ण जीवनशैलीबाबत निरसता.
3. पालकांचा इंग्रजी माध्यम शाळांकडे ओढा.
4. विविध भौतिक सुविधांचा अभाव
5. विद्यार्थ्यांची गैरहजेरी
6. तंत्रज्ञान, स्मार्ट डिजिटल सुविधांची कमतरता.

**अडचणींवर मात करण्यासाठी शिक्षकांनी विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांद्वारे प्रभावी कामासाठी केलेली अंमलबजावणी -**

**1. पटनोंदणी -शाळा पूर्वतयारी मेळावा -** शाळेची पटसंख्या वाढावी तसेच सर्व बालके शालेय प्रवाहात दाखल व्हावे याकरिता जनजागृती करण्यात आली. परराज्यातून आलेल्या पालकांच्या गृहभेटी घेऊन सर्व विद्यार्थ्यांना शालेय प्रवाहात दाखल करून 100% पट नोंदणी उद्दिष्ट पूर्ती करण्यात आली.

**2. आमचा परिपाठ, आमचे हक्काचे व्यासपीठ -** सप्तरंगी परिपाठामध्ये आठवड्यातील नियोजनानुसार वर्ग तुकडी निहाय विद्यार्थी परिपाठासोबतच नाटिका, कविता, इंग्रजी स्किट, कथाकथन यांचे सादरीकरण व्यासपीठावर अतिशय उत्साहाने करतात.

**3. मी ज्ञानी होणार उपक्रम -** विद्यार्थ्यांना दैनंदिन सर्व विषय समावेशक सामान्य ज्ञान आधारित पाच प्रश्न रोज फलकावर लिहून दिले जातात. महिन्यातील शेवटच्या शनिवारी यावर आधारित सराव चाचणी घेतली जाते.

**4. लेखक- कवी आपल्या भेटीला -** या उपक्रमांतर्गत विद्यार्थी पाठ्यपुस्तकातील पाठ, कविता यांचे कवी व लेखक यांना ऑनलाइन गुगल मॅप व झूम द्वारे भेटतात. त्यांची मुलाखत घेऊन विविध विषयांवर संवाद साधतात.

**5. जपूया आपली मूल्ये -**

1) जयंती पुण्यतिथी निमित्त वक्तृत्व गायन स्पर्धांचे आयोजन.

2) बालदिन साजरा करणे.

3) स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन विविध कार्यक्रम आयोजन.

4) योग दिन कवायत सूर्यनमस्कार प्राणायाम घेणे.

5) वाचन दिन साजरा करणे.

6) विविध सण उत्सव साजरे करणे.

**6. विविध गुणदर्शन सोहळा -** सदर उपक्रमांतर्गत शालेय वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करण्यात येते. यामध्ये विद्यार्थी सुप्त कला गुणांचे सादरीकरण करतात कला संस्कृतीची जोपासना करत लोकगीते,पोवाडे, विविध नाटिका, संदेशात्मक नृत्य सादर केले जातात.

**7. आनंद नगरीचे आयोजन -** घरगुती तयार करण्यात आलेल्या विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल्स तसेच भाजीपाला विक्रीची दुकाने लावण्यात येतात. यामध्ये विद्यार्थी स्व कमाई- खर्च याद्वारे गणितीय संबोध शिकतात.

**8. कौशल्य व डिजिटल उपक्रम -** आनंददायी शनिवार अंतर्गत माती पासून मुखवटे निर्मिती, कागदी पिशवी निर्मिती, डिजिटलतेच्या दृष्टीने- Pmevidya, SCERT युट्युब चॅनेल्स तसेच इंटर ऍक्टिव्ह बोर्ड वर प्रात्यक्षिक विद्यार्थी शिकतात.

**9. मिशन लाईफच्या दृष्टीने उपक्रम** –

1) वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन केले जाते.

2) इको क्लब ची स्थापना केली.

3) खाद्य महोत्सव साजरा केला जातो.

**10.मुलांचा हक्काचा फळा - फ्रीडमवॉल -** सदर उपक्रमामध्ये विद्यार्थी स्वतःच्या आवडीचे हक्काने हवे ते त्यांच्यासाठी स्वतंत्रपणे उपलब्ध करून देण्यात आलेल्या फळ्यावर लिहितात तसे तरी रेखाटतात. यामुळे मुले स्वतःहून व्यक्त होण्यास मदत मिळाली आहे.

**11. QR code युक्त परसबाग -** औषधी वनस्पती, भाजीपाला, फुलझाडे, फळझाडे यांवर क्यू आर कोड लावण्यात आलेले आहेत. विद्यार्थी क्यूआर कोड स्कॅन करून स्वतः वनस्पती झाडांची फुलांची फळांची माहिती मिळवतात.

**12. स्वच्छता मॉनिटर उपक्रम -** सदर उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी गावामध्ये परिसरामध्ये कचरा टाकणाऱ्या ग्रामस्थांना लोकांना योग्य वेळी थांबवून कचरा कचराकुंडीतच टाकावा याबद्दल स्वतः सांगितले आहे व कृती करून घेतलेल्या आहेत. सदर उपक्रमांमध्ये शाळेतील विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय बक्षीसही मिळविलेले आहे.

**13. प्रसंगोत्पादक उपक्रम -**

1) इको फ्रेंडली राखी निर्मिती कार्यशाळा.

2) पर्यावरण पूरक आकाश कंदील निर्मिती.

**3) क्षेत्रभेटी -**

1) साखर कारखाना भेट.

2) बँक ग्रामपंचायत पोस्ट ऑफिस भेट.

3) बांधकाम लाकूडकाम कारखाना भेट.

4) शैक्षणिक सहलींचे आयोजन.

**14. पुस्तक फराळ उपक्रम -** ठेवा ज्ञानाचा, पुस्तक फराळ उपक्रमाचा!

प्रत्येक बालकाचा भाषिक विकास होण्यास वाचन हे अनन्यसाधारण असे महत्त्वपूर्ण साधन आहे. वाचनाने प्रत्येक व्यक्ती प्रतिभावंत, प्रगल्भ होते,समृद्ध बनते. शब्द संपत्ती व ज्ञान भांडारात वाढ होते या दृष्टीने वाचनाचा तास अत्यंत उत्तम भूमिका पार पाडत आहे अवांतर वाचनाचा पुस्तक साठा अधिक असेल तर विद्यार्थ्यांचे वाचन वेळ

नक्कीच वाढेल विद्यार्थी अधिकाधिक वेगवेगळी पुस्तके वाचू शकतील म्हणून २०२३-२०२४ शैक्षणिक वर्षात नोव्हेंबर २०२३पासून नाविन्यपूर्ण पुस्तक फराळ उपक्रम शाळेमध्ये राबविला. उपक्रमाकरिता मुख्याध्यापक व शिक्षक यांनी साथ दिली. दिनांक ६ नोव्हेंबर २०२३ रोजी पुस्तक फराळ उपक्रमाची सुरुवात केली.

विद्यार्थ्यांना प्रत्येक गोष्टीत नाविन्य हवे असते. ही नावीन्याची आस विद्यार्थ्यांचे चांगले व्यक्तीमत्त्व घडण्यास उपयोगात आणणे अत्यंत गरजेचे व महत्वाचे ठरले. विद्यार्थ्यांची वाचनाची आवड जोपासण्यासाठी नवनवीन पुस्तकांचा संग्रह ग्रंथालयात असणे आवश्यक होते, या दृष्टीने पुस्तकांचे संकलन करणे गरजेचे वाटले. विद्यार्थ्यांची शब्दसंपत्तीतील वाढ,एकाग्रता अवांतरवाचनाची आवड या दृष्टीने सदर उपक्रम राबविण्यासाठी महत्त्वाचा वाटला. विद्यार्थ्यांना अधिकाधिक नवनवीन पुस्तके वाचनास जर उपलब्ध झाली तर निश्चितच विद्यार्थ्यांच्या नैतिक मूल्यांची रुजवण होऊन संस्कारक्षम सर्वगुण संपन्न विद्यार्थी घडण्यास मदत मिळेल.

**15.भाषा विषयक उपक्रम -**

मराठी भाषा दिन साजरा करणे.

पत्रलेखन आयोजन : चांद्रयान-3 मोहीम यशस्वीतेबद्दल इस्रो या अंतराळ संशोधन केंद्रास अभिनंदन पर पत्र लेखन करण्यात आले.

**16.निपुण भारत अभियान अंतर्गत विविध उपक्रम -**

1) माता पालक गटाचे उत्कृष्ट कार्य व सहभाग.

2) गणितोत्सव आयोजन.

3) जलसाक्षरता मिशन स्पर्धा.

4) विज्ञान दिन.

5) वाचन प्रेरणा दिन.

**उद्दिष्टे -**

1) अवांतर वाचनाची गोडी निर्माण करणे.
2) एकाग्रता व शब्द संपत्ती वृद्धिंगत करणे.
3) समज पूर्वक वाचन क्षमता विकसित करणे.
4) नवनवीन विविध बाल साहित्याचा साठा शालेय ग्रंथालयात वाढवून विद्यार्थ्यांना वाचनाची संधी विविध स्तरावर उपलब्ध करून देणे.
5) भविष्याचा विचार करता राष्ट्रीय,सामाजिक,शैक्षणिक, वैचारिक विचाराचा पाया उभा करण्यास हातभार लावणे.

6) वयोगटांनुसार बालकांना मराठी भाषेतील साहित्य उपलब्ध करून देणे.
7) बाल वयातच वाचक वर्ग तयार करणे.
8) वाचनाद्वारे चांगले संस्कार घडविणे.
9) कथा कविता कादंबरी नाटके यांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये रसास्वाद घेण्याची वृत्ती निर्माण करणे.

**उपक्रमाचे नियोजन व प्रत्यक्ष कार्यवाही -**

विद्यार्थी वाचन आवड वाढविण्यासाठी प्रथमतः विद्यार्थ्यांना अवांतर वाचन योग्य विविध पुस्तके उपलब्ध असणे आवश्यक होते या दृष्टीने दिनांक ६ नोव्हेंबर, २०२३ रोजी "पुस्तक फराळ" उपक्रमास सुरूवात केली. या अंतर्गत विविध पुस्तके भेट स्वरूपात उपलब्ध होण्याकरिता उपक्रमाच्या दुसऱ्या दिवशी सोशल मीडियावरील पोस्ट पाहून लेखी स्वरूपात एक मेसेज सोशल मीडियावर पोस्ट करण्यात आला.

- मा.सारिका कळसकर- युनिक फीचर्स व जागर समकालीन प्रकाशन संस्था,पुणे यांनी फोन द्वारे संपर्क केला. विद्यार्थ्यांसाठी व सोबतच शिक्षकांसाठी देखील उत्कृष्ट अशी पुस्तके त्यांनी शाळेसाठी पाठविली या कार्यात पुण्यातील श्री. सुधीर जोशी यांचे सहकार्य संस्थेस मिळाले.
- मा.श्री पंकज सोनवणे साहेब (मुळगाव नेवासा), IRS, आयकर उपायुक्त, बेंगलोर यांच्याकडून अतिशय उत्कृष्ट अशी पाच पुस्तके भेट देण्यात आली.
- IPS, मा श्री प्रशांत सुंबे साहेब (मुळगाव पाडळी तर्फे कान्हूर पारनेर), जिल्हा पोलीस अधीक्षक, नर्मदा, गुजरात यांच्याकडून छत्रपती शिवरायांचे मावळे यांवर आधारित 14 पुस्तकांचा संच भेट देण्यात आला.
- मा.रेणुका मुजुमदार, Explore Kids World, Pune या संस्थेकडून इंग्रजी भाषेतील गोष्टी कथा आधारित 50 पुस्तके तसेच सोबत प्रत्येक विद्यार्थ्यास My Colour Book रंग खडूंचे पॅकेट्स भेट देण्यात आले.
- मा. सुगम कुलकर्णी, सक्षम फाउंडेशन मुंबई यांज कडून उत्कृष्ट ५० पुस्तके भेट.
- चि.अजित अजय गवारे व गवारे कुटुंबीय पुणे तर्फे ५० पुस्तके सप्रेम भेट.
- राज्य आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षक मा.श्री.तुकाराम दादा यांजकडून १०० पुस्तके भेट प्राप्त झाली आहेत.

या उपक्रमात हातभार लावणारी प्रत्येक व्यक्ति, संस्था अतिशय उपयुक्त ठरल्या आहेत, ग्रंथालयातील वाढलेला पुस्तक संग्रह अशाप्रकारे पुस्तक फराळ या उपक्रमाची उत्तम फलनिष्पत्ती प्राप्त झाली आहे, अजूनही पुस्तकांचा अविरतपणे पोस्टाद्वारे संग्रह प्राप्त होत आहे. मनापासून केलेल्या प्रत्येक कार्याची निश्चितच उत्तम फलनिष्पत्ती मिळते हे याद्वारे खरोखर सिद्ध होताना दिसत आहे.

**यशस्विता -**

१.विद्यार्थ्यांना नवनवीन विविध पुस्तके वाचनास उपलब्ध झाली.

२. विद्यार्थी अधिक आवडीने वाचन करू लागले परिणामी शालेय पाठ्यपुस्तके वाचनात गोडी निर्माण झाली.

३ शालेय ग्रंथालय बालसाहित्यातील संग्रहाची वाढ झाली आहे.

४. विद्यार्थ्यांच्या अवांतर वाचनात तील आवड वाढून शब्द संपत्तीत वाढ होत आहे.

५. विद्यार्थ्यांना स्वयं अध्ययनाची सवय लागली.

६. महाराष्ट्रातील वाचन चळवळ एक तास आनंददायी वाचनाचा या उपक्रमास पूरक असा पुस्तक फराळ उपक्रम ठरला आहे.

**फलनिष्पत्ती -**

विद्यार्थ्यांचा बौद्धिक भावनिक आणि सामाजिक विकास होण्यास अतिशय मोलाचा हातभार मिळाला. विद्यार्थ्यांची दैनंदिन हजेरी उपस्थिती 100% झाली. विद्यार्थी शाळेमध्ये उत्साहाने येऊ लागले. यासोबतच पालकांचा लोकसहभाग देखील शाळेत मोठ्या प्रमाणावर वाढला. राज्यस्तरावर शाळेने स्वच्छता मॉनिटर उपक्रमात फेज-2 मध्ये टॉप 100 मध्ये 19व्या क्रमांकावर तर फेज-3 मध्ये special 51 मध्ये स्थान मिळवले. तालुकास्तर तसेच जिल्हास्तरावर विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी क्रमांक प्राप्त केले. विविध स्पर्धा परीक्षांमध्ये अधिकाधिक विद्यार्थ्यांची उच्चतम श्रेणीमध्ये निवड झाली. शाळेस मोठ्या प्रमाणावर लोकसहभाग प्राप्त होत आहे. तालुका, जिल्हा नव्हेच तर राज्यामध्ये देखील शाळेची वेगळी ओळख निर्माण झाली आहे.

**समारोप -**

विविध सहशालेय आनंददायी उपक्रमांद्वारे शाळेतील वातावरण अतिशय आनंददायी व हसत खेळत राहून विद्यार्थी भविष्यवेधी शिक्षणाकडे आगेकूच करू पाहत आहेत.शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी अतिशय पोषक वातावरण तयार होत असून सर्व उपक्रमांना शाळेचे मुख्याध्यापक सर्व वर्गशिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती,ग्रामस्थ केंद्रप्रमुख तसेच सर्व पर्यवेक्षीय यंत्रणा आणि DIET टीम संगमनेर यांचे वेळोवेळी मदत सहकार्य व मार्गदर्शन देखील लाभले आहे.

**विविध उपक्रम व्हिडिओ लिंक्स -**

https://www.instagram.com/reel/DBIT_j3M63D/?igshcjZkN2M2bzBiZ2Jl

https://youtu.be/Kzhw-TO1Si8?feature=share

https://youtu.be/22OCiSC9D7Y?si=n3VZAZ-dkXVU27mH

https://youtu.be/_5V9hwUsPrE?si=r7xW1fdp9iwapYaN

https://youtu.be/dFOoRbNp6pQ?si=Z4679_dqcZp3Zr7k

https://www.instagram.com/reel/DBjfbq-s9Qs/?igsh=MTduYzhxNzR4Mml3cg==

https://www.instagram.com/reel/DBjddTss6Ln/?igsh=MmFuczBsYWQ2M2py

https://www.instagram.com/reel/DBjc7_ws_Tt/?igsh=aTV5ZHlwd3lpNWlm




BLACKBOARD
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,भाळवणी
Z. P. P. S. Bhalwani, Ahmednagar
*कागदी टोपी तयार करणे*
*भेटकार्ड तयार करणे*
Save Tree

## PLC Swachhta Monitor 2023-24 Phase 2

## Special 51 Schools In Maharashtra

List is sorted in Alphabetical Order of Districts; Not Ranks.

| District | Udise | School | Selection |
|---|---|---|---|
| Ahmednagar | 27260710610 | Diwate Patil Public School | Special 51 |
| Ahmednagar | 27261003921 | Pravara Kanya Vidya Mandir & Jr. College | Special 51 |
| Ahmednagar | 27261501305 | Residential High School, Ahmednagar | Special 51 |
| Ahmednagar | 27260502205 | Shri Nrusinha Vidyalaya, Chas Ta Ahmednagar | Special 51 |
| Ahmednagar | 27260501001 | Z P P School Baburdi Ghumat | Special 51 |
| Ahmednagar | 27260608101 | Z P P School, Bhalgaon | Special 51 |
| Ahmednagar | 27260700901 | Zilla Parishad Primary School Bhalwani | Special 51 |
| Ahmednagar | 27260501902 | Zilla Parishad Primary School Yashwantnagar | Special 51 |
| Amravati | 27071506911 | Manibai Gujarati High School, Ambapeth, Amravati | Special 51 |
| Beed | 27270711004 | Jijamata Vid Mogra | Special 51 |
| Beed | 27270600118 | Saneguruji Nivashi Prathmik Vidyalay, Kaij | Special 51 |
| Bhandara | 27100600403 | Dr. Babasaheb Ambedkar Vidyalaya & Jr. College Lakhandur | Special 51 |
| Buldhana | 27041004029 | Ajit International School & Jr. College Nandura | Special 51 |
| Buldhana | 27040400113 | Chatrapati Shri Shivaji Maharaj N.P. High School And Junior | Special 51 |
| Buldhana | 27041202202 | N. V. Chinmaya Vidyalaya, Shegaon | Special 51 |
| Buldhana | 27040102502 | Vidya Vikas Vidyalaya Kolwad Tq, Buldhana | Special 51 |
| Buldhana | 27040201101 | Z P MARATHI UPPER PRIMARY SCHOOL, BHOKAR | Special 51 |
| Chandrapur | 27130303603 | Nutan Nehru Vidyalaya Nagri | Special 51 |






#SwachhtaMonitor


#SwachhtaMonitor



wachhtaMonitor




#SwachhtaMonitor


विजयादशमी



विजयादशमी


Hate (हेट)-तिरस्कार
Lie (लाइ) - खोटे बोलणे
Ego (इगो) - अंहकार
Anger (अँगर)-राग
Jealousy
Cruelty
Violence
Greed
Hate
तिरस्कार
Lie
खोटेपणा
Ego
अहंकार
Anger
Violence
हिंसा


विजयादशमी


BLACKBOARD
23/10/2023
Monday सोमवार
विजयादशमी
Hate (हेट)-तिरस्कार
Lie (लाइ) - खोटे बोलणे
Ego (इगो) - अंहकार
Anger (अँगर)-राग
Jealousy
Cruelty
Violence
Greed
Dishonest


नवरात्री उपक्रम
रंग अध्ययनाचे अभ्यासाचे
जि प प्राथ शाळा भाळवणी
लाल
Red


नवरात्री उपक्रम
रंग अध्ययनाचे अभ्यासाचे
जि प प्राथ शाळा भाळवणी
Blue
निळा


नवरात्री उपक्रम
रंग अध्ययनाचे अभ्यासाचे
जि. प. प्रा. शाळा, भाळवणी
Yellow
पिवळा



नवरात्री उपक्रम
रंग अध्ययनाचे अभ्यासाचे
जि प प्राथ शाळा भाळवणी
Blue
निळा


नवरात्री उपक्रम
रंग अध्ययनाचे अभ्यासाचे
जि. प. प्रा. शाळा, भाळवणी
Yellow
पिवळा


वर्ष १ । अंक ४ । ऑक्टोबर - नोव्हेंबर - डिसेंबर २०२३
शिक्षणगाथा
विद्यार्थी रमतात खेळण्यांच्या बँकेत...
खलाणे एक्सप्रेस - उपस्थितीचा सुसाट प्रवास...
लाईट कॅमेरा अॅन्ड ... शिक्षण


शिक्षणगाथा
शैक्षणिक त्रैमासिक
ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०२३
वर्ष पहिले, अंक ४ था,
पाडव्य-अश्विन-कार्तिक-मार्गशीर्ष, शके १९४५
संकल्पना/मार्गदर्शन :
सुरज मांढरे
संपादक :
कृष्णकुमार पाटील
प्रकाशक :
विवेक उत्तम गोसावी
कार्यकारी संपादक
किरण केंद्रे
निर्मिती अधिकारी :
हेमंत वावर
मुखपृष्ठ : रविंद्र केदार
पत्रव्यवहाराचा पत्ता:
कार्यकारी संपादक, शिक्षणगाथा
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
सेनापती बापट मार्ग, पुणे- ४११००४
संपादक : ०२०- २५७१९७७
ई-मेल : shikshangatha@balbharati.in
अनुक्रमणिका
समूह शाळा : नव्या युगाची नांदी
सुरज मांढरे ४
आगळावेगळा निसर्ग अभ्यास
प्रार्थना देसाई ७
तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षकाची भूमिका महत्त्वाची
मृणाल गाजाळे ८
विद्यार्थी रमतात खेळण्यांच्या बँकेत...
योगिता सोनवणे १०
खलाणे एक्सप्रेस - उपस्थितीचा सुसाट प्रवास...
कैलास गोडिंबा वाघ १२
...आणि विद्यार्थी बनले अर्थसाक्षर
सौम्या शर्मा १४
गाव जेव्हा नकाशावर येतं...
समीना नजीर खलिफा १७
विद्यार्थी नितळात संविधानाचे धडे
अश्विनी लोंढणे १८
वदनी कवळ घेता...
भागीनाथ नामदेव वडे २०
पावलांना ओढ शाळेची...
जगदीश कुळे २२
लाईट कॅमेरा अॅन्ड ... शिक्षण
उमेश वेरुळीकर २४
चित्रवाचन आणि पाठ्यपुस्तके
प्रमोद प्रकाश चाफळे २६
महात्मा फुल्यांची शैक्षणिक भूमिका आणि कार्य
प्रा. डी. गणेश राऊत २८
थडे 'सर्वसमावेशक क्लासरूम'चे
योगेश टिळेकर ३०
मुलांच्या हक्काचा फळा... 'फ्रीडमवॉल'
निलिमा सुंबे ३४
आणि उलगडला रानभाज्यांचा खजिना !
रश्मी आंगणे ३८
सालेय शिक्षणाचा व्यापक विचारवेध


वेचक
मुलांच्या हक्काचा फळा... 'फ्रीडमवॉल'
शाळेत आल्या आल्या मुलांना खूप काही सांगायचे असते पण ते वेळीच त्यांना व्यक्त होता येतेच असे नाही. त्यांच्या मनातल्या गोष्टी कळल्यात; नकळत मुलांच्या अंतरंगात शिरता याच म्हणून मी फ्रीडमवॉल हा उपक्रम हाती घेतला. मुलांचे भावविश्व फळ्यावर पाहणे ही प्रक्रिया एका शिक्षकासाठी खूप सकारात्मक भावना जागृत करणारी आहे. फळा, खडू, मुले आणि मोकळा वेळ एवढेच उपक्रमाचे साधन.
निलिमा सुंबे
प्राथमिक शाळा माळवली, ता. पारनेर , जि. अहमदनगर
संपर्क : ९४०३१९०५५०
शाळेतील काही मुले इतर विद्यार्थ्यांप्रमाणे चुटचुटू बोलत नाहीत. यामध्ये मुख्य अडसर असतो तो भाषेचा! मुलांना जाणवणारा हा भाषिक अडसर दूर करून त्यांना त्यांच्याच भाषेत व्यक्त होण्याची संधी देण्यासाठी वेगळा उपक्रम राबवायला हवा असे मला वाटले आणि आकाराला आली 'फ्रीडमवॉल'.
शाळेतीलच एक भिंत काळ्या रंगाने रंगवण्यात आली. या भिंतीवर मुलांनी त्यांच्या मनातले बिनधास्त लिहावे असे सांगण्यात आले. मुख्य म्हणजे भिंतीवर लिहिताना नाव न लिहिण्याची मुभा देण्यात आली. तुम्हांला जे मनात वाटते ते विचार करून फळ्यावर रेखाटा अशी सूचना मुलांना केली. सुरुवातीला मुले जरा बिचकत होती पण काही वेळानंतर त्यांच्या मनातील भाव फळ्यावर उमटू लागले. मुलांच्या मनातील आनंद, उत्साह, राग, अगदी कधुली-जबाबसुद्धा या भिंतीवर उमटायला लागले आहेत. मुलांचे भावविश्व फलकावर पाहणे ही प्रक्रिया एका शिक्षकासाठी खूप सकारात्मक भावना जागृत करणारी आहे.
मुलांमध्ये नेमका काय बदल झाला
फ्रीडम वॉलमुळे शाळेतील लाजऱ्या-बुजऱ्या, अबोल मुलांमध्ये कमालीचा फरक दिसून येत आहे. काही विद्यार्थी अडखळत बोलायचे, वर्गापुढे यायला बिचकायचे; ते आता बिनधास्त व्यक्त होत आहेत. काही विद्यार्थ्यांना बोलताना विचित्र हातवारे, एकच गोष्ट वारंवार सांगण्याची त्याला सवय
रांगोळीचाही वापर
रांगोळीतून संकल्पना अधिक चांगल्या पद्धतीने समजतात हे माझ्या लक्षात आले म्हणून फ्रीडमवॉलनंतर विज्ञान हा विषय रांगोळी या माध्यमातून विद्यार्थ्यांसमोर कसा आणता येईल याविषयी विचार केला. विज्ञानातील आकृती काहीने कागदावर पेन्सिलने कधी कधी काटळ्याने होते. या पार्श्वभूमीवर रांगोळी हे माध्यम अतिशय वेगळे ठरले. रांगोळीचा वापर करत मी मुलांना गणित आणि विज्ञानातील अवघड संकल्पना शिकवल्या. मुलांनी आकृत्या रेखाटल्याच, तसेच त्यात रंग भरताना मुले तल्लीन झाली.
तुम्हांला हा उपक्रम राबवताना अजून काय करता येईल
नवीन शब्द फळ्यावर मोठ्या अक्षरात लिहावा अशा शब्दाचे थेट अर्थ मुलाना लगेच न सांगता, विविध प्रश्नोत्तरांतून या शब्दांपर्यंत मुलांना घेऊन जावे. नवीन गोष्टी शिकण्याची ही 'प्रक्रिया'च मुलांनी शिकावला हवी. त्याचा आनंद घ्यायला हवा. ही प्रक्रिया जितकी मुलांच्या कलाने होईल, तितके शिक्षण उत्तम होईल. याउलट नवीन


तळटक वैशिष्ट्ये
१. प्रचलित पाठ्यपुस्तकावर आधारित
२. स्वयंअध्ययनास चालना देणारी
३. लेखनाचा अधिकाधिक सराव
४. प्रश्नप्रकारांमधले वैविध्य
५. विषयांचे दृढीकरण
६. जिज्ञासावर्धक आणि विचारप्रवर्तक प्रश्न
७. पाठ्यांशावर आधारित परंतु पाठ्यपुस्तकापलीकडे नेणारे प्रश्न
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.




www.commonnews.in dainikcnews@gmail.com commonnews

ई-पेपर D.T.P चे 4 पान आता फक्त 300 रूपयात
D.T.P
ई-पेपर PDF चे 4 पान आता फक्त 300 रूपयात
जनसेवा कॉम्प्युटर
* दैनिक
* साप्ताहिक
* मासिक
* विशेषांक
टिप :- नियम व अटी लागू
Mob.9273005986 / 7448155986

दैनिक
# कॉमन न्यूज
सदैव सर्वांच्या सोबत.....
संपादक – अलताफ शेख मो.9921229149 /7709587851
* अहमदनगर * मंगळवार दि. १०/१०/२०२३ * वर्ष ०८ वे * अंक ६३ पाने ४ * किंमत ३ रुपये

गोल्डन टूल्स
स्पेशलिस्ट इन रिपेअरिंग
GOLDEN TOOLS

## उद्या बीडमध्ये प्रकाश आंबेडकरांची तोफ कडाडनार; काय बोलणार प्रकाश आंबेडकर याकडे महाराष्ट्राचे लक्ष..

(बीड-विवेक कुलेकर) वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर यांच्या उपस्थितीमध्ये परिवर्तन महासभा उद्या बीडमध्ये संपन्न होणार आहे . राज्याची देखील लातूरच्या सभेतली गोंदीयर हाडा करत कुळवाडी परिस्थितीत मोदी यांना पंतप्रधान होऊ देणार नाही अशी कडाडक लतकारी लातूरच्या परिवर्तन महासभेतून प्रकाश आंबेडकरांनी केली होती आता यापुढे नेमके प्रकाश आंबेडकर बीडच्या सभेतून



# पीएलसी स्वच्छता मॉनिटर प्रकल्पात भाळवणी शाळा सर्वोत्तम.
# मुंबईत आयोजित कार्यक्रमात शाळेचा होणार गौरव सोहळा

कॉमन न्यूज नेटवर्क

पारनेर – तालुक्यातील भाळवणी शाळेची पीएलसी स्वच्छता मॉनिटर प्रकल्पात सर्वोत्तम शाळा म्हणून निवड झाली आहे. पहिल्या टप्प्यात राज्यातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या नोंदणीकृत ६४ हजार शाळांपैकी सर्वाधिक प्रभावी १०० शाळांचे कौतुक आणि सत्कार मुंबई येथे एका कार्यक्रमात केला जाणार आहे.

महाराष्ट्र कचऱ्याबाबत काळजी मुक्त करण्याच्या शिक्षण विभागाच्या पीएलसी स्वच्छता मॉनिटर प्रकल्पाचा पहिला टप्पा २ ऑक्टोबर रोजी झाला प्रकल्पाचा पहिला टप्पा म्हणजे शाळा आणि विद्यार्थ्यांना स्वच्छता मॉनिटर प्रकल्पात नेमके काय करायचे हे समजण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरला. कारण या प्रकल्पात विद्यार्थी स्वतः कोणतेही झाडू घेऊन व भाषण बाजी करणारे नसून, स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणारे, संदेश देणारे दूत नसून कळत नकळत झालेली समाजातील चूक निदर्शनास आणून ती सुधारायला सांगणारे स्वच्छता मॉनिटर आहेत. या प्रकल्पाचा शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर आणि उद्योग मंत्री उदय सामंत यांनी केला होता. ६४ हजार शाळांची सहभागाची नोंदणी झाली आणि विद्यार्थी वाटेल तिथे कचरा टाकणाऱ्यांना आणि बेफिकीर थुंकणाऱ्यांना जागच्या जागी थांबवून झालेली चूक दाखवून देत होते. विद्यार्थ्यांनी गांधीगिरी करत इतरांनी केलेली घाण साफ करणे अपेक्षित नसून लेट्स चेंज फिल्म मधील सरदार पटेलबाजी करत घाण करणाऱ्यालाच साफ करायला विनंती करणे अपेक्षित आहे. स्वच्छता मॉनिटरगिरी म्हणजे सफाई करने किंवा भाषण बाजी नसल्यामुळे मुलांना मजा येते आनंद वाटतो. आणि त्यापुढे घटनेचे विवरण सांगतानाचे मजेशीर व्हिडिओ करून सोशल मीडियाला शेअर करणे त्यांच्या आवडीचे काम बनून जाते. पहिल्या टप्प्यात राज्यातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या नोंदणीकृत ६४ हजार शाळांपैकी सर्वाधिक प्रभावी शंभर शाळांची कौतुक आणि सत्कार मुंबई येथे होणार आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भाळवणी राज्यातील सर्वोत्तम १०० च्या यादीत समाविष्ट आहे. त्याचबरोबर निवडक विद्यार्थ्यांना 'महाराष्ट्र स्वच्छता मॉनिटर' ओळखपत्राने गौरवण्यात येणार आहे. स्वच्छता मॉनिटर उपक्रमात शाळेचे मुख्याध्यापक श्री. श्रीपती आबुज यांनी त्यांच्या सर्व विद्यार्थ्यांना स्वच्छता मॉनिटर बनवून जागोजागी बेफिकिर लोकांना थांबवण्यास प्रोत्साहित केले आणि शाळा समन्वयक श्रीम.सुंबे एन.ए.आणि सर्व वर्गशिक्षक श्री. मते बी.ए., श्री.दरेकर एस.व्ही.,श्री.सिनारे डी. एस.,श्रीम.शिंदे यु.एस., श्रीम.पंदारे आर.ए., श्रीम.रोहोकले सी.जी. यांनी नियमित विद्यार्थ्यांसोबत चर्चा करून त्यांचे अनुभव ऐकून त्यांना मार्गदर्शन दिले.












STARS of
the Month


कारगिल विजय
रंग पंचमी
जिजा महाला


ज्याच्या हाती पेन्सिल पाटी,
तोची सुखाचे मंदिर गाठी ॥
बालसंस्कार परिपाठ


ज्याच्या हाती पेन्सिल पाटी,
तोची सुखाचे मंदिर गाठी ॥


Alphabets
Aa Bb Cc Dd Ee Ff Gg
Hh Ii Jj Kk Ll Mm Nn


February
March
April
1) 42+19
2) 37






गर्जा भारत
माझे जीवन
ए. पी. जे. अब्दुल कलाम
श्यामची आई
साने गुरुजी
कान्होजी जेधे
इसापनीतीच्या १०० गोष्टी


चांगले मित्र
Anju
Anju


रायगड




गुणवत्तावृध्दी शिक्षण
जिल्हा परिषद मेमी इंग्लीश स्कूल, भालवणी
पुस्तक फ्रगळ उपक्रम


Green
भारत
१५ आगस्ट
२६ जानेवारी
तिरंगा
नवी दिल्ली
हिंदी
वंदे मातरम
REDMI NOTE 8
AI QUAD CAMERA


Friday
Saturday
रविवार
सोमवार
मंगळवार
बुधवार






Fruits
E FOR ELEPHANT
My Colouring Book Jr 3



जि. प. प्राथमिक
शाळा भालवणी
ता॰ पारनेर
यांना स. भेट








2023


REDMI NOTE 8
AI QUAD CAMERA


आणि आदिमानव
माणूस बनला.
शब्द येती घरा






पारनेर दर्शन

# पीएलसी स्वच्छता मॉनिटर प्रकल्पात भाळवणी शाळा सर्वोत्तम

■ मुंबईतील कार्यक्रमात होणार शाळेचा गौरव ■ स्वच्छता मॉनिटर बनवून केली जागृती

भाळवणी : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील भाळवणी शाळेची पीएलसी स्वच्छता मॉनिटर प्रकल्पात सर्वोत्तम शाळा म्हणून निवड झाली आहे. पहिल्या टप्प्यात राज्यातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या नोंदणीकृत ६४ हजार शाळांपैकी सर्वाधिक प्रभावी १०० शाळांचे कौतुक आणि सत्कार मुंबई येथे एका कार्यक्रमात केला जाणार आहे.**



महाराष्ट्र कचऱ्याबाबत निष्काळजी मुक्त करण्याच्या शिक्षण विभागाच्या पीएलसी स्वच्छता मॉनिटर प्रकल्पाचा पहिला टप्पा २ ऑक्टोबर रोजी झाला प्रकल्पाचा पहिला टप्पा म्हणजे शाळा आणि विद्यार्थ्यांना स्वच्छता मॉनिटर प्रकल्पात नेमके काय करायचे हे समजण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरला. कारण या प्रकल्पात विद्यार्थी स्वतः कोणतेही झाडू घेऊन व भाषण बाजी करणारे नसून, स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणारे, संदेश देणारे दूत नसून कळत नकळत झालेली समाजातील चूक निदर्शनास आणून ती सुधारायला सांगणारे स्वच्छता मॉनिटर आहेत.

या प्रकल्पाचा शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर आणि उद्योग मंत्री उदय सामंत यांनी केला होता. ६४ हजार शाळांची सहभागाची नोंदणी झाली आणि विद्यार्थी वाटेल तिथे कचरा टाकणाऱ्यांना आणि बेफिकीर थुंकणाऱ्यांना जागच्या जागी थांबवून झालेली चूक दाखवून देत होते. विद्यार्थ्यांनी गांधीगिरी करत इतरांनी केलेली घाण साफ करणे अपेक्षित नसून लेट्स चेंज फिल्म मधील सरदार पटेलबाजी करत घाण करणाऱ्यालाच साफ करायला विनंती करणे अपेक्षित आहे.

स्वच्छता मॉनिटरगिरी म्हणजे सफाई करने किंवा भाषण बाजी नसल्यामुळे मुलांना मजा येते आनंद वाटतो. आणि त्यापुढे घटनेचे विवरण सांगतानाचे मजेशीर व्हिडिओ करून सोशल मीडियाला शेअर करणे त्यांच्या आवडीचे काम बनून जाते. पहिल्या टप्प्यात राज्यातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या राज्यातील नोंदणीकृत ६४ हजार शाळांपैकी सर्वाधिक प्रभावी शंभर शाळांची कौतुक आणि सत्कार मुंबई येथे होणार आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भाळवणी राज्यातील सर्वोत्तम १०० च्या यादीत समाविष्ट आहे. त्याचबरोबर निवडक विद्यार्थ्यांना महाराष्ट्र स्वच्छता मॉनिटर ओळखपत्राने गौरवण्यात येणार आहे.

स्वच्छता मॉनिटर उपक्रमात शाळेचे मुख्याध्यापक श्रीपती आबुज यांनी त्यांच्या सर्व विद्यार्थ्यांना स्वच्छता मॉनिटर बनवून जागोजागी बेफिकिर लोकांना थांबवण्यास प्रोत्साहित केले आणि शाळा समन्वयक श्रीम.एन.ए.सुंबे आणि सर्व वर्गशिक्षक बी.ए.मते,एस.व्ही.दरेकर,डी. एस..सिनारे,श्रीम.यु. एस. शिंदे,श्रीम.आर.ए. पंदारे,श्रीम.सी.जी. रोहोकले यांनी नियमित विद्यार्थ्यांसोबत चर्चा करून त्यांचे अनुभव ऐकून त्यांना मार्गदर्शन दिले.




ROCKETS and Beyond
VP Balagangadharan
Space Odysseys
The Spectacle of Scientific and Space Exploration
MARVELS OF INDIAN SATELLITES
प्रति,
भारतीय अंतराळ संशोधन
संस्था, ISRO
सार्थ अभिमान !!
WE ALL PROUD OF YOU !
CHANDRAYAAN

सकाळ
शुक्रवार, १ नोव्हेंबर २०२४ | अहिल्यानगर

सनी सोनावळे : सकाळ वृत्तसेवा

# टाकाऊपासून टिकाऊ वस्तू बनविण्याचे धडे

## भाळवणी जिल्हा परिषद शाळेचा उपक्रम

**टाकळी ढोकेश्वर, ता. ३१ :** 'स्वच्छ भारत, सुंदर भारत, प्लास्टिक मुक्त भारत', संकल्पनेतून भाळवणी (ता. पारनेर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी जुने पुठ्ठे, बांबूच्या काड्या, चहाचे पेपर ग्लास, अशा टाकाऊ वस्तुंपासून, घोटीव कागद, कार्डशिट कागद आणि नैसर्गिक रंगांचा उपयोग करून पर्यावरणपूरक आकाश कंदील बनविले आहेत.

आकाश कंदिलांचे आणखी वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक आकाश कंदील हा दुसऱ्या आकाश कंदिलासारखा नाही, प्रत्येकाचा आकार रंग साहित्य वेगवेगळे आहे.

या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील सर्व वर्गशिक्षक नीलम सुंबे, छाया रोहोकले, राजश्री पंदारे, उज्ज्वला शिंदे, विमल थोरात, बबन मते, सयाजी दरेकर, दत्तात्रय सिनारे यांनी प्रयत्न केले.

### पर्यावरणपूरक आकाश कंदील

पर्यावरणपूरक आकाश कंदील बनवा उपक्रमात शाळेतील इयत्ता तिसरी व चौथीच्या १३७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, तसेच इयत्ता पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर पणत्या सुरेख रंगात रंगविल्या. यामध्ये कुठेही प्लास्टिक व थर्माकोलचा वापर करण्यात आलेला नाही.

पर्यावरणपूरक उपक्रमाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे शाळेचे मुख्याध्यापक आबूज आणि शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेंद्र चेमटे व सर्व सदस्य यांनी कौतुक केले.



----------**----------

# "वाचन उपक्रमातून स्व-अभिव्यक्ती विकास"

**शाळेचे नाव -जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, देवळा,केंद्र.धानोरा (बु.), ता.अंबाजोगाई,जि.बीड**

**शाळेचा ईमेल आयडी** - sarikadirange9@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री. तट दिलीप ज्ञानोबा
**मोबाईल क्रमांक** - 9527687652
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - sarikadirange9@gmail.com

मार्च 2020 ते जानेवारी 2021 च्या कोरोनाकाळ म्हणजेच लॉकडाऊन काळानंतर जेव्हा पुन्हा शाळा पूर्ववत सुरू झाल्या, तेव्हा शिक्षकांसमोर अनेक आव्हाने दत्त म्हणून उभी होती. दीड ते दोन वर्षे शाळेकडे न फिरकलेली ही मुले. त्यांना लिहायला-वाचायला शिकवणे, त्यांना शिस्त लावणे, एका ठिकाणी बसून अभ्यास करणे आणि अवांतर वाचनाची गोडी लावणे ही तर खूपच लांबची म्हणजे स्वप्नातीलच गोष्ट म्हणावी लागेल. पण या संकटांना घाबरतील ते शिक्षक कसले? म्हणतात ना -

**"लहरों से डरकर नौका पार नहीं होती ।**
**कोशिश करनेवालों की कभी हार नहीं होती ॥"**

आता शिक्षकांसमोर जी आव्हाने होती, ती म्हणजे शाळेकडे न फिरकलेली ही मुले. अगदी स्वतंत्रपणे खेळत, भटकत राहिलेली ही मुले टी.व्ही. मोबाईलच्या सानिध्यात वेळ घालवलेली ही मुले. आणि सतत टी.व्ही. मोबाईलवरील चित्रपटात पाहिलेली मारामारी, दंगे, हिरो आणि व्हिलनची कुस्ती हे सर्व पाहून मुलांची विध्वंसक वृत्ती जरा वाढलीच होती, असे म्हणायला काही हरकत नाही. कारण त्याचा प्रत्यय शिक्षकांना येऊ लागला होता.

जेव्हा नियमित शाळा सुरू झाल्या, तेव्हा असे लक्षात आले की, मुले मधल्या सुट्टीत – लघुमध्यंतर असो वा दीर्घमध्यंतर. या वेळात एकमेकांच्या खोड्या काढणे, ढकलाढकली करणे, मारामारी करणे असे विविध प्रकार घडू लागले होते. काही वेळा घसरगुंडीवरून पडून कोच पडणे, डबलबारवरून पडल्यामुळे जखम होणे, एकमेकांना ढकलून देणे, चिमटे घेणे, एकमेकांना दगड मारणे असे प्रकार नेहमीपेक्षा जरा जास्तच होऊ लागले. मुलांना दुपारच्या मधल्या सुट्टीत खिचडीला सोडून आम्ही जेव्हा जेवायला बसायचो, तेव्हा जेवण होईपर्यंत कुणीतरी विद्यार्थी तक्रार घेऊन रडत आलेला असायचा. जेवण अर्ध्यावर सोडून ते भांडण सोडवावे लागायचे. कधी-कधी तर कुणालातरी जखम झालेली असायची. जेवण अर्धे ठेवून प्रथमोपचार पेटीतले आयोडीन वगैरे लावायचे. कुणालातरी कोच पडली असेल किंवा जखम मोठी असेल तर त्याला गावातील डॉक्टरांकडे घेऊन जावे लागायचे. गावातील डॉक्टर हजर नसतील तर शेजारच्या गावी जावे लागायचे. मलमपट्टी करूनही लेकराची जखम बघितली की, पालक तक्रार घेऊन हजर असायचे. त्यांना समजावता समजावता शिक्षकांच्या नाकीनऊ यायचे. तरीही पालकांची तक्रार असायची की, एवढे लागेपर्यंत गुरुजींनी कसे बघितले नाही. दुपारचा डबा शाळेत न्यावा की न न्यावा असा प्रश्न पडायचा.

थोडे दिवस वाटले की, लेकरं आहेत, असे चालायचेच. लेकरं म्हणजे माकडंच असतात. माकडासारख्या उड्या मारणारच, असू दे. पण नव्याचे नऊ दिवस संपले. आता हा प्रकार नित्यनियमाचा होऊ लागला. सर्वांसाठी हा विषय डोकेदुखीचा ठरू लागला. तेव्हा आम्ही सर्व शिक्षकांनी विचार करून मुख्याध्यापकांसमोर एक प्रस्ताव मांडला. प्रस्ताव असा होता की, मुलांची लघुमध्यंतर बंद करावी. त्याऐवजी मुलांनी रांगेत शौचालयाकडे जावे आणि परत रांगेतच वर्गात येऊन बसावे. वर्गाच्या मॉनिटरने ही जबाबदारी पार पाडावी. अशाप्रकारे लघुमध्यंतर ही पाचच मिनिटांची असेल आणि लघुमध्यंतरात मुले रिकामी राहणार नाहीत. जेणेकरून भांडणे करण्यासाठीही त्यांना वेळ मिळणार नाही. मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांनी सर्वानुमते हा प्रस्ताव मंजूर केला. अशाप्रकारे सन 2022 च्या जानेवारी महिन्यापासून लघुमध्यंतरासाठी घंटा वाजणे बंद झाले. लघुमध्यंतराची वेळ पाच मिनिटे झाली.

आता प्रश्न राहिला होता दीर्घ मध्यंतराचा. या दीर्घमध्यंतरातही मुले अगदी पंधरा मिनिटांत खिचडी खायची आणि पुन्हा उरलेल्या वेळात पुन्हा तेच भांडणे, खोड्या करणे, पडणे, जखम होणे, कोच पडणे हे प्रकार घडूच लागले. ये रे माझ्या मागल्या हा प्रकार सुरू झाला. यावर काय तोडगा काढावा, हा प्रश्न आमच्यासमोर आ वासून उभा होता. त्यामुळे यावर भरपूर विचार केला. मधल्या सुट्टीत मुलांना गुंतवून ठेवण्यासाठी मुलांच्या जोड्या लावून अभ्यास घेण्यास सांगितले. एक अभ्यासात हुशार आणि एक मध्यम अशा मुलांच्या जोड्या सर्व वर्गात तयार केल्या. मधल्या सुट्टीत या सर्व जोड्या मैदानात झाडाखाली बसून एकमेकांचे पाठ्यपुस्तक वाचन घेऊ लागल्या. असा नवीन उपक्रम सुरू केला. पण तो जास्त दिवस प्रभावीपणे राबवला गेला नाही. कारण तेच ते पाठ्यपुस्तक आणि तेच ते पाठ वाचून मुले कंटाळू लागली. जोड्या-जोड्यांमध्ये भांडणे होऊ लागली. हुशार विद्यार्थ्यांचे वर्चस्व त्याच्या जोडीला सहन होत नव्हते. किती दिवस आम्ही त्यांचेच ऐकावे, असे अभ्यासात मध्यम असणाऱ्या मुलाला वाटू लागले. म्हणून या उपक्रमात नाविन्यता आणण्यासाठी आणि मोबाईलच्या आहारी जाणाऱ्या मुलांना त्यापासून दूर ठेवण्याची गरज लक्षात घेऊन मुलांमध्ये वाचनाची गोडी विकसित करण्यासाठी मुलांनी ग्रंथालयातील पुस्तकांचे वाचन मधल्या सुट्टीत करावे, असे सांगण्यात आले. नवनवीन पुस्तके वाचण्यात मुलांना आनंद वाटू लागला. नवीन ज्ञान मिळू लागले. पाठ्यपुस्तकातला तोच तो रटाळपणा गेला.

म्हणतात ना - 'सोन पे सुहागा' अगदी तसेच झाले आणि महाराष्ट्र शासनाने दिनांक 27 सप्टेंबर 2022 रोजी एक शासन निर्णय निर्गमित केला. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त 15 ऑक्टोबर हा दिवस सर्व शाळा व महाविद्यालयांत वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा करावा, असे सांगण्यात आले आणि आमच्या या उपक्रमाला अगदी नवीन झळाळी मिळाली. नवीन बनवलेल्या सोन्याच्या दागिन्याला शेवटी पॉलिश केल्यानंतर जशी चकाकी येते, अगदी तसेच झाले आणि आमचा हा उपक्रम चमकू लागला.

या उपक्रमाच्या वर एक अगदी मुकुट ठरावा असा अजून एक उपक्रम सुरू झाला. तो म्हणचे महावाचन उत्सव. जगातील प्रत्येक यशस्वी व्यक्ती हा वाचक असतो. वाचन हे ज्ञान आणि नवनिर्मितीचे बीज आहे. वाचन हे आनंदासाठी आणि मनाच्या विकासासाठी आवश्यक असते. महावाचन उत्सव 16 जानेवारी 2024 रोजी सुरू झाला. हा उत्सव सर्व माध्यमांच्या शाळांनी राबवावा, असा शासन निर्णय आला आणि

त्याप्रमाणे कार्यवाही सुरू झाली. शाळेच्या ग्रंथालयातील पुस्तके वाचून तसेच ठेवून न देता मुलांनी वाचलेल्या पुस्तकांची टिपणे काढावीत, असा नवीन उपक्रम सुरू झाला.

या उपक्रमामुळे मुलांमध्ये वाचन संस्कृती विकसित होऊ लागली. अवांतर पुस्तके वाचल्यामुळे ज्ञानात भर पडू लागली. मुलांचा आत्मविश्वास वाढला. राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेतही मुला-मुलींनी सहभाग नोंदवला. मुलांची सतत होणारी भांडणे बंद झाली. भांडणे, मारामारी, ढकलाढकली थांबल्याने सतत जखम होणे, कोच पडणे थांबले आणि पर्यायाने दवाखान्यावर होणारा खर्चही वाचला. मुलांच्या आणि पालकांच्या येणाऱ्या तक्रारीही थांबल्या. त्यामुळे शिक्षकांना थोडे हायसे वाटले. पण एवढ्यावर समाधानी राहतील ते शिक्षक कसले ? यात आणखी काय आणि कोणते नाविन्य आणावे, हा एकच विचार सतत डोक्यात चमकून गेला. तो म्हणजे मुलांना थोडेसे प्रलोभन दिले तर मुले जास्तीची पुस्तके वाचतील. कारण सध्याच्या स्पर्धेच्या युगात मुलांना विविध स्पर्धा परीक्षांना सामोरे जावे लागणार आहे. त्यासाठी गरज आहे अवांतर वाचनाची. त्यातून मुलांचे ज्ञान वाढेल.

मुलांना प्रलोभन देण्यासाठी त्यांना सांगितले की, प्रत्येक महिन्याला मुलांनी जास्तीत जास्त पुस्तके वाचून टिपणे काढावी. ज्याची पुस्तकांची टिपणे जास्तीत जास्त होतील, त्यांना तेवढे रुपये बक्षीस दिले जातील. ते पैसे त्यांनी खर्च न करता शाळेच्या बचत बँकेत जमा करावेत. हा विचार मुख्याध्यापकांनाही आवडला आणि त्यांनी शाळेतील एका शिक्षिकेकडे बचत बँकेचा व्यवहार सुपूर्द केला. तसेच मुलांना पासबूक देण्यासाठी छोट्या-छोट्या डायऱ्या मुलांना आणून दिल्या. त्यामुळे मुलांना बँकेचा व्यवहार समजण्यास मदत झाली. किती पैसे टाकले, किती काढले, हे दिनांकासह डायरी म्हणजे पासबुकावर लिहून स्वाक्षरीसह दिले जाऊ लागले. त्यामुळे गणितीक्रिया प्रभावीपणे करता येऊ लागल्या. बक्षीस ठेवल्यामुळे मुलांची पुस्तके वाचनाची आवड आणि गती वाढली. मुले त्यांच्या स्वतःकडचे चिल्लर पैसेही बँकेतच जमा करू लागली. त्यामुळे मुलांचा चॉकलेट, बिस्कीट, कुरकुरे या गोष्टींवर होणारा खर्चही थांबला. पर्यायाने आरोग्याच्या समस्याही कमी झाल्या. पैसे मिळाले की, दुकानाची वाट धरणारी मुले पैसे जपून ठेवू लागली आणि बँकेत जमा करू लागली. मुलांमध्ये झालेला हा बदल पालकांच्याही नजरेतून सुटला नाही. पालकांनीही या उपक्रमास चांगला प्रतिसाद दिला.

मुलांना म्हणजे आमच्या शाळेच्या विद्यार्थ्यांना वाचनाच्या उपक्रमामुळे खूप चांगला फायदा झाला. त्यांच्या सामान्यज्ञानात भर पडू लागली. संतांची पुस्तके मुले वाचू लागली. मुलांवर नकळत सुसंस्कार होऊ लागले. रिकाम्या वेळेचा सदुपयोग झाला. वाचलेल्या पुस्तकांचे टिपण काढताना मुले स्वतःचे विचार त्यात मांडू लागली. त्यामुळे स्वतःचे विचार व्यक्त करण्याची संधी मिळाल्यामुळे स्व-अभिव्यक्ती विकसित होऊ लागली. त्याचा खूप चांगला आणि सकारात्मक अगदी डोळ्यांत भरण्यासारखा संस्मरणीय परिणाम असा झाला की, विद्यार्थी कविता करू लागले. इयत्ता पाचवी आणि सहावीच्या विद्यार्थ्यांनी स्वतः काही कविता रचल्या. मुलांच्या स्व-रचित कविता वाचून शिक्षकांनाही खूप आनंद झाला. त्यापैकी काही विद्यार्थ्यांच्या निवडक कविता पुढीलप्रमाणे -

आई

आई एक नाव असते,
जगावेगळा भाव असते.
आई एक जीवन असते,
प्रेमळ मायेचे लक्षण असते.
आई एक श्वास असते,
जीवनाची रास असते.
आई एक आठवण असते,
प्रेमाची साठवण असते.
आई एकवाट असते,
आयुष्यातील सर्वांत पहिली गाठ असते.
आई एक गोड नाते असते,
वाहणाऱ्या जीवनाची हिरवी पात असते.
आई एक सुंदर घर असते,
वात्सल्याची सर असते.
आई हृदयाची हाक असते,
निशब्द जग असते.
आई क्षमेची मूर्ती असते,
जी सतत सोबत राहून मार्ग दाखवत असते.
जी स्वतःसाठी न जगता इतरांसाठी जगत असते.

**- अस्मिता मच्छिंद्र शिंदे**

**इयत्ता - सहावी**

झाड

झाड आहे हिरवेगार
झाडाला लागतात
छान छान फुले
झाडाखाली खेळतात मुले
झाड आहे हिरवेगार
वारा देतो थंडगार
झाडावर येऊन बसतात पक्षी
झाडाच्या सावलीत बसतात मुले
झाड देतो माया
झाड देतो छाया
झाड आहे माझा मित्र
माझ्या मनात राहते नेहमी
झाडाचे चित्र

**- शेख जोया अंबीर**
**इयत्ता - सहावी**

नदी

नही है मेरी जान
सबका है सम्मान
कभी मै बैठकर नहाती
तो कभी उछलकर
नदी है मेरी जान
सबका है सम्मान
नदी है तो पानी है
पानी है तो जीवन है
नदी है तो मौजमस्ती है
नदी है तो जीवन है
नदी है तो खेत है
नदी है मेरी जान
सबका है सम्मान

**- गायकवाड नंदिनी शिवाजीराव**
**इयत्ता - पाचवी**

या विद्यार्थ्यांना अशा प्रकारच्या कविता इतक्या कमी वयात रचण्याचे सामर्थ्य आणि प्रगल्भता या विद्यार्थ्यांमध्ये केवळ वाचनातूनच प्राप्त झाली. सध्याच्या काळात मोबाईलच्या आहारी जाणारी मुले सतत पुस्तकांच्या शोधात, पुस्तकांच्या विश्वात रममाण होऊ लागली आणि विद्यार्थ्यांना वाचनाची आवड वाटू लागली.

विद्यार्थी सतत पुस्तके वाचत असलेली पाहून सर्व शिक्षकांनीही ठरवले की, आम्हीपण दररोज दुपारी 45 मिनिटे सर्व मुलांसोबत मोबाईल दूर ठेवून पुस्तके वाचणार आणि शिक्षकसुध्दा मुलांसोबत 45 मिनिटे अवांतर वाचन करू लागली. अशाप्रकारे आमचे मुख्याध्यापक आणि सहकारी शिक्षकांनी शाळेतील या नवीन उपक्रमास खूप सहकार्य केले आणि वेळोवेळी मुलांना मार्गदर्शन करून प्रेरीत केले. या विद्यार्थ्यांमधूनच कदाचित उद्याचे कवी आणि कवयित्री घडण्यास हातभार लागेल.








ता.अंबाजोगाई जि.बीड


कॉ.गंगाधरअप्पा बुरांडे स्मृती प्रतिष्ठान आणि
महाराष्ट्र शिक्षण संस्था, मोहा. याच्या संयुक्त विद्यमाने आयोजित.
राज्यस्तरीय
महाराष्ट्र शिक्षण संस्था, मोहा
वर्ष ४थे

----------**----------

# "लोकसहभागातून भौतिक विकास साधणारी शाळा"

**शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कारेगव्हाण, केंद्र.विठ्ठलपेठ, नेकनूर, ता.जि.बीड**

**शाळेचा ईमेल आयडी** - 123avanti@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - विकास मच्छिंद्र परदेशी
**मोबाईल क्रमांक** - 9421274388 / 7972855955
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - 123avanti@gmail.com

**प्रास्ताविक** -

ग्रामीण भागात शिक्षण देण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा या महत्त्वाची भूमिका बजावत असतात. पुर्वीच्या काळापासून शिक्षण व्यवस्थेला मजबूत करण्यासाठी याच जिल्हा परिषद शाळा शैक्षणिक कार्य करत आल्या आहेत यात शंका नाही.पण आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे तसेच विज्ञानाच्या युगात, तंत्रज्ञानाच्या युगात या शाळा आपली शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रयत्न करताना पाहून समाधान वाटते कारण बदलत्या काळानुसार पालकांचे विचार बदलत आहेत आज प्रत्येक पालकांना वाटते की माझा पाल्य चांगल्या शैक्षणिक गुणवत्ता असणाऱ्या शाळेत पाहिजे.मोठी इमारत, प्रशस्त मैदान,सर्व भौतिक सुविधा असणाऱ्या शाळेत पालकांचा ओढा वाढत आहे ही बाब नाकारून चालणार नाही.पण यातही काही शाळा अशा आहेत की ज्या आशेचा किरण म्हणून पुढे येत आहेत. शैक्षणिक वातावरण निर्माण करताना दिसत आहेत.ग्रामीण भागात शैक्षणिक वातावरण निर्माण करून शैक्षणिक गुणवत्तेच्या आधारावर तग धरताना दिसत आहेत.यामध्ये पालक व गावातील नागरिकांनी शाळेच्या प्रगतीसाठी केलेले सहकार्य खरोखरच समाजासमोर आदर्श असते.अशीच आमची शाळा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कारेगव्हाण ता जि बीड आहे. बीड पासून 40 किलोमीटर अंतरावर असलेल्या डोंगरी भागात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कारेगव्हाण ता जि बीड शाळा आहे..गाव तसे मोठे पण सर्व पालक ऊसतोड मजूर. एकदा गावातील पालक स्थलांतर झाले की गाव सुने सुने होते. गावात आजी आजोबा सोडता तुरळक काही पालक असतात मग जी मुले मुली ऊस तोडणीसाठी पालकांसोबत गेली नाहीत तेवढेच विद्यार्थी व गुरूजी अशी काहीशी शाळा , जिथे ना शैक्षणिक वातावरण ना शैक्षणिक गुणवत्ता..गाव आहे म्हणून शाळा व शाळा आहे म्हणून गावातील काही मुले मुली शाळेत याहून वेगळी परिस्थिती नव्हतीच.. असं पालक सांगतात.ही सर्व परिस्थिती होती जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कारेगव्हाण ची मे महिन्यापर्यंत... पण परिस्थिती बदलत आहे जून महिन्यापासून. याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

**शाळेसंदर्भात आलेल्या अडचणी** -

जून महिन्यात शाळा सुरू झाली तेव्हा शाळेसमोरील चित्र,वर्गाची परिस्थिती, भौतिक सुविधेची कमतरता, गावात मोबाईल कव्हरेज फक्त शाळेसमोर म्हणून सर्व गावच फोनवर बोलण्यासाठी शाळेसमोर जमलेले .. पण शाळेत रूजू झाल्यानंतर काम तर करायचे आहे शाळा तर सुधारायची आहे विद्यार्थी तर घडवायचे आहेत शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यासाठी प्रयत्न तर करावेच लागतील हे मनोमन ठरवले व कामास सुरुवात केली एक वर्ग तर असा होता की अक्षरशः वर्गात शेण,वैरण सर्व

काही घाणच पण परिस्थिती बदलणे गरजेचे होते..बहूतांशी पालक टीसी मागण्यासाठी शाळेत आलेले.या पालकांना समजून सांगणे कठिण होते कारण आम्ही सर्व नवीन व अनोळखी यामुळे त्यांचा आमच्यावर विश्वास बसणे शक्य नव्हते. हे सर्व बदलून शैक्षणिक वातावरण निर्माण केले पाहिजे आपण आपले काम प्रामाणिकपणे करून शाळेची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रयत्न तर करू या विचाराने दुसऱ्या दिवशी पालक सभेचे आयोजन करण्यात आले या पालक सभेला उपस्थित पालकांची संख्या पाहून काहीतरी बदल होईल असे प्रथमदर्शनी वाटू लागले.. सर्वप्रथम पालकांना काय सांगावे हा फार मोठा प्रश्न आमच्या समोर कारण बहुतांश पालक अशिक्षित व समजून न घेणारे अशा बऱ्याच समस्या आमच्या समोर उभ्या पण काम तर करायचे आहे शैक्षणिक वातावरण निर्माण तर करायचे आहे शैक्षणिक गुणवत्ता तर वाढवायची आहे मग काहीतरी चर्चा तर करावीच लागणार.. चर्चा सुरू झाली प्रश्न येऊ लागले उत्तर दिले पण समाधान नाही कारण पुर्व परिस्थिती पुर्ण पणे विरोधी असल्याकारणाने पालकांचा सहभाग कठिण वाटू लागला पण आम्ही थांबलो नाहीत.

**अडचणींवर मात करण्यासाठी केलेल्या उपाययोजना -**

पालक सभेत लोकसहभागाचे महत्व पटवून देण्यासाठी आटोकाट प्रयत्न केला शेवटी यश आलेच. गावचे प्रतिष्ठीत नागरिक व लोकप्रतिनिधी तसेच सरपंच पती सदाभाऊ खंदारे समोर आले व गावकऱ्यांना सांगू लागले गुरूजी म्हणतात तर विश्वास ठेवायला काय हरकत आहे ? भलं तर आपलंच होणार आहे.गावच्या अखंड हरिनाम सप्ताहात जमा केलेल्या वर्गणी पैकी एक लाख रु देऊन टाकू शाळेला. बघताबघता सर्व गावकऱ्यांनी होकार दर्शविला व मग काय आम्ही मागे वळून पाहिले नाही गावातील नौकरदार वर्ग यांनीही एक लाखापर्यंत मदत तात्काळ खात्यावर जमा केली. तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक यांनीही काही प्रमाणात म्हणजे 50000 रु पर्यंत मदत दिली. यातूनच शाळेला कंपाऊंड वॉल तसेच रंगरंगोटी, डागडुजी, विजपुरवठा काही शैक्षणिक साहित्य खरेदी केली व आज शाळा सजून शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रयत्न करत आहे.जोपर्यत गावाला तूमच्या वर विश्वास बसत नाही तोपर्यंत गाव तुम्हाला मदत करत नाही याचाच काहीसा अनुभव याठिकाणी आला. शाळा पाहून गावातील नागरिक आनंद व्यक्त करताना पाहून समाधान वाटत आहे.शिक्षणाचे महत्व पटवून देण्यासाठी प्रयत्न केला याचे यश पाहताना आनंद कोणाला होणार नाही.एक शिक्षक म्हणून या शाळेत 2018 पासून कार्यरत असणाऱ्या  जाधव मॅडम यांचा अनुभव फार महत्वाचा ठरला व यातूनच शाळेच्या कमतरता पुर्ण करता आल्या. आज शाळा शिक्षणाच्या वाटेतील आशेचा किरण म्हणून पुढे येत आहे व नक्कीच भविष्यात देशाचे भवितव्य घडवणारी पिढी निर्माण होईल यात काही शंका नाही.आज मितीला या शाळेचा लोकसहभाग 5 लक्षापर्यत गेला आहे.

**फलनिष्पत्ती -**

लोकसहभागातून शाळा विकास व विद्यार्थी गूणवत्तेवर होणारा सकारात्मक परिणाम पाहून पालक समाधानी वाटतात. विद्यार्थ्यांना शाळेविषयी निर्माण झालेली गोडी त्यांच्या उपस्थितीमधून दिसून येत आहे.दैनंदिन परिपाठात वाढलेला विद्यार्थी सहभाग नेतृत्व गुण विकसित करत आहे हे ही ठळकपणे दिसून येत आहे. जून पासून 68 वरून 140 वर गेलेली पटसंख्या ही सकारात्मक दृष्टिकोन रुजविण्यासाठी महत्वाची ठरत आहे.वाचाल तर वाचाल या नवोपक्रमातील विद्यार्थ्यांचा सहभाग शाळेविषयी गोडी निर्माण झाल्याचा पुरावा देत आहे. अशा अनेक गोष्टी या लोकसहभागातून सिद्ध होत

आहेत..यातच या उपक्रमाची यशस्वीता दिसून येत आहे.पुर्वी साधी बैठक बोलावली तर एकही पालक उपस्थित राहत नसे पण आज साधा फोन केला तरी सर्व पालक आवर्जून शाळेत बैठकीला उपस्थित राहतात हा आशादायी किरण शाळेसाठी आहे.जिल्हा परिषद शाळा पालकांच्या सहभागातून शैक्षणिक वातावरण व सकारात्मक बदल घडवून आणू शकतात याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कारेगव्हाण ता जि बीड होय. येणाऱ्या काळात या शाळेतील विद्यार्थी देशाचे उज्वल भविष्य असणार यात शंका नाही. या सर्व प्रयत्नांमुळे ही शाळा सलग दोन वर्षे माझी शाळा सुंदर शाळा अभियानात तालूक्यातून पहीली आली आहे तर यावर्षी जिल्ह्यातून तिसरा क्रमांक प्राप्त झाला आहे....

**समारोप -**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कारेगव्हाण ही शाळा जून 2023 या महिन्यात मोडकळीस आलेली शाळा होती पण विज्ञान व पालकांची सकारात्मक भुमिका व प्रतिसादामुळे शाळेत झालेला हा बदल खरोखरच प्रेरणादायी आहे इतरांनी आदर्श घेऊन जिल्हा परिषद शाळा सुधारण्यासाठी प्रयत्न केला तर ही शाळा खरोखरच सर्वांना मार्गदर्शक ठरेल यात शंका नाही..आज पटसंख्येच्या अभावी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत पण डोंगराच्या पायथ्याशी असलेली ही जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आपल्या पालकांच्या प्रतिसादामुळे इतर शाळांना मार्गदर्शक ठरत आहे ही आनंदाची बाब आहे..आज ऊसतोड मजुरांच्या पाल्यांसाठी शिक्षण देणारी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा म्हणुन पुढे येत आहे.ऊसतोड मजूर जर स्वप्रयत्नांनी शाळा सुधारत असतील तर अशा शाळांना भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे.


**शाळेचे पुर्वीचे रुप**



**लोक सहभागातून बदललेले शाळेचे नवीन रुप**






पाणी वाचवा
आणि
याचे
णी.
Shot on OnePlus
By VIKAS M PARDESHI


जि.प.उच्च प्रा.शा.कारेगव्हाण
ता.जि.बीड
UDise-27270112901
DayS
Monday
Tuesday
Wednesday
सोमवार
मंगळ
बुध
गुरुवार
शुक्र
शनि
रवि


Shot on OnePlus
By VIKAS M PARDESHI




Shot on OnePlus
By VIKAS M PARDESHI


जि.प.उच्च प्रा.शाळा कारेगाव


-सुविचार फलक-
Shot on OnePlus
By VIKAS M PARDESHI


$21^2=441$
$22^2=484$
$23^2=529$
$24^2=576$
$25^2=625$
$26^2=676$
$27^2=729$
$28^2=784$
$29^2=841$
$30^2=900$
- सुविचार फलक -
ज्ञानाचा प्रसार म्हणजे समानतेचा विस्तार
महावाचन चळवळ
शनिवार




वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
दत्ता
इयत्ता १ ली
जि.प.प्राथ. कारेगव्हाण


लोकमत
Shot on OnePlus
By VIKAS M PARDESHI


जि.प.उच्च प्रा.शाळा कारंजकाण
CHILD LINE 1098
धूम्रपान मद्यपान,
आयुष्याची धूळधाण


जि.प.उच्च प्राशा कारंजकाण
शेतीमुळे धनधान्य फार;
विना शेती नाही उध्दार.






Shot on OnePlus
By VIKAS M PARDESHI


जि.प.उच्च प्रा.शाळा कारेगव्हाण
Shot on OnePlus
By VIKAS M PARDESHI

----------**----------

# “मार्गदर्शन शालेय नेतृत्वाचे, सहकारातून यश क्रीडा क्षेत्रातले”

**शाळेचे नाव व पत्ता - श्री.योगेश्वरी नूतन विद्यालय, परळी रोड, अंबेजोगाई, जि.बीड**

**शाळेचा ईमेल आयडी** - ynvambajogai@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** — सौ .पाठक. ए. आर
**मोबाईल क्रमांक** - 9403927545
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - jayvishunu2121@gmail.com

शैक्षणिक वर्ष 2024-25 शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. ए. आर. पाठक मॅडम यांनी विविध उपक्रमाविषयी व विविध विभागांना मार्गदर्शन केले. मागील विविध क्षेत्रांमध्ये मिळालेले यश व त्याहीपेक्षा या वर्षात अधिक यश मिळाले पाहिजे अशी अभिलाषा व्यक्त करून मुख्याध्यापिकेंनी सर्व शिक्षक वृंदांना मार्गदर्शनपर प्रोत्साहित केले.

साधारणपणे ऑगस्ट महिन्यात शालेय स्तरावरील विविध स्पर्धांना सुरुवात झाली. तत्पूर्वी जुलै महिन्यात शिक्षक श्री.बी.डी.गोविंदवाड, क्रीडा शिक्षक श्री.के.बी.परदेशी व शाळेचे उपमुख्याध्यापक श्री.व्ही.के. गायकवाड यांनीही खेळाडूंची निवड करताना मदत केली. आमच्या शाळेत एकूण 1500 विद्यार्थी असून त्यापैंकी 500-600 विद्यार्थी विविध प्रकारच्या खेळांच्या निवडीसाठी मैदानावर उपस्थित होते. एवढ्या विद्यार्थीसंख्येमधून वेगवेगळ्या प्रकारच्या खेळांमध्ये त्यांची विभागणी करणे सहज सोपे नव्हते, तरीपण विद्यार्थ्यांची विविध खेळामध्ये असलेली आवड आणि योगदान पाहून शिक्षकांनी मार्गदर्शन केले. त्यातून विविध क्रीडा प्रकारात जवळपास 190 विद्यार्थ्यांचे ऑनलाईन रजिस्ट्रेशन करण्यात आले. त्यातही या वर्षी आपल्या शाळेत नवीन प्रवेश घेतलेले विद्यार्थी जे उत्तम खेळाडू आहेत त्यांचे रजिस्ट्रेशन लवकर होत नव्हते. त्यातील काही तांत्रिक अडचणी दूर करून रजिस्ट्रेशन केले. अशा प्रकारे शालेय स्तरावर असलेल्या विविध खेळांमधून काही खेळ निवडून ज्या त्या विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार त्या त्या खेळामध्ये त्यांचे नाव समाविष्ट(अपलोड) केले. नंतर विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक खेळाच्या सरावासाठी मैदानावर उतरले. विद्यार्थी व शिक्षक तहान भूक हरवून दिवस-दिवस खेळांचा सराव करू लागली. त्यामुळे विद्यार्थी व शिक्षकांमध्ये सकारात्मक बदल झाला.

**"सक्षम नेतृत्व असले की, सहज सर होतो डोंगर माथा**

**मुख्याध्यापिकेच्या मुख्य मार्गदर्शनामुळे सुरू झाली क्रीडा क्षेत्राची यशोगाथा"**

विजयाची सुरुवात खो-खो संघाने केली, व असा त्यांचा यशस्वी प्रवास सुरू झाला. खो-खो संघ इतर पाच संघांना हरवून अंबाजोगाई तालुक्यातून प्रथम आला व जिल्हा स्तरावर पोहोचला. या संघाची प्रेरणा घेऊन इतर खेळाचे संघ ही त्यांची प्रेरणा घेऊन प्रोत्साहित झाले. खोखो चा- पहिला खो हा क्रिकेट संघाने घेतला आणि

क्रिकेट संघ ही अंबाजोगाई तालुक्यातुन इतर संघांना पराभूत करून प्रथम आला व जिल्हा स्तरावर पोहोचला. खो खो खेळातील चि. नैतिक ढेंबरे, चि. जयेश गंगणे व चि. दादासाहेब डोईफोडे यांनी उत्कृष्ट डिफेंडर व धावपटू म्हणून लक्षणीय कामगिरी केली.

**खो-खो संघ 17 वर्ष वयोगट**







तसेच नेहमी क्रिकेट साठी सौरभ धायगुडे व अथर्व शेळके हे सलामी फलंदाज म्हणून उत्कृष्ट कामगिरी बजावतात. आपला धबधबा विरोधी संघावर कायम ठेवतात, त्यातही चि. अविष्कार रुपनर च्या अविष्कार विकेटकीपरिंग मुळे आणि चि.आर्यन कांबळे च्या फिरकीच्या जादुई बॉलिंगमुळे क्रिकेट संघाने इतर पाच संघांना हरवून अंबाजोगाई तालुक्यातून प्रथम क्रमांक मिळवला व हा संघ जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरला.

**क्रिकेट संघ 17 वर्ष वयोगट**






नव्यानेच क्रीडा शिक्षक म्हणून रुजू झालेले परदेशी सर वेट लिफ्टिंग साठी विद्यार्थ्यांना बाहेरच्या जिम मध्ये नेऊन त्यांचा वेटलिफ्टिंग चा सराव करून घेत होते. सातत्याने सराव चालू असल्यामुळे चि. गणेश कटारे 67 किलो वजन गटातून बीड जिल्ह्यात पहिला आला असून त्याची निवड विभागीय पातळीवर होणाऱ्या स्पर्धेसाठी झाली आहे, तसेच चि. राजवीर परदेशी 61 किलो वजन गटातून बीड जिल्ह्यात प्रथम आल्यामुळे त्याचीही निवड विभागीय पातळीवर होणाऱ्या शालेय वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी झाली आहे.

## वेटलिफ्टिंग 17 वर्ष वयोगट






छत्रपती शिवरायांचा हा महाराष्ट्र तेव्हा तलवारबाजीतही मागे कसा राहणार. आमच्या शाळेचे दोन विद्यार्थी जिल्हा स्तरावरून विभागीय पातळीवर होणाऱ्या शालेय तलवारबाजी स्पर्धेत चि. नैतिक ढेंबरे व चि. सार्थक देशमुख हे पात्र ठरले.

## तलवारबाजी 14-17 वयोगट





तलवारबाजी स्पर्धेबरोबरच भालाफेक या स्पर्धेतही आमच्या शाळेचे खेळाडू पुढेच आहेत. त्यात चि.अविष्कार रुपनर हा खेळाडू अंबाजोगाई तालुक्यात 17 वर्ष वयोगटातून प्रथम व बीड जिल्ह्यातही प्रथम येऊन विभागीय पातळीवर होणाऱ्या भालाफेक या स्पर्धेसाठी पात्र झाला आहे.

## भालाफेक 17 वर्ष वयोगट






आणखी एक शालेय स्तरावरील ज्युदो या खेळासारखाच एक नवीन खेळ शालेय स्तरावर खेळला जाणारा एक खेळ म्हणजेच कुराश होय. या खेळात चि. चैतन्य पवार 17 वर्ष वयोगटातून जिल्हास्तरावर खेळून त्याची निवडही विभागीय पातळीवर होणाऱ्या कुराश (40 किलो वजन गट) या स्पर्धेसाठी झाली आहे.

## कुराश 17 वर्ष वयोगट






या सर्व खेळांबरोबरच उत्कृष्ट बॅडमिंटन व बुद्धिबळपटू ही आपल्या शाळेत आहेत. एकूणच गतवर्षी पेक्षा यावर्षी विविध क्रीडा प्रकारात शाळेचे विद्यार्थी सकारात्मक होऊन आज आपल्या क्रीडा प्रकारात त्यांनी नैपुण्य दाखवले आहेत. क्रीडा शिक्षकांनीही त्यांना वेळोवेळी तत्परतेने मार्गदर्शन केले. तसेच मुख्याध्यापक व शिक्षक यांनी विद्यार्थ्यांना सतत प्रोत्साहन दिले, प्रेरणा दिली ज्यामुळे विद्यार्थी क्रीडा प्रकारात उत्साहाने सहभागी होऊन यश मिळवण्यासाठी प्रोत्साहित होत आहेत.

----------**----------

# "क्रीडा क्षेत्रातील यश"

**शाळेचे नाव व पत्ता - रामभाऊ जोशी हायस्कूल,करकंब,ता.पंढरपूर जि.सोलापूर**

**शाळेचा ईमेल आयडी** - rjhskkarkamb@gmail.com
**मुख्याध्यापकाचे पूर्ण नाव** - श्री. हेमंत वैजनाथ कदम
**मोबाईल क्रमांक** - ९९२२७२५०९९
**मुख्याध्यापक ईमेल आयडी** - hemantkadam5099@gmail.com



**प्रास्ताविक –**

**'शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्'**

राजश्री शाहु महाराज म्हणतात, पहिली संपत्ती शरीर आहे, दुसरी संपत्ती पुत्र/संतती आणि तिसरी संपत्ती ही भौतिक संपत्ती आहे.म्हणून आताच्या काळात आरोग्याला खूप महत्व आहे, आरोग्य जपायच असेल तर नियमित व्यायाम हा केलाच पाहिजे विद्यार्थ्यानी मैदानावर आलेच पाहिजे विविध प्रकारची मैदानी खेळ खेळलेच पाहिजे.विद्यार्थ्यांची शारीरिक सदृढता ठेवण्यासाठी आपण दर शनिवारी कवायत घेतो, पण एक दिवस व्यायाम घेवून शारीरीक सुदृढता राहत नाही असे निदर्शनास आले. रोज सकाळ-संध्याकाळी जास्तीत जास्त विद्यार्थी विविध खेळाच्या माध्यमातून मैदानावर आले पाहिजे, शारीरिक सुदृढतेबरोबर क्रीडा स्पर्धेत भाग घेऊन त्या प्रमाणपत्राचा उपयोग भविष्यात व्हावा या हेतूने मी श्री हेमंत वैजनाथ कदम स्वतः मुख्याध्यापक व क्रीडा शिक्षकाची अशी मागील ११ वर्षापासून दुहेरी भूमिका बजावत असताना या विषया संदर्भात आलेल्या अडचणी व या अडचणी

वर वेग-वेगळ्या उपाय योजना करून या वर अधिक काम करून रामभाऊ जोशी हायस्कूल ची क्रीडा क्षेत्रातील यशोगाथा लिहिली.

**शालेयस्तरावर क्रीडा क्षेत्रात काम करत असताना आलेल्या अडचणी-**

रामभाऊ जोशी हायस्कूल, करकंब यांची स्थापना सन १९५४ साली झाली, शाळेत जवळपास पाच एकराचे मैदान पण त्यावर सगळीकडे चीलारी / बाभळीची झाडे शाळेच्या भोवती कंम्पाउंड नसल्यामुळे शाळेच्या आवारातूनच गावकऱ्यांची वाहतूक असायची. मैदानावर कोणत्याही खेळाच्या मैदानाची मापे किवा क्रीडांगण नव्हते. शाळेतील विद्यार्थी फक्त रबरी बॉल वर क्रिकेट व लगोर खेळत असत. क्रीडा साहित्याचा तुटवडा असल्याने, आपण विद्यार्थ्यांना खेळाचे प्रात्यक्षिक योग्य व समाधानकारक दाखवू शकत नव्हतो, तसेच साहित्य अपुरे असल्याने विद्यार्थ्यामध्ये खेळाविषयी आवड/रुची वाढत नव्हती.

शासनाकडून मिळणारे अनुदान अत्यंत अल्पप्रमाणात असल्यामुळे शाळेकडून क्रीडा साहित्य म्हणून फक्त लगोर मिळत असे. विद्यार्थी संख्या भरपूर प्रमाणात असूनही तालुका स्तरावर स्पर्धे साठी विद्यार्थ्याचे प्रमाण नगण्य (खुप कमी) होते, मुलींचे क्रीडा स्पर्धेतील प्रमाण तर बोटावर मोजण्याइतकेच होते. शाळेतील विद्यार्थ्यांना कोणत्याही क्रीडांगणाची मापे व्यवस्थित माहित नव्हती, त्यांना कोणत्याही खेळाचे नियम व्यवस्थितरित्या माहित नव्हते. सुरवातीच्या काळात अशा अनेक अडचणी/संकटाना तोड द्यावे लागले, करकंब गावात कुस्तीसाठी चांगले वातावरण आहे, गावात दोन तीन मातीच्या कुस्तीच्या तालमी चालतात, पण शालेय व राष्ट्रीय स्तरावर मॅटवरील कुस्ती असते. गावात / शाळेत कुस्ती मॅट नसल्यामुळे मॅटवरील कुस्तीचा विद्यार्थ्यांना अनुभव येत नव्हता आणि कुस्ती मॅटची किंमत ही भरमसाठ होती. कुस्तीची मॅट नसल्यामुळे विद्यार्थ्यांकडून अपेक्षित निकाल मिळत नव्हता.

क्रीडा क्षेत्रात अनेक अडचणींपैकी अजून एक महत्त्वाची अडचण म्हणजे "मुलींना क्रीडांगणापासून" दूर ठेवले जायचे, मुलींना खेळायला मैदानावर पाठवायचे नाही अशी पालकांची भावना असायची, मुलींचा स्पर्धेतील सहभाग सुद्धा 0% होता. क्रिकेट हा सर्व विद्यार्थ्यांचा आवडीचा खेळ, पण क्रिकेट स्पर्धेसाठी लेदर बॉल, पॅड, हेल्मेट, क्रिकेटची मॅट इत्यादीचा खर्च खूपच होता. तसेच तायक्वांदो कराटेचे किट विद्यार्थी दुसऱ्याकडून उधार घेऊन खेळत होते. अडचणीमध्ये क्रीडा साहित्याची कमी ही खूप मोठी अडचण होती.

विद्यार्थ्यांच्या पालकांची मानसिकता क्रीडा या विषयावर नाराजीची होती, मुले मैदानावर खेळू लागली तर अभ्यासात मागे राहतील भविष्यात त्यांचे करिअर व्यवस्थित घडणार नाही, आणि मुलीना तर मैदानावर पाठ्विण्याची मानसिकता नव्हती, यामुळे पालक विद्यार्थ्यांना मैदानावर पाठवत नसत.

**उपाययोजना किंवा प्रभावी कामासाठी केलेली अंमलबजावणी —**

**Sports is Happy Life खेळ हेच आनंदी जीवन -**

ही म्हण २०१३ पासून विद्यार्थ्याच्या मनात रुजविण्याचा प्रयत्न चालू झाला. या साठी शाळा सुटल्यानंतर विद्यार्थी क्रीडांगणावर बोलवू लागलो, सुरुवातीला संख्या खुप कमी होती. परंतु हळू हळू विद्यार्थी खेळाडू संख्या वाढू लागली, मी स्वतः सकाळी ५.३० ला शाळेच्या मैदानावर व्यायमासाठी रोज येत होतो, माझे बघुन संध्याकाळी सराव करणारे विद्यार्थी सकाळी ६.०० वाजता मैदानावर येऊ लागले, सुरुवातीच्या काळात मैदान स्वच्छतेवर

जास्त भर दिला, शाळेची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे खेळाडू विद्यार्थ्याकडून मैदानाची स्वच्छता करून घेत असत.

हळू हळू आमचे व्हॉलीबॉल, खो-खो, क्रिकेट, कबड्डी व मैदानी स्पर्धाचे मैदान तयार झाले. विद्यार्थ्यांबरोबर रोज सकाळ - संध्याकाळ मी स्वतः व्हॉलीबॉल, खो-खो खेळू लागलो स्वतः मुख्याध्यापक / क्रीडाशिक्षक आपल्या सोबत सराव करतात हे पाहून विद्यार्थ्यांमध्ये भरपूर प्रमाणत जोश यायचा. सकाळ / संध्याकाळ शाळेच्या विद्यार्थ्यांनी मैदान फुलू लागले, भरपूर प्रमाणात विद्यार्थी वेगवेगळ्या खेळाचा सराव करू लागले.

**फिर नही मिलेंगे खेलने के मोके**

**बच्चो को खेलने दो उन्हे ना रोके**

हळू हळू पंढरपूर तालुका स्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये विद्यार्थी सहभागी होऊ लागले व्हॉलीबॉल मैदानी स्पर्धा ,खो-खो, कबड्डी या स्पर्धेमध्ये यश मिळू लागले.

**हार भी जाओ तो गम ना करो,**

**फिर से खेलो मगर होसला कम ना करो !**

याप्रमाणे कराटे,ज्युदो,तायकान्दों,कुस्ती,योगा,थाळी फेक,गोळा फेक,१०० मी धावणे अशा अनेक स्पर्धेत विद्यार्थी सहभागी होवू लागले. शाळेच्या पाच एकर मैदानावर व्हॉलीबॉल,खो-खो,कबड्डी व धावण्याचा track अशी मैदाने उठून दिसू लागली. पंढरपूर तालुकास्तर स्पर्धा शाळेच्या मैदानावर घेवू लागलो, या स्पर्धेत आलेली बाहेरच्या शाळेतील मुले/मुली खेळताना पाहून त्यांचे चांगले कौशल्य रामभाऊ जोशी हायस्कुलच्या खेळाडूंनी आत्मसात केले, पंढरपूर तालुकास्तर, सोलापूर जिल्हास्तर व्हॉलीबॉल,खो-खो,कराटे स्पर्धा शाळेत होवू लागल्या, बाहेरचे खेळाडू बघून माझ्या शाळेत खेळाडू विद्यार्थी संख्या वाढू लागली, याचा परिणाम दरवर्षी घेतल्या जाणाऱ्या शाळेच्या क्रीडा सप्ताहामध्ये मुला / मुलींचे प्रमाण वाढले.

१०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत व गोळा फेक स्पर्धेत प्रशालेचे विद्यार्थी राज्यस्तरा पर्यंत गेले. कुस्तीमध्ये तालुकास्तर, जिल्हास्तर, विभागस्तर व राज्यस्तरीय स्पर्धा जिंकून राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग नोंदविला तसेच शाळेतील विद्यार्थ्यांची "कुमार महाराष्ट्र केसरी" साठी निवड झाली,विद्यार्थ्यांना कुस्तीचा सराव मॅट वर व्हावा म्हणून आत्ताचे माढा मतदार संघाचे खासदार मा.श्री धैर्यशील मोहिते-पाटील यांना गावचे वस्ताद व प्रतिष्ठीत नागरिकांनी विनंती केल्याने मा.श्री धैर्यशील मोहिते-पाटील यांनी शाळेतील एका २५ * ८० हॉल मध्ये त्यांच्या कडील सरावासाठी कुस्तीची मॅट दिली, आता विद्यार्थी रोजचा सराव कुस्ती मॅटवर चालू आहे.

**खेल समझाते है मानव को शक्ती ओर बुद्धी का अर्थ**

**तभी तो प्रतिगामी बडे लक्ष्यो को पाने मे होते है समर्थ ।**

हळू हळू काही नवीन व मजेदार खेळ शासनाकडून – संघटनेकडून चालू झाले या मध्ये गदा – युद्ध हा खेळ आमच्या विद्यार्थ्यांना खूप आवडला, यामध्ये विद्यार्थ्यांचा थोडा सराव करून घेतला विद्यार्थी औरंगाबाद येथे राज्यस्तरावर विजयी झाले. राष्ट्रीयस्तरावर सुद्धा विजयी झाले श्रीलंका येथे आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांची निवड झाली, पण कोरोना या रोगाच्या फैलावामुळे सदर आंतरराष्ट्रीय स्पर्धा झाल्या नाहीत, या

गदायुद्धाबरोबर आपल्या ग्रामीण भागात जास्त चालणाऱ्या आट्या-पट्या, लगोर, डॉजबॉल अशा नवीन खेळामध्ये रामभाऊ जोशी हायस्कूल, करकंबचे विद्यार्थी सहभाग घेऊ लागले व नाव कमवू लागले.

**खेलकुद है स्वस्थ के मूलमंत्र**

**रण मे भाग लेकर बनाओ जीवन को अनमोल .....**

शाळेच्या एकूण विद्यार्थी संख्येपैकी जवळपास ४५% विद्यार्थी वेग-वेगळ्या क्रीडा स्पर्धेत भाग घेवू लागले, आता ध्येय लागले संपूर्ण शाळा क्रीडामय करण्याचे मग या साठी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना एकच नारा दिला.

**मनाला अधिक आनंदी करूया,**

**चला योगाकडे वळूया.**

आनंदी शनिवार या उपक्रमाखाली दर शनिवारी जवळपास सकाळी ३०-३५ मिनिटे योगा व सूर्यनमस्कार करून घेतले जावू लागले. यामध्ये सर्व शिक्षक व १००% विद्यार्थी सहभागी होवू लागले. विद्यार्थ्याकडून योगा व सूर्यनमस्कारचा व्यायाम करून घेतला जाऊ लागला.

योगा बरोबर आनंदी शनिवार उपक्रमामध्ये साउंडवर गाणे लावून "झुम्बा डान्स" कवायत प्रकार घेण्यात येवू लागले. या प्रकारे खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांचा शनिवार आनंदी जाऊ लागला.

यामुळे जे विद्यार्थी विशेषतः मुली या मैदानावर येवू शकत नाहीत, त्या आप-आपल्या घरी रोज सकाळी सर्वांग सुंदर व्यायाम म्हणजे "सूर्यनमस्कार" करू लागल्या सूर्यनमस्काराच्या सरावामुळे विद्यार्थ्यांची शारीरिक सुदृढता , मानसिकता व एकाग्रता वाढू लागली असे दिसून आले.

**रोज करा योग, कधीही जवळ येणार नाही रोग**

समाधान आणि संतोष हिच सर्वात मोठी संपत्ती आहे आणि ती फक्त मिळते योगा वाटे..... शाळेत योग दिन, सूर्यनमस्कार दिन (रथसप्तमी) दिवशी असे दिवस साजरा करू लागलो, २१ जून जागतिक योग दिन दिवशी करकंब गावातील योग प्रेमी नागरीक विद्यार्थी / शिक्षक सर्वजन मिळून अतिशय चांगल्या रीतीने करू लागलो.या मुळे शाळेतील विद्यार्थी योगा स्पर्धेत भाग घेवू लागले व तालुका / जिल्हास्तरावर विजयी होवू लागले.

**खेल कुद बनाते है मनुष्य का आरोग्य.**

**शक्ती संचार करके शरीर को बनाते है सुयोग्य.**

शाळेतील भरपूर विद्यार्थ्यांचा क्रिकेट कडे ओढा होता, पण शालेय व संघटनेच्या स्पर्धा लेदर बॉल क्रिकेट व नियमाने होत असत. त्यांचे साहित्य पण महाग होते तरी पण विद्यार्थामध्ये वर्गणी करून क्रिकेटचे साहित्य आणले व रोज क्रिकेटमॅट टाकून लेदर बॉलवर सराव सुरू झाला. रोज दोन वेळा सराव होऊ लागल्याने पंढरपूर तालुकास्तरीय विजयी व जिल्हास्तरावर उपविजयी राहिलो.

शाळेची क्रीडा क्षेत्रातील प्रगती बघून व वाढता उत्साह पाहून माजी खासदार मा.श्री विजयसिंह मोहिते पाटील यांनी आपल्या खासदार निधीतून ओपन जिम दिली.

तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी, सोलापूर यांच्याकडून सुद्धा 2019 साली ओपन जिम / खुली व्यायामशाळा मिळाली, व याच कार्यालयाकडून कुस्तीत झालेली शाळेची प्रगती बघून 30 * 30 बंदिस्त व्यायाम शाळेसाठी ७०००००/- (सात लाख रुपये) दिले.

दयानंद शिक्षण संस्था, सोलापूर यांनी पाच एकर मैदानावर मुरूम व लाल माती टाकून 400 मी. ट्रॅक विद्यार्थ्यांना सरावासाठी करून दिला, विद्यार्थ्यांबरोबर धावण्याचा सराव करकंब गावातील युवक सुद्धा पोलीस भरती, मिलेट्री भरतीचा सराव करू लागले. शाळेकडून सर्वांसाठी ही सुविधा मिळत असल्याने समाजातून गावातून खूपच कौतुक होऊ लागले, याच काळात सन 2023 साली विद्यार्थ्यांना रात्री उशिरा पर्यंत सराव करता यावा म्हणून माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी ७ हॅलोजन लँप मैदानावर बसवून दिले.

क्रीडा क्षेत्र हे सुद्धा असे एक क्षेत्र आहे की, येथे करियरच्या सुद्धा भरपूर संधी उपलब्ध आहेत यांची विद्यार्थ्यांना जाणीव करून दिली. इ.१०वी व इ.१२ वीच्या विद्यार्थ्यांना जिल्हास्तरावर- ५ गुण, विभागस्तरावर १० गुण, राज्यस्तरावर १५ गुण,राष्ट्रीयस्तरावर २५ गुण असे बोर्डाकडून गुण मिळू लागले, त्यामुळे विद्यार्थ्यांना सुद्धा त्यांच्या कष्टाची चीज झाली असे वाटू लागले.

आमच्या शाळेतील खेळाडूंना गावांमध्ये, तालुक्यामध्ये विशेष असा मान- सन्मान मिळू लागला, दैनंदिन पेपरमध्ये फोटो - बातमी मध्ये नाव येऊ लागले, त्यामुळे विद्यार्थ्यांबरोबर त्यांच्या पालकांमध्ये सुद्धा उत्साह वाढू लागला.

राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध क्रीडा खेळ खेळले जातात त्याची व खेळाडूंची माहिती ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मिळू लागली,ऑलिम्पिक सारख्या स्पर्धा विद्यार्थी रात्री जागून पाहू लागले, क्रिकेट खेळाडू सोडून बाकी अनेक खेळातील आंतरराष्ट्रीय खेळाडू यांची माहिती विद्यार्थी गोळा करू लागले. दैनंदिन पेपर मधल्या क्रीडा बातम्या विद्यार्थी आवर्जून वाचू लागले. विद्यार्थ्यांचा शारीरिक विकासाबरोबर मानसिक विकास सुद्धा होऊ लागला आणि त्यांच्या क्रीडा गुणांना वाव मिळू लागला.

क्रीडा क्षेत्रात हार-जीत होत असते, विद्यार्थ्यांना लहान वयातच हरले तर नाराज व्हायचे नाही व जिंकले तर अति उत्साही व्हायचे नाही ही सवय लागून राहते व त्यांच्या पुढील आयुष्यातील यश अपयशाला तो अगदी व्यवस्थितपणे सामोरे जाऊ लागतो.

**क्रीडाक्षेत्र — राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये क्रीडा (खेळ) या विषयास इतर गणित विज्ञान इंग्रजी विषया इतकेच महत्त्व दिले आहे. NEP २०२० मध्ये विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा संस्कृती रुजवण्यात आली आहे क्रीडा (खेळ)या विषयातून नेतृत्व गुण विकसित झाले पाहिजे यामध्ये आपल्या संस्कृतीतील प्राचीन खेळाला महत्त्व दिले तसेच खेळ माणसाचे चारित्र्य आणि व्यक्तिमत्त्व घडविण्यास मदत करते. तसेच क्रीडा क्षेत्रातील वेग वेगळ्या खेळांचा विद्यार्थ्यांच्या मनावर आणि शरीरावर मोठा सकारात्मक बदल परिणाम झालेला दिसून येत आहे.

1. विद्यार्थी विविध क्रीडा स्पर्धेत भाग घेत असल्याने तो शारिरीक दृष्ट्या तंदुरुस्त झालेला आहे.
2. हायस्कूल मधून क्रीडा स्पर्धेसाठी मुले / मुली ची खेळाडू ची संख्या वाढली, तसेच हायस्कूलमध्ये क्रीडा बाबी मुळे विद्यार्थी संख्या वाढू लागली हे एक महत्त्वाचे झाले.

3. क्रीडा क्षेत्रात एक साखळी तयार झाली इ १० वीच्या विद्यार्थ्यांचा सराव बघुनच आपोआप इ ५ वी व इ ६ वी चे विद्यार्थी तयार होऊ लागले, सराव पाहूनच बेसिक कौशल्य ती शिकू लागली.
4. क्रीडा क्षेत्रात शाळेचे नाव आदराने घेऊ लागले, तसेच शाळेच्या नावाचा दबदबा राहिला.
5. क्रीडा क्षेत्रात जास्तीत जास्त विद्यार्थी भाग घेत असल्याने खेळाडू विद्यार्थी निरोगी राहण्याचे प्रमाण जास्त राहू लागले, स्मरणशक्ती वाढ होऊ लागली असे निदर्शनास आले.
6. माझी शाळा - सुंदर शाळा अभियान टप्पा १ व २ मध्ये क्रीडा क्षेत्रामध्ये हायस्कूलला संपूर्ण गुण मिळाले, या जोरावरच टप्पा १ मध्ये रामभाऊ जोशी हायस्कूल, करकंब ला पंढरपूर तालुक्यात प्रथम क्रमांकाचे रु ३००००/- (तीन लाख रुपये) चे बक्षीस मिळाले.
7. क्रीडा क्षेत्रातील आवडीमुळे शाळेतून विद्यार्थी पास झाल्यानंतर सुद्धा विद्यापीठ व राष्ट्रीयस्तरावर खेळू लागले, पुढे जाऊन अनेक विद्यार्थी पोलीस भरतीत उतरले तसेच भारतीय सैन्य दलामध्ये निवड झाली व बरेच विद्यार्थी बी.पी.एड, एम. पी. एड शिक्षण घेऊन हेच विद्यार्थी अनुदानित खाजगी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत "क्रीडा शिक्षक" म्हणून कार्यरत आहेत ही आमच्यासाठी आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट आहे, सर्वात मोठे क्रीडा क्षेत्रातील यश म्हणजे शाळेची खेळाडू विद्यार्थी कु. अश्विनी शिवानंद हत्तरगे हिची महाराष्ट्र शासनाकडून "क्रीडा अधिकारी" म्हणून निवड झाली.

जसं एक ज्वारीचा दाणा जमिनीत पेरल्यानंतर त्याच्या रूपात हजारो दाणे मिळतात, त्याच प्रमाणे एका क्रीडा शिक्षकाच्या प्रामाणिक कार्यामुळे अनेक चांगले क्रीडा शिक्षक, क्रीडा अधिकारी आपल्याला मिळू लागले ही सर्वात मोठी फल निष्पत्ती आहे म्हणून सर्वात आनंदी जीवन कोणते असेल तर....

**Sports is Happy Life**

**समारोप -**

**सिखना मुश्किल है जुस्तुजू चाहिये**

**सीखना और भी मुश्किल है,.**

**खाक मे मिटने की तमन्ना चाहिये!.....**

क्रीडा हा विषय खूपच अवघड असतो, एखादी मराठी किंवा इंग्रजीची कविता एका तासातच पाठ होते, पण खेळातील एक-एक कौशल्य शिकण्यासाठी खूप काळ लागतो, आता स्पर्धा सुद्धा वाढली आहे, तालुका जिल्हास्तर तरी जिंकायचे म्हटले तर सातत्याने दोन-तीन वर्षे सराव करावा लागतो या सरावामुळेच खेळाडू विद्यार्थ्यांना यश मिळते व शाळेचे नाव होते.विद्यार्थी मोठा झाल्यानंतर काही काळानंतर तो शाळेतील इतर विषयाच्या शिक्षकांचे नाव विसरू शकतो पण आपल्या शाळेतील "क्रीडा शिक्षकाचे" व शाळेचे नाव कायमस्वरूपी लक्षात ठेवतो हेच क्रीडा क्षेत्राचे महत्त्वाचे यश आहे.






व्हिडीओ लिंक –

https://drive.google.com/file/d/1jhkPUCMjWMTGWWQofxbn-cNGZnBzeJw8/view

----------**----------

# "वस्ती शाळेचा आनंददायी प्रवास"

**शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लोकरेवस्ती, करकंब,ता.पंढरपूर जि.सोलापूर.**

**शाळेचा ईमेल आयडी** - zppslokarewasti@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.नागनाथ विष्णू घाटूळे
**मोबाईल क्रमांक** - 9763141216
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - nagnathghatule79@gmail.com

उन्हातान्हात एका झाडाखाली एका शाळेच छोटेसे रोपट लावलं त्याला कष्टाचा खत पाणी देत राहिलो आणि त्यातून वस्ती शाळा सुरू झाली. लोकरे वस्ती शाळेचे रोपट 25/ 7/2005 मध्ये उन्हातान्हात झाडाच्या छायेत व छपरामध्ये वाढत होतं. 500 ते 3500 रुपयाच्या अतिशय तुटपुंज्या मानधनावर न डगमगता व खिशातून पदर मोड करून होणाऱ्या खर्चाचा विचार न करता विद्यार्थ्यांना शाळेमध्ये गोडी निर्माण होण्यासाठी स्वतः दररोज शालेय पोषण आहार सुरू केला. तेथील काही अडाणी व अशिक्षित पालक होते त्यांची शिक्षणाबद्दल पूर्ण अनास्था होती. अशा परिस्थितीमध्ये रोज त्यांच्या गाठीभेटी घेऊन त्यांचे मत परिवर्तन करून शिक्षणाबद्दल गोडी निर्माण केली. त्यामुळे पंधरा ते वीस मुले शाळेच्या प्रवाहात आली, पालकांची परिस्थिती नसताना मी स्वतः त्यांच्या पाल्यांना गणवेश उपलब्ध करून दिला तोही माझ्या वडीलांच्या कष्टातून, कारण माझी आर्थिक परिस्थिती नव्हती. सन 2009 मध्ये वस्ती शाळा ही नियमित वस्ती शाळा सुरू झाली. शासनाकडून जिल्हा परिषद मार्फत एक इमारत देऊन जि. प. प्राथमिक शाळा लोकरेवस्ती सुरू झाली. शिक्षणाने मानवाचा विकास साधता येतो शिक्षणाने मानवाच्या ज्ञानात भर पडते. त्याचबरोबर भारतीय संविधानाने प्रत्येकाला शिक्षणाचा अधिकार दिलेला आहे. बहुतेक आज ग्रामीण भागामध्ये मुलं दर्जेदार शिक्षणापासून वंचित राहिलेले दिसतात. म्हणून आज अशा गुणवत्तापूर्ण शिक्षणापासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांना विचार करून जि. प. प्राथमीक शाळा लोकरेवस्ती, करकंब तालुका पंढरपूर येथे 25/7/ 2005 रोजी या ठिकाणी नागनाथ विष्णू घाटुळे यांनी शाळा रुपी शिक्षणाचा एक स्रोत निर्माण केला आणि आज एका नियमित शाळेत मुले दाखल आहेत . शिक्षणाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये आपली गुणवत्ता निर्माण करणारी करकंब परिसरातील एकमेव शाळा म्हणजे लोकरेवस्ती, करकंब शाळेत अतिशय संकटातून मार्ग काढत यशाची उत्तुंग भरारी घेत आहे. 'आधी केले मग सांगितले' या उक्तीप्रमाणे शाळा सुरू झाली.. शिक्षण सेवेत असताना 25/7/2005 रोजी रूजू झालो. डॉक्टर कर्मवीर भाऊराव पाटील व सावित्रीबाई फुले, साने गुरुजी ,शिक्षण तज्ञ डॉक्टर राधाकृष्णन यांचे शैक्षणिक कार्य डोळ्यासमोर ठेवून आजपर्यंत शिक्षकाची भूमिका बजावली. आजतागायत शाळेसाठी स्वतः मी बराच खर्च केला. मला कोणी चांगले म्हणावे म्हणून नाहीतर शिक्षणाची

गोडी मुलांना निर्माण व्हावी म्हणून मी शाळेसाठी अहोरात्र कष्ट केले. 'केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहिजे' नंतर 2008 -2009 या कालावधीमध्ये शाळेला सर्व शिक्षा अभियानामध्ये बांधकाम मंजूर झाले. बांधकाम करत असताना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले. रात्रीचे एक ते दोन वाजेपर्यंत स्वतः बसून बांधकाम पूर्ण करून घेतले. फक्त विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच शिक्षणाचे अंतिम ध्येय साध्य करण्यासाठी मी शाळेसाठी व विद्यार्थ्यांसाठी झटत राहिलो.

प्रत्येकाला वाईट वेळ येते. खचून न जाता जोमाने काम करत राहिलो अनेकदा दोरी तुटलेल्या पतंगासारखी स्थिती व्हायची माझ्या स्वप्नात भोळीभाबडी स्वप्न होती त्यांना प्रयत्नाच्या कष्टाची जोड दिली. जेवढा मोठा संघर्ष तेवढे मोठे यश काळ बदलतो ,वेळ बदलते ,पात्र बदलतात आणि भूमिकाही बदलतात.

मनगटात स्वप्नांना जिवंत करण्याची पंखात बळ निर्माण करण्याची जिद्द आणि अविरत संघर्ष करण्याची तयारी ठेवावी लागते. माझ्यासारख्या तळागाळातल्या कष्टकऱ्यांच्या कामगाराच्या घरातल्या अपुऱ्या साधन सामग्रीत आणि पराकोटीच्या ध्येयाने कुठल्या तरी कोपऱ्यात ज्ञानसाधना करणाऱ्या माणसाने कोणतेही काम करताना त्या कामावर तुटून पडले पाहिजे. काम लहानसे आहे म्हणून त्या कामाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळ दृश्य परिस्थितीत असणाऱ्या पंढरपूर तालुक्यातील करकंब हे माझे गाव. इयत्ता पहिली ते चौथी वर्ग असणारी शाळा आज जवळजवळ 42 पटाची ही एक उत्तमाकडे झेप घेणारी शाळा म्हणजे लोकरेवस्ती शाळा होय. शाळेत ध्वनी क्षेपक यंत्राद्वारे घेतला जाणारा परिपाठ म्हणजे तर ज्ञानाचे भांडारच होय. शिवाय पाढे, कविता, बोधकथा, प्रश्नमंजुषा, दिनांक तो पाढा, सुविचार, इंग्रजी शब्द जनरल नॉलेज वर प्रश्न, विद्यार्थी परिपाठानंतर वर्गात उत्साहाने सामील होतात. कृतिशील शिक्षण आनंदाने सुरू असते. विद्यार्थ्यांनी जमवलेल्या काड्या, कांड्या, मणी , चिंचुके दगड, गोटे तर शिक्षणामुळे तक्ते, शब्द कार्ड, शब्द पट्ट्या, गोष्टी, गणित, खेळ, शब्दातून गोष्ट, कविता मुलांना हा वेगळाच आनंद देऊन जातात, अशी ही जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लोकरेवस्ती, करकंब तालुका पंढरपूर जिल्हा सोलापूर ही आमची शाळा प्रगतीच्या दिशेने वाटचाल करणारी, सर्वांना आवडणारी शाळा. आकर्षक परिसर, शाळा व्यवस्थापन समिती, गावातील ,वस्तीवरील ग्रामस्थ यांचा शाळेविषयी सकारात्मक दृष्टिकोन या सर्व बाबी खूपच लाभदायक ठरल्या आहेत.

**शाळेसाठी उल्लेखनीय बाबी**

**पुणे विभागीय आयुक्त -**

चोकलिंगम साहेब सोलापूरचे जिल्हाधिकारी ,तुकाराम मुंढे साहेब मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण डोंगरे साहेब आदींनी अचानक लोकरे वस्ती शाळेला भेट देऊन पाहणी करून शाळेतील मुलांचे व शिक्षकांचे कौतुक केले.

**पालक जागर सभा व शिक्षण परिषद -**

पंढरपूरचे गटशिक्षण अधिकारी सुलभा वटारे मॅडम यांनी शाळेच्या चांगल्या कार्याबद्दल नावलौकिक मिळवून दिला. तसेच एन सी ई आर टी दिल्ली व एस सी ई आर टी पुणे यांनी पंढरपूर तालुक्यातील करकंब केंद्रातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लोकरे वस्ती शाळेस भेट देऊन गुणवत्तेचे कौतुक केले.

**'अ' शाळा गुणवत्ता श्रेणी -**

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत होत असलेल्या पायाभूत चाचणी मध्ये शाळेला शासनाकडून 'अ' श्रेणी प्राप्त झाली तसेच शाळा सिद्धि या केंद्र शासनाच्या उपक्रमांमध्ये स्वयं मूल्यमापनात अ श्रेणी मध्ये आहे अध्ययन अध्यापनात निष्पत्ती मध्ये सुद्धा अ श्रेणीमध्ये आहे.

**शाळा बनली परिवर्तनाचा केंद्रबिंदू -**

शिक्षक जेव्हा परिवर्तनाचा आग्रह धरतो त्यासाठी जीव ओतून काम करू लागतो त्याला कोणीच रोखू शकत नाही. अशातच जर लोकांचा सहभाग मिळाला आणि पालकांची मदत केली तर खूपच नव्या गोष्टी साकारतात येतात. शाळेमध्ये डिजिटल वर्ग ज्ञानरचनावादी कृतीयुक्त अध्यापन आणि आनंददायी वर्ग या साऱ्या गोष्टी शिकवल्या जातात. लेखक प्र. के. अत्रे म्हणतात. जे शिक्षक मुलांना घडवितात ते स्वतः घडत असतात.

**शालेय कार्यात यश -**

माझ्याकडे अध्यापनासाठी जे वर्ग आहेत त्यात शंभर टक्के विद्यार्थी प्रगत झाले शाळा सिद्धि अ श्रेणी वर्ग व ज्ञानरचनावाद उपक्रम यामध्ये 100% यश लाभले.

**शालेय उपक्रमात सक्रिय सहभाग -**

100% डिजिटल शाळा 100% शाळा समृद्धीसाठी 100% पट नोंदी 100% मुले वाचनात प्रगत, ई लर्निंगचा वापर, बाजार डे उपक्रम, केंद्रीय प्रश्नमंजुषा या उपक्रमांचे आयोजन

**पाठीवर पडली शाब्बासकीची थाप -**

शिक्षण विभागातील विविध स्तरावरील अधिकारी शाळेला भेट देऊन शाळेबद्दल व गुणवत्तेबद्दल गौरवोद्गार काढले.

**पुरस्कारातून झालेल्या शाळेचा गौरव -**

१)स्वच्छ शाळा सुंदर शाळा पुरस्कार मिळाला २)आदर्श उत्कृष्ट शाळा पुरस्कार मिळाला ३)आंतरराष्ट्रीय आय एस ओ मानांकन प्रदान केले अशा विविध माध्यमातून शाळेचा गौरव झाला.

**ग्रामस्थांचा सहभाग -**

शाळेच्या सर्वत्र पसरलेल्या नावलौकिक व विद्यार्थ्यांचे यश यामुळे शिक्षकाच्या आव्हानाला पालकांनी व ग्रामस्थांनी १०० % प्रतिसाद दिला. शाळेला ग्रामस्थांचा व शाळा व्यवस्थापन सामिती सहकारी शिक्षक यांचा तितकाच मोलाचा प्रतिसाद मिळतो. उदाहरणार्थ श्रमदान, खाऊवाटप, शैक्षणिक साहित्य, रोख रक्कम व वस्तूच्या रूपात दुष्काळग्रस्त अशा भागात त्यांचे हे योगदान निश्चित कौतुकास्पद आहे. शाळा व्यवस्थापन समिती सहकार्य शिक्षक केंद्रप्रमुख साहेब यांचे नेहमीच सहकार्य लाभले आहे.

**वाचक गौरव -**

एक स्त्री शिकली तर संपूर्ण कुटुंब सुधारते या क्रांतीज्योती सावित्री फुले यांच्या विचारानुसार शाळेच्या परिसरातील महिला व पालक यांच्यासाठी वाचनालय सुरू करण्यात आले आहे.

सकाळ




करकंब (ता. पंढरपूर) : येथील लोकरे वस्ती जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आयोजित महिला मेळाव्यात सहभागी महिला.

# लोकरे वस्ती शाळेत महिला मेळावा

**करकंब, ता. १३ :** करकंब (ता.पंढरपूर) येथील लोकरे वस्ती जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत महिला मेळावा उत्साहात पार पडला. अध्यक्षस्थानी ग्रामपंचायत सदस्या ज्योती शिंगटे या होत्या.

सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये दशसूत्री हा महत्त्वाकांक्षी उपक्रम सुरु केला आहे. त्याअंतर्गत विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये सुसंस्कार आणि राष्ट्रभक्ती वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून लोकरे वस्ती शाळेत महिला मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात प्रा.नीता शेटे यांनी ''आजचा विद्यार्थी आणि उद्याचे स्पर्धेचे युग'' या विषयावर मार्गदर्शन केले. सुवर्णा खरात यांनी वैयक्तिक व सामाजिक स्वच्छतेचे महत्त्व विषद केले. मनीषा शेटे यांनी बालसंगोपन आणि संस्काराबाबत माता-पालकांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन विनोद सावंत यांनी आभार नागनाथ घाटूळे यांनी मानले.

Solapur, Solapur-Today
14/09/2022 Page No. 3




बेरीज तयार करू
VIVO T1 5G


VIVO T1 5G


VIVO T1 5G


I.S.O
9001:
2008
VIVO T1 5G




WEL
COME


चिंचवड देवस्थान ट्रस्ट
श्री मयूरेश्वर मंदिर,मोरगाव

----------**----------

# "विविध उपक्रमातून पटसंख्या वाढीचे यश"

**शाळेचे नाव व पत्ता - श्री नवलबाई फुलचंद शहा कोठारी हायस्कूल, शिवगंगानगर भाग 5, कुमठानाका, सोलापूर.**

**शाळेचा ईमेल आयडी** - nfshahkothari@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.रमेश युवराज यादवाड
**मोबाईल क्रमांक** - 9850839957
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - nfshahkothari@gmail.com

**प्रास्ताविक -**

सन्मती ज्ञान प्रसारक मंडळ संचलित श्री.न.फु.शहा कोठारी हायस्कूल सोलापूर, शिवगंगा नगर भाग 5, आमची शाळा शहरातील हद्दवाढ भागात वसलेली आहे. शाळा व विद्यार्थ्यांच्या उज्वल विकासासाठी मुख्याध्यापक व शिक्षक सदैव प्रयत्नशील असतात. विद्यार्थ्यांची नियमित उपस्थिती, विद्यार्थी गळती प्रमाण, लोकसहभागातून विद्यार्थी विकास, किशोरवयीन मुलींच्या उत्तम आरोग्यासाठी सदैव प्रयत्नशील राहून, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेसाठी अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. हद्दवाढ भागात कामगार,कष्टकरी वर्गातील विद्यार्थी मोठ्या संख्येने शिक्षण घेत आहेत. गरीब कष्टकरी वर्गातील ही मुले शाळा व गुणवत्तेपासून वंचित राहू नये यासाठी मुख्याध्यापक श्री रमेश यादवाड सर यांच्या नेतृत्वाखाली सर्व शिक्षक सदैव प्रयत्नशील राहतात. शाळेच्या पटसंख्येत मागील तीन वर्षापासून वाढ झाली आहे. विद्यार्थी शाळेत नियमित उपस्थित राहतात. लोकसहभागातून विद्यार्थ्यांसाठी अनेक साहित्य मिळाले आहे. अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत विकास झाला आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी थोर महापुरुषांचे जयंत्या,पुण्यतिथी, विविध उपक्रम, दहीहंडी, गणेशोत्सव, आषाढी एकादशी, वेशभूषा, विविध स्पर्धा, विज्ञान व गणित प्रदर्शन, हस्तकला वस्तूंचे प्रदर्शन, मतदान जनजागृती रॅली, चित्रकला स्पर्धा, आनंद मेळावा,क्रीडा सप्ताह,व्याख्यानमाला,वार्षिक स्नेहसंमेलन व सहलीचे आयोजन केले जाते. शासनाचे विविध उपक्रम शाळेत नियमितपणे राबविले जातात. मेरा देश मेरी माटी, विद्यांजली पोर्टल, स्वच्छता मॉनिटर व्हिडिओ उपक्रम, महावाचन चळवळ उपक्रमात विद्यार्थी सहभाग, आनंददायी शनिवार,मुख्यमंत्री सुंदर शाळा टप्पा 1 व 2 उपक्रमात प्रशालेने सहभाग नोंदविला आहे.विद्यार्थ्यासाठी ज्यादा तास,अप्रगत विद्यार्थ्यासाठी वाचन लेखन, स्कॉलरशिप परीक्षा, एन.एम.एम.एस परीक्षा, या सर्वांमुळे विद्यार्थ्यांना शिक्षणाविषयी आवड निर्माण होऊन नियमित शाळेला येतात. यातून विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसोबत शाळेचा विकास ही झाला. विद्यार्थ्यांसाठी शाळेत सर्व सुविधा पुरविण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. आमच्या शाळेची यशोगाथा मांडण्यास मला खूप आनंद होत आहे.

**मुख्याध्यापक व शिक्षक विषयासंदर्भात आलेल्या अडचणी त्यावर केलेले प्रभावी काम, केलेल्या उपाययोजना** - व त्यातून मिळालेली फलनिष्पत्ती हे पुढील प्रमाणे :

**विषय 1 : पट नोंदणी व नियमित उपस्थिती -**

विद्यार्थी हेच शाळेचे दैवत आहेत.विद्यार्थ्यांची पट नोंदणी व नियमित उपस्थिती बाबत आम्हाला कोरोना नंतरच्या काळात मोठी समस्या निर्माण झाली होती. विद्यार्थी व पालकांमध्ये शाळेसंबंधी उदासीनता निर्माण झाली होती. अशावेळी पटनोंदणी व विद्यार्थी उपस्थिती वाढवण्यासाठी आम्ही पुढील प्रयत्न केले.

अ) गृहभेट: जे विद्यार्थी सतत गैरजर राहतात त्यांच्या घरी शिक्षकानी भेटी दिल्या. विद्यार्थ्यांना व पालकांना शिक्षणाचे महत्त्व सांगून विद्यार्थ्यांना शाळेत पाठवण्यास प्रोत्साहित केले. विद्यार्थी व पालक यांच्या अडचणी जाणून घेऊन त्या दूर करण्याचा प्रयत्न केले.

ब) पालकसभेचे आयोजन: विद्यार्थी उपस्थिती वाढवण्यासंबंधी पालकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी शाळेत वेळोवेळी पालक सभेचे आयोजन केले. सदर सभेची सूचना पालकांना विद्यार्थ्यांमार्फत व प्रत्यक्ष शिक्षकांमार्फत देण्यात आली.पालक सभेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या उज्वल विकासासाठी पालकांनी कोणते कार्य करावे याविषयी मार्गदर्शन केले.शिक्षणाचे महत्त्व सांगण्यात आले. शाळेत घेणारे उपक्रम सांगण्यात आले. पालक प्रोत्साहित होऊन आपल्या मुलांना नियमित शाळेत पाठवू लागले.

क) विद्यार्थी व पालक जनजागृती रॅली : विद्यार्थी पटसंख्या व नियमित उपस्थिती वाढावी, यासाठी दरवर्षी जून महिन्यात शाळा सुरू होण्याआधी एक दिवस रॅलीचे आयोजन केले जाते. शिक्षणाचे महत्त्व पटवून देणारे घोषवाक्य, शाळा सुरू होण्याचे संदेश देत रॅली काढून जनजागृती करण्यात येते. विद्यार्थी शाळेपासून व शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी रॅलीच्या माध्यमातून संदेश दिला जातो. यातून विद्यार्थी व पालक जागृत होऊन आपल्या मुलांना शाळेत पाठवतात.

**फलनिष्पत्ती** : विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी आवड निर्माण झाली, प्रत्येक मुलगा शाळेत येऊ लागला. मागील तीन वर्षाच्या तुलनेत पटसंख्येत वाढ झाली. सतत गैरहजर राहणारे विद्यार्थी नियमित शाळेत येऊ लागले.शाळाबाह्य मुलांचे सर्वे करून त्या मुलांना शाळेच्या प्रवाहात आणले. याशिवाय आनंददायी शनिवार व विविध खेळातून शिक्षण व विविध उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करून विद्यार्थी उपस्थिती वाढविण्यात आम्ही प्रयत्नशील राहिलो.

**पटनोंदणी -**

सन 2022 23 एकूण पट – 605

सन 2023-24 एकूण पट – 649

सन 2024-25 एकूण पट – 685

गेल्या दोन वर्षात विविध उपक्रम व उपाययोजना केल्यामुळे शाळेच्या पटसंख्येचा आलेख वाढलेला दिसून येतो.

**विषय 2 : स्वच्छ शाळा सुंदर शाळा -**

"स्वच्छता माणसाचे आत्म दर्शन घडविते." स्वच्छ सुंदर परिसरातूनच सुंदर सुसंस्कृत नागरिक घडतात. स्वच्छ सुंदर परिसरातूनच सुंदर सुसंस्कृत नागरिक घडत असतात. म्हणून आम्ही आमची शाळा स्वच्छ सुंदर बनवण्यासाठी अथक परिश्रम घेतले. आमची शाळा ही हद्दवाढ भागात येते आमच्या शाळेच्या परिसरातील बहुसंख्य नागरिक हे कामगार वर्ग व अशिक्षित असल्याने परिसरात अस्वच्छता निर्माण झाली होती. परिसरा बरोबर आम्ही आमची शाळा ही स्वच्छ व सुंदर बनवण्यासाठी पुढील उपक्रमांचे आयोजन करून ते यशस्वीपणे राबवले.

अ) स्वच्छता रॅलीचे आयोजन: दरवर्षी 2 ऑक्टोबर महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून प्रशालेत स्वच्छता रॅलीचे आयोजन करण्यात येते. या रॅलीत स्वच्छता विषयीचे घोषवाक्य बॅनर विद्यार्थ्यांच्या हातात देऊन स्वच्छतेचा संदेश देत महत्त्व सांगितले.

ब) पथनाट्य सादरीकरण: शाळेच्या परिसरातील नागरिकांना तसेच विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व कळावे यासाठी प्रशालेतील विद्यार्थ्याचे स्वच्छतेवर आधारित पथनाट्य सादरीकरण करण्यात आले. या पथनाट्याच्या माध्यमातून स्वच्छतेचे फायदे अस्वच्छतेमुळे होणारे दुष्परिणाम या गोष्टी बाबत जनजागृती करण्यात आली . पथनाट्याच्या माध्यमातून निरोगी जीवनासाठी आपण काय केले पाहिजे याविषयीची माहिती घरोघरी पोहोचवण्याचा प्रयत्न आम्ही करत असतो.

क) स्वच्छता मॉनिटर: स्वच्छ शाळा सुंदर शाळा करण्यासाठी आम्ही "स्वच्छता मॉनिटर" हा अभिनव उपक्रम प्रभावीपणे आमच्या प्रशालेत राबविला आहे. ऑनलाइन रजिस्ट्रेशन करून स्वच्छतेचे महत्व सांगणारे 200 व्हिडिओ शाळेच्या फेसबुक पेजवर अपलोड करण्यात आले. प्रशालेतील अनेक विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचे संदेश देणारे छोटे व्हिडिओ तयार करून अपलोड केले. शिवाय शाळेत स्वच्छता मॉनिटरची नेमणूक करण्यात आली. मॉनिटरच्या माध्यमातून शालेय परिसर व शाळा स्वच्छ करून कोणत्याही प्रकारे कचरा न टाकण्याचा आव्हान नागरिकांना दिला.

**ड) तंबाखूमुक्त शाळा प्रमाणपत्र -**

स्वच्छ शाळा सुंदर शाळा उपक्रमा अंतर्गत शाळेत कोणत्याही प्रकारे तंबाखू तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन व विक्री केली जात नाही.यातून कोणत्याही प्रकारे कुठेही घाण केला जात नाही याची दक्षता घेतली आहे.तंबाखू मुक्त शाळा प्रमाणपत्र ही मिळालेले आहे. याशिवाय विद्यार्थ्यांना पिण्याचे स्वच्छ पाणी मिळावे यासाठी प्रशालेत RO फिल्टर पाण्याची सुविधा उपलब्ध करून घेतली. विद्यार्थ्यांच्या पटसंख्येनुसार स्वच्छतागृहांची निर्मिती करण्यात आली. प्रशालेतील विद्यार्थ्यांना वैयक्तिक स्वच्छतेबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी विविध वैद्यकीय क्षेत्रातील व्यक्तींचे व्याख्यान आयोजित केले.शाळेची दरवर्षी रंगरंगोटी ही करण्यात येते. भिंती बोलक्या करण्यासाठी त्यावर विविध प्रकारचे शालेय संदेश दिला जातो. शाळेतील कचरा विल्हेवाट करण्यासाठी प्रशालेत ओला कचरा व सुका कचरा वेगवेगळ्या गोळा करून त्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावली जाते. शाळेतील पालापाचोळा तसेच विद्यार्थ्यांच्या डब्यातील शिल्लक राहिलेले अन्न यांच्या साह्याने कंपोस्ट खत निर्मिती करून प्रशालेत स्वच्छता राखली जाते. टाकाऊ वस्तु पासून टिकाऊची निर्मिती केली जाते.या सर्व उपक्रमामुळे शाळा व शालेय परिसर स्वच्छ ठेवण्यास आम्ही यशस्वी झालो.

3) **लोकसहभागातून विद्यार्थी विकास -**

"एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ"या उक्तीप्रमाणे लोकसहभागातून आम्ही आमच्या प्रशालेतील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील असतो. शाळेतील गरीब मुलांसाठी शैक्षणिक साहित्य, फिल्टर पाण्याची व्यवस्था, अध्ययन अध्यापनासाठी TV संच,संगणक कक्ष उपलब्ध करणे हे आमच्या शाळेसाठी आव्हान होते.

अडचणीवर केलेले उपाययोजना व फलनिष्पत्ती : आमच्या शाळेसाठी खालील संस्था,संघटना व समितींकडून मदत मिळाली आहे.

अ) शालेय व्यवस्थापन समितीकडून शैक्षणिक साहित्य : प्रशालेतील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना दरवर्षी शालेय व्यवस्थापन समितीकडून वह्या पुस्तके व इतर शैक्षणिक साहित्याचे वाटप केले जाते.यासाठी शालेय व्यवस्थापन समितीतील सर्व सदस्य व पालक वर्ग मोठ्या उत्साहाने सहकार्य करतात. विद्यार्थ्यांच्या गरजा ओळखून त्या पूर्ण करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे.काही गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य तर काही विद्यार्थ्यांना शालेय गणवेश देऊन शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला.

**ब) बालाजी अमाईन्स कडून RO फिल्टर प्लांटची सुविधा -**

प्रशालेत विद्यार्थ्यांना पूर्वी महानगरपालिका पाण्याची व्यवस्था पिण्यासाठी होती.आता लोकप्रतिनिधींनी शाळेत बोरची व्यवस्था केली नंतर आरो फिल्टर मशीनसाठी सातत्याने प्रयत्न केल्यानंतर बालाजी अमाईन्स कडून मिळाली. यातून विद्यार्थ्यांना स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध झाली आहे. विद्यार्थ्यांच्या निरोगी आरोग्यासाठी RO फिल्टर पाण्याची आवश्यकता निर्माण झाली. शुद्ध व स्वच्छ पाण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करून RO फिल्टर मशीन बसवण्यात आम्ही यशस्वी झालो.

क) प्रिसिजन फाउंडेशन या संस्थेकडून अभ्यासक्रमसहित डिजिटल टीव्ही संच :

सोलापुरातील प्रसिद्ध प्रिसिजन फाउंडेशनच्या वतीने प्रशालेतील सांस्कृतिक भवनात शैक्षणिक अभ्यासक्रम सहित डिजिटल टीव्ही संच लावण्यात आला. याशिवाय प्रशालेतील बारा वर्ग खोलीत टीव्ही संच लावून सर्व वर्ग डिजिटल करण्यात आले आहे.

ड) स्मृती ऑर्गनायझेशन या संस्थेकडून विद्यार्थ्यांसाठी खेळणी संच उपलब्ध करून दिले.

इ) दिलीपराव माने फाउंडेशनच्या वतीने विद्यार्थ्यांना वह्या वाटप व शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

ई) सेवा सहयोग संस्थेकडून विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी शालेय साहित्य दिला जातो, होतकरू विद्यार्थ्यांना पुस्तके शैक्षणिक साहित्य दिले जाते.

याशिवाय विद्यांजली पोर्टलवर शाळेची नोंदणी करून विविध मागण्या करण्यात आल्या. आमच्या शाळेच्या मागण्यानुसार काही साहित्याची पूर्तताही झालेली आहे विद्यांजली पोर्टलचा फायदाही आमच्या शाळेसाठी झालेला आहे.

4) **किशोरवयीन मुलींचे आरोग्य -**

किशोरवयीन मुला मुलींच्या अनेक समस्या दिसून आल्यामुळे किशोरवयीन मुला-मुलींसाठी विविध उपक्रम प्रशालेत आयोजित केले जातात.

**अ) किशोरवयीन विद्यार्थिनीसाठी मासिक पाळी व्यवस्थापनाबाबत समुपदेशन सत्राचे आयोजन :** किशोरवयीन विद्यार्थिनीसाठी मासिक पाळी व्यवस्थापनाबाबत समुपदेशन सत्राचे आयोजन केले गेले.. बालपण संपवून किशोरावस्थामध्ये प्रवेश करताना शरीरामध्ये विविध बदल होत असतात. किशोरवयीन मुलींमध्ये होणारा महत्त्वाचा बदल म्हणजे मासिक पाळी सुरू होणे. मासिक पाळी सुरू झाला की मुली घाबरतात घराबाहेर पडण्याचे टाळतात. आमच्या प्रशालेच्या परिसरामधील बहुतांश पालक वर्ग हा कामगार वर्ग आहे. अज्ञानामुळे बरेचदा ते आपल्या पाल्यांना योग्य मार्गदर्शन करू शकत नाही. म्हणूनच प्रशालेमध्ये दरवर्षी मासिक पाळी विषयी मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात येते. प्रिसिजन फाउंडेशन व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन यांच्यावतीने किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळी दरम्यान शरीरामध्ये होणारे बदल शारीरिक स्वच्छता याविषयी मार्गदर्शन केले जाते. शिवाय डॉक्टर अँड गॅम्बल या कंपनीमार्फत सौ.ममता मॅडम यांनी सॅनिटरी पॅडचे मोफत वाटप केले आहे. पॅडचा वापर व विल्हेवाट कशी करावी याविषयी माहिती दिली.

**ब) व्याख्यानाचे आयोजन :** प्रशालेतील विद्यार्थिनीसाठी दरवर्षी म.न.पा अंतर्गत वैद्यकीय क्षेत्रातील अधिकाऱ्यांची व खाजगी डॉक्टरांचे व्याख्यान आयोजित केले जाते. यामध्ये मुला-मुलींच्या किशोर वयात होणारे शारीरिक व मानसिक बदल,घ्यावयाची काळजी, सकस आहार, व्यायामाचे महत्त्व अशा विविध विषयांवर या मला मुलींना तज्ञ मार्गदर्शकाकडून मार्गदर्शन केले जाते .

क) आरोग्य तपासणी : प्रशालेत दरवर्षी किशोरवयीन मुलींच्या आरोग्याची तपासणी केली जाते. मुलींचे रक्तातील हिमोग्लोबिन तपासणी केली जाते शिवाय सर्व विद्यार्थ्यांचे आरोग्य तपासणी शिबिर आयोजित केले जाते.

**5) अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर -**

आजचे युग संगणकाचे युग म्हणून ओळखले जाते.अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर ही मोठी समस्या आमच्या शाळेसाठी निर्माण झाली होती. या समस्येवर मात करण्यासाठी शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकांनी केलेले प्रयत्न व त्यातून मिळालेली फलनिष्पत्ती पुढीलप्रमाणे:

**फलनिष्पत्ती -**

**अ) डिजिटल वर्ग व टीव्ही संच:** पूर्वी अध्ययन अध्यापन पाठ्यपुस्तक व शैक्षणिक साहित्याचा वापर करून केला जात होता. एखादा गुंतागुंतीचा घटक विज्ञानातील एखादा घटक प्रभावीपणे मांडताना अडचणी येत होत्या. कधी कधी अध्ययन-अध्यापन एक मार्गी होत असे. प्रभावी अध्यापन व्हावे प्रत्येक घटक विद्यार्थ्यांना कळावे शिक्षणात गोडी निर्माण व्हावी, अध्ययन अध्यापनात जिवंतपणा यावा यासाठी एकूण बारा वर्गात बारा टीव्ही संच, हॉलमध्ये अभ्यासक्रम सहित डिजिटल टिव्ही, संगणक कक्ष, प्रोजेक्टरची व्यवस्था करण्यात आली. अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे अध्ययनाची गोडी निर्माण झाली.प्रत्येक घटक विद्यार्थ्यांना कळू लागले. दृकश्राव्य साधनांमुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ झाली विज्ञानातील प्रयोग, ऐतिहासिक घटना,शैक्षणिक चित्रपट दाखवण्यात आल्यामुळे त्याचा फायदा विद्यार्थ्यांना झाला. शिक्षक घटकाची पी.पी.टी तयार करून त्याद्वारे अध्यापन करू लागले.यातून अध्ययन अध्यापन प्रभावी होऊ लागले विद्यार्थी स्वतःही शैक्षणिक व्हिडिओ, स्वच्छता संदेश देणारे व्हिडिओ निर्मिती करू लागले. शिवाय राज्य शासनाच्या वतीने घेण्यात आलेल्या शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत प्रशालेतील श्री बगले एस.एम., श्री भांजे डी. बी.,सौ उपाध्ये पी.एस. श्रीम.भांदुर्गे वाय.के.या शिक्षकांना तालुका व जिल्हा स्तरावर प्रथम क्रमांक मिळाला. विद्यार्थी दीक्षा ॲपचा वापर करून अध्ययन करू लागले. यामुळे अध्ययन अध्यापन प्रक्रिया सोपी व सुलभ झाली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ झाली असून शिक्षकही अद्ययावत होत आहेत.

**समारोप -**

श्री नवलबाई फुलचंद शहा कोठारी प्रशालेचा यशोगाथा सांगताना आम्हाला खूप अभिमान व आनंद वाटतो. शहरी हद्दवाढ भागामध्ये वसलेल्या आमच्या शाळेत कामगार कष्टकरी वर्गातील मुले शिक्षण घेत आहेत. या मुलांसाठी शाळेच्या वतीने सर्व सुविधा पुरविण्यात आम्ही प्रयत्नशील राहिलो आहोत. विद्यार्थ्यांच्या उज्वल विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न केलेला आहे. आज शाळेत डिजिटल वर्ग खोल्या, आरो फिल्टर पाणी, परसबाग, संगणक कक्ष,भव्य मैदान, सुसज्ज ग्रंथालय, सांस्कृतिक भवन, सुसज्ज प्रयोगशाळा विद्यार्थ्यांसाठी व्यवस्था करण्यात आली आहे. शिवाय शाळेत शासनाचे सर्व उपक्रम, विविध स्पर्धा ,प्रत्येक

दिवस व उत्सव साजरा केला जातो.क्रीडा सप्ताह,वार्षिक स्नेहसंमेलन घेतले जाते. याशिवाय मुख्यमंत्री सुंदर शाळा टप्पा एक व दोन मध्ये आमची शाळा सहभाग नोंदवून URC स्तरावर चांगले गुण मिळवून स्पर्धेत टिकून राहिले आहे. शाळेच्या व विद्यार्थ्यांच्या विकासासाठी मुख्याध्यापकांच्या नेतृत्वाखाली शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सदैव प्रयत्नशील राहतात.यामुळे शाळेच्या व विद्यार्थ्यांच्या विकासाचा आलेख दिवसेंदिवस वाढत आहे.











**VIDEO PHOTOS LINK -**

https://drive.google.com/drive/folders/1SB7bqBAJ1ztIJBemmT-aEiNvdJY8-NZM

----------**----------

# "जीवन कौशल्यातून विद्यार्थी विकास"

**शाळेचे नाव व पत्ता - श्री सिद्धेश्वर प्राथमिक शाळा, सिद्धेश्वर पेठ, सोलापूर.**

**शाळेचा ईमेल आयडी** - siddheshwarprathamik@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - सौ.शिल्पा मल्लिकार्जुन वाले
**मोबाईल क्रमांक** - 8484008115
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - shilpawale77148@gmail.com

**प्रास्ताविक** -

ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर यांच्या पवित्र सानिध्यात शहराच्या मध्यवर्ती भागात असलेली श्री सिद्धेश्वर देवस्थान संचलित एक नामवंत शाळा म्हणजे श्री सिद्धेश्वर प्राथमिक शाळा होय. सर्व विद्यार्थ्यांना सर्वगुण संपन्न बनवण्याचे उद्दिष्ट ठेवून सन १९५९-६० साली शाळेची स्थापना झाली असून आजतागायत सोलापूरच्या नवनिर्माणात योगदान देत यावर्षी शाळेने ६५ वर्षे पूर्ण केली आहेत. आज रोजी शाळेत ५७२ विद्यार्थी ज्ञानार्जन करीत असून मुख्याध्यापिकांसह एकूण १३ शिक्षिका व ०३ शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत आहेत. शैक्षणिक वर्ष २०२३ -२४ जूनपासून शाळा सुंदर ,भव्य व सर्व भौतिक सुविधांनीयुक्त अशा नवीन इमारतीत भरवण्यात येत आहे. तंत्रज्ञान युगातील इंग्रजीचे महत्त्व जाणून सन २००८ - २००९ पासून शाळेत सेमी इंग्रजीचे वर्ग सुरू करण्यात आले आहेत. शाळेतून राष्ट्रप्रेमाचा जागर करत दैनंदिन परिपाठातून विद्यार्थ्यांमध्ये विविध संस्कार व मूल्ये रुजवली जातात.

उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचा व विविध कौशल्यांचा विकास साधला जातो. विद्यार्थी घडविणारा शिक्षक अधिक सक्षम व्हावा यासाठी संस्थेमार्फत शिक्षकांसाठी विविध मान्यवरांचे प्रबोधनपर मार्गदर्शन व कार्यशाळेचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांचे अनुभवविश्व विस्तारण्यासाठी शाळेत विविध शालेय व सहशालेय उपक्रम राबविले जातात. विद्यार्थी क्रीडा, अबॅकस, चित्रकला यासारख्या स्पर्धांमध्ये वेळोवेळी यश संपादन करतात. तसेच बाह्य स्पर्धा परीक्षेत राज्यस्तर, जिल्हास्तर व केंद्रस्तरावर विशेष प्राविण्य मिळतात. श्री सिद्धेश्वर देवस्थान शिक्षण समितीच्या सन्माननीय सदस्यांचे कुशल मार्गदर्शन, शिक्षकांचे अथक परिश्रम व पालकांचे सहकार्य यामुळे श्री सिद्धेश्वर प्राथमिक शाळेचा हा इतिहास हा शिक्षणरथ यशाची शिखरे पादाक्रांत करत अखंड घोडदौड करत आहे. "धरुनी शिक्षणाची कास साधतो गुणवत्ता विकास" हे तत्व अंगीकारून विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आदर्श नागरिकांचे मूर्त स्वरूप देण्यासाठी आमच्या शाळेतील शिक्षक ज्ञानदानाचे श्रेष्ठ कार्य तळमळीने करत आहेत.

शालेय स्तरावरील विविध स्पर्धा परीक्षेतील यश -



## अवंतिका रंगभरण स्पर्धा

**2023-24**



| क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | इयत्ता | प्राविण्य |
|---|---|---|---|
| ०१ | चि. कुंभारीकर लक्ष्मण सोमनाथ | १ अ | सिल्वर जुबली |
| ०२ | चि. कामूर्ती अर्जुन विशाल | २ अ | सिल्वर जुबली |
| ०३ | चि. स्वामी शिवराज गणेश | १ अ | सरोजपदक |
| ०४ | चि भंडारी वंशवर्धन विजयकुमार | २ अ | सुवर्णपदक |
| ०५ | चि. बन्हाणपुरे वैभव किरण | २ ब | सुवर्णपदक |
| ०६ | चि. मुलाणी माहीन जावेदहुसेन | ३ अ | सुवर्णपदक |
| ०७ | चि. आंबटवार तन्मय मधुकर | ३ ब | सुवर्णपदक |
| ०८ | चि. लंगोटे नरेंद्र रामचंद्र | ३ क | सुवर्णपदक |
| ०९ | कु. जाधव फुटाणे अनघा अरविंद | ४ अ | सुवर्णपदक |
| १० | कु. हिंगमिरे ईश्वरी युवराज | ४ ब | सुवर्णपदक |
| ११ | चि .माने यश दिलीप | ४ क | सुवर्णपदक |
| १२ | कु. मांडवे भावना सुनील | २ अ | रजतपदक |

| क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | इयत्ता | प्राविण्य |
|---|---|---|---|
| १३ | कु. थोत्रे कृतिका प्रमोद | २ अ | रजतपदक |
| १४ | कु. माळी स्वरा संजय | ३ ब | रजतपदक |
| १५ | कु. पुकाळे चिरंतना नवनीत | ४ अ | रजतपदक |
| १६ | कु. गुरव आराध्या साईबाबा | ४ ब | रजतपदक |
| १७ | चि. साठे शौर्य विश्वास | ४ ब | रजतपदक |
| १८ | कु. शिंदे प्रियदर्शनी महेश | ४ क | रजतपदक |
| १९ | चि. बगले प्रज्वल नागराज | १ अ | कास्यपपदक |
| २० | कु .जाधव स्वानंदी प्रमोद | २ अ | कास्यपपदक |
| २१ | कु. घाडगे विराक्षी सुहास | ४ अ | कास्यपपदक |
| २२ | चि. बंडगर श्रीनिवास अजित | ४ अ | कास्यपपदक |
| २३ | कु. हंचाटे स्वराली सुनील | ४ ब | कास्यपपदक |
| २४ | चि. जक्कापल्ली नवदीप मोहन | ४ क | कास्यपपदक |

## किल्ले बांधणी स्पर्धा

किल्ले बांधणी स्पर्धेतील
इयत्ता ४ थी सिंहगड वर्गातील
यशस्वी विद्यार्थ्यांसमवेत
मा.मुख्याध्यापिका व वर्गशिक्षिका.



**कला क्षेत्रातील यश**



## बालचित्रपट

**लेट्स चेंज** हा बालचित्रपट
पाहण्यात दंग असलेले विद्यार्थी.

## पाठ्यपुस्तक वितरण

सर्व शिक्षा अभियानांतर्गत मोफत
**पाठ्यपुस्तकांचे शाळेच्या पहिल्याच दिवशी वितरण** करताना प्रमुख अतिथी
मा.डॉ.व्यंकटेश मेतन सर,
शिक्षण समितीचे सदस्य
मा.डॉ.श्री.राजशेखर येळीकर सर





## क्रीडा सप्ताह

**क्रीडा सप्ताह** उद्घाटनप्रसंगी आमच्या बाल खेळाडूंसमवेत प्रमुख अतिथी क्रीडा शिक्षक श्री.नेताजी पवार सर, शाळेच्या मा. मुख्याध्यापिका व विद्यार्थी.
क्रीडा सप्ताह निमित्त आयोजित स्पर्धेतील क्रीडा प्रकारात सहभागी झालेले विद्यार्थी

## किल्ले बांधणी स्पर्धा

**किल्ले बांधणी** स्पर्धेतील
इयत्ता ४ थी सिंहगड वर्गातील
यशस्वी विद्यार्थ्यांसमवेत
मा.मुख्याध्यापिका व वर्गशिक्षिका.



## सदिच्छा भेट



**सद्गुरु वामनराव पै** यांच्या जीवन विद्या मिशनच्या सदस्यांची शाळेला भेट व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

## बचत पेटीचे वाटप



अंगीकृत करूया संस्कार आर्थिक साक्षरतेचे या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या अंगी **आर्थिक बचतीची सवय** जोपासण्यासाठी बचत पेटीचे वाटप

## बाल संसद



**लोकशाही** पद्धतीने वर्ग मंत्रिमंडळाची निवड व त्यानुसार मंत्रिमंडळाचे कामकाज पाहणारे विद्यार्थी

## बाल दिन



बाल दिनाचे औचित्य साधून आयोजित **पुष्प सजावट** स्पर्धेतील विद्यार्थ्यांच्या कलाकृती

## योगा दिन



जागतिक योग दिनानिमित्त **योगाचे प्रात्यक्षिक** करताना विद्यार्थी

## गड्डा यात्रा



गड्डा जत्रेचा **आनंद** लुटताना विद्यार्थी



वैविध्यपूर्ण उपक्रम





**पथनाट्य -**

सामाजिक भावनात्मक शिक्षणासाठीचे प्रयत्न अनाथ आश्रम गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



# एक हात मदतीचा



**पूरग्रस्तांना मदत**

## पर्यावरणपूरक पताके

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून
विद्यार्थ्यांनी बनवलेले पर्यावरण पूरक
कापडी पताके





## हस्तकला प्रदर्शन

विद्यार्थ्यांनी कला, कार्यानुभव
अंतर्गत बनवलेल्या विविध
कलाकृतींचे प्रदर्शन





**समारोप -**

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हाच शिक्षकांचा ध्यास असतो.आमचे विद्यार्थी नेहमीच यशाची शिखरे चढत राहतील याकरिता आम्ही प्रयत्नशील राहूच.अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये उत्तम संस्कारांची मूल्ये रुजवत राहू आणि आपल्या देशाचा एक उत्तम नागरिक घडवण्याचा प्रयत्न करू.

----------**----------

# "वैज्ञानिक दृष्टीकोनाच्या विकासासाठी शाळेचे प्रयत्न"

**शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,वैदवस्ती,केंद्र.देवळाली,ता.करमाळा,जि.सोलापूर**

**शाळेचा ईमेल आयडी** - prafullatasatpute73@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्रीमती प्रफुल्लता बाबासाहेब सातपुते
**मोबाईल क्रमांक** - 7588506882
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - prafullatasatpute73@gmail.com

**केल्याने होत आहे रे.....!!**

जिल्हा परिषद शाळा म्हटलं की रंग उडालेल्या भिंती, मोडकळीस आलेले दरवाजे, गळके छप्पर, चिरा पडलेले फलक, करकर वाजणारे पंखे असे काहीसे चित्र गत काही वर्षांत समाजमनात निर्माण होत होते. जिल्हा परिषद शाळेचे हे चित्र बदलविण्याचा वसा आणि वारसा घेण्याचा मानस अनेकवेळा मनात विचारांची गर्दी करत जातो. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वैद वस्ती केंद्र देवळाली ता. करमाळा या शाळेवर शैक्षणिक वर्ष 2023-24 अंतर्गत दिनांक 11/07/2023 रोजी बदलीने रूजू झाल्यानंतर शाळेच्या प्रवेशव्दारातून शाळेत प्रवेश केला आणि मनात नैराश्याचे मोहोळ उठायला सुरूवात झाली. जिल्हा परिषद शाळांचे सर्वदुर असणाऱ्या चित्रापेक्षाही काहीसे धीरगंभीर चित्र वैद वस्ती शाळेत दिसून येत होते. आता कसे? हा प्रश्न माझ्यासमोर 'आ' वासून उभा होता. बोटावर मोजण्याइतकी अल्पशी मुले "मॅडम आल्या" या उत्साहाने परंतु अनाकलनीय काळजीने माझ्याकडे पाहात होती. मुलांच्या पेहरावाकडे आणि निरागस चेहऱ्याकडे पाहील्यानंतर ही मुले कोणीतरी शाळेत पाठवतय, म्हणून आणि म्हणूनच शाळेत येत असावीत अशी माझी धारणा निर्माण होण्यास हे चित्र अत्यंत बोलके होते. शाळेत उपलब्ध असलेल्या सर्व खोल्यांकडे नजर टाकली असता आपल्याला या शाळेत बरच काही करावे लागणार या आव्हानाची मनात कल्पना लागलीच निर्माण झाली. खरतर आजवर बहुशिक्षकी शाळेवर अधिकाधिक सेवा केल्यानंतर अशा व्दिशिक्षकि आणि अनेक आव्हानांना जन्म देणाऱ्या स्थळी काम करावे लागणार हीच उदासिनता काही केल्या मनातून जात नव्हती. परंतु कर्तव्य हाच आपला धर्म हे ब्रीद वाक्य सेवेत रूजू होतानाच प्रतिज्ञाबध्द झालेल्या माझ्या मनाला वैद वस्तीची अशैक्षणिक स्थिती ही सहज सुंदर काम करण्याची उत्तम संधी असल्याने नक्कीच जाणवत होते. शाळेची एकूण पटसंख्या 42 इतकी असूनही हाताच्या बोटावर मोजण्या इतकी कमी मुले शाळेत उपस्थित होती. सहकारी शिक्षक माझ्या अगोदर साधारणपणे अठवडाभरापूर्वी प्रस्तुत शाळेवर उपस्थित झाले होते. परंतु त्यांची प्रत्यक्ष भेट झाल्यानंतर माझ्या मनात असणारी आव्हाने त्यांच्याही मनात जाणवत असल्याचे दिसून आले.

आणि मनात ठरवलं शिक्षणापासून काहीसे दुर असणाऱ्या वैद वस्ती शाळेला शिक्षण अनुरूप वेद वस्ती बनवायचं.

**विषयासंदर्भात आलेल्या अडचणी -**

**पालकांची शैक्षणिक उदासिनता -**

पोटाची खळगी भरण्यासाठी वर्षातील 365 दिवस सर्वदूर भटकंती करणाऱ्या, शिक्षणापासून कोसो दूर असणाऱ्या भटक्या जमातीचा समावेश असणाऱ्या विद्यार्थ्यांचा अधिकाधिक शाळेत भरणा असल्याने त्यांच्या पालकांत शिक्षणाबद्दल कमालीची उदासिनता ही अपेक्षीत उद्दीष्टे प्राप्तीसाठी मुख्या अडचण होती. पालकांचे समुपदेशन करून पालकांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करावा म्हटलं तर पालकांची प्रत्यक्ष भेट होणे, असंभव दिसून येत होते.

**तुटपंजे शाळा अनुदान -**

शाळेचा सर्वांगिण विकास हे स्वप्न उराशी बाळगून मी शाळेत रूजू झाले, वर्षभरात करावयाच्या कामाची यादीही तयार झाली परंतु ही कामे करण्यासाठी आर्थिक पाठबळ वैद वस्ती मधून कसे मिळणार हा प्रश्न अनुत्तरीत होता. शाळेची सर्व पासबुके तपासली असता अत्यंत तुटपंजी रक्कम बँक खात्यावर शिल्लक होती. तुटपंजे शाळा अनुदान ही आमच्या स्वप्न पुर्ततेत अडसर ठरणार हे पदोपदी जाणवत होते.

**पालकांची आर्थिक कुमकवत स्थिती -**

वैद वस्तीवर राहणारे सर्वच पालक हे उपजिविकेसाठी सातत्यपूर्ण संघर्ष करणारे असल्याने त्यांची आर्थिक स्थिती ही कमालीची खालावलेली होती. पालकांना शिक्षणाबद्दल नक्कीच आस्था, प्रेम, आपुलकी, बांधीलकी याबाबत सजगता नसल्याने शाळा विकासात त्यांचा आर्थिक सहभाग घेणे अशक्यप्राय आव्हान जाणवत होते.

**विद्यार्थ्यांची बोलीभाषा -**

जिल्हा परिषद प्राथ. शाळा वैद वस्ती मधील विद्यार्थ्यांची बोलीभाषा ही त्यांची पिढीजात पारंपारीक भाषा असल्याने या विद्यार्थ्यांना शैक्षणिक बाबींच्या अनुषंगाने अवगत करून त्यांना गुणवत्तेच्या शतप्रतिशत प्रवाहात आणणे ही शाळेच्या गुणवत्तापूर्ण विकासावर प्रभाव टाकणारी अडचण आम्हाला वारंवार जाणवत होती.

**पालक आणि विद्यार्थ्यांची अंधश्रध्दा -**

अमावस्याच्या दिवशी शाळा आणि शाळा परिसरात भूतांचा अधिवास असतो. या अंधश्रध्देने पिडीत पालक आपल्या पाल्यांना अमावस्याच्या दिवशी शाळेत कदापीही पाठवत नसत. आधिच अध्ययन अध्यापन प्रक्रीयेत अनंत अडचणी असताना वैद वस्तीस्थित पालक आणि विदयार्थ्यांची अंधश्रध्दा ही बाब वैद वस्ती शाळेच्या गुणवत्तापूर्ण विकासात अडथळा निर्माण करत होती.

**शाळेचा परिसर -**

ओबड-धोबड मैदान, चिरा पडलेल्या रंग उडालेल्या भिंती, गळके छत, खडबडीत फलक, विद्यार्थ्यांच्या कायम अनुपस्थितीने दिसणारे रिकामे वर्ग अशा अनेकाविध बाबी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या अंतरबाह्य परिसराची गंभीरपणे ओळख करून देत होत्या.

**भौतिक सुविधांचा अभाव -**

करकर वाजणारे पंखे, पाण्याचे वेळोवेळी जाणवणारे दुर्भिक्ष, शौचालयाची दुरावस्था, विद्यार्थ्यांना बसण्यासाठी नसणारी आसन व्यवस्था, संगणक व तत्सम साहीत्यांची कमतरता, क्रीडा सुविधांची अनुपलब्धता इ. बाबी शाळेच्या सहजसुंदर शैक्षणिक वातावरणास अडसर ठरत होत्या.

**स्थानिक स्वराज्य संस्थांचा अल्पसहभाग -**

जिल्हा परिषद प्राथ. शाळा वैद वस्ती शाळेत ग्रामपंचायत, पंचायत समिती या स्थानिक स्वराज्य संस्थेतील स्थानिक पदाधिकारी आणि सदस्य यांची केवळ राष्ट्रीय कार्यक्रमाच्या अनुषंगाने ध्वजारोहणाव्यतीरिक्त इतर वेळी उपस्थिती दुर्मिळ असल्याने शाळेच्या शैक्षणिक विकासाचे नियोजन व प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यात अनंत अडचणी निर्माण होत होत्या.



**आलेल्या अडचणीवर मात करण्यासाठी केलेल्या उपाययोजना व प्रभावी कामासाठी केलेली अंमलबजावणी -**

जिल्हा परिषद् प्राथ.शाळा वैद वस्ती या शाळेला सर्वांगसुंदर रूप देण्याचा मी व माझे सहकारी यांनी मानस केला. अनुषांगिक विषय आम्ही दोघांनी सविस्तर चर्चा केली. आपल्याला या शाळेसाठी काहीतरी कराव लागेल. आमचा सर्व पालक वर्ग दिवसभर मोलमजूरी व भंगार गोळा करण्याचे काम करत आहे त्यांना लोकसहभाग कसा मागावा, हे आमच्या बुध्दीला पटेना. आम्ही सुरूवातीला दि. 15/07/2023 वार शनिवार पालकसभा घेतली, पालकांना शाळेची व्यवस्था,विद्यार्थी गुणवत्ता, शाळेच्या भौतिक सुविधा याबद्दल माहिती दिली. पालकांनाही आम्ही तुम्हाला आमच्या पध्दतीने मदत करू असे आश्वासन दिले.

त्यानंतर मी व माझे सहकारी शिक्षक यांनी स्वत:चे 25000 (पंचवीस हजार रूपये) खर्च करून शाळेला आतून रंग दिला. तेव्हा आम्हाला थोडे प्रसन्न वाटायला लागले. त्यानंतर ग्रामपंचायत देवळालीच्या माध्यमातून शाळेला बाह्यचित्रीकरणासह रंगरंगोटी करून मिळाली. शाळेत पाण्याच्या सुविधेसाठी एक बोअरवेल घेवून दिला. तसेच विद्यार्थ्यांना शुध्द व स्व्च्छ पाणी मिळावे यासाठी कुलिंगचा वॉटर फिल्टर देण्यात आला. वैदू समाज विचार मंचच्या माध्यमातून एक साऊंड सिस्टीम देण्यात आली. तसेच यशकल्याणी सेवाभावी संस्थेकडून एक स्मार्ट टी.व्ही.संच मिळाला, भौतिक गरजा थोड्या प्रमाणात पूर्ण झाल्या.

व्दिशिक्षकी शाळेवर काम करण्याची पहिलीच वेळ व विद्यार्थ्यांची बोलीभाषा तेलगू, पालकांची अनास्था, गैरहजेरीचे प्रमाण, अज्ञान, अंधश्रध्दा या सर्व गोष्टी कशा कमी करता येतील यासाठी प्रयत्न सुरू केले.

एके दिवशी शाळा भरली शाळेत 42 पटापैकी मोजकी दहा मुले शाळेत हजर होती मी मुलांना विचारले आज काही वैदवस्तीतील लग्न् कार्य आहे का? एवढी मुले घरी का राहीली? त्यावर विद्यार्थ्यांनी दिलेल्या उत्तराने मी स्तब्ध झाले. मुले म्हणाली, मॅडम आज अमावस्या आहे, अमावस्येला मुलं शाळेत येत नाहीत, कारण शाळेत भुतं आहेत, मग मी विचारलं, तुम्ही कसे शाळेत आलात. त्या मुलांनी दिलेल्या उत्तराने तर मी हैराण झाले. मुलं म्हणाली, बाकी मुलं शाळेत का आली नाहीत? हे सांगण्यासाठी आम्ही आलो. आम्ही पण घरी जाणार, मी मुलांना गोड बोलून थांबवून घेतलं, मनात अनेक विचाराचं काहूर माजलं, जग एकविसाव्या शतकात आहे आणि हा समाज, विद्यार्थी जगाच्या पाठीवर कुठे आहेत?

दुसऱ्या दिवशी अंधश्रध्दा निर्मूलन समिती करमाळा यांचे वतीने अंधश्रध्दा निर्मूलनपर कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांसह पालकांनाही निमंत्रीत करून कार्यक्रम यशस्वी झाला. त्यामध्ये नारळातून रीबीन काढणे, बिनवातीचा दिवा पाण्याने पेटविणे, भूत गडूमध्ये बांधणे, तोंडामध्ये जळता कापूर टाकणे इत्यादी प्रयोगाचे प्रात्याक्षिक दाखविण्यात आले. मुलांमध्ये भूताची भिती नाहीशी झाली, तेव्हापासून एकही अमावस्येला मुलांनी शाळा बुडवली नाही, हेच या कार्यक्रमाचे फलित झाले.

शाळेच्या संरक्षक भिंतीच्या बाहेर कित्येक काळया बाहुल्या, त्याला सुया, बिबे लावून टाकलेल्या मी विद्यार्थ्यांसमवेत स्वत: जाळल्या कारण मुले म्हणायची मॅडम याला हात लावू नका हे भूत लागल्यानंतर उतारा म्हणून टाकतात. ज्यावेळी मी मुलांना आत्मविश्वास दिला. मला काही झाले का.? मुलांनाही वाटू लागले, हे सर्व खोटे आहे मॅडमला काही झाले नाही.

मुले नियमित शाळेत येवू लागली. अंधश्रध्दा कमी झाली, मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन वाढीस लागावा यासाठी शाळेमध्ये सायन्सवॉलची निर्मिती करण्यात आली. यामध्ये 28 शास्त्रज्ञांचे फोटो भिंतीवर लावण्यात आले. सायन्सवॉलचे बॅनर लावण्यात आला, या शास्त्रज्ञांची जयंती शाळेत साजरी करून त्यांच्या कार्याची माहिती, त्यांचे बालपण, त्यांनी लावलेले शोध हे विद्यार्थ्यांना तोंडी तसेच टेलिव्हीजनच्या माध्यमातून देण्यात आली.

प्रत्यक्ष अध्यापन करताना अनेक अडचणी ऐकू येऊ लागल्या. मुलांची बोलीभाषा तेलगू असल्याने मराठी शब्दांचे अर्थ त्यांना कळत नव्हते. विद्यार्थी शांत बसायचे आम्ही अध्यापन करताना प्रमाणभाषेतील शब्द् व बोलीभाषेतील शब्द् यांचा समन्वय साधून अध्यापन करायला सुरूवात केली. विद्यार्थ्यांना आनंद वाटायला लागला की मॅडम आपली भाषा शिकतायेत. यामध्ये आमच्यातील दरी कमी होऊन हळूहळू अध्ययन ही प्रक्रीया सुलभ होवू लागली. एका वर्षभराच्या कालावधीतच मुले वाचन करू लागली. खरोखर ज्यावेळी पूर्वीच्या शाळेत माझे सहा विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले व मला सोलापूर जिल्हा परिषदेचा शिष्यवृत्ती मार्गदर्शक पुरस्कार मिळाला त्यावेळी जेवढा आनंद झाला होता त्यापेक्षा जास्त् आनंद माझ्या वर्गातील विद्यार्थ्यांना वाचायला येवू लागले याचा झाला.

दैनंदिन अध्यापनाबरोबरच शाळेमध्ये अनेक उपक्रम राबविले. यामध्ये विद्यार्थ्यांची शैक्षणिक क्षेत्रभेट घडवून आणली. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर या ऐतिहासिक स्मारक जन्मस्थान चौंडी या ठिकाणी अहिल्याबाईंचे कार्य, आदर्श राज्यकर्त्या कशा होत्या याची मुलांना माहिती दिली व प्रेरणा मिळाली. तसेच साखर कारखान्यांना क्षेत्रभेट देऊन प्रत्यक्ष साखरेचे उत्पादन कसे केले जाते याचे प्रात्यक्षिक पाहिले. तसेच उस टाकण्यापासून ते साखरेचे पोते तयार होवून ते ट्रकमध्ये कसे भरले जाते याचे प्रात्याक्षिक पाहिले. त्याचबरोबर भौगोलिक परिस्थिती ऊसाला पोषक वातावरण ऊस कोणत्या वातावरणात येतो याची माहिती सांगितली.

तसेच रक्षाबंधन कार्यक्रम घेण्यात आला, यामध्ये प्रत्यक्ष राख्या तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखविले व राख्या तयार करून घेतल्या व त्या सीमेवरील जवानांना पाठविण्यात आल्या. रक्षण करणारा भाऊ असतो आपल्या देशाचे रक्षण करणारे आपले भाऊ जवान यांना राख्या पाठविण्यात आल्या एकमेकांबद्दल, प्रेम, देशप्रेम यामधून माहिती विद्यार्थ्यांना मिळाली.

दैनंदिन अध्यापन सोपे जावे यासाठी गणित विषय खेळातून शिकविला. एकक, दशक, शतक यांची संकल्पना संगीत खुर्चीच्या माध्यमातून शिकविली. वर्गात शैक्षणिक साहित्य् निर्मिती करून दोन्ही वर्ग डिजीटल

केले. वर्गसजावट केली, कार्यानुभव अंतर्गत पणती पेंटींग, आकाश कंदील तयार करणे याची कार्यशाळा घेतली, यातूनच विद्यार्थ्यांमधील सुप्त् गुणांना वाव दिला. तसेच साक्षरता दिंडी काढण्यात आली, मेरी माटी मेरा देश, वृक्षारोपण इत्यादी उपक्रम राबविले, बचत बँक शाळेत उघडली, विद्यार्थ्यांना बचत कशी करावी त्याचे फायदे सांगितले. निपुण भारत अंतर्गत महिला मेळावे घेवून महिलांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांकडे लक्ष द्यावे तसेच स्वत:चे आरोग्य्, बालसंगोपन यासारख्या गोष्टीवर मार्गदर्शन केले. हळदीकुंकवाचा कार्यक्रम घेवून महिलांना मार्गदर्शन केले.शाळेत विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम घेवून विद्यार्थ्यांमधील सुप्त् कलागुणांना वाव देण्याचा प्रयत्न् केला. तसेच बालदिन, जागतिक महिला दिन, शाळापूर्वतयारी मेळावे यांचे ही चांगले असे नियोजन करून कार्यक्रम घेण्यात आले, तसेच वक्तृत्व् स्पर्धा, निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.

विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून शाळेमध्ये सुसज्ज असे ग्रंथालय निर्माण करण्यात आले सुमारे 400 पुस्तके या ग्रंथालयात आहेत. त्यांना ग्रंथालयात नेवून पुस्तके वाचावयास दिली जातात. माझ्या शाळेचा वैयक्तीक उपक्रम अंतर्गत शाळेत अधिकारी, पदाधिकारी, मान्यवर आल्यास त्यांचा सन्मान बुकेऐवजी 'बुक' देवून केला जातो. यामुळे वाचन संस्कृतीचा विकास होण्यास मदत होते.

ऑगस्ट् 2024 मध्ये शिक्षण परिषद आमच्या शाळेत झाली. त्यावेळी केंद्रातील सर्व शिक्षकांना छोट्या गोष्टी, मोठे बोध व संस्कारधन ही गोष्टीची पुस्तके देवून सन्मानित करण्यात आले. अशा प्रकारे दैनंदिन अध्यापनाबरोबर इतर शैक्षणिक उपक्रम महिला मेळावे, हळदीकूंकू कार्यक्रम, साक्षरता दिंडी, शैक्षणिक क्षेत्रभेट, राख्या तयार करणे, शैक्षणिक साहित्य् निर्मिती, परसबाग, निबंध स्पर्धा, कार्यानुभव साहीत्य् निर्मीती, गायन, खेळ, इत्यादी, शैक्षणिक उपक्रम घेवून विद्यार्थ्यांमधील कला गुणांना वाव दिला जातो.

प्रमाणभाषा व बोलीभाषा यांचा समन्वय, साधून अध्यापन केले जाते. गुणवत्ता वाढीसाठी वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. तारखेनुसार पाढा (1 ते 30) म्हणून घेतले जातात. एकंदरीत विद्यार्थी हिताच्या दृष्टीने प्रयत्न करून गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न् केले जातात. मुख्यमंत्री माझी शाळा, स्वच्छ शाळा सुंदर शाळा या उपक्रमांतर्गत शाळेचा अंर्तबाह्य परिसर स्वच्छ व सुंदर बनविला आहे.

## करमाळ्याचे दिग्दर्शक महेंद्र पेठकर यांना आंतरराष्ट्रीय चित्रपट दिग्दर्शक पुरस्कार प्रदान

राष्ट्रप्रथम
सुर्यकांत होनप
करमाळा । प्रतिनिधी

आंतरराष्ट्रीय रिल्स फिल्म फेस्टिव्हल पुरस्कार सोहळा छत्रपती संभाजी नगर येथे संपन्न झाला. या सोहळ्यात करमाळा येथील दिग्दर्शक महेंद्र पेठकर यांना उत्कृष्ट चित्रपट दिग्दर्शक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांनी अनुभव या चित्रपटाचे उत्तम दिग्दर्शक केले होते. आजकाल च्या धावपळीच्या जीवनात आपला छंद जोपासणारे खुप कमी लोक असतात अशाच प्रकारे आपल्या जीवनातील संघर्ष करत नोकरी, संसारतून वेळ काढत महेंद्र पेठकर हे चित्रपट आणि लिखानाचा छंद जोपासतात. त्यांना तब्बल दोन आंतरराष्ट्रीय चित्रपट दिग्दर्शक पुरस्कार मिळाले आहेत.

मूळ करमाळा गावचे महेंद्र हरिचंद्र पेठकर हे नोकरीसाठी कडा येथील अमोलक जैन संस्था मध्ये नोकरी करत आहेत. नोकरी सांभाळून त्यांनी हा छंद जोपासला आहे त्यांनी विविध चित्रपटात दिग्दर्शकाचे काम केले. तसेच ह्रुहसमर्पणह्रुह नावाची कादंबरी त्यांनी लिहिली आहे. आपल्या चित्रपटांतून त्यांनी समाजोपयोगी विविध संदेश दिले. आणि ग्रामीण भागात कलावंतांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी स्टेज उपलब्ध करून देत आहेत. याच अनुषंगाने त्यांना गेल्या वर्षी मुंबई येथे राज्यपाल रमेश जी बैस यांच्या हस्ते पुरस्कार दिले होते. एका वर्षात दोन आंतरराष्ट्रीय चित्रपट दिग्दर्शक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे विविध स्तरांतून कौतुक होत आहे.




ग्रामीण भागातील कलावंतांना स्टेज उपलब्ध करून देणे त्यांना प्रोत्साहन देणे आणि समाजातील व्यसनाच्या आहारी चाललेली तरुण पिढी अशा अनेक विषयांवर आपल्या लिखान व चित्रपटाद्वारे समाज प्रबोधन करण्याचे कार्य या पुढेही करणार आहोत जेवढे योगदान आपल्या माध्यमातून देता येईल तेवढे देण्याचा प्रयत्न मी करणार आहे असे दिग्दर्शक महेंद्र पेठकर यांनी बोलताना सांगितले.

## देवळालीतील वैदुवस्ती शाळेत अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा कार्यक्रम संपन्न

राष्ट्रप्रथम
सुर्यकांत होनप
करमाळा । प्रतिनिधी

करमाळा तालुक्यातील देवळाली वैदुवस्ती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत अंधश्रद्धा निर्मूलन समितीतर्फे विविध प्रयोग व प्रात्यक्षिकांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सुरुवातीला क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अंनिसचे कार्याध्यक्ष अनिल माने यांनी अंधश्रद्धा निर्मूलन ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. बाबेळी त्यांनी गारळातून रिबीन काढणे, बिनबातीचा दिवा पाण्याने पेटवणे, भूत गड्डामध्ये बांधणे, तोंडामध्ये जळता कापूर टाकणे वास्तू इतर अनेक प्रात्यक्षिके करून दाखविली. तसेच समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी परंपरा व विद्यार्थ्यांमध्ये असलेली भूताची भीती नाहीशी करून मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लागेल अशा प्रकारे मार्गदर्शन केले.



बाबेळी वस्तीवरील म हिला व पालक यांची विशेष उपस्थिती होती. बाबेळी सोलापूर जिल्हा अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे सदस्य संजय हंडे, शाळा व्यवस्थापन समि तीच्या सदस्या साधना दाम ोदरे, रंजना बाघमोडे, प्रियंका पडवळे, काजल धोत्रे, निकिता घनवे, पार्वती चव्हाण, श्रावणी सुरवसे आरोग्य सेविका साळवे मॅडम, सर्व शिक्षक, मान्यवर इ. उपस्थित होते. कार्यक्रम तीच्या सदस्या साधना दाम ाचे सूत्रसंचालन उपशिक्षक शांतीलाल खाडे यांनी तर आभार मुख्याध्यापिका प्रफ ुल्ला सातपुते यांनी मानले.



# लोकसहभागातून शाळेत बहुतेक सुविधा उपलब्ध


जि.प.प्राथ. शाळा वैदवस्ती (देवळाली)
ता.करमाळा जि.सोलापूर
स्थापना सन १९९२
शिवनेरी
कार्यालय
रायगड
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वैदवस्ती (देवळाली)
ता. करमाळा, जि. सोलापूर
माझी दिनचर्या


जि.प.प्राथ. शाळा, वैदवस्ती (देवळाली), ता. करमाळा, जि. सोलापूर
SCIENCE WALL


कार्यालय
रायगड
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वैदवस्ती (देवळाली)
ता. करमाळा, जि. सोलापूर
२०२३-२४


साक्षरता प्रचार व प्रसार
होईल साक्षर जनसारा
हाच आमचा महिला नारा
Jul 10, 2024, 12:03


REDMI NOTE 8 PRO
AI QUAD CAMERA


वाचन वृद्धीगत होण्यासाठी
उपक्रम


जि. प. प्राथमिक शाळा वैदवस्ती (देवळाली)
GPS Map Camera
Deolali, Maharashtra, India
Karmala, Deolali, Maharashtra 413203, India
Lat 18.371789°
Long 75.18208°
27/07/24 09:38 AM GMT +
Google
शिक्षण सप्ताह पोषक आहार
GPS Map Camera
Deolali, Maharashtra, India
95FJ+7QG, Deolali, Maharashtra 413203, India
Lat 18.373189°
Long 75.18183°
27/07/24 10:27 AM GMT +05:30
Google
GPS Map Camera
Deolali, Maharashtra, India
95FJ+7QG, Deolali, Maharashtra 413203, India
Lat 18.373203°
Long 75.181937°
27/07/24 10:10 AM GMT +05:30
Google
जि.प.प्राथ.शाळा वैदवस्ती (देवळाली)
दिनांक -27-07-2024


2
1
3


REDMI NOTE 8 PRO
AI QUAD CAMERA



# शिक्षकांच्या पुढाकाराने शाळेचा वर्षभरातच कायापालट

## वैदूवस्ती येथील जि. प. शाळेचे पालटले रूपडे; पालकांसह ग्रामपंचायतीची मदत

**प्रेरणादायी...**

सकाळ वृत्तसेवा

पांडे, ता. १८ : वैदूवस्ती, देवळाली (रा.करमाळा) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षकांच्या पुढाकारातून लोकसहभाग व ग्रामपंचायतीच्या माध्यमातून वर्षभरात कायापालट झाला आहे. योजनेची वाट न पाहता पदरमोड करून शाळेतील भौतिक सुविधांसह शाळा डिजिटल करण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

पालकांच्या मदतीने बोअरवेल घेऊन विद्यार्थ्यांची पिण्याच्या पाण्याची सोय केली. विद्यार्थ्यांची मातृभाषा मराठी नसतानाही त्यांना मातृभाषेकडून प्रमाणभाषेकडे आणण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

वैदूवस्ती येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत गतवर्षी जुलै २०२३ मध्ये मुख्याध्यापिका प्रफुल्लता बाबासाहेब सातपुते व सहशिक्षक शांतिलाल खाडे हे शिक्षकांनी पदभार घेतला. शाळेमध्ये ९५ टक्के विद्यार्थ्यांची मातृभाषा तेलुगु असल्याने त्यांना मातृभाषेकडून प्रमाणभाषेकडे



देवळाली : वैदूवस्ती येथील रंगरंगोटी व सजावट केलेली डिजिटल शाळा

आणण्यासाठी विविध उपक्रम राबवले. यामध्ये मातृभाषेतील शब्द व त्याचा प्रमाण भाषेतील शब्द यांचा शब्द संग्रह तयार केला. शाळेचा परिसर अंतरबाह्य स्वच्छ व सुंदर बनविण्यासाठी दोन्ही शिक्षकांनी स्वतः जवळचे २५ हजार रुपये खर्च करून शाळेच्या वर्ग खोल्यांची रंगरंगोटी केली. वर्गखोल्या डिजिटल केल्या. मोलमजुरी करणाऱ्या पालकांनी वैदू समाज विचार मंचाच्या माध्यमातून परिपाठ व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी साउंड सिस्टिम शाळेत भेट दिली. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून शाळेच्या भिंती चित्रीकरणासह रंगरंगोटी करून दिली. पाण्याच्या व्यवस्थेसाठी एक बोअरवेल घेऊन दिला. तसेच विद्यार्थ्यांना शुद्ध पाणी मिळावे यासाठी कुलिंग वॉटर फिल्टर ही दिला.



"मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमांतर्गत शाळेचा अंतर्बाह्य कायापालट केला आहे. विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी वेगवेगळे उपक्रम राबवून मातृभाषा (तेलुगु) व प्रमाणभाषा यांचा समन्वय साधून त्यांच्यामधील सुप्तगुणांना वाव दिला जातो.

**- प्रफुल्लता सातपुते,** मुख्याध्यापक



"शाळेमध्ये दैनंदिन अध्यापनाबरोबरच वेगवेगळे उपक्रम राबवले जातात. यामध्ये वैज्ञानिक क्षेत्र, साक्षरता, वाचन, ग्रंथालय, निबंध, क्रीडा, वक्तृत्व स्पर्धा, माझी परसबाग या सर्व उपक्रमांचा विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी उपयोग होतो.

**- शांतिलाल खाडे,** शिक्षक

शाळेमध्ये येणारे मान्यवर यांचा सन्मान करताना बुकेऐवजी बुकचा वापर केला जातो. शाळेमध्ये सुसज्ज ग्रंथालय निर्माण केले आहे. सायन्स हॉलची निर्मिती करण्यात आली आहे. शैक्षणिक क्षेत्रभेट, अंधश्रद्धा निर्मूलन कार्यक्रम, महिला, सांस्कृतिक गुणदर्शन कार्यक्रम, स्वच्छता, साक्षरता दिंडी, वाचन, क्रीडा स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, वाचन कट्टा, माझी परसबाग, सुंदर हस्ताक्षर, निबंध स्पर्धा इत्यादी उपक्रम राबविले जातात.

**समारोप -**

जिल्हा परिषद प्राथ. शाळा वैद वस्ती या शाळेचा शैक्षणिक, भौतिक, प्रशासकीय आणि सामाजिक चेहरा मोहरा बदलण्याचे कार्य आम्ही नियोजनबध्द् कार्यकृतीच्या माध्यमातून करत आहोत. खऱ्या अर्थाने करमाळा तालुक्याच्या शैक्षणिक पटलावर कधीकाळी दुर्लक्षित आणि शैक्षणिक दृष्ट्या उपेक्षित असणारे वैद वस्ती शाळा आज करमाळा तालुक्यात स्वच्छ सुंदर व गुणवत्तापूर्ण शाळा म्हणून उदयास आली याचा आम्हा सर्वांना नक्कीच अभिमान आहे. या अनुषंगाने एकच की केल्याने होत आहे रे.....

----------**----------

# “बालविवाह.....एक समस्या .....त्यासाठी समाजजागृती ”

शाळेचे नाव व पत्ता - नेताजी सुभाष चंद्रबोस आवासीय विद्यालय, तोरणमाळ,
ता.धडगाव जि.नंदुरबार

**शाळेचा ईमेल आयडी** - toranmal.mieb@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.दशरथ गुंड्या मोरे
**मोबाईल क्रमांक** - 9405214163
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - mdashrath333@gmail.com




प्रत्येक सुज्ञ नागरिक, जबाबदार व्यक्ती आणि प्रशासकीय कर्मचारी आपल्या सेवाकाळात विविध उपक्रमाची मांडणी करून त्यांची रचना करून आणि त्यांना अमलात आणून समाजामध्ये बदल घडवण्याचा प्रयत्न करत असतात हे बदल समाजाच्या भविष्यासाठी आणि सामाजिक सलोखा टिकवण्यासाठी जितके उपयोगी असतात तितकेच ते मानवी जीवन सुखकर करण्यासाठी उपयुक्त असतात. मी तर म्हणेल की प्रत्येक व्यक्तीने आपल्या जीवनाची एक दिशा ठरवून त्या दिशेने काम करत असताना मला माझ्याकडून या समाजाला काय देणे शक्य होऊ शकते. तसेच या समाजामध्ये कोणत्या बाबींची गरज आहे, समाज कुठल्या गोष्टींमध्ये मागे आहे, समाजाच्या चालीरीती किती योग्य किती अयोग्य याचा सारासार विचार करून त्या समाजाला लाभदायक ठरतील अशा सवयी चढवणे, अशी जीवनशैली अंगीकारणे आणि ती समाजातील मोठ्या घटकांनी नव्हे तर प्रत्येक माणसाने अंगी करावी यासाठी समाजामध्ये वेगवेगळे उपक्रम राबवून जबाबदार व्यक्ती आणि संवेदनशील व्यक्ती या गोष्टी करत असतात. तसं पाहिलं तर प्रत्येक क्षेत्रात अमुलाग्र बदल घडवण्यासाठी वेगवेगळ्या उपक्रमाची मांडणी करून त्यांना प्रत्यक्षात उतरवून त्या क्षेत्रातला जबाबदार व्यक्ती ते क्षेत्र अधिकाधिक सुदृढ करण्याचा प्रयत्न करत असतो. शेतकरी आपल्या शेतामध्ये वेगवेगळे प्रयोग करून वेगवेगळे उपक्रम राबवून उत्पन्नाची वाढ करून सबंध मानव जातीचे पोट भरण्यासाठी प्रयत्न करत असतो. शेकडो -शेकडो वर्षांपूर्वीची शेतीची पद्धत त्यावेळीची लोकसंख्या याचा जर आपण तुलनात्मक अभ्यास केला तर लोकसंख्या कमी असताना देखील आणि सबंध देश शेतीप्रधान असताना देखील उपासमारी ही व्हायचीच,

आता याच देशाची लोकसंख्या भरमसाठ वाढलेली आणि शेतीचे प्रमाण देखील कमी झालेले आहे.परंतु शेकडो वर्षापासून चालत आलेल्या पद्धतीत काहीतरी बदल करून नवनवीन उपक्रम राबवून आजच्या शेतकऱ्यांनी कमी जमिनीत भरपूर उत्पन्न काढून आज जगात अव्वल असणाऱ्या लोकसंख्येच्या देशाला भरपूर अन्नधान्याचा पुरवठा केलेलाच आहे. हे केवळ त्या क्षेत्रात नवनवीन उपक्रम राबवल्यामुळे हे शक्य झालेले आहे. तसेच आपण वस्त्र आणि निवारा या बाबीत सुद्धा नवनवीन उपक्रम राबवून या समाजाची प्रगतीच केलेली आहे. उभ्या आयुष्यात दोन-चार अंग वस्त्र वापरणारे लोक आज दिवसातून दोन-चार अंगावरचे बदलण्यापर्यंतचा जो अमुलाग्र असा बदल झालेला आहे. तेही या क्षेत्रात झालेल्या नव उपक्रमामुळे शक्य झालेले आहे. निवाऱ्याचे बघाल तर कित्येकाच्या डोक्यावर छत नव्हतं, छत होते तर ते कमकुवत होतं भक्कम छताची घरं ही स्वप्नात असल्यासारखी वाटत होती.परंतु यादेखील क्षेत्रात नवनवीन प्रयोग करून नवनवीन उपक्रम राबवून माणसाने आज घरातल्या प्रत्येकासाठी सुंदर भक्कम आणि पर्यावरण पूरक तसेच हवेशीर अशी घर बनवलेलीच आहेत सांगायचा अर्थ असा की मानवी समाजामध्ये जो काही बदल होत आहे वर्षा गणित महिन्या गणित दिवसा गणित या प्रत्येक बदलामध्ये उपक्रमाचा खूप मोठा वाटा आहे आणि उपक्रम राबवणारा चा त्याच्यापेक्षा अगदीच मोठा वाटा म्हणावा लागेल.

अन्न ,वस्त्र, निवारा या गरजा भागवण्यासाठी केलेली प्रगती आपण शिखरावर पोचवली म्हणून समाजाचे सर्व प्रश्न सुटले का? तर नाही, काही प्रश्न अजून शिल्लक आहेत. काही प्रश्न अजून उभे आहेत आणि काही प्रश्न भविष्यातील सगळ्यात मोठी हानी पोहोचवण्यासाठी तयार आहेत. या प्रश्नांकडे जर बारकाईने लक्ष दिलं तर आपल्याला असं कळेल की या समाजातल्या या देशातल्या या जगातल्या प्रत्येक मानवी जातीसाठी अजून करण्यासारखं खूप आहे . नाही तर ते करावंच लागेल अन्यथा माणसाची ही जात नष्ट होण्यास वेळ लागणार नाही. मानव जातीचे प्रश्न सोडवण्याचं आणि सुदृढ मानव जात निर्माण करण्याचं पहिलं कोणतं ठिकाण असेल तर ती शाळा आहे. या शाळेत नुसतं आकडेमोड ,वाचन, लेखन एवढं शिकवण इतका मर्यादित विषय हा नाही आहे. शाळेमध्ये जीवन कसं जगावं भविष्यातील आव्हाने कोणती आहेत आणि त्या आव्हानांना तोंड देण्यासाठी आपण घडवत असलेला नागरिक हा परिपूर्ण आहे का ?हे त्या शाळेने त्या शाळेतील कर्मचाऱ्यांनी लक्षात घेणे गरजेचे आहे. शाळेमध्ये शेतकऱ्याची मुलं येतात,काम करणाऱ्याची मुलं येतात. व्यवसायिकांची मुलं येतात सगळ्या प्रकारच्या समाजातील मुलं आपल्या शाळेमध्ये येत असतात. त्या प्रत्येक मुलाचे प्रश्न वेगळे आहेत आणि त्या प्रत्येक प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी राबवले जाणारे उपक्रम देखील वेगळे आहेत. आज कदाचित त्या मुलांना आपण राबवत असलेले उपक्रम हे कळणार नसतील परंतु भविष्यामध्ये तो जेव्हा भूतकाळात डोकवून बघेल त्यावेळेस माझ्या गुरुजींनी राबवलेला उपक्रम माझ्या जीवनामध्ये कसा उपयोगी आला आहे हे तो नक्की सांगू शकेल अर्थात ते सांगण्यासाठी किंवा ते ऐकण्यासाठी तो शिक्षक नसेल, ती शाळा नसेल, तो समाज नसेल ते अधिकारी नसतील कोणी कोणीच नसेल परंतु समाज हा अविरतपणे घडत जाईल. आणि बालवयात पेरलेले संस्कार उपक्रम मार्फत दिलेले ज्ञान हे त्या बालकाला जो भविष्याचा जबाबदार नागरिक झालेला असेल त्याला समाज घडवण्यासाठी निश्चितच उपयोगी पडेल.शाळेतील शिक्षक श्री शिंदे

यांनी मुख्याध्यापक श्री मोरे यांच्या मार्गदर्शनातून आणि सहकार्याने बालविवाह समस्येला दूर करण्यासाठी केलेले प्रयत्न त्यांच्याच शब्दात दिले आहेत.....

मी रविंद्र शिंदे, प्राथमिक शिक्षक आपल्या प्राथमिक शाळेत आपल्यासमोर बसणाऱ्या सहा ते 14 वयोगटातील मुलांना ज्ञान देण्यासाठी कुठले उपक्रम राबवेल तर तो उपक्रम संख्याज्ञान, अक्षर ओळख, समजपूर्वक वाचन, वैयक्तिक स्वच्छता, सार्वजनिक स्वच्छता, पैसे कमावण्याचे मार्ग खूपच झालं तर त्या पैशांची बचत करण्याचे मार्ग अजून काय काय उपक्रम राबवता येतील आणि राबवलेत.पण हा माझा उपक्रम नसून बालकांसाठी केसस्टडी आहे. हा उपक्रम आहे तो मी सेवा सुरु केल्याच्या अगोदर पासून माझ्या डोक्यात पक्का होता. मी माझ्या बालवयात, मी माझ्या शैक्षणिक जीवनात बालविवाह बद्दल ऐकलं आहे. बघितलं आहे आणि भोगले सुद्धा आहे. भारतात हजारो वर्षापासून बालविवाह ही परंपरा चालत आलेली आहे .त्याच्यासाठी मोठमोठे समाज सुधारक आपल्या जीवनभर कार्य करत राहिले. समाजाला घडवत राहिले.. या गोष्टींपासून टाळत राहिले परंतु तरीदेखील म्हणावा तसा बदल माझ्या बालवयापर्यंत तरी झालेला नव्हता. तसा मी प्रगत जिल्ह्यातला जळगाव माझा जिल्हा माझ्या चाळीसगाव तालुक्यात सुद्धा माझ्या लहानपणी माझ्याच वर्गातले मुले पुढे गेलेली मुलं अभ्यासात चांगली असलेली मुलं विशेषता मुली यांचे कमी वयात लग्न लावून दिल्याने त्या शिक्षणापासून वंचित राहिल्या .त्यांच्या जीवनाची कलाटणी अशी काय झाली की मी अभ्यासात मागे असलेला आज मी शिक्षक झालो. लहानपणी घडलेल्या घटना, समाजामध्ये वावरत असताना दिसलेले बदल याबाबतीत शिक्षक म्हणून सेवेची सुरुवात करताना प्रत्येक कर्मचाऱ्यांच्या मनात ज्या कल्पना येतात त्याच कल्पना माझ्या मनात आल्या आणि त्या कल्पनेमध्ये सगळ्यात उच्च स्थानावर होती ती बालविवाहाची कल्पना या बालविवाह बद्दल मी वाचलेल आहे, ऐकलेला आहे आणि बघितलेले आहे .मला असं वाटलं की समाज आता खूप मोठा पल्ला गाठून पुढे गेलेला आहे .त्याच्यात या रूढी कदाचित आता संपले असतील इतिहास जमा झाले असतील मग याविषयी काम का करायचं किंवा गरज आली तर करू पण गरज येणारच नाही अशी माझी ठाम भूमिका होती.पण नशिबात काही वेगळच वाढून ठेवलं होतं. धडगाव तालुक्यातल्या पाटीलपाडा गोरंबा या शाळेवर मी रुजू झालो नोकरीला लागण्याच्या अगोदर समाजामध्ये खूप मोठे बदल झाले. समाजाने खूप मोठी प्रगती केली आहे. समाजाला आता विकसित होण्यापासून कोणी रोखू शकत नाही. ही ठाम भूमिका असलेला मी त्या गावात रुजू झाल्यावर चक्क बधीर झालो. त्या आदिवासी दुर्गम नव्हे तर अतिदुर्गम गावात समस्या किती असाव्यात. कोणत्या असाव्यात, कशा संदर्भात असाव्यात याची गणना जर करायला गेलं तर माणसाचा डोकं सुन्न होईल. दळणवळणाची साधने नाहीत, विजेचा पुरवठा नाही ,पाण्याची सुविधा नाही, आरोग्याची सुविधा नाही, शेतीसाठी सिंचनाची सुविधा नाही. या सगळ्याच समस्या मीच सोडवू शकतो का? तर नाही. पण सगळ्याच समस्या शाळेत दिल्या जाणाऱ्या शिक्षणामुळे सुटू शकतात याची मला जाणीव झाली. दररोजच्या अध्यापनात अक्षर ओळख स्वच्छता राहणीमान संवाद कौशल्य याबाबतीत मी कमी अधिक प्रमाणात धडे देत होतो. मुलं शिकत होती माझ्यासमोर मोठी होत होती .चौथीला असलेल्या मुलं पाचवीत जात नव्हती आणि मुली तर ज्या काही प्रमाणात अगदी शंभरातल्या दहा माझ्या विद्यार्थिनी असतील त्या देखील लग्नाचे पूर्ण वय न होता माझ्या डोळ्या देखत

विवाहबद्ध झालेल्या मला दिसल्या. मग घरी राहिलेल्या 90% मुलींचं तर जीवन काय असेल ही कल्पना न केलेली बरी, माझ्या पद्धतीने माझे प्रयत्न सुरु झाले. या आदिवासी समाजाच्या अधोगतीचे दुःखाचे आणि मागासलेपणाचे मूळ कारण हे बालविवाह हाच आहे. हे माझ्या लक्षात आलं .आणि मी त्याच गावात राहून त्या पालकांशी संवाद साधून बालविवाह रोखण्यासाठी प्रयत्न करायला लागलो. हजारो वर्षापासून जे मोठमोठ्या समाज सुधारकांकडून शक्य झाले नाही .आपला देश, आपलं राज्य आणि त्यातला आपला एक जिल्हा आणि त्या जिल्ह्यातलं एक अतिदुर्गम गाव याच्यात एक व्यक्ती किती करू शकतो हा जरी प्रश्न असला तरी हजारो समाजसेवकांनी जीवनभर ज्या कार्यासाठी स्वतःला वाहून घेतलं की त्यांच्या पायाच्या नखाइतके देखील आपल्याकडून काम होणार नाही. परंतु याच्यावर काम होणे गरजेचे आहे हे मी ठाम ठरवलं .आणि माझ्याकडं माझ्या सेवाकाळात असो की जीवनभरात असो मी बोटावर मोजण्या एवढे जरी बालविवाह रोखू शकलो तरी ,ते माझ्यासाठी खूप मोठे कार्य ठरेल ही खूणगाठ मी पक्की बांधली आणि कामाला लागलो..

गोरंबा गावात केलेल्या कामाचं मूल्यमापन करायला गेलो तर ते माझ्यापुरतं जरी मोठं असलं तरी बाहेरून निरीक्षण करणाऱ्यांसाठी ते काम अगदी छोटं म्हणावं लागेल. असो परंतु मी माझ्या कामाला समाधानी होतो आणि आहे. कालांतराने शासनाचा निर्णयानुसार माझी गोरंबा शाळेवरून बदली झाली. आंतरराष्ट्रीय शाळा तोरणमाळ आजची सुभाष चंद्र बोस आवासी विद्यालय तोरणमाळ या ठिकाणी मी जोडलो गेलो . माझ्या गोरंब्यापासून पुढे अगदी दूर- दूर नर्मदा काठावर वसलेले मध्य प्रदेश गुजरात महाराष्ट्र याच्या सीमा लगत असलेले छोटे -छोटे पाडे ,विखुरलेले घर आणि रस्ते नसलेले गाव या आंतरराष्ट्रीय शाळेला जोडले गेले. मध्यंतरीच्या काळात माझी बदली चोरणापाडा या गावावर झालेलीच होती .तीही गाव म्हणलं तर सर्व दृष्टीने मागास. या सर्व शाळा एक ठिकाणी आल्यावर आणि त्या शाळेतली मुलं जेव्हा नंदुरबारला आणली गेली. तेव्हा चित्र तर अगदीच भयानक होते.शिक्षण द्यायचं की त्यांना आरोग्याच्या सवयी लावायच्या की नेमकं त्यांचं रडणं थांबवायचं, त्यांना जेवन घालायचं त्यांना नाव घालायचं नेमक नेमकं करायचं काय या सगळ्या वावटाळात पुन्हा मी भरकटायला लागलो. तुलनात्मक अभ्यास केला तर या सर्व पाड्यातून आलेली मुलं त्यात मुलींचे प्रमाण अगदी नगण्य असं म्हटलं तरी चालेल मग या मुली आहेत कुठं मला अगोदर भटकंतीची सवय ,प्रत्येक गाव - गाव कशाचं ते कुठेही गल्ली नाही की जवळ दोन घर नाहीत. कुठेतरी खड्यांसारखे विखुरलेले ते घर त्या प्रत्येक घरामध्ये जाण्याचं मी धाडस केलं होतं आजही करतो. आहे प्रत्येक घरात गेलं ती प्रत्येक घराची समस्या वेगळी असली तरी प्रत्येक घरामध्ये एक समस्या ही होतीच ती म्हणजे मुलींचं काय तर मुलांचं देखील बालपणी लग्न होऊन आंतरराष्ट्रीय शाळेच्या निमित्ताने या परिसरातील सर्व मुलांची सर्व पालकांशी संबंध येत होता. मुलंही कोरी पाटी होती व त्यांच्या मनावर या अगोदर काहीही बिंबवलेलं नव्हतं. मुख्याध्यापक यांच्या सहकार्याने आणि मार्गदर्शनातून  मी किंवा माझे सहकारी जे त्यांच्या मेंदूवर करणार जे त्यांच्या मनावर ठसवणार तेच त्यांच्या जीवनामध्ये होणार होतं. हे सिद्ध होतं मुलं खूप चतूर होती ,हुशार होती, काटक होती क्रीडा क्षेत्रामध्ये शिक्षण क्षेत्रामध्ये चांगल्या प्रकारे नाव गाजवत होती. जिल्हा राज्य नव्हे तर देश पातळीवर मजल मारण्याची कुवत या बालकांमध्ये आहे. मी त्याही दृष्टीने काम करत होतो .परंतु सातवी आठवी मध्ये आले की काही मुलं

ही अशी धूमकेतू सारखी गायब व्हायची नेमकी जायची कुठे तर त्याचा शोध घेण्यासाठी पुन्हा मी माझी पायपीट सुरु करायचो आणि त्या प्रत्येक घरामध्ये जाण्याचा प्रयत्न करायचो. आठवी मधून बाहेर पडलेला मुलगा लग्न होऊन बायकोबरोबर फिरताना दिसतो ?काही वेळेस त्याची बायको त्याच्यापेक्षा पाच वर्षांनी मोठी असते. एखादी माझी विद्यार्थिनी तिच्यापेक्षा मोठ्या मुलाशी लग्न करते तिच्यापेक्षा लहान मुलांची लग्न करते पण सर्व लग्न है बालविवाह होत आहेत. हे मी प्रकर्षाने जाणवतोय उपक्रम हाच सेवेच्या सुरुवातीपासून तोच होता बालविवाह रोखणे .पण तो राबवण्याच्या पद्धती बदलत होत्या आणि योगायोगाने माझ्यासमोर आंतरराष्ट्रीय शाळेच्या निमित्ताने खूप मोठे प्रांगण खूप मोठा पटांगण मिळालं होतं. शाळा निवासी असल्यामुळे वर्ग पाहण्याच काम संपलं की मी माझ्या सर्व विद्यार्थ्यांना प्रांगणात घेऊन बसायचो. म्हणून मी मला जेव्हा वेळ मिळेल मग ते दहा मुलं असं 100 मुलं असो हजार मुलं असत. जेव्हा मुलांनी मुलींनी माझ्यासोबत गराडा घातला तेव्हा मी त्यांना कुठल्या ना कुठल्या पद्धतीने आपलं जीवन जर सुधरवायचं असेल आपला आरोग्य जर टिकवायचं असेल आपला समाज जर पुढे न्यायचा असेल आणि आपली जर सर्वांगीण प्रगती करायची असेल तर आपण लहानपणी लग्न करू नये. लग्न केल्याने एक संसाराची जबाबदारी आली की आपल्यात असलेल्या कौशल्य आपण दाखवू शकत नाही .तुम्ही उद्या उठून दहावी पास होणार चांगल्या मार्काने पास झाले तर मोठ्या चांगल्या कॉलेजमध्ये नंबर लागेल, रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. असे वेगवेगळे चित्र आणि ते स्वप्नांचा चित्रपट मी त्यांना दिवसा- रात्री दाखवत होतो. मी त्यांच्यातच राहत होतो. त्यांच्यातच जेवत होतो. त्यांच्यातच झोपत देखील होतो.अशा वेळेस मला या शाळेच्या निमिताने खूप मोठी संधी मिळाली आणि काही प्रमाणात का असेना ते बाल विवाह रोखण्यासंदर्भात मी प्रयत्न केले ,ज्या मुलांचे सातवी आठवीत लग्न व्हायचे त्यांना मी दहावीपर्यंत तरी टिकून ठेवलं होतं. दहावीचे निरोप समारंभाचे कार्यक्रम असोत, पालकांच्या मीटिंग असोत, पाडा भेटी असोत वेगवेगळ्या अधिकाऱ्यांना आणून त्यांचं मार्गदर्शन असो ,शिक्षण क्षेत्रातले नव्हे तर राजकीय क्षेत्रातले असोत,अशा तज्ञ लोकांना बोलावून मुलांना बालविवाह कसा वाईट आहे ?हे सांगण्याचा प्रयत्न करत आलो. मला खूप आनंद वाटतो की माझ्याच काही विद्यार्थिनी दहावी पास होईपर्यंत त्यांनी लग्न केले नाही .दहावी पास झाल्यानंतर चांगल्या मार्काचे मार्कशीट घेऊन मुली जात होत्या. गेटमधून बाहेर पडताना देखील मी त्यांना विनंती करत होतो. की बाळा पुढे शिक. लग्न करू नको गहिवरून येत होते . बऱ्याचशा लोकांच्या मनात ही भूमिका ठाम झाली आहे की मी माझ्या मुलीला माझ्या मुलाला लग्नाच्या बेडित अडकवणार नाही तर त्याला पुढे शिकवेल. चित्र खूप आश्वासक वाटतंय पण तरी देखील पुढे गेलेल्या मुलांपेक्षा शिकत असलेल्या मुला-मुलींपेक्षा पुन्हा संसाराच्या रहाटगाड्यात कमी वयात अडकलेल्यांची संख्या मोठी आहे.





मुख्यकार्यकारी अधिकारी यांची कार्यशाळा.



धुळे सिटी 06-12-2024

झानल अध्यक्ष पाश्चम रलवार.

**तोरणमाळ परिसरात बालविवाहावर जागृती**

खेडदिगर| तोरणमाळ परिसरात बालविवाहाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी सावनकुमार यांच्या मार्गदर्शनात बालविवाह विरोधी जनजागृती करण्यात आली. बालविवाह रोखण्यासाठी तोरणमाळ शाळेतील उपक्रमशील उपमुख्याध्यापक रवींद्र शिंदे यांनी तोरणमाळ परिसरातील अतिदुर्गम भागातील पाडे, विखुरलेले वस्ती, गावे मिळून २० ठिकाणी जाऊन शालेय विद्यार्थ्यांच्या मदतीने पथनाट्याद्वारे बोलीभाषेतून समाज जागृती केली. बालविवाहामुळे होणारे दुष्परिणाम यावर मार्गदर्शन करण्यात आले.



पुण्य नगरी

**बालविवाहविरोधी जनजागृती**

शहादा: दुर्गम-अतिदुर्गम भागात बालविवाहाचे प्रमाण अधिक असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी सावनकुमार यांचे मार्गदर्शनाने बालविवाह विरोधी जनजागृती करण्यात आली. तोरणमाळ येथील इंटरनेशनल स्कूलच्या विद्यार्थी व शिक्षकांनी रॅली काढून जनजागृती केली.

तोरणमाळ शाळेतील उपक्रमशील उपमुख्याध्यापक रविंद्र शिंदे यांनी तोरणमाळ परिसरातील अतिदुर्गम भागातील पाडे, विखुरलेली वस्ती, गावे मिळून २० ठिकाणी जाऊन शालेय विद्यार्थ्यांच्या मदतीने पथनाट्याद्वारे बोलीभाषेतून समाज जागृती केली. बालविवाहामुळे होणारे दुष्परिणामांचे मार्गदर्शन केले. बालविवाह विरोधी निबंध स्पर्धा, रॅलीद्वारे, पोस्टर इत्यादि करून पाडे, वस्ती, गावे घाटिकाणी जाऊन समाजजागृती केली.सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक दशरथ मोरे, उपमुख्याध्यापक रामलाल पारधी, गंगाराम पावरा, रमेश वळवी, मधुकर वळवी, चंद्रलाल पावरा, विजय पाडवी यांच्यासह शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

Nandurbar Edition
Dec 04, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com



लोकमत



तोरणमाळ येथे बालविवाह विरोधी जनजागृतीपर काढण्यात आलेल्या रॅलीत सहभागी विद्यार्थी व शिक्षक. नरेंद्र गुरव सर प्रकाशा (छाया : नरेंद्र गुरव)

**बालविवाहाविरोधात पथनाट्याद्वारे जनजागृती**

लोकमत न्यूज नेटवर्क

प्रकाशा : तोरणमाळ येथील आश्रमशाळेतर्फे बालविवाह रोखण्यासाठी जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी आश्रमशाळेतील मुख्याध्यापक रवींद्र शिंदे यांनी तोरणमाळ परिसरातील अतिदुर्गम भागातील पाडे व विखुरलेल्या वस्तीगावे जाऊन शालेय विद्यार्थ्यांच्या मदतीने आदिवासी बोलीभाषेतून पथनाट्याद्वारे समाज जागृती केली.

दरम्यान, बालविवाहामुळे होणाऱ्या दुष्परिणामांची माहितीही या वेळी विद्यार्थ्यांनी उपस्थित गाव-पाड्यांतील नागरिकांना दिली. बालविवाहविरोधी निबंध, रेली, पोस्टर प्रदर्शनाच्या माध्यमातून पाडे, वस्ती, गावे या ठिकाणी जाऊन समाज जागृती केली.

कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक दशरथ मोरे, उपमुख्याध्यापक रामलाल पारधी, गंगाराम पावरा, रमेश वळवी, मधुकर वळवी, चंद्रलाल पावरा, विजय पाडवी, यांनी परिश्रम घेतले.

Hello Nandurbar
Page No. 2 Dec 04, 2024
Powered by: erelego.com





**तोरणमाळ परिसरातील सर्व अंगणवाडी सेविका,मदतनीस ,सुपरवायझर यांची कार्यशाळा चे आयोजन करून त्यांनाही या उपक्रमात सहभाग**

**गाव सिंदीदिगर येथे ४ जानेवारी २०२४ रोजी माननीय शिक्षण विस्तार अधिकारी श्री.माळी साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली बालविवाह मुक्त गाव या प्रबोधन कार्यशाळेचे आयोजन सभा पार पडली.**

**सन 2023/24 च्या कालावधीत बालविवाह रोखून शिक्षणाच्या प्रवाहात आणलेल्या बालकांची संख्या गाव व पाड्या निहाय-**

| २०२३/२४ मध्ये पालकांचे प्रबोधन करून बालविवाह बाबत जनजागृती करून शालेय व शिक्षण प्रवाहात टिकवून ठेवलेली बालके. | | |
|---|---|---|
| **अ.क्र** | **बालकांची नावे** | **गाव** |
| 1 | सुबाराम वेलसिंग नाईक | खडकी |
| 2 | जयराम बिया नाईक | खडकी |
| 3 | पारशी विक्रम चौधरी | तोरणमाळ |
| 4 | दिनेश दिलीप नाईक | तोरणमाळ |
| 5 | उमेश कालसिंग पावरा | झापी |
| 6 | इकलेस नसऱ्या पावरा | सावऱ्या |
| 7 | कैलास नवसिंग पावरा | भादल |
| 8 | हिरमल गिरमत्या पावरा | पानमूवडी |
| 9 | उमेश कालसिंग पावरा | तोरणमाळ |
| 10 | दारासिंग तेरसिंग नाईक | तोरणमाळ |
| 11 | भरत दायसिंग चौधरी | तोरणमाळ |
| 12 | उज्वला सुभाष नाईक | तोरणमाळ |
| 13 | अजय अभिमन्यु नाईक | तोरणमाळ |
| 14 | कमला विक्रम चौधरी | तोरणमाळ |
| 15 | महेंद्र दिला चौधरी | तोरणमाळ |
| 16 | देवसिंग दिला चौधरी | तोरणमाळ |
| 17 | अर्चना नागेश्वर पावरा | सिंदी |
| 18 | विकेश दारासिंग चौधरी | तोरणमाळ |
| 19 | रुपेश सत्या चौधरी | तोरणमाळ |
| 20 | नितीन भावसिंग चौधरी | तोरणमाळ |
| 21 | रमिला तेजला पावरा | खडकी |
| 22 | मुन्ना देवजी पावरा | झापी |
| 23 | सावन दयाराम पावरा | झापी |
| 24 | संज्या नागऱ्या नाईक | सिंदी |
| 25 | संगिता मूवद्या पावरा | कुंड्या |
| 26 | कमी सायसिंग चौधरी | तोरणमाळ |
| 27 | पेरणा हन्या वळवी | गोरंबा |
| 28 | चंदन जयसिंग पाडवी | गोरंबा |
| 29 | विशाल राज्या नाईक | खडकी |
| 30 | सावन राज्या नाईक | खडकी |
| 31 | प्रदीप बाळू पावरा | खडकी |
| 32 | रिंकू रेवाज्या पवार | खडकी |

| | | |
|---|---|---|
| 33 | सायमल रमेश वसावे | खडकी |
| 34 | गिरीराम लकद्या पावरा | सिंदी |
| 35 | सनी देवोल मंग्या पावरा | चोरणा |
| 36 | रमू भाषा नाईक | खडकी |
| 37 | रवी सख्या चौधरी | खडकी |
| 38 | सिरला दादला नाईक | छापरी |
| 39 | कुमारी भिमसिंग पावरा | मूरवाणी |
| 40 | रुयदास शिलदार पावरा | कुंड्या |

बालविवाह ही समस्या सोडविण्यासाठी अनेक प्रयत्न केले ,त्यसाठी अनेक उच्च विद्या विभूषित व्यक्तींना शाळेत आमंत्रित करून प्रेरणादायी व्याख्यानांचे आयोजन केले तसेच बोलीभाषेत अनेक ठिकाणी पथनाट्य सादर करून समाज मनात बालविवाह करू नका असा आशय पोचविण्याचे काम शाळेने केले. ज्यामुळे काही अंशी बालविवाह कमी करण्याचे प्रयत्न करता आले .यात मुख्याध्यापक महोदय तसेच शाळेतील सर्व सहकारी यांचे योगदान मिळाले.

----------**----------

# "आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या विकासात शाळेची भूमिका"

**शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद केंद्रशाळा, पाचोराबारी, ता.जि.नंदुरबार**

**शाळेचा ईमेल आयडी** - omkala6043@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.ओमशेखर वैजीनाथ काळा
**मोबाईल क्रमांक** - 9420045915
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - omkala6043@gmail.com

**प्रास्ताविक** -

**"मुश्कील नही है कुछ दुनिया में**
**तु जरा हिम्मत तो कर,**
**ख्वाब बदलेंगे हकीकत में**
**तु जरा कोशिश तो कर" ।**

या युक्तीप्रमाणेच शाळेत आम्ही बदल केला आहे. सन २०१८-१९ मध्ये मी जिल्हा परिषद केंद्रशाळा, पाचोराबारी ता. जि. नंदुरबार या शाळेत रुजू झालो. शाळेच्या गावाचे नाव पाचोराबारी ता. जि. नंदुरबार असे होते. पाचोराबारी हे गांव नंदुरबार तालुक्यातील एक छोटस गांव जवळपास २००० लोकसंख्या असलेलं हे गांव. या गावात जवळजवळ ९० टक्के लोक हे आदिवासी जमातीचे आणि १० टक्के लोक हे बिगर आदिवासी जमातीचे राहतात. गावात जवळपास ७० ते ८० पटांची असलेली जिल्हा परिषद शाळा, शाळेत एकूण एक ते चार वर्ग, मला शाळेत येऊन जवळपास पंधरा दिवस झाले होते. मी संपूर्ण शाळेचा, शालेय परिसराचा, गावाचा, मुलांचा व गावातील लोकांचा अभ्यास केला. या अभ्यासात मला खूप गोष्टी जाणवल्या. त्यापैकी मुलांची उपस्थिती कमी होती, उपस्थितीत अनियमितता होती, पालकांची शाळेविषयी उदासीनता दिसत होती, शालेय परिसर अबोल होता, अध्यापनात व अध्ययनात तंत्रज्ञानाचा अभाव होता. स्वच्छतागृहांची व वर्गखोल्यांची दुरुस्ती आवश्यक होती व इतर अनेक बाबींमध्ये शाळेत कमतरता जाणवली.

हे सर्व पाहून माझ्या आणि माझ्या सोबत माझे सहकारी शिक्षकांच्या मनात चलबिचल सुरु झाली. यानंतर दोन ते तीन दिवसात मी व माझे सहकारी मिळून एक छोटीसी सभा घेण्याच ठरवलं. या सभेत भविष्यात कोणत्या गोष्टी आपल्याला कराव्या लागतील जेणेकरुन शाळेची ही पूर्वस्थिती बदलुन एक आदर्श शाळा तयार होईल. लगेचच शा.व्य.स. सभेमध्ये हा विषय मी व शिक्षकांनी चर्चेला घेतला आणि यांवर सर्व सदस्यांनी परिवर्तन होणे आवश्यक असल्याचे सांगितले. यानंतर आम्ही लगेचच पालकभेटी वाढवल्या, सकाळी लवकर येऊन पालकांच्या भेटी घेणे सुरु ठेवले व संध्याकाळी शाळा सुटल्यानंतरही पालकभेटी घेण्याचे सत्र सुरुच ठेवले. पालक भेटीत आम्ही पालकांचे मनपरिवर्तन करुन त्यांना शिक्षणाचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न करु लागलो व पालकांमध्ये उत्साह निर्माण करुन त्यांना शालेय उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रेरीत करु लागलो.


जवळपास एका महिन्यानंतर आम्हाला यामध्ये बऱ्याच अंशी यश मिळायला सुरुवात झाली. पालकांचा कल हळुहळु शाळेकडे वळत होता आणि स्वतः पालक आपल्या मुलांना शाळेत पोहचवण्यासाठी येत होते हे पाहुन मनाला समाधान वाटले. आता मुलांची उपस्थिती वाढली होती. मग आम्हाला त्या मुलांना शाळेत टिकवायचं होतं. सुरुवातीला आम्ही परिपाठात मुलांचे वाचन, लेखन यात सुधारणा करण्याचे ठरवले. मुलांना आवडेल अशा प्रकारची उदाहरणे देऊन, त्यांना आवडणाऱ्या गोष्टी गप्पा, गाणी अशा स्वरुपात आम्ही अध्ययनाला सुरुवात केली. मुलांची उपस्थिती वाढल्यानंतर शालेय परिसरात त्यांना टिकवून ठेवण्यासाठी जेणेकरुन परिसर त्यांना रम्य वाटेल, ते आनंदाने कसे राहतील तसेच त्यांच्या अध्ययनात दृक-श्राव्य साधनांचा वापर झाला पाहिजे. याच बरोबर शालेय इमारत, वर्गखोल्या ह्या बोलक्या दिसल्या पाहिजेत, मुलांच्या आरोग्यात व पोषणात सुधारणा होऊन त्यांचे आरोग्य हे सुदृढ झाले पाहिजे असे बदल मी व माझे सहकारी यांनी शाळेत करायचे ठरवले. बदल करायचे याचे तरी नियोजन झाले परंतु हे बदल करण्यासाठी आर्थिक मदत शाळेला हवी होती. आर्थिक मदतीबरोबर श्रमदानाची सुद्धा गरज लागणार होती. हे करत असतांना वर्ष २०१९-२० संपुर्ण जगामध्ये कोविड महामारी सुरु झाली आणि यामुळे सर्वात मोठा फटका शाळेला बसला. जवळजवळ दिड ते दोन वर्षे शाळा बंद सुरु अवस्थेत होत्या. या काळात Online व Offline पद्धतीने आम्ही शाळा सुरु ठेवली होती.

कोविड काळानंतर जेव्हा शाळा नियमित सुरु झाल्या आणि पुढे काही दिवस-महिने आम्ही मुलांची उपस्थिती व गुणवत्ता विकासाच्या कामाला लागलो. कोविडमुळे पालक व मुले सुस्त झाली होती. त्यांच्यामधून तो आलेला मरगळपणा काढणे खूप गरजेचे होते. पुढे काही दिवस गावातील दानशूर व्यक्तींच्या शोधात गेली, आणि म्हणतात ना "प्रयत्नांती परमेश्वर". म्हणून प्रयत्न करत राहणं चांगल असत. काही पालकांनी व दानशूर व्यक्तींनी शाळेला आर्थिक मदत करण्याचे सांगितले आणि १५ ऑगस्ट २०२२ मध्ये (पालक सभेत) शाळेत करायचे बदल आणि त्याला अंदाजित खर्च यांवर चर्चा करण्यात आली.

**पूर्वस्थिती**




**नंतरची स्थिती**




**आलेल्या अडचणी -**

1. मुलांची उपस्थिती कमी होती.
2. मुलांची गुणवत्ता कमी जाणवली.
3. पालकांची शाळेविषयी उदासीनता.
4. शालेय इमारतीत बदल करणे आवश्यक होते.
5. वर्ग खोल्यांची दुरुस्ती करणे आवश्यक होते.
6. स्वच्छतागृहाची दुरुस्ती करणे आवश्यक होते.
7. शालेय परिसर अबोल झाला होता.
8. अध्ययन-अध्यापनात तंत्रज्ञानाचा अभाव होता.
9. मुलांच्या आरोग्यात व पोषणात सुधारणा आवश्यक.
10. शालेय परिसर रम्य करणे आवश्यक वाटले.

**करावयाचे बदल -**

1. शालेय इमारत बोलकी करणे (मुलांच्या अध्ययनात शालेय इमारत एक शै.साधन म्हणुन वापरले जावे)
2. शालेय परिसर हिरवा व रम्य करणे.
3. मुलांचे पोषण अधिक दर्जेदार होण्यासाठी सेंद्रीय परसबागेची निर्मिती करणे.
4. कोविड काळातील मुलांच्या अध्ययनात झालेले नुकसान भरुन काढुन त्यांचा अध्ययन विकास साधणे. (दिवाळी सुट्टीतील शाळा)
5. अध्ययनात व अध्यापनात दृकश्राव्य (तंत्रज्ञानाचा) वापर करणे.

**शिक्षकांनी केलेले प्रभावी काम -**

**(बाला) Building as Learning Aid**

विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी शाळा हे खास ठिकाण आहे. विद्यार्थ्यांची शिकण्याची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी आरामदायक वातावरण आणि अनुभव हे महत्वपूर्ण भुमिका बजावतात. शाळेतील भौतिक वातावरण हे विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी लाभदायक ठरते आणि यासाठी आपण (बाला) Building as Learning Aid चा वापर करु शकतो. जसे शाळेतील वर्ग, येण्याजाण्याची जागा, बाह्यपरिसर, भिंती, रंगरंगोटी, दरवाजे, खिडकी यांचा वापर विद्यार्थ्यांना मजेदार पद्धतीने शिकविण्यासाठी करता येतो. शाळेचा भौतिक परिसर हा शिक्षणप्रक्रियेत एक महत्वाचा घटक होऊ शकतो. पण याचा आतापर्यंत कुणीच गंभीरपणे विचार केला नाही. त्यामुळे या संकल्पनेचा उपयोग करण्याचे, विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या प्रक्रियेत Building as Learning Aid चा वापर करण्याचे आम्ही ठरविले.

सुरुवातीला या उपक्रमाची माहिती शाळा व्यवस्थापन समिती सभेमध्ये मुख्याध्यापक ओमशेखर काळा यांनी दिली. विद्यार्थ्यांची दैनंदिनी उपस्थिती व गुणवत्ता तसेच शाळेचे भौतिक विकास साधण्यासाठी हा उपक्रम आपल्या शाळेत राबविणे गरजेचे असल्याचे मुख्याध्यापकांनी सभेला सांगितले. त्यानंतर सभेमध्ये उपक्रमाच्या संपूर्ण खर्चाची चर्चा करण्यात आली व या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी आवश्यक लोकसहभाग मिळवणे यावर चर्चा करण्यात आली. यामध्ये शाळेच्या मुख्याध्यापकांनी गावातील दानशुर व्यक्ती व शाळेविषयी आपुलकी असलेल्या पालकांचा शोध घेण्याचे सभेला सांगितले. या सभेनंतर या उपक्रमाची माहिती पालकांना देण्यात आली. (पालकसभा भरवून) यानंतर जमलेल्या पालकांमधुन श्री प्रविण नरोत्तम पटेल यांनी शाळेसाठी १,००,०००/- रु. देणगी देण्याचे जाहिर केले. त्यानंतर श्री. लिंबा माधव शिंदे (शा.व्य.समिती अध्यक्ष) यांनी ४५०००/- रु. देण्याचे जाहिर केले. अशाप्रकारे पालक सभेमध्ये लोकसहभागातून सुरुवातीला (१५ ऑगस्ट २०२२) एकूण १,४५,०००/- रुपयांचा निधी जमा झाला व पुढील पंधरा दिवसात काम सुरु करण्यात आले.


**प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांचे काठिण्यपातळी समजुन घेणे -**

जिल्हा परिषद केंद्रशाळा पाचोराबारी शाळेत एकूण १ ते ४ वर्ग आहेत. प्रत्येक वर्गातील वर्गशिक्षकांच्या मदतीने जास्तीत-जास्त मुलांचे काठिण्यपातळी समजुन घेवून मुलांच्या पायाभूत संकल्पना साधता येतील त्याचबरोबर प्रत्येक वर्गातील अभ्यासक्रमाचा विचा र करुन प्रत्येक वर्गात रंगकाम करण्याचे ठरविले गेले.

**प्रत्यक्ष अंमलबजावणी** - शाळेच्या इमारतीवर व आवार भिंतीवर कोणत्या प्रकारच्या बोधात्मक डिझाईन्स, बालचित्रे असायला हवी त्यासाठी कच्चा आराखडा तयार करण्यात आला व पुढील २ ते ३ दिवसात प्रत्यक्ष








कामाला सुरुवात करण्यात आली. चारही इयत्तेचा विचार करुन अध्ययनात उपयोगी पडेल अश्या चित्रांचा समावेश शाळेच्या संरक्षण भिंतीवर रंगवण्यात आला. यामध्ये मी कसा दिसतो, रोजची दिनचर्या, दिवस उगवतांनाचे सूर्यचित्र, इंग्रजी व मराठी सुविचार, मराठी आणि इंग्रजी विषयांच्या शब्दांचा समुह तसेच लहान मुलांना आवडणाऱ्या कार्टुन्स, थोर महापुरुषांचे चित्रे, आकाशगंगा, इंग्रजी लिपी, ऋतुचक्र, सातवारांची छोटी रेल्वेगाडी, शब्दांची रेल्वेगाडी, भौमितीक आकृत्या, स्वच्छतागृहावर स्वच्छतेचे प्रतिक, स्वच्छतेचे संदेश, पर्यावरण वाचवा, निसर्गचित्रे, हवेचे प्रदुषण थांबवण्यासाठी संदेश चित्र, तसेच वर्गाच्या बाह्यभिंतीवर कॉलमवर 'वारली' पेंटींग करण्यात आली.प्रत्येक वर्गाची गरज बघुन भाषा, गणित, इंग्रजी व सामाजिकशास्त्रे याविषयांमधील अध्ययन निष्पत्तीचा विचार करुन या गोष्टींची चित्रे

वर्गात रंगवण्यात आले, तसेच वर्गात ज्ञानरचनावादावर आधारित विविधप्रकारचे आरेखन, बेरीज-वजाबाकी, गुणाकार-भागाकार, आकृत्या, पाढ्यांचा सराव, वर्णमाला, शब्दपट्टया, बाराखडी अशा विविध गोष्टींचा समावेश वर्गात करण्यात आला.

शाळेचे चारही वर्ग (अंतरंग व बाह्यरंग) शाळेची आवारभिंत रंगवल्यांनतर शाळेचे उपलब्ध प्रवेशद्वार अबोल होते ही बाब समजुन घेऊन प्रवेशद्वार बोलके आणि आकर्षक करणे महत्वाचे होते. प्रवेशद्वाराच्या रंगकामाचे कच्च्या स्वरुपात नियोजन करुन प्रवेशद्वार रंगवण्याचे काम सुरु करण्यात आले. प्रवेशद्वारावर भव्य स्वरुपात शाळेचे नाव, स्थापना दिवस लिहुन मुलांना आकषर्क दिसेल अश्या स्वरुपात प्रवेशद्वार रंगवण्यात आले.

जवळपास एक ते दिड महिना शालेय इमारतीचे रंगकाम झाल्यांतर शाळेच्या दर्शनी भागावर (सुमारे १००० स्के.फुट) जागेवर ग्रीनपॅड (Green grass) लावण्यात आले व त्याच्या आजुबाजुला विविध प्रकारचे मुलांना आवडणारे रंगीबेरंगी फुलझाडे लावण्यात आली. या कामाला गावातील दानशूर व्यक्ती श्री. विलास शंकर पटेल यांनी ५१०००/- रु. चा निधी शाळेसाठी दिला. सदर निधीतून Green pad व झाडांचे रोपण करण्यात आले.

अशा प्रकारे सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात शाळा इमारत रंगरंगोटी व शाळा परिसर हिरवळीचे बनवण्यात आले.

मुख्याध्यापक श्री. ओमशेखर सरांच्या प्रयत्नाने फिनीश सोसायटी या कंपनीच्या C.S.R. फंडातून शाळेसाठी १६००००/- रु. चे हॅन्डवॉश स्टेशन आणि ८००००/- रु. किंमतीचे Drinking Water Station शाळेला प्राप्त झाले.





**सेंद्रीय परसबागेतून मुलांचे पोषण व शिक्षण -**



लोकमत

**पोषणासाठी मिळतेय कांदा, मुळा भाजी; परसबाग स्पर्धेत पाचोराबारी केंद्राची बाजी**

जिल्ह्यात प्रथम; जिल्हा परिषदेकडून निकाल जाहीर

उपक्रमाचे नाव हे जरा वेगळेच आहे. "सेन्द्रीय परसबागेतून मुलांचे पोषण व शिक्षण" हे ऐकून सर्वांना जरा वेगळेच अनुभूती येते, परंतु यातून मुलांचे अध्ययन नव्हे तर मुलांचे सर्वात महत्वाचे अंग असणारे त्यांचे आरोग्य म्हणजे पोषण हे सुद्धा यातून साधले आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे मुलांची उपस्थिती वाढवणे व ती टिकवणे हे सुद्धा साध्य झाले आहे.

सन २०२२-२३ पासून शाळेत नव्यानेच सेन्द्रीय परसबागेची निर्मीती करण्यात आली आहे. मुलांच्या दररोजच्या नियमित पोषण आहारात परसबागेतील वेगवेगळ्या सेन्द्रीय भाज्यांचा दररोज समावेश केला जातो. जेव्हापासून हे सुरु झालं तेव्हापासुन मुलांच्या प्रतिक्रिया आम्हाला समजुन येतात की, पोषण आहाराची चव पूर्वीपेक्षाही अधिक वाढली आहे. त्याचबरोबर शाळापरिसर सुद्धा पूर्वीपेक्षाही अधिक दिव्य आकर्षक, सुंदर




दिसायला लागला आहे. परसबागेच्या निर्मीतीपासूनचे भाज्या परिपक्वतेपर्यंतच्या सर्व टप्प्यांचा अभ्यास मुलांना आता शाळेतच सहजरित्या उपलब्ध झाला आहे. यांमध्ये झाडांविषयी माहिती, भाज्यांमधील पोषणमूल्य आणि शरीरवाढीसाठी त्यांचा उपयोग या गोष्टी अगदी सहजपणे मुलांना ज्ञात झाल्या आहेत.

**i) जागा उपलब्ध नव्हती -**

मुलांच्या पोषण आहारात सेन्द्रीय भाज्यांचा समावेश करणे या उद्देशाने परसबाग निर्माण करण्याचे ठरवले परंतु शाळेच्या परिसरात जागा उपलब्ध नव्हती. याशिवाय शाळेच्या मागील परिसरात शाळा इमारतीला धोकादायक झाडे होती. शालेय व्यवस्थापन समितीचा ठराव घेवून व गावातील ग्रामपंचायतीची मंजुरी घेऊन झाडे काढुन जागा सपाटीकरण करुन सुपीक मातीची आवश्यकता होती.

**ii) आर्थिक अडचण -**

जागा सपाटीकरण करणे, मोठ-मोठी झाडे (धोकेदायक) काढणे, माती आणणे, कंपोस्ट खत निर्मीती करणे यासाठी आर्थिक मदतीची गरज शाळेला होती. याशिवाय संपुर्ण परसबागेला पाण्याचे व्यवस्थापन करणे या बाबीसाठी सुद्धा आर्थिक मदत आवश्यक होते.

**iii) पालकांचा सुरुवातीला या उपक्रमाला अल्पप्रमाणात प्रतिसाद -**

गावामाध्ये सुरुवातीला पालकांमध्ये शिक्षणाविषयी उदासिनता होती तसेच पालक शाळेच्या कोणत्याच उपक्रमात सहभागी होत नव्हते, जेव्हा हा उपक्रम सुरु करायचा आहे असे पालक सभेमध्ये शाळेचे मुख्याध्यापक श्री. ओमशेखर सरांनी पालकांसोबत संवाद साधला तेव्हा पालकांनी याकडे दूर्लक्ष केले आणि हा काय नविन उपक्रम असे उद्गार काढले.

**iv) परसबागेला पाण्याचे व्यवस्थापन -**

परसबाग निर्माण करणे म्हणजे पाणी हा घटक खूप महत्वाचा होता. शाळेला लागून ग्रामपंचायतीचा जो बोअरवेल होता तेथून पाणी उपलब्ध होणार होते. पाणी साठवणूकिसाठी मोठी टाकी व तिथून संपूर्ण पाईपलाईन करणे आवश्यक होते शिवाय पाणी उपलब्ध झाल्यानंतर लावलेल्या भाज्यांची वाढ चांगल्याप्रकारे होण्यासाठी ठिबकसिंचनाची आवश्यकता होती, या संपूर्ण कामाला आर्थिक बाबींची गरज होती.

**v) कोविडमुळे मुले आणि पालक यामध्ये आलेली मरगळ :-**

कोविड काळानंतर या उपक्रमाने मुलांमध्ये आणि पालकांमध्ये उत्साह वाढवायचा होता. म्हणुन हा उपक्रम राबवणे खूप महत्वाचे होते. शाळेत काहीतरी नवीन बाब होत आहे आणि या बाबीचा आपल्या आरोग्याशी संपर्क आहे असे मुलांना व पालकांना जेव्हा वाटेल तेव्हा निश्चितच ते याकडे आपले लक्ष केंद्रीत करतील असा विश्वास होता.

"सतत प्रयत्न केल्याने वाळुमधुनही तेल निघत असते", "प्रयत्नांती परमेश्वर" या युक्तींचा सार मनामध्ये ठेवून प्रत्यक्ष कामाला सुरवात केली. सुरुवातीला शालेय व्यवस्थापन समितीची सभा घेण्यात आली. जून २०२२ पासून शाळा नियमित सुरु झाल्या या अगोदर जवळ-जवळ दिड-दोन वर्षे कोविड या संसर्गजन्य

रोगांमध्येच गेले. साधारणपणे जुन महिन्याच्या अखेरीस शालेय व्यवस्थापन समितीच्या सभेत सेंद्रीय परसबाग निर्मीतीविषयी सभेला सुचित करण्यात आले. या उपक्रमांचा उद्देश म्हणजे मुलांची उपस्थिती वाढावी. पालकांची उदासीनता कमी व्हावी. कोविडमधली मरगळ दूर होऊन मुलांत व पालकांत नवीन उत्साह निर्माण व्हावा हे समितीला सांगण्यात आले आणि शालेय व्यवस्थापन समितीला ही बाब आवडली आणि याला लगेचच मंजुरी देण्यात आली.

परंतु या उपक्रमाला हवी तेवढी जागा शाळेच्या परिसरात उपलब्ध नव्हती आणि जी जागा होती ती सपाट नव्हती आणि तिथे मोठ-मोठी धोकेदायक झाडे होती. सुरुवातीला धोकेदायक झाडे काढून टाकण्यात आली त्यातून शाळेला ११०००/- रु. प्राप्त झाले. त्यानंतर शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष यांनी जागा सपाटीकरणासाठी आठ ते दहा मजुरांची व्यवस्था करुन दिली. जागेचे सपाटीकरण झाले. त्यानंतर मजुर लावून संपूर्ण जागा उकरुन टाकण्यात आली , हे करत असतांना गावातील पालक श्री. शांताराम वळवी यांनी १००००/- रुपयांची शाळेला मदत केली. परसबागेला सुमारे चार ट्रॉली मातीची आवश्यकता होती. नंदुरबारहून सुपीक गाळाची माती मागवण्यात आली व संपुर्ण परसबागेच्या जागेवर पसरवण्यात आली. परसबागेच्या जागेची तयारी झाल्यावर काही दिवस त्याला उन-पाऊस देण्यात आले आणि परसबागेच्या आरेखनानुसार वाफे तयार करुन त्यामध्ये एकूण १० ते १५ प्रकारच्या देशी वाणांची लागवड करण्यात आली. यानंतर लगेचच पाण्याच्या व्यवस्थापनासाठी २५०० लीटर क्षमतेची पाण्याची टाकी आणून त्याद्वारे संपूर्ण भाज्यांच्या वाफ्यांना ड्रीपलाईन टाकून त्यातून भाज्यांना पाणी उपलब्ध केले. या पद्धतीमुळे दोन गोष्टी साधता आल्या एक म्हणजे पाण्याची बचत आणि दुसरे म्हणजे भाज्यांची वाढ. हवे तितके पाणी मिळाल्यामुळे झाडांची वाढ चांगल्या प्रकारे होऊ लागली. पाण्याच्या व्यवस्थापनानंतर झाडांना / रोपांना खताची गरज होती, पहिल्या वर्षी गावातीलच पालक श्री. संतोष चित्रकथी यांनी स्वतःचा एक ट्रॉलीभर शेणखत शाळेसाठी देऊ केले आणि ते आम्ही सुरुवातीलाच मजुरांच्या मार्फत परसबागेच्या जागेत पसरवले होते.

त्यानंतर सुमारे आठ ते दहा पोती सोनखेड (ता. नवापूर) रहिवासी यांनी स्वतःच्या गांडुळखत प्रोजेक्ट अंतर्गत शाळेसाठी दिले होते. गांडुळखताची फवारणी आम्ही झाडांच्या गरजेनुसार वेळोवेळी केली आणि पुढील काही दिवसातच ग्रामपंचायत, पाचोराबारी मार्फत परसबागेच्या कंपोस्ट खताच्या गरजेसाठी शाळेतच कचरा व्यवस्थापन टाकी बांधून दिली आणि त्यातूनच आता कंपोस्ट खत आम्ही परसबागेसाठी तयार करत असतो. यातून कचऱ्याचे व्यवस्थापनाबरोबर खताची निर्मीतीसुद्धा शाळेतच होत आहे.



सेंद्रीय परसबागेसाठी सेंद्रीय स्प्रेचा वापर आम्ही वेळोवेळी करत असतो यात झाडांवर कोणत्याही प्रकारचा प्रादुर्भाव / रोग पडु नये यासाठी या स्प्रे चा वापर आम्ही करत असतो. यामध्ये गुळ, ताक, अंडे यांचे मिश्रण आणि निमअर्क यांचा वापर करत असतो. सेंद्रीय परसबागेबरोबरच त्याच्या राउंड आकारात विविध प्रकारची औषधी वनस्पतींची सुध्दा लागवड आम्ही केली आहे. जवळजवळ एकूण १६ प्रकारची औषधी वनस्पती यात लावली आहेत. त्याचबरोबर मुलांना आवडणारी रंगीबेरंगी फुले आणि मनमोहक झाडे लावली आहेत. अशा प्रकारे आमच्या शाळेत सुंदर अश्या परसबागेची निर्मीती आम्ही केली असुन याचा वापर मुलांच्या पोषण आहारात नियमितरित्या आम्ही करत असतो.









**दिवाळी सुट्टीत मुलांचे अध्ययन -**

कोविड काळातील झीज भरुन काढण्यासाठी व या काळात प्रत्यक्ष स्वरुपात शाळा बंद-सुरु अवस्थेत होत्या. यामुळे मुलांच्या अध्ययनात खंड पडला होता. तो खंड भरुन निघावा याशिवाय पाचोराबारी गावातील काही कुटुंब रोजगार मिळवण्यासाठी परराज्यात स्थलांतरीत होत असत व त्यांच्याबरोबर मुलांचे देखील स्थलांतर व्हायचे आणि मला हे मुलांचे होणारे स्थलांतर थांबवायचे होते त्यामुळे मी स्वतः दिवाळी सुट्टीत घरी न जाता शाळा सुरु ठेवण्याचा निर्णय घेतला. गावात फिरुन मी अश्या कुटुंबांची भेट घेऊन पालकांना विनंती केली की तुम्ही तुमच्या मुलांना परराज्यात घेऊन जाऊ नका, इथेच घरातील ज्येष्ठ व्यक्तींकडे मुलांना ठेवून जा तेव्हा माझ्या विनंतीला पालकांनीसुद्धा मान दिला आणि मुलांचे स्थलांतर होणे थांबले.



दिवाळी सुटीतही पसरवला शिक्षणाचा प्रकाश!

पाचोराबारी केंद्र शाळेचे मुख्याध्यापक काळा यांचा 'फिटे अज्ञानाचे जाळे' उपक्रम

भूषण रामराजे
लोकमत न्यूज नेटवर्क

नंदुरबार : बहुसंख्य नोकरदारांकडून दिवाळीच्या सुट्या सुरू होण्यापूर्वीच गावी जाण्याचे नियोजन झालेले असते. त्यात शाळांना तर काही काळ जास्तच सुट्या असतात. त्यामुळे शिक्षकांचेही असेच नियोजन असते. परंतु पाचोराबारी (ता. नंदुरबार) येथील केंद्रशाळा आणि तेथील मुख्याधापक ओमशेखर वैजनाथ काळा हे याला अपवाद ठरले आहेत. त्यांनी सुटीतही विद्यार्थ्यांसोबतच राहून शिक्षणाचा प्रकाश पसरवण्याचे आपले काम सुरूच ठेवले होते.

काळा हे मूळचे लातूर जिल्ह्यातील. त्यांचे गाव पाचोराबारीपासून जवळजवळ ५०० किलोमीटर लांब. एवढ्या लांब जाण्यापेक्षा शाळेतील १५ विद्यार्थी- विद्यार्थिनींसोबत शाळेतच थांबून सणासुदीतही शिक्षणाचा प्रकार पसरवणे हीच खरी दिवाळी, या विचारातून त्यांनी शाळेतच थांबणे पसंत केले. २० ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर अशा सुट्या असताना देखील ते शाळेवरच होते. आपल्या या निर्णयाने शाळेतील इतर चार शिक्षकांची अडचण होऊ नये याचीही त्यांनी काळजी घेतली आणि शिक्षित गृहिणी असलेल्या पत्नी सरोजा यांनाही आपल्या ज्ञानदानाच्या व्रतात सोबत घेतले.

पाचोराबारी येथील शाळेत अधिकारी वर्गाने भेट देत विद्यार्थिनींसोबत संवाद साधला.

हे दाम्पत्य दिवाळीत सकाळी आठ ते दुपारी १२ आणि दिवाळीनंतर सकाळी नऊ ते एक असे विद्यार्थ्यांना ज्ञानाचा प्रकाश वाटण्याचे काम करीत होते. दिवाळीतील फराळ अन् फटाक्यांचा आनंदही दिला.

वृक्षारोपण, पर्यावरण माहिती, शैक्षणिक तालिकांची माहिती, तसेच इतर शैक्षणिक कामांवर भर दिला.

या उपक्रमाला गटशिक्षणाधिकारी नीलेश पाटील, विस्तार अधिकारी एस. एन. पाटील, पाचोराबारी केंद्रप्रमुख श्रीराम बागूल यांनी भेट दिली होती. यावेळी सरपंच प्रिया पाडवी, उपसरपंच सुदर्शन राठोड, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष लिंबा शिंदे, माजी उपसरपंच धरमसिंग राठोड उपस्थित होते. या दाम्पत्याचा सरपंच व ग्रामस्थांकडून सत्कार करण्यात आला.

दिवाळी सुट्टीत मदतीला माझी पत्नी श्रीमती सरोजा ओमशेखर काळा (B.A.B.Ed) ही सुद्धा धावून आली. आम्ही दोघे मिळून सुट्टीच्या काळात शाळा सुरु ठेवून मुलांचा अध्ययन विकास साधण्याचा प्रयत्न केला , या दरम्यान आम्ही मुलांचा खंड पडलेला अभ्यास घेतला यांमध्ये गणितीक्रिया (मुलभूत) इंग्रजी शब्द, वाक्य तयार करणे आणि इंग्रजी वाचन / लेखन इत्यादींवर भर दिला. पुढील पंधरा दिवसातच आम्हाला या कामात यश मिळाले आणि मुलांच्या वाचन-लेखनातच खूप बदल जाणवला. सुट्टीतील शाळा सुरु असतांना गावातील पालक श्री. प्रविण पटेल यांनी शाळेला भेट दिली आणि स्वःखर्चातून मुलांना दिवाळीचा फराळ व जेवण देण्यात आला.





सुट्टीतील शाळा सुरु असतांना नंदुरबार तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी श्री. निलेश पाटील विस्तारअधिकारी श्री. एस. एन. पाटील व केंद्रप्रमुख श्री. बागुल यांनी शाळेला भेट दिली व मुलांची गुणवत्ता तपासली. या तपासणीत मुलांनी दिलेल्या उत्तरांवर मान्यवरांचे समाधान झाले आणि खऱ्या अर्थाने सुरु ठेवलेला हा प्रयत्न सफल झाला. मान्यवरांच्या भेटीच्या दिवशीच मुलांना त्यांच्या हस्ते दिवाळीचा फराळ व जेवण देण्यात आले व मुलांच्या चेहऱ्यावर आनंद पाहुन मनाला खूप समाधान वाटले. आमच्या या उपक्रमाची दखल घेऊन गटशिक्षणाधिकारी श्री. निलेश पाटील यांनी आम्हा दोघांचा सत्कार घडवून आणला.

यादरम्यान शाळेपासून ७०० मीटर लांब असलेल्या नवी दिल्ली (पाडा) या पाड्याहून मुलांच्या येण्या-




जाण्यासाठी SMC पाचोराबारी यांच्या वार्षिक १०,०००/- रु. लोकसहभागातून रिक्शा सुरु केली.

गावात एक आदर्श निर्माण व्हावा सर्व पालकांना एकसमान शिक्षणाचे महत्व जाणून यावा यासाठी मी माझ्या मुलाला देखील याच जिल्हा परिषद शाळेत दाखल केले आणि गावातील मुलांबरोबर त्याचेही शिक्षण याच शाळेत सुरु झाले.

त्याच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन शाळेतील सर्व (१००) मुलांना स्कूलबॅगचे वाटप केले, मुलांना आणि केंद्रातील सर्व शिक्षकांना मिष्टांन्न भोजन या दिवशी दिले. (दि. ३ फेब्रुवारी २०२२)

**अध्ययनात व अध्यापनात दृकश्राव्य (तंत्रज्ञानाचा) वापर करणे -**




पालक सभेत आम्ही गावातील पालकांना अध्ययन-अध्यापनाचे महत्व पटवून सांगितले. मुलांना अभ्यासातील काठीण्य पातळी समजून येण्यासाठी व गणितीय संबोध स्पष्ट होण्यासठी त्याचबरोबर जगातील चालु-घडामोडी माहित होण्यासाठी अध्ययनात व अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर करणे महत्वाचे असते असे सभेत सांगितले. पालकांनाही ही गोष्ट समजून आली. प्रत्येकांनी यासाठी वर्गणी देण्याचा निर्धार केला. त्यामध्ये मी स्वतः ५०००/- रु. व इतर शिक्षक यांनी रक्कम जमवून एकूण २०,०००/- रु. निधीतून शाळेसाठी प्रोजेक्टर खरेदी करण्यात आले आणि शाळेत एक डिजीटल वर्ग सुरु करण्यात आला.

याच बरोबर शाळेची गरज ओळखून व आमच्या पाठपुराव्यातून शाळेला एक व्हर्च्युअल टी.व्ही. संच प्राप्त झाला आणि शाळेतील एकूण तीन वर्ग डिजीटल म्हणुन सुरु झाले. आज प्रत्येक वर्गातील मुले स्वतः सर्व डिजीटल साहित्य वापरतात आणि त्यातील माहिती जाणून घेतात व कुठे अडचणी आल्या तिथे आम्ही मुलांना मार्गदर्शन करत असतो.

**दर शनिवारचा वाचन उपक्रम -**

मुलांच्या वाचनात सुधारणा व्हावी यासाठी मी शाळेतील शिक्षकांनी (सहकारी) यांनी दर शनिवारी वाचन उपक्रम घेण्याचा निर्णय घेतला यासाठी लोकसहभागातून शाळेला जवळपास ४०० पुस्तके प्राप्त झाली होती यांचा वापर या दिवशी करण्याचा आम्ही निर्णय घेतला व हा उपक्रम आम्ही सुरु केला. यामध्ये शाळेतील ग्रंथालयाचा वापर, मासिकांचा वापर, वृत्तपत्रांचा वापर व शालेय पाठ्यपुस्तकांचा वापर करुन घेण्याचे आम्ही ठरवले. थोड्याच महिन्यात याचा फायदा शाळेला झाला. या उपक्रमामुळे मुलांचे वाचन विकसित झाले.



व

वरील सर्व उपक्रम सुरु असतांना पाचोराबारी शाळेला DIET नंदुरबार प्राचार्य श्री. जगराम भटकर व सर्व अधिव्याख्याता यांनी भेट दिली. शाळेचे बदललेले हे रुप पाहुन व मुलांची गुणवत्ता तपासून DIET नंदुरबार यांनी आमच्या शाळेचे कौतुक केले .





लोकमत

नंदुरबार तालुक्यातील पाचोराबारी येथील जि.प. शाळेतील डिजिटल वर्गांची पाहणी करताना सुहास नाईक, रघुनाथ गावडे सतीश चौधरी, प्राचार्य जगराम भटकर, डॉ. रमेश चौधरी, डॉ. संदीप मुळे, मायाबाई माळशे आदी.

## पाचोराबारी शाळेत शैक्षणिक उपक्रमांची पाहणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार :** तालुक्यातील पाचोराबारी येथील जिल्हा परिषद केंद्रशाळेत शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जि.प.चे उपाध्यक्ष सुहास नाईक होते. कार्यक्रमास उपस्थित मान्यवरांनी शाळेतील विविध शैक्षणिक उपक्रमांची पाहणी केली.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी रघुनाथ गावडे, प्राथमिक शिक्षणाधिकारी सतीश चौधरी, प्राचार्य जगराम भटकर, अधिव्याख्याता डॉ. रमेश चौधरी, डॉ. संदीप मुळे, पं.स. सभापती मायाबाई माळशे, उपशिक्षणाधिकारी नीलेश पाटील, शिक्षणविस्तार अधिकारी एस.एम. पाटील, जयवंत चौरे, डॉ. सचिन गोसावी, केंद्र प्रमुख बागुल, सरपंच प्रिया कैलास पाडवी, उपसरपंच सुदर्शन मांगीलाल राठोड, माजी सरपंच धरमसिंग भालसिंग प्रधान, लतेश पटेल, लिंबा माधव शिंदे उपस्थित होते.

मान्यवरांच्या उपस्थितीत शाळेतून विद्यार्थ्यांची प्रभातफेरी काढण्यात आली. सजवलेल्या ट्रॅक्टरमध्ये वाजत गाजत विद्यार्थ्यांची मिरवणूक काढण्यात आली. तसेच वृक्षारोपणही करण्यात आले. रघुनाथ गावडे यांनी शाळेच्या भौतिक परिसरासोबतच गुणात्मक बाब ही महत्त्वाची आहे शाळेतील परसबाग सुंदर असून ती विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरणार आहे असे सांगितले. सुहास नाईक, सतीश चौधरी, डॉ. जगराम भटकर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले प्रास्ताविक मुख्याध्यापक ओमशेखर काळा यांनी तर आभार नीलेश पाटील यांनी मानले.

Hello Nandurbar
Page No. 2 Jun 18, 2023
Powered by: erelego.com

**फलनिष्पती -**

या Bala (Building as learning aid) चा फायदा विद्यार्थ्यांच्या अध्ययनात खूप मोठ्या प्रमाणात दिसून आला. शाळा आता आकर्षक दिसत आहे व विद्यार्थ्यांमध्ये शाळेप्रती कुतुहल निर्माण झाले आहे. दररोजच्या परिपाठामध्ये बालाचा उपयोग केला जातो. विद्यार्थी स्वत:हुन रंगरंगोटीची पाहणी करतात आणि अभ्यासतात व विचारलेल्या प्रश्नांची अचूक उत्तरे देतात विद्यार्थ्यांच्या शब्दसंपत्तीत वाढ झाली आहे. प्रत्येक वर्गाचे वर्गशिक्षक वर्गानुसार विद्यार्थ्यांना चित्रे व त्यासंदर्भात माहिती देतात. विद्यार्थी बालाचा वापर करुन दिनचर्या, ब्रह्मांड, ऋतुचक्र, स्वच्छतेचे संदेश याविषयी माहिती सांगतात.

शाळेच्या दर्शनी भागात लावण्यात आलेल्या ग्रीनपॅड व बहुतेक रंगीबेरंगी फुलझाडे यामुळे शाळेचे वातावरण निसर्गरम्य झाले आहे. मुलांना हवेहवेसे वातावरण निर्मीती झाली आहे. यामुळे न येणारी मुलेही शाळेत येऊन इथल्या वातावरणात रममाण होत आहेत.

थोडक्यात सांगायचे झाल्यास BaLA उपक्रमांमुळे शाळेला खूप फायदा झालेला आहे. शाळेची उपस्थिती वाढली आहे व ती टिकून सुद्धा आहे. शाळा खूप आकर्षक दिसत आहे. याचबरोबर मुलांची पायाभूत संकल्पना यांचा विकास होऊन मुलांच्या गुणवत्ता विकास यामुळे झाला आहे. एवढेच नव्हे तर पालकांची शाळेच्या प्रती असलेली उदासीनता नाहीशी होऊन पालकवर्ग आता शाळेच्या प्रत्येक उपक्रमांमध्ये सहभागी होत आहेत. परसबागेच्या निर्मीतीमुळे आम्हाला महत्वाचे दोन फायदे झाले आहेत.

**मुलांचे आरोग्य व पोषण -**

मुलांच्या पोषण आहारात शाळेतच तयार होणारा सेंद्रीय भाजीपाला वापरत असल्यामुळे पूर्वीपेक्षाही आता त्या पोषण आहाराची चव अधिकरित्या वाढून मुले आता आवडीने आणि चवीने पोषण आहार ग्रहण करत असतात. दररोजच्या पोषण आहारात एक-दोन नव्हे तर कमीत-कमी दररोज चार ते पाच प्रकारच्या सेंद्रीय भाज्यांचा समावेश होत असतो, याशिवाय ज्या मुलांना सर्दी, ताप, खोकला असे आजार होतात त्यांना शाळेतील औषधी वनस्पतींपासून तयार होणारा काढा किंवा झाडाचे पान त्यांना देत असतो.

अशा प्रकारे मुलांचे आरोग्य व पोषण परसबागेतून आम्हाला साध्य झाले आहे.

**मुलांचे शिक्षण व उपस्थिती वाढ -**

परसबागेच्या निर्मीतीपासूनच मुलांचे निरीक्षण सुरु होते, बागेच्या निर्मीतीचे टप्पे कोणते आणि कसे असतात याची माहिती मुलांना झाली आहे. एखादे वाण लावल्यानंतर हळुहळु कश्याप्रकारे वाढत आहे व त्याची निगा आणि काळजी आपल्याला कश्याप्रकारे घ्यावयाची असते याचीसुध्दा माहिती मुलांना झाली आहे, याशिवाय बागेसाठी पाण्याचे व्यवस्थापन कसे केले आहे ठिबक सिंचन, तुषार सिंचन, सेंद्रीय पद्धत, सेंद्रीय स्प्रे, भाज्यांची नावे, आपल्या आरोग्यात भाज्यांचे महत्व, यातून कोणकोणती पोषणमुल्ये मिळतात या सर्वांची माहिती मुलांना झाली आहे. शिवाय परसबागेची निगा व स्वच्छता दररोजच्या नियोजनाप्रमाणे शाळेतील मुलेच करत असतात यांमुळे जवळून या सर्व गोष्टींची जाण मुलांना झाली आहे.

एवढेच नव्हे तर शाळेत झालेला हा बदल व हिरवळ यांमुळे मुलांचा व पालकांचा उत्साह अधिकरित्या वाढला आहे. पालकसुद्धा त्यांच्या वेळेनुसार येऊन श्रमदान करत असतात, यामुळे स्वतःहुन पालकच या उपक्रमात सहभागी झाल्यामुळे मुलांची उपस्थिती वाढली आहे व ती टिकली सुद्धा आहे.



मागील सहा वर्षाच्या सततच्या करत असलेल्या शाळेचे भौतिक आणि मुलांच्या सर्वांगीण विकास कामामुळे सन २०२३-२४ या वर्षात जिल्हा परिषद केंद्रशाळा पाचोराबारी शाळेने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा, या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवुन नंदुरबार जिल्ह्यातून प्रथम क्रमांकाने येण्याचा मान मिळविला व शाळेला ११ लाखाचे बक्षिस प्राप्त झाले. शाळेच्या या यशाने आम्हाला खूप आनंद झाला.




तसेच सन २०२३-२४ या साली मला राज्यशासनाकडून मिळणारा महाराष्ट्र राज्य सावित्रीबाई फुले शिक्षक गुणगौरव पुरस्कार प्राप्त झाला. मिळालेल्या या दोन्ही यशामुळे पाचोराबारी गावातील ग्रामस्थ व ग्रामपंचायत कार्यालय यांच्याकडून माझा सपत्निक व माझ्या सर्व सहकारी शिक्षकांचा गावात मिरवणुक काढुन सत्कार केला.



शालेय नेतृत्वातून व लोकसहभागातून झालेला हा बदल परिणामकारक आहे. सेवेत लागल्याच्या काळापासुन शालेय नेतृत्वातील एक प्रमुख घटक मुख्याध्यापक म्हणून जबाबदारीचे पालन करतांना अनेक अडचणी आल्या परंतु प्रत्येक अडचणीवर मात करुन आज आमची शाळा पंचक्रोशीत गुणवत्तेच्या बाबतीत शिखरावर आहे. याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे



लोकमत

# पाचोराबारी शाळेला पुरस्कार शिक्षकांची काढली मिरवणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार** : तालुक्यातील पाचोराबारी येथील जिल्हा परिषद मराठी शाळेला मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमात जिल्हास्तरीय प्रथम पुरस्कार मिळवून दिल्याबद्दल उपक्रमशील शिक्षकांची ग्रामस्थांनी वाजत-गाजत मिरवणूक काढली.

या प्रसंगी सरपंच प्रिया कैलास पाडवी, गटशिक्षणाधिकारी नीलेश पाटील, विस्ताराधिकारी एस. एन. पाटील, एस. एम. पाटील, उपसरपंच सुदर्शन मांगीलाल राठोड, ग्रामसेवक प्रवीण पवार, माजी सरपंच धरमसिंग प्रधान, जालमसिंग वळवी, मांगीलाल राठोड व अल्पेश पटेल, प्रवीण पटेल उपस्थित होते.

ओम शेखर काळा यांनी ग्रामस्थांचे आभार मानत भविष्यात शाळेची प्रगती साधून विद्यार्थी विकास घडवून आणणार, असे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे आयोजन शिक्षिका उज्ज्वला वळवी, प्रियंका पटले व लिंबा शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन डी. एस. सामुद्रे यांनी केले.

## गावाला मिळवून दिला ११ लाखांचा पुरस्कार

- जिल्हा परिषद केंद्र शाळेतील शिक्षक ओमशेखर वैजीनाथ काळा यांना क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले राज्य शिक्षक पुरस्कार प्राप्त झाल्यामुळे गावाचे व शाळेचे नाव राज्यस्तरावर झळकले. तसेच शाळेने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमामध्ये सहभाग नोंदवत जिल्ह्यातून प्रथम येण्याचा मान मिळवत ११ लाखांचे बक्षीस पटकावले.

Hello Nandurbar
Page No. 3 Sep 22, 2024
Powered by: erelego.com



लोकमत



नंदुरबार तालुक्यातील पाचोराबारी येथील जिल्हा परिषद मराठी शाळेचे शिक्षक ओमशेखर काला यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करतांना सरपंच प्रिया पाडवी. सोबत गटशिक्षणाधिकारी नीलेश पाटील, ग्रामसेवक प्रवीण पवार, धरमसिंग प्रधान, जालमसिंग राठोड व ग्रामस्थ. (छाया : सुनील कुलकर्णी)

Hello Nandurbar
Page No. 3 Sep 22, 2024
Powered by: erelego.com



**समारोप -**

अशाप्रकारे मागील पाच ते सहा वर्षाच्या कालावधीत आमच्या शाळेत सर्व उपक्रम राबवून एक आदर्श शाळा बनवण्याचा आम्ही जोरदार प्रयत्न केला आहे व सर्व सहकारी, विद्यार्थी, ग्रामस्थ यांची मोलाची साथ लाभत आहे.

आतापर्यंत शाळेला केंद्र प्रमुख पासुन ते सी. ई. ओ. पर्यंतच्या सर्व अधिकाऱ्यांनी व पदाधिकाऱ्यांनी शाळेला भेट देऊन अधिकचे मार्गदर्शन व कौतुक केले आहे. या यशामध्ये गावातील पालकवर्ग, ग्रामपंचायत कार्यालयामधील सर्व सदस्यवर्ग, सरपंच, उपसरपंच, माजी सरपंच व शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सदस्य यांचे योगदान आहे.

**Video Link -** https://youtube.com/@omshekharkala6194?si=74aeBvq7_qAzK7zZ

----------**----------

# "सहकार तत्त्वातून आदिवासी विद्यार्थ्यांचा विकास"

**शाळेचे नाव व पत्ता - पीएमश्री जि.प.उर्दु केंद्र शाळा क्र.2 अक्कलकुवा, ता.अक्कलकुवा, जि.नंदुरबार**

**शाळेचा ईमेल आयडी** - hmzpurduschool2@gmail.com

**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री मुन्तजीमोददीन रफियोददीन काझी

**मोबाईल क्रमांक** - 9423194125

**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - qazi1967@gmail.com

**प्रास्ताविक -**

PM SHRI जिल्हा परिषद उर्दू केंद्र शाळा नंबर 2 तालुका अक्कलकुवा जिल्हा नंदुरबार या शाळेची स्थापना दिनांक 01/01/1943 रोजी झाली. शाळेत स्थापनेच्या वेळी इयत्ता पहिली ते चौथीचे वर्ग होते जे आज आठवी पर्यंत झालेले आहेत. मी श्री.मुन्तजीमोद्दिन रफ़ीयोद्दिन काझी, पदोन्नतीने मुख्याध्यापक पदावर या शाळेत 01/06/2013 रोजी रुजू झालो. त्यावेळी शाळेची इमारत व शालेय परिसर यांची स्थिती फारशी चांगली नव्हती. एकाच प्रांगणात तीन शाळा आहेत; पैकी आमच्या शाळेची स्थिती इतर दोन शाळा इमारतींच्या तुलनेत फारशी चांगली दिसायची नाही. शाळेच्या मागील जागेत गावकरी घाण करत. मुतारी म्हणून त्या जागेचा उपयोग करत. शाळा हमरस्त्यावर असल्याने व शाळेच्या इमारतीस कुंपण आवारातून सतत ये जा करत असत. तहसील कार्यालयात आपल्या कामांसाठी येणारे लोक शाळेच्या व्हरांड्यांवर गर्दी करून बसत असत. शाळेला अध्ययन अनुकूल असे वातावरण अजिबात नव्हते. वेड्या लोकांनी शाळेच्या मागील परिसरात वस्ती केलेली होती. गल्ली मोहल्ल्यातील मुले सुट्टीच्या कालावधीत खेळण्याच्या निमित्ताने येऊन शाळेचे खूप नुकसान करत असत. शाळेचे प्रांगण मोठे असल्याने सार्वजनिक कार्यक्रम, समारंभासाठी त्याचा वापर गावकरी करत असत.



250 पेक्षा अधिक पट असणाऱ्या व आठवीपर्यंत वर्ग असणाऱ्या शाळेस पुरेशा आणि योग्य अशा भौतिक सुविधा नव्हत्या परिणामी पालकांचा व स्वतः विद्यार्थ्यांचा कल खाजगी शाळांमध्ये प्रवेश घेण्याकडे वाढत चाललेला होता. शालेय आवारास शाळा व्यवस्थापन समिती व शिक्षक, पालक यांच्या मदतीने अनेक वेळा काटेरी कुंपण केले; परंतु त्याचा फारसा उपयोग होऊ शकला नाही.त्यातच कोरोना महामारीचे संकट आले.शाळेच्या नियमिततेत पूर्णतःखंड पडला;परंतु माझ्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या शिकण्यात खंड पडू दिला नाही. प्रत्येक शिक्षकाने आपल्या घरी आपला वर्ग सुरू ठेवला व विद्यार्थ्यांची अध्ययनक्षती न होऊ देण्यात कठीण काळात मोलाचे योगदान दिले.पालकांनी सर्व सुरक्षिततेचे नियम पाळत मुलांच्या शिकण्यात सहकार्य केले.

अक्कलकुवा हे तालुक्याचे गाव जरी असले तरी येथील सोयीसुविधा, राहणीमान हे ग्रामीण भागासारखेच आहे. अनेक पालकांच्या विचारात शिक्षण ही फार महत्त्वाची बाब नाही. काही चुकीच्या विचारांचे पगडे काही पालकांच्या विचारात घट्ट रुतून बसल्याने त्यांना मुलांच्या शिकण्यात सहभागी करून घेताना संघर्ष करावा लागला.

या सर्व गोष्टींवर मात करण्यासाठी माझ्या शाळेतील प्रत्येक घटकाने शाळेत योग्य ते बदल करून मुलांना दर्जेदार शिकण्याचे वातावरण देण्याचा निश्चय केला व विविध शालेय आणि सहशालेय उपक्रमांच्या माध्यमातून आज शाळा प्रत्येक विद्यार्थ्यास शिकते करून गुणवत्तेच्या दिशेने वेगाने वाटचाल करीत आहे.

**आलेल्या अडचणी-**

मुख्याध्यापक म्हणून शाळेत योग्य त्या बदलांना सुरुवात करण्याचा विचार केला तेव्हा अजून अडचणी आल्या.

**त्यात प्रमुख अडचणी होत्या -**

1. भौतिक सुविधांसाठी आर्थिक बाबीची तरतूद नसणे.
2. पालकांचा पुरेसा सहभाग नसणे.
3. अध्ययनास अनुकूल वातावरण नसणे.
4. शैक्षणिक साहित्याची योग्य मांडणी व वापर नसल्याने त्याचा मुलांच्या शिकण्यात प्रभावी उपयोग नसणे.
5. ५)अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा समावेश नसणे.
6. शिक्षक सक्षमीकरणासाठी योग्य त्या उपक्रमांची कमतरता असणे.

**शिक्षकांना आलेल्या अडचणी-**

1. वर्ग खोल्या अतिशय दुरावस्थेत असल्याने शैक्षणिक साहित्य मांडणी करता न येणे.
2. भिंतींचा शिकण्यासाठी वापर न करता येणे.
3. आवार उंचसखल असल्याने मुलांना खेळण्यासाठी त्याचा वापर न करता येणे.
4. तंत्रज्ञानाची साधने उपलब्ध नसल्याने कमतरता येणे.
5. मुलांचे अनुपस्थितीचे प्रमाण जास्त असणे.

**विषयासंदर्भात मुख्याध्यापक व शिक्षकांनी करावयाच्या कामांचे नियोजन करण्यात आले -**

1. वर्गखोल्यांची दुरुस्ती करणे.
2. रंगरंगोटी करून वर्ग खोल्या अध्ययनानुकूल करणे.
3. आवारभिंत, स्वच्छतागृह बांधणे व या कामांसाठी सीएसआर मिळविणे.
4. शाळेच्या आवारात वृक्षारोपण करणे.
5. वर्गनिहाय पालक सभा घेणे.
6. प्रत्येक विद्यार्थ्याची अध्ययन स्तर निश्चिती करून मूलनिहाय नियोजनाने प्रत्येक मूल शिकते करणे.
7. परसबाग निर्मिती करून मुलांना पोषक तत्वांसह पोषण आहार देणे.
8. शैक्षणिक साहित्याच्या मांडणीसाठी सुविधा उपलब्ध करणे.
9. शिक्षक सक्षमीकरणासाठी ऑनलाईन आणि ऑफलाइन कार्यशाळांना शिक्षकांना पाठविणे.
10. तंत्रज्ञानाच्या बाबी शिकून घेऊन त्याचा अध्ययनात वापर करण्यासाठी शिक्षकांना सक्षम करणे.
11. आवार समतोल करणे.खेळांची मैदाने आखून खेळ साहित्य उपलब्ध करणे.
12. पालक संपर्क वाढविणे.
13. सर्व विषयांच्या प्रयोगशाळा उपलब्ध करणे.
14. अद्ययावत वाचनालय उपलब्ध करून देणे.
15. विद्यार्थ्यांना व्यवसाय शिक्षणाच्या पायाभूत संधी उपलब्धब्ध करून देणे.
16. विविध स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना सहभागी होण्यास प्रवृत्त करणे.

**मुख्याध्यापक व शिक्षकांनी केलेले प्रभावी काम -**

शाळेच्या विकासात अडचण ठरणाऱ्या समस्यांवर मात करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे प्रभावी सहकार्य घेऊन आणि सक्रिय सहभाग घेऊन कामाला सुरुवात केली. सर्वप्रथम केंद्रप्रमुख आणि आम्ही सर्व शिक्षक यांनी मिळून आर्थिक सहभाग दिला व शाळेच्या मागील बाजूस जाळीचे तारेचे कुंपण करून तो भाग संरक्षित केला. प्रशासनाकडून मोठ्या दुरुस्तीसाठी मिळालेल्या निधीचा अत्यंत पद्धतशीर वापर करून इमारतीच्या एका भागाच्या वर्गखोल्यांचा पत्रा बदलला शाळेच्या आवारात खुल्या असलेल्या वाटा सातत्याने बुजत राहीलो. शाळेच्या आवारात असलेले पर्यावरण पूरक वडाच्या झाडाच्या काही फांद्या जीर्ण झालेल्या असल्याने वनखात्याची परवानगी घेऊन त्या फांद्या छाटून झाडास योग्य आकार दिला आणि वृक्षारोपण करण्यास सुरुवात केली.

मात्र ही झाडे वाढवण्यात आम्ही फारसे यशस्वी होऊ शकत नव्हतो यासाठी प्रशासनाकडे आम्ही कुंपणाची वारंवार मागणी करत राहिलो आणि आमच्या शाळेला प्री-कास्ट कुंपण मंजूर झाले प्री-कास्ट कुंपण तयार झाल्यानंतर पुन्हा शाळा ग्रीन शाळा बनवण्यासाठी आमच्या मुलांची आणि शिक्षकांची इको क्लबच्या माध्यमातून वृक्षसंवर्धनाला मदत होऊ लागली. शाळेचा इको क्लब अतिशय सक्रिय असून पुर्वी उजाड असलेल्या शाळेच्या आवारात आज चांगली हिरवळ झालेली आहे.








**अध्ययन अनुकूल वातावरण तयार करणे -**

शाळेच्या सर्व वर्ग खोल्या भकास स्वरूपात होत्या.भिंतींना रंगांचे पापुद्रे आलेले होते. या सर्व भिंती मुलांच्या शिकण्यास उपयोगी पडतील अशा पद्धतीच्या व्हाव्यात म्हणून आम्ही कामाला सुरुवात केली आणि त्याचवेळी आम्हाला आमच्या शाळेची निवड पीएमश्री शाळेसाठी झाली असल्याचे समजले. पीएमश्री योजनेचे अनुदान हे आमच्यासाठी वरदान ठरले आणि आम्ही अतिशय नियोजनबद्धरित्या जोमाने कामाला

पुन्हा सुरुवात केली. वर्गवातावरण तयार करण्यासाठी वर्गांच्या भिंतींना प्लास्टर करून बर्जर रंगाचा वापर करून सुंदर रूप दिले आणि BaLA पद्धतीने (Building As Learning Aid) प्रत्येक वर्ग आणि सर्व इमारतींचे व्हरांडे मुलांच्या शिकण्यास मदत करतील असे बनवले.




फरशीवरील रंग काम केले जेणेकरून मुले फरशीचा वापर देखील शिकण्यासाठी करतील.

शाळेच्या आवाराचा देखील मुलांच्या शिकण्यासाठी वापर व्हावा म्हणून अतिशय चोखंदळ विचार करून औषधी वनस्पतीची लागवड, मुलांनी तयार केलेली नर्सरी त्यात त्यांनी करावयाची रोपांची विक्री, त्या व्यवहारातून दैनंदिन जीवनात गणितातून शिकलेल्या संकल्पनांचा प्रत्यक्ष वापर या सर्व बाबी प्रभावी ठरू लागल्या. मुले धाडसाने सादरीकरण करू लागली. वर्ग वातावरणाचा मुलांच्या शिकण्यात फार सहज आणि उपयुक्त असा वापर होऊ लागला. मुले कृती करण्यात रस घेऊ लागली आणि मग्न होऊ लागली.





वर्ग वातावरणात साहित्य मांडणी करणे हा कळीचा मुद्दा होता. माझ्या काही शिक्षकांनी यापूर्वीच स्वखर्चाने रॅक खरेदी केले होते व साहित्य मांडणी केलेली होती. त्याच धर्तीवर प्रत्येक वर्गात रॅकवर व्यवस्थितरीत्या बॉक्समध्ये साहित्य ठेवून त्या बॉक्सेसवर साहित्यांची नावे लिहून व्यवस्थित मांडणी करण्यात आली. याचा फायदा असा झाला की साहित्य वापरायोग्य झाले.मुले स्वतः आपणास गरज असलेले साहित्य वापरू लागले.शिक्षक साहित्याचा वापर करून अध्ययन अध्यापन प्रक्रिया अधिक प्रभावी करण्यासाठी काम करू लागले.



मुलांनी केलेल्या कामाचे योग्य पद्धतीने प्रदर्शन व्हावे म्हणून प्रत्येक वर्गात फ्लॅनेल बोर्ड वापरात आहेत.मुलांचे विशेष काम यावर प्रदर्शित केले जाते व एक आठवड्यानंतर ज्याच्या त्याच्या पोर्टफोलीओत ते साठवले जाते. अशा पद्धतीने वर्ग वातावरण तयार केल्यामुळे मुलांचे शिकणे समृद्ध होऊ लागले.

**पालकांचा सहभाग मिळवणे -**

मुलांना शाळेत सोडायला येणे, घ्यायला येणे या बाबी आमचे पालक नित्याने करतात. कारण आमची शाळा हमरस्त्यावर आहे आणि गावाचा विस्तार मोठा आहे. त्यांचे सातत्याने शाळेत येणे जाणे असल्याने त्यांना शाळेचे बदललेले रूप जाणवू लागले. ते स्वतःहून आम्हा सर्वांशी बोलू लागले.संवाद वाढत गेला आणि आम्ही वर्गनिहाय पालक सभांचे नियोजन केले.

वर्गनिहाय पालक सभा घेतल्याने प्रत्येक पालक सभेत येतात किंवा नाही याची खात्री करता येते.आम्ही प्रत्येक पालकास सभेस येण्याचा आग्रह केला आणि त्यांच्या मुलांचे शिकणे, शिकण्याच्या पद्धती हे सर्व त्यांच्यासमोर मांडू लागलो. पालकांना मुले चांगली शिकत आहेत किंवा काही कमतरता राहत आहेत हे प्रत्यक्ष दिसत असल्याने त्यांचा मुलांच्या शिकण्यात रस वाढू लागला; आणि आम्हाला जी खंत होती की पालकांचा योग्य सहभाग मिळत नाही ती खंत कमी होऊ लागली.

अनेक शालेय योजनांमध्ये पालकांनी चांगल्या बाबी सुचवल्या.काही पालकांनी अनुपस्थित राहणाऱ्या आपल्या शेजारपाजारच्या मुलांसाठी विशेष प्रयत्न करून त्या मुलांना शाळेत नियमित केले.असे सक्रिय योगदान पालकांचे मिळू लागले आणि आमचा उत्साह वाढत गेला.




**सी.एस.आर आणि लोकसहभाग मिळविणे-**

शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानांमध्ये ज्या गोष्टी शक्य होत्या त्या आम्ही करत राहिलो. सोबतच आम्ही सीएसआर मिळविण्याच्या प्रयत्नात राहिलो. आमच्या शाळेत आठवीपर्यंतचे वर्ग आणि 250 च्या पुढे

पटसंख्या राहत असल्याने आम्हाला स्वच्छतागृहांची आणि विशेषतःबंदिस्त स्वच्छतागृहांची फार गरज होती. त्यासाठी केंद्रप्रमुखांच्या पुढाकाराने आम्हाला एअर इंडिया एक्सप्रेस या कंपनी द्वारा फंडिंग झालेला आय ए एच व्ही या संस्थेचा सीएसआर मिळाला व मुलांसाठी आणि मुलींसाठी बंदिस्त स्वच्छतागृहांची व्यवस्थित सोय झाली शिवाय उर्दू केंद्रातील सर्व शिक्षकांनी मिळून 70000/- लोक सहभाग जमा केला आणि शाळेसाठी मजबूत आणि भव्य प्रवेशद्वार उभे केले.






**अध्ययन स्तर निश्चिती व मूलनिहाय नियोजन -**

भौतिक सुविधांच्या बाबतीत काम सुरू असतानाच गुणवत्तेसाठी देखील कसून काम करण्याचे माझ्या पूर्ण टीमने ठरवले. जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था नंदुरबार व जिल्हा परिषद शिक्षण विभाग नंदुरबार यांच्या प्रेरणेने अध्ययन स्तर निश्चिती करून प्रत्येक मुलाच्या शिकण्याचा स्तर समजून घेतला, शाळेतील विद्यार्थ्यांचे आणि प्रत्येक वर्गाच्या प्रत्येक मुलाच्या प्रत्येक विषयाचे मूलनिहाय नियोजन आम्ही केले. त्यानुसार गट अध्ययन, जोडी अध्ययन आणि स्वतंत्र मार्गदर्शन या प्रक्रियेतून प्रत्येक मुलास आम्ही या घटकेला शिकते केलेले आहे हे सांगताना मला अभिमान वाटतो. मूलनिहाय नियोजन करताना प्रत्येक वर्गशिक्षकाने पालकांचा सक्रिय सहभाग घेतला आणि पालकांनी देखील मुलांच्या शिकण्याला चांगला पाठिंबा दिला. गुणवत्तेसाठी शाळा वैकासिक दिशेने, गतीने जात आहे हे आम्ही निश्चितपणे सांगू शकतो.



**शैक्षणिक साहित्याची मांडणी व वापर -**

शाळेला मुबलक प्रमाणात शैक्षणिक साहित्य प्राप्त झालेले असून त्या साहित्याच्या मांडणी विषयी काही विचार झालेला नव्हता; परंतु साहित्य मांडल्याशिवाय वापरात येणार नाही ह्या एका विचाराने प्रत्येक वर्गात, वर्गाच्या शिकण्याच्या स्तरानुसार साहित्य मुलांचा सहज हात पोहोचेल अशा स्वरूपात मांडले गेले.

साहित्य वापराच्या शाळास्तर, केंद्रस्तर कार्यशाळा होतात त्यातून साहित्याच्या वापरातून मुलांचे शिकणे सोपे आणि सहज कसे होते हे समजले. सध्या प्रत्येक वर्गात आवश्यक शैक्षणिक साहित्य अतिशय व्यवस्थितरीत्या लेबलिंग करून मांडण्यात आलेले आहे व त्याचा नियमित वापर स्वतः मुले करतात. त्याचप्रमाणे फरशीवरील रंगकाम करून फरशी देखील मुलांना शिकण्यासाठी उपलब्ध करून दिलेली आहे.

**परसबाग निर्मिती** –

शाळेच्या मागील बाजूस शाळेच्या मालकीची बरीच मोठी जागा आहे; परंतु ही जागा बंदिस्त नसल्याने कधीही चांगल्या कामासाठी वापरली गेली नाही. मी व माझ्या शिक्षकांनी असा विचार केला की सर्वप्रथम ही जागा बंदिस्त करावी. स्वखर्चाने तारेचे कुंपण करून ती जागा बंदिस्त केली व आजच्या घडीला या जागेत अत्यंत आधुनिक तंत्रासह परसबागेची निर्मिती करण्यात आलेली आहे.या परसबागेत तेरा प्रकारचे भाजीपाल्यांचे विविध वाण उत्पादन आहेत.या भाजीपाल्यांचा विद्यार्थ्यांच्या रोजच्या मध्यान्ह भोजनात वापर होतो. तसेच जास्तीचा असणारा भाजीपाला मुले स्वतः विक्री करतात व त्याचा लेखाजोखा ठेवतात. बागेची संपूर्ण माहिती मुले देतात. परस बागेला लागूनच औषधी वनस्पतींची बाग आम्ही तयार केलेली आहे. या बागेत वीस उपयुक्त औषधी वनस्पतींचे उत्पादन होते.परसबाग व औषधी वनस्पतींच्या माध्यमातून मुलांच्या शिकण्याला देखील मदत होते व निसर्गाप्रती मुलांना आवश्यक असलेल्या भावनिक बुद्धिमत्तेचा देखील विकास होतो.






**सर्वांगीण विकासासाठी इतर सुविधा –**



**वाचनालय -**

शाळेत अतिशय सुसज्ज असे वाचनालय असून वाचनालयात, 1200 पेक्षा अधिक पुस्तके आहेत वाचनालयात एका वेळी कमीत कमी 15 मुले बसू शकतील अशा पद्धतीने टेबल व खुर्च्यांची रचना केलेली आहे. विद्यार्थी जी पुस्तके तिथे येऊन वाचतात त्यांची नोंद त्यांच्यापैकीच विद्यार्थी घेत असतात. इ-लायब्ररी देखील येथे उपलब्ध आहे तसेच पहिली ते चौथीच्या वर्गातील मुलांसाठी प्रत्येकाच्या वर्गात दोरीवरील वाचनालय उपलब्ध आहे. उर्दू वाचन कार्यक्रमांतर्गत स्टोरी विव्हर सारख्या प्लॅटफॉर्मवरून गोष्टींचे वाचन मुले करतात व यामुळे मुलांचे वाचनविश्व विस्तारित होत आहे.







**प्रयोगशाळा -**

आमच्या शाळेत इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतचे वर्ग असल्याने आम्हाला प्रयोगशाळेची नितांत गरज होती. एम पी एस पी मुंबई यांच्याकडून आम्हाला विज्ञान प्रयोगशाळा प्राप्त झाली. या प्रयोगशाळेतील उपलब्ध साहित्याचा वापर मुले स्वतःच करतात कारण येथे प्रत्येक साहित्यावर क्यू आर कोड देण्यात आलेला असून पेन ड्राइव मध्ये प्रत्यक्ष प्रयोगाची पद्धती दिलेलीआहे. स्वतः प्रयोग करून शिकणे मुलांना विज्ञानात आवड निर्माण करणारे ठरत आहे. तसेच वैज्ञानिक दृष्टिकोनास चालना मिळत आहे.

विज्ञान प्रयोगशाळेसोबतच शाळेत उर्दू, इंग्रजी आणि मराठी भाषेच्या प्रयोगशाळा, गणित, समाजशास्त्र प्रयोगशाळा उपलब्ध आहेत. या सर्व प्रयोगशाळांचा अतिशय संयुक्तिक वापर शिक्षक आणि मुले करत असतात. भाषा, गणित व समाजशास्त्राच्या प्रयोगशाळेत स्वतः विद्यार्थ्यांनी देखील साहित्य निर्मिती केलेली आहे.



**व्यावसायिक प्रयोगशाळा -**

शाळेत सुसज्ज अशी व्यावसायिक प्रयोगशाळा उपलब्ध आहे. या प्रयोगशाळेत विविध छोटे उद्योग शिकण्यासाठी मुलांना प्रशिक्षण देण्याच्या सोयी उपलब्ध आहेत. अत्यंत अद्ययावत स्वरूपात असलेल्या या व्यवसाय प्रयोगशाळेत आधुनिक प्रकारची साधन सामग्री उपलब्ध असून तिच्या वापरासाठी प्रत्येक साहित्याबाबत किंवा उपकरणाबाबत व्हिडिओ देण्यात आलेले आहेत. त्यांची मदत घेत मुले या प्रयोगशाळेतून व्यवसायांचे शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी या सर्व बाबी खूप मदतीच्या ठरत आहेत.










अशाप्रकारे पीएमश्री जिल्हा परिषद उर्दू केंद्र शाळा अक्कलकुवा नंबर 2 या शाळेचा भौतिक स्वरूपात संपूर्ण कायापालट होत असताना विद्यार्थी गुणवत्तेत आणि शिक्षक सक्षमीकरणात देखील शाळेने उंच भरारी घेतलेली आहे.

शाळेच्या या विकासात मला माझ्या शाळेची शाळा व्यवस्थापन समिती, माझ्या शाळेचे सर्व शिक्षक, विद्यार्थी आणि सर्व अधिकारी महोदयांची साथ मिळालेली आहे. त्याचप्रमाणे मिपा, छत्रपती संभाजी नगर यांनी आमच्या शाळेच्या यशाची ही यशोगाथा लिहिण्याची आम्हाला संधी दिली याचे आम्हाला खूप समाधान वाटत आहे. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेने ही यशोगाथा लिहिण्यास आम्हाला प्रेरणा दिली. शाळेच्या पुढील प्रगतीत आम्ही सर्व घटक पूर्णपणे सहभाग देऊन शाळेस यशाच्या शिखरावर नेऊ अशी आम्हाला खात्री आहे. धन्यवाद.

----------**----------

## “आनंददायी शिक्षण - आनंददायी शनिवार”

**शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा, येळाकेळी, केंद्र.जामणी, पं.स.सेलू,जि.वर्धा**

**शाळेचा ईमेल आयडी** - yelakeliprimaryschool@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - सौ.मीना रविंद्र कडू
**मोबाईल क्रमांक** - 9673462933
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - meenakadu99@gmail.com





**प्रस्तावना -**

मी, सौ.मीना रविंद्र कडू प्रभारी मुख्याध्यापिका जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येळाकेळी या शाळेची सेवा जेष्ठ शिक्षिका. माझी प्रथम निवृत्ती १९ ऑक्टोबर १९९३ मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा हिंगणी, पंचायत समिती सेलू येथे झाली. ८ वर्ष मी या शाळेत अध्यापन कार्य केले. त्यानंतर सन २००१ मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा सालोड हिरापूर, पं.स. वर्धा येथे विनंती बदली झाली. या शाळेत ११ वर्ष अध्यापन कार्य केले. नंतर मी २०१२ मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा, तळेगाव टा. येथून जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा येळाकेळी पंचायत समिती, सेलू येथे झाली. याठिकाणी माझ्या नोकरीची ही विशेष नोंद घेण्याबाबतची गोष्ट म्हणजे माझ्या प्रथम नियुक्तीपासून ते सर्व बदल्यांमध्ये मला मिळालेल्या शाळा ह्या कन्या शाळाच होत्या.

माझ्यासोबत सौ चंदा हिरामण कंडे, सौ विश्रांती राजेंद्र मस्के, सौ.ज्योती नंदकिशोर झाडे यांची सुद्धा २०१८ मध्ये याच शाळेत ऑनलाईन बदली झाली. त्याचप्रमाणे सन २०२३ मध्ये कल्पना तेलरांधे व मार्च २०२४ मध्ये सौ अनिता मेश्राम ह्या सुद्धा बदलीने येळाकेळी शाळेत आल्या. त्यामुळे या शाळेत आम्हा सर्व शिक्षकांना चांगल्या कामाची सुरुवात करण्यायोग्य परिस्थिती होती. विद्यार्थ्यांची शाळेत येण्याची अनियमितता, शाळेबद्दल भीती पाहून आणि सर्व शिक्षिकांनी विद्यार्थ्यांसाठी काय चांगले करता येईल व विद्यार्थी शाळेत कसा टिकेल यासाठी प्रयत्न करायला सुरुवात केली. मुलांसाठी काय चांगले करता येईल हीच भावना मनात ठेवून चौघीजणी शिक्षिका कामाला लागलो. प्रथमतः मुलांची उपस्थिती वाढविणे हे आमच्या समोर मोठे आव्हान होते. कारण या शाळेत येणारे बहुतांश मुले ही गिट्टी खदान परिसरातील असल्याने त्यांचे पालक वीटभट्टी व गिट्टी खदान या ठिकाणी काम करणारे व शिक्षणाविषयी कसलीही आस्था नसणारे पालक असल्यामुळे आम्ही पालकभेटी, पालकसभा, शाळा व्यवस्थापन समिती सहभाग व विविध आनंददायी उपक्रमांच्या माध्यमातून पालक व विद्यार्थ्यांमध्ये शाळेबद्दलचे आकर्षण वाढविण्यासाठी जोमाने सुरुवात केली व विद्यार्थ्यांना आनंददायी पद्धतीने शिक्षण देण्याचे ठरविले.

# येळाकेळी शाळेचा इतिहास

येळाकेळी हे अगदी जिल्ह्याच्या ठिकाणाला लागून असलेले सेलू तालुक्यातील एक गाव. येथील लोकसंख्या ४५०० इतकी असून या गावात जिल्हा परिषद शाळेसोबतच इतर नावारूपाला आलेल्या चार इंग्रजी माध्यमांच्या शाळा आहेत. तसेच इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत इयत्ता असलेले यशवंत माध्यमिक विद्यालय सुद्धा या गावात आहे. हे गाव धाम नदीच्या अगदी तीरावर बसलेले आहे.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येळाकेळी या शाळेची स्थापना सन १८८५ झाली असून त्यावेळी या शाळेचे नाव 'जनपद माध्यमिक शाळा' असे होते. ही शाळा त्यावेळी इयत्ता १ ली ते १० वी वर्गापर्यंत होती. त्यावेळी आजूबाजूच्या गावातील विद्यार्थी शिक्षणासाठी याच शाळेत यायचे. काही काळानंतर 'यशवंत विद्यालय' स्थापन झाले व जिल्हा परिषद शाळेत फक्त इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच वर्ग भरायला लागले.

इ. सन १९६० पासून मुलांची व मुलींची शाळा एकाच आवारात भरायला सुरुवात झाली. एक मुलांची शाळा म्हणजे जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा (मुले) व दुसरी जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा (मुली) असे नामकरण झाले. काही काळानंतर म्हणजेच जून २०१९मध्ये सन्माननीय पंचायत समिती सदस्य श्रीमान बंडूभाऊ गव्हाळे यांच्या विशेष प्रयत्नाने या दोन्ही शाळेचे एकत्रीकरण झाले व शाळेचे नाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येळाकेळी असे नामकरण करण्यात आले

शाळेची पूर्वस्थिती



शाळेची आताची स्थिती



**शाळेत राबविण्यात आलेले आनंददायी उपक्रम**




**वृक्षारोपण व फुलझाडांची लागवड**

**मी व माझे झाड -**

विद्यार्थ्यांना निसर्गप्रेम तसेच वृक्षांचे महत्त्व पटवून देण्यासाठी तसेच वृक्ष लागवडीचे महत्त्व समजावून देण्याच्या दृष्टीने, सोबतच शाळेचा परिसर सुंदर व आकर्षक करण्यासाठी हा उपक्रम हाती घेतला. सुरुवातीला पोषण आहार मदतनीस व पोषण आहार शिजवून देणाऱ्या महिला यांच्या सोबत चर्चा केली. त्यांची फार मोठी मदत या उपक्रमाच्या यशस्वीतेकरिता होणार होती. परंतु त्यांचे मत जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता, त्यांनी या शाळेच्या परिसरात फुलझाडे किंवा फळझाडे वाढविणे हे फार मोठे जिकरीचे काम असल्याचे व झाड या ठिकाणी टिकू शकत नाही असे सांगितले. पण आम्ही सर्व शिक्षिका निराश न होता वृक्ष लागवड करून परिसराचे सौदर्यीकरण करायचे या निश्चयावर ठाम होतो. सुरुवातीला पांढरी व गुलाबी सदाफुलीची रोपे लावली. ती थोडी मोठी झाल्यावर गुलाब, मोगरा, जास्वंद, कनेर व चक्री फुलझाडांची लागवड केली. यानंतर गावातील समाजसेवक, ग्रामपंचायत सरपंच, सदस्य, तसेच ग्रामविकास अधिकारी वृक्षप्रेमी संघटना, बचत गट यांच्याशी चर्चा केली त्यांना या उपक्रमाविषयी पूर्वकल्पना देऊन आपणास सर्वांच्या सहकार्याने वृक्ष लागवड करायची आहे, शाळेचा परिसर सुंदर करावयाचा आहे असे सांगितले. सर्वप्रथम ग्रामपंचायत सरपंच व ग्रामविकास अधिकारी यांचेकडे वृक्ष लागवडी करता रितसर अर्ज केला. अवघ्या काही दिवसातच त्यांनी आम्हाला काही झाडांची रोपटी पुरविली. तसेच झाडे लावण्याकरता सिमेंट व विटांच्या काऱ्या करून दिल्या व त्यांना रंगरंगोटी सुद्धा करून दिली. इतर काही फुलझाडे आम्ही सर्व

शिक्षिकांनी स्वखर्चाने विकत आणून वृक्ष लागवडीचे काम सुरू केले. जुलै २०१८ मध्ये पावसाळ्याच्या सुरुवातीला वृक्ष लागवड केल्यामुळे अगदी थोड्या कालावधीत शाळेचा परिसर आकर्षक, सुंदर आणि हिरवागार दिसायला लागला. झाडे लावण्याकरता विद्यार्थ्यांना सुद्धा आनंद वाटायला लागला. मुलांनी सुद्धा आपआपल्या घरून विविध झाडांच्या फांद्या आणल्या व स्वतः हातांनी खड्डे करून झाडांच्या फांद्या लावल्या व आनंदाने स्वतः लावलेल्या झाडांची निगा राखू लागले. या वृक्ष लागवडीतून विद्यार्थ्यांनाही विविध झाडांची नावे, विविध आकारांची व रंगाची पाने व फुलांची ओळख झाली. झाडांच्या पानावरून त्या वृक्षांची नावे सांगायला लागली. विविध औषधी, उपयोगी झाडांची माहिती विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून व्हायला सुरुवात झाली. 'एक मूल एक झाड' या नाविन्यपूर्ण आनंददायी उपक्रमामुळे विद्यार्थी स्वतःच आपल्या झाडाचे संगोपन करायला लागले.

**फलप्राप्ती** या उपक्रमातील वृक्षप्रेम, संगोपन, श्रमदान, श्रमप्रतिष्ठा, निसर्गप्रेम इत्यादी मुल्ये विद्यार्थ्यांमध्ये हळूहळू रुजायला सुरुवात झाली.



**ज्ञानरचनावादातून शिक्षण**

ज्ञानरचनावाद म्हणजे कृतीयुक्त शिक्षण. विद्यार्थी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष आपल्या परिसरातील उपलब्ध साहित्याचा उपयोग करून अनुभवातून शिक्षण घेतो व ते शिक्षण तो स्वतःच्या अनुभवातून शिकत असल्यामुळे ते त्याच्या चिरकाल स्मरणात राहते. या उपक्रमाचा उपयोग आम्ही विद्यार्थ्यांच्या विकासाकरिता मोठ्या प्रमाणात करून घेतला. यासाठी आम्ही परिसरातील उपलब्ध साहित्याचा वापर करून घेतला . उदाहरणार्थ शंख, शिंपले, काड्या, खडे, चिंचोके, मणी, बाटलीची झाकणे, रिकाम्या आगपेट्या इत्यादी साहित्याचा वापर करून गणिताच्या व भाषिक संकल्पना स्पष्ट करण्यासाठी आम्हाला या साहित्याची फार मोठी मदत झाली. विद्यार्थी हसतखेळत शिक्षण घेत असल्यामुळे याचा उपयोग विद्यार्थ्यांच्या उपस्थितीवर सुद्धा झाला. विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती वाढली. विद्यार्थी कृतीयुक्त शिक्षणातून शिक्षण घेऊ लागले. पूर्वज्ञानाच्या आधारे जेव्हा नवीन संकल्पनांची विद्यार्थी रचना करतो तेव्हा त्यातून त्याचे अध्ययन घडते यालाच ज्ञानरचनावाद असे म्हटले जाते. विद्यार्थी स्वतः वैयक्तिकरित्या, अथवा सामुहिकरित्या ज्ञानाची निर्मिती करत असतो. या उपक्रमासाठी आम्ही सर्व शिक्षिका व सोबतीला पालकांच्या मदतीने विविध साहित्याची जुळवाजुळ करून त्या साहित्याचा उपयोग विद्यार्थ्यांच्या विविध संकल्पना स्पष्ट करण्याकरिता करून घेतला.

**योग प्राणायाम व कवायत उपक्रम** -

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधने हे शिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट असून यासाठी आमच्या शाळेत योग, प्राणायाम व कवायती या उपक्रमाची अंमलबजावणी नियमितपणे केली जाते. विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासासोबतच त्यांना एकाग्रता, मनाची स्थैर्यता, मनःशांती दर्जेदार शिक्षणाकरिता आवश्यक बाब आहे. यासाठी आम्ही आमच्या शाळेत दर शनिवारी कवायत सोबतच प्राणायाम व योगासन याचा सुद्धा सराव करून घेत आहोत. यासाठी बरेच वेळा योग शिक्षकांची सुद्धा मदत घेत असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांची चंचलता कमी होऊन मुलांमध्ये एकाग्रता वाढलेली आहे. कपालभाती, अनुलोम-विलोम, उज्जयी, भ्रामरी यासारखे प्राणायाम व विविध शारीरिक हालचाली सुद्धा करून घेतल्या जातात. या उपक्रमाचा फार मोठा फायदा आम्हाला विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती करता झालेला आहे. 'सुदृढ शरीर म्हणजे सुदृढ मन'. विद्यार्थ्यांना ज्ञानर्जन करण्याकरिता प्राणायाम, योगासन यांचा खूप मोठा फायदा होतो. तसेच विद्यार्थी आजारी पडण्याचे प्रमाण सुद्धा कमी झाल्यामुळे त्यांची शैक्षणिक प्रगती चांगल्या प्रकारे होत आहे.

**फलप्राप्ती** - बहुतांश मुलांचा स्वभाव चंचल असतो. त्यांचे मन अस्थिर असल्यामुळे शिकविताना किंवा शिकताना अडचण होते. यासाठी मुलांची एकाग्रता वाढविण्याकरिता व मुलांची बौद्धिक पातळी उंचावण्यासाठी या उपक्रमाचा फार मोठा फायदा आम्हाला होत आहे.



**बडबडगीते, गायन व नृत्याद्वारे शिक्षण -**

मुळातच विद्यार्थ्यांचा स्वभाव चंचल व अस्थिर असतो आणि विद्यार्थ्यांना शिक्षणात तोचतोपणा हा पण कंटाळवाणा वाटतो. त्यासाठी त्यांना वेगवेगळ्या उपक्रमांच्या माध्यमातून तसेच बडबडगीत गायन, नृत्य इत्यादी माध्यमाचा वापर करून शिक्षण घेण्यात रुची असते. याच बाल मानसिकतेचा उपयोग करून आम्ही आमच्या शाळेत यानावीन्यपूर्ण उपक्रमाची सुरुवात केली. नृत्याद्वारे शिक्षणासाठी आमच्या शाळेतील मी व सौ. विश्रांती मस्के आम्ही दोघींनी मिळून छोटी छोटी बडबडगीते नृत्य व गायन याचा शाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सांस्कृतिक प्रगती करता उपयोग करून घेतला. विविध शैक्षणिक गीतांद्वारे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत सोबतच त्यांच्या आवडीचे गाणे म्हणून नृत्य असल्यामुळे विद्यार्थी आवडीने शिक्षण प्रक्रियेत रमू लागलेली आहेत. यामुळे विद्यार्थी उपस्थितीचे प्रमाण सुद्धा वाढले व विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती सातत्याने वाढविण्यास या उपक्रमाचा आम्हाला फायदा झाला. यासोबतच गेल्या सत्रापासून आनंददायी शनिवार, दप्तराविना शाळा अशा शैक्षणिक पूरक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती करता फार मोठा फायदा

आम्हाला झालेला आहे, दर शनिवारी विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थी आनंददायी शिक्षण घेत आहेत. जसे गेल्यात शनिवारी आम्ही परिसर भेट एक दिवसीय सहलीचे आयोजन केले. त्यावेळी संपूर्ण विद्यार्थी उपक्रमात सहभागी झाले होते. यात काही मुले अबोल व लाजरी बुजरी आहेत त्यांनी सुद्धा या सहलीत सहभाग घेऊन आपापल्या सुप्तगुणांचे सादरीकरण करून दाखवले.

**फलप्राप्ती -**

एकंदरीत जे विद्यार्थी अबोल किंवा लाजऱ्या स्वभावाची असतात त्यांचा बुजरेपणा कमी करण्यासाठी सोबतच अशा मुलांना बोलके करण्यासाठी बडबड गीते, गायन, नृत्य व त्याद्वारे शिक्षण उपक्रम खूपच फलदायी होत आहेत.



**कला व कार्यानुभव अंतर्गत शिक्षण -**

विद्यार्थ्यांच्या शिक्षणात आणि विकासात कला महत्त्वाची भूमिका बजावते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि यशासाठी शाळांमध्ये कला या विषयाचे शिक्षण देणे महत्त्वाचे आहे. हे त्यांना सर्जनशील आणि आकर्षक पद्धतीने वाढण्यास, शिकण्यास आणि आधुनिक जगात यश मिळवण्यास मदत करते. यासाठी आम्ही आमच्या शाळेतील उपक्रमशील शिक्षिका सौ. कल्पना तेलरांधे ज्यांचा नावलौकिक कल्पनाची आयडिया आहे अशा सर्जनशील शिक्षिका यांनी विद्यार्थ्यांना 'टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू बनविणे' उपक्रमाद्वारे त्यांनी मुलांकडून विविध वस्तूंची निर्मिती करून घेतलेली आहे. विद्यार्थी सुद्धा अगदी मनोरंजक

पद्धतीने टाकाऊ वस्तु पासून विविध नाविन्यपूर्ण वस्तू तयार करण्यात पारंगत होत आहेत. त्यामुळे आज आम्हाला काय नवीन शिकायला किंवा नवीन वस्तू तयार करायला मिळणार आहे या ओढीने नियमितपणे शाळेत पूर्ण वेळ उपस्थित राहत आहेत. त्याचा परिणाम म्हणजे विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती शंभर टक्के असते. या सोबतच शाळेमध्ये  चित्रकला, रंगकाम, मातीच्या विविध वस्तू, विविध प्राणी, खेळणी तयार करण्याचे शिक्षण दिले जात आहे, यातून मुलांना व्यावसायिक शिक्षणाकडे आकर्षित करणे सोबतच दिवाळीच्या सुरुवातीला आकर्षक दिवे तयार करणे, पतंग तयार करणे, मुकुट तयार करणे यासारखे शिक्षण विद्यार्थ्यांच्या भावी जीवनासाठी फार उपयोगाचे होत आहे.





**शाळेत राबविलेले इतर उपक्रम -**












----------**----------

# “व्यावसायिक शिक्षणातून विद्यार्थी व शाळा विकास”

## शाळेचे नाव व पत्ता - सरस्वती विद्यालय,धोंडगाव ता.समुद्रपूर जि.वर्धा

**शाळेचा ईमेल आयडी** – hmsarswativdy@gmail.com
**मुख्याध्यापकाचे नाव** - श्री.अतुल.म.देवढे
**मोबाईल क्रमांक** – 9130461644/9421726687
**मुख्याध्यापकाचा ईमेल आयडी** - deodheatul@gmail.com




**प्राथमिक माहिती -**

सरस्वती विद्यालय धोंडगाव ही शाळा समुद्रपूर तालुक्यात ग्रामीण भागात वसलेली शाळा असून या शाळेत सभोवतालच्या ६ ते ७ खेड्यातील विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी येतात. त्यांच्या पालकांचा व्यवसाय प्रामुख्याने शेती व शेतीसबंधी कामे हा आहे. शालेय परिसर हा जवळपास ३.७५ एकर एवढया जागेने व्यापला आहे. त्यातील जवळपास २ एकर जागा पडीत स्वरुपात होती ज्यात निरुपयोगी कचरा वाढत होता. त्याचा त्रास विद्यार्थ्यांना होत होता. त्या जागेचा वापर करण्याचा मानस मुख्याध्यापकांनी व्यवस्थापनाला बोलून दाखविला व या जागेत कृषी व त्यासबंधी इतर व्यावसायिक शिक्षण विद्यार्थांना देवून त्यातून शाळेकरिता उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण करायचे ठरविले. या उपक्रमाला नविन शैक्षणिक धोरणानुसार “ व्यावसायिक शिक्षणातून विद्यार्थी व शाळा विकास” असे नाव दिले. सत्र २०२४ -२५ या कालावधीत हा उपक्रम राबविण्याचे ठरविले.

**उपक्रमपुर्व स्थिती -**

कृषी व त्यासबंधी इतर व्यावसायिक शिक्षण विद्यार्थ्यांना देण्याच्या अगोदर शाळेतील पडिक २ एकर जागा निरुपयोगी कचऱ्याने व्यापलेली होती. ज्यात साप,विंचू तसेच इतर किटक असायचे. त्याचा त्रास व धोका विद्यार्थ्यांच्या जीविताला होता. तसेच शालेय पोषण आहाराकरिता भाजीपाला विकत घ्यावा लागायचा. त्यासाठी शासनाने दिलेल्या अनुदानापेक्षा जास्त निधी खर्च व्हायचा. विद्यार्थी जरी शेतकरी कुटुंबातील असला तरी

शेतकऱ्याच्या कष्टाची व होणाऱ्या हालअपेष्टेची प्रत्यक्ष जाणीव त्यांना करून देणे गरजेचे होते. शाळेतुन उत्पन्न मिळत नाही. त्यामुळे शिक्षकांना व व्यवस्थापनाला स्वत:च्या जवळून शाळेसाठी खर्च करावा लागायचा. प्रत्यक्ष शेती करतांना कोणत्या समस्येला सामोरे  जावे लागते याचे ज्ञान विद्यार्थ्यांना नव्हते.




**उपक्रमोत्तर स्थिती -**

या उपक्रमात जवळपास दिड एकर जागेत कापूस या पिकाची लागवड करण्यात आली. उर्वरित जागेत परसबाग व गांडूळखत निर्मिती प्रकल्प सुरु करण्यात आला.या उपक्रमात ८,९ व १० चे सर्व विद्यार्थी सहभागी झाले. त्यांना जमिनीची माहिती, पिकांची माहिती, हवामानाची माहिती तसेच इतरही शेती विषयी माहिती प्राप्त झाली. सर्व विद्यार्थी एकावेळी कार्य करू लागल्याने सामुहिक शेती ही संकल्पना फायदेशीर ठरू शकते. ही जाणीव त्यांना झाली. एकत्र व कामचुकारपणा न करता काम केले तर कमी वेळात जास्त काम होऊन त्याचा लाभ उत्पन्नात होतो. हे विद्यार्थ्यांना शिकायला मिळाले. परसबागेतून निघणारा भाजीपाला शालेय पोषण आहारात वापरला जाऊ लागला. गांडूळखत तयार होत असल्याने परिसरातील झाडाचा कचरा त्यात टाकल्या जावू लागला. परिसर स्वच्छ झाला.

पहिल्यांदा वेचलेला कापूस जवळपास ४.५० क्विंटल इतका भरला ज्याची अंदाजे किंमत ३५,००० रु. इतकी होती. जवळपास संपूर्ण एक लक्ष रुपये किंमतीचे उत्पन्न शाळेला प्राप्त झाले. विद्यार्थी या प्रक्रियेत सहभागी असल्या कारणाने खर्च खूप कमी झाला. यातून विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत व्यावसायिक शिक्षणाचे महत्व पटले. शेती करिअरचा भाग होवू शकते हे पटले आणि शेतकऱ्याच्या कष्टाची सुद्धा विद्यार्थ्यांना जाणीव झाली.

**संदर्भ व निवडक छायाचित्रे -**

या व्यावसायिक शिक्षणामध्ये ‘कृषी संजीवनी’ या लेखक डॉ. राजेंद्र सरकाळे यांच्या पुस्तकाची मदत झाली. तसेच गांडूळ खत निर्मिती विषयी युट्युब वरून माहिती मिळवली. शिवणकाम व फॅशन डिझायनिंग या पुस्तकाची शिवणकाम शिकवितांना मदत झाली.





**कृषी (NSQF अनुरूप अभ्यासक्रम)**







नवराष्ट्र

## सरस्वती विद्यालय जिल्ह्यात प्रथम

### मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियान

गिरड,(वा.) मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियानात सरस्वती विद्यालय, धोंडगाव या शाळेने जिल्ह्यातून प्रथम क्रमांक प्राप्त केला. संबंधित शाळेला जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वर्धा येथे पुरस्कार प्रदान करण्यात आला.
यावेळी व्यासपीठावर खा. रामदास तडस, मुख्य कार्यपालन अधिकारी रोहण घुगे, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य मंगेश घोगरे, शिक्षणाधिकारी डॉ. नितू गावंडे प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते सरस्वती विद्यालयाला पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. शाळेच्यावतीने लोकेश गुजरकर, प्रा. संदीप झाडे व मुख्याध्यापक अतुल देवढे यांनी सदर पुरस्कार स्वीकारला. याप्रसंगी निखाडे, बुटे, शहाणे, महाकाळकर, समिक्षा मेश्राम, सानिया उमाटे उपस्थित होते.

**प्रास्ताविक -**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी सुरु झालेली आहे. पूर्वीचे शैक्षणिक धोरण आणि या धोरणात प्रामुख्याने दिसून येणारा बदल म्हणजे उच्च प्राथमिक व माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांना दिल्या जाणारे कृषी व पशुपालन या अभ्यासक्रमाचा केलेला समावेश आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये लहान वयापासून आवडीच्या क्षेत्रात कौशल्य विकसित करण्याची संधी मिळेल. तसेच त्यांना या क्षेत्रात प्रत्यक्ष काम करण्याचा

अनुभव मिळेल आणि त्यांना उद्योगाची प्रत्यक्षात जाणीव होईल. शालेय शिक्षणात व्यावसायिक शिक्षणाचा प्रारंभ, व्यावसायिक शिक्षणाला प्रवाहात आनणे, व्यावसायिक शिक्षणासाठी तंत्रज्ञानाचा वापर करणे, बहुविध कौशल्य विकास करणे, स्थानिक कौशल्यांवर आधारित अभ्यासक्रम, उद्योग व शाळा भागीदारी,उच्च शिक्षणाशी जोडणी,राष्ट्रीय कौशल्य पात्रता चौकट (NSQF) लागू करणे, व्यावसायिक शिक्षणाचे प्रशिक्षण, शालेय अभ्यासक्रमात व्यावसायिक शिक्षणाचे एकत्रीकरण अशा शिफारशी नविन शैक्षणिक धोरणात करण्यात आल्या आहे.

सरस्वती विद्यालय धोंडगाव या शाळेने आपल्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना नविन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेती तसेच शेतीसबंधी जोडव्यवसायाचे प्रशिक्षण देण्यासाठी कृषी व गांडूळ खत निर्मिती प्रकल्प सुरु करण्याचे ठरविले. व त्याची सुरुवात सत्र २०२४ -२५ मध्ये केली. या शालेय शिक्षणामध्ये व्यावसायिक शिक्षणाचा समावेश करून, विद्यार्थ्यांना लहान वयातच विविध व्यावसायिक कौशल्यांची ओळख करून देणे, त्यांना रोजगारक्षम बनवणे आणि देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी कुशल मनुष्यबळ तयार करणे, असा उददेश शाळेचा हा अभ्यासक्रम सुरु करण्यामागे आहे.

**गरज व महत्व -**

1. नविन शैक्षणिक धोरणात व्यावसायिक शिक्षण समाविष्ट होत असल्याने विद्यार्थ्यांना त्या बाबत ज्ञान अवगत करून देणे गरजेचे होते.
2. शाळा चालवितांना आर्थिक अडचण दुर करण्यासाठी व्यावसायिक शिक्षणातून उत्पन्नाचे साधन तयार करणे.
3. शालेय परिसरात असलेली पडीक जमीन उपयोगात आणणे.
4. विद्यार्थ्यांमध्ये एकता निर्माण करणे.
5. कष्टाचे महत्व लक्षात आणून देणे.
6. शेतकऱ्याच्या तसेच व्यावसायिकांच्या कष्टाची जाणीव करून देणे.
7. व्यावसायिक शिक्षणातून करिअरच्या विविध संधींची जाणीव करून देणे.

**नियोजन -**

शाळा समिती सरस्वती विद्यालय धोंडगाव, तसेच शाळा व्यवस्थापन समिती सरस्वती विद्यालय धोंडगावच्या सभेमध्ये ठराव पारित करून सत्र २०२४ -२५ मध्ये NSQF अनुरूप कृषी, गांडूळ खत निर्मिती व शिवणकाम हे अभ्यासक्रम सुरु करण्याचे ठरले. त्यानुसार शालेय मंत्रीमंडळात विद्यार्थ्यांनी या तीनही उपक्रमाबाबत सकारात्मक चर्चा करून नियोजन केले. यात श्री.बुटे सर यांनी कृषी व गांडूळ खत निर्मिती आणि श्री.निखाडे सर यांनी शिवणकाम या व्यावसायिक शिक्षणाविषयी अभ्यासक्रम तयार करून त्याच्या तासिका अतिरिक्त तासिकेऐवजी घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे ठरले.

कृषीच्या व्यावसायिक शिक्षणाविषयी हवामान व जमिनीच्या पोत (प्रकार) नुसार बियाण्याची निवड, लागवडीचे तंत्रज्ञान, उगवलेल्या पिकाची निगा राखणे. सेंद्रिय खताचा वापर व महत्व यानुसार कापूस व परसबागेमध्ये भाजीपाल्याचे उत्पन्न घेण्याचे नियोजन करण्यात आले. केलेल्या नियोजनानुसार विद्यार्थ्यांकडून कार्यवाही करून घेण्यात आली.

**गांडूळ खत निर्मिती -**

सरस्वती विद्यालयाच्या परिसरात अनेक मोठी झाडे आहेत. त्यापासून पालापाचोळा हा मोठ्या प्रमाणात साचतो. त्याची विल्हेवाट लावणे व शेतीसाठी आवश्यक सेंद्रिय असे गांडूळ खत निर्मिती करण्याचे नियोजन करण्यात आले. केलेल्या नियोजनानुसार विद्यार्थ्याकडून कार्यवाही करून घेण्यात आली.

**शिवणकाम -**

मुली व आवड असणाऱ्या मुलांकरीता दोन शिलाई मशिन व एक पिको फॉल मशिन खरेदी करून शिकविण्याकरिता गावातील सौ. माधुरी कोल्हे व स्वयंसेविका सौ.कृतिका महाकाळकर यांनी मार्गदर्शन करण्याचे नियोजन करण्यात आले. केलेल्या नियोजनानुसार विद्यार्थ्याकडून कार्यवाही करून घेण्यात आली.



**गांडूळ खत निर्मिती (कचरा व्यवस्थापन)**



**शिवणकाम (NSQF अनुरूप अभ्यासक्रम)**

**फलनिष्पत्ती -**

विद्यार्थ्यांना कृषी या अभ्यासक्रमातून कृषीक्षेत्रात पारंपारिक पद्धती ऐवजी आधुनिक पद्धत कशी प्रभावी आहे. हे शिकायला मिळाले. सर्व विद्यार्थी सहभागी झाल्याने जास्त काम कमी वेळात पार पडले व त्रास कमी झाला. यातून समूह शेतीबद्दल आवड निर्माण झाली. जवळपास ११ क्विंटल कापसाचे उत्पन्न झाले. खर्च वजा जाता शाळेला ६०,००० हजार रु. निव्वळ नफा मिळाला व तो आपल्या मेहनतीने आपण मिळविला याचा आनंद कर्मचारी व विद्यार्थ्यांना झाला.

परसबागेतील भाजीपाल्याने शालेय -पोषण आहार समृद्ध झाला. व अधिक पोषक आहार विद्यार्थ्यांना मिळू लागला. यातून विद्यार्थ्यांना भूमिती, गणित, भूगोल, विज्ञान या विषयाविषयी प्रात्यक्षिकातून अधिक ज्ञान प्राप्त होवू लागले.

**गांडूळ खत -**

गांडूळ खत निर्मितीतून शेतजमिनीला लागणारे खत तयार झाले.पुढील वर्षी या खताचा वापर करून शेतजमीन अधिक समृद्ध व सुपिक होईल.

**शिवणकाम -**

या उपक्रमातून मुली, आवड असणाऱ्या मुलांसाठी या व्यवसायाविषयी प्राथमिक माहिती प्राप्त झाली. मुलीसाठी या व्यवसायातून करिअरच्या विविध संधी कश्या उपलब्ध होवू शकतात. या विषयी माहिती मिळाली.

**समारोप -**

नविन शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्याला भविष्यातील कामगार न बनविता व्यावसायिक म्हणून जीवन जगता यावे. या दृष्टीकोनातून व्यावसायिक शिक्षण अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आले. सरस्वती विद्यालय, धोंडगाव या शाळेने या शिक्षणातून निर्माण होणाऱ्या नफ्यातून शिक्षणासाठी लागणारे साहित्य खरेदी करण्यासाठी निधी प्राप्त केला. व्यावसायिक शिक्षण आणि शालेय शिक्षण याची सांगड घातली. या उपक्रमांमुळे शाळेने 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' या स्पर्धेत सत्र २०२३-२४ व २०२४-२५ या सत्रात गुणानुक्रमे जिल्ह्यात प्रथम व तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.




----------**----------